# पालि-मराठी शब्दकोश

संपादक
जगन्नाथ विष्णू उर्फ बाबा भारती

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# पालि-मराठी

# शब्द-कोश

– संपादक –

**बाबा भारती** [ गुरुज़ी ]
रा. भा. रत्न
उरुण--इस्लामपूर, जि. सांगली
(महाराष्ट्र)

साहित्य आणि संस्कृती मंडळ
महाराष्ट्र राज्य

इसवी सन,
१९८७

बुद्धाब्द,
२५३१

* प्रथमावृत्ती :

* प्रकाशक :
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
नवीन प्रशासन भवन,
मुंबई–४०० ०३२

* प्रकाशकाधीन (C) :

* मुद्रक :
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामुग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर–४१६ ००३.

* किंमत : रु. ४२६/–

# निवेदन

महाराष्ट्र शासनाच्या साहित्य–संस्कृती मंडळाच्या वतीने बाबा भारती गुरुजी यांनी संपादित केलेला पालि - मराठी शब्दकोश प्रसिद्ध करताना मंडळाला एक मोठे उपयुक्त कार्य केल्याचे समाधान वाटत आहे.

भगवान बुद्धांनी स्थापन केलेला बौद्ध धर्म आणि त्यांचे तत्त्वज्ञान हा भारताचा फार मोठा सांस्कृतिक ठेवा आहे. बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रसार केवळ भारतापुरताच मर्यादित न राहता तो चीन, जपान, ब्रह्मदेश, श्रीलंका अशा अनेक देशापर्यंत जाऊन पोचला. आजही हे देश भारताकडे आपली धर्मभूमी म्हणून प्रेमाने आणि आदराने पाहतात. असे हे बौद्ध वाङ्मय पूर्णतः पालि भाषेत आहे. बौद्ध वाङ्मयाचा अभ्यास पालि भाषेच्या सर्वांगीण अभ्यासाविना होऊच शकणार नाही. या पालि भाषेच्या स्वरुपाविषयी विद्वानांची आणि अभ्यासकांची विविध मते असली तरी पालि भाषा ही एकेकाळी मगध (बिहार), विंध्य प्रदेश या भागातील जनसामान्यांची बोलीभाषा होती यात काही शंका नाही. या बोलीभाषेतूनच भगवान बुद्धांचे सर्व विचार, तत्त्वज्ञान प्रकट झाले आहे. पालि भाषेलाच "मागधी" असेही दुसरे नाव असून मगध देशातील जनसामान्यांची एक प्राचीन प्राकृत भाषा म्हणूनच ती ओळखली जाते.

अशा या प्राचीन भाषेचा अभ्यास आणि परिचय सर्वसामान्य जनतेला आजही फारसा राहिलेला नाही. तो परिचय होणे ही आजची मोठी गरज आहे. कारण बौद्ध वाङ्मय पूर्णपणे पालि भाषेत आहे. ही भाषा म्हणजे भगवान बुद्धाच्या संदेशाचा ठेवाच होय असे मानले जाते. वैदिक भाषेला सर्वात जवळची पालि भाषाच आहे असे अभ्यासक मानतात. त्या दृष्टीने या भाषेचा आधुनिक काळात परिचय आणि अभ्यास होणे आवश्यक आहे. बाबा भारती गुरुजी यांनी पालि - मराठी विस्तृत शब्दकोश तयार करून अभ्यासकांची आणि सर्वसामान्य जनतेची फार मोठी सोय केलेली आहे. म्हणून बाबा भारती जरी आज हयात नसले तरी त्यांनी केलेल्या या कार्याबद्दल मंडळ कृतज्ञ आहे.


**द. मा. मिरासदार,**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# भूमिका

बौद्ध वाङ्मय पूर्णत: पालि भाषेत आहे. बौद्ध वाङ्मयाचा अभ्यास करताना प्रथम पालि भाषा अवगत करून घेणे–शिकणे आवश्यक आहे. कोणतीही भाषा अवगत होण्यास त्या भाषेतील विपुल शब्द-संग्रह परिचितच नव्हे तर व्याकरणदृष्टचा माहीत असणे आवश्यक आहे. तरच त्या भाषेचा अभ्यास होऊन तिच्यातील वाङ्मयीन कलाकृती तत्त्वज्ञान आणि जनसामान्यावर तिचा झालेला इष्टा–निष्ट परिणाम पाहता येईल.

पालि भाषेला "बुद्ध वचन" किंवा "भगवान बुद्धाच्या संदेशाचा ठेवा" असे मानले जाते. बुद्धकाळी पालि भाषा ही सामान्यजनांची बोलीभाषा प्राकृत मानली होती. त्याच भाषेतून भगवान बुद्धानी आपल्याला प्राप्त झालेल्या मानवी जीवनाविषयीची विकसीत, प्रगत व सर्वाभिमुखी सुखशांती देणारी तत्वे प्रतिपादन केली. त्या प्रचारासाठी त्यानी आपल्या अनुयायांना–भिक्खुना जगाच्या कानाकोपऱ्यात पाठविले.

ही पालि भाषा आज जनसामान्यांपासून अनेक कारणांनी अलिप्त राहिली गेली होती. आजच्या समाजाला परत त्याच पालि भाषेची नितांत गरज भासू लागली आहे. तिच्यातील सद्धम्माची शिकवण साऱ्या जगाला आकर्षित करीत आहे. म्हणून पालि भाषेचा आत्मियतेने अभ्यास करणारी तरुणपिढी हिरीरीने सरसावत आहे. परंतु फार काळ पडद्याआड गेलेल्या या भाषेच्या अभ्यासाची सोय उपलब्ध नसल्याने इच्छा असूनही तिच्यापासून वंचित रहावे लागत आहे. ही उणीव दूर करण्याचा मी अल्पसा प्रयत्न करून सदरचा "पालि–मराठी शब्द–कोश" तयार करण्याचा उपक्रम हाती घेतला.

**जगातील काही भाषा–**

भाषांचा सामान्य विचार करताना जागतिकदृष्टचा त्यांचे स्थूलमानाने दोन विभाग मानले जातात. पहिला विभाग पाश्चिमात्य भाषांचा व दुसरा विभाग पौर्वात्य भाषांचा. या दोन्ही विभागातील भाषा काही विद्वान आर्योद्भव भाषा असाव्यात असे मानतात.

पाश्चिमात्य भाषांत ग्रीक, लॅटीन, लिथ्यूनियन, अंग्ल, फिनिश, स्लाव, झेक, रशियन, फ्रेंच, जर्मन वगैरे भाषांचा अंतर्भाव आहे.

पौर्वात्य भाषेत दोन भेद मानतात. त्यात पहिला पौर्वात्य व मध्यपौर्वात्य होय. मध्यपौर्वात्य भाषेत सुरूवातीला हिट्टाइट, कॅसाइट, मिटानी व नंतर खोटान असे भेद होते. मध्यपौर्वात्य भाषेतच आणखी हिब्रू, अरबी, पारशी, तुर्की इत्यादी भाषा येतात. तर पौर्वात्य भाषेत प्राचीन भारताच्या पुश्तु, पालि, पैशाची, अर्धमागधी, शौरसेनी, मागधी वगैरे भाषा असून दक्षिण भारतात द्रविड लोकांच्या तामीळ, तेलगू, मल्याळी, कन्नड, तुळू इत्यादी भाषांचाही समावेश आहे. या स्थूल दृष्टिक्षेपामधून आपणाला पालि भाषेकडे वळता येईल.

**काही पाश्चिमात्यांची पालिविषयी मते–**

**मॅक्सवेलेसर (जर्मन)**–पालि ही पाटलीपुत्राची प्राचीन भाषा आहे. पाटली या शब्दाचे संक्षिप्त रूप पालि असे झाले.

**प्रोफे. ऱ्हीसडेविड्स**– इ. स. पूर्व ७ व्या, ६ व्या शतकात कोसल देशाची जी भाषा होती तिला पालि भाषा म्हणत व तिचाच बोलीभाषा म्हणून सर्वसामान्यत: वापर केला जात असे.

**वेस्टरगार्ड ई कुन्स व प्रोफेसर फ्रँक**–पालि ही भाषा उज्जयनी प्रदेशात बोलली जात होती. तिचे उगमस्थान विंध्य प्रदेश हे आहे कारण गिरनार पर्वताच्या शिलालेखांशी पालिचे जास्त साम्य आहे.

**स्टेन कोनो**–यांचे मतेही पालिचे उगमस्थान विंध्य प्रदेशच आहे. कारण पैशाची या प्राकृत भाषेशी पालिचे अधिक साम्य आहे.

**ओल्डेन बर्ग**–पालि ही कलिंग देशाची भाषा होती. हीच पालि भाषा बौद्ध धम्मप्रचारासाठी कलिंगातून श्रीलंकेत गेली. तिथे धम्माबरोबरच पालि भाषेच्या विस्ताराचे कार्य झपाट्याने झाले.

**जर्मन विद्वान गायगर**–मगधाच्या मागधी भाषेचे प्रमुख रूप म्हणजेच त्या काळची तेथील बोलीभाषा पालि ही होती. तसेच इ. स. पूर्व ६ व्या शतकात मध्ययुगीन भारतीय आर्य भाषेच्या प्रमुख रुपात पालिचा विकास होऊन वैदिक व संस्कृत अशा शाखा निर्माण झाल्या.

**काही भारतीय विद्वानांची मते–**

**पंडीत विधुशेखर भट्टाचार्य**–पालि = पंक्ति, ओळी, बुद्ध वचनाच्या पंक्तिलाच पालि भाषा म्हणत. ती प्राकृत होती व संस्कृत पालिशब्दाचा पर्यायवाची शब्द होय.

**आचार्य बुद्धघोष**–पालि भाषा म्हणजे बुद्ध वचनांची भाषा होय. ती जनसामान्यांची बोलीभाषा असल्यामुळे सर्वापर्यंत पोहचली होती.

**भिक्खु जगदीश काश्यप**–पालि ही प्राकृत बोलीभाषेचा परियाय (पर्याय) असून बौद्ध त्रिपिटकाची ती भाषा होय. अशोकाच्या भाब्रु भाषेतील शिलालेखात त्रिपिटकातील "धम्म परियाय" या शब्दापासून पालिशब्द बनला आहे. बुद्धकालिन मगध देशात सर्रास बोलली जाणारी भाषा पालिच होती असे सिंहली परंपरा सांगते. मात्र मूळ त्रिपिटकांत भाषेचे नाव लिहिल्याचे आढळत नाही.

**यास्क व पाणिनी**–मगध किंवा कोशल या प्रांतात ज्या भाषेने रूप धारण केले होते तिच पालि भाषा होय. आर्यांची बोलीभाषा म्हणून पालिचाच सर्वत्र वापर होत होता. त्याच काळी वैदिक भाषेला या दोघांनी संस्कृत बनवून आर्यांच्या शास्त्र व धर्म यासाठी तिचा (संस्कृतचा) वापर केला.

**आधुनिक काही ग्रंथकारांची मते–**

**"मराठी शब्दरत्नाकर" कै. वा. गो. आपटे** (१९२०)–"पालि ही बौद्धग्रंथांची प्रमुख भाषा होय."

"**हिंदी भाषा शब्दकोश**" **डॉ. रामशंकर शुक्ल** (१९३६)–"बर्मादि देशोंमें संस्कृतसी पाठित–पठित प्राचीन बिहारी भाषा पालि जिसमें बुद्धमत के समस्त ग्रंथ लिखे है।"

"**मराठी व्युत्पतिकोश**" **कृ. पा. कुलकर्णी** (१९४६)– "पालि भाषा म्हणजे आद्य प्राकृत भाषा किंवा भगवान बुद्धाची भाषा होय."

"**विसुद्धिमग्ग आचार्य बुद्धघोषकृतच्या प्रस्तावनेत त्रिपिटकाचार्य**" **भिक्खु धर्मरक्षित** (१९५६)– "पालि साहित्यमें बौद्ध दर्शन के साथ प्रारम्भिक अवस्थासें लेकर सिद्धितक की सारी विधियाँ समाई गई है।"

"**बौद्ध सिद्धांतसार**" **पूज्य १४ वे दलाई लामा** (१९६४)– "पालिमें ही भगवान बुद्धद्वारा उपदिष्ट धर्म समुद्रकी भाँति गम्भिर और अति विस्तृत है।"

"**पालि–हिंदी कोश**" **डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन** (१९७४)– "पालि उत्तर भारत और विशेष रूपसे मगधजनपद की एक प्राचीन प्राकृत भाषा है। इसे मागधी भी कहते है।"

"**भारतीय प्राचीन लोकभाषा परिचय**" **भदन्त एस. परमशान्ति** (१९८३)– "पालि भाषा यह भगवान बुद्धके समयकी भारतीय सामान्य जनोंकी बोलीभाषा (प्राकृत) थी। साथ साथ वह राष्ट्रभाषा भी थी।"

ब्रिटिशांनी हिंदुस्थानात इंग्रजीबरोबर काही अन्य भाषांचा अभ्यासक्रमांत समावेश करून त्यांच्या स्वतंत्र पदवी परीक्षा ठेवल्या. कलकत्ता विद्यापीठाने प्रथम "पालितीर्थ" ही परीक्षा ठेवून ही उपाधी देण्यास सुरुवात केली. नंतर नागपूर विद्यापीठानेही पालिची पदवी परीक्षा सुरू केली. त्यावेळच्या मुंबई विद्यापीठाने १९१० सालापासून मॅट्रिक ते एम. ए. पर्यंतच्या परीक्षांना दुसरी भाषा म्हणून पालि भाषा अभ्यासक्रमात समाविष्ट केली. नंतर नागपूर, बनारस विद्यापीठांनी आपल्या परीक्षांच्या अभ्यासक्रमांत पालि भाषा ठेवली.

सन १९३७ सालापासून मुंबई विद्यापीठाने पालि, संस्कृत व अर्धमागधी या भाषांच्या अभ्यासक्रमात वाङ्मयावर जास्त भर दिला. त्यामुळे पालि-व्याकरण तयार करणे आवश्यक झाले. त्यासाठी प्राचीन कच्चायन, मोगलायन, सद्दनीति, रूप सिद्धी बालावतार या व्याकरणांचा आधार घेऊन मराठीत पालि-व्याकरणाची उभारणी करणे आवश्यक वाटले.

त्या दृष्टीने पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूलमधील पालि व संस्कृतचे शिक्षक "काव्यतीर्थ" व "पालितीर्थ" श्री. नारायण वासुदेव तुंगार यांनी पालि भाषेच्या शिक्षणासाठी "पालि-भाषा-प्रवेश" हे पुस्तक लिहून या पालि अभ्यासक्रमाला गती दिली. हे पुस्तक मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांना फार उपयुक्त ठरले (१५ ऑगस्ट १९३९).

"पालि-भाषा-प्रवेश" या पुस्तकात त्यावेळच्या महाराष्ट्रातील नामवंत शिक्षणतज्ज्ञांनी पालि भाषेविषयी आपली मते व्यक्त केली होती.

**डॉ. पुरुषोत्तम विश्वनाथ बापट**, एम. ए., पी. एच. डी. (फर्ग्युसन कॉलेज पुणे)– " वैदिक भाषेला सर्वात जवळ असलेली कोणती प्राकृत भाषा असेल तर ती पालि भाषा होय. पालि या शब्दाचा मूळ अर्थ पंक्ति (ओळ), नंतर क्रमाक्रमाने धर्मग्रंथातील ओळ किंवा उतारा, धर्मग्रंथ, धर्मग्रंथाची भाषा असा अर्थ बदलत गेला.

आद्य बौद्ध धर्माचे यथार्थ ज्ञान देणारे प्राचीन वाङ्मय जर कोठे असेल तर ते पालि भाषेतच आढळते. समाजशास्त्राच्या अभ्यासकास या भाषेचे महत्त्व विसरून चालणार नाही" (ता. १–८–१९३९ पुणे).

**श्री. ना. के. भागवत**, एम. ए. (फेलो-मुंबई विद्यापीठ, प्राध्यापक, सेंट झेवियर कॉलेज, मुंबई)– "पालि भाषेचे वाङ्मय विस्तृत असून त्यात नैतिक मुल्यांचा ठेवा आहे" (ता. २२–७–१९३९ मुंबई).

**श्री. नारायणशास्त्री वाडीकर** (न्यायरत्न, अहमदाबाद)– " सर्वदर्शन संग्रह व इतर संस्कृत ग्रंथातून बौद्धाच्या तत्त्वज्ञानासंबंधी नेहमी उल्लेख देतात. त्यांची बरोबर कल्पना यावी म्हणून बौद्धाच्या मूळच्या पालितील ग्रंथांचे अध्ययन करणेच आवश्यक आहे" (ता. २५–७–१९३९ अहमदाबाद).

**श्री. दत्तो वामन पोतदार** (प्राध्यापक सर परशुराम भाऊ कॉलेज, पुणे)– "प्राचीन भाषांत नुसते संस्कृतच तेवढे ठेवून कार्यभाग होणार नाही. प्राकृत–पालि–भाषेचे अध्ययन आवश्यक व्हावयास पाहिजे" (ता. १–८–१९३९ पुणे).

अशा प्रकारे पालि भाषेचे महत्त्व दिसून आले व तिच्या अध्ययनाची आवश्यकता वाढली. यासाठी श्री. वा. ना. तुंगार यांनी पालि व्याकरणाबरोबरच पालि-मराठी शब्दकोशाची उणीव भरून काढावी असे अनेकांनी सुचविले ते कार्य त्यावेळी श्री तुंगारांच्या हातून पूर्ण झाले असते तर आज मराठीतील पालि भाषा विद्यार्थींची फार सोय झाली असती. पण कालगतीत त्याची उणीव राहून गेली म्हणून ती उणीव भरून काढण्याचा मी अल्पसा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळाने पालि–मराठी शब्दकोशाची मराठी अभ्यासकांना असलेली निकड जाणून पालि-मराठी शब्दकोश प्रसिद्धीसाठी घेतला. त्याबद्दल मी मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. य. दि. फडके आणि आतापर्यंतचे सर्व अध्यक्ष तसेच सचिव आणि विद्यमान सचिव मा. श्री. चं. वडे यांचा अत्यंत आभारी आहे.

डॉ. शेषराव मेश्राम, पालि विभाग प्रमुख, मिलिंद कला महाविद्यालय, औरंगाबाद यांनी संपूर्ण हस्तलिखित तपासून ह्यात दुरुस्त्या केल्या आणि मुद्रणप्रत तयार केली त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

तसेच आमदार आण्णासाहेब डांगे व आमदार रा. सु. गवई यांनी बहुमोल सहकार्य केले त्याबद्दल मी आभारी आहे.

मुंबई. बाबा भारती.

दि.

# संकेत सूची

| | | |
|---|---|---|
| ना. | – | नाम |
| सं. | – | संज्ञा |
| स. ना. | – | सर्वनाम |
| विशे. ना. | – | विशेषनाम |
| वि. | – | विशेषण |
| क्रि. | – | क्रियापद |
| सं. वि. | – | संख्या विशेषण |
| भूत. | – | भूतकाळ |
| भवि. | – | भविष्यकाळ |
| वर्त. | – | वर्तमानकाळ |
| पु. | – | पुल्लिंग |
| स्त्री. | – | स्त्रीलिंग |
| नपु. | – | नपुसकलिंग |
| भूत. क्रि. | – | भूतकालिक क्रियापद |
| पू. क्रि. | – | पूर्व क्रिया |
| क्रि. वि. | – | क्रियाविशेषण |
| कृ. | – | कृदन्त |
| अ. | – | अव्यय |

अ–नागरी लिपीच्या वर्णमालेतील पहिले अक्षर संयुक्त व्यंजना पूर्वी " आ " या उपसर्गाचे ऱ्हस्व–स्वरूप. उदा. –आ + कोसति = अक्कोसति कांही नामे व विशेषणापूर्वी येणारा उपसर्ग
उदा. –न + कुसल = अकुसल
न + न्याय = अन्याय
तसेच भूतकाळी क्रियेपूर्वी येणारा उपसर्ग
उदा. –अकासि.

**अकट**–(वि.) अकृत, अनिर्मित, तयार न केलेले.

**अकतं**–(नपु.) निर्वाण.

**अकतञ्ञु**–(वि.) अकृतज्ञ, उपकार न जाणणारा

**अकतञ्ञु जातक**–अकृतज्ञ व्यापाऱ्याची जातक कथा– (नं. ९०).

**अकनिट्ठदेव**–(पु.) पाच पवित्र स्थानांपैकी पहिल्या स्थानी राहणारे देवलोक, सर्वश्रेष्ठ देव.

**अकम्पिय**–(वि.) स्थिर, अचल, न हालणारे.

**अकल्लं**–(नपु.) रोग, व्याधि.

**अकाच**–(वि.) शुद्ध, निर्दोष, दोष रहित.

**अकारादि**–(पु., नपु.) स्वर–अ, आ, अि, अी · · · · इ.

**अकारिय**–(वि.) कडू, कटू.

**अकालरावी जातक**–अवेळी आरवणाऱ्या कोंबड्याची कथा–(नं. ११९).

**अकामक**–(वि.) निरिच्छ, इच्छा नसलेला, अनिच्छुक.

**अकाल**–(पु.) अवेळ, असमय.

**अकासि**–(भूत. क्रि.) पूर्वी केलेले, केले.

**अकित्ति जातक**–एका उदार ज्ञान्याची कथा–(नं. ४८०).

**अकिरिय**–(पु.) अक्रियावाद, कोणत्याही कर्माचे कोणतेही फळ मिळत नाही असे मानणारे मत.

**अकिञ्चन**–(वि.) निर्धन, दरिद्री, ज्याचे जवळ काही नाही असा.

**अकिलासु**–(वि.) क्रियाशील, अप्रमादि, जागरूक.

**अकुटिल**–(वि.) सरळ, शुद्ध, सात्विक मनाचा.

**अकुतोभय**–(वि.) निर्भय, धीट, कुणाकडून भय नाही असा.

**अकुप्प**–(वि.) स्थिर, अचल, अचंचल, न हालणारा.

**अकुसल**–(नपु.) पापकर्म, दुराचार.

**अकोविद**–(वि.) दक्ष नसलेला, अज्ञानी, हुशार नाही.

**अक्क**–(पु.) अर्क, रवि, सूर्य, एक विशेष वनस्पती.

**अक्कन्त**–(क्रि. वि.) आक्रोश, आक्रांत, मोठ्याने रडणे.

**अक्कन्दति**–(क्रि.) दुःखाने रडणे, ओरडणे, अति दुःख करणे, आक्रंदणे.

**अक्कोस**–(पु.) आक्रोश, अपमान.

**अक्कोस**–( पु. ) राजगृहाचा भारद्वाज ब्राह्मण याने भ. बुद्धाचा अपमान केला होता.

**अक्ख**–(पु.) अक्ष, नेत्र, डोळा, गाडीचा कणा, जुगारातील फासा.

**अक्खक**–(नपु.) गळ्याचे गोलाकार हाड, गोल दागिना, सरी.

**अक्खग्गकील**–(स्त्री.) खीळ, जूवरील खीळ, जोखडावरील खीळ,

**अक्खण**–(पु.) अक्षण, अवेळ, अयोग्य वेळ.

**अक्खणवेधी**–(पु. व विशे.) क्षणार्धात तीर मारणारा.

**अक्खत**–(वि.) अक्षय, ज्याचा क्षय-नाश होत नाही, ज्यास क्षती-हानी पोहोचत नाही.

**अक्खदस्स**–(पु.) न्यायाधीश, न्याय देणारा, निवाडा करणारा.

**अक्खदेवी**–(पु.) जुगारी, धूर्त.

**अक्खधुत्त**–(वि.) जुगारी, जुगार खेळणारा, फसवा.

**अक्खय**–(वि.) अक्षय, अक्षर, लिहिण्याची पाटी, विद्या

**अक्खर**–(नपु.) अक्षर, विद्या, लिपी.

**अक्खरमाला**–(स्त्री.) अक्षरमाला, वर्णमाला, पालि व सिंहली भाषेच्या वर्णमालेविषयीची काव्य रचना.

**अक्खरावयव**–(स्त्री.) मात्रा, प्रमाण, व्यंजनास जोडला जाणारा स्वर, अक्षराचा अवयव.

**अक्खणवेधी**–(पु. वि.) क्षणार्धात तीर मारणारा.

**अक्खात**–(क्रि. वि.) सांगितले, म्हणाले, व्याख्या केली.

**अक्खातार**–(क्रि. वि.) सांगणारा, शिकविणारा, मार्गदर्शक.

**अक्खाति**–(क्रि.) सांगणे, शिकविणे, ऐकविणे, समजाविणे.

**अक्खान**–(न.) आख्यान, कथा, गोष्ट.

**अक्खि**–(नपु.) नेत्र, नयन, डोळा, अक्ष, चक्षु.
**अक्खोभिनी**–(स्त्री.) अक्षोहिणी, सेना, सैन्यदल, पलटण.
**अक्खोहिणी**–(स्त्री.) संपूर्ण सैन्य, तिन्ही सैन्यदले.
**अखात**–(नपु.) खड्डा.
**अखेत्त**–(नपु.) नापिक जमीन, शेतीस अयोग्य क्षेत्र.
**अग**–(पु.) पर्वत, वृक्ष.
**अगति**–(स्त्री.) अयोग्य मार्ग, पक्षपात.
**अगद**–(नपु.) औषधी वनस्पती.
**अगभेद**–(पु.) वृक्ष, औषधी वृक्ष-झाड.
**अगरु**–(वि.) हलका, कमी वजनाचा.
**अगळु**–(पु.) औषध, काढा, रस, अर्क.
**अगाध**–(वि.) अती, अतिशय, फार, अत्याधिक.
**अगार**–(नपु.) घर, गृह, निवासस्थान.
**अगारिक**–(पु., वि.) गृहस्थ, गृहपति, घरधनी.
**अग्ग**–(वि.) अग्र, टोक, प्रथम, श्रेष्ठतम.
**अग्गज**–(पु.) अग्रज, वडील बंधु, अगोदर जन्मलेला.
**अग्गञ्ज**–(वि.) सर्वश्रेष्ठ, अग्रगण्य, सर्व प्रथम.
**अग्गता**–(स्त्री.) श्रेष्ठता, जेष्ठता.
**अग्गतो**–(नपु.) समोर, सन्मुख, पुढे.
**अग्गळत्थम्भ**–(पु.) अर्गलस्तंभ, खांब, दाराचा अडसर (अरगल).
**अग्गल**–(नपु.) अरगल, आडणा, दरवाज्याचा अडसर.
**अग्गि**–(पु.) अग्नी, आग, जाळ, आगटी.
**अग्गि-जाल**–(स्त्री.) रानटी फूल, जंगली फूल.
**अग्गि-पूजा**–(स्त्री.) अग्नीशाळा, स्वयंपाकघर, यज्ञ-शाळा.
**अग्गिमन्थ**–(नपु.) कर्णिका.
**अग्गिक जातक**–जंगलास आग लागली असता, ज्या कोल्ह्याच्या डोक्याचे केस जळले होते त्या कोल्ह्याची कथा–(नं. १२९).
**अग्गिक भारद्वाज**–(पु.) श्रावस्तीचा अग्नीहोत्री ब्राह्मण, भारद्वाज गोत्रातील ब्राह्मण.
**अग्गिब्रह्मा**–(पु., वि शे. ना.) अशोकाचा जावई, संघमित्राचा नवरा याने तिस्सकुमारा बरोबर प्रव्रज्जा (श्रामणेर-दीक्षा) घेतली होती.
**अग्घ**–(पु.) अर्घ, किंमत ठरविणारा, मूल्य करणारा.
**अग्घति**–(क्रि.) किंमत ठरवणे, मूल्य करणे.
**अग्घिक**–(नपु.) फुलमालांनी सजविलेला खांब.
**अग्घिय**–(नपु.) आतिथ्य पाहुणचार, सत्कार, आदर.
**अघ**–(नपु.) आकाश, नभ, दुःख, दुर्भाग्य.
**अङ्क**–(पु.) संख्या, चिन्ह, मांडी.
**अङ्कुर**–(पु.) अंकुर, कोंब, नवा शेंडा.
**अङ्कुस**–(पु.) अंकुश.
**अङ्कोल**–(पु.) त्रिलोचक, त्रिनेत्र, शिव-शंकर.
**अङ्केति**–(क्रि.) चिन्ह लावणे, चित्रित करणे.
**अङ्ग**–(पु.) प्राचीन भारताच्या सोळा गणराज्यांपैकी एक अंगराज्य.
**अङ्ग**–(नपु.) १–अंग, २–शरिराचे सर्व भाग (अवयव), ३–अंगराग = उटणे.
**अङ्गजात**–(नपु.) पुरूषेंद्रिय, शिस्न.
**अङ्गण**–(नपु.) आंगण, घरासमोरील मोकळी जागा.
**अङ्गद**–(नपु.) बाजूबंद, दंडावरील दागिना.
**अङ्गना**–(स्त्री.) स्त्री, नारी.
**अङ्गार**–(पु-) विस्तव.
**अङ्गिरस**–(वि शे. ना.) भ. बुध्दाचे एक नाव.
**अङ्गुट्ठ**–(पु.) आंगठा.
**अङ्गुत्तर निकाय**–(पु.) सुत्तपिटकातील पांच भागापैकी एक भाग (ग्रंथ).
**अङ्गुत्तरठ्ठकथा**–(स्त्री.) अंगुत्तर निकायातील अठ्ठकथा.
**अङ्गुल**–(नपु.) बोट, बोटभर माप, तसू.
**अङ्गुलिमाल**–(वि. शे ना.) प्रसिध्द डाकू हा बुद्धोपदेश ऐकून अर्हत पदाला पोहोचला.
**अङ्गुलीयक**–(न.) अंगठी, बोटातील दागिना.
**अचल**–(वि.) स्थिर, न हालणारा, पर्वत.
**अचिर**–(वि.) नुकताच, जो आताच झाला.
अचिरप्पभा = विजेची चमक.
**अचिरवती**–(स्त्री. वि शे. ना.) पाच महानद्यांपैकी एक, सध्याची राप्ति नदी.
**अचेतन**–(वि.) निर्जीव, जड, मृतप्राय.
**अचेल**–(वि.) नग्न, विवस्त्र, नागडा.
**अच्चगा**–(क्रि., भूत.) उडी मारून गेला.
**अच्चना**–(स्त्री.) अर्चना, पूजा.
**अच्चन्त**–(वि.) सतत, निरंतर.
**अच्चय**–(पु.) अपराध, दोष, गुन्हा.
**अच्चयाभाव**–(पु.) निर्दोष.
**अच्चायिक**–(वि.) तातडीचे, जरूरीचे काम.
**अच्चासन्न**–(वि.) चिकटून, फार जवळ, जोडून.
**अच्चि**–(स्त्री.) अग्नी, ज्वाला, आग, अर्ची.
**अच्चिमन्तु**–(पु.) जाळ, जळता, चमकाद, सतेज.
**अच्चित**–(वि.) अर्चित, पूजित, सन्मानित.
**अच्चुगत**–(वि.) अत्युच्च, अति उंच, शिखर.
**अच्चुण्ह**–(वि.) अति उष्ण, अति प्रखर.
**अच्चुत**–(वि., पद) = निर्वाण.

**अच्चीगाळह**–(वि.) विद्वत्ता प्राप्त, विद्वान, महापंडित.
**अच्चोदक**–(नपु.) जास्त पाणी, सागर.
**अच्छ**–(वि.) चांगला, स्वच्छ, निर्मळ, दोष रहित.
**अच्छक**–(पु.) अस्वल.
**अच्छम्भी**–(वि.) निर्भय, धीट.
**अच्छरा**–(स्त्री.) अप्सरा.
**अच्छरा**–(क्रि. वि.) समुदायात चुटकी वाजविणे.
**अच्छरिय**–(नपु.) आश्चर्य.
**अच्छादन**–(नपु.) वस्त्र, परिधान, झांकण, आच्छादन.
**अच्छि**–(नपु.) डोळा, नेत्र, नयन, अक्ष, आंख.
**अच्छिन्दति**–(क्रि.) लुटणे, अपहरण करणे, पळविणे, पळवून नेणे.
**अच्छेच्छि**–(भूत. क्रि.) कापले, छेदले, तुकडे केले.
**अज**–(पु.) बकरा, बोकड.
**अजपाल**–(पु.) मेंढपाळ, धनगर.
**अज लण्डिका**–(स्त्री.) शेळीची लेंडी.
**अजगर**–(पु.) अजगर जातीचा साप.
**अजञ्ञ**–(नपु.) धोका, संकट.
**अजात सत्तु**–(विशे. ना., पु.) अजात शत्रु, मगध राजाचा पुत्र. (बिंबिसाराचा पुत्र)
**अजपालक**–(पु.) मेंढपाळ, धनगर.
**अजा**–(स्त्री.) बकरी, शेळी.
**अजानन**–(नपुं.) अज्ञान.
**अजिन**–(नपुं.) बिबळ्या वाघ, चित्ता.
**अजिनपत्ता**–(स्त्री.) पाकळ्या.
**अजिनि**–(भूत. क्रि.) जिंकला, जिंकली, जिंकले.
**अजिन योनि**–(स्त्री.) हरीणीची एक जात, मृगी.
**अजिम्ह**–(वि.) सरळ.
**अजिर**–(नपु.) आंगण.
**अजी**–(स्त्री.) शेळी, बकरी.
**अजेय्य**–(वि.) जो जिंकला गेला नाही, स्वतंत्र.
**अज्ज**–(अ.) आज.
**अज्ज-तग्गे**–(अ.) आजपासून.
**अज्ज-तन**–(वि.) आधुनिक, अर्वाचीन.
**अज्जति**–(क्रि.) प्राप्त करणे, मिळविणे, अर्जन करणे.
**अज्जव**–(पु.) आर्जव, विनंती, साधेपणा.
**अज्जित**–(वि.) अर्जित, मिळविलेला, संपादिलेला.
**अज्जुन**- (पु.) (१) अर्जुन नावाचा वृक्ष,
(२) पांडवा पैकी एक.
**अज्जक**–(पु.) श्वेतपत्र.
**अज्झक्ख**–(पु.) अध्यक्ष, प्रमुख.
**अज्झगा**–(भूत. क्रि.) प्राप्त केले, मिळविला, –ली, –ले.
**अज्झत्त**–(वि.) स्वकीय, आपला, –ली, –ले.
**अज्झत्तिक**–(वि.) स्वतः विषयी.
**अज्झयन**–(नपु.) अध्ययन, शिक्षण.
**अज्झाचार**–(पु.) संभोग, मैथुन, हद्द ओलांडून.
**अज्झाचिण्ण**–(क्रि. वि.) अभ्यस्त, सराईत, तरबेज.
**अज्झापन**–(नपु.) अध्यापन, शिकविणे.
**अज्झाय**–(पु.) अध्याय, पाठ, धडा, परिच्छेद.
**अज्झायक**–(पु.) अध्यापक, शिक्षक, गुरु, आचार्य.
**अज्झारोह**–(पु.) मोठा मासा.
**अज्झावसति**–(क्रि.) घरात राहणे, वसती करणे.
**अज्झासय**–(पु.) आशय, इरादा, हेतु, उद्देश.
**अज्झेसना**–(स्त्री.) सत्कार, पाहुणचार, आतिथ्य.
**अज्झोहत**–(कृ.) खाल्ले, खाऊन टाकले.
**अज्झुपगच्छति**–(क्रि.) मिळणे, मिसळणे, सहमत होणे.
**अज्झुपेक्खति**–(क्रि.) उपेक्षा करणे, तिरस्कार करणे.
**अज्झुपेति**–(क्रि.) जवळ येणे.
**अज्झेन**–(नपु.) अध्ययन, शिक्षण.
**अज्झोकास**–(पु.) खुले आकाश, निरभ्र आकाश, स्वच्छ आकाश.
**अज्झोसान**–(नपु.) आसक्ती, ओढ, आकर्षण.
**अज्झोहरण**–(नपु.) लुबाडणे, फसविणे, फसवणूक.
**अञ्जति**–(क्रि.) डोळ्यांत अंजन घालणे.
**अञ्जन**–(नपु.) अंजन, काजळ.
**अञ्जन-वण्ण**–(वि.) काळा रंग, काळा वर्ण.
**अञ्जलि**–(स्त्री.) ओंजळ, तळहात मिळविणे.
**अञ्जलिपुट**–(क्रि. वि.) ओंजळ करणे, घेण्यासाठी हात जुळविणे.
**अञ्जस**–(नपु.) वाट, मार्ग, रस्ता, पथ.
**अञ्ञ**–(स. ना.) अन्य, दुसरा.
**अञ्ञतम**–(सार्वनामिक विशेषण) अन्यतम, अनेकांपैकी एक.
**अञ्ञतित्थिय**–(पु.) दुसऱ्या सांप्रदायाचा अनुयायी.
**अञ्ञत्थ, अञ्ञत्र**–(अ.) अन्यत्र, इतरत्र.
**अञ्ञथत्त**–(नपु.) मनात अनेक विचार असणे.
**अञ्ञथा**–(अ.) अन्यथा, दुसऱ्या प्रकारे.
**अञ्ञदत्थु**–(अ.) निश्चयाने, निर्धाराने.
**अञ्ञदा**–(अ.) अन्यदा, दुसऱ्या दिवशी.
**अञ्ञमञ्ञ, अञ्ञोञ्ञ**–(वि.) परस्पर, एक दुसऱ्याशी.
**अञ्ञा**–(स्त्री.) संपूर्ण ज्ञान, अर्हत्त्व.
**अञ्जली**–(स्त्री.) ओंजळ.

**अञ्ञतर**–(पु.) अन्यतर, दुसरा.
**अञ्ञतरोपन**–(पु. व नपु.) गुंडाळी, लपेटलेला.
**अञ्ञथाभाव**–(नपु.) परिवर्तन, बदल.
**अञ्ञांत-कोण्डञ्ञ**–(पु., विशे. ना.) भ. बुध्दाचा पहिला प्रव्रजित शिष्य.
**अञ्ञातक**–(वि.) परका, नाते नसलेला.
**अञ्ञातावी**–(पु.) जाणकार, ज्ञाता.
**अञ्ञातुकाम**–(वि.) इच्छुक, अभिलाषी.
**अटनी**–(स्त्री.) खाटेच्या पायाजवळचा भाग, आटणी.
**अटवि**–(स्त्री.) अरण्य, जंगल.
**अट्टहास**–(पु.) जोराचे हसणे.
**अट्ट**–(नपु.) वाद, फिर्याद.
**अट्टाल**–(नपु) गच्ची, आगांशी.
**अट्टालक**–(पु.) अटारी, माडी.
**अट्ठित**–(वि.) पाडित, पिडलेला.
**अट्ठपुरिसा**–(पु.) स्त्रोतापत्ति-मार्ग-फलमिळालेले आठ प्रकारचे लोक.
**अट्ठानरियवोहार**–(पु.) आठ प्रकारचे अयोग्य व्यवहार, आठ प्रकारचे अनार्य व्यवहार.
**अट्ठ**–(सं. वि.) आठ [८].
**अट्ठक**–(वि.) अष्ठक, आठपट.
**अट्ठकथाचार्य**–(पु.) अर्थ सांगणारा, निरुपण करणारा
**अट्ठङ्गिक**–(पु.) आष्टांगिक, आठ अंगाचा-बाजूंचा.
**अट्ठपद**–(नपु.) बुद्धिबळाचा-सोंगट्याचा पट.
**अट्ठास**–(नपु.) अष्टकोनी, आठ कोनांचा.
**अट्ठाव**–(नपु.) अनाठायी, अस्थान, अयोग्य ठिकाणी.
**अट्ठारस**–(स. वि.) आठरा [१८].
**अट्ठि**–(नपु.) हड्डी, हाड, अस्थी.
**अट्ठिकत्त्वा**–(क्रि. वि.) ध्यान देऊन, लक्षपूर्वक, काळजीने.
**अट्ठिसङ्घाट**–(पु.) अस्थिपंजर, हाडांचा सापळा.
**अट्ठिसेन जातक**–राजाच्या उद्यानात राहून, राजाकडून कशाचीही अपेक्षा न ठेवलेल्या एका साधूची कथा-(नं. ४०३).
**अड्ढ**–(वि.) धनाढ्य, फार श्रीमंत.
**अड्ढतिय**–(सं. वि.) अडीच [२॥].
**अड्ढरस**–(स्त्री., नपु.) अर्धी रात्र.
**अड्ढयोग**–(पु.) महाल, राजवाडा.
**अड्ढुड्ढ**–(सं. वि.) साडे तीन [३॥].
**अण**–(पु.) ऋण–कर्ज नसलेला.
**अणु**–(वि.) अतिलहान कण, अणु.
**अण्ड**–(नपु.) अंडे, पुरुषाचा वृषण.
**अण्डज**–(पु.) पक्षी.
**अण्डूपक**–(नपु.) चुंबळ, भांड्याखाली ठेवण्याचे वर्तुळाकार कापड, तरट, दोरीची चुंबळ.
**अण्डभूत**–जातक–स्वाभाविकरित्या स्त्रिया चारित्र्यहीन असतात हे भासविणारी जातक कथा–(नं. ६२).
**अण्ण**–(पु.) पाणी, जल.
**अण्णव**–(नपु.) समुद्र.
**अण्ह**–(पु.) दिन, दिवस (यावरूनच पूर्वान्ह, अपरान्ह शब्द तयार झाले).
**अतक्कित**–(क्रि. वि.) सहसा.
**अतसी**–(स्त्री.) आळशीचे रोप.
**अति**–(उपसर्ग) अतिशय, जास्त, अधिक.
**अतिक्कम**–(पु.) अतिक्रमण, आक्रमण.
**अतिखिप्प**–(क्रि. वि.) अति शीघ्र, तत्काळ, जलद.
**अतिखिण**–(वि.) कोमल, मृदु, मऊ, अति क्षीण.
**अतिगाळह**–(वि.) फार जवळ, निकट.
**अतिचारिणी**–(स्त्री.) व्यभिचारिणी.
**अतितण्ह**–(पु., वि.) अत्यंत लोभी, हावरा, स्वार्थी.
**अतिप्पसत्थ**–(पु.) फार प्रसिद्ध.
**अतित्त**–(वि.) अतृप्त.
**अतिथि**–(पु.) आगतुक, पाहुणा, अवेळी आलेला.
**अतिदिवा**–(अ.) दिवसा, सूर्योदयानंतर.
**अति देव**–(पु.) श्रेष्ठ देव.
**अतिधमति**–(क्रि.) जोरजोराने ढोल वाजविणे.
**अतिधावति**–(क्रि.) जोरात पळणे, जोरात पुढे धावणे.
**अतिनामेति**–(क्रि.) वेळ निघून जाणे.
**अतिनिग्गण्हाति**–(क्रि.) फार रागावणे, क्रुद्ध होणे.
**अतिपपञ्च**–(पु.) फार वेळ, उशिर.
**अतिपात**–(पु.) खून, हत्या, मार.
**अतिप्पगो**–(अ.) फार जलद, शीघ्र.
**अतिबहल**–(वि.) फार मोठा, जाड, लठ्ठ.
**अतिबाळह**–(क्रि. वि.) आधिक्याने, खूप जास्त, अधिक, अतिशय.
**अतिबाहोति**–(क्रि.) पळविणे, पिटाळून लावणे.
**अतिभगिनी**–(स्त्री.) प्रिय बहीण.
**अतिभारिय**–(वि.) फार जड, अति भारी, फार गंभीर.
**अतिमञ्ञति**–(क्रि.) तिरस्कार करणे, घृणा करणे.
**अतिमनाप**–(वि.) अत्यंत प्रिय.
**अतिमत्त**–(वि.) अधिक, जास्त, अतिशय.
**अतिमहन्त**–(क्रि.) फार मोठा.
**अतिमान**–(पु.) अभिमान, अहंकार.

**अतिमुखर**–(वि.)वाचाळ, बडबड्या.
**अतिमुत्तक**–(विशे. ना.)एक प्रकारचे झाड.
**अतिमुत्त**–(स्त्री.)माधवी वेल.
**अतिमुदुक**–(वि.)अतिमृदु, फार मऊ, कोमल.
**अतियक्ख**–(पु.)जादू-टोणा करणारा मांत्रिक.
**अतियाचक**–(वि.)अति याचना करणारा.
**अतियुव**–(स्त्री.)अति तरुण, युवक, युवती.
**अतियति**–(क्रि.)पार करणे, ओलांडणे.
**अतिरत्ति**–(क्रि. वि.)मध्य रात्री.
**अतिरिच्चति**–(क्रि.)बाकी राहणे, शिल्लक उरणे.
**अतिरित्त**–(वि.)अतिरिक्त, खेरीज, शिवाय.
**अतिरिव**–(अ.)अतिशय, अत्यधिक.
**अतिरेक**–(वि.)अतिरिक्त, अतिरेक.
**अतिरोचति**–(क्रि.)सतेजणे, चमकदार होणे, चमकणे.
**अतिलुद्ध**–(वि.)अतिलुब्ध, लोभी.
**अतिवङ्किन**–(वि.)वक्र, फार वाकडा.
**अतिवत्त**–(क्रि. वि.) विजित, जिंकलेला.
**अतिवत्तति**–(क्रि.) ओलांडणे, पार करणे, उल्लंघिणे.
**अतिवस**–(वि.) ताब्यात असलेला, परतंत्री, परावलंबी.
**अतिवस्सति**–(क्रि.) अतिवृष्टी होणे, मुसळधार पाऊस पडणे.
**अतिवाक्य**–(नपु.) अपशब्द, शिवीगाळ.
**अतिवात**–(पु.) तुफान, चक्रीवादळ, सोसाट्याचा वारा.
**अतिवायति**–(क्रि.) सुगंधित वायु, सुगंधी वारा.
**अतिवाहक**–(पु.) हमाल, ओझे वाहणारा.
**अतिविकाल**–(वि.) अवेळ, असमय, अकाळ.
**अतिविज्झति**–(क्रि.) वेध घेणे, आर–पार जाणे, छेदणे.
**अतिविय**–(क्रि. वि.) अत्यंत, अधिक, अती.
**अतिविस्सट्ठ**–(वि.) वाचाळ, बडबड्या.
**अतिविस्सासिक**–(वि.) रहस्यपूर्ण.
**अतिविस्सुत**–(वि.) फार प्रसिद्ध, विस्तृत.
**अतिवेलं**–(क्रि. वि.) अधिक वेळ निघून जाणे.
**अतिसण्ह**–(वि.) अतिसूक्ष्म, फार लहान, स्निग्ध.
**अतिसम्बाध**–(वि.) फार गर्दी, मोठा जमाव.
**अतिसय**–(पु.) अतिशय, फार, पुष्कळ, आधिक्य.
**अतिसायं**–(क्रि. वि.) संध्याकाळी, संधि प्रकाशात.
**अतिसार**–(पु.) जुलाब.
**अतिसिथिल**–(वि.) सैल, ढिला, शिथील.
**अतिसुण**–(पु.) पिसाळलेला कुत्रा.
**अतिहट्ठ**–(वि.) प्रसन्न चित्त, आनंदित, उत्साहित.
**अतिहीन**–(वि.) फार गरीब, दरिद्री.
**अतिहीलेति**–(क्रि.) घृणा करणे, तिरस्कार करणे.
**अतीत**–(वि.) भूतकाळ.
**अतीव**–(अ.) फार, अती, अतिशय.
**अतो**–(उ.) अतः, यानंतर.
**अत्त**–(पु., स. ना.) स्वतः, आपोआप.
**अत्त–काम**–(पु.) आत्म–प्रेम.
**अत्त–किलमथ**–(पु.) शरीरभोग, काय–क्लेश.
**अत्त–गुत्ति**–(स्त्री.) आत्मसंयम.
**अत्त–घञ्ञ**–(नपु.) आत्मविनाश.
**अत्तदत्थ**–(पु.) आत्महित, स्वतःचे हित, लाभ, फायदा.
**अत्तदन्त**–(वि.) आत्मदमन, आत्मसंयम, स्वतःच्या मना-वर ताबा ठेवणे.
**अत्तदिट्ठि**–(स्त्री.) आत्मदृष्टी, आत्म्याचे अस्तित्व मानण्याची भावना.
**अत्तभाव**–(पु.) स्वत्व, व्यक्तित्व.
**अत्तवाद**–(पु.) आत्म्यासंबंधीचे मत.
**अत्तवध**–(पु.) आत्मविनाश, आत्महत्या.
**अत्तहित**–(नपु.) आत्महित, स्वतःचे हित.
**अत्तज**–(वि.) आत्मज, स्वतःचा पुत्र.
**अत्तदीप**–वि.) आत्मदीप, आत्मनिर्भर, स्वतः मार्गदर्शक स्वतः असणे.
**अत्तनीय**–(वि.) स्वतःविषयी, स्वतःसंबंधी.
**अत्तंतप**–(वि.) स्वतः कष्ट करणारा, स्वतः श्रमणारा.
**अत्तपच्चक्ख**–(वि.) आत्मप्रत्यय, स्वतः साक्षी, स्वतः समक्ष.
**अत्तपटिलाभ**–(पु.) आत्म प्रतिलाभ, जन्म.
**अत्तमन**–(वि.) प्रसन्न वदन, आनंदी चेहरा, प्रसन्न चित्त.
**अत्तसम्भव**–(वि.) आत्मसंभव, आपोआप उत्पन्न.
**अत्तहेतु**–(अ.) आत्महेतु, स्वतःकरिता.
**अत्ताण**–(वि.) क्षीण, अशक्त, असंरक्षित.
**अत्थ**–(वि.) अर्थ, धन, लाभ, कल्याणकारक.
**अत्थक्खायी**–(पु.) सदुपदेश करणारा.
**अत्थकर**–(वि.) हितकारी, फायदेशीर, लाभदायक.
**अत्थकाम**–(वि.) हितचिंतक, हितैषी.
**अत्थकुसल**–(वि.) हितशोधक, दक्ष, अर्थ सांगणारा.
**अत्थचर**–(वि.) परोपकारी.
**अत्थचरिया**–(स्त्री.) परोपकार.
**अत्थदस्सी**–(वि.) लाभकारी, हितकर.
**अत्थभञ्जक**–(वि.) विनाशक, अहितकारी.

**अत्थवादी**–(वि.) हित सांगणारा, अर्थवादी.
**अत्थकथा**–(स्त्री.) अर्थाची व्याख्या, भाष्य.
**अत्थगम**–(पु.) अस्तपावणे, न दिसणे, अदृश्य.
**अत्थञ्ञु**–(वि.) मर्मज्ञ, जाणकार, अर्थ जाणणारा, हित जाणणारा.
**अत्थना**–(स्त्री.) याचना, भीक.
**अत्थरत**–(क्रि. वि.) वरून झाकलेले, वर अंथरलेले.
**अत्थर**–(पु.) हत्तीची झूल, बैठक, अंथरूण अस्तर.
**अत्थरक**–(पु.) अंथरणारा.
**अत्थरण**–(नपु.) अंथरूण, पलंगपोस.
**अत्थरति**–(क्रि.) अंथरणे.
**अत्थरापेति**–(क्रि. वि.) अंथरवून घेणे.
**अत्थवस**–(पु.) कारण, उपयोग.
**अत्थसत्त**–(पु.) अर्थशास्त्र.
**अत्थसालिनि**–(स्त्री.) अभिधम्म पिटकाच्या धम्मसंगिनी (धम्मपरिषद) विषयी "बुद्धघोषांनी" रचलेली अर्थकथा–(अट्ठकथा).
**अत्थस्स द्वार जातक**–वाराणसीच्या एका व्यापाऱ्याच्या पुत्राने केवळ सातव्या वर्षी सन्मार्ग स्वीकारल्याची जातक कथा–(नं. ८४).
**अत्थाय**–(वि.) अत्थ या शब्दाचे चतुर्थी विभक्ती रूप-करीता, कशाकरिता ?
**अत्थि**–(मूळ कि.) आहे, असणे, असो.
**अत्थिभाव**–(पु.) अस्तित्त्व.
**अत्थिक**–(वि.) इच्छुक, अभिलाषी, इच्छा धरणारा.
**अत्थु**–(मूळ क्रि.) अस्तु, असो.
**अत्र**–(दर्शक स. ना.) येथे.
**अत्रज**–(पु.) पुत्र, मुलगा, येथे जन्मलेला.
**अत्रजा**–(स्त्री.) कन्या, मुलगी, येथे जन्मलेली.
**अत्राह**–(क्रि. वि.) येथेच, याच ठिकाणी.
**अत्रिच्छ**–(पु., वि.) अति लोभी, फार स्वार्थी.
**अतिच्छता**–(स्त्री. वि.) लोभी स्त्री, स्वार्थी स्त्री.
**अथ**–(अ.) तेंव्हा, म्हणून, साठी, करिता.
**अथवण्ण**–(पु.) अथर्ववेद.
**अथो**–(नपु.) हत्यार, शस्त्र, मृत्यूस कारण.
**अदक**–(वि.) खाणारा.
**अदति**–(क्रि.) खाणे, भक्षिणे.
**अदन**–(नपु.) जेवण, भोजन, खाद्य पदार्थ.
**अदस्सन**–(नपु.) न दिसणे, अदृश्य, अदर्शन.
**अदास**–(पु.) दास नाही, नोकर नाही.
**अदिति**–(स्त्री.) देवाची आई, देवमाता.
**अदिट्ठ**–(वि.) अदृश्य.
**अदिन्न**–(वि.) न दिलेले.
**अदिस्स मान**–(वि.) जे दिसत नाही, न दिसणारे.
**अदु**–(नपु.) अमुक.
**अदुक्खमसुखा**–(स्त्री.) सुख-दुःख विरहित.
**अदूभक**–(वि.) विश्वसनीय, खात्रीचा.
**अदूसक**–(वि.) निर्दोष, निरपराध.
**अद्द**–(नपु.) ओला, भिजलेला, आर्द्र.
**अद्दक**–(नपु.) अद्रक, आले.
**अद्दक्खि**–(भूत. क्रि.) पाहिले.
**अद्दसा**–(भूत. क्रि.) पाहिले.
**अद्दा**–(नपु.) आर्द्रा नक्षत्र.
**अद्दि**–(पु.) अद्री, पर्वत, डोंगर.
**अद्दित**–(क्रि. वि.) दाबलेला, दडपलेला.
**अद्ध**–(पु., वि.) अर्धा, निम्मा, अर्धा महिना, एक पक्ष.
**अद्धगत**–(पु.) जीवन पथावरील प्रवासी.
**अद्धगू**–(पु.) प्रवासी, यात्री, वाटसरू.
**अद्धनिय**–(वि.) प्रवासास योग्य, चिरकाल, कायम.
**अद्धा**–(अ.) निश्चितरूपाने, निश्चितपणे.
**अद्धा**–(पु.) मार्ग, रस्ता, वाट.
**अद्धान**–(नपु.) लांब रस्ता, दीर्घ काळ.
**अद्धि**–(स्त्री.) वाट, सडक.
**अद्धिक**–(पु.) यात्री, प्रवासी, वाटसरू.
**अद्धुव**–(वि.) अध्रुव, अस्थिर.
**अद्वेज्म**–(वि.) असंदिग्ध.
**अधम**–(वि.) पापी, नीच, दुष्ट.
**अधर**–(पु.) खालचा ओठ.
**अधि**–(उपसर्ग) पर्यंत, वर.
**अधिकत**–(वि.) अधिकृत.
**अधिकरण**–(नपु.) दावा.
**अधिकरण समथ**–(पु.) दाव्याचा निकाल.
**अधिकरणिक**–(पु.) न्यायाधीश.
**अधिकरणी**–(स्त्री.) लोहाराची ऐरण.
**अधिकार**–(पु.) पद.
**अधिकोट्टन**–(नपु.) बलिवेदि, ठार मारण्याचे ठिकाण.
**अधिकोधित**–(वि.) अतिक्रोधी, फार रागीट, कोपिष्ट.
**अधिगच्छति**–(क्रि.) प्राप्त करणे, घेणे.
**अधिगच्छि**–(भूत. क्रि.) प्राप्त केले, मिळविले.
**अधिगत**–(वि.) कार्यफलप्राप्त, प्राप्त केलेला.

**अधिगण्हाति**–(क्रि.) पार करणे, ओलांडणे.
**अधिगम**–(पु.) ज्ञान-प्राप्ती.
**अधिचित्त**–(नपु.) चित्त एकाग्र करण्याची साधना, तपश्चर्या.
**अधिच्च**–(भूत. क्रि.) वाचून, पाठ करून.
**अधिच्च समुप्पन्न**–(वि.) अकारण उत्पन्न.
**अधिच्चका**–(स्त्री.) टेकडी.
**अधिट्ठाति**–(क्रि.) दृढ संकल्प करणे, अधिष्ठान करणे.
**अधिट्ठातब्ब**–(कृ.) अधिष्ठानास योग्य.
**अधिट्ठायक**–(वि.) निरीक्षक, समालोचक.
**अधिट्ठान**–(नपु.) अधिष्ठान.
**अधिप**–(पु.) स्वामी, मालक, अधिपति, धनी.
**अधिपञ्ञा**–(स्त्री.) श्रेष्ठ ज्ञान, बोधि.
**अधिपतन**–(नपु.) वर उडी मारणे.
**अधिपन्न**–(वि.) गृहित.
**अधिपात**–(पु.) विनाश.
**अधिपातक**–(पु.) रातकिडा.
**अधिपातेति**–(क्रि.) नाश करणे.
**अधिप्पघरति**–(क्रि.) पदभ्रष्ट होणे, स्थानभ्रष्ट होणे.
**अधिप्पाय**–(पु.) अभिप्राय, इरादा.
**अधिभवति**–(क्रि.) खाली दाबणे, अवनत करणे.
(२)**अधिभू**–(पु.) स्वामी, मालक.
**अधिमण्ण**–(पु.) ऋणी.
**अधिमत्त**–(वि.) जास्त प्रमाणात, जादा.
**अधिमन**–(पु.) चित्ताची एकाग्रता.
**अधिमान**–(पु.) अहंकार, स्वाभिमान, गर्व.
**अधिमानिक**–(पु.) सिद्धी प्राप्तीचा खोटा अभिमान.
**अधिमुच्चति**–(क्रि.) झुकणे, अनुरक्त होणे, वाकणे.
**अधिमुच्चन**–(नपु.) संकल्प करणे.
**अधिमुत्ति**–(स्त्री.) संकल्प, सुझाव.
**अधिमोक्ख**–(पु.) दृढ निश्चय.
**अधिरोहनी**–(स्त्री.) शिडी, जिना, सोपान.
**अधिवचन**–(नपु.) नाम, नामकरण, नाव, संज्ञा.
**अधिवत्तति**–(क्रि.) पराभव करणे, परास्त करणे.
**अधिवत्थ**–(वि.) राहणारा, निवासी.
**अधिवसति**–(क्रि.) राहणे.
**अधिवासक**–(क्रि.) सहनशील.
**अधिवासेति**–(क्रि.) सहन करणे, स्वीकार करणे.
**अधिसील**–(नपु.) सदाचार, सद्वर्तन.
**अधिसेति**–(क्रि.) बसणे, झोपणे.

**अधीन**–(वि.) स्वाधीन, ताब्यात.
**अधीयति**–(क्रि.) शिकणे.
**अधुना**–(वि.) आता.
**अधो**–(अ.) खाली.
**अधोकत**–(वि.) खाली केलेला.
**अधोभाग**–(पु.) खालचा भाग.
**अधोमुख**–(वि.) खाली तोंड.
**अनङ्गण**–(वि.) राग, द्वेष रहित, निर्दोष, प्रेमळ.
**अनच्छ**–(नपु.) विष्ठा, मल.
**अनण**–(वि.) ऋणमुक्त, कर्जमुक्त.
**अनत्त**–(पु.) अनात्म–(हा एक सिध्दांत आहे.)
**अनत्तमन**–(वि.) असंतुष्ट, अतृप्त.
**अनत्थ**–(पु.) अनर्थ, हानी.
**अनधिवर**–(पु., विशे. ना.) तथागत, बुद्ध.
**अननुच्छविक**–(वि.) अनुचित, अयोग्य.
**अननुसोचिय जातक**–वाराणसीत श्रीमंत ब्राह्मणाच्या रूपाने असलेली बोधिसत्वाची जातक कथा–(नं. ३२८).
**अनन्त**–(वि.) अंत नसलेला.
**अनन्तर**–(वि.) या नंतर.
**अनपेक्ख**–(वि.) अपेक्षा नसलेला.
**अनभाव**–(पु.) जन्म-मरणाचा अनुभव नसलेला.
**अनभिरत**–(वि.) निरस.
**अनभिरद्धि**–(स्त्री.) दुष्ट भावना.
**अनभिरति जातक**–(१) स्त्रियांनी स्वतःची मालमत्ता मानणे अयोग्य आहे या प्रसंगाची जातक कथा–(नं.६५).
(२) चांगली स्मरणशक्ती, चित्ताची स्थीरता, मनाचे स्थैर्य, हे प्रसंग सांगणारी जातक कथा–(नं. १८५).
**अनमतग्ग**–(वि.) ज्याचा आरंभ माहीत नाही.
**अनय**–(पु.) दुर्भाग्य.
**अनरिय**–(वि.) असभ्य, अनार्य.
**अनरियवोहार**–(पु.) अनार्यांचे आठ प्रकारचे अनुचित व्यवहार.
**अनल**–(पु.) अग्नी, विस्तव.
**अनलंकत**–(वि.) असंतुष्ट.
**अनवट्ठित**–(वि.) अस्थिर, चंचल.
**अनवय**–(वि.) परिपूर्ण.

अनवरत–(वि.) सतत, निरंतर.
अनवसेस–(वि.) संपूर्ण.
अनवोसित–(वि.) न संपलेला, चालू.
अनसन–(नपु.) उपवास.
अनस्सासिक–(वि.) अनिश्चित, मोघम.
अनाकुल–(वि.) निःशंक, निश्चित.
अनागत–(पु.) भावी, भविष्यकाळी.
अनागत वंस–(नपु.) चोल देशातील काश्यपथ विरानी भावी मैत्रेय बुद्धाविषयी रचलेले काव्य.
अनागमन–(नपु.) आला नाही.
अनागामी–(पु.) या जगात पुनर्जन्म नाही, जन्म न घेणारा.
अनाचार–(पु.) वाईट वर्तन.
अनाजानीय–(वि.) अशुद्ध, भेसळ.
अनाथ–(वि.) असहाय्य, दुःखी, अनाथ.
अनाथपिण्डिक–(पु. विशे. ना.) श्रावस्तीचा दानशूर धनिक शेठ सुदत्त (अनाथपिण्डिक).
अनादर–(पु.) तिरस्कार, घृणा.
अनादा–(पू. क्रि.) न घेता.
अनापादा–(स्त्री.) कुमारिका, अविवाहिता.
अनापुच्छा–(पू. क्रि.) न विचारता.
अनाबाध–(वि.) सुरक्षित.
अनामन्त–(वि.) अनिमंत्रित.
अनामय–(वि.) निरोगी, निकोप.
अनामिका–(स्त्री.) करंगळी जवळील बोट.
अनामसित–(वि.) अस्पर्श्य.
अनायतन–(नपु.) अयोग्य स्थान.
अनायास–(वि.) सहज.
अनारम्भ–(वि.) सहज सुरूवात.
अनारत–(नपु) सतत, नेहमी.
अनाधारक–(वि.) अयशस्वी.
अनालम्ब–(वि.) निराधार.
अनालय–(वि.) निरिच्छ.
अनावट–(वि.) अनावृत, न झाकलेले.
अनावत्ती–(पु.) परत न येणारा.
अनावास–(वि.) निर्जन.
अनावरण–(नपु.) उघडे, प्रसिद्ध.
अनाविल–(वि.) स्वच्छ, निर्मळ.
अनावुत्थ–(वि.) जेथे कोणी राहिले नाही.
अनासक–(वि.) निराहार.
अनासव–(वि.) शुध्द, चित्त.
अनाळीहक–(वि.) गरीब.
अनिक्कसाव–(वि.) काषाय, म्हणजे चित्त-मलांनी युक्त.
अनिरवात–(वि.) खणला नाही.
अनिघ–(वि.) दुःख रहित.
अनिच्च–(वि.) अस्थिर, अनित्य.
अनिच्छमान–(क्रि. वि.) निरिच्छ.
अनिच्छय–(पु. वि.) अनिश्चय, अनिश्चित.
अनिच्छा–(स्त्री.) इच्छा (नसणे) नाही.
अनिञ्जन–(नपु.) स्थिरता.
अनिट्ठ–(वि.) अनिष्ट.
अनिट्ठित–(वि.) अनिश्चित.
अनिन्दित–(वि.) निंदा रहित.
अनिदस्सना–(स्त्री., नपु.) निर्वाण.
अनिन्दिय–(वि.) निंदा करता येणार नाही.
अनिमिस–(वि.) एकटक, निमिशमात्र.
अनियत–(वि.) अनियमित.
अनिल–(पु.) वारा, वायु.
अनिल पथ–(पु.) आकाश.
अनिवत्तन–(नपु.) न थांबता.
अनिसम्मकारी–(वि.) अविचारी
अनिस्सर–(वि.) ईश्वराशिवाय, ऐश्वर्य रहित.
अनीक–(नपु.) सेना, सैन्य.
अनीघ–(वि.) दुःख रहित.
अनीतिक–(वि.) निर्विघ्न.
अनीतिह–(वि.) स्वानुभवाने.
अनुकंखी–(वि.) इच्छुक.
अनुकंतति–(क्रि.) फाडणे, कापणे.
अनुकंपक–(वि.) दयाळू, दया करणारा.
अनुकंपति–(क्रि.) दया करणे.
अनुकरोति–(क्रि.) नक्कल करणे.
अनुकस्सति–(क्रि.) ओढणे, पाठ करणे.
अनुकार–(पु.) नक्कल.
अनुकिण्ण–(क्रि. वि.) विसकटला, उधळला.
अनुकूल–(वि.) योग्य.
अनुक्कम–(पु.) क्रम, ओळ, अनुक्रम.
अनुक्कमेन–(वि.) क्रमाने, अनुक्रमे.
अनुखुद्दक–(वि.) कमी महत्त्वाची बाब.
अनुग–(वि.) अनुयायी.
अनुगच्छति–(क्रि.) मागून येणे, अनुसरणे.
अनुगत–(क्रि. वि.) अनुसरतो.

**अनुगति**–(क्रि.) मागून जाणे.
**अनुगामिक**–(वि.) शिष्य, अनुयायी.
**अनुगायति**–(क्रि.) मागून म्हणणे, साथ करणे.
**अनुगाहति**–(क्रि.) बुडणे.
**अनुगिज्झति**–(क्रि.) लोभ धरणे.
**अनुगण्हाति**–(क्रि.) अनुग्रह करणे.
**अनुगहित**–(क्रि. वि.) प्रेमाने.
**अनुग्गाहक**–(वि.) प्रेमी.
**अनुग्गिरन्त**–(क्रि. वि.) न बोलता, मूकपणे.
**अनुग्घाटेति**–(क्रि.) उद्‌घाटन करणे.
**अनुचङ्कमति**–(क्रि.) बरोबर वा मागून फेरी घालणे फिरणे.
**अनुचर**–(पु.) अनुयायी, शिष्य.
**अनुचरण**–(नपुं.) अभ्यास, सराव.
**अनुचरित**–(क्रि. वि.) परिपाठी, अभ्यस्त.
**अनुचिनाति**–(क्रि.) साठा करणे, संग्रह करणे.
**अनुचिन्तेति**–(क्रि.) विचार करणे, चिंतन करणे.
**अनुच्चारित**–(क्र. वि.) ज्याचा उच्चार केला नाही.
**अनुच्चिट्ठ**–(वि.) चाखले नाही, उष्टे नाही.
**अनुच्छविक**–(वि.) योग्य, उचित.
**अनुज**–(पु.) बंधु, नंतर जन्मलेला.
**अनुजा**–(स्त्री.) बहीण, नंतर जन्मलेली.
**अनुजात**–(वि.) नंतर जन्मलेला, –ली, –ले.
**अनुजानाति**–(क्र.) संमती देणे, परवानगी देणे.
**अनुजीवति**–(क्रि.) जीवित राहणे, जिवंत असणे.
**अनुजीवी**–(वि.) परावलंबी जीवन.
**अनुजु**–(वि.) वक्र, वांकडा.
**अनुञ्ञा**–(स्त्री.) अनुमती, परवानगी.
**अनुट्ठान**–(नपु.) क्रियाशील नसलेला.
**अनुट्ठुभ**–(पु.) काठ्याचा एक छंद, अनुष्ठुभ वृत्त.
**अनुडसति**–(क्रि.) चावणे, डंख मारणे.
**अनुडहति**–(क्रि.) जाळणे, पेटविणे, अग्नी देणे.
**अनुतप्पति**–(क्रि.) पश्चाताप करणें.
**अनुताप**–(पु.) पश्चाताप.
**अनुतिट्ठति**–(क्रि.) जवळ उभा राहणे, सहमत होणे.
**अनुतीर**–(नपु.) किनाऱ्यालगत, काठाजवळ.
**अनुत्तर**–(नपु. वि.) सर्वश्रेष्ठ, सर्वोत्तम.
**अनुत्तान**–(वि.) खोल, अस्पष्ट.
**अनुत्थुनाति**–(क्रि.) ओरडणे, पश्चाताप करणे.
**अनुत्रासी**–(वि.) निर्भय.



**अनुथेर**–(वि., पु.) स्थविर पदानंतरचे दुसरे पद (महास्थविर).
**अनुददाति**–(क्रि.) देणे.
**अनुदिसा**–(स्त्री.) उपदिशा.
**अनुद्दया**–(स्त्री.) अनुकंपा, प्रेमछत्र, दया.
**अनुद्दिट्ठ**–(वि.) संकेत रहित.
**अनुद्धत**–(वि.) निगर्वी, निरहंकारी.
**अनुद्धम्म**–(पु.) धर्मानुसार, धर्मप्रमाणे.
**अनुधावति**–(क्रि.) मागून पळणे, मागून धावणे.
**अनुनय**–(पु.) मित्रत्व, मैत्री-भाव.
**अनुनेति**–(क्रि.) संतुष्ट करणे, तृप्त करणे.
**अनुप, अनूप**–(पु.) ओली जमीन, पाणस्थळ.
**अनुपकुट्ठ**–(वि.) निर्दोष.
**अनुपखज्जति**–(क्रि.) दखल देणे, हजेरी लावणे.
**अनुपगच्छति**–(क्रि.) परत येणे.
**अनुपघात**–(पु.) अहिंसा.
**अनुपचित**–(वि.) असंग्रहित, जवळ नाही, संग्रह नसलेला.
**अनुपच्छिन्न**–(वि.) सतत.
**अनुपञ्ञत्ति**–(स्त्री.) पोटनियम, उपनियम.
**अनुपटिपाटि** -(स्त्री.) क्रम, क्रमानुसार.
**अनुपट्ठित**–(वि.) गैरहजर, अनुपस्थित.
**अनुपत्ति**–(स्त्री.) मिळकत, प्राप्ती.
**अनुपद**–(वि.) पदानुसार, जेष्ठतेनुसार.
**अनुपद्दव**–(वि.) उपद्रव नसलेले.
**अनुपधारेति**–(क्रि.) विचार न करणे.
**अनुपबज्जा**–(स्त्री.) दुसऱ्याच्या प्रभावाने घेतलेली दीक्षा.
**अनुपमेय**–(वि.) अतुल, तुलना नाही, अनुपमेय.
**अनुपरिगच्छति**–(क्रि.) चोहोंकडे फिरणे.
**अनुपरिवत्तति**–(क्रि.) फलंडणे, लोळणे.
**अनुपरिवेरति**–(क्रि.) वेढा घालणे, घेराव घालणे.
**अनुपलित्त**–(वि.) माखला नाही, निर्लेप.
**अनुपवज्ज**–(वि.) निर्दोष.
**अनुपविसति**–(क्रि.) प्रवेश करणे, आत जाणे.
**अनुपसम्पन्न**–(वि.) अपूर्ण.
**अनुपस्सक**–(पु., वि.) द्रष्टा, ज्ञाता.
**अनुपस्सति**–(क्रि.) पाहणे, तपासणे, परिक्षण करणे.
**अनुपस्सना**–(स्त्री.) विचारपूस, चौकशी, तपास, परीक्षण.
**अनुपहृत**–(वि.) शाबूत, क्षति नसलेला.
**अनुपात**–(पु.) अपशब्द, शिवीगाळ.
**अनुपादाय**–(पू.क्रि.) जाणून न घेता, विचार न करता.

**अनुपादिसेस**–(वि.) निर्वाणाचे मूळ.
**अनुपापुणाति**–(क्रि.) मिळविणे, प्राप्त करणे.
**अनुपातेति**–(क्रि.) मिळविणे, प्राप्त करणे.
**अनुपाय**–(पु.) अयोग्य उपाय.
**अनुपायास**–(वि.) निश्चित.
**अनुपालेति**–(क्रि.) सांभाळणे, पाळणे, रक्षण करणे.
**अनुपाहन**–(वि.) अनवाणी, जोडे न घालता.
**अनुपिय**–(स्त्री., विशे. ना.) कपिलवस्तूच्या पूर्वेकडील मल्ल राज्यातील एक नगरी.
**अनुपुच्छति**–(क्रि.) प्रश्न विचारणे.
**अनुपुट्ठ**–(क्रि. वि.) विचारले.
**अनुपुब्ब**–(वि.) क्रमशः, क्रमाने.
**अनुपुब्बि**–(स्त्री.) क्रमाने घडलेल्या गोष्टी.
**अनुपेक्खति**–(क्रि.) लक्ष देणे, ध्यान देणे.
**अनुपेक्खना**–(स्त्री.) लक्ष, ध्यान.
**अनुपेसेति**–(क्रि.) मागे पाठविणे, परत करणे.
**अनुपोसिय**–(वि.) पालन कर्ता, पालक.
**अनुप्पति**–(स्त्री.) प्राप्ती, मिळकत, न जन्मलेला.
**अनुप्पदातु**–(पु.) दाता.
**अनुप्पदाति**–(क्रि.) देणे.
**अनुप्पन्न**–(वि.) उत्पन्न न झालेला.
**अनुप्पीळ**–(वि.) पीडा झाली नाही, पीडा रहित.
**अनुकरण**–(नपु.) अनुसरणे, मागून जाणे, अनुकरण.
**अनुफुसीयति**–(क्रि.) भिजविणे, सिंचन करणे.
**अनुबद्ध**–(क्रि. वि.) ज्याचा पाठलाग केला आहे, पाठलाग झालेला.
**अनुबन्धन**–(नपु.) बंधन, पाठलाग.
**अनुबल**–(नपु.) समर्थन, मदत, अनुमोदन.
**अनुबुज्झति**–(क्रि.) समजणे, कळणे, ज्ञात होणे.
**अनुबुज्झन**–(नपु.) ज्ञान, समज, बोध.
**अनुबुद्ध**–(क्रि. वि.) गौतम बुद्धाहून अल्प.
**अनुबोध**–(पु.) समज, ज्ञान.
**अनुब्बजति**–(क्रि.) अनुयायी होणे, शिष्य होणे.
**अनुब्बत्त**–(वि.) श्रद्धाळू.
**अनुब्यञ्जन**–(नपु.) अनुव्यंजन, दुय्यम दर्जाचे चिन्ह.
**अनुब्रूहेति**–(क्रि.) पुढे जाणे, सरसावणे.
**अनुभवति**–(क्रि.) अनुभव घेणे, अनुभव करणे.
**अनुभाग**–(नपु.) गौण भाग, कमी महत्त्वाचा.
**अनुभायाति**–(क्रि.) भिणे, घाबरणे.
**अनुभाव**–(नपु.) प्रताप, शौर्य.
**अनुभासति**–(क्रि.) पाठ करणे, घोकणे.
**अनुभूत**–(क्रि. वि.) अनुभवास येणे.
**अनुमज्जति**–(क्रि.) थोपटणे, खोल जागी उतरणे.
**अनुमज्झ**–(वि.) मध्यस्थ, दलाल.
**अनुमञ्ञति**–(क्रि.) सहमत होणे, मान्यता देणे.
**अनुमति**–(स्त्री.) सहमती, मान्यता, संमती.
**अनुमान**–(पु.) प्रमाण, अंदाज, कयास, अनुमान.
**अनुमीयति**–(क्रि.) अनुमान करणे, परिणामावर येणे.
**अनुमोदक**–(पु.) समर्थक, अनुमोदक.
**अनुम्मत्त**–(वि.) उन्मत्त नसलेला.
**अनुयात**–(क्रि. वि.) मागून कोणी येतो, मागून आलेला.
**अनुयायी**–(पु., वि.) शिष्य, मागून येणारा, अनुयायी.
**अनुयुज्जति**–(क्रि.) कार्यरत असणे.
**अनुयुत्त**–(क्रि. वि.) कामात गुंतणे.
**अनुयोग**–(पु.) साधना, तपस्या.
**अनुयोगी**–(पु.) साधक, तपस्वी.
**अनुरक्खक**–(पु.) रखवालदार, रक्षक.
**अनुरक्खण**–(नपु.) रक्षक, राखण.
**अनुरक्खति**–(क्रि.) रक्षण करणे.
**अनुरक्खा**–(स्त्री.) आरक्षण.
**अनुरक्खिय**–(वि.) राखण्यायोग्य, संरक्षणीय.
**अनुरज्जति**–(क्रि.) आकर्षित होणे, मोहित होणे, भुलणे.
**अनुरत्त**–(क्रि. वि.) आसक्त, मोहित.
**अनुरव**–(पु.) गुंजन, गुणगुण.
**अनुरुद्ध स्थविर**–(पु. विशे. ना.) अमितोदन शाक्याचा पुत्र महानामाचा बंधु, सिद्धार्थ–गौतमाचा चुलत बंधु, भ. बुद्धाच्या प्रमुख भिक्खु शिष्यांपैकी एक भिक्खु शिष्य.
**अनुरूप**–(वि.) अनुकूल, योग्य.
**अनुरोदति**–(क्रि.) ओरडणे, मोठ्याने रडणे.
**अनुलाप**–(पु.) पुनर्कथन, पुन्हा सांगणे.
**अनुलिम्पति**–(क्रि.) सिंचन करणे.
**अनुलोम**–(वि.) सरळ, सजाती.
**अनुलोमेति**–(क्रि.) क्रमाने जाणे, स्वजातीत मिळणे.
**अनुवज्ज**–(वि.) दोषी.
**अनुवत्तक**–(वि.) अनुगामी, अनुवर्तक.
**अनुवत्तति**–(क्रि.) उत्तराधिकारी होणे.
**अनुवदति**–(क्रि.) दोष देणे.
**अनुवसति**–(क्रि.) बरोबर राहणे, सहवास करणे.
**अनुवस्सं**–(क्रि. वि.) दर पावसाळ्यांत.
**अनुवासिक**–(वि.) वार्षिक.
**अनुवात**–(पु.) अनुकूल वारा, हवा.
**अनुवाद**–(पु.) भाषांतर, दोषारोपण, अनुवाद.

**अनुवासति**–(क्रि.) सुगंधित करणे.
**अनुविचरति**–(क्रि.) चोहोंकडे फिरणे.
**अनुविचिनाति**–(क्रि.) चिंतन करणे, विचार करणे.
**अनुविच्च**–(पू. क्रि.) जाणून, समजून.
**अनुविज्जक**–(पु.) परीक्षक.
**अनुविज्झति**–(क्रि.) परीक्षण करणे.
**अनुवितक्केति**–(क्रि.) तर्क-वितर्क करणे, मनन करणे.
**अनुविधियति**–(क्रि.) विधियुक्त आचरण करणे.
**अनुविलोकेति**–(क्रि.) निरीक्षण करणे, पहाणी करणे, अवलोकन करणे.
**अनुवुट्ठ**–(क्रि. वि.) राहता, थांबता.
**अनुव्यंजन–अनुव्यञ्जन**–(नपु.) लक्षण, चिन्ह.
**अनुसक्कति**–(क्रि.) बाजूस सरणे, मागे सरणे.
**अनुसंवच्छर**–(क्रि. वि.) दरवर्षी, प्रतिवर्षी.
**अनुसंचरति**–(क्रि.) चालणे, फिरणे, संचार करणे.
**अनुसट**–(क्रि. वि.) अभिसिंचित.
**अनुसत्थर**–(पु.) शिक्षक, उपदेशक, गुरु.
**अनुसन्धि**–(स्त्री.) जोड, संधी.
**अनुसय**–(पु.) मताचा बदल, चित्ताची प्रवृत्ती.
**अनुसरति**–(क्रि.) स्वीकारणे, अनुसरणे.
**अनुसवति**–(क्रि.) स्थानभ्रष्ट होणे, वाहवत जाणे.
**अनुसावक**–(पु.) ऐकणारा, घोषणा देणारा.
**अनुसावेति**–(क्रि.) घोषित करणे.
**अनुसासक**–(पु.) उपदेश करणारा, शास्ता.
**अनुसासिक जातक**–एका आधाशी (खादाड) भिक्खुणी-विषयी जेतवनांतील जातक कथा–(नं. ११५).
**अनुसासन**–(स्त्री. व नपु.) आज्ञा, आदेश.
**अनुसिक्खति**–(क्रि.) शिकणे, अध्ययन करणे.
**अनुसिट्ठि**–(स्त्री.) उपदेश.
**अनुसुणाति**–(क्रि.) ऐकणे, श्रवणे.
**अनुसूयक**–(वि.) ईर्षा नाही, निरवैर (निर्वैर), अवैर.
**अनुसेति**–(क्रि.) बरोबर झोपणे.
**अनुसोचति**–(क्रि.) विचार करणे.
**अनुसोत**–(पु.) प्रवाहाच्या दिशेने.
**अनुस्सती**–(स्त्री.) स्मृति, आठवण, जागरूकता.
**अनुस्सरण**–(नपु.) उशिरा आठवणे.
**अनुस्सव**–(पु.) कीव, गोष्ट, दंतकथा.
**अनुस्सुक**–(वि.) निराश, निरुत्साही, नाराज.
**अनुहसति**–(क्रि.) हसणे, नंतर हसणे.
**अनुपम**–(वि.) उपमा नाही, अनुपम.
**अनून**–(वि.) परिपूर्ण, संपूर्ण.
**अनूनक**–(वि.) परिपूर्ण, संपूर्ण.
**अनूहत**–(वि.) न खोदलेले.
**अनेक**–(संख्या विशे.) बहुत, पुष्कळ, अनेक.
**अनेकत्थ**–(वि.) अनेक अर्थ, वेगवेगळे अर्थ.
**अनेज**–(वि.) तृप्त, समाधान.
**अनेध**–(वि.) इंधन नाही.
**अनेळ**–(वि.) निर्दोष.
**अनेळ-गल**–(वि.) बोलका.
**अनेसन**–(स्त्री.) गैरव्यवहारी उपजीविका.
**अनोक**–(नपु.) बेघर, निराधार.
**अनोकास**–(वि.) स्थळ-काळाचा अभाव.
**अनोजा**–(स्त्री.) नारंगी रंगाचे फूल.
**अनोतत्त**–(पु.) मानसरोवर.
**अनोतप्प**–(नपु.) पापी, दुराचारी.
**अनोदक**–(वि.) निर्जळ.
**अनोदिस्सक**–(वि.) सार्वजनिक.
**अनोनमति**–(क्रि.) ताठ राहणे.
**अनोम**–(वि.) श्रेष्ठ, थोर.
**अनोमा**–(स्त्री., वि.) कपिलवस्तुच्या पूर्वेस असलेली नदी, सिद्धार्थाने गृहत्यागानंतर प्रथमच ओलांडली होती.
**अनोमज्जति**–(क्रि.) हाताने अंग चोळणे.
**अनोरपार**–(वि.) अमर्याद.
**अनोवस्सक**–(वि.) पावसापासून सुरक्षित.
**अन्त**–(पु.) मृत्यु, शेवट, अवसान, अन्त.
**अन्तकर**–(वि.) शेवटचा, शेवट करणारा.
**अन्तगत**–(क्रि. वि.) अंतर्गत, एकरूप.
**अन्तगुण**–(नपु.) आंतडे.
**अन्तजातक**–वेळु वनांत देवदत्ताला भ. बुद्धांनी सांगितलेली उपदेशाची जातक कथा–(नं. २९५).
**अन्तक**–(पु.) अंत करणारा, मृत्यू.
**अन्तमसो**–(अव्यय) कनिष्ठ, खालचा.
**अन्तर**–(नपु.) भेद, फरक.
**अन्तरकप्प**–(पु.) दोन विचारातील अंतर, कल्पभर, मधले अंतर.
**अन्तरघर**–(नपु.) घरात, गावात.
**अन्तरसाटक**–(नपु.) आंतील वस्त्र.
**अन्तरट्ठक**–(पु.) अतिशय थंडीतील आठ दिवस बर्फ-वृष्टीचा काळ.

**अन्तरवन्तरा**–(क्रि. वि.) जेव्हा तेव्हा.
**अन्तरधान**–(नपु.) अदृश्य, न दिसणे.
**अन्तरवासक**–(पु.) आंतील वस्त्र, लुंगी, पंचा, भिक्खुचे चीवर.
**अन्तरंस**–(पु.) दोन्ही खांद्यातील अंतर.
**अन्तरा**–(क्रि. वि.) मध्ये.
**अन्तरामग्गे**–(क्रि. वि.) रस्त्यामधोमध, मार्गात.
**अन्तरापण**–(पु.) बाजार.
**अन्तराय**–(पु.) बाधा, अडचण, धोका, अडथळा.
**अन्तरायिक**–(वि.) बाधाचे कारण, अडचणीचे.
**अन्तराल**–(नपु.) मधली स्थिती.
**अन्तरिक**–(वि.) नंतरची स्थिती.
**अन्तरीप**–(नपु.) द्वीप, समुद्रातील भू-भाग.
**अन्तरीय**–(नपु.) आतील वस्त्र, लुंगी.
**अन्तरेन**–(क्रि. वि.) शिवाय, ऐवजी, खेरीज.
**अन्तलिक्ख**–(नपु.) अंतरिक्ष, अवकाश, पोकळी, आकाश.
**अन्तवन्तु**–(वि.) शेवटचा.
**अन्तिक**–(वि.) टोकावरील, अग्रावरील,
**अन्तिक**–(नपु.) शेजार.
**अन्तेपुर**–(नपु.) गावाचा मध्यभाग, महालाचा मध्य, झोपण्याची खोली, रनिवास, शयनगृह.
**अन्तेवासी**–(पु.) गुरुबरोबर राहणारा, जवळचा शिष्य.
**अन्तो**–(अ.) आत (मध्ये).
**अन्तोकुच्छि**–(पु.) जांघेत, बगलेत, काखेत.
**अन्तिम**–(वि.) शेवटचा, अखेरचा.
**अन्दु**–(पु.) बेडी.
**अन्दुघर**–(नपु.) तुरुंग, कारागृह.
**अन्धक**–(पु.) माशी.
**अन्धक**–(वि.) आन्ध्र निवासी.
**अन्धक-निकाय**–(पु.) स्थविरपदाच्या वादामुळे वेगळे झालेल्या भिक्खुंचा संप्रदाय.
**अन्धक-विन्द**–(पु.) राजगृहापासून तीन कोस अंतरावरील मगध राज्यातील एक गाव.
**अन्धकार**–(पु.) अंधार, अन्धकार.
**अन्धतम**–(पु., नपु.) दिपविणारा.
**अन्न**–(नपु.) भोजन, खाद्य पदार्थ, अन्न.
**अन्नद**–(पु.) अन्न देणारा, अन्नदाता.
**अन्नादि.**–(पु.) भोजन इत्यादि.
**अन्न-पान**–(नपु.) खाणे-पिणे.
**अन्वक्खर**–(वि.) अक्षरानुक्रम, वर्णानुक्रम, अक्षरानुसार.
**अन्वगा**–(भूत. क्रि.) तो गेला.
**अन्वगु**–(भूत. क्रि.) ते गेले.
**अन्वड्ढमास**–(क्रि. वि.) प्रत्येक पंधराव्या दिवशी.
**अन्वत्थ**–(वि.) अर्थानुसार.
**अन्वदेव**–(अ.) मागे, पिच्छा.
**अन्वय**–(पु.) मार्ग, क्रम, हेतु.
**अन्वहं**–(क्रि. वि.) दैनिक, दरदिवशी.
**अन्वागच्छति**–(क्रि.) मागून येणे.
**अन्वाचय**–(पु.) संग्रह, साठा.
**अन्वाय**–(पू. क्रि.) अनुभव घेऊन, **अन्वाचय**-(अ.) ही, सुद्धा.
**अन्वायिक**–(वि.) साथी, जोडीदार.
**अन्वाहिण्डति**–(क्रि.) मागून फिरणे, हिंडणे.
**अन्वेति**–(क्रि.) अनुसरणे, मागून येणे.
**अन्वेसक**–(पु., वि.) संशोधक, शास्त्रज्ञ.
**अन्वेसति**–(क्रि.) शोध लावणे.
**अन्ह**–(पु.) दिवसाचा भाग-काळ, (पूर्वान्हि, मध्यान्ह, अपरान्ह).
**अपकड्ढति**–(क्रि.) बाहेर ओढणे.
**अपकरोति**–(क्रि.) अपकार करणे.
**अपकस्सति**–(क्रि.) हटविणे, बाजूस सारणे.
**अपकार**–(पु.) हानी, नुकसान.
**अपक्कम**–(पु.) पलायन.
**अपक्कमति**–(क्रि.) पळून जाणे, निघून जाणे.
**अपगब्भ**– (वि.) पुनर्जन्म, अप्रगल्भ.
**अपगम**–(पु.) निघून जाणारा.
**अपचय**–(पु.) निरोध, थांबविणे, जन्म-मरणाचा निरोध.
**अपचायति**–(क्रि.) आदर करणे, गौरव करणे.
**अपचायन**–(नपु.) पूजा, आदर, गौरव.
**अपचायक**–(पु.) पुजारी.
**अपच्च**–(नपु.) अपत्य, मूल, संतान.
**अपच्चक्ख**–(वि.) अप्रत्यक्ष.
**अपजित**–(नपु.) हार, पराजय.
**अपटु**–(वि.) मठ्ठ, मंदबुद्धी.
**अपण्डित**–(वि.) मूर्ख, अज्ञ, मूढ.
**अपण्णक**–(वि.) निर्दोष.
**अपण्णक जातक**–अनाथपिंडिक व त्याच्या पांचशे मित्रांना उपदेशिलेली जातक कथा–(नं. १).
**अपत्थट**–(वि.) पसरला नाही, वाढला नाही.
**अपत्थद्ध**–(वि.) निरुत्साही, शिथिल.
**अपत्थिय**–(वि.) त्याज्य, टाकाऊ.
**अपथ**-(पु.) कुमार्ग.

**अपद**–(वि.) चिन्ह रहित.
**अपदान**–(नपु.) जीवन चर्या, अनुश्रुती.
**अपदान**–(पु.) खुद्दक निकायातील पंधरा ग्रंथापैकी एक ग्रंथ. "अपदान" ग्रंथात भ. बुद्धाच्या पाचशे सत्तेचाळीस (५४७) भिक्खु शिष्यांच्या व चाळीस (४०) भिक्खुणींच्या जीवनकथांचा संग्रह आहे.
**अपदिस**–(पु.) साक्षीदार, समर्थक.
**अपदिसति**–(क्रि.) साक्ष देणे, समर्थन करणे.
**अपदेस**–(पु.) तर्क.
**अपधारण**–(नपु.) झाकण, आवरण.
**अपनामेति**–(नपु., क्रि.) हटविणे, दूर करणे.
**अपनिदहति**–(क्रि.) झाकणे, लपविणे.
**अपनिहित**- (क्रि. वि.) झाकलेला, गुपित ठेवलेला.
**अपनुदति**–(क्रि.) हाकलून देणे.
**अपनुदन**–(नपु., क्रि.) हटविणे, मागे सारणे.
**अपनुदितु**–(पु.) ढकलणारा, हटविणारा.
**अपनेति**- (क्रि.) दूर सारणे, ढकलणे.
**अपमार**–(पु.) फेफरे (रोग), मिरगी, फिट येणे.
**अपयाति**–(क्रि.) निघून जाणे, परत फिरणे.
**अपर**–(वि.) परका, दुसरा, पाश्चिमात्य.
**अपरभागे**–(अधिकरण) नंतर, पुन्हा, पश्चाताप.
**अपरगोयान**–(नपु.) पृथ्वीच्या चार महाद्वीपांपैकी एक खंड.
**अपरज्जु**–(क्रि. वि.) उद्या.
**अपरज्झति**–(क्रि.) अपराध करणे, गुन्हा करणे.
**अपरद्ध**–(क्रि. वि.) दोषी, अपराधी, गुन्हेगार.
**अपरण्ण**–(नपु.) द्विदल धान्य, कड धान्य.
**अपरंत**–(पु.) तिसऱ्या संगीति (धम्म परिषद) नंतर सम्राट अशोकाने ज्या ज्या देशांत धम्म प्रचारार्थ भिक्खु पाठविले, त्या देशांपैकी "अपरंत" हा एक देश.
**अपरप्पच्चय**–(वि.) स्वावलंबी.
**अपरसेलिय**–(पु.) एक उपसंप्रदाय.
**अपराजित**–(वि.) अजिंक्य, अपराजित.
**अपराध**–(पु.) दोष, गुन्हा, अपराध.
**अपरापरीय**–(वि.) निरंतर, सतत.
**अपरिग्गहित**–(वि.) ताबा नाही असा, ताबा नसलेला.
**अपरिच्छिन्न**–(वि.) असीम, अमर्याद.
**अपरिमित**–(वि.) असीम, अमर्याद.
**अपलायी**–(वि.) पळत नाही, स्थीर.
**अपलालेति**–(क्रि.) प्रेम-माया करणे.
**अपलिबुद्ध**–(वि.) स्वतंत्र, निर्दोष.
**अपलेखन**–(नपु.) चाटणे.
**अपलोकेति**–(क्रि.) वर पाहणे, दया मागणे, याचना करणे.
**अपवग्ग**–(पु.) मुक्ति, मोक्ष, निर्वाण.
**अपवज्जन**–(नपुं.) परित्याग.
**अपवत्तति**–(क्रि.) वळणे, परिवर्तन करणे.
**अपवदति**–(क्रि.) दोष देणे.
**अपवहति**–(क्रि.) घेऊन जाणे.
**अपवाद**–(पु.) निंदा, टीका, दोषारोपण.
**अपविद्ध**–(क्रि. वि.) फेकून दिले, त्यागले.
**अपसक्कति**–(क्रि.) बाजूस होणे, सरकणे.
**अपसव्य**–(नपु.) उजवीकडे.
**अपसादन**–(नपु.) निग्रह, निश्चय.
**अपसादेति**–(क्रि.) निश्चय करणे.
**अपस्मार**–(पु.) मिरगी रोग, फेफरे.
**अपस्सय**–(पु.) आश्रय, आधार, साह्य.
**अपस्सेति**–(क्रि.) आश्रय देणे.
**अपस्सेन**–(नपु.) आधारफळी.
**अपहत्तु**–(पु.) हालविणारा.
**अपहरति**–(क्रि.) लुटणे, अपहरण करणे.
**अपांग**–(पु.) अक्षावरील कोन.
**अपाकट**–(वि.) अप्रकट, अज्ञात, गुप्त.
**अपाकतिक**–(वि.) अप्राकृतिक, कृत्रिम.
**अपाची**–(स्त्री.) पश्चिम दिशा.
**अपाचीन**–(वि.) पाश्चिमात्य.
**अपाद, अपादक**–(वि.) बिन पायांचा, पाय नसलेला.
**अपादान**–(नपु.) पंचमी, विभक्ती, पृथक्करण.
**अपान**–(नपु.) उच्छ्वास, प्रश्वास.
**अपापक**–(वि.) निर्दोष, पुण्यवान.
**अपापुरण**–(नपु.) चावी, किल्ली.
**अपापुरति**–(क्रि.) उघडणे, खोलणे.
**अपाय**–(पु.) नरकलोक, पापी, पाताळयंत्री.
**अपायगामी**–(वि.) दुर्दशा झालेला.
**अपाय-मुख**–(नपु.) दुरावस्थेचे कारण.
**अपाय-सहाय**–(पु.) चैनी मित्र.
**अपार**–(वि.) अमर्याद, असीम.
**अपारुत**–(वि.) उघडलेला.
**अपालम्ब**–(पु.) टेकू, गाडीचा लाकडी घोडा.
**अपि**–(अ.) ही, सुद्धा.
**अपि**–(अ.) किंतु, परंतु.
**अपितु**–(अ.) प्रश्नवाचक अव्यय.

अपिनाम–(प्रश्नार्थक स. ना.) जर आम्ही.
अपिनाम–(अ.) निपात, प्रशंसा, निंदा या मध्ये वापरला जाणारा अ.
अपित्सु–(वि.) इतका, इतकी, इतके.
अपिधान–(नपु.) झाकण.
अपिलापन–(नपु.) पाठांतर, संथा, घोकंपट्टी.
अपिहालु–(वि.) निस्वार्थी, निरिच्छ.
अपिहित–(वि.) झाकलेला.
अपुच्छ–(वि.) न विचारलेला, अनुच्चारित.
अपुञ्ञ–(नपु.) पाप, अपुण्य.
अपूप–(नपु.) पान, पृष्ठ.
अपेक्खक–(वि.) अपेक्षक, वाट पहाणारा, आतूर.
अपेक्खति–(क्रि.) वाट पाहणे, प्रतीक्षा करणे, अपेक्षा करणे.
अपेक्खा–(स्त्री.) अपेक्षा, इच्छा, आशा.
अपेत–(क्रि. वि.) निघून गेलेला.
अपेति–(क्रि.) निघून जाणे.
अपेत्तेय्यता–(स्त्री.) वडिलांची अवज्ञा, वडिलांचा अपमान.
अपेय्य–(वि.) दारू, मदिरा, पिण्यास अयोग्य.
अप्प–(वि.) अल्प, थोडा.
अप्पकसिरेण–(वि.) कष्टाने, त्रासाने.
अप्पकिच्च–(वि.) अल्प काम, सोपे काम.
अप्पकिण्ण–(वि.) शांत, विरळ, पातळ.
अप्पत्थ–(पु.) अल्पार्थ, थोडा अर्थ.
अप्पगब्भ–(वि.) निगर्वी.
अप्पग्घ–(वि.) स्वस्त.
अप्पच्चय–(पु.) सहज, निर्हेतु.
अप्पटिखिप्प–(वि.) पाठविण्यास अयोग्य.
अप्पटिध–(वि.) विनविरोध, एकमताने.
अप्पटिपुग्गल–(पु.) अतिशक्तिमान.
अप्पटिबद्ध–(वि.) अनासक्त, निरिच्छ.
अप्पटिभाग–(वि.) १) स्वतःचा २) आज्ञाधारक.
अप्पटिम–(वि.) अप्रतिम.
अप्पटिवत्तिय–(वि.) अपरिवर्तनीय.
अप्पटिवानी–(वि.) हार न मानणारा.
अप्पटिविद्ध–(वि.) अडाणी.
अप्पटिसंखा–(स्त्री.) अविचारी, विचाराचा अभाव.
अप्पटिसंधिक–(वि.) पुनर्जन्म संबंध जोडणे अयोग्य.
अप्पणा–(स्त्री.) एकाग्र, केंद्रितलक्ष.
अप्पणिहित–(वि.) निरिच्छ.
अप्पतिट्ठ–(वि.) अप्रतिष्ठ, उदास, असहाय्य.
अप्पतिस्सन–(वि.) विद्रोही.
अप्पतीत–(वि.) अप्रसन्न, उदास.
अप्पदुट्ठ–(वि.) सज्जन.
अप्पधंसीय–(वि.) संग्राह्य, टाकाऊ नाही.
अप्पना–(स्त्री.) तर्क-वितर्क.
अप्पमञ्ञा–(स्त्री.) मैत्री-करूणा-मुदिता व उपेक्षा या चारी असीम भावना.
अप्पमत्त–(वि.) जागरूक, सज्जन, अप्रमादी.
अप्पमाण–(वि.) असीम, अमाप, अप्रमाण.
अप्पमाद–(वि.) जागरुकता, सौजन्य, अप्रमाद.
अप्पमेय्य–(वि.) अमाप.
अप्पवत्ति–(स्त्री.) उणीव, अभाव, अप्रवृत्ती.
अप्पसाद–(पु.) असंतोष.
अप्प-सत्थ–(वि.) टोळी-प्रमुख, अप्रशंसित.
अप्पसन्न–(वि.) अप्रसन्न, उदास.
अप्पसमारंभ–(वि.) सहज, विनासायास.
अप्पस्सक–(वि.) निर्धन.
अप्पस्साद–(वि.) थोडी चव, बेचव, अरूचकर.
अप्पहीन–(वि.) नाश न होणारा, नित्य.
अप्पाणक–(वि.) प्राणहीन, निर्जिव.
अप्पातङ्क–(वि.) निरोगी, आतंकरहित.
अप्पिच्छ–(वि.) अल्पसंतुष्टी, अल्पेच्छी.
अप्पिय–(वि.) नावडता, अप्रिय.
अप्पेकदा–(क्रि. वि.) कधी-कधी, केव्हा-केव्हा.
अप्पेव–(वि.) चांगला.
अप्पेवनाम–(अव्यय) जर असे झाले.
अप्पेवसक्क–(वि.) सामान्य, मामुली.
अप्पोसुक्क–(वि.) अनुत्साही, उदास (अल्प + उत्सुक).
अप्फुट–(वि.) अस्पृश्य, स्पर्श न झालेला.
अप्फोटेति–(क्रि.) चुटकी, टाळी वाजविणे.
अफल–(वि.) निष्फळ, व्यर्थ.
अफस्सित–(वि.) स्पर्शरहित, न शिवलेला, स्पर्श न झालेला.
अफासु–(वि.) गैरसोय, अवघड.
अफेग्गुक–(वि.) सबल, सशक्त, बलवान.
अबद्ध–(वि.) बंधमुक्त, मोकळा.
अबन्धन–(वि.) स्वैर.
अबल–(वि.) निर्बल, अशक्त.
अबला–(स्त्री.) स्त्री नारी.
अबव–(नपु.) संख्याविषयी, आंकड्याबाबत.

अबाध–(नपु., वि.) बाधा नसलेला, अबाध्य.
अब्बण–(वि.) व्रण रहित.
अब्बत–(वि.) निर्वती, व्रत न करणारा.
अब्यासेक–(नपु.) संतोषजनक, आनंदी.
अब्बुद–(नपुं.) गर्भ धारणेनंतरचे दोन महिन्याच्या गर्भाची अवस्था.
अब्बोकिण्ण–(वि.) निर्विघ्न.
अब्बोछिन्न–(वि.) बाधा रहित.
अब्बोहारिक–(वि.) अव्यवहारी, नियमबाह्य.
अब्भ–(नपु.) आकाश, अभ्र.
अब्भकूट–(नपु.) ढगांचे शिखर.
अब्भपटल–(नपु.) ढगांचे छत.
अब्भक–(पु.) अभ्रक (खनिज).
अब्भक्खाति–(क्रि.) निंदा करणे.
अब्भक्खान–(वि.) दोष.
अब्भञ्जति–(क्रि.) तेल लावून चोळणे.
अब्भतीत–(वि.) भूतकालिक, निघून गेलेला.
अब्भनुमोदति–(क्रि.) आनंद प्रकट करणे.
अब्भन्तर–(नपु.) आंत, मध्ये.
अब्भन्तर जातक–बिम्बादेवीसाठी सारिपुत्राने आम्ररस मिळविल्याची जातक कथा-(नं. २८१).
अब्भागत–(पु.) अतिथी, पाहुणा.
अब्भाघात–(नपु.) वध-स्थळ, वेदि.
अब्भाचिक्खति–(क्रि.) दोष देणे.
अब्भान–(नपु.) आवाहन, बोलावणे,
प्रायश्चित घेतल्यानंतर भिक्खुला परत संघात बोलावणे
अब्भाहत–(क्रि. वि.) आकस्मित, अचानक.
अब्भुक्किरण–(नपु.) बाहेर ओढणे.
अब्भुगच्छति–(क्रि.) वर जाणे.
अब्भुगमन–(पुन.) प्रगति होणे, उत्कर्ष होणे.
अब्भुत धम्म–(पु.) आश्चर्यकारक प्रकरण, गोष्ट.
अब्भुदेति–(क्रि.) उत्कर्ष होणे, प्रगती करणे.
अब्भुन्नत–(वि.) उदय, उन्नती, प्रगती.
अब्भुम्मे–(अ.) अहाहा !
अब्भुय्याति–(क्रि.) आक्रमण करणे, चढाई करणे.
अब्भुसूयक–(वि.) उत्साही, आनंदित.
अब्भेति–(क्रि.) आवाहन करणे, बोलावणे.
अब्भोकास–(पु.) निरभ्र आकाश, स्वच्छ आकाश.
अब्भोकिरति–(क्रि.) अभिषेक करणे, वर्षाव करणे.
अभब्बो–(वि.) अयोग्य, प्रतिकूल.
अभय–(वि.) निर्भय.
अभाव–(पु.) लोप, उणीव.
अभावित–(वि.) अननुभवी.
अभिकंखति–(क्रि.) इच्छिणे, आशा धरणे.
अभिकंखन–(नपु.) इच्छा, कामना, आशा.
अभिकिरति–(क्रि.) विसकटणे, पसरणे.
अभिकीळति–(क्रि.) खेळणे, क्रीडा करणे.
अभिकूजति–(क्रि.) गुणगुणणे, किलबिलणे.
अभिक्कन्त–(अ.) अत्यंत सुंदर.
अभिक्कमति–(क्रि.) निघून जाणे, प्रस्थान करणे.
अभिक्खण–(वि.) प्रतिक्षण, सतत, लागोपाठ.
अभिक्खणति–(क्रि.) खोदणे, पाने, उत्खनन करणे.
अभिगज्जति–(क्रि.) गर्जना करणे.
अभिगज्जन–(नपु.) गर्जना.
अभिघात–(पु.) संपर्क.
अभिघात–(क्रि. वि.) ठार मारणे, हत्या करणे, खून करणे.
अभिघाती–(पु.) घातक, शत्रू, वैरी.
अभिचेतसिक–(वि.) चित्तासंबंधी.
अभिचेतेति–(क्रि.) विचार करणे, चिंतन करणे.
अभिजच्च–(वि.) अभिजात, उच्चप्रतीचा, जातिवंत.
अभिजन–(पु.) नातलग, नातेवाईक.
अभिजप्पति–(क्रि.) जप करणे, प्रार्थना करणे, विनविणे.
अभिजाति–(स्त्री.) पुनर्जन्म, विशिष्ट वा उच्चजाती.
अभिजानन–(नपु.) ओळख, आठवण.
अभिजानाति–(क्रि.) जाणणे, ओळखणे, आठवणे.
अभिजायति–(क्रि.) उत्पन्न होणे, निर्माण होणे.
अभिजिगिज्झति–(क्रि.) अतिलोभी असणे, हाव धरणे.
अभिजिगिज्झन–(नपु.) लोभ, हाव, तृष्णा.
अभिजिगिंसति–(क्रि.) जिंकण्याची इच्छा करणे.
अभिज्जमान–(वि.) अतूट, अभंग.
अभिज्झा- (स्त्री.) अति लोभ.
अभिज्झायति–(क्रि.) अति लोभ धरणे, स्वार्थी असणे.
अभिञ्ञ–(वि.) जाणकार, अभिज्ञ.
अभिञ्ञा–(स्त्री.) विशिष्ठ ज्ञान.
अभिञ्ञाय–(पु. क्रि.) जाणून घेऊन, ज्ञान मिळवून.
अभिञ्ञात–(क्रि. वि.) प्रसिद्ध.
अभिण्हजातक–कुत्रा आणि हत्ती या दोन प्रामाणिक प्राण्यांची अतूट मैत्री असल्याची जातक कथा-(नं. २७).
अभिण्ह–(वि.) सतत, नेहमी.
अभिण्हं–(क्रि. वि.) प्रायः, संध्या.

**अभिण्हसो**–(क्रि. वि.) सदैव, नेहमी.
**अभितप्त**–(क्रि. वि.) तापलेला, उष्ण.
**अभितप्ति**–(क्रि.) तापणे, गरम होणे.
**अभिताप**–(पु.) उष्णता, ऊब.
**अभिताळित**–(क्रि. वि.) ताडित, उपद्रवित.
**अभिताळेति**–(क्रि.) ताडण करणे, छळणे, त्रास देणे.
**अभितिट्ठति**–(क्रि.) बाजी मारणे, पुढे जाणे.
**अभितो**–(अ.) चोहोंकडून.
**अभितोसेति**–(क्रि.) संतुष्ट करणे, तृप्त करणे.
**अभिथनति**–(क्रि.) गर्जना करणे, गरजणे.
**अभिथरति**–(क्रि.) घाई करणे.
**अभित्थवति**–(क्रि.) प्रशंसा करणे, स्तुती करणे.
**अभित्थवि**–(भूत. क्रि.) प्रशंसा केली, स्तुती केली.
**अभित्थुत**–(क्रि. वि.) प्रशंसित.
**अभित्थुनाति**–(क्रि.) प्रशंसा करणें, स्तुती करणे.
**अभित्थुनि**–(भूत. क्रि.) प्रशंसा केली, स्तुती केली.
**अभिदोस**–(पु.) कालची संध्याकाळ.
**अभिदोसिका**–(वि.) काल संध्याकाळविषयी.
**अभिधमति**–(क्रि.) वाजविणे, आवाज काढणे.
**अभिधम्म**–(पु.) अभिधम्मपिटकाचा विशेष उपदेश.
**अभिधम्मपिटक**–(पु.) त्रिपिटकांपैकी एक पिटक यात सात ग्रंथ आहेत. (१) धम्मसङ्गणि, (२) विभंग (३) कथा-वत्यु, (४) पुग्गलपञ्ञत्ति, (५) धातु कथा, (६) यमक (७) पट्ठान.
**अभिधम्मिक**–(पु., वि.) अभिधम्म जाणणारा.
**अभिधा**–(स्त्री.) नाम, संज्ञा.
**अभिधान**–(नपु.) नाम, संज्ञा.
**अभिधानप्प दीपिका**–(स्त्री.) बाराव्या शतकात लिहि-लेल्या "पालि कोशा"ची रचना. संस्कृत भाषेतील "अमर कोशा"च्या रचनेप्रमाणे केली आहे.
**अभिधावति**–(क्रि.) धावणे, पळणे.
**अभिधेय्य**–(वि.) नावाचा.
**अभिधेय्य**–(नपु.) अर्थ, व्याख्या.
**अभिनदति**–(क्रि.) आवाज काढणे, हांक मारणे.
**अभिनदित**–(नपु.) आवाज.
**अभिनन्दति**–(क्रि.) आनंदणे, आनंदित होणे.
**अभिनन्दी**–(वि.) आनंदी.
**अभिनमति**–(क्रि.) झुकणे, वाकणे, नम्र होणे.
**अभिनय**–(नपु.) नाटक, अभिनय.
**अभिनयन**–(नपु.) आणणे, चौकशी.
**अभिनव**–(वि.) नवा, ताजा, नवीन, अभिनव.
**अभिनादित**–(क्रि. वि.) घुमविला, वाजविला.
**अभिनिकूजित**–(क्रि. वि.) पक्षांची किलबिल.
**अभिनिक्खमति**–(क्रि.) गृहत्याग करणे, अभिनिष्क्रमण करणे.
**अभिनिक्खमन**–(नपु.) गृहत्याग.
**अभिनिक्खिपति**–(क्रि.) ठेवणे, ठेवून देणे.
**अभिनिक्खिपन**–(नपु.) ठेवणे.
**अभिनिपज्जति**–(क्रि.) झोपणे, निजणे.
**अभिनिपतति**–(क्रि.) खाली पडणे.
**अभिनिप्पीळेति**–(क्रि.) त्रास देणे, पीडा देणे.
**अभिनिप्फज्जति**–(क्रि.) उत्पन्न होणे, तयार होणे.
**अभिनिप्फति**–(क्रि.) उत्पन्न होणे, समर्थ होणे.
**अभिनिप्फादेति**–(क्रि.) उत्पादन करणे, निर्माण करणे.
**अभिनिब्बत**–(क्रि. वि.) जन्मलेला, उपजलेला.
**अभिनिब्बत्ति**–(क्रि.) जन्मणे, उपजणे.
**अभिनिब्बत्ति**–(स्त्री.) उत्पत्ती.
**अभिनिब्बत्तेति** (क्रि.) जन्म घेणे, उपजणे.
**अभिनिब्बिदा**–(स्त्री.) वैराग्य.
**अभिनिब्बुत**–(वि.) विझलेला, शांत झालेला.
**अभिनिमंतेति**–(क्रि.) निमंत्रण देणे, निमंत्रित करणे.
**अभिनिम्मिणाति**–(क्रि.) निर्माण करणे, पैदा करणे.
**अभिनिरोपन**–(नपु.) लक्ष, चित्त.
**अभिनिरोपेति**–(क्रि.) लक्षात ठेवणे, स्मरणांत ठेवणे, आठवणीत ठेवणे.
**अभिनिविसति**–(क्रि.) आसक्त होणे, मोहित होणे.
**अभिनिवेस**–(पु.) सूचना, कल्पना.
**अभिनिसीदति**–(क्रि.) जवळ बसणे.
**अभिनीत**–(क्रि. वि.) आणले.
**अभिनीहट**–(क्रि. वि.) बाहेर आणले.
**अभिनीहरति**–(क्रि.) बाहेर आणणे, बाहेर काढणे.
**अभिनीहार**–(पु.) संकल्प, निश्चय.
**अभिपत्थेति**–(क्रि.) इच्छिणे, आकांक्षा करणे.
**अभिपालेति**–(क्रि.) पालन करणे, पोसणे.
**अभिपीळेति**–(क्रि.) त्रास देणे, पीडा देणे.
**अभिपुच्छति**–(क्रि.) विचारणे.
**अभिपूरति**–(क्रि.) पुरे करणे, पूर्ण करणे.
**अभिप्पकीरति**–(क्रि.) विस्कटणे, पसरणे.
**अभिप्पमोदति**–(क्रि.) आनंदणे, मुदित होणे.
**अभिप्पसाद**–(पु.) श्रद्धा, भक्ती.

**अभिप्पसारेति**–(क्रि.) पसरणे, आकार वाढविणे.
**अभिप्पसीदति**–(क्रि.) श्रद्धाळू असणे, प्रसन्न होणे.
**अभिभवति**–(क्रि.) जिंकणे.
**अभिभवन**–(नपु.) जीत, जय.
**अभिभवनीय**–(वि.) जिंकण्यायोग्य.
**अभिभू**–(पु.) विजेता, जेता.
**अभिभूत**–(क्रि. वि.) विजयी, यशवंत.
**अभिमङ्गल**–(वि.) मंगल, पवित्र.
**अभिमण्डित**–(क्रि. वि.) सजविले, नटविले.
**अभिमत**–(वि.) इच्छित.
**अभिमित्थति**–(क्रि.) घुसळणे, मंथन करणे.
**अभिमद्दति**–(क्रि.) चोळणे, मर्दन करणे.
**अभिमद्दन**–(नपु.) मर्दन, मालिश, चोळणे.
**अभिमनाप**–(वि.) सुंदर.
**अभिमान**–(पु.) स्वाभीमान, अभिमान.
**अभिमार**–(पु.) डाकू, चोर, ठग.
**अभिमुख**–(वि.) समोर, पुढे.
**अभियाचति**–(क्रि.) याचना करणे, मागणे.
**अभियाचन**–(नपु.) याचना, मागणी.
**अभियाति**–(क्रि.) विरोध करणे, प्रतिकार करणे.
**अभियुज्जति**–(क्रि.) अभ्यास करणे, अध्ययन करणे.
**अभियुञ्जति**–(क्रि.) भांडणे, झगडणे.
**अभियुञ्जन**–(नपु.) दावा.
**अभियोग**–(पु.) अभ्यास.
**अभियोगी**–(पु.) अभ्यासू.
**अभिरक्खति**–(क्रि.) रक्षण करणे, सांभाळणे.
**अभिरक्खन**–(नपु.) रक्षण, सांभाळ.
**अभिरति**–(स्त्री.) प्रीती, आसक्ती, प्रेम.
**अभिरद्धि**–(स्त्री.) संतोष, तृप्ती.
**अभिरमति**–(क्रि.) रमणे, भोगणे, रती क्रीडा करणे.
**अभिरम्मन**–(नपु.) भोग, रति, रास, मैथुन.
**अभिरमापेति**–(क्रि.) भोग भोगणे, संभोगणे.
**अभिराम**–(वि.) अनुकूल, योग्य.
**अभिरुचि**–(स्त्री.) आवड, इच्छा, अभिरुची.
**अभिरुचिर**–(वि.) अतिसुंदर.
**अभिरुद**–(वि.) गुणगुण, किलबिल.
**अभिरूप**–(वि.) सुंदर, सुस्वरूप, अभिरूप.
**अभिरूहति**–(क्रि.) वर चढणे.
**अभिरूहन**–(नपु.) चढाई.
**अभिरोचेति**–(क्रि.) पसंत करणे, आवडणे.

**अभिरोपन**–(नपु.) एकाग्रता, तपश्चर्या.
**अभिरोपेति**–(क्रि.) मन एकाग्र करणे, तपश्चर्या करणे, साधना करणे, व्रत आचरणे.
**अभिलक्खित**–(क्रि. वि.) मुद्रित, चिन्हांकित.
**अभिलक्खेति**–(क्रि.) छापणे, मुद्रित करणे.
**अभिलाप**–(पु.) बोल, भाषण, चर्चा.
**अभिलाव**–(पु.) कापणे.
**अभिलासा**–(स्त्री.) इच्छा, आकांक्षा, अभिलाषा.
**अभिलेखेति**–(क्रि.) छापविणे, मुद्रित करविणे.
**अभिवञ्चन**–(नपु.) फसवणूक, लुबाडणूक.
**अभिवट्ठ**–(क्रि. वि.) वर्षाव झाला, वृष्टी झाली.
**अभिवड्ढति**–(क्रि.) वाढ होणे, वृद्धी होणे.
**अभिवड्ढन**–(नपु.) वाढ, वृद्धी.
**अभिवण्णित**–(क्रि. वि.) प्रशंसित.
**अभिवण्णेति**–(क्रि.) प्रशंसा करणे, वाखाणणे.
**अभिवदति**–(क्रि.) घोषित करणे, जाहीर करणे.
**अभिवन्दति**–(क्रि.) अभिवादन करणे, वंदन करणे.
**अभिवस्सति**–(क्रि.) वर्षाव होणे, वृष्ठी होणे.
**अभिवादन**–(नपु.) नमस्कार, वंदन, अभिवादन.
**अभिवादेति**–(क्रि.) नमस्कार करणे, अभिवादन करणे.
**अभिवायति**–(क्रि.) वारा सुटणे, हवा हालणे.
**अभिवारेति**–(क्रि.) थांबविणे, अडविणे, थोपवून धरणे.
**अभिविजयति**–(क्रि.) विजय मिळविणे, विजयी होणे.
**अभिविञ्ञापेति**–(क्रि.) प्रेरित करणे, प्रोत्साहन देणे.
**अभिवितति**–(क्रि.) वाटणे, वितरण करणे.
**अभिविधि**–(स्त्री.) मर्यादा.
**अभिवितरण**–(नपु.) दान, देणगी.
**अभिविसिट्ठ**–(वि.) विशिष्ठ, महत्त्वाचे.
**अभिसंखत**–(क्रि. वि.) संस्कारित, संस्कारक्षम.
**अभिसंखरण**–(नपु.) जमिनीची सफाई.
**अभिसङखरोति**–(क्रि.) रचणें, घडविणे.
**अभिसंधि**–(पु.) अभिप्राय.
**अभिसङखार**–(पु.) संस्कार.
**अभिसङखारिक**–(वि.) संस्काराविषयी.
**अभिसङ्ग**–(पु.) आसक्ती, ओढ.
**अभिसज्जति**–(क्रि.) रागावणे, संतप्त होणे.
**अभिसज्जन**–(नपु) राग, क्रोध.
**अभिसञ्चेतेति**–(क्रि.) विचार करणे, चिंतन करणे.
**अभिस्संग**–(पु.) अभिशाप.
**अभिसट**–(क्रि. वि.) समागत, जोडीने.

**अभिसत्त**–(क्रि. वि.) अभिशाप.
**अभिसद्दहति**–(क्रि.) श्रद्धा ठेवणे, भक्ती असणे.
**अभिसंतापेति**–(क्रि.) संतप्त होणे.
**अभिसंद**–(पु.) परिणाम, फळ.
**अभिसंदहति**–(क्रि.) जोडणे, सांधणे.
**अभिसंदेति**–(क्रि.) उतरून घेणे.
**अभिसपति**–(क्रि.) शाप देणे.
**अभिसपन्न**–(नपु.) शाप.
**अभिसमय**–(पु.) पूर्ण ज्ञान, स्पष्ट ज्ञान.
**अभिसमागच्छति**–(क्रि.) समजून घेणे, जाणून घणे.
**अभिसम्माचारिक**–(वि.) सद्गुणविषयी, सदाचारासंबंधी.
**अभिसमेच्च**–(पू. क्रि.) पूर्ण विचार करून, जाणून-बूजून.
**अभिसमेति**–(क्रि.) भावस्पर्शी, हृदयस्पर्शी, हृदयंगम.
**अभिसम्पराय**–(पु.) भावी, परलोक, भविष्यत्.
**अभिसम्बुज्झति**–(क्रि.) संबोधि मिळविणे, बुद्धत्व प्राप्त करणे.
**अभिसम्बुद्ध**–(क्रि. वि.) पूर्ण ज्ञानी, बुद्ध, शास्ता, सम्बुद्ध.
**अभिसम्बोधि**–(स्त्री., वि.) पूर्ण ज्ञान, सम्बोधि.
**अभिसम्भव**–(क्रि. वि.)दुर्लक्ष, अप्राप्य, मिळण्यास कठीण.
**अभिसम्भुनाति**–(क्रि.) समर्थ होणे, सामर्थ्य येणे.
**अभिसम्मति**–(क्रि.) थांबणे, शांत होणे, थंड होणे.
**अभिसर**–(पु.) अनुयायी, शिष्य, अभिसरण करणारा, मिसळणारा.
**अभिसाप**–(पु.) अभिशाप.
**अभिसारिका**–(स्त्री.) राजदासी.
**अभिसिञ्चति**–(क्रि.) अभिषेक करणे.
**अभिसेक**–(पु.) अभिषेक, वर्षाव, सिंचन.
**अभिहट**–(क्रि. वि.) आणले.
**अभिहनति**–(क्रि.) मारणे, धक्का देणे.
**अभिहरति**–(क्रि.) भेट देणे, पुरस्कार देणे.
**अभिहार**–(पु.) भेट, पुरस्कार.
**अभिहित**–(क्रि. वि.) सांगितलेले.
**अभीत**–(वि.) निर्भय.
**अभीरुक**–(वि.) धीटपणा.
**अभूत**–(वि.) सत्य, खरे, प्रत्यक्ष.
**अभेज्ज**–(वि.) अभेद्य, विभागला नाही.
**अभोज्ज**–(वि.) अखाद्य, खाण्यास अयोग्य.
**अमच्च**–(पु.) अमात्य, सल्लागार, मंत्री.
**अमज्ज**–(नपु.) अमद्य, दारू नाही.
**अमज्जप**–(वि.) निर्व्यसनी.
**अमत**–(नपु.) अमृत.
**अमतप**–(नपु.) देव.
**अभ्यास**–(पु., वि.) जवळ, लगट.
**अमत्त**–(वि.) मर्यादित, नशा न चढलेला.
**अमत्तञ्ञु**–(वि.) खादाड, मात्रा-प्रमाणे न जाणणारा.
**अमत्तेय्य**–(वि.) मातृद्रोही, करंटा.
**अमनुस्स**–(पु.) अमानुष, भूत-प्रेत, देव.
**अमम**–(वि.) निर्लोभी, निस्वार्थी, उदार.
**अमर**–(वि.) मरण नाही, चिरंजीव, अमर.
**अमरत्त**–(नपु.) अमरत्व, चिरंजीवी.
**अमरा**–(स्त्री) निसरून जाणारी मासळी.
**अमता**–(स्त्री.) आवळा.
**अमल**–(वि.) निर्मळ, शुद्ध, दोष रहित.
**अमस्सुक**–(वि.) निकोडा, चेहऱ्यावर केस नसलेला.
**अमाता-पितिक**–(वि.) पोरका, आई बाप नसलेला.
**अमातिक**–(वि.) मातृविहिन.
**अमानुस**–(वि.) अमनुष्य, माणूस नव्हे.
**अमायावी**–(वि.) सज्जन, फसवा नव्हे.
**अमावसी**–(स्त्री.) अमावस्या.
**अमित**–(वि.) असीम, अमर्याद.
**अमिताभ**–(वि.) अनंत तेजाचा, उज्वल.
**अमिता**–(विशे. ना., स्त्री.) सिंहहनूच्या दोन मुलींपैकी एक, शुद्धोदनाची बहीण, सिद्धार्थांची आत्या, दैवदत्ताची आई.
**अमितोदन**–(विशे. ना., पु.) शुद्धोदनाचा भाऊ, महानाम व अनुरुद्ध यांचा पिता.
**अमिलात**–(वि.) टवटवीत.
**अमिस्स**–(वि.) शुद्ध, मिश्रण नसलेला.
**अमु**–(स. ना.) अमुक, (जो, तो).
**अमुच्छित**–(वि.) सूज्ञ, शहाणा, मुर्ख नाही.
**अमुत्त**–(वि.) बंदी, मोकळा नाही.
**अमुत्र**–(क्रि. वि.) अशा जागी, अमुक ठिकाणी.
**अमेज्झ**–(स्त्रि.) शुक्र, वीर्य.
**अमोघ**–(पु.) प्रज्ञा, ज्ञान.
**अम्ब**–(पु.) आंबा, आम्रफळ.
**अम्ब-अंकुर**–(पु.) आंब्याचा अंकूर.
**अम्ब-पक्क**–(नपु.) आंबा पिकला.
**अम्ब-पान**–(नपु.) आंब्याचे पान, आंबा चोखणे.
**अम्ब-पिण्डि**–(स्त्री.) आंब्याची कोय, बी, वाटी.

**अम्ब-वन**–(नपु.) आम्रवन, आंब्याची बाग, आंबराई.
**अम्ब-सण्ड**–(पु.) आंब्याची बाग.
**अम्ब-लट्ठिका**–(स्त्री.) आंब्याचे रोप.
**अम्बजातक**–हिमालयातील एका तपस्व्याने दुष्काळांत जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची सोय केली म्हणून जनावरे कृतज्ञतेने तपस्व्याला फलाहार आणून देत असल्याची जातक कथा–(नं. १२४).
**अम्ब जातक**–हुशार, ज्ञानी, कलावंत चांडाळाकडून एक ब्राह्मण शिल्पकला शिकल्याची जातक कथा–नं. (४७४).
**अम्ब चोर जातक**–आम्रवनात आश्रम थाटून चोरून आंबे खाणाऱ्या लबाड तपस्व्याची जातक कथा–(नं. ३४४).
**अम्बपाली**–(विशे. ना., स्त्री.) वैशालीची प्रसिद्ध, श्रीमंत व उदार गायिका आम्रपाली हिने भिक्खु संघाला आपले आम्रवन दान दिले. शेवटी ती भिक्खुणी होऊन भिक्खुणी संघात दाखल झाली.
**अम्बर**–(नपु.) वस्त्र, कापड, आकाश, नभ.
**अम्बा**–(स्त्री.) आई, माता, देवी.
**अम्बिल**–(वि.) आंबट, आम्ल.
**अम्बु**–(नपु.) पाणी.
**अम्बुचारी**–(पु.) जलचर, पाण्यांतील प्राणी.
**अम्बुज**–(वि.) पाण्यात जन्मणारे, जलज.
**अम्बुज**–(नपु.) कमळ, पद्म.
**अम्बुधर**–(पु.) ढग, मेघ.
**अम्बुजिनी**–(स्त्री.) पुष्करिणी, तलाव.
**अम्भो**–(अ. संबोधन) हे पुरुषा, अहो पुरुषांनो.
**अम्म**–(स्त्री.) माता, आई.
**अम्मण**–(नपु.) मणभर भात, धान्याचे मोठे माप.
**अम्मा**–(स्त्री.) आई, माता.
**अम्ह**–(स. ना.) मी चे अनेक वचन, आम्ही.
**अम्हि**–(क्रि.) मी आहे.
**अम्हा**–(बहुवचनी स. ना.) आम्ही आहोत.
**अय**–(पु.) आय, प्राप्ती, आवक, मिळकत.
**अयस**–(पु., नपु.) लोखंड किंवा तांबे, उभय धातु.
**अयकूट जातक**–जनावरांची यज्ञात व इतरत्र होणारी हत्या बोधिसत्त्वाने थांबविल्याची जातक कथा–(नं. ३४०).
**अयं**- (दर्शक स. ना.) हा, ही, हे.
**अयथा**–(अ.) अयथार्थ, मिथ्या.
**अयन**–(नपुं.) पथ, मार्ग, रस्ता, वाट.
**अयस**–(पु., नपु.) अपयश (उभयलिंगी).
**अयिर**- (पु.) स्वामी, मालक, धनी.
**अयुत्त**–(वि.) अयोग्य, अनुचित (नपुं.) अन्याय.
**अयो-कुट**–(पु.) लोखंडी हातोडा.
**अयो-खील**–(नपु.) लोखंडी खिळा.
**अयो-गुळ**–(पु.) लोखंडी गोळा.
**अयो-घन**–(नपु.) लोखंडी घण, मोठा हातोडा.
**अयोमय**–(वि.) लोहोत्पन्न, लोखंडापासून बनविलेले.
**अयो-संकु**–(पु.) लोखंडी कांटा, तराजू.
**अयो-घर जातक**–लोखंडासारख्या मजबूत घरात बोधिसत्त्वाचा जन्म झाल्याची जातक कथा–(नं. ५१०).
**अयोग**–(वि.) अयोग्य.
**अयोज्झ**–(वि.) तह केलेला, युद्ध नाही.
**अयोनिसो**–(क्रि. वि.) अनुचित प्रकारे.
**अय्य**–(पु.) आर्य, स्वामी.
**अय्य-पुत्त**–(पु.) आर्यपुत्र, राजपुत्र.
**अय्यक**–(पु.) पितामह, आजोबा.
**अय्यका, अय्यिका**–(स्त्री.) आजी.
**अय्या**–(स्त्री.) आर्या, राणी, स्वामिनी.
**अर**–(नपु.) चाकाची अरी, त्रिज्जा.
**अरक जातक**–बोधिसत्त्वाने आपल्या शिष्यांना मैत्री, करूणा, मुदिता व उपेक्षा या चार ब्रह्मविहारांचे शिक्षण दिल्याची जातक कथा–(नं. १६९).
**अरक्खिय**–(वि.) असुरक्षित.
**अरक्खेय**–(वि.) संरक्षण नाही.
**अरघट्ट**–(नपु.) रहाट.
**अरज**–(वि.) रजरहित.
**अरञ्ञ**–(नपु.) अरण्य, जंगल, वन.
**अरञ्ञक**–(वि.) अरण्यात राहणारा.
**अरञ्ञगत**–(वि.) अरण्यात गेला.
**अरञ्ञवास**–(पु.) अरण्यात राहणे.
**अरञ्ञविहार**–(पु.) अरण्यात फिरणे.
**अरञ्ञ जातक**–पत्नीच्या मृत्युनंतर बोधिसत्त्व आपल्या पुत्रास घेऊन हिमालयात राहू लागला. तपस्वी जीवन आचरू लागला. परंतु तेथे एका तरुणीने तरुणाचे (?) शीलभंग केल्याची जातक कथा–(नं. ३४८).
**अरञ्ञानी**–(स्त्री.) विशाल वन.
**अरण**–(वि.) शांतचित्त, स्थिरचित्त.
**अरणि**–(स्त्री.) घर्षनाने ठिणगी पाडण्याचा लाकडी तुकडा.
**अरणि-मथन**–(नपु.) ठिणगी पाडण्यासाठी केलेले दोन लाकडी तुकड्यांचे घर्षण.

**अरणि-सहित**–(नपु.) घर्षणाचे वरील लाकूड.

**अरति**–(स्त्री.) नावड, अरुची.

**अरती**–(स्त्री.) माराच्या तीन मुली पैकी एक. २–तण्हा (तृष्णा) ३–रगा (राग).

**अरविन्द**–(नपु.) कमळ, पद्म.

**अरह**–(वि.) योग्य, लायक.

**अरहध्वज**–(पु.) अर्हंत ध्वज, चीवर, भिक्खुचे काषाय वस्त्र.

**अरहति**–(क्रि.) योग्य होणे, यथार्थ होणे.

**अरहत्त**–(नपु.) अर्हत्त्व.

**अरहत्त-फल**–(नपु.) अर्हत्त्व फल.

**अरहत्त-मग्ग**–(पु.) अर्हत्त्व प्राप्तीचा मार्ग.

**अरहन्त**–(पु., वि.) अर्हत् पद प्राप्त झालेला.

**अरि**–(पु.) शत्रू, वैरी.

**अरिंदम**–(तिन्ही लिंगी) विजेता, जयवंत, जेता.

**अरिञ्चमान**–(वि.) उद्योगी, प्रयत्नशील.

**अरिट्ठ**–(वि.) निर्दयी, कठोर, क्रूर.

**अरिट्ठ**–(पु.) कावळा, लिंबाचे झाड, रिठ्यांचे झाड.

**अरित्त**–(नपु.) पायवाट, पाऊलवाट.

**अरित्त**–(वि.) उद्योगी, अरिक्त.

**अरिय**–(पु.) आर्य, श्रेष्ठ, सज्जन.

**अरिय-कन्त**–(वि.) सज्जनोपयोगी.

**अरिय-धन**–(नपु.) आर्यांचे श्रेष्ठ धन.

**अरिय-धम्म**–(पु.) श्रेष्ठ धर्म, सत्धम्म.

**अरिय-पुग्गल**–(पु.) सर्वज्ञ, ज्ञाता, श्रेष्ठ मनुष्य.

**अरिय-मग्ग**–(पु.) आर्यांचा मार्ग, उत्तम मार्ग.

**अरिय-सच्च**–(नपु.) आर्य सत्य.

**अरिय-सावक**–(पु.) सज्जनांचा शिष्य, आर्यश्रावक.

**अरियूप-वाद**–(पु.) सज्जनांचा अपमान.

**अरिस**–(पु.) मूळ पुरुष.

**अरु**–(नपु.) जखम.

**अरुचि**–(स्त्री.) बेचव, चवहीन, नावड, अरुची.

**अरुण**–(पु.) सूर्य.

**अरुण-वण्ण**–(वि.) लाल रंग, लालिमा, सूर्योदयाची लाली.

**अरूप**–(वि.) आकारहीन, निराकार.

**अरूप-कायिक**–(वि.) जिवाविषयी, निराकार.

**अरूप-भाव**–(पु.) निराकाराचे अस्तित्त्व.

**अरूप-लोक**–(पु.) आकार नाही पण अस्तित्त्व आहे असा.

**अरूपावचर**–(वि.) अदृष्यासंबंधी, अरूपाविषयी.

**अरूपी**–(पु.) आकारहीन जीव.

**अरे**–(अ.) अरे, अहो इ. संबोधने.

**अरोग**–(वि.) निरोगी, स्वस्थ.

**अरोग-भाव**–(पु.) आरोग्य, स्वास्थ्य.

**अलं**–(अ.) पर्याप्त, पुरे.

**अनलं**–(अ.) अपर्याप्त.

**अलक्क**–(पु.) पिसाळलेला कुत्रा.

**अलक्खिक**–(वि.) दुर्दैवी.

**अलक्खी**–(वि.) दुर्दैवी, दुर्भागी.

**अलगद्द**–(पु.) साप, सर्प.

**अलग्ग**–(वि.) अनासक्त, अलग, वेगळा.

**अलग्गन**–(नपु.) अनासक्ती.

**अलङ्कत**–(क्रि. वि.) अलंकृत, मंडित.

**अलङ्करण**–(नपु.) सजावट, अलंकरण.

**अलङ्कार**–(पु.) दागिना, आभूषण, अलंकार.

**अलज्जी**–(वि.) निर्लज्ज, लज्जाहीन.

**अलत्तक**–(नपु.) लाल रंगाची लाख.

**अलम्ब**–(वि.) घट्ट, चिकटलेला.

**अलम्बुस जातक**–ऋषिपुत्र शृंगीला अलम्बुसा नावाच्या अप्सरेने भुलविल्याची जातक कथा–(नं. ५२३).

**अलस**–(वि.) आळशी, निरोद्योगी.

**अलसता**–(स्त्री.) आळशीपणा, आलस्य, आळस.

**अलसक**–(नपु.) अजीर्ण, अपचन.

**अलहुक**–(वि.) भारी, जड.

**अलात**–(नपु.) कोलीत, जळते लाकूड.

**अलापु**–(नपु.) दुधी भोपळा.

**अलाबु**–(पु.) दुधी भोपळा.

**अलाला**–(अव्यय) बोलका, मुका नव्हे.

**अलि**–(पु.) मधमाशी, विंचू.

**अलिक**–(नपु.) मिथ्या, खोटा, नकली.

**अलीन**–(वि.) अप्रमादी.

**अलिनचित्त जातक**–बोधिसत्त्वाने अलिनचित्त नावाच्या वाराणसीच्या राजाचा जन्म घेतल्याची जातक कथा–(नं. १५६).

**अलोभ**–(पु.) निरिच्छ, निर्मोही, निर्लोभी.

**अलोल**–(वि.) उघड, स्पष्ट, दृष्य.

**अल्ल**–(वि.) भिजलेला, ओला.

**अल्ल-दारु**–(नपु.) ओले लाकूड.

**अल्ल-कप्प**–(पु.) मगधाजवळील एक छोटा प्रदेश. [अल्लकप्पाच्या क्षत्रियांनी भ. बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या अस्थी अधिकाराने मिळवून घेतल्या होत्या.]

**अल्लाप**–(पु.) चर्चा, संभाषण, बातचीत.
**अल्लीन**–(क्रि. वि.) आसक्त, मोहित.
**अल्लीयति**–(क्रि.) मोहित होणे, भुलणे, आसक्त होणे
**अल्लीयन**–(नपु.) आसक्ती, ओढ, मोह.
**अवकङ्खति**–(क्रि.) आकांक्षिणे, इच्छिणे.
**अवकड्ढति**–(क्रि.) मागे ओढणे.
**अवकड्ढन**–(नपु.) मागची ओढ.
**अवकड्ढित**–(क्रि. वि.) मागे ओढून घेतले.
**अवकन्तति**–(क्रि.) कापणे.
**अवकारक**–(क्रि. वि.) विस्कटणे, विखुरणे.
**अवकास**–(पु.) संधी, अवसर, वेळ.
[**ओकास**–(पु.) संधी, उसंत, वेळ].
**अवकिरति**–(क्रि.) भरून वाहणे.
**अवकिरिय**–(पू. क्रि.) फेकून देऊन.
**अवकुज्ज**–(वि.) अधोमुख, लज्जित.
**अवक्कन्ति**–(स्त्री.) प्रवेश.
**अवक्कमति**–(क्रि.) प्रवेश करणे, आंत जाणे, शिरणे.
**अवक्कम**–(पू. क्रि.) प्रवेशून, आंत येऊन, शिरून.
**अवक्कार**–(पु.) केर, कचरा.
**अवक्कारपाति**–(स्त्री.) केराची टोपली.
**अवक्खिपति**–(क्रि.) खाली टाकणे, फेकणे.
**अवक्खिपन**–(नपु.) टाकणे, फेकणे.
**अवगच्छति**–(क्रि.) प्राप्त करणे, मिळविणे.
**अवगण्ड**–(पु.) चेहरा, पसरट तोंड.
**अवगत**–(क्रि. वि.) परिचित, माहितीचा, ओळखीचा.
**अवगणित**–(वि.) अपमानित.
**अवगाहति**–(क्रि.) बुडणे, डुबकी मारणे.
**अवगाह**–(पु.) डुबकी.
**अवगाहन**–(नपु.) डुबकी मारणे.
**अवगुण्ठण**–(वि.) झांकलेला, अच्छादलेला.
**अवग्गह**–(पु.) बाधा, उपद्रव.
**अवच**–(वि.) खाली, अधो.
**अवचनीय**–(वि.) न सांगण्यासारखे.
**अवचर**–(वि.) फिरणे, हिंडणे.
**अवचरक**–(तिन्ही लिंगी) गुप्तचर, हेर.
**अवचरण**–(नपु.) व्यवहार.
**अवच्छिद**–(क्रि. वि.) छिद्र असलेला, भोक पडलेला.
**अवजय**–(पु.) हार, पराजय.
**अवजात**–(वि.) नीच, हराम, दुग्गल.
**अवजानाति**–(क्रि.) घृणा करणे, तिरस्कार करणे.
**अवजिनाति**–(क्रि.) पुन्हा जिंकणे, परत मिळविणे.
**अवज्ज**–(वि.) निर्दोष, अवर्ज्य.
**अवज्झ**–(वि.) मारता-वध करता येत नाही.
**अवञ्ञा**–(स्त्री.) अवज्ञा, उपेक्षा.
**अवञ्ञात**–(क्रि. वि.) उपेक्षित.
**अवट्ठान**–(नपु.) स्थिति, अवस्था.
**अवड्ढि**–(स्त्री.) हानी, नुकसान, अधोगती.
**अवण्ण**–(पु.) दुर्गुण.
**अवतरण**–(नपु.) अवतीर्ण झाला, खाली आला.
**अवतार**–(पु.) खाली येणारा, अवतीर्ण होणारा.
**अवतंस**–(पु.) मुकूट माळ.
**अवतिण्ण**–(क्रि. वि.) पतित, पापी.
**अवत्थरति**–(क्रि.) झांकणे, धरून दाबणे.
**अवत्थु**–(वि.) निराधार, पोरका.
**अवदात**–(वि.) पांढरा, स्वच्छ.
**अवदान**–(नपु.) जीवन चर्या. (अपदान पहा)
**अवदायति**–(क्रि.) अनुकंपा दाखविणे, प्रेम करणे.
**अवधारण**–(नपु.) लक्ष, ध्यान, एकाग्रता.
**अवधारेति**–(क्रि.) निवडणे, स्वीकारणे, पसंत करणे.
**अवधि**–(पु.) सीमा, हद्द.
**अवनति**–(स्त्री.) पतन, अधोगती, अवनती.
**अवनि**–(स्त्री.) पृथ्वी.
**अवपिबति**–(क्रि.) पिणे.
**अवबुज्झति**–(क्रि.) समजून घेणे, जाणून घेणे.
**अवबोध**–(पु.) ज्ञान.
**अवबोधेति**–(क्रि.) समजाविणे, शिकविणे.
**अवभास**–(पु.) प्रकाश, तेज, प्रकटणे.
**अवभासति**–(क्रि.) चमकणे, प्रकाशणे.
**अवभुञ्जति**–(क्रि.) ग्रासणे, गिळणे, खाऊन टाकणे.
**अवमंगल**–(नपु.) दुर्भाग्य, अपशकून, अमंगळ.
**अवमञ्ञति**–(क्रि.) अवनत पाहणे, खालच्या नजरेने पाहणे.
**अवमञ्ञना**–(स्त्री.), अवमान, अनादर.
**अवमानेति**–(क्रि.) अवमान करणे.
**अवयव**–(पु.) अंग, भाग, हिस्सा.
**अवरज्झति**–(क्रि.) चुकणे, उपेक्षा करणे, चुकविणे.
**अवरुन्धति**–(क्रि.) कैद करणे, ताब्यात घेणें.
**अवरोधक**–(पु.) बाधक.
**अवरोधन**–(नपु.) बाधा, अडथळा.
**अवलक्खण**–(वि.) अवलक्षण, कुरूप,

**अवलम्बित**–(क्रि.) लटकणे, आधार घेणे.
**अवलम्बन**–(नपु.) आधार, सहारा, मदत.
**अवलिखति**–(क्रि.) कांपणे, तुकडे करणे, मोडतोड करणे.
**अवलिम्पति**–(क्रि.) लेप देणे, चोपडणे, माखणे.
**अवलेखन**–(नपु.) खरडणे, खाजविणे, घासणे.
**अवलेपन**–(नपु.) लेप.
**अवलेहन**–(नपु.) चाटणे.
**अवस**–(वि.) अशक्त, शक्तिहीन, निर्बल.
**अवसर**–(पु.) संधी, वेळ, अवसर.
**अवसरति**–(क्रि.) निघून जाणे, पोहोचणे.
**अवसान**–(नपु.) अंत, शेवट, मरण.
**अवसिञ्चति**–(क्रि.) शिंपणे, पाणी पाजणे.
**अवसिट्ठ**–(क्रि. वि.) राहिलेला भाग, अवशेष.
**अवसिस्सति**–(क्रि.) शिल्लक राहणे, अवशेष उरणे.
**अवसुस्सति**–(क्रि.) वाळविणे, सुकविणे.
**अवसुस्सन**–(नपु.) वाळला, सुकला.
**अवसेस**–(नपु.) बाकी, शिल्लक, अवशेष.
**अवस्सं**–(क्रि. वि.) अनिवार्य, बदलता न येणारा.
**अवस्सय**–(पु.) आश्रय, आधार.
**अवस्सावन**–(नपु.) पाणी गाळण्याचे कापड.
**अवस्सित**–(क्रि. वि.) आधारित, अवलंबीत.
**अवस्सुत**–(वि.) तहानलेला, तृषित.
**अवहरण**–(नपु.) चोरी.
**अवहरति**–(क्रि.) चोरी करणे.
**अवहसति**–(क्रि.) वेडावणे, वाकुल्या दाखविणे.
**अवहीयति**–(क्रि.) मागे राहणे, मागे पडणे.
**अवंति**–(नपु., स्त्री.) बुद्ध कालीन सोळा गणराज्यापैकीं, एकराज्य. (राज्याची-अवंतिराज्याची-राजधानी उजैनी.)
**अवाट**–(पु.) खड्डा, डबरा, खळगा.
**अवापुरण**–(नपु.) चावी, किल्ली.
**अवापुरति**–(क्रि.) दरवाजा उघडणे.
**अवारिय जातक**–एका मूर्ख नाविकाला बोधिसत्त्वाने उपदेशिलेली जातक कथा–(नं. ३७६).
**अविकम्पी**–(पु) अविचलित, स्थिरचित्ताचा, स्थितप्रज्ञ.
**अविक्खेप**–(पु.) शांत, अढळ, स्थिर, गंभीर, अविक्षिप्त.
**अविग्गह**–(पु.) कामदेव, नैसर्गिक.
**अविज्जमान**–(वि.) गैरहजर, अनुपस्थित, अविद्यमान.
**अविज्जा**–(स्त्री.) अविद्या, अज्ञान.
**अविञ्ञाणक**–(वि.) निर्जीव, चेतनाहीन, जड.
**अविञ्ञात**–(वि.) अज्ञात.
**अवितथ**–(नपु.) सत्य, यथार्थ.
**अविदित**–(वि.) अज्ञात.
**अविदूर**–(वि.) जवळ, समीप, नजीक.
**अविदूरे निदान**– (क्रि. वि.) तृषित देवलोकातून खाली येऊन बोधिवृक्षाखाली ज्ञानप्राप्ती होईपर्यंतच्या गौतमाच्या चरित्रास "अविदूरे निदान" म्हणतात.
**अविद्दसु**–(पु. वि.) मूर्ख.
**अविनासक**–(वि.) नाश न करणारा.
**अविनिब्भोग**–(वि.) अस्पष्ट, अंधूक.
**अविनित**–(वि.) उद्धट, उच्छृंखल.
**अविप्पवास**–(पु.) हजर, उपस्थित, तयार.
**अविभूत**–(वि.) अस्पष्ट.
**अविरत**–(नपु.) सतत, नेहमी, न थांबता.
**अविरुद्ध**–(वि.) अनुकूल, निर्वैर.
**अविरुळिह**– (स्त्री.) वाढ नसलेली, खुजी.
**अविरोध**–(पु.) निर्वैर, विरोध नाही, अविरोध.
**अविसग्गता**–(स्त्री.) एकाग्र, स्थिरचित्त.
**अविस्सासनीय**–(वि.) अविश्वासनीय, विश्वास नसलेला.
**अविलम्बित**–(क्रि. वि) जलद, शीघ्र, गतिशील.
**अविवय्ह**–(वि.) विवाहास अयोग्य, विजोड.
**अविसंवाद**–(पु.) सत्य.
**अविसंवादक**–(पु., वि.)सत्यवादी, सरळ, सज्जन, निस्पृह.
**अविहित**–(वि.) अकृत, न केलेले.
**अविहिंसा**–(स्त्री.) दया, अहिंसक कृत्य.
**अविहेठक**–(वि.) दयाळू.
**अवीचि**–(वि.) स्थिर, निश्चल, शांत.
**अवीचि**–(स्त्री.) नरक- विशेष, नरकाविषयी.
**अवीतिक्कम**–(पु.) क्रम नसलेला, अनियमित.
**अवरि**–(वि.) भित्रा, भ्याड.
**अवुट्ठिक**–(वि.) अवर्षण, पाऊस न पडणे, सुका दुष्काळ.
**अवेक्खति**–(क्रि.) पाहणे.
**अवेच्च**–(पू. क्रि.) जाणून, समजून.
**अवेच्चपसाद**–(पु.) दृढश्रद्धा.
**अवेभंगिक**–(वि.) अविभाज्य.
**अवेर**–(वि.) अवैर, मैत्री, दोस्ती.
**अवेरी**–(वि.) मैत्रीपूर्ण, वैर रहित.
**अवेला**–(स्त्री.) अवेळ.
**अव्यत**–(वि.) अव्यक्त.

**अव्यय**–(नपु.) वचन, विभक्ती, पुरुष यांचे प्रत्यय न लागणारे (व्याकरणांतील) शब्द, न बदलणारा, अव्यय.
**अव्ययीभाव**–(पु.) सामासिक शब्द, सामासिक पद, ज्याचा अव्ययाबरोबर समास होतो.
**अव्याकत**–(वि.) ज्याची व्याख्या केली नाही, ज्याविषयी काही सांगितले नाही.
**अव्यापज्ज**–(वि.) रोष रहित, दुःखहीन.
**अव्यापाद**–(वि.) निर्मळमन, ईर्षा रहित.
**अव्यावट**–(वि.) उपेक्षावान.
**अव्हय**–(पु.) नाम, संज्ञा.
**अव्हयाति**–(क्रि.) बोलावणे, हाक मारणे.
**अव्हात**–(क्रि. वि.) बोलाविले, हाक मारली.
**अव्हान**–(नपु.) नाम, हाक, संदेश, निरोप.
**असंवर**–(नपु.) असंयम, ताबा नाही.
**असकिं**–(क्रि. वि.) अनेक वेळा, पुष्कळदा.
**असक्क**–(वि.) अशक्य, असमर्थ.
**असंकिण्ण**–(वि.) असंकीर्ण, सोपा.
**असंकिय जातक**–बोधिसत्त्वाच्या जागरुकतेमुळे लुटारू व्यापाऱ्यांना लुटू शकले नसल्याची जातक कथा–(नं. ७६).
**असंकिलिठ्ट**–(वि.) अलिप्त, वेगळा.
**असंखत**–(वि.) असंस्कृत, असभ्य.
**असंखतधातु**–(स्त्री.) मूळ, असंस्कृताचे ठिकाण.
**असंखेय्य**–(वि.) अगणित, असंख्य.
**असङ्ग**–(पु.) अनासक्ती, निरिच्छ.
**असच्च**–(नपुं.) असत्य.
**असज्जमान**–(वि.) अनासक्त.
**असञ्ञी**–(वि.) निर्जीव, जड, मृत.
**असञ्ञत**–(वि.) असंयमी.
**असठ**–(वि.) सज्जन.
**असण्ठित**–(वि.) चंचल, अस्थिर.
**असति**–(क्रि.) खाणे.
**असति**–(अधिकरण) न झाल्यामुळे.
**असतिया**–(क्रि. वि.) अज्ञानपणाने, नकळत.
**असत्त**–(वि.) अनासक्त.
**असत्थ**–(वि.) निशस्त्र, हत्यार नसलेला.
**असदिस**–(वि.) असदृष्य, अनुपम, सारखा नाहीं.
**असदिस जातक**–असदिस राजकुमाराची जातक कथा–(नं. ११८).
**असद्धम्म**–(पु.) अधर्म, गैरमैथुन.
**असन**–(नपु.) खाद्य पदार्थ, जेवण.
**असन**–(पु.) तीर, बाण, दगड.
**असनि**–(स्त्री.) वज्र, कठीण हत्यार.
**असनिपात**–(पु.) वज्रपात, वज्राघात.
**असन्त**–(वि.) दुष्ट, अशांत.
**असन्तासी**–(वि.) निर्भय.
**असन्तुठ्ठ**–(वि.) असंतुष्ठ.
**असन्थव**–(नपु.) समाजात न मिसळणारा.
**असंधिता**–(स्त्री.) संधीचा अभाव.
**असंधिमित्ता**–(स्त्री.) वि. ना.) सम्राट अशोकाची पट्टराणी.
**असपत्त**–(पु., वि.) अजात शत्रू.
**असप्पाय**–(वि.) प्रतिकूल.
**असप्पुरिस**–(पु.) असत्पुरुष, दुष्ट.
**असबल**–(वि.) निष्कलंक, डाग नसलेला.
**असब्भ**–(वि.) असभ्य.
**असम**–(वि.) विषम, असमान.
**असमण**–(पु.) नागरिक, गृहस्थ, श्रमण नसलेला.
**असमाहित**–(वि.) चंचल, अस्थिर.
**असमेक्खकारी**–(पु.) धांदरट, गडबड करणारा, घाईखोर.
**असमोसरण**–(नपु.) अप्राप्य, न मिळणारे.
**असम्पकम्पिय**–(वि.) स्थिर, अचल, कंपनरहित.
**असम्पजञ्ञ**–(नपु.) अज्ञानी, ज्ञानहीन.
**असम्पत्त**–(वि.) अप्राप्त, न मिळणे.
**असम्पदान जातक**–ऐंशी कोटीचा धनी, संखशेठ याची जातक कथा–(नं. १३१).
**असम्मूळ**–(वि.) ज्ञानी, समजदार, मूर्ख नव्हे.
**असम्मोस**–(पु.) मूढपणाचा अभाव, मूर्ख नाही.
**असयंवसी**–(वि.) असंयमी.
**असरह**–(वि.) असहाय्य, असह्य.
**असरण**–(वि.) निराधार, पोरका, आश्रय नसलेला.
**असहाय्य**–(वि.) एकटा, कुणाचा आधार नाही.
**असंवास**–(वि.) राहण्यास अयोग्य.
**असंवुत**–(क्रि. वि.) उघडा, खुला, असंवृत्त.
**असंसठ्ठ**–(वि.) निर्मळ, शुद्ध.
**असंहारिम**–(वि.) स्थिर, जड, हलविता येत नाही.
**असात**–(वि.) प्रतिकूल.
**असात**–(नपुं.) दुःख, कष्ट, त्रास.
**असातमन्त जातक**–तरुण ब्राह्मण कुमाराने आपल्या आईच्या आज्ञेवरून बोधिसत्त्वाकडून असातमंत्र शिकल्याची जातक कथा–(नं. ६१).

**असातरूप जातक**–कोसलराजा व काशीचा राजा यांच्यात झालेल्या युद्धाची जातक कथा–(नं. १००).
**असाद**–(वि.) बेचव, चवहीन, स्वादरहित.
**असार**–(वि.) सत्वहीन, निरस.
**असारद्ध**–(वि.) साहसाचा अभाव.
**असि**–(पु.) तलवार, समशेर, खड्ग.
**असिग्गाहक**–(पु.) समशेर बहाद्दर.
**असिचम्म**–(नपु.) ढाल.
**असिधारा**–(स्त्री.) तलवारीची धार.
**असिपत्त**–(नपु.) तलवारीचे पाते.
**असित**–(नपु.) भोजन.
**असित**–(वि.) काळा.
**असित**–(पु.) कालदेवल शुद्धोदनाचा राजगुरु
**असिताभु जातक**–राजाने आपला राजकुमार व त्याची पत्नी असिताभु यांना देशाबाहेर घालविल्याची जातक कथा–(नं. २३४).
**असिलक्खण जातक**–तलवारीचा वास घेऊन तिच्या धारकाला योग्य कार्य होणार की, नाही हे सांगणारा ब्राह्मण त्याची जातक कथा–(नं. १२६).
**असिथिल**–(वि.) घट्ट, ढिला नाही.
**असिनिद्ध**–(वि.) ओबड धोबड.
**असीति**–(सं. वि., स्त्री.) ऐंशी अंक.
**असीमित**–(संख्या वि.) ऐंशीवा.
**असु**–(वि.) अमुक, आसका.
**असुचि**–(पु.) घाण, वीर्य.
**असुभ**–(वि.) अशुभ, अमंगळ.
**असुर**–(पु.) दैत्य, राक्षस.
**असूर**–(वि.) भित्रा, भ्याड, शूर नसलेला.
**असेख**–(वि.) अशैक्ष्य, अर्हत.
**असेचन**–(पु.) आनंदी, संतोष प्रद.
**असेवना**–(स्त्री.) संगत, सोबत न करणे, मैत्री न करणे.
**असेस**–(वि.) संपूर्ण, अशेष.
**असोक**–(वि.) दुःख न करणारा, अशोक.
**असोक**–(पु.) अशोक वृक्ष.
**असोक**–(पु., विशे. ना.) बिंदुसार राजाचा पुत्र, मगध देशाचा राजा, सम्राट अशोक.
**असोकाराम**–(पु.) पाटलीपुत्रातील (हल्ली पाटणा) एक प्रसिद्ध बौद्ध विहार.
**असोभन**–(वि.) कुरूप.
**अस्नाति**–(क्रि.) खाणें.
**अस्मा**–(पु.) दगड, शिला, खडक.
**अस्मि**–(क्रि., स. ना.) मी आहे.
**अस्मिमान**–(पु.) अहंकार, गर्व, अभिमान.
**अस्स**–(पु.) अश्व, घोडा.
**अस्सतर**–(पु.) खेचर.
**अस्सपोतक**–(पु.) शिंगरू.
**अस्स-मंडळ**–(नपु.) घोडे पळविण्याची जागा, मैदान.
**अस्स-मेध**–(पु.) अश्वमेध यज्ञ.
**अस्सवाणिज**–(पु.) घोड्यांचा व्यापारी.
**अस्स-सेना**–(स्त्री.) घोडदळ, घोडेस्वारांची तुकडी.
**अस्साजानिय**–(पु.) जातिवंत घोडा, पंचकल्याणी घोडा.
**अस्सक**–(पु. वि.) गरीब, दरिद्री.
**अस्सक जातक**–अस्सक राजाची जातक कथा–(नं. २०७).
**अस्सकण्ण**–(पु.) सालवृक्ष, सालपर्वताविषयी.
**अस्सत्थ**–(पु.) अश्वत्थ, पिंपळ, बोधिवृक्ष.
**अस्सद्ध** (वि.) श्रद्धाहीन.
**अस्सम**–(पु.) आश्रम, कुटी, झोपडी.
**अस्समण**–(पु.) गृहस्थ, नागरिक, श्रमण नसलेला.
**अस्सयुज**–(पु.) आश्विन महिना, असौज.
**अस्सव**–(पु.) स्वामीभक्त, स्वामीनिष्ठ.
**अस्सवणता**–(स्त्री.) ध्यान न देता, न ऐकता, कानाडोळा.
**अस्सवनीय**–(वि.) ऐकणे अयोग्य.
**अस्ससति**–(क्रि.) श्वास घेणे, वास घेणे.
**अस्साद**–(पु.) आस्वाद, चव, रुचि.
**अस्सादेति**–(क्रि.) चव घेणे, चाखणे, स्वाद घेणे.
**अस्सास**–(पु.) श्वास.
**अस्सासक**–(वि.) सांत्वना देणारा.
**अस्सासेति**–(क्रि.) आश्वासन देणे.
**अस्सु**–(नपु.) अश्रु, आंसू.
**अस्सुत**–(वि.) अश्रुत, न ऐकलेले.
**अस्सुतवन्त**–(वि.) अडाणी.
**अह**–(नपु.) दिन, दिवस.
**अहं**–(स. ना.) मी.
**अहंकार**–(पु.) गर्व, अभिमान, अहंकार
**अहारिय**–(वि.) अचल, पर्वत, न हालणारा, स्थिर.
**अहि**–(पु.) सर्प.
**अहि-गुण्ठिक**–(पु.) गारुडी.
**अहि-फेण**–(नपु.) अफू, मादक पदार्थ.
**अहि-गुण्ठिक जातक**–वाराणसीच्या गारुड्याची जातक कथा–(नं. ३६५).

**अहि-रिक**–(वि.) निर्लज्ज.
**अहिवातक रोग**–(पु.) प्लेग.
**अहिंन्द्रिय**–(वि.) सर्व इंद्रियांची पूर्ण वाढ झालेला, प्रौढ.
**अट्टहासिय**–(नपु.) मोठ्याने हसणे.
**अहेतुक**–(वि.) हेतु नसता, उद्देश नसता, अहेतुक.
**अहो**–(अ.) आश्चर्यबोधक शब्द.
**अहोगङ्ग**–(पु.) प्राचीन उत्तर भारतातील एक पर्वत.
**अहोरत्त**–(पु., सं.) दिन-रात, रात्रंदिवस.
**अहोसि**–(क्रि.) होता, तो होता.
**अहोसिकम्प**–(नपु.) चालू काम, अपूर्ण काम.
**अंस**–(पु., नपु.) अंश, हिस्सा, भाग, खांदा.
**अंसकूट**–(नपु.) खांदा, खांद्यावर.
**अंसु**–(पु.) किरण, प्रकाश स्रोत.
**अंसुक**–(नपु.) वस्त्र.
**अंसुमाली**–(पु.) सूर्य, रवि, भास्कर, दिनकर.
**असंलक्ख**–(वि.) ज्यावर दृष्टी जात नाहीं, जे आकलन होत नाही.

## आ

**आ**–नागरी लिपीतील दुसरा स्वर. उपसर्ग, संयुक्त व्यंजनापूर्वी "आ" हा स्वर ऱ्हस्व "अ" होत असतो.
**आकङ्खति**–(क्रि.) इच्छा करणे, आकांक्षिणे.
**आकङ्खा** (स्त्री.) आकांक्षा, इच्छा.
**आकड्ढति**–(क्रि.) ओढणे.
**आकड्ढन**–(नपु.) ओढ, आकर्षण.
**आकप्प**–(पु.) चाल–ढाल, चाल–चलणूक, वर्तन.
**आकप्प सम्पन्न**–(वि.) सदाचरण, सदाचार संपन्न, सदाचरण युक्त.
**आकम्पित**–(कृ.) कापत असता.
**आकर**–(पु.) खाण, (सोने, चांदी, इ. धातूंची)
**आकस्सति**–(क्रि.) ओढणे, आकर्षिणे.
**आकार**–(पु.) बनावट, चेहरा–मोहरा.
**आकास**–(पु.) आकाश, नभ, अंबर, गगन.
**आकासगङ्गा**–(स्त्री.) आकाश गंगा.
**आकास-चारी**–(वि.) आकाशात भ्रमण करणारा खग, हवाई वाहन.
**आकासट्ठ**–(वि.) आकाशात राहणारा.
**आकासतल**–(नपु.) घराचे छत, छप्पर.
**आकिञ्चञ्ञ**–(नपु.) निरीच्छ, कशाची इच्छा नसलेला.
**आकिण्ण**–(वि.) गर्दी, वेढलेला.
**आकिरति**–(क्रि.) पसरणे, विस्कटणे.
**आकुल**–(वि.) गुरफटलेला, व्यापलेला.

**आकोटन**–(नपु.) ठोठावणे.
**आखु**–(पु.) उंदीर, मूषक.
**आख्या**–(स्त्री.) नाम, संज्ञा.
**आख्यात**–(पु., स्त्री., नपु.) सांगितले, म्हणाले, बोलले.
**आख्यायिका**–(स्त्री.) कहाणी, गोष्ट, कथा.
**आगच्छति**–(क्रि.) येणे.
**आगत**–(कृ.) आलेला.
**आगद**–(पु.) वचन, भाषण, बोलणे, वक्तृत्व.
**आगन्तु**–(वि.) येणारा.
**आगन्तुक**–(पु.,स्त्री.,नपु.) अतिथि, पाहुणा, अवेळी आलेला.
**आगम**–(पु.) येणे. धर्म, धर्मग्रंथ, दोन अक्षरांमधील व्यंजन.
**आगमन**–(नपु.) येणे.
**आगमेति**–(क्रि.) वाट पहाणे, प्रतिक्षा करणे.
**आगम्म**–(पू. क्रि.) पोहोचून, येऊन.
**आगमिक**–(वि.) भविष्य काळ, येणारा काळ.
**आगामी**–(वि.) येणारा, आगामी.
**आगमीकाल**–(पु.) भविष्य.
**आगारक**–(वि.) घरधनी.
**आगारिक**–(वि.) खजीनदार, कोठीवाला, भांडारदार, कोठारी कुबेर.
**आगाळ्ह**–(वि.) मजबूत, कठीण, घट्ट, कठोर.
**आगिलायति**–(क्रि.) त्रास देणे, पीडा करणे, उपद्रव पोहोचविणे.
**आगु**–(नपु.) दोष, अपराध, गुन्हा.
**आगुचारी**–(पु.) दोषी, अपराधी, गुन्हेगार.
**आघात**–(पु.) मार, धक्का, ठोका.
**आघात**–(पु.) रोष, घृणा, तिरस्कार.
**आघातन**–(नपु.) कसाईखाना, कत्तलखाना.
**आचमति**–(क्रि.) पिणे, पाणी–तीर्थ पिणे.
**आचमन**–(नपु.) तोंड धुणे, चूळ भरणे.
**आचमन कुम्भी**–(स्त्री.) तोंड धुण्याचे भांडे, कमंडलू.
**आचय**–(पु.) संग्रह, साठा, संचय.
**आचरति**–(क्रि.) आचरण करणे, वागणे.
**आचरिय**–(पु.) आचार्य, शिक्षक, गुरुजी.
**आचरिय-धन**–(नपु.) गुरुदक्षिणा, शिक्षकास दिलेली दक्षिणा.
**आचरिय-मुट्ठि**–(स्त्री.) शिक्षकांचे विषय, ज्ञानावरील प्रभुत्त्व, विशिष्ठ विषयांवरील अधिकार.
**आचरिय-वाद**–(पु.) परम्परागत मत, पक्ष.
**आचारियानी**–(स्त्री.) आचार्या, शिक्षिका, अध्यापिका, आचार्यांची पत्नी.

**आचाम**–(पु.) भाताची पेज.

**आचार**–(पु.) आचरण, व्यवहार, वागणे.

**आचार-कुसल**–(वि.) व्यवहार-चातुर्य, सदाचारयुक्त, कार्य-कुशल.

**आचिक्खक**–(पु.) सांगणारा, बोलणारा, दाखविणारा.

**आचिक्खति**–(क्रि.) सांगणे, बोलणे, दाखविणे.

**आचिण्ण**–(कृ.) अभ्यस्त, कार्यरत.

**आचिण्णकप्प**–(पु.) रीतिनुसार, चालीप्रमाणे, रिवाजानुसार.

**आचित**–(कृ.) संग्रहित, साठवांत.

**आचिनाति**–(क्रि.) संग्रह करणे, एकत्र करणे. साठा करणे, वेचणे.

**आचियति**–(क्रि.) संग्रह होणे, साठा होणे, क्षीण बनणे.

**आचेर**–(पु.) "आचरिय" शब्दाचें संक्षिप्त रूप. अध्यापक, शिक्षक, गुरुजी, आचार्य.

**आजञ्ञ**–(वि.) जातीवंत.

**आजञ्ञ जातक**–बोधिसत्त्वाने सुलक्षणी घोड्यांच्या जातीत जन्म घेतल्याची जातक कथा–(२४).

**आजानन**–(नपु.) ज्ञान.

**आजानाति**–(क्रि.) जाणणे, समजणे, कळणे, ज्ञात होणे; सर्वज्ञ होणे.

**आजानीय**–(पु.) जातीवंत घोडा.

**आजि**–(स्त्री.) युद्ध, द्वंद्व, समर, संघर्ष.

**आजीव**–(पु.) जीविका, जगण्याचे साधन, धंदा, उद्योग.

**आजीवक**–(पु.) नग्न साधूंचा संप्रदाय, पंथ.

**आजीवन**–(नपु.) आयुष्यापर्यंत, जीविका, जीवनभर.

**आट**–(पु.) पक्षांची एक जात.

**आणा**–(स्त्री.) आज्ञा, आदेश, हुकूम.

**आणा सम्पन्न**–(वि.) अधिकृत.

**आणापक**–(पु.) आज्ञा देणारा, अधिकारी, शास्ता, शासक.

**आणापेति**–(क्रि.) आदेश देणे, आज्ञा देणे.

**आणि**–(स्त्री.) मेख, मोठा खिळा, खुंटा.

**आणी**–(स्त्री) अर्गल, दाराचा आडणा.

**आतङ्क**–(पु.) रोग, आजार, भय, भीती, पीडा.

**आतत**–(नपु.) एक प्रकारचा ढोल, वाद्य.

**आतत-वितत**–(नपु.) आतत-वितत या नावाचे दोन ढोल, संबळ.

**आततायी**–(पु.) घाईखोर, खून-वध करण्यास न भिणारा, घाई करणारा, आततायी.

**आतत्त**–(कृदन्त) तप्त, तापलेला, क्रोधित.

**आतपत्त**–(नपु.) छत्री, छत्र.

**आतप**–(पु.) ऊन्ह, उष्णता.

**आतपाभाव**–(पु.) सावली, छाया, उन्हाचा अभाव.

**आतपति**–(क्रि.) चमकणे, प्रकाशने.

**आतप्प**–(पु.) प्रयत्न, प्रयास.

**आताप**–(पु.) चमक, उष्णता, ऊब.

**आतापन**–(नपु.) शरिरश्रम, आत्मपीडा, शारीरिक वेदना.

**आतापी**–(वि.) प्रयत्नशील, उद्योगी.

**आतापेति**–(क्रि.) शारीरिक कष्ट देणे.

**आतुमा**–(नपु., विशे. ना.) कुसानारा व श्रावस्ती या मधील एक नगर.

**आतुर**–(वि.) रोगी, पीडित, रोगग्रस्त, आजारी.

**आतोज्ज**–(नपु.) बाजा, वाद्य.

**आदर**–(पु.) गौरव, आदर.

**आदाति**–(क्रि.) घेणे, स्वीकारणे.

**आदान**–(नपु.) ग्रहण करणे.

**आदायी**–(पु.) ग्रहण करणारा, घेणारा, स्वीकारणारा.

**आदास**–(पु.) आरसा.

**आदासतल**–(पु.) आरशाचा तळ.

**आदि**–(पु.) आरंभ, सुरुवात.

**आदि कम्मिक**–(पु.) सुरुवात करणारा.

**आदि कल्याण**–(वि.) सुरुवातीस कल्याणकारक.

**आदिम**–(वि.) पहिला, आरंभीचा.

**आदिच्च**–(पु.) सूर्य, आदित्य, रवि.

**आदिच्च पथ**–(पु.) आकाश.

**आदिच्च-बन्धु**–(पु.) सूर्यवंशी, भ. बुद्धाचे एक नाव.

**आदिच्च पट्ठान जातक**–तपस्व्यांच्या आश्रमांना नष्ट करणाऱ्या वानराची कथा–(१७५).

**आदितो**–(क्रि. वि.) आरंभापासून, सुरुवातीपासून.

**आदित्त**–(कृ.) जळत असलेला.

**आदित्त जातक**–सोवीर राष्ट्राचा रोरुव राजा "भरत" याची कथा–(४२४).

**आदिन्न**–(कृ.) गृहीत, ग्राह्य.

**आदियति**–(क्रि.) ग्रहण करणे, स्वीकारणे, घेणे.

**आदिसति**–(क्रि.) सांगणे, घोषित करणे, जाहीर करणे.

**आदीनव**–(पु.) दुष्परिणाम.

**आदु**–(अ.) किंवा, पण, परंतु.

**आदेति**–(क्रि.) देणें, घेणें, ग्रहण करणे.

**आदेय्य**–(वि.) अनुकूल, योग्य.

**आदेय्य वचन**–(नपु.) स्वागत.

**आदेवना**–(स्त्री.) रडणे, मारणे.
**आवेस**–(पु.) आदेश
**आदेस**–(पु.) विशिष्ठ अक्षरावर दुसऱ्या व्यंजनाचा जोर पडणे. जोडाक्षरांत जोडाच्या पहिल्या अक्षरावर जोर येणे. (उदा. उत्तम, प्रसन्न आदि.)
**आदेसना**–(स्त्री.) भविष्यवाणी, अनुमान, अंदाज.
**आधान गाही**–(पु.) दुराग्रही.
**आधार**–(पु.) सहारा, आश्रय, आधार.
**आधावति**–(क्रि.) पळणे, धावणें.
**आधावन**–(नपु.) धाव, दौड.
**आधिपच्च**–(नपु.) आधिपत्य, स्वामित्त्व, मालकी.
**आधुनाति**–(क्रि.) हालविणे, घुमविणें, फिरविणें.
**आधूत**–(कृ.) हालविले गेले.
**आधेय्य**–(वि.) धारण करण्यास योग्य, घेण्यालायक.
**आन**–(नपु.) आश्वासन, शपथ.
**आण**–(नपु.) शपथ.
**आनक**–(पु.) भेरी, तुतारी, शिंग (रणशिंग).
**आनण्य**–(नपु.) ऋणमुक्त, कर्जमुक्त.
**आनन**–(नपु.) चेहरा, तोंड.
**आनन्तरिक**–(वि.) नंतर बरोबर होणे, लागोपाठ घडणारी घटना.
**आनन्द**–(पु.) प्रीति, प्रसन्नता, मोद, आनंद.
**आनन्द**–(पु., विशे. ना.) भगवान बुद्धाच्या प्रमुख शिष्यांपैकी एक शिष्य, याने भगवानाची अनन्यभावे सेवा केली होती, तो शिष्यत्त्व पत्करल्यानंतर महापरिनिर्वाणापर्यंत बरोबर होता.
**आनन्दबोधि**–श्रावस्तीच्या जेतवनाच्या दरवाज्याजवळ भिक्खु आनंदाने लावलेला बोधिवृक्ष (पिंपळ).
**आनयति**–(क्रि.) आणणे, घेऊन येणें.
**आनापान**–(नपु.) श्वासोच्छवास.
**आनाय**–(पु.) मोहपाश, जाळे.
**आनिसंस**–(पु.) शुभपरिणाम, चांगले फळ.
**आनिसद**–(नपु.) नितम्ब.
**आनीत**–(कृ.) आणलेले.
**आनुपुब्बी**–(स्त्री.) क्रमशः, क्रमाने, ओळीनें.
**आनुभाव**–(पु.) प्रताप, तेज, ओज.
**आनेञ्ज**–(वि.) स्थिर, अचंचल, अचल.
**आनेति**–(क्रि.) आणणे.
**आप**–(पु., नपु.) जल, पाणी, नीर, तोय, अंबु, वारि, जीवन.
**आपगा**–(स्त्री.) नदी, सरिता, तटिनी, जलवाहिनी.
**आपज्जति**–(क्रि.) पडणे, भेट देणे.
**आपण**–(पु.) बाजार.
**आपण**–(नपु., विशे. ना.) अगुत्तराप गणराज्यातील एक नगर (ही बहुतेक त्या गणराज्याची राजधानी असावी.)
**आपणिक**–(पु.) व्यापारी, दुकानदार.
**आपतति**–(क्रि.) पडणें.
**आपतन**–(नपु.) पडीक.
**आपत्ति**–(स्त्री.) नम्रतेचे उल्लंघन, अपराध, गुन्हा.
**आपदा**–(स्त्री.) दुःख, कष्ट, दुर्भाग्य, संकट.
**आपन्न**–(कृ.) अनुप्राप्त, नंतर मिळाले.
**आपन्न-सत्ता**–(स्त्री.) गरोदर, गर्भिणी.
**आपाण**–(नपु.) श्वास घेणें.
**आपाण कोटिक**–(वि.) आजीवन, मरेपर्यंत.
**आपाथ**–(पु.) दिसणारी इंद्रियें.
**आपाथ-गत**–(वि.) इंद्रियें दिसणें.
**आपादक**–(पु.) मुलाचा पालक, पालनकर्ता.
**आपादिका**–(स्त्री.) दाई, बाई.
**आपादेति**–(क्रि.) दूध पाजणे.
**आपान**–(नपु.) पेयभवन, रसगृह, पाणपोई.
**आपानक**–(वि.) पिणारा.
**आपानीय**–(वि.) पिण्यास योग्य.
**आपानीय कंस**–(पु.) प्याला, सुरा-पात्र.
**आपायिक**–(वि.) नरकातील.
**आपुच्छति**–(क्रि.) विचारतो, परवानगी मागतो.
**आपुच्छा**–(स्त्री) अनुज्ञा, परवानगी, अनुमती.
**आपूरति**–(क्रि.) भरणें, पूर्ण करणे.
**आपूरण**–(नपु.) पूर्ती.
**आपोधातु**–(स्त्री) पाण्याचा मूळ घटक, जल तत्त्व.
**आफुसति**–(क्रि.) मिळविणे. प्रत्यक्ष करणें, साक्षात होणे.
**आबद्ध**–(कृ.) बांधलेला, बंधनातील.
**आबन्धक**–(वि.) बांधणारा.
**आबन्धति**–(क्रि.) बांधणे.
**आबाध**–(पु.) रोग, आजार, पीडा.
**आबाधिक**–(वि.) रोगी, आजारी, पीडित.
**आबाधित**–(कृ.) बाधित, पीडित, दाबला गेलेला, छळला गेलेला, ताडला गेलेला.
**आबाधेति**–(क्रि.) दाबणें, हैराण करणें, छळणें, त्रास देणें.
**आभत**–(कृ.) आणलेला.
**आभरण**–(नपु.) अलंकार, दागिना, आभूषण.
**आभरति**–(क्रि.) आणणे.

**आभस्सर**–(वि.) प्रकाशमान, सतेज, प्रकाशित, तेजःपुंज.
**आभा**–(स्त्री.) प्रकाश.
**आभाकर**–(पु.) सूर्य.
**आभास**–(पु.) प्रकाश, उजेड.
**आभाति**–(क्रि.) प्रकाशणे, चमक, उदय होणें.
**आभावेति**–(क्रि.) अभ्यास करणे, प्रयत्न करणे.
**आभिदोसिक**–(वि.) गेल्या रात्रीशी संबंधित.
**आभिधम्मिक**–(वि.) अभिधम्माचा जाणकार.
**आभिन्दति**–(क्रि.) कापणे, छाटणे.
**आभिमुख्य**–(नपु.) समोरचा, पुढचा.
**आभिसमाचारिक**–(नपु.) लहान-मोठे कर्तव्य, लहान-सहान कार्य.
**आभिसेकिक**–(वि.) अभिषेकासंबंधी, वर्षावाविषयी.
**आभुजति**–(क्रि.) झुकविणे, वाकविणे, नमविणे.
**आभुजन**–(नपु.) झुकणे, वाकणे, नम्र होणे.
**आभुजी**–(स्त्री.) भोजपत्र.
**आभोग**–(पु.) विचार, मत.
**आम**–(अ.) हा, होय.
**आम**–(पु.) आंबा.
**आमक**–(वि.) कैरी, हिरवा कच्चा आंबा, न पिकलेला.
**आमगन्ध**–(पु.) मांस.
**आमगन्धि**–(स्त्री.) मांसासारखा वास.
**आमक-सुसान**–(नपु.) साधे स्मशान, मातीत दफन.
**आमठ्ठ**–(कृ.) स्पर्श झालेला, शिवलेला, हात लावलेला.
**आमण्ड**–(पु.) एरंडाचे रोप.
**आमण्डलीय**–(वि.) मंडळासारखे, वर्तुळाप्रमाणे.
**आमत्तिक**–(वि.) मडके, मातीचे भांडे.
**आमद्दन**–(नपु.) दळणे, भरडणे.
**आमन्तन**–(नपु.) निमंत्रण, आमंत्रण.
**आमन्तित**–(कृ.) निमंत्रित, आमंत्रित.
**आमन्तेति**–(क्रि.) निमंत्रण देणे, आमंत्रण देणे.
**आमय**–(पु.) रोग, आजार, पीडा.
**आमलक**–(नपु.) आवळा.
**आमसति**–(क्रि.) शिवणे, स्पर्श करणे, हात लावणे.
**आमसन**–(नपु.) स्पर्शणे, चोळणे, रडणे.
**आमा**–(स्त्री). दासी, सेविका.
**आमासय**–(पु.) पोट, उदर.
**आमिस**–(नपु.) मांसाहारी भोजन.
**आमिस-दान**–(नपु.) भौतिक सुखसोईची पूर्तता, आवश्यक वस्तूंची प्राप्ती.
**आमुञ्चति**–(क्रि.) धारण करणे, घेणे, परिधान करणे, नेसणे.
**आमुत्त**–(कृ.) धारण केलेले, घातलेले.
**आमेण्डित**–(नपुं.) घोषित, जाहीर, प्रकट, प्रसिद्ध.
**आमो**–(अ.) होय, हां.
**आमोद**–(पु.) उत्साह, आनंद, प्रमोद.
**आमोदति**–(क्रि.) आनंदित होणें, प्रमुदित होणें.
**आमोदना**–(स्त्री.) आनंदणे, प्रमोदणे.
**आमोदमान**–(कृ.) आनंदित, प्रमोदित, उत्साहित.
**आमोदेति**–(क्रि.) आनंदित करणे, आनंद देणें.
**आय**–(पु.) जमा, मिळकत, लाभ, फायदा.
**आय-कम्मिक**–(पु.) जमा करणारा, मिळविणारा.
**आय-कोसल्ल**–(पु.) मिळविण्यात कुशल, फायदा करून घेणारा.
**आय-मुख**–(नपु.) फायद्याचा धंदा, उद्योग, व्यापार, लाभ होण्याचे मार्ग.
**आयत**–(वि.) लांबडा.
**आयतन**–(नपु.) क्षेत्र, ठिकाण, जागा, इंद्रिय, स्थिती.
**आयतनिक**–(वि.) जागेसंबंधी, ठिकाणाविषयी, इंद्रियाविषयी.
**आयति**–(स्त्री.) भविष्य.
**आयतिक**–(वि.) भावी, पुढील.
**आयतिका**–(स्त्री.) नळी.
**आयत्त**–(वि.) आधीन, ताब्यांत, परवश.
**आयत्त**–(नपु.) मिळकत, प्राप्ती.
**आयस**–(वि.) लोहनिर्मित, लोखंडाचा.
**आयसक्य**–(नपु.) अपमान, उपेक्षा, गौरव नाही.
**आयसमन्त**–(वि.) आयुष्मान, आदरणीय, पूजनीय.
**आयाग**–(पु.) यज्ञाविषयी दान, यज्ञासाठी दान.
**आयाचक**–(वि.) याचक, मागणारा, भिकारी.
**आयाचति**–(क्रि.) याचना करणे, मागणे.
**आयाचना**–(स्त्री.) मागणी, प्रार्थना, विनंती, याचना.
**आयाचमान**–(वि.) मागत, प्रार्थित, विनंती करत, याचना करत.
**आयाचिका**–(स्त्री.) याचना करणारी, विनंती करणारी, याचना करणारी स्त्री.
**आयाचितभत्त जातक** – वनदेवीने-वनदेवाने पशुहत्तेची निंदा केल्याची कथा–(१९).
**आयात**–(कृ.) आगत, येणारा, आलेला.
**आयाति**–(क्रि.) येणें.
**आयाम**–(पु.) लांबी, दूरी, अंतर.

**आयामति**–(क्रि.) पसरणे.
**आयास**–(पु.) कष्ट, त्रास, क्लेश.
**आयु**–(नपु.) वय.
**आयुक**–(वि.) वयाचा.
**आयु-कप्प**–(पु.) जीवनभर, आयुष्यभर, आमरण.
**आयु-क्खय**–(पु.) आयुष्याचा नाश, जीवनाचा नाश जीवनक्षय.
**आयु-सङ्खय**–(पु.) मृत्यू, आयुष्याचा शेवट, मरण,अंत.,
**आयु-सङ्ख**–(पु.) जीवन, आयुष्य, आयुष्याचा काळ, आयुभर.
**आयुत्त**–(कृ.) जुंपलेला.
**आयुत्तक**–(पु.) दलाल, विश्वस्त, अडत्या.
**आयुध**–(नपु.) हत्यार, शस्त्र.
**आयुवन्त**–(वि.) जास्त वय लाभलेला, दीर्घायुषि.
**आयुस्स**–(वि.) आयुष्यासंबंधी, जीवनाविषयी.
**आयहक**–(वि.) क्रियाशील, कर्तव्यतत्पर.
**आयहति**–(क्रि.) प्रयत्न करणे, श्रम घेणे, कष्ट करणे.
**आयूहन**–(नपु.) प्रयत्न, परिश्रम, कष्ट.
**आयूहापेति**–(क्रि.) दुसऱ्याकरवी प्रयत्न करणे.
**आयोग**–(पु.) प्रयत्न, बन्धन, अनुरक्ति.
**आयोधन**–(नपु.) युद्ध.
**आर**–(पु.) सुई, टोकदारसळी, आरी, शिवण्याचे साधन.
**आरग्ग**–(नपु.) सुईचे टोक, सुईचे अग्र, सुईची अगकुची.
**आरपन्थ**–(पु.) सुईचा मार्ग, रस्ता.
**आरकत्त**–(नपु.) लांबी, दुरावा.
**आरका**–(अ.) लांबी.
**आरकूट**–(पु.) पितळ.
**आरक्खक**–(पु.) पहारेकरी, रखवालदार, रक्षक.
**आरक्खा**–(स्त्री.) पहारा, रक्षण, राखण.
**आरञ्ञक**–(वि.) आरण्यक, अरण्यात राहणारा.
**आरञ्ञिक**–(वि.) जंगलात राहणारा.
**आरञ्ञकत्त**–(नपु.) जंगलात राहण्याची भावना.
**आरञ्जित**–(नपु.) खरडणें.
**आरञ्जित**–(कृ.) नांगरणे.
**आरति**–(स्त्री.) दुरावा, त्याग.
**आरद्ध**–(कृ.) आरंभ केला, सुरुवात केली.
**आरद्ध चित्त**–(वि.) मनोनिग्रही, चित्तावर ताबा असलेला.
**आरद्ध विरीय**–(वि.) प्रयत्नशील, उद्योगी.
**आरनाळ**–(नपु.) कांजी, खीर.
**आरब्भ**–(अ.) संबंधी, बाबतीत, विषयी.
**आरब्भति**–(क्रि.) आरंभ करणें, सुरुवात करणे, वध करणे, ठार मारणे, हत्या करणे, त्रास देणे, सतावणे.
**आरभन**–(नपु.) आरंभ, सुरुवात.
**आरम्भ**–(पु.) सुरुवात, आरंभ, प्रारंभ.
**आरम्मण**–(नपु.) इंद्रियांची विषयवासना, काम भोगाची इच्छा, दृष्टीने विषयासक्त.
**आरवा**–(पु.) ओरडणे, आरवणे, रडणे.
**आरा**–(अ.) लांब.
**आरा**–(स्त्री.) चांभाराची आरी.
**आराचारी**–(पु.,स्त्री.,नपु.) लांब राहणारा, दूर असलेला, दूरचा.
**आराधक** (पु.) प्रसन्न करणारा, पुजारी.
**आराधना**–(स्त्री.) प्रसन्न करणे, निमंत्रण, आराधना.
**आराधेति**–(क्रि.) प्रसन्न ठेवणे, निमंत्रण देणे, आराधना करणे.
**आराधित**–(कृ.) निमंत्रित, प्रसन्नकृत, आराधना करणे.
**आराम**–(पु.) विहार, बगीचा.
**आरामपाल**–(पु.) माळी.
**आरामवत्थु**–(नपु.) बगिचाचे ठिकाण.
**आरामिक**–(पु.) विहारातील सेवक.
**आरामिक**–(वि.) विहारासंबंधी.
**आरामता**–(स्त्री.) आसक्ती, ओढ, आकर्षण.
**आराम दूसक जातक**–वानरांनी सात दिवसपर्यंत बागेला पाणी देऊन तिची जोपासना केल्याची कथा–(२६८).
**आरुण्ण**–(नपु.) रडणे, पश्चाताप.
**आरुप्प**–(वि., नपु.) निराकार, रूप नसलेली स्थिती.
**आरुहति**–(क्रि.) चढणे, वर बसणे, आरोहन करणे.
**आरुहन**–(नपु.) चढाई आक्रमण, आरोहन.
**आरुहन्त**–(कृ.) चढत असलेला.
**आरूळ्ह**–(कृ.) चढलेला, आरुढ झालेला.
**आरोग्य**–(नपु.) स्वास्थ्य, आरोग्य.
**आरोग्य-मद**–(पु.) स्वास्थ्याचा अहंकार.
**आरोग्य-साला**–(स्त्री.) रुग्णालय, चिकित्सालय, दवाखाना.
**आरोचना**–(स्त्री.) घोषणा.
**आरोचापन**–(नपु.) घोषणा देवविणे.
**आरोचापेति**–(क्रि.) घोषणा करवितो.
**आरोचित**–(कृ.) सूचित.
**आरोचेति**–(क्रि.) सूचना देणे, सुचविणे.
**आरोदना**–(स्त्री.) रडणे, आक्रोश करणे, विलाप करणे.
**आरोपन**–(नपु.) लावणे, पेरणे.

**आरोपित**–(कृ.) दोषी, दोष लागलेला.
**आरोपेति**–(क्रि.) दोष देणे, दोष लावणे, आरोप करणे.
**आरोह**–(पु.) वर चढणे, वृद्धी, उंची.
**आरोहक**–(पु.) वर चढणारा, वर बसणारा, स्वार.
**आरोहति**–(क्रि.) चढणे.
**आरोहन**–(नपु.) चढाई.
**आलकमंदा**–(स्त्री., विशे. ना.) कुबेर नगरी.
**आलका**–(स्त्री.) अलका पुरी, अलका नगर.
**आलग्गित**–(कृ.) लागलेला, लटकलेला.
**आलग्गेति**–(क्रि.) लावणे, लटकावणे, टांगणे, अडकविणे.
**आलपति**–(क्रि.) संभाषण करणे, चर्चा करणे, बोलणे.
**आलपन**–(नपु.) संभाषण., चर्चा, वक्तृत्त्व.
**आलम्ब**–(पु.) आधार, अडकण्याचा आधार.
**आलम्बणदण्ड**–(पु.) टेकण्याची काठी.
**आलम्बति**–(क्रि.) लटकणे, अडकणे, लोंबत राहणे.
**आलम्बन**–(नपु.) इंद्रियाचा विषय (उदा-. डोळा पाहणे).
**आलम्बर**–(पु.) तुतारी (एक प्रकारचे रणशिंग).
**आलय**–(पु.) स्थान, ठिकाण, घर, इच्छा, आसक्ती, ओढ, आकर्षण, बहाणा, सोंग.
**आलवालक**–(नपु.) सुपीक जमीन, शेत.
**आळवी**–(नपु., विशे. ना.) श्रावस्तीपासून अंदाजे तीस योजन व बनारसपासून जवळजवळ बारा योजन अंतरावर असलेले एक नगर. हे नगर श्रावस्ती आणि राजगृह यांच्या मध्यावर बसलेले होते.
**आलस**–(नपु.) आळस.
**आलान**–(नपु.) हत्ती बांधण्याचा खांब, खुंटा.
**आलाप**–(पु.) चर्चा, बातचीत, संभाषण.
**आळार कालाम**–(पु., विशे. ना.) सिद्धार्थ गौतमाने गृहत्याग केल्यानंतर सर्वप्रथम आळार कालाम यांचे शिष्यत्त्व पत्करले होते.
**आलि**–(स्त्री.) एक प्रकारची मासळी.
**आलि**–(स्त्री.) खाई.
**आलिखति**–(क्रि.) लिहिणे, चित्र काढणे, मुद्रित करणे.
**आलिङ्गति**–(क्रि.) भेटणे, मिठी मारणे, आलिंगन देणे.
**आलित्त**–(कृ.) लिप्त, लपेटलेला, वेढलेले, गुरफटलेला.
**आलिन्द**–(पु.) घराचा सोपा, व्हरांडा.
**आलिम्पन**–(नपु.) लिंपणे, सारविणे.
**आलिम्पित**–(कृ) लिंपलेले, सारविलेले.
**आलिम्पेति**–(क्रि.) लिंपणे.
**आली**–(स्त्री.) सखी, मैत्रिण, सोबतीण.
**आलु**–(नपु.) जमीकन्द, बटाटा.
**आलुम्पति**–(क्रि.) उकरणे, खणणे, खोदणे.
**आलुळति**–(क्रि.) हालचाल करणे.
**आलेप**–(पु.) लेप.
**आलेपन**–(नपु.) लेप.
**आलोक**–(पु.) प्रकाश, तेज.
**आलोकन**–(नपु.) बाहेर पाहणे, खिडकी.
**आलोकसन्धि**–(पु.) झरोका, गवाक्ष, (स्त्री.) खिडकी.
**आलोकित**–(कृ.) पाहिलेला.
**आलोकेति**–(क्रि.) बाहेर पाहणे, अवलोकन करणे.
**आलोप**–(पु.) घास, अन्न, पिंड.
**आलोळ**–(पु.) हालचाल.
**आलोळेति**–(क्रि.) हालचाल करणे, ताक घुसळणे.
**आळाहन**–(नपु.) स्मशान भूमि, दहन-दफनाचे ठिकाण.
**आवज्जति**–(क्रि.) आवर्जन करणे, विचार करणे.
**आवज्जेति**–(क्रि.) एकाग्र होणे, ध्यान करणे, तप करणे, तप जपणे.
**आवट्ट**—(कृ.) आवृत्त, झाकलेला.
**आवट्टति**–(क्रि.) उलट-पलट करणे.
**आवट्टन**–(नपु.) आवर्तन.
**आवट्टन**–(नपु.) अंगात येणे, भूतसंचार.
**आवट्टनी**–(स्त्री.) जादू, आवर्तनी-माया, भुलवणी.
**आवट्टेति**–(क्रि.) जादू करणे.
**आवत्त**–(कृ.) परत आलेला, आवर्त.
**आवत्तक**–(वि.) परत येणारा, मागे फिरणारा.
**आवत्तति**–(क्रि.) परत येणे, मागे फिरणे, मागे वळणे.
**आवत्तन**–(नपु.) परत मागे.
**आवत्तिय**–(वि.) परतण्याशक्य, परतविण्यायोग्य.
**आवत्थिक**–(वि.) योग्य, मौल्यवान, किंमतवान.
**आवपति**–(क्रि.) भेट देणे, बक्षीस देणे.
**आवपन**–(नपु.) पेरणे, विस्कटणे, फेकणे.
**आवर**–(वि.) बाधक, घातक.
**आवरण**–(नपु.) पडदा, झाकण, आच्छादन.
**आवरणीय**–(वि.) झाकण्यालायक.
**आवरति**–(क्रि.) बाधा आणणे, घात करणे, संकट निर्माण करणे, अडथळा उभा करणे.
**आवरित**–(कृ.) बाधित, बाध्य, संकटग्रस्त.
**आवरिय**–(पू., क्रि.) संकट आणून, बाधा आणून, पडदा टाकून.
**आवलि**–(स्त्री.) ओळ, पंक्ती.

**आवली**–(स्त्री.) पंक्ती, माळ.
**आवसति**–(क्रि.) राहणे, वसती करणे, थांबणे, बसणे.
**आवसथ**–(पु.) निवासस्थान, राहण्याचे ठिकाण, घर.
**आवहति**–(क्रि.) आणणे.
**आवाट**–(पु.) खड्डा, खळगा, डबरा.
**आवहन**–(नपु.) आणणे.
**आवाप**–(पु.) कुंभाराचा आवा, मडकी भाजण्याची भट्टी.
**आवास**–(पु.) निवासस्थान, घर.
**आवासिक**–(वि.) गृहस्थ, नैवासिक, घरात राहणारा.
**आवि**–(अ.) प्रकट रुपाने, सर्वांसमोर, दृष्य.
**आविज्झति**–(क्रि.) चोहोंकडून घेरणे, घेरा घालणे, वेढा बसविणे, वेढा टाकणे.
**आविज्झन**–(नपु.) सभोती फिरणे.
**आविञ्जति**–(क्रि.) ताक घुसळणे, मंथन करणे.
**आविञ्जनक**–(वि.) लटकलेला.
**आविट्ठ**–(कृ.) प्रविष्ट, हजर, दाखल.
**आविद्ध**–(कृ.) छेदला, घेरला.
**आविल**–(वि.) मळका, घाणेरडा, मलीन.
**आविलत्त**–(कृ.) मळविला, घाण केला.
**आविसति**–(क्रि.) प्रवेश करणे, आत येणे.
**आवुणाति**–(क्रि.) धागा बांधणे, दोरा बांधणे.
**आवुत्त**–(वि.) घेरलेला, वेढलेला.
**आवुध**–(नपु.) हत्यार, शस्त्र.
**आवुसो**–(अ.) सम्बोधन, हाक मारणे, (उदा. मित्रा, आयुष्मान).
**आवेट्ठन**–(नपु.) वेष्टन, लपेटणे, गुंडाळणे.
**आवेठेति**–(क्रि.) लपेटणे, गुंडाळणे.
**आवेणिक**–(वि.) विशेष, असाधारण, असामान्य, विशिष्ठ.
**आवेला**–(स्त्री) फुलांचा गजरा.
**आवेल्लित**–(कृ.) वाकडा.
**आवेसन**–(नपु.) प्रवेशद्वार, दरवाजा.
**आवेसिक**–(पु., स्त्री., नपु.) अतिथी, आगंतुक.
**आसंक जातक**–एका राजपुत्राने एका मुलीचे नाव ओळखून पण जिंकला व तिच्याशी विवाह केल्याची कथा–(३८०).
**आसंकति**–(क्रि.) शंका घेणे, संदेह होणे.
**आसंका**–(स्त्री.) शंका, संदेह.
**आसंकित**–(कृ.) साशंक, शंकाग्रस्त.
**आसंगवचन**–(नपु.) आसक्ती, ओढ.
**आसंसत्थ**–(पु., नपु.) आशिर्वाद, प्रशसित.
**आसज्ज**–(पू. क्रि.) घेऊन, जवळ जाऊन, पोहोचून.
**आसज्जति**–(क्रि.) आसक्त होणे, मोहित होणे.
**आसज्जति**–(क्रि.) रागावणे, विरोध करणे.
**आसज्जन**–(नपु.) निग्रह, अपमान, आसक्त.
**आसति**–(क्रि.) बसणे, स्थानापन्न होणे.
**आसत्त**–(कृ.) आसक्त, मोहित.
**आसन**–(नपु.) बैठक, बसण्याची जागा, आसन.
**आसन-साला**–(स्त्री.) दिवाणखाना, बसण्याची खोली.
**आसन्दि**–(स्त्री.) खुर्ची, चौकी.
**आसन्न**–(वि.) जवळ.
**आसन्न**–(नपु.) शेजार.
**आसभ**–(वि.) वृषभ, बैल.
**आसय**–(पु.) आशय, हेतु.
**आसय**–(पु.) निवासस्थान, आश्रयस्थान.
**आसव**–(पु.) प्रवाही, वाहणारे, वाईट विचार, आस्रव.
**आसव-क्खय**–(पु.) वाईट विचारांचा नाश, आस्रवांचा क्षय.
**आससान**–(वि.) इच्छा करता, इच्छा करत असता.
**आसा**–(स्त्री.) आशा, आकांक्षा.
**आसाभङग**–(पु.) निराशा होणे, आशा भंग होणे.
**आसाटिका**–(स्त्री) माशीचे अंडे, कीटकाचे अंडे.
**आसादेति**–(क्रि.) अपमानित करणे.
**आसार**–(पु.) अतिवर्षाव, मुसळधारवृष्टी.
**आसाळ्ह**–(पु.) आषाढ महिना.
**आसि**–(क्रिया) (तो) होता, होणे.
**आसिञ्चति**–(क्रि.) शिंपणे, पाजणे.
**आसिट्ठ**–(कृ) आशीर्वाद मिळालेला.
**आसित्त**–(कृ.) पाजलेला, शिंपलेला.
**आसित्तक**–(नपु.) मसाला.
**आसिलेसा**–(स्त्री.) आश्लेषा नक्षत्र.
**आसिविस**–(पु.) सर्प.
**आसिं**–(क्रिया) (मी) होतो, असणे.
**आसिंसक**–(वि.) इच्छुक, आशाळभूत.
**आसिंसना**–(स्त्री.) इच्छा, आशा, आकांक्षा.
**आसी**–(स्त्री.) आशीर्वाद.
**आसी**–(स्त्री.) सापाची फडी.
**आसितिक**–(वि.) ऐंशी वर्षाचा.
**आसीन**–(कृ.) बसलेला.
**आसु**–(अ.) लवकर, भरभर, जलद.
**आसुं**–(क्रिया) (ते) होते.

आसुम्पति–(क्रि.) शिंपडणे, पातळ पदार्थ फेकणे.
आसेवति–(क्रि.) अभ्यास करणे, संचय करणे, संगती करणे.
आसेवना–(स्त्री) अभ्यास, संचय, संगत.
आह–(क्रिया.) (तो) म्हणाला.
आहच्च–(वि.) हालविण्याजोगा, हटविण्यायोग्य.
आहच्च पाद–(नपु.) पलंग, खाट.
आहट–(कृ.) आणलेला.
आहत–(कृ.) मार लागलेला, घायाळ, जखमी.
आहनति–(क्रि.) जखमी करणे, घायाळ करणे, मारणे.
आहनन–(नपु.) मार, जखम.
आहरण–(नपु.) आणला.
आहरति–(क्रि.) आणणे.
आहव–(नपु.) युध्द, द्वंद्व,
आहवनीय–(नपु.) यज्ञाग्नि, होम.
आहार–(पु.) भोजन, जेवण.
आहारट्ठितिक–(वि.) जेवणावर अवलंबून.
आहारेति–(क्रि.) जेवणे, खाणे, भोजन करणे.
आहाव–(नपु.) विहीरीजवळचा खांब, राहटाची बाजू (खांब).
आहिण्डति–(क्रि.) फिरणे, इकडे तिकडे करणे.
आहुति–(स्त्री.) यज्ञात टाकणे, आहुती देणे, जाळणे.
आहुण–(नपु.) भेट, बक्षीस, देणगी.
आहुणेय्य–(वि.) देणगीस योग्य, बक्षीस पात्र.
आहुंदरिक–(वि.) ठासून, भरगच्च.
आळ्हक–(नपु.) हत्ती बांधण्याचा खुंटा.

## इ

इ–नागरी लिपीतील तिसरा स्वर, ऱ्हस्व इकार.
इक्क–(पु.) अस्वल.
इक्खन–(नपु.) पहाणे, बघणे.
इक्खणिक–(पुं.) ज्योतिषि, भविष्यवादी.
इक्खति–(क्रि.) पहाणे.
इक्खित–(कृ.) दिसला गेला, पाहिला गेला.
इङ्ग–(पु.) इशारा, संकेत, खूण.
इङ्गित–(नपु.) प्रयत्न, इशारा.
इङ्गिरीलि–इंग्रजी भाषेकरिता पालि शब्द.
इंगुवी–(स्त्री.) हिंगोटीचे झाड, बिब्याचे झाड.
इङ्घ–(अ.) इकडे पहा.
इच्छ–(वि.) इच्छाकरत, इच्छुक.
इच्छक–(वि.) इच्छुक, इच्छा करणारा.
इच्छति–(क्रि.) इच्छिणे, इच्छा करणे.
इच्छा–(स्त्री.) मनोकामना, इच्छा.
इच्छानङ्गल–कोसल गणराज्यातील एक ब्राह्मण गाव.
इज्झति–(क्रि.) सफल होणे, यशस्वी होणे, यश मिळविणे, उन्नति करणे.
इज्झन–(नपु.) सफलता, वृद्धि.
इञ्जति–(क्रि.) हालणे, कंप पावणे.
इञ्जन–(नपु.) हालचाल, कंपन.
इट्ठ–(वि.) इष्ट, अनुकूल, योग्य.
इट्ठका-इट्ठिका–(स्त्री.) वीट.
इट्ठगन्ध–(पु., स्त्री., नपु.) सुगंध, सुवास.
इट्ठविपाक–(पु.) चांगला परिणाम, शुभ परिणाम, शुभ फल.
इट्ठस्सासिसना–(स्त्री.) आशीर्वाद.
इट्ठिय–(पु., विशे. ना.) महास्थाविर महेंद्र (सम्राट अशोकाचा पुत्र) बरोबर जे भिक्खु गेले होते, त्यापैकी, एक भिक्खु.
इण–(नपु.) ऋण, कर्ज.
इणट्ठ–(वि.) ऋणको, कर्जदार.
इण-पण्ण–(नपु.) वचनचिठ्ठी, ऋण–पत्र, हुंडी.
इण-मोक्ख–(पु.) कर्जमुक्त, ऋणमुक्त, कर्जफेड.
इण सामिक–(पु.) ऋण देणारा, धनको, सावकार.
इण-सोधन–(नपु.) ऋणमुक्त, कर्जमुक्त.
इणयिक–(पु.) ऋणी, कर्जदार, ऋणको.
इणुक्खेप–(नपु.) कर्ज, उधारी.
इतर–(वि.) दुसरा, अन्य.
इतरीतर–(वि.) दुसरा कोणी.
इति–(अ.) वाक्य, अध्याय संपल्याचे दर्शविणारा शब्द, बहुधा याचा आरंभीचा स्वर "इ" लुप्त होतो. उदा. "ति किर" = "असे खरोखर"
इतिवुत्त–(नपु.) वृत्तांत, बातमी, हकीकत.
इतिवुत्तक–(पु.) खुद्दक निकायातील एकशे दहा पदे (सुत्ते) असलेला चौथा ग्रंथ. यात प्रत्येक सूत्राच्या आरंभी ठराविक पध्दतीची एक ओळ आहे, की, "सांगण्याचा अधिकार असलेला-शास्ता- भगवान बुध्दाने सांगितले आहे की",
इतिह–(नपु.) परंपरागत उपदेश.
इतिहा–(पु.) पूर्ण हकीकत, संपूर्ण माहिती, पूरा वृतांत.
इतिहास–(पु.) परंपरेचे इति-वृत्त, इतिहास.
इतो–(अ.) यापुढे, याचे पुढे.

**इतोपट्ठाय**–(अ.) इथून सुरुवात करून, येथे आरंभ करून.

**इत्तर**–(वि.) संक्षिप्त, थोडा, लहान, बारिक, लघु.

**इत्तरकाल**–(पु.) थोडावेळ, अल्पकाळ.

**इत्थत्त**–(नपु.) (इत्थ + त्त) वर्तमान स्थिती, सध्य:स्थिती.

**इत्थत्त**–(स्त्री.) (इत्थि + त्त) स्त्रीत्त्व.

**इत्थं**–(क्रि. वि.) या प्रकारे, याप्रमाणे.

**इत्थंनाम**–(वि.) या नावाचा.

**इत्थंभूत**–(वि.) या प्रमाणे संपुर्ण.

**इत्थागार**–(पु.) स्त्रियांसाठी राखीव भाग.

**इत्थि, इत्थिका**–(स्त्री.) स्त्री, ललना, महिला.

**इत्थिधत**–(पु.) स्त्रीलंपट, विषयासक्त.

**इत्थिलिङ्ग**–(नपु.) स्त्रीलिंग, योनी.

**इत्थिनिमित्त**–(नपु.) स्त्रीत्त्वाचे चिन्ह, योनी, गुप्तेंद्रिय.

**इदं**–(नपु.) "इम" या सर्वनामाचा कर्ता. "इम" या सर्वनामाचे एकवचनी कर्म. हे.

**इवपच्चयता**–(स्त्री.) ( हा या दर्शक सर्वनामाचे क्रियापद आहे) हा आहे, ही आहे, हे आहे.

**इदानि**–(क्रि. वि.) आता.

**इद्ध**–(क.) संपन्न.

**इद्धि**–(स्त्री.) ऋद्धीसिध्दी, सिद्धहस्त.

**इद्धि बल**–(नपु.) अलौकिक शक्ती.

**इद्धिमन्त**–(वि.) अलौकिक बलप्राप्त, शक्तिशाली.

**इद्धि विसय**–(पु.) अलौकिक शक्तीचे क्षेत्र.

**इध**–(क्रि. वि.) येथे, या जन्मी, या लोकांत.

**इधम**–(नपु.) जळलेले जंगल, जळलेले वन.

**इन्द**–(पु.) इंद्र, देवांचा राजा, (वैदिक).

**इन्द्र खील**–(पु.) वेशीबाहेर (नगर द्वार) रोवलेला मजबूत खांब.

**इन्द-गज्जित**–(नपु.) मेघगर्जना, ढगांचा गडगडाट.

**इन्द गोपक**–(पु.)पावसाळ्यात जमिनीतून बाहेर निघणारे लाल रंगाचे किडे, गांडूळ, दानवा.

**इन्द-अग्गि**–(पु.) वीज.

**इन्द जाल**–(नपु.) जादू, इंद्रजाल.

**इन्दजालिक**–(पु.) जादूगार.

**इन्द धनु**–(नपु.) इंद्रधनुष्य.

**इन्द नील**–(पु.) नीलमणी, नीलम, इंद्रनील.

**इन्द पत्त**–(नपु., विशे. ना.) कुरू गणराज्यातील एक नगर, इंद्रप्रस्थ, सध्याची दिल्ली ही याच इंद्रप्रस्थाचे ठिकाणी वसली आहे. आजही इंद्रप्रस्थाचा किल्ला अस्तित्वात आहे.

**इन्द यव**–(पु.) इंद्रासारखा, इंद्राप्रमाणे.

**इन्द वारुणि**–(स्त्री.) टरबूज, काकडी इ. चे वेल.

**इन्द साल**–(पु.) इंद्रसाल, (सालवृक्ष)

**इन्दा वुध**–(नपु.) इंद्राचे वज्र.

**इन्दीवर**–(नपु.) नील कमल.

**इन्द्रिय**–(नपु.) अवयव, (डोळा, कान, नाक, जीभ इ.).

**इन्द्रिय गुत्ति**–(स्त्री.) इंद्रियांचे संरक्षण.

**इन्द्रिय दमन**–(नपु.) इंद्रिये ताब्यात ठेवणे, दमन करणे, मारणे.

**इंद्रिय संवर**–(पु.) इंद्रियांचा संयम.

**इंद्रिय जातक**–नारदाला एका अप्सरेने भुलविल्याची कथा–(४२३).

**इन्दु**–(पु.) चंद्र, शशी.

**इन्धन**–(नपु.) सरपण, जळण, इंधन, जाळण्याची वस्तू.

**इब्भ**–(वि.) धनी, मालक, स्वामी.

**इभ**–(पु.) हत्ती.

**इभपिप्फली**–(स्त्री.) मिऱ्याप्रमाणे तिखट असलेली पिंपळी (लेंडीपिंपळी), औषधी वनस्पति.

**इरिण**–(नपु.) वाळवंट, निकस जमीन, पडीक भूमि.

**इरिण**–(नपु.) महान जंगल, घनदाट जंगल.

**इरियति**–(क्रि.) हालचाल करणे.

**इरिया, इरियाना**–(स्त्री.) रीतिरिवाज, चाल-चलणूक, पद्धती परंपरा.

**इरिया पथ**–(पु.) अंगाची हालचाल.

**इरीण**–(नपु.) भयानक वाळवंट.

**इरू**–(स्त्री.) ऋग्वेद.

**इरुब्बेद**–(स्त्री.) ऋग + वेद.

**इल्ली**–(स्त्री.) कटयार, लहान तलवार.

**इल्लिस जातक**–इल्लिस नावाच्या चिक्कू (कंजूस)सावकाराची गोष्ट–(७८).

**इस**–(पु.) सिंहाची विशिष्ट जात.

**इसि**–(पु.) ऋषी.

**इसि पब्बज्जा**–(स्त्री.) ऋषीप्रमाणे संन्यास, दीक्षा.

**इसिगिली**–(पु.) राजगृहाजवळील पांच पर्वतांपैकी (पांडवपर्वतांपैकी) एक पर्वत.

**इसिपतन**–(स्त्री., विशे ना.) बनारसजवळील मृगदाय वनाची जागा. (सध्याचे सारनाथ) याच ठिकाणी भगवान बुद्धाने आपले धम्मचक्र प्रथम प्रवर्तित केले होते.

**इस्स**–(पु.) अस्वल.

**इस्सति**–(क्रि.) ईर्षा करणे.

**इस्सत्थ**–(नपु.) धनुर्विद्या.
**इस्सत्थ**–(पु.) धनुर्धारी, धनुष्यधारी.
**इस्सर**–(पु.) ईश्वर, सृष्टिकर्ता, स्वामी, मालक, निर्माता.
**इस्सरजन**–(पु.) प्रभावशाली लोक, समर्थ लोक.
**इस्सर निम्माण**–(नपु.) ईश्वर निर्मित.
**इस्सर निम्माण वादी**–(पु.,स्त्री.,नपुं.) आस्तिक, ईश्वराने ही सृष्टी निर्माण केली, यावर विश्वास ठेवणारा, ईश्वरवादी.
**इस्सरिय**–(नपु.) ऐश्वर्य, सुखोपभोग, भौतिक सुखे.
**इस्सरिय मद**–(पु.) ऐश्वर्याचा मद, ऐश्वर्याची घमेंड, आत्मश्लाघी.
**इस्सरियता**–(स्त्री.) ऐश्वर्य भावना.
**इस्सा**–(स्त्री.) ईर्षा, गर्व, अहंकार, अभिमान.
**इस्सा मनक**–(वि.) ईर्षाळू, ईर्षाखोर.
**इस्सास**–(पु.) धनुर्धारी.
**इस्सुकी**–(वि.) ईर्षाळू.
**इह**–(अ.) येथे , यालोकी, पृथ्वीवर, मर्त्य लोक.
**इह लोक**–(नपु.) हा जन्म, मृत्य लोक.
**इह लौकिक**–(पु.) मृत्यूलोकाविषयी.

## ई

**ई**–नागरी लिपीतील चौथा स्वर, दीर्घ ईकार.
**ईघ**–(पु.) दुःख, संकट, धोका.
**ईति**–(स्त्री.) विपत्ती, आपत्ती, संकट, समस्या.
**ईतिक**–(वि.) विपत्ति-ग्रस्त, संकटानी घेरलेला.
**ईदिस**–(वि.) असा, असला, यासारखा.
**ईरति**–(क्रि.) चालणे, हालणे, डुलणे.
**ईरित**–(कृ.) कंपित, थरथरत, कंपपावत.
**ईरेति**–(क्रि.) बोलणे.
**ईस**–(पु.) ईश, ईश्वर, सृष्टिकर्ता, स्वामी.
**ईसं**–(अ.) थोडा, अल्प, कमी, लहान, लघु.
**ईसक**–(वि.) थोडासा, लहानसा.
**ईसधर**–सिनेदा (सिनाई) पर्वताच्या चारी बाजूस असलेल्या सात पर्वत शृंखलेपैकी एक पर्वत.
**ईसम्पण्डु**–(वि.) भूरा रंग, राकट किंवा करडा रंग.
**ईसत्थ**–(पु., नपु.) थोड्याऐवजी, कमीकरिता.
**ईसदत्थ**–(पु., नपु.) थोड्यासाठी थोडक्याकरिता.
**ईसा**–(स्त्री.) नांगराचा फाळ.
**ईसादन्त**–(वि.) नांगराच्या फाळासारखे मजबूत दात असलेला हत्ती.
**ईहति**–(क्रि.) प्रयत्न करणे.
**ईहा**–(स्त्री.) प्रयत्न ,प्रयास.
**ईहान**–(नपु.) प्रयत्न, प्रयास.

## उ

**उ**–नागरी लिपीतील पांचवा स्वर, न्हस्व उकार, उ पालि वर्णमालेतील "उ" हा चौथा स्वर आहे.
**उक्कंस**–(पु.) उत्कृष्ट असणे, श्रेष्ठ असणे.
**उक्कंसक**–(वि.) प्रशंसक, उत्तेजक.
**उक्कंसना**–(स्त्री.) बढाई करणे, प्रशंसा करणे.
**उक्कंसेति**–(क्रि.) बढाई करणे.
**उक्कट्ठि**–(वि.) उत्कर्ष, उत्कृष्ट, श्रेष्ठ, थोर.
**उक्कट्ठता**–(स्त्री.) उत्कृष्टता, थोरवी, श्रेष्ठपणा.
**उक्कण्ठति** (क्रि.) उत्कंठित होणे, असंतुष्ट असणे.
**उक्कण्ठणा**–(स्त्री.) उत्कंठा, असंतोष.
**उक्कण्ठित**–(कृ.) उत्कंठित, असंतुष्ट.
**उक्कण्ण**–(वि.) उभ्या कानांचा, कान सरळ उभे असलेला.
**उक्कमति**–(क्रि.) बाजूस होणे, बाजूस सरकणे, बाजूस हटणे.
**उक्कल**–(नपु., विशे. ना.) सध्याचे ओरिसा राज्य हे पूर्वीचे प्राचीन उत्कल गणराज्य होय.
**उक्किलिस्सति**–(क्रि.) पतित होणे, पदभ्रष्ट होणे, अवनति होणे.
**उक्का**–(स्त्री.) मशाल, दिवटी, उल्का (उल्कापात), लोहाराची भट्टी.
**उक्काचेति**–(क्रि.) उलथणे, उचटणे, विस्कटणे.
**उक्कार**–(पु.) मल, मैला, शेण, विष्टा, गू.
**उक्कार-भूमि**–(स्त्री.) मैला टाकण्याची जागा.
**उक्कासति**–(क्रि.) खोकणे, घसा साफ करणे, खाकरणे.
**उक्किण्ण**–(कृ.) खणलेला, खोदलेला, उत्खनन केलेला.
**उक्किलेदेति**–(क्रि.) केर काढणे, कचरा काढून टाकणे.
**उक्कुज्ज**–(वि.) सरळ ठेवलेला, उभा केलेला.
**उक्कुज्जेति**–(क्रि.) वाकलेल्यास सरळ उभे करणे.
**उक्कुटिक**–(वि.) उकिडवा बसलेला, उपलाणी बसलेला.
**उक्कुट्ठि**–(स्त्री.) ओरडणे, आरडणे, घोषणा देणे.
**उक्कुस**–(पु.) मासे खाणारा पक्षी, बगळा, खंड्यापक्षी.
**उक्कूल**–(वि.) ढाळलेला, साचेबंद, ओतिव.
**उक्कोच**–(पु.) भेट, बक्षीस, देणगी, उपहार.
**उक्कोटन**–(नपु.) लाच घेऊन न्याय-निवाडा न देणे, निस्पृह न्याय देणे.

**उक्कोटेति**–(क्रि.) दावा नवीन पध्दतीने सुरू करणे, न्यायालयात दावा पुन्हा चालू करणे.

**उक्खलि**–(स्त्री.) भांडे.

**उखा**–(स्त्री.) भांडे, उखळ.

**उक्खलिखका**–(स्त्री.) लहान भांडे.

**उक्खित्त**–(कृ.) उचलले, हालविले.

**उक्खित पलिघ**–(वि.) बाधा नसलेले निर्दोष, निष्कलंक.

**उक्खिपति**–(क्रि.) वर उचलणे, घेणे, फेकणे.

**उक्खिपति**–(क्रि.) थांबविणे, स्थगित करणे, रहित करणे.

**उक्खिपन**–(नपु.) वर फेकणे, वर उडविणे.

**उक्खेपक**–(वि.) वर फेकणारा, उडविणारा.

**उक्लाप**–(पु.) केर-कचरा.

**उग्ग**–(वि.) उग्र, भयानक, मोठा, फार शक्तिवान, रागीट.

**उग्गच्छति**–(क्रि.) वर जाणे, उभारणे.

**उग्गज्जति**–(क्रि.) ओरडणे, आरडणे.

**उग्गण्हन**–(नपु.) लिहिणे-वाचणे, शिक्षण, अध्ययन.

**उग्गण्हाति**–(क्रि.) शिकणे, अध्ययन करणे.

**उग्गण्हापेति**–(क्रि.) शिकविणे, अध्यापन करणे.

**उग्गरह्**–(पू. क्रि.) शिकून, अध्ययन करून.

**उग्गत**–(कृ.) उठलेला, वर आलेला, उगवलेला, उत्कर्ष पावलेला.

**उग्गत्थन**–(नपु.) दागिना, आभरण, आभूषण.

**उग्गम**–(पु.) वर चढणे, वर होणे, उदम.

**उग्गमन**–(नपु.) चढाई, वृध्दि.

**उग्गहित**–(कृ.) शिकत असलेला, वर चढलेला, अयोग्य रीतीने घेतला गेलेला.

**उग्गहेतु**–(पु.) शिकणारा, विद्यार्थी.

**उग्गहेत्वा**–(पू. क्रि.) शिकून.

**उग्गार**–(पु.) ढेकर, पोटातील वायू बाहेर पडणे, वमन, वान्ती.

**उग्गाहक**–(वि.) विद्यार्थी.

**उग्गिरति**–(क्रि.) उच्चार करणे, ढेकर देणे, पाठ करणे.

**उग्गिरण**–(नपु.) उच्चार, उद्गार.

**उग्गिलति**–(क्रि. ) थुंकणे, उलटी करणे.

**उग्घटित**–(वि.) प्रयत्नशील, उद्योगी.

**उग्घरति**–(क्रि.) थेंब-थेंब पडणे, ठिपकणे.

**उग्घंसेति**–(क्रि.) रगडणे, चोळणे.

**उग्घाटन**–(नपु.) उद्घाटन, उघडणे, खुले करणे.

**उग्घाटित**–(कृ) उद्घाटित केलेले, खुले केलेले.

**उग्घाटेति**–(क्रि.) उद्घाटन करणे, खुले करणे.

**उग्घात**–(पु.) झटका, फटका, धक्का.

**उग्घातित**–(कृ.) झटका खाल्लेला, मार बसलेला.

**उग्घातेति**–(क्रि.) अचानक झटका देणे, झटकणे.

**उग्घोसना**–(स्त्री.) घोषणा.

**उग्घोसित**–(कृ.) घोषित, जाहीर, प्रकट.

**उग्घोसेति**–(क्रि.) घोषणा करणे, जाहीर करणे, प्रकट करणे.

**उच्च**–(वि.) उंच, श्रेष्ठ, थोर.

**उच्चत्त**–(नपु.) उंची.

**उच्चतरस्सर**–(पु.) उंच आवाज, पहाडी आवाज, मोठा आवाज.

**उच्चय**–(पु.) संग्रह, साठा.

**उच्चसद्दन**–(नपु.) घोषणा.

**उच्चा**–(क्रि. वि.) उंच

**उच्चा सद्द**–(वि.) उंच शब्द, मोठ्याने बोलणे, मोठे बोलणे.

**उच्चासयन**–(पु.) उंच पलंग.

**उच्चार**–(पु.) मल, विष्टा ('उक्कार' पहा).

**उच्चारण**–(नपु.) वर उचलणें, शब्दोच्चार.

**उच्चारित**–(कृ.) उच्चारलेला.

**उच्चारेति**–(क्रि.) उच्चारणे.

**उच्चालिङ्ग**–(पु.) बुद्ध, सूर्य, विष्णू, जैन तीर्थंकर.

**उच्चावच**–(वि.) उंच-नीच, वर-खाली.

**उच्चिनाति**–(क्रि.) निवडणे, नियुक्त करणे, निवडणूक घेणे.

**उच्छङ्ग**–(पु.) गोद, काख, कूस.

**उच्छंग जातक**-एका स्त्रीने राजाच्या कैदेत असलेला आपला पती व पुत्र यांच्या मुक्ततेऐवजी आपल्या भावाची मुक्तता व्हावी अशी विनंती केली, ही कथा–(६७).

**उच्छादन**–(नपुं.) अंग चोळणे.

**उच्छादेति**–(क्रि.) अंग चोळणे, रगडणे.

**उच्छिट्ठ**–(वि.) उष्टे, खरकटे.

**उच्छिट्ठभत्त जातक**–एका स्त्रीने आपल्या प्रियकराचा (यार) उष्टा भात ब्राह्मणास खाऊ घातल्याची कथा–(२१२).

**उच्छिज्जति**–(क्रि.) नष्ट होणे.

**उच्छित**–(वि.) उच्च.

**उच्छिन्दति**–(क्रि.) तोडणे, नाश करणे.

**उच्छिन्न**–(कृ.) तुटलेला, नाश झालेला.

**उच्छु**–(पु.) ऊस.

**उच्छुयन्त**–(नपु.) ऊस पेरण्याचे (लागण करण्याचे) यंत्र.

**उच्छु-रस**–(पु.) उसाचा रस.

**उच्छेद**–(पु.) नाश, विनाश, विच्छेद.

**उच्छेद दिट्ठि**–(स्त्री.) पुनर्जन्मावर अविश्वास.
**उच्छेदवादी**–(पु.) पुनर्जन्म न मानणारा.
**उजु, उजुक**–(वि.) साधा, सरळ.
**उजुता**–(स्त्री.) सरळपणा, साधेपणा.
**उजु**–(क्रि. वि.) सरळ.
**उज्जग्घति**–(क्रि.) जोराने हसणे.
**उज्जग्घिका**–(स्त्री.) जोराचे हास्य.
**उज्जङ्गल**–(वि.) वाळवंट, निकस जमीन, नापीक जमीन.
**उज्जल**–(वि.) उज्वल, चमकदार, अतिशुभ्र.
**उज्जलति**–(क्रि.) चमकणे.
**उज्जवति**–(क्रि.) प्रवाहाविरुद्ध जाणे.
**उज्जवनिका**–(स्त्री.) प्रवाहाविरुद्ध जाणारी नाव, नौका.
**उज्जहति**–(क्रि.) सोडणे.
**उज्जेनी**–(स्त्री., विशे. ना.) अवन्ती गणराज्याची राजधानी, उजेनी.
**उज्जोत**–(पु.) प्रकाश.
**उज्जोतित**–(कृ.) प्रकाशित.
**उज्जोतेति**–(क्रि.) प्रकाशित करणे.
**उज्झति**–(क्रि.) सोडणे, सोडून देणे.
**उज्झान**–(नपु.) तक्रार.
**उज्झानसञ्ञी**–(वि.)दोष देण्यास प्रवृत्त, तक्रार करणारा.
**उज्झापन**–(नपु.) उत्तेजित, प्रभावित.
**उज्झापेति**–(क्रि.) चिडविणे, तक्रार करणे, प्रोत्साहित करणे.
**उज्झायति**–(क्रि.) संतोषणे, आनंदणे, उत्साहित होणे.
**उज्झित**–(कृ.) फेकलेला, टाकलेला, त्यक्त.
**उञ्छति**–(क्रि.) खरकटे गोळा करणे, उष्टे घेणे.
**उञ्ञातब्ब**–(कृ.) घृणास्पद, तिरस्कारित.
**उट्ठहति**–(क्रि) उठणे, उभे रहाणे.
**उट्ठातु**–(पु.) उठणारा, उभा राहणारा.
**उट्ठान**–(नपु.) उत्थान, उभारणे.
**उट्ठापेति**–(क्रि.) उठविणे, बाहेर काढणे.
**उट्ठायक**–(वि.) क्रियाशील, अप्रमादी.
**उट्ठित**–(कृ.) उठलेला.
**उड्डाहति**–(क्रि.) जाळणे.
**उड्डेति**–(क्रि.) उडणे.
**उण्ण**–(नपु.) ऊन्ह, सूर्याची उष्णता, उब.
**उण्णा**–(स्त्री.) बुद्धाच्या भुवईमधील केस.
**उण्णा नाभी**–(पु.) कोळी (किटक).
**उण्णामय**–(वि.) केसाळ वस्त्र, कांबळी, घोंगडे, रग, जान.
**उण्ह**–(वि.) उष्ण, गरम, उबदार.
**उण्हत्त**–(नपु.) गरमी, उष्णता, उन्हाळा.
**उण्हरंस**–(पु.) सूर्य, रवि.
**उण्हास**–(नपु.) फोडा, फोडे.
**उतु**–(स्त्री.) ऋतु–मोसम, ठराविक काळ.
**उतुकाल**–(पु.) ऋतुकाल, स्त्रियांची मासिक पाळी.
**उतुपरिस्सय**–(पु.) ऋतु परिवर्तनाने होणारा त्रास.
**उतुसप्पाय**–(पु.) ऋतुचा अनुकूलता, ऋतुचा लाभ.
**उतुनी**–(स्त्री.) ऋतुस्त्राव होणारी स्त्री, रजस्वला, ऋतुमती.
**उत्त**–(कृ.) सांगितलेले, उक्त, वृत्त.
**उत्तण्डुल**–(वि.) उतू गेलेला भात (शिजत असलेला भात).
**उत्तत्त**–(कृ.) गरम केलेला.
**उत्तम**–(वि.) श्रेष्ठ, चांगला, उत्तम.
**उत्तमङ्ग**–(नपु.) श्रेष्ठ अंग, डोके, मस्तक, उत्तमांग.
**उत्तमङ्गरुह**–(नपु.) डोक्याचे केस.
**उत्तमण्ण**–(पु.) धनको, ऋणदाता, सावकार.
**उत्तमत्थ**–(पु.) सर्वश्रेष्ठ, परमार्थ, उत्तम अर्थ, हित.
**उत्तमा**–(स्त्री.) श्रेष्ठ स्त्री. सुंदर स्त्री, सुंदरी, देखणी स्त्री.
**उत्तम पोरिस**–(पु.) श्रेष्ठ पुरुष, उत्तम पुरुष.
**उत्तर**–(वि.) उच्च, सर्वोच्च, उत्तर दिशा.
**उत्तर**–(नपु.) प्रश्नाचे उत्तर.
**उत्तर कुरु**–(पु., विशे. ना.) निकायातील किंवा उत्तर कालीन पालिवाङमयात वर्णन केलेला प्रदेश.
**उत्तरत्थरण**–(नपु.) पलंगपोस, गादीवरील आच्छादन.
**उत्तरच्छद**–(पु.) चादवा, छत.
**उत्तरसुवे**–(क्रि. वि.) परवा.
**उत्तर-पञ्चाल**–(नपु., विशे. ना.) उत्तरकालीन पालि वाङमयात व प्राचीन संस्कृत वाङमयात वर्णिलेला पांचाळ देश, याची राजधानी कंपिला शहर होते.
**उत्तरण**–(नपु.) पार होणे, पलिकडे जाणे, परीक्षा पास होणे, उत्तीर्ण होणे.
**उत्तरति**–(क्रि.) नदीतून बाहेर पडणे, नदीपार करणे, नदी उतरणे.
**उत्तरविपरित**–(वि.) चुकीचे उत्तर.
**उत्तरा**–(स्त्री.) उत्तर दिशा.
**उत्तरा नन्दमाता**–(स्त्री., विशे. ना.) भगवान बुद्धाला विहार उपस्थान बांधून देणारी एक प्रमुख उपासिका.
**उत्तरापथ**–(पु., विशे. ना.) जम्बुद्वीपाचा-प्राचीन भारताचा-उत्तरकडील प्रदेश पालि वाङमयात याच्या सीमांचा स्पष्ट, निश्चित उल्लेख नाही, कदाचित श्रावस्तीपासून तक्षसिलेपर्यंत जाणारा महामार्ग असावा.

उत्तरायण–(नपु.) सूर्याच्या परिभ्रमणाचे उत्तरायण व दक्षिणायन असे दोन भाग आहेत. त्यापैकी पहिला भाग उत्तरायण.

उत्तर, उत्तर–(क्रि. वि.) जास्तीत जास्त.

उत्तर-करणीय–(नपु.) पुढील कार्य.

उत्तर भङ्ग–(पु.) जेवणाच्या शेवटी दिला जाणारा रुचकर गोड पदार्थ.

उत्तर मनुस्स धम्म–(पु.) परामानुषिक स्थिति, अलौकिक स्थिती.

उत्तर-साटक–(पु.) उपरणे, वर पांघरण्याची चादर, शाल.

उत्तरितर–(वि.) सर्वश्रेष्ठ.

उत्तरिय–(नपु.) श्रेष्ठ अवस्था.

उत्तरिय–(नपु.) प्रत्युत्तर.

[अनुत्तरिय–(नपु.) सर्वश्रेष्ठ अवस्था, स्थिती.]

उत्तरिय–(नपु.) उपरणे, वरील चादर.

उत्तसति–(क्रि.) त्रासणे, चकित होणे.

उत्तसन–(नपु.) त्रास, भय, भीती.

उत्तस्त–(कृ.) भयभीत, त्रासित.

उत्तान-उत्तानक–(वि.) आकाशाकडे तोंड करून झोपलेला, उताणा.

उत्तान सय्यक–(वि.) मूल.

उत्तानीकम्म–(नपु.) स्पष्टीकरण, खुलासा.

उत्तानीकरण–(नपु.) स्पष्टीकरण.

उत्तानीकरोति–(क्रि.) स्पष्ट करणे.

उत्तापेति–(क्रि.) कष्ट देणे, त्रास देणे.

उत्तारित–(कृ.) पार पडलेला, पार उतरून गेलेला.

उत्तारेति–(क्रि.) पार उतरणे, पार पडणे, निघून जाणे, रक्षण, मदत करणे, सहाय्य देणे.

उत्तास–(पु.) त्रास, भय.

उत्तासन–(नपु.) त्रासणे, त्रास देणे, मृत्यूदंड देणे.

उत्तासित–(कृ.) त्रास दिलेला, मृत्यूदंड दिलेला.

उत्तासेति–(क्रि.) त्रास देणे, भीती देणे, भिवविणे.

उत्तिट्ठति–(क्रि.) उठून उभे राहणे.

उत्तिण–(वि.) तृण रहित.

उत्तिण्ण–(कृ.) उत्तीर्ण, पास झालेला, पार पडलेला.

उत्रास–(पु.) त्रास, भीती.

उत्रासी–(वि.) त्रासित, भयभीत, त्रस्त.

उद–(अ.) किंवा, व, अथवा.

उदक–(नपु.) पाणी, जल.

उदक-काक–(पु.) समुद्रपक्षी.

उदक धारा–(स्त्री.) जलधारा, पाण्याची धार, प्रवाह.

उदक बिन्दु–(नपु.) जलबिंदू, पाण्याचा थेंब.

उदक मणिक–(पु.) पाणी ठेवण्याचे मोठे भांडे, हांडा.

उदक साटिका–(स्त्री.) आंघोळीचे वस्त्र.

उदकच्छ–(नपु.) दलदल.

उदकान्ति–(स्त्री.) पाण्यात उतरणे, पाण्यात जाणे.

उदकायतिक–(स्त्री.) पाण्याचा नळी, नळ.

उदकुम्भ–(पु.) पाण्याचा घडा, पाण्याची घागर, पाण्याची कळशी.

उदकोघ–(पु.) पाण्याचा पूर, महापूर.

उदग्ग–(वि.) आनंदित, प्रसन्न चित्त.

उदञ्चन–(नपु.) वाटी, फुलपात्र, पाण्याचे लहान भांडे.

उदञ्चनीजातक–मुलगी एका स्त्रीवर मोहित झाल्याचे पाहून त्याच्या वडिलांनी त्यास त्या स्त्रीबरोबर राहण्यास अनुमती दिल्याची कथा– (१०६).

उदण्ह–(नपु.) सूर्योदय, अरुणोदय.

उदधि–(पु.) समुद्र, सागर, जलाशय.

उदपादि–(क्रि.) उत्पन्न होणे, निर्माण होणे, उदय होणे, उगवणे.

उदपान–(पु.) विहिर, कूप.

उदपान दूसक जातक–विहिरीतील पाणी दूषित करणाऱ्या कोल्ह्याची कथा– (२७१).

उदय–(पु.) उदय, उन्नत्ति, वृद्धी, वाढ, आय, जमा, व्याज.

उदय जातक–उदयभद्र आणि उदयभद्रा यांची कथा– (४५८).

उदयत्थगम–(पु.) उदयास्त, उत्थान-पतन, उत्कर्ष-अपकर्ष.

उदय-ब्बय–(पु.) वृद्धी व ऱ्हास, जन्म-मृत्यू.

उदयन्त–(कृदन्त) उन्नत, उन्नत्ति होणारा, वृद्धि-मिळविणारा.

उदयति–(क्रि.) उदय होणे.

उदयन–(नपु.) उत्कर्ष, उन्नती.

उदर–(नपु.) पोट.

उदरग्गि–(पु.) भूक.

उदरावदेहकं–(क्रि. वि.) पोटापासून गळ्यापर्यंत भरणे, आकंठ, फार खाणे, अति भोजन.

उदरिय–(नपु.) पोट, पोटासाठी खाद्य, जेवण, पोट पालन, पोषण.

उदहारक–(पु.) पाणक्या, पाणी आणणारा, पाणी भरणारा.

उदहारिय–(वि.) पाण्यास जात असता, पाणी आणण्यास जाताना.

**उदागच्छति**–(क्रि.) पूर्ण होणे, पुरे होणे, समाप्त होणे.

**उदान**–(नपु.) उल्हासित होऊन सांगणे, आनंदाने सांगणे, उत्साहित होऊन कथन करणे.

**उदान**–(पु., विशे. ना.) खुद्दक निकायांतील एक ग्रंथ.

**उदानेति**–(क्रि.) आनंदाने कथन करणे, उत्साहाने सांगणे; आनंदाने उपदेश देणे.

**उदार**–(वि.) महान, मोठा, विशाल अंतःकरणाचा.

**उदासिन**–(वि.) उदासीन, निराश, नाराज, उपेक्षित, अक्रियाशील.

**उदाहट**–(कृ.) बोल, उक्ती, वचन, उवाच.

**उदाहरण**–(नपु.) नमुना, उदाहरण, तीच गोष्ट.

**उदाहरति**–(क्रि.) पाठ करणे, उच्चारणे, म्हणणे.

**उदाहार**–(पु.) कथन, सांगणे.

**उदाहु**–(अ.) अथवा, किंवा, अगर.

**उदिक्खति**–(क्रि.) पहाणे, नजर फिरविणे, दृष्टि टाकणे, दृष्टिक्षेप.

**उदिक्खितु**–(पु.) पाहणारा, प्रेक्षक, नजर टाकणारा.

**उदिच्च**–(वि.) श्रेष्ठ, कुलवंत, उच्च कुलोत्पन्न.

**उदित**–(कृ.) उदय झाला, वर आला, वर चढला, उत्कर्षिला.

**उदीचि**–(स्त्री.) उत्तर दिशा.

**उदीरण**–(नपु.) कथन.

**उदीरित**–(कृ.) सांगितले, निवेदिले, कथिले, कथित, निवेदित.

**उदीरेति**–(क्रि.) सांगणे, बोलणे, कथन करणे.

**उदुक्खल**–(पु., नपुं.) उखळ.

**उदुम्बर**–(पु.) औदुंबर वृक्ष, उंबराचे झाड.

**उदुम्बर-जातक**–एका वानराने दुसऱ्या वानरास, आपल्याच जातभाईस फसविल्याची कथा–(२९८).

**उदेति**–(क्रि.) उदय होणे, वृद्धि होणे, सुधारणे.

**उदेन**–(पु.) कोसंबिचा राजा (उदेन नृप).

**उद्द**–(पु.) ऊद, पाण्यातील मांजर.

**उद्दक रामपुत्त**–(पु., विशे. ना.) गौतम बुद्धाने गृहत्याग केल्यानंतर ज्या आचार्याचे शिष्यत्व पत्करले होते त्या आचार्यांपैकी एक उद्दक रामपुत्त.

**उद्दलोमी**–(पु.) केसाळ, उभ्या केसांचा, दोन्ही बाजूस (टोकास) दशा असलेले घोंगडे किंवा कांबळी.

**उद्दसेति**–(क्रि.) दाखविणे, प्रकट करणे.

**उद्दान**–(नपु.) सूचि, यादी.

**उद्दाप**–(पु.) इमारतीचा पाया.

**उद्दाम**–(वि.) चंचल, अस्थिर, उद्धट.

**उद्दालन**–(नपु.) फाडणे, नाश करणे.

**उद्दालक जातक**–उद्दालक पुरोहिताची कथा–(४८७).

**उद्दालेति**–(क्रि.) फाडणे.

**उद्दिट्ठ**–(कृ.) निर्देशित, दाखविलेला, इशारा केलेला, सांकेतिक.

**उद्दिसति**–(क्रि.) नियम करणे, उच्चारण करणे.

**उद्दिसापेति**–(क्रि.) नियमाने बांधणे, नियमबद्ध करणे.

**उद्दीपना**–(स्त्री.) व्याख्या, सतेज होणे, प्रकाशमान, प्रकाशित.

**उद्देक**–(पु.) ढेकर, उद्रेक, बाहेर पडणे.

**उद्देस**–(पु.) संकेत, इशारा, व्याख्या, पाठ, धडा, हेतु.

**उद्देसक**–(पु.) संकेत करणारा, खुणविणारा, व्याख्याता, पाठ करणारा.

**उद्देहक**–(वि.) उखळणारा.

**उद्ध**–(वि.) वरचा, उन्नत, ऊर्ध्व.

**उद्धग्ग**–(वि.) तोंड वर केलेला, उन्नतमुख.

**उद्धगति**–(स्त्री.) ऊर्ध्वगति, आकाशगमन, वर जाणे.

**उद्धच्च**–(नपु.) उद्धटपणा, अतिरेक.

**उद्धट**–(कृ.) ओढलेला, नष्ट केलेला.

**उद्धत**–(वि.) उद्धट,.

**उद्धदेहिक**–(कृ.) श्राद्ध, मृतकदान.

**उद्धन**–(नपु.) चूल, चुलवान, चुलाण.

**उद्धपाद**–(वि.) पाय वरती केलेला, वरपाय असलेला.

**उद्धम्म**–(पु.) मिथ्या मत, चुकीचे मत, खोटी धारणा.

**उद्धरण**–(नपुं.) वर काढणे, मुळातून उपडणे.

**उद्धरति**–(क्रि.) उद्धार करणे, वर काढणे, उत्कर्ष करणे.

**उद्धं**–(क्रि. वि.) वर, उन्नत.

**उद्धंगम**–(वि.) वर जाणारा, ऊर्ध्वगामी वायु, शरिरात खेळणारी हवा (वायु).

**उद्धंभागिय**–(वि.) वरच्या भागाशी संबंधित.

**उद्धंविरेचन**–(क्रि. वि.) वमन, वान्ती, ओकारी.

**उद्धंसोत**–(वि.) जीवन मार्गावर प्रगति करणे, वर चढणे.

**उद्धंसेति**–(क्रि.) नष्ट करणे, नाश करणे, विनाश करणे.

**उद्धार**–(पु.) बाहेर काढणे, प्रगती करणे.

**उद्धुमात, उद्धुमातक**–(वि.) सुजलेला.

**उद्धुमायति**–(क्रि.) सुजणे.

**उद्रय**–(वि.) कारण असणे.

**उद्रीयति**–(क्रि.) फूट पाडणे, विभक्त करणे, तुकडे-तुकडे करणे.

**उद्रीयन**–(नपु.) फूट पडणे, भाग होणे, विभागणे, खाली पडणे.

**उद्रेक**–(पु.) बाहेर पडणे, विस्फोट होणे, ज्वालामुखीचा उद्रेक.
**उन्दु**–उन्दुर, उन्दूर, (पु.) उंदीर.
**उन्न**–(नपु.) ओलावा, ओलेपणा.
**उन्नत**–(कृ.) उद्धारित, प्रगतिशील, वर आलेला, उन्नत.
**उन्नति**–(स्त्री.) वाढ, वृद्धी.
**उन्नदति**–(क्रि.) ओरडणे.
**उन्नम**–(पु.) उंची.
**उन्नमति**–(क्रि.) उंच होणे, वर चढणे, प्रगति होणे.
**उन्नल**–(वि.) अभिमानी, अहंकारी, गर्विष्ठ.
**उन्नाद**–(पु.) दंगा, गोंधळ, आरडा-ओरड.
**उन्नादेति**–(क्रि.) गोंधळ माजविणे, आरडा-ओरड करणे.
**उप**–(उपसर्ग) उपसर्ग, संसर्ग, जवळीक, जवळ इत्यादी अर्थाचा शब्द.
**उपक, उपग**–(वि.) जवळचा, जवळ गेलेला.
**उपकच्छ**–(नपु.) बगल, बाजू, कड.
**उपकट्ठ**–(वि.) जवळ, नजीक.
**उपकड्ढति**–(क्रि.) ओढणे, जवळ घेणे.
**उपकण्णक**–(नपु.) दुसऱ्यांचे बोलणे गुप्तपणे ऐकण्याची जागा.
**उपकप्पति**–(क्रि.) जवळ जाणे, योग्य होणे, अनुकूल होणे.
**उपकप्पन**–(नपु.) जवळीक, उपयुक्त, योग्य, अनुकूल.
**उपकरण**–(नपु.) साधन.
**उपकरोति**–(क्रि.) उपकार करणे.
**उपकार**–(पु.) मदत, सहाय्यता, उपकार.
**उपकारक**–(पु.) उपकार करणारा, मदत करणारा, सहाय्यक, मदतगार.
**उपकिण्ण**–(कृ.) विखुरलेला, विस्कटलेला.
**उपकूजति**–(क्रि.) चिवचिवणे, किलबिलणे.
**उपकूल**–(वि.) नदी-किनारा, नदी-तट.
**उपकूळित**–(कृ.) उकळलेला, भाजलेला, होरपळलेला.
**उपक्कम**–(पु.) साधन, उपाय, उपक्रम.
**उपक्कमति**–(क्रि.) प्रयत्न करणे, प्रयास करणे, आक्रमण करणे, उपक्रम करणे.
**उपक्कमन**–(नपु.) आक्रमण, जवळ जाणे, जवळ पोहोचणे.
**उपक्किलिट्ठ**–(वि.) मळलेला, डाग पडलेला, घाण झालेला, घाणेरडा.
**उपक्किलेस**–(पु.) दुर्विचार, दूषित मन, मलीन चित्त.
**उपक्कीतक**–(पु.) गुलाम, विकत घेतलेला दास.
**उपक्कुट्ठ**–(कृ.) दोषी, दोष लागलेला, दूषित.
**उपक्कोस**–(पु.) दोषारोपन, टीका.
**उपक्कोसति**–(क्रि.) दोष देणे, टीका करणे.
**उपक्खट**–(वि.) जवळ आणलेला.
**उपक्खर**–(पु.) रथाचा एक भाग, चाकाचा भाग.
**उपक्खलन**–(नपु.) ढळणे, पाय लटपटणे, अस्थिर होणे.
**उपग**–(वि.) जाणारा, जवळ येणारा.
**उपगच्छति**–(क्रि.) जवळ येणे.
**उपगत**–(कृ.) जवळ गेला.
**उपगमन**–(नपु.) जवळ जाणे.
**उपगूहति**–(क्रि.) भेटणे, मिठी मारणे, आलिंगन देणे.
**उपगूहन**–(नपु.) भेट, आलिंगन.
**उपग्घात**–(पु.) झटका, फटका, थाप.
**उपघात**–(पु.) मार, धक्का.
**उपघातक**–(पु., वि.) मारणारा, धक्का देणारा.
**उपघाती**–(वि.) मारेकरी, खुनी.
**उपचय**–(पु.) संग्रह, साठा.
**उपचरति**–(क्रि.) व्यवहार करणे, उद्योगी असणे.
**उपचरित**–(कृ.) अभ्यस्त, कार्यरत.
**उपचार**–(पु.) शेजार-पाजार, पूर्वतयारी.
**उपचिका**–(स्त्री.) वाळवी, वल्मिक.
**उपचिण्ण**–(कृ.) अभ्यस्त, एकत्रित.
**उपचित**–(कृ.) ढीग, साठा.
**उपचिनाति**–(क्रि.) एकत्र करणे, जमविणे, संग्रह करणे, साठविणे.
**उपच्चगा**–(क्रि.) पार झाला, ओलांडून गेला, पास, पुढे गेला.
**उपच्छिन्दति**–(क्रि.) तोडणे, नष्ट करणे, मोडणे, बाधक होणे.
**उपच्छिन्न**–(कृ.) तोडलेला, कापलेला, नष्ट केलेला, मोडलेला, छिन्न-विच्छिन्न.
**उपच्छेद**–(पु.) अडथळा, बाधा, विनाश.
**उपच्छेदक**–(वि.) अडथळा करणारा, बाधा निर्माण करणारा, विनाशी.
**उपजानाति**–(क्रि.) शिकणे, मिळविणे, प्राप्त करणे, घेणे.
**उपजीवति**–(क्रि.) परोपजीवी, दुसऱ्याच्या आश्रयाने जगणारा, परावलंबी.
**उपजीवी**–(वि.) परावलंबी.
**उपज्झाय**–(पु.) उपाध्याय.
**उपञ्ञात**–(कृ.) शिकलेला, ज्ञाता, ज्ञात.
**उपञ्ञास**–(पु.) वचनक्रम, कादम्बरी, उपन्यास.
**उपट्ठपेति**–(क्रि.) अर्पण करणे, सेवेस हजर होणे, वाहणे.

**उपट्ठहति**–(क्रि.) वाट पहाणे, सेवा करणे, सेवेस हजर असणे, समजणे, उपस्थित करणे.

**उपट्ठाक**–(पु.) सेवक, दास, नोकर,

**उपट्ठान**–(नपु.) सेवा, चाकरी, नोकरी.

**उपट्ठान-साला**– (स्त्री.) सभागृह, सभा भवन.

**उपट्ठित**–(कृ.) उपस्थित, हजर, तयार.

**उपट्ठेति**–(क्रि.) सेवेत असणे, नोकरीत असणे, गौरव दाखविणे.

**उपडय्हति**–(क्रि.) जळणे.

**उपड्ढ**–(वि., नपु.) अर्धा, निम्मा.

**उपतप्पति**–(क्रि.) रागावणे, क्रोधित होणे, अनुतप्त होणे.

**उपताप**–(पु.) पश्चाताप, पुन्हा वाईट वाटणे, नंतर दुःख करणे.

**उपतापक**–(त्रि.) पश्चातापाचे कारण.

**उपतापेति**–(क्रि.) कष्ट देणे, त्रास देणे, सतावणे, उपद्रव करणे.

**उपतिट्ठति**–(क्रि.) जवळ उभे राहणे, देखरेख करणे सांभाळणे.

**उपतिस्स**–(पु., विशे. ना.) धम्म सेनापती सारिपुत्ताचे गृहस्थ नाव.

**उपत्थद्ध**–(वि.) कठीण, कठोर, आधाराने उभा.

**उपत्थम्भ**–(पु.) आधार.

**उपत्थम्भेति**–(क्रि.) आधार देणे, आधारभूत होणे.

**उपत्थर**–(पु.) दरी, आस्तरण, सतरंजी, अंथरुण.

**उपदस्सेति**–(क्रि.) प्रदर्शित करणे, दाखविणे, सांगणे.

**उपदहति**–(क्रि.) देणे, कारणीभूत होणे, कारण होणे.

**उपदा**–(नपु.) भेट, देणगी, उपहार, बक्षीस.

**उपदिट्ठ**–(कृ.) दर्शविलेला, दाखविलेला.

**उपदिसति**–(क्रि.) उपदेशिणे, सांगणे, उपदेश करणे.

**उपदिसन**–(नपु.) उपदेश.

**उपदिस्सति**–(क्रि.) प्रकट करणे, सांगणे, उपदेश करणे.

**उपदेस**–(पु.) उपदेश, हिताची गोष्ट.

**उपद्दव**–(पु.) उपद्रव, त्रास, कष्ट, दुर्भाग्य.

**उपद्दवेति**–(क्रि.) त्रास देणे, उपद्रव करणे, दुखविणे.

**उपद्दुत**–(कृ.) त्रासित, उपद्रुत, कष्टलेला, दुखविलेला.

**उपधान**–(नपु.) उशी, टेकण्याचा लोड किंवा तक्क्या.

**उपधान**–(वि.) कारण असणे, कारण होणे.

**उपधानेति**–(क्रि.) कल्पना करणे, विचार करणे.

**उपधारण**–(नपु.) दुधाचे भांडे, दूध-पात्र, क्षीरपात्र.

**उपधारणा**–(स्त्री.) विचार, मत.

**उपधारित**–(कृ.) विचार करत.

**उपधारेति**–(क्रि.) विचार करणे, निर्णय घेणे, मत मांडणे.

**उपधावति**–(क्रि.) पळणे, धावणे.

**उपधावन**–(नपु.) मागे पळणे, परत जाणे.

**उपधि**–(पु.) आसक्ती, ओढ, आकर्षण, पुनर्जन्माचे कारण.

**उपनच्चति**–(क्रि.) नाचणे, नृत्य करणे.

**उपनत**–(कृ.) वाकलेला, नम्र, झुकलेला.

**उपनदति**–(क्रि.) हाक मारणे, बोलावणे, आवाज देणे.

**उपनद्ध**–(कृ.) वैर, शत्रुत्व.

**उपनन्धति**–(क्रि.) वैर धरणे, शत्रुत्व करणे.

**उपनमति**–(क्रि.) वाकणे, झुकणे, नम्र होणे.

**उपनमन**–(नपु.) झुकाव, नम्र, नम्रता.

**उपनयन**–(नपु.) जवळ आलेला, हिंदूचा उपनयन संस्कार.

**उपनय्हति**–(क्रि.) शत्रुत्व करणे, वैर धरणे.

**उपनय्हना**–(स्त्री.) वैर, शत्रुत्व.

**उपनामित**–(कृ.) जवळ आणला, भेट आणली.

**उपनामेति**–(क्रि.) जवळ करणे भेट आणणे.

**उपनायिक**–(त्रि.) जवळ येता, जवळ आणता.

**उपनाह**–(पु.) वैर, शत्रुत्व.

**उपनाही**–(त्रि.) वैरी, शत्रु.

**उपनिक्खमति**–(क्रि.) आणणे, अभिनिष्क्रमण.

**उपनिक्खित्त**–(कृ.) ठेवला, आणला, निक्षिप्त.

**उपनिक्खित्तक**–(पु.) फिरणारा पुरुष, फिरता मनुष्य, भटक्या, प्रवासी.

**उपनिक्खिपति**–(क्रि.) ठेवणे.

**उपनिक्खिपन**–(नपु.) ठेवणे निक्षेप.

**उपनिक्खेप**–(पु.) ठेवणे, निक्षेप.

**उपनिघंसति**–(क्रि.) घासणे चोळणे, गाळणे, घाण्यात घालून गाळणे तेल काढणे.

**उपनिज्झान**–(नपु.) मनन विचार चिंतन.

**उपनिज्झायति**–(क्रि.) विचार करणे, मनन करणे, चिंतन करणे.

**उपनिधा**–(स्त्री.) तुलना.

**उपनिधी**–(पु.) वचन देणे, कबूल करणे, आश्वासने.

**उपनिधाय**–(अ.) तुलना केली.

**उपनिपज्जति**–(क्रि.) जवळ झोपणे, जवळ विश्रांती घेणे.

**उपनिबद्ध**–(कृ.) जोडलेला, चिकटविलेला, मिळविलेला.

**उपनिबन्ध**–(पु.) जवळीक, संबंध.

**उपनिबन्ध**–(वि.) अवलंबीत, संबंधित.

**उपनिबन्धति**–(क्रि.) जोडून बांधणे, मिळविणे, चिकटविणे.

**उपनिबन्धन**–(नपु.) जवळचे संबंध, अति विनम्र प्रार्थना.
**उपनिसा**–(स्त्री.) कारण, साधन, सम-भाव.
**उपनिसीदति**–(क्रि.) जवळ बसणे.
**उपनिवेसति**–(क्रि.) सोबत करणे, मैत्री करणे, बरोबर राहणे.
**उपनिस्सय**–(पु.) आधार, आश्रय, सहारा.
**उपनिस्सयति**–(क्रि.) दोस्ती करणे, सोबत करणे, मैत्री करणे.
**उपनिस्साय**–(क्रि. वि.) जवळ, नजीक, कारणाने, साधनाने.
**उपनिस्सित**–(कृ.) आश्रित, निर्भृत.
**उपनीत**–(कृ.) आणला, पाळला, पोसला, वाढविला.
**उपनीय**–(पू. क्रि.) आणून.
**उपनीयति**–(क्रि.) आणणे, घेऊन जाणे.
**उपनील**–(वि.) नीलवर्ण, निळ्या रंगाचा, नीलमणी.
**उपनेति**–(क्रि.) आणणे, घेऊन जाणे.
**उपन्तसेल्ल**–(पु.) जवळचा, शेजारी.
**उपन्तिक**–(वि.) जवळ, नजीक.
**उपन्तिक**–(नपु.) शेजार-पाजार.
**उपपज्जति**–(क्रि.) पुनर्जन्म होणे, उत्पन्न होणे.
**उपपति**–(नपु.) प्रियकर, जार, यार.
**उपपत्ति**–(स्त्री.) जन्म, पुनर्जन्म.
**उपपन्न**–(कृ.) जन्मलेला, उपजलेला.
**उपपरिक्खण**–(नपु.) परीक्षा.
**उपपरिक्खति**–(क्रि.) परीक्षा घेणे, तपासणे.
**उपपरिक्खा**–(स्त्री.) परीक्षा.
**उपपातिक**–(वि.) स्वयंभू, माता-पित्याविना जन्मलेला, सत्त्व, देव.
**उपपादित**–(कृ.) समुत्पन्न.
**उपपादेति**–(क्रि.) उत्पन्न करणे, जन्म देणे, निर्माण करणे.
**उपपारमी**–(स्त्री.) लहान लहान बंधने, लहान पारमिता, विशिष्ट गुणांच्या पराकाष्टा.
**उपपीळक**–(वि.) त्रास देणारा, कष्ट देणारा, पीडा करणारा, उपद्रवी.
**उपपीळा**–(स्त्री.) त्रास, कष्ट, पीडा, उपद्रव.
**उपफ्फुसति**–(क्रि.) स्पर्श करणे, शिवणे, हात लावणे.
**उपप्लवति**–(क्रि.) पोहणे.
**उपब्बजति**–(क्रि.) जाणे, निरोप घेणे, गमन करणे.
**उपब्बळह**–(वि.) गर्दीचे ठिकाण, यात्रा, बाजार.
**उपब्रूहन**–(नपु.) वृद्धी, वाढ, विस्तार.
**उपब्रूहति**–(क्रि.) वृद्धी करणे, वाढविणे, विस्तार करणे.

**उपभुञ्जक**–(वि.) खाणारा, भक्षक, भोगणारा.
**उपभुञ्जति**–(क्रि.) भोगणे, खाणे, भोग घेणे.
**उपभोग**–(पु.) भोगण्यास, खाण्यास, वापरण्यास योग्य, उपभोग.
**उपभोगी**–(वि.) भोगणारा, खाणारा, उपभोग घेणारा, फायदा घेणारा.
**उपमा**–(स्त्री.) समानता, सारखेपणा, सादृश्य, उपमा.
**उपमातू**–(स्त्री.) दाई, सांभाळणारी स्त्री.
**उपमान**–(नपु.) तुलना, ज्याच्याशी तुलना केली जाते, उपमान.
**उपमेति**–(क्रि.) तुलना करणे.
**उपमेय्य**–(वि.) ज्याची तुलना केली जाते.
**उपय**–(पु.) आसक्ती, ओढ.
**उपयम**–(नपु.) विवाह, लग्न.
**उपयाचति**–(क्रि.) याचना करणे, मागणे.
**उपयाचितक**–(पु.) याचक, मागणारा.
**उपयाचितक**–(वि.) याचना, मागणे.
**उपयाति**–(क्रि.) जवळ जाणे.
**उपयान**–(नपु.) पोहोच.
**उपयानक**–(नपु.) खेकडा.
**उपयुज्जति**–(क्रि.) संबंध जोडणे, अभ्यास करणे, उपयोग करणे.
**उपयोग**–(पु.) (उप + योग) संबंध, आवश्यकता, उपयुक्तता, उपयोग.
**उपरचित**–(कृ.) निर्मित, उत्पन्न.
**उपरज्ज**–(नपु.) निर्माण करणे, पैदा करणे, मिळविणे, बनविणे, उपराज्य.
**उपरत**–(कृ.) विरक्त, अलिप्त, वेगळा.
**उपरति**–(स्त्री.) संयम, विरक्ती, वैराग्य, उपरती.
**उपरमति**–(क्रि.) विरक्त होणे, संयमी असणे, अलिप्त राहणे.
**उपराजा**–(पु.) राजाचा प्रतिनिधी, राज्याच्या जागी असलेला (राष्ट्राध्यक्ष).
**उपरि**–(अ.) वर.
**उपरिट्ठ**–(वि.) सर्वश्रेष्ठ, सर्वोच्च, सर्वात उंच.
**उपरि-पासाद**–(पु.) सर्वात वरचा मजला.
**उपरि-भाग**–(पु.) वरचा भाग, हिस्सा.
**उपरि-मुख**–(वि.) वर तोंड केलेला.
**उपरित्त**–(कृ.) वर जाण्याचा भाव, वर गेलेला.
**उपरिस**–(वि.) सर्व प्रकारे, सर्वोपरि.
**उपरिज्झति**–(क्रि.) थांबणे, अवरोधणे.
**उपरुन्धति**–(क्रि.) थांबविणे, अडथळा करणे, विरोध करणे.

**उपरूळ्ह**–(कृ.) उगविलेला, उपजलेला.
**उपरोचति**–(क्रि.) प्रसन्न करणे, आनंदित करणे, उत्साहित करणे.
**उपरोदति**–(क्रि.) रडणे, आक्रोश करणे, दुःख करणे, विलाप करणे.
**उपरोधेति**–(क्रि.) अडथळा करणे, विरोध करणे, बाधा आणणे.
**उपरोप**–(नपु.) (?) रोप, कलम, रोपटे.
**उपल**–(पु.) दगड.
**उपलक्खणा**–(स्त्री.) विचार, मत, विचार करणे.
**उपलक्खित**–(कृ.) उपलक्षित, विचारपूर्वक, काळजीपूर्वक.
**उपलक्खेति**–(क्रि.) विचार करणे.
**उपलद्ध**–(कृ.) प्राप्त, मिळणे, उपलब्ध.
**उपलद्धि**–(स्त्री.) प्राप्ती, मिळकत, उपलब्धी.
**उपलब्भति**–(क्रि.) प्राप्त होणे, मिळणे, विद्यमान असणे.
**उपलभति**–(क्रि.) प्राप्त करणे, मिळविणे.
**उपलापन**–(नपु.) प्रेरणा, बडबड.
**उपलापेति**–(क्रि.) प्रेरित करणे, प्रोत्साहन देणे, बडबड करणे.
**उपलालेति**–(क्रि.) पालनपोषण करणे, सांभाळ करणे, रक्षिणे.
**उपलिक्खति**–(क्रि.) खरडणे, उकरणे, खणणे.
**उपलिप्पति**–(क्रि.) लिंपणे, सारवणे, लेप देणे.
**उपलिम्पति**–(क्रि.) रंग देणे, रंगविणे.
**उपलेप**–(पु.) लेप.
**उपलोहितक**–(वि.) लालरंग, तांबडा रंग.
**उपवज्ज**–(वि.) सदोष, दोषमुक्त.
**उपवण्णेति**–(क्रि.) वर्णन करणे, सांगणे.
**उपवत्त, उपवत्तन**–(नपु., विशे. ना.) हिरण्यवती नदी किनाऱ्यावरील कुसिनाराच्या मल्लांचे शालवन-(शाल उद्यान).
**उपवत्तति**–(क्रि.) समोर येणे, हजर होणे, उपस्थित असणे, विद्यमान असणे.
**उपवत्तन**–(वि.) जवळचा, जवळ असलेला.
**उपवसति**–(क्रि.) वसणे, राहणे, निवास करणे.
**उपवाद**–(पु.) दोष, अपमान.
**उपवादक**–(वि.) दोष देणारा, अपमान करणारा.
**उपवायति**–(क्रि.) वारा वाहणे.
**उपवास**–(पु.) व्रत, न खाणे, आहार-त्याग, उपवास.
**उपवासन**–(नपु.) सुगंधित करणे, सुवासिक बनविणे.
**उपवासित**–(वि.) सुवासिक, सुगंधित.
**उपवासेति**–(क्रि.) सुगंधी करणे, सुवासिक बनविणे.
**उपवाहन**–(नपु.) घेऊन जाणे, बाहेर नेणे.
**उपविजञ्ञा**–(स्त्री.) प्रसूत होणारी स्त्री.
**उपविसति**–(क्रि.) जवळ येणे, जवळ बसणे.
**उपवीण**–(पु.) वीणेची तार.
**उपवीत**–(कृ.) विणलेला.
**उपवीयति**–(क्रि.) विणणे.
**उपवुत्त**–(कृ.) दोषी असलेला.
**उपवुत्थ**–(कृ.) उपोषथ, व्रत, व्रत धरणे, उपास-तापास.
**उपवेसन**–(नपु.) बसणे, बैठक.
**उपव्हाति**–(क्रि.) बोलविणे, हाक मारणे.
**उपसंवसति**–(क्रि.) बरोबर राहणे, बरोबर असणे.
**उपसंहरण**–(नपु.) सर्व एकत्र करणे, तुलना करणे.
**उपसंहरति**–(क्रि.) एकत्र करणे, जवळ आणणे, ढीग करणे, साठा करणे.
**उपसंहार**–(पु.) एकत्र, रसग्रहण, तुलना, उपसंहार.
**उपसङ्कमति**–(क्रि.) जवळ जाणे.
**उपसङ्कमन**–(नपु.) पोहोच, जवळीक.
**उपसङ्कमित्वा**–(पू. क्रि.) जवळ जाऊन.
**उपसग्ग**–(पु.) धोका, संकट.
**उपसग्ग**–(पु.) क्रियेपूर्वी येणारा वर्णसमूह, उपसर्ग.
**उपसन्त**–(कृ.) शांत चित्त, स्थिर मन.
**उपसम**–(पु.) शांती, संतोष, समाधान.
**उपसमेति**–(क्रि.) संतुष्ट करणे, शांत करणे.
**उपसम्पज्ज**–(कृ.) पोहोचलेला, दाखल झालेला. (भिक्खु), उपसंपन्न झालेला, संपादन केलेला.
**उपसम्पज्जति**–(क्रि.) पोहोचणे, दाखल होणे, **(भिक्खु)** उपसंपन्न होणे, संपादन करणे.
**उपसम्पदा**–(स्त्री.) बौद्ध भिक्खु संघाद्वारे दिली जाणारी दीक्षा.
**उपसम्पन्न**–(कृ.) दीक्षित, दीक्षा मिळालेला, उपसंपदा-प्राप्त.
**उपसम्पादेति**–(क्रि.) दीक्षा देणे, उपसंपदा देणे.
**उपसम्फस्सति**–(क्रि.) भेटणे, मिठी मारणे, आलिंगन देणे.
**उपसम्मति**–(क्रि.) शांत होणे, संतुष्ट होणे, तृप्ति होणे, समाधान पावणे.
**उपसाळ्ह जातक**–एका ब्राह्मणाने आपल्या मुलास सांगून ठेवले होते की, माझे दाहकर्म अशा जागी कर की, त्यापूर्वी त्या जागी कोणाचे दाहकर्म झाले नव्हते, ही कथा–(१६६).

**उपसिंघति**–(क्रि.) शिंकणे, नाकातून आवाज येणे.

**उपसिंघन**–(नपु.) शिंक, नाकातील आवाज.

**उपसुस्सति**–(क्रि.) सुकणे, वाळणे, सुकविणे, वाळविणे.

**उपसुस्सन**–(नपु.) सुकणे, वाळणे.

**उपसेचन**–(नपु.) जेवण रुचकर होण्यासाठी त्यावर मीठ-मिरची-मसाला टाकणे, मिसळणे.

**उपसेनिया**–(स्त्री.) लाडकी मुलगी, आईजवळ सतत राहणारी मुलगी.

**उपसेवति**–(क्रि.) अभ्यास करणे, संगतीत असणे, मैत्री करणे.

**उपसेवना**–(स्त्री.) अभ्यास, संगती, मैत्री, दोस्ती.

**उपसेवित**–(कृ.) अभ्यास केलेला, संगती-मैत्री केलेला.

**उपसेवी**–(वि.) अभ्यस्त, दोस्त, मित्र, सोबती.

**उपसोभति**–(क्रि.) सुशोभित होणे, सुंदर बनणे.

**उपसोभित**–(कृ.) सुशोभित, सुंदर, सजलेला, नटलेला.

**उपसोभेति**–(क्रि.) सुशोभित करणे, सजविणे, सुंदर बनविणे, नटविणे.

**उपसोसेति**–(क्रि.) सुकविणे, वाळविणे.

**उपसट्ठ**–(कृ.) दमन झालेला, झळलेला, त्रासित.

**उपस्सय**–(पु.) निवासस्थान, घर.

**उपस्सास**–(पु.) श्वासोच्छ्वास.

**उपस्सुत्ति**–(स्त्री.) उपश्रुति, दुसऱ्यांचे गुप्त बोलणे.

**उपस्सुतिक**–(वि.) पर गुपित ऐकणारा.

**उपहञ्ञति**–(क्रि.) मार खाणे, भ्रष्ट होणे.

**उपहत**–(कृ.) मार खाल्लेला.

**उपहत्तु**–(पु.) आणणारा.

**उपहनति**–(क्रि.) बाधा आणणे, मारणे, त्रास देणे.

**उपहरण**–(नपु.) भेट, बक्षीस, देणगी.

**उपहरति**–(क्रि.) भेट देणे, बक्षीस आणणे, देणगी मिळविणे.

**उपहार**–(पु.) भेट, पुरस्कार, बक्षीस, उपहार.

**उपहिंसति**–(क्रि.) मारणे, धक्का देणे, हानी करणे, नुकसान करणे.

**उपागच्छति**–(क्रि.) जवळ येणे.

**उपागत**–(कृ.) जवळ आलेला, जवळ असलेला.

**उपातिधावति**–(क्रि.) धावत असणे, पळत असणे.

**उपातिपन्न**–(कृ.) पडलेला, मारलेला, शिकार झालेला.

**उपातिवत्त**–(कृ.) सीमा ओलांडलेला, सीमोलंघन केलेला, दूर गेलेला.

**उपातिवत्तति**–(क्रि.) सीमोलंघन करणे, सीमा-हद्द ओलांडणे.

**उपादा**–(क्रि. वि.) उपादायचे संक्षिप्त रूप, सकारण.

**उपादान**–(नपु.) आसक्ती, ओढ, आकर्षण, इंधन, जळण, सरपण.

**उपादानक्खन्ध**–(पु.) आसक्तीचे रूप, वेदना इत्यादी स्कंध.

**उपादानक्खय**–(पु.) आसक्तीचा नाश, आसक्ती क्षय.

**उपादानिय**–(वि.) आसक्तीविषयी, आसक्तीसंबंधी.

**उपादाय**–(पू. क्रि.) कारण होऊन, कारणाने.

**उपादि**–(पु.) जीवनातील बाधा, चरित्र दूषित करणाऱ्या गोष्टी.

**उपादि-सेस**–(वि.) ज्यामध्ये रूप, वेदना, आदि स्कंधांचा अवशेष आहे.

**उपादिन्न**–(कृ.) गृहित, मान्य.

**उपादियति**–(क्रि.) ग्रहण करणे, स्वीकारणे, मान्य करणे.

**उपाधि**–(पु.) पद, स्थान, अधिकार, पदवी, उपाधी.

**उपान्तभू**–(स्त्री.) जवळची जागा, जवळची जमीन, स्थान.

**उपाय**–(पु.) साधन, उपाय.

**उपाय कुसल**–(वि.) साधनसपन्न, सुविधायुक्त, सुखसोयी.

**उपाय कोसल्ल**–(नपु.) उपाय कुशलता, उपायाची योग्य जुळणी.

**उपायन**–(नपु.) भेट, पुरस्कार, देणगी.

**उपायास**–(पु.) चिन्ता, काळजी, दुःख, पश्चाताप.

**उपारम्भ**–(पु.) धाक, भीति, दम, धाक, दपटशा.

**उपालि स्थविर**–(पु., विशे. ना.) भगवान बुद्धाच्या प्रमुख शिष्यापैकी एक अतिप्रसिद्ध महास्थविर, यांचा जन्म कपिलवस्तूच्या न्हावी कुटुंबात झाला होता. बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतरच्या पहिल्या धम्मपरिषदेत–संगीतीत– उपालीस्थविर हेच विनयाच्या विषयी प्रमाणभूत ज्ञाता मानले गेले होते.

**उपाविसि**–(क्रि.) स्थानापन्न होणे, आसनस्थ होणे, आसनारुढ होणे, ठिकाणावर बसणे, जवळ बसणे.

**उपासक**–(पु.) गृहस्थाश्रमी शिष्य, नागरिक शिष्य, उपासक.

**उपासकत्त**–(नपु.) उपासक भाव, उपासकत्व शिष्यत्व.

**उपासति**–(क्रि.) उपासना करणे, भक्ती करणे, सेवा करणे.

**उपासन**–(नपु.) सेवा, र, धनुर्विद्या.

**उपासिका**–(स्त्री.) स्त्रीधर्मानुयायी, गृहस्थाश्रमी शिष्या, उपासिका.

**उपासित**–(कृ.) पूजित, पुजलेला, सेवित, सेवा केलेला.

**उपासीन**–(कृ.) जवळ बसलेला.

**उपाहत**–(कृ.) मारलेला, आघात झालेला, धक्का-लागलेला.

**उपाहन**–(नपु.) जोडा, वहान, चप्पल, पादत्राण.

**उपेक्खक**–(वि.) उपेक्षा करणारा.
**उपेक्खति**–(क्रि.) उपेक्षा करणे.
**उपेक्खना**–(स्त्री.) उपेक्षा.
**उपेक्खा**–(स्त्री.) उपेक्षा भाव, मध्यस्थ भाव.
**उपेत**–(कृ.) जवळ गेलेला, मिळालेला.
**उपेति**–(क्रि.) जवळ जाणे, मिळणे, प्राप्त होणे.
**उपेत्वा**–(पू. क्रि.) जवळ जाऊन.
**उपोग्घात**–(पु.) उदाहरण, प्रस्तावना, प्रारंभ.
**उपोचित**–(कृ.) संग्रहित, साठा केलेला, सुखद, सुखकारक.
**उपोसथ**–(नपु.) हत्तींची विशिष्ठ जात, जातीवंत हत्ती.
**उपोसथ**–(पु.) महिन्यांतील दोन्ही अष्टमी (शुक्ल अष्टमी, कृष्ण अष्टमी) तसेच अमावस्या व पौर्णिमा हे चार उपोसथाचे दिवस, उपोसथ
**उपोसथ-कम्म**–(नपु.) उपोसथाचे क्रियात्मक रूप, उपोसथ कर्म.
**उपोसथागार**–(नपु.) उपोसथ भवन.
**उपोसथिक**–(वि.) उपोसथाच्या दिवशीच्या अष्टशील ग्रहण करणारा, अष्टशील पाळणारा, उपोसथ करणारा.
**उप्पक्क**–(वि.) सुजलेला, फुगलेला.
**उप्पच्चति**–(क्रि.) पिकणे, पक्व होणे, तयार होणे.
**उपज्जति**–(क्रि.) उत्पन्न होणे, उपजणे, जन्मणे.
**उप्पज्जमान**–(कृ.) उत्पन्न होणारा, जन्मणारा.
**उप्पज्जितब्ब**–(कृ.) उत्पन्न होण्यास योग्य.
**उप्पटिपाति**–(क्रि.) अनुक्रम, अनियम, क्रमभाव.
**उप्पटिपाटिया**–(वि.) क्रमाविरुद्ध.
**उप्पण्डना**–(स्त्री.) चेष्टा-मस्करी, फजिती.
**उप्पण्डुकजात**–(वि.) गोरा--मोरा, निस्तेज, लाजलेला.
**उप्पण्डेति**–(क्रि.) वेडावणे, वाकुल्या दाखविणे, चेष्टा-मस्करी करणे.
**उप्पतति**–(क्रि.) उडणे, वर जाणे, वर फेकणे, उडविणे.
**उप्पतन**–(नपु.) उड्डान.
**उप्पतमान**–(कृ.) उडत असलेला, उसळत असलेला.
**उप्पतित**–(कृ.) उडलेला, उसळलेला.
**उप्पतित्वा**–(पू. क्रि.) उडून, उसळून.
**उप्पत्ति**–(स्त्री.) उत्पत्ती.
**उप्पत्ति-भूमि**–(स्त्री.) जन्म-भूमी, मातृ-भूमी.
**उप्पथ**–(पु.) कुमार्ग, वाईट मार्ग.
**उप्पन्न**–(कृ.) उत्पन्न, निर्माण.
**उप्पब्बजति**–(क्रि.) भिक्खु संघातून परावृत्त होणे, परत गृहस्थाश्रमी होणे.
**उप्पब्बजित**–(कृ.) भिक्खु संघातून निघणारा, पुन्हा गृहस्थाश्रमी होणारा.
**उपब्बाजेति**–(क्रि.) भिक्खु संघातून काढून टाकणे. परत गृहस्थाश्रमी बनविणे.
**उप्पल**–(नपु.) कमल, पद्म.
**उप्पलवण्णा थेरी**–(स्त्री., विशे. ना.) भगवान बुद्धाच्या प्रमुख दोन भिक्खुणींपैकी एक, ती एका श्रीमंताची मुलगी होती तिची कांति उत्पलवर्णासारखी दिसत होती म्हणून तिला उत्पलवर्णा असे नाव पडले होते.
**उप्पालिनी**–(पु.) कमळानी भरलेला तलाव.
**उप्पाटन**–(नपु.) उपडणे, खोदणे.
**उप्पाटित**–(कृ.) उपडलेला, खणलेला, खोदून काढलेला.
**उप्पाटेति**–(क्रि.) उपडणे, खणणे, सोलणे.
**उप्पात**–(पु.) वर उडणे, उल्कापात, असाधारण घटना.
**उप्पाद**–(पु.) उत्पन्न झालेला, अस्तित्वात असलेला.
**उप्पादक**–(वि.) उत्पन्न करणारा, उत्पादक, निर्माता.
**उप्पादन**–(नपु.) उत्पत्ति, निर्मिती, उत्पादन.
**उप्पादेति**–(क्रि.) उत्पन्न करणे, निर्मिणे, बनविणे.
**उप्पादेतु**–(पु.) उत्पादक, निर्माता.
**उप्पादेतुं**–(नपुं.) उत्पन्न करण्याकरिता, निर्मितीसाठी. उत्पादनास्तव.
**उप्पीळन**–(नपु.) पीडा देणे, दमन करणे, त्रास देणे.
**उप्पीळित**–(कृ.) पीडित, त्रासित, त्रस्त.
**उप्पीळेति**–(क्रि.) पिडणे, त्रास देणे, दमन करणे, कष्टविणे, सतावणे.
**उप्पोठन**–(नपु.) मारणे, झाडणे, झोडपणे.
**उप्पोठेति**–(क्रि.) झोडपणे, मारणे.
**उप्लवन**–(नपु.) पोहणे, तरंगणे.
**उप्लवति**–(क्रि.) पोहणे, तरणे, तरंगणे.
**उप्लापेति**–(क्रि.) डुबकी मारणे, बुडून वर निघणे.
**उप्फालेति**–(क्रि.) फाडणे.
**उप्फासुलिक**–(वि.) फासळ्या निघालेला, कृश, रोडका.
**उब्बट्टन**–(नपु.) शरीरास चोळणे, मालिश करणे, उटणे (सुगंधी) लावणे.
**उब्बट्टित**–(कृ.) चोळलेला, मालिश केलेला, उटणे (सुगंधी) लावलेला.
**उब्बट्टेति**–(क्रि.) मालिश करणे, चोळणे, उटणे (सुगंधी) लावणे.
**उब्बत्तेति**–(क्रि.) उत्कर्ष होणे, सुधारणा होणे, वर येणे, वाढणे, फुलणे, सन्मार्ग सोडणे.

**उब्बन्धति**–(क्रि.) फासावर चढविणे, गळा घोटणे, शीर उतरणे, कंठस्नान घालणे, ठार मारणे.

**उब्बन्धन**–(नपु.) कंठस्थान, फासी, नरडीचा घोट.

**उब्बहति**–(क्रि.) ओढणे, घेऊन जाणे, उचलणे.

**उब्बहन**–(नपु.) ओढणे, घेणे, उचलणे.

**उब्बाळह**–(कृ.) कष्टलेला, हैराण झालेला, त्रासलेला.

**उब्बिग्ग**–(कृ.) उद्विग्न, वैतागलेला.

**उब्बिज्जति**–(क्रि.) त्रास देणे, उद्विग्न करणे, हैराण करणे, कष्टविणे.

**उब्बिज्जना**–(स्त्री.) उद्वेग, अशान्ती, वैताग.

**उब्बिलावितत्त**–(नपु.) अत्यानंद, आल्हाद.

**उब्बी**–(स्त्री.) भूमी, जमीन.

**उब्बेग**–(पु.) उद्वेग, उत्तेजना, प्रोत्साहन.

**उब्बेजेति**–(क्रि.) उद्वेग उत्पन्न करणे, भीती दाखविणे. भयभित करणे.

**उब्बेध**–(पु.) उंची.

**उब्भट्ठक**–(वि.) सरळ उभा असलेला.

**उब्भत**–(कृ.) परत घेतलेला, ओढून आणलेला.

**उब्भव**–(पु.) उद्भव, उत्पत्ती.

**उब्भार**–(पु.) हाकलून काढणे, पिटाळून लावणे.

**उब्भिज्ज**–(पू. क्रि.) बाहेर येऊन, अंकूर फुटून.

**उब्भिद**–(नपु.) खाण्याचे मीठ.

**उब्भिद**–(पु.) पाण्याचा प्रवाह, डोळ्याचा चष्मा.

**उब्भिद**–(वि.) अंकूर फुटलेला, कोंब आलेला.

**उब्भुजति**–(क्रि.) वर येणे, अंकूरणे.

**उभ, उभय**–(स. ना.) दोघे.

**उभतो**–(अ.) दोन्ही प्रकारे, दोन तऱ्हेने.

**उभतोभट्ठ जातक**–एका कोळ्याची (मच्छिमार) गोष्ट तो दोन्ही बाजूनी गेला–(१३९).

**उभयतोदिक**–(स्त्री.) दोन दिशा, दोन्ही बाजू, दोहोंकडे.

**उभो**–(स. ना.) दोन्ही, दोघे, दोन.

**उम्मग्ग**–(पु.) चोरवाट, गुहा, डोंगर पोकरून केलेला बोगदा, भुयार.

**उम्मज्जन**–(नपु.) आंघोळ, स्थान, शरीर धुणे.

**उम्मत्त**–(वि.) उन्मत्त, पागल, खुळा, वेडा.

**उम्मदन्ती जातक**–एका श्रीमंताच्या मुलीची कथा. ती मुलगी फार सुंदर होती. तिला पाहणारा अती मोहित होऊन उन्मत बनत असे–(५२७).

**उम्मा**–(स्त्री.) आळशीचे बीज, जवसाचे बीज.

**उम्माद**–(पु.) उन्माद, खुळेपणा, भ्रम.

**उम्मादवन्तु**–(पु.) खुळा, वेडा, भ्रमिष्ट.

**उम्मार**–(पु.) देवडी, दरवाजा, चौकट, दार.

**उम्मि**–(स्त्री.) उर्मी, लहर.

**उम्मिसति**–(क्रि.) डोळे उघडणे.

**उम्मिहति**–(क्रि.) लघवी करणे, लघुशंका करणे.

**उम्मीलन**–(नपु.) उम्मीलन, डोळे उघडणे, दृष्टांत, ज्ञात होणे.

**उम्मीलेति**–(क्रि.) उम्मीलन करणे, समजाविणे, ज्ञात करणे.

**उम्मुक**–(नपु.) दिवटी, मशाल, टेंभा.

**उम्मुक्क**–(कृ.) पडलेला.

**उम्मुख**–(वि.) आकाशाकडे तोंड केलेला.

**उम्मुज्जति**–(क्रि.) पाण्यातून बाहेर काढणे.

**उम्मुज्जन**–(नपु.) बाहेर काढणे.

**उम्मुज्ज–निम्मुज्ज**–(स्त्री.) बुडणे, वर येणे (तरणे), घमेंड करणे.

**उम्मुज्ज मान**–(कृ.) तरणारा.

**उम्मूल**–(वि.) उन्मूल, मुळासह.

**उम्मूलित**–(कृ.) मुळासह खोदलेला, समूळ उपडलेला.

**उम्मूलन**–(नपु.) मूळ खणणे.

**उम्मूलेति**–(क्रि.) मूळ उखडणे, मुळासह काढणे.

**उय्यान**–(नपु.) उद्यान, बाग, वाटिका, उपवन.

**उय्यान-कीळा**–(स्त्री.) उद्यान-क्रीडा, बागेतील खेळ.

**उय्यान-पाल**–(पु.) उद्यान-पाल, माळी.

**उय्यान-भूमि**–(स्त्री.) उद्यान-भूमी, बागेची जागा.

**उय्यानवन्त**–(वि.) अनेक बागांचा मालक.

**उय्याम**–(पु.) उद्यम, प्रयत्न, उद्योग.

**उय्युज्जति**–(क्रि.) कामास लागणे, कामास जुंपणे, प्रयत्न करणे, उद्योग करणे.

**उय्युज्जन**–(नपु.) उद्योग, काम, क्रियाशीलता.

**उय्युजन्त**–(कृ.) उद्योगरत, क्रियाशील, कामकरी.

**उय्युत्त**–(कृ.) उत्साही, उद्युक्त, कामास लागलेला.

**उय्योग**–(पु.) उद्योग, काम, धंदा.

**उय्योजन**–(नपु.) प्रेरणा.

**उय्योजित**–(कृ.) प्रेरित, पाठविलेला.

**उय्योजेति**–(क्रि.) प्रेरित करणे, पाठविणे.

**उय्योधिक**–(नपु.) लढाईची योजना, लुटु-पुटूची लढाई.

**उर**–(पु., नपु.) छाती, उर.

**उर-चक्क**–(नपु.) छातीवर ठेवलेले लोखंडी चाक.

**उर-च्छद**–(पु.) छातीची ढाल.

**उर-त्ताळि**–(क्रि. वि.) छाती बडवून घेणे.

**उरग**–(पु.) साप, सर्प, नाग.

**उरग जातक**–साप आणि गरुड यांचे सतत वैर असे. परंतु बोधिसत्त्वाने या दोन्ही वैऱ्यांची मैत्री घडवून त्यांचे वैर संपविल्याची कथा–(१५४).

**उरग जातक**–पुत्राच्या मृत्यूनंतर घरांतील (कुटुंबातील) कोणीही व्यक्ती रडली नाही. कारण मृत्यू हा अटळ आहे व दुःख करणे व्यर्थ आहे, ही भावना जाणली होती ही कथा–(३५४).

**उरण**–(पु.) मेंढा.

**उरणी**–(स्त्री.) मेंढी.

**उरब्भ**–(पु.) मेंढा.

**उरू**–(वि.) मोठा, लांब–रुंद, चौडा, प्रमुख.

**उरुवेल कप्प**–(नपु., विशे. ना.) मल्लाच्या गणराज्या-राज्यांतील एक मल्लनगर.

**उरुवेला**–(स्त्री., विशे. ना.) बुद्धगयेच्या परिसरातील बोधिवृक्षाजवळचे नैरंजना नदीकिनाऱ्यावरील एक ठिकाण.

**उलूक**–(पु.) घुबड.

**उलूक-जातक**–पक्षी सभेत पक्षांनी घुबडाला आपला राजा निवडण्याचा एक ठराव संमत (मंजूर) केल्याची कथा–(२७०).

**उल्लंघन**–(नपु.) सीमोल्लंघन, हद्द ओलांडणे, हद्दपार जाणे.

**उल्लंघेति**–(क्रि.) सीमा ओलांडून जाणे, उल्लंघन करणे, उल्लंघन.

**उल्लपति**–(क्रि.) आत्म प्रशंसा करणे, स्वतःची स्वतः स्तुती करणे.

**उल्लपना**–(स्त्री.) आत्मस्तुती, आत्मप्रशंसा.

**उल्लिखति**–(क्रि.) वेगळे करणे, विभक्त करणे, मध्ये रेघ ओढणे.

**उल्लिखन**–(नपु.) वेगळे केले, मध्ये रेघ ओढली.

**उल्लित्त**–(कृ.) लिंपलेले, उपलिप्त.

**उल्लुम्पति**–(क्रि.) मदत करणे, सहाय्य करणे. वर काढणे.

**उल्लुम्पन**–(नपु.) संरक्षण, वर घेणे, सहाय्य, मदत.

**उल्लोकक**–(वि.) द्रष्टा, ज्ञाता, सर्वज्ञ, ज्ञानी.

**उल्लोकन**–(नपु.) दृष्टि, खिडकी, गवाक्ष, झरोका.

**उल्लोकेति**–(क्रि.) पाहणे, निरीक्षण करणे, अवलोकन करणे.

**उल्लोच**–(पु., नपु.) चांदवा, वित्तान, मांडव, छत.

**उल्लोल**–(पु.) चाल, मोठी लाट, लहर.

**उल्लोलेति**–(क्रि.) हालचाल निर्माण करणे, क्रांति घडविणे, बदल करणे.

**उसभ**–(पु.) वृषभ, बैल, श्रेष्ठ पुरुष.

**उसभ**–(पु.) अंतर मोजण्याचे माप (प्रमाण).

**उसभंग**–(पु.) वृषभाचे अंग.

**उसीर**–(नपु.) खस, लोहाळा, सुगंधी गवत.

**उसु**–(पु., स्त्री.) तीर, बाण, शर.

**उसुकार**–(पु.) बाण तयार करणारा, लोहार.

**उसु वड्ढकी**–(पु.) बाण तयार करणारा, लोहार.

**उसूयक**–(पु., वि.) ईर्षाळू, ईर्षा करणारा.

**उसूयति**–(क्रि.) ईर्षा करणे, स्पर्धा करणे.

**उसूया**–(स्त्री.) ईर्षा, असूया.

**उसूयोपगम**–(पु.) ईर्षेचा उगम, ईर्षा उत्पन्न होणे.

**उस्मा**–(स्त्री.) उष्णता, उन्हाळा, उष्मा.

**उस्सङ्की**–(वि.) साशंक, शंकेखोर, भयभित.

**उस्सद, उस्सन्न**–(वि.) विपुल, भरपूर, जास्त, मुबलक.

**उस्सन्नता**–(स्त्री.) विपुलता, सुकाळ.

**उस्सव**–(पु.) उत्सव, यात्रा.

**उस्सहति**–(क्रि.) प्रयत्न करणे, उत्साहित होणे.

**उस्सहन**–(नपु.) प्रयत्न, प्रयास, उद्योग.

**उस्सापन**–(नपु.) उठविणे, उभारणे.

**उस्सापित**–(कृ.) उठविलेला, उभारलेला.

**उस्सापेति**–(क्रि.) उठविणे, उंच करणे, उभारणे.

**उस्सारणा**–(स्त्री.) गर्दी, जमाव, घोळका.

**उस्सारित**–(कृ.) बाजूस सारला, सरकविला.

**उस्सारेति**–(क्रि.) बाजूस सारणे, ढकलणे, सरकविणे.

**उस्साव**–(पु.) दंव, ओस.

**उस्सावबिन्दु**–(नपु.) दंवाचा थेंब.

**उस्साह**–(पु.) उत्साह, आनंद, उल्हास.

**उस्साहेति**–(क्रि.) उत्साहित करणे, उल्हासित करणे.

**उस्सिञ्चन**–(क्रि.) पाणी वर काढणे, सिंचन करणे, भिजविणे, शेतीस पाणी देणे.

**उस्सिञ्चन**(नपु.) जलसिंचन, पाणी वर काढणे.

**उस्सित**–(कृ.) वर काढले, उंचावले, उंच केले.

**उस्सीसक**–(नपु.) उशी, डोके टेकण्याची जागा.

**उस्सुक**–(वि.) उत्सुक, उत्साही, क्रियाशिल.

**उस्सुक्क**–(नपु.) औत्सुक, उत्सुकता, क्रियाशीलता, कार्यतत्परता.

**उस्सुक्कति**–(क्रि.) प्रयत्न करणे, कार्यरत असणे.

**उस्सुक्कापेति**–(क्रि.) प्रेरित करणे, प्रोत्साहन देणे, उत्तेजन देणे, उत्साहित करणे.

**उस्सुस्सति**–(क्रि.) सुकणे, वाळणे.

**उस्सूर**–(वि.) सूर्योदयानंतरचा.

**उस्सूर-सेय्या**–(स्त्री.) सूर्योदयानंतरही झोपून रहाणे.

**उस्सोळ्ही**–(स्त्री.) उत्साह, उमंग.

**उळार**–(वि.) उदार, विशाल, श्रेष्ठ, प्रमुख.

**उळारत्त**–(नपु.) औदार्य, उदारता, विशालता, श्रेष्ठत्व. प्रमुखत्त्व.

**उळु**–(पु.) तारा, नक्षत्र.

**उळु-राज**–(पु.) चंद्र, शशी, चांदोबा.

**उळुङ्क**–(पु.) मोठा चमचा, डाव पळी.

**उळुम्प**–(पु.) पडाव, लहान नाव.

**उळूक**–(पु.) घुबड, दिवाभीत.

**उल्लूक-पक्खिक**–(नपु.) घुबडाच्या पंखापासून तयार केलेली टोपी.

## ऊ

**ऊ**–नागरी लिपीतील सहावा स्वर दीर्घ ऊ, दुसरा ऊकार.

**ऊका**–(स्त्री) ऊं, ऊवा.

**ऊन**–(वि.) कमतरता, कमी, न्यून, उणीव.

**ऊनत्त**–(नपु.) कमी, न्यून.

**ऊनता**–(स्त्री.) न्यूनता, कमीपणा, उणीव.

**ऊमि, ऊम्मी**–(स्त्री.) लहर, लाट, उर्मी, उसाळा.

**ऊरट्ठि**–(नपु.) जांघेचे हाड.

**ऊरू**–(नपु.) जांघ.

**ऊरू-पब्ब**–(नपु.) जांघेचे सांधा, उखळी सांधा.

**ऊस**–(पु.) खारी माती.

**ऊसवन्तु**–(पु.) खारी मातीवाला, खारवाला.

**ऊसा**–(नपु.) खारा पदार्थ, खारट.

**ऊसर**–(वि.) क्षारयुक्त, खारट.

**ऊसर**–(वि., नपु.) नापीक जमीन.

**ऊहच्च**–(कृ.) ओढला, हटविला, बाजूस सारला.

**ऊहबति**–(क्रि.) स्वच्छ करणे, साफ करणे, मळ घालविणे, धुणे.

**ऊहन**–(नपु.) विचार, मत, संग्रह.

**ऊहनति**–(क्रि.) ओढून काढणे, बाजूस सारणे, हटविणे.

**ऊहसति**–(क्रि.) हसणे.

**ऊहा**–(स्त्री.) चिंतन, मनन.

## ए

**ए**–नागरी लिपीतील सातवा स्वर, एक मात्रा–"े"

**एक**–(वि.) संख्यावाचक शब्द, एकवचन (संख्या) मात्र कित्येक वेळा बहुवचनात (अनेकवचनात) एक या शब्दाचा अर्थ कांही (अनेक) असा होतो. उदा.–दहा एक पक्षी असावेत!

**एक-चर**–(वि.) एकटा चाललेला.

**एक-चारी**–(वि.) एकटा राहणारा.

**एक-देश**–(पु.) एक विभाग, एक हिस्सा.

**एक-पट्ट**–(वि.) एकेरी कापड, कापडाची एकेरी पट्टी.

**एक-भत्तिक**–(वि.) दिवसात फक्त एकवेळ भोजन करणारा.

**एकक**–(वि.) एकटा.

**एककूटयुत्त**–(पु.) एक मजली घर, बैठी इमारत.

**एकक्खर कोस**–(पु.) एकाक्षरी कोश. सोळाव्या शतकात सद्धम्मकित्ती (सद्धर्म कीर्ती) नावाच्या भिक्खुने संपादित केलेली "पालि शब्द सूचि" पालि-शब्द संग्रह.

**एकक्खी**–(वि.) एकाक्ष, एका डोळयाचा.

**एकग्ग**–(वि.) एकाग्र.

**एकग्गता**–(स्त्री.) एकाग्रता.

**एकच्च, एकच्चिय**–(वि.) एकत्र, काही, समुदायाने.

**एकज्झं**–(क्रि. वि.) एकाच ठिकाणी, एकेजागी.

**एकतो**–(अ.) एक बाजू, एक दिशा, एक कड.

**एकत्त**–(नपु.) एकता, ऐक्य, (२) एकटेपणा, (३) अनुकूलता.

**एकदा**–(क्रि. वि.) एक वेळ, एकदा.

**एकत्त**–(वि.) निश्चयाने, पूर्ण खात्रीने, एकतर्फी, एका बाजूने.

**एकन्त लोमी**–(पु.) दशा (केस) असलेले घोंगडे, दशा असलेली कांबळी.

**एकन्तरिक**–(वि.) एक आड एक, एक सोडून एक.

**एकपटलिक**–(वि.) एकेरी कापड, कापडाची पट्टी.

**एकपण्ण जातक**–बोधिसत्त्वाने एका राजकुमारास लिंबाची पाने खावयास सांगून त्याचे आचरण सुधारण्याचे शिक्षण दिल्याची कथा–(१४९).

**एकपद जातक**–बोधिसत्त्वाने केवळ एकच शब्द सांगून आपल्या पुत्रास उपदेश दिला. तो शब्द म्हणजे "दक्खेय्य" अर्थात "दक्षता"! सदैव दक्ष राहणे–(२३८).

**एकपदिक-मग्ग**–(पु.) पाऊल वाट.

**एक मन्तं**–(क्रि. वि.) एक बाजू, एक दिशा, एकीकडे.

**एकमेक, एकेक**–(वि.) एक-एक, एका मागून एक.

**एक राज जातक**–मंत्र्याने राजाच्या गृहात दुर्वतन केल्यामुळे, राजाने मंत्र्यास हद्दपार केलेली कथा–(३३०). (पहा–सेय्यसं जातक).

**एकरूप**–(वि.) समाविष्ट, अभिभक्त, अपरिवर्तनशील, वेगळे नसलेले.

**एकविध**–(वि.) एकाच प्रकारचा, समान, सारखा.

**एकसो**–(क्रि. वि.) एकानंतर एक, एकानंतर दुसरा.
**एकंस**–(वि.) निश्चितपणे, खात्रीने, आत्मविश्वासाने.
**एकंसिक**–(वि.) एका खांद्यावरून, एका खांद्याशी संबंधित.
**एकाकी**–(त्रि.) एकटा, एकटी, एकटे, एकाकी.
**एकाकिनी**–(स्त्री.) एकटी.
**एकागारिक**–(पु.) चोर, डाकू.
**एकादस**–(सं. वि.) अकरा. (दहा + एक)
**एकायन**–(पु.) एकच मार्ग, एकच रस्ता, एकच वाट, एकच उपाय.
**एकासनिक**–(वि.) दिवसा एकच वेळ जेवणारा.
**एकाह**–(नपु.) एक दिवस.
**एकाहिक**–(वि.) एक दिवस राहणारा.
**एकिका**–(स्त्री.) एकटी स्त्री.
**एकीभाव**–(पु.) एकता, ऐक्य, एकान्त.
**एकीभूत**–(वि.) एकत्रित, संबंधित.
**एकून**–(वि.) एकडणे, एक कमी.
**एकून चत्तालीसति**–(स्त्री., संख्या वि.) एकोण चाळीस.
**एकून तिसति**–(स्त्री., सं. वि.) एकोण तीस.
**एकून पञ्ञास**–(स्त्री., सं. वि.) एकोण पन्नास.
**एकूनवीसति**–(स्त्री., सं. वि.) एकोणवीस.
**एकून सठ्ठी**–(स्त्री., सं. वि.) एकोण साठ.
**एकून सत्तति**–(स्त्री., सं. वि.) एकोण सत्तर.
**एकूननवुत्ति**–(स्त्री., सं. वि.) एकोण ऐंशी.
**एकून सत**–(नपु.) नव्याण्णव.
**एकूनासीति**–(स्त्री.) एकोण नव्वद.
**एकोदिभाव**–(पु.) एकाग्रता.
**एजा**–(स्त्री.) तृष्णा, वासना.
**एजा**–(स्त्री.) चालणे, हालणे, डोलणे.
**एट्ठि**–(स्त्री.) शोध, इच्छा, आवड.
**एण**–(पु.) विशिष्ठ प्रकारचा काळवीट, हरीण.
**एणिमिग्ग**–(पु.) काळवीट, हरीण.
**एणेय्य**–(पु.) हरीण.
**एणेय्यक**–(नपु.) श्रमदान, सामुदायिक काम.
**एत**–(स. ना.) हा, तो.
**एत**–(पु., सर्व.) असा, ऐसा.
**एत**–(स्त्री., सर्व.) अशी, ऐसी.
**एतरहि**–(क्रि. वि.) आता.
**एता दिस**–(वि.) असा, या प्रकारचा, असला.
**एति**–(क्रि.) येत आहे, येणे.
**एतिहा**–(स्त्री.) इति–वृत्त, समाप्त, शेवट.
**एतिह्य**–(नपु.) दंतकथा, परंपरागत वृत्तान्त.
**एत्तक**–(वि.) इतका.
**एत्तावता**–(क्रि. वि.) इथेपर्यंत, इतका लांब, एवढा, एवढी एवढे.
**एत्तो**–(अ.) येथे, येथून.
**एत्थ**–(क्रि. वि.) येथेच.
**एदिस**–(वि.) असला.
**एदिसक**–(वि.) या प्रकारचा.
**एध**–(पु.) इंधन, सरपण, जळण.
**एधति**–(क्रि.) प्राप्त करणे, मिळविणे, सफल होणे.
**एन**–(स. ना.) एत या सर्वनामाचे रुप. हा, तो.
**एरक**–(नपु.) गवत.
**एरक दुस्स**–(नपु.) चटई., गवत काडयांचे अंथरूण.
**एरण्ड**–(पु.) एरंड.
**एरावण**–(पु.) ऐरावत, इंद्राचा हत्ती.
**एरावत**–(पु.) नारंगी, संत्री.
**एरित**–(कृ.) कंपित, कंपपावत, थरथरत, शहारणे.
**एरेति**–(क्रि.) हालणे, कंप पावणे, थरथरणे.
**एला**–(स्त्री.) थुंकी.
**एव**–(अ.) ही सुद्धा.
**एवरूप**–(वि.) असे, या प्रकारे.
**एवं**–(क्रि. वि.) या प्रकाराने, अशा प्रकारे.
**एवं**–(अ.) हां, होय.
**एवंम्पि**–(अ.) याही प्रकारे, याही पद्धतीने.
**एवमेव**–(अ.) या प्रकारे, अशा प्रकारे.
**एवंविध**–(वि.) या प्रकारे.
**एसति**–(क्रि.) शोधणे, हुडकणे, तपासून पाहणे.
**एसना**–(स्त्री.) शोध, संशोधन, तपास.
**एसन्त, एसमान**–(कृ.) शोधित असता.
**एसिक-त्थम्भ**–(पु.) वेशीसमोरील खांब, नगरद्वारापुढील खांब.
**एसित**–(कृ.) शोधला गेला, हुडकला.
**एसितब्ब**–(कृ.) शोधणे योग्य.
**एसी**–(पु.) संशोधक, शोधणारा, शोध लावणारा.
**एसिनी**–(स्त्री.) संशोधिका.
**एहलोकिक**–(वि.)इह लोकासंबंधी, या(मृत्यु)लोकाविषयी.
**एहिपस्सिक**–(वि.) या आणि परीक्षा करून पहा, असे सांगणारा धम्म, सर्वांना खुला.
**एहि-भिक्खु**–(क्रि. वि.) प्राचीन काळी भिक्खु दीक्षा देते-वेळी संबोधण्याची पद्धती "भिक्खु या"

**एळक**–(पु.) मेंढी, एळका.
**एळगल**–(वि.) लाळ गळणारा, अजागळ.
**एल्मूग**–(पु.) बहिरा, किवंडा, मुका, मुक-बधीर.
**एळा**–(स्त्री.) थुंकी.
**एळालुक**–(नपु.) वाळूक, दोडका, काकडी.

## ऐ

**ऐ**–नागरी लिपीतील आठवा स्वर, ऐ–दोन मात्रा "ै"

## ओ

**ओ**–नागरी लिपीतील नववा स्वर, ओ, एक काना एक मात्रा–ो, पालि वर्णमालेतही "ओ" हा एक स्वर मानला आहे. कांही व्याकरण कर्त्यांच्या मते पालि वर्णमालेत आठ स्वर आहेत. तर काहींच्या मते दहा स्वर आहेत. आठ स्वर मानणारे "ए" आणि "ओ" यांचे अनुक्रमे "ऐ" आणि "औ" अशी ऱ्हस्व आणि दीर्घ रूपे मानत नाहींत. तर दहा स्वर मानणारे व्याकरणकर्ते "ए" आणि "ओ" यांची ऱ्हस्व आणि दीर्घ अशी अनुक्रमे "ऐ" आणि "औ" दोन दोन रूपे मानतात. संयुक्त वर्णापूर्वी ती रूपे वापरत असल्यामुळे "ए" आणि "औ" हे ऱ्हस्व स्वर समजतात.
**ओक**–(नपु.) (१) जल, पाणी, (२) निवास स्थान, राहण्याची जागा, घर, गृह.
**ओकड्ढति**–(क्रि.) ओढून आणणे, हटविणे, बाजूस सारणे.
**ओकन्तति**–(क्रि.) कापणे.
**ओकप्पति**–(क्रि.) व्यवस्था करणे, नियोजन करणे, तयारी करणे, खात्री करणे, विश्वास ठेवणे.
**ओकप्पना**–(स्त्री.) विश्वास, खात्री.
**ओकप्पनिय**–(वि.) विश्वसनीय, खात्रीशीर, खात्रीलायक.
**ओकप्पेति**–(क्रि.) विश्वास करणे, विश्वास ठेवणे.
**ओकम्पेति**–(क्रि.) हालविणे, कंपायमान करणे.
**ओकार**–(पु.) कमीपणा, उणीव, विकृती.
**ओकास**–(पु.) स्थान, ठिकाण, जागा, स्थळ.
**ओकास**–(पु.) अवसर, संधी, अनुज्ञा, परवानगी, संमती.
**ओकास कम्म**–(नपु.) अनुज्ञा, परवानगी.
**ओकिण्ण**–(कृ.) विसकटलेला, पसरलेला, अस्ताव्यस्त फेकलेला, झाकलेला.
**ओकिरण**–(नपु.) विसकटणे., फेकणे.
**ओकिरति**–(क्रि.) विसकटणे, पसरविणे.

**ओक्कन्त**–(कृ.) आगत, आलेला, घडलेला.
**ओक्कन्ति**–(स्त्री.) प्रकट, प्रविष्ट. दाखल, हजर, घटित.
**ओक्कन्तिक**–(वि.) घडणारा.
**ओक्कमति**–(क्रि.) प्रवेश करणे, येणे.
**ओक्कमन**–(नपु.) प्रवेश, आगमन.
**ओक्कमन्त**–(कृ.) प्रवेशणारा, येणारा, येत असलेला.
**ओक्कम्म**–(पू. क्रि.) बाजूस होऊन, हटून, सरकून.
**ओक्काक**–(पु.) शाक्य आणि कोलिय या दोन घराण्यांचा पूर्वज, ओक्काक नरेश.
**ओक्खित्त**–(कृ.) खाली पाडलेला.
**ओक्खित्त चक्खु**–(वि.) खाली पाहणारा, खाली नजर असलेला.
**ओक्खिपति**–(क्रि.) फेकणे, खाली पाडणे, सांडणे.
**ओगच्छति**–(क्रि.) खाली जाणे, अधोगती होणे, अस्त पावणे, मागे हटणे.
**ओगण**–(वि.) वाळीत टाकलेला, ग्रामण्य केलेला, गणातून काढलेला, एकटा.
**ओगध**–(वि.) संमिलित, मिसळलेला, बुडलेला.
**ओगय्ह**–(पू. क्रि.) मिळाल्यानंतर, बुडल्यानंतर.
**ओगाह**–(पु.) बुडणे.
**ओगाहन**–(नपु.) बुडी.
**ओगाहति**–(क्रि.) बुडी मारणे, बुडणे.
**ओगाहमान**–(कृ.) बुडताना.
**ओगिलति**–(क्रि.) गिळणे.
**ओगुण्ठित**–(कृ.) बुरखा घेतलेला, झाकलेला.
**ओगुम्फेति**–(क्रि.) माळ ओवणे, हार बनविणे.
**ओग्गत**–(कृ.) अवगत, येणे, अस्त पावणे, संपणे.
**ओघ**–(पु.) पूर, मोठा प्रवाह, ओघ.
**ओघतिण्ण**–(वि.) पूरापासून सुरक्षित.
**ओघनिय**–(वि.) पुरात सापडणारा.
**ओचरक**–(वि., पु.) हेर, गुप्तचर.
**ओचिण्ण**–(कृ.) संगृहीत, साठचात.
**ओचिनन**–(नपु.) संग्रह, एकत्र, जमा साठा.
**ओचिनन्त**–(कृ.) संग्राहित करता, एकत्र करता, जमविता.
**ओचिनाति**–(क्रि.) संग्रह करणे, जमविणे, साठविणे, जमा करणे, गोळा करणे.
**ओछिन्दति**–(क्रि.) कापणे.
**ओज**–(पु.) शारिरीक शक्ती, उत्साह.
**ओजवन्त**–(वि.) शक्तीवर्धक.
**ओजवन्तता**–(स्त्री.) शक्तिवर्धक भाव.

**ओजहाति**–(क्रि.) सोडणे, त्यागणे, टाकणे.
**ओजा**–(स्त्री.) शरीराचा आधार, शक्ती.
**ओजिनाति**–(क्रि.) जिंकणे, हरविणे, विजय मिळविणे, पराजित करणे.
**ओट्ठ**–(पु.) ऊंट (प्राणी).
**ओट्ठ**–(पु.) ओठ.
**ओट्ठुभति**–(क्रि.) थुंकणे.
**ओड्डित**–(कृ.) जाळे फेकणे.
**ओड्डेति**–(क्रि.) जाळे टाकणे.
**ओणमति**–(क्रि.) झुकणे, वाकणे, नम्र होणे.
**ओण्मन**–(नपु.) झुकाव.
**ओणमित**–(कृ.) वाकलेला, झुकलेला.
**ओतरण**–(नपु.) उतार, खाली.
**ओतरति**–(क्रि.) उतरणे, खाली येणे.
**ओतरन्त**–(कृ.) खाली येत असता, उतरताना.
**ओतापेति**–(क्रि.) उन्हात तापणे.
**ओतार**–(पु.) उतार, पोहोंच, अवसर, संधी, वेळ, दोष.
**ओतार गवेसी**–(वि.) संधी शोधणारा, प्रतिक्षा करणारा.
**ओतारण**–(नपु.) उतार.
**ओतारेति**–(क्रि.) उतरणे, खाली येणे.
**ओतिण्ण**–(कृ.) अवतरित, येत असता, उतरत असता.
**ओत्तप्प**–(नपु.) पाप-भिरुता.
**ओत्तप्पति**–(क्रि.) पाप करताना भिणे.
**ओत्तप्पी**–(वि.) पाप-भीरू.
**ओत्थट**–(कृ.) पसरलेला, खाली गेलेला.
**ओत्थरक**–(नपु.) वस्त्रगाळ, कापडातून चाळणे.
**ओत्थरति**–(क्रि.) पसरणे, खाली जाणे, गाळणे, चाळणे.
**ओदकन्तिक; ओद्रकन्तिक**–(नपु.) पाण्याजवळचे ठिकाण, पाण्याजवळील जागा, पाणस्थळ.
**ओदकन्तिक; ओद्रकन्तिक**–(वि.) पाण्यात अंत झालेला, पाण्यात मेलेला, जलसमाधी घेतलेला.
**ओदग्य**–(नपु.) उग्र, रागीट, क्रूर, तेजस्वी भाव.
**ओदन**–(नपु., पु.) शिजवलेले तांदूळ, भात.
**ओदन संभव**–(पु., नपु.) पाठलाग.
**ओदनिक**–(पु.) स्वयंपाकी, आचारी, जेवण तयार करणारा.
**ओदनिय**–(वि.) जेवणाविषयी.
**ओदरिक**–(वि.) खादाड, पेटू, केवळ पोट भरण्याकरिता जगणारा.
**ओदहति**–(क्रि.) ठेवणे, लक्ष देणे.
**ओदहन**–(नपु.) खाली, लक्षपूर्वक, ध्यानावस्थित.
**ओदात**–(वि.) शुभ्र, स्वच्छ, सफेद, पांढरा.
**ओदात कसिण**–(नपु.) पांढऱ्या रंगाचे चित्त (मन) एकाग्र करण्याचे साधन, शुभ्र वस्तु, निर्मळ वस्तु.
**ओदात-वसन**–(वि.) श्वेत वस्त्रधारी, श्वेतांबरी, शुभ्र वस्त्र परिधान केलेला, श्वेतांबर.
**ओदिस्स**–(क्रि. वि.) उद्देशाने, हेतूने.
**ओदिस्सक**–(वि.) विशेष रुपाने, विशिष्ट हेतूने, काही उद्देश्याने.
**ओदुम्बर**–(वि.) औदुंबर वृक्ष, उंबराचे झाड, उंबर.
**ओधि**–(पु.) अवधी, सीमा, वेळ, संधि, मर्यादा, हद्द, शिव.
**ओधिसो**–(क्रि. वि.) सीमित, मर्यादित, प्रमाणात, मापात.
**ओधुनाति**–(क्रि.) पिंजणे.
**ओनद्ध**–(कृ.) बांधलेला, झाकलेला, गुंडाळलेला, लपेटलेला, आच्छादित.
**ओनन्धति**–(क्रि.) बांधणे, झाकणे, गुंडाळणे, आच्छादणे, लपेटणे.
**ओनमक**–(वि.) वाकलेला, झुकलेला, नम्र.
**ओनमति**–(क्रि.) झुकणे, वाकणे.
**ओनमन**–(नपु.) वाकडा, अधोमुख.
**ओनय्हति**–(क्रि.) झाकणे, बांधून टाकणे.
**ओनहन**–(नपु.) झाकण.
**ओनीत**–(कृ.) घेऊन गेला, घालविला.
**ओनेति**–(क्रि.) हटविणे, सारणे, बाजूस करणे, घेऊन जाणे.
**ओनोजन**–(नपु.) वटवडा, भेट, बक्षीस, उपहार.
**ओनोजेति**–(क्रि.) वाटणे, भेट देणे.
**ओनोजित**–(कृ.) वाटलेले, दिलेले.
**ओपक्कमिक**–(वि.) उपद्रव, त्रास, कष्ट.
**ओपक्खी**–(वि.) ज्यावर कापले आहे.
**ओपतति**–(क्रि.) पडणे, उडून जाणे.
**ओपतित**–(कृ.) पडलेला.
**ओपत्त**–(वि.) निष्पर्ण, पाने गळालेला, पतझड.
**ओपधिक**–(वि.) पुनर्जन्मासंबंधी.
**ओपनियक**–(वि.) जवळ नेणारा, जवळ घेऊन जाणारा
**ओपपातिक**–(वि.) नैसर्गिक, सहज उत्पन्न, आपोआप निर्माण.
**ओपम्म**–(नपु.) उपमा, तुलना, बरोबरी.
**ओपरज्ज**–(नपु.) उपराजन, निर्मिती, बनावट, मिळकत.
**ओपवय्ह**–(वि.) चढण्यायोग्य.
**ओपसमिक**–(वि.) शांति-कारक, शीतल, थंड, शांती देणारा.

**ओपात**–(पु.) खड्डा.
**ओपात**–(पु.) पतन.
**ओपातेति**–(क्रि.) पडणे, खाली जाणे, पतन होणे.
**ओपान**–(नपु.) विहीर, आड.
**ओपारम्भ**–(वि.) सहाय्यक, मदतनीस, साथी, जोडीदार.
**ओपायिक**–(वि.) योग्य, लायक.
**ओपिलापित**–(कृ.) तरला गेला, पोहोचला गेला.
**ओपिलापेति**–(क्रि.) तरणे, तरंगणे, पोहणे.
**ओपुणाती**–(क्रि.) साफ करणे, स्वच्छ करणे, धुणे.
**ओपुप्फ**–(नपु.) कळी, कलिका.
**ओबन्धति**–(क्रि.) बांधणे, जखडणे.
**ओभग्ग**–(कृ.) भग्न, तुटलेला, फुटलेला, तुटका, फुटका.
**ओभञ्जति**–(क्रि.) तोडणे, फोडणे, भंगविणे.
**ओभत**–(कृ.) घेऊन गेला.
**ओभरति**–(क्रि.) घेऊन जाणे.
**ओभास**–(पु.) प्रकाश, आभा, तेज.
**ओभासति**–(क्रि.) चमकणे, प्रकाशणे, सतेज होणे.
**ओभासित**–(कृ.) प्रकाशित.
**ओभासेन्त**–(कृ.) चमकत, प्रकाशित, सतेज होत.
**ओभोग**–(पु.) वाकणे, गुंडाळणे, (वस्त्राची) घडी घालणे.
**ओम, ओमक**–(वि.) हलक्या प्रतीचा, कमी प्रतीचा.
**ओमट्ठ**–(कृ.) वापरलेला, मळविलेला, दूषित.
**ओमद्दति**–(क्रि.) मळणे, चोळणे, दाबणे.
**ओमसति**–(क्रि.) शिवणे, स्पर्श करणे, हात लावणे.
**ओमसना**–(स्त्री.) स्पर्श.
**ओमसवाद**–(पु.) अपमान, निंदा, टीका.
**ओमान**–(नपु.) अवमान, अपमान, दूषण.
**ओमिस्सक**–(वि.) मिश्रण, मिसळलेला, भेसळ.
**ओमुक्क**–(वि.) फेकलेला, टाकलेला, त्यागलेला, सोडलेला.
**ओमुञ्चति**–(क्रि.) वस्त्र फेडणे, सोडून टाकणे.
**ओमुत्त**–(कृ.) मुक्त, स्वतंत्र.
**ओमुत्तेति**–(क्रि.) लघवी करणे, लघुशंका करणे, मुतणे.
**ओयाचति**–(क्रि.) शाप देणे, वाईट इच्छिणे.
**ओर**–(नपु.) अलिकडचा तट, जवळचा किनारा.
**ओर**–(वि.) कमी प्रतीचा, कमी योग्यतेचा, सामान्य.
**ओर-पार**–(नपु.) इह-पर लोक.
**ओर-मत्तक**–(वि.) तुच्छ, हलका, कमी प्रतीचा.
**ओरब्भिक**–(पु.) बकऱ्यांचा व्यापारी, खाटीक, कसाई.
**ओरमति**–(क्रि.) इथेच थांबणे.
**ओरमापेति**–(क्रि.) (दुसऱ्यास) थांबविणे.
**ओरम्भागिय**–(वि.) इहलोकांविषयी, इहलोकांसंबंधी.
**ओरस**–(वि.) स्वतःचा पुत्र, औरस संतान.
**ओरिम**–(वि.) या बाजूचा, या पक्षाचा, या कडेचा.
**ओरिम-तीर**–(नपु.) समोरचा काठ, जवळचा किनारा-तट.
**ओरुद्ध**–(कृ.) अवरुद्ध, अडथळा आणलेला.
**ओरुन्धति**–(क्रि.) प्राप्त करणे, मिळविणे.
**ओरूळ्ह**–(कृ.) उतरलेला, खाली आलेला, उतरला.
**ओरोध**–(पु.) रतिगृह, विलासगृह, शयनगृह, बाधा.
**ओरोपन**–(नपु.) उतरविणे, हटविणे.
**ओरोपेति**–(क्रि.) उतरणे, हटविणे.
**ओरोहण**–(नपु.) उतरणे, खाली येणे.
**ओरोहति**–(क्रि.) खाली उतरणे.
**ओलग्गेति**–(क्रि.) थांबविणे.
**ओलंघना**–(स्त्री.) खाली वाकलेला, ओणवा.
**ओलंघेति**–(क्रि.) खाली उडी मारणे.
**ओलम्बति**–(क्रि.) खाली अडविणे.
**ओलम्बन**–(नपु.) अडकविणे, लोंबकाळणे.
**ओलिखति**–(क्रि.) रेघ ओढणे, खरडणे, घासणे.
**ओलिगल्ल**–(पु.) ओहोळ, पाट, नाला, नाव उभे राहण्याचे ठिकाण.
**ओलीन**–(कृ.) प्रमादी, सैल, निर्बंध वर्तन.
**ओलीयति**–(क्रि.) प्रमाद करणे, स्वैराचार करणे, दुर्वर्तन करणे, वाईट वागणे.
**ओलीयना**–(स्त्री.) आळस.
**ओलीयमान**–(कृ.) मागे पडला.
**ओलुग्ग**–(कृ.) फुटला, छिन्न-विछिन्न झाला.
**ओलुज्जति**–(क्रि.) छिन्न-भिन्न होणे, तुकडे होणे.
**ओलुम्पेति**–(क्रि.) साल काढणे, ढलपी पाडणे, तुकडा काढणे, धरणे, वेचणे, खाणे.
**ओलोकन**–(नपु.) अवलोकन, पाहणे.
**ओलोकनक**–(नपु.) खिडकी, झरोका, गवाक्ष.
**ओलोकेति**–(क्रि.) पाहणे, बघणे, प्रेक्षिणे, अवलोकन करणे.
**ओळारिक**–(वि.) स्थूल, वातूळ.
**ओवज्जमान**–(कृ.) अनुशासित, निर्देशित, दाखविल्याप्रमाणे, नियमानुसार, कायद्याप्रमाणे.
**ओवट्टिक**–(स्त्री.) कमरबन्द, कमरपट्टी.
**ओवदति**–(क्रि.) उपदेशिणे, सांगणे, ऐकविणे.
**ओवदन**–(नपु.) उपदेश, ज्ञान, शिक्षण.
**ओवदितब्ब**–(कृ.) उपदेशायोग्य, सांगण्यासारखे.

**ओवमति**—(क्रि.) उलटी करणे, वांती होणे.
**ओवरक**—(नपु.) आतील खोली, मध्य घर.
**ओवरति**—(क्रि.) थांबविणे, अडविणे.
**ओवस्सति**—(क्रि.) वर्षाव होणे, पाऊस पडणे.
**ओवस्सापेति**—(क्रि.) पावसांत भिजविणे.
**ओवहति**—(क्रि.) खाली नेणे.
**ओवाद**—(पु.) उपदेश.
**ओवादक**—(पु.) शिकविणारा, उपदेश करणारा, उपदेशक.
**ओवादक्खम**—(वि.) शिक्षणप्रेमी, शिक्षणक्षम, उपदेश ऐकणारा.
**ओविज्झति**—(क्रि.) छेदणे, टिपणे, नेमणे, नेम मारणे.
**ओसक्कति**—(क्रि.) मागे हटणे, मागे जाणे.
**ओसज्जति**—(क्रि.) सोडणे, मोकळे करणे.
**ओसध**—(नपु.) औषध, दवा.
**ओसधी**—(स्त्री.) औषधी वनस्पती.
**ओसधी**—(स्त्री.) चमकदार चांदणी, सतेज चांदणी.
**ओसधसी**—(पु.) चंद्र.
**ओसप्पति**—(क्रि.) मागे हटणे.
**ओसरण**—(नपु.) परत, परतीचा.
**ओसरति**—(क्रि.) परतणे, परत येणे, मागे फिरणे.
**ओसान**—(नपु.) शेवट, अंत, समाप्ती, उपसंहार.
**ओसापेति**—(क्रि.) संपविणे, शेवट करणे, अंत करणे, उपसंहार करणे.
**ओसारक**—(नपु.) ओसारा, निवडलेला, नियुक्त, पाळी, क्रम, बारी.
**ओसारणा**—(स्त्री.) उप निवडणूक, पुर्ननियुक्ती.
**ओसरेति**—(क्रि.) पुन्हा निवडणे, पुर्ननियुक्ती करणे.
**ओसिञ्चति**—(क्रि.) शिंपणे, पाणी देणे, शेतीस पाणी देणे.
**ओसिदन**—(नपु.) बुडणे.
**ओसीदापन**—(नपु.) बुडविणे.
**ओस्सग्ग**—(नपु.) शिथील, सैल, ढिला.
**ओस्सजति**—(क्रि.) सैल सोडणे, ढिले सोडणे, निर्बंध काढून टाकणे, मुक्त करणे,
**ओस्सजन**—(नपु.) मुक्ती, स्वातंत्र्य, परित्याग.
**ओहरति**—(क्रि.) घेऊन जाणे, बरोबर नेणे.
**ओहाय**—(पू. क्रि.) सोडून, मोकळे करून.
**ओहारण**—(नपु.) हटविणे, मागे सारणे, ढकलणे.
**ओहारण**—(नपु.) हजामत करणे, दाढी करणे, स्मश्रु-करणे, केस कापणे.
**ओहित**—(कृ.) दडलेला, लपलेला.
**ओहीन**—(कृ.) मागे सुटलेला, मागे राहिलेला, मागास.
**ओहीयति**—(क्रि.) मागे रहाणे, मागासणे.
**ओहीयन**—(नपु.) मागासलेला.
**ओहीयमान**—(कृ.) मागे राहता.

## क

**क**—नागरी व पालि वर्णमालेतील पहिले व्यंजन. प्रश्नवाचक सर्वनाम "कि" चे एकरूप. कोण, काय, कोणता.
**कंस**—(नपु.) कांसे (धातू).
**ककच**—(नपु.) चाकातील आरा.
**ककण्टक**—(पु.) गिरगिट, सरडा.
**ककण्टक जातक**—महा उम्मग जातकांत आलेल्या ककण्टक प्रश्न कथा.
**ककु**—(पु.) शिखर, वरचे टोक.
**ककुट्ठा**—(स्त्री., विशे. ना.) कुसीनारा (कुशीनगर) जवळची एक नदी. ककुट्ठा याच नदींत भगवान बुद्धाने महापरिनिर्वाणाअगोदर स्नान केले. होते आणि तिचेच पाणी प्याले होते, तेच त्यांचे शेवट स्नान व जलप्राशन होय.
**ककुध**—(पु.) बैलाच्या पाठीवरील वशींड, अर्जुन वृक्ष.
**ककुध-भण्ड**—(नपुं.) राजचिन्ह, राजदंड.
**कक्क**—(नपु.) लेप, गंध (लावण्याचा), टिळा.
**कक्कट**—(पु.) खेकडा, कर्क.
**कक्कट जातक**—खेकडयांच्या वस्तीत, देवदह = देवांचे नगर, कुरीलदह = खेकडयांचे नगर (गांव) मध्ये राहणाऱ्या, हत्तास खाणाऱ्या खेकडयांची कथा—(२६७).
**कक्कर**—(पु.) चित्तर (पक्षी) तीतर.
**कक्कर जातक**—बुद्धीमान पक्ष्यांची कथा—(२०९).
**कक्करता**—(स्त्री.) कर्कश किंवा कठोर भावना.
**कक्कस**—(वि.) कर्कश, कर्णकटु, न आवडणारा आवाज.
**कक्कारी**—(स्त्री.) काकडी, वाळूक.
**कक्कारू जातक**—देवाने दिलेली माळ आपणास मिळावी अशी मागणी करणाऱ्या दुर्गुणी पुरोहिताची कथा—(३२६).
**कक्कारेति**—(क्रि.) खाकरणे.
**कक्खळ**—(वि.) खरबरीत, ओबड-धोबड.
**कक्खळता**—(स्त्री.) कठोरपणा, कठीणपणा.
**कंक, कङ्क**—(पु.) सारस (पक्षी) बगळा.
**कंकट**—(पु.) कवच.
**कङ्कण**—(नपु.) कांकण, बांगडी.

**कङ्खा वितरणी**–(स्त्री., विशेषणाम) विनय पिटकाच्या प्रातिमोक्षावर बुद्ध घोषाचार्यांनी लिहिलेली अट्ठकथा.
**कंखति**–(क्रि.) संदेह करणे, शंका धरणे, साशंक असणे.
**कंखना**–(स्त्री.) संदेह, शंका.
**कंखनीय**–(कृ.) संदिग्ध, शंकित, सांशंक.
**कंखी**–(वि.) शंका धरणारा, साशंक, शंकेखोर.
**कंङग**–(स्त्री.) बाजरी.
**कच**–(नपु.) केस, कुंतल, केश, बाल.
**कचवर**–(पु.) केरकचरा.
**कच्चानि-जातक**–धर्माच्या श्रद्धाची कथा–(४१७).
**कच्चायन व्याकरण**–(पु.) कुच्चायंन (कात्यायन) ने लिहिलेले व्याकरण.
**कच्चि**–(अव्यय) संशयित स्थान, साशंक स्थळ-ठिकाण, शंकेची जागा.
**कच्छ**–(पु.) दलदल.
**कच्छ**–(नपु.) बगल, बाजू, कड, पक्ष, काख.
**कच्छक**–(पु.) अंजीराचे झाड.
**कच्छन्तर**–(नपु.) राजाचा दिवाणखाना.
**कच्छन्तर**–(नपु.) बाजूखाली, बगलेआड.
**कच्छप**–(पु.) कासव.
**कच्छप-जातक**–दुःष्काळात तळ्यातील पाणी आटून गेले तरी ज्या कासवाने आपले तळे सोडले नाही त्याची ही कथा–(१७८).
**कच्छप जातक**–दोन हंसांबरोबर मैत्री केलेल्या कासवाची कथा–(२१५).
**कच्छप जातक**–एका वानराने कासवाबरोबर तक्रार (भांडण) केलेली कथा–(२७३).
**कच्छपुट**–(पु) गाठोडे पाठीवर बांधून मसाले विकणारा वाणी (व्यापारी).
**कच्छबन्धन**–(नपु.) कमरपट्टा, कमरबन्ध.
**कच्छा**–(स्त्री.) कास, खाज, त्वचेची आग, कासोटा.
**कच्छु**–(स्त्री.) खरूज, त्वचारोग.
**कजङगल**–(स्त्री.) मध्य भारताची पूर्व सीमा.
**कज्जल**–(नपु.)काजल, डोळ्यात घालण्याचे औषध, अंजन.
**कञ्चन**–(नपु.) सोने, सुवर्ण.
**कञ्चनवण्ण**–(वि.) पिवळा, सोनेरी, सोन्याच्या रंगाचा.
**कञ्चुक**–(पु.) जाकेट, चोळी, कवच, कंचुकी.
**कञ्चुकी**–(पु.) राजकीय सेवक, राजाचा नोकर, दास.
**कञ्जिक**–(नपु.) कांजी, खळ.
**कञ्जिय**–(नपु.) कांजी, खळ.
**कञ्ञा**–(स्त्री.) कन्या, मुलगी, पुत्री.
**कट**–(कृ.) कृत, केलेला.
**कट**–(पु.) चटई, तट्टया, बोऱ्या (शिंदीच्या पानाची चटई).
**कटक**–(नपु.) बाजूबंद, दंडावरील आभूषण.
**कटकटायति**–(क्रि.) दात खाणे, दातावर दात घासणे.
**कटच्छु**–(पु.) काठी, छडी.
**कटल्लक**–(नपु.) लाकडी बाहुली.
**कटसार**–(पु.) चटई.
**कटसी**–(स्त्री.) स्मशान भूमी.
**कटाह**–(पु.) लाकूडतोड्या.
**कटाह जातक**–दासीपुत्र कटाहाची गोष्ट(कथा)–(१२५).
**कटि**–(स्त्री.) कंबर, कमर.
**कटु**–(वि.) कडू, कडवट.
**कटुक**–(वि.) कडक, तिखट, कडवट.
**कटुक-भण्ड**–(नपु.) मसाले.
**कटुक विपाक**–(वि.) दुष्परिणाम, वाईट परिणाम.
**कटुक रोहिणी**–(स्त्री.) दुष्ट स्त्री. दुर्वर्तनी स्त्री.
**कटु वियकत**–(वि.) कडवा.
**कटुका**–(स्त्री.) वाईट स्त्री. दुष्ट स्त्री. कटु रोहिणी.
**कट्ठ**–(नपु.) काष्ट, लाकूड.
**कट्ठक**–(पु.) वेळूचे झाड.
**कट्ठत्थर**–(नपु.) लाकडी फळीचा अस्तर.
**कट्ठमय**–(वि.) लाकडी, लाकडाचा, लाकडापासून बनविलेला.
**कट्ठहारि जातक**–दुःष्यंताने प्रेमप्रतिक म्हणून शंकुतलेस जशी आपली आंगठी दिली होती त्याचप्रमाणे एका राजाने जंगलातील लाकडे गोळा करणाऱ्या तरुणीस आपली आंगठी दिल्याची कथा–(७).
**कट्ठिस्स**–(नपु.) रेशमी चादर.
**कठल**–(नपु.) फोडणी (स्वयंपाकातील).
**कठित**–(नपु.) शिजविलेला, उकडलेला, उकडून घेतलेला.
**कठिन**–(वि.) अवघड, कठीण.
**कठिन**–(नपु.) दरवर्षी भिक्खुना दिले जाणारे वस्त्र.
**कठिनत्थार**–(पु.) कठिनवस्त्र देणे, वस्त्रदान.
**कड्ढति**–(क्रि.) ओढणे, काढणे.
**कड्ढन**–(पु.) चोखणे, ओढणे.
**कण**–(पु.) कण, तांदळाचे कण.
**कणय**–(पु.) भाला, बर्चा.
**कणवीर**–(पु.) करवीर, बाहुबली.
**कणवीर**–(वि.)वीषवल्ली, विषारी वनस्पती, विषारी झाड.

**कणवेर जातक**—मृत्युदंडाची (फाशीची) शिक्षा झालेल्या कैद्यास मुक्त करण्याचा प्रयत्न "सामा" नावाच्या राजगणिकेने केल्याची कथा–(३१८).

**कणाजक**–(नपु.) तांदळांच्या कणीची खिचडी, भात.

**कणिका**–(स्त्री.) कणिका.

**कणिकर**–(पु.) फुललेला वृक्ष.

**कणेरिक**–(नपु.) झोपडी, खोप.

**कणिट्ठ**–(वि.) कनिष्ठ, लहान, धाकटा.

**कणिट्ठक**–(पु.) लहान भाऊ, धाकटा भाऊ, कनिष्ठ बन्धू.

**कणिट्ठा**–(स्त्री.) लहान वहीण, कनिष्ठ भगिनी.

**कणेरू**–(पु.) हत्ती.

**कणेरू**–(स्त्री.) हत्तीण.

**कण्टक**–(नपु.) काटा.

**कण्टक-अपस्सय**–(पु.) काट्यांचे अंथरूण.

**कण्टकाधान**–(नपु.) काटेरी झाड.

**कण्टकीफल**–(पु.) फणस.

**कण्ठ**–(पु.) गळा.

**कण्ठज**–(वि.) कंठातून उच्चारलेला, कंठस्थ.

**कण्ड**–(पु.) परिच्छेद, भाग, तीर, काठ.

**कण्डक**–(वि.) सुरक्षित, अबाधित.

**कण्डर**–(नपु.) मुख्य रक्तवाहिनी, शीर.

**कण्डरा**–(स्त्री.) पुट्ठा.

**कण्डरि जातक**–किन्नरा राणी एका कोढी (रोगी) पुरुषावर मोहित झाल्याची कथा–(३१४).

**कण्डिन जातक**–एक हरीण दुसऱ्या हरिणीवर आसक्त झाल्याची कथा–(१३).

**कण्डु**–(स्त्री.) खाज, आग, खरूज, त्वचारोग.

**कण्डुति**–(स्त्री.) खाज, खरूज.

**कण्डूवति**–(क्रि.) खाजविणे.

**कण्डोलिका**–(स्त्री.) टोपली, बुट्टी, पाटी.

**कण्ण**–(नपु.) कान.

**कण्ण कटुक**–(वि.) कर्ण-कटु, कर्कश, कानास न आवडणारा आवाज.

**कण्ण गूथ**–(नपु.) कानातील मळ.

**कण्ण छिद्द**–(नपु.) कर्णछेद, कानाच्या पाळीचे भोक, छिद्र.

**कण्ण-छिन्न**–(वि.) कापलेला कान, तुटका कान.

**कण्ण-जप्पक**–(वि.) कानगोष्टी करणारा, चहाडखोर, कानात हळूच सांगणारा.

**कण्ण-खजूरा**–(स्त्री.) कानाची जखम, कानातील व्रण, विषारी किडा.

**कण्ण-भुसा**–(स्त्री.) कर्णाभूषण, कानातील दागिना.

**कण्ण-मूल**–(नपु.) कानाचे मूळ.

**कण्ण-विज्झन**–(नपु.) कर्णछेद, कान टोचणे, छेद पाडणे.

**कण्ण-वेठन**–(नपु.) कर्णाच्छादन, कान झाकणे.

**कण्ण-सक्खालिका**–(स्त्री.) कानाची पाळी, बाह्यकर्ण.

**कण्ण-सुख**–(वि.) कर्णसुख, श्रवण सुख, ऐकण्यास गोडी.

**कण्ण-सूल**–(नपु.) कान दुखणे, कर्णशूळ, कानातील पीडा.

**कण्ण-धार**–(पु.) कर्णधार, सुत्रधार, नावेचा सुकाणू धरणारा.

**कण्णिका**–(स्त्री.)कानाच्छादन, कणिका, कानाचा दागिना.

**कण्ह**–(वि.) कृष्ण, काळा, काळा रंग, कृष्णवर्ण.

**कण्ह जातक**–कृष्ण (काळ्या) तपस्व्याची कथा–(४४०).

**कण्ह-तुण्ड**–(पु.) वानर (लंगूर), काळ्या तोंडाचे वानर.

**कण्ह-दीपायन जातक**–कोसाम्बीच्या दीपायन व माण्डव्य नावांच्या दोन ब्राह्मणांची कथा–(४४४).

**कण्ह-पक्ख**–(पु.) महिन्याचा कृष्ण-पक्ष, वद्यपक्ष, काळोख्याचा पंधवरडा.

**कण्ह-वत्तनी**–(पु.) आग, अग्नी.

**कण्ह-विपाक**–(वि.) दुष्परिणाम.

**कण्ह-सप्प**–(पु.) काळा साप, काळा नाग.

**कत**–(कृ.) कृत, केलेला.

**कत-कल्याण**–(वि.) शुभ काम, चांगले कार्य, सत्कार्य.

**कत-किच्च**–(वि.) कृत-कृत्य, पूर्ण कार्य, कार्य करून पूर्ण झाले, इच्छित साध्य झाले.

**कतञ्जली**–(वि.) दोन्ही हात जोडलेला, नमस्कार करणारा.

**कतञ्ञता**–(स्त्री.) कृतज्ञता, केलेले उपकार जाणणे.

**कतञ्ञू**–(वि.) कृतज्ञ, उपकार जाणणारा.

**कत पटि संथार**–(वि.) स्वागत झालेला, आदरातिथ्य केलेला.

**कत-परिचय**–(वि.) अभ्यस्त, परिचित, ओळखीचा, माहित असलेला.

**कत-पातरास**–(वि.) सकाळी जेवलेला, न्याहरी केलेला.

**कत-पुञ्ञ**–(वि.) पुण्यवान, पुण्य कार्य केलेला, पुण्यकृत.

**कत-भत्त किच्च**–(वि.) जेवण पूर्ण केलेला, जेवण संपविलेला, खाऊन मोकळा झालेला.

**कत-वेदी**–(वि.) कृतज्ञ.

**कत-सङ्गह**–वि.) आदरातिथ्य मिळालेला, सत्कारित.

**कत-सङ्केत**–(वि.) कृत संकेत, संकल्प.

**कताधिकार**–(वि.) संकल्प केलेला, ध्येयनिष्ठ, संकल्पी.

**कतापराध**–(वि.) दोषी, अपराधी, गुन्हेगार.

**कताभिसेक**–(वि.) ज्याचा अभिषेक झाला आहे, अभिषिक्त.

**कतत्त**–(नपु.) कर्तव्य.
**कतम**–(वि.) कोण, कोणता ?
**कतमत्ते**–(अधिकरण) पूर्ण झालेले काम.
**कतर**–(वि.) दोहोंपैकी कोणता ?
**कति**–(अव्यय, सर्वनाम) किती ?
**कतिवस्स**–(वि.) किती वर्षाचा ?
**कतिविध**–(वि.) किती प्रकार.
**कतिका**–(स्त्री.) वार्तालाप, चर्चा, संभाषण.
**कतिकावत्त**–(नपु.) निश्चय, ध्येय, हेतु, करणीय.
**कतिपय**–(वि.) काही, कित्येक.
**कतिपाह**–(नपु) काही दिवस, कित्येक दिवस.
**कतिपाहं**–(क्रि. वि.) काही दिवसांकरिता.
**कति मि**–(वि.) कोणती तिथी, कोणता दिवस.
**कतुपासन**–(वि.) धनुर्विद्येत प्रवीण, चतुर.
**कतूपकार**–(वि.) उपकृत.
**कते**–(क्रि. वि.) त्याच्यासाठी, त्याकरिता.
**कतोकास**–(वि.) आज्ञा मिळालेला, परवानगी मिळालेला, संधि-वेळ-सवड मिळालेला.
**कतब्ब**–(कृ.) कर्तव्य.
**कत्तर**–(वि.) फार लहान.
**कत्तर दण्ड**–(पु.) फिरावयास जाताना घेण्याची छडी-काठी, लहान काठी.
**कत्तर यट्ठि**–(स्त्री.) लहान यष्ठि, हातातील काठी.
**कत्तर सुप्प**–(पु.) लहान सूप (पाखडण्याचे).
**कत्तरिका**–(स्त्री.) कातर, कातारी.
**कत्तिकमास**–(पु.) कार्तिक महिना.
**कत्तिका**–(स्त्री.) कृतिका नक्षत्र.
**कत्तु**–(पु.) कर्ता, लेखक, वाक्यांतील कर्ता.
**कत्तु काम**–(वि.) इच्छुक, करण्याची इच्छा धरणारा.
**कत्तुं**–(कृ.) करण्यास, करण्यासाठी.
**कत्थ**–(क्रि. वि.) कोठे.
**कत्थचि**–(अव्यय) कोठे ना कोठे.
**कत्थरि**–(क्रि.) सांगणे, शेखी मिरविणे, मोठेपणा सांगणे.
**कत्थन**–(नपु.) प्रशंसा.
**कत्थना**–(स्त्री.) बढाई.
**कत्थी**–(वि.) बढाई मारणारा.
**कत्थुद्दिका**–(स्त्री.) कस्तुरी.
**कथं**–(क्रि. वि.) कसे ?
**कथंकथा**–(स्त्री.) संदेश, संशय, शंका.
**कथंकथी**–(वि.) संशयी, शंकाखोर.
**कथंकर**–(वि.) कोणते कार्य, कसले काम.
**कथं भूत**–(वि.) कसला, कोणत्या प्रकारचा.
**कथं विध**–(वि.) कोणत्या प्रकारचा.
**कथं सील**–(वि.) कोणत्या शीलाचा, कसल्या शीलाचा.
**कथन**–(नपु.) सांगणे, बोलणे, कथन करणे.
**कथा**–(स्त्री.) गोष्ट, कथा.
**कथापाभत**–(नपु.) गोष्टीचा विषय.
**कथा मग्ग**–(पु.) कथा वर्णन, कहानीचा मार्ग.
**कथावत्थु**–(पु.) अभि धम्माच्या सात ग्रंथ प्रकारा-पैकी, पांचवा ग्रंथ.
**कथावत्थु**–(नपु., विशेषनाम) चर्चेचा विषय, वाद-विवादाचा विषय.
**कथा सल्लाप**–(पु.) मित्रत्वाचे बोलणे, चर्चा.
**कथा पेति**–(क्रि.) निरोप पाठविणे, संदेश देणे.
**कथित**–(कृ.) सांगितलेले.
**कथेति**–(क्रि.) सांगणे, कथन करणे.
**कथेत्वा**–(पूर्व क्रि.) सांगून, कथन करून.
**कदन्न**–(नपु.) खराब अन्न, वाईट अन्न, कदन्न.
**कदम्ब**–(पु.) कदंब वृक्ष.
**कदम्बक**–(नपु.) समूह, समुदाय, जथा, थवा, कळप.
**कदर**–(पु.) वृक्ष, झाड.
**कदर**–(वि.) वाईट स्थितीतील, दुरावस्थ.
**कदरिय**–(वि.) कंजूस, चिक्कू.
**कदलि**–(स्त्री.) केळीचे झाड, केळीचा खुंड.
**कदलि-फल**–(नपु.) केळ, केळीचे फळ.
**कदलि मिग**–(पु.) सोनेरी हरीण.
**कदा**–(क्रि. वि.) केव्हा.
**कदाचि, करहचि**–(अव्यय) केव्हा-केव्हा, कधी-कधी.
**कद्दम**–(पु.) कर्दम, चिखल.
**कद्दम बहल**–(वि.) दलदल, जास्ती चिखल.
**कद्दमोदक**–(नपु.) गढूळ पाणी, गाळाचे पाणी.
**कनक**–(नपु.) सोने, सुवर्ण, कांचन.
**कनकच्छवि**–(वि.) सवर्ण कांती, सोनेरी कातडे.
**कनकप्पभा**–(स्त्री.) सुवर्ण प्रभा, सुवर्ण तेज.
**कनक विमान**–(नपु.) सोनेरी महाल.
**कनय**–(पु.) आयध, शस्त्र.
**कनिट्ठ**–(पु.) कनिष्ठ, धाकटा, लहान भाऊ, लहान मुलगा.
**कनिट्ठा**–(स्त्री.) लहान मुलगी.
**कनिथ**–(वि.) लहान.
**कनीनिका**–(स्त्री.) दृष्टीचा आधार, आशेचा किरण, जीवनाचा आधार.

**कन्त**–(पु.) पति, नवरा, प्रियकर.
**कन्त**–(वि.) प्रियतम, अनुकूल, योग्य.
**कन्तति**–(क्रि.) कापणे, कातणे.
**कन्तन**–(नपु.) काप, कताई.
**कन्ता**–(स्त्री.) पत्नी, स्त्री, बायको.
**कन्तार**–(पु.) जंगल, अरण्य, वाळवंट.
**कन्तार-नित्थरण**–(नपु.) वाळवंटातील प्रवास.
**कन्ति**–(स्त्री.) कांति, शोभा.
**कन्तित**–(कृ.) कापला, तोडला.
**कन्तिमत्त**–(वि.) चालत असलेला.
**कन्थक**–(पु.) गौतमाचा आवडता घोडा, याच घोड्यावरून सिद्धार्थ गौतमाने महाभिनिष्क्रमण-प्रयाण-गृहत्यागाचा प्रवास केला होता.
**कन्द**–(पु.) कन्द-मूळ.
**कन्दगलक जातक**–खदिरवनिय नावाचा लाकूडतोड्या कन्दगलका या मित्रांची कथा–(२१०).
**कन्दति**–(क्रि.) ओरडणे, रडणे, आक्रोश करणे, पश्चाताप करणे, आक्रंदन करणे.
**कन्दन्त**–(कृ.) दुःखित, रडणारा, रडत असलेला.
**कन्दर**–(पु.) गुहा, डोंगर पोखरून केलेली खोली.
**कन्दरा**–(स्त्री.) गुहा, गुंफा.
**कन्दुक**–(पु.) चेंडू.
**कपण**–(वि.) दरिद्री, कृपण.
**कपण**–(पु.) भिकारी.
**कपल्लक**–(नपु.) चुलीवरील तवा, तापलेला तवा.
**कपल्लक पूव**–(पु.) तव्याचे पृष्ठ.
**कपाल**–(नपु.) कपाळ, डोके.
**कपि**–(पु.) वानर, माकड.
**कपिकच्छु**–(नपु.) केवांच, वृक्ष.
**कपि जातक**–एक माकड तपस्व्याचे रूप घेऊन आला ती कथा–(२५०).
**कपि जातक**–एका वानराने पुरोहिताच्या तोंडात विष्टा टाकल्याची कथा–(४०४).
**कपिञ्जल**–(पु.) चित्तर जातीचा एक पक्षी.
**कपित्थ**–(पु.) बेलासारखे काटेरी फळ.
**कपिल**–(वि.) भुरा, भुऱ्या रंगाचा.
**कपिल**–(पु.) कपिल ऋषि, मुनी.
**कपिलवत्थु**–(स्त्री., विशेषनाम) शाक्याची राजधानी, कपिलवस्तु.
**कपिला**–(स्त्री.) शिसवीचे झाड, काळे लाकूड.
**कपिसीस**–(पु.) दरवाज्याचे आतील आडणा–मोठा अडसर.
**कपोत**–(पु.) कबूतर.
**कपोत जातक**–कावळ्याने मांसाच्या लोभाने पिंजऱ्यांत राहणाऱ्या कबुतराची मैत्री केल्याची कथा–(४२).
**कपोत जातक**–वरील कथेसारखीच दुसरी कथा–(३७५).
**कपोत पालिका**–(स्त्री.) पक्षी-घर, प्राणी संग्रहालय.
**कपोल**–(पु.) गाल.
**कप्प**–(पु.) कल्प, बदल, दुःख कल्पना.
**कप्प**–(वि.) योग्य, अनुकूल, उपयुक्त, उपयोगी.
**कप्पक**–(पु.) न्हावी, राजमहालातील नोकर.
**कप्पक्खय**–(पु.) कल्पक्षय, बदल, संपला.
**कप्पट्ठायी**–(वि.) कल्पस्थळी, बदलाच्या ठिकाणी.
**कप्परुक्ख**–(पु.) कल्पवृक्ष, इच्छा पूर्ण करणारे झाड.
**कप्पविनास**–(पु.) कल्पानंतर नाश, बदलानंतर शेवट, अंत, मृत्यू, जगाचा नाश.
**कप्पट**–(पु.) जुने कापड, चिंधी.
**कप्पति**–(क्रि.) योग्य होणे, योग्य घडणे, योग्य असणे.
**कप्पना**–(स्त्री.) व्यवस्थित (करणे), नीट (करणे).
**कप्पबिन्दु**–(पु.) भिक्खुच्या चीवरावर (वस्त्र) बनविलेले काळे चिन्ह, खुण.
**कप्पर**–(पु.) कोपर.
**कप्पास**–(नपु.) कापूस.
**कप्पास पटल**–(स्त्री.) कापसाची घडी, रूईची घडी, थर.
**कप्पासिक**–(वि.) रूईदार, रूईचे बनविलेले.
**कप्पासी**–(पु.) कापसाचे झाड, पळकाठी.
**कप्पिक**–(वि.) कल्पासंबंधी, बदलाविषयी.
**कप्पित**–(कृ.) तयार केलेला.
**कप्पिय**–(वि.) योग्य, उचित.
**कप्पिय कारक**–(पु.) भिक्खुंची योग्य आवश्यकता पुऱ्या करणारा, भिक्खुंची उचित सोय करणारा.
**कप्पिय भाण्ड**–(नपु.) भिक्खुंना निर्धारित केलेले भांडे. लाकडी कटोरा, भिक्षा पात्र.
**कप्पुर**–(नपु.) कापूर.
**कप्पूर**–(पु.) कापूर, कर्पूर.
**कप्पेति**–(क्रि.) तयार करणे, कापणे, बनविणे, जीवन व्यतित करणे, जगणे.
**कप्पेत्वा**–(पूर्वक्रिया.) तयार करून, कापून.
**कबर**–(वि.) रंगी-बेरंगी, कबरी, चितरा.
**कबरमणि**–(पु., नपु.) लसणाच्या रंगाचे रत्न, पांढरे-तांबूस रत्न.
**कबल**–(पु.,नपु.) घास.
**कबलिंकार**–(पु.) तोंडभर घास, मोठा घास.

**कबलिंकाराहार**–(पु.) जेवण, भोजन.
**कब्ब**–(नपु ) काव्य, काव्यात्मक रचना.
**कम**–(पु.) क्रम.
**कमति**–(क्रि.) जाणे.
**कमण्डलु**–(पु.,नपु.) तपस्व्याचा तांब्या, पाण्याचे भांडे.
**कमनीय**–(वि.) सुंदर, आकर्षक, वांछनीय.
**कमल**–(नपु.) कमळ, पद्म.
**कमलदल**–(नपु.) कमळाची पाकळी, पद्मपत्र.
**कमलासन**–(पु.) कमळावर बसणे, कमळ हे आसन, कमळावर बसलेला देव.
**कमलिनी**–(स्त्री.) कमळ असलेले सरोवर, कमळ असलेले तळे.
**कमितु**–(नपु.) कामुक, कामेच्छुक, कामातुर.
**कमुक**–(पु.) सुपारीचे झाड.
**कम्पक**–(वि.) कंप देणारा, हालविणारा.
**कम्पति**–(क्रि.) कांपणे, कंप पावणे, थरारणे, शहारणे.
**कम्पमान**–(कृ.) थरथरत असलेला, शहारणारा.
**कम्पित**–(कृ.) थरारला, कंप पावला.
**कम्पिय**–(वि.) हालवू शके, थरारू शके.
**कम्पेति**–(क्रि.) कांपणे, शहारणे, थरारणे, कंप पावणे.
**कम्पेत्वा**–(पू. क्रि.) हालवून, थरारून, शहारुन.
**कम्बल**–(नपु.) कांबळी, घोंगडे, लोकरीचे पांघरून.
**कम्बली**–वि.) कामळीवाला, कांबळीवाला.
**कम्बु**–(पु.) शंख.
**कम्बु**–(नपु.) सोने, सुवर्ण.
**कम्बुगीव**–(वि.) तीन रेषा मानेवर दिसणारा, तिहेरी मान.
**कम्बोज**–(पु.) प्राचीन भारतातील एक गणराज्य.
**कम्म**–(नपु.) कर्म, कार्य, काम.
**कम्मकर, कम्मकार**–(पु.) मजूर, कामगार, कर्मचारी.
**कम्मकरण**–(नपु.) परीश्रम, मजुरी, कष्ट, उद्योग.
**कम्मकारणा**–(स्त्री.) देहदंड, शिक्षा, शारीरिक दंड, शिक्षा.
**कम्म-कखय**–(पु.) पूर्व कर्मांचा क्षय, पूर्वजन्मातील कर्मांचा नाश.
**कम्मज**–(वि.) कार्यातून उत्पन्न, कर्मातून निर्माण.
**कम्मजात**–(नपु.) विविध कार्ये, अनेक कामे, बहुत कामे.
**कम्मदायाद**–(वि.) कार्याचा जबाबदार, कर्माचा उत्तराधिकारी.
**कम्म नानत्त**–अनेक कार्ये, अनेकविध कामे, विविध कार्ये.
**कम्म निब्बत्त**–(वि.) कार्यातून निर्माण, कामातून उत्पन्न.
**कम्म पथ**–(पु.) कर्म मार्ग
**कम्म पाच्चय**–(वि.) कार्यावर आधारित, कामावर अवलंबून, कर्माधारित.
**कम्म फल**–(नपु.) कर्म फळ, कामाचा फायदा, कार्याचा परिणाम.
**कम्मबन्धु**–(वि.) काम हाच ज्याचा पाठीराखा, कर्मबंधू.
**कम्मबल**–(नपु.) काम हेच ज्याचे बल वा शक्ति, कर्मबल.
**कम्मयोनि**–(वि.) कर्मातून ज्याची उत्पत्ती झाली, कर्मयोनी.
**कम्मवाद**–(पु.) कर्म व त्याचे परिणाम मानणारा, कर्मवाद.
**कम्मवादी**–(वि.) कर्मवादी.
**कम्मविपाक**–(पु.) कर्माचे फल, कार्याचा परिणाम.
**कम्म वेग**–(पु.) कार्याची गति, कार्याचा वेग.
**कम्म समुट्ठान**–(वि.) कार्योत्पन्न.
**कम्म सम्भव**–(वि.) कर्माने निर्माण, कर्माने उत्पन्न.
**कम्म सरिक्खक**–(वि.) कार्य सदृश्य परिणाम, कार्याप्रमाणे फळ.
**कम्मसक**–(वि.) कार्य ही ज्याचे सर्वस्व आहे, कर्मावर अवलंबित.
**कम्म यूहन**–(नपु.) कर्मांचा ढीग, कार्य बाहुल्य, अनेक कामे, विविध कार्ये.
**कम्म उपचय**–(पु.) कर्मांचा संग्रह.
**कम्मज-वात**–(पु.) प्रसव-वेदना, प्रसुती वेदना.
**कम्मञ्ञ**–(वि.) कमविलेले कातडे.
**कम्मञ्ञता**–(स्त्री.) कमविणे, कर्मण्यता.
**कम्मट्ठान**–(नपु.) कर्मस्थान, ध्यान, तपश्चर्याचा विषय, ज्यावर चित्त एकाग्र केले जाते.
**कम्मट्ठानिक**–(पु.) तपस्वी, योगाभ्यास करणारा, साधक.
**कम्मधारय**–(पु.) कर्म धारय समास.
**कम्मन्त**–(नपु.) काम, कार्य, उद्योग, कारभार, धंदा.
**कम्मन्तट्ठान**–(नपु.) कार्याची जागा, कामाचे ठिकाण, कर्मशाळा.
**कम्मन्तिक**–(पु.) मजूर, कामगार.
**कम्मप्पत्त**–(वि.) विनय कार्यासाठी एकत्र झालेले भिक्खु.
**कम्मवाचा**–(स्त्री.) विनय कर्माचा पाठ, विनयाचे पठन, विनयाचे वाचन, विनयाचे पाठांतर.
**कम्मस्सामी**–(पु.) उद्योगपति, कारखानदार, धंद्याचा मालक.

**कम्मधिट्ठायक**–(पु.) धंद्याचा निरीक्षक, व्यवस्थापक.

**कम्मानुरूप**–(वि.) कर्मानुसार, कर्माप्रमाणे.

**कम्मार**–(पु.) लोहार किंवा सोनार.

**कम्मार भण्ड**–(नपु.) लोहाराचे साहित्य.

**कम्मार साला**–(स्त्री.) लोहार किंवा सोनाराची कार्यशाळा, कारखाना.

**कम्मारम्भ**–(पु.) कार्यारंभ, कामास सुरूवात.

**कम्मारह**–(वि.) कामास योग्य.

**कम्माराम**–(वि.) कार्यरत, कामात मग्न, निष्ठेने काम करणारा.

**कम्मारामता**–(स्त्री.) सर्व कार्यांत पूर्ण लक्ष घालणे, सर्व कामे आस्थेवाईकपणे करणे, कामात आत्मीयता असणे.

**कम्मास**–(वि.) विचलित, स्थिर नसलेले काम, धरसोडीचे काम.

**कम्मासदम**–(नपु., विशे. ना.) कुरूचे एक नगर. याच कम्मासदम नगरीत भगवान बुद्ध अनेक वेळा थांबले होते, राहिले होते आणि याच कम्मासदम नगरीत महासतिपठ्ठानसुत्त यासारख्या महत्त्वपूर्ण सूत्रांचा उपदेश दिला होता.

**कम्मिक, कम्मी**–(पु.) कामगार, मजूर, कर्मी.

**कम्यता**–(स्त्री.) इच्छा, आशा.

**कय**–(पु.) क्रय, खरेदी, विकत घेणे.

**कय-विक्कय**–(पु.) क्रय-विक्रय, खरेदी-विक्री.

**कय-विक्कयी**–(पु.) व्यापारी, दुकानदार.

**कयिक**–(पु.) खरीददार, विकत घेणारा, ग्राहक.

**कर**–(पु.) हात, किरण, जकात, हत्तीची सोंड.

**करक**–(पु.) डाळिंब.

**करक**–(नपु.) जल पात्र, पाण्याचे भांडे.

**करका**–(स्त्री.) गारा (पावसातील गार).

**करग्ग**–(पु.) कराग्र, तळहाताची बोटे.

**करज**–(पु.) बोटाचे नख.

**करज काय**–(पु.) घाण शरीर, घाणेरडे अंग, मलीन अंग.

**करञ्ज**–(पु.) बोट, नख, सुगंधी वस्तु.

**करतल**–(नपु.) तळहात, हाताचा तळवा.

**करपुट**–(पु.) जोडलेले हात.

**करभुसा**–(स्त्री.) हातातील दागिना, कडे, बाजूबंद.

**करण**–(नपु.) करणे, बनविणे.

**करण**–(स्त्री.) उत्पत्ती.

**करणत्थ**–(पु.) साधन-साहित्य, वस्तूंची बनावट.

**करण विभत्ति**–(स्त्री.) तिसरी विभक्ती, तृत्तीया.

**करणीय**–(वि.) कर्तव्य.

**करण्डक**–(पु.) टोपली, पेटी.

**करभ**–(पु.) ऊंट.

**करभ**–(पु.) मनगट.

**करमद्द**–(पु.) हात चोळणारा, करमर्दक.

**करमर**–(पु.) कैदी, तुरुंग्या, शिक्षा भोगणारा.

**करमरानीत**–(वि.) युद्धबंदी.

**करवीक**–(पु.) कोकीळ.

**करवीक भाणी**–(वि.) मधूर गायक, गोड गळ्याचा, कोकिळकंठी.

**करसाखा**–(स्त्री.) बोट, करशाखा, हाताची बोटे.

**कर हाट**–(नपु.) मूळ, कंद-मुळे.

**करिसापण्ण**–(पु.) कर्षापण, सुवर्णमुद्रा, सोन्याचे नाणे.

**करी**–(पु.) हत्ती.

**करीयति**–(क्रि.) केले, केले जाणे, करणे.

**करीयमान**–(कृ.) करीत असलेले, काम चालू.

**करीर**–(पु.) अशुभ योग.

**करीस**–(नपु.) शेण, विष्टा, गू, मल.

**करीस मग्ग**–(पु.) गुदद्वार.

**करूणं**–(क्रि. वि.) करूणापूर्वक, दयापूर्ण, दयार्द्र, दयेने, मायेने, प्रेमाने.

**करूणा**–(स्त्री.) दया, करूणा.

**करूणायति**–(क्रि.) दयाळूपणाने, प्रेमाने, मायेने.

**करेणु**–(स्त्री.) हातनी, हत्त्या.

**करेरि**–(पु.) वृक्ष, झाड.

**करोति**–(क्रि.) करणे.

**करोन्त**–(कृ.) करत असताना, करताना, करता-करता.

**कल**–(पु.) मधुर आवाज, सुस्वर.

**कलंक**–(पु.) चिन्ह, डाग, ठपका.

**कलण्डुक जातक**–बनारसच्या एका श्रीमंताच्या नोकराने खोटे पत्र तयार करून शेजारच्या भागांतील एका श्रीमंतास दाखवले व त्याच्या मुलीबरोबर लग्न करूवून घेतले, त्या नोकराचे नाव कलण्डुक होते. त्याची कथा–(१२७).

**कलत्त**–(स्त्री.) पत्नी, बायको, स्त्री.

**कलन्दक**–(पु.) खारोटी, खार.

**कलन्दक-निवास** (निवाप)–(पु., विशे.ना.) वेळू वनांतील (राजगृह) एक ठिकाण. या ठिकाणी खारीना नियमितपणे खाणे दिले जात असे.

**कलभ**–(पु.) हत्तीचे पिल्लू.

**कलल**–(नपु.) चिखल.
**कलल मक्खित**–(वि.) चिखलाने माखलेला.
**कलल-रूप**–(नपु.) गर्भाची प्रारंभावस्था.
**कलविंक**–(पु.) चिमणी, पक्षी.
**कलस**–(नपु.) कलश, घडा, घागर, जलपात्र, कळशी.
**कलसिगाम**–(नपु., विशे. ना.) अलसन्दा (अलेक्झांड्रिया) द्वीपातील कलसग्राम, याच नगरींत राजा मिलींद याचा जन्म झाला होता.
**कलह**–(पु.) भांडण, झगडा, कलह.
**कलह-कारक**–(वि.) भांडखोर, भांडणारा, कलह करणारा.
**कलह-कारण**–(नपु.) झगडयाचे कारण, भांडणाचे कारण.
**कलह सद्द**–(पु.) भांडणाचा आवाज.
**कला**–(स्त्री.) पूर्णकृतीचा एक भाग, शिल्पकला.
**कलाप**–(पु.) बंडल, गठ्ठा, वस्तूंचा समूह.
**कलापी**–(पु.) मोर.
**कलाय मुठ्ठी जातक**–वानराने एका वाटाण्याच्या दाण्यासाठी मूठभर वाटाणे गमविल्याची कथा–(१७६).
**कलि**–(पु.) हार, पराजय, अपयश, दुर्भाग्य, पाप, कष्ट.
**कलिका**–(स्त्री.) फुलाची फळी.
**कलिग्गह**–(पु.) माळेचा फासा.
**कलियुग**–(पु.) (सत्य, द्वापार, त्रेता, कलि.) या युगापैकी शेवटचे युग कलियुग.
**कलिङ्गर**–(पु., नपु.) गठ्ठा, लाकडाची मोळी.
**कलिल**–(नपु.) गहन, अवघड, कठीण.
**कलीर**–(नपु.) ताड वृक्षाच्या खोडाचा मऊ भाग.
**कलुस**–(नपु.) कलुष, पाप कर्म, अपवित्रता, अमंगल.
**कलेवर, कलेबर**–(नपु.) शरीर, देह.
**कल्याण**–(वि.) शुभ, कल्याण.
**कल्याण-काम**–(वि.) शुभ कार्य, चांगले काम, पवित्र कार्य.
**कल्याण-कारी**–(वि.) शुभकर्मी, मंगलदायक, मंगलकारक.
**कल्याण दस्सन**–(वि.) सुंदर दर्शन, पवित्र दर्शन, मंगल दर्शन.
**कल्याण-पटिभाण**–(वि.) शीघ्र बोध, शीत्त समज, तत्पर ग्रहण.
**कल्याणमित्र**–(पु.) शुभचिंतक, शुभेच्छक, हितैषी, कल्याण मित्र.
**कल्याण अज्झासय**–(वि.) शुभ-प्रेरणा, शुभ-चेतना, मंगल प्रेरणा.
**कल्याण धम्म जातक**–सासूच्या बहिरेपणात सुनेने एक सांगितले आणि सासूने दुसरेच ऐकले (समजले) ही कथा–(१०१).
**कल्याणी**–(स्त्री.) सुंदर स्त्री., सुंदरी, संदर युवती.
**कल्याणी**–(स्त्री., विशे.ना.) लंकेतील (सिलोन) एक नदी, त्याच प्रमाणे एक नगरी.
**कल्ल**–(वि.) दक्ष, तत्पर, योग्य, स्वस्थ.
**कल्लता**–(स्त्री.) दक्षता, तत्परता.
**कल्लसरीर**–(वि.) निरोगी शरीर, स्वस्थ शरीर.
**कल्लहार**–(नपु.) श्वेत कमळ, पांढरे पद्म.
**कल्लोल**–(पु.) तरंग, मोठी लाट, लहर.
**कवच**–(पु.) चिलखत, अभेद्य कोट.
**कवंध**–(पु.) बिन शिराचे धड.
**कवाट**–(पु.) दरवाजा, कवाड.
**कवाट**–(स्त्री.) खिडकी.
**कवि**–(पु.) काव्य करणारा, कवि.
**कविट्ठ**–(पु.) कविठ कैथ, बेलासारखे कांटेरी फळ.
**कविता**–(स्त्री.) काव्यकृति, काव्यरचना, कविता.
**कवित्त**–(नपु.) कवित्त्व, काव्य सामर्थ्य, काव्य-शक्ती, कवीची अवस्था.
**कसट**–(पु.) केर-कचरा, दुर्गंधी, बेचव.
**कसति**–(क्रि.) कसणे, नांगरणे, मशागत करणे.
**कसन**–(नपु.) मशागत, औत चालविणे.
**कसंत, कस्समान**–(कृ.) मशागत करता, नांगरता.
**कसम्बु**–(पु.) केर-कचरा, घाण.
**कसम्बुजात**–(वि.) केर-कचऱ्यात उत्पन्न, घाणीत जन्मलेला, घाणीत पैदा झालेला.
**कसा**–(स्त्री.) चाबूक
**कसाहत**–(वि) चाबकाचा मार.
**कसाय**–(नपु.) दोन बंधने, बाजेची दोरी.
**कसाव**–(पु.) काषाय रंग, भगवा रंग.
**कसाव**–(नपु.) दुर्गंधी, बेचव.
**कसि**–(स्त्री.) शेती, कृषि.
**कसि कम्म**–(नपु.) शेतीचा धंदा, शेती करणे.
**कसि भण्ड**–(नपु.) शेतीची औजारे.
**कसि भारद्वाज**–(पु.) कृषि भारद्वाज गोत्रातील एक ब्राह्मण. तो दक्षिणगिरीच्या एका खोऱ्यात रहात होता. बुद्धत्त्व प्राप्तीनंतर अकराव्या वर्षी तो ब्राह्मण भगवान बुद्धाला भेटला होता.
**कसिण**–(वि.) समस्त, आम, तमाम, सर्व.
**कसिण**–(स्त्री.) चित्त एकाग्र करण्याची साधना.
**कसिण-परिकम्म**–(नपु.) योगाभ्यासाची पूर्वतयारी.
**कसिण-मण्डल**–(नपु.) योगाभ्यासाकरिता चित्त एकाग्र करण्यास कागदावर किंवा भिंतीवर काढलेले चक्र, चिन्ह.

**कसितट्ठान**–(नपु., वि.) नांगरलेली जमीन.

**कसित्वा**–(पू. क्रि.) नांगरून.

**कसिर**–(वि.) कठीण.

**कसिर**–(नपु.) अवघड, कठीण.

**कसिरेन**–(क्रि. वि.) कठीणपणे, अवघडपणे.

**कस्मीर**–(पु.) उत्तर भारतातील प्रदेश, आधुनिक काश्मीर.

**कस्सक**–(पु.) कृषक, शेतकरी, किसान.

**कस्सति**–(क्रि.) ओढणे, कसणे.

**कस्सपमन्दिय जातक**–वृद्धांबरोबर तरुणांनी किंवा परस्परांनी एकमेकांबरोबर सहनशीलतेने वागण्याविषयीचे शिक्षण देणारी कथा–(३१२).

**कहं**–(क्रि. वि.) कोठे ?

**कहापण**–(नपु.) सुवर्णमुद्रा, सोन्याचे नाणे, कार्षापण.

**कहापणक**–(नपु.) दंड-शिक्षा, या शिक्षेत अपराधीच्या गुन्हेगाराच्या मांसाचे-चामडीचे कार्षापणासारखे तुकडे केले जातात. (अशक्य वाटणारी गोष्ट.)

**काक**–(पु.) कावळा.

**काक**–(पु., विशे. ना.) राजा चण्डप्रद्योत याचा अतिजलद धावणारा सेवक.

**काक-पाद**–(पु.) कावळ्याचा पाय, (क्रॉस) अधिक चिन्ह.

**काक पेय्य**–(वि.) काठोकाठ भरलेला, कावळाही सहजपणे पिऊ शकेल असे भरलेले भांडे, (तहानलेल्या कावळ्याने घागरीत खडे टाकून चोंचीस पाणी येण्याचा केलेल्या प्रयत्नांची गोष्ट.)

**काक-वर्ग**–(वि.) कावळ्याच्या रंगाचा (काळ्या) वर्ग.

**काक जातक**–(१) राज पुरोहित स्नान करून येत असता कावळ्याने त्याच्यावर विष्टा केली म्हणून त्या राज पुरोहिताने सर्व कावळे मारून टाकण्याविषयी राजास सुचविल्याची कथा–(१४०).

**काक जातक**–(२) कावळा व कावळी मद्यपान करून बेहोष झाले. कावळीला समुद्राच्या लाटेने आत ओढून नेल्यामुळे ती बुडून मेली. तेव्हा कावळा पत्नीवियोगाने आक्रोश करू लागला. त्याचा आक्रोश पाहून सर्व कावळे समुद्राचा द्वेष करू लागले व त्याचे शत्रु झाले ही कथा–(१४६).

**काक जातक**–(३) एक लोभी कावळ्याने पिंजऱ्यात राहणाऱ्या कबुतराबरोबर मांस खाण्याच्या आशेने मैत्री केली. तो एक दिवस स्वयंपाक्याच्या हाती लागला व स्वतःचा जीव गमवून बसल्याची कथा–( – )

**काकच्छति**–(क्रि.) शिंकणे, नाक शिंकरणे.

**काकणिका**–(स्त्री.) कौडी, कांकणी.

**काकतालिय**–(नपु.) आकस्मित घटना, एकांगी निकाल, एकतर्फी न्याय, काकतालीक न्याय.

**काकतिन्दुक**–(पु.) काकदृष्टी, कावळ्याच्या दोन्ही डोळ्यात एकच बाहुली.

**काक पक्ख**–(पु.) केसांची जुडी, शेंडी.

**काकली**–(स्त्री.) धीमा आवाज, हळू आवाज, बारीकस्वर.

**काकसूर**–(वि.) कावळ्याचा कर्कश आवाज, निर्लज्ज बोलणे.

**काकति जातक**–बनारस येथील राजाच्या काकति नावाच्या पट्टराणीवर गरुड मोहित झाला व त्याने काकति राणीस आकाशात उचलून नेले ही कथा–(३२७).

**काकी**–(स्त्री.) कावळी.

**काकोल, काकोळ**–(पु.) जंगली कावळा, डोम कावळा.

**काच**–(पु.) काच, पारदर्शक पदार्थ.

**काच तुम्ब**–(पु.) काचेची बाटली.

**काचमय**–(वि.) कांचेपासून बनविलेली, काचनिर्मित.

**काज**–(पु.) कावड.

**काज हारक**–(पु.) कावड नेणारा.

**काट**–(पु.) पुरुषेंद्रिय, शिश्न.

**काण**–(वि.) काना, तिरळी नजर, एका डोळ्याने आंधळा.

**कातब्ब**–(नपु.) कर्तव्य.

**कातर**–(वि.) दुःखी, कष्टी, दरिद्री.

**कातवे, कातुं**–(नपु.) करण्यासाठी.

**कातु काम**–(वि.) इच्छुक, काम करू इच्छिणारा.

**कादम्ब**–(पु.) बदक

**कानन**–(नपु.) जंगल.

**कापिलवत्थव**–(वि.) कपिलवस्तूचा.

**कापुरिस**–(वि.) धृणित व्यक्ती, तिरस्करणीय माणूस, दुष्ट.

**कापोतक**–(वि.) कबुतरासारखा शुभ्र.

**कापोतिक**–(स्त्री.) एक प्रकारचे मद्य.

**काम**–(पु.) कामना, कामवासना, कामुकता.

**काम गिद्ध**–(वि.) इंद्रिय सुखोपभोगी, कामुक.

**काम गुण**–(नपु.) इंद्रिय सुख, संभोग.

**कामगेध**–(वि.) इंद्रिय सुखासक्त.

**कामच्छन**–(नपुं.) कामकता.

**काम तण्हा**–(स्त्री.) कामतृष्णा, कामातुर.

**काम दद**–(वि.) इच्छित वस्तु देणे.

**काम धातु**–(नपु.) इच्छा लोक, इहलोक.

**कामपङ्क**––(वि.) वासनेचा चिखल, मलीन वासना.

**काम परिळाह**–(पु.) कामज्वर, वासनेचा उद्रेक, काम दाह.

**काम भव**–(पु.) वासनांचा पसारा, इच्छांचे जाळे.

**काम भोगी**–(वि.) इंद्रिय सुखात रमणारा.

**काम मुच्छा**–(स्त्री.) काम मूर्च्छा, कामातिरेक.

**काम रति**–(स्त्री.) भोगातील आनंद, कामुकतेत आनंद.

**काम राग**–(पु.) काम चेतना, भोग प्रेरणा, कामोद्युक्त.

**काम लोक**–(पु.) वासनारुपी जग, वासनांचा पसारा.

**काम वितक्क**–(पु.) कामनासंबंधी विचार, कामवितर्क.

**काम संकप्प**–(पु.) कामनाविषयी संकल्प-ध्येय, काम संकल्प.

**काम सञ्ञोजन**–(नपु.) कामनांचे बंधन, काम संयोजन.

**काम सुख**–(नपु.) कामेंद्रियापासून मिळणारे सुख, समाधान, इंद्रिय सुख.

**काम सेवना**–(स्त्री.) मैथून, संभोग, मिथूनाचा निसर्गधर्म.

**काम जातक**–(राजकुमाराची कामवासना उत्तरोत्तर वाढतच गेल्याची कथा–(४६७).

**कामनीत जातक**–वरील आशयाची (कामजातक) कथा–(२२८).

**कामता**–(स्त्री.) आकांक्षा, इच्छा.

**कामी**–(पु., स्त्री.) कामेंद्रियाचा आसक्त पुरुष अगर स्त्री, कामुक, कामेच्छु.

**कामुक**–(वि.) काम वासनेने प्रेरित, प्रेमी.

**कामेति**–(क्रि.) इच्छा करणे, इच्छिणे, अभिलाषा धरणे.

**कामेतब्ब**–(कृ.) इच्छिण्यायोग्य.

**काय**–(पु.) देह, शरीर, संग्रह, साठा, ढीग.

**काय-कम्म**–(नपु.) शारीरिक कार्य, शारीरिक कर्म, देह-धर्म.

**कायकम्मञ्ञता**–(स्त्री.) शरीर सौष्ठव, शरिराचा पिळदारपणा, कमविलेले शरीर.

**काय गत**–(वि.) शरीरासंबंधी, शरीराविषयी, शारीरिक.

**काय गन्थ**–(पु.) शारीरिक बन्धन.

**काय गुत्त**–(वि.) शरीराशी निगडीत.

**काय डाह**–(पु.) शरीर ताप, शारीरिक दाह.

**काय दरथ**–(पु.) शारीरिक कष्ट, शरीर श्रम.

**काय दुच्चरित**–(नपु.) शारीरिक दुःष् चरित्र, शारीरिक दुर्वर्तन.

**काय द्वार**–(नपु.) शरीराची इंद्रिये (तोंड, नाक, जननेंद्रिय, गुद्द्वार इ.).

**काय धातु**–(स्त्री.) स्पर्शेंद्रिय, त्वचा.

**कायप्पकोप**–(पु.) शारीरिक दुष्कर्म.

**कायप्प चालक**–(क्रि. वि.) शारीरिक हालचाल.

**काय पटिबद्ध**–(वि.) शरीराशी संबंधित, शरीराशी निगडीत.

**कायप्पयोग**–(पु.) शारीरिक साधन.

**काय परिहारिक**–(वि.) शरीर पालन, शरीर पोषण, शरीर संवर्धन.

**कायप्पसाद**–(पु.) स्पर्शज्ञान, पूर्ण जाणीव.

**कायप्पसद्धि**–(स्त्री.) इंद्रियांची शांति, इंद्रियांची तृप्ति.

**काय पागब्भिय**–(नपु.) शारीरिक प्रगल्भता, शरीराची पूर्ण वाढ, शरीर वृद्धी.

**काय बंधन**–(नपु.) कमरपट्टा, कमरपट्टी, मासपट्टा (स्त्रियांचा).

**काय बल**–(नपु.) शारीरिक बल, शरीरातील शक्ती, ताकद.

**काय मुदुता**–(स्त्री.) कोमल शरीर, नाजूक शरीर, इंद्रियांचा कोमलपणा.

**काय लहुता**–(स्त्री.) हलके शरीर, सडपातळ, लठ्ठ नसलेले.

**काय वङ्क**–(पु.) दुःष्कर्म, वाईट काम, अयोग्य कार्य.

**काय विकार**–(पु.) संकेत, खूण.

**काय विञ्ञत्ति**–(स्त्री.) शारीरिक सूचना, खुणविणे, पालविणे.

**काय विञ्ञाण**–(नपु.) स्पर्श चेतना, स्पर्श जागृति, स्पर्शामुळे होणारी उद्दिप्ती.

**काय विञ्ञेय्य**–(वि.) स्पर्शज्ञान, स्पर्शाने समजणे.

**काय विवेक**–(पु.) (पु.) शारीरिक एकान्त.

**काय वेय्यावच्च**–(नपु.) शारीरिक सेवाकार्य, श्रमदान.

**काय संसग्ग**–(पु.) शारीरिक संसर्ग, शरीर संबंध.

**काय सक्खी**–(वि.) शरीराचे अस्तित्व.

**काय संखार**–(पु.) शरीराचे सूक्ष्म स्वरूप.

**काय समाचार**–(पु.) सदाचरण, सत्चारित्र्य.

**काय सम्फस्स**–(पु.) स्पर्शेंद्रिय, त्वचा, चामडी, कातडे.

**काय सुचरित**–(नपु.) शारीरिक सदाचरण.

**काय सोचेय्य**–(नपु.) शारीरिक पवित्रता, शरीर स्वच्छता, स्नान, आंघोळ.

**काय विच्छिन्द जातक**–धार्मिक जीवन जगण्याचा संकल्प केल्यामुळे पालिका (कावीळ) रोग नष्ट झाल्याची कथा–(२९३).

**कायिक**–(वि.) शारीरिक, शरीरासंबंधी, शरीराविषयी.

**कायिक दुक्ख**–(नपु.) शारीरिक वेदना, शारीरिक पीडा, दुखणे.
**कायुजुकता**–(स्त्री.) सरळ शरीर.
**कायूपग**–(वि.) शरीरासक्ती, नवजात.
**कायूर**–(नपु.) बाजूबंद, दंडावरील दागिना, ताळेबंद.
**कार**–(पु.) क्रिया, कर्म, कार्य, सेवा.
[ **(रथ) कार**–(वि.) रथ बनविणारा.]
**कारक**–(पु.) कर्ता, कार्यकरणारा, व्याकरणातील कर्ता.
**कारण**–(नपु.) हेतु, उद्देश्य, अपादान, कारण.
**कारण्डीय जातक**–योग्या-योग्यता पहिल्याशिवाय कोणासही उपदेश करणाऱ्या आचार्याची कथा–(२६६).
**कारणा**–(स्त्री.) यातना, शिक्षा, शारीरिक दंड.
**कारणिक**–(पु.) शिक्षा करणारा, यातना देणारा, मारणारा, मारक.
**कारवेल्ल**–(पु.) कारले.
**कारा**–(स्त्री.) कैद, बंद.
**काराधर**–(नपु.) तुरुंग, बंदिशाळा, कैदखाना.
**कारापक**–(पु.) करणारा, कर्ता, करविणारा, करविता.
**कारापिका**–(स्त्री.) करविणारी.
**कारापन**–(नपु.) करविणे, करवून घेणे, करावयास लावणे.
**कारापित**–(कृ.) करविले, करावयास लावले.
**कारापेति**–(क्रि.) करविणे.
**कारा भेदक**–(वि.) तुरुंगांतून पळून जाणारा.
**कारिका**–(स्त्री.) व्याख्या.
**कारिय**–(नपु.) कार्य, कर्तव्य, काम.
**कारी**–(पु.) करणारा.
**कारुञ्ञ**–(नपु.) करूणा, दया.
**कारुणिक**–(वि.) दयाळू, मायाळू, प्रेमळ.
**कारेति**–(क्रि.) करवून घेणे, करावयास लावणे.
**काल**–(पु.) काळ, वेळ, समय.
**कालस्सेव**–(क्रि. वि.) वेळ असता, वेळी, काळी.
**कालेन**–(क्रि. वि.) योग्य वेळी.
**कालेन कालं**–(क्रि. वि.) वेळोवेळी.
**कालं करोति**–(क्रि.) मरणे, मृत्यू पावणे.
**कालं कत**–(कृ.) मेला, मृत्यू पावला, मरण पावला.
**कालकिरिया**–(स्त्री.) मृत्यू, मरण, अंत, शेवट, कालक्रिया.
**काल कण्णी**–(पु.) अशुभ, अयोग्य.
**कालपवेदन**–(नपु.) वेळेची सूचना, समय सूचना.
**कालवादी**–(वि.) हजर जबाबी, समयोचित बोलणारा.
**कालञ्ञू**–(वि.) कालज्ञ, योग्य वेळ जाणणारा.
**कालंतर**–(नपु.) समयविभाग, ठराविक वेळ, व्यवधान. अमूकवेळ, कालखंड.
**कालिक**–(वि.) वेळेसंबंधी.
**कालिङ्ग**– (नपु., विशे.ना.) (कलिंग)–प्राचीन. पूर्व भारतातील एक गणराज्य, कलिंग (या कलिंग देशाशी सम्राट अशोकाने युद्ध केले यास कलिंग युद्ध म्हणतात. या युद्धानंतर अशोकाने अहिंसेचा बौद्ध धम्माचा स्वीकार केला.)
**कालुसिय**–(नपु.) मल, विष्टा, (कालुष्य).
**काबेय्य**–(नपु.) काव्य, कवित, पद्यरचना.
**कास**–(पु.) श्वासाचा विकार, दमा, कांस, क्षयरोग.
**कासाय**–(नपु.) काषाय वस्त्र, भगवे वस्त्र, विरक्ती दर्शक रंग.
**कासाव**–(वि.) काषाय वर्णयुक्त, भगवा रंगमिश्रीत.
**कासि**–(नपु., विशे. ना.) प्राचीन भारतातील सोळां गणराज्यांपैकी एक गणराज्य (जनपद) काशी. या काशी गणराज्याची राजधानी वाराणसी ही होती.
**कासिक**–(वि.) काशीचा, काशीत निर्माण, काशीत बनविलेला.
**कासु**–(स्त्री.) खड्डा, डबरा, खळगा.
**काळ**–(वि.) काळा.
**काल**–(पु.) काळा रंग.
**कूट**–(पु.) हिमालय पर्वतातील एक शिखर.
**काळ केस**–(वि.) काळ्या केसांचा.
**काळ-पितु**–(नपु.) काळी कांच.
**काळ-पक्ख**–(पु.) कृष्ण-पक्ष, वद्य पक्ष.
**काळ-लोण**–(नपु.) काळे मीठ.
**काळ-सीह**–(पु.) काळा सिंह.
**काळ-सुत्त**–(नपु.) काळे सूत्र.
**काळ-हंस**–(पु.) काळ्या रंगाचा हंस पक्षी.
**काळक**–(वि.) काळा, काळे चिन्ह, काळी फीत.
**काळक**–(नपु.) काळा डाग, भातातील काळा दाणा.
**काळकण्णी जातक**–अनाथ पिंडकाच्या काळकण्णी मित्राच्या गोष्टीसारखी कथा–(८३).
**काळबाहु जातक**–काळबाहु वानराची कथा–(३२९).
**काळाम**–(नपु., विशे. ना.) एका गोत्राचे नाव कालामगोत्र, या कालामांना भगवान बुद्धाने प्रसिद्ध काळाम सूत्राचा उपदेश दिला होता.
**काळायस**–(नपु.) काळे लोखंड, (तांबे).
**काळावक**–(पु.) हत्तीची एक जात.

**कालिंग बोधि जातक**–कार्कालिंग राजाच्या दोन राजपुत्रांची कथा–(४७९).
**कासाव जातक**–काषाय वस्त्र (भगवे वस्त्र) परिधान केले असल्यामुळे एका दुष्ट माणसास त्याच्या दुःष्कृत्या-बद्दलही हत्तीने त्याला क्षमा केल्याची कथा–(२२१).
**किकी**–(पु.) नील-कण्ठी, निळ्या कंठाचा.
**किकी**–(स्त्री.) कोंबडी.
**किंकर**–(पु.) नोकर, दास, सेवक.
**किंकिणी**–(स्त्री.) लहान घंटी, घुंगरू.
**किंकिणिक जाल**–(नपु.) चाळ, घुंगराचे जाळे, घुंगराचा पट्टा.
**किच्च**–(नपु.) कृत्य, काम, कार्य, करणी, कर्म.
**किच्चकारी**–(वि.) कर्तव्यदक्ष, आपले कर्तव्य पूर्ण करणारा.
**किच्चाकिच्च**–(नपु.) कृत्य वा अकृत्य, करणीय किंवा अकरणीय, योग्यायोग्य कार्य.
**किच्छ**–(वि.) कठीण, अवघड, दुःखद.
**किच्छ**–(नपु.) कठीणपणा, दुःख.
**किच्छति**–(क्रि.) कष्ट मिळणे, त्रास पडणे, दुःख होणे.
**किंचन**–(नपु.) कांही, प्रापंचिक आसक्ती, भौतिक आशा.
**किंचन**–(वि.) तुच्छ, त्याज्य, टाकाऊ.
**किंचापि**–(अ.) कांहीही, कसेही, कितीही, पण, परंतु.
**किंचि**–(अ.) काही.
**किंचिक्ख**–(नपु.) तुच्छ, त्याज्य, कमी.
**किंजक्ख**–(पु., नपु.) रेणु, लहान कण.
**किट्ठ**–(नपु.) भाताचा कोंब, उगविणारा भात.
**किट्ठाद**–(वि.) भात खाणारा, भातखाऊ.
**किट्ठा-सम्बाध-समय**–(पु.) शेती पक्व होण्याची वेळ, सुगी.
**किणन्त**–(कृ.) विकत घेताना, खरेदी करताना.
**किणित्वा**–(पू. क्रि.) विकत घेऊन, खरेदी करून.
**किण्ण**–(कृ.) विसकटलेला, पसरलेला.
**किण्ण**–(नपु.) अंबवण–विरजण.
**कितव**–(पु.) ठग, भामटा, चोर, फसविणारा.
**कित्तक**–(स. ना.) किती, कोठेपर्यंत.
**कित्तन**–(नपु.) कीर्तन, प्रशंसा, स्तुती.
**कित्तावता**–(क्रि. वि.) कोठपर्यंत, कोणत्यासंबंधी, कोणत्याविषयी.
**कित्ति**–(स्त्री.) कीर्ती, प्रसिद्धी.
**कित्ति-घोस, कित्ति-सद्द**–(पु.) यश, कीर्ती.
**कित्ति मन्तु**–(वि.) यशस्वी, यशवन्त, विजय, कीर्तिमान.
**कित्तिम**–(वि.) कृत्रिम, मानवनिर्मित.
**कित्तेति**–(क्रि.) प्रशंसा करणे, स्तुती करणे.
**किन्नर**–(पु.) जंगलात राहणारी जात यक्ष-किन्नरादि (काल्पनिक), पक्षांची विशिष्ठ जात.
**किन्नरी**–(स्त्री.) किन्नर स्त्री, किन्नराची बायको-पत्नी.
**किपिल्लिका**–(स्त्री.) मुंगी.
**किब्बिस**–(नपु.) अपराध, गुन्हा, चुक, आगळिक, अन्याय.
**किब्बिस कारी**–(पु., वि.) अपराधी, गुन्हेगार, अन्यायी.
**किमि**–(पु.) किडा, कृमी, जंतु.
**किमी-कुल**–(नपु.) किड्यांचा समूह.
**किमक्खायी**–(वि.) कोणत्या उपदेशाचा उपदेशक, उपदेश करणारा.
**किमत्थं**–(क्रि. वि.) कशासाठी, कशाकरिता.
**किमत्थिय**–(वि.) कोणत्या उद्देशाने.
**किमपक्क फल**–(नपु.) आंब्यासारखे पण विषारी फळ.
**किम्पुरिस**–(पु.) [किन्नर पहा.]
**किंसुकोपम जातक**–भगवान बुद्धाने चार भिक्खुंना चार वेगवेगळी कार्यस्थळे दिली. त्या चारही भिक्खुंनी आपापल्या कार्यांनी अर्हत पदांचा लाभ करून घेत-ल्याची कथा–(२४८).
**किंच्छन्द जातक**–लाच घेणाऱ्या ब्राह्मण न्यायाधिशांची कथा–(५११).
**किर**–(अ.) वास्तविक, सत्य, खरे, प्रकाश किरण.
**किरण**–(पु., नपु.) सूर्य किंवा चंद्राचा प्रकाशस्रोत.
**किरति**–(क्रि.) विसकटणे, पसरणे, फेकणे.
**किरात**–(पु.) जंगली जात.
**किरिय**–(नपु.) क्रिया, कार्य, काम.
**किरियवाद**–(पु.) कर्मफलावर विश्वास.
**किरियवादी**–(पु.) कर्मफलावर विश्वास ठेवणारा.
**किरीट**–(नपु.) राज मुकुट.
**किलञ्जा**–(स्त्री.) चटई.
**किलन्त**–(कृ.) दमलेला, थकलेला.
**किलमति**–(क्रि.) थकणे, दमणे.
**किलमथ**–(पु.) थकवा, दम.
**किलमन्त**–(कृ.) थकताना, दमताना.
**किलमित**–(कृ.) दमलेला, थकलेला.
**किलमेति**–(क्रि.) थकणे, दमणे.
**किलास**–(पु.) स्पर्शजन्य रोग, त्वचा रोग, कोड.
**किलिट्ठ**–(कृ.) मळलेला, डागाळलेला.
**किलिन्न**–(कृ.) भिजलेला.
**किलिस्सति**–(क्रि.) डाग लागणे, दूषित होणे, अशुद्ध होणे.
**किलिस्सन**–(नपु.) मळणे, डागाळणे.

**किलेस**–(पु.) कामुकता, कामवासनेने प्रेरित, कामी, क्लेश.

**किलेसक्खय**–(पु.) काम वासनेचा क्षय, अंत, नाश, क्लेश क्षय.

**किलेसप्पहाण**–(पु.) कामुकतेचा नाश.

**किलेस-वत्थु**–(नपु.) आसक्तीस पात्र.

**किलेसेति**–(क्रि.) दोष देणे, डाग लावणे, दोषारोपन करणे.

**किलोमक**–(नपु.) फुप्फुसाचे आवरण.

**किस**–(वि.) कृश, अशक्त, दुबळा, रोड.

**किं**,–(स. ना.) काय.

**को**–(पु.) कोण, कोणता (पुरुष).

**का**–(स्त्री.) कोणती (स्त्री).

**कं**–(नपु.) कोणत्या (वस्तुस), कोणास.

**किं कारण**–(क्रि. वि.) कोणत्या कारणाने.

**किं वादी**–(वि.) कोणत्या मताचा.

**कीट**–(पु.) किडा, कीटक, जंतू.

**कीत**–(कृ.) खरेदी केलेला, विकत घेतलेला.

**कीदिस**–(वि.) कसा, कसला, कोणत्या प्रकारचा.

**कीर**–(पु.) पोपट, राघू.

**कील**–(पु.) खुंटा, खांब.

**कीव**–(अ.) किती, केव्हापर्यंत, किती वेळ.

**कीवतिक**–(वि.) किती.

**कीळति**–(क्रि.) खेळणे.

**कीळनक**–(नपु.) खेळणे, खेळण्याची वस्तु.

**कीळना**–(स्त्री.) विनोद, आनंद, मजा.

**केळी**–(स्त्री.) रतिक्रीडा, संभोग, मिथून, मैथुन.

**कीळा**–(स्त्री.) क्रीडा, खेळ.

**कीळा-गोळक**–(नपु.) खेळण्याचा चेंडू.

**कीळा-पसुत**–(वि.) खेळात गुंतलेला, खेळत असलेला, खेळात हजर, खेळात प्रस्तुत.

**कीळा-भण्डक**–(नपु.) खेळण्याची वस्तु, खेळण्याचे भांडे.

**कीळा-मण्डल**–(नपु.) क्रीडा-भूमी, खेळाचे मैदान, क्रीडांगण.

**कीळा-पनक**–(वि.) खिलाडी, खेळाडू.

**कीळा-पनक**–(नपु.) खेळणे, वस्तु.

**कीळापेति**–(क्रि.) खेळविणे.

**कीळित**–(कृ.) खेळलेला.

**कुकुत्थक**–(पु.) (एक प्रकारचा पक्षी) कोंबडा, कुक्कुट.

**कुक्कु**–(पु.) हाताचे माप.

**कुक्कु जातक**–बनारसचा राजा ब्रह्मदत्त यास समजून सांगण्यासाठी दिलेल्या अनेक उपमायुक्त कथा–(३९६).

**कुक्कुच्च**–(नपु.) पश्चाताप, मागुन-नंतर दुःख होणे, कौकृत्य.

**कुक्कुचायति**–(क्रि.) पश्चाताप करणे.

**कुक्कुट**–(पु.) कोंबडा.

**कुक्कुट जातक**–एका मांजरीने एका कोंबड्यास त्याची बायको बनण्याचे खोटे आमिष दाखवून फसविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या प्रयत्नात मांजरीला यश आले नसल्याची कथा–(३८३).

**कुक्कुट जातक**–एका बाज पक्षाने (बहिरी ससाण्याने) कोंबडीस फसविण्याची कथा–(४४८).

**कुक्कुटी**–(स्त्री.) कोंबडी.

**कुक्कुर**–(पु.) कुत्रा.

**कुक्कुर वतिक**–(वि.) कुत्र्याच्या वृत्तीचा.

**कुक्कुर जातक**–बनारसच्या राजाने आपल्या पाळलेल्या कुत्र्याच्या अपराधामुळे इतर सर्व निपराध कुत्र्यांना मारून टाकण्याची आज्ञा दिलेली कथा–(२२).

**कुक्कुळ**–(पु.) गरम राख, उष्ण राख.

**कुंकुळ**–(नपु.) केशर, कुंकू.

**कुच्छि**–(पु.) पोट, उदर.

**कुच्छिट्ठ**–(वि.) पोटांत असलेला, गर्भ.

**कुच्छिदाह**–(पु.) पोट दुखी.

**कुच्छित**–(कृ.) कुत्सित, घृणित, तिरस्कारयुक्त.

**कुज**–(पु.) वृक्ष, मंगलग्रह.

**कुज्झति**–(क्रि.) रागावणे, क्रोधित होणे.

**कुज्झन**–(नपु.) क्रोध, राग.

**कुज्झित्वा**–(पू. क्रि.) क्रुद्ध होऊन, रागावून.

**कुञ्चनाद**–(पु.) क्रौंचनाद, हत्तीचे ओरडणे.

**कुञ्चिका**–(स्त्री.) चावी, किल्ली, हत्या.

**कुञ्चिकाविवर**–(नपु.) चावीचे छिद्र.

**कुञ्चित**–(कृ.) वाकविलेला, वळविलेला.

**कुञ्ज**–(नपु.) वेलींचा मांडव, लता मंडप.

**कुञ्जर**–(पु.) हत्ती..

**कुट**–(पु., नपु.) पाण्याचे भांडे, जलपात्र.

**कुटज**–(पु.) औषध, दवा, वनौषधि, वनस्पति (कुरैया).

**कुटि**–(स्त्री.) झोपडी.

**कुटि दूसक जातक**–बया पक्षिणीने (कोष्टीने) पावसांत भिजलेल्या वानरास उपदेश करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या वानराने तिचे घरटेच उध्वस्त करून टाकल्याची कथा–(३२१).

**कुटिल**–(वि.) वाकडा.
**कुटिलता**–(स्त्री.) वाकुडपणा, वाकडेपणा.
**कुटुम्ब**–(नपु.) परिवार.
**कुटुम्बिक**–(पु.) घरचा कर्तापुरुष, कारभारी, प्रमुख.
**कुट्ठ**–(नपु.) कुष्ट, एक प्रकारचे रोप.
**कुट्ठी**–(पु.) कोढी, महारोगी, कुष्टरोगी.
**कुठारी**–(स्त्री.) कुऱ्हाड.
**कुडुब**–(पु.) १/५ शेर, शेराचा पांचवा भाग.
**कुडुमल**–(पु.) कोंब, अंकूर, मुकुल.
**कुड्ड**–(नपु.) भिंत.
**कुणप**–(पु.) मृतदेह, मढे, प्रेत.
**कुणपगन्ध**–(पु.) सडलेल्या प्रेताचा वास, दुर्गंध.
**कुणाल**–(पु.) कोयल, कोकीळ.
**कुणाल**–(पु., विशे. ना.) सम्राट अशोकचा पुत्र.
**कुणाल जातक**–कोकीळांच्या कुणाल नांवाच्या राजाची कथा–(५३६).
**कुणी**–(पु., वि.) लंगडा.
**कुण्ठ**–(वि.) बोथरा, दात पडलेला, बोथट.
**कुण्ठेति**–(क्रि.) कुंठित करणे, गुंग करणे, आश्चर्यचकित करणे, भुलविणे.
**कुण्डक**–(नपु.) तांदूळाचे पीठ.
**कुण्डक-पूव**–(नपु.)तांदूळाच्या पिठीची पुरी,तळलेली रोटी.
**कुंडल**–(नपु.) कानातील पाळी, कर्णभूषण.
**कुंडलकेस**–(वि.) कुरळे केस.
**कुंडली**–(वि.) ज्याच्या कानात बाळी आहे किंवा ज्याचे केस कुरळे आहेत, असा.
**कुण्डिका**–(स्त्री.) कुंडी, मातीचे उथळ भांडे.
**कुतुहल**–(नपु.) उत्तेजना, औत्सुक्य, कुतुहल.
**कुतो**–(क्रि. वि.) कोठून ?
**कुत्त**–(नपु.) आचरण, वागणे, वर्तन, नखरा.
**कुत्तक**–(नपु.) मोठा गालीचा.
**कुत्ति**–(स्त्री.) सजावट, कृति.
**कुत्थ, कुत्र**–(क्रि. वि.) कोठे ?
**कुथित**–(कृ.) उसळलेले, शिजवलेले.
**कुदस्सु**–(अ.) केव्हा ?
**कुदाचन, कुदाचनं**–(अ.) केव्हा, कोणत्या वेळी.
**कुद्दाल**–(पु.) कुदळ, टिकाव, खणण्याचे औजार.
**कुद्दाल जातक**–कुद्दाल पंडित आपल्या कुदालीच्या (पत्नीच्या) अति आसक्तीने सहा वेळा गृहस्थाश्रमी बनला आणि सहा वेळा प्रापंचिक यातना असह्य होऊन संन्यासी झाल्याची कथा–(७०).

**कुद्ध**–(कृ.) क्रुद्ध, रागावलेला, तापलेला.
**कुदरूसक**–(पु.) एक प्रकारचे धान्य, तांदळातील कुदरू.
**कुन्त**–(पु.) भाला, एक प्रकारचा पक्षी.
**कुन्तनी**–(स्त्री.) सारस, बगळा, (पाण्यातील).
**कुन्तनी जातक**–एका मुलाने बगळीणीची दोन पिल्ली मारली म्हणून बगळीणीने सिंहाला सांगून त्या मुलास ठार मारविले, आणि आपण स्वत. हिमालयात गेल्याची कथा–(३४३).
**कुन्तल**–(पु.) केस, केश-राशि.
**कुन्थ**–(पु.) मुंगी.
**कुन्द**–(नपु.) जुईसारखे पांढरे फूल.
**कुन्नदी**–(स्त्री.) लहान नदी.
**कुपथ**–(पु.) कुमार्ग, वाईट मार्ग, चुकीचा मार्ग, वाईट वर्तन.
**कुपित**–(कृ.) क्रुद्ध, रागावलेला.
**कुपुरिस**–(पु., वि.) दुष्ट माणूस, वाईट माणस, कुपुरुष.
**कुप्प**–(वि.) अस्थिर, चंचल, स्वच्छंदी.
**कुप्पति**–(क्रि.) रागावणे, क्रोधित होणे. उत्तेजन देणे..
**कुप्पन**–(नपु.) क्रोध, राग, उत्तेजना.
**कुब्बति**–(क्रि.) करणे.
**कुब्बनक**–(नपु.) छोटे जंगल, लहान अरण्य.
**कुब्बन्त**–(कृ.) करत असलेला.
**कुब्बर**–(स्त्री.) गाडीच्या चाकाची अरी.
**कुमति**–(स्त्री.) दुःष्ट बुद्धि, वाईट दृष्टि, वाईट विचार.
**कुमार**–(पु.) मुलगा.
**कुमार-कीळा**–(स्त्री.) बाल-लीला, बाल-क्रीडा, मुलाचा खेळ.
**कुमार पञ्ह**–(पु. विशे. ना.) खुद्दक निकायातील (सुत्त-पिटक) चौथा भाग. कुमार प्रश्न. सात वर्षाच्या सोपाक नांवाच्या अर्हत पद प्राप्त मुलाने विचारलेले प्रश्न.
**कुमारिका**–(स्त्री.) कुमारी, लग्न न झालेली मुलगी, कुमारिका.
**कुमुद**–(नपु.) श्वेत कमळ, शुभ्र कमळ, पांढरे कमळ.
**कुमुदणाल**–(नपु.) श्वेत कमळाची नलिका, शुभ्र कमळाचा देठ.
**कुम्भ**–(पु.) घडा, मातीची घागर, मडके.
**कुम्भक**–(नपु.) जहाजाचा सुकाणू, मध्य खांब.
**कुम्भकार**–(पु.) कुंभार, मातीच्या वस्तु बनविणारा.
**कुम्भकार जातक**–बोधिसत्व कुंभाराच्या कुळांत (वंशात) जन्म घेऊन पुढे त्याने गृहत्याग केल्याची कथा–(४०८).

**कुम्भकार-साला**–(स्त्री.) कुंभारवाडा, कुंभारशाळा.
**कुम्भ-दासी**–(स्त्री.) पाणी भरणारी दासी, सेविका.
**कुम्भ-जातक**–दारूची आरंभीची कथा–(५१२).
**कुम्भण्ड**–(पु.) दिव्यलोक.
**कुम्भण्ड**–(नपु.) कद्दू, दुधी भोपळा.
**कुम्भी**–(स्त्री.) भांडे, कुंभी.
**कुम्भील**–(पु.) मगर, सुसर.
**कुम्म**–(पु.) कासव.
**कुम्मग्ग**–(पु.) कुमार्ग, वाईट वर्तन.
**कुम्मास**–(पु.) कुल्माष, दोष, डाग.
**कुम्मासपिण्ड जातक**–कुलमाष-पिंडदानाची कथा–(४१५).
**कुर**–(नपु.) भात.
**कुरण्डक**–(पु.) फुलझाड, फुलाचे रोप.
**कुरर**–(पु.) मासे खाणारा पक्षी, (बगळा) खंड्या.
**कुरु**–(नपु., विशे. ना.) प्राचीन भारतातील सोळा गणराज्यापैकी एक कुरू राज्य.
**कुरुंग**–(पु.) हरिणांची एक विशिष्ट जात. काळवीट.
**कुरुंग मिग जातक**–एका शिकाऱ्याने कुरूंग मृगाला फसवून मारण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या मृगाने (काळविटाने) त्याच्या फसवेगिरिवर मात करून आपला जीव वाचविल्याची गोष्ट–(२१).
**कुरुंग मिग जातक**–मृग (हरीण) लाकूडतोड्या व कासव यांची कथा–(२०६).
**कुरु-धम्म-जातक**–पंचशील अथवा कुरू–धम्मच्या पालनाने गणराज्य समृद्ध झाल्याची कथा–(२७६).
**कुरुमान**–(कृ.) करत असता.
**कुरुरट्ठ**–(नपु.) प्राचीन उत्तर भारतातील कुरूराष्ट्र.
**कुरूर**–(वि.) क्रूर, अत्याचारी.
**कुल**–(नपु.) जात, वंश, परिवार, गोत, कूळ.
**कुल-गेह**–(नपु.) आई-बापाचे घर, वडिलार्जित घर.
**कुलङ्गार**–(पु., वि.) करंटा, कुल-विनाशक.
**कुलतन्ति**–(स्त्री.) कुळ परंपरा, घराण्याची वहिवाट, रीत.
**कुल-दूसक**–(पु., वि.) कुलांगार, कुळाची बदनामी करणारा.
**कुल-धीता**–(स्त्री.) वंशातील मुलगी. कूळकन्या.
**कुल-पुत्त**–(पु.) कूळपुत्र, वंशातील मुलगा.
**कुल-वंस**–(नपु.) वंश परंपरा.
**कुलटा**–(स्त्री.) दुःष्ट स्त्री., कुळाला बट्टा लावणारी.
**कुलत्थ**–(पु.) विशिष्ट झाड.
**कुल-पालिका**–(स्त्री.) कुळाचे पालन करणारी, कर्ती स्त्री.
**कुलल**–(पु.) बाज, बाहरी ससाणा.
**कुलाल**–(पु.) कुंभार.
**कुलाल चक्क**–(नपु.) कुंभाराचे चाक.
**कुलावक जातक**–गावातील एकोणतीस कुटुंबाचा प्रमुख (कर्ता) म्हणून "मध" याने केलेल्या समाज सेवेची कथा–(३१).
**कुलिस**–(नपु.) वज्र, (इंद्राचे हत्यार) गदा.
**कुलीन**–(वि.) श्रेष्ठ कुलातील, कुलवंत, कुलीन.
**कुलीर**–(पु.) खेकडा, कर्क.
**कुलूपग**–(वि.) परिवाराच्या ओळखीचा.
**कुल्ल**–(पु.) वेढा, घेराव.
**कुवलय**–(नपु.) पाण्यातील कमळ, जल कमळ.
**कुवेर**–(पु.) यक्षाधिपति, यक्षांचा राजा.
**कुस**–(पु.) कुश, दर्भ, गवताची काडी.
**कुसग्ग**–(नपु.) कुशाग्र, दर्भाचे टोक.
**कुसचीर**–(नपु.) गवताने विणलेले, चटई, गवती वस्त्र.
**कुस जातक**–स्त्री आसक्त (विषयलंपट) झालेल्या एका भिक्खुला सावध (परावृत्त) करण्यासाठी सांगितलेली कथा–(५३१).
**कुसल**–(नपु.) कुशल कार्य, शुद्ध कर्म.
**कुसल**–(वि.) शुभ कार्य, पवित्र कार्य, मंगल कार्य, कुशल.
**कुसल-चेतना**–(स्त्री.) शुभ-चिंतन.
**कुसल-धम्म**–(पु.) कुशल धर्म, (एकूण तीन धर्म मानले आहेत पैकी अकुशल धर्म आणि अव्याकृत धर्म).
**कुसल विपाक**–(पु.) शुभ कार्याचे फळ.
**कुसलता**–(स्त्री.) कुशलता, नैपुण्य, निपुणता, कौशल्य.
**कुसा**–(स्त्री.) नाकपुडी.
**कुसि**–(पु.) चीवराची (वस्त्राची) एक बाजू-कड.
**कुसीनारा**–(पु., विशे. ना.) मल्लांची राजधानी, कुशीनगर, (याच कुसीनारेस भगवान बुद्धाचे महापरिनिर्वाण झाले होते. तिथे आज निर्वाण मंदिर आहे.)
**कुसीत**–(वि.) आळशी, निरोद्योगी.
**कुसीतता**–(स्त्री.) आळस, मेद.
**कुसुम**–(नपु.) फूल.
**कुसुमित**–(वि.) फुललेले, प्रफुल्लित, पुष्पित.
**कुसुब्भ**–(नपु.) लहान तलाव.
**कुसुम्भ**–(नपु.) केशर, गंध.
**कुसूल**–(पु.) धान्यागार, कोठार.
**कुसेसय**–(नपु.) पद्म, कमळ.
**कुह, कुहक**–(वि.) ठग, ढोंगी.
**कुहक जातक**–एका ढोंगी साधूने श्रीमंत गृहस्थाची संपत्ती लुटण्याचा प्रयत्न केल्याची कथा–(८९).

कुहण–(नपु.) ढोंग.
कुहणा–(स्त्री.) ढोंग करणारी, ढोंगी स्त्री.
कुहर–(नपु.) छिद्र, भोक.
कुहिं–(क्रि. वि.) कोठे ?
कुहेति–(क्रि.) फसणे.
कूजति–(क्रि.) कुंजन करणे, गुणगुणणे, आवाज काढणे.
कूजंत–(कृ.) गुणगुणतो.
कूट–(वि.) मिथ्या, खोटा, असत्य.
कूट-गोण–(पु.) दुष्ट बैल, मारका बैल, अवखळ बैल.
कूट-अट्ट–(नपु.) खोटा आरोप.
कूट-अट्टकारक–(पु.) खोटा आरोप करणारा, खोटा आरोप दाखल करणारा.
कूट-जटिल–(पु.) ढोंगी तपस्वी, ढोंगी संन्याशी.
कूट वाणिज–(पु.) फसवा व्यापारी, ठग व्यापारी.
कूट वाणिज जातक–पंडित आणि अपंडित अशा दोन नावांच्या व्यापाऱ्यांची कथा–(९८).
कूट वाणिज जातक–एका सद्गृहस्थाने आपल्या व्यापारी मित्राकडे स्वतःचा लोखंडी नांगर ठेवण्यास दिला होता व कांही दिवसांनी तो नांगर परत आणण्यास गेला असता व्यापाऱ्याने सांगितले की, नांगर उंदरांनी खाल्ला ही कथा–(२१८).
कूटागार–(नपु.) शिखर असलेली इमारत.
कूप–(पु.) विहीर, आड.
कूपक–(पु.) मस्तूल, पाण्यातील प्राणी, अज्ञ.
कूल–(नपु.) किनारा, काठ, तीर.
केका–(स्त्री.) मोराचा आवाज, मोराचा टाहो.
केणिपात, केनिपात–(पु.) नावेचे वल्हे.
केतकी–(स्त्री.) केवडयाचे झाड, याची पाने काटेदार असतात (घायाळ, घायपात).
केतन–(नपु.) पताका, झेंडा, निशाण.
केठब–(नपु.) शठता, मूर्खपणा.
केतु–(पु.) झेंडा, पताका, निशाण.
केतु-कम्यता–(स्त्री.) महत्त्वाकांक्षा, मोठेपणाची हाव-इच्छा.
केतुं–(क्रिया) खरेदीसाठी, विकत घेण्याकरिता.
केदार–(पु., नपु.) शेत.
केदार-पाळि–(स्त्री.) दोन शेतांमधील बांध.
केयूर–(नपु.) बाजूबंद.
केय्य–(वि.) खरेदीस योग्य, विकत घेण्यायोग्य.
केराटिक–(वि.) ठग, ढोंगी, फसवा.
केराटिय–(नपु., विशे. ना.) ठगी, ढोंगी.
केलास–(पु., विशे. ना.) कैलास पर्वत, कैलास शिखर.
केळि–(स्त्री.) रासक्रीडा, रतिक्रीडा, संभोग.
केळिसील जातक–विनोदी (हसऱ्या) राजाला इंद्राने लोकांच्या करमणुकीचे साधन बनविल्याची कथा–(२०२).
केवट्ट–(पु.) कोळी, मच्छिमार, भोई.
केवल–(वि.) एकान्त समस्त.
केवल कप्पं–(वि.) जवळ-जवळ सर्व, संपूर्ण.
केवल परिपुण्णं–(वि.) संपूर्ण, सर्व, सगळे.
केवलि–(वि.) पूर्णत्व प्राप्त, सर्वज्ञ, अर्हत.
केस–(पु.) डोक्याचा केस, केश, कच, कुंतल.
केसोहारक–(पु.) न्हावी.
केस कम्बल–(नपु.) लोकरीचे वस्त्र, घोंगडी, कांबळी.
केस कलाप–(पु.) केसांचा झुपका, केसाळ गोंडा.
केस-कल्याण–(नपु.) केसांचे सौंदर्य.
केस-धातु–(स्त्री.) भगवान बुद्धाचा पवित्र केस, जो भगवतांचा अवशेष म्हणून स्तूपात ठेवला जातो.
केसर–(नपु.) रेणु, आयाळ.
केसर-सीह–(पु.) केसरी, सिंह, वनराज.
केसव–(वि.) केसाळ, केस असलेला.
केसव–(पु.) केशव, वसुदेवाचा पुत्र, कृष्णाचे एक नाव.
केसव जातक–एका तपस्व्याला आजारीपणांतून राजवैद्यही बरा करू शकला नाही. शेवटी तो तपस्वी आपल्या शिष्यांच्या सहवासांत औषधाविना बरा झाल्याची कथा–(३४६).
केसोरोपन–(नपु.) केस कापणे, केश कर्तन, हजामत.
केसोहारण–(नपु.) केस कापणे.
को–(पु.) कोण.
कोक–(पु.) लांडगा.
कोकनद–(नपु.) लाल कमळ, तांबडे कमळ, रक्तवर्ण कमळ.
कोकिल–(पु.) कोकीळ.
कोचि–(अ.) कोणी.
कोच्छ–(नपु.) झाडू, झाडणी, खराटा, केरसुणी.
कोच्छ–(नपु.) खुर्ची, कोच.
कोज–(पु.) कवच.
कोजव–(पु.) गालिचा.
कोकालिक जातक–वाचाळ (बडबडया) राजास वाचाळतेपासून परावृत्त करण्यासाठी दिलेल्या उपदेशाची कथा–(३३१).
कोञ्च–(पु.) सारस, हंस.

**कोञ्चनाद**–(पु.) हत्तीचे ओरडणे.

**कोट**–(नपु.) शिखर.

**कोटच्चिका**–(स्त्री.) योनी, भग.

**कोटि**–(स्त्री.) शिखर, कोटी संख्या, करोड.

**कोटिप्पकोटि**–(स्त्री.) १०,०००,०००,०००,०००, ०००,०००,०० ही संख्या.

**कोटिप्पत**–(वि.) शेवटास पोहोचला, पूर्ण ज्ञान मिळाले, पूर्णत्त्व पावला.

**कोटिल्ल**–(नपु.) कुटिलता, वाकुडपण.

**कोटिसिम्बलि जातक**–गरुडाने एका नागावर झेप टाकून पकडले, नागाने एका वटवृक्षास विळखा घालून घट्ट धरून राहिला. परंतु गरुडाने नागासह त्या वटवृक्षास समूळ उपटून घेऊन भरारी मारल्याची कथा–(४१२).

**कोटुम्बर**–(नपु.) एक वस्त्र.

**कोट्टन**–(नपु.) कुटणे, चेचणे, बारीक करणे.

**कोट्ठ**–(पु.) कोठा, साठा, भांडार.

**कोट्ठागार**–(नपु.) धान्याचे कोठार, भांडार.

**कोट्ठारिक**–(पु.) कोठीवाला, कोठावळा, भांडारिक.

**कोट्ठासय**–(वि.) पोटात असलेला, उदरस्थ, पोटात राहणारा.

**कोट्ठक**–(पु.) द्वार, दरवाजा, दार.

**कोट्ठक**–(वि.) लपण्याचे ठिकाण, दडण्याची जागा.

**कोट्ठास**–(पु.) हिस्सा, भाग.

**कोण**–(पु.) कोपरा, टोक.

**कोण्डञ्ञ**–(नपु.) प्रसिद्ध ब्राह्मण, क्षत्रिय गोत्र.

**कोतूहल**–(नपु.) जिज्ञासा, उत्तेजना, जाणून घेण्याची इच्छा, कुतुहल.

**कोत्थु, कोत्थुक**–(पु.) कोल्हा.

**कोदण्ड**–(नपु.) धनुष्य.

**कोध**–(पु.) क्रोध, राग, तामस्य.

**कोधन**–(वि.) चंचल मन, अस्थिर चित्त, विचलित मन, असंयमी.

**कोप**–(पु.) क्रोध, राग, कोप.

**कोपनेय्य**–(वि.) रागीट, राग उत्पन्न करणारा.

**कोपी**–(वि.) क्रोधी, रागीट, तापट, तामसी.

**कोपीन**–(स्त्री.) लंगोटी.

**कोपेति**–(क्रि.) कोपणें, रागावणे, क्रोधित होणे.

**कोमल**–(वि.) नरम, मऊ, मृदु, तलम, कोमल.

**कोमार**–(वि.) कुमाराविषयी, कुमारासंबंधी.

**कोमारभच्च**–(नपु.) बाल-चिकित्सा, मुलांची आरोग्य-तपासणी.

**कोमारभच्च**–(नपु.) राजकुमाराने सांभाळलेला, पाळलेला, पोसलेला.

**कोमायपुत्त जातक**–कोमाय पुत्राने तपस्व्यांचा आश्रम हिरावून घेतला, व त्यांना निराश्रित केल्याची कथा–(२९९).

**कोमुदी**–(स्त्री.) चांदणे, चंद्रप्रकाश.

**कोरक**–(पु., नपु.) अंकूर, कोंब.

**कोरव्य, कोरब्य**–(वि.) कुरु वंशाचा, कुरू वंशातील.

**कोल**–(पु., नपु.) रसाळ, रसभरी.

**कोलक**–(नपु.) मिरची.

**कोलम्ब**–(पु.) मोठे भांडे.

**कोलाप**–(पु.) वाळून पोकळ झालेला वृक्ष.

**कोलाहल**–(नपु.) गोंधळ, आरडाओरड.

**कोलित**–(पु.) मोद्गलायन स्थविराचे गृहस्थी नाव.

**कोलिय**–(स्त्री., विशे. ना.) शाक्याप्रमाणे प्राचीन भारतातील एक जात–
(शाक्य आणि कोलिय यांच्यात नेहमी तंटे होत).

**कोलेय्यक**–(वि.) जातीवंत कुत्र्यांची विशिष्ठ जात.

**कोविद**–(वि.) पण्डित, यक्ष, कोविद.

**कोस**–(पु.) भांडार, कोठा, साठा, खजीना, म्यान.

**कोसक**–(पु.,नपु.) पाणी पिण्याचे भांडे, फुलपात्र.

**कोसज्ज**–(नपु.) आळस.

**कोसम्बी**–(स्त्री.,विशे. ना.) प्राचीन भारतातील वत्स देशाची राजधानी.

**कोसल**–(पु.) प्राचीन भारतातील कोशल गणराज्य.

**कोसल्ल**–(नपु.) कौशल्य, निपुणता, प्राविण्य.

**कोसारक्ख**–(पु.) खजीनदार.

**कोसिक**–(पु.) कौशिक, घुबड.

**कोसिनारक**–(वि.) कुशिनारासंबंधी.

**कोसिय जातक**–एक ब्राह्मण स्त्री दिवसा आपण आजारी असल्याचे सांगून झोपून राही आणि रात्रभर मौजमजा करत असल्याची कथा–(१३०).

**कोसिय जातक**–कावळ्यानी घुबडाला आकांत (धुत्कार) करावयास लावलेली कथा–(२२६).

**कोसी**–(स्त्री.) म्यान.

**कोसोहित**–(वि.) अंडे, अंड्यातील कोश.

**कोहञ्ञ**–(नपु.) ढोंग, सोंग, नकली रूप.

**क्व**–(अ.) कोठे ?

**क्वचि**–(अ.) काही.

## ख

**ख**–नागरी वर्णमालेतील "क" वर्गातील दुसरे अक्षर.

**ख**–(नपु.) आकाश., आभाळ, गगन, नभ.

**खग**–(पु.) पक्षी.

**खगन्तर**–(पु.) सुतारपक्षी.

**खगादि**–(पु.) पक्षीगण.

**खगादिबन्धन**–(पु.) पक्षी पकडण्याचे जाळे.

**खग्ग**–(पु.) खड्ग, तलवार, समशेर.

**खग्ग-कोस**–(पु.) तलवारीचे म्यान.

**खग्गगाहक**–(पु.) तलवार धारी, खड्गधारी.

**खग्गतल**–(नपु.) तलवारीचे पान.

**खग्गधर**–(पु.) तलवार धारी.

**खग्गविसाण**–(पु.) गेंडा.

**खचति**–(क्रि.) जडविणे, घडविणे, कोंदणात बसविणे, (अंगठीत खडा बसविणे).

**खज्ज**–(वि.) खाद्य.

**खज्ज**–(नपु.) खाजा, (मिठाईतील पदार्थ).

**खज्जकन्तर**–(नपु.) अनेक मिठाई.

**खज्जु**–(स्त्री.) खाज.

**खज्जूरी**–(स्त्री.) खजूर.

**खज्जोपनक**–(पु.) काजवा.

**खञ्ज**–(वि.) लंगडा, अपंग.

**खञ्जति**–(क्रि.) लंगडणे.

**खञ्जन**–(नपु.) लंगडे करणे.

**खञ्जन**–(पु.) पक्षी.

**खटक**–(पु.) मूठ.

**खण**–(पु.) क्षण, थोडा वेळ, अवसर, (अल्प समय).

**खणेन**–(क्रि. वि.) क्षणात, फार थोड्या वेळात.

**खणातीत**–(वि.) जो वेळेत चुकला, क्षणार्धात, अल्पावधीत.

**खणति**–(क्रि.) खोदणे, खणणे, उकरणे.

**खणन**–(नपु.) खोदण्याची क्रिया.

**खणिक**–(वि.) क्षणिक, थोड्या वेळेचा.

**खणित्ती**–(स्त्री.) कुदळ, खणण्याचे हत्यार.

**खण्ड**–(पु.) खंड, तुकडा, हिस्सा, भाग.

**खण्ड-दन्त**–(वि.) दांत तुटलेले, किडक्या दातांचा.

**खण्ड-फुल्ल**–(नपु.) खिंडार, जुने इमारतीचे अवशेष, पडलेले घर.

**खण्डन**–(नपु.) तुटणे, तोडणे, तुटके असणे.

**खण्डहाल जातक**–स्वार्थी व लाचखाऊ पुरोहित ब्राह्मणाने राजपुत्राची हत्या करविली ही कथा–(५४२).

**खण्डाखण्ड**–(वि.) तुकडे, छिन्न-विच्छिन्न.

**खण्डिका**–(स्त्री.) तुकडा, लहान भाग.

**खण्डिच्च**–(नपु.) तुकडा पडणे, मोडणे, तुटणे.

**खण्डेति**–(क्रि.) तोडतो, तुकडे करतो.

**खत**–(कृ.) खणलेला, उकरलेला, घायाळ, जखमी.

**खत्त**–(नपु.) शासन, अधिकार, सत्ता.

**खत्त-धम्म**–(पु.) क्षात्र धर्म, राजनीती.

**खत्तिय**–(पु.) क्षत्रिय.

**खत्तिय**–(वि.) क्षत्रिय वर्णाचा.

**खत्तिय कञ्ञा**–(स्त्री.) क्षत्रीय-कन्या, क्षत्रियाची मुलगी.

**खत्तिय कुल**–(नपु.) क्षत्रिय-कूल, क्षत्रिय वंश.

**खत्तिय परिसा**–(स्त्री.) क्षत्रिय परिषद, क्षत्रियांची सभा.

**खत्तिय महासाल**–(पु.) सर्वश्रेष्ठ क्षत्रिय, क्षत्रियांची शाळा, सैनिक शाळा.

**खत्तिय-सुखुमाल**–(वि.) राजबिंडा, राजकुमारासारखा देखणा व कोमल.

**खत्तिया, खत्तियानी**–(स्त्री.) क्षत्रियानी, क्षत्रिय स्त्री.

**खत्तु**–(पु.) सारथी, राजाचा सल्लागार.

**खदिर**–(पु.) बाभूळ.

**खदिराङ्गार**–(पु.) बाभळी लाकडाचा विस्तव.

**खदिराङ्गार जातक**–एका श्रीमंताने जळत्या खाईत उडी घेण्याचा धोका पत्करूनही दान देण्याची इच्छा प्रदर्शित केल्याची कथा–(४०).

**खन्ति**–(स्त्री.) सहनशीलता, क्षमा.

**खन्तिबल**–(नपु.) सहनशक्ती.

**खन्तिमन्तु**-(वि.) सहनशील, सोशिक, क्षमाशिल.

**खन्तिक**–(वि.) विशिष्ट मत, विचार.

[**अन्य खन्तिक**–(वि.) दुसऱ्या मताचा, वेगळ्या विचाराचा.]

**खन्तिवण्ण जातक**–एका (राजदरबारी) मंत्र्याने राजाच्या महालात गडबड केली. त्याच मंत्र्याच्या घरांत त्याच्या नोकराने गडबड केली (अनैतिक वर्तन), तेव्हा मंत्र्याने राजाकडे या बाबतीत तक्रार केली. त्यावेळी राजाने मंत्र्यास सहनशील राहण्याचा उपदेश केल्याची कथा–(२२५).

**खन्ति वादी जातक**–कलाबु नावाच्या राजाने एका संन्याशाच्या शरिराचे लचके तोडावयास लावले तरी त्या संन्याशाने शेवटपर्यंत संयम पाळला व सर्व कष्ट सहन केल्याची कथा–(३१३).

**खन्तु**–(पु.) क्षमाशील.

**खन्ध**–(पु.) स्कंध, झाडाचे खोड, ढीग, परिच्छेद, रूप, वेदनादि पांच स्कंध.

**खन्ध-पञ्चक**–(नपु.) रूप, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान यांचा समूह.

**खन्धक**–(पु.) विभाग, परिच्छेद, भाग.

**खन्धकोट्ठास**–(पु.) शरिराचा अवयव.

**खन्धदेस**–(नपु.) आसन, बैठक.

**खन्धवत्त जातक**–नियमितपणे मित्रत्वाच्या भावनेने सर्वांशी वागणाऱ्यास सर्पदंशसुद्धा होऊ शकत नसल्याची कथा–(२०३).

**खन्धावार**–(पु.) छावणी, तळ.

**खम**–(वि.) क्षमाशील, दयावंत.

**खमति**–(क्रि.) क्षमा करणे.

**खमन**–(नपु.) क्षमा, माफी.

**खमापन**–(नपु.) क्षमा–याचना करणे.

**खमापेति**–(क्रि.) क्षमा करणे.

**खमितब्ब**–(कृ.) क्षमा करण्यायोग्य.

**खमित्वा**–(पू. क्रि.) क्षमा करून.

**खम्भकत**–(वि.) कमरेवर हात ठेवून उभा.

**खय**–(पु.) क्षय, नाश.

**खयानुपस्सना**–(स्त्री.) जगाचे परिवर्तन, नित्य बदल नित्यनूतन, जगात नेहमी बदल होते याचे ज्ञान.

**खर**–(वि.) कठोर, तीक्ष्ण, दुःखद.

**खर**–(पु) गाढव, दुष्ट.

**खरपुत्त जातक**–राजाने गावातील मुलांपासून नागाचे रक्षण केल्याची कथा–(३८६).

**खरत्त**–(नपु.) कठोरता.

**खरादीय-जातक**–मृग मामा पासून भाचा मृगाने प्राण-रक्षणाची कला शिकला नाही, ही कथा–(१५).

**खल**–(नपु.) खळे, धान्य मळण्यास तयार केलेली जागा.

**खलग्ग**–(नपु.) मळणी, भात सडणी.

**खलति**–(क्रि.) स्खलित होणे. स्खलन, पडणे, गळणे. लटपटणे.

**खलित**–(नपु.) स्खलन, अपराध.

**खलीन**–(पु.) घोडयाचा लगाम.

**खलु**–(अ.) वास्तव्य, खरा, सत्य.

**खलुङ्क**–(पु.) पहाडी घोडा.

**खल्लाट**–(वि.) टक्कल, खवडे डोके, केस नसलेले.

**खलोपि**–(स्त्री.) भांडे.

**खळ**–(वि.) कठोर, निर्दयी.

**खळ**–(पु.) दुःष्ट मनुष्य, खल.

**खाणु**–(पु.) झाडाचा बुंधा.

**खात**–(कृ.) खणलेला, उकरलेला.

**खादक**–(वि.) खाणारा.

**खादति**–(क्रि.) खाणे.

**खादन**–(नपु.) खाद्य, भोजन, जेवण, स्वयंपाक.

**खादनीय**–(वि.) खाण्यास योग्य.

**खादनीय**–(नपु.) मिठाई, गोड पदार्थ.

**खादापन**–(नपु.) खाऊ घालणे, चारणे, भरविणे.

**खादापित**–(कृ.) खाऊ घातले, खावयास लावले.

**खादापेति**–(क्रि.) खाऊ घालणे, चारणे.

**खादित**–(कृ.) खाल्ले, खाऊन झाले.

**खादितब्ब**–(कृ.) खाण्यायोग्य, खाद्य.

**खादितुं**–(कृ.) खाण्यासाठी, खाण्यास, खाण्या-करिता.

**खायति**–(क्रि.) खाल्याचे माहित होणे, समजणे, कळणे.

**खायित**–(वि.) खाल्लेला.

**खार**–(पु.) क्षार, खारट.

**खारी**–(स्त्री.) शिक्यावरील टोपली. बुट्टी.

**खारी-काज**–(पु.,नपु.) शिंके व टोपली.

**खालेति**–(क्रि.) धुणे, चूळ भरणे.

**खिड्डा**–(स्त्री.) क्रीडा, खेळ.

**खिड्डा-पदोसिक**–(वि.) खेळून बिघडलेला, खेळून खराब झालेला.

**खिड्डारति**–(स्त्री.) खेळात गुंग, खेळात मग्न.

**खित्त**–(कृ.) फेकलेला, टाकलेला.

**खित्त-चित्त**–(वि.) विक्षिप्त मन, विक्षिप्त चित्त.

**खिप**–(पु.) जाळे, पसरलेली वस्तु.

**खिपति**–(क्रि.) पसरणे, फेकणे, टाकणे.

**खिपन**–(नपु.) फेक, टाक, पसर.

**खिपित**–(कृ.) टाकलेले, फेकलेले, पसरलेले.

**खिप्प**–(वि.) शीघ्र, ताबडतोब, क्षिप्र.

**खिल**–(नपु.) कठोरता, कठोरपणा.

**खीण**–(कृ.) क्षीण, नाश पावत चाललेला, कमी झालेला.

**खीण-मच्छ**–(वि.) मासे नसलेला.

**खीण-बीज**–(वि.) निर्जीव-बीज, ज्याची पुन्हा उत्पत्ति नाही.

**खीणासव**–(वि.) ज्याचे आश्रव क्षीण-कमी झालेत, मनांतील मळ कमी झालेत.

**खीयति**–(क्रि.) क्षय होणे, नष्ट होणे, संपणे.

**खीर**–(नपु.) क्षीर, दूध.

**खीरण्णव**–(पु.) पांढरा समुद्र, दुधाचा साठा, क्षीरार्णव.
**खीरपक**–(वि.) स्तनातील दूध पिणारा.
**खीरोदन**–(नपु.) दूध-भात.
**खील**–(पु.) खांब, मोठा खुंटा, अडसर.
**खुंसेति**–(क्रि.) शिवी देणे, अवाच्य बोलणे.
**खुज्ज**–(वि.) कुबडा, खुजा, कमी उंचीचा.
**खुदा**–(स्त्री.) भूक, क्षुधा.
**खुद्दक**–(वि.) लहान, तुच्छ.
**खुदक निकाय**–(पु., विशे. ना.) पाच निकायापैकी एक निकाय.
**खुद्दक पाठ**–(पु., विशे. ना.) खुद्दक निकायातील पहिली पुस्तिका, लहान ग्रंथ-खुद्दक पाठ.
**खुद्दा**–(स्त्री.) पोळयातील लहान मधमाशी, क्षूद्रा.
**खुद्दानु खुद्दक**–(वि.) लहान-मोठे, छोटे-मोठे.
**खुप्पिपासा**–(स्त्री.) भूक-तहान.
**खुभति**–(क्रि.) क्षुब्ध होणे, रागावणे.
**खुर**–(नपु.) न्हाव्याचा वस्तरा.
**खुर**–(नपु.) जनावरांच्या पायाची नखी.
**खुरग्ग**–(नपु.) केश कर्तनालय, मुंडण करण्याचे ठिकाण.
**खुर कोस**–(पु.) वस्तरा ठेवण्याचे म्यान-पिशवी.
**खुर चक्क**–(नपु.) वस्तऱ्याप्रमाणे धारदार चक्र.
**खुर-धारा**–(स्त्री.) वस्तऱ्याची धार.
**खुर-भण्ड**–(नपु.) न्हाव्याची धोपटी, न्हाव्याचे सामान.
**खुर-मुण्ड**–(वि.) क्षौर, मुंडण केलेले डोके.
**खुरप्प**–(पु.) एक प्रकारचा बाण.
**खुरप्प जातक**–व्यापारी जंगलातून जात असता व्यापारी व वाटाडया यांच्यावर डाकूनी आक्रमण केल्याची कथा–(२६५).
**खेट**–(स्त्री.) ढाल.
**खेटक**–(नपु.) ढाल.
**खेत्त**–(नपु.) क्षेत्र, शेत, जमीन.
**खेत्तोपम**–(नपु.) शेतासारखे, जमिनीसारखे.
**खेत्त कम्म**–(नपु.) शेती, शेतीचे काम, कृषि-कर्म.
**खेत्त गोपक**–(पु.) शेताचा राखणदार.
**खेत्त सामिक**–(पु.) शेताचा धनी, शेतांचा स्वामी. मालक.
**खेत्ताजीव**–(पु.) शेतकरी, कृषक.
**खेद**–(पु.) दु:ख पश्चाताप, खेद.
**खेप**–(पु.) फेक.
**खेपक**–(पु.) धनुर्धारी, फेकणारा.
**खेपन**–(नपु.) कालक्षेप, कालक्रमण.
**खेपेति**–(क्रि.) कालक्रमण करणे, जीवन जगणे, चरितार्थ करणे.
**खेम**–(वि.) क्षेम, शांती, कुशल, कल्याण.
**खेमट्ठान**–(नपु.) शांति-स्थान, शांत ठिकाण, कल्याण-स्थान.
**खेमप्पत्त**–(वि.) क्षेम प्राप्त, शांति मिळालेला.
**खेम भूमि**–(स्त्री.) कल्याण भूमि, फायद्याचे ठिकाण.
**खेमी**–(पु.) सुखी, सुखात राहणारा.
**खेळ**–(पु.) थुंका, थुंकी.
**खेळ मल्लक**–(पु.) पिकदान, थुकदान.
**खेळ-सिंघानिका**–(स्त्री.) थुंकी, खाकरा.
**खेळासिक**–(वि.) थुंकी झेलणारा, (एक शिवी 'अपशब्द')
**खो**–(अ.) खरे, सत्य, वास्तविक.
**खोभ**–(पु.) क्षोभ, राग.
**खोम**–(नपु.) तागाचे रेशमी कापड.
**ख्यात**–(वि.) प्रसिद्ध.
**ख्यापन**–(नपु.) प्रसिद्धी.

## ग

**ग**–नागरी वर्णमालेतील "क" वर्गातील तिसरे अक्षर.
**गगन**–(नपु.) आकाश, नभ.
**गगन-गामी**–(वि.) पक्षी, नभ-चर, आकाशात उडणारा.
**गग्ग जातक**–शिंक आल्यावर दीर्घायु किंवा चिरायु हो असे म्हणण्याचा प्रघात होता. परंतु असे न म्हटल्यामुळे एका शिंकणारास यक्षाचे भक्ष बनावे लागल्याची कथा–(१५५).
**गग्गरा**–(स्त्री., विशे. ना.) एका सरोवराचे नाव, गग्गरा सरोवर.
**गग्गरायति**–(क्रि.) गर्जना करणे, गर्जने, मोठा आवाज काढणे.
**गग्गरी**–(स्त्री.) लोहाराचा भाता.
**गङ्गा**–(स्त्री., विशे. ना.) नदी, गंगा नदी.
**गङ्गा तीर**–(नपु.) गंगेचा किनारा, गंगा तट, गंगा तीर.
**गङ्गाद्वार**–(पु.) नदी समुद्रास मिळण्याचे ठिकाण.
**गङ्गा धार**–(पु.) गंगेचा प्रवाह, नदी प्रवाह.
**गङ्गापार**–(नपु.) गंगेचा पैलतीर, दुसरा किनारा-तट.
**गङ्गा सोत**–(पु.) गंगेचा श्रोत, गंगेचा प्रवाह-धार.
**गङ्ग-माल जातक**–उपोसथ व्रतधारी नोकर निराहार राहिल्यामुळे मरण पावल्याची कथा–(४२१).

**गङ्गेय**–(वि.) गंगेसंबंधी, गंगेविषयी.

**गच्छ**–(पु.) रोप.

**गच्छति**–(क्रि.) जाणे, स्वीकारणे, अनुसरणे.

**गज**–(पु.) हत्ती.

**गज कुम्भ**–(पु.) हत्तीचे मस्तक, हत्तीचे डोके, गंडस्थळ.

**गज-पोतक**–(पु.) हत्तीचे पिल्लू.

**गज्जति**–(क्रि.) गर्जना करणे, ओरडणे, आरोळी देणे.

**गज्जना**–(स्त्री.) गर्जना, मोठा आवाज, डरकाळी.

**गज्जित**–(कृ.) गर्जना करीत.

**गज्जितु**–(पु.) गर्जनारा, ओरडणारा.

**गण**–(पु.) समूह, समुदाय, दल, (भिक्खु) संघ, गण.

**गणपूरक**–(वि.) गणपूर्ती करणारा, हजेरी पूर्ण करणारा.

**गण पूरण**–(नपु.) गणपूर्ती, पूर्ण हजेरी.

**गण बंधन**–(नपु.) सहयोग, सहकार्य, मदत.

**गणसङ्गणिका**–(स्त्री.) मंडळात राहण्याची इच्छा.

**गणक**–(पु.) कारकून, मुनीम, हिशेब ठेवणारा, चिटणीस.

**गणनपथातीत**–(वि.) हिशेबात नसलेला, मोजणी बाहेरचा.

**गणना**–(स्त्री.) संख्या, मोजदाद.

**गणाचरिय**–(पु.) अनेकांचा गुरु, अनेकांचा शिक्षक, गणाचार्य.

**गणारामता**–(स्त्री.) मंडळाविषयी प्रेम, संघाविषयी आपुलकी.

**गणिका**–(स्त्री.) वेश्या.

**गणिकण्टक**–(पु.) सांबर.

**गणित**–(कृ.) मोजलेले, गणित शास्त्र.

**गणी**–(पु.) अनुयायी शिष्य असलेला.

**गणेति**–(क्रि.) मोजणे, गणित करणे.

**गण्ठि**–(स्त्री.) ग्रंथी, गाठ.

**गण्ठिका**–(स्त्री.) ग्रंथी.

**गण्ठिकासव**–(नपु.) गाठी मारलेले भगवे वस्त्र.

**गण्ठिट्ठान**–(नपु.) कठीण जागा, अवघड ठिकाण.

**गण्ठिपद**–(नपु.) अवघड वाट, कठीण रस्ता, समजण्यास कठीण असलेली गोष्ट.

**गण्ठिपास**–(स्त्री.) बेडी.

**गण्ड**–(पु.) फोड.

**गण्डक**–(वि.) फोड आलेला.

**गण्डक**–(पु.) गेंडा.

**गण्डम्ब**–(पु.) श्रावस्तीच्या वेशीतील आंब्याचे झाड. याच आम्रवृक्षाखाली भगवान गौतम बुद्धाने "यमक पाटिहारिय" नावाचा चमत्कार दाखविला होता.

**गण्डिका**–(स्त्री.) पोकळ लाकडी दांडा. या प्रकारच्या पोकळ दांड्याने घंटा वाजवितात.

**गण्डि**–(स्त्री.) घंटा.

**गण्डि**–(नपु.) मारेकऱ्याचे घर.

**गण्डि**–(वि.) फोड आलेला, देवीचे व्रण असलेला.

**गण्डुप्पाद**–(पु.) मातीतील किडा, हुमणी.

**गण्डूस**–(पु.) घास, तोंडभर.

**गण्हाति**–(क्रि.) ग्रहण करणे, घेणे, स्वीकारणे.

**गण्हापेति**–(क्रि.) ग्रहण करणे, घेणे, स्वीकारणे.

**गण्हितु**–(नपु.) घेण्यासाठी, घेण्याकरिता, स्वीकारण्यास.

**गत**–(कृ.) गेलेला.

**गतक**–(पु.) संदेशवाहक, बातमीदार.

**गतट्ठान**–(नपु.) जाण्याचे ठिकाण.

**गतद्ध**–(वि.) मार्ग पुरा केलेला, कार्य पूर्ण केलेला. ठिकाणावर पोहोचलेला.

**गतद्धी**–(वि.) मार्ग पूर्ण केलेला, ठिकाणावर पोहोचलेला.

**गतयोब्बन**–(वि.) तारुण्य संपलेला, म्हातारा, वृद्ध.

**गति**–(स्त्री.) जाणे, वाट, गती.

**गतिमन्तु**–(वि.) दक्ष, तरबेज, हुशार, गतीमान.

**गत्त**–(नपु.) गात्र, शरीर, देह.

**गथित**–(कृ.) बांधलेला, जखडलेला, गुंतवलेला.

**गद**–(पु.) रोग, आजार, वाणी, वाचा.

**गदति**–(क्रि.) बोलणे.

**गदा**–(स्त्री.) एक प्रकारचे हत्यार, मल्लांची गदा.

**गदुल**–(पु.) चमड्याचा पट्टा.

**गदुहन**–(नपु.) धार काढणे.

**गद्रभ**–(पु.) गाढव.

**गधित**–(कृ.) बांधलेला (गथित-पहा).

**गन्तब्ब**–(कृ.) जाण्यास योग्य, गन्तव्यस्थान.

**गन्तु**–(पु.) जाणारा.

**गन्तुं**–(कृ.) जाण्यासाठी, जाण्यास, जाण्याकरिता.

**गन्त्वा**–(पू. क्रि.) जाऊन.

**गन्थ**–(पु.) ग्रंथ.

**गन्थकार**–(पु.) ग्रंथकार, लेखक.

**गन्थधुर**–(नपु.) अध्यापन-अध्ययन, शिकणे-शिकविण्याचे कार्य.

**गन्थप्पमोचन**–(नपु.) बंधन-मुक्त, स्वतंत्र, मोकळा.

**गन्थति**–(क्रि.) गाठ बांधणे.

**गन्थन**–(नपु.) गुंफणे, गाठ मारणे, ग्रथित करणे, लिहिणे.

**गन्थेति**–(क्रि.) गाठ बांधणे.

**गन्ध**–(पु.) वास, सुगंध, सुवास.

**गन्धकुटि**–(स्त्री.) भगवान बुद्धाची राहण्याची कुटी (झोपडी).
**गन्धचुण्ण**–(नपु.) सुगंधित चूर्ण, उटणे, (सुगंधी पावडर).
**गन्ध जात**–(नपु.) सुगंधीचे प्रकार.
**गन्ध तेल**–(नपु.) सुगंधीचे तेल, अत्तर.
**गन्ध पञ्चङ्गुलिक**–(नपु.) सुगंधी तेलात बुडवून उठविलेले पाचहि बोटांचे ठसे.
**गन्धब्ब**–(पु.) संगीतकार, गंधर्व, पुनर्जन्म घेणारा.
**गन्धब्बाधिप**–(पु.) गंधर्वांचा प्रधान (मुख्य).
**गन्धमादन**–(पु.) हिमालयातील एक पर्वत शिखर.
**गन्धवंस**–(पु.) ब्रह्मदेशात लिहिलेला एक पालि भाषेतील ग्रंथ. हा ग्रंथ "नन्दपन्य" आरण्यक याने लिहिला असावा असे मानतात.
**गन्धसार**–(पु.) चंदन, चंदनाचा वृक्ष.
**गन्धापण**–(पु.) अत्तरवाल्याचे दुकान, सुगंधी दुकान.
**गन्धार**–(पु., विशे. ना.) प्राचीन भारतातील सोळा-गणराज्यापैकी एक राज्य गंधार (गांधार). याची राजधानी तक्षशीला होती. सध्याचा कंदहार प्रांत (अफगाणिस्तान).
**गन्धारी**–(स्त्री.) गंधारसंबंधी, जादू टोना.
**गन्धिक**–(वि.) अत्तरवाला, सुगंधीवाला.
**गन्धि**–(वि.) अत्तरवाला.
**गन्धोदक**–(नपु.) सुगंधित जल, सुगंधी पाणी.
**गब्बित**–(वि.) गर्विष्ठ, अहंकारी, अभिमानी.
**गब्भ**–(पु.) आंतील भाग, गर्भ.
**गब्भगत**–(वि.) गरोदर, गर्भधारणा.
**गब्भ परिहरण**–(नदु.) गर्भ संरक्षण.
**गब्भ पातन**–(नपु.) गर्भपात.
**गब्भमल**–(नपु.) प्रसुतीच्या वेळी मुलाच्या शरिरावरून आलेला घृणित पदार्थ, अशुद्ध पदार्थ, गर्भमल.
**गब्भ वुट्ठान**–(नपु.) प्रसव, प्रसववेदना (कळा).
**गब्भर**–(नपु.) गुहा.
**गब्भासय**–(पु.) गर्भाशय, मुलाची पिशवी, (स्त्री-उदरातील).
**गब्भिनी**–(स्त्री., वि.) गर्भिणी, गरोदर स्त्री
**गभीर**–(वि.) गंभीर, खोल.
**गम**–(पु.) गमन, यात्रा, प्रवास, जाणे.
**गमन**–(नपु.) जाणे, यात्रा करणे, फिरणे.
**गमनन्तराय**–(पु.) प्रवासात बाधा, प्रवासात अडथळा.
**गमन कारण**–(नपु.) जाण्याचे कारण.
**गमनागमन**–(नपु.) जाणे-येणे.

**गमनीय**–(वि.) जाण्यास योग्य, जाण्यास उपयोगी.
**गमिक**–(वि.) जाणारा, प्रवासी, यात्री.
**गमिकवत्त**–(नपु.) प्रवासाची तयारी.
**गमेति**–(क्रि.) पाठविणे, समजणे.
**गम्भीर**–(वि.) शांत, खोल, गंभीर.
**गम्भीरावभास**–(वि.) गांभीर्याचा अनुभव, गंभीरपणाची प्रचीती.
**गम्म**–(वि.) ग्राम्य, ग्रामीण, खेडवळ.
**गया**–(स्त्री., विशे. ना.) बोधिवृक्ष आणि बनारस यामधील रस्त्यावरील एक प्रसिद्ध नगरी.
**गया-सीस**–(पु.) गयेजवळील एक डोंगर.
**गय्ह**–(वि.) ग्रहण करण्यायोग्य, ग्राह्य, घेण्यालायक.
**गय्हति**–(क्रि.) ग्रहण करणे, घेणे, स्वीकारणे.
**गरहति**–(क्रि.) दोष देणे, निंदा करणे, निंदणे.
**गरहन**–(नपु.) निंदा, टीका, दोषारोपन.
**गरहित जातक**–एक वानर कांही काळ माणसात राहिला होता. त्या नंतर तो जंगलातील आपल्या बांधवात जाऊन राहिला. तेथे त्याने आपल्या जाति बांधवाना मनुष्याच्या गृहस्थी (कौटुंबिक) जीवनाची माहिती सांगितल्याची कथा–(२१९).
**गरही**–(पु.) टीकाकार, निंदाखोर, दोष देणारा.
**गरू**–(वि.) भारी, गंभीर, सन्मान.
**गरुकातब्ब**–(वि.) सन्माननीय, आदरणीय.
**गरुकार**–(पु.) सन्मान करणारा, आदर करणारा.
**गरुगब्भा**–(स्त्री.) गरोदर, गर्भिणी.
**गरुट्ठानीय**–(वि.) आचार्य, शिक्षक, गुरू.
**गरुक**–(वि.) गंभीर, भारी, शांत.
**गरुकरोति**–(क्रि.) आदर करणे, सत्कार करणे, सन्मान करणे.
**गरुत्त**–(नपु.) गुरुत्व.
**गरुळ**–(पु.) काल्पनिक पक्षी.
**गल**–(पु.) गळा.
**गलग्गाह**–(पु.) गळा धरणे, गळा दाबणे.
**गलनाळी**–(स्त्री.) गळ्यातील नलिका.
**गलप्पमाण**–(वि.) गळ्यापर्यंत.
**गलवाटक**–(पु.) गळ्याचा घेर, गळ्याचे माप.
**गलति**–(क्रि.) वाहणे, प्रवाहित होणे.
**गलित**–(कृ.) वाहिलेला, प्रवाहित झालेला.
**गव**–(पु.) बैल, वृषभ.
**गवक्ख**–(पु.) खिडकी, झरोका, गवाक्ष.
**गव घातन**–(नपु.) गोहत्त्या.

**गव-पान**–(नपु.) खीर, दूध-भात.

**गवज, गवय**–(स्त्री.) नील गाय.

**गवि**–(पु.) हवनाची सामुग्री, तूप.

**गवेसक**–(वि.) शोधणारा, हुडकणारा, संशोधक.

**गवेसति**–(क्रि.) शोधणे, हुडकणे, धुंडणे.

**गवेसन**–(नपु.) शोध, हुडका, तपास.

**गवेसी**–(पु.) संशोधक, शोधणारा, तपास लावणारा.

**गह**–(पु.) ग्रहण करणारा, स्वीकारणारा, घेणारा.

**गह, ग्रह**–(नपु.) ग्रह, आकाशातील तारे.

**गह**–(नपुं.) घर.

**गह कारक**–(पु.) घर बांधणारा, गवंडी.

**गह-कूट**–(नपु.) घराचे शिखर, छप्पर, आडे.

**गहट्ठ**–(पु.) गृहस्थ.

**गहण**–(नपु.) घेणे, ग्रहण करणे, स्वीकारणे.

**गहणिक**–(वि.) चांगली पचनक्रिया असणारा, पचविणारा.

**गहणी**–(स्त्री.) पचन शक्ती.

**गहन**–(नपु.) दाट.

**गहनट्ठान**–(नपुं.) जंगलातील दाट भाग, जेथे जाता येत नाही.

**गह पतानी**–(स्त्री.) गृह-पत्नी, बायको, गृहिणी.

**गह पति**–(पु.) गृह-पती, नवरा, घरचा मालक.

**गह पति जातक**–एका गृहस्थाची बायको गावातील एका पुढाऱ्याच्या नादी लागली. हे कळताच त्या गृहस्थाने गावच्या पुढाऱ्यास बेदम ठोकल्याची कथा.–(१९९).

**गहपति महासाल**–(पु.)श्रीमंत गृहस्थ व त्याचा भव्यवाडा.

**गहित**–(कृ.) गृहित, मान्य, कबूल, स्वीकृत.

**गळगळायति**–(क्रि.) खळखळ पाऊस पडणे, जोराची वृष्टी होणे.

**गळोचि**–(स्त्री.) गडूच ?

**गाथा**–(स्त्री.) दोन ओळीची काव्य रचना-छंद.

**गाथा**–(पु.) तिपिटकातील नऊ वर्गीकरणापैकी एक.

**गाध**–(वि.) खोल.

**गाध**–(पु.) खोली, खोलपणा.

**गाधति**–(क्रि.) निश्चयाने उभे राहणे, ठामपणे उभे राहणे.

**गान**–(नपु.) गाणे, काव्य, कविता.

**गाम**–(पु.) गाव, ग्राम, नगर.

**गामक**–(पु.) लहान गाव, खेडे.

**गाम घात**–(पु.) गावची लूट, गावचा नाश.

**गाम-जेट्ठ**–(पु.) गावचा पुढारी, नेता.

**गाम-दारक**–(पु.) गावचा मुलगा.

**गाम-दारिका**–(स्त्री.) गावची मुलगी.

**गाम-द्वार**–(नपु.) वेस, गावचा दरवाजा.

**गाम-धम्म**–(पु.) ग्राम्य धर्म, मैथुन धर्म.

**गाम-भोजक**–(पु.) पुढारी, नेता.

**गाम-वासी**–(पु.) ग्रामवासी, गांवचा रहिवाशी.

**गाम-सीम**–(स्त्री.) गावची शीव, गावची हद्द, सीमा.

**गामणी**–(पु.) गावचा प्रमुख, ग्रामणी.

**गामणी जातक**–[पहा-संवर जातक–(४६२)].

**गामिक**–(पु.) ग्रामीण.

**गामी**–(वि.) जाणारा.

**गायक**–(पु.) गाणारा.

**गायति**–(क्रि.) गाणे.

**गायन**–(नपु.) गाणे, काव्य.

**गायिका**–(स्त्री.) गाणारी स्त्री.

**गारय्ह**–(वि.) निंदनीय, तिरस्करणीय.

**गारव**–(पु.) गौरव.

**गाळ्ह**–(वि.) मजबूत, कसलेला, पिळदार, सशक्त.

**गावी**–(स्त्री.) गाय.

**गावुत**–(नपु.) अंतर, लांबी, लांबीचे माप, दूरचे अंतर, कोस.

**गावो**–(पु.) पशु, जनावर.

**गाह**–(पु.) पकड, जम, छाप, मत विचार, दृष्टि.

**गाहक**–(पु.) घेणारा, ग्राहक, गिऱ्हाईक, ग्रहण करणारा.

**गाहति**–(क्रि.) आत जाणे, बुडणे, शिरणे.

**गाहन**–(नपु.) आत, बुडी.

**गाहपच्च**–(पु.) घेण्यास योग्य, ग्राह्य.

**गाहापक**–(वि.) घेणारा, स्वीकारणारा.

**गाहापेति**–(क्रि.) घ्यावयाला लावणे, घेण्यास भाग पाडणे.

**गाही**–(वि.) घेणारा, ग्राहक, ग्रहण करणारा.

**गाहेति**–(क्रि.) ग्रहण करविणे.

**गिगमक**–(नपु.) झाकण, अच्छादन, अभ्रा.

**गिज्झ**–(पु.) गिधाड.

**गिज्झकूट**–(पु., विशे.ना.) राजगृहाजवळचा गृध्र कूट पर्वत. याच पर्वतावर भगवान बुद्धाने युद्धविरोधी "शांतिसंदेश" पहिल्या प्रथम दिला होता. त्या ठिकाणी आजही भगवान बुद्धाच्या तपश्चर्येचे ठिकाण भग्नावस्थेत आहे.

**गिज्झ जातक**–एका गृहस्थाने गिधाड पाळला होता. तो इतर लोकांचे दागिने उचलून आणत असे व आपल्या मालकाच्या घरात आणून टाकत असल्याची कथा–(१६४).

गिज्झ जातक–सुपत्त नावाच्या गिधाडाने आपल्या बापाचा उपदेश ऐकला नाही. त्यामुळे सुपत्तास आपला प्राण गमाविण्याची पाळी आल्याची कथा–(४२७).
गिज्झति–(क्रि.) लोभ करणे, स्वार्थ धरणे.
गिजका–(स्त्री.) वीट.
गिञ्जकावसथ–(पु.) विटांनी बांधलेले घर.
गिद्ध–(कृ.) मोहित-लुब्ध झालेला, मोहवश.
गिद्धि–(स्त्री.) लोभ, आसक्ती.
गिद्धी–(वि.) लोभी, आसक्त.
गिनी–(पु.) अग्नी, आग, जाळ.
गिम्ह–(पु.) गरमी, उष्णता, उन्हाळा, ग्रीष्मऋतु.
गिम्हान–(पु.) ग्रीष्मऋतु, उन्हाळा.
गिम्हिक–(वि.) उन्हाळ्याविषयी.
गिरग्ग समज्जा–(स्त्री.) डोंगरावरील यात्रा, पहाडी उत्सव.
गिरा–(स्त्री.) वाणी, वाचा, बोलणे.
गिरि–(पु.) पर्वत, डोंगर, पहाड.
गिरिगब्भर–(नपु.) पर्वतातील गुंफा, लेणी, गुहा.
गिरिदन्त जातक–आपले शिक्षक लंगडत आहेत हे पाहुन घोडाही लंगडू लागला. शिक्षकाचे अनुकरण विद्यार्थी करतात हे दर्शविणारी कथा–(१८४).
गिरिब्बज–(स्त्री.) प्राचीन मगधाची जुनी राजधानी नगरी.
गिरिराज–(पु.) मेरू पर्वत, (हिमालय).
गिरि सिखर–(नपु.) पर्वताचे शिखर.
गिलति–(क्रि.) गिळणे.
गिलन–(नपु.) गळती.
गिलान–(वि.) रोगी, आजारी.
गिलान पच्चय–(पु.) रोग्याचे पथ्य.
गिलान भत्त–(नपु.) रोग्याचे जेवण-खाद्य.
गिलान-साला–(स्त्री.) रुग्णालय, दवाखाना.
गिलानालय–(पु.) रोग्याचे सोंग.
गिलानुपट्ठाक–(पु.) रोग्याची सेवा करणारा, परिचारक.
गिलानुपट्ठान–(नपु.) रोग्याची सेवा, परिचर्या.
गिलायति–(क्रि.) आजार असणे, दुखणे.
गिलित–(कृ.) खाल्लेला, खाल्लेले.
गिही बन्धन–(नपु.) गृह बंधन, घराची जबाबदारी.
गिही भोग–(पु.) गृहस्थाचे भोग, गृहस्थाच्या सुख-सोयी.
गिहीब्यञ्जन–(नपु.) गृहस्थाची वैशिष्ठ्ये. घरची विशेषता.
गिही संसग्ग–(पु.) गृहस्थाबरोबर संसर्ग, सहवास.
गीत–(नपु.) गाणे, कविता, काव्य.
गीत-ख–(पु.) गाण्याचा आवाज.
गीत-सद्द–(पु.) गाण्याचा आवाज.
गीवा–(स्त्री.) मान, ग्रीवा, गर्दन.
गीवेय्यक–(नपु.) गळ्यातील दागिना.
गुग्गुलु–(पु.) गुग्गुळ.
गुञ्जा–(स्त्री.) गुंज. वजनाचे अतिलहान माप, रत्ती. पूर्वी सोने वजन करण्यास वापरत असलेली गुंज.
गुण–(पु.) सद्गुण वा दुर्गुण, धागा, दोर (द्विगुण–दुहेरी, दुप्पट).
गुण-कथा–(स्त्री.) प्रशंसा, महात्म्य.
गुण-कित्तन–(नपु.) आत्मप्रशंसा, आत्मप्रौढी.
गुण-गण–(पु.) सद्गुणाचा साठा.
गुण-वन्तु–(वि.) गुणवान सद्गुणी, गुणवंत.
गुणानुपेत–(वि.) गुणी.
गुणहीन–(वि.) गुणरहित दुर्गुणी, गुणहीन.
गुण जातक–सिंहाला गिधाडाने दलदलीतून बाहेर निघण्याचा मार्ग दाखविल्याची कथा–(१५७).
गुणक–(वि.) ज्याच्या टोकास गाठ आहे.
गुण्ठिक–(वि.) झाकलेला, आच्छादलेला, वेष्ठित.
गुण्ठिका–(स्त्री.) दोऱ्यांचा गोळा, पुंजका.
गुण्ठेति–(क्रि.) लपेटणे, गुंडाळणे, वेष्ठिणे, वेढणे.
गुण्डिक–[पहा-गुण्ठिक].
गुणेतर–(पु.) दोष, चूक.
गुत्त–(कृ.) संरक्षित.
गुत्तद्वार–(वि.) संयतेंद्रिय, झाकून घेतलेले इंद्रिय.
गुत्ति–(स्त्री.) संरक्षक, रक्षण करता, पालक, रक्षक.
गुत्तिक–(पु.) चौकीदार, पहारेकरी.
गुत्तिल जातक–आचार्य गुत्तिल आणि त्याचा शिष्य मूसील यांच्या वादविवादाची कथा–(२४३).
गुद–(नपु.) गुदा.
गुम्ब–(पु.) झाडी.
गुम्बीय जातक–वाटाड्याने यात्रेकरूंना सांगितले की, या जंगलातील कोणतीही वनस्पति अगर फळ मला दाखविल्याशिवाय खाऊ नका, ही कथा–(३६६).
गुय्ह–(वि.) गुपित, रहस्य, लपलेले.
गुय्हभण्डक–(नपु.) पुरुष वा स्त्रीचे जननेंद्रिय.
गुरु–(पु.) गुरूजी, शिक्षक, आचार्य.
गुरु दक्खिणा–(स्त्री.) गुरुदक्षिणा, गुरुस दिलेले धन.
गुहा–(स्त्री.) गुंफा, डोंगर पोखरून केलेले स्थान.

**गुळ**–(नपु.) गूळ, गोळी, चेंडू, गोळा.
**गुळ-कीळा**–(स्त्री.) गोळ्याचा खेळ, चेंडूचा खेळ.
**गुळिका**–(स्त्री.) गोळी.
**गूथ**–(नपु.) मल, विष्टा, शेण, गू.
**गूथ-पाणक**–(पु.) शेणांतील किडा.
**गूथ-भक्ख**–(वि.) विष्टा खाणारा, शेण खाणारा.
**गूथ-भाणी**–(पु.) वाईट बोलणारा, अभद्र.
**गूथ-पाण जातक**–घाणीत राहणाऱ्याने दारू प्याली. त्याला नशा चढली व तो स्वैराचाराने वागल्याची कथा–(२२७).
**गूहति**–(क्रि.) लपविणे, दडविणे.
**गूहन**–(नपु.) गुप्त, दडविलेला.
**गूहित**–(कृ.) दडविलेला.
**गूळ्ह**–(कृ.) दडलेला. गूढ.
**गेण्डुक**–(पु.) चेंडू, गोळा.
**गेध**–(पु.) लोभ, माया, आशा.
**गेधित**–(कृ.) लुब्ध, भुकेलेला, मोहित झालेला.
**गेय्य**–(वि.) गाण्यायोग्य, त्रिपिटकाच्या नऊ भागापैकी, एक भाग, गेय्य अंश.
**गेरुक**–(नपु.) केशरी रंग, भगवा रंग.
**गेलञ्ज**–(नपु.) रोग, आजार.
**गेह**–(पु., नपु.) घर, भवन, निवास.
**गेहङ्गन**–(नपु.) घरापुढील आंगण.
**गेहजन**–(पु.) कुटुंबातील लोक.
**गेहट्ठान**–(नपु.) घराची जागा.
**गेह-द्वार**–(नपु.) घराचे दार, दरवाजा.
**गेह-निस्सित**–(वि.) घरावर अवलंबून, घराच्या आश्रयास.
**गेहप्पवेसन**–(नपु.) गृह-प्रवेशाचा संस्कार, गृहप्रवेशारंभ.
**गो**–(पु,) बैल, खोंड.
**गो**–(स्त्री.) गाय.
**गो-कण्टक**–(नपु.) जनावरांचे खूर, नख्या.
**गो-कुल**–(नपु.) गाईचा गोठा, गो शाळा.
**गो-गण**–(पु.) गाईचा कळप, पशु–समूह.
**गो-घातक**–(पु.) कसाई.
**गो-कुलिक**–(नपु., विशे. ना.)–प्राचीन वज्जीपुत्रांचा (वज्जी लोकांचा) एक गट-विभाग.
**गोचर**–(पु.) गायरान, गाई चरण्याचे क्षेत्र, चराऊरान.
**गोचर-गाम**–(पु.) भिक्षाटन क्षेत्र.
**गोच्छक**–(पु.) गुच्छ, गुच्छा, झुपका.
**गोट्ठ**–(नपु.) गोठा, गाई–बैल, बांधण्याची जागा.
**गोण**–(पु.) बैल, वृषभ.
**गोणक**–(पु.) खिल्लारी बैल, खोंड, लोकरी गालिचा.
**गोतम**–(वि.) शाक्यांचे गोत्र, गौतम गोत्रासंबंधी.
**गोतमी**–(स्त्री.) गौतम गोत्रातील.
**गोत्त**–(नपु.) गोत्र, कूळ, वंश.
**गोत्रभू**–(नपु.) एक पारिभाषिक शब्द, सांसारिक किंवा प्रापंचिक (कौटुंबिक) न राहता, निर्वाण प्राप्तीचा उद्देश धरून राहणारा.
**गोध जातक**–एका तपस्व्याने घोरपडीच्या मांसाच्या लोभाने घोरपडीची हत्त्या केल्याची कथा–(१३८).
**गोध जातक**–एका घोरपडीच्या मुलाने सरडयाच्या मुलीवर अतिप्रसंग केल्याची कथा–(१४१).
**गोध जातक**–घोरपडीने ढोंगी तपस्व्याला आश्रम सोडून जाणे भाग पाडल्याची कथा–(३२५).
**गोध जातक**–राजकुमार व त्याची भार्या या दोघांना शिकाऱ्यांनी घोरपडीचे मांस दिल्याची कथा–(३३३).
**गोधा**–(स्त्री.) घोरपड.
**गोधावरी**–(स्त्री., विशे. ना.) दक्षिण भारतातील एक प्रसिद्ध नदी, गोदावरी,
**गोधूम**–(पु.) गहू.
**गोनस**–(पु.) विषारी साप, घोणस.
**गोपक**–(पु.) पहारेकरी, चौकीदार, रक्षक, राखणदार.
**गोपानसी**–(स्त्री.) कडी, कडया.
**गोपी**–(स्त्री.) गवळयाची बायको.
**गोपुर**–(नपु.) दार, दरवाजा.
**गोपेति**–(क्रि.) रक्षण करणे, राखणे, सांभाळणे.
**गोपेतु**–(पु.) रक्षक, राखणदार.
**गोप्फक**–(नपु.) लगोरी, गलोली, गोफण.
**गोमय**–(नपु.) शेण.
**गोमिक**–(पु., वि.) गाईचा धनी, जनावरांचा मालक.
**गोमी**–(वि.) जनावरांचा मालक.
**गोमुत्त**–(नपु.) गो-मूत्र.
**गोयूथ**–(पु.) गाईचा कळप, गाईची झुंड.
**गोरक्खा**–(स्त्री.) गो-रक्षा, गोपालन, गाईचा सांभाळ.
**गोळक**–(पु., नपु.) चेंडू.
**गोसीस**–(पु.) पिवळे चंदन, केशरी गंध.

## घ

**घ**–नागरी वर्णमालेतील "क" वर्गातील चौथे अक्षर.
**घंसति**–(क्रि.) घासणे, रगडणे, चोळणे.
**घच्चा**–(स्त्री.) विनाश, अंत, शेवट.

**घट**–(पु.) घडा, घागर, मडके.
**घटक**–(पु., नपु.) लहान भांडे.
**घट जातक**–कोसल नरेशाच्या मंत्र्यास उद्देशून सांगितलेली कथा–(३५५).
**घट जातक**–घट पंडिताने आपला भाऊ वासुदेव याचा त्रास संपविल्याची कथा–(४५४).
**घटति**–(क्रि.) प्रयत्न करणे, श्रम करणे, प्रयास करणे.
**घटना**–(स्त्री.) मेळ, ऐक्य, एकी.
**घटा**–(स्त्री.) गर्दी, जमाव, थवा, कळप.
**घटासन जातक**–तलावाकांठच्या वृक्षावर अनेक पक्षी रहात होते, त्यांना मारण्यासाठी तलावातील नाग देवाने आग भडकविल्याची कथा–(१३३).
**घटिका**–(स्त्री.) सुरई, लहानपात्र, वेळ मोजण्याचे प्राचीन साधन.
**घटी**–(स्त्री.) जलपात्र, पाण्याचे भांडे, लहान घागर, केळी.
**घटीकार**–(पु.) कुंभार.
**घटीयन्त**–(नपु.) आडावरील रहाट, घटीयंत्र.
**घटीयति**–(क्रि.) संबंध असणे.
**घटेति**–(क्रि.) प्रयत्न करणे, प्रयास करणे.
**घट्टन**–(नपु.) घर्षण, संघर्ष, झगडा, भांडण.
**घट्टेति**–(क्रि.) धक्का मारणे, आघात करणे, रूष्ट करणे.
**घण्टा**–(स्त्री.) घंटा (वाजविण्याची) मंदिरातील घाट.
**घत**–(नपु.) तूप, घृत.
**घत-सित्त**–(वि.) तुपातील, ज्यावर तूप घातले आहे.
**घन**–(वि.) मोठा, स्थूल, भरीव.
**घनतम**–(वि.) फार मोठा, अत्यंत स्थूल.
**घनपुप्फ**–(नपु.) फुलांचा गालिचा.
**घनसार**–(पु.) कापूर.
**घनोपल**–(पु.) पावसाच्या गारा.
**घम्म**–(पु.) उष्णता, ऊब, उन्ह, घाम.
**घम्म-जल**–(नपु.) घाम, धर्म, त्वचेतून येणारे पाणी.
**घम्माभितत्त**–(वि.) उष्माघात, उष्णतेचा त्रास, उन्हाळ्याने त्रस्त, त्रासलेला, घामाने त्रासलेला.
**घर**–(नपु.) गृह, निवास, भवन.
**घर गोलिका**–(स्त्री.) पाल.
**घर बन्धन**–(नपु.) विवाह, लग्न,.
**घर मानुस**–(पु.) घरातील लोक.
**घर सप्प**–(पु.) उंदीर, मूषक.
**घराजिर**–(नपु.) घराचे अंगण.
**घरावास**–(पु.) गृहस्थी जीवन, संसारी जीवन, कौटुंबिक जीवन.
**घरणी**–(स्त्री.) गृहिणी, प्रापंचिक स्त्री. जबाबदार स्त्री.
**घस**–(वि.) खाणारा.
**घसति**–(क्रि.) खाणे, भक्षिणे, भक्षण करणे.
**घंसेति**–(क्रि.) घासणे, रगडणे, चोळणे.
**घात**–(पु.) हत्या, ठार मारणे, वध, घात.
**घातन**–(नपु.) हत्या, वध.
**घातक**–(पु.) मारेकरी, ठार मारणारा., लुटारू.
**घाती**–(पु.) घात करणारा, मारेकरी, लुटारू.
**घातापेति**–(क्रि.) मारवितो, वध करवितो, लुटवितो.
**घातेति**–(क्रि.) हत्या करणे, वध करणे, ठार मारणे, लुटणे.
**घाण**–(नपु.) नाक, श्वसनेंद्रिय, नासिका, घाणेंद्रिय.
**घाण विञ्ञाण**–(नपु.) घ्राणेंद्रियाद्वारे (नाकाद्वारे) मिळणारे गंध (वास) ज्ञान.
**घायति**–(क्रि.) हुंगणे, वास घेणे.
**घायित**–(कृ.) खाल्लेला, खाल्लेले.
**घास**–(पु.) (अन्नाचा) घास, जनावरांचा आहार (गवत).
**घासच्छादन**–(नपु.) भोजनावरील वस्त्र, ताटावरील रुमाल.
**घास हारक**–(वि.) गवत कापणारा.
**घुट्ठ**–(कृ.) घोषित, जाहीर, प्रसिद्ध.
**घोटक**–(पु.) खोगीर न घातलेला घोडा.
**घोर**–(वि.) भयानक, भीतिदायक.
**घोरतर**–(वि.) अतिभयानक, अतिशय भीतिदायक.
**घोस**–(पु.) घोषणा, आवाज, शब्द.
**घोसक**–(पु.) घोषणा करणारा, आवाज काढणारा, बोलणारा.
**घोसापेति**–(क्रि.) घोषणा करणे, आवाज देणे.
**घोसिताराम**–(पु., विशे. ना.) कोशाम्बीचा प्रसिद्ध विहार.
**घोसेति**–(क्रि.) घोषणा करणे.

## ङ

**ङ**–नागरी वर्णमालेच्या "क" वर्गातील पाचवे अक्षर. अनुनासिक. याच्या आरंभाने शब्द तयार झालेले अस्तित्वात नाहीत.

## च

**च**–नागरी वर्णमालेतील "च" वर्गातील पहिले अक्षर.
**च**–(अ.) आणि, तेव्हा, आता.
**चकित**–(वि.) चकित, भयभित, हैराण, त्रासित.

**चकोर**–(पु.) चकोर पक्षी.

**चक्क**–(नपु.) चक्र, चाक.

**चक्क-अङ्कित**–(वि.) चक्रांकित, चक्रछापाचे निशाण.

**चक्क-पाणि**–(पु., विशे. ना.) चक्र-पाणि, ज्याचे हातावर चक्र आहे, विष्णु.

**चक्क-युग**–(नपु.) चाक जोडी, दोन चाके.

**चक्क रतन**–(नपु.) चक्रवर्ती राजाचे चक्र रत्न.

**चक्क-वत्ती**–(पु.) चक्रवर्ती राजा.

**चक्कसमारूळ्ह**–(वि.) चाके, (गाड्या). चाकावर चढलेले, गाड्यावर चढलेले.

**चक्कवाक**–(पु.) चक्रवाक पक्षी, चकवा.

**चक्कवाक जातक**–संतोष-सौंदय देणारी चकवा-चकवीची कथा आणि लोभ-सौंदर्य नष्ट करणारी कावळ्याची कथा–(४३४).

**चक्कवाक जातक**–वरील कथेप्रमाणेच दुसरी कथा–(४५१).

**चक्कवाळ**–(पु.) परीघ, घेर, क्षेत्र.

**चक्कव्ह**–(पु.) चक्रवाक, चकवा.

**चक्किक**–(वि.) स्तुतिपाठ गाणारा, भाट, खुशामस्कऱ्या.

**चक्खु**–(नपु.) नेत्र, नयन, अक्ष, चक्षु, डोळा, दृकेंद्रिय.

**चक्खुक**–(वि.) दृष्टि असणारा, डोळस.

**चक्खुदद**–(वि.) दृष्टी देणारा, शिकविणारा, समजावून सांगणारा.

**चक्खु-धातु**–(स्त्री) दृष्टी, नजर, चक्षु.

**चक्खु-पथ**–(पु.) दृष्टिपथ, दृष्टिमार्ग, चक्षुपथ.

**चक्खु-भूत**–(वि.) सम्यकदृष्टिवाला, सम्यकदृष्टीचा.

**चक्खुमन्तु**–(वि.) दृष्टा, ज्ञाता.

**चक्खु-लोल**–(वि.) दृष्टिलोभी, पहाण्यास उत्सुक.

**चक्खु विञ्ञाण**–(नपु.) दृष्टीने मिळणारे ज्ञान, पाहून होणारे ज्ञान, चक्षु-विज्ञान.

**चक्खु-सम्फस्स**–(पु.) चक्षुस्पर्श दृष्टिस्पर्श, पाहणे.

**चक्खुस्स**–(वि.) दृष्टिसुख देणारा, डोळ्यास उपयुक्त.

**चङ्कम**–(पु.) चंक्रमण, प्रदक्षिणा, सभोवती फिरणे. प्रदक्षिणेची जागा.

**चङ्कमन**–(नपु.) प्रदक्षिणा करणे, सभोवती फिरणे. ये-जा करणे.

**चङ्कमति**–(क्रि.) चंक्रमण करणे, प्रदक्षिणा घालणे, ये-जा करण.

**चङ्गवार**–(पु.) दूध गाळण्याचे कापड किंवा चाळणी.

**चङ्गोटक, चंगाटक**–(पु.) लहान टोपली, परडी, बुट्टी.

**चच्चर**–(नपु.) चौक, आंगण, चार रस्ते एकत्र मिळालेले ठिकाण.

**चजति**–(क्रि.) त्यागणे, टाकणे, सोडणे, त्याग करणे.

**चजन**–(नपु.) त्याग.

**चञ्चल**–(वि.) अस्थिर, सतत हालणारा, सतत फिरणारा, चंचल.

**चटक**–(पु.) पक्षी, चिमणी.

**चणक**–(पु.) हरभरा.

**चण्ड**–(वि.) भयानक, भीतिदायक, क्रूर, रागीट, प्रचंड, फारमोठा.

**चण्डपज्जोत**–(पु., विशे. ना.) चंडप्रद्योत, बुद्धाच्या समकालीन अवंती, गणराज्याचा राजा, चंडप्रद्योत्त.

**चण्डासोक**–(वि., विशे. ना.) निर्दयपणे भावांची हत्या केल्यामुळे अशोकाला दिलेले नाव, चंडशोक.

**चण्डाल**–(पु.) चांडाळ, अस्पृश्य, जाति-बहिष्कृत.

**चण्डाल-कुल**–(नपु) चांडाळकुळ, नीचकुळ.

**चण्डाली**–(स्त्री) चांडाळ स्त्री.

**चण्डिक**–(नपु.) भयानकता, क्रूरता, प्रचंड भाव.

**चतु**–(वि.) चार, (४).

**चतुक्कण्ण**–(वि.) चौकोन, चौकोणाकृति, चौरस.

**चतुक्खतु**–(क्रि. वि.) चारवेळा, चौपदरी, चारदा.

**चतुग्गुण**–(वि.) चौपट, चारपट.

**चत्तालीसति**–(स्त्री., सं. वि.) चौवेचाळीस, (४४).

**चतुज्जाति-गन्ध**–(पु) चार प्रकारचे सुगध.

**चतुत्तिसति**–(स्त्री., सं. वि.) चौतीस, (३४).

**चतुद्दस**–(सं. वि.) चौदा, (१४).

**चतुद्दिसा**–(स्त्री.) चारदिशा, चौदिशा.

**चतुद्वार**–(वि.) चारीदारे, चार दरवाजे, चतुद्वार.

**चतुनवुति**–(स्त्री., सं. वि.) चौऱ्याणव, (९४).

**चतुपच्चय**–(पु.) भिक्खुचे चीवर पिण्डपात, सयनासन, गिलान, पच्चय भेसज्ज (वस्त्र) इत्यादी चार आवश्यक वस्तू.

**चतुपण्णास**–(स्त्री., सं. वि.) चोपन्न, (५४).

**चतु-परिसा**–(स्त्री.) चार प्रकारची परिषद, सभा. (भिक्खु, भिक्खुणी, उपासक, उपासिका यांची सभा).

**चतु-भूमक**–(वि.) चार मजली, चार ताळ.

**चतु-मधुर**–(नपु.) चार प्रकारची चव (गोडी) तूप, मध, इत्यादि पदार्थांची चव.

**चतुरङ्गिक**–(वि.) चार हिश्श्यांचा, चार अंगाचा, चौविध.

**चतुरङ्गिनी**–(स्त्री.) चतुरंग सेना, चार प्रकारचे सैन, (पायदळ, घोडदळ, अश्वदळ, हत्तीदळ).

**चतुरङ्गुल**–(वि.) चार बोटे मापाचा, चंप.

**चतुरस्स**–(वि.) चौकार चौरस.
**चतुरस्सक**–(पु.) चौमजली इमारत.
**चतुरंस**–(वि.) चतुष्कोण.
**चतुरासीति**–(स्त्री., सं. वि.) चौऱ्याऐंशी–(८४).
**चतुवीसति**–(स्त्री., सं. वि.) चोविस–(२४).
**चतुसट्ठि**–(स्त्री., सं. वि.) चौसष्ठ–(६४).
**चतुसत्तति**–(स्त्री., सं. वि.) चौऱ्याहत्तर–(७४).
**चतुक्क**–(नपु.) चार, (४), चौक.
**चतुद्वार-जातक**–(४३९)–याच कथेचे दुसरे नाव "महामित्त विन्दक जातक" असे आहे.
**चतुत्थ**–(वि.) चौथा.
**चतुत्थी**–(स्त्री.) चतुर्थी, पक्षातील चौथी तिथी.
**चतुधा**–(क्रि. वि.) चार प्रकारे.
**चतुपोसथिक जातक**–(४४१)–ह्या जातक कथेचे शीर्षक आहे. तिथे लिहिले आहे की, ही कथा पुण्णक जातकात आहे. परंतु या नावाची जातक कथा. प्रत्यक्षात मिळत नाही.
**चतुप्पद**–(पु.) चतुष्पाद, चार पायाचा, पशु, जनावर.
**चतुब्बिध**–(वि.) चतुर्विध, चार प्रकारे.
**चतुभानवार**–(पु.) पाच निकायांपैकी, आणि विशेषतः खुद्दक पाठामधील सत्तावीस परिच्छेदांचा संग्रह.
**चतुमट्ठ जातक**–चित्रकूट पर्वतावरून आलेल्या हंसाची कथा–(१८७).
**चतुर**–(वि.) हुषार, बुद्धीमान, शहाणा, चतुर.
**चतुरोपधि**–(पु.) चार प्रकारांची बंधने.
**चत्त**–(कृ.) त्यागलेला, टाकलेला, सोडलेला. त्यक्त.
**चन**–(अ.) कधी-कधी या अर्थाचा, "कुदाचन" या शब्दाचा एक भाग.
**चनं**–(अ.) [पहा-चन].
**चन्द**–(पु.) चंद्र, शशी, चांद.
**चन्दग्गाह**–(पु.) चंद्रग्रहण.
**चन्दमण्डल**–(नपु.) चंद्रमंडल, चंद्राचे किरिट, चंद्राचे वलय.
**चन्द किन्नर जातक**–बनारसचा राजा चंदा किन्नरीवर मोहित झाला. त्याने चंदाचा पति चंद यास ठार मारले. परंतु ती चंदा त्यास वश झाली नाही. तिनें स्वामी-पति-भक्ती दर्शविल्याची कथा–(४८५).
**चन्दन**–(पु.) चंदनाचे झाड-वृक्ष, चंदन.
**चन्दन**–(नपु.) चंदनाचे लाकूड, चंदन काष्ट, चन्दन.
**चन्दन-सार**–(पु.) चंदनाचा रस.

**चन्दाभ जातक**–चंद्र आणि सूर्य यांच्यावर स्थिर दृष्टि ठेवून पहिल्यास तेजस्वी लोकांत देवलोकांत जन्म होतो असे मानणाऱ्याची कथा–(१३५).
**चन्दनिका**–(स्त्री.) नाला, नाली, पाट.
**चन्दप्पभा**–(स्त्री.) चांदणे, चंद्रतेज, चंद्रप्रभा.
**चन्दभागा**–(स्त्री.) चंद्रभागा नदी.
**चन्दिका**–(स्त्री.) चांदणे, चंद्रिका.
**चन्दिमा**–(पु.) चंद्रमा, चंद्र, चांद.
**चपल**–(वि.) चपळ, चंचल, अस्थिर.
**चपु-चपु-कारकं**–(क्रि. वि.) चपचप आवाज करणे, मचमच खाणे, जेवताना होणारा आवाज.
**चमर**–(पु.) हिमालयातील सुरागाय, देवांची गाय, (वनगाय).
**चमू**–(स्त्री.) सेना, सैन्य.
**चमूपति**–(पु.) सेनापती.
**चम्पक**–(पु.) चाफा.
**चम्पा**–(स्त्री., विशेषनाम) चम्पा नदीकिनाऱ्यावरील शहर, चंपानगर, प्राचीन "अंग" या गणराज्याची राजधानी चंपानगरी, सध्या त्या शहरास भागलपूर असे नाव आहे.
**चम्पेयक जातक**–मगध राजाने चंपा नदीत राहणाऱ्या नागराजाच्या मदतीने अंग राजाचा पराभव केल्याची कथा,–(५०६).
**चम्म**–(नपु.) चर्म, चामडे, कातडे.
**चम्मकार**–(पु.) चर्मकार, चांभार.
**चम्मखण्ड**–(पु.) बैठकीसाठी वापरावयाचा चामड्याचा तुकडा, (मृग, व्याघ्र, चर्म आदि).
**चम्म-पसिब्बक**–(पु.) चामड्याची पिशवी.
**चय**–(पु.) संग्रह, साठा, ढीग.
**चर**–(पु.) फिरणारा, चालणारा.
**चर पुरिस**–(वि.) हेर, गुप्तचर.
**चरक**–(वि.) [पहा-चर-पुरिस].
**चरण**–(नपु.) हिंडणे, फिरणे, पाय, आचरण, वागणे.
**चरति**–(क्रि.) हिंडणे, फिरणे, आचरण करणे, आचरणे.
**चराचर**–(नपु.) स्थिर-अस्थिर वस्तु प्राणी, इत्यादी-चराचर.
**चरापेति**–(क्रि.) चालणे, फिरणे, चालविणे, फिरविणे.
**चरित**–(नपु.) चरित्र, जीवनचर्या.
**चरिम**–(वि.) शेवटचा, अन्तिम, अखेरचा.
**चरिया**–(स्त्री.) आचरण, वागणे, चारित्र्य, चर्या.
**चरिया पिटक**–(पु.) खुद्दक निकायाच्या पंधरा ग्रंथापैकी एक ग्रंथ, हा खुद्दक निकायाचा शेवटचा ग्रंथ मानला जातो.

**चरू**–(पु.) यज्ञाचे साहित्य, सामग्री.
**चल**–(वि.) अस्थिर, चंचल.
**चल-चित्त**–(वि.) अस्थिर मन, चंचल मन, चंचल चित्त.
**चलति**–(क्रि.) चंचल होणे, थरथर कापणे, हालणे.
**चलन**–(नपु.) हालणे-डुलणे, कापणे, थरथरणे.
**चलनी**–(पु.) वातमृग, गतिमान, वायुरूपी हरीण.
**चवति**–(क्रि.) पडणे.
**चवन**–(नपु.) पतन, मृत्यू.
**चसक**–(नपु., पु.) पानपात्र, पानाचा डबा.
**चाग**–(पु.) भेट, देणगी, बक्षीस, उपहार.
**चाग**–(पु.) त्याग.
**चागानुस्सति**–(स्त्री.) औदार्याचे स्मरण-आठवण.
**चागी**–(पु.) त्यागी.
**चाटि**–(स्त्री.) एक भांडे, पात्र.
**चाटुकम्यता**–(स्त्री.) खोटी स्तुति, खुशामद.
**चातक**–(पु.) चातकपक्षी.
**चातुद्दसी**–(स्त्री.) पक्षातील चौदावा दिवस, चतुर्दशी.
**चातुद्दिस**–(वि.) चार दिशांसंबंधी.
**चातुद्दीपक**–(वि.) चार द्वीपांवर पसरलेला अर्थात आकाश.
**चातुम्महापथ**–(पु.) चौक, चार रस्ते मिळणारे ठिकाण.
**चातुम्महाभूतिक**–(वि.) पृथ्वी, आप, तेज, वायु या चार महाभूतांविषयी.
**चातुरिया**–(नपु.) चातुर्य.
**चाप**–(पु.) धनुष्य.
**चापल्य**–(वि.) चपलता.
**चामर**–(नपु.) चौरी.
**चामिकर**–(नपु.) सुवर्ण, सोने.
**चार**–(पु.) चाल, चलन.
**चारक**–(वि.) चालणारा.
**चारक**–(पु.) तुरुंग, कारागृह.
**चारण**–(नपु.) चालविणे, व्यवस्था करणे, व्यवस्था पाहणे.
**चारिका**–(स्त्री.) यात्रा, प्रवास.
**चारित्त**–(नपु.) आचरण, अभ्यास, संवय, चारित्र्य.
**चारू**–(वि.) सुंदर, मोहक, आकर्षक.
**चारुदस्सन**–(वि.) सुंदर दिसणारा.
**चारेति**–(क्रि.) चालविणे, इंद्रियांनी काम करणे.
**चाल**–(पु.) आघात, धक्का, मार.
**चालेति**–(क्रि.) चालविणे.
**चावना**–(स्त्री.) पतन, हटविणे, बाजूस सारणे.
**चावेति**–(क्रि.) पाडणे.

**चि, (कोचि)**–(अव्यय) कोण, कोणी.
**चिक्खल्ल**–(नपु.) चिखल, दलदल.
**चिङ्गुलायति**–(क्रि.) स्वतःभोवती फिरणे.
**चिटचिटायति**–(क्रि.) चिटचिटणे.
**चिञ्चा**–(स्त्री.) चिंचेचे झाड.
**चिण्ण**–(कृ.) अभ्यस्त, सवईचा.
**चिण्ह**–(नपु.) निशान, खूण, चिन्ह.
**चित**–(कृ.) एकत्र, एकत्रित.
**चितक**–(पु.) चित्ता.
**चिति**–(स्त्री.) ढीग.
**चित्त-सम्भूत जातक**–चित्त आणि सम्भूत या दोन चांडाळ बंधूंना सनातनी धर्ममार्तंडानी मारल्याची कथा–(४९८).
**चित्त**–(नपु.) मन, विचार, चित्त.
**चित्त**–(नपु.) चित्र.
**चित्त**–(पु.) चैत्र महिना.
**चित्त**–(वि.) नानाविध सुंदर, अनेक सौंदर्यांनी युक्त.
**चित्तक्खेप**–(पु.) चित्ताचा-मनाचा विक्षेप.
**चित्तपस्सद्धि**–(स्त्री.) मनःशांती.
**चित्त मुदुता**–(स्त्री.) मनाची कोमलता, मृदुता, मऊपणा.
**चित्तसमथ**–(पु.) एकाग्र मन, स्थिर मन.
**चित्तानुपस्सना**–(स्त्री.) चित्तानुपश्यना.
**चित्ता भोग**–(पु.) विचार, मत.
**चित्तुजुकता**–(स्त्री.) मनाचा सरळपणा.
**चित्तुत्रास**–(पु.) मनाला होणारा त्रास, भय.
**चित्तुप्पाद**–(पु.) मनाची-चित्ताची उत्पत्ति.
**चित्तकत**–(वि.) चित्रित, सजविलेले, चित्रकृत.
**चित्त कथिक**–(वि.) श्रेष्ठ वक्ता.
**चित्त कम्म**–(नपु.) चित्रकला.
**चित्त-कार**–(पु.) चित्रकार.
**चित्ततर**–(वि.) विचित्र, वेगळा, वेगळ्या प्रकारचा.
**चित्तागार**–(नपु.) चित्रशाळा, चित्रगार.
**चित्तक**–(पु.) एक प्रकारचे हरीण, चित्तळ.
**चित्तक**–(नपु.) टिळा, तिळक.
**चित्तता**–(स्त्री.) विचित्रता, वेगळा भाव, वैचित्र्य.
**चित्तीकार**–(पु.) आदर, सन्मान, सत्कार.
**चिनाति**–(क्रि.) ढीग करणे, साठा करणे, संग्रह करणे, वेचणे.
**चिन्तक**–(वि.) चिंतन करणारा, विचार करणारा.
**चिन्ता**–(स्त्री.) काळजी, विचार, प्रश्न, समस्या.
**चिन्तामणि**–(पु.) इच्छित पूर्ण करणारा मणी.

**चिन्तामय**–(वि.) वैचारिक, विचारयुक्त, विचारपूर्वक.
**चिन्तित**–(कृ.) विचार करत, अविकृत.
**चिन्ती**–(कृ.) विचार करत.
**चिन्तेतब्ब**–(कृ.) विचारणीय, वैचारिक.
**चिन्तेति**–(क्रि.) विचार करणे.
**चिन्तमान**–(कृ.) विचारी, विचार करत असलेला.
**चिन्तेय**–(वि.) चिंतेचा, चिंतनीय, विचारणीय.
**चिमिलिका**–(स्त्री.) उशीचा आभ्रा, पिशवी, खोळ.
**चिर**–(वि.) पुष्कळ काळ टिकणारा.
**चिरकाल**–(वि.) दीर्घ काळ.
**चिरट्ठितिक**–(वि.) चिरस्थायी, कायमच्या ठिकाणी.
**चिरतर**–(वि.) अधिक काळ.
**चिरनिवासी**–(वि.) दीर्घ काळ राहणारा, कायम राहणारा.
**चिरपब्बजित**–(वि.) दीर्घ काळ दीक्षा घेतलेला दीर्घ काळ प्रव्रजित.
**चिरपावासी**–(वि.) चिर प्रवासी, कायमचा फिरता, दीर्घ काळापासून प्रवासास गेलेला.
**चिरत्तं**–(वि.) चिरकालभाव.
**चिरत्ताय**–(वि.) चिरकालासाठी.
**चिरं**–(क्रि. वि.) कायम, चिरकालपर्यंत.
**चिरस्सं**–(क्रि. वि.) फार उशीरा, अगदी शेवटी.
**चिरातीत**–(वि.) चिरकाल, चिरभूत.
**चिराय**–(क्रि. वि.) चिरकालासाठी.
**चिरायति**–(क्रि.) उशीर करणे.
**चिरेन**–(क्रि. वि.) फार काळानंतर.
**चीन-पिट्ठ**–(नपु.) लाल (सीसा) लाल काच, तांबडी काच.
**चीन-रट्ठ**–(नपु.) चीन राष्ट्र.
**चीर**–(नपु.) साल, सालीचे कापड, सालीचा धडपा.
**चीरक**–(नपु.) [पहा-चीर].
**चीरी**–(स्त्री.) झुरळ.
**चीवर**–(नपु.) बौद्ध भिक्खुंचे काषाय वस्त्र.
**चीवर-कण्ण**–(नपु.) चीवराचा कोपरा.
**चीवर-कम्म**–(नपु.) चीवर तयार करण्याचे कार्य.
**चीवर-कार**–(पु.) चीवर बनविणारा.
**चीवर-दान**–(नपु.) चीवर देणे, चीवर-दान.
**चीवर-दुस्स**–(नपु.) चीवर तयार करण्याचे कापड.
**चीवर-रज्जु**–(स्त्री.) चीवर ठेवण्याची दोरी.
**चीवर-वंस**–(पु.) चीवर ठेवण्याचा वेळू-काळक.
**चुण्ण**–(नपुं.) चूर्ण, पूड, पीठ.
**चुण्ण-विचुण्ण**–(वि.) चूर्ण-विचूर्ण, फार बारीक पूड.
**चुण्णक**–(नपु.) सुगंधी चूर्ण, उटणे.
**चुण्णक जात**–(वि.) चूर्ण केलेले.
**चुण्णक-चालनी**–(स्त्री.) पीठ चाळणी, पिठाची चाळण.
**चुण्णित**–(कृ.) चूर्ण केलेले, पीठ केलेले.
**चुण्णेति**–(क्रि.) चूर्ण करणे, पीठ करणे, दळणे.
**चुत**–(कृ.) पडलेला, पदभ्रष्ट, अयशस्वी, पराजीत.
**चुति**–(स्त्री.) अयशस्वी, न दिसणे, अदृष्य.
**चुदित**–(कृ.) दूषित.
**चुदितक**–(पु.) दोषी, गुन्हेगार, अपराधी.
**चुद्दस**–(सं. वि.) चौदा–(१४).
**चुन्द**–(पु., विशे. ना.)–लोहार किंवा सोनार गृहस्थ. हा "पावा" नगरीचा नगरवासी होय. कुशीनगरच्या रस्त्यावर पावा नगरीत पोहोचल्यावर भगवान बुद्ध चुन्द कुमार पुत्राच्या आम्रवनांत थांबले होते. त्याच चुन्दाच्या घरचे जेवण हे भगवंताचे शेवटचे जेवण होय.
**चुन्दकार**–(पु.) खरडणारा, घासणारा, ठोकणारा.
**चुन्द-भण्ड**–(नपु.) लोहाराचे (सोनाराचे) साहित्य, सामान, हत्यार.
**चुबुक**–(नपु.) हनुवटी.
**चुम्बटक**–(नपु.) शिंके, भांडे, घडा ठेवण्याचे दोरीचे जाळे, चंबळ.
**चुम्बति**–(क्रि.) चुंबन घेणे, मुका घेणे.
**चुल्ल**–(वि.) लहान, बारीक, छोटा, अल्प.
**चुल्लन्तेवासिक**–(पु.) लहान शिष्य, अल्पवयीन शिष्य.
**चुल्ल-पितु**–(पु.) चुलता, काका.
**चुल्ल-उपट्ठाक**–(पु.) लहान नोकर, सेवक.
**चुल्लकसेट्ठिक जातक**–अगदी क्षुद्र वस्तूंच्या व्यापारास सुरुवात करून शेवटी फार मोठा श्रीमंत झाल्याची कथा–(४).
**चुल्ल कालिङ्ग जातक**–दन्तपुरचा राजा कालिंग याची युद्धाविषयी आसक्ती असल्याची कथा–(३०१).
**चुल्ल कुणाल जातक**–[पहा–कुणाल जातक.]
**चुल्ल धनग्गह जातक**–तक्षशिलेच्या एका आचार्याने आपल्या मुलीचे लग्न धनुर्धारी शिष्याशी कथा–(३७४).
**चुल्ल धम्मपाल जातक**–राणी राजाच्या सन्मानासाठी आपल्या जागेवरून उठली नाही म्हणून राजाने तिच्या पुत्राचे हात-पाय तोडल्याची कथा–(३५०).
**चुल्लनन्दिय जातक**–एका ब्राह्मणाने वृद्धा वानरीची हत्या केल्याची कथा–(२२२).
**चुल्ल नारद जातक**–तपस्वी मलगा (तरूण) एका तरुणीवर मोहित झाल्याची कथा–(४७७).

**चुल्ल पदुम जातक**–एका राजाने आपल्या सर्व राजपुत्रांना देशाबाहेर घालविल्याची कथा–(१९३).
**चुल्लपलोभन जातक**–एका राजकुमारास स्त्रियाविषयी तिरस्कार वाटे. परंतु एका नर्तकीने त्याला हळू हळू मोहित करण्यात यश मिळविल्याची कथा–(२६३).
**चुल्लबोधि जातक**–माता पित्याच्या मृत्यूनंतर मुलगा व सुनेने संन्यास घेतल्याची (दीक्षा) कथा–(४४३).
**चुल्ल सुतसोम जातक**–सोमरस (दारू) पिणाऱ्या एका राजकुमाराच्या सोळा हजार राण्याची कथा–(५२५).
**चुल्लहंस जातक**–नव्वद हजार हंसाच्या (बदकांच्या) राजाची कथा–(५३३).
**चुल्ली**–(स्त्री.) चूल.
**चूचुक**–(नपु.) स्तनाग्र, स्तनाचे पुढील टोक.
**चूल जनक जातक**–[पहा-महाजनक जातक].
**चूल वग्ग**–(पु.) विनय पिटकाच्या दोन स्कंधापैकी (भागापैकी) एक स्कंध (भाग).
**चूळा**–(स्त्री.) डोकीचे केस, केसांचा बुचडा, अंबाडा.
**चूळामणि**–(पु.) बुचड्यात वापरण्याचा मणी.
**चूळिका**–(स्त्री.) केसांचा बुचडा, अंबाडा.
**चे**–(अ.) जर.
**चेट**–(पु.) सेवक, नोकर, चाकर, मुलगा.
**चेटक**–(पु.) नोकर, गुलाम.
**चेटिका**–(स्त्री.) दासी, सेविका, मुलगी.
**चेटी**–(स्त्री.) दासी, मुलगी.
**चेत**–(पु., नपु.) चित्त, मन.
**चेतक**–(पु.) जंगली कीटक, बन्धन.
**चेतना**–(स्त्री.) इरादा, उद्देश, चेतना.
**चेतयति**–(क्रि.) विचार करणे.
**चेतस**–(वि.) मन, (पापचेतस = पापी मन).
**चेतसिका**–(वि.) चित्तासंबंधी, मनाविषयी.
**चेतापेति**–(क्रि.) अदल-बदल करणे.
**चेतिय**–(नपु.) चैत्य, अवशेषाचे मंदिर, स्मारक.
**चेतियङ्गण**–(नपु.) चैत्यासमोरील आंगण, आवार.
**चेतिय-गब्भ**–(पु.) चैत्याचा मध्यभाग, आतील भाग. चैत्यगर्भ.
**चेतिय-पब्बत**–(पु.) चैत्य-पर्वत, चैत्य उभारलेला डोंगर.
**चेतिय जातक**–चेति राजा अपचर आणि पहिला मित्थ्यावादी यांची कथा–(४२२).
**चेतेति**–(क्रि.) [पहा-चेतयति].
**चेतोखिल**–(नपु.) चित्ताची हानी, मनाची हानी.
**चेतोपणिधि**–(स्त्री.) निश्चय.
**चेतोपरिञ्ञाण**–(नपु.) दुसऱ्यांचे विचार जाणून घेणे.
**चेतोपसाद**–(पु.) मनाची प्रसन्नता, प्रसन्नचित्त.
**चेतोविमुत्ति**–(स्त्री.) चित्ताची विमुक्ती.
**चेतोसमथ**–(पु.) चित्ताची शांती, मनःशांती.
**चेल**–(नपु.) वस्त्र, वसन, कापड.
**चेल-वितान**–(नपु.) चांदवा, छत.
**चेलुक्खेप**–(पु.) वस्त्र उडविणे, कापड फेकणे.
**चोच**–(नपु.) केळी (फळ), केळ.
**चोच-पान**–(नपु.) केळीचे शिखरण, केळांची खीर.
**चोदक**–(पु.) टीकाकार, दोष देणारा, उत्तेजक.
**चोदना**–(स्त्री.) दोष, टीका.
**चोदित**–(कृ.) दोष देत, टीका करत, उत्तेजित.
**चोदेति**–(क्रि.) दोष देणे, टीका करणे, उत्तेजित करणे.
**चोपन**–(नपु.) चलन, चाल, पद्धती, रिवाज.
**चोर**–(पु.) डाकू, चोरी-करणारा, दरोडेखोर.
**चोर-घातक**–(पु.) मारेकरी.
**चोर-उपद्दव**–(पु.) चोरांचा उपद्रव, डाकूंचा त्रास, दरोडा.
**चोरिका**–(स्त्री.) चोरी, लुबाडणूक.
**चोरी**–(स्त्री.) चोरी करणारी, चोरटी स्त्री.
**चोळ**–(पु.) वस्त्र, वसन, अंबर, कापड.
**चोळ-रट्ठ**–(पु., विशे. ना.) प्राचीन भारतातील एक गणराज्य, चोल राष्ट्र.
**चोळक**–(नपु.) चिंधी, जीर्ण वस्त्राचा तुकडा.
**चोळिय**–(वि.) चोळ देशाचा.

## छ

**छ**–नागरी वर्णमालेतील "च" वर्गातील दुसरे अक्षर.
**छ**–(सं. वि.) सहा,–(६).
**छक्खत्तु**–(क्रि. वि.) सहा वेळा.
**छचत्तालीसति**–(सं. वि., स्त्री.) सेहेचाळीस,–(४६).
**छद्वारिक**–(वि.) सहा इंद्रियांसंबंधी.
**छनवुति**–(स्त्री., सं. वि.) शहाण्णव,–(९६).
**छपञ्ञास**–(स्त्री., सं. वि.) छप्पन्न,–(५६).
**छब्बग्गिय**–(वि.) षड्वर्गीय, भिक्खु.
**छब्बण्ण**–(वि.) सहा वर्णांचा.
**छब्बसिक**–(वि.) सहा वर्षे, सहा वर्षाचा.
**छब्बिध**–(वि.) सहा प्रकार, सहाविधी.
**छब्बीसति**–(स्त्रि., सं. वि.) सव्वीस,–(२६).
**छसट्ठि**–(स्त्री., सं. वि.) सहासष्ठ,–(६६).
**छसत्तति**–(स्त्री., सं. वि.) शहाहत्तर,–(७६).

छक–(नपु.) विष्ठा, मल, गू.
छकन–(नपु.) घोडा-गाढवाची लीद.
छकल–(पु.) बकरा.
छक्क–(नपु.) सहा-सहांचा बंडल, गठ्ठा.
छट्ठ–(वि.) सहावा, सहा.
छट्ठी–(स्त्री.) षष्ठी विभक्ती.
छड्डक–(वि.) फेकणारा.
छड्डन–(नपु.) फेकणे.
छड्डनीय–(वि.) फेकण्यायोग्य.
छड्डापेति–(क्रि.) फेकविण्यास लावतो.
छड्डित–(कृ.) टाकावयास लावले. टाकून दिले गेले.
छड्डेति–(क्रि.) फेकणे, टाकणे, सोडणे.
छण–(पु.) सण, उत्सव.
छत्त–(पु.) विद्यार्थी, छत्र.
छत्त–(नपु.) छत्री, छत्र.
छत्तकार–(पु.) छत्री बनविणारा.
छत्त-गाहक–(पु.) छत्रधारी, छत्री घेतलेला.
छत्त-नाळी–(स्त्री.) छत्रीची दांडी, वेळूची दांडी.
छत्त-दण्ड–(पु.) छत्रीचा दांडा.
छत्त-पाणि–(पु.) छत्रधारी, हातात छत्री असलेला.
छत्त-मङ्गल–(नपु.) छत्र धरण्याचा उत्सव, कार्य.
छत्त-उस्सापन–(नपु.) राजकीय छत्र धरणे.
छत्तिंसति–(स्त्री., स. वि.) छत्तीस–(३६).
छद–(पु.) छत, झाकण्याचे वस्त्र.
छदन–(नपु.) छत.
छद्दन्त–(वि.) सहा दात असणारा.
छद्दन्त-जातक–हस्तीराज (ऐरावत) छदन्ता (सहादाती) ची कथा–(५१४).
छद्दिका–(स्त्री.) वमन, टाकणे, ओकणे, सोडणे.
छद्दा–(क्रि. वि.) सहा प्रकारांनी.
छधा–(क्रि. वि.) सहा प्रकारांनी, सहा वेळ.
छन्द–(पु.) इच्छा, कामना, नाद, आवड, छन्द.
छन्द-राग–(पु.) उत्तेजित इच्छा, प्रबळ इच्छा.
छन्दक–(नपु.) मत, विचार, वर्गणी.
छन्दागति–(क्रि. वि.) पक्षपात करणे.
छन्न–(कृ.) झाकला गेला.
छन्न–(वि.) योग्य, ठीक, बरोबर.
छन्न–(पु., विशे. ना.) सिद्धार्थ गौतमाचा सारथी, (नंतर तोच त्याचा साथी-मित्र बनला).
छप्पञ्च–(वि.) सहा किंवा पाच.
छप्पद–(पु.) मधमाशी.

छमा–(स्त्री.) क्षमा, माफी, पृथ्वी, जमीन, भू, भूमी.
छम्भति–(क्रि.) भीतीने गांगरणे, खचणे.
छरस–(पु.) सहा रस (गोड, कडू, तिखट, आंबट, खारट, तुरट.)
छव–(पु.) शव, प्रेत, मृत शरीर.
छव कुटिका–(स्त्री.) स्मशान.
छवट्ठिक–(नपु.) प्रेताचे हाड.
छव दाहक–(पु.) प्रेत जाळणारा, अग्नी देणारा.
छवालात–(नपु.) चितेच्या ज्वाला.
छवक जातक–राजाने आपल्या गळ्यातील रत्नहार चांडाळाच्या गळ्यात घातल्याची कथा–(३०९).
छवि–(स्त्री.) चामडी, कातडी.
छवि कल्याण–(नपु.) चामडीचा रंग, चामडीचे सौंदर्य.
छवि वण्ण–(पु.) चामडीचा वर्ण-रंग, कातडीचा रंग.
छळङ्ग–(वि.) सहा अंगानी युक्त.
छळभिञ्ञा–(वि.) सहा प्रकारांचे दिव्यज्ञान, (अभिज्ञा).
छळंस–(वि.) षटकोण.
छा–(स्त्री.) तहान-भूक.
छात–(वि.) भुकेलेला, भुभुक्षू.
छातक–(नपु.) दुष्काळ, भूक.
छादन–(नपु.) आवरण, आच्छादन, झाकण, शरीरावरील कापड.
छादना–(स्त्री.) अंगातील कपडे, आच्छादन, आवरण.
छादनीय–(कृ.) झाकण्यायोग्य.
छादेति–(क्रि.) झाकणे, आच्छादणे.
छाप–(पु.) पशु-शावक, जनावराचे पिल्लू.
छापक–(पु.) जनावराचे पिल्लू.
छाया–(स्त्री.) सावली, छाया.
छायामान–(नपु.) सावली मोजणे-मापणे.
छायारुप–(नपु.) छायाचित्र, फोटो.
छारिका–(स्त्री.) राख, रक्षा.
छाह–(नपु.) सहा दिवस.
छि–(अव्यय) निश्चयार्थ,.
छिग्गल–(नपु.) छिद्र, भोक.
छिज्जति–(क्रि.) भोक पाडणे, कापणे.
छिद–(वि.) तुकडा, मोडका, फुटका, [बन्धन-छिद=बंधन तोडणारा, छिन्न-भिन्न करणारा].
छिद्द–(नपु.) छिद्र, भोक, छेद.
छिद्दक–(वि.) भोकपडा, छिद्र असलेला.
छिद्दगवेसी–(वि.) दुसऱ्यांचे दोष पाहणारा, छिद्रान्वेषी.
छिद्दावच्छिद्दक–(वि.) सछिद्र, अनेक भोके असलेला.

छिद्दित–(कृ.) छिद्रित, भोक पडलेला.
छिन्दति–(क्रि.) कापणे, भोक पाडणे.
छिन्दिय–(वि.) कापू शकेल, तुटू शकेल, मोडू शकेल.
छिन्न–(कृ.) तुटलेला, नष्ट झालेला, छिन्न-विछिन्न.
छिन्नास–(वि.) निराश, नाराज, निरूत्साही.
छिन्ननास–(वि.) नाक कापलेला.
छिन्नभत्त–(वि.) आहार न मिळणारा, भुकेलेला.
छिन्न-वत्थ–(वि.) कपडे फाटलेला.
छिन्न हत्थ–(वि.) ज्याचे हात तोडलेत, हात तुटलेला.
छिन्न इरियापथ–(वि.) जो चालत नाही, हिंडत नाही.
छुद्ध–(कृ.) क्षुब्ध, उत्तेजित, प्रक्षिप्त, रागावलेला, फेकलेला.
छुपति–(क्रि.) शिवणे, स्पर्श करणे, हात लावणे.
छुपन–(नपु.) स्पर्श.
छुरिका–(स्त्री.) सुरी, चाकू (छूरीकामी).
छेक–(वि.) दक्ष, तरबेज, हुषार, चतुर.
छेकता–(स्त्री) दक्षता, हुषारी, चातुर्य.
छेज्ज–(वि.) कापण्यास.
छेज्ज–(नपु.) शारीरिक दंड, शिक्षा.
छेतब्ब–(कृ.) कापण्यालायक.
छेत्तु–(पु.) कापणारा.
छेत्वा–(पू. क्रि.) कापून, तोडून.
छेत्वान–(पू. क्रि.) कापून, तोडून.
छेद–(पु.) काप, छेद.
छेदक–(पु.) कापणारा, छेदणारा.
छेदन–(नपु.) काप, खाच.
छेदापन–(नपु.) कापविणे, कापून घेणे, छेदविणे.
छेदापेति–(क्रि.) कापवून घेतो.
छेप्पा–(स्त्री.) शेपटी.

## ज

ज–नागरी वर्णमालेतील "च" वर्गातील तिसरे अक्षर.
जगति, जगती–(स्त्री.) पृथ्वी, जग, दुनिया.
जगतिप्पदेस–(पु.) पृथ्वी प्रदेश, भू प्रदेश.
जगतिरूह–(पु.) वृक्ष, झाड.
जगति–(क्रि.) सांभाळणे, देखरेख करणे, पोसणे. जिवंत ठेवणे.
जग्गित्वा–(पू. क्रि.) जागून, जागृत राहून.
जग्गन–(नपु.) जागरण, जागृती.
जग्घति–(क्रि.) चेष्टा करणे, विनोद करणे, चिढविणे.
जग्घना–(स्त्री.) चेष्टा, विनोद, मस्करी.
जग्घित–(नपु.) चेष्टा, विनोद, मस्करी.
जङ्गम–(वि.) चल, संपत्ती.
जङ्गल–(नपु.) अरण्य, जंगल, वन.
जङ्घमग्ग–(पु.) पाऊलवाट, पायवाट, पायरस्ता.
जङ्घपेसनिक–(नपुं.) संदेश वाहन, वृत्त प्रसरण.
जङ्घपेसनिक–(पु.) संदेशवाहक, बातमीदार.
जङ्घा–(स्त्री.) जांघ, मांडी.
जङ्घाबल–(नपु.) जांघेतील शक्ती.
जङ्घा विहार–(पु.) प्रवास, यात्रा, सहल.
जङ्घेय–(नपु.) इजार, विजार, पायजमा.
जच्च–(वि.) जन्म.
जच्चन्ध–(वि.) जन्मांध, जन्मल्यापासून आंधळा.
जच्चा–(नपु.) जन्मापासून.
जज्जर–(वि.) आजाराने जर्जर.
जञ्ञ–(वि.) पवित्र, श्रेष्ठ, आकर्षक, कुलीन.
जट–(नपु.) मूठ.
जटा–(स्त्री.) केसांच्या जटा, झाडांच्या एकत्र असलेल्या डाहळ्या, (आलंकारिक अर्थात वासनेचा उठाव).
जटाधर–(पु.) जटाधारी, केसाळ.
जटित–(कृ.) गुरफटलेला.
जटी–(पु.) जटाधारी, तपस्वी.
जटिल–(पु.) जटाधारी तपस्वी.
जठर–(पु., नपु.) पोट, उदर.
जठरग्गि–(पु.) जठराग्नी, भूक.
जण्णु–(पु.) गुडघा.
जण्णुतग्घ–(पु.) गुडघ्यापर्यंत खोल-उंच.
जण्णु–(नपु.) गुडघा.
जण्णुमत्त–(वि.) गुडघ्यापर्यंत.
जतु–(नपु.) लाख.
जतुमट्ठक–(न.) लाख बंद, मोहर केलेले, सीलबंद.
जतुका–(स्त्री.) पाकोळी.
जत्तु–(नपु.) खांदा, खांद्याचे हाड.
जन–(पु.) लोक, जनता, माणसे, समाज.
जन काय–(पु.) जनता, समाज.
जनपद–(पु.) प्रांत, देश, खेडे, प्राचीन भारतातील. सोळा जनपदे, गणराज्ये.
जनपद-कल्याणी–(स्त्री.) देशांतील सर्व सुंदर स्त्री, सुंदरी.
जनपद चारिका–(स्त्री.) देश-भ्रमण, देश-प्रवास, देश-दर्शन.
जनसम्मद्द–(पु.) गर्दी, जन संमर्द.

**जनक**–(पु.) निर्माता, उत्पन्नकर्ता, जन्मदाता, पिता, वडील, जनक.
**जनन**–(नपु.) उत्पत्ती, जन्म, निर्माण.
**जननी**–(स्त्री.) आई, माता, जननी.
**जनसंघ जातक**–जनसंघ नावाच्या धनिकाच्या दानशीलतेची कथा–(४६८).
**जनाधिप**–(पु.) राजा, नरेश, नृप, भूप, भूपती.
**जनालय**–(पु.) मंडप.
**जनिका**–(स्त्री.) आई, माता, जननी.
**जनित**–(कृ.) उत्पन्न, निर्माण.
**जनिन्द**–(पु.) राजा, जनेंद्र.
**जनेति**–(क्रि.) निर्माण करणे, उत्पन्न करणे, बनविणे, जन्म घालणे.
**जनेन्त**–(कृ.) निर्माण करीत.
**जनेत्त्वा**–(पू. क्रि.) निर्माण करून, बनवून, उत्पन्न करून, जन्म देऊन.
**जनेतु**–(पु.) उत्पन्न कर्ता, निर्माता, बनविणारा, जन्म देणारा.
**जनेत्ती**–(स्त्री.) आई, जन्मदात्री, जननी, जन्म देणारी.
**जन्ताघर**–(नपु.) गरम पाण्याचे स्नानगृह, न्हाणी.
**जन्तु**–(पु.) जीव.
**जप**–(पु.) जप करणे, स्मरण भक्ती.
**जपति**–(क्रि.) जप करणे, भक्ती करणे.
**जपित**–(कृ.) जप केलेले, भक्ती केलेली.
**जपित्त्वा**–(पू. क्रि.) जप करून, भक्ती करून.
**जपा**–(स्त्री.) लसणाची कुडी.
**जप्पना**–(स्त्री.) लोभ, माया, जल्पना, शेखी मिरविणे.
**जप्पा**–(स्त्री.) लोभ, जल्पा, शेखी मिरविणे.
**जम्बाली**–(स्त्री.) डबके, घाण पाण्याचे तळे.
**जम्बीर**–(पु.) लिंबू.
**जम्बु**–(स्त्री.) जांभूळ.
**जम्बुखादक जातक**–कोल्ह्याच्या स्तुतीसाठी कावळयाने कोल्ह्यासाठी फळे पाडल्याची कथा–(२९४).
**जम्बुदीप**–(पु.) जांभळाचा देश, चार महाद्वीपांपैकी एक देश, भारत.
**जम्बुसण्ड**–(स्त्री.) जांभळाची बाग.
**जम्बुक**–(पु.) कोल्हा.
**जम्बुक जातक**–कोल्ह्याने हत्तीवर आक्रमण केले. हत्तीने त्या कोल्ह्यास पायाखाली चिरडून मारल्याची कथा–(५३५).
**जम्बोनद**–(नपु.) सोने, सोन्याचा एक प्रकार.
**जम्भ**–(वि.) साधा, कमी प्रतीचा, निकृष्ट.
**जम्भति**–(क्रि.) अंगडाई घेणे, जांभई देणे, आळस टाकणे.
**जम्भना**–(स्त्री.) जांभई.
**जय**–(पु.) विजय, यश.
**जयग्गाह**–(पु.) विजय, पटावर फासे अनुकूल पडणे.
**जय पान**–(नपु.) विजय पान.
**जय सुमन**–(नपु.) विजयाचे फुल.
**जयति**–(क्रि.) जिंकणे, विजय मिळविणे.
**जयद्दिस जातक**–कम्पिल राजा पांचाळ याच्या मुलांना एका दुष्ट स्त्रीने दोन वेळा खाऊन टाकल्याची (मारून टाकल्याची) कथा–(५१३).
**जया**–(स्त्री.) पत्नी, बायको, स्त्री.
**जयम्पति**–(पु.) पति-पत्नी, नवरा बायको.
**जर**–(पु.) ज्वर, ताप.
**जर**–(वि.) वृद्ध, म्हातारा.
**जरग्गाव**–(पु.) म्हातारा बैल.
**जरता**–(स्त्री.) वृद्धत्व, म्हातारपण.
**जरा**–(स्त्री.) वृद्धत्व, म्हातारपण.
**जरा-दुक्ख**–(नपु.) म्हातारपणातील दुःख.
**जरा-धम्म**–(वि.) ऱ्हास धर्म, निसर्गनियम.
**जरा-भय**–(नपु.) म्हातारपणाची भीती.
**जरुदपान जातक**–संपत्तीच्या आशेने अधिकाधिक खनत गेल्यामुळे शेवटी आपला प्राण गमविणाऱ्या स्वार्थ्यांची कथा–(२५६).
**जल**–(नपु.) पाणी.
**जल-गोचर**–(वि.) पाण्यात रहाणारा, जलचर.
**जलचर**–(पु.) मासा, जलचर.
**जलज**–(नपु.) कमळ, पद्म.
**जलद**–(पु.) ढग.
**जलधि**–(पु.) सागर, समुद्र, जलाशय.
**जलनिग्गम**–(पु.) पाण्याचा प्रवाह, पाट.
**जलनिधी**–(पु.) समुद्र, जलाशय, सागर.
**जलाधार**–(पु.) पाणी अडविण्याची जागा, धरण, बंधारा.
**जलासय**–(पु.) सरोवर, जलाशय.
**जलति**–(क्रि.) जळणे, चमकणे, सतेज होणे.
**जलन**–(नपु.) चमक, जाळ, ज्वलन.
**जलाबु**–(पु.) गर्भाशय.
**जलाबुज**–(वि.) गर्भातून जन्मणारा.
**जलूका**–(स्त्री.) जळू, जळवा.
**जल्ल**–(नपु.) घाण, मळ.
**जळ**–(वि.) जड, निर्जीव, अचेतन.

**जव**–(पु.) गती, शक्ती.
**जवति**–(क्रि.) पळणे, धावणे, दौडणे.
**जवन**–(नपु.) धाव, दौड.
**जवन-पञ्ञ**–(वि.) क्षिप्र-प्रज्ञा, शीघ्र बुद्धी.
**जवन हंस जातक**–बनारसचा राजा आणि राज हंस यांच्या मैत्रीची कथा–(४७६).
**जव सकुण जातक**–सुतार पक्षाने सिंहाच्या तोंडात (दाढेत) अडकलेला हाडकाचा तुकडा काढल्याची कथा–(३०८).
**जवनिका**–(स्त्री.) पडदा.
**जवाधिक**–(पु.) भरधाव धावणारा घोडा.
**जहति**–(क्रि.) सोडणे, टाकून देणे, त्यागणे.
**जागर**–(वि.) जागृत, जागणारा.
**जागर जातक**–वृक्ष-देवतेने (वन देवाने) एका तपस्व्यास काही प्रश्न विचारल्याची कथा–(४०४).
**जागरति**–(क्रि.) जागे रहाणे, पहारा करणे, जागृत असणे.
**जागरण**–(नपु.) जागृति.
**जागरिय**–(नपु.) जागृत, जागा.
**जागरियानुयोग**–(पु.) जागे राहण्याची संधि-वेळ.
**जाणु**–(पु.) गुडघा.
**जाणु-मण्डल**–(नपु.) घोटा.
**जाणु-मत्त**–(वि.) गुडघ्यापर्यंत.
**जात**–(कृ.) उत्पन्न, घडलेले.
**जात**–(नपु.) प्रकार, संग्रह.
**जात-दिवस**–(पु.) जन्म दिवस.
**जात-रुप**–(नपु.) सोने (धातु).
**जात-वेद**–(पु.) अग्नी, आग, जाळ.
**जातस्सर**–(पु., नपु.) नैसर्गिक सरोवर.
**जातक**–(नपु.) जन्मकथा. सुत्तपिटकातील खुद्दक-निकायाचा दहावा ग्रंथ, या ग्रंथात भगवान बुद्धाच्या पूर्वजन्मांच्या कथांचे वर्णन आहे.
**जातकट्ठ कथा**–(नपु.) जातकाची अट्ठ (अर्थ) कथा-या अठ्ठ कथामधून जातकाच्या पद्य भागासंबंधी गद्य विवेचन (अर्थ) केले आहे.
**जातक भाणक**–(पु.) जातक कथा सांगणारा, कीर्तनकार.
**जातत्त**–(नपु.) उत्पती.
**जाति**–(स्त्री.) जन्म, पुनर्जन्म, जात (वंश) सिंहल जाति.
**जातिकोस**–(पु.) जावित्रीचा तुकडा, जायफळाचा तुकडा.
**जातिक्खय**–(पु.) जातिक्षय, पुनर्जन्माची संभावना नसणे.
**जातिक्खेत**–(नपु.) जन्म-स्थान, मातृभूमि.
**जातित्थद्ध**–(वि.) जन्माभिमानी, कुलाभिमानी.
**जाति-निरोध**–(पु.) पुनर्जन्माचा नाश, पुनर्जन्माची अशक्यता.
**जाति-फल**–(नपु.) जायफळ.
**जातिमन्तु**–(वि.) चांगल्या जातीचा, जातीवंत, गुणवान.
**जाति-वाद**–(पु.) जाती किंवा वंशपरंपरेविषयी वाद.
**जाति-सम्पन्न**–(वि.) चांगल्या जातीचा, उच्चकुलीन.
**जाति-सुमना**–(स्त्री.) चमेली.
**जातिस्सर**–(वि.) पूर्व जन्माची आठवण-स्मृती.
**जाति-हिंगुलुक**–(नपु.) शेंदूर.
**जातिक**–(वि.) जातीबाबत, जातीसंबंधी. जातीविषयी.
**जातु**–(अ.) निश्चयाने, ध्येयाने.
**जानन**–(नपु.) ज्ञान, ओळख, जाण.
**जाननक**–(वि.) जाणणारा, जाणकार, ओळखणारा.
**जाननीय**–(वि.) जगण्यायोग्य.
**जानपद**–(वि.) जनपदासंबंधी, गणराज्याविषयी.
**जानपद**–(पु.) खेडूत, गांवढळ.
**जानपदिक**–(वि.) जनपदाविषयी.
**जानाति**–(क्रि.) जाणणे, ओळखणे, समजणे.
**जानापेति**–(क्रि.) जाणवतो, जाणीव देणे. समजवितो.
**जानि**–(स्त्री.) हानी, नुकसान, तोटा, घात.
**जानि**–(स्त्री.) पत्नी, बायको, स्त्री.
**जानि-पति**–(पु.) पत्नी-पति, पति-पत्नी, नवरा-बायको.
**जामातु**–(पु.) जावई, मुलीचा पति.
**जायति**–(क्रि.) उत्पन्न होणे.
**जायत्तन**–(न.) पत्नीत्व.
**जायन**–(नपु.) जन्म.
**जाया**–(स्त्री.) पत्नी, बायको.
**जाया-पति**–(पु.) पत्नी-पति.
**जार**–(पु.) प्रियकर, उपपति नवऱ्याशिवाय दुसरा प्रिय मनुष्य.
**जारत्तन**–(नपु.) प्रेम, अनैतिक संबंध.
**जारी**–(स्त्री.) दुर्वर्तनी स्त्री, प्रियकरीण, छिनाल, वेश्या.
**जाल**–(नपु.) जाळे (मासे पकडण्याचे), समस्या, कोडे.
**जाल-पूप**–(पु.) गोड पुरी, तळीव पदार्थ.
**जालक**–(पु.) लहान जाळे, कोंब, अंकूर.
**जालक्खिक**–(नपु.) जाळयाचे छिद्र, भोक.
**जाला**–(स्त्री.) ज्वाला, अग्नी.
**जालाकुल**–(वि.) चोहोबाजूनी लागलेली आग.
**जालिक**–(पु.) मासे धरणारा कोळी, भोई, जाळयाने मासे धरणारा.

जालिका–(स्त्री.) जिरेटोप, लोखंडी शिरस्त्रान.
जालिनी–(स्त्री.) तृष्णा, हाव.
जालेति–(क्रि.) जाळणे.
जिगिंसक–(वि.) इच्छुक.
जिगिंसति–(क्रि.) इच्छा करणे, इच्छिणे.
जिगुच्छक–(वि.) तिरस्कार करणारा, घृणा करणारा. जिगुप्सा करणारा.
जिगुच्छति–(क्रि.) घृणा करणे, तिरस्कार करणे.
जिगुच्छन–(नपु.) घृणा, तिरस्कार.
जिगुच्छना–(स्त्री.) घृणा, नावड.
जिगुच्छा–(स्त्री.) घृणा, नावड.
जिघच्छति–(क्रि.) भूक लागणे, भोजन पाहिजे असणे.
जिघच्छा–(स्त्री.) भूक.
जिञ्जुक–(पु.) जंगली धोतरा.
जिण्ण–(कृ.) जीर्ण, जुना, वृद्ध, म्हातारा.
जिण्ण वसन–(नपुं.) जुने वस्त्र, जुने कापड, जीर्णवस्त्र.
जित–(कृ.) जिंकलेला, जिंकुन घेतलेला.
जितत्त–(नपु.) जय, विजय.
जितत्त–(वि.) आत्म विजय, स्वतःवर विजय.
जिति–(स्त्री.) जय, विजय.
जिन–(पु.) विजेता, जिंकणारा.
जिन–(वि.) बुद्ध, इंद्रिये जिंकणारा, इंद्रियावर संयम ठेवणारा.
जिन-चक्क–(नपु.) बुद्धमत्त.
जिन-पुत्त–(पु.) बुद्ध पुत्त (राहूल).
जिन-सासन–(नपु.) बुद्धाची शिकवण.
जिनाति–(क्रि.) जिंकणे, विजय मिळविणे.
जिम्ह–(वि.) वाकडा, बेईमान.
जिया–(स्त्री.) धनुष्याची दोरी.
जिव्हा–(स्त्री.) जीभ, रसना.
जिव्हग–(नपु.) जिभेचा शेंडा, जिव्हाग्र.
जिव्हायत्तन–(न.) रसना, रसनेंद्रिय.
जिव्हाविञ्जाण–(नपु.) जिभेद्वारा होणारे ज्ञान, चव.
जिव्हिन्द्रिय–(नपु.) जीभ.
जीन–(वि.) हीन, कमी प्रतीचा.
जीमूत–(पु.) ढग, मेघ.
जीयति–(क्रि.) म्हातारे होणे, जुने होणे, जरा प्राप्त होणे.
जीरक–(नपु.) जिरे–(मसाल्यातील).
जीरति–(क्रि.) कमी होणे, म्हातारपण येणे, घटणे, जुने होणे.
जीरण–(नपु.) जीर्णता, जुनेपणा.
जीरापेति–(क्रि.) पचविणे, वृद्धत्वाचे कारण होणे.
जीव–(पु.) जीव, जीवन, प्राण.
जीव-दन्त–(पु.) जिवंत हत्तीचे दात.
जीवक–(पु.) जगणारा.
जीवक–(पु., विशे. ना.)–बुद्धसमकालीन प्रसिद्ध वैद्य, हा शेवटी बुद्ध शिष्य बनला.
जीवकम्बवन–(नपु.) जीवकाचे राजगृहाजवळील आम्रवन (आंबराई) हे आम्रवन जीवकाने बुद्धाच्या प्रमुख भिक्खु संघास दान दिले होते.
जीवति–(क्रि.) जगणे, जिवंत असणे.
जीवन–(नपु.) जीवन, आयुष्य, जिवंत काळ.
जीविका–(स्त्री.) जगण्याचे साधन, उपजीविकेचे साधन-अन्न, वस्त्रा-दि मूलभूत गरजा.
जीवित–(नपु.) जीवन.
जीवितक्खय–(पु.) जीवनाचा क्षय, जीवनाचा नाश, जन्माची हानी, आयुष्याचे नुकसान.
जीवित-दान–(नपु.) जीवन दान, जीवदान, जीवनाचे दान.
जीवित-परियोसान–(नपु) जीवनाचा अंत, मृत्यू, मरण, शेवट.
जीवित-मद–(पु.) जीवनाचा मद, गर्व, अहंकार.
जीवित वृत्ति–(स्त्री.) [पहा–जीविका].
जीवित-संखय–(पु.) जीवनाचा अंत, शेवट.
जीवितासा–(स्त्री.) जीवनाची आशा, जगण्याची आशा.
जीवितिन्द्रिय–(नपु.) जीव, प्राण.
जीवित-संसय–(पु.) जीवनास धोका, जिवास धोका, प्राणास धोका.
जीवी–(पु.) जगणारा.
जुण्ह–(वि.) चमकदार, चकाकणारा, प्रकाशणारा.
जुण्ह-पक्ख–(पु.) शुक्ल पक्ष, शुद्ध पक्ष.
जुण्ह जातक–राजकुमार जुण्हाने भिक्षापात्र फोडण्या-ऐवजी राजा झाल्यावर तेच पात्र एका ब्राह्मणाला दान दिल्याची कथा–(४५६).
जुण्हा–(स्त्री.) चांदणे, चांदणीपात्र.
जुति–(स्त्री.) चमक, तेज, द्युति.
जुतिक–(वि.) चमकदार, सतेज.
जुतिधर–(वि.) प्रकाशमान, प्रकाशित.
जुतिमन्तु–(वि.) प्रकाशमान.
जुहति–(क्रि.) यज्ञात आहुती देणे.
जुहन–(नपु.) यज्ञ.
जूत–(नपु.) जुगार, द्युत.

**जूतकार**–(पु.) जुगारी, जुगार खेळणारा.

**जे**–(अ.) गे, अगे, कनिष्ठ प्रतीच्या स्त्रीला संबोधण्याचे अव्यय, (संबोधन).

**जेगुच्छ**–(वि.) घृणित, तिरस्कृत.

**जेगुच्छी**–(पु.) घृणा करणारा, तिरस्कार करणारा.

**जेट्ठ**–(वि.) जेष्ठ, श्रेष्ठ पहिला.

**जेट्ठतर**–(वि.) सर्वश्रेष्ठ, जेष्ठतर.

**जेट्ठ-भगिनी**–(स्त्री.) वडील बहीण, थोरली बहीण.

**जेट्ठ-भातु**–(पु.) वडील भाऊ, थोरला भाऊ.

**जेट्ठ-मास**–(पु.) जेष्ठ महिना.

**जेट्ठा पचायन**–(नपु.) मोठ्यांचा सन्मान, थोराचा आदर-सत्कार, वडिलांचा मान.

**जेतब्ब**–(कृ.) जिंकण्यायोग्य.

**जेतवन**–(नपु., विशे. ना.) श्रावस्तीचे प्रसिद्ध उद्यान, याच जेतवनांत अनाथ पिंडकाचा प्रसिद्ध "जेतवनाराम" होता, जेत या राजकुमाराच्या नावावरून त्या उद्यानास (बागेस) जेतवन असे नाव पडले होते.

**जेति**–(क्रि.) जिंकणे.

**जेतुत्तर**–(नपु.) जेतवनाजवळील एक छोटे नगर-(गृहस्थी लोकांची वसती).

**जेतुमिच्छा**–(स्त्री.) जिंकण्याची इच्छा, विजुगिच्छा

**जेय्य**–(कृ.) जिंकण्यायोग्य.

**जोतक**–(वि.) द्योतक, फळ, परिणाम.

**जोतति**–(क्रि.) चमकणे, प्रकाशणे.

**जोतन**–(नपु.) चमक, तेज, प्रकाश.

**जोति**–(स्त्री.) ज्योत, प्रकाश.

**जोति**–(नपु.) तारा, चांदणी.

**जोति**–(पु.) आग, जाळ, अग्नी.

**जोति-पासाण**–(पु.) चमकदार दगड, हिरा.

**जोति-सत्थ**–(नपु.) ज्योतिष-शास्त्र.

**जोतेति**–(क्रि.) प्रकाशमान करणे, प्रज्वलित करणे, प्रकाशित करणे.

**ज्यो**–(स्त्री.) धनुष्याची दोरी.

## झ

**झ**–नागरी वर्णमालेच्या "च" वर्गातील चौथे अक्षर झ.

**झज्झरी**–(स्त्री.) झंझट, विनाकारण त्रास.

**झत्वा**–(पू. क्रि.) जाळून, पेटवून.

**झल्लिका**–(स्त्री.) रातकिडा.

**झस**–(पु.) मासा, मासळी.

**झसा**–(स्त्री.) नाग कन्या.

**झाटल**–(पु.) वृक्ष, झाड, तरू.

**झान**–(नपु.) ध्यान, एकाग्रता.

**झान-अङ्ग**–(न.) ध्यानाचा एक भाग.

**झान-रत**–(वि.) ध्यानरत, ध्यानमग्न, ध्यानांत तल्लीन.

**झान-विमोक्ख**–(पु.) ध्यानाने मुक्तीप्राप्त.

**झान सोधक जातक**–व्यक्ता व्यक्ताची व्याख्या असलेली कथा–(१३४).

**झानिक**–(वि.) ध्यान-प्राप्त, ध्यानासंबंधी.

**झापक**–(पु.) आग लावणारा, पेटविणारा, जाळणारा.

**झापन**–(नपु.) आग लावणे, पेटविणे.

**झापित**–(कृ.) जाळलेले, पेटविलेले.

**झापियति**–(क्रि.) जाळले जाणे, पेटविले जाणे, आग लावणे.

**झापेति**–(क्रि.) जाळणे, पेटविणे, आग लावणे.

**झापेत्वा**–(पू. क्रि.) जाळून, पेटवून.

**झाबुक**–(पु.) कापसाचा.

**झाम**–(वि.) जळलेला, पेटलेला.

**झामक**–(वि.) जळलेला.

**झायक**–(पु.) ध्यानी, ध्यानमग्न.

**झायति**–(क्रि.) ध्यान धरणे, आग लावणे, पेटविणे.

**झायन**–(नपु.) ध्यानमग्न, आग पेटविणे.

**झायी**–(पु.) ध्यान धारक, ध्यान मग्न.

## ञ

**ञ**–नागरी वर्णमालेच्या "च" वर्गातील पाचवे अक्षर म्हणजेच अनुनासिक ञ.

**ञत्त**–(नपु.) ज्ञात, माहीत.

**ञत्ति**–(स्त्री.) घोषणा, पुकार.

**ञत्वा**–(पू. क्रि.) जाणून, माहीत होऊन, समजून.

**ञाण**–(नपु.) ज्ञान, बुद्धी.

**ञाण-करण**–(वि.) ज्ञान देणारा, ज्ञानदाता.

**ञाण-चक्खु**–(नपु.) ज्ञान-चक्षु, ज्ञान-डोळा, ज्ञान-नेत्र.

**ञाण-जाल**–(नपु.) ज्ञानाचे जाळे.

**ञाण-दस्सन**–(नपु.) ज्ञान दर्शन, संपूर्ण ज्ञान.

**ञाण-विप्पयुत्त**–(वि.) ज्ञान शून्य.

**ञाण-सम्पयुत्त**–(वि) ज्ञानयुक्त.

**ञाणी**–(वि.) ज्ञानी, बुद्धीमान, हुषार.

**ञात**–(कृ.) ज्ञात, प्रसिद्ध, माहीत, साक्षात्कृत, कळलेला, समजलेला.

**ञातक**–(पु.) नातेवाईक, संबंधित.

**ञाति**–(पु.) नातेवाईक, संबंधित.

**ञाति-कथा**–(स्त्री.) नातेवाईकांबरोबर बोलणे, चर्चा.

**ञाति-धम्म**–(पु.) नातेवाईकांविषयीचे कर्तव्य.

**ञाति-परिवट्ट**–(नपु.) नातेवाईक मंडळी, सर्व नातेवाईक, नातलग.

**ञाति-पेत**–(पु.) मृत नातेवाईक, नातेवाईकाचे शव.

**ञाति-व्यसन**–(नपु.) नातेवाईकाचे दुःख.

**ञाति-सङ्गह**–(पु.) नातेवाईकाशी चांगुलपणा.

**ञाति-सालोहित**–(पु.) रक्त संबंधातील, रक्ताचे नाते.

**ञापन**–(नपु.) घोषणा, जाहीरात, प्रसिद्धी.

**ञापेति**–(क्रि.) प्रकट करणे, जाहीर करणे, घोषित करणे.

**ञाय**–(पु.) व्यवस्था, पद्धति, प्रकार, योग्य प्रकार.

**ञाय-पटिपन्न**–(वि.) सुपथगामी, सन्मार्गी, सन्मार्गाने चालणारा.

**ञेय्य**–(वि.) ज्ञानाचा विषय.

**ञेय्य-धम्म**–(पु.) शिकण्यासारखा, जाणण्यास योग्य, समजून घेण्यास योग्य.

## ट

**ट**–नागरी वर्णमालेतील "ट" वर्गाचे आद्याक्षर.

**टण्क**–(पु.) दगड फोडण्याची टाकी, छिनी.

**टीका**–(स्त्री.) व्याख्या, अर्थ.

**टीकाचरिय**–(पु.) टीकाकार, व्याख्या करणारा, अर्थ सांगणारा.

## ठ

**ठ**–नागरी वर्णमालेतील "ट" वर्गाचे दुसरे अक्षर.

**ठत्वा**–(पूर्व क्रि.) उभे राहून, उभा होऊन, उभारून.

**ठपन**–(नपु.) स्थापन, बांधलेला, उभारलेला.

**ठपापेति**–(क्रि.) स्थापन करणे, बांधणे, उभारणे, अस्तित्वात आणणे.

**ठपित**–(कृ.) स्थापित, स्थापलेला, उभारलेला.

**ठपेति**–(क्रि.) ठेवणे, निश्चित करणे, बांधणे.

**ठपेत्वा**–(पूर्व क्रिया) ठेवून, बाजूस सारून.

**ठान**–(नपु.) स्थान, ठिकाण, जागा, स्थळ, कारण.

**ठानसो**–(क्रि. वि.) सकारण, कारणासह.

**ठानिय**–(नपु.) स्थानिक, मूळ ठिकाणचा, योग्य स्थान.

**ठापक**–(वि.) उभा होणारा, उभा करणारा, स्थापन करणारा, संस्थापक. निर्माण करून ठेवणारा, उत्पन्न करणारा.

**ठायी**–(वि.) स्थायी, मूळचा, नैसर्गिक.

**ठित**–(कृ.) स्थित, असलेला, राहिलेला.

**ठितक**–(वि.) उभा राहणारा, उभा होणारा.

**ठितट्ठान**–(नपु.) जिथे उभा होता.

**ठितत्त**–(नपुं.) स्थितत्व, स्थायी भाव, मूळ स्वभाव.

**ठिति**–(स्त्री.) स्थिती, अवस्था.

**ठितिक**–(वि.) निर्भर, अवलंबून, स्थायी.

**ठिति-भागीय**–(वि.) स्थायी स्वभावाविषयी, स्थायी स्वभावाबाबत.

## ड

**ड**–नागरी वर्णमालेच्या "ट" वर्गातील तिसरे अक्षर.

**डसति**–(क्रि.) डसणे, चावणे, नांगी मारणे.

**डसन**–(नपु.) डंक, चावा.

**डय्हति**–(क्रि.) जाळणे, पेटविणे, आग लावणे.

**डहति**–(क्रि.) जळणे, पेटणे, आग लागणे.

**डंस**–(पु.) डास.

**डाक**–(पु., नपु.) भाजीपाला, खाण्यास योग्य वनस्पति.

**डाह**–(पु.) दाह, चमक, ऊब, ज्वलन.

**डेयन**–(न.पु) भरारी, उडी.

**डेति**–(क्रि.) उडविणे, फेकणे.

## ढ

**ढ**–नागरी वर्णमालेच्या "ट" वर्गातील चौथे अक्षर. या अक्षराचा वापर फार क्वचित झालेलासुद्धा आढळून आला नाही.

## ण

**ण**–नागरी वर्णमालेच्या "ट" वर्गातील पाचवे अक्षर. हे अनुनासिक होय. याचा आरंभ असलेले शब्द आढळत नाहीत.

## त

**त**–नागरी वर्णमालेच्या "त" वर्गातील आद्याक्षर.

**त**–(सर्वनाम) तो-ते, ते-ती.

**त**–(स्त्री., सर्वनाम) ती-त्या, तं.

**तक्क**–(पु.) विचार, तर्क, मत.

**तक्क**–(नपु.) ताक, पाच गोरसापैकी एक (दूध, दही, ताक, लोणी, तूप) ताक.

**तक्क जातक**–एका तपस्व्याने गंगा नदीत बुडणाऱ्या श्रीमंत कन्येस वाचविल्याची कथा–(६३).

**तक्कन**–(नपु.) तर्क, विचार, मत.

**तक्कर**–(वि.) कर्ता, करणारा.

**तक्कर**–(पु.) तस्कर, चोर, बदमाश, दुष्ट.

**तक्करू जातक**–[पहा-कक्करू जातक.]

**तक्कळ जातक**–वसिष्ट नावाच्या गृहस्थाने आपल्या पत्नीच्या सांगण्यावरून स्वतःच्या बापास ठार मारून पुरून टाकल्याची योजना आखली परंतु हे कृत्य त्याच्या मुलास समजताच मुलाने आपल्या बापास वसिष्ठास या कृत्यापासून परावृत्त केल्याची कथा–(४४६).

**तक्कसिला**–(स्त्री., विशेषनाम) प्राचीन गंधार गण-राज्याची ही राजधानी होय. याच ठिकाणी प्रसिद्ध "तक्षशीला विश्व विद्यालय" होते.

**तक्कसिला जातक**–कदाचित "तेल पत्त" जातकाचे दुसरे नाव असावे.

**तक्कारी**–(स्त्री.) वैजयन्ती, पताका, झेंडा-ध्वज, मोत्यांची माळ.

**तक्काल**–(नपु.) त्याच क्षणी, त्याच वेळी, तात्काळ.

**तक्कारिय जातक**–ब्राह्मणाला स्वतः अबोल न राहता आल्यामुळे आपला प्राण गमाविण्याची पाळी आल्याची कथा–(४८१).

**तक्किक**–(पु.) तार्किक, तर्क करणारा, विचार करणारा.

**तक्की**–(पु.) तार्किक.

**तक्केति**–(क्रि.) विचार करणे, तर्क करणे, अनुमान काढणे.

**तक्कोल**–(नपु.) एक प्रकारचे सुगंधी द्रव्य, सुगंधी अत्तर.

**तगर**–(नपु.) तगरीचे फूल, सुगंधित द्रव्य.

**तगरूक**–(वि.) तिकडे झुकले, तिकडे वळलेला, पलिकडे वळलेला.

**तग्घ**–(अ.) त्याच प्रमाणे, यथार्थ रूपाने, योग्य रूपे, तोच, तोच.

**तच**–(पु.) चामडी, कातडे, साल, त्वचा.

**तच-गन्ध**–(पु.) सालीचा वास, चामडीचा-कातडीचा वास.

**तच-पञ्चक**–(नपु.) शरिराचे केस, लोम, नख, दात व त्वचा हे पाच भाग किंवा अवयव.

**तच-परियोसान**–(वि.) त्वचेपर्यंत, सीमित, मर्यादित.

**तच सार जातक**–गावच्या वैद्याने मुलांना साप पकडण्यास सांगितले. परंतु एका हुशार मुलाने सापास मारून आपला जीव वाचविल्याची कथा–(३६८).

**तचुब्भव**–(वि.) साली पासून तयार केलेले.

**तच्छ**–(वि.) सत्य, यथार्थ, योग्य.

**तच्छ**–(नपु.) सत्य.

**तच्छक**–(पु.) सुतार, लाकूड काम करणारा.

**तच्छति**–(क्रि.) तासणे, साल काढणे.

**तच्छन**–(नपु.) तासणे.

**तच्छनी**–(स्त्री.) तासणी, रंधा.

**तच्छसूकर जातक**–डुकराने आपल्या साथीदारांना संघटित करून परक्या-दुसऱ्या डुक्करास मारून टाकल्याची कथा–(२८६).

**तच्छेति**–(क्रि.) तासणे.

**तज्ज**–(वि.) त्यातून उत्पन्न, तत्‌जन्य, त्यातून निर्माण.

**तज्जना**–(स्त्री.) भीतीचे कारण.

**तज्जनीय**–(नपु.) भिण्यायोग्य.

**तज्जनी**–(स्त्री.) तर्जनी, आंगठ्याजवळचे बोट

**तज्जारी**–(स्त्री.) छत्तीस अणू.

**तज्जेति**–(क्रि.) धमकावणे, भीति दाखविणे, भिवविणे, दम भरणे.

**तट**–(नपु.) नदी किनारा, नदी काठ-कडा, नदी तीर, नदी तट, दरड.

**तट**–(पु.) डोंगराचा उभा कडा.

**तट तटायति**–(क्रि.) तट तट आवाज निघणे-होणे.

**तट्टक**–(नपु.) थाळी, पितळी, उथळ भांडे, ताट.

**तट्टिका**–(स्त्री.) ताटी, लहान चटई.

**तण्डुल**–(नपु.) तांदूळ.

**तण्डुलनाली जातक**–किंमत ठरविणाऱ्या राजाच्या मदतनिसाने पाचशे घोड्यांची किंमत तांदुळाच्या एका पोत्याइतकी ठरविल्याची कथा–(५).

**तण्डुल-मुट्ठि**–(पु.) मूठभर तांदूळ, तांदुळाची मूठ.

**तण्हा**–(स्त्री.) तृष्णा.

**तण्हाक्खय**–(पु.) तृष्णेचा नाश, तृष्णाक्षय.

**तण्हा-जाल**–(नपु.) तृष्णेचे जाळे, मोहजाळ.

**तण्हा-दुतिय**–(वि.) तृष्णा रहित.

**तण्हा-पच्चय**–(वि.) तृष्णेचे कारण.

**तण्हा-मूलक**–(वि.) तृष्णा ज्याच्या मुळाशी आहे, तृष्णेतून उत्पन्न.

**तण्हा-विचारित**–(कृ.) तृष्णेचा विचार.

**तण्हा संखय**–(पु.) तृष्णेचा समूळ नाश.

**तण्हा-संयोजन**–(नपु.) तृष्णेवरील बंधन.

**तण्हा-सल्ल**–(नपु.) तृष्णारुपी शल्य, तृष्णाबाण.

**तण्हीयति**–(क्रि.) तृष्णा धरणे, इच्छा करणे.

**तत**–(कृ.) पसरलेला.

**ततिय**–(सं वि.) तृतीय, तिसरा.
**ततिया**–(स्त्री.) तृतीया, तिसरी.
**ततियं**–(क्रि. वि.) तिसरी वेळ, तिसऱ्यांदा.
**ततो**–(अ.) तेथून, त्यामुळे, त्याकरिता.
**ततो निदानं**–(क्रि. वि.) त्या कारणामुळे, त्या कारणाने.
**ततो पट्ठाय**–(अ.) त्यावेळेपासून आरंभ करून, तेव्हा सुरुवात करून.
**ततो परं**–(अ.) त्यानंतर.
**तत्त**–(नपु.) तत्त्व, वास्तविकता.
**तत्त**–(कृ.) तापलेला, गरम झालेला, उष्ण झालेला, तप्त.
**तत्ततो**–(अ.) वास्तविक, तत्वत:.
**तत्तक**–(वि.) त्यापर्यंत, त्या मापापर्यंत.
**तत्थ, तत्र**–(क्रि. वि.) तेथे, त्या ठिकाणी, त्या जागी, त्या स्थळी.
**तथ**–(वि.) तथ्य, खरेपणा.
**तथ**–(नपु.) सत्य.
**तथता**–(स्त्री.) सत्यता.
**तथत्त**–(नपु.) सत्यता, खरेपणा.
**तथ वचन**–(वि.) सत्य वचन.
**तथा**–(क्रि. वि.) त्याच प्रमाणे.
**तथा कारी**–(वि.) तसे करणारा, तसे वागणारा.
**तथागत**–(वि.) भगवान बुद्धानी स्वत:विषयी वापरलेले नाव, जसा आला अथवा जसा गेला.
**तथागत-बल**–(नपु.) तथागताच्या विशिष्ट दहा प्रकारच्या शक्ती, दहा प्रकारचे सामर्थ्य.
**तथा-भाव**–(पु.) तसाच भाव, तसला भाव, सारखेपण.
**तथा रुप**–(वि.) या प्रकारचा, या रुपाचा, या सारखा.
**तथेव**–(क्रि. वि.) तसेच, त्याप्रकारे.
**तदग्गे**–(क्रि. वि.) याचे पुढे, या पुढे, तेव्हा पासून.
**तदङ्ग**–(वि.) ते अंग, ती बाजू, ते प्रकरण.
**तदत्थं**–(अ.) तदर्थ, त्या अर्थाने, त्या उद्देशासाठी.
**तदनुरुप**–(वि.) त्यानुरूप, त्या प्रमाणे, त्या अर्थाने, त्या सारखे.
**तदह, तदहु**–(न.) त्याच दिवशी.
**तदहुपोसथे**–(न.) त्या उपोसथ दिवशी.
**तदा**–(अ.) त्यावेळी, तेव्हा, त्या काळी.
**तदुपिय**–(वि.) त्यानुरूप, त्यायोग्य, त्याप्रमाणे, त्या सम.
**तदुपेत**–(वि.) त्या बरोबर, त्या सवे.
**तनय, (तनुज)**–(पु.) पुत्र, मुलगा, संतान.
**तनया, (तनुजा)**–(स्त्री.) कन्या, मुलगी, स्त्री.
**तनु**–(स्त्री., नपु.) शरीर, देह.
**तनु**–(वि.) सडपातळ, बारीक, अशक्त, कमजोर.
**तनुकत**–(वि.) कमजोर केलेला, दुबळा बनविलेला.
**तनुकरण**–(नपु.) कमजोर करणे, दुबळा बनविणे.
**तनुतर**–(वि.) फार अशक्त, फार दुबळा, अति कमजोर.
**तनुत्त**–(नपु.) अशक्त होण्याचा भाव.
**तनुता**–(स्त्री.) अशक्त, कमजोर होण्याची भावना.
**तनुभाव**–(पु.) अशक्त होण्याचे लक्षण.
**तनुरुह**–(नपु.) शरिरावरील केस, अंगावरील केस.
**तनोति**–(क्रि.) पसरणे, वाढणे, विस्तृत होणे.
**तन्त**–(पु.) धागा, दोरा, तन्तु.
**तन्त-वाय**–(पु.) विणकर, कोष्टी.
**तन्ताकुल जात**–(वि.) धाग्याची गुंडी.
**तन्ति**–(स्त्री.) पंक्ती, ओळ, परंपरा, पवित्र ग्रंथ.
**तन्तिधर**–(वि.) परंपरेचा संरक्षक, परंपरा टिकविणारा.
**तन्तिस्सर**–(पु.) सतार वादन तंतुवाद्याचा आवाज-सूर.
**तन्तु**–(पु.) धागा, दोरा.
**तन्दित**–(वि.) दमलेला, थकलेला, सुस्तावलेला, अ-क्रियाशिल, आळसलेला.
**तन्दी**–(वि.) आळशी, प्रमादी, निरुत्साही, निष्क्रिय.
**तप**–(पु., नपु.) तपश्चर्या, तप, साधना.
**तपोकम्प**–(नपु.) तपश्चर्येची क्रिया.
**तपोधन**–(वि.) तपश्चर्या हेच ज्याचे सर्वस्व.
**तपोवन**–(नपु.) तपश्चर्येचे ठिकाण, तपाची जागा.
**तपति**–(क्रि.) चमकणे, सतेज होणे, प्रकाशमान होणे.
**तपन**–(नपु.) चमक, तेज, प्रकाश.
**तपनीय**–(वि.) अनुतापाचे कारण.
**तपनीय**–(नपु.) सोने, सुवर्ण, कांचन.
**तपस्सी**–(वि.) तपस्वी, तपश्चर्या करणारा, तप करणारा.
**तपस्सी**–(पु.) तपस्वी साधु, तापस.
**तपस्सिनी**–(स्त्री.) तपस्विनी.
**"तपस्सु"**–(पु., विशे. ना.) उत्कल (ओरिसा) चा हा व्यापारी होता. त्याचा मित्र "भल्लिक' या दोघांनी केवळ दोन शरण गमनानी उपासकत्व प्राप्त केले होते- "(बुद्ध आणि धम्म)".
**तपोदा**–(पु., विशे. ना.) राजगृहाबाहेर आणि वैभार पर्वताच्या पायथ्याशी असलेला मोठा तलाव.
**तप्पण**–(नपु.) संतोष, आनंद, समाधान.
**तप्पति**–(क्रि.) जळणे, तापणे, तप्त होणे.
**तप्पर**–(वि.) तत्पर, सर्मपित.
**तप्पित**–(कृ.) तत्पर, संतुष्ट, संतर्पित.

**तप्पिय**–(वि.) संतुष्ट झाला, तृप्त.
**तप्पिय**–(पू. क्रि.) संतुष्ट होऊन, तृप्त होऊन.
**तप्पेति**–(क्रि.) संतुष्ट होणे, तृप्त होणे.
**तप्पेतु**–(पु.) संतुष्ट होणारा, तृप्त होणारा.
**तब्बहुल**–(वि.) अधिक, जास्त, फार, बहुत, पुष्कळ.
**तब्बि पक्ख**–(वि.) त्या बाजूचा, त्या पक्षाचा.
**तब्बि परीत**–(वि.) त्या विरुद्ध.
**तब्बिसय**–(वि.) तोच विषय, तीच बाब.
**तब्भाव**–(पु.) तोच भाव.
**तम**–(पु., नपु.) अंधार, अज्ञान.
**तमो खन्ध**–(पु.) घोर, अंधार, दाट काळोख.
**तमो नद्ध**–(वि.) अंधार नष्ट करणारा, अज्ञान दूर करणारा.
**तमो नुद**–(वि.) अंधार घालविणारा.
**तमो-परायण**–(वि.) अंधारात जाणारा, अडाणी.
**तमाल**–(पु.) तमाल वृक्ष.
**तम्ब**–(नपु.) तांबे.
**तम्ब**–(वि.) तांबडा, तांबडया रंगाचा, ताम्र वर्णाचा.
**तम्ब-केस**–(वि.) तांबडया रंगाचे केस.
**तम्ब चूल**–(पु.) कोंबडा.
**तम्ब-नख**–(वि.) तांबडी नखे असलेला.
**तम्ब-नेत्त**–(वि.) लाल डोळे, तांबडया रंगाचे डोळे असलेला.
**तम्ब-भाजन**–(नपु.) तांब्याचे भांडे.
**तम्ब पण्णि**–(नपु., विशेषनाम) "ताम्रपर्णी", सुप्परकचा निरोप घेऊन विजय राजकुमार आणि त्याचे जोडीदार लंकेत (सिलोन) ज्या ठिकाणी प्रथम पोहोचले ते ठिकाण.
**तम्बूल**–(नपु.) विडयाचे पान.
**तम्बूल-पसिब्बक**–(पु.) पान ठेवण्याचा बटवा, पिशवी.
**तम्बुल-पेळा**–(स्त्री.) पान ठेवण्याची पेटी, पानपुडा.
**तय**–(नपु., सं. वि.) तीन, (३).
**तयी**–(स्त्री.) त्रयी, त्रिकुट, तिघे, तीनजण.
**तयो**–(वि.) तिघे, तीनजण.
**तयो धम्म जातक**–वानर स्वतः आपल्या मुलांची (पिल्लाची) हत्या करत असे ही कथा–(५८).
**तर**–(पु.) नाव, नौका, तरणी.
**तरङ्ग**–(पु.) लाट, लहर.
**तरच्छ**–(पु.) कोल्हा, तरस.
**तरण**–(नपु.) पोहणे, पलिकडे पोहोंचणे, पैलतीर गाठणे.
**तरणी**–(स्त्री.) नौका, नाव, होडी.
**तरति**–(क्रि.) तरणे, पोहणे, तरंगणे.
**तरमान-रूप**–(वि.) घाईने, गडबडीने, ताबडतोब, जलद.
**तरल**–(नपु.) कांजी, खळ.
**तरितु**–(पु.) पलिकडे जाणारा, पोहणारा.
**तरी**–(स्त्री.) नाव, नौका.
**तरू**–(पु.) वृक्ष, झाड.
**तरा-सण्ड**–(पु.) दाट झाडे, घनदाट अरण्य.
**तरुण**–(वि.) नवजवान, युवक, यौवन प्राप्त.
**तल**–(नपु.) तळ, खालचा भाग, रुंद ठिकाण, रुंद छत, हत्याराचे पान-पाते.
**तल घातक**–(नपु.) हाताची थप्पड, चापट.
**तल-सत्तिक**–(नपु.) तळ हात, उभ्या तळ हाताचा मार.
**तळाक**–(पु.) तलाव, जलाशय, तळे.
**तळुण**–(पु.) [पहा-तरूण].
**तस**- (वि.) चंचल, अस्थिर.
**तसर**–(पु.) फिरकी, चक्र-चाक.
**तसति**–(क्रि.) थरकांप होणे, भिणे, भयभित होणे, त्रास होणे.
**तसिना**–(स्त्री.) तृष्णा, हाव, इच्छा.
**तस्सन**–(नपु.) तृष्णा, पिपासा, तृष्णा.
**तहं**–(क्रि. वि.) तेथे, त्या जागी, त्या ठिकाणी.
**तहिं**–(क्रि. वि.) तेथे, त्या जागी, त्या ठिकाणी.
**ताण**–(पु.) त्राण, शक्ती, शरण.
**तात**–(पु.) पिता, वडील.
**तादिस**–(वि.) तत्सदृष्य, तसला, त्यासारखा.
**तापन**–(नपु.) आत्मक्लेश.
**तापस**–(पु.) तपस्वी.
**तापसी**–(स्त्री.) तपस्विनी.
**तापेति**–(क्रि.) तापविणे, उब देणे, गरम करणे.
**तामबूली**–(पु.) तांबोळी, पानवाला.
**तामलित्ती**–(पु. क्रि.) ज्या पश्चातापाने सम्राट अशोकाने बोधिवृक्षाची फांदी, सिलोनला (लंकेला) पाठविली होती, ती उपरति.
**तायति**–(क्रि.) रक्षण करणे, सांभाळणे, पालन करणे.
**तायन**–(नपु.) रक्षण, सांभाळ, पालन.
**तार**–(पु.) अति उंच स्वर, संगीतातील सात स्वरानंतरचा उंच स्वर, सां-(सा, रे, ग, म, प, द, नि, सा).
**तारका**–(स्त्री.) आकाशातील तारा, चांदणी.
**तारा**–(स्त्री.) आकाशातील चांदणी, तारा.
**तारगण**–(पु.) तारकांचा समूह, तारांगण.
**तारा-पति**–(पु.) चंद्र, चंद्रमा, चांद.

**तारा-पथ**–(पु.) आकाश, नभ, अवकाश.
**तारेतु**–(पु.) संरक्षक, सांभाळणारा, पालक, पोहताना सांभाळून नेणारा.
**ताल**–(पु.) ताड वृक्ष.
**तालट्ठिक**–(नपु.) ताडगोळा, ताडाचे फळ.
**ताल-कन्द**–(पु.) ताडाचा अंकूर, कोंब.
**तालक्खन्ध**–(पु.) ताड वृक्षाचे खोड, बुन्धा.
**तालपक्क**–(नपु.) ताडाचे फळ (कवचासह).
**ताल-पण्ण**–(नपु.) ताडाचे पान.
**तालवन्त**–(नपु.) ताडपत्राचा पंखा.
**तालावत्थुकत**–(वि.) मुळासह उपडून काढलेला, तळातून काढलेला.
**तालु**–(पु.) टाळा, तोंडातील वरच्या जबड्याचा घुमटकार भाग, टाळू.
**तालुज**–(वि.) तालव्य, टाळ्याच्या सहाय्याने निघणारा आवाज.
**ताव**–(अ.) तो पर्यंत.
**तावकालिक**–(वि.) अस्थायी, ठिकाण नसलेला.
**तावतक**–(वि.) इतकेच, तोपर्यंत, त्यावेळेपर्यंत.
**तावता**–(क्रि. वि.) तो पर्यंत.
**तावतिंस**–(सं. वि.) तेहत्तीस, (३३).
**तावतिंस**–(वि.) सामासिक शब्दात जिथे तेहत्तीस देवांचा उल्लेख असतो.
**तावतिंस-देव लोक**–(पु.) चातुम्महाराजिक देव लोकानंतरचा काल्पनिक देवलोक.
**तावतिंस-भवन**–(नपु.) तेहतीस देवलोकांचे निवासस्थान.
**तावदेव**–(अव्यय) त्याचवेळी, तत्क्षणी, तावडतोब, लगेच.
**ताळ**–(पु.) ठेका, गाण्याचा ताल.
**ताळ**–(स्त्री.) चावी, किल्ली.
**ताळच्छिग्गल**–(नपु.) चावीचा छेद, चावीचे भोक, छिद्र.
**ताळच्छिद्द**–(नपु.) चावीचे छिद्र.
**ताळावचर**–(पु.) संगीतज्ञ, संगीतकार.
**ताळावचर**–(नपु.) संगीत.
**ताळन**–(नपु.) ताडन, धक्का देणे, मारणे.
**ताळी**–(स्त्री.) टाळी, धक्का, मार.
**ताळेति**–(क्रि.) मारणे, त्रास देणे, ताडन करणे.
**तास**–(पु.) त्रास, भय, भीति, कंपन, थरकाप.
**तासेति**–(क्रि.) त्रास देणे.
**ति**–(सं. वि.) तीन, (३).
**ति-कटुक**–(नपु.) तीन मसाले, तीन औषधे.
**तिक्खत्तुं**–(क्रि. वि.) तीन वेळा, त्रिवार, तीनदा.
**तिगावुत**–(वि.) तीन गव्यूति अंतर, तीन कोस.
**तिगोचर**–(पु.) तिघांनी ऐकलेला शब्द.
**तिचीवर**–(नपुं.) भिक्खुंचे तीन चीवर, तीन वस्त्र.
**तिदिव**–(पु.) दिव्यलोक.
**तिदिवाधार**–(पु.) मेरूपर्वत, हिमालय.
**तिदिवाधिभू**–(पु.) शक्र, देवेंद्र.
**तिपिटक**–(नपुं.) पालि भाषेतील त्रिपिटक. (१) सुत्तपिटक, (२) विनय पिटक, अभिधम्मपिटक.
**तिपुटा**–(पु.) तेवरी, धमकी, डोळे वटारणे, भुवई चढवविणे.
**तिपेटक, तिपेटकी**–(वि.) त्रिपिटकाचा ज्ञाता, त्रिपिटक समजलेला.
**तियामा**–(स्त्री.) रात्र, निशा.
**तियोजन**–(नपुं.) तीन योजन लांब, तीन योजनाचे अंतर. (आठ कोसांचा एक योजन)
**तिरक्कार**–(पु.) तिरस्कार, अपमान.
**तिलिङ्गिक**–(वि.) तिन्ही लिंगांत वापरला जाणारा शब्द, त्रिलिंगी, (पुलिंग–स्त्रीलिंग–नपुंसकलिंग).
**तिलिच्छ**–(पु.) साप, सापाची एक जात.
**तिलोक**–(पु.) तीन लोक (स्वर्ग, मृत्यू, पाताळ).
**तिवग्ग**–(वि.) त्रिवर्ग, तीन वर्ग, जीवनाचे तीन परमार्थ (धर्म, अर्थ, काम).
**तिवङ्गिक**–(वि.) तीन अंगाचा, तीन भागांचा.
**तिवस्सिक**–(वि.) तीन वर्षाचा, त्रैवार्षिक.
**तिविज्जा**–(स्त्री.) तीन विद्या, त्रिविद्या.
**तिविध**–(वि.) त्रिविध, तीन प्रकारे.
**तिवुता**–(स्त्री.) पांढऱ्या रंगाची.
**तिक**–(नपु.) तिसरा, ज्यात तीनचा समावेश आहे.
**तिकिच्छक**–(पु.) चिकित्सक, चिकित्सा करणारा, तपासणारा.
**तिकिच्छति**–(क्रि.) चिकित्सा करणे, तपासणे, परीक्षा करणे.
**तिकिच्छा**–(स्त्री.) चिकित्सा, परीक्षा, तपासणी.
**तिक्ख**–(वि.) तीक्ष्ण, धारदार, अणकुचीदार.
**तिक्ख पञ्ञा**–(वि.) फार बुद्धीमान, अतिहुषार, प्राज्ञ, प्रज्ञावंत.
**तिखिण**–(वि.) तीक्ष्ण, धारदार.
**तिट्ठति**–(क्रि.) थांबणे, स्थित असणे, उभा राहणे. (ठित–(कृ.) (स्थित, जागेवर असलेला)
**तिण**–(नपु.) तृण, गवत, गवताची काडी.
**तिण अण्डूपक**–(नपु.) गवताची गादी.

**तिण-डक्का**–(स्त्री.) गवताची दिवटी, गवताची मशाल.
**तिण-गहण**–(नपु.) गवत खाणे, तृण ग्रहण.
**तिण-जाति**–(स्त्री.) गवतांच्या जाती, गवतांचे प्रकार
**तिण-भक्ख**–(वि.) तृण-भक्षक, गवत खाणारा.
**तिण-भिसि**–(स्त्री.) गवताची चटई.
**तिण-संथार**–(पु.) गवताचे अंथरुण.
**तिण-हारक**–(पु.) गवत विकणारा, गवत कापणारा.
**तिणागार**–(नपु.) गवताची झोपडी, छप्पर.
**तिन्दुक जातक**–[पहा-तिण्दुक जातक].
**तिण्ण**–(कृ.) उत्तीर्ण, पास, पार पडला.
**तिण्ह**–(वि.) तेज.
**तितिक्खति**–(क्रि.) सहन करणे, सोसणे.
**तितिक्खा**–(स्त्री.) सहनशीलता.
**तित्त**–(वि.) तिखट, तिक्त, कडू.
**तित्त**–(कृ.) तृप्त, संतुष्ट, समाधानी.
**तित्तक**–(वि.) तिखट, कडवट.
**तित्ति**–(स्त्री.) तृप्ती, आत्मसमाधान.
**तित्तिर**–(पु.) चित्तर पक्षी.
**तित्तिर जातक**–चित्तर, वानर आणि हत्ती यांची कथा–(३७).
**तित्तिर जातक**–निरर्थक उपदेश करण्याचा प्रयत्न केल्यामुळे मिळालेल्या शिक्षेची कथा–(११७).
**तित्तिर जातक**–चित्तर पक्षाचा आवाज काढला म्हणजे इतर चित्तर पक्षी गोळा होतात आणि फासेपारध्याच्या हातून मरतात. ही कथा.–(३१९).
**तित्तर जातक**–चित्तर पक्षाने तिन्ही वेद पाठ केल्याची कथा–(४३८).
**तित्थ**–(नपु.) तीर्थ, पवित्र ठिकाण, पवित्र क्षेत्र.
**तित्थकर**–(पु.) तीर्थंकार, संप्रदायाचा संस्थापक, नवीन मताचा, विशिष्ठ मताचा प्रेरक.
**तित्थायतन**–(नपु.) संप्रदायाचे सिद्धांत, पंथांची मते, शाखेचे तत्त्व.
**तित्थजातक**–राजाच्या आवडत्या घोड्यास ठराविक ठिकाणी धुतला जात असे. त्याच जागी एके दिवशी दुसऱ्या घोड्यास धुतले, हे त्या पहिल्या घोड्याने पाहिले. तेव्हापासून त्या जागी आपण आंघोळ करण्याचे नाकारल्याची कथा–(२५).
**तित्थिय**–(पु.) दुसऱ्या मताचा संस्थापक, वेगळ्या मतांचा विचार प्रवर्तक.
**तित्थिय सावक**–(पु.) दुसऱ्या मताचा शिष्य, अन्य मतांचा अनुयायी.
**तित्थियाराम**–(पु.) तपस्व्यांचा आश्रम.
**तिथि**–(स्त्री.) चंद्रमासाचा एक दिवस, तिथी.
**तिदस**–(पु.) देव.
**तिदसपुर**–(नपु.) देवनगर, देवनागरी.
**तिदसिन्द**–(पु.) देवांचा राजा–(इंद्र).
**तिदण्ड**–(नपु.) तिवई, तीन पायांची बैठक.
**तिधा**–(क्रि. वि.) तीन प्रकारे, तीन प्रकारांचा, त्रिविध, तीनदा.
**तिन्त**–(वि.) ओला, भिजलेला, चिंब, जलयुक्त,
**तिन्दुक**–(पु.) तिन्दुक नांवाचा वृक्ष (वनस्पती).
**तिन्दुक जातक**–तिन्दुकाची फळे खाणाऱ्या वानराची कथा–(१७७).
**तिपञ्ञास**–(सं. वि.) त्रेपन्न, (५३).
**तिपल्लत्थमिग जातक**–एका काळविटाने मरून पडल्याचे सोंग करून आपला जीव वाचविल्याची कथा–(१६).
**तिपु**–(न.) सीमा, शीव, सरहद्द, गावकुस.
**तिपुस**–(न.) भोपळा.
**तिप्प**–(वि.) तीव्र.
**तिमि**–(पु.) मोठ्या माश्यांची एक जात (समुद्रातील).
**तिमिंगल**–(पु.) मोठा मासा, जो लहान माशांना गिळून टाकतो.
**तिमिर**–(नपु.) अंधार, अंधःकार, काळोख, काळोखी रात्र.
**तिमिरायितत्त**–(नपु.) काळोखी, कालिमा, काळेपणा.
**तिमिस**–(न.) अंधार, काळीरात्र, काळोख.
**तिमिसिका**–(स्त्री.) घोर अंधार, अतिकाळोख्याची रात्र, आमावस्या.
**तिम्बरू**–[पहा-तिन्दुक].
**तिरच्छान**–(पु.) पशु, जनावर, चतुष्पाद प्राणी.
**तिरच्छान कथा**–(स्त्री.) निरर्थक बोलणे, बेकार चर्चा, विसंवाद.
**तिरच्छान गत**–(पु.) पशु, पशुतुल्य, पशुसारखा.
**तिरच्छान योनि**–(स्त्री.) पशु-योनि, पशु-जाती.
**तिरियं**–(क्रि. वि.) तिरके, आडमार्ग.
**तिरियंतरण**–(क्रि. वि.) पार पडणे, मुक्त होणे, ओलांडणे, पार करणे.
**तिरीटक**–(नपु.) सालीपासून बनविलेले झांकण, सालीचा मोठा तुकडा, सालीचा धडपा.
**तिरीटवच्छ जातक**–तिरीटवच्छ तपस्व्याने अरण्यात आलेल्या राजाचे स्वागत केल्याची कथा–(२५९).
**तिरो**–(अ.) पार, बाह्य, मुक्त.
**तिरोकरणी**–(स्त्री.) पडदा.

**तिरो-कुड्ड**–(नपु.) भिंतीबाहेर, भिंतीच्या बाहेरील बाजूस.

**तिरोक्कार**–(पु.) अपमान, तिरस्कार, अवमान, घृणा.

**तिरोधान**–(नपु.) झांकण, अच्छादन.

**तिरोभाव**–(पु.) अदृष्य, न दिसणे, दृष्टिआड, नजरे आड.

**तुण्ही-भूत**–(वि.) चुप, गप्प, शांत, अबोल.

**तुण्हीयति**–(क्रि.) गप्प बसणे, शांत होणे, अबोल राहणे.

**तुत्त**–(नपु.) हत्तीचा अंकूश.

**तुदत्ति**–(क्रि.) टोचणे, बोचणे, अंकूश मारणे-लावणे.

**तुदित**–(कृ.) टोचला, बोचला, अंकूश लावला गेला.

**तुदन**–(नपु.) टोचणी, बोचणी, वेदना.

**तुदम्पति**–(वि.) उभयता, जोडी, पति-पत्नी दोघे.

**तुमुल**–(वि.) मोठे, विशाल, तुंबळ, घनघोर.

**तुम्ब**–(पु., नपु.) तुंबा, (कुऱ्हाडीचा तुंबा).

**तुम्ब कटाह**–(नपु.) भोपळ्याचा कटोरा, भिक्खुंचे भांडे.

**तुम्बी**–(स्त्री.) भोपळा, दुधी भोपळा.

**तुम्ह**–(सर्वनाम) द्वितीय पुरुषवाचक सर्वनामाचे अनेकवचन, तुम्ही.

**तुरग**–(पु.) घोडा, अश्व.

**तुरति**–(क्रि.) शीघ्र करणे, ताबडतोब करणे, जलद करणे.

**तुरित**–(वि.) शीघ्र, तावडतोब, त्वरित, लगोलग.

**तुरितं**–(क्रि. वि.) शीघ्रतेने, त्वरेने, जलदीने, लवकर.

**तुरिय**–(नपु.) तुतारी, रणशिंग, नगारा.

**तुरियंत्तर**–(नपु.) तुतारीप्रमाणे अन्य वाद्य.

**तुरुक्ख**–(वि.) तुर्कीविषयी, तुर्कासंबंधी.

**तुलना**–(स्त्री.) तोलणें, मोजणे, जोकणे, विचार करणे.

**तुलसी**–(स्त्री.) तुळस, तुळशीचे रोप.

**तुला**–(स्त्री.) तराजू.

**तुलाकूट**–(नपु.) खोटा तराजू.

**तुला-दण्ड**–(पु.) तराजूची दांडी.

**तुलिय**–(वि.) समान, सारखा, बरोबरीचा, त्याच योग्यतेचा. जो तोलता येईल, जोकता येईल.

**तुलिय**–(पु.) पाकोळी.

**तुलेति**–(क्रि.) तोलणे, जोकणे, मोजणे.

**तुल्य**–(वि.) समान, सारखा, बरोबरीचा, तोलता येईल, जोकता येईल.

**तुल्यता**–(स्त्री.) समानता, सारखेपणा, बरोबरी.

**तुल्ल**–[पहा–तुल्य.]

**तुवं त्वं,**–(सर्वनाम) तू, द्वितीय पुरुषी एकवचनी सर्वनाम.

**तुवटं**–(क्रि. वि.) शीघ्रतेने, तत्काळ, ताबडतोब, जलदीने.

**तुवट्टेति**–(क्रि.) वाटणे, विभागणे, भाग पाडणे, वेगळे करणे.

**तुस्सति**–(क्रि.) संतुष्ट होणे, तृप्त होणे, समाधान पावणे.

**तुस्सना**–(स्त्री.) संतोष, तृप्ती, समाधान.

**तुसित**–(पु.) सहा देवलोकांपैकी चौथा देवलोक.

**तुहिन**–(नपु.) दव, ओस, दवाचा थेंब, दहिवर.

**तूण**–(पु.) बाणांचा भाता, तरकश.

**तूणीर**–[पहा–तूण].

**तूरिय**–[पहा–तुरिय.]

**तूल**–(नपु.) कापूस.

**तूलिका**–(स्त्री.) चित्रकाराची तूलिका, कुंचला.

**तूलिका**–(स्त्री.) कापसाची गादी.

**ते-असीति**–(सं. वि.) त्र्याऐंशी, (८३).

**ते-किच्छ**–चिकित्सा करण्यायोग्य, परीक्षणीय, योग्य, तपासण्यालायक.

**ते-चत्तालीसति**–(सं. वि.) त्रेचाळीस, (४३).

**ते-चीवरिक**–(वि.) तीन चीवर (भिक्खुवस्त्र) असणारा.

**तेज**–(पु., नपु.) उष्णता, प्रकाश, तेज.

**तेजोधातु**–(स्त्री.) उष्णता, ऊब.

**तेजो-कसिन**–(नपु.) ध्यान धारणेसाठी वापरलेली ज्योत, अग्नी-प्रकाश.

**तेजन**–(नपु.) तीर, बाण.

**तेजवन्तु**–(वि.) तेजयुक्त, प्रकाशमान, प्रज्वलित, सतेज, प्रकाशित, तेजोमय.

**तेजित**–(कृ.) प्रकाशित केलेला, सतेज केलेला, पेटविलेला.

**तेजेति**–(क्रि.) जळणे, पेटणे, उष्णता उत्पन्न करणे.

**तेत्तिंसा**–(सं. वि., स्त्री.) तेहत्तीस, (३३).

**तेन**–(अ.) या कारणाने, यामुळे, यास्तव, यासाठी.

**ते-नवुति**–(सं. वि., स्त्री.) त्र्याण्णव, (९३).

**ते-पञ्ञासति**–(सं. वि., स्त्री.) त्रेपन्न, (५३).

**तेमन**–(नपु.) भिजणे, ओले होणे, चिंब होणे.

**तेमियति**–(क्रि.) भिजणे, ओले होणे.

**तेरस**–(सं. वि.) तेरा, (१३).

**तेरो-वस्सिक**–(वि.) तीन वर्षाचा, त्रिवर्षिय.

**तेल**–(नपु.) तेल, पातळ स्निग्ध पदार्थ, द्रवरूप स्निग्ध पदार्थ.

**तेल-घट**–(पु.) तेलाचा घडा, तेलाची बुदली, तेलाचे मोठे भांडे

**तेल-चाटी**–(स्त्री.) तेलाचे लहान भांडे, तेलाची पळी.
**तेल-धूपित**–(वि.) तेलात तळलेला.
**तेल-पदीप**–(पु.) तेलाचा दिवा.
**तेल-मक्खन**–(नपु.) तेल माखणे, तेल लावणे, तेलाने चोळणे.
**तेलक**–(नपु.) थोडेसे तेल, तेलाचा थेंब.
**तेलपत्त जातक**–राजकुमार इंद्रिय सुखांकडे न वळता तो ज्ञानार्जनासाठी तक्षशिला विद्यापीठात जाऊन अध्ययन करू लागला. तेथून परतल्यानंतर तो राजा झाल्याची कथा–(९६).
**तेलिक**–(पु.) तेली, तेल गाळणारा, तेलाचा व्यवसाय करणारा.
**तेलोवाद जातक**–तीन कोटी (त्रिकोटि) परिशुद्ध मांस-मासे यांचे भोजन करू शकण्याबाबतची कथा–(२४६).
**तेसकुण जातक**–राजाने अंड्यांतून जन्मलेल्या पिलास आपल्या मुलाप्रमाणे पालन-पोषण करून वाढविल्याची कथा–(५२१).
**तेसट्ठि**–(सं. वि., स्त्री.) त्रेसष्ठ, (६३).
**तेसत्तति**–(सं. वि., स्त्री.) त्र्याहत्तर, (७३).
**तोमर**–(पु., नपु.) बर्चा, भाला.
**तोय**–(नपु.) जल, पाणी, जीवन.
**तोरण**–(नपु.) तोरण बांधलेला दरवाजा, सुशोभित केलेले दार.
**तोस**–(पु.) प्रसन्नता, प्रीति, आनंद, प्रेम, संतोष.
**तोसना**–(स्त्री.) संतोष, समाधान, आनंद.
**तोसापेति**–(क्रि.) संतुष्ट करणे, समाधान देणे, तृप्त करणे.
**तोसेति**–(क्रि.) संतोष देणे, समाधान देणे, तृप्त करणे.
**त्याबो**–(वि.) अनेक, बहुत, पुष्कळ, इत्यादि, आदि.

## थ

**थ**–नागरी वर्णमालेतील "त" वर्गातील दुसरे अक्षर, थ.
**थकन**–(नपु.) झाकण, झाकणे.
**थकेति**–(क्रि.) झाकून टाकणे, बंद करणे.
**थकेसि**–(पू. क्रि.) झाकले गेलेले, बंद केले गेलेले.
**थकित**–(कृ.) बंद केलेले, झाकलेले.
**थकेन्त**–(कृ.) बंद करत असता, झाकत असता.
**थकेत्वा**–(पू. क्रि.) बंद करून, झाकून.
**थञ्ज**–(नपु.) स्तनांतील, थानांतील, आईचे दूध.
**थण्डिल**–(नपु., स्त्री.) कठीण जमीन.
**थण्डिल-सायिका**–(स्त्री.) कठीण जमिनीवर झोपणे, एक प्रकारची तपश्चर्या, हटयोगाचा एक प्रकार.
**थण्डिल-सेय्या**–(स्त्री.) जमीन हेच अंथरूण, धरणी हीच शय्या.
**थद्ध**–(वि.) कठोर, कठीण, कडक.
**थद्धमच्छरी**–(पु., वि.) अत्यंत चिक्कू, कंजूस, स्वार्थी.
**थन**–(नपु.) स्त्रीचे स्तन, गाय-बकरी इत्यादींचे स्तन.
**थनग्ग**–(नपु.) स्तनाग्र, स्तनाचे पुढील टोक, बोंड, चूची.
**थनप**–(पु.) स्तन पिणारे, लहान मूल, शिशु.
**थनयति**–(क्रि.) गर्जना करणे, ओरडणे, मोठा आवाज काढणे.
**थनित**–(पु.) गर्जना, मोठा आवाज.
**थनेति**–(क्रि.) गर्जना करणे, ओरडणे.
**थनेसि**–(पू. क्रि.) ओरडला, गर्जना केली.
**थनित**–(कृ.) गर्जलेला, ओरडलेला.
**थनेन्त**–(कृ.) गरजत असता, ओरडत असता.
**थनेत्वा**–(पू. क्रि.) गर्जना करून, ओरडून.
**थपति**–(पु.) सुतार.
**थबक**–(पु.) गुच्छा, झुबका, गुच्छ.
**थम्भ**–(पु.) खांब, स्तंभ.
**थम्भक**–(पु.) मूठभर गवत, गवताची मूठ.
**थरु**–(पु.) तलवार, खड्ग.
**थरु**–(स्त्री.) तलवारीची किंवा अन्य शस्त्राची मूठ.
**थल**–(नपु.) भूमी, जमीन, स्थळ, ठिकाण.
**थलगोचर**–(वि.) जमिनीवर राहणारा.
**थलज**–(वि.) जमिनीतून उत्पन्न.
**थलट्ठ**–(वि.) जमिनीवर राहिलेला, जमिनीवर थांबलेला, जमिनीवर स्थित, जमिनीवर असलेला.
**थलपथ**–(पु.) भू-मार्ग, जमीन-मार्ग, स्थल-मार्ग.
**थव**–(पु.) प्रशंसा, स्तुती, वाहवा.
**थवति**–(क्रि.) प्रशंसा करणे, स्तुती करणे, वाहवा करणे.
**थविक**–(स्त्री.) थैली, पिशवी, झोळी.
**थाम**–(पु.) सामर्थ्य, शक्ती, बल.
**थामवन्तु**–(वि.) सामर्थ्यवान, शक्तिशाली, बलवान, सशक्त.
**थाल**–(पु., नपु.) थाळी, ताट, उथळ पात्र.
**थाली**–(स्त्री.) थाळी, ताटली.
**थालक**–(नपु.) लहान भांडे.
**थालिका**–(स्त्री.) चिंचोळे भांडे, टोकदार भांडे, वगराळ.
**थाली-पाक**–(पु.) दुधांत शिजविलेला भात किंवा जवस.

**थावर**–(वि.) स्थिर, अचल, न हालणारे, स्थावर, एका ठिकाणी असलेले.
**थावरिय**–(नपु.) स्थिरपणा, अचलपणा.
**थिर**–(वि.) स्थिर, दृढ, निश्चल.
**थिरतर**–(वि.) दृढतर, स्थिरपणे.
**थिरता**–(स्त्री.) स्थैर्य, दृढता.
**थी**–(स्त्री.) स्त्री, बाई, नारी.
**थी-रज**–(पु., नपु.) स्त्रियांची मासिक पाळी.
**थीन**–(नपु.) आळस, भेद, जडता, जडपणा.
**थुति**–(स्त्री.) स्तुती, वाहवा.
**थुति-पाठक**–(पु.) भाट, स्तुती गाणारा.
**थुनाति**–(क्रि.) कण्हणे, विव्हळणे.
**थुनि**–(पू. क्रि.) कण्हला, विव्हळला.
**थुनंत, थुनमान**–(कृ.) कण्हत असलेला, विव्हळत असलेला.
**थुनित्वा**–(पू. क्रि.) कण्हून, विव्हळ होऊन.
**थुल्ल**–(वि.) स्थूल, मोठा, विशाल.
**थुल्लचय**–(पु.) घोर अपराध, मोठा अपराध-गुन्हा.
**थुल्ल-कुमारी**–(स्त्री., वि.) मोठी-स्थूल शरिराची मुलगी, लठ्ठ मुलगी.
**थुल्ल-फुसितक**–(वि.) मोठ्या थेंबांचा पाऊस, मुसळधार पाऊस.
**थुल्ल-सरीर**–(वि.) स्थूल शरिराचा, लठ्ठ-शरीर असलेला, वातूळ शरिराचा.
**थुस**–(पु.) भूसा, भुसकट, धान्याच्या कणसातून निघालेला टाकाऊ भाग.
**थुसग्गि**–(पु.) भुसाचा जाळ
**थुस-पच्छि**–(स्त्री) भूसा भरलेला, भाता भरलेला, मृत प्राणी किंवा पक्षाची कातडी काढून वाळवून परत त्यांत भूसा भरून ठेवणे.
**थुस सोडक**–(नपु.) साखरेचा पाक.
**थुस जातक**–आचार्याने (गुरु) बनारसच्या राजकुमाराला जो त्यांचा शिष्य होता त्याला चार गोष्टी सांगितल्या होत्या. त्या शिकवणीने तो राजकुमार राज्याचा उत्तराधिकारी झाला व आपला प्राण वाचवू शकल्याची कथा–(३३८).
**थूण**–(पु.) खांब, स्तंभ, वध करण्याचे ठिकाण, पशूंना बळी देण्याची जागा.
**थूण**–(नपुं.) मध्यप्रदेशातील पश्चिम सरहद्दीवरील एक गाव-सध्या त्यास स्थानेश्वर असे म्हणतात.
**थूप**–(पु.) स्तूप.

**थूपारह**–(वि.) स्तूप निर्मितीमुळे पूज्य, पवित्र ठिकाण पवित्र क्षेत्र.
**थूप-वंस**–(नपु) वाचेश्वर (वाचस्पति) रचित पालि-भाषेतील पद्य साहित्य रचना. या काव्य रचनेच्या एका भागात श्रीलंकेच्या अनुराधापूर येथील महा स्तूपाचे वर्णन आहे.
**थूपिका**–(स्त्री.) शिखर.
**थूपिकत**–(वि.) स्तूपाप्रमाणे बनविलेले.
**थूल**–(वि.) स्थूल, लठ्ठ, वातूळ.
**थूलता**–(स्त्री.) स्थूलपणा, स्थूलता.
**थूल-साटक**–(पु.) पासोडी, चादर, जाडवस्त्र, कापड.
**थेत**–(वि.) विश्वसनीय, खात्रीशीर.
**थेन**–(पु.) चोर, डाकू.
**थेनक**–(पु.) चोरी करणारा, डाका घालणारा, चोर, डाकू.
**थेनित**–(कृ.) चोरी केलेला, चोरटा, चोरीचा.
**थेनेति**–(क्रि.) चोरी करणे, चोरणे, अपहरण करणे
**थेनेसि**–(पू. क्रि.) चोरी केली, अपहरण केले.
**थेनेन्त**–(कृ.) चोरी करताना, अपहरण करत असता.
**थेनेत्वा**–(पू. क्रि.) चोरी करून, अपहरण करून.
**थेय्य**–(नपु.) चोरी.
**थेय्य-चित्त**–(नपु.) चोरीचा इरादा, चोरीची भावना, चोरीची इच्छा.
**थेय्य-संवासक**–(वि.) भिक्खु पदाची दीक्षा न घेता, खोटीच भगवी वस्त्रे नेसून भिक्खु बरोबर राहणारा-वावरणारा.
**थेर**–(पु.) जेष्ठ भिक्खु. कमीत कमी दहा वर्षापेक्षा अधिक काळ उपसंपन्न भिक्खुपद सांभाळले आहे असा जेष्ठ भिक्खु.
**थेर-गाथा**–(पु.) खुद्दक निकायाचा आठवा ग्रंथ. या ग्रंथांचा संग्रह हा भगवान बुद्धाच्या समकालीन भिक्खंच्या रचना मानल्या जातात.
**थेर-वाद**–(पु.) स्थविर-वाद, स्थविरांचे सिद्धांत.
**थेरी**–(स्त्री.) जेष्ट भिक्खणी, वृद्धा भिक्खुणी.
**थेरी-गाथा**–(पु.) खुद्दक निकायाचा नववा ग्रंथ. या कथा भिक्खणीच्या-थेरीच्या काव्यरचना मानल्या जातात.
**थेव**–(पु.) थेंब, पाण्याचा बिंदु.
**थोक**–(वि.) थोडा, अल्प, जरासा.
**थोकं-थोकं**–(क्रि. वि.) थोडा-थोडा.
**थोमन**–(नपु.) स्तुती, प्रशंसा, वाहवा.
**थोमेति**–(क्रि.) स्तुती करणे, प्रशंसा करणे.

## द

**द**–नागरी लिपीच्या वर्णमालेतील "त" वर्गातील तिसरे अक्षर.

**दक**–(नपु.) पाणी, जल, उदक.

**दक-रक्खस**–(पु.) जल-राक्षस, पाण्यातील राक्षस, जलशक्ति.

**दक-रक्खस जातक**-[पहा-महा उम्मग्ग जातक-(५४६)]. दक-रक्खस जातक-(५१७) या नावाची वेगळी कथा अस्तित्वात नाही.

**दक्ख**–(वि.) दक्ष, योग्य, तत्पर, तयार.

**दक्खक**–(वि.) दर्शक, पाहणारा, निरीक्षक.

**दक्खता**–(स्त्री.) दक्षता, काळजी, तत्परता.

**दक्खति**–(क्रि.) पहाणे, निरीक्षण करणे.

**अदक्खि**–(पू. क्रि.) पाहिलेले, निरीक्षण केलेले.

**दक्खिण**–(वि., स्त्री.) दक्षिण दिशा, उजवा-उजवी.

**दक्खिणक्खक**–(नपु.) स्त्रियांच्या उजव्या बाजूचा दागिना.

**दक्खिण-दिसा**–(स्त्री.) दक्षिण दिशा.

**दक्खिण-देस**–(पु.) दक्षिण देश, दक्षिणेकडील प्रदेश-भाग.

**दक्खिणा**–(स्त्री.) दक्षिणा, दक्षिण दिशा.

**दक्खिणापथ**–(पु.) भारताचा दक्षिण भाग, दक्खन (डेक्कन).

**दक्खिणायन**–(नपु.) सूर्याचे दक्षिणायन, सूर्य विषुववृत्ताकडून दक्षिणेकडे मकर वृत्तापर्यंत जाण्याचा काळ.

**दक्खिणारह**–(वि.) दक्षिणा देण्यास योग्य.

**दक्खिणावत्त**–(वि.) उजवीकडे वळणे.

**दक्खिणा-विसुद्धि**–(वि.) दक्षिणेचे पावित्र्य.

**दक्खिणोदक**–(नपु.) दक्षिणेचे पाणी.

**दक्खिणेय**–(वि.) दक्षिणा देण्यास योग्य, पात्र.

**दक्खिणेय-पुग्गल**–(पु.) दक्षिणा घेण्यास योग्य असलेली व्यक्ती, दक्षिणा घेण्याचा अधिकारी.

**दक्खि**–(पु.) पाहणारा, अनुभव घेणारा.

**दट्ठ**–(कृ.) डसला, चावला, दंश केला.

**दट्ठट्ठान**–(नपु.) चावलेले ठिकाण, डसलेली जागा.

**दट्ठ-भाव**–(पु.) चावल्याची गोष्ट, डसल्याची बाब.

**दड्ढ**–(कृ.) जळलेला, पेटलेला.

**दड्ढट्ठान**–(नपु.) जळालेली जागा, पेटलेले ठिकाण.

**दड्ढ-गेह**–(वि.) जळालेले घर, पेटलेले घर, जळके घर.

**दण्ड**–(पु.) काठी, लाठी.

**दण्ड**–(पु.) शिक्षा, दण्ड.

**दण्डक-मधु**–(नपु.) मधाचे पोळे लागलेली काठी.

**दण्ड-कम्म**–(नपु.) शिक्षा, शिक्षा करण्याचे काम.

**दण्डकोटि**–(स्त्री.) छडीचे टोक.

**दण्डदीपिका**–(स्त्री.) मशाल, जळते लाकूड.

**दण्डनीय**–(वि.) शिक्षा करण्यास पात्र, दंडास पात्र.

**दण्डप्पत्त**–(वि.) शिक्षा झालेला, सजा भोगणारा.

**दण्ड परायण**–(वि.) ज्याला काठीचा आधार आहे.

**दण्ड-पाणि**–(वि.) हातात काठी असणारा.

**दण्ड-पाणि**–(पु., विशे. ना.) अंजन आणि सुलक्षणा यांचा पुत्र, देवदह येथील कोलिय. याच दंड-पाणीच्या दोन्ही बहिणी-माया व महाप्रजापति (गौतमी) शुद्धोदनाच्या दोन राण्या होत्या.

**दण्ड-भय**–(नपु.) शिक्षेची भीति.

**दण्ड-हत्थ**–(वि.) हातात काठी घेतलेला, हातात काठी असणारा.

**दत्त**–(कृ.) दिला गेलेला, दिलेला.

**दत्ति**–(स्त्री.) जेवणाचे लहान ताट, भांडे.

**दत्तु**–(पु.) मूर्ख माणस.

**दत्वा**–(पू. क्रि.) देऊन.

**दद**–(वि.) देत असलेला.

**ददित्वा**–[पहा–दत्वा].

**ददाति**–(क्रि.) देणे, देऊन टाकणे.

**दद्दभ-जातक**–बेलाच्या झाडाखाली एक ससा सहज पडला होता. त्याने पाहिले की, झाडावरून एक बेलफळ पडत आहे. हे पाहण त्यास वाटले कीं, आता प्रलयकाळ होऊ लागलेला आहे. म्हणून ससा पळू लागल्याची कथा–(३२२).

**दद्दर जातक**–जंगलात एक कोल्हा सिंहाप्रमाणे गर्जनेचा आवाज काढू लागला. तेव्हा सिंहाला संकोच वाटून तो स्तंभित झाल्याची कथा–(१७२).

**दद्दर जातक**–महादद्दर व चूळदद्दर या दोन नागांची कथा–(३०४).

**दद्दरी**–(पु.) एक प्रकारचे तंतू वाद्य.

**दद्दु**–(स्त्री.) दाद, माहिती, शोध.

**दद्दुर**–(पु.) बेडूक, मेंढक.

**दद्दुल**–(वि.) स्पंजाप्रमाणे मऊ पदार्थ.

**दद्दुल**–(नपु.) एक प्रकारचे तांदूळ.

**दधि**–(नपु.) दही.

**दधि-घट**–(पु.) दह्याचा घडा, दह्याचे भांडे.

**दधि-मण्ड**–(नपु.) ताक, मठ्ठा.

**दधि-मण्डक**–(पु.) ताक करणारा, दही घुसळणारा.

**दधिवाहन जातक**–दधिवाहन राजाने आपल्या शत्रूना दह्याच्या समुद्रात बुडवून ठार मारल्याची कथा–(१८६).

दन्त–(नपु.) दात.
दन्त–(कृ.) संयत, संयमी, स्वतःवर ताबा असणारा.
दन्त-कट्ठ–(नपु.) दात घासण्याची काडी.
दन्त-कार–(पु.) हस्तीदंताचे काम करणारा.
दन्त-पाळि–(स्त्री.) दातांची कवळी.
दन्तपोण–(पु.) दात स्वच्छ करण्याचा कुंचला, ब्रश.
दन्त-वलय–(नपु.) हस्तीदंताचे कांकण.
दन्त-विदंसक–(वि.) दात दाखविणारा, तोंड उघडून, वेडेवाकडे करून वाकुल्या दाखविणारा.
दन्तावरण–(नपु.) दातांवरील झाकण, ओठ.
दन्तपुर–(नपु., विशे. ना.) कलिंग राज्याची राजधानी.
दन्तता–(स्त्री.) दक्षता, संयत भावना.
दन्तसठ–(पु.) लिंबू, लिंबाचे झाड.
दन्ध–(वि.) मूर्ख, गबाळा, ढिला.
दन्धता–(स्त्री.) मूर्खपणा, ढिलाई, आळशीपणा, गबाळेपणा.
दनु–(स्त्री.) दानवांची आई-माता.
दप्प–(पु.) दर्प, वास, घ्राण, गंध.
दप्पण–(नपु.) दर्पण, आरसा, कांच.
दप्पित–(वि.) अहंकारी, गर्विष्ठ, अभिमानी.
दब्ब–(वि.) बुद्धिमान, हुशार, योग्य, उचित.
दब्ब–(नपु.) लाकूड, धन, संपत्ति, पदार्थ.
दब्ब जातिक–(वि.) समजूतदार, सूज्ञ, समजदार, जाणकार.
दब्ब-तिण–(नपु.) दुर्वा, हराळी.
दब्ब-पुप्फ-जातक–रोहित जातीचा मोठा मासा दोन उदांनी (पाणमांजरानी) मारून आणला. त्याच्या वाटपाबाबत त्या उदांचे भांडण लागले. त्यावेळी एका माकडाने तेथे येऊन एका उदास माशाचे डोके व एकास शेपूट दिले व मधला मांसल भाग स्वतः खाऊन टाकल्याची कथा.–(४००).
दब्ब-सम्भार–(पु.) घर बांधणीचे साहित्य–सामान.
दब्बी–(स्त्री.) तासणी, पळी.
दब्भ–(पु.) दर्भ, कुश नांवाचे गवत, गवताची काडी.
दमन–(नपु.) संयम, मनावरील ताबा.
दमक–(वि.) संयमी, संयम पाळणारा.
दमित–(कृ.) संयम पाळला.
दमिळ–(स्त्री.) दक्षिण भारतातील तामिळनाडूमधील एक जात.
दमेति–(क्रि.) संयमी बनणे, संयम राखणे.
दमेतु–(वि.) दमन करणारा, संयमी.
दम्पत्ति–(पु.) पत्नि आणि पति, नवरा-बायको, उभयता.
दम्म–(वि.) संयम शिकणारा.
दया–(स्त्री.) करुणा, दया.
दयालु–(वि.) दया करणारा, दया दाखविणारा, दयाळू.
दयित–(कृ.) दयापात्र, दया करण्यास योग्य.
दयितब्ब–(कृ.) दयापात्र, दया दाखविण्यास योग्य.
दयिता–(स्त्री.) स्त्री, बाई, नारी, अबला, महिला.
दर–(पु.) दुःख, कष्ट, त्रास, चिन्ता.
दरथ–(पु.) दुःख, कष्ट, त्रास, चिन्ता.
दरीमुख जातक–मगध देशाचा राजपुत्र ब्रह्मदत्त आणि त्याचा सहपाठी दरीमुख यांची कथा.–(३७८).
दल–(नपु.) पाकळी, पान, फळी, फलक.
दलिद्द–(वि.) दरिद्रि, गरीब.
दळिद्द–(वि.) दरिद्री, गरीब, पीडित, शोषित.
दळ्ह–(वि.) दृढ, निश्चित, ठाम.
दळ्हपरक्कम–(वि.) दृढ, पराक्रमी, उत्साही, प्रभावित, प्रोत्साहित.
दळ्ह–(क्रि. वि.) दृढतापूर्वक, निश्चयाने, ठामपणे.
दळ्हीकम्म–(नपु.) दृढ बनविणे, मजबूत बनविणे, घट्ट करणे.
दळ्हधम्म जातक–बनारसच्या दळ्हधम्म नावाच्या राजाच्या मंत्र्याची कथा.–(४०९).
दव–(पु.) क्रीडा, खेळ, आग, उष्णता, ऊब.
दवकम्यता–(स्त्री.) चेष्टा-विनोद करण्याची आवड.
दवधु–(नपु.) जलन, आग.
दव डाह–(पु.) वणवा, जंगलास लागलेली आग.
दस–(सं. वि.) दहा,–(१०).
दस–(वि.) दर्शक, पाहणारा, दिसणारा.
दसक–(नपु.) दशक, दहा वस्तूंचा संच.
दसक्खतुं–(क्रि. वि.) दहावेळा, दहांदा.
दसधा–(क्रि. वि.) दहा प्रकारांनी, दहा पद्धतीने.
दसबल–(वि.) दहा प्रकारच्या शक्तींनी युक्त, भगवान बुद्धाचे एक विशेषणयुक्त पद. (नाव).
दसविध–(वि.) दहा प्रकारांनी.
दस-सत्त–(सं. वि.) सहस्त्र, हजार, (१०००).
दस-सत्त-नयन–(वि.) हजार डोळयांच्या, सहस्त्र नयनांचा.
दस-सहस्स–(सं. वि.) दहा हजार, दश सहस्त्र, (१०,०००).
दुद्दस–(वि.) पाहण्यास दुर्मिळ, पाहण्यास अवघड, कधी न दिसणारा.

**दसण्ण**–(पु.) मध्य भारताचा एक भू-भाग, देशार्णव.

**दसण्णक जातक**–राजाने पुरोहिताच्या पुत्राला आपली राणी एक सप्ताहासाठी सुपूर्त केली होती. तो पुरोहित-पुत्र त्या राणीस घेवून पळून गेल्याची कथा.–(४०५).

**दस ब्राह्मण जातक**–इंद्रप्रस्थचा राजा फार उदार आणि दानशूर होता. परंतु त्याचे सर्वदान दु ट माणसांच्याच पदरात पडत असल्याची कथा.–(४९५).

**दसरथ जातक**–वनवासास जात असताना राम, लक्ष्मण व सीतेला दशरथ राजाच्या मृत्यूची बातमी समजली. सद्गुणी रामाने पितृ आज्ञा पालनासाठी दुःख करत बसण्याऐवजी वनवासगमन करून असाधारण सहनशीलतेचा परिचय दिल्याची कथा.–(४६१).

**दसन**–(नपु.) दात, दंत.

**दसनच्छद**–(पु.) ओठ.

**दसा**–(स्त्री.) दशा, अवस्था, स्थिती, किनार.

**दसिक-सुत्त**–(नपु.) किनारीचा धागा.

**दस्सक**–(वि.) दाखविणारा, दर्शन घडविणारा.

**दस्सति**–(क्रि.) दिसणे, दृगोचर होणे.

**दस्सन**–(नपु.) दर्शन, दृष्टी, अंत, प्रेरणा.

**दस्सनीय**–(वि.) दर्शनीय, पाहण्यायोग्य, प्रेक्षणीय.

**दस्सावी**–(पु.) पाहणारा, बघणारा, दर्शक.

**भय दस्सावी**–(वि.) भयभीत, भ्यालेला, भय पाहणारा.

**दस्सु**–(पु.) दस्यु, दास, डाकू, चोर.

**दस्सेति**–(क्रि.) दिसणे, दृगोचर होणे.

**दस्सेतु**–(पु.) दाखविणारा, दर्शक.

**दह**–(पु.) सरोवर, जलाशय, मोठे तळे, तलाव.

**दहति**–(क्रि.) जाळणे, पेटविणे, आग लावणे, स्वीकार करणे.

**दहन**–(नपु.) जलन, ज्वलन.

**दहन**–(पु.) आग, जाळ.

**दहर**–(पु.) तरुण, युवक, मुलगा.

**दहरा**–(स्त्री.) तरुणी, युवती, मुलगी.

**दाडिम**–(नपु.) डाळिंब.

**दाठा**–(स्त्री.) दाढ.

**दाठा-धातु**–(स्त्री.) भगवान बुद्धाचा दंतावशेष.

**दाठावुध**–(वि.) दातांचा हत्याराप्रमाणे उपयोग करणारा दाताने चावणारा, दाताने फोडणारा.

**दाठाबली**–(वि.) मजबूत दातांचा.

**दात**–(कृ.) चावला गेला.

**दातब्ब**–(कृ.) देण्यायोग्य, दानास योग्य.

**दातु**–(पु.) देणारा, दाता.

**दातुं**–(कृ.) देण्यासाठी.

**दात्त**–(नपु.) दात असलेला. (कृ.) चावलेला.

**दात्त**–(कृ.) चावला गेला.

**दान**–(नपु.) दान, देणगी.

**दान-कथा**–(स्त्री.) दानासंबंधी उपदेश.

**दानग्ग**–(नपु.) दानाची जागा, दानदेण्याचे ठिकाण, छत्र.

**दान-पति**–(पु.) दानशूर, दाता, उदार दाता.

**दान-फल**–(नपु.) दानाचे फल, दानाचा परिणाम.

**दान-मय**–(वि.) दानयुक्त, दानाने भरलेला, दानाने ओतप्रोत.

**दान-वट्ट**–(नपु.) नित्य दान, नेहमी दान, सतत दान.

**दान-वत्थु**–(नपु.) दानाची वस्तु.

**दान वेय्यावटिक**–(वि.) दान वाटणारा.

**दान-साला**–(स्त्री.) दानशाळा, दान देण्याची जागा-इमारत.

**दान-सील**–(वि.) दानशील, दानव्रती.

**दान-सोण्ड**–(वि.) दान-प्रिय.

**दानारह**–(वि.) दान देण्यायोग्य, दानास योग्य-उपयुक्त.

**दानव**–(पु.) राक्षस.

**दानि**–पहा-इदानि.

**दापन**–(नपु.) देवविणे, देण्यास सांगणे, देणे भाग पाडणे.

**दापेति**–(क्रि.) द्यावयास लावणे.

**दापेतु**–(पु.) द्यावयास लावणारा.

**दाब्बि**–(स्त्री.) हळदपूड, वाळलेली हळद.

**दाम**–(पु.) माळ, दोरी, साखळी.

**दाय**–(पु.) जंगल, अरण्य, वन, भेट, देणगी, बक्षीस.

**दायपाल**–(पु.) माळी, वनपाल.

**दायक**–(पु.) दाता, सहाय्यक, मदत करणारा.

**दायज्ज**–(नपु.) उत्तराधिकार, वारसा.

**दायज्ज**–(वि.) उत्तराधिकारी, वारस.

**दायति**–(क्रि.) कापणे, तोडणे, फोडणे.

**दायन**–(नपु.) कापणे, काप.

**दायाद**–(पु.) उत्तराधिकार, वारसा.

**दायादक**–(वि.) उत्तराधिकारी, वारस.

**दायिका**–(स्त्री.) देणारी.

**दायी**–(वि.) देणारा.

**दार**–(पु.) स्त्री, नारी, बाई, अबला, महिला.

**दार-भरण**–(नपु.) स्त्रीचे पालन-पोषण.

**दारक**–(पु.) मुलगा, मूल, पुत्र.

**दारा**–(स्त्री.) स्त्री, महिला.

**दारिका**–(स्त्री.) मुलगी, कन्या.

**दारित**–(कृ.) चिरले, फाडले.
**दारेति**–(क्रि.) फाडणे, चिरणे.
**दारेत्वा**–(पू. क्रि.) फाडून, चिरुन.
**दारेन्त**–(कृ.) फाडत असता, चिरत असता.
**दारेसि**–(पू. क्रि.) फाडले, चिरले.
**दारु**–(नपु.) लाकूड, काष्ट.
**दारु-खण्ड**–(नपु.) लाकडाचा तुकडा.
**दारुक्खन्ध**–(पु.) लाकडांची मोळी, लाकडांचा गठ्ठा.
**दारु-भण्ड**–(नपु.) लाकडी सामान-साहित्य.
**दारुमय**–(वि.) लाकडापासून बनविलेले.
**दारु-सङ्घात**–(संघात)–(पु.) लाकडी नाव, नौका, होडी.
**दारुण**–(वि.) कठोर, कठीण, अवघड, घोर.
**दालन**–(नपु.) चिर-फाड.
**दालेति**–पहा-दारेति.
**दावग्गि**–(पु.) वणवा, जंगलाची आग, दावाग्नी. अरण्यास लागलेली आग.
**दास**–(पु.) गुलाम, नोकर, सेवक, दास.
**दास-गण**–(पु.) गुलामांचा, नोकरांचा, सेवकांचा, दासाचा समूह.
**दासत्त**–(नपु.) नोकरी, गुलामी, सेवा, दास्यत्व.
**दासित्त**–(नपु.) दासीभाव, बटिक
**दासी**–(स्त्री.) दासी, सेविका.
**दाह**–(पु.) आग, ज्वलन, उष्णता, ऊब.
**दालिद्दिय**–(नपु.) दारिद्र्य, दरिद्रता, गरिबी.
**दालिम**–पहा–दाडिम.
**दिक्खति**–(क्रि.) पहाणे, बघणे, निरीक्षण करणे.
**दिक्खति**–(क्रि.) दीक्षा घेणे, दीक्षा स्वीकारणे.
**दिक्खित**–(कृ.) दीक्षित, दीक्षा घेतलेला.
**दिगम्बर**–(पु.) नग्न साधू.
**दिगुण**–(वि.) द्विगुण, दुप्पट, दोनदा,.
**दिगंधका**–(स्त्री.) खाई, विस्तवाची चर.
**दिज**–(पु.) द्विज, दोनदा जन्मणारा, पक्षी, ब्राह्मण.
**दिजगण**–(पु.) पक्षांचा किंवा ब्राह्मणांचा समूह-थवा.
**दिट्ठ**–(कृ.) पाहिले गेले, बघितले गेले.
**दिट्ठ**–(नपु.) दृश्य, दिसणारे.
**दिट्ठ-धम्म**–(पु.) इह लोक, मृत्युलोक, मर्त्य लोक, हे जग.
**दिट्ठ-धम्म**–(वि.) सत्याचा साक्षात्कार.
**दिट्ठ धम्मिक**–(वि.) इह लोकासंबंधी, मृत्यु लोकांविषयी.
**दिट्ठिमङ्गलिक**–(वि.) शकून-अपशकुनाचा विचार करणारा, मांत्रिक.
**दिट्ठ संसन्दन**–(नपु.) दृश्य अथवा ज्ञात-माहीत गोष्टींविषयी तुलनात्मक विवेचन.
**दिट्ठानुगति**–(स्त्री.) दृश्याचे अनुकरण.
**दिट्ठि**–(स्त्री.) सिद्धांत, मत, विश्वास, दृष्टी.
**दिट्ठिक**–(वि.) विशिष्ट मत मानणारा, विशिष्ट दृष्टी असलेला.
**दिट्ठि-कन्तार**–(पु.) मतांची मालिका, विचारधारा, जंगल, अनेक मतांची गल्लत.
**दिट्ठिगत**–(नपु.) चुकीचे मत, मिथ्यामत, चुकीची धारणा.
**दिट्ठि-गहन**–(नपु.) मतांचा गोंधळ, अनेक मते-विचार.
**दिट्ठि-जाल**–(नपु.) मतांचे जाळे, विचारांचा गुंता.
**दिट्ठि-विपत्ति**–(स्त्री.) विचाराची असफलता, मतांची अयशस्विता.
**दिट्ठि-विपल्लास**–(पु.) मतांची विकृती, मतांचा विपर्यास, चुकीचे विचार.
**दिट्ठि-विसुद्धि**–(स्त्री.) स्पष्ट मत, निर्णायक विचार, स्पष्ट दृष्टी, योग्य निर्णय.
**दिट्ठि-सम्पन्न**–(वि.) सम्यक दृष्टीचा, सर्वज्ञ, द्रष्टा.
**दिट्ठि-संयोजन**–(नपु.) चुकीच्या मतांवरील बंधन.
**दित्त**–(कृ.) दीप्त, प्रदीप्त, प्रकाशमान, प्रकाशित, सतेज, उज्वलित, प्रज्वलित.
**दित्ति**–(स्त्री.) दीप्ति, प्रकाश, तेज.
**दिद्ध**–(वि.) दग्ध, त्रासलेला, वेढलेला, विष पाजलेला.
**दिन**–(नपु.) दिवस.
**दिनकर**–(पु.) सूर्य, रवि, भास्कर, दिनमणी.
**दिनच्चय**–(पु.) दिवसाचा अंत, संध्याकाळ, सायंकाळ.
**दिन-पति**–(पु.) सूर्य.
**दिन्दिभ**–(पु.) दुंदुभी, तुतारी, भोंगा, शिंग, रणशिंग,
**दिन्न**–(कृ.) दिले गेले, देऊन टाकले, दिलेले.
**दिन्नादायी**–(वि.) दिलेले घेणारा, स्वीकारणारा.
**दिन्नक**–(पु.) दत्तक पुत्र, दिलेली वस्तू.
**दिपद**–(पु.) द्विपद, दोन पायांचा, मनुष्य.
**दिपदिन्द**–(पु.) मनुष्यांत श्रेष्ठ, तथागत बुद्ध, मनुष्येंद्र.
**दिपदुत्तम**–(पु.) मानवांत श्रेष्ठ, तथागत बुद्ध.
**दिप्पति**–(क्रि.) चमकणे, प्रकाशणे, प्रज्वलित होणे, सतेज होणे.
**दिप्पन**–(नपु.) चमक, तेज, प्रकाश.
**दिब्ब**–(वि.) दिव्य, चमकदार, तेजोमय, प्रकाशमान.
**दिब्ब-चक्खु**–(नपु.) दिव्य चक्षु, दिव्य दृष्टी.
**दिब्ब-चक्खुक**–(वि.) दिव्य दृष्टीने युक्त.

**दिब्ब-विहार**–(पु.) दिव्य-विहार, करूणा-दया-भूतदया इत्यादी भावनांत मन गुंतविणे.
**दिब्ब-सम्पत्ति**–(स्त्री.) दिव्य-संपत्ति, दिव्य-धन.
**दिब्बत दिब्बति**–(क्रि.) विनोद करणे, करमणूक करणे.
**दियड्ढ**–(पु.) वैर, तेढ, शत्रुत्व, विरोध.
**दिव**–(पु.) दिव्य लोक.
**दिवस**–(पु.) दिन, दिवस.
**दिवसकर**–(पु.) सूर्य, भास्कर, रवि, दिनमणी.
**दिवस-भाग**–(पु.) दिवसाचे वेळी, दिवसाचा काळ.
**दिवा**–(अ.) दिन, दिवस, दिवसांत, दिवसा.
**दिवाकर**–(पु.) सूर्य.
**दिवा-ठान**–(नपु.) सूर्यास्ताची जागा, पश्चिम क्षितिज.
**दिवा-विहार**–(पु.) दिवसा विश्रांती घेणे, दिवसा झोपणे.
**दिवा-सेय्या**–(स्त्री.) दिवसाची शैय्या, दिवसा झोपणे.
**दिस**–(पु.) शत्रू, वैरी.
**दिसम्पति**–(पु.) राजा, नरेश, भूप.
**दिसा**–(स्त्री.) दिशा, बाजू.
**दिसा-काक**–(पु.) भू प्रदेशाचा शोध घेण्यासाठी नौकेवर पाळलेला (ठेवलेला) कावळा.
**दिसा-कुसल**–(वि.) दिशा ओळखण्यांत पटाईत-कुशल-निष्णात.
**दिसा-पामोक्ख**–(वि.) सर्वत्र प्रसिद्ध, कीर्तिमान, प्रसिद्ध.
**दिसा-भाग**–(पु.) दिशा, बाजू.
**दिसामूळ्ह**–(वि.) दिशांचे ज्ञान नसलेला.
**दिसा-वासिक**–(वि.) देशाच्या दुसऱ्या भागात राहणारा, परप्रांतीय, विदेशी, परदेशी.
**दिस्सति**–(क्रि.) असे दिसणे, असे समजणे, कळणे.
**दीघ**–(वि.) लांब, दूर, दीर्घ.
**दीघङ्गुली**–(वि.) लांब बोटांचा.
**दीघ-जातिक**–(पु.) दीर्घायुषी साप.
**दीघता**–(स्त्री.) लांबी, दूरी, फार लांब.
**दीघत्त**–(नपु.) लांबी, दीर्घत्व.
**दीघ-दस्सी**–(वि.) दूर-दर्शी, भविष्य ओळखणारा.
**दीघ निकाय**–(पु., विशे. ना.) सुत्तपिटकाचा पहिला ग्रंथ, यात विस्तृत रचनेची चौतीस सूत्रे आहेत.
**दीघ-भाणक**–(पु.) दीर्घनिकायाचा पाठक, ज्याने दीर्घनिकाय पाठ केला आहे.
**दीघ-रत्तं**–(क्रि. वि.) दीर्घ काळापर्यंत, पुष्कळ काळापर्यंत.
**दीघ-लोमक**–(वि.) लांब केसांचा, अजानुकेशराशी.
**दीघ-सोत्थिय**–(नपु.) सम्पन्नता, समृद्धी, ऐश्वर्य, श्रीमंती.
**दीघ-हत्थ**–(पु.) लांब हातांचा, अजानुबाहू.

**दीधिति**–(स्त्री.) प्रकाश, तेज, चमक, दीप्ती.
**दीन**–(वि.) गरीब, दीन, असहाय, शोषित.
**दीनता**–(स्त्री.) गरीबी, दैन्य, दूरावस्था, असहायता, दीनत्व.
**दीप**–(पु.) दिवा, दीपक, शामदान, कंदील, बत्ती, दीप.
**दीप**–(पु., नपु.) द्वीप, आश्रय, आधार.
**दीप**–(नपु.) एक प्रकारचे वाहन, चित्त्याच्या चमड्याची बैठक.
**दीपक**–(नपु.) लहान दिवा, द्वीप, दीपक.
**दीपक**–(वि.) जाहीर करणारा, प्रकट करणारा, घोषित करणारा.
**दीपङ्कर**–(वि.) दिवा लावणारा, प्रकाश पाडणारा, बत्ती पेटविणारा, ज्ञान देणारा.
**दीपङ्कर**–(पु., विशे. ना.) चोवीस बुद्धांपैकी पहिला बुद्ध.
**दीपच्चि**–(स्त्री.) दिव्याची ज्योत.
**दीप-रुक्ख**–(पु.) दीप-स्तंभ, दिव्यांचा खांब, दीपमाळ.
**दीप-सिखा**–(स्त्री.) दिव्याची ज्योत.
**दीपालोक**–(पु.) दिव्याचा प्रकाश, दिव्याचे तेज.
**दीपना**–(स्त्री.) व्याख्या.
**दीपनी**–(स्त्री.) व्याख्यात्मक टिप्पणी.
**दीपवंस**–(नपु.) श्रीलंकेचे प्राचीन ऐतिहासिक काव्य.
**दीपि**–(पु.) चित्ता, बिबळ्या वाघ.
**दीपिक**–(पु.) चित्ता, बिबळ्या वाघ.
**दीपि जातक**–शेळीने गोड शब्दांत बिबळ्या वाघाची स्तुती केली. पण शेवटी बिबळ्याने तिला मारून खाल्याची कथा. (४२६).
**दीपिका**–(स्त्री.) मशाल, टेंभा, दिवटी, व्याख्या.
**दीपित**–(कृ.) ज्याची व्याख्या बनविली, ज्याचा अर्थ सांगितला, व्याख्यात.
**दीपिनी**–(स्त्री.) चित्ती, बिबळी वाघीण.
**दीपेति**–(क्रि.) प्रकाशित करणे, जाहीर करणे, स्पष्ट करणे.
**दुक**–(नपु.) जोडी, जोडा, उभयता, दोघे.
**दुकूल**–(नपु.) तलम कापड.
**दुक्कट**–(वि.) वाईट काम, दुष्कर्म, दुष्कृत.
**दुक्कट**–(नपु.) दुष्कर्म, अकुशल कर्म, दुष्कृत.
**दुक्कर**–(वि.) दुष्कर, कठीण, अवघड.
**दुक्करभाव**–(पु.) कठिणाई, अवघडपणा, कठोरता, दुष्करता.
**दुक्ख**–(नपु.) कष्ट, त्रास, वेदना, दुःख.

दुक्ख–(वि.) अप्रिय, त्रासदायक, दुःख.
दुक्खं–(क्रि. वि.) कष्टाने, श्रमाने, त्रासाने.
दुक्खक्खय–(पु.) दुःखाचा नाश, दुःखाचा अंत-शेवट.
दुक्खक्खन्ध–(पु.) दुःखांचा समुदाय, दुःखांचा खंदक.
दुक्ख-निदान–(नपु.) दुःखाचे मूळ, दुःखाचा शोध.
दुक्ख-निरोध–(पु.) दुःखांचा नाश, दुःखांचा अंत.
दुक्ख-निरोध-गामिनी-पटिपदा–(स्त्री.) दुःख नाशाकडे नेणारा मार्ग.
दुक्खन्तगु–(वि.) दुःखांचा अंत केलेला, दुःखांचा अंत करणारा.
दुक्ख-पटिकूल–(वि.) दुःख विरोध, दुःखाच्या प्रतिकूल.
दुक्ख-परेत–(वि.) दुःखाँने त्रासलेला, दुःखाने व्यग्र.
दुक्खप्पत्त–(वि.) दुःखप्राप्त, दुःखी, दुःखित.
दुक्खप्पहाण–(नपु.) दुःख दूर करणे, दुःखाचा नाश, दुःख परिहार, दुःखाचा अंत-शेवट.
दुक्ख-विपाक–(वि.) दुःख प्राप्ति, दुःख मिळणे, ज्याचे फळ दुःख, दुःखाचा परिणाम.
दुक्ख-सच्च–(नपु.) दुःखाविषयी सत्त्य, दुःख आहे, हे सत्त्य.
दुक्ख-समुदय–(पु.) दुःखाच्या उत्पत्तीविषयी सत्त्यता.
दुक्ख-सम्फस्स–(वि.) दुःखाची उत्पत्ती, दुःखाचा स्पर्श.
दुक्ख-सेय्या–(स्त्री.) बेचैन झोप.
दुक्खानुभवन–(नपु.) दंड भोगणे, शिक्षा भोगणे, दुःख भोगणे, कष्ट सोसणे.
दुक्खापगम–(पु.) दुःख घालविणे, दुःखाचा अंत, दुःखाचा नाश.
दुक्खापन–(नपु.) कष्टप्रद, कष्टदायक, दुःखदायक, दुःखकारक.
दुक्खापेति–(क्रि.) कष्ट देणे, दुःख देणे, त्रास देणे, दुखविणे, त्रसित करणे.
दुक्खित–(वि.) अप्रसन्न, दुःखी.
दुक्खी–(वि.) अप्रसन्न, दुःखी.
दुक्खीयति–(क्रि.) दुःखी होणे, दुःखी करणे.
दुक्खुद्रय–(वि.) दुःखद, दुःखकारक, दुःखाने.
दुक्खूपसम–(पु.) दुःखाचे उपशमन, दुःख दूर करण्याचा उपाय.
दुग्ग–(पु.) किल्ला, गड, दुर्ग.
दुग्गत–(वि.) गरीब, दरिद्र, दुर्गति प्राप्त, दरिद्री.
दुग्गति–(स्त्री.) वाईट स्थिती, दुर्गति.
दुग्गन्ध–(पु.) घाण वास, दुर्गंध.
दुग्गन्ध–(वि.) वाईट वासाचा, घाण वासाचा, दुर्गंधीयुक्त.
दुग्गम–(वि.) कठीण, अवघड, दुर्गम, जाणे अशक्य, पोहोचणे अशक्य.
दुग्गहीत–(वि.) जे नीट समजले नाही, कळले नाही, चुकीची धारणा, अयोग्य मत.
दुग्गसंचार–(पु.) किल्यावर जाण्याचा रस्ता, अवघड वाट, कठीण मार्ग.
दुच्चज–(वि.) त्यागण्यास किंवा सोडण्यास अवघड-कठीण.
दुच्चरित–(नपु.) दुराचरण, वाईट वर्तन, अयोग्य वागणे.
दुजिव्ह–(पु.) साप, नाग, दोन जिभांचा प्राणी.
दुज्जह–(वि.) त्यागण्यास किंवा सोडण्यास अवघड, कठीण.
ज्दुजान–(वि.) समजण्यास अवघड, कळण्यास कठीण, जाणणे कठीण.
दुज्जीवित–(नपु.) मित्थ्या चरितार्थ, दुर्जीवन, अयोग्य चरितार्थ.
दुट्ठ–(वि.) दुष्ट, वाईट, दुर्विचारी, वाईट धारणेचा.
दुट्ठ–(कृ.) द्वेषयुक्त, द्वेषपूर्ण, दुष्ट.
दुट्ठ–(क्रि. वि.) वाईट तऱ्हेने, वाईट विचाराने, द्वेष बुद्धीने.
दुट्ठुल्ल–(नपु.) निरर्थक चर्चा, मूर्खपणाचे बोलणे
दुट्ठुल्ल–(वि.) हलका, कमी.
दुतप्पय–(वि.) दुटप्पी, विचारांची धरसोड.
दुतिय–(वि.) द्वितीय, दुसरा.
दुतियक–(वि.) साथी, जोडीदार, दोस्त, मित्र.
दुतियं–(क्रि. वि.) दुसऱ्यांदा, दुसऱ्या वेळी.
दुतियपलायी जातक–गांधार देशाचा राजा पळून गेल्याची कथा–(२३०).
दुतिया–(स्त्री.) पत्नी, बायको, भार्या.
दुतिया–(वि., स्त्री.) द्वितीया विभक्ती, कर्मकारक.
दुतियिका–(स्त्री.) पत्नी, बायको, भार्या.
दुत्तर–(वि.) दुस्तर, अवघडरित्या निभावून नेणे, पार करणे.
दुद्द जातक–तक्षशिलेस राहून विद्या विभूषित झालेला तपस्वी व त्याचा शिष्यगण बनारसला पोहोचले तेव्हा त्यांचा वाराणसीच्या नागरिकांनी सत्कार करून त्यांना यथेच्छ भोजन दिल्याची कथा–(१८०).
दुद्दम–(वि.) दुर्दम, अवघड, कठीण, फार त्रासाने निभावणे.
दुद्दस–(वि.) फार त्रासाने दिसणे, फार श्रमानंतर समजणे.
दुद्दसतर–(वि.) अधिकाधिक त्रासाने दिसणे, अतिश्रमानंतर समजून येणे.

दुद्दसा–(स्त्री.) दुर्दशा, वाईट स्थिती, खडतर जीवन.
दुद्दसापन्न–(वि.) दुर्दशा प्राप्त, दुर्दशेने ग्रासलेला.
दुद्दसिक–(वि.) विद्रुप, अपशकुनी, वाईट चेहऱ्याचा, कुरुप.
दुद्दिन–(नपु.) दुर्दिन, वाईट दिवस.
दुद्दिन–(वि.) पावसाचा दिवस.
दुद्ध–(नपु.) दूध, दुग्ध, गोरस, अमृत.
दुद्ध–(कृ.) धार काढलेली, दूध काढून घेतलेली.
दुंदुभि–(स्त्री.) ढोल, रणवाद्य, नगारा.
दुन्नायक–(नपुं) मूळ व्याधी.
दुन्निक्खित–(वि.) कसातरी ठेवला, निष्काळजीपणे टाकला.
दुन्निग्गह–(वि.) अनियंत्रित, नियंत्रणात ठेवणे कठीण, ताब्यात राखणे अवघड.
दुन्निमित्त–(नपु) अपशकुन.
दुन्नीत–(वि.) हिरावून नेणे, फसवून घेणे.
दुपद्द–(वि.) दोन मजली, दोन ताळाचा, दुमजली.
दुपञ्ञ–(पु.) मूर्ख माणस.
दुपञ्ञ–(वि.) मूर्ख, खुळा, अव्यवहारी.
दुप्पटिनिस्सग्गिय–(वि.) सोडणे अशक्य, टाकणे अवघड.
दुप्पटिविज्झ–(वि.) समजण्यास अवघड, दुर्बोध.
दुप्पमञ्च–(वि.) सोडणे अशक्य, सोडण्यास कठीण.
दुप्परिहारिय–(वि.) व्यवस्था करणे अवघड, गैरसोय.
दुफस्स–(पु.) न आवडणारा स्पर्श.
दुब्बच–(वि.) न ऐकणारा, अनाज्ञाधारक, न मानणारा.
दुब्बच्च जातक–आचार्यांनी बोधिसत्त्वाचा उपदेश न ऐकल्याची कथा–(११६).
दुब्बण्ण–(वि.) दुर्वर्ण, दुसऱ्या वर्णाचा, पर जातीचा.
दुब्बल–(वि.) दुर्बल, अशक्त, कमजोर, निर्बल.
दुब्बल-भाव–(पु.) अशक्तपणा, दुर्बलपणा, कमजोरी.
दुब्बल-कट्ठ जातक–साखळदंड तोडून पळून गेलेल्या हत्तीची कथा–(१०५).
दुब्बा–(स्त्री.) दुर्वा, तृण, गवताची काडी, हराळी.
दुब्बिजान–(वि.) समजण्यास कठीण, दुर्बोध.
दुब्बिनीत–(वि.) उद्धट, गर्विष्ठ, दुर्विनीत.
दुब्बुट्ठिक–(वि.) अनावृष्टी, कमी पाऊस, पाण्याचा अभाव.
दुब्बुट्ठिक–(नपु.) दुष्काळ, अकाल.
दुब्भक–(वि.) विश्वासघातकी, धोकेबाज.
दुब्भति–(क्रि.) विश्वासघात करणे, षडयंत्र रचणे.
दुब्भन–(नपु.) द्रोह, विश्वासघात, धोका.
दुब्भर–(वि.) कठीण चरितार्थ, खडतर जीवन.
दुब्भासित–(नपुं) अपशब्द, शिवी-गाळ, अपमानसूचक शब्द.
दुब्भिक्ख–(नपुं) दुर्भिक्ष, दुष्काळ, अकाल, खाद्य नसणे.
दुब्भी–(वि.) विश्वासघातकी.
दुम–(पु.) द्रुम, वृक्ष, झाड, वनस्पती.
दुमग्ग–(नपु.) झाडाचा शेंडा.
दुमन्तर–(नपु) अनेक प्रकारची झाडे.
दुमिन्द–(पु.) वृक्षराज, वृक्ष श्रेष्ठ, बोधिवृक्ष, पिंपळ.
दुमुत्तम–[पहा–दुमिन्द.]
दुमुप्पल–(पु.) पिवळ्या फुलांचा वृक्ष, पिवळा चाफा, सोनतरवड.
दुम्मङ्कु–(वि.) शांत करण्यास कठीण.
दुम्मती–(पु.) बुद्धिभ्रष्ट मनुष्य, वेडा, खुळा, मूर्ख, दुर्मती.
दुम्मन–(वि.) दुःखी, अप्रसन्न, सचिंत, दुर्मन, उदासी.
दुम्मुख–(वि.) दुर्मुख, दुःखी चेहरा, उदास.
दुम्मेध–(वि.) दुर्बुद्धी, वाईट विचार, कुबुद्धी.
दुम्मेध जातक–राजाने दुष्कर्म करणाऱ्या अपराध्यास फाशी देण्याची शिक्षा जाहीर केल्याची कथा–(५०).
दुम्मेध जातक–राजाने ईर्षेने (रागाने) आपल्या हत्तीस ठार मारण्याचे ठरविल्याची कथा–(१२२).
दुय्योधन–(पु.) दुर्योधन, एक कौरव.
दुय्हति–(क्रि.) धार काढणे, दूध काढणे.
दुरक्ख–(वि.) सांभाळण्यास अवघड, कठीण संरक्षण.
दुरच्चय–(वि.) पार करणे अवघड, ओलांडणे कठीण.
दुराजान–(वि.) दुर्बोध, समजण्यास अवघड, कळण्यास अवघड.
दुराजान जातक–गुरुने आपल्या शिष्यास सांगितले की, तू तुझ्या पत्नीच्या कामांकडे उपेक्षित दृष्टीने पहात जा ही कथा–(६४).
दुरासाद–(वि.) जवळ जाणे, पोहोचणे अवघड.
दुरित–(नपु.) पाप, वाईट कृत्य, अकुशल कर्म.
दुरुत्त–(वि.) दुरुत्तर, अयोग्य उत्तर, वाईट बोलणे.
दुल्लद्ध–(वि.) मिळणे अवघड, दुर्लभ, मिळण्यास कठीण.
दुल्लद्धि–(स्त्री.) मिथ्या दृष्टि, चुकीची धारणा.
दुल्लभ–(वि.) दुर्लभ, मिळणे कठीण, मिळणे अशक्य, अप्राप्य.
दुवङ्गिक–(वि.) दोन अंगाचा, दोन बाजूंचा.
दुविध–(वि.) दोन प्रकारचा, दोन तऱ्हेचा.
दुवे–(सं. वि.) दोन, (२).
दुस्स–(नपु.) कापड, वस्त्र.

दुस्स-करण्डक–(पु.) कापडांची पेटी.
दुस्स-कोट्ठागार–(नपु.) कापडांचे भांडार, घर.
दुस्स-युग–(पु.) कापडांची जोडी, दोन कपडे, दोन वस्त्र.
दुस्स-वट्टि–(स्त्री.) कापडाचे ठान, किनारी, धडी.
दुस्सति–(क्रि.) द्वेष करणे, राग येणे, रागावणे, तिरस्कार करणे.
दुस्सित्त्वा–(पू. क्रि.) द्वेष करून, रागावून, तिरस्कार करून.
दुस्सन–(नपु.) द्वेष, क्रोध, राग, तिरस्कार.
दुस्सह–(वि.) असह्य, सोसण्यास कठीण, सहन होत नाही.
दुस्सील–(वि.) दुराचारी, दुर्वर्तनी, वाईट वागणुकीचा.
दुहति–(क्रि.) धार काढणे, दूध काढणे.
दुहन–(कृ.) धार काढली गेली, दूध काढले गेले.
दुहितु–(स्त्री.) मुलगी, कन्या, स्त्री, दुहिता.
दूत–(पु.) बातमीदार, संदेशवाहक, दूत.
दूती–(स्त्री.) संदेशवाहिका.
दूतेय्य–(नपु.) संदेश, संदेश-वाहन, संदेश-वहन.
दूत जातक–एक लोभी मनुष्य स्वतःला दूत, दूत म्हणत राजाच्या भोजन गृहापर्यंत पोहोचला राजा भोजनास बसला होता, त्याने विचारले की, "तू कोणाचा दूत आहेस? "तेव्हा त्या मनुष्याने सांगितले "मी पोटाचा दूत आहे" ही कथा–(२६०).
दूत जातक–गुरु-दक्षिणा देण्यासाठी जमविलेली सर्व संपत्ति गंगानदीत बुडल्याची कथा–(४७८).
दूभक–[पहा-दुब्भक].
दूर–(नपु.) अंतर, लांबी.
दूर–(वि.) लांब.
दूरङ्गम–(वि.) दूरवर जाणारा, दूरवर पोहोचणारा.
दूरतो–(अ.) दूरहून, लांबून.
दूरत्त–(नपु.) दूरपणा, दूरत्व, दूर असणे.
दूसक–(वि.) दूषित करणारा, खराब करणारा, बिघडविणारा, घाण करणारा, विकृत करणारा.
दूसन–(नपु.) दूषण, दोष, विकृति, घाण.
दूसित–(कृ.) दूषित, दोषी, घाणेरडे, विकृत.
दूसेति–(क्रि.) दूषित करणे, खराब करणे, बदनाम करणे, दूषण देणे.
दूहन–(नपु.) डाका घालणे, दरोडा घालणे, मोठी चोरी करणे, दूध काढणे, धार काढणे.
देड्डुभ–(पु.) जलसर्प, पाण-साप, पाण्यातील साप, विरोळा.
देण्डिम–(पु.) दौंडी, जाहिरात, घोषणा.
वाय ३–१४
देति–(क्रि.) देणे.
देव–(पु.) राजा, आकाश, ढग, देव.
देव-कञ्ञा–(स्त्री.) देवाची मुलगी, देवपुत्री, देवकन्या.
देव-काय–(पु.) देवगण, देवजन.
देव-कुमार–(पु.) दिव्य राजकुमार, देखणा मुलगा.
देव-कुसुम–(नपु.) देवलोकातील फूल, स्वर्गातील फूल-पुष्प.
देव-गण–(पु.) देवांचा समूह, देवांचा समुदाय, देवांगण.
देव-चारिका–(स्त्री.) देवलोकांत भ्रमण, स्वर्गात फिरणे, वावरणे.
देवच्छरा–(स्त्री.) देव लोकांतील अप्सरा.
देवञ्जतर–(वि.) लहान देव, कनिष्ठ देव.
देवट्ठान–(नपु.) देवस्थान, देवाचे ठिकाण-जागा.
देवत्तभाव–(पु.) दैवी शरीर.
देवदत्तिक–(वि.) देवांनी दिलेला.
देव-दुन्दुभि–(स्त्री.) गर्जना, देवांचा आवाज.
देव-दूत–(पु.) देवांचा बातमीदार, देवदूत.
देव-देव–(पु.) देवांचा देव, (इंद्र).
देव-धम्म–(पु.) दिव्य गुण, सद्गुण, पापभीरुता.
देव-धीतु–(स्त्री.) अप्सरा.
देव-नगर–(नपु.) देवांचे नगर, देवनगरी, देवांचे गांव.
देव-निकाय–(वि.) देवांचा समूह, देवांचा संघ.
देव-परिसा–(स्त्री.) देवांची सभा, देव-परिषद.
देव-पुत्त–(पु.) देवपुत्र, देवांचा मुलगा, देवसुत.
देव-पुर–(नपु.) देवपुरी, देवनगरी.
देव-भवन–(नपु.) देऊळ, देवालय, देवाचे निवासस्थान.
देव-यान–(नपु.) स्वर्गाचा मार्ग, आकाश गमन, विमान, हवाई जहाज.
देवराजा–(पु.) देवांचा राजा, शक्र.
देव-रुक्ख–(पु.) देवांचा वृक्ष, पारिजातक.
देव-रूप–(नपु.) देवाची मूर्ती, देवरुप.
देव-लोक–(पु.) स्वर्ग लोक, देव लोक.
देव-विमान–(वि.) देवांचे भवन, देवलोकांचे भवन.
देवता–(स्त्री.) देवता.
देवत्त–(नपु.) देवत्त्व, देवपण.
देवदत्त–(पु. विशेषनाम) शाक्य मुनी गौतम बुद्धाचा मामा सुप्रबुद्ध शाक्याचा मुलगा. हा जन्मभर गौतम बुद्धाचा द्वेष करीत राहिला होता.
देवदह–(नपु. विशे. ना.) कोलियांचे एक नगर. भगवान गौतम बुद्ध या देवदह नगरीत अनेक वेळा आले होते.

**देवदारू**–(पु.) देवदार वृक्ष.
**देव-धम्म जातक**–देव-धम्म म्हणजे पाप विरहित वर्तन म्हणजेच सद्वर्तनाच्या कथा–(६).
**देवर**–(पु.) दीर, नवऱ्याचा धाकटा भाऊ.
**देवसिक**–(वि.) दैनिक, दरदिवसाचा, दररोजचा.
**देवा**–(पु.) मानवांपेक्षा श्रेष्ठ मानलेला लोक. हे देवा (देवलोक) तीन प्रकारचे मानलेत (१) सम्मुति देवा-ज्यांना देव मानले आहे. ते म्हणजे राजा व राजकुमार (२) विसुद्धि देवा–पवित्र देव, म्हणजे अर्हत पदप्राप्त किंवा बुद्ध (३) उप्पत्ति देवा–उत्पन्न देव गण ज्यांत सात प्रकारांचे देवांचा समूह मानला जातो. चातुम्महाराजिक, तावतिंस इत्यादि.
**देवातिदेव**–(पु.) देवांचा देव.
**देवानुभाव**–(पु.) देव प्रताप, देव महात्म्य.
**देवानम्पिय तिस्स**–(पु. विशे. ना.) सम्राट अशोकाने बौद्ध धम्म स्वीकारल्या वेळचा श्रीलंकेचा राजा.
**देविसि**–(पु.) दिव्य-ऋषि, देवर्षी.
**देवी**–(स्त्री. विशे. ना.) देवा, राणी, महेंद्रस्थविर आणि संघमित्रांची आई, सम्राट अशोकाची पत्नी.
**देवुपपत्ति**–(स्त्री.) देवांत उत्पन्न, देवलोकांत जन्म, देवांत उत्पत्ति.
**देस**–(पु.) देश, प्रदेश, भू-भाग.
**देसक**–(पु.) उपदेश करणारा, उपदेशक, देशना देणारा.
**देसना**–(स्त्री.) उपदेश, ज्ञान, माहिती.
**देसना विलास**–(पु.) उपदेशातील महत्त्व, उपदेशांतील सौंदर्य, उपदेशांतील गर्भितार्थ, उपदेशाचा विस्तार.
**देसिक**–(वि.) प्रदेशाविषयी, देशाविषयी, भागाविषयी.
**देसित**–(कृ.) उपदेशित, उपदिष्ट, उपदेशिलेले, उपदेश केलेला.
**देसेति**–(क्रि.) उपदेश करणे, उपदेशिणे.
**देसेतु**–[पहा–देसक].
**देस्स**–(वि.) प्रतिकूल, अयोग्य.
**देस्सिय**–[पहा–देस्स].
**देह**–(पु., नपु.) शरीर.
**देह-निक्खेप**–(नपु.) शरीर त्याग, मृत्यू, देहनिक्षेप.
**देह-निस्सित**–(वि.) शरिरासंबंधी, शरिराविषयी.
**देहनी**–(स्त्री.) उंबरठा.
**देहावयव**–(पु.) शरीराचा अवयव, शरीराचा एक भाग.
**देही**–(पु.) देहधारी, देहधारण करणारा, मनुष्य, मानवजन्म.
**दोण**–(पु., नपु.) एक माप, द्रोण.
**दोण**–(पु. वि.) भगवान बुद्धांचे देहावसान (मृत्यू-महापरिनिर्वाण) झाल्यानंतर त्यांच्या अस्थींचे वाटप करून देणारा द्रोण-ब्राह्मण.
**दोणि, द्रोणिका**–(स्त्री.) नांव, नौका, द्रोणि.
**दोणिका**–[पहा–दोणि].
**दोमनस्स**–(नपु.) असंतोष, चित्ताचे-मनाचे दुःख, दौर्मनस्य.
**दोला**–(स्त्री.) झूला, झोपाळा, हिंदोळा.
**दोलायति**–(क्रि.) झुलणे, झोका घेणे, हिंदोळणे.
**दोवारिक**–(पु.) द्वारपाल, पहारेकरी, द्वाररक्षक.
**दोस**–(पु.) द्वेष, दोष, क्रोध, राग.
**दोसक्खान**–(नपु.) दोषारोपण, दोष लावणे, दोष देणे.
**दोसग्गी**–(पु.) द्वेषाग्नी.
**दोसञ्ञू**–(पु.) पंडित, ज्ञानी, बुद्धिमान.
**दोसापगत**–(वि.) दोषरहित, निर्दोष.
**दोसिना**–(स्त्री.) चांदणी, तारका.
**दोसो**–(पु.) रात्र, अंधःकार, निशा, तम.
**दोह**–(पु.) द्रोह.
**दोह**–(नपु.) धार काढणे, दूध काढणे.
**दोहक**–(पु.) धार काढणारा, गवळी.
**दोहक**–(नपु.) धार काढण्याचे लहान भांडे, चंबू, दुधाचे भांडे.
**दोहळ**–(पु.) गरोदर स्त्रीचे डोहाळे-प्रबल इच्छा, दोहद.
**दोहळिनी**–(स्त्री.) डोहाळे लागलेली गर्भवती.
**दोही**–(वि.) द्रोही, घातकी, अकृतज्ञ, धार काढणारा.
**द्रव**–(पु.) रस, पातळ पदार्थ, द्रव.
**द्वङ्गुल**–(वि.) दोन बोट मापाचा, तसूभर, तसू.
**द्वत्तिक्खत्तुं**–(क्रि. वि.) दोन-तीन वेळा.
**द्वत्तिपत्त**–(नपु.) दोन-तीन पात्र, दोन-तीन भांडी.
**द्वत्तिंसति**–(सं. वि.) बत्तीस, (३२).
**द्वन्द**–(नपु.) जोडा., दोन, द्वन्द्व समास.
**द्वय**–(सं. वि.) दोन, (२).
**द्वाचत्तालीसति**–(सं. वि.) बेचाळीस, (४२).
**द्वादस**–(सं. वि.) बारा, (१२).
**द्वानवुत्ति**–(सं. वि.) ब्याण्णव, (९२).
**द्वार**–(नपु.) दार, दरवाजा, द्वार.
**द्वार-कवाट**–(नपु.) दारे, दरवाजाचे कवाडी, दाराच्या फळ्या.
**द्वार-कोट्ठक**–(नपु.) दरवाजावरील खोली, गच्ची.
**द्वार-गाम**–(पु.) वेशीबाहेरील गांव, तटाबाहेरील वसती.
**द्वारपाल**–(पु.) चौकीदार, पहारेकरी, द्वाररक्षक, द्वारपाल.

द्वार-बाहा–(स्त्री.) दरवाजाचा खांब, चौकटीची बाजू.
द्वार-साला–(स्त्री.) देवडी, दरवाजाबाहेरील ओसरी.
द्वारिक–(वि.) द्वाराविषयी, दारासंबंधी, दरवाजाबाबत.
द्वारिक–(पु.) द्वारपाल, पहारेकरी.
द्वावीसति–(सं. वि., स्त्री.) बावीस, (२२).
द्वासट्ठिदिट्ठि–(सं. वि., स्त्री.) बासष्ठ, (६२). चुकीचे मत, खोटी धारणा.
द्वासत्तति–(सं. वि., स्त्री.) बहात्तर, (७२).
द्वासीति–(सं. वि., स्त्री.) ब्याऐंशी, (८२).
द्वि–(वि.) (सं. वि., स्त्री.) दोन, (२).
द्विक–(नपु.) दोघांची जोडी, उभयता.
द्विक्खुत्तुं–(क्रि. वि.) दोन वेळा, दोनदा.
द्विगुण–(वि.) दुप्पट.
द्विचत्तालीसति–(सं. वि., स्त्री.) बेचाळीस, (४२).
द्विज–[पहा-दिज].
द्वि-जिव्ह–(वि., पु.) दोन जिभा असलेला, साप, सर्प, नाग.
द्वि-पञ्ञासति–(सं. वि., स्त्री.) बावन्न, (५२).
द्वि-मासिक–(वि.) दोन महिन्याचा, द्वैमासिक.
द्वि-सट्ठि–(सं. वि., स्त्री.) बासष्ठ, (६२).
द्वि-सत–(सं. वि., नपु.) दोनशे, (२००).
द्वि-सत्तति–(सं. वि., स्त्री.) बहात्तर, (७२).
द्वि-सहस्स–(सं. वि., नपु.) दोन हजार, दोन सहस्त्र, (२,०००).
द्वि-गोचर–(पु.) दोघांतील बोलणे, दोघांची चर्चा.
द्विधा–(क्रि. वि.) दोन प्रकार, दोन तऱ्हा, दोन पद्धती.
द्विधा-पथ–(पु.) रस्त्याचे दोन भाग, जाणारा-येणारा असे भाग.
द्विप–(पु.) हत्ती, गज.
द्विरद–(पु.) हत्ती.
द्वीह–(नपु.) दोन दिवस.
द्वीहं–(क्रि. वि.) दोन दिवसांत.
द्वीह-तीहं–(क्रि. वि.) दोन किंवा तीन दिवसांत.
द्वे–(सं. वि.) दोन, (२).
द्वे-वाचिक–(वि.) दोन शब्द घोकणारा.
द्वेज्झ–(नपु) संदेह, शंका, संशय, विरोध.
द्वेधा–(क्रि. वि.) दोन प्रकारांनी, दोन तऱ्हेनी, द्विधा.
द्वेधा-पथ–(पु.) रस्त्याचे दोन भाग, जाणारा-येणारा मार्ग.
द्वेळ्हक–(नपु.) संदेह, शंका, संशय.

## ध

ध–नागरी वर्णमालेच्या "त" वर्गातील चौथे अक्षर, ध.
धंक–(पु.) कावळा.
धंसित–(कृ.) उध्वस्त, नाश केलेले, मोडून टाकलेले.
धज–(पु.) ध्वज, झेंडा, निशाण.
धजग्ग–(पु.) ध्वजाचे टोक, झेंड्याचे टोक.
धजालु–(वि.) निशाणांनी सजविलेले.
धजाहट–(वि.) युद्ध जिंकल्यावर लावलेला झेंडा, विजयाचे निशाण, विजयाचे द्योतक.
धजविहेठ जातक–दिवसभर तपस्व्याचे सोंग घेणारा व रात्री बनारसच्या राजाच्या राणीबरोबर सुखविलास भोगणाऱ्या जादुगाराची कथा–(३९१).
धजिनी–(स्त्री.) सेना, सैन्य.
धञ्ञ–(नपु.) धान्य.
धञ्ञ–(वि.) सौभाग्य संपन्न, सर्व सुखांनीयुक्त, धन्य.
धञ्ञ-पिटक–(नपु.) धान्याची भरलेली टोपली, बळूत, मोठे टोपले.
धञ्ञ-रासि–(पु.) धान्याचा ढीग, धान्याची रास.
धञ्ञवन्तु–(वि.) सौभाग्य संपन्न.
धञ्ञगार–(पु.) धान्य कोठार, धान्याचे गोदाम.
धत–(कृ.) धारण केलेला, आठवण ठेवलेला, ल्यालेला, परिधान केलेला, धृत.
धन–(नपुं.) संपत्ति, पैसा, दौलत, धन.
धनग्ग–श्रेष्ठधन.
धनत्थिक–(पु.. वि.) धनार्थी, धनाची इच्छा धरणारा, श्रीमंतीची आस असलेला.
धनक्खय–(पु.) धनाचा क्षय, धनाचा नाश, श्रीमंती गेली.
धनक्कीत–(वि.) पैशाने खरेदी केलेला.
धनत्थद्ध–(वि.) धनलोभी, श्रीमंतीचा अभिमानी, धनाने गर्विष्ठ.
धन-लोल–(वि.) धनलोभी, धनाचा लोभी, श्रीमंतीचा हव्यास.
धनवन्तु–(वि.) धनवान, श्रीमंत.
धन-हेतु–(क्रि. वि.) धनासाठी, श्रीमंतीकरिता, पैशासाठी.
धनासा–(स्त्री.) धनाची आशा, श्रीमंतीची हाव, पैशाची हाव.
धनञ्जय जातक–इंद्रप्रस्थचा राजा आपल्या पहिल्या योद्धयाकडे दुर्लक्ष करून नवीन योद्धयाकडे अधिक आस्थेने लक्ष देत असल्याची कथा–(४१३).
धनायति–(क्रि.) धन ओळखणे, संपत्ति कळणे.

**धनिक**–(पु.) श्रीमंत, सावकार, ऋण देणारा, कर्जदाता.
**धनित**–(नपु.) आवाज, स्वर, नाद.
**धनित**–(वि.) ध्वनित, आवाज काढला.
**धनी**–(पु.) श्रीमंत मनुष्य, धनवान, धनी.
**धनी**–(वि.) धनवान, श्रीमंत, धनी.
**धनु**–(नपु.) धनुष्य, कमान.
**धनुक**–(नपु.) लहान धनुष्य, धनुकली.
**धनुकार**–(पु.) धनुष्य तयार करणारा.
**धनु केतकी**–(पु.) केतकी.
**धनुग्गह**–(पु.) धनुर्धारी.
**धनुसिप्प**–(नपु.) तिरंदाजी, नेमबाजी, धनुर्विद्या.
**धनुपञ्चसत**–(नपु.) पांचसे धनुष्य, कोसभर अंतर (एक कोस = दोन मैल).
**धन्त**–(कृ.) फुंकलेला.
**धम**–(वि.) वाजंत्री, वाजविणारा.
**धमकरक**–(पु.) पाणी गाळण्याचे साधन.
**धमति**–(क्रि.) वाजविणे.
**धमनि**–(स्त्री.) नाडी, नस, रग.
**धमनि-संथत-गत**–ज्याच्या सर्व शरीरावर शिरा दिसतात असा मनुष्य.
**धमेति**–(क्रि.) वाजविणे.
**धमापेति**–(क्रि.) वाजविण्यास लावणे.
**धम्म**–(पु.) धर्म, सिद्धांत, स्वभाव, सत्य, सदाचार.
**धम्मक्खान**–(नपु.) धर्माची व्याख्या.
**धम्म-कथा**–(स्त्री.) धार्मिक कथा, धार्मिक गोष्टी.
**धम्म कथिक**–(पु.) उपदेश करणारा, उपदेष्टा, सद्गुण सांगणारा.
**धम्म-कम्म**–(नपु.) कायदेशीर काम, विनयानुकूल कार्यक्रम.
**धम्म-काम**–(नपु.) धार्मिक, धर्म-प्रिय, धर्मानुसार वागणारा.
**धम्म-काय**–(वि.) धर्मकाय, धार्मिक शरीर, धर्म देह.
**धम्म-क्खन्ध**–(पु.) धर्मस्कंध, धर्माचा भाग.
**धम्म-गण्ठिका, धम्म गण्डिका**–(स्त्री.) बलि-वेदी, बळी देण्याची जागा, ठार मारण्याचे ठिकाण.
**धम्म-गरू**–(वि.) धर्माचा गौरव, धर्माचा सन्मान.
**धम्म-घोसक**–(पु.) धर्माची घोषणा करणारा, धर्मोपदेशक.
**धम्म-चक्क**–(नपु.) धर्मचक्र, बौद्ध धर्माचे बोधचिन्ह, धम्मचक्र.
**धम्म-चक्क-पवत्तन**–(नपु.) धर्मचक्र प्रवर्तन, धर्मोपदेश. धर्ममताचा प्रसार, धर्माची वैचारिक गति.
**धम्मचक्कपवत्तन-सुत्त**–(नपु.) (१) आषाढ पौर्णिमेच्या दिवशी ऋषिपत्तनच्या (वाराणसी) मृगदाय वनांत भगवान बुद्धांनी पहिल्या पंचवर्गीय भिक्खुंना केलेला सर्वप्रथमचा धर्मोपदेश. या उपदेशानंतर बौद्ध धम्माचा सगळीकडे जोरदार प्रचार व प्रसार झाला होता. (२) हाच प्रकार चौदा ऑक्टोबर एकोणीसशे छप्पन रोजी बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूरच्या दीक्षा भूमीवर घडविला आणि तेव्हापासून भारतात बौद्ध धम्माचे पुनर्जीवन झाले.
**धम्म-चक्खु**–(नपु.) धर्म चक्षु, धर्मदृष्टि, धर्मज्ञान.
**धम्म-चरिया**–(स्त्री.) धर्माचरण, धर्माचे पालन.
**धम्मचारी**–(पु.) धर्माप्रमाणे आचरण करणारा, धम्मचारी.
**धम्म-चेतिय**–(नपु.) पवित्र धर्म ग्रंथालय.
**धम्म जातक**–धर्म आणि अधर्म कोणता हा फरक दर्शविणाऱ्या कथा–(४५७).
**धम्मजीवी**–(वि.) धर्मानुसार चरितार्थ चालविणारा, धर्माप्रमाणे उपजीविका करणारा.
**धम्मञ्ञु**–(वि.) धर्मज्ञ, धर्माचे पूर्ण ज्ञान असलेला, बुद्धज्ञानी.
**धम्मट्ठ**–(वि.) धर्मस्थित, धर्मादर्शचे ठिकाण, पवित्र क्षेत्र
**धम्मट्ठिति**–(स्त्री.) धर्मस्थिती, धर्माची अवस्था, धर्माविषयी लोकांची धारणा.
**धम्म-तक्क**–(पु.) धर्म तर्क, योग्य तर्क करणे, योग्य धारणा असणे.
**धम्मता**–(स्त्री.) स्वाभाविक नियम, चर्या.
**धम्म-दान**–(नपु.) धर्म दान, धर्माची शिकवण, धर्माचा प्रसार.
**धम्म-दायाद**–(वि.) धर्माचा उत्तराधिकारी, धम्माचा वारस.
**धम्म-दीप**–(वि.) धर्मज्योत, धर्मप्रकाश, धर्मदीप, धर्म-द्वीप.
**धम्म-देसना**–(स्त्री.) धर्मोपदेश, धर्माचा प्रसार, धर्माची शिकवण, धर्माचा आदर्श.
**धम्म-देस्सी**–(पु.) धर्मद्वेषी, धर्माचा द्वेष करणारा, धर्माचा तिरस्कार करणारा, धर्मात द्वेष पाहणारा.
**धम्म-धज**–(वि.) जो धर्मालाच आदर्शाचा ध्वज मानतो.
**धम्मद्धज-जातक**–बनारसच्या राजाचा स्वार्थी व लाचखाऊ पुरोहित काळकव धर्मध्वज नांवाचा धार्मिक पुरोहित यांच्यामधील वादविवादाची कथा–(२२०).
**धम्मद्धज जातक**–धर्मध्वज नांव धारण करून इतर पक्षांना फसवून त्यांची सर्व अंडी आणि पिल्लाना मारून खाल्याची कथा–(३८४).

**धम्म-धर**–(वि.) धर्मधर, धार्मिक, धर्माचरणी.

**धम्म-नियाम**–(पु.) प्राकृतिक नियम, निसर्ग नियम, स्वाभाविक नियम.

**धम्मनी**–(पु.) गृहसर्प, धामीण, बिनविषारी साप.

**धम्म-पण्णाकार**–(पु.) धर्म-भेट, धर्मदेणगी, धार्मिक बक्षीस.

**धम्म-पद**–(नपु.) धार्मिक पद्य, धार्मिक कविता.

**धम्म-पद**–(पु.) खुद्दक निकायाचा दुसरा ग्रंथ, "धम्म पद" याचे संकलन "थेरगाथा" व "थेरीगाथा" यांच्या संकलनानंतर झाले असावे असा संभव आहे.

**धम्मपद-अट्ठकथा**–(स्त्री.) जातक अर्थ कथे प्रमाणेच (जातकट्ठकथा) धम्मपदाची अर्थकथा.

**धम्मप्पमाण**–(वि.) धर्म माप, धर्म प्रामाण्य, धर्मानुसार धर्मादेशा प्रमाणे.

**धम्मभण्डागारिक**–(पु.) धर्मज्ञानाचा संग्राहक, धर्माचा खजिनदार, भगवान बुद्धाच्या सतत सानिध्यात असणारा शिष्य "आनंद" यास धम्मभण्डागारिक म्हणत असत.

**धम्म-भेरि**–(स्त्री.) धर्माचे वाद्य, धर्मढोल. धार्मिक वाद्य, धम्मघोष.

**धम्म-रक्खित**–(वि., पु.) धर्मरक्षित, धर्माचा रक्षक, धर्म रक्षण करणारा.

**धम्म-रत**–(वि.) धर्मरत, धर्मप्रिय, धार्मिक कार्यात मग्न.

**धम्म-रति**–(स्त्री.) धर्मप्रीति, धर्माची आवड, धर्म-प्रेम.

**धम्म-रस**–(पु.) धर्मरस, धर्माचा गर्भितार्थ.

**धम्म-राजा**–(पु., वि.) धर्म राजा, धर्म संस्थापक, धर्मशास्त्रा, भगवान बुद्धाचे एक नाव.

**धम्म-लद्ध**–(वि.) धर्माने मिळालेले, धर्मामुळे प्राप्त.

**धम्म-वर**–(पु.) धर्म श्रेष्ठ, धर्मामुळे श्रेष्ठत्त्व.

**धम्म-वादी**–(वि.) धर्मानुसार बोलणारा, धार्मिक चर्चा करणारा, धार्मिक वाद-विवाद करणारा, धम्मवादी.

**धम्म-विचय**–(वि.) धर्माची परंपरा चालविणे, धर्म मीमांसा, धर्माचा प्रचार-प्रसार, धर्माची वृद्धी.

**धम्म-विदू**–(वि.) धर्माचा चांगला जाणकार, धर्माचा विद्वान, श्रेष्ठ धर्मज्ञानी.

**धम्म-विनिच्छय**–(पु.) धार्मिक निश्चय, धर्म संकल्पना.

**धम्म-सङ्गणि**–(पु.) अभिधम्म पिटकाच्या सात ग्रंथापैकी पहिला ग्रंथ.

**धम्म-संविभाग**–(पु.) धर्मानुसार वाटप, धर्मानुसार विभागणी.

**धम्म-संगीति**–(स्त्री.) धर्मसभा, धर्मपरिषद.

**धम्म-संगाहक**–(पु.) धर्माचा संग्रह करणारा.

**धम्म-समादन**–(नपु.) धर्माचा स्वीकार, धर्मग्रहण, धर्मस्वीकृति.

**धम्म-सवण**–(नपु.) धर्म ऐकणे, धर्म श्रवण.

**धम्म-साकच्छा**–(स्त्री) धार्मिक चर्चा, धार्मिक वाद-विवाद.

**धम्म-सेनापति**–(पु.) धर्म सेनापति, धर्माचा दिग्दर्शक, धर्माचा सूत्रधार, भगवान बुद्धाचा अग्रश्रावक (पहिला शिष्य) "सारिपुत्र" यास धम्मसेनापति मानतात.

**धम्म-सोण्ड**–(वि.) धर्म-प्रेमी, धर्माची आवड असलेला.

**धम्माधिपति**–(वि.) धर्मास स्वामी मानणारा.

**धम्मानुधम्म**–(पु.) धर्माप्रमाणे आचरण.

**धम्मानुवत्ती**–(वि.) धर्मानुयायी, धर्माचा अनुयायी.

**धम्माभिसमय**–(पु.) धर्माचे ज्ञान, धर्माविषयी समज.

**धम्मामत**–(नपु.) धर्मरूपी अमृत, श्रेष्ठ जीवन सार.

**धम्मादास**–(पु.) धर्मदर्पण, धर्माचा आदर्श.

**धम्माधार**–(वि.) धर्म हाच आधार, धर्म हाच आश्रय.

**धम्मासन**–(नपु.) धर्मासन, धर्म हीच बैठक, धार्मिक बैठक, धर्माचे वास्तव ठिकाण.

**धम्मिक**–(वि.) धार्मिक, धर्मानुसार, धर्मानुकूल.

**धम्मिल्ल**–(पु.) केसांचा बुचडा, केसांची गांठ.

**धम्मीकथा**–(स्त्री.) धार्मिक कथा, धार्मिक गोष्ट.

**धर**–(पु., वि.) धारण करणारा, धारण केलेला.

**धरण**–(नपु.) साठा, भार-विशेष.

**धरण**–(वि.) धारण करणारा.

**धरणी**–(स्त्री.) पृथ्वी, भूमि, जमीन, भू-भाग, भू-प्रदेश.

**धरति**–(क्रि.) धारण करणे, तत्पर राहणे, तयार असणे.

**धरा**–(स्त्री.) जमीन, भूमि, धरत्री.

**धव**–(पु.) पति, नवरा, मालक.

**धव**–(पु.) बाभळीचे झाड, बाभूळ.

**धवल**–(पु.) पांढरा, पांढरा रंग, श्वेत रंग, धवल.

**धवल**–(नपु.) पांढरा, स्वच्छ, श्वेत, धवल, शुभ्र.

**धात**–(कृ.) पोट भरलेला, संतुष्ट झालेला.

**धातकी**–(स्त्री.) अग्नी ज्वाला, ज्वाळा.

**धाती**–(स्त्री.) दाई, सांभाळणारी स्त्री.

**धातु**–(स्त्री.) स्वाभाविक अवस्था, पवित्र अस्थि, पवित्र धातु, शद्वाचे मूळ रूप, शारीरिक अंश, इंद्रिय, शरिराचा भाग-अंश.

**धातु-कथा**–(स्त्री.) धातूंची व्याख्या.

**धातु-कथा**–(पु.) अभिधम्म पिटकातील तिसरा ग्रंथ.

**धातु-घर**–(नपु.) पवित्र धातु-गृह, चैत्य, स्तूप.
**धातु-नानत्त**–(नपु.) धातुंचे अनेक प्रकार, अनेक प्रकारच्या धातु, विविध अंश.
**धातु-विभाग**–(पु.) धातुंची वाटणी, धातुंची विभागणी, धातुंचे वाटप, धातुंचे पृथक्करण, धातुंचे विश्लेषण.
**धातुक**–(वि.) धातुची प्राकृतिकता, धातूची नैसर्गिक अवस्था.
**धाना**–(स्त्री.) भाजलेले, सातू.
**धार**–(वि.) धारण करणारा.
**धारक**–(वि.) धारण करणारा, सांभाळणारा, पालक., पालन-पोषण करणारा, आठवण ठेवणारा, स्मरण राखणारा.
**धारण**–(नपु.) धारण करणे, परिधान करणे, वापरणे, लेणे घालणे.
**धारा**–(स्त्री.) प्रवाह, पाण्याचा पाट, धार, ओहोळ.
**धारा धर**–(पु.) ढग, मेघ, जलद.
**धारित**–(कृ.) धारण केलेला.
**धारी**–(वि.) धारण करणारा.
**धारेति**–(क्रि.) धारण करणे, घेणे, वापरणे.
**धारेतु**–(पु.) धारण करणारा, वापरणारा.
**धारेन्त**–(कृ.) धारण करत असता.
**धारेसि**–(पू. क्रि.) धारण केले, वापरले.
**धारेत्वा**–(पू. क्रि.) धारण करून, वापरून, स्वीकारून, घालून.
**धावति**–(क्रि.) पळणे, धावणे, दौडणे.
**धावन्त**–(कृ.) पळत असता, पळता-पळता, धावत असता.
**धावि**–(पू. क्रि.) पळाला, धावला.
**धावित**–(कृ.) पळताना, पळत असता, धावत असता.
**धाविय**–(पू. क्रि.) धावून, पळून.
**धावित्वा**–(पू. क्रि.) धावून, पळून, धावत जाऊन.
**धावन**–(नपु.) धाव, दौड.
**धावी**–(वि., पु.) पळणारा, धावणारा.
**धि**–(अ.) धिःकार, (धिक्कार), तिरस्कार, घृणा.
**धिक्कत**–(वि.) घृणित, तिरस्कारित, धिःकारित
**धिति**–(स्त्री.) धैर्य, सहनशक्ती, धीटपणा.
**धितिमन्तो**–(वि.) धीट, शूर, वीर, धैर्यवान.
**धी**–(स्त्री.) बुद्धी, ज्ञान.
**धीमन्तो**–(वि.) बुद्धीमान, हुषार.
**धीतलिका**–(स्त्री.) बाहुली, मूर्ती.
**धीतु**–(स्त्री.) मुलगी, कन्या, धी, साठा, समुद्र.
**धीतु-पति**–(पु.) जावई, मुलीचा नवरा.
**धीयति**–(क्रि.) उत्पन्न होणे, निर्माण होणे, निपजणे, जन्मणे.
**धयिमान**–(कृ.) उत्पन्न होत असलेला.
**धीर**–(वि.) बुद्धिमान, हुषार, ज्ञानी.
**धरीत्त**–(नपु.) धीरता, धैर्य.
**धीवर**–(पु.) कोळी, भोई, मच्छिमार.
**धुत**–(कृ.) पिंजला गेला, घालविला गेला.
**धुतङ्ग**–(नपु.) तपस्व्याचे व्रत.
**धुत-धर**–(वि.) व्रतधारी संन्यासी.
**धुत-वादी**–(पु.) व्रतज्ञ, संन्यास व्रतांचा अभ्यासू.
**धुत्त**–(पु.) धूर्त, कावेबाज.
**धुत्तक**–(पु.) धूर्तपणा करणारा, कावा करणारा.
**धुत्तिका**–(स्त्री.) धूर्तपणा, कावेबाजपणा.
**धुत्ती**–(स्त्री.) धूर्तपणा, कावेबाजपणा.
**धुनन**–(नपु.) झाडून टाकणे, स्वच्छ करणे, फेकणे, काढून टाकणे.
**धुनाति**–(क्रि.) पिंजणे, काढून टाकणे, हालविणे, दूर करणे.
**धुनन्त**–(कृ.) पिंजत असता.
**धुनितब्ब**–(कृ.) पिंजण्यायोग्य, पिंजण्यालायक, झाडण्यासारखा.
**धुनित्वा**–(पू. क्रि.) पिंजून, झाडून.
**धुपित**–(कृ.) गरम केला गेला, तापविला गेला, उष्ण केला गेला.
**धुर**–(नपु.) जबाबदारी.
**धुर-गाम**–(पु.) जवळचे गाव, शेजारचे नगर.
**धुरंधर**–(वि.) पदाधिकारी, धुरंधर.
**धुर-निक्खेप**–(पु.) पद-परित्याग, राजीनामा.
**धुर-भत्त**–(नपु.) नियमित भोजन.
**धुर-वहन**–(नपु.) पद धारण, पद स्वीकार, अधिकार स्वीकारणे.
**धुरवाही**–(पु.) ओझे वाहणारे जनावर, गाढव, घोडा, बैल, इत्यादी.
**धुर-विहार**–(पु.) शेजारचा विहार, जवळचा विहार.
**धुव**–(वि.) स्थायी, मुळचा, स्वाभाविक, नैसर्गिक.
**धुवं**–(क्रि. वि.) ध्रुव, सतत, नेहमी, क्रमवार, अनुक्रमे.
**धूत**–[पहा-धुत].
**धूप**–(पु.) धूप, सुगंधीपूड, बत्ती.
**धूपन**–(नपु.) धूप जाळणे, तळणे.
**धूपायति**–(क्रि.) धूर करणे, मंद ज्वलन करणे, धुरी देणे.

**धूपायी**–(कृ.) धूर दिला गेला, धूर केला गेला.
**धूपायन्ति**–(कृ.) धूर करत असता, धुरी देत असता.
**धूपायित**–(कृ.) धूर दिलेला, धूरकटलेला.
**धूपेति**–(क्रि.) तळणे.
**धूपेसि**–(पू. क्रि.) तळले.
**धूपित**–(कृ.) तळता.
**धूपेत्वा**–(पू. क्रि.) तळून.
**धूम**–(पु.) धूर.
**धूम-केतु**–(पु.) शेंडे नक्षत्र, धूमकेतु.
**धूम-जाल**–(नपु.) धुराचा कोट, धुराचा जाळ.
**धूम-नेत्त**–(नपु.) धुराडी, धूर जाण्याचा मार्ग, धुराची नळी.
**धूम-सिख**–(पु.) धुराचे शिखर, अग्नी, ज्योत, ज्वाला.
**धूमयति**–(क्रि.) धुम्रपान करणे, तंबाखू ओढणे, तोंडाने धूर सोडणे.
**धूमायति**–[पहा-धूमयति].
**धूमायितत्त**–(नपु.) पुसट करणे, अस्पष्ट करणे, दिसू न देणे.
**धूमायि**–(पू. क्रि.) धुम्रपान केले, धूर काढला.
**धूलि**–(स्त्री.) धूळ, धुराळा, मातीची पूड.
**धूसर**–(वि.) मळलेला, घाण झालेला, अस्वच्छ.
**धेनु**–(स्त्री.) गाय.
**धेनुप**–(पु.) दूध पिणारे वासरू.
**धोत**–(कृ.) धुतला गेला, स्वच्छ केला गेला.
**धोन**–(पु., वि.) बुद्धिमान.
**धोरय्ह**–(वि.) ओझे वाहण्यास समर्थ, शक्तिमान, बलशाली, बलवान.
**धोवति**–(क्रि.) धुणे, स्वच्छ करणे.
**धोवन**–(नपु.) धुणे, धुण्यास ठेवलेले.

## न

**न**–नागरी लिपीच्या "त" वर्गातील पांचवे अक्षर 'न' व अनुनासिक.
**न**–(अ.) नाही, नकार.
**नकुल**–(पु.) मुंगूस.
**नकुल जातक**–साप आणि मुंगूसाचे जन्मजात वैर असते. तरीपण त्यांच्यांत मैत्री, सख्य स्थापन करण्याविषयीची कथा–(१६५).
**नक्क**–(पु.) कासव.
**नक्खत**–(नपु.) नक्षत्र, तारका, तारा.
**नक्खत-कीळा**–(स्त्री.) नक्षत्र क्रीडा, नक्षत्रांचा खेळ, तारकांचे नृत्य, ताऱ्यांची हालचाल, ताऱ्यांचे भ्रमण.
**नक्खत-पाठक**–(पु.) ज्योतिषी, खगोलशास्त्रज्ञ.
**नक्खत-योग**–(पु.) नक्षत्रांचा योग, जन्मपत्रिका.
**नक्खत राज**–(पु.) चंद्र, शशी, तारकापती.
**नक्खत जातक**–नक्षत्र-राशि इत्यादी बाबींचा विचार करून विशिष्ठ तिथीला लग्न घडवून आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या वरपक्षाला अपयश आल्याची कथा–(४९).
**नख**–(पु., नपु.) बोटाचे नख.
**नख-पञ्जर**–(पु.) पंजा.
**नखी**–(वि.) पंजावाला, नखे असलेला.
**नग**–(पु.) डोंगर, पर्वत, अचल, अद्रि.
**नगर**–(नपु.) लहान शहर.
**नगर-गुत्तिक**–(पु.) नगराधिपति, नगराध्यक्ष, नगरीचा मालक.
**नगर-वर**–(नपु.) श्रेष्ठ नगर, प्रसिद्ध शहर.
**नगर-वासी**–(पु.) नागरिक, नगरांत राहणारा.
**नगर-सोधक**–(पु.) नगर शोधक, शहराची सफाई करणारा, झाडूवाला.
**नगर-सोभिनी**–(स्त्री.) नगर-वधु.
**नग्ग**–(वि.) नग्न, विवस्त्र, उघडा.
**नग्ग-चरिया**–(वि.) नग्न राहणे, उघडे वावरणे, विवस्त्र फिरणे.
**नग्ग-समण**–(वि.) नग्न साधु, जैन साधु, नग्न श्रमण.
**नग्गिय**–(नपु.) नग्नता, विवस्त्रता, उघडेपणा.
**नङ्गल**–(नपु.) नांगर.
**नङ्गल-फाल**–(पु.) नांगराचा फाळ.
**नङ्गलीस-जातक**–मूर्ख विद्यार्थी प्रत्येक वस्तूला नांगराच्या फाळाची उपमा देत असल्याची कथा–(१२३).
**नङ्गुट्ठ**–(नपु.) शेपटी.
**नङ्गुट्ठ जातक**–एका ब्रह्मचाऱ्याने अग्नीदेवास (यज्ञांत) गाईची शेपटी आहुती दिल्याची कथा–(१४४).
**नङ्गुल**–(स्त्री.) शेपटी.
**नचिरस्सं**–(क्रि. वि.) थोड्या वेळेत, अल्पावधीत, अल्पकाळांत.
**नच्च**–(नपु.) नृत्य, नाच, नाटक, अभिनय.
**नच्च जातक**–हंस राजाने निर्लज्ज मोरास आपली मुलगी न दिल्याची कथा–(३२).
**नच्चट्ठान**–(नपु.) नृत्यस्थान, नृत्यशाळा, नाटयगृह.
**नच्चक**–(पु.) नर्तक, नाचणारा, नाटकातील पात्र, अभिनेता.

**नच्चति**–(क्रि.) नाचणे, नृत्य करणे, अभिनय करणे

**नच्चि**–(पू. क्रि.) नाचला, अभिनय केला.

**नच्चन्त**–(कृ.) नाचत असता, अभिनय करीत असता.

**नच्चित्वा**–(पू. क्रि.) नाचून, अभिनय करून.

**नच्चन**–(नपु.) नृत्य, नाच, अभिनय.

**नट**–(पु.) नर्तक, नृत्यकार, अभिनेता.

**नटक**–(पु.) नृत्यकार, नर्तक, अभिनेता.

**नट्ट**–(नपु.) नृत्य, नाटक.

**नट्ठ**–(पु.) नृत्यकार, अभिनेता.

**नट्ठ**–(कृ.) नष्ट झालेले, संपलेले.

**नत**–(कृ.) वाकलेला, झुकलेला, नम्र झालेला.

**नति**–(स्त्री.) नम्रता, लीनता, लीनपणा.

**नत्त**–(नपु.) नृत्य, नाटक.

**नत्तक**–(पु.) नर्तक, नृत्य करणारा.

**नत्तकी**–(स्त्री.) नर्तकी, नाचणारीण, नाचणारी स्त्री.

**नत्तन**–(नपु.) नर्तन, नृत्य, नाटक, नृत्य करणारी.

**नत्तमाल**–(पु.) वृक्ष, झाड.

**नत्त**–(पु.) नातू, मुलीचा मुलगा.

**नत्थि**–(क्रि.) नसणे, नाही, नकार देणे.

**नत्थिक-दिट्ठि**–(नपु.) नास्तिक मत.

**नत्थिक-वादी**–(पु.) नास्तिक.

**नत्थिता**–(स्त्री.) नास्तिकता.

**नत्थि-भाव**–(पु.) नकारभावना, नकारात्मकता. नास्ति-भाव.

**नत्थु**–(स्त्री.) नाक, नासिका, घ्राणेंद्रिय.

**नत्थुकम्म**–(नपु.) नाकाची चिकित्सा, नाकामार्फत चिकित्सा.

**नदति**–(क्रि.) गर्जना करणे, ओरडणे, किंकाळी फोडणे, डरकाळी फोडणे.

**नदि**–(पू. क्रि.) ओरडला, गर्जना केली, किंकाळी फोडली, डरकाळी फोडली.

**नदित**–(कृ.) ओरडलेला, गर्जलेला, किंकाळलेला. डरकाळलेला.

**नदित्वा**–(पू. क्रि.) गर्जना करून, ओरडून.

**नदन**–(नपु.) ओरड, गर्जना.

**नदी**–(स्त्री.) नदी, सरिता, तटिनी, दरिया.

**नदी-कूल**–(नपु.) नदीतट, नदीकिनारा, नदी-काढ

**नदी-दुग्ग**–(नपु.) नदीचा अडथळा, नदी आडवी येणे.

**नदी-मुख**–(नपु.) नदी ज्या ठिकाणी समुद्रास मिळते.

**नद्ध**–(कृ.) बांधला गेला.

**नद्धि**–(स्त्री.) चामड्याची दोरी, (चामड्याची) वादी, आरोसा.

**नन्दयेर**–(पु., विशे. ना.) शुद्धोदन आणि प्रजापती गौतमी यांचा पुत्र, सिद्धार्थ गौतमाचा सावत्र भाऊ.

**नन्द जातक**–वडिलाने आपला नोकर नन्द यास आपण पुरून ठेवलेली संपत्ती कोणत्या ठिकाणी आहे, हे दाखवून ठेवले आणि सांगितले की, माझा मुलगा मोठा झाल्यावर तू त्यास ती जागा दाखव ही कथा–(३९).

**ननन्दा**–(स्त्री.) नणंद, नवऱ्याची बहीण.

**ननु**–(अ.) निश्चयाने, खात्रीने, आत्मविश्वासाने.

**नन्दक**–(वि.) आनंददायक, खुशीकारक, मोदयुक्त.

**नन्दति**–(क्रि.) प्रसन्न होणे, आनंदणे, मोद होणे.

**नन्दि**–(पू. क्रि.) प्रसन्न झाला, आनंदला, मुदित झाला.

**नन्दित**–(कृ.) प्रसन्नचित्त, आनंदला, खुशीत आला.

**नन्दमान**–(कृ.) प्रसन्न होत असता, आनंदताना, मुदित होत असता.

**नन्दितब्ब**–(कृ.) प्रसन्न करण्यायोग्य, आनंद करण्या-योग्य.

**नन्दित्वा**–(पू. क्रि.) आनंदून, प्रसन्न होऊन, मुदित होऊन.

**नन्दन**–(नपु.) इंद्राची बाग, नंदनवन, देवांचे उद्यान.

**नन्दन**–(स्त्री.) प्रसन्नता, आनंद, मोद.

**नन्दि**–(स्त्री.) मनोविनोद, मानसिक समाधान, मानसिक आनंद.

**नन्दिक्खय**–(पु.) तृष्णेचा नाश.

**नन्दि-राग**–(पु.) अनुराग, प्रेम, ममता, माया.

**नन्दि-संयोजन**–(नपु.) तृष्णेवरील बंधन.

**नन्दियमिग जातक**–नन्दिय मृग सदाचारी होता. त्याच्या या सद्वर्तनामुळेच त्याचे स्वतःचे व त्याच्या माता-पित्याचे संरक्षण झाल्याची कथा–(३८५).

**नन्दि-विसाल जातक**–एका बलिष्ट बैलाने शर्यत जिंकून आपल्या धन्यास खूप संपत्ति मिळवून दिल्याची कथा-(२८).

**नन्धति**–(क्रि.) बांधणे, गुंतवून ठेवणे, बद्ध करणे.

**नन्धि**–(पू. क्रि.) बांधला, बांधून टाकला.

**नन्धित्वा**–(पू. क्रि.) बांधून, बद्ध करून, गुंतवून.

**नपुंसक**–(पु.) पौरुषत्व नसलेला, नपुंसक, वीर्यहीन. असमर्थ.

**नभ**–(पु., नपु.) आकाश, गगन, अवकाश, ख, नभ.

**नमक्कार**–(पु.) नमस्कार, वंदन, प्रणाम, अभिवादन.

**नमति**–(क्रि.) झुकणे, वाकणे, नमस्कार करणे, नम्र होणे, वंदन करणे, प्रणाम करणे, अभिवादन करणे.
**नमि**–(पू. क्रि.) झुकला, वाकला, नम्र झाला.
**नमन्त**–(कृ.) झुकत असता, वाकत असता, नम्र होत असता.
**नमित्वा**–(पू. क्रि.) झुकून, वाकून, नम्र होऊन, वंदन करून, अभिवादून.
**नमितब्ब**–(कृ.) झुकण्यायोग्य, वंदन करण्यायोग्य, अभिवादन करण्यायोग्य, नमस्कार करण्यालायक.
**नमस्सति**–(क्रि.) नमस्कार करणे, वंदन करणे, अभिवादन करणे.
**नमस्सि**–(पू. क्रि.) नमस्कार केला, प्रणाम केला, वंदन केले, अभिवादन केले.
**नमस्सित्वा**–(पू. क्रि.) नमस्कार करून, प्रणाम करून, वंदन करून. अभिवादन करून.
**नमस्सिय**–(कृ.) नमस्कार करण्यायोग्य, प्रणाम करण्यालायक. वंदन करण्यासारखा, अभिवादन करण्यायोग्य.
**नमस्सितुं**–(कृ.) नमस्कारासाठी, वंदन करण्यास, प्रणाम करण्याकरिता, अभिवादनास.
**नमस्सन**–(नपु.) नमस्कार, वंदन, प्रणाम, अभिवादन.
**नमस्सना**–(स्त्री.) वंदना, नमस्कार, प्रणाम.
**नमुचि**–(पु.) ठार मारणारा, मृत्यू, यम, माराचे नाव
**नमो**–(अ.) नमस्कार, असो, वंदन असो, प्रणाम असो.
**नम्मदा**–(स्त्री., विशेषनाम) नर्मदा नदी.
**नय**–(पु.) क्रम, पद्धती, ढंग, प्रकार, तऱ्हा, योग्य परिणाम.
**नयति**–(क्रि.) घेऊन जाणे, नेणे, मार्गदर्शन करणे, दिग्दर्शन करणे, [पहा–नेति].
**नयन**–(पु.) डोळा, नेत्र, अक्ष, चक्षु, दृकेन्दिय.
**नयन**–(क्रि.) घेऊन जाणे, नेणे.
**नयनावुध**–(पु.) डोळे हेच ज्याचे शस्त्र आहे असा, यम, रागीट दृष्टीचा.
**नय्हति**–(क्रि.) बांधणे, जखडणे, डांबणे, डांबून ठेवणे.
**नय्हन**–(नपु.) बंधन, बंध, बांधणे.
**नय्हित्वा**–(पू. क्रि.) बांधून, जखडून, डांबून.
**नर**–(पु.) पुरुष.
**नरक**–(नपु.) नरक, दुर्गतीचे ठिकाण, दुःखाची जागा.
**नर-देव**–(पु.) राजा, नृप, महिपती.
**नर-वीर**–(पु., विशेषनाम) श्रेष्ठ पुरुष, वीर पुरुष, भगवान बुद्धाचे एक विशेष नाव.
**नर-सीह**–(पु., विशेषनाम) पुरुषसिंह, श्रेष्ठ पुरुष, पराक्रमी पुरुष, भगवान बुद्धाचे एक विशेष नाव.



**नराधम**–(पु.) वाईट मनुष्य, नीच कर्म करणारा, नीच पुरुष, मानव जातीस कलंक लावणारा.
**नरासभ**–(पु., वि.) मानवांचा मालक, माणसांचा हितकर्ता, मार्गदर्शक, भगवान बुद्धाचे एक विशेष नाव.
**नरुत्तम**–(पु., विशेषनाम) पुरुष श्रेष्ठ, सर्वश्रेष्ठ लोकांत उत्तम, भगवान बुद्धाचे एक विशेष नाव.
**नळपान जातक**–एका वानराने बोरू(नळी)(सरकडयांच्या) मदतीने तळ्यांतील पाण्याची चव चाखल्याची (पाणी प्याल्याची) कथा–(२०).
**नलाट**–(नपु.) ललाट, कपाळ, मस्तक.
**नलिनी**–(स्त्री.) जलाशय, तलाव, कमळांचा तलाव.
**नव**–(सं. वि.) नऊ, (९).
**नव**–(वि.) नवा, नवीन, नूतन.
**नव-कम्म**–(नपु.) नवे काम, नवीन कार्य, दुरुस्ती, नूतनीकरण.
**नव-कम्मिक**–(वि.) नवीन कार्य करणारा. नवनिर्माता, नवीन घर बांधणारा.
**नवङ्ग**–(वि.) नऊ अंगाचा, नऊ भागांचा, नऊ-प्रकारांचा, नवविध.
**नव-नवुति**–(सं. वि., स्त्री.) नव्याण्णव. (९९).
**नवक**–(पु.) नवागन्तुक, नवीन आलेला, नुकताच दाखल झालेला. तरुण, युवक, जो संघात नवीनच दाखल झाला.
**नवक**–(नपु., वि.) नऊ जणांचा समूह.
**नवक तर**–(वि.) तरुणांत तरुण, सर्वांत तरुण-लहान.
**नवनीत**–(नपु.) लोणी.
**नवम**–(वि.) नववा.
**नवमी**–(स्त्री.) चांद्र मासाची नववी तिथी
**नवुति**–(सं वि., स्त्री.) नव्वद, (९०).
**नस्सति**–(क्रि.) नष्ट होणे, नाहीसे होणे, नाश पावणे. लुप्त होणे, न दिसणे.
**नस्सि**–(पू. क्रि.) नष्ट झालेला, नाश पावलेला, नाहीसा झालेला.
**नस्सन्त**–(कृ.) नष्ट होत असता, नाश पावत असता, नाहीसा होत असता, अदृश्य होताना.
**नस्सित्वा**–(पू. क्रि.) नष्ट होऊन, नाश पावून, लुप्त होऊन, संपून.
**नस्सन**–(नपु.) नाश.
**नहात**–(कृ.) आंघोळ केलेला, नाहलेला, स्नान केलेला.
**नहान**–(नपु) आंघोळ, स्नान.
**नहानिय**–(नपु.) आंघोळीची सामग्री, स्नानाचे साहित्य.

**नहापक**–(पु.) आंघोळ करणारा, स्नान करणारा, नाहणारा.

**नहापन**–(नपु.) आंघोळ स्नान, धुणे.

**नहापित**–(पु.) न्हावी, नापित, नाभिक.

**नहापित**–(कृ.) आंघोळ केलेला, नाहालेला, स्नान केलेला, स्वच्छ झालेला, धुतलेला.

**नहापेति**–(क्रि.) आंघोळ घालणे, स्नान घालणे, न्हाऊ घालणे.

**नहापेसि**–(पू. क्रि.) आंघोळ घातली, स्नान घातले, न्हाऊ घातले.

**नहापेन्त**–(कृ.) आंघोळ करताना, स्नान करताना, न्हाऊ घालताना.

**नहापेत्वा**–(पू. क्रि.) आंघोळ करून, स्नान करून, न्हाऊन.

**नहायति**–(क्रि.) आंघोळ करणे, स्नान करणे, नाहणे.

**नहायि**–(पू. क्रि.) आंघोळ केली, स्नान केले, नाहले.

**नहायन्त**–(कृ.) आंघोळ करताना, नाहताना, स्नान करताना.

**नहायित्वा**–(पू. क्रि.) आंघोळ करून, स्नान करून, न्हाऊन.

**नहायितुं**–(कृ.) आंघोळीसाठी, स्नानाकरिता, न्हाऊसाठी.

**नहायन**–(नपु.) स्नान, आंघोळ, न्हाऊ.

**नहारू**–(पु.) नाडी, शीर.

**नहि**–(अ.) नाही, न, नच.

**नहुत**–(सं. वि., नपु.) दहा हजार, दश सहस्त्र, (१०,०००).

**नळ**–(पु.) बोरू, पोकळ कळक, नळी.

**नळकार**–(पु.) बुरुड, टोपली बनविणारा, बांबूकाम करणारा.

**नळ कलाप**–(पु.) कळकाचा ढीग.

**नळ-मीन**–(पु.) समुद्री खेकडा, कर्क.

**नळागार**–(नपु.) वेळूची झोपडी.

**नळनिका जातक**–श्रृंग ऋषीला तपभ्रष्ट करण्यासाठी राजकुमारी नळनिकेला पाठविल्याची कथा–(५२६).

**नाक**–(पु.) स्वर्ग.

**नाग**–(पु.) सर्प, हत्ती, नागवृक्ष, श्रेष्ठ, श्रेष्ठ पुरुष.

**नागदन्त**–(नपु.) हस्तीदंती खुंटा, हस्तिदंती खिळा.

**नाग-दीप**–(पु., विशेषनाम) श्रीलंकेचा उत्तरप्रदेश, सध्याचा जाफना विभाग.

**नाग-बल**–(वि.) हत्तीच्या बळाचा, फार शक्तिमान.

**नाग-बेला, नाग-बला**–(स्त्री.) जालगंगा, पाण्यावर तरंगणारी वेल.

**नाग-भवन**–(नपु.) नागाचे निवास स्थान.

**नाग-माणवक**–(पु.) नाग तरुण, नाग युवक, नाग कुमार.

**नाग-माणविका**–(स्त्री.) नाग तरुणी, नाग युवती, नाग कन्या. नाग कुमारी.

**नाग-राज**–(पु.) नाग लोकांचा राजा, नागराज.

**नाग-रुक्ख**–(पु.) नाग वृक्ष, नाग तरु.

**नाग-लता**–(स्त्री.) खाऊच्या पानांचा वेल, नागवेल. विड्याच्या पानांचा वेल.

**नाग-लोक**–(पु.) नाग लोकांची जनता, नाग समाज नाग जगत.

**नाग-वन**–(नपु.) नाग लोकांचे वन, नाग वन, नाग लोक.

**नागसेन थर**–(पु., विशेषनाम) मिलिंद राजा बरोबर (मिनँडर) तात्त्विक वादविवाद करून बौद्ध सिद्धांताचा परिचय करून देणारे प्रसिद्ध नागसेन स्थविर.

**नागर**–(वि.) शहरी, नागरी, नगरवाला, नगरात राहणारा.

**नागरिक**–(पु., वि.) नगरांत राहणारा, नगरांच्या जीवनाशी संबंधित नागरिक.

**नाटक**–(नपु.) नक्कल, अभिनय, मानवी मनाचा व सामाजिक अंगोपांगाचा अभिनय, नाटक.

**नाटकित्थि**–(स्त्री.) नृत्यकुमारी, नर्तिका, अभिनेत्री.

**नानच्छन्द जातक**–राजाने औदार्याने पुरोहितास मागणी करण्यास सांगितले, पुरोहिताने आपल्या कुटुंबांतील लोकांच्या आवडी विचारल्या तेव्हा प्रत्येकांची आवड वेगवेगळी दिसून आली. नाना प्रकारच्या मागण्या केल्याची कथा–(२८९).

**नाथ**–(पु.) संरक्षण, संरक्षक (लोकनाथ–(पु.) लोकांचा संरक्षक, भगवान बुद्धाचे एक विशेष नाव).

**नाद**–(पु.) आवाज, स्वर, आवड, अभिरुची, नाद.

**नानता**–(स्त्री.) नाना प्रकार, अनेक प्रकार, विविधता.

**नानत्त-काय**–(वि.) नाना प्रकारांची शरिरे.

**नाना**–(अ.) अनेक, भिन्न-भिन्न, वेगवेगळे, अनेक प्रकार, विविध.

**नाना कारण**–(नपु.) अनेक कारणे.

**नाना-गोत्त**–(वि.) अनेक गोत्र.

**नाना-जच्च**–(वि.) अनेक जातींचा, विविध प्रकारांचा.

**नाना-जन**–(पु.) अनेक प्रकारांची जनता.

**नाना-तित्थिय**–(वि.) अनेक संप्रदायांचे लोक, विविध मतांचे लोक.

**नाना-प्रकार**–(वि.) अनेक प्रकार, विविध प्रकार, विविध पद्धति.

**नाना-रत्त**–(वि.) अनेक वर्ण, विविध वर्ण.

**नानावाद**–(पु.) अनेक मते, अनेक विचार, विविध प्रवाह.

**नाना-विध**–(वि.) अनेक पद्धति, अनेक प्रकार, विविध, अनेकविध.

**नाना-संवास**–(वि.) विभक्त राहणे, वेगवेगळे राहणे.

**नाभि, नाभी**–(स्त्री.) बेंबी, पोटाचा मध्य भाग, मध्य बिंदू, चाकाचा-चक्राचा मध्यभाग.

**नाम**–(नपु.) नाम, नाव, संज्ञा.

**नाम करण**–(नपु.) नाव ठेवण्याचा विधी.

**नाम-गहन**–(नपु.) नाव स्वीकारणे, नाव मान्य करणे.

**नाम-धेय, नाम-धेय्य**–(नपु.) नाव, संज्ञा, विशिष्ठ नावाचा.

**नाम-पद**–(नपु.) नाव, संज्ञा, नाम.

**नामक**–(वि.) नावाने, नावाचा.

**नामसिद्धि जातक**–"पापक" नावाचा शिष्य नवीन नावाचा शोध करू लागला. परंतु त्यास आपले मुळचे नावच ठीक आहे असे वाटून त्याने नाव बदल्याचा प्रयत्न सोडल्याची कथ –(९७).

**नामेति**–(क्रि.) नमविणे, वाकविणे, झुकविणे, नम्र करणे

**नामेसि**–(पू. क्रि.) नमविले, वाकविले, झुकविले, नम्र केले.

**नामित**–(कृ.) नमविले गेले, वाकविले गेले, झुकविले गेले. नम्र केले गेले.

**नामेत्वा**–(पू. क्रि.) नमवून, वाकवून, झुकवून, नम्र करून.

**नायक**–(पु.) नेता, पुढारी, मार्गदर्शक, नायक.

**नायिका**–(स्त्री.) मार्गदर्शिका, नायिका.

**नारङ्ग**–(पु.) नारिंगाचे झाड, संत्र्याचे झाड.

**नाराच**–(पु.) लोखंडी सळी, एक प्रकारचा बाण, अगकुचोदार सळी.

**नारी**–(स्त्री.) स्त्री, ललना, महिला, नारी.

**नालं**–(अव्यय) प्रतिकूल, अपर्याप्त.

**नालंदा**–(नपु., विशेषनाम) राजगृहापासून थोडया अंतरावर असलेले प्रसिद्ध ठिकाण या ठिकाणी भगवान बुद्ध अनेक वेळा जाऊन राहिले होते त्याच ठिकाणी नंतरच्या काळात प्रसिद्ध बौद्ध विश्वविद्यालय स्थापन केले गेले होते.

**नाल**–(पु.) नळी, नलिका, नाळी, पाणी जाण्यासाठी तयार केलेला लहानसा पाट, नाला.

**नालागिरी**–(पु., विशेषनाम) राजाच्या गजदलातील एक मस्त हत्ती. भगवान गौतम बुद्धास त्रास देण्यासाठी देवदत्ताच्या प्रेरणेने काही दुष्ट लोकांनी गौतमाच्या अंगावर हा हत्ती सोडला होता. पण गौतमाने आत्मबलाने त्यास शांत केले.

**नालि**–(स्त्री.) एक प्रकारचे लहान माप.

**नालिमत्त**–(वि.) नालिमात्र, केवळ एकच माप.

**नालिका**–(स्त्री.) नाली, नळी.

**नालिका-यन्त**–(नपुं.) घड्याळ, समय-सूचक यंत्र.

**नालिकेर**–(पु.) नारळ, श्रीफळ.

**नालि-पट्ट**–(पु.) टोपी, शिरस्त्राण, मुकूट.

**नावा**–(स्त्री.) जहाज. नाव, पडाव, होडी.

**नावा-तित्थ**–(नपु.) नांवेचे पत्तन, नांव चालणे, पडाव जाणे.

**नावा-संचार**–(पु.) जहाजांचे येणे जाणे, जहाजाचा प्रवास.

**नाविक**–(पु.) नावाडी, नांव चालविणारा.

**नाविकी**–(स्त्री.) नांव चालविणारी स्त्री, नावाड्याची पत्नी.

**नावुतिक**–(वि.) नव्वद वर्षाचा.

**नास**–(पु.) नाश, मृत्यू, अंत, शेवट.

**नासन**–(नपु.) नाश करणे, टाकून देणे, काढून फेकून देणे, नष्ट करणे.

**नासा**–(स्त्री.) नाक, नासिका.

**नासा-रज्जु**–(स्त्री.) नाकपुडी.

**नासिका**–(स्त्री.) नाक.

**नासेति**–(क्रि.) नष्ट करणे, नाश करणे, मारून टाकणे. खराब करणे.

**नासेसि**–(पू. क्रि.) नष्ट केले, नाश केला, मारून टाकले, खराब केले.

**नासित**–(कृ.) नष्ट केलेले, नाश केलेले, मारून टाकलेले, खराब केलेले.

**नासेत्वा**–(पू. क्रि.) नष्ट करून, नाश करून, मारून. खराब करून.

**नासितब्ब**–(कृ.) नष्ट करण्यासारखा, नाश करण्यायोग्य, मारून टाकण्यालायक.

**निकट**–(नपु.) शेजार.

**निकट**–(वि.) जवळचा.

**निकट्ठ**–(वि.) निकृष्ट, टाकाऊ, पडलेला, खराब झालेला, कमी प्रतीचा, अयोग्य.

**निकटि**–(स्त्री.) भुलविणारी, ठगविणारी, मोहिनी, कपटी स्त्री.

**निकत**–(वि.) कपट, दुष्ट.
**निकति**–[पहा-निकटी].
**निकन्त**–(कृ.) कापलेला.
**निकन्तति**–(क्रि.) कापणे.
**निकन्ति**–(पू. क्रि.) कापले.
**निकन्ति**–(स्त्री.) इच्छा, कामना, आशा.
**निकन्तित**–(कृ.) कापलेला.
**निकन्तित्त्वा**–(पू. क्रि) कापून.
**निकर**–(पु.) समूह, थवा, कळप, समुदाय.
**निकस**–(पु.) कसोटी, परीक्षा, निकष.
**निकामना**–(स्त्री.) इच्छा, आशा, लोभ–(निकन्ति).
**निकामलाभी**–(वि.) सहज मिळविणारा, अनायसे मिळविणारा, बिन कष्टाने मिळविणारा.
**निकामेति**–(क्रि.) इच्छा करणे, आशा धरणे, इच्छिणे.
**निकामेसि**–(पू. क्रि.) इच्छा केली, आशा केली.
**निकामित**–(कृ.) इच्छुक, इच्छा केलेला, आशा धरलेला.
**निकामेन्त**–(कृ.) इच्छा करत असता, आशा करत असता.
**निकाय**–(पु.) समूह, समुदाय, संग्रह, संप्रदाय.
**निकास**–(पु.) शेजार.
**निकिट्ठ**–(वि.) निकृष्ट, कमी प्रतीचा.
**निकुञ्ज**–(पु., नपु.) वृक्ष-वेलींनी झाकाळलेले ठिकाण.
**निकूजति**–(क्रि.) कुंजन करणे, गुणगुणणे.
**निकूजि**–(पू. क्रि.) बोलला, म्हणाला.
**निकूजित**–(कृ.) बोलत असता, म्हणत असता, सांगत असता.
**निकूजमान**–(कृ.) बोलताना, म्हणताना, सांगताना.
**निकेतन**–(नपु.) घर, निवासस्थान,, निवास, राहण्याची जागा.
**निक्कङ्ख**–(वि.) असंदिग्ध, स्पष्ट, निश्चित,निकेतन.
**निक्कड्ढन**–(नपु.) बाहेर ओढणे, बाहेर काढणे, उघड करणे.
**निक्कण्टक**–(वि.) निष्कंटक, काटे नसलेला, शत्रू-वैरी नसलेला.
**निक्कद्दम**–(वि.) चिखल नसलेला, सुका, कोरडा.
**निक्कम**–(पु.) प्रयत्न.
**निक्करुण**–(वि.) निर्दय, दया-माया नसलेला, क्रूर.
**निक्कसाव**–(वि.) पापा पासून मुक्त, पवित्र, पाप मुक्त.
**निक्काम**–(वि.) कामना रहित, निःस्वार्थी, निष्काम.
**निक्कारण**–(वि.) निष्कारण, कारण नसता.
**निक्कारणा**–(क्रि. वि.) कारण नसताना, विनाकारणाने.
**निक्किलेस**–(वि.) विकार रहित, निर्विकार.
**निक्कुज्ज**–(वि.) फेकलेला, टाकलेला.
**निक्कुज्जेति**–(क्रि.) उलटणे, उलटून टाकणे.
**निक्कुज्जेसि**–(पू. क्रि.) उलटले, उलटून टाकले.
**निक्कुजित**–(कृ.) उलटलेले, उलटून टाकलेले.
**निक्कुज्जेत्त्वा**–(पू. क्रि.) उलटून.
**निक्कुज्जिय**–(कृ.) उलटण्यास योग्य, उलटून टाकण्यालायक.
**निक्कुह**–(वि.) ढोंग नसलेला, खरा, सत्य, सोंगापासून अलिप्त.
**निक्कोध**–(वि.) क्रोध रहित, रागापासून अलिप्त.
**निक्केस-सीस**–(पु.) टक्कल पडलेले डोके, केस नसलेले शीर.
**निक्ख**–(पु.) निकष, सुवर्ण-मुद्रा, मोहोर.
**निक्खन्त**–(कृ.) घरातून बाहेर काढलेला.
**निक्खम**–(पु.) निष्क्रमण, जाणे.
**निक्खमण**–(नपु.) निघून जाणे, निरोप घेणे.
**निक्खमति**–(क्रि.) गृहत्याग करणे, घरातून निघून जाणे.
**निक्खमि**–(पू. क्रि.) गृहत्याग केला, घरातून निघून गेला.
**निक्खमन्त**–(कृ.) गृहत्याग करत असता, घरातून निघून जात असता.
**निक्खमित्त्वा**–(पू. क्रि.) गृहत्याग करून, घरातून निघून जाऊन, घर सोडून.
**निक्खम्म**–(पू. क्रि.) गृहत्याग करून, घरातून निघून जावून, घर सोडून.
**निक्खमितब्ब**–(कृ.) निष्क्रमण करण्यायोग्य, गृहत्याग करण्यालायक.
**निक्खमितुं**–(कृ.) निष्क्रमण करण्यासाठी,, गृहत्याग करण्यासाठी.
**निक्खमनिय**–(पु.) श्रावण महिना, या महिन्यात नवजात बालकास घरातून बाहेर आणून सूर्यदर्शन घडवितात. ही प्रथा उत्तर प्रदेशात आहे.
**निक्खामेति**–(क्रि.) घरातून बाहेर काढले.
**निक्खामेसि**–(पू. क्रि.) घरातून बाहेर काढणे.
**निक्खामित**–(कृ.) घरातून बाहेर काढलेला.
**निक्खामेन्त**–(कृ.) घरातून बाहेर काढत असता.
**निक्खामेत्वा**–(पू. क्रि.) घरातून बाहेर काढून.
**निक्खिक**–(पु.) खजिनदार, कोषाध्यक्ष.
**निक्खित्त**–(कृ.) ठेवले गेले.
**निक्खिपेति**–(क्रि.) एकोकडे ठेवणे, बाजूस ठेवणे.

निक्खिपि–(पू. क्रि.) ठेवले.
निक्खिपन्त–(कृ.) ठेवत असता, ठेवताना.
निखिपित्त्वा–(पू. क्रि.) ठेवून.
निखिपितब्ब–(कृ.) ठेवण्यायोग्य, ठेवण्यालायक.
निक्खेप–(पु.) निक्षेप, ठेवणे.
निक्खेपन–(नपु.) निक्षेपण, धरून ठेवणे.
निखणति, निखनति–(क्रि.) खणणे, खोदणे, उकरणे.
निखनि–(पू. क्रि.) खणले, खोदले, उकरले.
निखात–(कृ.) खणलेला, खोदलेला, उकरलेला.
निखनन्त–(कृ.) खणताना, खोदताना, उकरताना.
निखनित्त्वा–(पू. क्रि.) खोदून, उकरून.
निखादन–(नपु.) छिन्नी, टाकी, गवंड्याची घडविण्याची छिन्नी.
निखिल–(वि.) समस्त, सर्व, संपूर्ण.
निगच्छति–(क्रि.) अनुभव घेणे, सहन करणे, भोगणे, सोसणे.
निगण्ठ–(पु.) निर्ग्रन्थ, जैन संप्रदायाचा संन्याशी, नग्न साधू.
निगण्ठ-नाथपुत्त–(पु., विशे. ना.) भगवान बुद्धाच्या समकालिन सहा आचार्यांपैकी, एक. जैनांचे शेवटचे तिर्थंकार वर्धमान भगवान महावीर.
निगति–(स्त्री.) भाग्य, नशीब, अवस्था, स्थिती, आचरण.
निगम–(पु.) मोठा गाव, नगर, शहर.
निगमन–(नपु.) व्याख्या, उद्धरण, दृष्टांत, उदाहरण, नमुना.
निगल–(पु.) हत्तीच्या पायाचा साखळदंड.
निगूहति–(क्रि.) झाकणे, लपविणे, दडविणे.
निगूहि–(पू. क्रि.) झाकले, लपविले, दडविले.
निगूहित–(कृ.) झाकलेले, लपविलेले, दडविलेले.
निगूळ्ह–(कृ.) झाकलेले, लपविलेले, दडविलेले.
निगूहित्त्वा–(पू. क्रि.) झाकून, लपवून, दडवून.
निगूहन–(नपु.) लपविणे, झाकणे, दडविणे.
निग्गच्छति–(क्रि.) बाहेर जाणे.
निग्गण्ठि–(वि.) ग्रंथी नसलेला.
निग्गण्हन–(नपु.) निग्रह करणे, आग्रह करणे, धाक-दपटशा दाखविणे.
निग्गण्हति–(क्रि.) दोष देणे, धाक दाखविणे, भीति घालणे.
निगण्हि–(पू. क्रि.) निग्रह केला, आग्रप धरला, धाक दाखविला.
निग्गहीत–(कृ.) निग्रह केला गेला, आग्रह धरला गेला, धाक दाखविला गेला.
निग्गहीत–(नपु.) अनुस्वार, अनुनासिक.
निग्गण्हन्त–(कृ.) निग्रह करताना, आग्रह धरताना. धाक दाखविताना.
निग्गय्ह–(पू. क्रि.) निग्रह करून, निक्षून, आग्रह धरून, धाक दाखवून.
निग्गहित्त्वा–(पू. क्रि.) निग्रह करून, निक्षून, आग्रह धरून धाक दाखवून.
निग्गम–(पु.) निर्गमन, बाहेर जाणे, निघून जाणे.
निग्गमन–(नपु.) निर्गमन, निघून जाणे, निरोप घेणे.
निग्गय्ह-वादी–(पु.) निग्रह करणारा, टीका करणारा, दोष दाखविणारा.
निग्रोध मिग जातक–निग्रोध मृगाने प्रसंगी आपले बलिदान देण्याचे ठरवून आपल्या हरिणीचे व तिच्या पाडसाचे रक्षण करण्याचे ठरविले. शेवटी स्वतःसह सर्वांचे प्राण वाचविण्यांत त्याला यश आल्याची कथा–(१२).
निग्गह–(पु.) निग्रह, दोषारोपण, दोष लावणे.
निग्गहेतब्ब–(कृ.) निग्रह करण्यायोग्य, दोष देण्यालायक.
निग्गाहक–(पु.) आग्रह धरणारा, निग्रह करणारा.
निग्गुण्डी–(स्त्री.) औषधी वनस्पती.
निग्गुम्ब–(वि.) झाडे-झुडपे नसलेली जमीन, नापिक जमीन.
निग्घातन–(नपु.) हत्त्या, विनाश.
निग्घोस–(पु.) निर्घोष, आरडा-ओरड, गोंधळ रहित.
निग्रोध–(पु.) वटवृक्ष, वडाचे झाड.
निग्रोध-पक्क–(नपु.) पिकलेले वडाचे फळ.
निग्रोध-परिमण्डल–(वि.) वडाचा विस्तार.
निघंस–(पु.) चोळणे, घासणे, रगडणे.
निघंसन–(नपु.) चोळणे, घासणे, रगडणे.
निघंसति–(क्रि.) चोळणे, घासणे, रगडणे.
निघंसि–(पू. क्रि.) चोळले, घासले, रगडले.
निघंसित–(कृ.) रगडलेले, चोळलेले, घासलेले.
निघंसित्त्वा–(पू. क्रि.) चोळून, घासून, रगडून.
निघण्डु–(पु.) निघंटु, पर्यायी शब्दांचा कोश, (निर्ग्रंथाचा-जैनांचा अर्धमागधी शब्द-कोश).
निघात–(पु.) मार, मारणे.
निचय–(पु.) संग्रह, धन, संपत्ति, साठा, धनसंचय.
निचित–(कृ.) संग्रहीत, साठविलेले.

**निचुल**–(नपु.) एक प्रकारचे झाड, मुचलिंदो, मुचलिंद.
**निच्च**–(वि.) नित्य, सतत नेहमी, एकसारखे, सदैव.
**निच्चं**–(क्रि. वि.) नेहमी, सदैव, सातत्याने, नित्याने.
**निच्च-कालं**–(क्रि. वि.) नित्यकाळ, सदैव, नेहमी, सतत.
**निच्च-दान**–(नपु.) स्थायी दान, नित्यदान.
**निच्च-भत्त**–(नपु.) सतत, भोजनदान, सतत अन्नछत्र.
**निच्च-सील**–(नपु.) सदैवशील पालन, पंचशील आचरण.
**निच्चता**–(स्त्री.) नित्यता, सतत्य, सदैवता.
**निच्चम्म**–(वि.) चर्म रहित.
**निच्चोल**–(वि.) निर्वस्त्र, नग्न, विवस्त्र, उवडा, नागवा.
**निच्छय**–(पु.) निश्चय, निर्धार.
**निच्छरण**–(नपु.) बाहेर काढणे, बाहेर पाठविणे, बाह्य करणे.
**निच्छरत्ति**–(क्रि.) बाहेर जाणे.
**निच्छरि**–(पू. क्रि.) बाहेर काढले, बाहेर पाठविले, बाहेर घालविले.
**निच्छरित**–(कृ.) बाहेर काढलेला, बाहेर पाठविलेला, बाहेर घालविलेला.
**निच्छरित्वा**–(पू. क्रि.) बाहेर काढून, बाहेर पाठवून, बाहेर घालवून.
**निच्छात**–(वि.) भूक न लागता, भूक लागली नसता.
**निच्छारित**–(कृ.) उघड केलेला, जाहीर केलेला.
**निच्छारेति**–(क्रि.) जाहीर करणे, सांगणे, बोलणे, उघड करणे.
**निच्छारेत्वा**–(पू. क्रि.) प्रकट करून, जाहीर करून, सांगून, उघड करून.
**निच्छारेसि**–(पू. क्रि.) प्रकट केले, जाहीर केले, सांगितले, उघड केले.
**निच्छित**–(कृ.) निश्चित, विचारीत, मीमांसित, चर्चित.
**निच्छनाति**–(क्रि.) विचार करणे, चर्चा करणे, विमर्ष करणे, मीमांसा करणे.
**निज**–(वि.) स्वतःचा, आपला, स्वकीय.
**निज-देस**–(पु.) आपला देश, स्वदेश.
**निज्जट**–(वि.) सोपा, सुटणारा, अवघड नाही. कठीण नाही.
**निज्जर**–(वि.) निरोगी, सदैव तरुण, नाश नसलेला, वृद्धापकाळ न येणारा.
**निज्जरेति**–(क्रि.) नाश करणे, नष्ट करणे, खलास करणे, संपविणे.
**निज्जिण्ण**–(कृ.) वृद्धत्व आलेला, रोगी, ऱ्हास पावणारा नाश होणारा, विनाशी.
**निज्जिव्ह**–(वि.) जीभ नसलेला, जिव्हा विहीन.
**निज्जिव्ह**–(पु.) रानटी कोंबडा, रान कोंबडा.
**निज्जिव**–(वि.) निर्जीव, जीव नसलेला, प्राणहीन, मृत.
**निज्झान**–(नपु.) आंतरदृष्टि, आत्मज्ञान.
**निज्झायति**–(क्रि.) ध्यान धारणा करणे, ध्यान साधना करणे, तप करणे, योग साधना करणे, प्रण वोपासना.
**निट्ठा**–(स्त्री.) निष्ठा, भक्ती, अंत, शेवट, सारांश, सार.
**निट्ठाति**–(क्रि.) संपणे, समाप्त होणे, नष्ट होणे, संपविणे, समाप्त करणे, नष्ट करणे.
**निट्ठान**–(नपु.) शेवट, समाप्ती, अंत.
**निट्ठासि**–(पू. क्रि.) शेवट केला, समाप्ती केली, अंत केला, संपविले.
**निट्ठापित**–(कृ.) पूर्ण केलेला, संपविलेला, शेवट लावलेला.
**निट्ठापेति**–(क्रि.) पूर्ण करणे, संपविणे, शेवट लावणे, समाप्त करणे.
**निट्ठापेत्वा**–(पू. क्रि.) पूर्ण करून, संपवून, समाप्त करून, शेवट लावून.
**निट्ठापेन्त**–(कृ.) पूर्ण करत असता, संपवित असता, शेवट लावीत असता, समाप्त करीत असता.
**निट्ठापेसि**–(पू. क्रि.) पूर्ण केले, समाप्त केले, संपविले, शेवट लावला.
**निट्ठित**–(कृ.) समाप्त, संपूर्ण, पूर्ण, सगळे.
**निट्ठुभति**–(क्रि.) थुंकणे.
**निट्ठुभन**–(नपु.) थुंक, थुंकणे.
**निट्ठुभि**–(पू. क्रि.) थुंकला.
**निट्ठुभित**–(कृ.) थुंकलेला.
**निट्ठुभित्वा**–(पू. क्रि.) थुंकून.
**निट्ठुर**–(वि.) निष्ठूर, क्रूर, रागीट, निर्दय, कठोर.
**निट्ठुरिय**–(नपु.) निष्ठूरता, निर्दयपणा, क्रूरता, कठोरता.
**निड्ड**–(नपु.) घरटे, कोटे, पक्षाचे घर, थांबण्याची जागा, विश्रामधाम, विश्रांतीस्थान.
**निड्डेति**–(क्रि.) गवताची पाने-काडी काढणे.
**निण्णय**–(पु.) निर्णय, निकाल, शेवट, निवाडा.
**नितम्ब**–(पु.) नितंब, पर्वताची कड, डोंगर किनारा.
**नितण्ह**–(वि.) तृष्णा रहित, निरिच्छ, इच्छा नसलेला.
**नित्तल**–(वि.) गोल.
**नित्तिण्ण**–(कृ.) पास झाला, पार झाला, उत्तीर्ण झाला, पार पडलेला.
**नित्तुदन**–(नपु.) चावणे, कुरतडणे.
**नित्तेज**–(वि.) निस्तेज, प्रकाशहीन, प्रकाश नसलेला.

**नित्थरण**–(नपु.) पार पडणे, पोहून जाणे, तरणे, शेवट.
**नित्थरति**–(क्रि.) पार होणे, पास होणे, उत्तीर्ण होणे, पोहणे.
**नित्थरि**–(पू. क्रि.) पार झाला, पास झाला, उतीर्ण झाला, पोहून गेला.
**नित्थरित**–(कृ.) पार होता, पास होता, उतीर्ण होता, पोहून जाता.
**नित्थरित्त्वा**–(पू. क्रि.) पार होऊन, पास होऊन, उतीर्ण होऊन, पोहून जाऊन.
**नित्थुनन**–(नपु.) कण्हणे, विव्हळणे, व्याकूळ होणे.
**नित्थुनाति**–(क्रि.) कण्हणे, विव्हळणे, व्याकूळ होणे.
**नित्थुनन्त**–(कृ.) कण्हत असता, विव्हळत असता.
**नित्थुनि**–(पू. क्रि.) कण्हला, विव्हळला, व्याकूळला.
**नित्थुनित्त्वा**–(पू. क्रि.) कण्हून, विव्हळून, व्याकूळ होऊन.
**निदस्सन**–(नपु.) निदर्शन, उदाहरण, साक्ष, तुलना, बरोबरी.
**निदस्सित**–(कृ.) दाखविलेला, निदर्शन केलेला, दर्शविलेला.
**निदस्सिय**–(पू. क्रि.) दाखवून, दर्शवून.
**निदस्सितब्ब**–(कृ.) दर्शविणेयोग्य, दाखविण्यालायक.
**निदस्सेति**–(क्रि.) दर्शविणे, दाखविणे, निदर्शन करणे.
**निदस्सेसि**–(पू. क्रि.) दर्शविले, दाखविले, निदर्शन केले.
**निदस्सेत्वा**–(पू. क्रि.) दर्शवून, दाखवून, निदर्शन करून.
**निदहति**–(क्रिया) संपत्ति गाडणे, धन पुरणे, पैसे झाकून टाकणे.
**निदहि**–(पू. क्रि.) संपत्ती गाडली, धन पुरले, पैसे झाकून ठेवले.
**निदहित**–(कृ.) निहित, संपत्ती गाडताना, धन पुरताना, पैसे झाकताना.
**निदहित्त्वा**–(पू. क्रि.) संपत्ती गाडून, धन पुरून, पैसे झाकून ठेवून.
**निदाघ**–(पु.) उन्हाळा, उष्णता, उकाडा, सुका दुष्काळ.
**निदान**–(नपु.) मूळ, कारण, उत्पत्ति.
**निदान-कथा**–(स्त्री.) जातकट्ठ कथेची प्रस्तावना किंवा आरंभीचा भाग (भूमिका).
**निद्दय**–(वि.) निर्दय, दया नसलेला, कठोर.
**निद्दर**–(वि.) दुःख रहीत, भय रहीत, निर्धोक, बिनधोक.
**निद्दा**–(स्त्री.) निद्रा, झोप.
**निद्दारामता**–(स्त्री.) झोपाळूपणा, निद्राप्रियता, आळशीपणा.
**निद्दालु**–(वि.) झोपाळू, निद्राळू, आळशी.
**निद्दासीली**–(वि.) झोपाळू, निद्राळू, आळशी.
**निद्दायति**–(क्रि.) झोपणे, निजणे.
**निद्दायन**–(नपु.) झोप, निद्रा, आळस.
**निद्दायन्त**–(कृ.) झोपत असलेला, निजत असलेला, आळसलेला.
**निद्दायि, निद्दायित्वा**–(पू. क्रि.) झोपून, निजून, आळसून.
**निद्दिट्ठ**–(कृ.) निर्दिष्ट, दाखविलेला, निर्देश केलेला.
**निद्दिसति**–(क्रि.) निर्देशिणे, दाखविणे, निर्देशन करणे.
**निद्दिसि**–(पू. क्रि.) निर्देश केला, दाखविले, निदर्शन केले.
**निद्दिसितब्ब**–(कृ.) निर्देशन करणे योग्य, दाखविणे योग्य.
**निद्दिसित्वा**–(पू. क्रि.) निर्देश करून, दाखवून, निदर्शन करून.
**निद्दुक्ख**–(वि.) दुःख रहित, वेदनाहीन, त्रासविना.
**निद्देस**–(पु.) विश्लेषणात्मक व्याख्या, स्पष्टीकरण, खुलासा, अर्थ. खुद्दक निकायांतील एक विभाग-ग्रंथ.
**निद्धन**–(वि.) निर्धन, गरीब, दरिद्री, धन नसलेला.
**निद्धन्त**–(कृ.) फुंकताना, फुंकर मारताना, फुंकर घालताना.
**निद्धमति**–(क्रि.) फुंकर मारणे, बाहेर काढणे.
**निद्धमि**–(पू. क्रि.) फुंकर मारली, बाहेर काढले.
**निद्धमित्त्वा**–(पू. क्रि.) फुंकर मारून, बाहेर काढून.
**निद्धमन**–(नपु.) नाला, पाट, नळ, कालवा.
**निद्धमन-द्वार**–(नपु.) तलावातील अगर धरणातील पाणी काढण्याचा दरवाजा-पाट, नहर.
**निद्धारण**–(नपु.) निर्धार, निश्चय.
**निद्धारित**–(कृ.) निर्धारित केलेले, निश्चित केलेले.
**निद्धारेति**–(क्रि.) निर्धारित करणे, निश्चित करणे, पक्के करणे.
**निद्धारेसि**–(पू. क्रि.) निर्धारित केलेले, निश्चित केले. पक्के ठरविले.
**निद्धारेत्वा**–(पू. क्रि.) निर्धारित करून, निश्चित करून, पक्के ठरवून.
**निद्धुनन**–(नपु.) पिंजणे, पिंजण.
**निद्धुनाति**–(क्रि.) पिंजणे.
**निद्धुनि**–(पू. क्रि.) पिंजले.
**निद्धुनित्वा**–(पू. क्रि.) पिंजून.
**निद्धोत**–(कृ.) धुतलेला, स्वच्छ केलेला, साफ केलेला, घासून धारदार केलेला.

**निधन**–(पु., नपु.) मृत्यू, मरण, अंत, शेवट.
**निधान**–(नपु.) दडविलेली संपत्ती.
**निधापित**–(कृ.) ठेवविलेला, ठेवण्यास लावलेला.
**निधापेति**–(क्रि.) ठेवविणे, ठेवण्यास लावणे, सांगणे. गाडविणे, गाडण्यास सांगणे.
**निधापेसि**–(पू. क्रि.) ठेवविले, ठेवण्यास सांगितले, गाडविले, गाडण्यास सांगितले.
**निधाय**–(पू. क्रि.) ठेववून, ठेवण्यास सांगून, गाडवून, गाडण्यास सांगून.
**निधि**–(पु.) दडलेली संपत्ति, गुप्त धन, गुप्त द्रव्य, निधी.
**निधि-कुम्भि**–(स्त्री.) संपत्ती भरलेला घडा, धन भरलेला रांजण.
**निधिपति**–(क्रि.) ठेवविणे, गाडविणे, गाडावयास लावणे.
**निधेति**–(क्रि.) ठेवणे, गाडणे, पुरणे, मातीआड करणे.
**निन्दति**–(क्रि.) निंदा करणे, निंदणे, [निन्दि, नन्दित, निन्दन्त, निन्दित्त्वा, निन्दितब्ब].
**निन्दन**–(नपु.) अपमान, अवहेलना, तिरस्कार.
**निन्दना**–(स्त्री.) अपमान, अवहेलना, तिरस्कार.
**निन्दिय**–(वि.) निंदनीय, तिरस्कारणीय, अवहेलनीय.
**निन्न**–(वि.) निम्न, खालचा, कमी प्रतीचा, कमी योग्यतेचा, नीच.
**निन्न**–(नपु.) निम्नभूमी, खालची जमीन, खालची जागा.
**निन्नता**–(स्त्री.) निम्नता, नीचपणा.
**निन्नगा**–(स्त्री.) नदी, सरिता, तटिनी.
**निन्नहुत**–(नपु.) संख्या, दहा हजार, दश सहस्त्र, (१०,०००).
**निन्नाद**–(पु.) स्वर-माधुर्य, लय, राग, निनाद, मधुर-स्वर, आवाज.
**निन्नादी**–(वि.) पहाडी आवाज असणारा.
**निन्नामेति**–(क्रि.) झुकणे, वाकणे, नमणे, नम्र होणे, [निन्नामेसि, निन्नामेत्त्वा, निन्नामित].
**निन्निमित्त**–(नपु.) इच्छानुसार, मर्जीनुसार, इच्छेप्रमाणे, मनासारखे.
**निन्नेजक**–(पु.) परीट, धोबी.
**निन्नेतु**–(पु.) निर्णय करणारा, निकाल देणारा, निर्णायक, निवाडा करणारा, न्याय देणारा.
**निपक**–(वि.) दक्ष, तत्पर, बुद्धिमान, हुषार.
**निपच्च**–(पू. क्रि.) पडून.
**निपच्चाकार**–(पु.) नम्र, नम्रता, लीनपणा.
**निपज्ज**–(पू. क्रि.) झोपून, पडून, कलंडून.
**निपज्जति**–(क्रि.) झोपणे, पडणे, कलंडणे, [निपज्जि, निपन्न, निपज्जन्त, निपज्जा, निपज्जिय, निपज्जित्त्वा].
**निपज्जन**–(नपु.) झोप, आळस.
**निपठ**–(पु.) पाठ, धडा.
**निपाठ**–(पु.) शिकणे, शिक्षण, वाचणे.
**निपतति**–(क्रि.) पडणे, [निपति, निपतित, निपतित्त्वा].
**निपन्न**–(कृ.) झोपलेला, निजलेला, कलंडलेला.
**निपात**–(पु.) पडणे, उतरणे, खाली येणे.
**निपात**–(अ.) प्रत्यय. (विभक्ती प्रत्यय).
**निपातन**–(नपु.) पडणे, खाली पडणे, वरून खाली पडणे.
**निपाति**–(वि.) झोपणारा, निजणारा, कलंडणारा.
**निपातेति**–(क्रि.) झोपू देणे, निजू देणे, पडू देणे, कलंडू देणे, [निपातेसि, निपातित, निपातेन्त, निपात्तेत्त्वा].
**निपान**–(नपु.) जनावारांची पाणी पिण्याची जागा, ठिकाण.
**निपुण**–(वि.) दक्ष, तत्पर, तयार, हुषार, तरबेज.
**निपक्क**–(वि.) उकळलेला, शिजविलेला.
**निप्पदेस**–(वि.) सर्व व्यापक, सर्व व्याप्त.
**निप्पपञ्च**–(वि.) प्रपंच रहित, व्याप विरहित, त्रास न घेता, सहज.
**निप्पभ**–(वि.) निष्प्रभ, निस्तेज, तेजोहीन, मलीन.
**निप्परियाय**–(वि.) पर्याय नसलेला, भेद नसलेला, फरक नसलेला.
**निप्पलाप**–(वि.) प्रलाप रहित, दुःख न करता, न रडता.
**निप्पाप**–(वि.) निष्पाप, निर्दोष, पाप न करणारा.
**निप्पाव**–(पु.) सूप, पाकडण्याचे साधन.
**निप्पितिक**–(वि.) बाप नसलेला, वडील नसलेला, पिता विहीन.
**निप्पीळन**–(नपु.) पीडा, त्रास, दबाव, दाब, टोचण, बोचण.
**निप्पीळेति**–(क्रि.) पीडा देणे, त्रास देणे, दबाव आणणे, टोचण लावणे, बोचणे, [निप्पीळेसि, निप्पीळित, निप्पीळेत्वा]
**निप्पुरिस**–(वि.) पुरुष नाहीत, सर्व स्त्रियाच, पुरुष रहित, पुरुषा शिवाय, पुरुष विहीन.
**निप्पोथन**–(नपु.) मार, आघात.
**निप्फज्जति**–(क्रि.) निष्पादन करणे, उत्पन्न करणे, उठविणे, निर्माण करणे, [निप्फज्जि, निप्फन्न, निप्फज्जमान, निप्फज्जित्त्वा],

निप्फज्जन–(नपु.) परिणाम, शेवट, प्रभाव, प्राप्ती.
निप्फत्ति–(स्त्री.) निष्पत्ति, प्राप्ती, मिळकत.
निप्फल–(वि.) निष्फळ, फुकट, विनाकारण.
निप्फादक–(वि.) निर्माता, निष्पादक, उत्पन्न करणारा. बनविणारा, घडविणारा.
निप्फादन–(नपु.) उत्पत्ति, निर्माण, उत्पादन.
निप्फादेति–(क्रि.) उत्पन्न करणे, निर्माण करणे, उत्पादन करणे,
[निप्फादेसि, निप्फादित, निप्फादेन्त, निप्फादेत्त्वा].
निप्फादेतु–(पु.) उत्पन्न करणारा, निर्माण करणारा, बनविणारा, तयार करणारा, उत्पादक.
निप्फोटन–(नपु.) मारणे, बडविणे, हाणणे, झोडपणे.
निप्फोटेति–(क्रि.) मारणे, बडविणे, हाणणे, झोडपणे,
[निप्फोटेसि, निप्फोटित, निप्फोटेन्त, निप्फोटेत्त्वा].
निबद्ध–(वि.) नियमित, सतत, एकसारखे, क्रमाने.
निबन्ध–(पु.) बंधन, मर्यादा.
निबन्धन–(नपु.) बंधन, विशिष्ठ प्रकारची मर्यादा.
निबन्धति–(क्रि.) बांधणे, प्रेरित करणे, प्रोत्साहन देणे,
[निबन्धि, निबद्ध, निबद्धित्वा].
निब्बट्ट–(वि.) बीज नसलेला, विन वियांचा, बी रहित.
निब्बट्टेति–(क्रि.) हटविणे, घालविणे, धाडणे, दूर करणे,
[निब्बट्टेसि, निब्बट्टित, निब्बट्टेत्त्वा].
निब्बत्त–(कृ.) पुनर्जन्म झालेला, पुन्हा उत्पन्न झालेला, पुन्हा उपजलेला, जन्मलेला.
निब्बत्तक–(वि.) उत्पन्न करणारा, निर्माण करणारा, बनविणारा, उत्पादक, तयार करणारा.
निब्बत्तनक–(वि.) उत्पादक.
निब्बत्तति–(क्रि.) उत्पन्न होणे, जन्मणे, परिणत होणे, पूर्ण होणे, तयार होणे,
[निब्बत्ति, निब्बत्त, निब्बत्तन्त, निब्बत्तित्त्वा].
निब्बत्तन–(नपु.) उत्पत्ती, निर्मित्ती, बनावटी.
निब्बत्ति–(स्त्री.) जन्म घेणे, प्रकट होणे, बनणे, तयार होणे.
निब्बत्तापन–(नपु.) पुनर्जन्म.
निब्बत्तेति–(क्रि.) उत्पन्न करणे, परिणत करणे, तयार करणे, बनविणे,
[निब्बत्तेसि, निब्बत्तित, निब्बत्तेन्त, निब्बत्तेतब्ब, निब्बतेत्त्वा].
निब्बन–(वि.) तृष्णाहीन, वन रहित, निर्मोही, निरिच्छ.
निब्बनथ–(वि.) तृष्णा मुक्त.
निब्बसन–(वि.) वस्त्राशिवाय, उघडा, कपडे न घालता, नग्न.



निब्बाति–(क्रि.) विझणे, थंड पडणे, निर्जिव होणे, निश्चल होणे,
[निब्बायि, निब्बुत, निब्बायन्त, निब्बायित्त्वा].
निब्बान–(नपु.) निर्वाण, मोक्ष, विस्तव विझणे, आग विझणे.
निब्बान-गमन–(वि.) निर्वाण पावणारा, मोक्ष प्राप्त करुन घेतलेला.
निब्बान-धातु–(स्त्री.) निर्वाण क्षेत्र.
निब्बान-पत्ति–(स्त्री.) निर्वाण प्राप्ती.
निब्बान-सच्छिकिरिया–(स्त्री.) निर्वाणाचा साक्षात्कार, होणे, निर्वाणाची अनुभूती मिळणे, अनुभव होणे.
निब्बान-सम्पत्ति–(स्त्री.) निर्वाणाची प्राप्ती.
निब्बानाभिरत–(वि.) निर्वाण प्राप्तीत अनुरक्त, निर्वाण प्राप्तीसाठी प्रयत्नशील.
निब्बापन–(नपु.) शांत होणे, विझणे, गत-प्राण.
निब्बापेति–(क्रि.) विझविणे, शांत करणे, गतः प्राण होणे,
[निब्बापेसि, निब्बापित, निब्बापेन्त, निब्बापेत्त्वा].
निब्बायति–(क्रि.) निर्वाण प्राप्त होणे, शांत होणे, विझणे, गतप्राण होणे.
निब्बायितु–(कृ.) निर्वाण प्राप्तीसाठी, निर्वाण प्राप्तिकरिता.
निब्बाहन–(नपु.) हटविणे, घालविणे.
निब्बाहन–(वि.) बाहेर काढलेला, बाह्यकृत, फेकलेला, दूर लोटलेला.
निब्बिकार–(वि.) निर्विकार, ज्यावर परिणाम होत नाही, अपरिवर्तनशील.
निब्बिचिकिच्छ–(वि.) शंका रहित, निःशंक, संशयमुक्त, निःसंशय.
निब्बिज्ज–(कृ.) निर्वेद प्राप्त, अपमानित.
निब्बिज्जति–(क्रि.) अपमान होणे,
[निब्बिज्जि, निब्बिन्न, निब्बिज्जित्त्वा].
निब्बिज्झति–(क्रि.) नेमणे, टिपणे, बाण मारणे, निशाणबाजी करणे,
[निब्बिज्झि, निब्बिद्ध].
निब्बिदा–(स्त्री.) अपमान, अवज्ञा.
निब्बिन्दति–(क्रि.) अपमान होणे, अवज्ञा होणे,
[निब्बिन्दि, निब्बिन्न, निब्बिन्दित्त्वा].
निब्बिस–(वि.) विष नसलेला, निर्विष.
निब्बिस–(नपु.) मजुरी, काम, उद्योग.
निब्बिसेस–(वि.) समान, सारखा, एकसारखा, प्रतिरूप.
निब्बुति–(स्त्री.) शांती, सूख, निवृत्ती.

**निब्बुय्हति**–(क्रि.) पोहणे, तरंगणे, तरणे.
**निब्बेठन**–(नपु.) विचार, मत, अर्थ, व्याख्या.
**निब्बेठेति**–(क्रि.) विचार करणे, अर्थ लावणे, व्याख्या करणे,
[निब्बेठेसि, निब्बेठित, निब्बेठेत्त्वा].
**निब्बेध**–(पु.) घुसविणे, आत घालणे.
**निब्बेमतिक**–(वि.) एकमत, एकविचार, सहविचार.
**निब्भय**–(वि.) निर्भय, न भिणारा.
**निब्भोग**–(वि.) व्यर्थ, विनाकारण, फुकट, कारण नसता, बेकार.
**निभ**–(वि.) समान, सारखा.
**निभा**–(स्त्री.) प्रकाश, तेज, चमक.
**निभाति**–(क्रि.) प्रकाशमान होणे, तेज पडणे, चमकणे, प्रकाशणे.
**निभासि**–(पू. क्रि.) प्रकाशला, चमकला.
**निमन्तक**–(वि.) निमंत्रक, निमंत्रण देणारा, बोलाविणारा.
**निमन्तन**–(नपु.) निमंत्रण, आमंत्रण, बोलावणे.
**निमन्तेति**–(क्रि.) निमंत्रण देणे, आमंत्रण देणे, बोलावणे,
[निमन्तेसि, निमन्तित, निमन्तेत्त्वा, निमन्तिय, निमन्तेन्त].
**निमि जातक**–डोक्याचा केस पांढरा झाल्याचे पाहून निमि राजाने आपल्या पूर्वजांप्रमाणे सिंहासन सोडून संन्यास घेतल्याची कथा–(५४१).
**निमित्त**–(नपु.) कारण, शकुन, चिन्ह, निमित्त.
**निमित्तग्गाही**–(वि.) वरील चिन्हांनी आकर्षित.
**निमित्त-पाठक**–(पु.) शकुनांचा अर्थ सांगणारा, भविष्यवादी, ज्योतिषी, भविष्य वक्ता.
**निमिनाति**–(क्रि.) देवाण-घेवाण करणे, देव-घेव करणे,
[निम्मिनि, निमिनित, निमिनित्त्वा].
**निमिस, निमेस**–(पु.) पापणी मालविणे, निमिश, पापणी हालण्यास लागणारा वेळ.
**निमिसति**–(क्रि.) डोळा मारणे, डोळा मिचकावणे, डोळ्याची उघड झाप करणे.
**निमीलेति**–(क्रि.) डोळा मिचकाविणे, डोळा झाकणे,
[निमीलेसी, निमिलित, निमीलेत्त्वा].
**निमीलन**–(नपु) दृष्टी भिडविणे, डोळा मारणे, डोळा मिचकाविणे.
**निमुज्ज**–(कृ.) बुडी मारताना, बुडताना.
**निमुज्जति**–(क्रि.) बुडी मारणे, बुडणे.
**निमुज्जी**–(पू. क्रि.) बुडी मारली, बुडला.
**निमुज्जित्वा**–(पू. क्रि.) बुडी मारून, बुडून.
**निमुज्जितुं**–(कृ.) बुडी मारत असता, बुडत असता.
**निमुज्जा**–(स्त्री.) डुबकी, बुडी.
**निमुज्जन**–(नपु.) बुडणे, डुबकी मारणे.
**निमेस**–[पहा–निमिस].
**निम्ब**–(पु.) लिंब, लिंबाचा वृक्ष.
**निम्मक्खिक**–(वि.) माशा नसलेला, माशा विरहित.
**निम्मज्जन**–(पु.) बोचण, टोचण, रुखरुख.
**निम्मथन**–(नपु.) दळणे, पीठ करणे, चूर्ण करणे.
**निम्मथति**–(क्रि.) दळणे, पीठ करणे, चूर्ण करणे, वाटून बारीक करणे.
**निम्मथि**–(पू. क्रि.) दळले, पीठ केले, चूर्ण केले, वाटले.
**निम्मथित**–(कृ.) दळताना, पीठ करताना, चूर्ण करताना, वाटताना.
**निम्मथित्वा**–(पू. क्रि.) दळून, पीठ करून, चूर्ण करून.
**निम्मथेति**–(क्रि.) दळणे, पीठ, करणे, चिरडून टाकणे.
**निम्मद्दन**–(नपु.) चोळणे, चिरडणे, दाबून टाकणे.
**निम्मल**–(वि.) निर्मळ, स्वच्छ, साफ, दोष रहित.
**निम्मंस**–(वि.) मास रहित, मास नसलेले.
**निम्मात-पितिक**–(वि.) अनाथ, पोरका, माता-पिता नसलेला, मातृ-पितृ विहिन.
**निम्मातिक**–(वि.) आई नसलेला, मातृहीन, माता विरहित.
**निम्मातु**–(पु.) निर्माता, निर्माण करणारा, बनविणारा, तयार करणारा, रचियता, रचणारा.
**निम्माण**–(नपु.) निर्माण, रचना, कृती.
**निम्मान**–(नपु.) निर्माण, रचना, कृती.
**निम्मान**–(वि.) मान नसलेला, मान रहित, सामान्य.
**निम्मित्त**–(कृ.) निर्मित.
**निम्मणाति, निम्मिनाति**–(क्रि.) उत्पन्न करणे, निर्माण करणे, रचणे, तयार करणे, बनविणे.
**निम्मिणि**–(पू. क्रि.) निर्मिले, तयार केले, रचले, बनविले.
**निम्मिणन्त**–(कृ.) निर्माण करताना, तयार करताना, उत्पन्न करताना, रचताना, बनविताना, निर्मिताना.
**निम्मिणित्वा**–(पू. क्रि.) निर्मून, तयार करून, उत्पन्न करून, रचून, बनवून.
**निम्माय**–(कृ.) निर्माण करण्यायोग्य, तयार करण्यालायक, उत्पादन करण्यायोग्य. बनविण्यायोग्य.
**निम्मूल**–(वि.) निर्मूल, मूळ नसलेले, मुळासह काढणे.
**निम्मोक**–(पु.) सापाची कात, कातन.

**नियं, नियक**–(वि.) स्वकीय, आपला, नात्यातील.
**नियत**–(वि.) निश्चित, स्थिर, ठाम, कायम.
**नियति**–(स्त्री.) भाग्य, नशीब, आवश्यकता.
**नियम**–(पु.) मर्यादा, बंधन, बांध, निश्चित, स्थिर.
**नियमन**–(नपु.) नियमबद्ध, मर्यादित, स्थिरपणा, निश्चितपणा.
**नियमेति**–(क्रि.) नियमित करणे, कायम करणे, स्थिर ठेवणे.
**नियमेसि**–(पू. क्रि.) नेमले, कायम केले, स्थिर ठेवले.
**नियमित**–(कृ.) नेमत असता, कायम करताना, स्थिर ठेवताना.
**नियमेत्वा**–(पू. क्रि.) नेमून, कायम करून, स्थिर ठेवून
**नियाम**–(पु.) प्रकार, पद्धती, तऱ्हा, नियमाने.
**नियामक**–(पु.) जहाजाचा कप्तान, सेनापती, नियम राबविणारा, नियंत्रक, सूत्रधार, नियामक.
**नियुज्जति**–(क्रि.) निवडणे, नियुक्त करणे, कार्यरत असणे, नेमणे.
**नियुज्जि**–(पू. क्रि.) निवडला, नियुक्त केला, नेमला, वेचून घेतला, कार्यरत झाला.
**नियुत्त**–(कृ.) नियुक्त, निवडलेला.
**नियोग**–(पु.) आज्ञा, हुकूम, आवश्यकता.
**नियोजन**–(नपु.) नेमून देणे, हुकूम देणे, आज्ञा देणे, नियोजन.
**नियोजित**–(कृ.) निवडलेला, नेमलेला, प्रतिनिधी, नियोजित.
**नियोजेति**–(क्रि.) निवडणे, नेमणे, प्रेरित करणे.
**नियोजेसि**–(पू. क्रि.) निवडले, नेमले, प्रेरित केले.
**नियोजेन्त**–(कृ.) निवडलेला, नेमलेला, प्रेरित केलेला.
**नियोजत्वा**–(पू. क्रि.) निवडून, नेमन, प्रेरित करून.
**निय्यति, नीयत्ति**–(क्रि.) घेऊन जाणे.
**निय्यातन**–(नपु.) सोपविणे, हवाली करणे, ताब्यात देणे, समर्पण.
**निय्याति**–(क्रि.) बाहेर जाणे.
**निय्यासि**–(पू. क्रि.) बाहेर गेला.
**निय्यात**–(कृ.) बाहेर जात असता, बाहेर जाताना, निर्याति.
**निय्यातु**–(पु.) नेता, पुढारी, मार्गदर्शक, जाणारा, बाहेर जाणारा.
**निय्यातेति, निय्यादेति, नीयादेति**–(क्रि.) सोपविणे, ताब्यात देणे, सर्मपित करणे.
**निय्यातेसि**–(पू. क्रि.) सोपविले, ताब्यात दिले, सर्मपित केले.
**निय्यातित**–(कृ.) सोपविताना, ताब्यात देताना, सर्मपित करताना.
**निय्यादित**–[पहा–निय्यातित].
**निय्यातेत्वा**–(पू. क्रि.) सोपवून, ताब्यात देवून, समर्पून.
**निय्यादेत्वा**–[पहा–निय्यातेत्वा].
**निय्यान**–(नपु.) बाहेर जाणे, निघून जाणे, निरोप घेणे, मुक्त होणे.
**निय्यानिक**–(वि.) मुक्ति मिळवून देणारा.
**निय्यास**–(पु.) झाडातून निघणारा रस किंवा डिंक.
**निय्यूह**–(पु.) शिखर, वरचे टोक, शेंडी, दरवाजा, द्वार.
**निरंकरोति, निराकरोति**–(क्रि.) तिरस्कार करणे, उपेक्षा करणे.
**निरंकरि**–(पू. क्रि.) तिरस्कार केला, उपेक्षा केली.
**निरंकत**–(कृ.) तिरस्कार करता, उपेक्षा करता.
**निरंकत्वा**–(पू. क्रि.) तिरस्कार करून, उपेक्षा करून.
**निरग्गल**–(वि.) मुक्त, मोकळा, अनिर्बंध.
**निरत**–(वि.) लागलेला, लावलेला.
**निरत्थ**–(वि.) निरर्थक, अर्थ नसलेला.
**निरत्थक**–(वि.) निरर्थक.
**निरन्तर**–(वि.) सतत, नेहमी, कायम, एकसारखे. निरंतर.
**निरंतर**–(क्रि. वि.) सतत, नेहमी, कायम, एकसारखे, निरंतर.
**निरपराध**–(वि.) अपराध नसलेला, गुन्हा न करणारा, निर्दोष, निरपराध.
**निरपेक्ख**–(वि.) अपेक्षा नसलेला, अपेक्षा रहित, निष्काळजी, निरपेक्ष.
**निरब्बुद**–(वि.) निर्धोक, बाधा नसलेला, नरकाविषयी, एक विशाल-फार मोठी संख्या,.
**निरय**–(पु.) नरक.
**निरय-गामी**–(वि.) नरकात जाणारा, पापी, दुर्जन, दुष्ट.
**निरय-दुक्ख**–(नपु.) नरकातील दुःख, नरक यातना.
**निरय-पाल**–(पु.) नरकाधिपति, नरक-पाल.
**निरय-भय**–(नपु.) नरकाची भीती.
**निरय-संवत्तनिक**–(वि.) नरकात घेऊन जाणारा, नरकाकडे नेणारा.
**निरवसेस**–(वि.) संपूर्ण, परिपूर्ण, अवशेष न राहिलेला.
**निरसन**–(वि.) निराहार, शंका दूर झाली.
**निरस्साद**–(वि.) बेचव, चव नसलेला, चवहीन.
**निराकति**–(क्रि., स्त्री.) दूर करणे, मागे सारणे.
**निराकुल**–(वि.) निःशंक, समस्या नसलेला, बाधा रहित.

**निरातङ्क**–(वि.) निरोगी, स्वस्थ, चांगले आरोग्य.
**निरामय**–(वि.) निरोगी.
**निरामिस**–(वि.) मांस रहित, अभौतिक, मानव-निर्मित.
**निरारम्भ**–(वि.) पशूंचा वध न करता, अहिंसक.
**निरालम्ब**–(वि.) निराधार, पोरका, अनाथ.
**निरालय**–(वि.) आसक्ति नसलेला, ओढ नसलेला, गृह हीन.
**निरास**–(वि.) निराश, आशा नसलेला, इच्छा रहित.
**निरासङ्क**–(वि.) निःशंक, शंका नसलेला.
**निरासंस**–(वि.) निरिच्छ, इच्छा नसलेला.
**निरासव**–(वि.) शुद्ध चित्ताचा, मनांत मळ नसलेला, मनातील दोष गेलेला.
**निराहार**–(वि.) उपवास, काहीही न खाता, कडक व्रत.
**निरिन्धन**–(वि.) इंधन रहित, जाळ न करता, अग्नी न पेटवता.
**निरुज्झति**–(क्रि.) निरोध, प्राप्त होणे, नाश करणे, उपाय करणे.
**निरुज्झि**–(पू. क्रि.) निरोध केला, नाश केला, उपाय केला.
**निरुद्ध**–(कृ.) निरोध करताना, उपाय करताना.
**निरुज्झित्वा**–(पू. क्रि.) निरोध करून, उपाय करून.
**निरुज्झन**–(नपु.) निरोध, उपाय.
**निरुत्तर**–(वि.) उत्तर नसणे, सर्वोत्तम, सर्वश्रेष्ठ.
**निरुत्ति**–(स्त्री.) निरुक्त शास्त्र, बोलणे, व्याकरणा-संबंधी विश्लेषण.
**निरुत्ति-पटिसम्भिदा**–(स्त्री.) निरुक्तीचे ज्ञान.
**निरुदक**–(वि.) निर्जल, उदक रहित, बिनपाण्याचा.
**निरुद्ध**–(कृ.) निरोध प्राप्त करताना, नाश करताना, उपाय शोधताना.
**निरुपद्दव**–(वि.) उपद्रव रहित, निरुपद्रव, त्रास रहित.
**निरुपधि**–(वि.) राग नसलेला, आसक्ती नसलेला, निरासक्त.
**निरुपम**–(वि.) उपमा नसलेला, अजोड, अतुलनीय.
**निरुस्सास**–(वि.) श्वासोच्छ्वास नसलेला.
**निरुस्सुक**–(वि.) उत्सुकता नसलेला, निरुत्सुक, औत्सुक्यहीन.
**निरोग**–(वि.) स्वस्थ, रोग रहित, चांगले आरोग्य, निरोगी.
**निरोज**–(वि.) चवहीन, बेचव, नावडता.
**निरोध**–(पु.) पुनरुत्पत्तीला अडथळा, पुनरुत्पती थांबणे.
**निरोध-धम्म**–(वि.) निरोध स्वभाव, नैसर्गिक निरोध.
**निरोध-समापत्ति**–(स्त्री.) विज्ञानाच्या विरुद्ध होण्याची स्थिती, विज्ञानास विरोध अवस्था.
**निरोधेति**–(क्रि.) पुनरुत्पती थांबविणे.
**निरोधेसि**–(पू. क्रि.) पुनरुत्पत्ति थांबविली.
**निरोधित**–(कृ.) पुनरुत्पत्ति थांबविताना.
**निरोधत्वा**–(पू. क्रि.) पुनरुत्पत्ति थांबवून.
**निलय**–(पु.) घर, निवास, निवास-स्थान, आलय, गृह.
**निलीयति**–(क्रि.) दडणे, लपणे.
**निलीयि**–(पू. क्रि.) दडले, लपले.
**निलीन**–(कृ.) दडताना, लपताना.
**निलीयित्वा**–(पू. क्रि.) दडून, लपून.
**निल्लज्ज**–(वि.) निर्लज्ज, बेशरम, लाज नसलेला, उद्धट.
**निल्लेहक**–(वि.) चाटणारा.
**निल्लोप**–(पु.) लूट, डाका, चोरी.
**निवत्त**–(कृ.) निवृत्त, थांबलेला, परावृत्त झालेला, मागे फिरलेला.
**निवत्तति**–(क्रि.) थांबणे, परत फिरणे, मागे येणे, निवृत्त होणे.
**निवत्ति**–(पू. क्रि.) थांबला, परतला, मागे आला, निवृत्त झाला.
**निवत्तन्त**–(कृ.) थांबताना, परतताना, मागे येताना.
**निवत्तित्वा**–(पू क्रि.) थांबून, परतून, मागे येऊन, निवृत्त होऊन.
**निवत्तितुं**–(कृ.) थांबण्यासाठी, परतण्यासाठी, मागे येण्यास, निवृत्त होण्यास.
**निवत्तन**–(नपु.) निवर्तन, थांबणे, मागे येणे.
**निवत्ति**–(स्त्री.) निवृत्ति, थांबणे, मागे फिरणे, निवृत्त होणे.
**निवत्तेत्ति**–(क्रि.) थांबणे, परत फिरणे, मागे येणे.
**निवत्तेसि**–(पू. क्रि.) थांबला, परत फिरला, मागे आला.
**निवत्तित**–(कृ.) थांबताना, परत फिरताना, मागे येताना.
**निवत्तेन्त**–(कृ.) थांबण्यायोग्य, परत फिरण्यायोग्य, मागे येण्यायोग्य.
**निवत्तेत्वा**–(पू. क्रि.) थांबून, परत फिरून, मागे येऊन.
**निवत्थ**–(कृ.) वस्त्र परिधान करता, कपडे घालताना.
**निवसति**–(क्रि.) राहणे, वसणे, वास करणे.
**निवसि**–(पू. क्रि.) राहिला, वसला, वास केला.
**निवुत्थ**–(कृ.) राहताना, वसताना, वास करताना.
**निवसन्त**–(कृ.) राहण्यायोग्य, वसण्यायोग्य, वास करण्यायोग्य.

**निवसित्त्वा**–(पू. क्रि.) राहून, वसून, वास करून.
**निवह**–(पु.) साठा, संग्रह, संचय, ढीग.
**निवातक**–(नपु.) सुरक्षित स्थान, निर्भय ठिकाण, बिनधोक जागा.
**निवात वुत्ति**–(वि.) विनम्र, अति लीन.
**निवाप**–(पु.) जनावरांचे खाद्य, भरडा, श्राद्ध.
**निवारण**–(नपु.) थांबविणे, संपविणे, दूर करणे.
**निवारीय**–(वि.) थांबविण्यासारखे, संपविणे योग्य, दूर करण्यासारखे.
**निवारेति**–(क्रि.) थांबविणे, संपविणे, दूर करणे.
**निवारेसि**–(पू. क्रि.) थांबविले, संपविले, दूर केले, निवारण केले.
**निवारित**–(कृ.) थांबविताना, संपविताना, दूर करताना, निवारण करताना.
**निवारेत्वा**–(पू. क्रि.) थांबवून, संपवून, दूर करून, निवारण करून.
**निवारेतु**–(पु.) थांबविणारा, दूर करणारा, निवारण करणारा.
**निवास**–(पु.) राहणे, राहण्याची जागा, घर.
**निवास-भूमी**–(स्त्री.) राहण्याची जागा, राहण्याचे ठिकाण.
**निवासन**–(नपु.) आंतरवस्त्र, आत घालण्याचे कापड, राहण्याची जागा.
**निवासिक**–(पु.) राहणारा.
**निवासेत्ति**–(क्रि.) कपडे घालणे, पोषाख करणे.
**निवासेसि**–(पू. क्रि.) कपडे घातले, पोषाख केला.
**निवासित**–(कृ.) कपडे घालताना, पोषाख करताना.
**निवत्थ**–(कृ.) [पहा निवासित].
**निवासेन्त**–(कृ.) [पहा-निवासित].
**निवासित्त्वा**–(पू. क्रि.) कपडे घालून, पोषाख करून.
**निविट्ठ**–(कृ.) थांबलेला, स्थिर झालेला.
**निविसति**–(क्रि.) घुसणे, थांबणे.
**निवुत्त**–(कृ.) घेरला, गेला, वेढा घातला.
**निवुत्थ**–(कृ.) राहिलेला.
**निवेदक**–(पु.) सांगणारा, निवेदन करणारा.
**निवेदेति**–(क्रि.) सांगणे, निवेदन करणे.
**निवेदेसि**–(पू. क्रि.) सांगितले, निवेदन केले.
**निवेदित**–(कृ.) सांगताना, निवेदन करताना.
**निवेदित्त्वा**–(पू. क्रि.) सांगून, निवेदन करून.
**निवेदिय**–(कृ.) सांगण्यालायक, निवेदन करण्यायोग्य.
**निवेस**–(पु.) राहणे, राहण्याची जागा, घुसणे, थांबणे.
**निवेसन**–(नपु.) घर, गृह, घुसणे, राहणे.
**निवेसेति**–(क्रि.) स्थापन करणे, घुसणे, कायम करणे.
**निवेसेसि**–(पू. क्रि.) स्थापले, घुसले, कायम केले.
**निवेसित**–(कृ.) स्थापताना, घुसताना, कायम करताना.
**निवेसित्त्वा**–(पू. क्रि.) स्थापून, घुसून, कायम करून.
**निसग्ग**–(पु.) निसर्ग, प्रकृति, देणे.
**निसज्ज**–(पू. क्रि.) बसून, ठाण मांडून.
**निसज्जा**–(स्त्री.) बसणे, बसण्याची संधी, बसण्याची जागा, बैठक.
**निसद**–(पु.) जाते, चक्की, जात्याची खालची तळी.
**निसद-पोत**–(पु.) जात्याची वरची तळी.
**निसभ**–(पु.) वृषभ, बैल.
**निसम्म**–(पू. क्रि., क्रि. वि.) विचार करून.
**निसम्मकारी**–(वि.) विचारी, विचार करणारा.
**निसा**–(स्त्री.) रात्र, निशा.
**निसाकर**–(पु.) चंद्र, चांदोबा.
**निसाण**–(पु.) सानेचा दगड, सानेचे चाक, चोळण्याचा दगड, शिळी, हत्यार घासण्याचा दगड, धार लावण्याचा दगड.
**निसाद**–(पु.) सात स्वरांपैकी, एक स्वर, अनार्य, चोर, डाकू, निषाद.
**निसानाथ**–(पु.) चंद्र, शशी.
**निसामक**–(वि.) द्रष्टा, दर्शक, परीक्षण करणारा, पाहणारा, लक्षपूर्वक ऐकणारा.
**निसामन**–(नपु.) पाहणे, ऐकणे.
**निसामेति**–(क्रि.) ऐकणे.
**निसामेसि**–(पू. क्रि.) ऐकले.
**निसामित**–(कृ.) ऐकताना, ऐकत असता.
**निसामेन्त**–(कृ.) ऐकण्यासारखे, ऐकण्यायोग्य.
**निसामेत्वा**–(पू. क्रि.) ऐकून, श्रवण करून.
**निसित**–(वि.) तेज, प्रकाश.
**निसिन्न**–(कृ.) बसलेला, बसताना.
**निसिन्नक**–(वि.) बसलेला, बसणारा.
**निसीथ**–(पु.) मध्यरात्र.
**निसीदति**–(क्रि.) बसणे.
**निसीदि**–(पू. क्रि.) बसले, बैठक मारली.
**निसीदितब्ब**–(कृ.) बसण्यायोग्य.
**निसीदित्वा**–(पू. क्रि.) बसून, बैठक मारून, आसन ठोकून.
**निसीदिय**–(कृ.) बसताना.

**निसीदन**–(नपु.) बैठक, बस्कर, बसण्यासाठी अंथरलेली चटई, सतरंजी, आसन.
**निसीदापन**–(नपु) बसणे.
**निसीदापेति**–(क्रि.) बसणे, आसनस्थ होणे, बसविणे.
**निसीदापेसि**–(पू. क्रि.) बसला, ली, ले.
**निसीदापित**–(कृ.) बसताना.
**निसीदापेत्त्वा**–(पू. क्रि.) बसून.
**निसूदन**–(नपु) हत्या करणे, ठार मारणे, हिंसा करणे.
**निसेध**–(पु.) थांबविणे, संपविणे.
**निसेधक**–(वि.) निषेध करणारा, थांबविणारा.
**निसेधेति**–(क्रि.) निषेध करणे, थांबविणे.
**निसेधेसि**–(पू. क्रि.) थांबविला, निषेध केला.
**निसेधित**–(कृ.) थांबविताना, निषेध करताना.
**निसेधेन्त**–(कृ.) थांबविण्यायोग्य, निषेध करण्यासारखा.
**निसेधेत्त्वा**–(पू. क्रि.) थांबवून, निषेध करून.
**निसेवति**–(क्रि.) संगती करणे, मैत्री करणे, दोस्ती करणे.
**निसेवि**–(पू. क्रि.) संगत केली, मैत्री केली, दोस्ती केली.
**निसेवित**–(कृ.) संगत करताना, मैत्री करताना, दोस्ती करताना.
**निसेवित्त्वा**–(पू. क्रि.) संगत करून, मैत्री करून, दोस्ती करून.
**निसेवन**–(नपु.) संगत करणे, उपयोग करून घेणे, वापरणे, सराव करणे, सवय करणे, परिपाठ करणे.
**निस्सङ्ग**–(पु.) परित्याग, सर्वस्वाचा त्याग, सर्व सोडणे.
**निस्सग्गिय**–(वि.) परित्याग करण्यायोग्य, सर्वस्वाचा त्याग करणे योग्य.
**निस्सङ्ग**–(वि.) सोबत नसलेला, त्याग केलेला, सर्व सोडून दिलेला.
**निस्सज्जति**–(क्रि.) त्याग करणे, सोडून देणे, सैल करणे.
**निस्सज्जि**–(पू. क्रि.) त्यागले, सोडले, सैल केले.
**निस्सट्ठ**–(कृ.) त्यागताना, सोडताना, सैल करताना.
**निस्सज्ज**–(कृ.) त्यागण्यायोग्य, सोडण्यासारखे, सैल करण्यायोग्य.
**निस्सज्जित्त्वा**–(पू. क्रि.) त्यागून, त्यजून, सोडून, सैल करून.
**निस्सट्ठ**–(कृ.) बाहेर निघालेला, सोडून दिलेला टाकलेला, परित्यक्त.
**निस्सत्त**–(वि.) सत्त्व नसलेला, निसत्त्व.
**निःस्सद्द**–(वि.) निःशब्द, शांत, न बोलता, अबोल.
**निस्सन्द**–(पु.) परिणाम, शेवट, पाझरणे.
**निस्सय**–(पु.) आश्रय, आधार, संरक्षण, सांभाळ.
**निस्सयति**–(क्रि.) आश्रम घेणे, मदत घेणे, आधार घेणे.
**निस्सरण**–(नपु.) जाणे, सोडून जाणे, बाहेर जाणे, निघून जाणे, निरोप घेणे.
**निस्सरति**–(क्रि.) जाणे, निरोप घेणे, सोडणे.
**निस्सरि**–(पू. क्रि.) गेला, निरोप घेतला, सोडले, सोडला.
**निस्सट**–(कृ.) जात असता, निरोप घेताना, सोडताना.
**निसरित्त्वा**–(पू. क्रि.) जाऊन, निरोप घेऊन, सोडून.
**निस्साय**–(अ.) त्यामुळे, त्याद्वारे, त्यायोगे, त्यास्तव.
**निस्सार**–(वि.) सार नसलेले, अर्थ नसलेले, निसत्त्व, रसहीन.
**निस्सारज्ज**–(वि.) विश्वस्त, निश्चयाने, खात्रीने.
**निस्सारण**–(नपु.) बाहेर सारणे, बाहेर ढकलणे, बाहेर काढणे.
**निस्साव**–(पु.) भाताची पेज, भाताचा सार.
**निस्सित**–(कृ.) आश्रित, आश्रयास असलेला.
**निस्सितक**–(वि.) आश्रित, अनुयायी, शिष्य.
**निस्सिरीक**–(वि.) दुर्भागी, दुर्दैवी, दुःखी, दरिद्री, पीडित.
**निस्सेणि-निस्सेणी**–(स्त्री) शिडी, पायऱ्या.
**निस्सेस**–(वि.) संपूर्ण, काही न राहता, निःशेष.
**निस्सेसं**–(वि.) पूर्ण रुपाने, पूर्णत्वाने, परिपूर्ण, निःशेष.
**निस्सोक**–(वि.) शोक रहित, दुःख रहित, निःशोक.
**निहत**–(कृ.) निरहंकारी, मान-मर्यादा संपलेला.
**निहतमान**–(वि.) विनम्र, लीन.
**निहनति**–(क्रि.) ठार मारणे, हिंसा करणे, जिवे मारणे.
**निहनि**–(पू. क्रि.) ठार मारले, हिंसा केली, जिवे मारले.
**निहंत्त्वा**–(पू. क्रि.) ठार मारून, हिंसा करून, जिवे मारून.
**निहीन**–(वि.) नीच, हलका, तुच्छ, थोडा, कमी, महत्त्व नसलेला.
**निहीन-कम्म**–(नपु.) नीच कर्म, पाप कर्म, कृष्ण कृत्य.
**निहीन-पञ्ञ**–(वि.) दुर्बुद्धी, वाईट विचार, दुष्ट बुद्धी, पापी बुद्धी.
**निहीन-सेवी**–(वि.) कुसंगतीत राहणारा, दुर्जनात वावरणारा.
**निहीयति**–(क्रि.) नाश होणे, नष्ट होणे, संपणे.

**निहिय**–(पू. क्रि.) नाश झाला, नष्ट झाला, संपला.
**निहीन**–(कृ.) नाश होताना, नष्ट होताना, संपताना.
**निहीयमान**–(कृ.) नाश होण्यायोग्य, नष्ट होण्यालायक, संपण्यालायक.
**नीघ**–(पु.) दुःख, अव्यवस्था, दुरावस्था.
**नीच**–(वि.) कमी प्रतीचा, कमी योग्यतेचा, निकृष्ट, कमी प्रतीचा.
**नीच-कुल**–(नपु.) नीच जात, हलकी जात, नीच कुल, नीच.
**नीचकुलीनता**–(स्त्री.) नीच भावना, नीच कुळात जन्मलेली अवस्था.
**नीचासन**–(नपु.) खालची जागा, नीच आसन.
**नीत**–(कृ.) घेऊन गेला.
**नीतत्थ**–(पु.) मानलेला अर्थ, अनुमानित अर्थ.
**नीति**–(स्त्री.) कायदा, नियम, मार्ग-दर्शन, नीती.
**नीति-सत्थ**–(नपु) नीतिशास्त्र.
**नीप**–(पु.) कदम्बवृक्ष.
**नीयति**–(क्रि.) घेऊन जाता येणे, घेऊन जाणे.
**नीयाति**–[पहा–निय्याति].
**नीर**–(नपु.) पाणी, जल, उदक.
**नील**–(वि.) निळा, निळा रंग.
**नील-कसिण**–(नपु.) ध्यान धारणेसाठी, निळे वर्तुळ.
**नील-गीव**–(नपु.) मोर, नील, ग्रीवा, निळ्या गळ्याचा मोर.
**नील-मणि**–(पु.) नीलम, इंद्रनील, निळामणी.
**नील-वण्ण**–(वि.) नीलवर्ण, निळ्या रंगाचा.
**नील-वल्ली**–(स्त्री.) निळ्या रंगाची वेली.
**नील-सप्प**–(पु.) निळा साप.
**नीलिनी, नीली**–(स्त्री.) निळीचे रोप, निळीचे झाड.
**नीलुप्पल**–(नपु.) नील-कमल, निळे कमळ.
**नीवरण**–(नपु.) बाधा, अडथळा, संकट.
**नीवार**–(पु.) धान्य.
**नीहट**–(कृ.) बाहेर निघालेला, बाहेर निघत असलेला.
**नीहरण**–(नपु) बाहेर काढणे.
**नीहरति**–(क्रि.) बाहेर नेणे, बाहेर काढणे.
**निहरि**–(पू. क्रि.) बाहेर नेले, बाहेर काढले.
**निहरन्त**–(कृ.) बाहेर नेण्यायोग्य, बाहेर काढण्यालायक.
**निहरित्त्वा**–(पू. क्रि.) बाहेर नेऊन, बाहेर काढून.
**नीहार**–(पु.) पथ, मार्ग, रस्ता, बाहेर काढणे.
**नीहित**–(कृ.) व्यवस्थित, ठेवलेला.
**नील**–(नपु) घरटे, कोटे, पक्षांचे घर.
**नीलज**–(पु.) पक्षी, खग.
**नुद**–(वि.) बाहेर काढून टाकणारा, दूर टाकणारा, फेकणारा.
**नुदक**–[पहा–नुद].
**नुदति**–(क्रि.) दूर घालविणे, पळविणे, पळवून लावणे.
**नुदि**–(पू. क्रि.) दूर घालविले, पळविले, पळवून लावले.
**नुदित्वा**–(पू. क्रि.) दूर घालवून, पळवून, पळवून लावून, पिटाळून.
**नुन्न**–(कृ.) हाकून दिलेला, पिटाळलेला, पळवून लावलेला.
**नूतन**–(वि.) नवा, नवीन, नूतन.
**नून**–(अ.) निश्चयाने, ठामपणे, खरोखर.
**नूपुर**–(नपु) पैंजण, स्त्रियांच्या पायांतील दागिना.
**नूही**–(स्त्री.) शेंड, ज्याचा चीक दुधासारखा असतो.
**नेक**–(वि.) अनेक, बहुत, पुष्कळ, अधिक.
**नेकाकार**–(वि.) अनेक प्रकारचा, विविध, पुष्कळ, अनेक आकाराचा.
**नेकतिक**–(पु.) ठग.
**नेकतिक**–(वि.) ठकविणारा, फसविणारा, लुबाडणारा.
**नेकायिक**–(वि.) सुत्तपिटकाच्या पांची निकायांचा (विभागांचा) जाणकार,
**नेक्ख**–(नपु) सुवर्णमुद्रा, सोन्याचे नाणे, निकष.
**नेक्खम्म**–(नपु) संसार त्याग, जगाचा त्याग.
**नेक्खम्म-वितक्क**–(नपु) अभिनिष्क्रमणासंबंधी विचार, संसार त्यागाविषयी विचार, समाधि घेण्याचा विचार.
**नेक्खम-सङ्कप्प**–(पु.) अभिनिष्क्रमणाचा संकल्प, समाधि घेण्याचा संकल्प, देह ठेवण्याचा संकल्प.
**नेक्खम-सुख**–(नपु) अभिनिष्क्रमणाचे सुख, समाधि घेण्याचे सुख, देह त्यागण्याचे सुख.
**नेगम**–(वि.) निगमासंबंधी, वेदासंबंधी.
**नेगम**–(पु.) वेद, निश्चय, मार्ग, वेद-सभा, वेदांत रमणारा.
**नेति**–(क्रि.) नेणे, घेऊन जाणे.
**नेसि**–(पू. क्रि.) नेले, घेऊन गेला.
**नीत**–(कृ.) नेण्यायोग्य, घेऊन जाण्यायोग्य.
**नेन्त**–(कृ.) नेण्यायोग्य, घेऊन जाण्यायोग्य.
**नेतब्ब**–(कृ.) नेण्यासाठी, घेऊन जाण्याकरिता.
**नेत्वा**–(पू. क्रि.) नेऊन, घेऊन जाऊन.
**नेतु**–(पु.) नेता, पुढारी.

**नेत्त**–(पु.) मार्गदर्शक, दिग्दर्शक.
**नेत्त**–(नपु) डोळा, नेत्र, नयन, अक्ष, चक्षु.
**नेत्ततारा**–(स्त्री.) नक्षत्रतारा, आशेचा किरण.
**नेत्ति**–(स्त्री.) तृष्णा, हाव.
**नेत्तिक**–(पु.) शेतांत पाण्याचा पाट करणारा.
**नेत्तिंस**–(पु.) खड्ग, तलवार.
**नेपक्क**–(नपु) बुद्धिमत्ता, समज, ज्ञान, हुषारी, चातुर्य.
**नेपच्छ**–(नपु) नेसण्याचे, घालण्याचे, वापरण्याचे.
**नेपुञ्ञ**–(नपु) निपुणता, दक्षता, तत्परता, हुषारी.
**नेमि**–(स्त्री.) चाकाची धाव.
**नेमित्तिक**–(पु.) ज्योतिषि, भविष्यवादी.
**नेमिंधर**–(पु.) पर्वत, डोंगर.
**नेय्य**–(वि.) नेलेले, घेऊन गेलेले.
**नेरञ्जरा**–(स्त्री., विशे. ना.) बुद्धत्व प्राप्तीनंतर भगवान बुद्ध याच नदीकाठी होते. नैरंजनानदी.
**नेरयिक**–(वि.) नरकांत उत्पत्ती, पापातून उत्पन्न.
**नेरु**–(पु.) मेरू पर्वत, सर्वाधिक उंच पर्वत.
**नेरु जातक**–सोनेरी रंगाचा मेरू पर्वत पाहिल्यावर कोणीही त्याच्या स्वर्णकांतिने मोहित होऊन जवळच असलेल्या सोनेरी रंगाच्या राजहंसाकडे ढुंकूनही न पाहिल्याची कथा–(३७९).
**नेवासिक**–(पु.) राहणारा, निवासी.
**नेसज्जिक**–(वि.) बसून राहणारा.
**नेसाद**–(पु.) निषाद, शिकारी, [पहा–निसाद].
**नो**–(अ.) नाही, न, नच.
**नोनीत**–(नपु.) नवनीत, लोणी.
**न्यास**–(पु.) अनामत.
**न्हात**–[पहा–नहात].
**न्हान**–[पहा–नहात].
**न्हारु**–[पहा–नहारु].

## प

**प**–नागरी लिपीच्या वर्णमालेतील "प" वर्गातील पहिले अक्षर.
**पसु**–(पु.) धूळ.
**पकट्ठ**–(वि.) अतिश्रेष्ठ, सर्वश्रेष्ठ, थोर.
**पकत**–(वि.) कृत, निर्मित.
**पकतत्त**–(वि.) सदाचारी, सद्वर्तनी, सद्शील, सद्गुणी.
**पकति**–(स्त्री.) प्राकृतिक, नैसर्गिक, मूळरुप, स्वाभाविक, मूळस्थिती.
**पकति-गमन**–(नपु.) स्वाभाविक चाल, नैसर्गिक चाल, प्राकृतिक चाल.
**पकति-चित्त**–(नपु.) स्वाभाविक चित्त, स्वाभाविक मन, प्राकृतिक चित्त.
**पकति-चित्त**–(वि.) प्राकृतिक मनाचा, स्वाभाविक चित्ताचा.
**पकति-सील**–(नपु.) प्राकृतिक वर्तन, स्वाभाविक वागणे.
**पकतिक**–(वि.) प्राकृतिक, स्वाभाविक, नैसर्गिक.
**पकतिज**–(पु., नपु.) प्राकृतिक उत्पत्ति, नैसर्गिक निपज, स्वाभाविक जन्म.
**पकप्पना**–(स्त्री.) तर्क, अंदाज, योजना, नियोजन, व्यवस्था.
**पकप्पेति**–(क्रि.) विचार करणे, योजना बनविणे, नियोजन करणे, व्यवस्था करणे.
**पकप्पेसि**–(पू. क्रि.) विचार केला, योजना केली, नियोजन केले, व्यवस्था केली.
**पकप्पित**–(कृ.) विचार करता, योजना करता, नियोजन करता व्यवस्था करताना.
**पकप्पेत्वा**–(पू. क्रि.) विचार करून, योजना करून, नियोजन करून, व्यवस्था करून.
**पकम्पति**–(क्रि.) कापणे, थरथरणे, थरकाप होणे.
**पकम्पि**–(पू. क्रि.) भीतीने कापला, थरथरला, थरकाप झाला.
**पकम्पित**–(कृ.) कापताना, थरारताना, थरकाप होताना.
**पकम्पन**–(कृ.) [पहा–प्रकमित].
**पकरण**–(नपु.) अवसर, वेळ, संधी, साहित्यिक, कृति, व्याख्या.
**पकार**–(पु.) प्रकार, तऱ्हा, पद्धति, ढंग.
**पकास**–(पु.) प्रकाश, चमक, तेज, कथन, व्याख्या, सांगणे.
**पकासक**–(पु.) प्रकाशक, जाहीर करणारा, प्रसिद्ध करणारा, व्याख्या करणारा, सांगणारा.
**पकासति**–(क्रि.) प्रकाशित होणे, प्रसिद्ध होणे, प्रकट होणे.
**पकासि**–(पू. क्रि.) प्रकाशित झाले, प्रसिद्ध झाले, प्रकट झाले.
**पकासित**–(कृ.) प्रकाशित होताना, प्रसिद्ध होताना. प्रकट होताना.
**पकासेत्वा**–(पू. क्रि.) प्रकाशित होऊन, प्रकाशून, प्रसिद्ध होऊन, प्रकट होऊन.
**पकासन**–(नपु.) प्रकाशन, प्रसिद्ध, प्रकट, जाहीर.

पकासेति–(क्रि.) प्रकाशन करणे, प्रसिद्ध करणे, प्रकट करणे.
पकासेसि–(पू. क्रि.) प्रकाशन केले, प्रसिद्ध केले, प्रकट केले.
पकासित–(कृ.) प्रकाशन करताना, प्रसिद्ध करताना, प्रकट करताना.
पकासेन्त–(कृ.) प्रकाशन करत असता, प्रसिद्ध करत असता, प्रकट करत असता.
पकासेत्त्वा–(पू. क्रि.) प्रकाशन करून, प्रसिद्ध करून, प्रकट करून.
पकिण्णक–(वि.) प्रकीर्ण, अवघड, कठीण, विसकटलेला, पसरलेला.
पकित्तेति–(क्रि.) प्रशंसा करणे, वहावा करणे, व्याख्या करणे, स्तुती करणे.
पकित्तेसि–(पू. क्रि.) प्रशंसा केली, वहावा केली, व्याख्या केली, स्तुती केली.
पकित्तित–(कृ.) प्रशंसा करताना, वहावा करताना, व्याख्या करताना.
पकित्तेन्त–(कृ.) प्रशंसा करत असता, वहावा करत असता, व्याख्या करत असता.
पकित्तेत्त्वा–(पू. क्रि.) प्रशंसा करून, वहावा करून, व्याख्या करून, अर्थ सांगून.
पकिरति–(क्रि.) पसरणे, विसकटणे, पाडणे.
पकिरि–(पू. क्रि) पसरले, विसकटले, पाडले.
पकिण्ण–(कृ.) प्रकीर्ण अवघड, पसरला, विसकटला.
पकुध-कच्चायन–(पु.) प्रकुध-कात्यायन, भगवान बुद्धाच्या समकालीन सहा तैर्थिक सांप्रदाया पैकी एका सांप्रदायाचा प्रमुख.
पकुप्पति–(क्रि.) क्रोधित होणे, रागावणे.
पकुब्बति–(क्रि.) करणे.
पकुब्बमान–(कृ.) करत असता, करणारा, करणारी, करणारे.
पकोटि–(स्त्री.) कोटि संख्येची एककोट पट, १०,००,००,००,००,००,००,००,००००
पकोट्ठन्त–(पु.) मनगट.
पकोप–(पु.) प्रकोप, क्रोध, राग, विद्वेष, विद्रोह.
पकोपन–(नपु.) प्रकोपण, क्रोधित करणे, रागावणे.
पक्क–(कृ.) पिकलेला, शिजविलेला.
पक्क–(वि.) पिकलेले फळ.
पक्कट्ठित–(कृ.) फार शिजविलेला.
पक्कम–(पु.) आरंभ, चालू, सुरुवात.



पक्कमन–(नपु.) निरोप घेणे.
पक्कमति–(क्रि.) निरोप घेणे, निघून जाणे.
पक्कमि–(पू. क्रि.) निरोप घेतला, निघून गेला.
पक्कन्त–(कृ.) निरोप घेताना, निघून जाताना.
पक्कमन्त–(कृ.) निरोप घेणे उचित, निघून जाणे योग्य.
पक्कमित्त्वा–(पू. क्रि.) निरोप घेऊन, निघून जाऊन.
पक्काभि–(कृ.) निघून गेला, निरोप घेतला.
पक्कोसति–(क्रि.) बोलावणे, हाक मारणे.
पक्कोसि–(पू. क्रि.) बोलाविले, हाक मारली.
पक्कोसित–(कृ.) बोलाविताना, हाक मारताना.
पक्कोसित्त्वा–(पू. क्रि.) बोलावून, हाक मारून.
पक्कोसन–(नपु.) हाक, संबोधन.
पक्कोसना–(स्त्री.) हांक, संबोधन.
पक्ख–(पु.) पक्ष, बाजू, पैलू, पंधरावडा (शुक्ल–कृष्ण पक्ष).
पक्ख–(वि.) स्पष्ट दिसणारा, संबंधित.
पक्ख–(पु., वि.) लंगडा मनुष्य.
पक्खन्दति–(क्रि.) उडी मारणे.
पक्खन्दि–(पू. क्रि.) उडी मारली.
पक्खन्त–(कृ.) उडी मारताना.
पक्खन्दित्त्वा–(पू. क्रि.) उडी मारून.
पक्खन्दन–(नपु.) उडी मारणे, पाठलाग करणे.
पक्खन्दिका–(स्त्री.) अतिसार, जुलाब, आंव पडणे, हगवण.
पक्खन्दि–(पु.) उडी मारणारा, पाठलाग करणारा.
पक्ख-बिलाल–(पु.) पाकोळी, वटवाघूळ.
पक्खलति–(क्रि.) धुणे, स्वच्छ करणे, लडखडणे.
पक्खलि–(पू. क्रि.) धुतले, स्वच्छ केले, लडखडले.
पक्खलित–(कृ.) धुताना, स्वच्छ करताना, लडखडताना.
पक्खलित्त्वा–(पू. क्रि.) धुऊन, स्वच्छ करून, लडखडून.
पक्खलन–(नपु.) धुणे, स्वच्छ करणे, लडखडणे.
पक्खालेति–(क्रि.) धुणे, स्वच्छ करणे, धुऊन घेणे, स्वच्छ करून घेणे.
पक्खालेसि–(पू. क्रि.) धुऊन घेतले, स्वच्छ करून घेतले.
पक्खालित–(कृ.) धुऊन घेताना, स्वच्छ करून घेताना.
पक्खालेत्त्वा–(पू. क्रि.) धुऊन घेऊन, स्वच्छ करून घेऊन.
पक्खिक–(वि.) पाक्षिक, पंधरा दिवसानी प्रसिद्ध होणारे.
पक्खिक-भत्त–(नपु.) पंधरावड्यांतून एकवेळ दिले जाणारे भोजन.

पक्खित्त–(कृ.) प्रक्षिप्त, फेकलेला, टाकलेला.
पक्खिपति–(क्रि.) प्रक्षेपित करणे, फेकणे, टाकणे.
पक्खिपि–(पू. क्रि.) प्रक्षेपित केले, फेकले, टाकले.
पक्खिपन्त–(कृ.) प्रक्षेपित करताना, फेकताना, टाकलेले
पक्खिपित्त्वा–(पू. क्रि.) प्रक्षेपित करून, फेकून, टाकून.
पक्खिपन–(नपु.) प्रक्षेपण, फेकणे.
पक्खि-भेद–(पु.) पक्षांचा प्रकार, पक्षांचे प्रकार, पक्षी-भेद.
पक्खिय–[पहा-पक्खिक].
पक्खि–(पु.) पक्षी, पक्षाचा, बाजूचा, मताचा, विचाराचा.
पक्खेप–(पु.) [पहा–पक्खिपन].
पखुम–(नपु.) पापणीचा केस.
पगब्भ–(वि.) प्रगल्भ–थोर साहसी, दु:साहसी.
पगाळ्ह–(कृ.) बुडलेला, बुडत असलेला.
पगाहति–(क्रि.) डुबकी मारणे, बुडणे.
पगाहि–(पू. क्रि.) डुबकी मारली, बुडला.
पगाहन्त–(कृ.) डुबकी मारताना, बुडताना.
पगाहित्त्वा–(पू. क्रि.) डुबकी मारून, बुडून.
पगिद्ध–(कृ.) अत्यंत लोभ करणारा, अति लोभी, अति स्वार्थी, कंजूस, आधाशी.
पगुण–(वि.) अभ्यासू, परिपूर्ण ज्ञान असलेला.
पगुणता–(स्त्री.) दक्षता, तत्परता.
पगुम्ब–(पु.) झाडी.
पगेव–(अ.) वेळेपूर्वी, अगोदर, काय सांगावे!
पग्गण्हाति–(क्रि.) ग्रहण करणे, धारण करणे, अनुमोदन देणे.
पग्गण्हि–(पू. क्रि.) ग्रहण केले, धारण केले, अनुमोदन दिले.
पग्गण्हन्त–(कृ.) ग्रहण करताना, धारण करताना, अनुमोदन देताना.
पग्गहेत्त्वा–(पू. क्रि.) ग्रहण करून, धारण करून, अनुमोदन देऊन.
पग्गय्ह–(पू. क्रि.) [पहा–पग्गहेत्त्वा].
पग्गहेतब्ब–(कृ.) ग्रहणीय, धारण करण्यायोग्य, अनुमोदन करण्यायोग्य.
पग्गह–(पु.) प्रयत्न, सामर्थ्य, शक्ती, बल, उचलणे, धरणे, अनुमोदन देणे.
पग्गहण–(नपु.) ग्रहण करणे, अनुमोदन देणे.
पग्गाहित–(कृ.) गृहित, धरलेला, पकडलेला.
पग्गाह–(पु.) पराक्रम, उत्साह.

पग्घरण–(नपु.) पाझरणे, वाहणे, झरणे.
पग्घरणक–(वि.) पाझरणारा, वाहणारा, झरणारा.
पग्घरति–(क्रि.) पाझरणे, वाहणे, झरणे.
पघण–(पु.) घरासमोरची ओसरी, आगाशी, गच्ची.
पधाण–(पु.) सोपा, ओसरी.
पङ्क–(पु.) चिखल, गारा, मैला.
पङ्कज–(नपु.) कमळ.
पङ्केरुह–[पहा–पङ्कज].
पङ्गु–(वि.) लंगडा, पांगळा.
पङ्गुल–[पहा–पङ्गुल].
पचति–(क्रि.) शिजविणे.
पचि–(पू. क्रि.) शिजविले.
पचित–(कृ.) शिजविलेले.
पक्क–(कृ.) शिजलेले.
पचन्त–(कृ.) शिजविताना.
पचितब्ब–(कृ.) शिजविण्यायोग्य, शिजविण्यासारखे.
पचित्त्वा–(पू. क्रि.) शिजवून.
पचन–(नपु.) शिजविणे.
पचरति–(क्रि.) अभ्यास करणे, पाहणे, चालणे, निघून जाणे.
पचरि–(पू. क्रि.) निघून गेला.
पचलायति–(क्रि.) पेंगणे, डुलकी घेणे.
पचलायिका–(स्त्री.) झोप, निद्रा.
पचा–(स्त्री.) शिजणे, पचणे.
पचापेति–(क्रि.) शिजविणे, पचविणे.
पचापेसि–(पू. क्रि.) शिजविले, पचविले.
पचापेत्त्वा–(पू. क्रि.) शिजवून, पचवून.
पचारक–(पु.) प्रचारक, विज्ञापक, प्रसार करणारा.
पचारेति–(क्रि.) प्रचार करणे, जाणे.
पचालक–(वि.) झुलता, हालता, डोलता.
पचालक–(क्रि. वि.) झुलताना, हालताना, डोलताना.
पचिनति–(क्रि.) टिपणे, (मधमाशी फुलातील मध खाण्याची क्रिया).
पचिनाति–(क्रि.) [पहा–पचिनाति, वेचणे].
पचुर–(वि.) बहुत, पुष्कळ, नाना प्रकारचा, प्रचुर.
पच्चक्ख–(वि.) प्रत्यक्ष.
पच्चक्ख-कम्म–(नपु.) प्रत्यक्ष कार्य, प्रत्यक्ष कर्म, प्रत्यक्ष काम.
पच्चक्खाति–(क्रि.) निषेध करणे, प्रत्याख्यान करणे,
पच्चक्खासि–(पू. क्रि.) निषेध केला.
पच्चक्खात–(कृ.) निषेध करत असता.

**पच्चक्खाय**–(कृ.) निषेध करण्यासारखा, निषेध करून.

**पच्चक्खान**–(नपु.) निषेध, प्रत्याख्यान, नकार.

**पच्चग्घ**–(वि.) नवा, सुंदर, मौल्यवान, महाग, फार किंमतीचा.

**पच्चङ्ग**–(नपु.) प्रत्यांग.

**पच्चति**–(क्रि.) शिजविणे, कष्ट होणे.

**पच्चि**–(पू. क्रि.) शिजविले, कष्ट झाले.

**पच्चित्वा**–(पू. क्रि.) शिजवून, कष्ट होऊन.

**पच्चमान**–(कृ.) कष्ट होणारे, शिजणारे.

**पच्चत्त**–(वि.) पृथक, वेगळे, व्यक्तिगत.

**पच्चत्तं**–(क्रि. वि.) पृथक-पृथक, वेग-वेगळे.

**पच्चत्थरण**–(नपु.) अस्तर, आंतील वस्त्र, पलंगपोस.

**पच्चत्थिक**–(पु.) शत्रू, वैरी, विरोधक, विरोधी.

**पच्चन**–(नपु.) शिजणे, कष्ट होणे.

**पच्चनिक**–(वि.) उलटा, निषेधात्मक.

**पच्चनिक**–(पु.) शत्रू, वैरी, विरोधक, विरोधी.

**पच्चनुभवति**–(क्रि.) अनुभव मिळणे, घेणे.

**पच्चनुभवि**–(पू. क्रि.) अनुभव मिळाला, घेतला.

**पच्चनुभवित्त्वा**–(पू. क्रि.) अनुभव मिळवून, घेऊन.

**पच्चन्त**–(पु.) सीमा प्रदेश, सरहद्दीवरील भाग.

**पच्चन्त-जनपद**–(नपु.) मध्य प्रदेशाच्या सीमेबाहेरील प्रदेश.

**पच्चन्त-वासी**–(पु.) सीमेबाहेरील रहिवासी, खेडूत.

**पच्चन्त-विसय**–(पु.) सीमा प्रदेश, सरहद्द प्रान्त.

**पच्चन्तिम**–(वि.) फार दूरचा राहणारा.

**पच्चय**–(पु.) हेतु, कारण, उद्देश, आवश्यकता, साधन, आश्रय, प्रत्यय.

**पच्चयता**–(स्त्री.) उद्देश्यत्व, हेतुत्त्व, प्रत्ययता.

**पच्चयाकार**–(पु.) कारणांचा प्रकार.

**पच्चयुप्पन्न**–(वि.) कारणांनी उत्पन्न.

**पच्चयिक**–(वि.) विश्वसनीय, खात्रीशीर, खात्रीचा.

**पच्चरि**–(स्त्री.) देवी महापच्चरी, अस्तित्वात नसलेली अठकथा.

**पच्चवेक्खति**–(क्रि.) विचार करणे, विवेचन करणे.

**पच्चवेक्खि**–(पू. क्रि.) विचार केला, विवेचन केले.

**पच्चवेक्खित**–(कृ.) विचार करता, विवेचन करता.

**पच्चवेक्खित्वा**–(पू. क्रि.) विचार करून, विवेचन करून.

**पच्चवेक्खिय**–(कृ.) विचार करण्यायोग्य, विवेचनालायक.

**पच्चवेक्खना**–(स्त्री.) विचार, मत, विवेचन.

**पच्चस्सोसि**–(पू. क्रि.) आश्वासन दिले, वचन दिले.

**पच्चाकत**–(कृ.) परित्यक्त, सोडून दिलेले, टाकलेले, पराजित.

**पच्चाकोटित**–(कृ.) लग्नासाठी नटलेला, लग्न नुकतेच झालेला.

**पच्चागच्छति**–(क्रि.) मागे येणे, मागे हाटणे.

**पच्चागच्छि**–(पू. क्रि.) मागे आला, मागे हाटला.

**पच्चागत**–(कृ.) मागे येत असता, मागे हाटत असता.

**पच्चागन्त्वा**–(पू. क्रि.) मागे येऊन, मागे हाटून.

**पच्चागमन**–(नपु.) परत, मागे.

**पच्चाजायति**–(क्रि.) पुनर्जन्म घेणे.

**पच्चाजायि**–(पू. क्रि.) पुनर्जन्म झाला.

**पच्चाजात**–(कृ.) पुनर्जन्म घेताना.

**पच्चाजायित्त्वा**–(पू. क्रि.) पुनर्जन्म घेऊन.

**पच्चादेस**–(पु.) परत पाठविणे, अस्वीकार.

**पच्चामित्त**–(पु.) शत्रू, वैरी, विरोधक, विरोधी.

**पच्चासिसति**–(क्रि.) आशा करणे, इच्छा करणे, वाट पाहणे.

**पच्चाहरति**–(क्रि.) परत आणणे.

**पच्चाहरि**–(पू. क्रि.) परत आणले.

**पच्चाहट**–(कृ.) परत आणतांना, परत आणत असता.

**पच्चाहरित्त्वा**–(पू. क्रि.) परत आणून.

**पच्चाहार**–(पु.) सोंग, बहाणा, क्षमा, याचना.

**पच्चुग्गच्छति**–(क्रि.) स्वागत करण्यास जाणे, स्वागतास जाणे.

**पच्चुग्गन्त्वा**–(पू. क्रि.) स्वागत करण्यास जाऊन, सामोरे जाणे, स्वागतास जाऊन, सामोरे जाऊन.

**पच्चुग्गमन**–(नपु.) स्वागत करणे, सामोरे जाणे.

**पच्चुट्ठाति**–(क्रि.) स्वागत करण्यासाठी उभे राहणे.

**पच्चुट्ठासि**–(पू. क्रि.) स्वागतासाठी उभा राहिला.

**पच्चुट्ठित**–(कृ.) स्वागतासाठी उभे रहात असता.

**पच्चुट्ठाय**–(कृ.) स्वागतास उभे राहून.

**पच्चुट्ठान**–(नपु.) स्वागत, आदर, सत्कार, सन्मान.

**पच्चुपकार**–(पु.) प्रति उपकार, उपकाराची फेड.

**पच्चुपट्ठाति**–(क्रि.) सत्कारासाठी उभे राहणे, सेवेस हजर असणे.

**पच्चुपट्ठासि**–(पू. क्रि.) सत्कारास उभे राहिले, सेवेस हजर राहिले.

**पच्चुपट्ठित**–(कृ.) सत्कारास उभे राहताना, सेवेस हजर असताना.

**पच्चुपट्ठित्वा**–(पू. क्रि.) सत्कारास उभे राहून, सेवेस हजर राहून.

**पच्चुपट्ठान**–(नपु.) सत्कारास हजर, सेवेस हजर.

**पच्चुपट्ठापेति**–(क्रि.) समोर हजर करणे, पुढे आणणे, समोर आणणे.

**पच्चुपन्न**–(वि.) वर्तमान, सध्या.

**पच्चूस**–(पु.) फार लवकर सकाळी, भल्या पहाटे.

**पच्चूस-काल**–(पु.) प्रातं, काळ.

**पच्चूह**–(पु.) बाधा, अडथळा.

**प्रच्चेक**–(वि.) प्रत्येक, पृथक, वेगवेगळा.

**पच्चेक-बुद्ध**–(पु., वि.) बोधि-ज्ञान प्राप्त केले. परंतु त्याने ते ज्ञान इतरांस दिले नाही असा, बोधिचा उपदेश दुसऱ्यास दिला नाही, असा बुद्ध.

**पच्चेति**–(क्रि.) शेवटास जाणे, परिणामावर पोहोचणे, यशस्वी होणे.

**पच्चारोहति**–(क्रि.) खाली उतरणे, खाली येणे.

**पच्चारोहि**–(पू. क्रि.) खाली उतरला, खाली आला.

**पच्चोरुळह**–(कृ.) खाली उतरतांना, खाली येताना.

**पच्चारोहित्वा**–(पू. क्रि.) खाली उतरून, खाली येऊन.

**पच्चोरुव्ह**–(कृ.) खाली उतरण्यायोग्य, खाली येण्यालायक.

**पच्चोसक्कति**–(क्रि.) मागे येणे, परत फिरणे.

**पच्चोसक्कि**–(पू. क्रि.) मागे आला, परत फिरला.

**पच्चोसक्कित**–(कृ.) मागे येता, परत फिरता.

**पच्चोसक्कित्वा**–(पू. क्रि.) मागे येऊन, परत फिरून.

**पच्चोसक्कना**–(स्त्री.) परत, मागे.

**पच्छतो**–(अ.) मागून, परतून.

**पच्छन्न**–(कृ.) झाकला गेला.

**पच्छा**–(अ.) नंतर, मागे.

**पच्छा-जात**–(वि.) नंतर जन्मलेला, मागून पैदा झालेला.

**पच्छाताप**–(पु.) पश्चाताप, नंतर-मागून दुःख-मागून उत्पन्न झालेला.

**पच्छा-निपाती**–(पु.) नंतर झोपणारा.

**पच्छानुताप**–(पु.) पश्चाताप, नंतर-दुःख.

**पच्छाबन्ध**–(पु.) नावेचा दांडा, नौकेचा सुकाणु.

**पच्छा-बाहं**–(क्रि. वि.) मागे हात बांधलेला.

**पच्छा-भत्तं**–(क्रि. वि.) मध्यानीनंतर, दुपारनंतर.

**पच्छा-भत्तं**–(वि.) दुपारनंतरचे भोजन.

**पच्छा-भाग**–(पु.) मागचा भाग.

**पच्छाभाव**–(पु.) नंतरचा भाव, नंतरची भावना.

**पच्छा-समण**–(पु.) नंतर झालेला श्रमण-साधू.

**पच्छाद**–(पु.) रथाचा झोळ, रथाचा हौदा.

**पच्छानुतप्पति**–(क्रि.) पश्चाताप करणे.

**पच्छाया**–(स्त्री.) पडछाया, सावली.

**पच्छि**–(स्त्री.) हातातली टोपली-लहान बुट्टी.

**पच्छिज्जति**–(क्रि.) तासणे, फोडणे.

**पच्छिज्जि**–(पू. क्रि.) तासले, फोडले.

**पच्छिन्न**–(कृ.) तासतांना, फोडताना.

**पच्छिज्जित्वा**–(पू. क्रि.) तासून, फोडून.

**पच्छिज्जन**–(नपु.) बाधा, अडथळा.

**पच्छिन्दति**–(क्रि.) छाटणे, कापणे.

**पच्छिन्दि**–(पू. क्रि.) छाटले, कापले.

**पच्छिन्न**–(कृ.) छाटताना, कापताना.

**पच्छिन्दित्वा**–(पू. क्रि.) छाटून, कापून.

**पच्छिम**–(वि.) अंतिम, शेवटचा.

**पच्छिमक**–(वि.) अंतिम, सर्वात लहान.

**पच्छेदन**–(नपु.) काप, तोड.

**पजग्घति**–(क्रि.) जोरात हंसणे, मोठ्याने हंसणे.

**पजप्पति**–(क्रि.) बडबडणे, तीव्र इच्छा करणे

**पजप्पि**–(पू. क्रि.) बडबड केली, तीव्र इच्छा केली

**पजहति**–(क्रि.) सोडणे, त्यागणे, टाकणे.

**पजहि**–(पू. क्रि.) सोडले, त्यागले, टाकले.

**पजहित**–(कृ.) सोडता, त्यागता, टाकता.

**पजहित्वा**–(पू. क्रि.) सोडून, त्यागून, टाकून.

**पहाय**–(कृ.) सोडण्यालायक, त्यागण्यायोग्य, टाकण्यायोग्य.

**पजहन्त**–(कृ.) सोडताना, त्यागताना, टाकताना.

**पजा**–(स्त्री) संतान, प्रजा, प्राणी, मनुष्य.

**पजानना**–(स्त्री.) ज्ञान, समज, अक्कल.

**पजानाति**–(क्रि.) पूर्व समजणे, पूर्ण कळणे, पूर्ण जाणणे, पूर्ण ओळखणे.

**पजापति**–(पु.) सृष्टिचा मालक, सृष्टिचा उत्पन्न करता.

**पजापति**–(स्त्री.) ज्याची सन्तान आहेत, ज्यास मुले-बाळे आहेत, प्रजा पती.

**पजायति**–(क्रि.) उत्पन्न होणे, जन्मणे.

**पजायन**–(नपु.) जन्म, उत्पत्ती.

**पज्ज**–(नपु.) पद्य, कविता, काव्य.

**पज्ज-बद्ध**–(पु.) काव्य-बद्ध, काव्यात्मक, पद्यात्मक.

**पज्जलति**–(क्रि.) जळणे, पेटणे, आग लागणे.

**पज्जलि**–(पू. क्रि.) जळले, पेटले, आग लागली.

**पज्जलित**–(कृ.) जळताना, पेटताना, आग लागताना.

**पज्जलन्त**–(कृ.) जळता, पेटता, आग लागता, प्रज्वलित.
**पज्जलित्वा**–(पू. क्रि.) जळून, पेटून, आग लागून.
**पज्जलन**–(नपु.) जाळ, आग, ज्योत, प्रज्वलन.
**पज्जुन्न**–(पु.) पावसाचा ढग, पाण्याचा ढग, इंद्र.
**पज्जोत**–(पु.) प्रदीप, प्रकाश, पेटती, ज्योत, तेज, चमक.
**पज्झायति**–(क्रि.) जळणे, क्षीण होणे, शोकाकुल होणे.
**पज्झायि**–(पू. क्रि.) जळाले, क्षीण झाले, शोकाकुल झाले.
**पज्झायन्त**–(कृ.) जळताना, क्षीण होताना, शोकाकूल होताना.
**पज्झायन्त्वा**–(पू. क्रि.) जळून, क्षीण होऊन, दुःखी होऊन.
**पञ्च**–(सं. वि., स्त्री.) पांच, (५).
**पञ्चक**–(नपु.) पांचाचा समूह किंवा गट.
**पञ्चकल्याण**–(नपु.) सौंदर्याची पाच लक्षणे, पाच चिन्हे.
**पञ्च-कामगुण**–(पु.) पाच इंद्रिय सुखे.
**पञ्चक्खत्तुं**–(क्रि. वि.) पाचवेळा, पाचदा, पांच प्रकारे.
**पञ्चक्खन्ध**–(पु.) पांच स्कन्ध–, पाच विभाग.
**पञ्च गरू जातक**–प्रत्येक बुद्धाचा, ज्ञानदात्याचा उपदेश मानणारा राजकुमार, शेवटी सर्वश्रेष्ठ राजा झाल्याची कथा–(१३२).
**पञ्च-गोरस**–(पु.) दूध, दही, ताक, लोणी, तूप हे पाच दुधाचे पदार्थ.
**पञ्चङ्ग**–(वि.) पाच अंगानी युक्त, पंचांग.
**पञ्चङ्गिक**–पहा–पञ्चङ्ग.
**पञ्चङ्गुलिक**–(वि.) पाचही बोटांचे ठसे.
**पञ्च-चक्खु**–(वि.) पाच दृष्टिचा, पांच प्रकारची नजर.
**पञ्चचत्तालिस**–(सं. वि., स्त्री.) पंचेचाळीस, (४५).
**पञ्च-चूळक**–(वि.) डोक्याच्या केसांच्या पांचवेळा वेण्या घातलेला.
**पञ्चतिंसति**–(सं. वि., स्त्री.) पस्तीस, पसतीस, (३५).
**पञ्चदस**–(सं. वि.) पंधरा, (१५).
**पञ्चदसी**–(स्त्री.) पौर्णिमा,
**पञ्च-धरण**–(नपु.) तोलणे, तराजूने मोजणे, वजन करणे.
**पञ्चधा**–(अव्यय) पांचदा, पाच प्रकारे., पाच तऱ्हेने.
**पञ्चनवुत्ति**–(सं वि., स्त्री.) पंचाण्णव, (९५).
**पञ्च-नीवरणे**–(नपु.) पाच प्रकारची बंधने.
**पञ्चपञ्ञासत्ति**–(सं. वि., स्त्री.) पंचावन्न, (५५).
**पञ्च पण्डित जातक**–महाउम्मग जातकाच्या एका भागाविषयी दिलेली कथा–(५०८).
**पञ्चपतिट्ठित**–(नपु.) पाच अंगानी प्रणाम, पंचेंद्रियांचा नमस्कार.
**पञ्चप्पकरण**–(नपु.) धम्म सङ्गणि व विभंग हे दोन भाग सोडून अभिधम्म पिटकाच्या उरलेल्या ग्रंथांचे सामुदायिक नाव.
**पञ्च-बन्धन**–(नपु.) पाच प्रकारांची बंधने.
**पञ्च-बल**–(नपु.) पाच प्रकारांचे बल, पाच प्रकारांची शक्ती.
**पञ्च-महापरित्याग**–(पु.) पाच प्रकारांचे त्याग.
**पञ्च-महानदी**–(स्त्री.) गंगा, सिंधु, सरस्वती, (अचिरावति) यमुना व गोदावरी या पाच नद्या.
**पञ्च-महाविलोक**–(नपुं) पाच प्रकारचे शोध.
**पञ्च-वग्गिय**–(पु.) भगवान गौतम बुद्धाच्या पहिल्या पाच शिष्यांच्या समुहाचे नाव, पंचवर्गीय भिक्षू-१ कौंडिण्य, २ भद्दिय, ३ वप्प, ४ महानाम, ५ अश्वजीत.
**पञ्च-वण्ण**–(वि.) पाच वर्ण.
**पञ्च-विध**–(वि.) पाच प्रकारांनी, पाचपट, पाच प्रकारचा.
**पञ्चविसति**–(सं. वि., स्त्री) पंचवीस, (२५).
**पञ्चसट्ठि**–(सं. वि., स्त्री.) पासष्ट, (६५).
**पञ्चसत**–(सं. वि.) पाचशे, (५००).
**पञ्चसिख**–(पु.) देव-गंधर्व.
**पञ्च-सिल**–(नपु) पाच-शील, वागण्याचे पाचनियम. पंचशील.
**पञ्च-सुवण्ण**–(पु.) पाच सुवर्ण भार, अंदाजे एक तोळा.
**पञ्चसो**–(अ.) पांच प्रकारे.
**पञ्च-हत्थ**–(पु.) पाच हात लांब, किंवा उंच.
**पञ्चानन्तरिय**–(नपु.) जलद फळ पावणारी पाच दुष्कर्मे, (१) मातृ-हत्या, (२) पितृ-हत्या, (३) अर्हतहत्या, (४) बुद्धाचे शरीर जखमी करणे. (५) संघ फोडणे.
**पञ्चाभिञ्ञा**–(स्त्री.) पाच प्रकारच्या दिव्य शक्ती. (१) प्रतिस्पर्ध्यावर दया दाखविण्याची व सहन करण्याची शक्ती (२) दिव्य-दृष्टि (३) दिव्य-श्रोत (४) दुसऱ्याचे विचार जाणण्याची शक्ती (५) पूर्वजन्माची अनुस्मृती.
**पञ्चाल**–(पु.,वि.)प्राचीन भारतातील सोळा गणराज्यांपैकी एक गणराज्य पञ्चाल. याचे दोन भाग होते. १ उत्तर पञ्चाल. २ दक्षिण पञ्चाल.

**पञ्चालिका**–(स्त्री.) बाहुली, पुतळी.
**पञ्चावुध**–(नपु.) तलवार, भाला, बर्चा, कुऱ्हाड व कटचार ही पाच शस्त्रे–आयुधे.
**पञ्चावुध जातक**–पाच हत्यारे असलेल्या (पंच हत्यारी) राजकुमाराचा सिलेसलोम नावाच्या यक्षाबरोबर संघर्ष झाला. शेवटी यक्षाने राजकुमाराचा जय मान्य केल्याची कथा–(५५).
**पञ्चासीति**–(सं. वि., स्त्री.) पंचाऐंशी, (८५).
**पञ्चाह**–(नपु.) पाच दिवस.
**पञ्चुपोसथ जातक**–कबूतर, साप, कोल्हा व अस्वल यांची परस्पर मैत्रीपूर्ण सहवासाची कथा–(४९०).
**पञ्जर**–(पु., नपु.) पिंजरा.
**पञ्जलिक**–(वि.) नमस्कारासाठी हात जोडलेला.
**पञ्ञ**–(वि.) प्रज्ञावान, ज्ञानी.
**पञ्ञता**–(स्त्री.) प्रज्ञावन्त.
**पञ्ञत्त**–(कृ.) बनविलेला नियम, केलेली घोषणा. बुद्धीमानी.
**पञ्ञत्ति**–(स्त्री.) संज्ञा, नाम, नियम, घोषणा, प्रज्ञप्ती.
**पञ्ञावन्तु**–(वि.) बुद्धीमान मनुष्य, प्रज्ञावान.
**पञ्ञा**–(स्त्री.) प्रज्ञा, ज्ञान, आत्मज्ञान.
**पञ्ञाक्खन्ध**–(पु.) प्रज्ञास्कंध.
**पञ्ञा-चक्खु**–(नपु.) ज्ञान चक्षू-दृष्टी.
**पञ्ञा-धन**–(नपु.) ज्ञान धन.
**पञ्ञा-बल**–(नपु.) ज्ञान बल
**पञ्ञा-भेद**–(पु.) प्रज्ञेचे प्रकार, ज्ञानाचे प्रकार.
**पञ्ञा-विमुत्ति**–(स्त्री.) प्रज्ञा विमुक्ती.
**पञ्ञा-सम्पदा**–(स्त्री.) प्रज्ञा संपत्ती, ज्ञान हेच धन.
**पञ्ञाण**–(नपु.) चिन्ह, खूण, निशान, ठसा.
**पञ्ञात**–(कृ.) प्रकट झालेला, उघड झालेला.
**पञ्ञापक**–(वि.) निवडणारा, निवड करणारा, नियुक्त करणारा.
**पञ्ञापन**–(नपु.) घोषणा, बैठकीची व्यवस्था.
**पञ्ञापेति**–(क्रि.) नियम बनविणे, घोषणा करणे, व्यवस्था करणे.
**पञ्ञापेसि**–(पू. क्रि.) नियम बनविले, घोषणा केली, व्यवस्था केली.
**पञ्ञापित**–(कृ.) नियम बनविता, घोषित करता, व्यवस्था करता.
**पञ्ञत्त**–(कृ.) नियम बनविण्यायोग्य, घोषित करण्यायोग्य, व्यवस्था करणेलायक.
**पञ्ञापेत्त**–[पहा–पञ्ञत].
**पञ्ञापेत्वा**–(पू. क्रि.) नियम बनवून, घोषित करून. व्यवस्था करून.
**पञ्ञापेतु**–(पु.) नियमबद्ध करणारा, नियमात बसविणारा, घोषणा करणारा, व्यवस्था करणारा.
**पञ्ञायति**–(क्रि.) प्रकट होणे, स्पष्ट होणे, जाहीर होणे.
**पञ्ञायि**–(पू. क्रि.) प्रकट केले, स्पष्ट केले, जाहीर केले.
**पञ्ञात**–(कृ.) प्रकट होताना, स्पष्ट होताना, जाहीर होताना.
**पञ्ञायमान**–(कृ.) प्रकट होणे योग्य, स्पष्ट होणे योग्य. जाहीर होणे योग्य.
**पञ्ञायित्वा**–(पू. क्रि.) प्रकट करून, स्पष्ट करून, जाहीर करून.
**पञ्ह**–(स्त्री.) प्रश्न, जिज्ञासा.
**पञ्ह-विस्सज्जन**–(नपु.) प्रश्नाचे उत्तर, शंका निरसन.
**पञ्ह-व्याकरण**–(नपु.) प्रश्नाचे समाधान, शंका-समाधान.
**पट**–(पु., नपु.) वस्त्र कपडा, कापड, वापरण्याचे आवरण.
**पटग्गि**–(पु.) प्रति अग्नी, आगीला आगीने उत्तर.
**पटङ्ग**–(पु) रातकिडा.
**पटल**–(नपु.) आवरण, पडदा, दरचे वस्त्र.
**पटलिका**–(स्त्री.) लोकरीचे शाल, दुशाला.
**पटह**–(पु.) नगारा, मोठा ढोल.
**पटाका**–(स्त्री.) पताका, झेंडा, निशाण, ध्वज.
**पटि, पति**–(उपसर्ग) विरुद्ध-अनुकूल.
**पटिकङ्खति**–(क्रि.) इच्छिणे, इच्छा करणे.
**पटिकङ्खि**–(पू. क्रि.) इच्छिले, इच्छा केली.
**पटिकङ्खित्त**–(कृ.) इच्छा करताना, इच्छिताना.
**पटिकङ्खित्वा**–(पू. क्रि.) इच्छून, इच्छा करून.
**पटिकण्टक**–(वि., पु.) विरोधी, विरोधक, शत्रू.
**पटिकम्म**–(नपु.) प्रतिकर्म, प्रायश्चित.
**पटिकत**–(कृ.) प्रायश्चित केलेला.
**पटिकर**–(वि.) प्रतिकार.
**पटिकरोति**–(क्रि.) प्रतिकार करणे, मार्जन करणे, निवारणे.
**पटिकरि**–(पू. क्रि.) प्रतिकार केला, मार्जन केले, निवारण केले.
**पटिकरोन्त**–(कृ.) प्रतिकार करता, मार्जन करता, निवारण करता.
**पटिकरोत्वा**–(पू. क्रि.) प्रतिकार करून, मार्जन करून, निवारण करून.
**पटिकस्सति**–(क्रि.) मागे सरणे, मागे हटणे.
**पटिकस्सि**–(पू. क्रि.) मागे सरला, मागे हटला.

**पटिकस्सित**–(कृ.) मागे सरताना, मागे हटताना.
**पटिकस्सित्वा**–(पू. क्रि.) मागे सरून, मागे हटून.
**पटिकार**–(पु.) प्रतिकार, इलाज, उपचार.
**पटिकुज्जति**–(क्रि.) झुकणे, वाकणे.
**पटिकुज्जेसि**–(पू. क्रि.) झुकले, वाकले.
**पटिकुज्जित**–(कृ.) झुकताना, वाकताना.
**पटिकुज्जिय**–(कृ.) झुकण्यायोग्य, वाकण्यायोग्य.
**पटिकुज्जेत्वा, पटिकुज्जित्वा**–(पूर्व क्रिया) झुकून, वाकून.
**पटिकुज्जन**–(नपु.) झुकणे, वाकणे, उलटून टाकणे.
**पटिकुज्झति**–(क्रि.) कारणाने रागावणे.
**पटिकुट्ठ**–(कृ.) घृणित, बदनाम, सदोष, धाक घातलेला.
**पटिक्कन्त**–(कृ.) परत आलेला.
**पटिक्कम्म**–(पु.) बाजूस होणे, बाजूस सरणे, दूर होणे, परतणे.
**पटिक्कम्मति**–(क्रि.) मागे हटणे, परतणे, मागे फिरणे.
**पटिक्कम्मि**–(पू. क्रि.) मागे हटला, परतला, मागे फिरला.
**पटिक्कम्मन्त**–(कृ.) मागे हटता, परतताना.
**पटिक्कम्मित्वा**–(पू. क्रि.) मागे हटून, परतून.
**पटिक्कमन**–(नपु.) प्रतिक्रमण, मागे सरणे, परतणे.
**पटिक्कम्मन-साला**–(स्त्री.) विश्राम धाम, विश्राम शाळा, विश्राम गृह.
**पटिक्कूल**–(वि.) प्रतिकूल.
**पटिक्कूलता**–(स्त्री.) प्रतिकूलता.
**पटिक्कूल-सञ्ञा**–(स्त्री.) शारीरिक घाणीविषयी.
**पटिक्कोसना**–(स्त्री.) विरोध-प्रदर्शन, विरोध-मोर्चा.
**पटिक्कोसति**–(क्रि.) बरे-वाईट म्हणणे, दोष देणे.
**पटिक्कोसि**–(पू. क्रि.) बरे-वाईट, दोष दिला.
**पटिक्कुट्ठ**–(कृ.) बरे-वाईट म्हणता, दोष देता.
**पटिक्कोसित्वा**–(पू. क्रि.) बरे-वाईट म्हणून, दोष देऊन.
**पटिक्खिपति**–(क्रि.) प्रतिक्षेपणे, निषेध करणे.
**पटिक्खिपि**–(पू. क्रि.) प्रतिक्षेप केला, निषेध केला.
**पटिक्खित्त**–(कृ.) प्रतिक्षेप करता, निषेध करता.
**पटिक्खिपित्वा, पटिक्खित्वा**–(पूर्व क्रिया) प्रतिक्षेप करून, निषेध करून.
**पटिक्खेप**–(पु.) प्रतिक्षेप, निषेध.
**पटिगच्च**–(अ.) पहिल्यापासून. [पहा-पटिकच्च].
**पटिगिज्झति**–(क्रि.) इच्छिणे, लोभ करणे, धरणे.
**पटिगिज्झि**–(पू. क्रि.) इच्छिले, लोभ धरला.
**पटिगिद्ध**–(कृ.) इच्छिता, लोभ धरता.
**पटिगिज्झित्वा**–(पू. क्रि.) इच्छा करून, लोभ धरून.
**पटिगूहति**–(क्रि.) दडविणे, झाकणे, मागे राहणे.
**पटिगूहि**–(पू. क्रि.) दडविले, झाकले, मागे राहिले.
**पटिग्गूहित**–(कृ.) दडविता, झाकता, मागे राहता.
**पटिगूहित्वा**–(पू. क्रि.) दडवून, झाकून, मागे राहून.
**पटिग्गण्हन**–(नपु.) प्रतिग्रहण, स्वागत.
**पटिग्गण्हक**–(वि.) स्वागत करणारा, प्रतिग्रहण करण्यास समर्थ.
**पटिग्गण्हाति**–(क्रि.) घेणे, मिळविणे, प्राप्त करणे.
**पटिग्गण्हि**–(पू. क्रि.) घेतले, मिळविले, प्राप्त केले.
**पटिग्गहित, पटिग्गण्हिन्त**–(कृ.) घेताना, मिळविताना, प्राप्त करताना.
**पटिगण्हिय, पटिग्गय्ह**–(कृ.) घेणे योग्य, मिळविणे, योग्य, प्राप्त करणे योग्य.
**पटिगहेत्वा**–(पू. क्रि.) घेऊन, मिळवून, प्राप्त करून.
**पटिग्गह**–(पु.) ग्रहण करणारा, घेणारा, धारक, पात्र, योग्य.
**पटिग्गह**–(नपु.) पिकदान, थुंकीचे भांडे.
**पटिग्गहण**–[पहा–पटिगण्हन].
**पटिग्गहेतु**–(पु.) घेणारा, स्वीकार करणारा, स्वीकारणारा, स्वागत करणारा.
**पटिघ**–(पु.) क्रोध, राग, विरोध, द्वेष, मत्सर.
**पटिघात**–(पु.) प्रतिघात, टक्कर, झुंज, द्वंद्व.
**पटिघोस**–(पु.) आवाज, ध्वनि, सूर.
**पटिचरति**–(क्रि.) फिरणे, वदलणे, उत्तराची टाळा-टाळ करणे.
**पटिचोदेति**–(क्रि.) दोष देणे, आरोप ठेवणे, (कारणाने).
**पटिचोदेसि**–(पू. क्रि.) दोष दिला, कारणाने आरोप ठेवला.
**पटिचोदित**–(कृ.) दोष देताना, कारणाने आरोप ठेवताना.
**पटिचोदेत्वा**–(पू. क्रि.) दोष देऊन, कारणाने आरोप ठेवून.
**पटिच्च**–(अ. पू. क्रि.) हेतुने, उद्देशाने.
**पटिच्च-समुप्पन्न**–(वि.) हेतूने उत्पन्न, उद्देशाने निर्माण.
**पटिच्च-समुप्पाद**–(पु.) हेतूच्या उत्पत्तीचा नियम, कार्यकारण नियम.
**पटिच्छति**–(क्रि.) स्वीकारणे, घेणे, ग्रहण करणे.
**पटिच्छन्न**–(कृ.) झाकलेला, लपविलेला.
**पटिच्छादक**–(वि.) झांकणारा, लपविणारा.

**पटिच्छादनिय**–(नपु.) मांसाचे सूप.
**पटिच्छादेति**–(क्रि.) झांकणे, लपविणे.
**पटिच्छादित**–(पू. क्रि.) झाकलेले, लपविलेले.
**पटिच्छन्न, पटिच्छादेन्त**–(कृ.) झाकताना, लपविताना.
**पटिच्छादिय**–(कृ.) झाकण्यायोग्य, लपविण्यायोग्य.
**पटिच्छादेत्वा**–(पू. क्रि.) झाकून, लपवून.
**पटिजग्गक**–(पु.) पालक, पालन-पोषण करणारा, सांभाळणारा.
**पटिजग्गति**–(क्रि.) सांभाळणे, पालन करणे.
**पटिजग्गि**–(पू. क्रि.) सांभाळले, पालन केले.
**पटिजग्गित**–(कृ.) सांभाळताना, पालन करताना.
**पटिजग्गिय**–(कृ.) सांभाळण्यायोग्य, पाळण्यालायक.
**पटिजग्गित्वा**–(पू. क्रि.) सांभाळून, पालन करून.
**पटिजग्गन**–(नपु.) पालन-पोषण, सांभाळ.
**पटिजग्गनक**–(वि.) पालक, सांभाळकर्ता.
**पटिजग्गिय**–(कृ.) दुरुस्ती करण्यालायक–पहा पटिजग्गिय.
**पटिजानाति**–(क्रि.) स्वीकारणे, वचन देणे, कबूल करणे.
**पटिजानि**–(पू. क्रि.) स्वीकारले, वचन दिले, कबूल केले.
**पटिञ्ञात, पटिजानन्त**–(कृ.) स्वीकारताना, वचन देताना, कबूल करताना.
**पटिजानित्वा**–(पू. क्रि.) स्वीकारून, वचन देऊन, कबूल करुन.
**पटिञ्ञ**–(वि.) प्रतिज्ञा करणारा, विश्वास देणारा.
**पटिञ्ञा**–(स्त्री.) प्रतिज्ञा, विश्वास, सहमती, अनुमती.
**पटिञ्ञात**–(कृ.) प्रतिज्ञा केलेला, सहमत झालेला, विश्वास दिलेला.
**पटिददाति**–(क्रि.) परत देणे, परत करणे.
**पटिददि**–(पू. क्रि.) परत दिले, परत केले.
**पटिदिन्न**–(कृ.) परत देताना, परत करताना.
**पटिदत्त्वा**–(पू. क्रि.) परत करून, परत देऊन.
**पटिदण्ड**–(पु.) प्रतिकार, विरोध.
**पटिदस्सेति**–(क्रि.) स्वतः प्रकट होणे.
**पटिदस्सेसि**–(पू. क्रि.) स्वतः प्रकट झाला.
**पटिदस्सित**–(कृ.) स्वतः प्रकट होताना.
**पटिदस्सेत्वा**–(पू. क्रि.) स्वतः प्रकट होऊन.
**पटि-दान**–(नपु.) पुरस्कार, भेट, बक्षीस.
**पटिदिस्सति**–(क्रि.) दिसणे.
**पटिदिस्सि**–(पू. क्रि.) दिसला, दिसून आला.
**पटिदेसेति**–(क्रि.) स्वीकारणे, मानणे, कबूल करणे.
**पटिदेसेसि**–(पू. क्रि.) स्वीकारले, मानले, कबूल केले.
**पटिदेसित**–(कृ.) स्वीकारताना, मानताना, कबूल करताना.
**पटिदेसेत्वा**–(पू. क्रि.) स्वीकारून, मानून, कबूल करून.
**पटिधावति**–(क्रि.) मागे पळणे, पळून जाणे, जवळून धावणे.
**पटिधावि**–(पू. क्रि.) भिऊन मागे पळून गेला, जवळून धावला.
**पटिधावित्वा**–(पू. क्रि.) पळून जाऊन, जवळून धावून.
**पटिनन्दति**–(क्रि.) प्रसन्न होणे, आनंदणे.
**पटिनन्दि**–(पू. क्रि.) प्रसन्न झाला, आनंदला.
**पटिनन्दित**–(कृ.) प्रसन्न होताना, आनंदताना.
**पटिनन्दित्वा**–(पू. क्रि.) प्रसन्न होऊन, आनंदून.
**पटिनन्दना**–(स्त्री.) आनंदित होणे, आनंदणे.
**पटिनासिका**–(स्त्री.) बनावट नाक, कृत्रिम नाक.
**पटिनिधि**–(पु.) प्रतिमूर्ती, दुसरा पुतळा, प्रतिनिधी.
**पटिनिवत्त**–(कृ.) परत आलेला, मागे आलेला, परतलेला.
**पटिनिवत्तति**–(क्रि.) परतणे, परत येणे, मागे येणे.
**पटिनिवत्ति**–(पू. क्रि.) परतला, परत आला, मागे आला.
**पटिनिवत्तित्वा**–(पू. क्रि.) परतून, परत येऊन, मागे येऊन.
**पटिनिस्सग्ग**–(पु.) परित्याग, टाकणे, सोडणे.
**पटिनिस्सज्जति**–(क्रि.) त्यागणे, सोडून देणे, परित्याग करणे.
**पटिनिस्सज्जि**–(पू. क्रि.) त्यागले, सोडून दिले, परित्याग केला.
**पटिनिस्सट्ठ**–(कृ.) त्यागताना, सोडताना, परित्याग करताना.
**पटिनिस्सज्जिय**–(कृ.) त्यागण्या योग्य, सोडण्या योग्य, परित्याग करण्यायोग्य.
**पटिनिस्सज्जित्वा**–(पू. क्रि.) त्याग करून, सोडून, परित्याग करून.
**पटिनेति**–(क्रि.) परत नेणे, मागे आणणे.

**पटिनेसि**—(पू क्रि.) परत नेले, मागे आणले.
**पटिनित**—(कृ.) परत नेताना, मागे आणताना.
**पटिनेत्वा**—(पू. क्रि.) परत नेऊन, मागे आणून.
**पटिपक्ख, पतिपक्ख**—(वि.) विरोधक, विरोधी, प्रतिपक्ष.
**पटिपक्ख, पतिपक्ख**—(पु.) शत्रू, वैरी.
**पटिपक्खिक**—(वि.) विरुद्ध पक्षाचा, प्रतिपक्षी.
**पटिपज्जति**—(क्रि.) मार्गारूढ होणे, मार्गी लागणे.
**पटिपज्जि**—(पू. क्रि.) मार्गारुढ झाला, मार्गी लागला.
**पटिपन्न**—(कृ.) मार्गारुढ होताना, मार्गी लागताना.
**पटिपज्जमान**—(कृ.) मार्गारुढ होण्यायोग्य, मार्गी लागण्यालायक.
**पटिपज्जित्वा**—(पू. क्रि.) मार्गारुढ होऊन, मार्गी लागून.
**पटिपज्जन**—(नपु.) पद्धती, प्रकार, तऱ्हा, अभ्यास, आचरण.
**पटिपण्ण**—(नपु.) पत्रोत्तर, पत्राचे उत्तर.
**पटिपत्ति**—(स्त्री.) आचरण, धार्मिक-संस्कार, धार्मिक कार्य, धर्म-संस्कार.
**पटिपथ**—(पु.) समोरून येणारा मार्ग, रस्ता, उलटी वाट.
**पटिपदा**—(स्त्री.) आचरण, चारित्र्य, जीवन मार्ग.
**पटिपन्न**—(कृ.) मार्गारुढ, आचरीत असलेला.
**पटिपरहति**—(क्रि.) उलट मारणे, प्रत्युत्तर देणे.
**पटिपहरि**—(पू. क्रि.) उलट मारले, प्रत्युत्तर दिले.
**पटिपहरित**—(कृ.) उलट मारतांना, प्रत्युत्तर देताना.
**पटिपहरित्वा**—(पू. क्रि.) उलट मारून, प्रत्युत्तर देऊन.
**पटिपहिणाति**—(क्रि.) परत पाठविणे.
**पटिपहिणि**—(पू. क्रि.) परत पाठविले.
**पटिपहिणत**—(कृ.) परत पाठविताना.
**पटिपहिणित्वा**—(पू. क्रि.) परत पाठवून.
**पटिपाटि**—(स्त्री.) क्रम, अनुक्रम.
**पटिपाटिया**—(क्रि. वि.) क्रमशः, क्रमाने, अनुक्रमे.
**पटिपाद**—(पु.) पलंग अगर बाजेचा आधार.
**पटिपादक**—(पु.) व्यवस्थापक, स्थापन करणारा, ठेवणारा.
**पटिपादन**—(नपु.) प्रतिपादन, सांगणे, शिकविणे.
**पटिपादेति**—(क्रि.) शिकविणे, सांगणे, व्यवस्था करणे, सामग्री पोहोचविणे.
**पटिपादेसि**—(पू. क्रि.) शिकविले, सांगितले, व्यवस्था केली, पोहोचविले.
**पटिपादित**—(कृ.) शिकविताना, सांगताना, व्यवस्था करताना, पोहोचविताना.
**पटिपादेत्वा**—(पू. क्रि.) शिकवून, सांगून, व्यवस्था करून, पोहोचवून.

**पटिपीळन**—(नपु.) त्रास, पीडा, उपद्रव.
**पटिपीळेति**—(क्रि.) त्रास देणे, पीडा करणे, उपद्रव देणे.
**पटिपीळेसि**—(पू. क्रि.) त्रास दिला, पीडा केली, उपद्रव दिला.
**पटिपीळित**—(कृ.) त्रास देताना, पीडा करतांना, उपद्रव देताना.
**पटिपीळेत्वा**—(पू. क्रि.) त्रास देऊन, पीडा करून, उपद्रव देऊन.
**पटिपुग्गल**—(पु.) प्रतिस्पर्धा, विरोधक, वैरी.
**पटिपुच्छति**—(क्रि.) उलट प्रश्न विचारणे.
**पटिपुच्छि**—(पू. क्रि.) उलट प्रश्न विचारला.
**पटिपुच्छित**—(कृ.) उलट प्रश्न विचारतांना.
**पटिपुच्छेत्वा**—(पू. क्रि.) प्रश्न विचारून.
**पटिपुच्छा**—(स्त्री.) प्रश्नोत्तरे.
**पटिपूजना**—(स्त्री.) आदर दाखविणे, गौरव करणे, सन्मान करणे.
**पटिपूजेति**—(क्रि.) आदर करणे, सन्मान करणे, गौरविणे.
**पटिपूजेसि**—(पू. क्रि.) आदर केला, सन्मान केला, गौरविले.
**पटिपूजित**—(कृ.) आदर करताना, सन्मान करताना, गौरविताना.
**पटिपूजेत्वा**—(पू. क्रि.) आदर करून, सन्मान करून, गौरवून.
**पटिपेसेति**—(क्रि.) परत पाठविणे.
**पटिपस्सद्ध**—(कृ.) शांत झाला, शांत झालेला.
**पटिपस्सद्धि**—(स्त्री.) शांती, शांतता.
**पटिपस्सम्भति**—(क्रि.) शांत होणे.
**पटिपस्सम्भना**—[पहा—पटिपस्सम्भति].
**पटिबद्ध**—(कृ.) बांधलेला, आकर्षित.
**पटिबद्ध-चित्त**—(वि.) अनुरक्त, आसक्त, मोहित.
**पटिबल**—(वि.) योग्य, सामर्थ्यवान, शक्तिशाली.
**पटिबाहक**—(वि.) विरोधक, बाधक, हटविणारा.
**पटिबाहति**—(क्रि.) विरोध करणे.
**पटिबाहि**—(पू. क्रि.) विरोध केला.
**पटिबाहित, पटिबाहन्त**—(कृ.) विरोध करताना.
**पटिबाहिय**—(कृ.) विरोध करण्यायोग्य.
**पटिबाहित्वा**—(पू. क्रि.) विरोध करून.
**पटिबिम्ब**—(नपु.) प्रतिबिंब, पडछाया.
**पटिबिम्बित**—(वि.) प्रतिबिंब पडलेले, पडछाया पडलेली.
**पटिबुज्झति**—(क्रि.) समजणे, जाणणे.
**पटिबुज्झि**—(पू. क्रि.) समजले. जाणले.

**पटिबुज्झित**–(कृ.) समजताना, जाणताना.

**पटिबुज्झित्वा**–(पू. क्रि.) समजून, जाणून.

**पटिबुद्ध**–(कृ.) ज्ञानी, जागृत.

**पटिभय**–(नपु.) भय, भीती.

**पटिभाग**–(वि.) समान, सारखा, सम,

**पटिभाग**–(पु.) समानता, एकरूपता, सादृष्य भाग.

**पटिभाति**–(क्रि.) समजणे, स्पष्ट होणे.

**पटिभासि**–(पू. क्रि.) समजले, स्पष्ट झाले.

**पटिभाण**–(नपु.) हर जबाबी, प्रत्युत्तर देण्याची क्षमता.

**पटिभाणवन्तु**–(नपु.) क्षिप्र, प्राज्ञ, प्रत्युत्तर देणारा.

**पटिभासति**–(क्रि.) उत्तर देणे.

**पटिभासि**–(पू. क्रि.) उत्तर दिले.

**पटिभू**–जामीन.

**पटिमग्ग**–(पु.) विरुद्ध मार्ग.

**पटिमण्डित**–(कृ.) सजलेला.

**पटिमल्ल**–(पु.) प्रति पैलवान.

**पटिमा**–(स्त्री.) प्रतिमा, मूर्ती, छवी.

**पटिमानेति**–(क्रि.) गौरव करणे, वाट पाहणे.

**पटिमानेसि**–(पू. क्रि.) गौरव केला, वाट पाहिली.

**पटिमानित**–(कृ.) गौरव करताना, वाट पाहताना.

**पटिमानेत्वा**–(पू. क्रि.) गौरव करून, वाट पाहून.

**पटिमुक्क**–(कृ.) वस्त्र नेसताना, बांधताना.

**पटिमुञ्चति**–(क्रि.) वस्त्र नेसणे, बांधणे.

**पटिमुञ्चि**–(पू. क्रि.) वस्त्र नेसले, बांधले.

**पटिमुञ्चित्वा**–(पू. क्रि.) वस्त्र नेसून, बांधून.

**पटियादेति**–(क्रि.) तयार करणे, व्यवस्था करणे, साहित्य देणे.

**पटियादेसि**–(पू. क्रि.) तयार केले, व्यवस्था केली, साहित्य दिले.

**पटियादित**–(कृ.) तयार करताना, व्यवस्था करताना, साहित्य देताना.

**पटियत्त**–(कृ.) तयार करण्यायोग्य, व्यवस्था करण्यायोग्य, साहित्य देण्यायोग्य.

**पटियादेत्वा**–(पू. क्रि.) तयार करून, व्यवस्था करून, साहित्य देऊन.

**पटियोध**–(पु.) प्रतिस्पर्धी योद्धा.

**पटिरव**–(पु.) प्रतिरव, उलट आवाज, गुंजन, प्रतिध्वनी.

**पटिराज**–(पु.) प्रतिराजा, बरोबरीचा राजा.

**पटिरूप, पतिरूप**–(वि.) योग्य, अनुकूल. बरोबरीचा, ठीक, समान.

**पटिरूपक, पतिरूपक**–(वि.) समान, सारख्या चेहेऱ्याचा.

**पटिरूपता, पतिरूपता**–(स्त्री.) रुपाची समानता.

**पटिबद्ध**–(कृ.) प्राप्त, मिळालेला.

**पटिलभति**–(क्रि.) प्राप्त करणे, मिळविणे.

**पटिलभि**–(पू. क्रि.) प्राप्त केले, मिळविले.

**पटिलभन्त**–(कृ.) प्राप्त करता, मिळविता.

**पटिलभित्वा**–(पू क्रि.) प्राप्त करून, मिळवून.

**पटिलद्धा**–(कृ ) प्राप्त करण्यायोग्य. मिळविण्यायोग्य.

**पटिलाभ**–(पु.) प्राप्ती.

**पटिलीयति**–(क्रि.) मागे सरणे, दूर राहणे.

**पटिलीयि**–(पू. क्रि.) मागे सरले, दूर राहिले.

**पटिलीन**–(कृ.) मागे सरता, दूर राहता.

**पटिलीयित्वा**–(पू. क्रि.) मागे सरून, दूर राहून.

**पटिलीयन**–(नपु.) दूर राहणे, मागे सरणे.

**पटिलोम**–(वि.) विरुद्ध.

**पटिलोम-पक्ख**–(पु.) विरोधी पक्ष.

**पटिवचन**–(नपु.) उत्तर, जबाब.

**पटिवत्तन**–(नपु.) परिवर्तन, बदल.

**पटिवत्तिय**–(वि.) परतणे, योग्य, गुंडाळणे योग्य.

**पटिवत्तु**–(पु.) विरुद्ध बोलणारा, खंडन करणारा.

**पटिवत्तेति**–(क्रि.) गुंडाळणे, मागे सरणे.

**पटिवत्तेसि**–(पू. क्रि.) गुंडाळले, मागे सरले.

**पटिवत्तित**–(कृ.) गुंडाळताना, मागे सरताना, परिवर्तित.

**पटिवत्तिय**–(कृ.) गुंडाळण्या योग्य, मागे सरणे योग्य, परिवर्तन करणे योग्य.

**पटिवत्तेत्वा**–(पू. क्रि.) गुंडाळून, मागे सरून, परिवर्तन करून.

**पटिवदति**–(क्रि.) उत्तर देणे, विरुद्ध बोलणे.

**पटिवदि**–(पू. क्रि.) उत्तर दिले, विरुद्ध बोलले.

**पटिवुत्त**–(कृ.) उत्तर देता, विरुद्ध बोलता.

**पटिवदित्वा, पटिवत्त्वा**–(पू. क्रि.) उत्तर देऊन, विरुद्ध बोलून.

**पटिवसति**–(क्रि.) राहणे, निवास करणे.

**पटिवसि**–(पू. क्रि.) राहिला, निवास केला.

**पटिवुत्थ**–(कृ.) राहताना, निवास करताना.

**पटिवासित्वा**–(पू. क्रि-) राहून, निवास करून.

**पटिवाक्य**–(नपु.) उत्तर.

**पटिवात**–(क्रि. वि.) वाऱ्याच्या दिशेने विरुद्ध.

**पटिवाद**–(पु.) प्रतिवाद, आरोपाच्या दोषांचे खंडन.

**पटिविसं**–(पु.) हिस्सा, भाग.

**पटिविजानाति**–(क्रि.) ओळखणे, जाणणे.

**पटिविजानि**–(पू. क्रि.) ओळखले, जाणले.
**पटिविजाणेत्वा**–(पू. क्रि.) ओळखून, जाणून.
**पटिविज्झति**–(क्रि.) प्रवेश करणे, समजणे.
**पटिविज्झि**–(पू. क्रि.) प्रवेश केला, समजले.
**पटिविज्झ**–(कृ.) प्रवेशताना, समजताना.
**पटिविज्झित्वा**–(पू. क्रि.) प्रवेश करून, समजून.
**पटिविदित**–(कृ.) ज्ञात, माहीत, सुनिश्चित.
**पटिविद्ध**–(कृ.) प्रविष्ट झाला, हजर झाला, समजून घेतला.
**पटिविनोदन**–(नपु.) घालविणे, हटविणे.
**पटिविनोदेति**–(क्रि.) घालविणे, हटविणे.
**पटिविनोदेसि**–(पू. क्रि.) घालविले, हटविले, सारले.
**पाटविनोदित**–(कृ.) घालविताना, हटविताना, मागे सारताना.
**पटिविनोदय**–(कृ.) घालविण्यायोग्य, हटविण्यायोग्य, मागे सारण्या योग्य.
**पटिविनोदेत्वा**–(पू. क्रि.) घालवून, हटवून, मागे सारून.
**पटिविभजति**–(क्रि.) वाटणे, वाटून देणे.
**पटिविभजि**–(पू. क्रि.) वाटले, वाटून दिले.
**पटिविभत्त**–(कृ.) वाटताना, वाटून देताना.
**पटिविभजित्वा**–(पू. क्रि.) वाटून, वाटून देऊन.
**पटिविरत**–(कृ.) थांबलेला.
**पटिविरमति**–(क्रि.) थांबणे, विरक्त होणे.
**पटिविरमि**–(पू. क्रि.) थांबला, विरक्त झाला.
**पटिविरमन्त**–(कृ.) थांबता, विरक्त होता.
**पटिविरमित्वा**–(पू. क्रि.) थांबून, विरक्त होऊन.
**पटिविरूज्झति**–(क्रि.) विरूद्ध होणे, भांडण करणे.
**पटिविरूज्झि**–(पू. क्रि.) विरुद्ध झाले, भांडण केले.
**पटिविरूज्झित्वा**–(पू. क्रि.) विरुद्ध होऊन, भांडण करून.
**पटिविरूद्ध**–(कृ.) विरुद्ध.
**पटिविरूहति**–(क्रि.) पुन्हा उगविणे.
**पटिविरूहि**–(पू. क्रि.) पुन्हा उगविले.
**पटिविरूळह**–(कृ.) पुन्हा उगविताना.
**पटिविरूहित्वा**–(पू. क्रि.) पुन्हा उगवून.
**पटिविरोध**–(पु.) वैर, शत्रुत्व, विरोधी वृत्ती.
**पटिविस्सक**–(पु.) शेजारी शेजारचा.
**पटिवेदेति**–(क्रि.) ज्ञात होणे, जाणणे, समजणे.
**पटिवेदेसि**–(पू. क्रि.) ज्ञात झाले, जाणले, समजले.
**पटिवेदित**–(कृ.) ज्ञात होताना, जाणताना, समजताना.
**पटिवेदेत्वा**–(पू. क्रि.) ज्ञात होऊन, जाणून, समजून.
**पटिवेध**–(पु.) आत घुसणे.
**पटिसङ्कत**–(कृ.) भागविले.
**पटिसंयुक्त**–(कृ.) संबंधित, जवळचा, नातलग.
**पटिसंवेदेति**–(क्रि.) सहन करणे, अनुभव घेणे.
**पटिसंवेदेसि**–(पू. क्रि.) सहन केले, अनुभविले.
**पटिसंविदित, पटिसंबेदित**–(कृ.) सहन करताना, अनुभवताना.
**पटिसंवेदेत्वा**–(पू. क्रि.) सहन करून, अनुभव घेऊन.
**पटिसंहरण**–(नपु.) टाकणे, फेकणे, हटविणे.
**पटिसंहार**–(पु.) [पहा–पटिसंहरण].
**पटिसंहरति**–(क्रि.) टाकणे, फेकणे, हटविणे.
**पटिसंहरि**–(पू. क्रि.) टाकले, फेकले, हटविले.
**पटिसंहरित, पटिसंहत**–(कृ.) टाकताना, फेकताना, हटविताना.
**पटिसंहरित्वा**–(पू. क्रि.) टाकून, फेकून, हटवून.
**पटिसंकरण**–(नपु.) प्रतिसंस्करण, दुरुस्ती.
**पटिसंकरोति**–(क्रि.) प्रतिसंस्करण करणे, दुरुस्ती करणे.
**पटिसंखरण**–[पहा–पटिसंकरण].
**पटिसंखरोति**–[पहा–पटिसंकरोति].
**पटिसंखा**–(स्त्री.) विचार, निर्णय, निकाल, मत.
**पटिसंखान**–(नपु.) विचार-विनिमय, मीमांसा.
**पटिसंखाय**–(पू. क्रि.) विचार करून, मीमांसा करून.
**पटिसंखार**–[पहा–पटिसंखरण].
**पटिसंचिक्खति**–(क्रि.) विचार करणे, मीमांसा करणे.
**पटिसंचिक्खि**–(पू. क्रि.) विचार केला, मीमांसा केली.
**पटिसंचिक्खित**–(कृ.) विचार करता, मीमांसा करता.
**पटिसंचिक्खित्वा**–(पू. क्रि.) विचार करून, मीमांसा करून.
**पटिसंचार**–(पु.) मित्रत्वाचे स्वागत.
**पटिसंदहति**–(क्रि.) पुन्हा भेटणे, भेट होणे.
**पटिसंदहि**–(पू. क्रि.) पुन्हा भेटला, भेट झाली.
**पटिसंदहित, पटिसंधित**–(कृ.) पुन्हा भेटताना.
**पटिसंदहित्वा**–(पू. क्रि.) भेटून.
**पटिसंधातु**–(पु.) ऐक्य घडविणारा, एकी करणारा, शांती संस्थापक.
**पटिसंधान**–(नपु.) पुनर्मीलन, पुनर्भेट, एकीकरण, ऐक्य.
**पटिसंधि**–(स्त्री.) पुनर्जन्म.
**पटिसम्भिदा**–(स्त्री.) मीमांसापूर्ण ज्ञान, विचार विनिमयांतून ज्ञानप्राप्ती.

**पटिसम्भिदामग्ग**–(पु.) खुद्दक निकायाचा बारावा ग्रंथ, (वास्तविक, याची गणना अभिधम्मांत करावयास हवी होती.)
**पटिसम्मोदति**–(क्रि.) मित्रत्वाचे बोलणे.
**पटिसम्मोदि**–(पू. क्रि.) मित्रत्वाने बोलला.
**पटिसम्मोदित**–(कृ.) मित्रत्वाने बोलताना.
**पटिसम्मोदित्वा**–(पू. क्रि.) मित्रत्वाने बोलून.
**पटिसरण**–(नपु.) आश्रयस्थान, सहायता, संरक्षण.
**पटिसल्लान**–(नपु.) एकान्तवास, एकान्त जीवन, एकान्त.
**पटिसल्लान–सारूप्प**–(वि.) योगाभ्यासास–ध्यान, धारणेस अनुकूल, तपश्चर्येस योग्य.
**पटिसल्लियति**–(क्रि.) ध्यानधारणा करणे, योगाभ्यास करणे, तपश्चर्या करणे.
**पटिसल्लि**–(पू. क्रि.) ध्यानधारणा केली, योगाभ्यास केला, तपश्चर्या केली.
**पटिसल्लीन**–(कृ.) ध्यानधारणा करताना, योगाभ्यास करताना, तपश्चर्या करताना.
**पटिसल्लीयित्वा**–(पू. क्रि.) ध्यानधारणा करून, योगाभ्यास. करून, तपश्चर्या करून.
**पटिसमेति**–(क्रि.) व्यवस्थित करणे, दूर असणे.
**पटिसमेसि**–(पू. क्रि.) व्यवस्थित केले, दूर राहिला.
**पटिसमित**–(कृ.) व्यवस्थित करताना, दूर असताना.
**पटिसमित्वा**–(पू. क्रि.) व्यवस्थित करून, दूर राहून.
**पटिसासन**–(नपु.) प्रत्युत्तर.
**पटिसेध**–(पु.) नकार, निषेध.
**पटिसेधन**–(नपु.) नाकारणे, निषेध करणे.
**पटिसेधक**–(पु.) नकार देणारा, निषेध करणारा.
**पटिसेधेति**–(क्रि.) नकार देणे, निषेध करणे, दूर राहणे.
**पटिसेधेसि**–(पू. क्रि.) नकार दिला, निषेध केला, दूर राहिला.
**पटिसेधित**–(कृ.) नकार देताना, निषेध करताना, दूर राहताना.
**पटिसेधिय**–(कृ.) नकार देणे योग्य, निषेध करणे योग्य, दूर असणे योग्य.
**पटिसेधित्वा**–(पू. क्रि.) नकार देऊन, निषेध करून, दूर राहून.
**पटिसेवति**–(क्रि.) खाणे, उपयोगात आणणे, अनुकरण करणे.
**पटिसेवि**–(पू. क्रि.) खाल्ले, उपयोगात आणले, अनुकरण केले.
**पटिसेवित, पटिसेवन्त**–(कृ.) खाताना, उपयोगात आणताना, अनुकरण करताना.
**पटिसेविय**–(कृ.) खाण्यास योग्य, उपयोगात आणण्या लायक, अनुकरणीय.
**पटिसेवित्वा**–(पू. क्रि.) खाऊन, उपयोगात आणून अनुकरण करून.
**पटिसेवन**–(नपु.) उपयोगात आणणे, अभ्यासणे, अनुकरण करणे.
**पटिसोत**–(वि.) प्रवाहाविरुद्ध.
**पटिस्सत**–(वि.) विचारवंत, विचारी.
**पटिस्सव**–(पु.) वचन, कबुली, स्वीकृती.
**पटिसुणाति**–(क्रि.) वचन देणे, सहमत होणे, कबूल करणे.
**पटिसुणि**–(पू. क्रि.) वचन दिले, सहमत झाला, कबूल केले.
**पटिसुत**–(कृ.) वचन देता, सहमत होता, कबूल करता.
**पटिसुणित्वा**–(पू. क्रि.) वचन देऊन, सहमत होऊन, कबूल करून.
**पटिहञ्ञति**–(क्रि.) मार खाणे.
**पटिहञ्ञि**–(पू. क्रि.) मार खाल्ला.
**पटिहञ्ञित्वा**–(पू. क्रि.) मार खाऊन.
**पटिहत**–(कृ.) मार खाल्लेला.
**पटिहनन**–(नपु.) विरोध, संघर्ष, झगडा, भांडण.
**पटिहनति**–(क्रि.) चोळणे, रगडणे, मळणे.
**पटिहनि**–(पू. क्रि.) चोळले, रगडले, मळले.
**पटिहत**–(कृ.) चोळताना, रगडताना, मळताना.
**पटिहन्त्वा**–(पू. क्रि.) चोळून, रगडून, मळून.
**पटिहार**–(पु.) दरवाजा, द्वार.
**पटु**–(वि.) हुषार, तरबेज, कुशल, निष्णात.
**पटुता**–(स्त्री.) दक्षता, हुषारी, चातुर्य.
**पटोल**–(पु.) रेशमी कापड.
**पट्ट**–(नपु.) वस्त्र, रेशमी कापड, पटका, पट्टी, फळी.
**पट्टक**–[पहा–पट्ट].
**पट्टन**–(नपु.) नदीकाठचे शहर.
**पट्टिका**–(स्त्री.) पट्टी.
**पट्ठपेति**–(क्रि.) स्थापन करणे.
**पट्ठपेसि**–(पू. क्रि.) स्थापन केले, स्थापिले.
**पट्ठपित**–(कृ.) स्थापताना, स्थापन करताना.
**पट्ठपेत्वा**–(पू. क्रि.) स्थापून, स्थापन करून.
**पट्ठान**–(नपु.) प्रस्थान, प्रयाण, जाणे.
**पट्ठानप्पकरण**–(पु.) अभिधम्मपिटकातील शेवटचा ग्रंथ. यांत भौतिकवाद व भौतिक वस्तूंच्या चोवीस प्रकारच्या हेतूंचे व उद्देश्यांचे विवेचन केले आहे.

**पट्ठाय**–(अ.) आरंभ करून, तेव्हापासून, त्यावेळेपासून.
**पठति**–(क्रि.) शिकणे, वाचणे.
**पठि**–(पू. क्रि.) शिकला, वाचला.
**पठित**–(कृ.) शिकतांना, वाचतांना.
**पठित्वा**–(पू. क्रि.) शिकून, वाचून.
**पठन**–(नपु.) वाचन, शिक्षण.
**पठम**–(वि.) प्रथम, पहिला.
**पठमं**–(क्रि. वि.) पहिल्या वेळी, पहिल्या प्रथम.
**पठमज्झान**–(नपु.) पहिले ध्यान, प्रथम ज्ञान.
**पठमतर**–(क्रि. वि.) सर्वांत प्रथम, सर्वाआधि, यथासंभव.
**पठवी**–(स्त्री.) भूमि, पृथ्वी, जमीन.
**पठवी-ओज, पठओज**–(नपु.) पृथ्वीचे तेज, पृथ्वी-प्रकाश.
**पठवी-कम्पन**–(नपु.) भूकम्प.
**पठवी-कसिण**–(नपु.) ध्यान धारणेसाठी बनविलेला मातीचा केंद्रबिंदु.
**पठवी-चलन**–(नपु.) भूकम्प.
**पठवीचाल**–(पु.) भूकम्प.
**पठवी-धातु**–(स्त्री.) पृथ्वी धातु, माती.
**पठवी-सम**–(वि.) पृथ्वीसमान, पृथ्वीसारखे.
**पण**–(पु.) शर्त, ध्येय्य, दुकान.
**पणक**–(पु.) शेवाळ, पाण्यांतील वनस्पती.
**पणमति**–(क्रि.) प्रणाम करणे, वंदन करणे, नम्र होणे, पूजा करणे.
**पणमि**–(पू. क्रि.) प्रणाम केला, वंदन केले, नम्र झाला, पूजा केली.
**पणत, पणमित**–(कृ.) प्रणाम करता, वंदन करता, नम्र होता, पूजा करता.
**पणमित्त्वा**–(पू. क्रि.) प्रणाम करून, वंदन करून, नम्र होऊन, पूजा करून.
**पणय**–(पु.) विश्वास, याचना, मागणे, प्रणय, प्रेम.
**पणव**–(पु.) ढोल.
**पणाम**–(पु.) प्रणाम नमस्कार.
**पणामेति**–(क्रि.) नमस्कार करणे, नम्र होणे, प्रार्थना करणे.
**पणामेसि**–(पू. क्रि.) नमस्कार केला, नम्र झाला, प्रार्थना केली.
**पणामित, पणामेन्त**–(कृ.) नमस्कार करताना, नम्र होताना, प्रार्थना करताना.
**पणामेत्वा**–(पू. क्रि.) नमस्कार करून, नम्र होऊन, प्रार्थना करून.
**पणामेति**–(क्रि.) चालू करणे, पळविणे, पसरणे.
**पणालि**–(स्त्री.) नाली, नाळ, लहान पाट, पनाळ.
**पणिदहति**–(क्रि.) इच्छा करणे, आकांक्षा करणे.
**पणिदहि**–(पू. क्रि.) इच्छा केली, आकांक्षा धरली.
**पणिहित, पणिदहित**–(कृ.) इच्छा करताना, आकांक्षा करताना.
**पणिदहित्वा**–(पू. क्रि.) इच्छा करून, आकांक्षा धरून.
**पणिधान**–(नपु.) आकांक्षा, दृढ संकल्प.
**पणिधि**–(स्त्री.) आकांक्षा, निश्चय.
**पणिधाय**–(पू. क्रि.) संकल्प करून.
**पणिपात**–(पु.) प्रणिपात, साष्टांग नमस्कार, दंडवत.
**पणिय**–(नपु.) पण्य, विकण्याची वस्तु.
**पणिय**–(पु.) व्यापारी, दुकानदार.
**पणिहित**–(कृ.) संकल्प-युक्त, निश्चयी.
**पणीत**–(वि.) श्रेष्ठ, उत्तम, थोर.
**पणीततर**–(वि.) सर्वश्रेष्ठ, सर्वोत्तम.
**पणेति**–(क्रि.) शिक्षा-दंड करणे, न्याय देणे, मार्गावर आणणे.
**पणेसि**–(पू. क्रि.) दंड केला, न्याय दिला, मार्गावर आणले.
**पणेत्वा**–(पू. क्रि.) दंड करून, न्याय देऊन, मार्गावर आणून.
**पण्डक**–(पु.) हिजडा, नामर्द, नपुंसक.
**पण्डर**–(वि.) श्वेत, पांढरा, सफेद, फिक्का, फिक्कट-पिवळा.
**पण्डर जातक**–सापांची गरूडांपासून स्वतःला वाचविण्याच्या युक्तीची कथा–(५१८).
**पण्डव**–(पु.) पाण्डव पर्वत, पांच पर्वत.
[सध्या राजगीर (राजगृह) जवळील पांच पर्वत १ गृध्रकूट, उदयगिरी, रत्नागिरी, सुवर्णगिरी, बायबरा हे ते पांच पर्वत].
**पण्डिच्च**–(नपु.) पांडित्य, विद्वत्ता.
**पण्डित**–(वि., पु.) पंडित, विद्वान.
**पण्डितक**–(पु.) बनावट पंडित, पंडिताचे सोंग घेतलेला, खोटा पंडित.
**पण्डु**–(वि.) पिवळा, पिवळसर.
**पण्डुकम्बल**–(नपु.) पिवळी शाल, पिवळी काम्बळी.
**पण्डुपलास**–(पु.) वाळलेले पान, पिकलेले पान, पिवळे पान.
**पण्डुरोग**–(पु.) पंडु रोग, (लहान मुलांना हा रोग झाल्यावर ती पिवळी दिसतात–हे रोगी माती खातात).

**पण्डुरोगी**–(पु.) पंडुरोग झालेला.
**पण्डुकम्बल सिलासन**–(नपु.) देवेन्द्र शक्राची बैठक-आसन.
**पण्डू**–(स्त्री.) दक्षिण भारतातील एक प्राचीन जमात, पाण्डय.
**पण्ण**–(नपु.) पान, पत्र, चिठ्ठी.
**पण्णक**–[पहा-पण्ण].
**पण्ण-कुटि**–(स्त्री.) पर्ण-कुटी, झोपडी, आश्रम.
**पण्ण-छत्त**–(नपु.) ताडपत्रांची छत्री, पानांचा पंखा, पाल्याचे छप्पर.
**पण्ण-सन्थर**–(पु.) पानांचे अंथरूण, चटई.
**पण्ण-साला**(स्त्री.) पर्णशाळा, आश्रम, झोपडी, कुटी.
**पण्णत्ति**–(स्त्री.) [पहा-पञ्ञत्ति, प्रज्ञप्ती].
**पण्णरस**–(सं.वि.) पंधरा, (१५).
**पण्णाकार**–(पु.) भेट, बक्षीस, देणगी, उपहार.
**पण्णास**–(सं. वि.) पन्नास, (५०)
**पण्णिक**–(पु.) पान विकणारा, तांबोळी.
**पण्णिक जातक**–एका वडिलाने आपल्या कन्येची सत्त्व, परीक्षा पाहिल्याची कथा–(१०२).
**पण्य**–[पहा–पणिय].
**पण्हि**–(पु., स्त्री.) टांच.
**पतङ्ग**–(पु.) पक्षी.
**पतति**–(क्रि.) पडणे, घसरणे.
**पति**–(पू. क्रि.) पडला, घसरला.
**पतित, पतन्त**–(कृ.) पडताना, घसरताना.
**पतित्त्वा**–(पू. क्रि.) पडून, घसरून.
**पतन**–(नपु.) पडणे, अधोगति.
**पतनु**–(वि.) फार अशक्त, हडकुळा.
**पताका**–(स्त्री.) झेंडा, ध्वज, निशाण.
**पताप**–(पु.) प्रताप, पराक्रम, तेजस्विता.
**पतापवन्तु**–(वि.) प्रतापी, पराक्रमी, तेजस्वी.
**पतापेति**–(क्रि.) तापविणे.
**पतापेसि**–(पू. क्रि.) तापविले.
**पतापित, पतापेन्त**–(कृ.) तापवितांना.
**पतापेतित्त्वा**–(पू. क्रि.) तापवून.
**पति**–(पु.) स्वामी नवरा.
**पतिकिट्ठ**–(वि.) निकृष्ठ, कमी प्रतीचा.
**पति-कुल**–(नपु.) नवऱ्याचे कूल, पतीचे पूर्वज.
**पतिट्ठहति**–(क्रि.) प्रतिष्ठित होणे, स्थापन होणे.
**पतिट्ठहि**–(पू. क्रि.) प्रतिष्ठित झाला, स्थापन झाला.
**पतिट्ठन्त**–(कृ.) प्रतिष्ठित होताना, स्थापन होताना
**पतिट्ठहित्त्वा**–(पू. क्रि.) प्रतिष्ठित होऊन, स्थापन होऊन.
**पतिट्ठा**–(स्त्री.) प्रतिष्ठा, सहायता, मदत, आश्रयस्थान.
**पतिट्ठातब्ब, पत्तिट्ठितब्ब**–(कृ.) प्रतिष्ठेस योग्य, स्थापन करण्यास योग्य.
**पतिट्ठाति**–[पहा–पतिट्ठहति].
**पतिट्ठासि**–(पू. क्रि.) प्रतिष्ठित झाला, स्थापन झाला.
**पतिट्ठित, पतिट्ठान्तु**–(कृ.) प्रतिष्ठित होतांना, स्थापन होताना.
**पतिट्ठाय**–(कृ.) प्रतिष्ठेस योग्य, स्थापण्यास लायक.
**पतिट्ठान**–(नपु.) प्रतिष्ठान, स्थापना.
**पतिट्ठापित**–(कृ.) प्रतिष्ठापित, स्थापन केलेला.
**पतिट्ठापेति**–(क्रि.) प्रतिष्ठित करणे, स्थापने.
**पतिट्ठापेसि**–(पू. क्रि.) प्रतिष्ठा केली, स्थापले.
**पतिट्ठापेन्त**–(कृ.) प्रतिष्ठा करताना, स्थापताना.
**पतिट्ठापेय**–(कृ.) प्रतिष्ठापनेस योग्य, स्थापण्यास योग्य.
**पतिट्ठापेत्त्वा**–(पू. क्रि.) प्रतिष्ठापून, स्थापून.
**पतिट्ठापेतु**–(पु.) स्थापन करणारा, संस्थापक.
**पतित**–(कृ.) अधोगति प्राप्त, पतन झालेला.
**पतितिट्ठति**–(क्रि.) उभा राहणे.
**पतिदान**–(नपु.) प्रतिदान, दुसरेदान, दानासाठी दान
**पतिबोध**–(पु.) प्रतिबोध, ज्ञान, जागरण, जागृति.
**पतिब्बता**–(स्त्री.) पतिव्रता, पतिभक्ती.
**पतिरूप**–[पहा–पटिरूप].
**पतिस्सत**–[पहा–पटिस्सत].
**पतीचि**–(स्त्री.) पश्चिम दिशा.
**पतीत**–(वि.) प्रसन्न-चित्त, आनंदी, उत्साही.
**पतीर**–(नपु.) किनारा, काठ, तट.
**पतोद**–(पु.) बैलांना हाकण्याची काठी, दांडके, छडी.
**पतोदक**–(नपु.) प्रेरणा.
**पतोदक**–(वि.) प्रेरक, प्रेरणा देणारा.
**पतोदक-लठिठ्**–(स्त्री.) जनावरांना हाकण्याची लाठी-काठी.
**पत्त**–(कृ.) प्राप्त, मिळालेला.
**पत्त**–(पु.) पात्र, योग्य, लायक, भिक्षापात्र-भांडे.
**पत्त**–(नपु.) पान, पंख.
**पत्तक्खन्ध**–(वि.) निराश, नाराज, दुःखी.
**पत्तगत**–(वि.) नदीच्या पात्रात गेलेला, पात्रात पडलेला.
**पत्त-गन्ध**–(पु.) पानांचा वास, सुवासिक पान, पानांचा सुगंध.

**पत्त-गाहक**–(पु.) दुसऱ्याचे शिक्षापात्र घेऊन जाणारा.
**पत्त-थविका**–(स्त्री.) भिक्षा पात्राची झोळी.
**पत्त-पाणि**–(वि.) भिक्षापात्र हातात असलेला.
**पत्त-पिण्डिक**–(वि.) एकाच पात्रात जेवणारा.
**पत्तदान**–(पु.) पक्षी.
**पत्तन**–[पहा–पट्टन].
**पत्तब्ब**–(कृ.) प्राप्त करण्यास योग्य, घेण्यास लायक.
**पत्ताधारक**–(पु.) पात्राचा आधार.
**पत्तानीक**–(नपु.) चौघा-चौघांची पायदळ सेना-चौघा-चौघांची ओळ-मिरवणूक.
**पत्तानुमोदना**–(स्त्री.) मिळविलेल्या पुण्याचे दान, (देवांना व स्वर्गस्थ संबंधितांना देण्याचे दान).
**पत्ति**–(पु.) पायदळ सैनिक.
**पत्ति**–(स्त्री.) पान, पानाचा देठ.
**पत्तिक**–(वि.) भागीदार, पायदळ सैनिक, पात्रवाला.
**पत्ति-दान**–(नपु.) पुण्य अगर आपल्या हिस्स्याचे दान.
**पत्ती**–(पु.) बाण, धनुष्याचा तीर.
**पत्तुन्न**–(नपु.) वस्त्र, विजार.
**पत्तुं**–(कृ.) प्राप्तीसाठी, मिळविण्यासाठी.
**पत्थ**–(पु.) प्रस्थ, धान्याचे किंवा पातळ पदार्थाचे माप, एकान्त स्थान.
**पत्थट**–(कृ.) ज्ञात, प्रसिद्ध, विख्यात, कीर्तिमान, पसरलेला.
**पत्थद्ध**–(वि.) कठोर, कठीण,शिखराप्रमाणे, सरळ उभा.
**पत्थना**–(स्त्री.) प्रार्थना, कामना, इच्छा, मागणे.
**पत्थयति**–(क्रि.) प्रार्थना करणे, इच्छा करणे, मागणे.
**पत्थयि**–(पू. क्रि.) प्रार्थना केली, इच्छा केली, मागितले.
**पत्थयन्त, पत्थित**–(कृ.) प्रार्थना करता, इच्छिता, मागता.
**पत्थयित्त्वा**–(पू. क्रि.) प्रार्थना करून, इच्छून, मागून.
**पत्थयान**–(वि.) इच्छिता, कामना करता.
**पत्थर**–(पु.) दगड, शिळा, दगडी सामान.
**पत्थरति**–(क्रि.) पसरणे.
**पत्थरि**–(पू. क्रि.) पसरले.
**पत्थट, पत्थरन्त**–(कृ.) पसरताना.
**पत्थरित्त्वा**–(पू. क्रि.) पसरून.
**पत्थिव**–(पु.) पार्थिव, राजा.
**पत्थेति**–(क्रि.)–[पहा–पत्थयति].
**पत्थेसि**–(पू. क्रि.) प्रार्थना केली, इच्छा केली, कामना केली.
**पत्थित, पत्थेन्त**–(कृ.) प्रार्थना करता, इच्छिता, कामना करता.
**पत्थेत्त्वा**–(पू. क्रि.) प्रार्थना करून, इच्छा करून, कामना करून.
**पत्वा**–(पू. क्रि.) प्राप्त करून, मिळवून.
**पथ**–(पु.) मार्ग, रस्ता, [(गणन-पथ पु.)–मोजणे.].
**पथवी**–[पहा–पठवी].
**पथावी**–(पु.) पथिक, प्रवासी, वाटसरू, यात्री.
**पथिक**–(पु.) वाटसरू, प्रवासी.
**पथित**–(वि.) प्रसिद्ध.
**पद**–(नपु.) पाय, वचन, पदवी, स्थान, हेतु, कवितेचा भाग, काव्य, चार ओळींचे कडवे.
**पद-चेतिय**–(नपु.) पवित्र पाऊल, पावलाचे चिन्ह, पाद-चैत्य.
**पद-जात**–(नपु.) अनेक प्रकारची पावलांची चिन्हे.
**पदट्ठान**–(नपु.) जवळचे कारण, जवळिकेमुळे.
**पद-पूरण**–(नपु.) पदाची, चरणाची पूर्ती होते.
**पद-भाणक**–(वि.) धर्मग्रंथांच्या गाथांचे पठण करणारा.
**पद-वण्णना**–(स्त्री.) पदांची व्याख्या, अर्थ.
**पद-वलञ्ज**–(नपु.) पावलांची चिन्हे-ठसे, माग, चिन्हे उठलेला रस्ता.
**पद-विभाग**–(पु.) शब्दांचा विभाग, वर्ग.
**पद-वीतिहार**–(पु.) पावलांचे परिवर्तन, पाऊल बदलले.
**पद-सद्द**–(पु.) पावलांची चाहूल, पावलांचा आवाज.
**पद कुसल माणव जातक**–बारा वर्षांनंतरसुद्धा पावलांच्या खुणा ओळखू शकल्याची कथा–(४३२).
**पदक्खिणा**–(स्त्री.) प्रदक्षिणा.
**पदग**–(पु.) पायदळ सैन.
**पदत्त**–(कृ.) दिले गेले, वाटले गेले.
**पदर**–(नपु.) भेग, छेद, भोक, फाटलेला भाग.
**पदवि**–(स्त्री.) मार्ग.
**पदहति**–(क्रि.) प्रयत्न करणे, विरुद्ध लढणे.
**पदहि**–(पू. क्रि.) प्रयत्न केला, विरुद्ध लढला.
**पदहित**–(कृ.) प्रयत्न करताना, विरुद्ध लढताना.
**पदहित्त्वा**–(पू. क्रि.) प्रयत्न करून, विरुद्ध लढून.
**पदहन**–[पहा–पधान].
**पदावते**–(कृ.) देण्यासाठी, देण्याकरितां.
**पदाति**–(पु.) पायदळ सैन्य.
**पदाति**–(क्रि.) देणे, घेणे, मिळविणे.
**पदातु**–(पु.) दाता, देणगीदार.
**पदान**–(नपु.) प्रदान, देणे.

**पदाळन**–(नपु.) चिरणे, फाडणे, चिपटणे, लपेटणे, गुंडाळणे.
**पदाळेति**–(क्रि.) चिरणे, फाडणे, चिपटणे.
**पदाळेसि**–(पू. क्रि.) चिरले, फाडले, चिपडले.
**पदाळित, पदाळेन्त**–(कृ.) चिरतांना, फाडतांना, चिपटतांना.
**पदाळेत्वा**–(पू. क्रि.) चिरून, फाडून, चिपटून.
**पदाळेतु**–(पु.) चिरणारा, फाडणारा, तोडणारा, मोडणारा.
**पदिक**–(वि.) काव्यात्मक–पथिक, वाटसरू.
**पदिप्पति**–(क्रि.) जळणे, पेटणे, प्रदिप्त होणे.
**पदिप्पि**–(पू. क्रि.) जळले, पेटले, प्रदिप्त झाले.
**पदिप्पमान**–(कृ.) जळता, पेटता, प्रदिप्त होता.
**पदित्त**–(कृ.) जळत. पेटत, प्रदिप्त होत.
**पदिस्सति**–(क्रि.) दिसणे, प्रदर्शित होणे.
**पदिट्ठ**–(कृ.) पाहिले गेले, पाहता.
**पदिस्समान**–(कृ.) दिसत असता, बघत असता.
**पदीप**–(पु.) प्रदीप, दिवा, ज्योत, प्रकाश.
**पदीप-काल**–(पु.) दिवे लागण, दिवा लावण्याची वेळ-काळ.
**पदीपिय**–(नपु.) सांजवातीचे साहित्य.
**पदीपेति**–(क्रि.) दिवा लावणे, ज्योत पेटविणे, समजाविणे, दाखविणे.
**पदीपेसि**–(पू. क्रि.) दिवा लावला, ज्योत पेटविली, समजाविले, दाखविले.
**पदीपित, पदीपेन्त**–(कृ.) दिवा लावतांना, ज्योत पेटविताना, समजाविताना, दाखविताना.
**पदीपेत्वा**–(पू. क्रि.) दिवा लावून, ज्योत पेटवून, समजावून, दाखवून.
**पदीपेय्य**–[पहा–पदीपीय].
**पदीयति**–(क्रि.) देणे, प्रदान करणे.
**पदीयि**–(पू. क्रि.) दिले, प्रदान केले.
**पदिन्न**–(कृ.) देताना, प्रदान करताना.
**पदीयित्वा**–(पू. क्रि.) देऊन, प्रदान करून.
**पदुट्ठ**–(कृ.) विकृत, खराब, प्रदुष्ट.
**पदुब्भति**–(क्रि.) कारस्थान रचणे, चूक करणे, गुप्तकट करणे, रचणे .
**पदुब्भि**–(पू. क्रि.) कारस्थान रचले, चूक केली, कट केला.
**पदुब्भित**–(कृ.) कारस्थान रचतांना, चूक करतांना, कट करताना.
**पदुब्भित्वा**–(पू .क्रि.) कारस्थान रचून, चूक करून, कट करून.
**पदुम**–(नपु.) कमल, गाळ, एकसंख्या पद्म.
**पदुम-कण्णिका**–(स्त्री.) कमळाचा बीजांड कोष, बीजकोष.
**पदुम-कलाप**–(पु.) कमळांचा समूह.
**पदुम-गब्भ**–(पु.) कमळाचा आतील भाग, कमळ गर्भ.
**पदुम-पत्त**–(नपु.) कमळाचे पान.
**पदुम-राग**–(पु.) लाल रंगाचे रत्न, लाल.
**पदुम-सर**–(पु., नपु.) कमळांचा तलाव, कमळ सरोवर.
**पदुम जातक**–बोधिसत्त्वाला सरोवरातून कमळे आणण्यात यश मिळाल्याची कथा–(२६१).
**पदुमिनी**–(स्त्री.) कमळाची वेली, कमळाचे तळे.
**पदुमिनी-पत्त**–(नपु.) कमळ वेलीचे पान.
**पदुमी**–(वि.) कमळवाला, कमळाचा.
**पदुमी**–(वि., पु.) पदुमी हत्ती.
**पदुस्सति**–(क्रि.) वाईट करणे, भ्रष्ट करणे, रागावणे, दूषित करणे.
**पदुस्सि**–(पू. क्रि.) वाईट केले, भ्रष्ट केले, रागावले, दुषित केले.
**पदुट्ठ**–(कृ.) वाईट करता, भ्रष्ट करता, रागावता, दुषित करता.
**पदुस्सित्वा**–(पू. क्रि.) वाईट करून, भ्रष्ट करून, रागावून, दुषित करून.
**पदेस**–(पु.) प्रदेश, भाग, स्थान.
**पदेसञ्ञाण**–(नपु.) अपुरे ज्ञान, मर्यादित ज्ञान, कोतीबुद्धी.
**पदेस-रज्ज**–(नपु.) प्रदेश राज्य.
**पदेस-राजा**–(पु.) भागाचा राजा, प्रदेशाचा राजा.
**पदेसन**–(नपु.) भेट किंवा परित्याग.
**पदोस**–(पु.) प्रदोष (रात्र), क्रोध, राग, दोष,
**पदोसेति**–[पहा–पदूसेति].
**पद्म**–[पहा–पदुम].
**पधंस**–(पु.) विध्वंस, नाश, विनाश, प्रध्वंश.
**पधंसन**–(नपु.) लूट-मार.
**पधंसित**–(कृ.) लूटमार केली गेली.
**पधंसिय**–(वि.) लूट-मार करण्याचा विचार करणारा.
**पधंसेति**–(क्रि.) लूट-मार करणे, आक्रमण करणे, दरोडा घालणे.
**पधंसेसि**–(पू. क्रि.) लूट-मार केली, आक्रमण केले, दरोडा घातला.
**पधंसित, पधंसेन्त**–(कृ.) लूटमार करता, आक्रमण करता, दरोडा घालता.

**पधंसेत्वा**–(पू. क्रि.) लूटमार करून, आक्रमण करून, दरोडा घालून.
**पधान**–(वि.) प्रधान, मुख्य, प्रमुख.
**पधान**–(नपु.) प्रयास, प्रयत्न.
**पधान-घर**–(नपु.) योगाभ्यास करण्याचे ठिकाण.
**पधान-घर**–(वि.) मुख्य कार्यालय.
**पधानिक**–(वि.) योगाभ्यासाचा प्रयत्न करणारा.
**पधावति**–(क्रि.) पळणे, धावणे.
**पधावि**–(पू. क्रि.) पळाला, धावला.
**पधावित**–(कृ.) पळताना, धावताना.
**पधावित्वा**–(पू. क्रि.) पळून, धावून.
**पधावन**–(नपु.) धाव, दौड.
**पधूपेति**–(क्रि.) धूर करणे, धूर पसरणे,-[पहा-धूपेति].
**पधूपेसि**–(पू. क्रि.) धूर केला, धूर पसरला.
**पधूपित**–(कृ.) धूर करताना, धूर पसरताना.
**पधूपेन्त**–(कृ.) धूर करता, धूर पसरता.
**पधूपेत्वा**–(पू. क्रि.) धूर करून, धूर पसरून.
**पधोत**–(कृ.) स्वच्छ, धुतलेला, तीक्ष्ण धार लावलेला.
**पन**–(अ.) आणि, आता, परंतु, च्याविरूद्ध, यावेळी, याखेरीज.
**पनस**–(पु.) फणस, फणसाचे झाड.
**पनस्सति**–(क्रि.) नाश पावणे, नष्ट होणे.
**पनस्सि**–(पू. क्रि.) नाश पावले, नष्ट झाले.
**पनट्ठ**–(कृ.) नाश पावताना, नष्ट होताना.
**पनस्सित्वा**–(पू. क्रि.) नाश पावून, नष्ट होऊन.
**पनाळिका**–(स्त्री.) नाली, नळी, पाण्याचा लहान पाट.
**पनुदति**–(क्रि.) दूर सारणे, हटविणे, ढकलणे.
**पनुदि**–(पू. क्रि.) दूर सारले, हटविले, ढकलले.
**पनुदित**–(कृ.) दूर सारता, हटविता, ढकलता.
**पनुदिय, पनुदिमान**–(कृ.) दूर सारण्यायोग्य, हटविण्यायोग्य, ढकलण्यायोग्य.
**पनुदित्वा**–(पू. क्रि.) दूर सारून, हटवून, ढकलून.
**पनुदन**–(नपु) दूर लोटणे, हटविणे, ढकलणे.
**पनूदन**–(नपु.) न घेणे, अस्वीकार.
**पन्त**–(वि.) दूर, लांब, एकान्त.
**पन्त-सेनासनं**–(नपु.) एकांत स्थान, शांत ठिकाण.
**पन्ति**–(स्त्री.) पंक्ति, ओळ, चरण.
**पन्थ**–(पु.) मार्ग, रस्ता सडक, वाट.
**पन्थक**–(पु.) प्रवासी, वाटसरू, यात्री.
**पन्थ-घात**–(पु.) वाटमारी, लूटमार.
**पन्थ-घातक**–(पु.) वाटमार करणारा, रस्त्यावर लूटमार करणारा, डाकू, लुटारू.
**पन्थ-दूहन**–(नपु.) लूटमार करणे, रस्त्यावर लुटणे.
**पन्थिक**–[पहा-पन्थक].
**पन्न**–(कृ.) पडलेला, पतित.
**पन्नक्खन्ध**–[पहा पत्तक्खन्ध].
**पन्न-भार**–(वि.) ओझे उतरून ठेवलेला, ओझे फेकलेला.
**पन्न-लोम**–(वि.) पराजित, ज्याचे केस गळून पडले आहेत.
**पन्नग**–(पु.) साप.
**पय**–(नपु.) पाणी, जल, नीर, तोय.
**पपञ्च**–(पु.) प्रपंच, अडथळा, झगडा, भांडण, भ्रम, विलंब, आरोप.
**पपञ्चेति**–(क्रि.) भांडणे, विलंब करणे, अर्थ लावणे.
**पपञ्चेसि**–(पू. क्रि.) भांडले, विलंब केला, अर्थ लावला.
**पपञ्चित**–(कृ.) भांडताना, विलंब करताना, अर्थ लावताना.
**पपञ्चेत्वा**–(पू. क्रि.)भांडून, विलंब करून, अर्थ लावून.
**पपटिका**–(स्त्री.) झाडाची साल, पापडी.
**पपतति**–(क्रि.) खाली पडणे.
**पपति**–(पू. क्रि.) खाली पडला.
**पपतित**–(कृ.) खाली पडताना.
**पपतित्वा**–(पू. क्रि.) खाली पडून.
**पपतन**–(न.पु) पतन, अधोगति.
**पपद**–(पु.) पायाचा पंजा, तळपाय.
**पपा**–(स्त्री.) विहीर, आड, पेव.
**पपात**–(पु.) प्रपात, धबधबा, वरून पडणारा प्रवाह.
**पपितामह**–(पु.)आजोबांचे वडील, पणजोबा.
**पपुत्त**–(पु.) मुलाचा मुलगा, नातू.
**पपुन्नाट**–(पु.) फूल गळल्यानंतर फळांचा कोष.
**पप्पटक**–(पु.) खडा, दगडाचा तुकडा, कुत्र्याची छत्री.
**पप्पोठेति**–(क्रि.) मारणे, बडविणे, झोडपणे.
**पप्पोठेसि**–(पू. क्रि.) मारले, बडविले, झोडपले.
**पप्पोठित**–(कृ.) मारताना, बडविताना, झोडपताना.
**पप्पोठेत्वा**–(पू. क्रि.) मारून, बडवून, झोडपून.
**पप्पोति**–(क्रि.) मिळणे, पोहोचणे.
**पप्पुय्य**–(कृ.) मिळण्यायोग्य, पोहोचण्यालायक.
**पप्पोसि**–(पू. क्रि.) मिळाले, पोहोचले.
**पप्पोत**–(कृ.) मिळता, पोहोचता.
**पप्पोतित्वा**–(पू. क्रि.) मिळून, पोहोचून.
**पप्फास**–(नपु.) फुप्फुस.

**पबन्ध**–(पु.) प्रबन्ध, साहित्यिक रचना, मोठा निबंध, मुद्देसूद मांडणी.

**पबल**–(वि.) प्रबळ, मोठा, शक्तिमान.

**पबुज्झति**–(क्रि.) जागणे, जाणणे, समजणे, कळणे.

**पबुज्झि**–(पू. क्रि.) जागले, जाणले, समजले, कळले.

**पबुद्ध**–(कृ.) प्रबुद्ध, जागृत.

**पबोधन**–(नपु.) जागृती, प्रबोधन.

**पबोधेति**–(क्रि.) जागृत करणे, प्रबोधन करणे.

**पबोधेसि**–(पू. क्रि.) जागृत केले, प्रबुद्ध केले.

**पबोधित, पबोधेन्त**–(कृ.) जागृत करता, प्रबुद्ध करता.

**पबोधेत्वा**–(पू. क्रि.) जागृत करून, प्रबुद्ध करून, शिकवून.

**पब्ब**–(स्त्री.) गाठ.

**पब्ब**–(नपु.) बोटाचे पेर, कांडे, हिस्सा, भाग.

**पब्बजति**–(क्रि.) प्रव्रजित होणे, संन्यासासाठी घर सोडणे.

**पब्बजि**–(पू. क्रि.) प्रव्रजित झाला, संन्यासासाठी घर सोडले.

**पब्बजित, पब्बजन्त**–(कृ.) प्रव्रजित होता, संन्यासासाठी घर सोडता.

**पब्बजित्वा**–(पू. क्रि.) प्रव्रजित होऊन, संन्यासासाठी घर सोडून.

**पब्बजन**–(नपु.) प्रव्रज्या, गृहस्थी जिवनाचा त्याग, संन्यास.

**पब्बज्जा**–(स्त्री.) प्रव्रज्या, संन्यास.

**पब्बजित**–(कृ.) प्रव्रजित झालेला, संन्यास घेतलेला.

**पब्बजित**–(पु.) प्रव्रजित, साधु, संन्यासी.

**पब्बत**–(पु.) पर्वत, पहाड, डोंगर.

**पब्बत-कूट**–(नपु.) पर्वत, शिखर, डोंगराचे शिखर.

**पब्बत-गहन**–(नपु.) डोंगरी प्रदेश, डोंगराळ भाग.

**पब्बतट्ठ**–(वि.) पहाडी, डोंगरी, डोंगरात राहणारे.

**पब्बत-पाद**–(पु.) डोंगराच्या पायथ्याचा प्रदेश, तराई.

**पब्बत-शिखर**–(नपु.) पर्वत-शिखर.

**पब्बतुपत्थर जातक**–एका राजदरबारी व्यक्तीने राजाच्या महालात अनैतिक वर्तन केले. राजाने त्याची उपेक्षा केल्याची कथा–(१९५).

**पब्बतेय्य**–(वि.) पर्वतीय, डोंगराळ, पर्वतावर रहाणारा.

**पब्बाजन**–(नपु.) ताडीपार करणे, हद्दपार करणे, राज्याबाहेर घालविणे, प्रव्रजित करणे.

**पब्बाजनीय**–(वि.) हद्दपार करण्यालायक, घालविण्यालायक.

**पब्बाजेति**–(क्रि.) हद्दपार करणे, प्रव्रजित करणे.

**पब्बाजेसि**–(पू. क्रि.) हद्दपार केले, प्रव्रजित केले.

**पब्बाजित**–(कृ.) हद्दपार करता, प्रव्रजित करता.

**पब्बाजेत्वा**–(पू. क्रि.) हद्दपार करून, प्रव्रजित करून.

**पब्भार**–(पु.) पर्वत उतार, डोंगराची उतरण.

**पभग्ग**–(कृ.) तुटलेला, नष्ट झालेला, फुटलेला.

**पभङ्कर**–(पु.) प्रभाकर, सूर्य, रवि.

**पभङ्गु**–(वि.) अनित्य, नाशिवंत, नष्ट होणारे.

**पभङ्गुर**–[पहा-पभङ्गु].

**पभव**–(पु.) उत्पत्ती, मूळ, मूळ ठिकाण.

**पभवति**–(क्रि.) उत्पन्न होणे, समर्थ होणे.

**पभवि**–(पू. क्रि.) उत्पन्न झाले, समर्थ झाला.

**पभवित**–(कृ.) उत्पन्न होता, समर्थ होता.

**पभवित्वा**–(पू. क्रि.) उत्पन्न होऊन, समर्थ होऊन.

**पभस्सर**–(वि.) तेजस्वी, अति चमकदार.

**पभा**–(स्त्री.) प्रभा, तेज, प्रकाश.

**पभात**–(कृ.) स्वच्छ, सतेज, चमकदार, तेजस्वी, प्रकाशमान.

**पभात**–(नपु.) प्रभात, सकाळ, प्रातःकाल.

**पभाव**–(पु.) प्रभाव, सामर्थ्य, तेजस्विता.

**पभावित**–(कृ.) प्रभावित, प्रोत्साहित, उद्युक्त.

**पभावेति**–(क्रि.) प्रभावित करणे, प्रोत्साहित करणे, उत्तेजित करणे.

**पभास**–(पु.) प्रकाश, तेज, चमक.

**पभासति**–(क्रि.) चमकणे, प्रकाशणे.

**पभासि**–(पू. क्रि.) चमकले, प्रकाशले.

**पभासन्त**–(कृ.) चमकता, प्रकाशता.

**पभासित्वा**–(पू. क्रि.) चमकून, प्रकाशून.

**पभासेति**–(क्रि.) प्रकाशित करणे.

**पभासेसि**–(पू. क्रि.) प्रकाशित केले.

**पभासित, पभासेन्त**–(कृ.) प्रकाशित करता.

**पभासेत्वा**–(पू. क्रि.) प्रकाशित करून.

**पभिज्जति**–(क्रि.) तुटणे, फुटणे, छिन्न-भिन्न होणे.

**पभिज्जि**–(पू. क्रि.) तुटले, फुटले, छिन्न-भिन्न झाले.

**पभिज्जमान**–(कृ.) तुटता, फुटता, छिन्न-भिन्न होता.

**पभिज्जित्वा**–(पू. क्रि.) तुटून, फुटून, छिन्न-भिन्न होऊन.

**पभिज्जन**–(नपु.) वेगळे, विभक्त, तुटक.

**पभिन्न**–(कृ.) तुटता, फुटता, भिन्न होता.

**पभु, पभू**–(पु.) प्रभु, स्वामी, मालक, धनी.

**पभुति**–(अ.) प्रभृति, इत्यादि,
[ततो-पभुति—तेव्हा पासून].

**पभुत्त**–(नपु.) प्रभुत्त्व, मालकी हक्क.
**पभेद**–(पु.) प्रभेद, प्रकार, विशिष्ठ प्रकार, वेगळा प्रकार.
**पभेदन**–(नपु.) वाटप, बटवडा.
**पभेदन**–(वि.) विनाशक, विनाश करणारा.
**पमज्जति**–(क्रि.) निष्काळजीपणे वागणे, बेपर्वाई करणे, प्रमाद करणे, व्यसनात गुरफटणे.
**पमज्ज**–(वि.) प्रमत्त, उद्दाम, व्यसनी, निष्काळजी.
**पमत्त**–(वि.) प्रमत्त, उद्दाम, व्यसनी, निष्काळजी.
**पमज्जि**–(पू. क्रि.) निष्काळजीपणे वागलेला, बेपर्वाई केलेला, प्रमाद केलेला, व्यसनाधीन झालेला.
**पमज्जिय**–(पू. क्रि.) [पहा-पमज्जि].
**पमज्जितुं**–(कृ.) निष्काळजी असलेला, बेपर्वाई असणारा, प्रमाद करणारा, व्यसनी.
**पमज्जित्वा**–(पू. क्रि.) निष्काळजीपणा करून, बेपर्वाई करून, प्रमाद करून, व्यसने करून.
**पमज्जना**–(स्त्री.) प्रमाद, विलंब, उशीर.
**पमत्त**–(कृ.) प्रमादी, आळसी, व्यसनी, दुर्वतनी.
**पमत्त-बन्धु**–(पु.) प्रमादींचा मित्र, अर्थात मार.
**पमथति**–(क्रि.) स्वाधीन करणे, ताब्यात देणे.
**पमत्थि**–(पू. क्रि.) स्वाधीन केले, ताब्यात दिलेले.
**पमत्थित**–(कृ.) स्वाधीन करताना, ताब्यात देताना.
**पमत्थित्वा**–(पू. क्रि.) स्वाधीन करून, ताब्यात देऊन.
**पमदा**–(स्त्री.) स्त्री, ललना, महिला.
**पमदा-वन**–(नपु.) स्त्रीयांना आवडणारी बाग, महाला-जवळील उद्यान.
**पमद्दति**–(क्रि.) चोळणे, नष्ट करणे, पराजित करणे.
**पमद्दि**–(पू. क्रि.) चोळलेले, नष्ट केलेले, पराजित केलेले.
**पमद्दित**–(कृ.) चोळताना, नष्ट करताना, पराजित करताना.
**पमद्दित्वा**–(पू. क्रि.) चोळून, नष्ट करून, पराजित करून.
**पमद्दन**–(नपु) मर्दन, चोळणे, जिंकणे.
**पमद्दी**–(पु.) चोळणारा, विजय मिळविणारा.
**पमा**–(स्त्री.) माप.
**पमाण**–(नपु) प्रमाण, माप, मर्यादा.
**पमाणक**–(वि.) मोजणारा, मापाड्या.
**पमाणिक**–(वि.) मापाप्रमाणे, मापानुसार.
**पमाप**–(पु.) प्रमाद, निष्काळजी, बेपर्वा, व्यसन.
**पमाद-पाठ**–(नपु.) पुस्तकांतील सदोष पाठ-धडा, चुकीचा धडा.
**पमिणाति**–(क्रि.) मापणे, मोजणे, अंदाज करणे.
**पमिणि**–(पू. क्रि.) मापलेले, मोजलेले, अंदाज केलेले.
**पमिणत**–(कृ.) मापताना, मोजताना, अंदाज करता.
**पमिणित्वा, पमित्वा**–(पू. क्रि.) मापून, मोजून, अंदाज करून.
**पमुख**–(वि.) प्रमुख, मुख्य, कर्ता, कारभारी.
**पमुख**–(नपु.) घराचा दर्शनी भाग, पुढील भाग.
**पमुच्चति**–(क्रि.) मुक्त करणे, मोकळे करणे, स्वातंत्र्य देणे.
**पमुच्चि**–(पू. क्रि.) मुक्त केले, मोकळे केले, स्वातंत्र्य दिले.
**पमुच्च, पमुत्त**–(कृ.) मुक्त करता, मोकळे करता, स्वातंत्र्य देता.
**पमुच्चित्वा**–(पू. क्रि.) मुक्त करून, मोकळे करून, स्वातंत्र्य देऊन.
**पमुच्छति**–(क्रि.) मूर्च्छित होणे, बेशुद्ध होणे.
**पमुच्छि**–(पू. क्रि.) मूर्च्छित झाला, बेशुद्ध झाला.
**पमुच्छित**–(कृ.) मूर्च्छित होताना, बेशुद्ध होत असता.
**पमुच्छित्वा**–(पू. क्रि.) मूर्च्छित होऊन, बेशुद्ध होऊन.
**पमुञ्चति**–(क्रि.) सोडणे, मोकळे करणे.
**पमुञ्चि**–(पू. क्रि.) सोडले, मोकळे केले.
**पमुञ्चित, पमुत्त**–(कृ.) सोडताना, मोकळे करताना.
**पमुञ्चिय**–(कृ.) सोडण्यायोग्य, मुक्त करण्यायोग्य.
**पमुञ्चित्वा**–(पू. क्रि.) सोडून, मोकळे करून.
**पमुट्ठ**–(कृ.) भुललेला, विसरलेला.
**पमुत्त**–[पहा–पमुञ्चति].
**पमुत्ति**–(स्त्री.) मोक्ष, मुक्ति.
**पमुदित**–(कृ.) प्रमोदित, अति आनंदित.
**पमुय्हति**–(क्रि.) मोहित होणे, आकर्षित होणे.
**पमुय्हि**–(पू. क्रि.) मोहित झाला, आकर्षित झाला.
**पमुय्ह, पमूळ्ह**–(कृ.) मोहित होता, आकर्षित होता.
**पमुय्हित्वा**–(पू. क्रि.) मोहित होऊन, आकर्षित होऊन.
**पमुस्सति**–(क्रि.) विसरणे.
**पमुस्सि**–(पू. क्रि.) विसरला.
**पमुस्स, पमुट्ठ**–(कृ.) विसरलेला, विसरताना.

**पमुस्सित्त्वा**–(पू. क्रि.) विसरून.
**पमूळ्ह**–(कृ.) मोहित झालेला, मोहित होता.
**पमेय्य**–(वि.) मोजले जाऊ शकेल, मर्यादित केले जाईल, सामित केले जाईल, प्रमेय्य.
**पमोक्ख**–(पु.) मोक्ष, मुक्ती.
**पमोचन**–(नपु.) मुक्त करणे.
**पमोचेति**–(क्रि.) मुक्त करणे, मोकळे करणे, सोडणे.
**पमोचेसि**–(पू. क्रि.) मोकळे केले, सोडले, मुक्त केले.
**पमोचित**–(कृ.) मोकळा, सोडलेला, सोडताना.
**पमोचेत्वा**–(पू. क्रि.) मोकळा करून, सोडून.
**पमोद**–(पु.) आनंद, प्रीती, हर्ष.
**पमोदति**–(क्रि.) आनंदित होणे, हर्षित होणे.
**पमोदि**–(पू. क्रि.) आनंदित झाला, हर्षित झाला.
**पमोदित**–(कृ.) आनंदित झालेला, हर्षित झालेला.
**पमोदमान**–(कृ.) आनंदण्यायोग्य, हर्षित होण्यायोग्य.
**पमोदित्त्वा**–(पू. क्रि.) आनंदुन, हर्षित होऊन, प्रीतीने.
**पमोदना**–(स्त्री.) [पहा–पमोद].
**पमोहन**–(नपु.) धोका.
**पमोहेति**–(क्रि.) धोका देणे.
**पमोहेसि**–(पू. क्रि) धोका दिला.
**पमोहित**–(कृ.) धोका देताना, धोका दिलेला.
**पमोहेत्वा**–(पू. क्रि.) धोका देऊन.
**पम्पक**–(पु.) घारपड.
**पम्पटक**–(पु.) पाल.
**पम्ह**–(नपु.) पापणीचा केस.
**पय**–(पु., नपु.) पाणी, दूध.
**पयत**–(कृ.) संयत, संयमी.
**पयतन**–(नपु.) प्रयत्न.
**पयाग**–(नपु.) गंगा-यमुनेच्या संगमावरील शहर, प्रयाग किंवा अलाहाबाद.
**पयाग-तित्थ**–(नपु.) प्रयाग तीर्थ, संगमावरील तीर्थक्षेत्र.
**पयाग-पतिट्ठान**–प्रयाग प्रतिष्ठान [पहा–पयाग].
**पयाति**–(क्रि.) पुढे जाणे.
**पयासि**–(पू. क्रि.) पुढे गेला.
**पयात**–(कृ.) पुढे जात असता, पुढे गेलेला.
**पयासित्त्वा**–(पू. क्रि.) पुढे जाऊन.
**पयिरूपासति**–(क्रि.) संगतीत असणे, सेवा करणे.
**पयिरूपासि**–(पू. क्रि.) संगतीत असलेला, सेवा केलेला.
**पयिरूपासित**–(कृ.) संगतीत असता, सेवा करता.
**पयिरूपासित्त्वा**–(पू. क्रि.) संगतीत असून, सेवा करून.
**पयिरूपासना**–(स्त्री.) सेवा करणे, संगत-सोबत-मैत्री करणे.
**पयुञ्जति**–(क्रि.) निवडणे, लावणे.
**पयुञ्जि**–(पू. क्रि.) निवडले, लावले.
**पयुत्त**–(कृ.) निवडताना, लावताना.
**पयुञ्जमान**–(कृ.) निवडण्यायोग्य, लावण्यायोग्य.
**पयुञ्जित्त्वा**–(पू. क्रि.) निवडून, लावून.
**पयुत्तक**–(वि.) चालणारा, चर-पुरुष.
**पयोग**–(पु.) प्रयोग, साधन, क्रिया.
**पयोग-करण**–(नपु.) प्रयास, प्रयत्न.
**पयोग-विपत्ति**–(स्त्री.) असफलता, अपयश, पराजय.
**पयोग-सम्पत्ति**–(स्त्री.) सफलता, यश, जय.
**पयोजक**–(पु.) व्यवस्थापक, निर्देशक.
**पयोजन**–(नपु.) प्रयोजन, कार्य, कारण.
**पयोजेति**–(क्रि.) कामास लावणे.
**पयोजेसि**–(पू. क्रि.) कामास लावले.
**पयोजित, पयोजेन्त**–(कृ.) कामास लावता.
**पयोजिय**–(कृ.) कामास लावण्यायोग्य.
**पयोजेत्वा**–(पू क्रि.) कामास लावून.
**पयोजेतु**–(पु.) [पहा–पयोजक].
**पयोधर**–(पु.) पाण्याचा ढग, दुधाचे स्तन.
**पय्यक**–(पु.) पणजोबा, प्रपितामह.
**पर**–(वि.) दुसरा, परका.
**पर-कत**–(वि.) पर-कृत, दुसऱ्याने केलेले.
**पर-कार, परङ्कार**–(वि.) वेगळेपणा, अहंकाराविरुद्ध-उलट.
**पर-जन**–(पु.) परका मनुष्य, अनोळखी, बाहेरचा माणूस.
**परत्थ**–(पु.) परोपकार.
**परत्थ**–(अ.) अन्यत्र, मरणोत्तर, मृत्युनंतर.
**परदत्तूपजीवी**–(वि.) दुसऱ्यांच्या दानावर जगणारा, परावलंबी.
**पर-दार**–(पु.) दुसऱ्याची बायको, पत्नी.
**पर-दार-कम्म**–(नपु.) परस्त्रीगमन, व्यभिचार, मिथ्याचार.
**पर-दारिक**–(पु.) व्यभिचार करणारा, परस्त्रीगमन करणारा.
**परनेय्य**–(वि.) दुसऱ्याकरवी घेऊन जाणारा, दुसऱ्यामार्फत नेणारा.
**पर-जातक**–राजा आणि पुरोहित यांच्या गैरहजेरीत राणीने परन्तप नावाच्या नोकराबरोबर सहवास (संभोग) केल्याची कथा–(४१६).

**पर-पच्चय**–(वि.) परावलंबी, दुसऱ्यावर अवलंबून असलेला.

**पर-पत्तिय**–(वि.) परावलंबी, दुसऱ्याचा आश्रित.

**पर-पुट्ठ**–(वि.) दुसऱ्याकरवी पोसला जाणारा, परावलंबी.

**पर-पेस्स**–(वि.) परक्याची सेवा करणारा, सेवक, नोकर, दास.

**पर-भाग**–(पु.) मागील भाग, मागचा हिस्सा.

**पर-लोक**–(पु.) मृत्युनंतर मिळणारा लोक, स्वर्गलोक.

**पर-वम्भन**–(नपु.) दुसऱ्यांना कमी प्रतीचे मानणारा, दुसऱ्यांना खालच्या नजरेने पाहणारा.

**पर-वाद**–(पु.) विरोधी मत, विरुद्ध विचार.

**परवादी**–(पु.) विरोधी मताचा, विरुद्ध विचाराचा.

**पर-विसय**–(पु.) परदेश, विदेश, दुसऱ्यांचे राज्य.

**पर-सेना**–(स्त्री.) विरोधी सेना, शत्रुसैन्य.

**पर-हत्थगत**–(वि.) शत्रुच्या ताब्यात गेलेला.

**पर-हित**–(पु.) दुसऱ्यांवर-परक्यावर उपकार, दुसऱ्याचे हित.

**पर-हेतु**–(वि.) परक्यांकरिता, दुसऱ्याकरिता.

**परक्कम**–(पु.) पराक्रम, प्रयत्न.

**परक्कमन**–(नपु.) प्रयास, प्रयत्न.

**परक्कमति**–(क्रि.) पराक्रम करणे, साहस-धाडस दाखविणे.

**परक्कमि**–(पू. क्रि.) पराक्रम केला, साहस दाखविले, धाडस केले.

**परक्कमन्त, परक्कन्त**–(कृ.) पराक्रम करता, साहस दाखविता.

**परक्कमित्वा**–(पू. क्रि.) पराक्रम करून, साहस दाखवून.

**परक्कम्म**–(पु.) पराक्रम [पहा–परक्कम].

**परम**–(वि.) सर्वश्रेष्ठ, श्रेष्ठतम, परम.

**परमता**–(स्त्री.) श्रेष्ठत्व, महात्म्य मोठेपणा.

**परमत्थ**–(पु.) परमार्थ, श्रेष्ठ आदर्श.

**परमत्थ-जोतिका**–(स्त्री.) उत्तम आदर्श, आदर्श ज्योत, अर्थात खुद्दक पाठ व धम्मपद, आणि सुत्त–निपात तसेच जातक यावरील बुद्धघोषाचार्यांची अर्थकथा.

**परमत्थ-दीपनी**–(स्त्री.) उदान, इतिवुत्तक, विमानवत्थु पेतवत्थु, थेरगाथा, व थेरीगाथा, यावरील धम्मपालची अर्थकथा.

**परमाणु**–(पु.) अणुचा (कणाचा) छत्तीसावा भाग, परमाणु.

**परमायु**–(नपु.) आयुष्य मर्यादा.

**परम्परा**–(स्त्री.) वंश परंपरा, क्रम, परंपरा.

**परम्मुख**–(वि.) तोंड फिरविणे, पराङ्गमुख.

**परम्मुखा**–(क्रि. वि.) अनुपस्थितीत, गैरहजेरीत.

**परसुवे**–(अ.) परवा.

**परं**–(क्रि. वि.) नंतर, पुन्हा, मरणोत्तर, मृत्युनंतर.

**परंमरणा**–(क्रि. वि.) मृत्युनंतर.

**परा**–(उपसर्ग) परिहानि व पराजय या अर्थाचा.

**पराग**–(पु.) पुष्परेणु, फुलातील पराग कण.

**पराजय**–(पु.) हार, पराजय.

**पराजियति**–(क्रि.) हार होणे, पराजित होणे, हारणे.

**पराजियि**–(पू. क्रि.) हार झाली, पराजित झाला, हारला.

**पराजियित्वा**–(पू. क्रि.) हारून, पराजित होऊन.

**पराजेति**–(क्रि.) हारविणे, पराजय करणे.

**पराजेसि**–(पू. क्रि.) हारविले, पराजय केला.

**पराजित**–(कृ.) हारलेला, पराजय झालेला, हारविलेला.

**पराजेन्त**–(कृ.) हार होताना, पराजय होताना.

**पराजित्वा**–(पू. क्रि.) हारवून, पराजय करून.

**पराधीन**–(वि.) परक्याच्या ताब्यात, दुसऱ्याच्या आधीन, परतंत्रात.

**पराभव**–(पु.) अवनति, अपमान, हार, पराजय, पराभव.

**पराभवति**–(क्रि.) अवनत होणे, पतित होणे, हार होणे.

**पराभवि**–(पू. क्रि.) अवनत झाला, पतित झाला, हारला.

**पराभूत**–(कृ.) अवनत होता, पतित होता, हार होता.

**पराभवन्त**–(कृ.) अवनत होताना, पतित होताना, हार होताना.

**परामट्ठ**–(कृ.) शिवलेला, स्पर्श झालेला, दुषित केलेला.

**परामसति**–(क्रि.) शिवणे, स्पर्श करणे, धरून ठेवणे.

**परामसि**–(पू. क्रि.) शिवला, स्पर्श केला, धरून ठेवला.

**परामसित**–(कृ.) शिवता, स्पर्श करता, धरून ठेवता.

**परामसन्त**–(कृ.) शिवताना, स्पर्श करताना, धरून ठेवताना.

**परामसित्वा**–(पू. क्रि.) शिवून, स्पर्शुन, धरून ठेवून.

**परामास**–(पु.) स्पर्श.

**परामसन**–(नपु.) स्पर्शणे, हातात घेणे.

**परायण, परायन**–(नपु.) आधार, आश्रय, सहाय्य, मदत.

**परायत्त**–(वि.) परक्याचा (माल).

**परि**–(उपसर्ग) चोहोकडून, चोहोबाजूंनी पूर्ण.
**परिकड्ढति**–(क्रि.) ओढणे, ओढून आणणे.
**परिकड्ढि**–(पू. क्रि.) ओढले, ओढून आणले.
**परिकड्ढित**–(कृ.) ओढलेला, ओढून आणलेला.
**परिकड्ढित्वा**–(पू. क्रि.) ओढून, ओढून आणून.
**परिकड्ढन**–(नपु.) ओढ, आकर्षण.
**परिकथा**–(स्त्री.) व्याख्या, भूमिका, अर्थ.
**परिकन्तति**–(क्रि.) कापणे, कापून टाकणे.
**परिकन्ति**–(पू. क्रि.) कापले, कापून टाकले.
**परिकन्तित**–(कृ.) कापलेला, कापून टाकलेला.
**परिकन्तित्वा**–(पू. क्रि.) कापून, कापून टाकून.
**परिकप्प**–(पु.) इरादा, उद्देश, हेतु, कारण.
**परिकप्पेति**–(क्रि.) हेतु ओळखणे, इरादा जाणणे, उद्देश जाणणे.
**परिकप्पेसि**–(पू. क्रि.) हेतु ओळखला, इरादा जाणला, उद्देश ओळखला.
**परिकप्पित**–(कृ.) हेतु ओळखता, इरादा जाणता, उद्देश ओळखता.
**परिकप्पेत्वा**–(पू. क्रि.) हेतु ओळखून, इरादा जाणून, उद्देश ओळखून.
**परिकम्म**–(नपु.) व्यवस्था, तयारी.
**परिकम्म-कत**–(वि.) लेप दिला, लिंपला, वेष्टन केले.
**परिकम्म-कारक**–(पु.) दुरुस्त करणारा, तयारी करणारा, तयार करणारा.
**परिकस्सति**–(क्रि.) ओढणे.
**परिकस्सि**–(पू. क्रि.) ओढले.
**परिकस्सित**–(कृ.) ओढलेला, ओढता.
**परिकस्सित्वा**–(पू. क्रि.) ओढून.
**परिकिण्ण**–(कृ.) विखुरलेला, विस्कटलेला.
**परिकित्तेति**–(क्रि.) व्याख्या करणे, अर्थ लावणे.
**परिकित्तेसि**–(पू. क्रि.) व्याख्या केली, अर्थ लावला.
**परिकित्तित**–(कृ.) व्याख्या करता, अर्थ लावता.
**परिकत्तेत्वा**–(पू. क्रि.) व्याख्या करून, अर्थ लावून.
**परिकिरति**–(क्रि.) विखुरणे, विस्कटणे, घेरणे.
**परिकिरि**–(पू. क्रि.) विखुरले, विस्कटले, घेरले.
**परिकिरिय**–(कृ.) विखुरण्यायोग्य, विस्कटण्यायोग्य, घेरण्यालायक.
**परिकिरित्वा**–(पू. क्रि.) विखरून, विस्कटून, घेरून.
**परिकिलन्त**–(कृ.) थकलेला, दमलेला, श्रांत.
**परिकिलमति**–(क्रि.) थकणे, दमणे.
**परिकिलमि**–(पू. क्रि.) थकला, दमला.
**परिकिलमित्वा**–(पू. क्रि.) थकून, दमून.
**परिकिलिट्ठ, परिक्किलिट्ठ**–(कृ.) डागाळलेला, डाग लागलेला.
**परिकिलिन्न**–(वि.) डाग लागलेला, मळका, मळलेला, घाणेरडा.
**परिकिलिस्सति**–(क्रि.) डाग लागणे, मळणे, घाण होणे.
**परिकिलिस्सि**–(पू. क्रि.) डाग लागला, मळला, घाण झाला.
**परिकिलिस्सित्वा**–(पू. क्रि.) डाग लागून, मळून, घाण होऊन.
**परिकिलिस्सन**–(नपु.) घाण, मळ, डाग.
**परिकुप्पति**–(क्रि.) उत्साहित होणे, उत्तेजित होणे.
**परिकुप्पि**–(पू. क्रि.) उत्साहित झाला, उत्तेजित झाला.
**परिकुप्पित**–(कृ.) उत्साहित होता, उत्तेजित होता.
**परिकुप्पित्वा**–(पू. क्रि.) उत्साहित होऊन, उत्तेजित होऊन.
**परिकोपेति**–(क्रि.) रागावणे, क्रोधित होणे.
**परिकोपेसि**–(पू. क्रि.) रागावला, क्रोधित झाला.
**परिकोपित**–(कृ.) रागावलेला, क्रोधित झालेला.
**परिकोपेत्वा**–(पू. क्रि.) रागावून, क्रोधित होऊन.
**परिक्कमन**–(नपु.) परिक्रमा, फेरी, फेरा.
**परिक्खक**–(पु.) परीक्षक, परीक्षा घेणारा, तपासणारा.
**परिक्खण**–(नपु) परीक्षण, तपास, शोध.
**परिक्खत**–(कृ.) खोदलेला, खणलेला, जखमी, तयार केलेला, बनविलेला.
**परिक्खति**–(क्रि.) परीक्षा घेणे, तपासणे.
**परिक्खि**–(पू. क्रि.) परीक्षा घेतली, तपासले.
**परिक्खित**–(कृ.) परीक्षित, तपासलेला.
**परिक्खित्वा**–(पू. क्रि.) पारखून, तपासून, परीक्षा घेऊन.
**परिक्खय**–(पु.) क्षय, हानि, ऱ्हास, नाश.
**परिक्खा**–(स्त्री.) परीक्षा, तपासणी.
**परिक्खार**–(नपु.) परिष्कार, आवश्यकता, वस्तू.
**परिक्खित्त**–(कृ.) घेरलेला, वेढलेला.
**परिक्खिपति**–(क्रि.) घेरणे, वेढणे.
**परिक्खिपि**–(पू. क्रि.) घेरले, वेढले.
**परिक्खिपन्त, परिक्खित्त**–(कृ.) घेरलेला, वेढलेला.
**परिक्खिपितब्ब**–(कृ.) घेरण्यायोग्य, वेढण्यायोग्य.
**परिक्खिपित्वा**–(पू. क्रि.) घेरून, वेढून.

**परिक्खिपापेति**–(क्रि.) घेरा घालविणें, वेढा टाकविणे.
**परिक्खीण**–(कृ.) क्षीण झाला, मालविला, नष्ट झाला, संपला.
**परिक्खेप**–(पु.) घेरा, परीघ, वेढा.
**परिक्किलेस**–(नपु.) बाधा, अपवित्रता, अडथळा, अमंगळ.
**परिखणति-पलिखणति**–(क्रि.) चोहोंकडे खणणे.
**परिखणि**–(पू. क्रि.) चोहोकडे खणले.
**परिखत**–(कृ.) चोहोकडे, खणलेला, जोहोकडे खणता.
**परिखणित्वा**–(पू. क्रि.) चोहोकडे खणून.
**परिखा**–(स्त्री.) खाई, खड्डा, चर, खंदक.
**परिगण्हन**–(नपु.) ग्रहण, स्वीकार, तपास.
**परिगण्हाति**–(क्रि.) ग्रहण करणे, स्वीकारणे, अनुसरणें, तपासणे.
**परिगण्हि**–(पू. क्रि.) ग्रहण केले, स्वीकरले, अनुसरले, तपासले.
**परिग्गहित, परिगण्हन्त**–(कृ.) स्वीकारता, अनुसरता, तपासता.
**परिगण्हित्वा, परिगहेत्वा**–(पू. क्रि.) ग्रहण करून, स्वीकारुन, अनुसरून, तपासून.
**परिगाय्ह**–(कृ.) ग्रहणीय, स्वीकारण्यायोग्य, अनुसरणीय, तपासण्यायोग्य.
**परिगिलति**–(क्रि.) गिळणे.
**परिगिलि**–(पू. क्रि.) गिळले.
**परिगिलित**–(कृ.) गिळता.
**परिगिलित्वा**–(पू. क्रि.) गिळून.
**परिगूहति**–(क्रि.) लपविणे, दडविणे.
**परिगूहि**–(पू. क्रि.) लपविले, दडविले.
**परिगूहित, परिगूळह**–(कृ.) लपविताना, दडविताना.
**परिगुहिय**–(कृ.) लपविण्यायोग्य, दडविण्यालायक.
**परिगूहित्वा**–(पू. क्रि.) लपवून, दडवून.
**परिगूहना**–(स्त्री.) लपविणे, झाकून ठेवणे.
**परिग्गह**–(पु.) परिग्रह, संपत्ती.
**परिग्गहित**–(कृ.) परिग्रहित, साठविलेले.
**परिचय**–(पु.) अभ्यास, ओळख, परिचय.
**परिचरण**–(नपु.) देखरेख करणे, उपभोग घेणे, वापरणे.
**परिचरति**–(क्रि.) देखरेख करणे, उपभोग घेणे, फिरणे, वापरणे.
**परिचरि**–(पू. क्रि.) देखरेख केली, उपभोग घेतला, फिरले.
**परिचिण्ण**–(कृ.) देखरेख करता, उपभोगता, हिंडता-फिरता.
**परिचारित्वा**–(पू. क्रि.) देखरेख करून, उपभोगून, हिंडून-फिरून.
**परिचारक**–(वि., पु.) परिचर्या करणारा, सेवा करणारा, नोकर, सेवक.
**परिचारणा**–(स्त्री.) देखरेख, खाणे-पिणे.
**परिचारिका**–(स्त्री.) सेविका, पत्नी, दासी.
**परिचारेति**–(क्रि.) सेवा करणे.
**परिचारेसि**–(पू. क्रि.) सेवा केली.
**परिचारित**–(कृ.) सेवा करता, सेवा केलेला.
**परिचारेत्वा**–(पू. क्रि.) सेवा करून.
**परिचिण्ण**–(कृ.) अभ्यस्त, संगृहित, ओळखलेला, सेवा केलेला.
**परिचित**–[पहा–परिचिण्ण].
**परिचुम्बति**–(क्रि.) चुंबन घेणे, चुंबणे.
**परिचुम्बि**–(पू. क्रि.) चुंबन घेतले, चुंबिले.
**परिचुम्बित**–(कृ.) चुंबन घेतलेला, चुंबविलेला, चुंबताना.
**परिचुम्बित्वा**–(पू. क्रि.) चुंबन घेऊन, चुंबून.
**परिच्च**–(पू. क्रि.) समजून, जाणून, कळून.
**परिच्चजति**–(क्रि.) त्याग करणे, सोडून देणे, सोडणे.
**परिच्चजि**–(पू. क्रि.) त्याग केला, सोडले.
**परिच्चत, परिच्चजन्त**–(कृ.) त्यागलेला, सोडलेला, त्यागता, सोडता.
**परिच्चजितुं**–(कृ.) त्यागण्यायोग्य, सोडण्यालायक, सोडण्याकरिता.
**परिच्चजित्वा**–(पू. क्रि.) त्यागून, सोडून.
**परिच्चजन**–(नपु.) परित्याग.
**परिच्चाग**–(पु.) परित्याग.
**परिच्छन्न**–(कृ.) लपविलेला.
**परिच्छादना**–(स्त्री.) ओढ, झाकणे, घालणे, वापरणे.
**परिच्छिन्दति**–(क्रि.) वेगळे करणे, विभक्त करणे, भाग पाडणे.
**परिच्छिन्दि**–(पू. क्रि.) वेगळे केले, विभक्त केले, भाग पाडले, परिच्छद केले.
**परिच्छिन्न**–(कृ.) वेगळे केलेले, विभक्त केलेले, भाग पाडलेले, परिच्छेद.
**परिच्छिन्दिय**–(कृ.) वेगळे करण्यायोग्य, भाग पाडण्यायोग्य.

**परिच्छिञ्ज**–(कृ.) वेगवेगळे भाग, परिच्छेद.
**परिच्छिन्दन**–(नपु.) सीमा, हद, निशान, खूण, विश्लेषण, फोड.
**परिच्छेद**–(पु.) माप, सीमा, मर्यादा, सर्ग, भाग, भाग, पाठ, धडा परिच्छेद.
**परिजन**–(पु.) अनुयायी, स्वकीय, स्वजन, परिजन.
**परिजानन**–(नपु.) ज्ञान, परिचय, अभ्यास.
**परिजानाति**–(क्रि.) पूर्ण ओळखणे, निश्चित जाणणे.
**परिजानि**–(पू. क्रि.) पूर्ण ओळखले, निश्चित जाणले.
**परिञ्ञात, परिजानान्त**–(कृ.) पूर्ण ओळखलेला, निश्चित जाणलेला.
**परिञ्ञाय**–(कृ.) पूर्ण ओळखताना, निश्चित जाणताना.
**परिजानित्त्वा**–(पू. क्रि.) पूर्ण ओळखून, निश्चित जाणून.
**परिजिण्ण**–(कृ.) जीर्ण झालेला, नाशाप्रत गेलेला, अति जुना.
**परिञ्ञा**–(स्त्री.) स्थिर ज्ञान, पक्के ज्ञान.
**परिञ्ञात**–[पहा–परिजानाति].
**परिञ्ञाय**–(पू. क्रि.) पूर्ण जाणून, पूर्ण ओळखून.
**परिञ्ञेय**–(वि.) योग्य प्रकारे ओळखण्यास.
**परिडय्हति**–(क्रि.) जळणे, पेटणे.
**परिडय्हि**–(पू. क्रि.) जळले, पेटले.
**परिडड्ढ**–(कृ.) जळता, पेटता, जळलेले, पेटलेले.
**परिडय्हित्त्वा**–(पू. क्रि.) जळून, पेटून.
**परिडय्हन**–(नपु.) ज्वलन.
**परिणमति**–(क्रि.) पिकणे, परिवर्तन होणे, बदलणे.
**परिणमि**–(पू. क्रि.) पिकले, परिवर्तन झाले, बदलले.
**परिणन**–(कृ.) पिकता, परिवर्तन होता, बदलता.
**परिणमित्त्वा**–(पू. क्रि.) पिकून, परिवर्तन होऊन, बदलून.
**परिणय**–(पु.) विवाह, लग्न, परिणय.
**परिणाम**–(पु.) फळ, परिवर्तन, बदल, विकास, परिणाम.
**परिणामन**–(नपु) उपयोगी पडणे, उपयुक्त होणे.
**परिणामेति**–(क्रि.) परिवर्तन करणे, बदलणे.
**परिणामेसि**–(पू. क्रि.) परिवर्तन केले, बदलले.
**परिणामित**–(कृ.) परिवर्तन करता, बदलता.
**परिणामेत्वा**–(पू. क्रि.) परिवर्तन करून, बदलून.
**परिणायक**–(पु.) मार्गदर्शक, परामर्श घेणारा, निवाडा करणारा.
**परिणायक-रतन**–(नपु.) चक्रवर्ति राजाचा सेनापति.
**परिणायिका**–(स्त्री.) आंतरदृष्टि, आत्मज्ञान.
**परिणाह**–(पु.) परीघ, परिमिती, लांबी-रुंदी.
**परितप्पति**–(क्रि.) त्रासणे, चिंता करणे, अनुतप्त होणे
**परितप्पि**–(पू. क्रि.) त्रासला, चिंता केली, अनुतप्त झाला.
**परितत्त**–(कृ.) त्रासता, चिंतिता, अनुतप्त होता.
**परितप्पित्त्वा**–(पू. क्रि.) त्रासून, चिंतून, अनुतप्त होऊन.
**परितस्सति**–(क्रि.) चिंतित होणे, इच्छा करणे, उत्साहित होणे.
**परितस्सि**–(पू. क्रि.) चिंतित झाला, इच्छा केली, उत्साहित झाला.
**परितस्सित**–(कृ.) चिंतिता, इच्छा करता, उत्साहित होता.
**परितस्सित्त्वा**–(पू. क्रि.) चिंता करून, इच्छा करून, उत्साहित होऊन.
**परितस्सना**–(स्त्री.) चिंता, उत्तेजन.
**परिताप**–(पु.) पश्चाताप, अनुताप, नंतरचे दुःख.
**परितापन**–[पहा–परिताप].
**परितापेति**–(क्रि.) त्रास देणे.
**परितापेसि**–(पू. क्रि.) त्रास दिला.
**परितापित**–(कृ.) त्रासलेला.
**परितापेत्वा**–(पू. क्रि.) त्रास देऊन.
**परितुलेति**–(क्रि.) तोलणे, मोजणे, तुलना करणे.
**परितुलेसि**–(पू. क्रि.) तोलणे, मोजले, तुलना केली.
**परितुलित**–(कृ.) तोललेला, मोजलेला, तुलना केलेला.
**परितुलेत्वा**–(पू. क्रि.) तोलून, मोजून–मापून, तुलना करून.
**परितो**–(अ.) चोहोकडून, चोहोबाजूने.
**परितोसेति**–(क्रि.) प्रसन्न करणे, आनंद देणे, संतोषविणे.
**परितोसेसि**–(पू. क्रि.) प्रसन्न केले, आनंद दिला, संतोषविले.
**परितोसित**–(कृ.) प्रसन्न करता, आनंद देता, संतोषविता.
**परितोसेत्वा**–(पू. क्रि.) प्रसन्न करून, आनंद देऊन, संतोषवून.
**परित्त, परित्ता**–(पु.) खुद्दक पाठ, अंगुत्तर निकाय, मज्झिम निकाय, सुत्तनिपात यांच्या कांही सूत्रांचा संग्रह. या सूत्रांचे पठन कांही विशिष्ठ प्रसंगी केले जाते. परित्त या शब्दाचा अर्थ संरक्षण असा आहे. या पठनाचा उद्देश रोग-राई अन्य प्रकारचे त्रास यांपासून संरक्षण व्हावे असा आहे.

**परित्त**–(वि.) थोडा, अल्प, तुच्छ, कमी.
**परित्त**–(नपु.) ताईत, गळ्यातील मंतरलेली पेटी.
**परित्तक**–(वि.) थोडा, अल्पसा, तुच्छ, कमी प्रतीचा, हलका.
**परित्त-सुत्त**–(नपु.) मंतरलेला धागा, मंत्रित गंडा-दोरा, परित्तसुत्त.
**परित्ताण**–(नपु.) संरक्षण, सुरक्षा, आश्रम, शरण, परित्ताण.
**परित्तायक**–(वि.) संरक्षक, रक्षणकरता, पालक, रक्षक.
**परिदहति**–(क्रि.) परिधान करणे, धारण करणे, वस्त्र घालणे, कपडे घालणे.
**परिदहि**–(पू. क्रि.) परिधान केले, धारण केले, वस्त्र घातले, कपडे घातले.
**परिदहित**–(कृ.) परिधान केलेले, धारण केलेला, वस्त्र घातलेला.
**परिदहित्वा**–(पू. क्रि.) परिधान करून, धारण करून, वस्त्र घालून.
**परिदहन**–(नपु.) अंगावर वस्त्र धारण करणे, कपडे घालणे.
**परिदीपक**–(वि.) प्रकाश पाडणारा, समजावून सांगणारा.
**परिदीपन**–(नपु.) व्याख्या, अर्थ, समज, उदाहरण.
**परिदीपेति**–(क्रि.) स्पष्ट करणे, अर्थ सांगणे, उघड करणे.
**परिदीपेसि**–(पू. क्रि.) स्पष्ट केले, अर्थ सांगितला, उघड केले.
**परिदीपित, परिदीपेन्त**–(कृ.) स्पष्ट करता, अर्थ सांगता, उघड करता.
**परिदीपेत्वा**–(पू. क्रि.) स्पष्ट करून, अर्थ सांगून, उघड करून.
**परिदूसेति**–(क्रि.) दुषित करणे, खराब करणे, कलंक लावणे.
**परिदूसेसि**–(पू. क्रि.) दूषित केले, खराब केले, कलंक लावला.
**परिदूसित**–(कृ.) दूषित करता, खराब करता, कलंक लावता.
**परिदूसेत्वा**–(पू. क्रि.) दूषित करून, खराब करून, कलंक लावून.
**परिदेव**–(पु.) रडणे, ओरडणे, आक्रोष करणे.
**परिदेवना**–[पहा–परिदेव].
**परिदेवति**–(क्रि.) रडणे, ओरडणे, आक्रोष करणे, दुःख करणे.
**परिदेवि**–(पू. क्रि.) रडला, आक्रोष केला, दुःख केले.
**परिदेवित, परिदेवन्त**–(कृ.) रडता, आक्रोषता, दुःख करता.
**परिदेवमान**–(कृ.) आक्रोषण्यासारखे, रडण्यासारखे, दुःख करण्यायोग्य.
**परिदेवित्वा**–(पू. क्रि.) रडून, आक्रोष करून, दुःख करून.
**परिदेवित**–(नपुं.) रडे, आक्रोष, दुःख, विलाप.
**परिधंसक**–(वि.) विध्वंस करणारा, नाश करणारा.
**परिधावति**–(क्रि.) इकडे-तिकडे पळणे, धावणे.
**परिधावि**–(पू. क्रि.) इकडे, तिकडे पळाला, धावला.
**परिधावित**–(कृ.) इकडे-तिकडे पळता-धावता.
**परिधावित्वा**–(पू. क्रि.) इकडे-तिकडे पळून, धावून.
**परिधि**–(पु.) सूर्य-मंडळ, सूर्य-माला, ग्रहमाला.
**परिधोत**–(कृ.) धुतलेला, स्वच्छ केलेला.
**परिधोवति**–(क्रि.) चांगले धुणे, चांगले स्वच्छ करणे.
**परिधोवि**–(पू. क्रि.) चांगले धुतले, चांगले स्वच्छ केले.
**परिधोवित्वा**–(पू. क्रि.) चांगले धुऊन, चांगले स्वच्छ करून.
**परिनिट्ठान**–(नपु.) शेवटचे टोक, कड, काठ.
**परिनिट्ठापेति**–(क्रि.) शेवट लावणे, कड लावणे.
**परिनिट्ठापेसि**–(पू. क्रि.) शेवट लावला, कड लावली.
**परिनिट्ठापित**–(कृ.) शेवट लावता, कड लावता.
**परिनिट्ठापेत्वा**–(पू. क्रि.) शेवट लावून, कड लावून.
**परिनिब्बान**–(नपु.) परिनिर्वाण, जन्म-मरणाच्या बंधनातून मुक्त, पुनर्जन्म नाही, अर्हताचा मृत्यु, शेवटचे मरण.
**परिनिब्बापन**–(नपु.) राग-द्वेष आदि विकार नष्ट होणे.
**परिनिब्बाति**–(क्रि.) परिनिर्वाण पावणे.
**परिनिब्बायि**–(पू. क्रि.) परिनिर्वाण पावले.
**परिनिब्बुत**–(कृ.) परिनिर्वाण पावता.
**परिनिब्बायित्वा**–(पू. क्रि.) परिनिर्वाण पावून.
**परिनिब्बायी**–(वि.) परिनिर्वाण प्राप्त झालेला.
**परिपक्क**–(कृ.) परिपक्व, चांगला पिकलेला, तयार झालेला, प्रौढ.
**परिपतति**–(क्रि.) खाली पडणे, विनाश पावणे, नष्ट होणे.
**परिपति**–(पू. क्रि.) खाली पडला, विनाश पावला, नष्ट झाला.
**परिपतित**–(कृ.) खाली पडता, विनाश पावता, नष्ट होता.

**परिपतित्वा**–(पू. क्रि.) खाली पडून, विनाश पावून, नष्ट होऊन.
**परिपन्थ**–(पु.) धोका, संकट, बाधा, किनारा, काठ.
**परिपन्थिक**–(वि.) बाधक.
**परिपाक**–(पु.) पूर्णत्व, पिकणे, तयार होणे, प्रौढ बनणे, पचन.
**परिपाचन**–(नपु.) पूर्णत्त्व, पिकणे, प्रौढत्त्व.
**परिपाचेति**–(क्रि.) पिकणे, प्रौढ होणे, विकसित होणे.
**परिपाचेसि**–(पू. क्रि.) पिकले, प्रौढ झाला, विकसित झाला.
**परिपाचित**–(कृ.) पिकता, प्रौढ होता, विकसित होता.
**परिपाचेत्वा, परिपाचित्वा**–(पू. क्रि.) पिकून, प्रौढ होऊन, विकसित होऊन.
**परिपातेति**–(क्रि.) आक्रमण करणे, मारणे, पाडणे, नाश करणे.
**परिपातेसि**–(पू. क्रि.) आक्रमण केले, मारले, पाडले, नाश केला.
**परिपातित**–(कृ.) आक्रमण करता, मरता, पाडता, नाश करता.
**परिपातेत्वा**–(पू. क्रि.) आक्रमण करून, मारून, पाडून, नाश करून.
**परिपालेति**–(क्रि.) पालन करणे, पहारा करणे, संरक्षण करणे.
**परिपालेसि**–(पू. क्रि.) पालन केले, पहारा केला, संरक्षण केले.
**परिपालित**–(कृ.) पालन करताना, पहारा करताना, संरक्षण करताना.
**परिपालेत्वा**–(पू. क्रि.) पालन करून, पहारा करून, संरक्षण करून.
**परिपीळेति**–(क्रि.) पीडा करणे, त्रास देणे.
**परिपीळेसि**–(पू. क्रि.) पीडा केली, त्रास दिला.
**परिपीळित**–(कृ.) पिडलेला, त्रासलेला, पीडा करता, त्रास देता.
**परिपीळेत्वा**–(पू. क्रि.) पीडा करून, त्रास देऊन.
**परिपुच्छक**–(वि., पु.) प्रश्न विचारणारा.
**परिपुच्छति**–(क्रि.) चौकशी करणे, प्रश्न विचारणे.
**परिपुच्छि**–(पू. क्रि.) चौकशी केली, प्रश्न विचारला.
**परिपुच्छित, परिपुट्ठ**–(कृ.) चौकशी करता, प्रश्न विचारता.
**परिपुच्छित्वा**–(पू. क्रि.) चौकशी करून, प्रश्न विचारून.
**परिपुच्छा**–(स्त्री.) चौकशी, प्रश्न.
**परिपुण्ण**–(कृ.) संपूर्ण, परिपूर्ण.
**परिपुण्णता**–(स्त्री.) संपूर्णतः, पूर्णत्व.
**परिपूर**–(वि.) संपूर्ण.
**परिपूरक**–(वि.) पूर्ण करणारा, पूर्ती करणारा.
**परिपूरकारिता**–(स्त्री.) पूर्तीची भावना, परिपूर्णता.
**परिपूरकारी**–(पु.) पूर्ण करणारा.
**परिपूरण**–(नपु.) पूर्ती, पूर्णता.
**परिपूरति**–(क्रि.) पूर्ण करणे.
**परिपूरि**–(पू. क्रि.) पूर्ण केले.
**परिपुण्ण**–(कृ.) संपूर्ण, परिपूर्ण.
**परिपूरित्वा**–(पू. क्रि.) पूर्ण करून.
**परिपूरेति**–(क्रि.) पूर्ण करणे.
**परिपूरेसि**–(पू. क्रि.) पूर्ण केले.
**परिपूरित, परिपूरेन्त**–(कृ.) परिपूर्ण, संपूर्ण.
**परिपूरिय**–(कृ.) पूर्ण करण्यायोग्य.
**परिपूरेतब्ब**–(कृ.) पूर्ण करण्यासारखे.
**परिपूरेत्वा**–(पू. क्रि.) पूर्ण करून.
**परिप्फुट**–(कृ.) भरलेला, व्याप्त झालेला, माखलेला.
**परिप्लव**–(वि.) चंचल, अस्थिर.
**परिप्लवति**–(क्रि.) थरथरणे, कापणे, इकडे-तिकडे होणे.
**परिफन्दति**–(क्रि.) थरथर कापणे, धडधड होणे.
**परिफन्दि**–(पू. क्रि.) थरथर कापला, धडधड झाली.
**परिफन्दित**–(कृ.) थरथर कापता, धडधड होता.
**परिफन्दित्वा**–(पू. क्रि.) थरथर कांपून, धडधड होऊन.
**परिबाहिर**–(वि.) बाहेरचा, बाह्य.
**परिब्बजति**–(वि.) फिरणे, हिंडणे.
**परिब्बजि**–(पू. क्रि.) फिरला, हिंडला.
**परिब्बजित**–(कृ.) फिरता, हिंडता.
**परिब्बजित्वा**–(पू. क्रि.) फिरून, हिंडून.
**परिब्बय**–(पु.) खर्च, व्यय.
**परिब्बाजक**–(पु.) परिव्राजक, भ्रमण करणारा साधू, हिंडणारा साधू.
**परिब्बाजिका**–(स्त्री.) परिव्राजिका, भ्रमण करणारी साध्वी, सतत हिंडणारी साध्वी.
**परिब्बूळ्ह**–(कृ.) घेरलेला, वेढलेला.
**परिब्भमति**–(क्रि.) भ्रमण करणे, चोहोकडे फिरणे.
**परिब्भमि**–(पू. क्रि.) भ्रमण केले, चोहोकडे फिरले.

**परिब्भन्त, परिब्भमन्त**–(कृ.) भ्रमण करता, फिरता.
**परिब्भमित्त्वा**–(पू. क्रि.) भ्रमण करून, चोहोकडे फिरून.
**परिब्भमन**–(नपु.) परिभ्रमण, चोहोकडे फिरणे, सभोवती फिरणे.
**परिब्भमेति**–(क्रि.) परिभ्रमण करणे.
**परिब्भमेसि**–(पू. क्रि.) परिभ्रमण केले.
**परिब्भमित**–(कृ.) परिभ्रमण करताना.
**परिब्भमेत्त्वा**–(पू. क्रि). परिभ्रमण करून.
**परिभट्ठ**–(कृ.) परिभ्रष्ट, पतित, दोषी.
**परिभण्ड**–(पु.) लिंपणे, घेरणे, वेढणे, कमरपट्टा.
**परिभण्ड**–(वि.) लिंपलेला, घेरलेला, वेढलेला.
**परिभण्ड-कत**–(वि.) लिंपलेला.
**परिभव**–(पु.) घृणा, द्वेष, अपशब्द, शिवी-गाळ.
**परिभवन**–(नपु.) घृणा करणे, निंदा करणे.
**परिभवति**–(क्रि.) घृणा करणे, निंदा करणे, शिवी देणे.
**परिभवि**–(पू. क्रि.) घृणा केली, निंदा केला, शिवी दिली.
**परिभूत, परिभवन्त**–(कृ.) घृणित, निंदित.
**परिभवमान**–(कृ.) घृणा करण्यायोग्य, निंदण्यायोग्य.
**परिभवित्वा**–(पू. क्रि.) घृणा करून, निंदा करून, निंदून.
**परिभावित**–(कृ.) शिक्षित, शिकलेला, प्रभावित, उत्तेजित.
**परिभास**–(पु.) दोषारोपण, दोष लावणे.
**परिभासक**–(वि.) निंदक, शिवी देणारा, अपशब्द बोलणारा.
**परिभासति**–(क्रि.) शिवी देणे, बरे-वाईट बोलणे.
**परिभासि**–(पू. क्रि.) शिवी दिली, बरे-वाईट बोलले.
**परिभासित**–(कृ.) शिवी देता, बरे-वाईट म्हणता.
**परिभासमान**–(कृ.) शिवी देण्यायोग्य, वाईट म्हणण्यायोग्य.
**परिभासित्वा**–(पू. क्रि.) शिवी देऊन, वाईट म्हणून.
**परिभासन**–(नपु.) निंदा, उपहास, घृणा, थट्टा, शिव्या.
**परिभुञ्जति**–(क्रि.) भोग घेणे, खाणे, उपयोगात आणणे, जेवणे.
**परिभुञ्जि**–(पू. क्रि.) भोगले, खाल्ले, उपयोगात आणले, जेवण केले.
**परिभुत्त, परिभुञ्जन्त**–(कृ.) भोगता, खाता, उपयोगात आणता, जेवता.
**परिभुञ्जमान, परिभुञ्जियतब्ब**–(कृ.) भोगण्यायोग्य, खाण्यायोग्य, उपयोगात आणण्यायोग्य.

**परिभुञ्जित्वा, परिभुत्त्वा**–(पू. क्रि.) भोगून, खाऊन, उपयोगात आणून, जेवण करून.
**परिभुत्त**–(कृ.) खाल्लेला, भोगलेला, उपयोगात आणलेला.
**परिभूत**–(कृ.) तिरस्कृत, निंदित, निंदाकृत, घृणीत.
**परिभोग**–(पु.) उपयोग, भोग, भोग सामग्री.
**परिभोग-चेतिय**–(नपु.) भगवान तथागतांनी वापरलेल्या वस्तू, भगवंतांनी ठरवून दिलेल्या भिक्खुंच्या वस्तू, चीवर, भिक्षापात्र आदि पवित्र वस्तू.
**परिभोजनीय**–(वि.) वापरण्यास योग्य, उपयोगात आणण्यायोग्य.
**परिमञ्जक**–(पु.) चोळणारा, रगडणारा, मळणारा, थोपटणारा.
**परिमञ्जति**–(क्रि.) चोळणे, रगडणे, थोपटणे.
**परिमञ्जि**–(पू. क्रि.) चोळले, रगडले, थोपटले.
**परिमञ्जित, परिमट्ठ**–(कृ.) चोळता, रगडता, थोपटता.
**परिमञ्जित्वा**–(पू. क्रि.) चोळून, रगडून, थोपटून.
**परिमञ्जन**–(नपु.) चोळणे, रगडणे, मालिश करणे.
**परिमण्डल**–(वि.) वर्तुळाकार, गोलाकार, वर्तुळाचा परीघ.
**परिमण्डलं**–(क्रि. वि.) चोहोकडून, चारी बाजूनी.
**परिमद्दति**–(क्रि.) रगडणे, चोळणे, मालिश करणे.
**परिमद्दि**–(पू. क्रि.) रगडले, चोळले, मालिश केली.
**परिमद्दित**–(कृ.) रगडता, चोळता, मालिश करता.
**परिमद्दित्वा**–(पू. क्रि.) रगडून, चोळून, मालिश करून.
**परिमाण**–(नपु.) माप, सीमा, मर्यादा, हद्द.
**परिमित**–(कृ.) मापलेले, मोजलेले, सीमित केलेले.
**परिमुखं**–(क्रि. वि.) समोर, सन्मुख, पुढे.
**परिमुच्चति**–(क्रि.) मुक्त होणे, बचाव होणे.
**परिमुच्चि**–(पू. क्रि.) मुक्त झाला, बचाव झाला.
**परिमुत्त**–(कृ.) मुक्त होता, बचाव होता.
**परिमुच्चित्वा**–(पू. क्रि.) मुक्त होऊन, बचाव होऊन, बचाव करून.
**परिमुच्चन**–(नपु.) मुक्ती, बचाव, सुटका.
**परिमुत्त**–(कृ.) मुक्त, वाचलेला, वाचून निघालेला, सुटका झालेला.
**परिमुत्ति**–(स्त्री.) मुक्ति, बचाव, सुटका.
**परिमोचेति**–(क्रि.) मुक्त करणे, सुटका करणे.
**परिमोचेसि**–(पू. क्रि.) मुक्त केले, सुटका केली.

**परिमोचित**–(कृ.) मुक्त करता, सुटका करता.
**परिमोचेत्त्वा**–(पू. क्रि.) मुक्त करून, सुटका करून.
**परियत्ति**–(स्त्री.) धर्मग्रंथांचे पठण, धर्मग्रंथांचे अध्ययन.
**परियत्ति-धर**–(पु., वि.) त्रिपिटक पाठ असलेला, त्रिपिटक पाठ करता.
**परियत्ति-धम्म**–(पु.) त्रिपिटक धर्म, त्रिपिटकांतील धर्मोपदेश.
**परियत्ति-सासन**–(नपु.) त्रिपिटक व त्यांतील अट्ठकथा.
**परियन्त**–(पु.) शेवटचे टोक, किनार, कड, हद्द, पर्यंत.
**परियन्त-कत**–(वि.) सीमित, मर्यादित, बाधित.
**परियन्तिक**–(वि.) समाप्त, मर्यादित, सीमाबद्ध.
**परियति**–(क्रि.) चोहोकडे, फिरणे.
**परियादाति**–(क्रि.) जास्त घेणे, अधिक खाणे, मोकळे करणे.
**परियादासि**–(पू. क्रि.) जास्त घेतले, अधिक खाल्ले, मोकळे केले.
**परियादिन्न**–(कृ.) जास्त घेता, अधिक खाता, मोकळे करता.
**परियादायित्त्वा**–(पू. क्रि.) जास्त घेऊन, अधिक खाऊन, मोकळे करून.
**परियादाय**–(वि.) जास्त, अधिक, मोकळा.
**परियादियति**–(क्रि.) ताब्यात घेणे, सोडून जाण्यास लावणे.
**परियादियि**–(पू. क्रि.) ताब्यात घेतले, सोडून जाण्यास लावले.
**परियादिन्न**–(कृ.) ताब्यात घेता, सोडून जाण्यास लावता.
**परियादियित्त्वा**–(पू. क्रि.) ताब्यात घेऊन, सोडून जाण्यास लावून.
**परियापन्न**–(कृ.) सामिलित, संबंधित.
**परियापुणन**–(नपु.) अध्ययन, शिक्षण.
**परियापुणाति**–(क्रि.) अध्ययन करणे, शिकणे.
**परियापुणि**–(पू. क्रि.) अध्ययन केले, शिकले, शिक्षण घेतले.
**परियापुत**–(कृ.) अध्ययन करता, शिकता, शिक्षण घेता.
**परियापुणित्त्वा**–(पू. क्रि.) अध्ययन करून, शिकून, शिक्षण घेऊन.
**परियापुत**–(कृ.) पाठ केलेले, कंठस्थ केलेले, जाणलेले.
**परियाय**–(पु.) क्रम, गुण, कारण, सवय.
**परियाय-कथा**–(स्त्री.) उलट-सुलट बोलणे, असंबंध गोष्टी.
**परियाहत**–(कृ.) मार लागलेला, धक्का बसलेला.
**परियाहनति**–(क्रि.) धक्का मारणे, ठोठावणे.
**परियाहनि**–(पू. क्रि.) धक्का मारला, ठोठावले.
**परियाहत**–(कृ.) धक्का मारता, ठोठावता.
**परियाहनित्त्वा**–(पू. क्रि.) धक्का मारून, ठोठावून.
**परियुट्ठाति**–(क्रि.) उठणे, सर्वत्र पसरणे.
**परियुट्ठासि**–(पू. क्रि.) उठले, सर्वत्र पसरले.
**परियुट्ठित**–(कृ.) उठता, सर्वत्र पसरता.
**परियुट्ठित्त्वा**–(पू. क्रि.) उठून, सर्वत्र पसरून.
**परियुट्ठान**–(नपु.) उदान, पूर्वसंकल्प, नियोजन.
**परियेट्ठि**–(स्त्री.) शोध, धुडका, संशोधन.
**परियोग**–(पु.) हंडा, मोठे भांडे, भांडे, पात्र.
**परियोगाळ्ह**–(कृ.) मजबूत, कसलेला, खोल गेलेला.
**परियोगाहति**–(क्रि.) बुडी मारणे, बुडणे, पाण्याच्या तळापर्यंत जाणे.
**परियोगाहि**–(पू. क्रि.) बुडला, तळापर्यंत गेला.
**परियोगाहत**–(कृ.) बुडता, तळापर्यंत जाता.
**परियोगाहित्त्वा**–(पू. क्रि.) बुडून, तळापर्यंत जाऊन.
**परियोगाहन**–(नपु.) बुडणे, आत जाणे.
**परियोदपना, परियोदपन**–(स्त्री., वि.) शुद्धी, सफाई, स्वच्छता.
**परियोदपेति**–(क्रि.) शुद्ध करणे, स्वच्छ करणे.
**परियोदपेसि**–(पू. क्रि.) शुद्ध केले, स्वच्छ केले.
**परियोदपित**–(कृ.) शुद्ध करता, स्वच्छ करता.
**परियोदपेत्त्वा**–(पू. क्रि.) शुद्ध करून, स्वच्छ करून.
**परियोदात**–(वि.) शुद्ध, स्वच्छ, साफ, परिशुद्ध.
**परियोनद्ध**–(कृ.) बांधलेला, झाकलेला.
**परियोनन्धति**–(क्रि.) बांधणे, झाकणे.
**परियोनन्धि**–(पू. क्रि.) बांधले, झाकले.
**परियोनद्ध**–(कृ.) बांधता, झाकता.
**परियोनन्धित्त्वा**–(पू. क्रि.) बांधून, झाकून.
**परियोनन्धन**–(नपु.) झाकणे.
**परियोनाह**–(पु.) झाकणे.
**परियोसान**–(नपु.) समाप्ती, सारांश, मतितार्थ, शेवट.
**परियोसापेति**–(क्रि.) समाप्त करणे, सारांश सांगणे, शेवट करणे.
**परियोसापेसि**–(पू. क्रि.) समाप्त केले, सारांश सांगितला, शेवट केला.

**परियोसापित**–(कृ.) समाप्त करता, सारांश सांगता, शेवट करता.
**परियोसापेत्वा**–(पू. क्रि.) समाप्त करून, सारांश सांगून, शेवट करून.
**परियोसित**–(कृ.) समाप्त, संतुष्ट.
**परिरक्खति**–(क्रि.) संरक्षण करणे, सांभाळणे, पालन-पोषण करणे.
**परिरक्खण**–(नपु.) संरक्षण, सांभाळ, पालन-पोषण.
**परिवच्छ**–(नपु.) तयारी.
**परिवज्जन**–(नपु.) बचाव, संरक्षण, प्रतिकार.
**परिवज्जेति**–(क्रि.) दूर ठेवणे, बचाव करणे, प्रतिकार करणे.
**परिवज्जेसि**–(पू. क्रि.) दूर ठेवले, बचाव केला, प्रतिकार केला.
**परिवज्जित**–(कृ.) दूर ठेवता, बचाव करता, प्रतिकार करता.
**परिवज्जेन्त**–(कृ.) [पहा–परिवज्जित].
**परिवज्जेत्वा**–(पू क्रि.) दूर ठेवून, बचाव करून, प्रतिकार करून.
**परिवट्ट**–(न.) घेरा, वेढा.
**परिवत्त**–(कृ.) गडगडा लोळता.
**परिवत्तक**–(वि.) गडगडा लोळणारा.
**परिवत्तक**–(पु.) गोळा, गोलाकार वस्तू.
**परिवत्तति**–(क्रि.) गडगडा लोळणे.
**परिवत्ति**–(पू. क्रि.) गडगडा लोळला.
**परिवत्तमान**–(कृ.) गडगडा लोळणारा.
**परिवत्तित्वा**–(पू. क्रि.) गडगडा लोळून.
**परिवत्तन**–(नपु.) परिवर्तन, बदल, उलट-पालट, अनुवाद, भाषांतर.
**परिवत्तेति**–(क्रि.) बदलणे, भाषांतर करणे, अनुवाद करणे.
**परिवत्तेसि**–(पू. क्रि.) बदलले, भाषांतर केले, अनुवाद केला.
**परिवत्तित, परिवत्तेन्त**–(कृ.) बदलता, भाषांतर करता.
**परिवत्तिय**–(कृ.) बदलण्यायोग्य, भाषांतर करण्यायोग्य.
**परिवत्तेत्वा**–(पू. क्रि.) बदलून, भाषांतर करून, अनुवाद करून.
**परिवसति**–(क्रि.) सेवक-शिष्य बनून राहणे, सेवा करणे.
**परिवसि**–(पू. क्रि.) सेवक बनून राहिला, सेवा केली.
**परिवुत्थ**–(कृ.) सेवक बनून राहता.
**परिवसित्वा**–(पू. क्रि.) सेवक बनून राहून.
**परिवार**–(पु.) अनुयायी, अनुगामी, नोकर-चाकर, कुटुंबीय, परिवार.
**परिवारक**–(वि.) अनुचर, शिष्य, साथी, जोडीदार.
**परिवारण**–(नपु.) घेरणे, वेढणे.
**परिवार-पालि**–(पु. वि.) विनय पिटकाचा एक ग्रंथ.
**परिवारेति**–(क्रि.) घेरा घालणे, वेढा घालणे, वेढणे.
**परिवारेसि**–(पू. क्रि.) घेरा घातला, वेढा घातला.
**परिवारित**–(कृ.) घेरा घालता, वेढा घालता.
**परिवारेत्वा**–(पू. क्रि.) घेरा घालून, वेढा टाकून.
**परिवासित**–(कृ.) सुगंधित, सुवासिक.
**परिवितक्क**–(पु.) विचार-विमर्श, चर्चा, विचार-गोष्टी.
**परिवितक्केति**–(क्रि.) विचार करणे, मनन करणे.
**परिवितक्केसि**–(पू. क्रि.) विचार केला, मनन केले.
**परिवितक्कित**–(कृ.) विचार करता, मनन करता.
**परिवितक्केत्वा**–(पू. क्रि.) विचार करून, मनन करून.
**परिविसति**–(क्रि.) भोजन करणे, जेवणे, सेवेत असणे.
**परिविसि**–(पू. क्रि.) भोजन केले, जेवला, सेवेत राहिला.
**परिविसित**–(कृ.) भोजन करता, जेवता, सेवेत असता.
**परिविसित्वा**–(पू. क्रि.) भोजन करून, जेवून, सेवेत राहून.
**परिवीमंसति**–(क्रि.) विचार करणे, मनन करणे.
**परिवीमंसि**–(पू. क्रि.) विचार केला, मनन केले.
**परिवीमंसमान**–(कृ.) विचार करण्यायोग्य, मनन करण्यालायक.
**परिवीमंसित्वा**–(पू. क्रि.) विचार करून, मनन करून.
**परिवुत**–(कृ.) घेतलेला, वेढलेला.
**परिवेण**–(नपु.) भिक्खुंचे निवास स्थान, भिक्खुंचे विद्यालय.
**परिवेसक**–(वि., पु.) जेवण वाढणारा, वाढपी.
**परिवेसना**–(स्त्री.) जेवण वाढणे.
**परिसक्कति**–(क्रि.) प्रयत्न करणे, सहन करणे.
**परिसक्कि**–(पू. क्रि.) प्रयत्न केला, सहन केले.
**परिसक्कित**–(कृ.) प्रयत्न करता, सहन करता, साहता.
**परिसक्कित्वा**–(पू. क्रि.) प्रयत्न करून, सहन करून, साहून.
**परिस-गत**–(वि.) परिषदेत सहभागी, मंडळात सामील.
**परिसङ्कति**–(क्रि.) संशय धरणे, संदेह धरणे, शंका करणे.
**परिसङ्किक**–(पू. क्रि.) संशय धरला, संदेह धरला, शंका केली.

**परिसङ्किकत**–(कृ.) संशय धरता, संदेह करता, शंका करता.

**परिसङ्किकत्वा**–(पू. क्रि.) संशय धरून, संदेह करून, शंका करून.

**परिसङ्का**–(स्त्री.) संशय, शंका, संदेह.

**परिस-दूसक**–(वि., पु.) परिषद बिघडविणारा, मंडळ मोडणारा.

**परिसप्पति**–(क्रि.) रांगणे, वळवळणे.

**परिसप्पि**–(पू. क्रि.) रांगला, वळवळला.

**परिसप्पित**–(कृ.) रांगता, वळवळता.

**परिसप्पित्वा**–(पू. क्रि.) रांगून, वळवळून.

**परिसप्पना**–(स्त्री.) थरकाप होणे, संशय, संदेह, कचरणे, रांगणे.

**परिसमन्ततो**–(क्रि.) चोहोकडून, चारी बाजूंनी.

**परिसहति**–(क्रि.) जिंकणे.

**परिसहि**–(पू. क्रि.) जिंकले.

**परिसहित**–(कृ.) जिंकतांना.

**परिसहित्वा**–(पू. क्रि.) जिंकून.

**परिसा**–(स्त्री.) परिषद, अधिवेशन, सभा, मंडळ, संमेलन.

**परिसावचर**–(वि.) सभा-संमेलनात वावरणारा.

**परिसिञ्चति**–(क्रि.) सर्वत्र शिंपणे.

**परिसिञ्चि**–(पू. क्रि.) सर्वत्र शिंपले.

**परिसित्त**–(कृ.) सर्वत्र शिंपता.

**परिसिञ्चित्वा**–(पू क्रि.) सर्वत्र शिंपून.

**परिसुज्झति**–(क्रि.) शुद्ध होणे, पवित्र होणे, निर्दोश होणे.

**परिसुज्झि**–(पू. क्रि.) शुद्ध झाला, पवित्र झाला, निर्दोष झाला.

**परिसुज्झन्त**–(कृ.) शुद्ध होता, पवित्र होता, निर्दोष होता.

**परिसुज्झित्वा**–(पू. क्रि.) शुद्ध होऊन, पवित्र होऊन, निर्दोष होऊन.

**परिसुद्ध**–(कृ.) स्वच्छ, शुद्ध, पवित्र.

**परिसुद्धि**–(स्त्री.) स्वच्छता, पवित्रता, शुद्धता.

**परिसुस्सति**–(क्रि.) सुकणे, व्यर्थ जाणे, नाश पावणे.

**परिसुस्सि**–(पू. क्रि.) सुकले, व्यर्थ गेले, नाश पावले.

**परिसुक्ख**–(कृ.) सुकता, व्यर्थ जाता, नाश पावता.

**परिसुस्सित्वा**–(पू. क्रि.) सुकून, व्यर्थ जाऊन, नाश पावून.

**परिसुस्सन**–(नपु.) पूर्ण वाळणे, संपूर्ण सुकणे.

**परिसेदित**–(कृ.) वाफेवर शिजविले.

**परिसेदेति**–(क्रि.) शेकणे, वाफारा देणे, अंडी उबविणे.

**परिसोधन**–(नपु.) शुद्धी, पावित्र्य.

**परिसोधेति**–(क्रि.) शुद्ध करणे, स्वच्छ करणे.

**परिसोधेसि**–(पू. क्रि.) शुद्ध केले, स्वच्छ केले.

**परिसोधित**–(कृ.) शुद्ध करता, स्वच्छ करता.

**परिसोधिय**–(कृ.) शुद्ध करण्यायोग्य, स्वच्छ करण्यायोग्य.

**परिसोधित्वा**–(पू. क्रि.) शुद्ध करून, स्वच्छ करून.

**परिसोसेति**–(क्रि.) सुकविणे, वाळविणे.

**परिसोसेसि**–(पू. क्रि.) सुकविले, वाळविले.

**परिसोसित**–(कृ.) सुकविता, वाळविता.

**परिसोसित्वा**–(पू. क्रि.) सुकवून, वाळवून.

**परिस्सजति**–(क्रि.) मिठी मारणे, भेटणे, आलिंगन देणे.

**परिस्सजि**–(पू. क्रि.) मिठी मारली, भेटले, आलिंगन दिले.

**परिस्सजित, परिस्सजन्त**–(कृ.) मिठी मारता, भेटता, आलिंगन देता.

**परिस्सजित्वा**–(पू. क्रि.) मिठी मारून, भेटून, आलिंगन देऊन.

**परिस्सजन**–(नपु.) कवटाळणे, हृदयाशी धरणे.

**परिस्सन्त**–(कृ.) थकलेला, परिश्रांत, श्रांत.

**परिस्सम**–(पु.) परिश्रम, मेहनत, कष्ट, श्रम, उद्योग.

**परिस्सय**–(पु.) धोका, संकट, त्रास.

**परिस्सावन**–(नपु.) पाणी गाळण्याचे साधन.

**परिस्सावेति**–(क्रि.) पाणी गाळणे.

**परिस्सावेसि**–(पू. क्रि.) पाणी गाळले.

**परिस्सावित**–(कृ.) पाणी गाळता.

**परिस्सावेत्वा**–(पू. क्रि.) पाणी गाळून.

**परिहरण**–(नपु.) घेऊन जाणे, संरक्षण.

**परिहरणा**–(स्त्री.) ठेवणे, घेऊन जाणे, रक्षिणे.

**परिहरति**–(क्रि.) सांभाळणे, रक्षण करणे, घेऊन जाणे.

**परिहरि**–(पू. क्रि.) सांभाळले, रक्षिले, घेऊन गेले.

**परिहत, परिहरित**–(कृ.) सांभाळता, रक्षिता, घेऊन जाता.

**परिहरित्वा**–(पू. क्रि.) सांभाळून, रक्षण करून, घेऊन जाऊन.

**परिहसति**–(क्रि.) हसणे.

**परिहसि**–(पू. क्रि.) हसला.

**परिहसित**–(कृ.) हसता.

**परिहसित्वा**–(पू. क्रि.) हसून.

**परिहानि**–(स्त्री.) हानी, नुकसान, घाटा.

**परिहानिय**–(वि.) हानीकारक.
**परिहापेति**–(क्रि.) अवनति होणे, खाली जाणे, काळजी न घेणे.
**परिहापेसि**–(पू. क्रि.) अवनति झाली, खाली गेला, काळजी घेतली नाही.
**परिहापित**–(कृ.) अवनति होता, खाली जाता, काळजी न घेता.
**परिहापेत्वा**–(पू. क्रि.) अवनति होऊन, खाली जाऊन, काळजी न घेऊन.
**परिहायति**–(क्रि.) अवनत होणे, नुकसान होणे.
**परिहायि**–(पू. क्रि.) अवनत झाला, नुकसान झाले.
**परिहीन, परिहायमान**–(कृ.) अवनत होता, नुकसान होता.
**परिहायित्वा**–(पू. क्रि.) अवनत होऊन, नुकसान होऊन.
**परिहार**–(पु.) संरक्षण, सांभाळ, बचाव.
**परिहारक**–(वि., पु.) संरक्षक, सांभाळकर्ता, पहारेकरी.
**परिहार-पथ**–(पु.) चक्राकार रस्ता, गावासभोवतील रस्ता, चक्कर सडक (रिंगरोड).
**परिहारिक**–(वि.) जिवंत ठेवणारा, जीव वाचविणारा.
**परिहास**–(पु.) विनोद, आनंद, मजा, चैन.
**परिहीन**–(कृ.) हानिग्रस्त, अनाथ, दुबळा, पीडित.
**परूपक्कम**–(पु.) शत्रूचे आक्रमण, शत्रूची चढाई.
**परूपघात**–(पु.) परक्याचा घात, दुसऱ्याची हानी.
**परूपवाद**–(पु.) परक्यांचे आरोप.
**परूळ्ह**–(कृ.) उगविलेले.
**परूळ्ह-केस**–(वि.) लांब केसांचा.
**परेत**–(वि.) युक्त, संयुक्त, जोडून.
**परो**–(अ.) मरणोत्तर, पुढे, वर.
**परोक्ख**–(वि.) परोक्ष, दृष्टिआड, नजरेआड.
**परोक्खे**–(अ.) अनुपस्थितीत, गैर हजेरीत.
**परोदति**–(क्रि.) रडणे.
**परोदि**–(पू. क्रि.) रडला.
**परोदित**–(कृ.) रडता.
**परोदित्वा**–(पू. क्रि.) रडून.
**परोवर**–(वि.) उंच-सखल, वर-खाली, खालवर.
**परोवरिय**–(वि.) उच्च-नीच.
**परोसत**–(वि.) शंभराहून अधिक.
**परोसहस्स**–(वि.) हजाराहून, सहस्त्राहून, अधिक.
**परोसहस्स जातक**–एका तपस्व्याचे हजाराहून अधिक शिष्य होते. पण "अकिञ्चञ्ञायतन" चा अर्थ कोणासही न समजल्याची कथा–(९९).

**पल**–(नपु.) पळ, द्रव पदार्थ मोजण्याचे लहान माप.
**पल-गण्ड**–(पु.) गवंडी, घरे बांधणारा कारागीर.
**पलण्डु**–(पु.) कांदा.
**पलण्डुक**–[पहा–पलण्डु].
**पलपति**–(क्रि.) बडबडणे, प्रलाप करणे, निरर्थक बोलणे.
**पलपि**–(पू. क्रि.) बडबडला, प्रलाप केला, निरर्थक बोलला.
**पलपित**–(कृ.) बडबडता, प्रलाप करता, निरर्थक बोलता.
**पलपित्वा**–(पू. क्रि.) बडबडून, प्रलाप करून, निरर्थक बोलून.
**पलपन**–(नपु.) निरर्थक बोल.
**पलपित**–[पहा–पलपन].
**पलय**- (पु.) प्रलय, कल्प-विनाश, जग बुडण्याची वेळ.
**पलवङ्ग**–(पु.) वानर (काळे तोंड, रंग पांढरा व लांब शेपटी).
**पलात**–(कृ.) पळून गेलेला, पळपुटा.
**पलाप**–(पु.) भाताचा कोंडा, निरर्थक बडबड.
**पलापी**–(पु.) बडबड करणारा, प्रलाप करणारा.
**पलापेति**–(क्रि.) पिटाळणे, बडबड करणे.
**पलापेसि**–(पू. क्रि.) पिटाळून लावले, बडबड केली.
**पलापित**–(कृ.) पिटाळून लावता, बडबड करता.
**पलापेत्वा**–(पू. क्रि.) पिटाळून लावून, बडबड करून.
**पलायति**–(क्रि.) पळणे, वाचून निघणे.
**पलायि**–(पू. क्रि.) पळाला, बचावला, वाचला.
**पलात, पलायन्त**–(कृ.) पळता, वाचता.
**पलायित्वा**–(पू. क्रि.) पळून वाचून.
**पलायन**–(नपु.) पळून जाणे, पलायन.
**पलायनक**–(वि.) पळताना, पळून जाताना.
**पलायी**–(पु.) पळालेला, पळून गेलेला.
**पलायी जातक**–बनारसचा राजा तक्षशिलेवर चाल करून गेला, परंतु तक्षशिलेतील विश्वविद्यालयाची भव्य वास्तु व उंच सुशोभित मंदिर शिखरे पाहून त्याच्या मनांत धर्मप्रेम निर्माण झाले व आक्रमणाचा विचार सोडून तो परत फिरल्याची कथा–(२२९).
**पलाल**–(नपु.) भाताचा कोंडा, भाताचे पिंजार, रोपाच्या पानाचा देठ, गवत.
**पलाल-पुञ्ज**–(पु.) भाताच्या पिंजाराचा ढीग, गवताचा ढीग.
**पलास**–(पु., नपु.) पान, ईर्षा, द्वेष, मत्सर, तिरस्कार.

**पलास-साद**–(वि.) पानांपासून बनविलेला खाद्य पदार्थ, भाजी.

**पलास जातक**–एका ब्राह्मणाला पलास वृक्षाखाली पुरून ठेवलेले धन सापडल्याची कथा–(३०७).

**पलास जातक**–पलास वृक्षाच्या खाचेत वटवृक्ष उगवला. त्या वट वृक्षाने हळू-हळू पलास वृक्षालाच नष्ट करून टाकल्याची कथा–(३७०).

**पलासाद**–(पु.) गेंडा.

**पलासी**–(वि.) ईर्षाळू, ईर्षा करणारा.

**पलिघ**–(पु.) अडथळा, अडसर, बाधा, व्यत्यय.

**पलित**–(वि.) प्रौढ, वयस्कर, पिकलेला, वृद्ध.

**पलित**–(नपु.) पांढरा केस.

**पलिप**–(पु.) दलदल, पातळ चिखल.

**पलिपथ**–(पु.) धोक्याचा रस्ता, धोका, बाधा.

**पलिपन्न**–(कृ.) पडलेला, बुडलेला.

**पलुग्ग**–(कृ.) खाली पडलेला, तुटून पडलेला.

**पलुज्जति**–(क्रि.) खाली पडणे, तुटून पडणे.

**पलुज्जि**–(पू. क्रि.) खाली पडले, तुटून पडले.

**पलुज्जमान**–(कृ.) खाली पडता, तुटून पडता.

**पलुज्जित्वा**–(पू. क्रि.) खाली पडून, तुटून पडून.

**पलुज्जन**–(नपु.) लडबडणे.

**पलुद्ध**–(कृ.) अत्यंत आसक्त, लुब्ध, मोहित.

**पलेति**–(क्रि.) निघून जाणे, पळणे.

**पलोभन**–(न.) प्रलोभन, लालच, आशा, लाच.

**पलोभेति**–(क्रि.) लाच देणे.

**पलोभेसि**–(पू. क्रि.) लाच दिली.

**पलोभित**–(कृ.) लाच देता.

**पलोभेत्वा**–(पू. क्रि.) लाच देऊन.

**पलङ्क**–(पु.) पलंग, दीवान, खाट.

**पलङ्क**–(वि.) पालथी, मांडी घालून बसलेला.

**पल्लत्थिका**–(स्त्री.) पालकी.

**पल्लल**–(नपु.) छोटा तलाव, लहान सरोवर, पाणथळा भूमी.

**पल्लव**–(पु.) कोंब; अंकूर कोवळी पाने.

**पवक्खति**–(क्रि.) सांगणे, दाखविणे.

**पवड्ढ, पवद्ध**–(वि.) प्रौढ, वाढलेला, सशक्त, शक्तिमान.

**पवड्ढति**–(क्रि.) वाढणे, प्रौढ होणे.

**पवड्ढि**–(पू. क्रि.) वाढला, प्रौढ झाला.

**पवड्ढत**–(कृ.) वाढता, प्रौढ होता.

**पवड्ढित्वा**–(पू. क्रि.) वाढून, प्रौढ होऊन.

**पवड्ढन**–(नपु.) वृद्धी, वाढ.

**पवत्त**–(वि.) चालू असलेला, खाली पडलेला.

**पवत्त**–(नपु.) चालू असलेले, भवचक्र, जन्म-मृत्यूचा फेरा, निसर्ग चक्र.

**पवत्तति**–(क्रि.) चालू असणे, विद्यमान असणे.

**पवत्ति**–(पू. क्रि.) चालू असलेले, विद्यमान असलेले.

**पवत्तित**–(कृ.) चालू असता, विद्यमान असता.

**पवत्तित्वा**–(पू. क्रि.) चालू असून, विद्यमान असून.

**पवत्तन**–(नपु.) अस्तित्व, चालू ठेवणे, प्रवर्तन.

**पवत्तापन**–(नपु.) संतत चालू ठेवणे.

**पवत्ति**–(स्त्री.) प्रवृत्ती, घटना.

**पवत्तेति**–(क्रि.) चालू करणे, सुरू करणे, फिरविणे.

**पवत्तेसि**–(पू. क्रि.) चालू केले, सुरू केले प्रवर्तित केले, फिरविले.

**पवत्तित, पवत्तेन्त, पवत्तेतुं**–(कृ.) चालू असता.

**पवत्तेत्वा**–(पू. क्रि.) चालू असून, प्रवर्तित करून, सुरू करून.

**पवत्तेत**–(पु.) चालू करणारा.

**पवद्ध**–[ पद्ध–पवड्ढ ].

**पवन**–(नपु.) हवा, वायु, डोंगराचा काठ, धान्य पाखडणे.

**पवर**–(वि.) श्रेष्ठ, जेष्ठ, अधिकारयुक्त, प्रवर.

**पवसति**–(क्रि.) राहणे, वसणे.

**पवसि**–(पू. क्रि.) राहिला, वसला.

**पवुत्थ**–(कृ.) राहता, वसता.

**पवसित्वा**–(पू. क्रि.) राहून, वसून.

**पवस्सति**–(क्रि.) वर्षाव होणे, पाऊस पडणे.

**पवस्सि**–(पू. क्रि.) वर्षाव झाला, पाऊस पडला.

**पवट्ठ**–(कृ.) वर्षाव होता, पाऊस पडता.

**पवस्सित्वा**–(पू. क्रि.) वर्षाव होऊन, पाऊस पडून.

**पवस्सन**–(नपु.) वर्षा, पाऊस.

**पवात**–(नपु.) उंच ठिकाण, थंड हवा, हवेशीर जागा.

**पवाति**–(क्रि.) वारा वाहणे, सुगंध पसरणे.

**पवायति**–(क्रि.) वारा वाहणे, सुगंध पसरणे.

**पवायि**–(पू. क्रि.) वारा वाहिला, सुगंध पसरला.

**पवायित**–(कृ.) वारा वाहता, सुगंध पसरता.

**पवायित्वा**–(पू. क्रि.) वारा वाहून, सुगंध पसरून.

**पवारणा**–(स्त्री.) निमंत्रण, संतोष, वर्षावासानंतर केला जाणारा एक धार्मिक संस्कार.

**पवारित**–(कृ.) निमंत्रित, आमंत्रित, वर्षावासानंतरचा धार्मिक संस्कार केला.

**पवारेति**–(क्रि.) निमंत्रण देणे, सोपविणे, पवारणा करणे.

**पवारेसि**–(पू. क्रि.) निमंत्रण दिले, सोपविले, पवारणा केली.
**पवारेसित**–(कृ.) निमंत्रण देता, सोपविता, पवारणा करता.
**पवारेत्वा**–(पू. क्रि.) निमंत्रण देऊन, सोपवून, पवारणा करून.
**पवाल**–(पु.) प्रवाळ, कोंब, अंकूर.
**पवास**–(पु.) प्रवास, घरापासून दूर जाणे-राहणे.
**पवासी**–(पु.) प्रवासी, यात्री.
**पवाह**–(पु.) प्रवाह, वाहणे.
**पवाहक**–(वि.) घेऊन जाणारा, वाहून नेणारा.
**पवाहेति**–(क्रि.) घेऊन जाणे, वाहून नेणे.
**पवाहेसि**–(पू. क्रि.) घेऊन गेला, वाहून नेले.
**पवाहित**–(कृ.) घेऊन जाता, वाहून नेता.
**पवाहेत्वा**–(पू. क्रि.) घेऊन जाऊन, वाहून नेऊन.
**पवाळ**–[पहा–पवाल].
**पवाळ्ह**–(कृ.) रद्द केलेला, कमी केलेला.
**पविज्झति**–(क्रि.) छेदणे, भोक पाडणे.
**पविज्झि**–(पू. क्रि.) छेदले. भोक पाडले.
**पविद्ध**–(कृ.) छेदता, भोक पाडता.
**पविज्झित्वा**–(पू. क्रि.) छेदून, भोक पाडून.
**पविट्ठ**–(कृ.) प्रविष्ठ, दाखल.
**पविवित्त**–(वि.) पृथक्क केले, वेगळे, एकान्त.
**पविवेक**–(पु.) एकान्त, शांत, निर्जन.
**पविसति**–(क्रि.) प्रवेश करणे, आत येणे.
**पविसि**–(पू. क्रि.) प्रवेश केला, आत आला.
**पविसन्त, पविसितुं**–(कृ.) प्रवेश करता, आत येता.
**पविसित्वा**–(पू. क्रि.) प्रवेश करून, आंत येऊन.
**पविण**–(वि.) प्रविण, हुषार.
**पवुच्चति**–(क्रि.) म्हणणे, सांगणे.
**पवुत्त**–(कृ.) म्हटले गेले, सांगितले.
**पवुत्थ**–(कृ.) राहिला.
**पवेणि**–(स्त्री.) परंपरा, उत्तराधिकारी, केसांची वेणी.
**पवेदन**–(नपु.) घोषणा.
**पवेदियमान**–(कृ.) घोषित करत असता.
**पवेदेति**–(क्रि.) जाहीर करणे, प्रकट करणे.
**पवेदेसि**–(पू. क्रि.) जाहीर केले, प्रकट केले.
**पवेदित, पवेदेन्त**–(कृ.) जाहीर करता, प्रकट करता.
**पवेदेत्वा**–(पू. क्रि.) जाहीर करून, प्रकट करून.
**पवेधति**–(क्रि.) थरकाप होणे, भिणे.

**पवेधि**–(पू. क्रि.) थरकाप झाला, भ्याला.
**पवेधित**–(कृ.) थरकाप होता, भिता.
**पवेधमान**–(कृ.) भिण्यायोग्य.
**पवेधित्वा**–(पू. क्रि.) थरकाप होऊन, भिऊन.
**पवेस**–(पु.) प्रवेश.
**पवेसन**–(नपु.) घुसणे, प्रवेश दाखल होणे, हजर होणे.
**पवेसक**–(वि., पु.) घुसणारा, दाखल होणारा, हजर होणारा, प्रवेश करणारा.
**पवेसेति**–(क्रि.) प्रवेश करणे, दाखल होणे.
**पवेसि**–(पू. क्रि.) प्रवेश केला, दाखल झाला.
**पवेसित, पवेसेन्त**–(कृ.) प्रवेशता, दाखल होता.
**पवेसेन्त**–(कृ.) प्रवेश करता, दाखल होता.
**पवेसेत्वा**–(पू. क्रि.) प्रवेश करून, दाखल होऊन.
**पवेसेतु**–(पु.) प्रवेश करणारा, दाखल होणारा.
**पसंसक**–(पु.) प्रशंसा करणारा, वहावा म्हणणारा, खशामदी.
**पसंसति**–(क्रि.) प्रशंसा करणे, स्तुती करणे.
**पसंसि**–(पू. क्रि.) प्रशंसा केली, स्तुती केली.
**पसंसित, पसंसन्त, पसंसितुं**–(कृ.) प्रशंसा करता.
**पसंसितब्ब, पसंसिय**–(कृ.) प्रशंसा करण्यायोग्य.
**पसंसित्वा, पसंसेत्वा**–(पू. क्रि.) प्रशंसा करून.
**पसंसन**–(नपु.) प्रशंसा, वहावा, स्तुती.
**पसंसा**–(स्त्री.) स्तुती, प्रशंसा.
**पसङ्ग**–(पु.) प्रसंग, अवस्था, आसक्ती.
**पसट**–(कृ.) प्रशस्त, ऐसपैस, पसरलेला.
**पसत**–(पु.) पसा, ओंजळ.
**पसत्थ**–(कृ.) प्रशस्त.
**पसट्ठ**–[पहा–पसत्थ].
**पसद**–(पु.) हरीण, मृग.
**पसन्न**–(कृ.) प्रसन्न, स्पष्ट, आनंदित, सतेज.
**पसन्न-चित्त**–(वि.) प्रसन्न-चित्त.
**पसन्न-मानस**–(वि.) प्रसन्न-मन, प्रसन्न मानस.
**पसय्ह**–(पू. क्रि.) जबरदस्ती करून, दबावाने.
**पसव**–(पु.) संतान, मूल, जन्म देणे.
**पसवति**–(क्रि.) उत्पन्न करणे, जन्म देणे.
**पसवि**–(पू. क्रि.) उत्पन्न केले. जन्म दिला.
**पसवित, पसवन्त**–(कृ.) उत्पन्न होता, जन्म देता.
**पसवित्वा**–(पू. क्रि.) उत्पन्न करून, जन्म देऊन.
**पसहति**–(क्रि.) दावणे, जिंकणे, चोळणे.
**पसहि**–(पू. क्रि.) दाबले, जिंकले, चोळले.

**पसरुह**–(कृ.) दाबता, जिंकता, चोळता.
**पसहित्वा**–(पू. क्रि.) दाबून, जिंकून, चोळून.
**पसहन**–(नपु.) अधिकार, ताबा.
**पसाख**–(नपु.) फांदी फुटण्याची जागा.
**पसाखा**–(स्त्री.) लहान-लहान फांद्या.
**पसाद**–(पु.) प्रसन्नता, श्रद्धा, स्पष्टता, प्रसाद.
[**इंद्रिय-पसाद**–(नपु.) इंद्रियांचे कार्य].
**पसादनिय**–(वि.) विश्वास निर्माण करणारा, विश्वस्त.
**पसादेति**–(क्रि.) प्रसन्न करणे, पवित्र करणे, श्रद्धा निर्माण करणे.
**पसादेसि**–(पू. क्रि.) प्रसन्न केले, पवित्र केले, श्रद्धा निर्माण केली.
**पसादित, पसादेन्त**–(कृ.) प्रसन्न करता, पवित्र करता, श्रद्धा निर्माण करता.
**पसादेतब्ब**–(कृ.) प्रसन्न करण्यायोग्य, पवित्र करण्यायोग्य, श्रद्धा निर्माण करण्यायोग्य.
**पसादेत्वा**–(पू. क्रि.) प्रसन्न करून, पवित्र करून, श्रद्धा निर्माण करून.
**पसाधन**–(नपु.) दागिना, अलंकार, सजावट.
**पसाधेति**–(क्रि.) दागिने घालणे, नटणे-सजणे.
**पसाधेसि**–(पू. क्रि.) दागिने घातले, नटले-सजले.
**पसाधित**–(कृ.) दागिने घालता, नटता-सजता.
**पसाधिय**–(कृ.) दागिने घालण्या योग्य, नटण्या योग्य.
**पसाधेत्वा**–(पू. क्रि.) दागिने घालून, नटून, सजून.
**पसारण**–(न.) प्रसारण, प्रसार करणे, पसरणे.
**पसारित**–(कृ.) प्रसारित, पसरलेला.
**पसारेति**–(क्रि.) पसरणे, प्रसार करणे.
**पसारेसि**–(पू. क्रि.) पसरले, प्रसार केला.
**पसारित**–(कृ.) पसरता, प्रसार करता, प्रस्तुत.
**पसासति**–(क्रि.) राज्य करणे, शासन चालविणे, शिक्षा देणे.
**पसासि**–(पू. क्रि.) राज्य केले, शासन चालविले, शिक्षा दिली.
**पसासित**–(कृ.) राज्य करता, शासन चालविता, शिक्षा करता.
**पसासित्वा**–(पू. क्रि.) राज्य करून, शासन चालवून, शिक्षा करून.
**पसिति**–(स्त्री.) बंधन, मर्यादा, नियंत्रण.
**पसिद्ध**–(वि.) प्रसिद्ध.
**पसिब्बक**–(पु.) कनाळ, रुपयांची थैली, पैशांचा बटवा.
**पसीदति**–(क्रि.) प्रसन्न होणे, श्रद्धाळू बनणे.
**पसीदि**–(पू. क्रि.) प्रसन्न झाला, श्रद्धाळू बनला.
**पसन्न**–(पू. क्रि.) प्रसन्न झाला, श्रद्धाळू बनला.
**पसन्न**–(कृ.) प्रसन्न.
**पसिदितब्ब**–(कृ.) प्रसन्न होण्यायोग्य.
**पसीदित्वा**–(पू. क्रि.) प्रसन्न होऊन, श्रद्धाळू बनून.
**पसीदन**–(नपु.) श्रद्धा, प्रसन्नता.
**पसीदना**–(स्त्री.) संतोष, आनंद, प्रसन्नता.
**पसु**–(पु.) पशु, चार पायांचा प्राणी.
**पसुत्त**–(वि.) आसक्त, लागलेला.
**पसुत**–(कृ.) प्रसूत, जन्मला, मूल झाले.
**पसुति**–(स्त्री.) प्रसूति, जन्म, बाळंत.
**पसुतिका**–(स्त्री.) प्रसूतिका, बाळंतीण.
**पसुतिकार-घर**–(नपु.) प्रसूतिका-घर, प्रसुतिका-गृह.
**पसेनदि**–(पु., वि. ना.) बुद्ध कालीन कोसल नरेश.
**पस्स**–(पु.) पार्श्व, फासा, एक बाजू, एक दिशा.
**पस्सति**–(क्रि.) पाहणे, शोधणे, समजणे.
**पस्सि**–(पू. क्रि.) पाहिले, शोधले, समजले.
**पस्सन्त, पस्सिन्तु**–(कृ.) पाहता, शोधता, समजता.
**पस्समान, पस्सितब्ब**–(कृ.) पाहण्यायोग्य, शोधण्यायोग्य, समजण्यायोग्य.
**पस्सित्वा**–(पू. क्रि.) पाहून, शोधून, समजून.
[**दिट्ठ**–(स्त्री.) दृष्टी, पाहिले, नजर].
[**दिस्वा**–(पू. क्रि.) पाहून, बघून].
**पस्सद्ध**–(कृ.) शांत, स्थिर, गंभीर.
**पस्सद्धि**–(स्त्री.) शांती, गांभीर्य.
**पस्सम्भेति**–(क्रि.) शांत करणे, थांबविणे.
**पस्सम्भेसि**–(पू. क्रि.) शांत केले, थांबविले.
**पस्सम्भित, पस्सम्भेत**–(कृ.) शांत करता, थांबविता.
**पस्सम्भेत्वा**–(पू. क्रि.) शांत करून, थांबवून.
**पस्ससति**–(क्रि.) श्वास घेणे.
**पस्ससि**–(पू. क्रि.) श्वास घेतला.
**पस्ससित, पस्ससन्त**–(कृ.) श्वास घेता.
**पस्ससित्वा**–(पू. क्रि.) श्वास घेऊन.
**पस्साव**–(पु.) मूत्र, लघवी.
**पस्साव-मग्ग**–(पु.) योनी, मूत्रमार्ग.
**पस्सास**–(पु.) उच्छवास, श्वास सोडणे.
**पस्सासी**–(पु.) उच्छवास टाकणारा, श्वास सोडणारा.
**पहट**–(कृ.) प्रहार झालेला, मार बसलेला.
**पहट्ठ**–(कृ.) अत्यानंदित, फार प्रसन्न.

**पहरण**–(नपु.) मारणे, झोडपणे, प्रहार करणे, मारण्याचे हत्यार, शस्त्र.
**पहरणक**–(पु., वि.) मारेकरी, मारणारा, हाणणारा.
**पहरति**–(क्रि.) मारणे, हाणणे, बडविणे.
**पहरि**–(पू. क्रि.) मारले, हाणले, बडविले.
**पहरन्त, पहरिन्तु**–(कृ.) मारता, हाणता, बडविता.
**पहरित्वा**–(पू. क्रि.) मारून, हाणून, बडवून.
**पहाण, पहान**–(न.) सोडणे, टाकणे, हटविणे, त्यागणे.
**पहाय**–(पू. क्रि.) सोडून, टाकून, हटवून, त्यागून.
**पहायी**–(पु.) सोडणारा, टाकणारा, त्यागणारा.
**पहार**–(पु.) प्रहार, मार, धक्का, ठोका.
[**एकप्पहारेन**–(नपु.) एकाच घावात, एकाच वेळी].
**पहार-दान**–(नपु.) घाव घालणे, मारणे.
**पहास**–(पु.) अत्यन्त प्रीति, फार माया, फार प्रेम, निस्सीम प्रेम.
**पहासेति**–(क्रि.) हसणे, आनंदित होणे.
**पहासेसि**–(पू. क्रि.) हसले, आनंदित झाले.
**पहासित**–(कृ.) हसता, आनंदित होता, हर्षित.
**पहिणन**–(नपु.) पाठविणे, धाडणे.
**पहिण-गमन**–(न.) बातमी पोहोचविणे, संदेश देणे.
**पहिणति**–(क्रि.) पाठविणे.
**पहिणि**–(पू. क्रि.) पाठविले.
**पहिणन्त**–(कृ.) पाठविता.
**पहिणित्वा**–(पू. क्रि.) पाठवून.
**पहित**–(कृ.) प्रेषित, पाठविले गेले.
**पहीन**–(कृ.) रहित, खेरीज, त्यक्त, नष्ट, शिवाय, प्रहीण.
**पहीयति**–(क्रि.) सोडणे, टाकणे, त्यागणे.
**पहीयि**–(पू. क्रि.) सोडले, टाकले, त्यागले.
**पहीन**–(कृ.) सोडता, टाकता, त्यागता.
**पहीयमान**–(कृ.) सोडण्यायोग्य, टाकण्यायोग्य, त्यागण्यायोग्य.
**पहीयित्वा**–(पू. क्रि.) सोडून, टाकून, त्यागून.
**पहू**–(वि.) योग्य, लायक.
**पहूत**–(वि.) फार, अति, जास्त.
**पहूत-जिव्ह**–(वि.) मोठी-लांब जीभ असलेला.
**पहूत-भक्ख**–(वि.) मोठे जेवण, जास्त खाणारा, खादाड.
**पहेणक**–(नपु.) बक्षीस, देता येण्यासारखी भेट.
**पहोति**–(क्रि.) समर्थ होणे, उत्पन्न होणे, [पहा-पभवति].
**पहोनक**–(वि.) प्राप्त, पर्याप्त.
**पळिगुण्ठेति**–(क्रि.) झाकणे.
**पळिगुण्ठेसि**–(पू. क्रि.) झाकले.
**पळिगुण्ठित**–(कृ.) झाकता.
**पळिगुण्ठित्वा**–(पू. क्रि.) झाकून.
**पळिघ, (पलिघ)**–(पु.) बाधा, अरगल, अडथळा.
**पळिबुज्झति**–(क्रि.) प्रमाद करणे, घाण होणे, बाधा येणे.
**पळिबुज्झि**–(पू. क्रि.) प्रमाद केले, घाण केले, बाधा आणली.
**पळिबुद्ध**–(कृ.) प्रमाद करता, घाण, बाधित.
**पळिबुज्झित्वा**–(पू. क्रि.) प्रमाद करून, घाण करून, बाधा आणून.
**पळिबुज्झन**–(नपु.) घाण होणे, खराब होणे.
**पळिबोध**–(पु.) बाधा, अडथळा.
**पळिवेठन**–(नपु.) वेढणे, लपेटणे, गुंडाळणे, घेरा घालणे.
**पळिवेठेति**–(क्रि.) वेढणे, गुंडाळणे.
**पळिवेठेसि**–(पू. क्रि.) वेढले, गुंडाळले.
**पळिवेठित**–(कृ.) वेढता, गुंडाळता.
**पळिवेठित्वा**–(पू. क्रि.) वेढा घालून, गुंडाळून.
**पंसु**–(पु.) धूळ.
**पंसु-कूल**–(नपु.) धुळीचा ढीग.
**पंसुकूल-चीवर**–(नपु.) घाण चिंध्यांपासून बनविलेले वस्त्र, चीवर.
**पंसुकूलिक**–(वि.) ठिगळांचे वस्त्र वापरणारा.
**पाक**–(पु.) शिजविणे, शिजविलेले.
**पाक-वट्ट**–(नपु.) भोजनाचे साहित्य नेहमी मिळणे.
**पाकट**–(वि.) प्रकट, प्रसिद्ध, जाहीर, विख्यात.
**पाकट्ठान**–(नपु.) स्वयंपाक गृह, सैपाकघर, पाकस्थान.
**पाकतिक**–(वि.) प्राकृतिक, नैसर्गिक.
**पाकार**–(पु.) प्राकार, तट, तटबंदी, चार भिंती.
**पाकार-परिक्खित्त**–(वि.) चार भिंतीच्या आत, तटबंदीत, तटांत.
**पागब्भिय**–(नपु.) प्रगल्भता, वाग्मीष, वाचाळता.
**पागुञ्जता**–(स्त्री.) प्रगुणता, प्रविणता, निपुणता.
**पाचक**–(वि.) शिजविणारा, सैपाकी, आचारी.
**पाचन**–(नपु.) शिजविणे, जनावरे हाकण्याची काठी.
**पाचरिय**–(पु., नपु.) प्राचार्य, मुख्य.
**पाचापेति**–(क्रि.) शिजवून घेणे.
**पाचापेसि**–(पू. क्रि.) शिजवून घेतले.
**पाचापित**–(कृ.) शिजवून घेता.
**पाचापेत्वा**–(पू. क्रि.) शिजवून घेऊन.

**पाचिका**–(स्त्री.) शिजविणारी स्त्री, स्वयंपाक करणारी स्त्री.
**पाचित्तिय**–(पु.) विनय पिटकाचा एक भाग-ग्रंथ.
**पाचीन**–(वि.) प्राचीन, पूर्वकालीन, पूर्वीय.
**पाचीन-दिसा**–(स्त्री.) पूर्वदिशा, उगवती दिशा.
**पाचीन-मुखा**–(वि.) पूर्वाभिमुख.
**पाचेति**–(क्रि.) शिजवून घेणे.
**पाजन**–(नपु.) हाकणे, वळविणे, राखणे.
**पाजेति**–(क्रि.) हाकणे, वळविणे, राखणे.
**पाजेसि**–(पू. क्रि.) हाकले वळविले, राखले.
**पाजित, पाजेन्त**–(कृ.) हाकता, वळविता, राखता.
**पाजेत्वा**–(पू. क्रि.) हाकून, वळवून, राखून.
**पाजापेति**–(पू. क्रि.) हाकले, वळविले, राखले.
**पाटल**–(वि.) गुलाब, गुलाबी.
**पाटलिपुत्त**–(नपु. वि.) पाटलीपुत्र, प्राचीन मगधाची राजधानी, सध्याचे पाटना शहर.
**पाटली**–(पु.) वृक्ष.
**पाटव**–(पु., नपु.) पटु-भाव, दक्षता, निष्णात, तरबेज.
**पाटिकङ्खि**–(वि.) आशान्वित, इच्छुक, इच्छा धरणारा.
**पाटिकङ्खी**–(वि.) आशाळभूत, इच्छुक, आशा करणारा.
**पाटिकम्म–फाटिकम्म**–(नपु) प्रतिकर्म, दुरूस्ती, डागडुजी.
**पाटिका**–(स्त्री.) अर्धगोलाकार, चंद्रबिंब.
**पाटिकूल्य**–(नपु.) प्रतिकूलता, विरोध, वैर.
**पाटिपद**–(पु.) प्रतिपदा, चांद्रमासाच्या शुक्ल पक्षातील पहिला दिवस.
**पाटिभोग**–(पु.) जबाबदार.
**पाटिमोक्ख, पातिमोक्ख**–(पु.) भिक्खु विनयाच्या दोनशे सत्तावास नियमांचा संग्रह.
**पाटियेक्क**–(वि.) प्रत्येक, वेग-वेगळा, पृथक्.
**पाटिहार**–(नपु.) चमत्कार.
[पाटिहार, पाटिहेर, पाटिहारिय–पहा–पाटिहार].
**पाटिहारिय-पक्ख**–(पु.) जादा सुट्टी, अधिक सवलत.
**पाटेक्क**–[पहा-पाटियेक्क].
**पाठ**–(पु.) ग्रंथाचा एकभाग, पुस्तकांतील धडा, पाठ.
**पाठक**–(वि.) पाठ करणारा.
**पाठीन**–(पु) माशाची एक जात, मासा.
**पाण**–(पु.) प्राण, प्राणी, जीवन, श्वास.
**पाण-घात**–(पु.) प्राणी हत्या.
**पाण-घाती**–(पु.) जीवहत्या- करणारा, ठार मारणारा.
**पाणद**–(वि.) प्राणरक्षक, वाचविणारा.
**पाण-भूत**–(पु.) जीवित प्राणी.
**पाण-वध**–(पु.) जीव-हत्या, प्राणवध.
**पाण-सम**–(वि.) प्राणाप्रमाणे, जिवासारखा, प्रिय.
**पाण-हर**–(वि.) प्राण घेणारा, ठार मारणारा, जीव घातक.
**पाणक**–(पु.) किडा, कृमि, जंतु.
**पाणि**–(पु.) हात, तळहात.
**पाणितल**–(नपु.) तळवा, तळहात.
**पाणिग्गह**–(पु.) पाणि-ग्रहण, विवाह, लग्न, हातात हात धरणे.
**पाणिका**–(स्त्री.) हातातील वस्तु, रुमाल, टावेल.
**पाणी**–(पु.) प्राणी, जीव.
**पातु**–(पु.) पडणे, फेकणे, टाकणे.
**पातन**–(नपु.) पतन, पडणे, खाली जाणे, खाली फेकणे.
**पातब्ब**–(कृ.) पिण्यायोग्य.
**पातरास**–(पु.) न्याहरी, सकाळचा नाष्टा.
**पाताल**–(पु.) पाताळ, पृथ्वीच्या खालचा भाग.
**पाति**–(स्त्री.) थाळी, पात्र, भांडे.
**पाति**–(क्रिया) रक्षण करणे, सांभाळणे, राखण करणे.
**पातिक**–(नपु.) थाळी, ताट, बशी.
**पातिमोक्ख**–[पहा-पाटिमोक्ख].
**पाती**–(वि.) फेकणारा, टाकणारा, सोडणारा.
**पातु**–(अव्यय) समोर, प्रकट, उघड, दिसणारा.
**पातुकम्म**–(नपु.) प्रकट करणे, उघड करणे, दाखविणे.
**पातुकरण**–[पहा–पातुकम्म].
**पातुभाव**–(पु.) प्रादुर्भाव, उघड होणे, स्पष्ट दिसणे.
**पातुभूत**–(कृ.) उघडा, उघड झालेला, प्रकट झालेला.
**पातुकम्यता**–(वि.) पिण्याची इच्छा, तृषित भाव.
**पातुकरोति**–(क्रि.) प्रकट करणे, प्रसिद्ध करणे, उघड करणे.
**पातुकरि**–(पू. क्रि.) प्रकट केले, उघड केले, प्रसिद्ध केले.
**पातुकत**–(कृ.) प्रकट झाला, उघड झाला, प्रसिद्ध झाला.
**पातुकरित्वा**–(पू. क्रि.) प्रकट करून, उघड करून, प्रसिद्ध करून.
**पातुकत्वा**–[पहा–पातुकरित्वा].
**पातुकाम**–(वि.) पिण्याची इच्छा धरणारा.
**पातुभवति**–(क्रि.) प्रकट होणे, उघड होणे, प्रसिद्ध होणे.
**पातुभवि**–(पू. क्रि.) प्रकट झाला, उघड झाला, प्रसिद्ध झाला.
**पातुभूत**–(कृ.) प्रकट होता, उघड होता, प्रसिद्ध होता.

**पातुभविस्त्वा**–(पू. क्रि.) प्रकट होऊन, उघड होऊन, प्रसिद्ध होऊन.
**पातुरहोसि**–(पू. क्रि.) प्रकट झाला, उघड झाला.
**पातुं**–(कृ.) पिण्यासाठी, पिण्याकरिता.
**पातेति**–(क्रि.) पडणे, फेकणे, हत्या करणे.
**पातेसि**–(पू. क्रि.) पडले, फेकले, हत्या केली.
**पातित**–(कृ.) पडता, फेकता, हत्या करता.
**पातेत्वा**–(पू. क्रि.) पाडून, फेकून, हत्या करून.
**पातो**–(अव्यय) प्रातःकाल, पहाट.
**पातोव**–(अव्यय) सकाळी, पहाटे, प्रातःकाली.
**पाथेय्य**–(नपु.) वाट खर्ची, प्रवासासाठी फराळ, प्रवासातील शिदोरी.
**पाद**–(पु., नपु.) पाय, टांग, काही लांबीचा चौथा भाग, एक चतुर्थांश, कवितेच्या चार ओळीपैकी एक ओळ.
**पादक**–(वि.) आधारासह, पाया असलेला.
**पादकज्झान**–(नपु.) आधारासह, सोदाहरण, साधार ध्यानधारणा.
**पाद-कठलिका**–(स्त्री.) पाय चोळण्याचा लाकडी तुकडा.
**पादङ्गुट्ठ**–(नपु.) पायाचा आंगठा, आंगठा.
**पादङ्गुलि**–(स्त्री.) पायाचे बोट, पंजा, बोट.
**पादट्ठिक**–(नपु.) पायाचे हाड.
**पाद-तल**–(पु.) पायाचा तळवा, तळपाय.
**पाद-परिचारिका**–(स्त्री.) पत्नी, बायको.
**पाद-पीठ**–(नपु.) पाय ठेवण्याची फळी (चौकी).
**पाद-पुंछन**–(नपु.) पाय पुसण्याचे वस्त्र.
**पाद-मूले**–(नपु.) पायावर, पायात.
**पाद-मूलिक**–(पु.) नोकर, चाकर, सेवक.
**पाद-लोल**–(वि.) फिरण्याचा इच्छुक, फिरण्याची आवड असलेला.
**पाद-सम्बाहन**–(नपु.) पाय चोळणे, पाय रगडणे, पाय दाबणे.
**पादञ्जलि जातक**–पादञ्जली नावाचा राजकुमार दुर्वर्तनी लोकांच्या संगतीमुळे नादान बनला होता. तो पित्याच्या मृत्युनंतर राजा बनू शकला नसल्याची कथा–(२४७).
**पादप**–(पु.) वृक्ष.
**पादासि**–(क्रि.) दिले.
**पादुका**–(स्त्री.) खडाऊ. लाकडी वहाणा.
**पादूदर**–(पु.) साप.
**पादोदक**–(पु.) पाय धुण्याचे पाणी.
**पान**–(नपु.) पिणे, पिण्याचा पदार्थ.
**पानक**–(नपु.) पेय, पदार्थ.
**पान-मण्डल**–(नपु.) दारूचा गुत्ता, दारूचा आड्डा.
**पानागार**–(नपु.) दारूचे दुकान.
**पानीय**–(नपु.) पाणी, पेय पदार्थ.
**पानीय-घट**–(पु.) पाण्याचा घडा, पाण्याची घागर, पाण्याचे मडके.
**पानीय-चाटी**–(स्त्री.) पाण्याची वाटी, फुलपात्र.
**पानीय-थालिका**–(स्त्री.) पिण्याचे भांडे, प्याला.
**पानीय-भाजन**–(नपु.) पिण्याचे भांडे.
**पानीय-मालक**–(नपु.) पाणपोई.
**पानीय-साला**–(स्त्री.) पाणपोई.
**पानीय-जातक**–आपले पाणी साठवून ठेवून, दुसऱ्याचे पाणी पिणाऱ्या स्वार्थ्यांची कथा–(४५९).
**पाप**–(नपु.) अकुशल-कर्म, पाप.
**पाप**–(वि.) वाईट.
**पाप-कम्म**–(नपु.) अपराध, गुन्हा, पाप-कर्म.
**पाप-कम्मन्त**–(वि.) पापी, दुराचारी.
**पापकर, पापकारी**–(वि.) पापी, दुराचारी.
**पाप करण**–(नपु.) वाईट कर्म करणे, दुष्कर्म करणे.
**पाप-धम्म**–(वि.) वाईट वर्तन, पापी.
**पाप-मित्त**–(पु.) वाईट मित्र.
**पाप-मित्तता**–(स्त्री.) कुसंगती, वाईटांची मैत्री.
**पाप-सङ्कप्प**–(पु.) वाईट विचार, पापी संकल्प.
**पाप-सुपिन**–(नपु.) वाईट स्वप्न.
**पापक**–(वि.) पापी, पाप करणारा.
**पापणिक**–(पु.) दुकानदार.
**पापिका**–(स्त्री.) पापी स्त्री., पापिणी, दुराचारी स्त्री.
**पापित**–(कृ.) वाईट केलेला, अपराधी, आरोपी, गुन्हेगार.
**पापिमन्तु**–(वि.) पाप करणारा.
**पापियो**–(वि. तुलनात्मक) त्यापेक्षा मोठा पापी.
**पापुणन**–(नपु.) प्राप्ती, पोहोचणे, जाणे, गाठणे.
**पापुणाति**–(क्रि.) पोहोचणे, गाठणे.
**पापुणि**–(पू. क्रि.) पोहोचला, गाठले.
**पापुणन्त**–(कृ.) पोहोचता, गाठता.
**पापुणितं-पत्तुं**–(कृ.) पोहोचण्यायोग्य, जाण्यायोग्य.
**पापुणित्वा, पत्वा**–(पू. क्रि.) पोहोचून, गाठून.
**पापुरण**–(नपु.) चादर, पांघरूण, कांबळ.
**पापुरति**–(क्रि.) पांघरणे, गुंडाळणे.
**पापेति**–(क्रि.) मिळविणे, पोहोचविणे.
**पापेसि**–(पू. क्रि.) मिळविले, पोहोचविले.

**पापित, पापेन्त**–(कृ.) मिळविता, पोहोचविता.
**पापेत्वा**–(पू. क्रि.) मिळवून, पोहोचवून.
**पाभत**–(नपु.) भेट, देणगी.
**पाम**–(नपु.) खरूज, खाज, आग.
**पामङ्ग**–(नपु.) छातीवर बांधण्याची पट्टी.
**पामुज्ज**–(नपु.) आनंद, प्रसन्नता, प्रमोद.
**पामेति**–(क्रि.) तुलना करणे.
**पामोक्ख**–(वि.) प्रमुख.
**पामोक्ख**–(पु.) नेता, नायक, पुढारी.
**पामोज्ज**–[पहा–पामुज्ज].
**पाय**–(वि.) प्रायः, संध्या, (समासात) भरलेला.
**पायक**–(वि.) पिणारा, चोखणारा.
**पायाति**–(क्रि.) निघून जाणे.
**पायासि**–(पू. क्रि.) निघून गेला.
**पायास**–(पु.) दुधाची खीर.
**पायित**–(कृ.) प्यालेला.
**पायी**–(वि.) पिणारा.
**पायु**–(पु.) गुदद्वार, मलद्वार.
**पायेति**–(क्रि.) पाजविणे, चोखविणे.
**पायेसि**–(पू. क्रि.) पाजविले, चोखविले.
**पायित, पायेन्त**–(कृ.) पाजविता, चोखविता.
**पायमान**–(कृ.) पाजविण्यायोग्य, चोखविण्यायोग्य.
**पायेत्वा**–(पू. क्रि.) पाजवून, चोखवून.
**पायेन**–(क्रि. वि.) प्रायः, संध्या.
**पार**–(नपु.) किनारा, नदीचा तट.
**पार-गत**–(वि.) किनारी लागलेला, पलिकडे गेलेला.
**पार-गवेसि**–(वि.) पलिकडे जाऊ इच्छिणारा.
**पार-गामी**–(पु.) पलिकडे जाणारा, ओलांडणारा.
**पारगू, पारङ्गत, पारपत्त**–(वि.) पलिकडे गेलेला, ओलांडून गेलेला.
**पार लोकिक**–(वि.) परलोकासंबंधी.
**पारद**–(पु.) पारा.
**पारदारिक**–(पु.) पर स्त्रीगमन करणारा, पर स्त्री भोगणारा.
**पारमिता, पारमी**–(स्त्री.) पूर्णत्व, परिपूर्णता, संपूर्णता, गुणांची पराकाष्टा.
**पारम्परिय**–(नपु.) परंपरा.
**पारं**–(क्रि. वि.) पलिकडे, पुढे, किनारा ओलांडून.
**पाराजिक**–(वि.) भिक्खुंच्या हस्ते घडणाऱ्या चार दोषांपैकी एकाचा दोष.
**पाराजिक**–(ना.) (पु.) विनय पिटकांतील सुत्त विभंगाच्या दोन भागांपैकी पहिला भाग.
**पारापत, पारावत**–(पु.) कबूतर.
**पारायण, पारायन**–(नपु.) अंतिम उद्देश, मुख्य हेतु, प्रधान उद्देश.
**पारिचारिया**–(स्त्री.) सेवा-सुश्रुषा.
**पारिच्छत्तक**–(पु.) तेहत्तीस कोटी देवलोकांच्या नंदनवनातील फुलांचा वृक्ष, पारिजातक.
**पारिजातक**–(पु.) पारिच्छत्तक.
**पारिपन्थिक**–(वि.) धोकेबाज, वाटमारी करणारा, लुटारू.
**पारिपूरि**–(स्त्री.) पूर्ती, पूर्तता, संपूर्णता.
**पारिम**–(वि.) तिकडे, पुढे, आणि पुढे.
**पारिभोगिक**–(वि.) वापरण्यायोग्य, उपयोगात आणलेले, वापरलेले.
**पारिलेय्य, पारिलेय्यक**–(नपु., वि.) कोसंबी-जवळील लहान बाग किंवा लहान नगर.
**पारिवट्टक**–(वि.) अदला-बदल केलेला.
**पारिसज्ज**–(वि.) परिषदेचा सदस्य.
**पारिसुद्धि**–(स्त्री.) पवित्रता, शुद्धी.
**पारिसुद्धि-सील**–(नपु.) उपजीविकेच्या साधनांची शुद्धता, योग्य चारितार्थ.
**पारुत**–(कृ.) पांघरलेला.
**पारुपति**–(क्रि.) पांघरणे, नेसणे.
**पारुपि**–(पू. क्रि.) पांघरले, नेसले.
**पारुपन्त**–(कृ.) पांघरता, नेसता.
**पारुपित्वा**–(पू. क्रि.) पांघरून, नेसून.
**पारुपन**–(नपु.) वस्त्र, चीवर, कापड.
**पारेवत**–[पहा–पारापत, पारापत].
**पारोह**–(पु.) वडाच्या झाडाप्रमाणे लोंबणारी पारंबी, परफांदी.
**पाल**–(पु.) पालक, संरक्षक, प्रमुख.
**पालक**–(पु.) पाळणारा, रक्षण करणारा, सांभाळणारा.
**पालन**–(नपु.) संरक्षण, सांभाळ.
**पालना**–(स्त्री.) सुरक्षा, आरक्षा, सांभाळ.
**पालि**–(स्त्री., वि.) बौद्ध त्रिपिटक अथवा त्रिपिटकाची भाषा, बौद्ध वाङ्मयाची भाषा, बुद्धकालीन जनबोली.
**पालि, पाली, पाळि, पाळी**–(स्त्री.) ओळ, पंक्ती.
**पालिच्च**–(नपु.) डोक्याच्या केसांचा पांढरेपणा, वृद्धापकाळाची खूण.

**पालेति**–(क्रि.) पालन करणे.
**पालेसि**–(पू. क्रि.) पालन केले.
**पालित, पालेन्त, पालेतुं**–(कृ.) पालन करता.
**पालेतब्ब**–(कृ.) पालन करण्यायोग्य.
**पालेत्वा**–(पू. क्रि.) पालन करून.
**पालेतु**–(पु.) पालन करणारा, संरक्षण, राखणदार, पहारेकरी.
**पावक**–(पु.) अग्नी, आग, विस्तव.
**पावचन**–(नपु.) प्रवचन, बुद्धोपदेश.
**पावळ**–(पु.) नितंब.
**पावस्सि**–(पु.) पाऊस, वर्षा.
**पावा**–(नपु., वि.) मल्लाचे एक नगर, पावा नगरीत भगवान बुद्ध आपल्या परिनिर्वाणापूर्वी गेले होते.
**पावार**–(पु.) कफनी, पायघोळ अंगरखा.
**पावारिक**–(वि., पु.) कफनी विकणारा.
**पावुस**–(पु.) पाऊस, वर्षाऋतु, मासा.
**पावुस्सक**–(वि.) वर्षाऋतुसंबंधी.
**पास**–(पु.) पाश, जाळे, बटनाचे छिद्र, गोफण.
**पासक**–(पु.) फासा.
**पासण्ड**–(नपु.) मिथ्या दृष्टि, चुकीची धारणा.
**पासण्डक**–(पु.) मिथ्या दृष्टिवाला, चुकीची धारणा असलेला, पाखंडी.
**पासाण**–(पु.) दगड, टेकडी.
**पासाण-गुळ**–(पु.) दगडी गोळा, गुंडी.
**पासाण-चेतिय**–(नपु.) दगडी चैत्य, पाषाण चैत्य.
**पासाण-पिट्ठि**–(स्त्री.) टेकडीचा पृष्ठभाग.
**पासाण-फलक**–(पु.) दगडी फळा, दगडी पट्टी.
**पासाण-लेखा**–(स्त्री.) दगडावर खोदलेला लेख, शिलालेख.
**पासाद**–(पु.) प्रासाद, महाल.
**पासाद-तल**–(नपु.) महालाचा वरचा ताळा.
**पासादिक**–(वि.) प्रियकर, आवडणारा.
**पाहुण**–(पु.) अतिथी, पाहुणा, आगंतुक, नातेवाईक.
**पाहुण**–(नपु.) अतिथी भोजन, सत्काराचे जेवण, भेट.
**पाहुणेय्य**–(वि.) आतिथ्य करण्यायोग्य, सत्कारपात्र.
**पाहेति**–(क्रि.) पाठविणे.
**पाहेसि**–(पू. क्रि.) पाठविले.
**पि**–(अ.) अपि, भी, सुद्धा, ही.
**पिक**–(पु.) कोकीळ, कोयल.
**पिङ्गल**–(वि.) ताम्र-वर्ण, तांबूस रंगाचा, तांबूस.
**पिङ्गल-नेत्त**–(वि.) तांबूस डोळ्याचा, आरक्त नेत्र, तांबूस डोळे.
**पिङ्गल-मक्खिका**–(स्त्री.) गोमाशी.
**पिचु**–(नपु.) कापूस.
**पिचु-पटल**–(पु.) कापसाचा थर.
**पिच्छ**–(नपु.) मोराचा पिसारा.
**पिच्छिल**–(वि.) घसरणारा.
**पिञ्ज**–(नपु.) पक्षाचा मागील भाग, शेपूट.
**पिञ्जर**–(वि.) रक्त वर्ण, तांबडा रंग.
**पिञ्जाक**–(नपु.) पेंड.
**पिटक**–(नपु., सामान्य नाम) पेटी, पालि त्रिपिटकापैकी एक पिटक, त्रिपिटक–(१) सुत्त पिटक, (२) विनय पिटक, (३) अभिधम्म पिटक.
**पिटक-धर**–(वि.) त्रिपिटक पाठ असलेला.
**पिट्ठ**–(नपु.) पाठ, मागील भाग, धान्याचे पीठ.
**पिट्ठ-खादनिय**–(नपु.) पिठाची मिठाई.
**पिट्ठ-धीतलिका**–(स्त्री.) पिठाची बाहुली.
**पिट्ठ-पिण्डी**–(स्त्री.) पिठाची पिंडी, पिठाची गोळी.
**पिट्ठि**–(स्त्री.) पाठ.
**पिट्ठि-कण्टक**–(नपु.) पाठीचा कणा, पाठीतील मणका.
**पिट्ठि-गत**–(वि.) पाठीवर चढणे, पाठीवर बसणे.
**पिट्ठि-पस्स**–(नपु.) पाठीमागील भाग.
**पिट्ठि-पासाण**–(पु.) रुंद पठार.
**पिट्ठि-मंसिक**–(वि.) चहाडखोर, चहाडी करणारा.
**पिट्ठि-वंस**–(स्त्री.) पाठीचा कणा, भिंतीतील आधार खांब–, ओंडका–, वासा.
**पिठर**–(पु.) मातीचा डेरा.
**पिण्ड**–(पु.) घास.
**पिण्ड-चारिका**–(वि.) भिक्षाटन करणारा.
**पिण्ड-दायक**–(पु.) भिक्षा वाढणारा.
**पिण्ड-पात**–(पु.) भिक्षाटन, भिक्षादान.
**पिण्ड-पातिक**–(वि.) भिक्षाटन करणारा, केवळ भिक्षाटनाने मिळालेल्या अन्नाचेच भोजन करणारा.
**पिण्डाचार**–(पु.) भिक्षाटन.
**पिण्डक**–(पु.) याचकास अन्नदान करणारा.
पिण्डक–(नपु.) भिक्षेत मिळालेले जेवण.
**पिण्डाय**–(चतुर्थी विभक्ती) भिक्षाटनाकरिता, भिक्षाटनासाठी.
**पिण्डि**–(स्त्री.) गुच्छा, झुबका.
**पिण्डिक-मंस**–(नपु.) नितंब.
**पिण्डित**–(कृ.) पिंडीकृत, गोळा.

**पिण्डियालोप-भोजन**–(नपु.) भिक्षाटनाने मिळालेले भोजन.
**पिण्डेसि**–(क्रि.) पिण्ड बनविणे, अन्न तयार करणे.
**पिण्डेसि**–(पू. क्रि.) पिंड बनविला, अन्न तयार केले.
**पिण्डेन्त**–(कृ.) पिंड बनविता, अन्न तयार करता.
**पिण्डेत्वा**–(पू. क्रि.) पिंड बनवून, अन्न तयार करून.
**पिण्डोल-भारद्वाज**–(पु., वि.) कोसंबीचा राजा उदयन याच्या पुरोहिताचा मुलगा. तो भारद्वाज गोत्राचा होता.
**पिण्डोल्प**–(नपु.) भिक्षाटन.
**पितामह**–(पु.) वडिलांचे वडील, आजोबा.
**पितिक**–(वि.) वडील-बाप असलेला.
**पिति-पक्ख**–(पु.) वडिलाकडून, वडिलार्जित.
**पितृ**–(पु.) पिता, बाप, वडील, जन्मदाता.
**पितु-किच्च**–(नपु.) वडिलाचे कर्तव्य.
**पितु-घात**–(पु.) पितृ-घात, पितृ-हत्या.
**पितु-सन्तक**–(वि.) बापाची संपत्ति.
**पितुच्छा**–(स्त्री.) वडिलांची बहीण, आत्या.
**पितुच्छा-पुत्त**–(पु.) आत्याचा मुलगा.
**पित्त**–(नपु.) पित्त, कडू द्रव (वांत, पित्त, कफ यापैकी)
**पित्ताधिक**–(वि.) ज्यात पित्त जास्त आहे.
**पिधीयति**–(क्रि.) बंद करणे, लपविणे, झाकणे.
**पिधीयि**–(पू. क्रि.) बंद केले, लपविले, झाकले.
**पिधीयित**–(कृ.) बंद करता, लपविता, झाकता.
**पिधीयित्वा**–(पू. क्रि.) बंद करून, लपवून, झाकून.
**पिदहति**–(क्रि.) बंद करणे, झाकणे.
**पिदहि**–(पू. क्रि.) बंद केले, झाकले.
**पिदहित, पिहित**–(कृदन्त) बंद करता, झाकता.
**पिधाय**–(कृ.) बंद करण्यायोग्य, झाकण्यायोग्य.
**पिदहित्वा**–(पू. क्रि.) बंद करून, झाकून.
**पिदहन**–(नपु.) बंद करणे, झाकणे.
**पिधान**–(नपु.) झाकण.
**पिनास**–(पु.) पडसे, सर्दी.
**पिपासा**–(स्त्री.) तहान, तृष्णा.
**पिपासित**–(कृ.) तहानलेला, तृषित.
**पिपिल्लिका, पिपीलिका**–(स्त्री.) मुंगी.
**पिप्फलक**–(नपु.) कात्री, कातर.
**पिप्फली**–(स्त्री.) पिंपळी.
**पिबति**–(क्रि.) पिणे.
**पिबि**–(पू. क्रि.) प्याले.
**पिबन्त, पीत, पिबितुं, पातुं**–(कृ.) पिता.
**पिबमान**–(कृ.) पिण्यायोग्य.
**पिबित्वा**–(पू. क्रि.) पिऊन.
**पिय**–(वि.) प्रिय, आवडता.
**पिय**–(पु.) पति, नवरा, प्रियकर.
**पिय**–(नपु.) प्रिय वस्तु.
**पियकम्यता**–(स्त्री.) प्रिय वस्तूची अभिलाषा, स्वतः प्रिय बनण्याची इच्छा.
**पियतर**–(वि.) प्रियतर, अधिक प्रिय.
**पियतम**–(वि.) प्रियतम, सर्वापेक्षा प्रिय.
**पिय-दस्सन**–(वि.) प्रिय दर्शन, आवडते दर्शन.
**पिय-रूप**–(नपु.) प्रिय रुप, आकर्षक रुप, मोहक रुप.
**पिय-वचन**–(नपु.) प्रिय वचन, गोड बोलणे, मधुर बोली.
**पिय-वचन**–(वि.) गोड बोलणारा.
**पिय-भाणी**–(वि.) मधुर बोलणारा.
**पिय-वादी**–(वि.) गोड बोलणारा, गोड संवाद करणारा.
**पियविप्पयोग**–(पु.) प्रिय माणसाचा वियोग, आवडत्याची ताटातूट.
**पियङ्गु**–(पु.) औषधी वनस्पती.
**पियता**–(स्त्री.) प्रियता, प्रेमभाव, प्रेम, माया.
**पिया**–(स्त्री.) प्रिया, पत्नी, प्रियकरीण.
**पियापाय**–(वि.) प्रिय व्यक्तीचा वियोग, आवडत्याची ताटातूट.
**पियायति**–(क्रि.) प्रेम करणे, माया करणे.
**पियायि**–(पू. क्रि.) प्रेम केले, माया केली.
**पियायित, पियायन्त**–(कृ.) प्रेम करता, माया करता.
**पियायमान**–(कृ.) प्रेम करण्यायोग्य, माया करण्यायोग्य.
**पियायित्वा**–(पू. क्रि.) प्रेम करून, माया करून.
**पियायना**–(स्त्री.) प्रेम करणे.
**पिलक्ख**–(पु.) अंजीराचे झाड.
**पिलन्धति**–(क्रि.) नटणे, सजणे, सजविणे.
**पिलन्धि**–(पू. क्रि.) नटले, सजले, सजविले.
**पिलन्धित**–(कृ.) नटता, सजता, सजविता.
**पिलन्धिय**–(कृ.) नटण्यायोग्य, सजण्यायोग्य, सजविण्यायोग्य.
**पिलन्धित्वा**–(पू. क्रि.) नटून, सजून, सजवून.
**पिलन्धन**–(नपु.) दागिना.
**पिलवति, प्लवति**–(क्रि.) पोहोणे, तरंगणे.
**प्लवि**–(पू. क्रि.) पोहला, तरंगला.
**प्लवित**–(कृ) पोहता, तरंगता.
**प्लवित्वा**–(पू. क्रि.) पोहून, तरंगून.
**पिलोतिका**–(स्त्री.) चिंधी, फाटके जुने कापड.

**पिल्लक**–(पु.) कुत्र्याचे पिल्लू.
**पिवति**–[पहा–पिबति].
**पिवन**–(नपु.) पिणे.
**पिसति**–(क्रि.) दळणे, पीठ करणे.
**पिसि**–(पू. क्रि.) दळले, पीठ केले.
**पिसित्त**–(कृ.) दळता, पीठ करता.
**पिसित्वा**–(पू. क्रि.) दळून, पीठ करून.
**पिसन, पिंसन**–(नपु.) दळण.
**पिसाच, पिसाचक**–(पु.) भूत, पिशाच्च.
**पिसित**–(नपु.) मांस.
**पिसुण**–(नपु.) चुगली, चहाडी.
**पिसुण**–(वि.) चहाडखोर, चहाडी सांगणारा, चुगली करणारा.
**पिहक**–(नपु.) प्लीहा.
**पिहयति**–(क्रि.) स्पृहा करणे, इच्छा करणे, प्रयत्न करणे.
**पिहयि**–(पू. क्रि.) स्पृहा केली, इच्छा केली, प्रयत्न केला.
**पिहायित**–(कृ.) स्पृहा करता, इच्छिता, प्रयत्न करता.
**पिहायित्वा**–(पू. क्रि.) स्पृहा करून, इच्छून, प्रयत्न करून.
**पिहायना**–(स्त्री.) प्रिय करणे, प्रेम करणे, आवडणे.
**पिहालु**–(वि.) ईर्षाळू.
**पिहित**–(कृ.) झाकलेला, गुंडाळलेला.
**पिंसति**–[पहा–पिसति].
**पीठ**–(नपु.) आसन, बैठक.
**पीठक**–(नपु.) बैठक, बसण्याची जागा.
**पीठ जातक**–एक तपस्वी एका दानी व्यापाऱ्याच्या घरी भिक्षेसाठी गेला होता, परंतु घरात कोणीही नसल्या-मुळे त्या तपस्व्यास रिक्त हाताने परत फिरावे लागल्याची कथा–(३३७).
**पीठ सप्पी**–(पु.) लुळा-पांगळा.
**पीठिका**–(स्त्री.) बसण्याची जागा, आसन.
**पीणन**–(नपु.) संतोष, आनंद.
**पीणेति**–(क्रि.) प्रसन्न करणे, संतुष्ट करणे.
**पीणेसि**–(पू. क्रि.) प्रसन्न केले, संतुष्ट केले.
**पीणित, पीणेन्त**–(कृ.) प्रसन्न करता, संतुष्ट करता.
**पीणेत्वा**–(पू. क्रि.) प्रसन्न करून, संतुष्ट करून.
**पीत**–(कृ.) प्यालेले.
**पीत**–(वि.) पिवळा रंग, पिवळा वर्ण
**पीतक**–(वि.) पीत वर्ण.
**पीतन**–(नपु.) पिवळा.
**पीति**–(स्त्री.) प्रीति, माया, प्रसन्नता, आनंद.

**पीति-पामोज्ज**–(नपु.) प्रसन्नता, आनंद, उत्साह.
**पीति-भक्ख**–(वि.) प्रीतिभक्ष, प्रीति हेच भोजन.
**पीति-मन**–(वि.) प्रसन्नचित्त.
**पीति-रस**–(वि.) प्रेम-रस, प्रेमरूपी रस.
**पीति-सम्बोज्झङ्ग**–(पु.) संबोधीचे प्रीति अंग.
**पीति-सहगत**–(वि.) प्रीतिसह, प्रेमासह.
**पीण**–(वि.) मोठा, फुगलेला, लठ्ठ.
**पीळक**–(वि.) पीडा देणारा, त्रास देणारा.
**पीळक**–(नपु.) फोड, फुटकुळी.
**पीळन**–(नपु.) पिडणे, त्रास देणे.
**पीळा**–(स्त्री.) पीडा, त्रास, कष्ट.
**पीळेति**–(क्रि.) पिडणे, त्रास देणे.
**पीळेसि**–(पू. क्रि.) पिडले, त्रास दिला.
**पीळित**–(कृ.) पीडित, पीडता, त्रास देता.
**पीळेत्वा**–(पू. क्रि.) पीडा करून, त्रास देऊन.
**पुक्कस, पुक्कुस**–(पु.) अस्पृश्य, भंगी, झाडूवाल .
**पुग्गल**–(पु.) जोडी, उभयता, दोघे.
**पुग्गल-पञ्ञत्ति**–(स्त्री.) जोडीचे वर्गीकरण. (पु. ना.) अभिधम्म पिटकाच्या सात प्रकरणापैकी, चौथे प्रकरण,. चौथा भाग.
**पुग्गलिक**–(वि.) व्यक्तिगत, वैयक्तिक.
**पुङ्ख**–(नपु.) बाणाचा पंख लावलेला भाग.
**पुङ्गव**–(पु.) वृषभ, श्रेष्ठ पुरुष.
**पुचिमन्द**–(पु.) लिंबाचे झाड, लिंब.
**पुचिमन्द जातक**–लिंबाच्या झाडावर राहणाऱ्या वन-देवाने लुटून आणलेली संपत्ती वाटून घेणाऱ्या चोरांना पिटाळून लावल्याची कथा–(३११).
**पुच्चण्ड**–(नपु.) नासलेले अंडे.
**पुच्छ**–(नपु.) शेपूट, शेपटी.
**पुच्छक**–(पु.) प्रश्न विचारणारा.
**पुच्छति**–(क्रि.) प्रश्न विचारणे.
**पुच्छि**–(पू. क्रि.) प्रश्न विचारला.
**पुट्ठ, पुच्छित, पुच्छन्त**–(कृ.) प्रश्न विचारता.
**पुच्छितब्ब**–(कृ.) प्रश्न विचारण्यायोग्य.
**पुच्छित्वा**–(पू. क्रि.) प्रश्न विचारून.
**पुच्छन**–(नपु.) विचारणे.
**पुच्छा**–(स्त्री.) प्रश्न, पृच्छा.
**पुज्ज**–(वि.) पूज्य, पूजनीय, गौरवार्ह.
**पुञ्छति**–(क्रि.) पुसणे, स्वच्छ करणे.
**पुञ्छि**–(पू. क्रि.) पुसले, स्वच्छ केले.
**पुञ्छित, पुञ्छन्त**–(कृ.) पुसता, स्वच्छ करता.

**पुञ्छमान**–(कृ.) पुसण्यायोग्य, स्वच्छ करण्यायोग्य.
**पुञ्छित्वा**–(पू. कि.) पुसून, स्वच्छ करून.
**पुञ्छन**–(नपु.) पुसण्याचे कापड, रुमाल.
**पुञ्छनी**–(स्त्री.) झाडणी, पुसण्याचे कापड, झाडू.
**पुञ्ज**–(पु.) ढीग, साठा.
**पुञ्जकत**–(वि.) ढीग लावला, साठा केला.
**पुञ्ञ**–(नपु.) पुण्य, पावित्र्य.
**पुञ्ञ-कम्म**–(नपु.) पुण्य-कार्य.
**पुञ्ञ-काम**–(वि.) पुण्य इच्छिणारा.
**पुञ्ञ-किरिया**–(स्त्री.) पुण्य क्रिया.
**पुञ्ञक्खन्ध**–(पु.) पुण्यस्कंध, पुण्याचा साठा.
**पुञ्ञक्खय**–(पु.) पुण्यक्षय-पुण्यनाश, पुण्याची हानी
**पुञ्ञपेक्ख**–(वि.) पुण्य, इच्छुक.
**पुञ्ञफल**–(नपु.) पुण्याचे फळ.
**पुञ्ञ-भाग** (पु.) पुण्याचा भाग-हिस्सा.
**पुञ्ञ-भागी**–(पु., वि.) पुण्याचा भागीदार-वाटेकरी.
**पुञ्ञ-वन्तु**–(पु.) पुण्यवान.
**पुञ्ञानुभाव**–(पु.) पुण्याचा प्रताप, पुण्याचा प्रभाव.
**पुञ्ञाभिसन्द**–(पु.) पुण्य संचय.
**पुट**–(पु., नपु.) पानांचा द्रोण.
**पुट-बद्ध**–(वि.) द्रोणात बांधलेला.
**पुट-भत्त**–(नपु.) द्रोणात भरलेला भात, रस्त्याची शिदोरी.
**पुट-भेदन**–(नपु.) द्रोण उघडणे.
**पुटक**–(नपु.) पानांचा द्रोण.
**पुट दूसक जातक**–पानांचे द्रोण नष्ट करणाऱ्या वानराची कथा–(२८०).
**पुट-भत्त जातक**–राजपुत्राने द्रोणातून भरून आणलेला भात आपल्या भार्येला न दिल्याची कथा–(२१९).
**पुट्ठ**–(कृ.) विचारले, विचारले गेले.
**पुणाति**–(क्रि.) शुद्ध करणे, स्वच्छ करणे.
**पुणि**–(पू. क्रि.) शुद्ध केले, स्वच्छ केले.
**पुणित**–(कृ.) शुद्ध, स्वच्छ.
**पुणित्वा**–(पू. कि.) शुद्ध करून, स्वच्छ करून.
**पुण्डरिक**–(नपु.) शुभ्र कमळ, पांढरे कमळ, श्वेत कमल.
**पुण्ण**–(कृ.) पूर्ण, संपूर्ण.
**पुण्णघट**–(पु.) पूर्ण घट.
**पुण्ण-चन्द**–(पु.) पूर्ण चंद्र.
**पुण्ण-पत्त**–(नपु.) पूर्ण-पात्र, पात्र भरून.
**पुण्णमासी**–(स्त्री.) पौर्णिमा, पुनव
**पुण्ण नदी जातक**–राजाने कमल पानावर पत्र लिहून आपल्या पुरोहितास परत बोलाविल्याची कथा–(२४१).
**पुण्ण पाति जातक**–मद्याने भरलेल्या घटांची कथा–(५३).
**पुण्णता**–(स्त्री.) पूर्णता, परिपूर्णता.
**पुण्णमी**–(स्त्री.) पौर्णिमा.
**पुत्त**–(पु.) पुत्र, मुलगा, सुत, तनय.
**पुत्तक**–(पु.) धाकटा मुलगा.
**पुत्त-दार**–(नपु.) मुलगा आणि पत्नी.
**पुत्त-धीतु**–(स्त्री.) मुलगा-मुलगी.
**पुत्तिम**–(वि.) पुत्र असलेला.
**पुत्तिय**–(वि.) पुत्र असलेला.
**पुथु**–(अ.) पृथक-पृथक, व्यक्तिगत, वेगवेगळा, दूर-दूर.
**पुथुज्जन**–(पु.) सामान्य माणूस, अडाणी, अशिक्षित, सामान्य लोक.
**पुथु-भूत**–(वि.) सर्वत्र पसरलेला.
**पुथु-लोम**–(पु.) मासा.
**पुथुक**–(नपु.) जनावराचे पिल्लू-वासरू, लहान, चिमणा, चिमुकला.
**पुथुल**–(वि.) विशाल, लांब-रुंद, मोठा.
**पुथुवी**–(स्त्री.) पृथ्वी.
**पुथुसो**–(क्रि. वि.) उलट रीतीने, वेग-वेगळा.
**पुन**–(अ.) नंतर, पुन्हा.
**पुन-दिवस**–(पु.) पुढचा दिवस, उद्या.
**पुनप्पुनं**–(अ.) पुनःपुन्हा, नंतर नंतर, वारंवार.
**पुनब्भव**–(पु.) पुनर्जन्म.
**पुनवचन**–(नपु.) पाठांतर.
**पुनरुत्ति**–(स्त्री.) पुनरुक्ती, पुनःपुन्हा म्हणणे, दुरुक्ती.
**पुनागमन**–(नपु.) परत येणे, पुनरागमन, पुन्हा येणे.
**पुनाति**–[पहा–पुणाति].
**पुनेति**–(क्रि.) पुन्हा येणे, परत येणे.
**पुन्नाग**–(पु.) जायफळाचे झाड.
**पुप्फ**–(नपु.) पुष्प, मासिक धर्म, मासिक पाळी.
**पुप्फ-गच्छ**–(पु.) फुलणारे झाड.
**पुप्फ-गन्ध**–(वि.) फुलांचा सुगंध.
**पुप्फ-चुम्बटक**–(नपु.) फुलांचा गुच्छ.
**पुप्फ-छड्डक**–(पु.) नाश झालेली फुले फेकणारा, भंगी, झाडूवाला.
**पुप्फ-दाम**–(स्त्री.) फुलांची माळ.

**पुप्फ-धर**–(वि.) फुललेला.
**पुप्फ-पट**–(पु., नपु.) वेलबुट्टीचे कापड, कशिदा काढलेले कापड.
**पुप्फ-मुट्ठि**–(पु.) फुलांनी भरलेली मूठ, मूठभर फुले.
**पुप्फ-रासि**–(पु.) फुलांचा ढीग.
**पुप्फवती**–(स्त्री.) पुष्पवती, मासिक पाळी चालू असलेली स्त्री, रजस्वाला, रजवति.
**पुप्फरत्त जातक**–पतीने आपल्या पत्नीची इच्छा पुरी करण्यासाठी राजाच्या केशर बागेतून काही केशर चोरण्याचा प्रयत्न केला. परंतु राजसेवकांनी त्यास पकडून नेल्याची कथा–(१४७).
**पुप्फति**–(क्रि.) फुलणे.
**पुप्फि**–(पू. क्रि.) फुलला.
**पुप्फित**–(कृ.) फुलता.
**पुप्फित्वा**–(पू. क्रि.) फुलवून, फुलून.
**पुब्ब**–(पु.) पू, जखमेतील घाण.
**पुब्ब**–(वि.) पहिला, पूर्व, पूर्व दिशेचा, पूर्वीचा [**गत-पुब्ब** = निघून गेलेला.]
**पुब्बन्त**–(पु.) भूतकाळ, निघून गेलेला, पूर्वक्षितीज. पूर्वेकडील कड-टोक, प्राचीन.
**पुब्ब-कम्म**–(नपु.) पूर्व जन्माचे कर्म, पूर्व-कर्म.
**पुब्ब-किच्च**–(नपु.) पूर्व-कृत्य.
**पुब्बङ्गम**–(वि.) पूर्वगामी, पूर्वीचे.
**पुब्ब-चरित**–(नपु.) पूर्व-चरित्र, पूर्वीचे जीवन.
**पुब्ब-देव**–(पु.) प्राचीन देवगण.
**पुब्ब-निमित्त**–(नपु.) पूर्व लक्षण.
**पुब्ब-पुरिस**–(पु.) पूर्व-पुरुष, मूळ पुरुष.
**पुब्ब-पेत**–(पु.) पूर्व-प्रेत.
**पुब्बङ्ग**–(पु.) पहिला भाग.
**पुब्ब योग**–(पु.) पूर्व संबंध, पूर्वीचा ऋणानुबंध.
**पुब्बविदेह**–(पु.) प्राचीन महाद्वीपाचे (भारताचे) नाव.
**पुब्बण्ह**–(पु.) पूर्वान्ह, दुपारपूर्वी.
**पुब्बन्न**–(नपु.) तांदुळ, गहू, इत्यादी सात प्रकारांची धान्ये.
**पुब्बा**–(स्त्री.) पूर्व दिशा.
**पुब्बाचरिय**–(पु.) पूर्वाचार्य, पहिले शिक्षक.
**पुब्बापर**–(वि.) पहिला आणि नंतरचा.
**पुब्बाराम**–(पु., वि.) श्रावस्ती नगरीच्या पूर्वेकडील उद्यान. अनाथ पिंडकाच्या घरी जेवण केल्यानंतर भगवान बुद्ध याच पूर्वारामात विश्रांती घेत असत.
**पुब्बुट्ठायी**–(वि.) इतरांच्या अगोदर उठणारा.
**पुब्बे**–(नपु.) पहिले, प्राचीन, पूर्वकालीन, पूर्वीच्या काळी
**पुब्बेकत**–(वि.) पूर्व-कृत, पूर्वजन्मी केलेले कर्म.
**पुब्बे निवास**–(पु.) पूर्वजन्म.
**पुब्बे निवास-ञाण**–(नपु.) पूर्व जन्मीचे ज्ञान.
**पुब्बे निवासानुस्सति**–(स्त्री.) पूर्व जन्माची स्मृती, पूर्व जन्माची आठवण.
**पुभ**–(पु.) पुरुष, नर
**पुर**–(नपु.) नगर, शहर, मोठे गाव.
**पुरक्खत**–(कृ) पुरस्कृत, सन्मानित, अभिनंदित.
**पुरक्खरोति**–(क्रि.) पुरस्कृत करणे, सन्मान करणे.
**पुरक्खरि**–(पू. क्रि.) पुरस्कृत केले, सन्मान केला.
**पुरक्खत**–(कृ.) पुरस्कृत, सन्मानित.
**पुरक्खत्वा**–(पू. क्रि.) पुरस्कृत करून, सन्मान करून.
**पुरतो**–(अ.) समोर, पुढे.
**पुरत्था**–(अ.) पूर्व दिशा.
**पुरत्थाभिमुख**–(वि.) पूर्वाभिमुख, पूर्वेला तोंड असलेला.
**पुरत्थिम**–(वि.) पूर्वेकडील, पौर्वात्य.
**पुरा**–(अ.) पूर्वेचा, पूर्वेकडील.
**पुराण**–(वि.) प्राचीन, फार जुना.
**पुराण-दुतियिका**–(स्त्री.) जी पहिली पत्नी होती. (विशेषत: हा शब्दप्रयोग भिक्खु संसारी होता आणि आणि त्यावेळी त्याची जो पत्नी होती तिच्यासाठीच वापरतात.)
**पुराण-सालोहित**–(वि.) पूर्वीचा रक्तसंबंधी, अगदी रक्ताचा नातेवाईक.
**पुरातन**–(वि.) प्राचीन, पुरातन.
**पुरिन्दद**–(पु.) इंद्र.
**पुरिम**–(वि.) पूर्वीचा, पहिला.
**पुरिम-जाति**–(स्त्री.) पूर्वजन्म.
**पुरिमत्तभाव**–पूर्वजन्म.
**पुरिमतर**–(वि.) पूर्वतर, फार पूर्वीचा
**पुरिस**–(पु.) पुरुष, मनुष्य, नर.
**पुरिसकार**–(पु.) पुरुषत्त्व, वीर्य.
**पुरिस-थाम**–(पु.) पुरुष सामर्थ्य.
**पुरिस-दम्म**–(पु.) शैक्ष मनुष्य, सुज्ञ, सुसंस्कृत.
**पुरिस-दम्म-सारथी**–(पु.) शैक्ष मनुष्यांचा सारथी, बुद्ध.
**पुरिस-परक्कम**–(पु.) पुरुषाचा पराक्रम.
**पुरिस-मेध**–(पु.) नरबालि, मनुष्य बळी देणे.
**पुरिस-लिङ्ग**–(पु.) पुरुष लिंग, पुरुषाचे जननेंद्रिय.
**पुरिस-ब्यञ्जन**–(पु.) [पहा–पुरिस लिङ्ग].
**पुरिसाजञ्ञ**–(पु.) श्रेष्ठ पुरुष, थोर पुरुष.
**पुरिसादक**–(पु.) हरामखोर, दुष्ट, नरमांसभक्षक.

**पुरिसाधम**–(पु.) अधम पुरुष, नीच माणूस.
**पुरिसिन्द्रिय**–(नपु.) पुरुषत्त्व दर्शविणारे इंद्रिय, पुरुषजननेंद्रिय.
**पुरिसुत्तम**–(पु.) उत्तम पुरुष, श्रेष्ठ पुरुष, पुरुषांत उत्तम.
**पुरे**–(क्रि. वि.) पूर्वीचा, फार प्राचीन.
**पुरेचारिक**–(वि.) पुढे-पुढे चालणारा.
**पुरेजव**–(वि.) पुढे धावणारा.
**पुरेतरं**–(क्रि. वि.) सर्वांच्या पुढे, सर्वप्रथम.
**पुरेभत्त**–(नपु.) सकाळची न्याहारी.
**पुरेक्खार**–(पु.) पुरस्कार, (पुढे जाणे) आदर करणे.
**पुरेजात**–(वि.) पूर्वोत्पन्न, आधी जन्मलेला.
**पुरोगामी**–(पु.) पुढे जाणारा, नवमतवादी, नव्या विचारांचा.
**पुरोहित**–(पु.) पुरोहित, धार्मिक संस्कार करणारा.
**पुलवक**–(पु.) किडा, कीटक, जंतु.
**पुलिन**–(नपुं) वाळू, वाळू असलेला किनारा.
**पूग**–(पु.) पेशींचा समुदाय.
**पूग**–(नपु.) ढीग, साठा.
**पूग-रुक्ख**–(पु.) सुपारीचे झाड.
**पूजना**–(स्त्री.) पूजा, भक्तिपूर्ण भेट.
**पूजनेय्य**–(वि.) पूजनीय, पूजण्यास योग्य.
**पूजिय**–(वि.) पूज्य.
**पूजियमान**–(कृ.) पुजत असतांना.
**पूजित**–(कृ.) पुजलेला, गौरव केलेला, गौरवान्वित.
**पूजेति**–(क्रि.) पूजा करणे, पुजणे.
**पूजेसि**–(पू. क्रि.) पूजा केली, पुजले.
**पूजेन्त, पूजेन्तु**–(कृ.) पूजा करता, पुजतांना.
**पूजेत्वा**–(पू. क्रि.) पूजा करून, पुजून.
**पूति**–(वि.) सडलेला, नासलेला, कुजलेला, दुर्गंधयुक्त.
**पूति-काय**–(पु.) घाणेरडे शरीर.
**पूति-गन्ध**–(पु.) घाण, दुर्गन्धी.
**पूति-मच्छ**–(पु.) कुजलेला-सडलेला मासा.
**पूति-मुख**–(वि.) तोंडाची घाण येणारा.
**पूति-मुत्त**–(नपु.) गोमूत्र.
**पूति-लता**–(स्त्री.) दुर्गंध येणारी वेल.
**पूतिक**–(वि.) कुजका, सडका, नासका.
**पूति मंस जातक**–पूतिमंस श्रृगालाने बकऱ्यांना मारून खाण्याचा प्रयत्न केल्याची कथा–(४३७).
**पूप**–(पु., नपु.) तळलेली गोडपुरी, अनारसा.
**पूपिय**–(पु.) अनारसे विकणारा.
**पूय**–(पुं.) पीप.
**पूर**–(वि.) पूर्ण.
**पूरक**–(वि.) पूर्ण करणारा, पूर्ती करणारा.
**पूरापेति**–(क्रि.) पूर्ण करणे.
**पूरापेसि**–(पू. क्रि.) पूर्ण केले, पुरे केले.
**पूरापित**–(कृ.) पूर्ण करता.
**पूरापेत्वा**–(पू. क्रि.) पूर्ण करून.
**पूरेति**–(क्रि.) पूर्तता करणे.
**पूरेसि**–(पू. क्रि.) पूर्तता केला.
**पूरेत, पूरेन्त, पूरेन्तु**–(कृ.) पूर्तता करता.
**पूरेत्वा**–(पू. क्रि.) पूर्तता करून.
**पूव**–(पु., नपु.) [पहा-पूप].
**पूविक**–[पहा-पूपिय].
**पेक्खक**–(वि.) प्रेक्षक, पाहणारा, बघणारा.
**पेक्खण**–(नपु.) दृष्य पाहणे, बघणे.
**पेक्खति**–(क्रि.) पाहणे, बघणे.
**पेक्खि**–(पू. क्रि.) पाहिले, बघितले.
**पेक्खित**–(कृ.) पाहता, बघता.
**पेक्खमान**–(कृ.) पाहण्यायोग्य, बघण्यायोग्य.
**पेक्खित्वा**–(पू. क्रि.) पाहून, बघून.
**पेखुण**–(नपु.) मोराचे शेपटीचे पंख, मोर-पिसारा.
**पेच्च**–(अ.) मरणोत्तर, मृत्युनंतर.
**पेटक**–(नपु.) पाटी, पेटी, टोपली.
**पेटक**–(वि.) पिटकासंबंधी.
**पेत**–(वि.) प्रेत, शव.
**पेत**–(पु.) भूत-प्रेत, प्राणी मात्राचे शव.
**पेत-किच्च**–(नपु.) अन्त्यक्रिया, प्रेत-क्रिया.
**पेत-योनि**–(स्त्री.) प्रेत योनी.
**पेत-लोक**–(पु.) प्रेतलोक, मृत्युलोक.
**पेत-वत्थु**–(नपु., वि.) प्रेतकथा, खुद्दक निकायाचा सातवा ग्रंथ, या ग्रंथात प्रेत लोकांविषयींच्या कथा संमिलित आहेत.
**पेत्तिक**–(वि.) पैतृक, वडिलार्जित.
**पेत्तणिक**–(वि.) वडिलार्जित संपत्तीवर जगणारा.
**पेत्ति-विसय**–(पु.) पितर-लोक, वाड-वडील.
**पेत्तेय्य**–(वि.) पित्याचा सन्मान करणारा.
**पेत्तेय्यता**–(स्त्री.) पितृ-भक्ती.
**पेम**–(नपु.) प्रेम.
**पेमनीय**–(वि.) प्रेमपात्र, प्रेमास पात्र.
**पेय्य**–(वि.) पिण्यास योग्य.
**पेय्य**–(नपु.) पिण्याचा पदार्थ.
**पेय्यवज्ज**–(नपु.) प्रियवाणी, गोड बोलणे, मधुर बोली.

**पेय्याल**–(नपु.) मध्येच भाषण थांबविण्याचा इशारा.
**पेलक**–(पु.) ससा.
**पेलव**–(नपु., वि.) कोमल, मृदु, बारीक.
**पेसक**–(पु.) प्रेषक, पाठविणारा.
**पेसकार**–(पु.) विणकर, विणणारा, कोष्टी.
**पेसन**–(नपु.) पाठविणे.
**पेसन-कारक**–(पु.) नोकर, सेवक.
**पेसन-कारिका**–(स्त्री.) दासी, सेविका, नोकरीण.
**पेसल**–(वि.) सदाचरणयुक्त, सद्शील.
**पेसि, पेसिका**–(स्त्री.) पेशी, मास पेशी.
**पेसित**–(कृ.) प्रेषित, पाठविलेला.
**पेसीयत्ति**–(क्रि.) पाठविणे.
**पेसीयमान**–(कृ.) पाठविण्या योग्य.
**पेसुण**–(नपु.) चहाडी, चुगली.
**पेसुण कारक**–(वि., पु.) चहाडखोर, चहाडी करणारा, चुगली करणारा.
**पेसुणिक**–(पु.) चहाडखोर, निंदक.
**पेसुञ्ञ**–(नपु.) चुगली, चहाडी, निंदा.
**पेसेति**–(क्रि.) पाठविणे.
**पेसेसि**–(पू. क्रि.) पाठविले.
**पेसित, पेसेन्त**–(कृ.) पाठविता.
**पेसेतब्ब**–(कृ.) पाठविण्यायोग्य.
**पेसेत्वा**–(पू. क्रि.) पाठवून.
**पेस्स, पेस्सिय, पेस्सिक**–(पु.) नोकर, दूत.
**पेळा**–(स्त्री.) पेटी.
**पोक्खर**–(नपु.) कमळ, सुंदर.
**पोक्खरता**–(स्त्री.) सौंदर्य.
**पोक्खर-पत्त**–(नपु.) कमळपत्र, कमळाचे पान.
**पोक्खर-मधु**–(नपु.) कमळातील मध, मकरंद.
**पोक्खर-वस्स**–(नपु.) पुष्पवर्षाव, गारांचा पाऊस.
**पोक्खरणी**–(स्त्री.) पुष्करणी, तलाव, तळे, सरोवर.
**पोङख**–[पहा–पुङख].
**पोटगल**–(पु.) काश नावाचे गवत, काशा.
**पोट्ठपाद**–(पु., वि.) आश्वीन महिना.
**पोट्ठपाद**–(ना., वि.) भगवान बुद्धांना आत्म्याविषयी प्रश्न विचारणारा एक परिव्राजक (साधु).
**पोठन**–(नपु.) मारणे, धक्का देणे, बडविणे.
**पोठेति**–(क्रि.) मारणे, धक्का देणे, बडविणे, बोटाने चुटकी वाजविणे.
**पोठेसि**–(पू. क्रि.) मारले, धक्का दिला, बडविले, चुटकी वाजविली.
**पोठित**–(कृ.) मारता, धक्का देता, बडविता, चुटकी वाजविता.
**पोठेत्वा**–(पू. क्रि.) मारून, धक्का देऊन, बडवून, चुटकी वाजवून.
**पोण**–(वि.) वाकलेला, झुकलेला, ओणवा.
**पोत**–(पु.) जनावराचे पिल्लू, वासरू.
**पोत**–(पु.) अंकूर, कोंब.
**पोत**–(पु.) नौका, जहाज.
**पोतक**–(पु.) जनावराचे पिल्लू-वासरू.
**पोतिका**–(स्त्री.) जनावराची पिल्ली-कालवड.
**पोतवाह**–(पु.) नावाडी, जहाज चालविणारा.
**पोत्थक**–(पु., नपु.) पुस्तक, चित्राचा तक्ता.
**पोत्थनिका**–(स्त्री.) बर्ची.
**पोत्थलिका**–(स्त्री.) बाहुली.
**पोत्थुज्जनिक**–(वि.) सामान्य माणसांविषयी.
**पोथियमान**–(कृ.) मारत असता.
**पोथेति**–[पहा–पोठेति].
**पोनोभविक**–(वि.) पुनर्भव-पुनर्जन्माचे कारण.
**पोराण**–(वि.) पुराणा, जुना, प्राचीन.
**पोराणक**–(वि.) प्राचीन.
**पोरिस**–(नपु.) पौरुषत्व.
**पोरिस**–(वि.) पुरुषायोग्य, पुरुषालायक, पुरुषासंबंधी, पुरुषाविषयी.
**पोरिसाद**–(वि.) हरामखोर, अधम मनुष्य.
**पोरी**–(पु.) नागरिक, शहरी, शिष्ट, सभ्य.
**पोरोहिच्च**–(नपु.) पौरोहित्व, पुरोहित-कार्य.
**पोस**–(वि.) वाढविलेला, सांभाळलेला.
**पोसक**–(वि.) पोसणारा, पोषण करणारा.
**पोसिका**–(स्त्री.) दाई, सांभाळणारी स्त्री.
**पोसथ**–[पहा–उपोसथ].
**पोसथिक**–(पु.) उपोसथ व्रत करणारा, आचरणारा.
**पोसन**–(नपु.) पोषण.
**पोसावनिक**–(नपु.) पालन-पोषणाचा खर्च.
**पोसित**–(कृ.) पोषण करता, पाळता, पालन करता.
**पोसेति**–(क्रि.) पोषण करणे, पोसणे.
**पोसेसि**–(पू. क्रि.) पोषण केले, पोसले.
**पोसेन्त, पोसेन्तु**–(कृ.) पोषण करता, पोसता.
**पोसेतब्ब**–(कृ.) पोषण करण्या योग्य, पोसण्या योग्य.
**पोसेत्वा**–(पू. क्रि.) पोषण करून, पोसून.
**प्लव**–(पु.) तरणे, पोहणे, डोंगी.
**प्लवन**–(नपु.) उडी मारणे, पोहणे.

फ्लवङ्गम–(पु.) बंदर, जहाज थांबण्याचे ठिकाण.

## फ

फ–नागरी लिपीच्या वर्णमालेतील "प" वर्गातील दुसरे अक्षर.

फग्गव–(पु.) पालेभाजी.

फग्गु–(पु.) निराहार (उपास), राहण्याची वेळ.

फग्गुण–(पु. वि.) फाल्गून, महिना.

फग्गुणी–(स्त्री.) फाल्गनी नक्षत्र.

फण–(पु.) सापाची फडी–फणा.

फणक, फनक–(नपु.) सापाच्या फडी प्रमाणे.

फणिज्जक–(पु.) ईडलिंबू.

फणी, फनी–(पु.) सर्प, साप, नाग.

फन्दति–(क्रि.) भीतीने कापणे, धडकी भरणे.

फन्दि–(पू. क्रि.) भीतीने कापला, धडकी भरली.

फन्दित–(कृ.) भीतीने थरकाप होता, धडकी भरता.

फन्दमान–(कृ.) थरकाप होण्यासारखा, धडकी भरण्यासारखा.

फन्दित्त्वा–(पू. क्रि.) थरकाप होऊन, धडकी भरून.

फन्दन–(नपु.) स्पंदन, हालणे-डोलणे, थरकाप होणे, थरथरणे, थरारणे.

फन्दना–(स्त्री.) स्पंदन, थरकाप.

फन्दन जातक–स्पंदन वृक्षाखाली झोपलेल्या सिंहावर त्या वृक्षाची फांदी तुटून पडली आणि त्या सिंहाला मार लागल्याची कथा–(४७५).

फन्दित–(कृ.) स्पंदित.

फरण–(नपु.) प्रसार, प्रसरण, व्याप्ती.

फरति–(क्रि.) व्यापणे, पुरे करणे.

फरि–(पू. क्रि.) व्यापले, पुरे केले.

फरित, फरन्त–(कृ.) व्यापता, पुरे करता.

फरित्त्वा–(पू. क्रि.) व्यापून, पुरे करून.

फरसु–(पु.) परशु, कुऱ्हाड.

फरुस–(वि.) कठोर, कडक, निर्दय, कटु बोलणे.

फरुस वचन–(नपु.) कठोर वचन, कडक बोलणे.

फरुसा-वाचा–(स्त्री.) कठोर वाणी.

फल–(नपु.) फळ, परिणाम, शेवट, चाकू सारख्या हत्यारांचे पाते-पान.

फल-चित्त–(नपु.) स्त्रोतापत्ति मार्गाचे स्त्रोतापती फळ, केलेल्या कार्याचे फळ.

फलट्ठ–(वि.) फळप्राप्त.

फलत्थिक–(वि.) फलार्थी, फळाची इच्छा करणारा.

फलदायी–(वि.) फळ देणारा, लाभप्रद.

फलरुह–(वि.) फलोत्पन्न.

फलवन्तु–(वि.) फळदार, फळांनी भरलेला.

फलाफल–(नपु.) अनेक प्रकारची फळे.

फलासव–(पु.) फळांचा अर्क. फळांचा काढा, फळांचा आसव.

फल जातक–घनदाट जंगलांतून एक व्यापारी लोकांची टोळी जात होती. त्या टोळीच्या वाटाड्याने सर्वांना सांगितले की, मला विचारल्याशिवाय किंवा दाखविल्याशिवाय कोणीही कोणतेही फळफूल खाण्याचा प्रयत्न करू नये, ही कथा–(५४).

फलक–(पु., नपु.) फळी, फळा, तक्ता, ढाल.

फलति–(क्रि.) फळ देणे, फाडणे.

फलि–(पू. क्रि.) फळ दिले, फाडले.

फलित, फलन्त–(कृ.) फळ देता, फाडता.

फलित्त्वा–(पू. क्रि.) फळ देऊन, फाडून.

फली–(पु.) फळदार वृक्ष, भरपूर फळे लागलेले झाड.

फलु–(नपु.) बोरू, पोकळ नळीच्या जातीचा सांधा, गाठ, कांडे.

फलु बीज–(नपु.) गाठ.

फस्स–(पु.) स्पर्श, हात लावणे, शिवणे.

फस्सेति–(क्रि.) स्पर्श करणे, प्राप्त करणे.

फस्सेसि–(पू. क्रि.) स्पर्श केला, प्राप्त केले.

फस्सित–(कृ.) स्पर्श करता, प्राप्त करता.

फस्सित्त्वा–(पू. क्रि.) स्पर्श करून, प्राप्त करून.

फळु–(नपु.) वेळूंच्या कांडीचा जोड, कळकाच्या बुंध्यांची गाठ.

फाटिकम्म–[पहा–पाटिकम्म].

फाणित–(नपु.) शेंडा, टोक, शिखर, अग्र.

फाणित-पुट–(पु.) काकवीचा द्रोण, पाकाची वाटी.

फाति–(स्त्री.) वाढ, समृद्धी, वाढीव भाग, हिस्सा.

फारुसक–(नपु.) वाटाण्यासारख्या आकाराचे गोड-आंबट फळाचे झाड, कांगूनी, गोन्नी.

फाल–(पु.) फाळ, नांगराचा फाळ.

फालक–(पु.) फाडणारा, तोडणारा, फोडणारा, नांगरणारा.

फालन–(नपु.) फोडणे, नांगरणे.

फालेति–(क्रि.) फाडणे, नांगरणे.

फालेसि–(पू. क्रि.) फाडले, नांगरले.

फालित, फालेन्त, फालेतु–(कृ.) फाडता, नांगरता.

**फालित्वा**–(पु. क्रि.) फाडून, नांगरून.
**फासु**–(पु.) सोपा, सहज, आराम.
**फासु**–(वि.) आरामशीर, ऐशारामी.
**फासुक**–(वि.) सुखद, सुखकारक, आरामशीर, सहज, सोपे.
**फासुका, फासुलिका**–(स्त्री.) फासळी, बरगडी.
**फिय**–(नपु.) नावेचे वल्हे.
**फीत**–(वि.) समृद्ध, भरपूर, स्फीत, फुगलेला, फार लठ्ठ.
**फुट**–(कृ.) व्याप्त, माखलेला, स्पृष्ट, पुष्ठ, तयार.
**फुटन, पुटन**–(नपु.) चिरणे, फाडणे.
**फुट्ठ**–(कृ.) पुष्ठ, तयार, भरगच्च.
**फुल्ल, फुल्लित**–(कृ.) पूर्णपणे, उमललेले, प्रफुल्ल.
**फुसति**–(क्रि.) स्पर्श करणे, पोहोचणे, प्राप्त करणे.
**फुसि**–(पु. क्रि.) स्पर्श केला, पोहोचला, प्राप्त केले.
**फुसित, फुसन्त**–(कृ.) स्पर्श करता, पोहोचता, प्राप्त करता.
**फुस्समान**–(कृ.) स्पर्श करण्यायोग्य, पोहोचण्यायोग्य, प्राप्त करण्यायोग्य.
**फुसित्वा**–(पु. क्रि.) स्पर्श करून, पोहोचून, प्राप्त करून.
**फुसन**–(नपु.) स्पर्श.
**फुसना**–(स्त्री.) स्पर्श करणे.
**फुसित, फुसितक**–(नपुं.) थेंब, बिंदू, स्पर्श.
**फुसीयति**–(क्रि.) स्पर्श केला जातो.
**फुस्स**–(पु.) पौष महिना, पौष नक्षत्र.
**फुस्स**–(वि.) वर्णयुक्त, रंगीत रंगाचा.
**फुस्स**–(न.) शकून, शुभ-मुहूर्त.
**फुस्स-रथ**–(पु.) राजाचा रथ, राजाच. वारस शोधण्यासाठी सोडलेले रथ, (आश्वमेधाप्रमाणे).
**फुस्स-राग**–(पु.) पुष्प-राग, पुख राज, पिवळे रत्न.
**फेग्गु**–(नपु.) साल, त्वचा.
**फेण**–(नपु.) फेस.
**फेण-पिण्ड**–(पु.) फेसाचा फुगा.
**फेणुद्देहक**–(वि.) फेस बनविणारा, फेस करणारा.
**फेणिल**–(पु.) फेस देणारे झाड.
**फोट**–(पु.) फोड.
**फोटक**–(नपु.) फोड, फुटकुळी.
**फोट्टब्ब**–(नपु.) स्पर्शाचा विषय.
**फोसित**–(कृ.) शिंपलेला, शिंपडलेला, पाणी पाजलेला.

## ब

**ब**–नागरी लिपीच्या वर्णमालेतील "प" वर्गातील तिसरे अक्षर.
**बक**–(पु.) बगळा.
**बक जातक**–बगळयाने ढोंगीपणाने माश्यांना फसवून खाल्ले, शेवटी एका खेकडयाने त्या बगळयाचा प्राण घेतल्याची कथा–(३८८).
**बक जातक**–बगळयाची बगुला भक्तीची कथा–(२३६).
**बक-ब्रह्म-जातक**–भगवान बुद्धाची बकब्रह्मा बरोबर भेट झाल्याची कथा–(४०५).
**बज्झति**–(क्रि.) बांधावयास लावणे, पकडावयास सांगणे, पकडणे, बांधणे.
**बत्तिसंति**–(सं.वि.,स्त्री.) बत्तीस, (३२).
**बदर**–(नपु.) बोर.
**बदरमिस्स**–(वि.) बोर मिश्रीत, बोरे मिसळलेले.
**बदरा**–(स्त्री.) कापूस.
**बदरी**–(स्त्री.) बोराचे झाड.
**बदालता**–(स्त्री.) एक प्रकारची वेली.
**बद्ध**–(कृ.) बांधलेला, अडकलेला, दृढ, घट्ट.
**बद्धञ्जलिक**–(वि.) हात बांधून, हात जोडून.
**बद्ध-राव**–(पु.) पकडलेल्या जनावराची आरडा–ओरड, आडकलेल्या जनावराचा आवाज.
**बद्ध-वरे**–(नपु.) घोरवैर, हाडवैर, घोर शत्रूत्व.
**बधिर**–(वि.) बहिरा, किवंडा, ऐकू न येणारा.
**बन्ध**–(पु.) बंधन, आसक्ती, ओढ.
**बन्धति**–(क्रि.) बांधणे.
**बन्धि**–(पू. क्रि.) बांधले.
**बन्धन्त, बन्धितुं**–(कृ.) बांधता.
**बन्धिय, बन्धनीय, बन्धितब्ब**–(कृ.) बांधण्यायोग्य.
**बन्धित्वा**–(पू. क्रि.) बांधून.
**बन्धन**–(नपु.) बंधन, बांधणे.
**बन्धन मोक्ख जातक**–राजाने युद्ध भूमीवरून खुशाली विचारण्यासाठी वरचेवर दूत पाठविले. राणीने प्रत्येक दूताबरोबर सहवास (संभोग) केल्याची कथा–(१२०).
**बन्धनागार**–(नपु.) तुरुंग, कारागृह.
**बन्धनागार जातक**–दोन मुले व पत्नीला सोडून पती तपश्चर्या करण्यास गेल्याची कथा–(२०१).
**बन्धनागारिक**–(पु.) कैदी, तुरुंगात राहणारा गुन्हेगार.
**बन्धव**–(पु.) बांधव, भाऊबंद.
**बन्धापेत्ति**–(क्रि.) बांधावयास लावणे.
**बन्धापेसि**–(पू. क्रि.) बांधावयास लावले.
**बन्धापित**–(कृ.) बांधावयास लावता.
**बन्धापेत्त्वा**–(पू. क्रि.) बांधावयास लावून.
**बन्धु**–[पहा-बन्धव].

बन्धु-जीवक–(पु.) रोप, झुडूप.
बन्धुमन्तु–(वि.) भाऊबंद असणारा.
बन्धुल–(वि.,पु.) कुशीनगरच्या सेनापतीचा मुलगा.
बप्प–(पु.) आंसू, आश्रू.
बब्बज–(नपु.) गवत, उंच गवत.
बब्बु, बब्बुक–(पु.) मांजर, बोका.
बब्बु जातक–धनलोभी पत्नी मेल्यानंतर उंदीर-घूसेच्या जन्मी गेल्याची कथा–(१३७).
बरिह–(नपु.) मोराची शेपटी, मोराचे मागचे पंख.
बरिहिस–(नपु.) कुश गवत, दर्भ, लोहाळा.
बल–(नपु.) शक्ती, बळ, सैन्यबळ.
बलक्कार–(पु.) जबरदस्ती, बलात्कार, बळजबरी.
बलट्ठ, बलत्थ–(पु.) सैनिक, शिपाई, जवान.
बलन्यास–(पु.) सैनिकांची रांग, ओळ.
बलाका–(स्त्री.) सारस, राजहंस.
बलि–(पु.) बळी, शेतकरी.
बलिकम्म–(नपु.) बळी देणे, आहुती, अर्पण.
बलि-पटिग्गाहक–(वि.) आहुती खाणारा, भक्षण करणारा.
बलि-पुट्ठ–(पु.) कावळा.
बलि-बद्द–(पु.) वृषभ, बैल, बलिवर्द.
बलि-हरण–(नपु.) कर (टॅक्स), कर वसूल करणे.
बली–(वि.) शक्तिशाली, बलवान, ताकदवाला.
बलिस–(पु.) मासे पकडण्याचा गळ.
बव्हाबाध–(वि.) अनेक रोगग्रस्त, अनेक व्याधियुक्त.
बहल–(वि.) मोठा, खोल.
बहलत्त–(नपु.) मोठापणा, वातूळ, खोली.
बहि–(अ.) बाहेर, बाह्य.
बहिगत–(वि.) बाहेर गेला.
बहि-नगर–(नपु.) गावाबाहेर, वेशीबाहेर, बाहेरचे गाव.
बहि-निक्खमन–(नपु.) अभिनिष्क्रमण, बाहेर जाणे, निघून जाणे.
बहिद्धा–(अ.) बाहेर.
बहु–(वि.) अनेक, पुष्कळ, बहुत.
बहुक–(वि.) अनेक.
बहुकरणीय–(वि.) बहुकार्य, अनेक कार्ये.
बहुकार–(वि.) फार उपयोगी.
बहुक्खत्तुं–(वि.) पुष्कळ वेळा, अनेक वेळा.
बहु-जन–(पु.) पुष्कळ लोक, अनेक लोक समाज.
बहु-जागर–(वि.) फार जागृत.
बहु-धन- (वि.) श्रीमंत, धनी.
बहु-पद- (वि.) अनेक पाय असलेला, वाणी कीटक.
बहु-बीहि–(पु.) बहुव्रीहि समास.
बहु-भण्ड–(वि.) पुष्कळ साहित्य.
बहु-भाणी–(वि.) बोलका, फार बोलणारा, वागीश.
बहु-भाव–(पु.) विपुलता, भरमसाठ.
बहु-मत–(वि.) अनेकांना मान्य, पुष्कळांना मान्य.
बहु-मान–(पु.) सन्मान, आदर, सहकार, बहुमान.
बहुमानन–(नपु.) गौरव, सत्कार.
बहुमानित–(वि.) सन्मानित, गौरवित.
बहु-वचन–(नपु.) अनेक वचन.
बहु-विध–(वि.) अनेक प्रकारचा, अनेक प्रकारांनी.
बहुस्सुत–(वि.) बहुश्रुत, पंडित, ज्ञानी.
बहुत्त–(नपु.) बहुत्त्व, अनेक प्रकार.
बहुधा–(क्रि. वि.) अनेक प्रकारांनी, कदाचित्.
बहुल–(वि.) विपुल, पुष्कळ, भरपूर, अनेक.
बहुलता–(स्त्री.) विपुलता.
बहुलत्त्व–(नपु.) बहुत्त्व, अनेक.
बहुलीकत–(वि.) अभ्यस्त, सरावाचा, सध्या चालू.
बहुलीकरण–(नपु.) सतत अभ्यास.
बहुलीकम्म–(नपु.) कार्यरत, सतत उद्योग, दीर्घोद्योग.
बहुलीकार–(पु.) निरंतर अभ्यास करणारा, आजन्म विद्यार्थी.
बहुलीकरोति–(क्रि.) वाढविणे, वाढ करणे.
बहुलीकरि–(पू. क्रि.) वाढविले, वाढ केली.
बहुलीकत–(कृ.) वाढविता, वाढ करता.
बहुलीकत्वा–(पू. क्रि.) वाढवून, वाढ करून.
बहुसो–(क्रि. वि.) अधिक करून, जास्तीत जास्त, प्रायः,
बहुपकार–(वि.) फार उपकार करणारा.
बाकुची–(स्त्री.) सोमराजी वृक्ष, मोहोळ.
बाण–(पु.) तीर, बाण.
बाणधि–(पु.) भाता, तुणीर.
बाधक–(वि.) अडथळा निर्माण करणारा, अडविणारा.
बाधकत्त–(नपु.) अडथळा, बाधा, बाधकत्त्व.
बाधति–(क्रि.) बाधणे, बाधक होणे.
बाधि–(पू. क्रि.) बाधले, बाधक झाला.
बाधित–(कृ.) बाधता, बाधक होता.
बाधित्वा–(पू. क्रि.) बाधून, बाधक होऊन, बाधा होऊन.
बाधन–(नपुं.) बाधा, अडथळा.
बाधा–(स्त्री.) अडथळा.
बाधित–(कृ.) बाधायुक्त, अडथळा आलेला.
बाधेति–(क्रि.) अडथळा करणे, दाबणे.

**बाधेसि**–(पू. क्रि.) अडथळा केला, दावले.
**बाधेन्त**–(कृ.) अडथळा करता, दाबता.
**बाधेत्वा**–(पू. क्रि.) अडथळा करून, दाबून.
**बारस**–(सं. वि.) बारा, (१२).
**बाराणसी**–(स्त्री.) वाराणसी, काशीगण राज्याची राजधानी.
**बाराणसेय्यक**–(वि.) वाराणसीवासी, वाराणसीत निर्माण-तयार.
**बाल**–(वि.) कमी वयाचा, अज्ञानी, अबोध, लहान, मूर्ख.
**बाल**–(पु.) मुलगा, लहान मुलगा.
**बालक**–(पु.) लहान मुलगा, बालक.
**बालता**–(स्त्री.) मूर्खपणा, मूर्खता.
**बाला**–(स्त्री.) लहान मुलगी, कन्या.
**बालिका**–(स्त्री.) लहान मुलगी, बालिका.
**बालिसिक**–(पु.) कोळी, भोई, मासे मारणारा.
**बाल्य**–(नपु.) लहानपणा, मूर्खता.
**बावीसति**–(सं. वि.,स्त्री.) बावीस, (२२).
**बावेरु जातक**–वाराणसीहून बावेरूला वाराणसीहून गेलेल्या व्यापाऱ्यांची कथा–(३३९).
**बाहा**–(स्त्री.) बाजू, कड.
**बाहु-बल**–(नपु.) बाहुबळ, हातातील शक्ती.
**बाहित**–(कृ.) दूर ठेवलेला, बाहेर ठेवलेला, बाह्य.
**बाहिर**–(वि.) बाह्य, बाहेर, दूर, बाहेरवाला.
**बाहिर**–(नपु.) बाहेर, बाहेरच्या बाजूस.
**बाहिरक**–(वि.) दुसऱ्याचे मत, अन्यमत.
**बाहिरक-पब्बज्जा**–(स्त्री.) अन्यमतांनुसार प्रव्रज्जा-दीक्षा.
**बाहिरत्त**–(नपु.) दूरपणा, बाह्यपणा, भेदभाव, दूरभाव.
**बाहिय जातक**–राजाने एका बाळंतिणीच्या वेदना पाहून मुलाच्या जन्मानंतर त्या स्त्रीला आपली पट्टराणी करून घेतल्याची कथा–(१०८).
**बाहु**–(पु.) बाजू, कड, हात.
**बाहुज**–(पु.) क्षत्रीय.
**बाहुजञ्ञ**–(वि.) सार्वजनिक, सामाजिक.
**बाहुमूल**–(नपु.) बगल, बाजू.
**बाहुलिक**–(वि.) समृद्धित राहणारा, समृद्धित वाढलेला.
**बाहुल्ल, बाहुल्य**–(नपु.) आधिक्य, प्रचुरता, अधिकता, कामोपभोगी जीवन.
**बाहुसच्च**–(नपु.) अधिक विद्वत्ता.
**बाहेति**–(क्रि.) दूर ठेवणे, दूर सारणे.
**बाहेसि**–(पू. क्रि.) दूर ठेवले, दूर सारले.



**बाहेन्त**–(कृ.) दूर ठेवता, दूर सारता.
**बाहेत्वा**–(पू. क्रि.) दूर ठेवून, दूर सारून.
**बाळ्ह**–(वि.) मजबूत, बाळसेदार, गुटगुटित.
**बाळ्हं**–(क्रि. वि.) जोराने, अधिकतेने.
**बिदल**–(नपु.) वासा, कळक, बांबू.
**बिन्दु**–(नपु.) थेंब, बिंदू.
**बिन्दुमत्त**–(वि.) थेंबा येवढा, अल्प.
**बिन्दुसार**–(पु. वि.) सम्राट अशोकाचा वडील, मगधाचा राजा.
**बिम्ब**–(नपु.) छाया, पडछाया, प्रतिबिंब.
**बिम्बा**–(स्त्री. विशे. ना.) सिद्धार्थ गौतमाची पत्नी बिम्बा, यशोधरेचे दुसरे नाव.
**बिम्बिका, बिम्बी**–(स्त्री.) एक प्रकारची वेली.
**बिम्बिसार**–(पु. विशे. ना.) मगधाचा राजा, बिंबिसार.
**बिम्बोहन**–(नपु.) उशी, तक्या.
**बिल**–(नपु.) भोक, बिळ, उंदराचे बिळ.
**बिलङ्ग**–(पु.) डोक्याचा.
**बिलङ्ग थालिका**–(स्त्री.) एक प्रकारची यंत्रणा.
**बिलसो**–(क्रि. वि.) वेगवेगळा, उशीराने.
**बिल्ल**–(पु.) बिल्व, बेल, बेलफळ.
**बिळार**–(पु.) बोका, नरमांजर.
**बिळार-भस्ता**–(स्त्री.) लोहाराचा भाता.
**बिळार जातक**–'ढोंगी कोल्हा दरदिवस एकेक उंदीर मारून खात असे. एका चाणाक्ष उंदराने त्याची चाल ओळखली व त्यास मारविले, उरलेल्या उंदरांनी त्या कोल्ह्याचे मांस खाल्ल्याची कथा–(१२८).
**बिळारि कोसिय जातक**–बिलार कोसिय नावाचा एक धनिक फार कंजूस होता. त्याने वडिलार्जित परंपरेने चालत आलेल दानछत्र मोडून टाकल्याची कथा–(४५०)
**बिळाली**–(स्त्री.) मांजर.
**बीज**–(नपुं.) बी, बीज.
**बीज-कोस**–(पु.) फुलांतील बीज कोष.
**बीज-गाम**–(पु.) बियांचा समूह, अनेक बिया.
**बीज-जात**–(नपु.) बियांचे वेग-वेगळे प्रकार-भेद.
**बीज-बीज**–(नपु.) बियांमधून उगविणारे नवे पीक.
**बीभच्छ**–(वि.) बीभत्स, घाणेरडे, किळस आणणारे, घाण.
**बीरण**–(नपु.) बीरण नावाचे गवत.
**बरीण-थम्भ**–(पु.) बीरण गवताचा खांब.
**बुज्झति**–(क्रि.) जाणणे, समजणे, कळणे.
**बुज्झि**–(पू. क्रि.) जाणले, समजले, कळले.

**बुद्ध**–(कृ.) बुद्ध, ज्ञानप्राप्त झालेला, सर्वज्ञ, जाणता समजता, कळता.
**बुज्झन्त**–(कृ.), जाणता, समजता, कळता.
**बुज्झित्वा**–(पू. क्रि.) जाणून, समजून, कळून.
**बुज्झन**–(नपु.) समज, ज्ञान.
**बुज्झनक**–(वि.) ज्ञानी, समजदार.
**बुज्झितु**–(पु.) ज्ञानी, जाणणारा, कळणारा, समजणारा.
**बुड्ढ**–(वि.) वृद्ध, म्हातारा, जास्त वयाचा.
**बुड्ढतर**–(वि.) वयोवृद्ध, फार म्हातारा, वृद्धतर.
**बुद्ध**–(वि.) जीवनाचे संपूर्ण ज्ञान झालेला. ज्ञानाचे प्रतीक, बुद्धत्वाचा लाभ झालेला, बुद्ध.
**बुद्धकारक धम्म**–(पु.) बुद्धत्त्व प्राप्तीसाठीचे आचरण, सात्त्विक वर्तन, सद्शील चारित्र्य, बुद्धकारक आचरण गोष्टी.
**बुद्ध-काल**–(पु.) बुद्धोप्रत्तीचा काळ.
**बुद्ध-कोलाहल**–(पु.) बुद्धजन्माची पूर्व सूचना.
**बुद्ध-क्खेत्त**–(नपु.) बुद्धाच्या शक्तीच्या मर्यादा-हद्द.
**बुद्ध-गुण**–(पु.) बुद्धत्वाचे गुण.
**बुद्धकुर**–(पु.) बुद्धत्त्वास स्थिर झालेला, बुद्ध जन्मानुकूल
**बुद्ध-चक्खु**–(नपु.) बुद्धाची आंतरदृष्टि.
**बुद्ध-ञाण**–(नपु.) अनंत ज्ञान, अनन्य ज्ञान, बुद्धज्ञान.
**बुद्धन्तर**–(नपु.) पहिला बुद्ध व दुसरा बुद्ध यांच्या उत्पत्तीमधील कालावधी.
**बुद्ध-पुत्त**–(पु.) बुद्धपुत्र.
**बुद्ध-बल**–(नपु.) बुद्धाची शक्ती.
**बुद्ध-भाव**–(पु.) बुद्ध-भावना, बुद्धत्त्व, बुद्धभाव
**बुद्ध-भूमि**–(स्त्री.) बुद्धाची भूमिका.
**बुद्ध-मामक**–(वि.) बुद्ध-भक्त.
**बुद्ध-रस्मि, बुद्ध-रंसि**–(स्त्री.) बुद्धाच्या शरिरांतून प्रकट होणारे तेज-तेजोवलय, बुद्ध-किरिट.
**बुद्ध-लीळ्हा**–(स्त्री.) बुद्ध लीला.
**बुद्ध-वचन**–(नपु.) बुद्धाची शिकवण.
**बुद्ध-विसय**–(पु.) बुद्ध-क्षेत्र.
**बुद्ध-वेनेय्य**–(वि.) बुद्ध शिकवणीने विनित बनु शकणारा, बुद्धोपदेशाने विनीत बनणारा.
**बुद्ध-सासन**–(नपु.) बुद्धोपदेश, बुद्धाची शिकवण.
**बुद्धानुभाव**–(पु.) बुद्धाचा प्रभाव, बुद्धाचा प्रताप.
**बुद्धानुस्सति**–(स्त्री.) बुद्धाचे अनुस्मरण.
**बुद्धारम्मण, बुद्धालम्बन**–(नपु.) बुद्धाच्या गुणांचे ध्यान.
**बुद्ध-पट्ठाक**–(वि., पु.) बुद्ध सेवक.
**बुद्ध-प्पाद**–(पु.) बुध्द युग.
**बुद्ध-घोस**–(पु. वि.) त्रिपिटकाचा सर्वश्रेष्ठ व्याख्याकार, अठ्ठकथाचार्य, आचार्य बुद्धघोष.
**बुद्ध घोसुप्पत्ति**–(पु.) एका पालि ग्रंथाचे नाव.
**बुद्धत्त**–(नपु.) बुद्धत्त्व, बुद्धत्त्व प्राप्तीची अवस्था.
**बुद्धवंस**–(पु. वि.) खद्दक निकायाचा चौदावा ग्रंथ, बुद्धवंश.
**बुद्धि**–(स्त्री.) प्रज्ञा, ज्ञान, बद्धी.
**बुद्धिमन्तु**–(वि.) बुद्धिमान, प्राज्ञ, पंडित, ज्ञानी.
**बुद्धि संपन्न**–(वि.) बुद्धिमान, पंडित, ज्ञानी.
**बुध**–(पु.) बुद्धिमान मनुष्य, बुद्ध-ग्रह, बुध-वार.
**बुब्बुल, बुब्बुलक**–(नपु.) बुडबुडा.
**बुभुक्खति**–(क्रि.) भूक लागणे, खाण्याची इच्छा होणे.
**बुभुक्खि**–(पू. क्रि.) भुकेलेला.
**बुभुक्खित**–(कृ.) भूक लागता.
**बुभुक्खित्वा**–(पू. क्रि.) भूक लागून.
**बुन्द**–(पु.) बुडका, खोड, झाडाच्या मुळाजवळील भाग, बुंधा.
**बेलुव**–(पु.) बेलफळाचे झाड.
**बेलुव-पक्क**–(नपु.) पिकलेले बेल फळ.
**बेलुव-लट्ठि**–(स्त्री.) बेलाची डहाळी, फांदी, गुळी.
**बेलुव-सलाटुक**–(नपु.) कच्चे बेलफळ.
**बोज्झङ्ग**–(नपु.) बोधि प्राप्त करण्यास लागणारे आवश्यक गुण.
**बोध**–(पु.) बोधन, बोध, बोधि अंग.
**बोध**–(नपु.) ज्ञान, बुद्धत्व.
**बोधनिय, बोधनेय**–(वि.) बुद्धत्त्व प्राप्त करून घेणारा.
**बोधि**–(स्त्री.) सर्वश्रेष्ठ ज्ञान, बोधि.
**बोधि-अङ्गण**–(नपु.) बोधि वृक्षाचे आंगण.
**बोधि-पक्खिक**–(वि.) बोधि पक्षीय धर्म.
**बोधि-पादप, बोधि-रुक्ख**–(पु.) बोधिवृक्ष, पिंपळ.
**बोधि-पूजा**–(स्त्री.) बोधिवृक्ष, पिंपळ-पूजा.
**बोधि-मण्ड**–(पु.) बुद्धत्त्व प्राप्तीसाठी सिद्धार्थ गौतम ज्या पिंपळाच्या झाडाखाली वज्रासन घालून बसला होता ते स्थान.
**बोधि-मह**–(पु.) बोधिवृक्षाच्या सन्मानार्थ केला जाणारा उत्सव.
**बोधि-मूल**–(नपु.) बोधि वृक्षाची मुळी.
**बोधिसत्त**–(वि.) बुद्धत्त्व प्राप्तीसाठी कृत संकल्प मनुष्य बुद्धत्त्व प्राप्तीपूर्वी सिद्धार्थ गौतमाला प्राप्त झालेले नाव, बोधिसत्त्व.
**बोधेति**–(क्रि.) ज्ञान प्राप्त करणे.

**बोधेसि**–(पू. क्रि.) ज्ञान प्राप्त करून घेतले.
**बोधित, बोधेन्त**–(कृ.) ज्ञान प्राप्त करून घेता.
**बोधेत्वा**–(पू. क्रि.) ज्ञान प्राप्ती करून घेऊन.
**बोधेतु**–(वि.) जागृत होणारा, ज्ञान प्राप्त झालेला.
**बोन्दि**–(पु.) शरीर, देह.
**ब्यग्घ**–(पु.) वाघ, व्याघ्र.
**ब्यञ्जन**–(नपु.) स्वराखेरीज वर्णमालेतील अक्षरे, व्यंजन.
**ब्यञ्जन**–(नपु.) कालवण, कढी, पक्वान्न.
**ब्यापाद**–(पु.) क्रोध, राग, द्वेष.
**ब्याम**–(पु.) माप, मापाचे भांडे.
**ब्यामपभा**–(स्त्री.) बुद्धाच्या शरिरांतून निघणारे तेज, प्रभा.
**ब्यूह**–(पु.) सैन्याच्या रचनेचा प्रकार, व्यूह.
**ब्रहन्त**–(वि.) विशाल, मोठा, भव्य.
**ब्रह्म, ब्रह्मा**–(पु.) सृष्टि, कर्ता, जगनिर्माता.
**ब्रह्म-कायिक**–(वि.) ब्रह्माच्या मंडळातील.
**ब्रह्म-घोस**–(वि.) ब्रह्मा सारखा आवाज.
**ब्रह्मचर्या**–(स्त्री.) श्रेष्ठ जीवन, पवित्र जीवन, ब्रह्मचर्य.
**ब्रह्मचारी**–(वि.,पु.) संभोगापासून-मैथुनापासून अलिप्त राहणारा, ब्रह्मचारी.
**ब्रह्मजच्च**–(वि.) ब्राह्मण जन्म.
**ब्रह्मञ्ञ, ब्रह्मञ्ञता**–(स्त्री.) श्रेष्ठजीवन, ब्राह्मण्य.
**ब्रह्म-दण्ड**–(नपु.) राजदण्ड, जो सिद्धार्थ गौतमाने आभूषणे व वस्त्रे उतरून "छन्न" सारथ्या जवळ दिला होता.
**ब्रह्म-देय्य**–(नपुं.) राजकीय भेट, बक्षीस देणगी.
**ब्रह्मप्पत्त**–(वि.) श्रेष्ठत्त्व प्राप्त, थोर पदस्थ.
**ब्रह्म-बन्धु**–(पु.) ब्रह्मा संबंधी, ब्राह्मण.
**ब्रह्म-भूत**–(वि.) सर्व श्रेष्ठ.
**ब्रह्म-लोक**–(पु.) ब्रह्म लोक.
**ब्रह्म-विमान**–(नपु.) ब्रह्माचे निवास स्थान.
**ब्रह्म-विहार**–(नपु.) चित्ताची विशद्ध स्थिती, मैत्री, करुणा, मुदिता व उपेक्षा यांचे संमीलित नाव.
**ब्रह्म दत्त जातक**–एका तपस्व्याने राजाचा निरोप घेताना केवळ एक पानांची छत्री आणि खडावांची जोडी मागितल्याची कथा. (३२३).
**ब्राह्मण**–(पु.) ब्राह्मण जातीचा मनष्य, ब्राह्मण.
**ब्रह्म-कञ्ञा**–(स्त्री.) ब्राह्मण-कन्या, ब्राह्मणाची मुलगी.
**ब्रह्म-वाचनक**–(न.पु) ब्राह्मणाने केलेले वेदांचे पाठांतर.
**ब्राह्मण-वाटक**–(पु.) ब्राह्मण पुरी, अनेक ब्राह्मण एकत्र राहण्याचे ठिकाण.

**ब्रूति**–(क्रि.) बोलणे.
**अब्रुवि**–(पू. क्रि.) बोलला.
**ब्रुवन्त**–(कृ.) बोलता.
**ब्रुवित्वा**–(पू. क्रि.) बोलून.
**ब्रूहन**–(नपु.) वृद्धी, वाढ.
**ब्रूहेति**–(क्रि.) वाढविणे, वृद्धी करणे.
**ब्रूहेसि**–(पू. क्रि.) वाढविले, वृद्धी केली.
**ब्रूहित, ब्रूहेन्त**–(कृ.) वाढविता, वृद्धी करता.
**ब्रूहेत्वा**–(पू. क्रि.) वाढवून, वृद्धी करून.
**ब्रूहेतु**–(पु.) वाढविणारा, वृद्धी करणारा.

## भ

**भ**–नागरी लिपिच्या वर्णमालेतील "प" वर्गातील **चौथे** अक्षर.
**भक्ख**–(वि.) भक्ष, खाणे योग्य, खाण्यास योग्य.
**भक्ख**–(नपु.) भक्ष, भोजन, खाद्य पदार्थ.
**भक्खक**–(पु.) भक्षक, खाणारा.
**भक्खति**–(क्रि.) खाणे.
**भक्खि**–(पू. क्रि.) खाल्ले.
**भक्खित**–(कृ.) खाता.
**भक्खिन्तु**–(कृ.) खाता.
**भक्खित्वा**–(पू. क्रि.) खाऊन.
**भक्खन**–(नपु) भक्षण, भोजन, जेवण, खाद्य.
**भक्खेति**–(क्रि.) खाणे.
**भग**–(नपु.) भाग्य, नशीब.
**भग**–(स्त्री.) योनी, स्त्री जननेंद्रिय.
**भगन्दल**–(पु.) भगेंदर रोग.
**भगवन्तु**–(वि.) भाग्यवान.
**भगवन्तु**–(पु.) भगवान बुद्ध.
**भगिनी**–(स्त्री.) बहीण.
**भगु**–(पु., ना.) भृगुऋषि.
**भग्ग**–(कृ.) भग्न, तुटलेला, फुटलेला.
**भङ्ग**–(पु.) तुकडा, तडा, तुटणे.
**भङ्ग**–(नपु.) गोणपाट, किलतान.
**भङ्गखण**–(नपु) भग्नक्षण, तुटण्याची फुटण्याची वेळ.
**भङ्गानुपस्सना**–(स्त्री.) वस्तूच्या विनाशा विषयीचे आंतर ज्ञान.
**भच्च**–(पु.) भृत्य, नोकर.
**भच्च**–(वि.) पाळीव, पोषित, सांभाळलेला, वाढविलेला.
**भजति**–(क्रि.) संगती करणे, मैत्री करणे.

**भजि**–(पू. क्रि.) संगत केली, मैत्री केली.
**भजित**–(कृ.) संगत करता, मैत्री करता.
**भजमान, भजितब्ब**–(कृ.) संगत करण्यायोग्य, मैत्री करण्यायोग्य.
**भजित्वा**–(पू. क्रि.) संगत करून, मैत्री करून.
**भजन**–(नपु.) संगता, संगत, मैत्री.
**भञ्जति**–(क्रि.) भाजणे, शिजविणे.
**भञ्जि**–(पू. क्रि.) भाजले, शिजविले.
**भञ्जित**–(कृ.) भाजता, शिजविता.
**भञ्जमान**–(कृ.) भाजण्यायोग्य, शिजविण्यायोग्य.
**भजित्वा**–(पू. क्रि.) भाजून, शिजवून.
**भञ्जक**–(वि.) ताडणारा, फोडणारा.
**भञ्जति**–(क्रि.) ताडणे, फाडणे.
**भञ्जि**–(पू. क्रि.) ताडले, फाडले.
**भञ्जित, भञ्जन्त**–(कृ.) ताडता, फोडता.
**भञ्जमान**–(कृ.) ताडण्यायोग्य, फोडण्यायोग्य.
**भञ्जित्वा**–(पू. क्रि.) ताडून, फाडून.
**भञ्जन**–(नपु.) मोड, तोड, फाड, विनाश.
**भञ्जनक**–(नपु.) मोडणे, तोडणे, फोडणे, विनाश करणे.
**भट**–(पु.) सैनिक, शिपाई, नोकर.
[भट-सेना = पायदळ सैन्य].
**भट्ठ**–(कृ.) भाजलेला, पडलेला.
**भणति**–(क्रि.) बोलणे, म्हणणे, सांगणे.
**भणि**–(पू. क्रि.) बोलला, म्हणाला, सांगितले.
**भणित, भणन्त, भणितु**–(कृ.) बोलता, म्हणता, सांगता.
**भणितब्ब**–(कृ.) बोलण्यायोग्य, सांगण्यायोग्य, म्हणण्यायोग्य.
**भणित्वा**–(पू. क्रि.) बोलून, म्हणून, सांगून.
**भणे**–(अ.) संबोधणे, हाक मारणे.
**भण्ड**–(नपु.) साहित्य, सामान्य, वस्तु.
**भण्डक**–(नपु.) सामान, वस्तु, साहित्य.
**भण्डगार**–(नपु.) भांडार, कोठा, साठा, खजीना.
**भण्डागारिक**–(पु.) भंडारी, खजानदार, कोठीवाला.
**भण्डति**–(क्रि.) भांडणे, झगडणे.
**भण्डि**–(पू. क्रि.) भांडला, झगडला.
**भण्डेसि**–(पू. क्रि.) भांडला, झगडला.
**भण्डेति**–(क्रि.) भांडणे, झगडणे.
**भण्डेत्वा**–(पू. क्रि.) भांडून, झगडून.
**भण्डन**–(नपु.) भांडण, झगडा.
**भण्डिका**–(स्त्री.) बंडल, जुडी, पेंडी, गुड्डी, गठडी.
**भण्डु**–(पु.) मुंडण केलेला.
**भण्डु-कम्म**–(नपु.) हजामत करणे.
**भत**–(पु.) नोकर, चाकर, सेवक.
**भत**–(कृ.) पाळलेला, पोसलेला.
**भतक**–(पु.) हमाल, नोकर, भृत्य, चाकर.
**भति**–(स्त्री.) मजुरी, वेतन.
**भत्त**–(नपु.) भात.
**भत्त-कारक**–(पु.) सैपाकी, आचारी, जेवण तयार करणारा.
**भत्त-किच्च**–(नपु.) भात खाणे, जेवणे, भोजन करणे.
**भत्त-किलमथ**–(पु.) जेवल्या नंतरचा आळस.
**भत्त-सम्मद**–(पु.) जेवल्या नंतरचा तंद्रा,-झोप,-गुंगी.
**भत्त-गाम**–(पु.) भेट देणारे किंवा सेवा करणारे गाव.
**भत्तग्ग**–(नपु.) भोजनालय, खाणावळ.
**भत्त-पुट**–(नपु.) भाताचा द्रोण, भात भरलेला द्रोण.
**भत्त-विस्सग्ग**–(पु.) जेवण वाढणे.
**भत्त-वेतन**–(नपु.) जेवण व पगार.
**भत्त वेला**–(स्त्री.) जेवणाचा वेळ.
**भत्ति**–(स्त्री.) भक्ती, पूजा.
**भत्तिक, भत्तिमन्तु**–(वि.) भक्त, भक्ति करणारा.
**भत्तु** (पु.) भर्तु, पती, नवरा.
**भदन्त**–(वि.) गौरवाई, पूज्य.
**भद्द, भद्र**–(वि.) शुभ, पवित्र, शुभ मुहूर्त.
**भद्दक**–(नपु.) भाग्य संपन्न वस्तु, पवित्र.
**भद्दक**–(वि.) भाग्य, संपन्न.
**भद्दकच्चाना**–(स्त्री.) यशोधरा (राहुलमाता) चे एक नाव.
**भद्दकुम्भ**–(पु.) पाणी भरलेला घडा-घागर.
**भद्द-दारू**–(पु.) देवदार जातीचा वृक्ष.
**भद्द-पदा**–(स्त्री.) भाद्रपद नक्षत्र.
**भद्द-पीठ**–(नपु.) भद्रासन, पवित्र-आसन.
**भद्द-मुख**–(वि.) सुंदर चेहरा, शिष्ट संबोधन.
**भद्द-युग**–(नपु.) श्रेष्ठ जोडी.
**भद्दसाल जातक**–राजाच्या उद्यानातील विशाल भद्रशाल (मोठा व पवित्र शाल वृक्ष) वृक्ष कापून टाकल्याची कथा–(४६५).
**भद्रघट जातक**–व्यसनाधीन झालेल्या (दारुड्या) मुलाने इंद्र प्रदत्त भद्रघट फाडून टाकल्याची कथा–(२९१).
**भद्दा, भद्दिका**–(स्त्री.) पवित्र स्त्री., पतिव्रता, सद्शील स्त्री.
**भद्दिय**–(नपु. वि.) अंग गणराज्यांतील एक नगर, भगवान बुद्ध अनेक वेळा या नगरीत आले होते.

भन्त–(कृ.) भ्रांत, भ्रमिष्ट, संभ्रमयुक्त.
भन्तत्त–(नपु.) संभ्रम, गडबड, भ्रांत.
भन्ते–(वि.) भदन्तचे संबोधन रूप, भिक्खुंचे आदरार्थी संबोधन.
भब्ब–(वि.) भव्य, विशाल, योग्य.
भब्बता–(स्त्री.) भव्यता, योग्यता, विशालता.
भम–(पु.) फिरणारा वस्तु.
भमकार–(पु.) फिरणारा, भ्रमण करणारा.
भमति–(क्रि.) फिरणे, भ्रमन्ता.
भमि–(पू. क्रि.) फिरला, भ्रमन्ता केला.
भन्त, भमन्त–(कृ.) फिरता, भ्रमन्ता करता.
भमित्वा–(पू. क्रि.) फिरून, भ्रमन्ता करून.
भमर–(पु.) भ्रमर, भुंगा.
भमरिका–(स्त्री.) भावरा, गरगर फिरणारा गोळा.
भमु, भमुका–(स्त्री.) भुवई.
भय–(नपु.) भीती.
भयङ्कर–(वि.) भयानक, भयावह, भीतीदायक.
भर–(वि.) पोषण करणारा.
[मातापेत्ति-भर–(वि., पु.) आई–बापाचे पोषण करणारा].
भरण–(नपु.) भरण-पोषण, सांभाळ.
भरत कुमार–(पु.) दशरथ पुत्र, रामाचा सावत्र भाऊ. [पहा–दशरथ जातक (४६१)].
भरति–(क्रि.) भरण-पोषण करणे, सांभाळ करणे.
भरि–(पू. क्रि.) भरण-पोषण केले, सांभाळ केला.
भत–(कृ.) भरण-पोषण करता, सांभाळ करता.
भरित्वा–(पू. क्रि.) भरण-पोषण करून, सांभाळ करून.
भरित–(कृ.) भरलेला, सांभाळलेला.
भरिया–(स्त्री., भार्या, पत्नी, बायको.
भरुकच्छ–(नपु. विशे. ना.) भरु प्रदेशातील बंदर, आधुनिक भडोच.
भरु-जातक–भरु देशाच्या राजाने तपस्वियांच्या झगड्याचा निर्णय दिल्याचा कथा –(२१३).
भल्लाटक, भल्लातक–(पु.) भल्लाट वृक्ष, औषधी वनस्पती.
भल्लाटिक जातक–भल्लाटिय राजाच्या शिकारीची कथा –(५०४).
भल्ली–(स्त्री.) भल्लातक, औषधी वनस्पतीचे फळ.
भव–(पु.) जग, संसार, अस्तित्व.
भवग्ग–(पु.) जगातील सर्वाधिक उंच शिखर, जगातील-मानवातील सर्वश्रेष्ट भावना, उच्च भावना.
भवङ्ग–(नपु.) जड मन, अचेतन मन, निर्जीव मन.
भव-चक्क–(नपु.) भवचक्र, संसाररुपी चक्र.
भव-तण्हा–(स्त्री.) भव-तृष्णा, जगाविषयी ओढ. मानवी आसक्ती.
भव-नेत्ति–(स्त्री.) [पहा–भव-तण्हा].
भवन्तग, भवन्तगू–(वि.) जगाच्या अंतीम सुख-दुःखाचा जाणकार.
भव-संयोजन–(नपु.) पुनर्जन्माचे बंधन.
भवाभव–(पु.) इह वा पारलौकिक जीवन.
भवेसना–(स्त्री.) भवेषणा, भवेच्छा, भवाची इच्छा, मानवी जीवन जगण्याची इच्छा.
भवोघ–(पु.) पुनर्जन्मरुपी महापूर.
भवति–(क्रि.) होणे.
भवि–(पू. क्रि.) झाला.
भूत, भवन्त, भविन्तु–(कृ.) होता.
भवमान, भवितब्ब–(कृ.) होण्यायोग्य.
भवित्वा, भूत्वा–(पू. क्रि.) होऊन.
भवन–(नपु.) होणे, निवास-स्थान.
भस्ता–(स्त्री.) भाता, लोहाराचा भाता.
भस्म–(नपु.) राख.
भस्मच्छन्न–(वि.) राखेखाली झाकलेला.
भस्स–(नपु.) व्यर्थ बडबड, निरर्थक बोलणे.
भस्सारामता–(स्त्री.) निरर्थक, बोलण्यात आनंद मानण.
भस्सति–(क्रि.) खाली पडणे.
भस्सि–(पू. क्रि.) खाली पडले.
भट्ठ, भसन्त–(कृ.) खाली पडता.
भसमान–(कृ.) खाली पडण्यासारखा.
भसित्वा–(पू. क्रि.) खाली पडून
भस्सर–(वि.) प्रकाशमान, सतेज, प्रकाशित.
भा–(स्त्री.) प्रकाशाची चमक, आभा, तेज.
भाकुटिक–(वि.) भुवई चढविणारा, रागीट, रागीट चेहऱ्याचा.
भाग–(पु.) हिस्सा, तुकडा.
भागवन्तु–(वि.) हिस्सेदार, भागीदार, हिस्सेवाला.
भागदेय्य, भाग धेय्य–(नपु.) भाग्य, नशीब.
भागसो–(क्रि. वि.) हिश्यानुसार, भागाप्रमाणे.
भागिनेय्य–(पु.) भाचा, बहिणीचा मुलगा.
भागिनेय्या–(स्त्री.) भाची, बहिणीची मुलगी.
भागीय–(वि.) संबंधित भागीदार.
भागी–(वि.) हिस्सेदार, भागीदार.
भागीरथी–(स्त्री.) गंगा नदीचे एक नाव.

**भाग्य**–(नपु.) सौभाग्य, नशीब.
**भाजक, भाजेतु**–(पु.) वाटणारा, भाग पाडणारा.
**भाजन**–(नपु.) बटवडा, वाटप, भांडे, पात्र.
**भाजन-विकति**–(स्त्री.) नाना प्रकारची भांडी.
**भाजेति**–(क्रि.) वाटणे, वाटप करणे.
**भाजेसि, भाजीयति**–(पू. क्रि.) वाटले, वाटप केले.
**भाजित, भाजेन्त**–(कृ.) वाटता, वाटप करता.
**भाजेतब्ब**–(कृ.) वाटण्यायोग्य, वाटप करण्यायोग्य.
**भाजेत्वा**–(पू. क्रि.) वाटून, वाटप करून.
**भाणक**–(पु.) धर्मग्रंथ पाठ करणारा, पाठक, मोठा घडा.
**भाणवार**–(पु.) त्रिपटकाच्या अनेक भागांपैकी एक भाग-एक भाणवार कमीत कमी आठ हजार अक्षरांचा मानला जातो.
**भाणी**–(वि.) बोलणारा, वक्ता.
**भाति**–(क्रि.) चमकणे.
**भासि**–(पू. क्रि.) चमकला.
**भातिक, भातु**–(पु.) भाऊ, बंधु, अनुज.
**भानु**–(पु.) प्रकाश, सूर्य, रवि.
**भानुमन्तु**–(वि.) प्रकाशमान, सतेज.
**भानुमन्तु**–(पु.) सूर्य.
**भायति**–(क्रि.) भिणे.
**भायि**–(पू. क्रि.) भ्याला.
**भायन्त**–(कृ.) भिता.
**भायितब्ब**–(कृ.) भिण्यासारखा, भीतिदायक.
**भायित्वा**–(पू. क्रि.) भिऊन.
**भायापेति**–(क्रि.) भिणे, भीती दाखविणे, भिवविणे.
**भायापेसि**–(पू. क्रि.) भ्याला, भीती दाखविली, भिवविले.
**भायापित**–(कृ.) भिता.
**भायापेत्वा**–(पू. क्रि.) भिऊन, भिववून, भीती दाखवून.
**भार**–(पु.) ओझे, वजन, बोजा.
**भार-निक्खेपन**–(नपु.) ओझे उतरणे, बोजा उतरणे.
**भार-मोचन**–(नपु.) भार-मुक्त.
**भार-वाही**–(पु.) ओझे वाहणारा, हमाल.
**भार-हार**–(पु.) ओझे वाहणारा, हमाल.
**भारिक**–(वि.) भारयुक्त.
**भारिय**–(वि.) भारी, वजनदार.
**भाव**–(पु.) स्वभाव.
**भावना**–(स्त्री.) विकास, योगाभ्यास, भावना.
**भावनानुयोग**–(पु.) योगाभ्यासात आवड-रुची.
**भावनामय**–(वि.) भावनायुक्त.
**भावना विधान**–(नपु.) योगाभ्यासाची पद्धती-रीत-प्रकार.
**भावनीय**–(वि.) अभ्यास करणे योग्य, सन्माननीय.
**भावित**–(कृ.) अभ्यास्त, विकसित.
**भावितत्त**–(वि.) विशेष अभ्यासी, संयत, नियमबद्ध.
**भावी**–(वि.) पुढे होणारा, अनिवार्य.
**भावेति**–(क्रि.) वाढ करणे, अभ्यास करणे.
**भावेसि**–(पू. क्रि.) वाढ केली, अभ्यास केला.
**भावित, भावेन्त, भावेतुं**–(कृ.) वाढ करता, अभ्यास करता.
**भावयमान, भावेतब्ब**–(कृ.) वाढ करण्यायोग्य, अभ्यसनीय.
**भावेत्वा**–(पू. क्रि.) वाढ करून, अभ्यास करून.
**भासति**–(क्रि.) बोलणे, चमकणे.
**भासि**–(पू. क्रि.) बोलला, चमकला.
**भासित, भासन्त**–(कृ.) बोलता, चमकता.
**भासितब्ब**–(कृ.) बोलण्यायोग्य, चमकण्यायोग्य.
**भासित्वा**–(पू. क्रि.) बोलून, चमकून.
**भासन**–(नपु.) भाषण, वक्तृत्व-बोल.
**भासन्तर**–(नपु.) दुसऱ्या भाषेत अनुवाद, भाषांतर.
**भासा**–(स्त्री.) भाषा, बोली.
**भासित**–(नपु.) कथन.
**भासितु, भासी**–(पु.) बोलणारा, सांगणारा, वक्ता.
**भासुर**–(वि.) चमकदार, सतेज, प्रकाशित.
**भिक्खक**–(पु.) भिकारी, भीक मागणारा.
**भिक्खति**–(क्रि.) भीक मागणे.
**भिक्खि**–(पू. क्रि.) भीक मागितली.
**भिक्खन्त**–(कृ.) भीक मागता.
**भिक्खमान**–(कृ.) भीक मागण्यायोग्य.
**भिक्खित्वा**–(पू. क्रि.) भीक मागून.
**भिक्खन**–(नपु.) भीक मागणे.
**भिक्खा**–(स्त्री.) भिक्षा.
**भिक्खाचरिया**–(स्त्री) भिक्षाटन.
**भिक्खाचार**–(पु.) भिक्षाटन.
**भिक्खाहार**–(पु.) भिक्षेत मिळालेले भोजन-आहार.
**भिक्खा-परम्पर जातक**–राजाला मिळालेले भिक्षा भोजन क्रमशः प्रत्येक बुद्धाला पोहोचल्याची कथा–(४९६).
**भिक्खु**–(पु.) बौद्ध भिक्खु.
**भिक्खुणी**–(स्त्री.) बौद्ध भिक्खुणी.
**भिक्खु-भेद**–(पु.) भिक्खु विशेष-वैशिष्टय.

**भिक्खु-संघ**–(पु.) भिक्खुंचा संघ.
**भिङ्क**–(पु.) हत्तीचे पिल्लू.
**भिङ्कार**–(पु.) पाण्याची झारी.
**भिज्जति**–(क्रि.) तुटणे, नष्ट होणे.
**भिज्जि**–(पू. क्रि.) तुटले, नष्ट झाले.
**भिन्न**–(कृ.) तुटता, नष्ट होता.
**भिज्जमान**–(कृ.) तुटण्यायोग्य, नष्ट होण्यासारखे.
**भिज्जित्त्वा**–(पू. क्रि.) तुटून, नष्ट होऊन.
**भिज्जन**–(नपु.) तुटणे, मोडणे, फुटणे.
**भिज्जन-धम्म**–(वि.) नष्ट होण्याचा स्वाभाविक धर्म.
**भित्ति**–(स्त्री.) भिंत, तट.
**भित्ति-पाद**–(पु.) भिंतीचा पाया.
**भिन्दति**–(क्रि.) तोडणे, फाडणे, वेगळे करणे.
**भिन्दि**–(पू. क्रि.) तोडले, फाडले, वेगळे केले.
**भिन्दित, भिन्दन्त, भिन्दितुं**–(कृ.) तोडता, फाडता, वेगळे करता.
**भिन्दित्त्वा**–(पू. क्रि.) तोडून, फाडून, वेगळे करून.
**भिन्दन**–(नपु.) तुटणे, फाडणे, वेगळे करणे.
**भिन्न**–(कृ.) तुटलेले, फुटलेले.
**भिन्नत्त**–(नपु.) भिन्नत्व, वेगळेपणा.
**भिन्नभाव**–(पु.) पृथकपणा, वेगळेपणा, पार्थक्य.
**भिन्न-नाव**–(वि.) फुटलेली नाव, फुटलेले जहाज, फुटलेली होडी.
**भिन्न-पट**–(नपु.) फाडलेले वस्त्र, कापड.
**भिन्न-मरियाद**–(वि.) हद्दी पलिकडे, सीमोलंघित.
**भिन्न-सील**–(वि.) शील-भ्रष्ट, पापी, दुराचारी.
**भिय्यो, भिय्योसो**–(अ.) अत्याधिक.
**भिय्योसो मत्ताय**–(वि.) आपल्या योग्यतेपेक्षा जास्त.
**भिस**–(नपु.) कमळ देठाची नळी.
**भिस-पुप्फ**–(नपु.) कमळ फूल.
**भिस-मुळाल**–(नपु.) कमळाचा देठ.
**भिस जातक**–वडिलांच्या मृत्यूनंतर सर्व बहिण-भाऊ हिमालयात गेल्याची कथा–(४८८).
**भिसक्क**–(पु.) भिषक्, चिकित्सक, वैद्य.
**भिस पुप्फ जातक**–बोधिसत्त्वाने फुलाचा वास घेतल्यामुळे एका स्त्रीने त्यास गंधचोर म्हटल्याची कथा–(३९२).
**भिसि**-(स्त्री.) मोठी गादी.
**भिंसन, भिंसनक**–(वि.) भीषण, भयानक, भीतिदायक.
**भीत**–(कृ.) भ्यालेला.
**भीति**–(स्त्री.) भय, भीती.
**भीम, भीसन**–(वि.) भयानक, भीषण, भीतिदायक.
**भीमसेन जातक**–भीमसेनाचा आधार घेऊन एका लहान धनुर्धाऱ्याने विजय मिळविल्याची कथा–(८०).
**भीयो**–(वि.) फार, पुष्कळ, अती.
**भीरू, भीरूक**–(वि.) भिता, भ्याड.
**भीरुत्ताण**–(नपु.) भित्र्याचे संरक्षण.
**भुक्करण**–(नपु.) कुत्र्याचे भुंकणे.
**भुंकार, भुक्कार**–(पु.) भुंकणे.
**भुंकरोति**–(क्रि.) भुंकणे.
**भुंकरि**–(पू. क्रि.) भुंकला.
**भुंकत, भुंकरोन्त**–(कृ.) भुंकता.
**भुकत्त्वा–, भुंकरित्त्वा**–(पू. क्रि.) भुंकून.
**भुज**–(पु.) हात, बाहु.
**भुज**–(वि.) वळलेला, दुमडलेला.
**भुजपत्त**–(पु.) भोजपत्र.
**भुजग, भुजङ्ग, भुजङ्गम**–(पु.) साप, नाग.
**भुजिस्स**–(पु.) स्वतंत्र व्यक्ती, स्वतंत्र माणूस.
**भुञ्जक**–(पु.) खाणारा, भोगणारा. उपभोग घेणारा.
**भुञ्जति**–(क्रि.) खाणे, भोगणे, उपभोग घेणे.
**भुञ्जि**–(पू. क्रि.) खाल्ले, भोगले, उपभोगिले.
**भुत्त, भुजन्त, भुञ्जितुं, भोत्तुं**–(कृ.) खाता, भोगता.
**भुञ्जमान, भुञ्जिय, भुञ्जितब्ब**–(कृ.) खाण्यायोग्य, भोगण्यायोग्य.
**भुत्त्वा, भुञ्जित्त्वा**–(पू. क्रि.) खाऊन, भोगून, उपभोग घेऊन.
**भुञ्जन**–(नपु.) खाद्य, भोग.
**भुञ्जन-काल**–(पु.) जेवण्याचा काळ, भोजनाची वेळ, भोजनसमय.
**भुत्त**–(कृ.) खाल्लेला, भोगलेला.
**भुत्तावी**–(वि.) खाणारा.
**भुम्म**–(वि.) ताळांची, मजल्याची इमारत.
**भुम्मट्ठ**–(वि.) भूमीवर, जमिनीवर, भूस्थल.
**भुम्मत्थरण**–(नपु.) सतरंजी, अंथरुण.
**भुम्मन्तर**–(नपु.) भिन्न जागा, वेगवेगळी जमीन.
**भुवन**–(नपु.) जग.
**भुस**–(नपु.) भूस, कोंडा.
**भुस**–(वि.) अधिक, जास्त, खूप.
**भुसं**–(क्रि. वि.) अधिकांश रुपाने, जास्तीत जास्त.
**भुसति**–(क्रि.) भुंकणे.
**भुस्सि**–(पू. क्रि.) भुंकला.
**भुस्सन्त**–(कृ.) भुंकता.
**भुस्समान**–(कृ.) भुंकण्यासारखा, भुंकणारा.

भुसिसत्वा–(पू. क्रि.) भुंकून.
भसत्त–(पु.) अधिक अर्थ, अधिकतेचा अर्थ.
भू–(स्त्री.) पृथ्वी, जमीन, भूमी.
भूत–(कृ.) होऊन गेलेला, झालेला.
भूत–(पु., नपु.) महा-भूत, प्रेत, प्राणी, यथार्थ भुथार्थ,
भूत-काय–(पु.) महाभुतांपासून बनलेले शरीर.
भूत-गाम–(पु.) वनस्पती.
भूत-गाह–(पु.) भुताने खाल्लेले, भूत-प्रेतामार्फत ग्रासीत.
भूत-वादी–(वि.) सत्यवादी.
भूत-वेज्ज–(पु.) भूत काढणारा, मांत्रिक.
भूतत्त–(नपु.) असल्याची भावना.
भूतिक–(वि.) भौतिक.
भू-तिण–(नपु.) भू-तृण, जमिनीवरील गवत.
भू-धर–(पु.) डोंगर, पर्वत.
भू-नाथ–(पु.) राजा, महिपति, भूप, नृप.
भू-भुज–(पु.) भूपति, राजा.
भूमक–(वि.) मजल्याची इमारत.
भूमि–(स्त्री.) पृथ्वी, जमीन, भूमी.
भूमि-कम्पा–(स्त्री.) भूकंप-हादरा.
भूमि-गत–(वि.) अदृष्य, न दिसणारा, पृथ्वी-स्थित.
भूमि-तल–(नपु.) पृथ्वी तळ, भूमीतल.
भूमिप्पदेस, भूमिभाग, भू भाग–(पु.) जमिनीचा तुकडा, भू भाग, जमीनिचा भाग.
भूरि–(स्त्री.) प्रज्ञा.
भूरि–(वि.) विपुल, अधिक, जास्त.
भूरि दत्त जातक–एका तपस्व्याला नागकन्येने भुलविल्याची कथा–(५४३).
भूरि-पञ्ञ–(वि.) विद्वान, अधिक ज्ञानी, पंडित.
भूरिपञ्ञ जातक–महाउम्मग जातकाचा एक अंश असलेली कथा–(४५२).
भूरि-मेध–(वि.) फार विद्वान, पंडित, महाज्ञानी.
भूसन–(नपु.) भूषण.
भूसा–(स्त्री.) सजावट.
भूसापेति–(क्रि.) सजविणे, नटविणे.
भूसापेसि–(पू. क्रि.) सजविले, नटविले.
भूसापित–(कृ.) सजविता, नटविता.
भूसापेत्वा–(पू. क्रि.) सजवून, नटवून.
भूसेति–(क्रि.) सजणे, नटणे.
भूसेसि–(पू. क्रि.) सजला, नटला.
भूसित, भूसेन्त–(कृ.) सजता, नटता.
भूसेत्वा–(पू. क्रि.) सजून, नटून, थटून.
भेक–(पु.) बेडूक, दादुर, मेंढक.
भेज्ज–(वि.) झिरझिरीत, विरळ, पातळ, कमजोर.
भेज्ज–(नपु.) तुटणे, फाटणे.
भेण्डिवाल–(पु.) हत्यार, अस्त्र.
भेण्डुक–(पु.) खेळण्याचा चेंडू.
भेत्तु–(पु.) तोडणारा.
भेद–(पु.) फरक, विविधता, ऐक्याचा अभाव, भेद.
भेदक–(वि.) फोडणारा तोडणारा, भेद करणारा.
भेदन–(नपु.) तुटणे, फुटणे, वेगळे होणे, भेद करणे.
भेदनक–(वि.) तुटण्यासारखा, फोडण्यायोग्य, भेद होणारा.
भेदन-धम्म–(वि.) भेद होण्याचा स्वभाव, वेगळे होण्याचा गुणधर्म.
भेदित–(कृ.) तुटका, फुटका, विभक्त, वेगळा.
भेरण्ड–(पु.) कोल्हा.
भेरण्डक–(नपु.) कोल्ह्याचा आवाज, कोल्हेकुई.
भेरव–(वि.) भयानक, भीतिदायक, क्रूर, क्रुद्ध, भैरव.
भेरि–(स्त्री.) ढोल, नगारा.
भेरि-चारण–(नपु.) ढोल वाजवून नाचणे, नगारा वाजविणे.
भेरि-तल–(नपु.) ढोलाचा तळ, ढोलाचे पुट, नगाऱ्याचे तल.
भेरि-वादक–(पु.) ढोल वाजविणारा, ढोलक-नगारा वाजविणारा.
भेरि-वादन–(नपु.) ढोल वाजविणे, नगारा वाजविणे.
भेरि-सद्द–(पु.) ढोलाचा आवाज, नगाऱ्याचा आवाज.
भेरि वाद जातक–वडिलांचे न ऐकता मुलाने मोठ-मोठ्याने ढोल वाजविला. ही चाहूल लागताच डाकूंनी त्या पिता-पुत्रास लुटल्याची कथा–(५९).
भेसज्ज–(नपु.) औषध.
भेसज्ज-कपाल–(नपु.) औषधाचा पेला.
भो–(अ.) संबोधन, हाक मारणे, हे.
भोग–(पु.) संपत्ति, धन.
भोगक्खन्ध–(पु.) संपत्तीचा ढीग, पैशांचा ढीग, धनाचा साठा.
भोग-गाम–(पु.) कर देणारे, जकात भरणारे गाव.
भोग-मद–(पु.) पैशाची घमेंड, धनाचा गर्व, संपत्तीचा अभिमान.
भोगवन्तु–(पु., वि.) धनी, श्रीमंत, धनवान.
भोगी–(पु.) साप, सर्प, श्रीमंत मनुष्य.
भोगी–(वि.) भोग भोगणारा.

**भोग्य**–(वि.) भोगण्यायोग्य.

**भोजक**–(पु.) खाऊ घालणारा, चारणारा, कर वसूल करणारा.

[**गाम-भोजक**–(पु.) गावचा नेता-पुढारी].

**भोजन**–(नपु.) खाद्य सामुग्री, जेवण, खाद्य पदार्थ.

**भोजनीय**–(वि.) खाण्यायोग्य, ताजे खाद्य पदार्थ, भोजन जेवण.

**भोजाजानीय जातक**–एका सैनिकाचा जातिवंत घोडा होता. सैनिक घायाळ झाला, घोडाही जखमी झाला तरीपण स्वामीभक्तीने प्रेरित झालेल्या घोड्याने शत्रूवर आक्रमण केल्याची कथा–(२३).

**भोजापेति**–(क्रि.) खाऊ घालणे, जेवण घालणे.

**भोजापेसि**–(पू. क्रि.) खाऊ घातले, जेवण दिले.

**भोजापित**–(कृ.) खाऊ घालता, जेवण देता.

**भोजापेत्वा**–(पू. क्रि.) खाऊ घालून, जेवण घालून.

**भोजि**–(वि., पु.) जेवणारा, खाणारा.

**भोजेति**–(क्रि.) खाऊ घालणे, जेवणे.

**भोजेसि**–(पू. क्रि.) खाऊ घातले, जेवले.

**भोजित, भोजेन्त, भोजेन्तु**–(कृ.) खाऊ घालता, जेवता.

**भोजेत्वा**–(पू. क्रि.) खाऊ घालून, जेवून.

**भोज्ज**–(नपु.) खाण्यायोग्य वस्तु, खाद्य पदार्थ.

**भोति**–(नपु.) संबोधन, भवति.

**भोतब्ब**–[पहा–भोज्ज].

**भोत्तुं**–(नपु.) खाण्यासाठी, खाण्याकरिता, जेवण्याकरिता.

**भोवादी**–(पु.) ब्राह्मण.

## म

**म**–नागरी लिपीच्या वर्णमालेतील "प" वर्गातील शेवटचे-पाचवे अक्षर.

**मंस**–(नपु.) मास.

**मंस-चक्खु**–(नपु.) दिव्य दृष्टीहून भिन्न अशी भौतिक दृष्टी.

**मंस जातक**–शिकाऱ्याजवळून मास मागून घेतल्याची कथा–(३१५).

**मंस-पुञ्ज**–(पु.) मासाचा ढीग.

**मंस-पेसि**–(स्त्री.) मास पेशी.

**मकचि**–(पु.) धनुष्याच्या दोरीचा तुकडा-तात.

**मकचि-वाक**–(नपु.) तुकड्याची साल, वादी.

**मकचि-वत्थ**–(नपु.) तातीचे वस्त्र, तंतूचे कापड.

**मकर**–(पु.) सुसर, मगर.

**मकर-दन्तक**–(नपु.) सुसरीच्या दाताप्रमाणे.

**मकरन्द**–(पु.) फुलातील कण, मध, पुष्परेणु, मकरंद.

**मकस**–(पु.) मच्छर, डास.

**मकस वारण**–(नपु.) मच्छरदाणी.

**मकस जातक**–अबोध मुलाने बापाच्या डोक्यावर बसलेल्या माशीवर कुऱ्हाडीने प्रहार केला. परिणाम बापाच्या डोक्याचे दोन भाग झाल्याची कथा–(४४).

**मकुट**–(पु.,नपु.) मुकुट, ताज, टोपी, शिरस्त्राण.

**मकुल**–(नपु.) फुलाची कळी.

**मक्कट**–(पु.) मर्कट, वानर.

**मक्कटक**–(पु.) कोळी, मकडी, कीटक.

**मक्कटक सुत्त**–(नपु.) कोळीष्टक, कोळ्याचे जाळे.

**मक्कट जातक**–एका वानराने एका साधूची वल्कले धारण करून आश्रमात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. पण त्या वानरास यश न आल्याची कथा–(१७३).

**मक्कटी**–(स्त्री.) वानरी, मर्कटी.

**मक्ख**–(पु.) गुणांचे अवमूल्यन, कमी लेखणे.

**मक्खण**–(नपु.) तेल लावणे, तेल चोळणे.

**मक्खली गोसाल**–(पु., वि.) भगवान बुद्धाच्या काळी वेगवेगळ्या प्रकारांचे सहा पंथ होते. त्यापैकी एका पंथाचा संस्थापक आचार्य मक्खली गोसाल.

**मक्खिका**–(स्त्री.) मक्षिका, माशी, कीटक.

**मक्खित**–(कृ.) माखलेला.

**मक्खि**–(पु.) दुसऱ्यांचे गुण कमी करणारा, दुसऱ्यांना कमी लेखणारा.

**मक्खेति**–(क्रि.) माखणे, चोपडणे.

**मक्खेसि**–(पू. क्रि.) माखले, चोपडले.

**मक्खित**–(कृ.) माखता, चोपडता.

**मक्खेत्वा**–(पू. क्रि.) माखून, चोपडून.

**मखादेव जातक**–राजाने डोक्यावरील एक केस पांढरा झाल्याचे पाहिले. त्या केसास त्याने देवदूत समजून आता आपण गृहत्याग केला पाहिजे असे म्हणून त्याने प्रव्रज्या घेतल्याची कथा–(९).

**मग**–(पु.) पशु, जनावर, चार पायांचा प्राणी.

**मगसिर**–(पु., वि.) मार्गशीर्ष महिना, मार्गशीर्ष नक्षत्र.

**मगध**–(पु., वि.) कौसल वंशीय, अवंतिप्रमाणे भगवान बुद्धाच्या काळचे एक गणराज्य. मगध देश.

**मग्ग**–(पु.) मार्ग रस्ता, वाट, पथ, सडक.

**मग्ग-किलन्त**–(वि.) चालून थकलेला, श्रांत.

**मग्ग-कुसल**–(वि.) वाटाड्या, रस्त्याचा माहितगार.

**मग्ग-क्खायी**–(वि.) रस्ता दाखविणारा, मार्गदर्शक.

**मग्गङ्ग**–(नपु.) सम्यकदृष्टि इत्यादी आर्य मार्गाचे आठ अंग (अष्टांग मार्ग).

**मग्ग-आण**–(नपु.) मार्गाचे ज्ञान, मार्ग ज्ञान.

**मग्गञ्जू, मग्गविदू**–(वि.) मार्गांचा जाणकार, विद्वान.

**मग्गट्ठ**–(वि.) मार्गस्थ, मार्गस्थित.

**मग्ग-दूसी**–(पु.) प्रवाशांना लुटणारा, लुटारू, डाकू.

**मग्ग-देसक**–(वि.) मार्गदर्शक.

**मग्ग-पटिपन्न**–(वि.) यात्री, प्रवासी, मार्गारूढ, वाटसरू.

**मग्ग-भावना**–(स्त्री.) आर्य-अष्टांग मार्गांचा अभ्यास.

**मग्ग-मूळ्ह**–(वि.) मार्गभ्रष्ट, पथभ्रष्ट, वाट चुकलेला.

**मग्ग-सच्च**–(नपु.) आर्य-अष्टांग मार्ग नावाचे सत्य.

**मग्गति**–(क्रि.) मार्ग शोधणे, पत्ता लावणे.

**मग्गि**–(पू. क्रि.) मार्ग शोधला, पत्ता लावला.

**मग्गित**–(कृ.) मार्ग शोधता, पत्ता लावता.

**मग्गित्वा**–(पू. क्रि.) मार्ग शोधून, पत्ता लावून.

**मग्गन**–(नपु.) शोध, पत्ता.

**मग्गिक**–(पु.) मार्गारूढ, मार्गाने जाणारा.

**मग्गित**–(कृ.) मार्ग शोधत असलेला.

**मग्गुर**–(पु.) विशिष्ठ जातीचा मासा.

**मग्गेति**–(क्रि.) [पहा–मग्गति].

**मघवन्तु**–(पु.) शक्र (इंद्र) याचेच दुसरे नाव.

**मघा**–(स्त्री.) मघा नक्षत्र.

**मङ्कु**–(वि.) निरुत्साहि, निराश, नाराज.

**मङ्कु-भाव**–(पु.) नैतिक दुर्बलता, उत्साहहीन.

**मङ्कु-भूत**–(वि.) मंदोत्साह, कमी उत्साह.

**मङ्गल**–(वि.) पवित्र, शुभ-मुहूर्त, मंगल.

**मङ्गल-किच्च**–(नपु.) पवित्र कार्य, मंगल कृत्य, उत्सव, मंगल कार्य.

**मङ्गल-कोलाहल**–(पु.) मंगल कार्यावरून भांडण, मंगल आवाज.

**मङ्गल-दिवस**–(पु.) उत्सवाचा दिवस, विवाहाचा दिवस, मंगल दिवस.

**मङ्गल-अस्स**–(पु.) राजकीय अश्व, राजाचा घोडा, मंगल घोडा.

**मङ्गल-सिन्धव**–(पु.) राजाचा घोडा.

**मङ्गल-पोक्खरणी**–(स्त्री.) मंगल पुष्करणी, मंगल सरोवर.

**मङ्गल-सीलापट्ट**–(नपु.) राज्यासन, सिंहासन.

**मङ्गल-सुपिन**–(नपु.) मंगल स्वप्न, शुभ-शकून.

**मङ्गल-हत्थी**–(पु.) राजाचा हत्ती, ऐरावत.

**मङ्गल जातक**–उंदरांनी कुरतडलेले कपडे घरात ठेवणे अशुभ समजून ते एका ब्राह्मणाने स्मशानात फेकून दिल्याची कथा. (८७).–

**मङ्गुर**–(पु.) नदीतील मासा, माशाची एक जात.

**मङ्गुर**–(वि.) पीत-वर्णी, पिवळा.

**मच्च**–(पु.) मनुष्य, माणूस.

**मच्चु**–(पु.) मृत्यु, मरण, अंत, शेवट.

**मच्चुतर**–(वि.) मृत्युंजयी.

**मच्चु-धेय्य**–(नपु.) मृत्यु क्षेत्र.

**मच्चु-परायण**–(वि.) मरणाधीन, मरणासन्न.

**मच्चु-पास**–(पु.) मृत्यु–पाश.

**मच्चु-राज**–(पु.) मृत्युराज, यम.

**मच्चु-वस**–(नपु.) मृत्युचे सामर्थ्य.

**मच्चु-हायी**–(वि.) मृत्युला जिंकणारा, मृत्युंजयी.

**मच्छ**–(पु.) मासा.

**मच्छण्ड**–(नपु) माशाचे अंडे.

**मच्छण्डि**–(स्त्री.) गूळ, उसापासून तयार केलेली कच्ची साखर.

**मच्छ-मंस**–(नपु.) मासे-मास.

**मच्छ-बन्ध**–(पु.) कोळी, भोई, मासे मारणारा.

**मच्छ जातक**–माशांच्या सत्कृत्याने पाऊस पडल्याची कथा–(७५).

**मच्छ जातक**–वरील कथेशी मिळती–जुळती कथा–(२१६)

**मच्छर चरिया**–(नपु.) मत्स्य जीवन.

**मच्छर चारी**–(पु.) चिक्कू, कंजूस.

**मच्छरायति**–(क्रि.) कंजूसपणाने वागणे.

**मच्छरिय**–(नपु.) मत्स्यजीवन, चिक्कूपणा.

**मच्छा**–(पु.) प्राचीन सोळा गणराज्यांपैकी, मस्त्य या जनपदाचा गणराज्याचा नागरिक.

**मच्छिक**–[पहा–मच्छ-बन्ध].

**मच्छी**–(स्त्री.) मासा.

**मच्छुद्दान जातक**–माशाच्या पोटांत गेलेली पैशाची पिशवी परत मिळाल्याची कथा–(२८८).

**मच्छेर**–पहा–[मच्छरिय].

**मज्ज**–(नपु.) मद्य, दारू, गुंगी आणणारा पदार्थ.

**मज्जन**–(नपु.) नशा, गुंगी.

**मज्जप**–(वि.) मद्यपी, दारू पिणारा, व्यसनी.

**मज्जपान**–(नपु.) मद्यपान, दारू पिणे.

**मज्जपायी**–[पहा–मज्जप].

**मज्ज-विक्कयी**–(पु.) दारू विकणारा.

**मज्जति**–(क्रि.) घासणे, धुणे, स्वच्छ करणे.

**मज्जि**–(पू. क्रि.) घासले, धूतले, स्वच्छ केले.

**मत्त, मट्ठ, मज्जित, मज्जन्त**–(कृ.) घासता, धुता, स्वच्छ करता.

**मजित्वा**–(पू. क्रि.) घासून, धुऊन, स्वच्छ करून.
**मज्जना**–(स्त्री.) घासणे, धुणे.
**मज्जार**–(पु.) बोका, मांजर (नर), मार्जार.
**मज्जारी**–(स्त्री.) मांजरी, मांजरीण, मार्जारी.
**मज्झ**–(पु.) मध्य भाग.
**मज्झ**–(वि.) मधला.
**मज्झट्ठ, मज्झत्त**–(वि.) मध्यस्थ, निपक्षपाती.
**मज्झ्**–(पु.) मध्यान्ह.
**मज्झत्तता**–(स्त्री.) मध्यस्थी.
**मज्झदेस**–(पु.) मध्य देश, मध्य-प्रदेश.
**मज्झन्तिक-समय**–(पु.) मध्यान्हाची वेळ, भर दुपारची वेळ.
**मज्झन्तिक (थेर)**–(पु. वि.) अशोकाचा पुत्र महेंद्र यास स्थविर पदाची उपसंपदा देणारे महास्थविर मज्झन्तिक थेर हे नंतर काश्मीर व गांधार प्रदेशांत धम्मप्रचारार्थ गेले होते.
**मज्झिम**–(वि.) मध्यम, केंद्रीय.
**मज्झिम पुरिस**–(पु.) मध्यम पुरुष, मध्याकार मनुष्य.
**मज्झिम-याम**–(स्त्री.) मध्य रात्री, अर्धी रात्र, रात्रीचा मधला प्रहर.
**मज्झिम-वय**–(पु.) प्रौढ, मध्यम वयाचा.
**मज्झिम निकाय**–(पु. वि.) सुत्त पिटकाच्या पांच निकाया-पैकी मध्यम आकाराच्या सूत्रांचा संग्रह.
**मज्झिम देस**–(पु., वि.) मध्यमंडळ, याची पूर्व, सीमा कंकजोल, मध्यभागी सिलई नदी, दक्षिणेस हजारी बाग जिल्ह्याचे सेतकण्णिक नांवाचे नगर-पश्चिमेस हरियाणाच्या कर्नाळ जिल्ह्याचे थानेसर नांवाचे शहर आणि उत्तरेस उशीरध्वज नांवाचा हिमालयाचा डोंगराळ भाग मानला जाई.
**मञ्च**–(पु.) बाजले, खाट.
**मञ्चक**–(पु.) लहान बाजले किंवा खाट.
**मञ्च-परायण**–(वि.) बाजल्यावर पडलेला, लोळणारा.
**मञ्चपीठ**–(नपु.) बाजले, खाट, खुर्ची आदि लाकडी बैठक.
**मञ्चवान**–(नपु.) बाजले विणणें.
**मञ्जरी**–(स्त्री.) फुलांचा गुच्छ.
**मञ्जिट्ठ, मञ्जेट्ठ**–(वि.) करडा रंग.
**मञ्जिट्ठा**–(स्त्री.) झाड, रोप, झुडूप.
**मञ्जिर**–(नपु.) पायाचे आच्छादन, मोजे.
**मञ्जु**–(वि.) आकर्षक, प्रिय, मोहक.
**मञ्जु-भाणक**–(वि.) प्रियंवद, मधुरवाणी.
**मञ्जुस्सर**–(वि.) मंजूळस्वर, गोडवाणी, प्रियवाणी.
**मञ्जूसक**–(पु.) देवांचा वृक्ष.
**मञ्जूसा**–(स्त्री.) पेटी, मंजुषा.
**मञ्जेट्ठी**–(स्त्री.) लता, वेली.
**मञ्जति**–(क्रि.) कल्पना करणे, संकल्प करणे, विचार करणे.
**मञ्जि**–(पू. क्रि.) कल्पना केली, संकल्प केला, विचार केला.
**मञ्जित**–(कृ.) कल्पना करता, संकल्प करता, विचार करता.
**मञ्जमान**–(कृ.) कल्पना करण्यायोग्य, संकल्प करण्यायोग्य, विचार करण्यायोग्य.
**मञ्जित्वा**–(पू. क्रि.) कल्पना करून, संकल्प करून, विचार करून.
**मञ्जना**–(स्त्री.) कल्पना, मान्यता.
**मञ्जित**–(नपु.) कल्पना, मान्यता.
**मञ्ञे**–(अ.) कल्पना करतो.
**मट्ट, मट्ठ**–(वि.) गुळगुळीत, घासलेला, चकचकीत.
**मट्ठ-साटक**–(नपु.) तलम वस्त्र, चमकदार कापड, रेशमी कापड.
**मट्टकुण्डलि जातक**–पुत्र शोकातून मुक्त झालेल्या ब्राह्मणाची कथा–(४४९).
**मणि**–(पु.) रत्न, जवाहिर.
**मणि-कुण्डल**–(नपु.) रत्नजडित बाळी, कर्णभूषण.
**मणिक्खन्ध**–(पु.) फार मौल्यवान रत्न, भारी किंमतीचा हिरा.
**मणि-पल्लङ्क**–(पु.) रत्नजडित सिंहासने, हिरेजडित सिंहासन.
**मणि-बन्ध**–(पु.) मनगट.
**मणि-मय**–(पु.) रत्नयुक्त, रत्नजडित, हिरेजडित.
**मणि रतन**–(नपु.) मौल्यवान रत्न, किंमती हिरा.
**मणि-वण्ण**–(वि.) हिऱ्याच्या रंगाचा, हिऱ्याच्या तेजाचा-वर्णाचा.
**मणि-सप्प**–(पु.) तोंडात लाल असलेला साप.
**मणिक**–(पु.) मोठे भांडे.
**मणिकण्ठ जातक**–मणिकंठ नांवाच्या सापाला त्याच्या तोंडातील लाल मागितल्या नंतर त्या सापाने तप-स्व्याला त्रास देण्याचे सोडल्याची कथा–(२५३).
**मणि कुण्डल जातक**–राजाने आपल्या शयन गृहात गैर-वर्तन करणाऱ्या मंत्र्याला हद्दपार केल्याची कथा–(३५१).

**मणि चोर जातक**–राजाने आपला हिरा गृहस्थाच्या गाडीत दडवून ठेवला आणि त्याच्यावर चोरीचा आरोप ठेवून त्याची सुंदर पत्नी हस्तगत केल्याची कथा–(१९४).
**मणि सूर जातक**–डुकराने हिरा जितका घासला तितका तो अधिकाधिक चमकदार झाल्याची कथा–(२८५).
**मण्ड**–(पु.) भाताची पेज.
**मण्ड**–(वि.) अतिस्पष्ट, सुस्पष्ट.
**मण्डन**–(नपु.) सजावट, मांडणे.
**मण्डन-जातिक**–(वि.) सजावटप्रिय, सौंदर्यदृष्टि.
**मण्डप**–(पु.) मंडप, मांडव, छत, तंबू.
**मण्डल**–(नपु.) घेरा, गोल वेदिका, गोलाकार.
**मण्डल-माल**–(पु) गोलाकार मंडप, तंबू.
**मण्डलिक**–(वि.) प्रदेशासंबंधी.
**मण्डलिस्सर**–(पु.) मंडळाचा-मंडलाचा शासक.
**मण्डली**–(वि.) मंडल-मंडळवाला.
**मण्डित**–(कृ.) सुसज्जित.
**मण्डूक**–(पु.) बेडूक.
**मण्डेति**–(क्रि.) सजविणे.
**मण्डेसि**–(पू. क्रि.) सजविले.
**मण्डित**–(कृ.) सजविता.
**मण्डेत्वा**–(पू. क्रि.) सजवून.
**मत**–(कृ.) मृत, मेलला.
**मत-किच्च**–(नपु.) अंत्यसंस्कार, मृतावरील क्रिया.
**मतक**–(पु.) मृतक, मेलेला.
**मतक-भत्त**–(नपु.) पिंडदान, श्राद्ध.
**मतक-वत्थ**–(नपु.) मृताच्या नांवे दिलेले दान वस्त्र.
**मतक भत्त जातक**–श्राद्ध घालू इच्छिणाऱ्या ब्राह्मणाने बकरीला बळी देण्यापूर्वी तिला धुऊन आणा असे आपल्या शिष्यांना सांगितल्याची कथा–(१८).
**मतरोदन जातक**–वडाल व भाऊ यांच्या निधनानंतर अनित्यतेचे स्मरण झाल्यामुळे बोधिसत्त्वाने दुःख न करता आणि अश्रु न वाहविल्याची कथा–(३१७).
**मति**–(स्त्री.) प्रज्ञा, विचार, बुद्धी.
**मतिमन्तु**–(वि.) बुद्धीमान.
**मति-विप्पहीन**–(वि.) मूर्ख.
**मत्त**–(कृदन्त) नशेत गुंग, मात्रा, प्रमाण माप.
**मत्त-हत्थी**–(पु.) मस्त हत्ती, माजलेला हत्ती, नशेने गुंग झालेला हत्ती.
**मत्तञ्ञू**–(वि.) मात्रज्ञ, मात्रांचा जाणकार, माप जाणणारा, प्रमाण कळलेला, मात्रा जाणणारा.
**मत्तञ्ञुता**–(स्त्री.) मापाचा जाणकार होणे.
**मत्ता**–(स्त्री.) मात्रा, प्रमाण, माप.
**मत्तासुख**–(नपु.) मोजके सुख, मर्यादित सुख.
**मत्तिका**–(स्त्री.) मृत्तिका, माती.
**मत्तिका-पिण्ड**–(पु.) मातीचा पिण्ड, मातीचा गोळा.
**मत्तिका-भाजन**–(नपु.) मातीचे भांडे, मातीचे पात्र.
**मत्तिघ**–(पु.) मातृ हत्त्या.
**मत्तेय्य**–(वि.) मातृ भक्त, आईची सेवा करणारा.
**मत्तेय्यता**–(स्त्री.) मातृ-भक्ती.
**मत्थक**–(पु.) मस्तक, शिर, डोके, शिखर, अंतरावर.
**मत्थ-लुङ्ग**–(नपु.) मेंदू.
**मत्थु**–(नपु.) दहा घुसळून काढलेले पाणी, ताक.
**मथति**–(क्रि.) घुसळणे.
**मथि**–(पू. क्रि.) घुसळले.
**मथित**–(कृ.) घुसळता.
**मथित्वा**–(पू. क्रि.) घुसळून.
**मथन**–(नपु.) मंथन, घुसळणे.
**मद**–(पु.) गर्व, अहंकार, अभिमान.
**मदन**–(पु.) कामदेव.
**मदन**–(नपु.) नशा, गुंगी, व्यसन.
**मदनीय**–(वि.) मादक, गुंगी आणणारा.
**मदिरा**–(स्त्री.) दारू, सुरा, धान्यापासून बनविलेली दारू.
**मद्द**–(पु.) मद्र देश.
**मद्दति**–(क्रि.) दाबणे, तुडविणे, चोळणे.
**मद्दि**–(पू. क्रि.) दाबले, तुडविले, चोळले.
**मद्दित, मद्दन्त**–(कृ.) दाबता, तुडविता, चोळता.
**मद्दिय**–(कृ.) दाबण्यायोग्य, तुडविण्यायोग्य, चोळण्यायोग्य.
**मद्दित्वा**–(पू. क्रि.) दाबून, तुडवून, चोळून.
**मद्दन**–(नपु.) मर्दन, चोळणे, दाबणे.
**मद्दल**–(नपु.) वाद्य, वाद्य-यंत्र.
**मद्दव**–(नपु.) मार्दव, कोमलता, नाजुकपणा.
**मद्दव**–(वि.) कोमल, नाजूक.
**मद्दित**–(कृ.) मर्दन केलेले, चोळलेले.
**मधु**–(नपु.) मध, सुरा.
**मधुक**–(पु.) मोहोळ, ज्याच्या फुलांपासून दारू तयार करतात तो वृक्ष-ती वनस्पती.
**मधुकर**–(पु.) मधमाशी, मध जमविणारी.
**मधु-गन्ध**–(पु.) मधाचे पोळे.
**मधु-पटल**–(पु.) मधाचे पोळे.
**मधुप**–(पु.) भ्रमर, भुंगा, मध पिणारा.

**मधु-पिण्डिका**–(स्त्री.) मधाचा थेंब, मधाचे पोळे.
**मधुब्बत**–(पु.) मधमाशी.
**मधु-मक्खित**–(वि.) मधाने माखलेला, मधाने भरलेला.
**मधु-मेह**–(पु.) मधुमेह रोग, लघवीतून साखर जाणे, फार लघवी होऊन.
**मधु-लट्ठिका**–(स्त्री.) जेष्ठमध (वनस्पती).
**मधु-लाज**–(पु.) मध मिसळलेल्या लाह्या.
**मधु-लीह**–(पु.) मधमाशी.
**मधुस्सव**–(वि.) मधाचा अर्क, मधाचा काढा.
**मधुका**–(स्त्री.) जेष्ठमध, औषधी वनस्पति.
**मधुर**–(वि.) गोड.
**मधुर**–(नपु.) गोड पदार्थ.
**मधुरत्त**–(नपु.) गोडी, मधुरता.
**मधुरस्सर**–(पु.) गोड स्वर, मधुर स्वर, सुस्वर.
**मधुरस्सर**–(वि.) मधुर भाषी, गोड बोलणारा.
**मधुरा**–(नपु. वि.) यमुना किनारी असलेली सूरसेन गण राज्याची राजधानी, मथुरा. दक्षिण भारतातील प्रसिद्ध मदुरा नगर.
**मध्वासव**–(पु.) दारू, सुरा.
**मन**–(पु., नपु.) चित्त, विज्ञान.
**मनक्कार, मनसिकार**–(पु.) मनोसंकल्प.
**मनता**–(स्त्री.) मनोभाव.
[अत्त-मनता–(स्त्री.)आनंदपूर्ण मनोभावना, विनोद].
**मनन**–(नपु.) विचार करणे, चिंतन.
**मनसिकरोति**–(क्रि.) मनात ठेवणे, विचार करणे.
**मनसिकरि**–(पू. क्रि.) मनात ठेवले, विचार केला.
**मनसिकत, मनसिकरोन्त**–(कृ.) मनात ठेवता, विचार करता.
**मनसिकातब्ब**–(कृ.) मनात ठेवण्यासारखे, विचार करण्यायोग्य.
**मनसिकत्वा**–(पू. क्रि.) मनात ठेवून, विचार करून.
**मनं**–(अ.) जवळजवळ.
**मनाप, मनापिक**–(वि.) मनमोहक, आकर्षक, मनोनुकुल, आवडता.
**मनुज**–(पु.) मनुष्य, माणूस, मानव.
**मनुजाधिप**–(पु.) राजा.
**मनुजिन्द**–(पु.) नरेंद्र, राजा.
**मनुञ्ञ**–(वि.) मनोज्ञ, सुंदर.
**मनुस्स**–(पु.) मनुष्य, माणूस.
**मनुस्सत्त**–(नपु.) मनुष्यत्त्व, माणुसकी, माणुसपणा.
**मनुस्स-भाव**–(पु.) मनुष्य-भाव, मनुष्य स्वभाव.
**मनुस्स-भूत**–(वि.) मनुष्य म्हणून जन्मला, मानव जन्म.
**मनुस्स-लोक**–(पु.) मानव-लोक.
**मनेसिका**–(स्त्री.) दुसऱ्यांच्या विचाराची माहिती-ज्ञान.
**मनो**–(नपु.) मन.
**मनोकम्म**–(नपु.) मानसिक कार्य.
**मनोजव**–(वि.) मनासारखी शीघ्र गती.
**मनोदुच्चरित**–(नपु.) मानसिक दुष्कर्म.
**मनोद्वार**–(नपु.) मनरूपी द्वार, (इंद्रिय).
**मनोधातु**–(स्त्री.) चित्त.
**मनोपदोस**–(पु.) द्वेष, तिरस्कार.
**मनोपसाद**–(पु.) भक्ती, श्रद्धा.
**मनोपुब्बङ्गम**–(वि.) ज्याचे पूर्वगामी मन आहे. मनच ज्याचे कारण आहे, मनामुळे.
**मनोमय**–(वि.) मनातून उत्पन्न, मनापासून, मनोमय.
**मनोरथ**–(पु.) इच्छा, संकल्प, कामना, मनोरथ.
**मनोरम**–(वि.) आनंददायक, सुंदर, मनोरम.
**मनोविञ्ञाण**–(नपु.) मनोविज्ञान.
**मनोविञ्ञेय्य**–(वि.) मनाने जाणणे योग्य.
**मनोवितक्क**–(पु.) मनोवितर्क, विचार.
**मनोहर**–(वि.) सुंदर, आकर्षक, मनोहर.
**मनोज जातक**–मनोजने राज्याचे घोडे हिरावून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु तो राजाच्या धनुर्धऱ्यांकडून मारला गेल्याची कथा–(३९७).
**मनोसिला**–(स्त्री.) मैनशिळ.
**मन्त**–(नपु.) मंत्र.
**मन्तज्झायक**–(वि.) मंत्राध्यायन करणारा, मंत्र शिकणारा.
**मन्तन**–(नपु.) मंत्रणा, विचार-विमर्श, चर्चा.
**मन्तना**–(स्त्री.) मंत्रणा, विचार-विमर्श, चर्चा.
**मन्ता**–(स्त्री.) प्रज्ञा.
**मन्ती**–(पु.) मंत्री.
**मन्तिणी**–(स्त्री.) मंत्रिणी.
**मन्तु**–(पु.) कल्पना करणारा.
**मन्तेति**–(क्रि.) मंत्रणा करणे, विचार-विमर्श करणे, चर्चा करणे.
**मन्तेसि**–(पू. क्रि.) मंत्रणा केली, विचार-विमर्श केला, चर्चा केली.
**मन्तित, मन्तेन्त, मन्तेतु**–(कृ.) मंत्रणा करता, विचारविमर्श करता.
**मन्तयमान**–(कृ.) मंत्रणा करण्यायोग्य, विचार-विमर्श करण्यायोग्य.

**मन्तेत्वा**–(पू. क्रि.)मंत्रणा करून, विचार-विमर्श करून.
**मन्थ**–(पु.) रवी.
**मन्थर**–(पु.) कासव.
**मन्द**–(वि.) मन्दबुद्धी, आळशी, निरुत्साही.
**मन्दता**–(स्त्री.) मदभावना, मूर्खपणा.
**मन्दं, मन्द मन्दं**–(क्रि. वि.) हळू-हळू.
**मन्दाकिनी**–(स्त्री. वि.) सरोवर किंवा नदीचे नाव, गंगानदी.
**मन्दामुखी**–(स्त्री.) शेकोटी.
**मन्दार**–(पु.) मंदार पर्वत.
**मन्दिय**–(नपु.) मूर्खपणा, आळस.
**मन्दिर**–(नपु.) भवन, महाल, मंदिर.
**मन्धातु जातक**–मान्धाता राजाची कथा–(२५८).
**ममङ्कार**–(पु.) ममत्त्व, ममता.
**ममायना**–(स्त्री.) स्वार्थ परायणता, आसक्ती, आकर्षण.
**ममायति**–(क्रि.) आसक्त होणे.
**ममायि**–(पू. क्रि.) आसक्त झाला.
**ममायित, ममायन्त**–(कृ.) आसक्त होता.
**ममायित्त्वा**–(पू. क्रि.) आसक्त होऊन.
**मम्म, मम्मट्ठान**–(नपु.) मर्म , मर्मस्थान.
**मम्मच्छेदक**–(वि.) मर्मस्थानाला छेदणारा.
**मम्मन**–(वि.) हाकलणारा, हाकणारा.
**मयं**–(स. ना.) आम्ही.
**मय्हक जातक**–भावाने पुतण्याला नदीत बुडवून मारल्याची कथा–(३९०).
**मयूख**–(पु.) प्रकाश किरण.
**मयूर**–(पु.) मोर.
**मरण**–(नपु.) मृत्यू, अंत, मरण.
**मरण-काल**–(पु.) मरणाची वेळ.
**मरण-चेतना**–(स्त्री.) मारून टाकण्याचा विचार-संकल्प.
**मरण-धम्म**–(वि.) मृत्यूस्वभाव, नैसर्गिक मरण भावना.
**मरणन्त**–(वि.) मृत्यूपर्यंत, जीवनाचा अंत-मृत्यू.
**मरण-परियोसान**–(वि.) जीवनाचा अंत, मरण.
**मरण-भय**–(नपु.) मरणाची भीती.
**मरण-मञ्चक**–(पु.) ज्या खाटेवर माणसाचा मृत्यू होतो
**मरण-मुख**–(नपु.) मृत्यूचा जबडा, मृत्यूचे तोंड.
**मरण-लिङ्ग**–(नपु.) मृत्यूचे चिन्ह.
**मरण-सति**–(स्त्री.) मरणाची आठवण, मृत्यूचे स्मरण.
**मरण-समय**–(पु.) मरणाचा काळ.
**मरति**–(क्रि.) मरणे.
**मरि**–(पू. क्रि.) मेला.
**मत, मरन्त, मरितुं**–(कृ.) मरताना.
**मरमान, मरितब्ब**–(कृ.) मरण्यालायक.
**मरित्त्वा**–(पू. क्रि.) मरून.
**मरिच**–(नपु.) मिरची.
**मरियादा**–(स्त्री.) सीमा, नियम, हद्द, मर्यादा.
**मरीचि**–(स्त्री.) प्रकाश किरण.
**मरीचिका**–(स्त्री.) मृगजळ, मृगतृष्णा.
**मरीचि-धम्म**–(वि.) मृगजळाप्रमाणे.
**मरू**–(स्त्री.) वाळवंट.
**मरू**–(पु.) देव.
**मरुम्ब**–(नपु.) आरसा, काच
**मल**–(नपु.) घाण, मैला, विष्टा
**मल-तर**–(वि.) फार घाण, जास्त घाण.
**मलय**–(पु.) मलय पर्वत.
**मलयज**–(पु.) चंदन.
**मलिन**–(वि.) डागाळलेला, घाणेरडा, मलिन.
**मल्ल**–(पु.) पैलवान, मल्ल.
**मल्ल-युद्ध**–(नपु.) कुस्ती
**मल्लक**–(पु.) भांडे, पिशवी, मोठी पिशवी.
**मल्लिका**–(स्त्री.) चमेली.
**मसारगल्ल**–(नपु.) भारी किंमतीचा दगड, संगमरवरी दगड.
**मसि**–(पु.) काजळी.
**मस्सु**–(नपु.) दाढी.
**मस्सुक**–(वि.) दाढीवाला.
**मस्सुक-कम्म**–(नपु.) हजामत, दाढी करणे.
**मस्सुकरण**–(नपु.) हजामत करणे, दाढी करणे.
**मह**–(पु.) धार्मिक उत्सव.
**महग्गत**–(वि.) फार उंच.
**महग्घ**–(वि.) फार किंमतीचा, महाग.
**महग्घता**–(स्त्री.) मौल्यवान.
**महग्घस**–(वि.) खादाड, भुकेलेला.
**महण्णव**–(वि.) महार्णव, महासागर.
**महति**–(क्रि.) आदर करणे, गौरव करणे.
**महि**–(पू. क्रि.) आदर केला, गौरव केला.
**महित**–(कृ.) आदर करता, गौरव करता.
**महित्त्वा**–(पू. क्रि.) आदर करून, गौरव करून.
**महत्त**–(नपु.) महत्त्व, मोठेपणा, श्रेष्ठत्त्व.
**महद्धन**–(वि.) फार श्रीमंत, अत्यंत धनवान.
**महनीय**–(वि.) आदरणीय.
**महन्त**–(वि.) महान, मोठा, श्रेष्ठ.

**महन्तर**–(वि.) फार मोठा, मोठ्याहून मोठा.
**महन्तता**–(स्त्री.) मोठेपणा, श्रेष्ठत्व.
**महन्त-भाव**–(पु.) थोरपणा, श्रेष्ठपणा.
**महप्फल**–(वि.) महाफळ मिळालेला.
**महब्बल**–(वि.) महान बलशाली, शक्तिमान.
**महब्बल**–(नपु.) फार मोठे सैन्य.
**महब्भय**–(नपु.) महान भीति, मोठे भय.
**महल्लक**–(वि.) म्हातारा, वृद्ध.
**महल्लक**–(पु.) म्हातारा मनुष्य, वृद्ध मनुष्य.
**महल्लकतर**–(वि.) सर्वात वयोवृद्ध.
**महल्लिका**–(स्त्री.) म्हातारी, वृद्ध स्त्री.
[महा–सामासिक शब्दांत "महंत"चे "महा" रूप होते आणि "टी" आ स्वर ऱ्हस्व होतो महान].
**महा उपासक**–(पु.) भगवान बुद्धाचा श्रद्धासंपन्न अनुयायी, महाउपासक.
**महा उपासिका**–(स्त्री.) भ. बुद्धाची श्रद्धासंपन्न अनुयायिनी महाउपासिका.
**महा करुणा**–(स्त्री.) महान दया, महाकरुणा,
**महा काय**–(वि.) फार मोठ्या शरिराचा.
**महागण**–(पु.) मोठी मंडळी, मोठा समुदाय, मोठा समाज.
**महागणी**–(पु.) अनेक अनुयायी शिष्य असलेला.
**महाजन**–(पु.) जनता, समाज.
**महातण्ह**–(वि.) फार लोभी, महास्वार्थी.
**महातल**–(नपु.) इमारतीवरील उघडी गच्ची.
**महाद्वीप**–(पु.) जम्बुद्वीप.
**महाधन**–(नपु.) फार मोठी संपत्ती.
**महानरक**–(पु.) घोर नरक.
**महानस**–(नपु.) सैपाक घर.
**महानुभाव**–(वि.) महा प्रतापी.
**महापञ्ञ**–(वि.) अत्यंत प्रज्ञावान.
**महापथ**–(पु.) महामार्ग.
**महापितु**–(पु.) वडिलांचा थोरला भाऊ, थोरला चुलता.
**महापुरिस**–(पु.) महापुरुष, पुरुष श्रेष्ठ.
**महाभूत**–(नपु.) पृथ्वी, जल, वायु, प्रकाश (अग्नी) ही महाभुते.
**महाभोग**–(वि.) ऐश्वर्यशाली.
**महामति**–(पु.) महान बुद्धीमान.
**महामत्त, महामच्च**–(पु.) मुख्य मंत्री.
**महामुनि**–(पु.) महान मुनी, सर्वश्रेष्ठ संन्याशी.
**महामेघ**–(पु.) मुसळधार पाऊस.
**महायञ्ञ, महायाग**–(पु.) महान यज्ञ.
**महायस**–(वि.) महान यशस्वी.
**महारह**–(वि.) अत्यंत मौल्यवान.
**महाराजा**–(पु.) महान नरेश, मोठा राजा, महाराजा.
**महालतापसाधन**–(नपु.) स्त्रियांच्या सौदर्यात भर घालणारी वेली, अर्थात फुले, फुलवेली.
**महासत्त**–(नपु.) महान सत्त्व, महासत्त्व.
**महा समुद्द**–(पु.) महासागर.
**महासर**–(नपु.) मोठा जलाशय, सरोवर.
**महासार, महासाल**–(पु.) अमाप संपत्तीचा धनी.
**महासावक**–(पु.) मोठा शिष्य, सर्वश्रेष्ठ अनुयायी.
**महा अस्सारोह जातक**–युद्धातील हाहाकार पाहून एक राजा घोड्यावर बसून पळून गेल्याची कथा–(३०२).
**महा उक्कुस जातक**–एका मित्राने आपल्या दुसऱ्या मित्रास मदत केल्याची कथा–(४८६).
**महा उम्मग जातक**–महोषध पंडिताच्या पांडित्याची कथा–(५४६).
**महाकण्ह जातक**–शक्राने (इंद्राने) महाकण्ह नावाच्या आपल्या कुत्र्याच्या मदतीने दुराचारी माणसाला चांगलीच भीती दाखविल्याची कथा–(४६९).
**महा कपि जातक**–वानराने आपल्या शरिराचा पूल करून आपल्या सर्व वानर बंधूंना नदी पार करण्यास मदत करून खऱ्या नेत्याच्या धर्माचे पालन केल्याची कथा–(४०७).
**महा कपि जातक**–एका कृतघ्न माणसाने एका वानराचे डोके फोडले. तरी सुद्धा परहित कारक त्या वानराने त्या माणसाचा जीव वाचविल्याची कथा–(५१६).
**महा कस्सप थेर**–भगवान बुद्धांच्या प्रमुख शिष्यांपैकी एक विद्वान शिष्य, महाकाश्यप थेर.
**महा जनपद**–प्राचीन-बुद्धकालीन भारतातील सोळा गणराज्ये, ती ही-कासी, कोसल, अङ्ग, मगध, वज्जी, मल्ल, चेतिय, वंस, कुरू, पांचाळ, मच्छ, सूरसेन, अस्सक, अवन्ती, गांधार, आणि कम्बोज यातील पहिली चौदा राज्ये मज्झिम देशात (मध्य-मंडल) आणि शेवटची दोन गणराज्ये उत्तरापथात मोडतात.
**महा तक्कारि जातक**–पहा तक्कारिय जातक.
**महाथूप**–(पु., वि.) राजा दुट्ठग्रामणीने अनुराधापूर (श्रीलंका) येथे स्थापलेला महान चैत्य.
**महा धम्मपाल जातक**–चिरंजीवी होण्याची रहस्य कथा–(४४७).

**महा धम्म रक्खित थेर**–(पु., वि.) तृतीय धम्म-परिषदेनंतर सम्राट अशोक आणि मोग्गलिपुत्त (मोग्गलीपुत्र) स्थविर यांनी धम्म प्रचारासाठी महाराष्ट्रांत पाठविलेला धर्म प्रचारक महास्थविर, महाधम्मरक्षित थेर.

**महा नारद कस्सप जातक**–नारद काश्यप ब्रह्माने अंगति राजाला स्वर्गवासाचा विश्वास दिल्याची कथा–(५४४).

**महानेरु, महामेरु**–(पु.) सुमेरु पर्वताचे दुसरे नाव.

**महापजापति गौतमी**–(स्त्री., वि.) सिद्धार्थाची आई महामाया हिचा देहान्त झाल्यावर त्याची मावशी महाप्रजापति गौतमी हिने सिद्धार्थाला दूध पाजून त्याचे पालन-पोषण केले व वाढविला तिच्या नावावरूनच सिद्धार्थास गौतम हे दुसरे नाव प्राप्त झाले होते.

भिक्खुणी संघ स्थापनेचे सर्व श्रेय महाप्रजापति गौतमीसच आहे.

**महा पदुम जातक**–सावत्र आईने मुलावर खोटा आळ घेऊन त्याला लांछन लावल्याची कथा–(४७२).

**महापनाद जातक**–ही कथा सुरुची जातकांत आली आहे–(२६४).

**महापलोभन जातक**–ही कथा चुल्लपलोभन जातक कथे सारखीच आहे–(५०७).

**महापिङ्गल जातक**–दुष्ट महापिंगल राजा मेल्यानंतर त्याच्या प्रजेने आनंद मानल्याची कथा–(२४०).

**महाबोधि जातक**–राजाने बोधीची न्याय-प्रियता पाहून त्याला न्यायाधीश निवडल्याची कथा–(५२८).

**महामङ्गल जातक**–शकुनांची व्याख्या व जीवनांत महामंगल काय काय आहे याची गाथा–(४५३).

**महामाया**–[पहा-माया].

**महामोग्गलायन थेर**–(पु., वि.) भगवान बुद्धांच्या दोन प्रमुख शिष्यांपैकी एक (१ महामोग्गलायन, २ धम्मसेनापति–सारिपुत्र.)

**महारक्खित थेर**–(पु., वि.) तिसऱ्या धम्म परिषदेनंतर (तृतीय संगीति) यवन देशांत धम्म प्रचारासाठी जाणारे महास्थविर, महारक्षित थेर.

**महारट्ठ**–(पु., वि.) तिसऱ्या धम्म परिषदेनंतर महाधम्मरक्षित हे ज्या प्रांतात गेले होते तो महाराष्ट्र.

**महावंस**–(पु., वि.) श्रीलंकेचे प्रसिद्ध ऐतिहासिक महाकाव्य याच्या पहिल्या खंडाची रचना चौथ्या शतकात महानामस्थविर यांनी केली होती. त्या-नंतरच्या खंडाची रचना पुढील काळात क्रमानुसार होत गेली.

**महावग्ग**–(पु., वि.) विनय पिटकाच्या पांच ग्रंथांपैकी एक ग्रंथ पुन्हा तो खंदकामध्ये विभागला गेला.

**महावाणिज जातक**–वटवृक्षाच्या एका फांदीपासून व्यापाऱ्यांना पाणी मिळाले, दुसरीपासून भोजन, तिसरीपासून सुंदर स्त्रिया व चौथीपासून इतर अनेक मौल्यवान वस्तू मिळाल्याची कथा. (४९३)

**महाविहार**–(पु., वि.) अनुराधापूर (श्रीलंका) येथील प्रसिद्ध बुद्ध विहार, शेकडो वर्षे हाच विहार बौद्ध धम्माचे प्रमुख केंद्र म्हणून मान्यता पावला आहे.

**महावेस्सन्तर जातक**–पहा वेस्सन्तर जातक.

**महासंघिक**–(पु.) दुसऱ्या धम्म परिषदेच्यावेळी स्थाविर वादापासून वेगळा झालेला एक बौद्ध संप्रदाय.

**महासार जातक**–एका वानरीने राणीची मोत्यांची माळ पळवून नेल्याची कथा–(९२).

**महासीलव जातक**–एका मंत्र्याने राजाच्या महालात अनैतिक कृत्य केल्यामुळे राजाने त्याला हद्दपार केल्याची कथा–(५१).

**महासुक जातक**–उंबराच्या (औदुंबर) वृक्षावरील सर्व फळे संपल्यावर सुद्धा पोपटाने तो वृक्ष सोडला नसल्याची कथा–(४२९).

**महासुत सोम जातक**–नरमांस भक्षक राजाची कथा–(५३७).

**महासुदस्सन जातक**–महासुदर्शनाच्या मृत्यूची कथा–(९५).

**महासुपिन जातक**–कोसल राजा प्रसेनजित यास पडलेल्या सोळा स्वप्नांचा अर्थ सांगणारी कथा–(७७).

**महाहंस जातक**–सोनेरी राजहंसाने सिंहासनावर बसून आपणास धर्मोपदेश करावा अशी प्रबळ इच्छा असलेल्या राणीची कथा–(५३४).

**महिंसासक**–(पु.) स्थविर वादापासून वेगळा झालेला आणखी एक बौद्ध संप्रदाय.

**महिका**–(स्त्री.) धंद, धुके.

**महिच्छ**–(वि.) अत्यंत लोभी.

**महिच्छता**–(स्त्री.) अत्यंत लोभ.

**महित**–(क्र.) पूजित, पुजलेला.

**महिद्धिक**–(वि.) महाऋद्धिमान.

**महिन्द**–(पु., वि.) महान इंद्र, भिक्षुणी संघ मित्राचा भाऊ व सम्राट अशोकांचा सुपुत्र आणि महा-मोग्गली पुत्र तिस्स थेर यांच्या प्रेरणेने धम्म प्रचारासाठी श्रीलंकेस (सिलोन-सिंहल) गेलेला महेंद्र.

**महिला**–(स्त्री.) स्त्री, महिला.

**महिला मुख जातक**–महिला मुख नावाच्या राजाच्या हत्तीची कथा–(२६).
**महिस**–(स्त्री.) म्हैस.
**महिस जातक**–वानराने एका म्हैशीला फार त्रास दिला तो त्रास तिने सहन केला. परंतु त्याच वानराला दुसऱ्या म्हैशीने ठार मारल्याची कथा–(२७८).
**महिस-मण्डल**–(पु.) महादेव स्थविराचे धम्म प्रचाराचे क्षेत्र. सध्याचे म्हैसूर.
**महिस्सर**–(पु.) महेश्वर, महादेव.
**मही**–(स्त्री.) पृथ्वी, नदी.
**मही-तल**–(नपु.) जमीन, जमिनीचा पृष्ठ भाग.
**मही-धर**–(पु.) पर्वत, डोंगर.
**महीपति, महीपाल**–(पु.) राजा.
**महीभाग**–(पु.) भयंकर अरण्य, महावन, भयानक स्थान.
**महीरूह**–(पु.) वृक्ष.
**महेसक्ख**–(वि.) महा प्रतापशाली.
**महेसि**–(पु.) महर्षि.
**महेसि**–(स्त्री.) पट्टराणी.
**महोघ**–(पु.) महापूर.
**महोदधि**–(पु., वि.) समुद्र, सागर.
**महोदर**–(वि.) मोठे पोट.
**महोरग**–(पु.) सापांचा राजा.
**महोसध**–(नपु.) सुंठ, वाळविलेले आले.
**मा**–(अ.) निषेधात्मक, नकारात्मक, न, नको या अर्थी.
**मा**–(पु.) चंद्र.
**मागध, मागधक**–(वि.) मगधा संबंधी.
**मागधी**–(स्त्री.) पालि भाषेचे प्रारंभिक नाव.
**मागविक**–(पु.) शिकारी, शिकार करणारा.
**मागसिर**–(पु., वि.) मार्गशीर्ष महिना.
**माघ**–(पु., वि.) माघ महिना.
**मा-घात**–(पु.) अहिंसा, हत्याविरत राहण्याची आज्ञा.
**माणव, माणवक**–(पु.) तरुण, ब्रह्मचारी.
**माणविका**–(स्त्री.) तरुणी, ब्रह्मचारिणी.
**मातङ्ग**–(पु.) हत्तीचे नाव, मांग, मांतग.
**मातली**–(पु., वि.) इंद्राच्या सारथ्याचे नाव.
**माता-पितु**–(पु.) माता-पिता, आई-बाप.
**माता पेत्तिक**–(वि.) आई बापा बरोबर आलेला.
**मातापेत्ति-भार**–(पु.) आई-बापांचे भरण-पोषण-संरक्षण.
**माता मह**–(पु.) आईचे वडील (आजोबा)
**माता मही**–(स्त्री.) आईची आई (आजी).
**मातिक**–(वि.) आईसंबंधी, आईविषयी.

**मातिका**–(स्त्री.) जल-मार्ग, अभिधम्मसंबंधी विषयांचे शीर्षस्थान, प्रातिमोक्ष-नियमावली.
**मातिपक्ख**–(पु.) मातृपक्ष.
**मातु**–(स्त्री.) आई.
**मातु-कुच्छि**–(पु.) आईची कूस.
**मातु-गाम**–(पु.) स्त्री
**मातु-घात**–(पु.) मातृ-हत्या.
**मातु-घातक**–(पु.) मातृहत्या करणारा.
**मातुच्छा**–(स्त्री.) मावशी, आईची बहीण.
**मातु-पट्ठान**–(नपु.) मातृसेवा, आईची सेवा.
**मातु-पोसक**–(वि.) आईस पोसणारा.
**मातुपोसक जातक**–हत्तीने आपल्या आंधळचा आईची सेवा केल्याची कथा–(४५५).
**मातु-भगिनी**–(स्त्री.) आईची बहीण, मावशी.
**मातु-भातु**–(पु.) आईचा भाऊ, मामा.
**मातुल**–(पु.) मामा.
**मातुलानी**–(स्त्री.) मामी.
**मातुलुङ्ग**–(पु.) ईडलिंबू.
**मादिस**–(वि.) माझ्या सारखा.
**मान, माण**–(नपु.) माप.
**मान, माण**–(पु.) अहंकार, गर्व.
**मानकूट**–(पु.) खोटे माप.
**मानत्थद्ध**–(वि.) अहंकारी, अहंकार भरलेला, गर्विष्ट.
**मानद**–(वि.) गौरवाई, आदरणीय.
**मानन**–(नपु.) आदर करणे, सन्मान करणे.
**मानव**–(पु.) मनुष्य, माणूस.
**मानस**–(नपु.) मन, चित्त, विज्ञान, केलेला संकल्प.
**मानित**–(कृ.) सन्मानित, गौरवित.
**मानी**–(पु.) अभिमानी.
**मानुस**–(वि.) मानवासंबंधी, मनुष्यासंबंधी.
**मानुस**–(पु.) मनुष्य, मानव, माणूस.
**मानुसक**–(वि.) मनष्याविषयी.
**मानुसि**–(स्त्री.) स्त्री, मानुषी.
**मानेति**–(क्रि.) आदर करणे, सत्कार करणे.
**मानेसि**–(पू. क्रि.) आदर केला, सत्कार केला.
**मानेन्त**–(कृ.) आदर करता, सत्कार करता.
**मानेत्वा**–(पू. क्रि.) आदर करून, सत्कार करून.
**मापक**–(पु.) रचनाकार, बनविणारा, निर्माण करणारा.
**मापित**–(कृ.) रचित, निर्मित.
**मापेति**–(क्रि.) रचणे, बनविणे.
**मापेसि**–(पू. क्रि.) रचले, बनविले.

**मापेत**–(कृ.) रचता, बनविता.
**मापेत्वा**–(पू. क्रि.) रचून, बनवून.
**मामक**–(वि.) श्रद्धाळू, प्रेमळ, ममत्वयुक्त.
**माया**–(स्त्री.) जादू, फसविणे, ठकविणे.
**माया, महामाया**–(स्त्री., वि.) सिद्धार्थ गौतमाची जन्मदात्री आई, तिचा बाप देवदह नगरीचा अंजनशाक्य आणि आई जयसेनाची मुलगी यशोधरा होती.
**मायाकार**–(पु.) जादुगार.
**मायावी**–(वि.) ढोंगी, फसविणारा, जादुगार, फसवा, मायावी.
**मायु**–(पु.) पित्त.
**मार**–(पु.) अकुशल वृत्तीचे साकार रूप, भुलविणारा, फसविणारा, साक्षात यम, मार.
**मार-कायिक**–(वि.) मार लोकांसंबंधी.
**मार-धेय्य**–(नपु.) माराचे क्षेत्र.
**मार-बन्धन**–(नपु.) मृत्यूचे बंधन, माराचे बंधन.
**मार-सेना**–(स्त्री.) माराचे सैन्य.
**मारक**–(वि.) मारणारा, घातक.
**मारण**–(नपु.) मारणे, ठार करणे, जीव घेणे.
**मारापित**–(कृ.) मारविले, मारावयास लावले.
**मारापेति**–(क्रि.) मारावयास लावणे, मारविणे.
**मारापेसि**–(पू. क्रि.) मारावयास लावले, मारविले.
**मारापित**–(कृ.) मारावयास लावता, मारविता.
**मारापेन्त**–[पहा–मारापित].
**मारापेत्वा**–(पू. क्रि.) मारावयास लावून, मारवून.
**मारित**–(कृ.) मारले गेले, मारला गेलेला.
**मारिस**–(वि.) मित्र, मान्यवर, संबोधन.
**मारूत**–(पु.) वारा, हवा.
**मारेति**–(क्रि.) मारणे.
**मारेसि**–(पू. क्रि.) मारले.
**मारेन्त, मारेन्तु**–(कृ.) मारता.
**मारेत्वा**–(पू. क्रि.) मारून.
**मारेतु**–मारेकरी, मारणारा.
**माल, मालक**–(पु.) वर्तुळाकार आंगण, घेरेदार जागा.
**माळ**–(पु.) एक ताळी घर.
**मालती**–(स्त्री.) मालती नावाची वेल.
**माला**–(स्त्री.) माळ, फुलांची माळ-हार.
**माला-कम्म**–(नपु.) माळ ओवणे, माळ गुंफणे, भिंतीवर कोरलेले फूल.
**मालाकार**–(पु.) माळी, हार गुंफणारा.
**माला-गच्छ**–(पु.) फुलझाड.
**माला-गुण**–(पु.) माळ गुंफण्याचा धागा.
**माला-गुळ**–(नपु.) फुलांचा ढीग.
**माला-चुम्बटक**–(पु.) फुलांचा गजरा.
**माला-दाम**–[पहा–माला गुण].
**माला-धर**–(पु., वि.) मालाधारी, हार घातलेला.
**माला-धारी**–(वि.) माला धारी.
**माला-पुट**–(पु.) फुलांनी भरलेला द्रोण.
**मालावच्छ**–(नपु.) पुष्पोद्यान, पुष्पशैया.
**मालिक, माली**–(वि) माला धारी.
**मालिनी**–(स्त्री.) माला धारिणी, माळ घातलेली स्त्री.
**मालुत**–(पु.) वारा, हवा, वायू.
**मालुत जातक**–एका तपस्व्याने अनुमान काढले की, जेव्हा वारा वाहतो तेव्हा अधिक थंडी पडते ही कथा–(१७).
**मालुवा**–(स्त्री.) आकाश वेल.
**मालूर**–(पु.) एक झाड.
**माल्य**–(नपु.) पुष्प-माला, फुलांचा हार.
**मास**–(पु.) महिना, उडदाची डाळ.
**मासिक**–(वि.) महिनावार, मासिक.
**मासक**–(पु.) सोने मोजण्याचे वजन, मासा (तोळा-मासा.)
**मिग**–(पु.) पशु, हरीण, मृग, चार पायाचा प्राणी.
**मिग-छापक, मिग-पोतक**–(पु.) हरिणीचे पाडस.
**मिग-तण्हिका**–(स्त्री.) मृगतृष्णा, मृगजळ.
**मिग-दाय**–(पु.) मृगोद्यान.
**मिग-मद**–(पु.) कस्तुरी.
**मिग-मातुक**–(स्त्री.) मृगी, हरिणी.
**मिग-लुद्दक**–(पु.) शिकारी, पारधी.
**मिग-पोतक जातक**–एका तपस्व्याने फार प्रेमाने एक हरिणाचे पाडस पाळले होते त्याच्या मृत्यूने त्यास फार राग आल्याची कथा–(३७२).
**मिगव**–(पु.) शिकारी, पारधी.
**मिगार-मातु-पासाद**–(पु., वि.) श्रावस्तीच्या पूर्वदिशेला पूर्वारामात विशाखा मिगारमाता द्वार बनविलेल्या विहाराचे नाव.
**मिगालोप जातक**–मिगालोपाने आपला वडील गृध्राचे न ऐकल्यामुळे आपला प्राण गमविल्याची कथा–(३८१).
**मिगिन्द**–(पु.) मृगेन्द्र, सिंह, पशुंचा राजा.
**मिगी**–(स्त्री.) हरिणी.
**मिच्छत्त**–(नपु.) मिथ्यत्व, खोटेपणा.
**मिच्छा**–(अ.) मिथ्या, खोटा.

**मिच्छा-कामन्त**–(पु.) दुराचरण, वाईट आचरण, मिथ्याचरण.
**मिच्छा-गहण**–(नपु.) खोटी धारणा, खोटा समज, चुकीची कल्पना.
**मिच्छाचार**–(पु.) मिथ्याचरण, दुराचरण, वाईट वर्तन.
**मिच्छाचारी**–(वि.) दुराचारी, वाईट वागणारा, मिथ्याचारी.
**मिच्छा-दिट्ठि**–(स्त्री.) मिथ्यादृष्टी, खोटी धारणा.
**मिच्छा-दिट्ठि**–(वि.) मिथ्यामतधारी, चुकीच्या मताचा.
**मिच्छा-पणिहित**–(वि.) चुकीच्या मार्गाने जाणारा.
**मिच्छा-वाचा**–(स्त्री.) खोटी वाचा, खोटे-बोलणे, असत्य बोलणे.
**मिच्छा-वायाम**–(पु.) चुकीचा प्रयत्न, अयोग्य उद्योग.
**मिच्छा-सङ्कप्प**–(पु.) खोटा संकल्प.
**मिञ्ज**–(नपु.) मज्जा.
**मणति, मनाति**–(क्रि.) मापणे, मोजणे.
**मिणि**–(पू. क्रि.) मापले, मोजले.
**मित, मिणन्त, मिणिन्तु**–(कृ.) मापता, मोजता.
**मिणीयति**–(पू. क्रि.) मापले, मोजले.
**मिणित्वा**–(पू. क्रि.) मापून, मोजून.
**मित**–(कृ.) मापले गेले, तोलले गेले, मोजले गेले.
**मित्त-भाषी**–(पु.) कमी बोलणारा, संयत बोलणारा.
**मित चिन्ती जातक**–फार काळजी करणाऱ्या, कमी अल्प काळजी करणाऱ्या व संयत काळजी करणाऱ्या माशांची कथा–(११४).
**मित्त**–(पु., नपु.) मित्र.
**मित्तद्दु, मित्तदुभि, मित्तदुभी**–(पु.) मित्रद्रोही.
**मित्त-पतिरुपक**–(वि.) खोटा मित्र, मित्रासारखे रूप दाखविणारा.
**मित्त-भेद**–(पु.) मित्र-भेद, मित्रातील फरक.
**मित्त-सन्थव**–(पु.) मैत्री संबंध.
**मित्त-विन्दक जातक**–चतुद्वार जातकात वर्णन केल्याप्रमाणे मित्त विन्द जातक कथेचा एक अंश–(८२).
**मित्त-विन्द जातक**–चतुद्वार जातक कथेचा आणखी एक वेगळा अंश असलेला भाग–(१०४).
**मित्त-विन्द जातक**–चतुद्वार जातकाचा वरील भागाखेरीज वेगळा असलेला भाग–(३६९).
**मित्ता मित्त जातक**–खऱ्या मित्राची लक्षण सांगणारी कथा–(४७३).
**मित्ता मित्त जातक**–एका तपस्व्याने हत्तीचे पिल्लू पाळले, त्याचे पालन पोषण केले, पुढे तो मोठा हत्ती झाल्यावर त्याने तपस्व्यास ठार मारल्याची कथा–(१९७).
**मिथिला**–(स्त्री., वि.) वैदेही गणराज्याच्या (विदेही) राजधानीचे शहर– सध्या नेपाळ सीमेत "जनकपूर" या नावाने प्रसिद्ध आहे.
**मिथु**–(अ.) एका नंतर एक, एकेक, दडून.
**मिथु-भेद**–(पु.) मित्रभेद, मित्रातील फरक.
**मिथुन**–(नपु.) पुलिंग व स्त्रीलिंगाचा प्रत्यक्ष संबंध, भोग, युगल, जोडी, मैथुन, संभोग.
**मिथो**–(अ.) परस्पर.
**मिद्ध**–(नपु.) आळस.
**मिद्धी**–(वि.) आळशी.
**मिय्यति, मीयति**–(क्रि.) मरणे.
**मीयमान**–(कृ.) मरणासन्न, मरत असलेला.
**मिलक्ख**–(पु.) मिसर जातीचा, मिस्त्र देशाचा रहिवासी.
**मिलक्ख-देस**–(पु.) मिसर देश, मिस्त्र देश.
**मिलात**–(कृ.) म्लान झालेला, निष्प्रभ झालेला, थकलेला.
**मिलातता**–(स्त्री.) निष्प्रभ, म्लान-भाव, कोमेजणे.
**मिलायति**–(क्रि.) कुचलणे, तुडविणे, दुर्दशा करणे.
**मिलायि**–(पू. क्रि.) कुचलले, तुडविले, दुर्दशा केली.
**मिलायमान**–(कृ.) कुचलण्या योग्य, तुडविण्या योग्य.
**मिलिन्द**–(पु., विशे. ना.) सागलचा राजा मिनँडर याचा जन्म अलसन्दा (आलेक्झांड्रिया) च्या जवळ कलसी या ठिकाणी झाला होता. नागसेन स्थविर आणि मिनँडर यांच्यात झालेला धार्मिक संवाद "मिलिन्द-पञ्ह" "मिलिंद प्रश्न" या नावाने प्रसिद्ध आहे.
**मिलिन्द-पञ्ह**–(पु.) भिक्षु नागसेन आणि राजा मिलिंद यांच्यात झालेल्या धार्मिक प्रश्नोत्तरांचा ग्रंथ.
**मिस्स, मिस्सक**–(वि.) मिश्रीत, मिसळलेला.
**मिस्सेति**–(क्रि.) मिसळणे.
**मिस्सेसि**–(पू. क्रि.) मिसळले.
**मिस्सेन्त**–(कृ.) मिसळता.
**मिस्सेत्वा**–(पू. क्रि.) मिसळून.
**मिहित**–(नपु.) हास्य, हासणे.
**मीन**–(पु.) मासा.
**मीळ्ह**–(नपु.) विष्टा, मळ, गू.
**मुकुल**–(नपु.) कळी, फुलाची कळी.
**मुख**–(नपु.) तोंड, चेहरा, प्रवेश-द्वार, मुख.
**मुख**–(वि.) प्रमुख, मुख्य.
**मुख-तुण्ड**–(नपु.) चोंच.
**मुख-द्वार**–(नपु.) तोंड.

**मुख-धोवन**–(नपु.) तोंड धुणे.
**मुख-पुञ्छन**–(नपु.) तोंड पुसण्याचे वस्त्र, रूमाल.
**मुख-पूर**–(नपु.) तोंड भरणे.
**मुख-पूर**–(वि.) तोंड भरणारा.
**मुख-वट्टि**–(स्त्री.) किनारा, काठ, कड.
**मुख-वण्ण**–(पु.) चेहऱ्याचा रंग.
**मुख-विकार**–(पु.) चेहेऱ्याचा रंग-ढंग, चेहऱ्याची सजावट.
**मुख-संकोचन**–(नपु.) चेहऱ्याची विकृति, वेडा वाकडा चेहरा.
**मुख-संयत**–(वि.) बोलण्यातील संयम, मोजके बोलणे.
**मुखर**–(वि.) वाचाळ, फार बडबडणारा.
**मुखरता**–(स्त्री.) बडबड, वाचाळता.
**मुखाधान**–(नपु.) लगाम, तोंडात घातलेले बंधन.
**मुखुल्लोकक**–(वि.) चेहऱ्याकडे पाहणारा.
**मुखोदक**–(नपु.) तोंड धुण्याचे पाणी.
**मुख्य**–(वि.) प्रमुख, प्रधान, अति महत्त्वपूर्ण, महत्त्वाचा.
**मुग्ग**–(पु.) मूग.
**मुग्गर**–(पु.) व्यायामाचा लाकडी करेल, लांबट गदा.
**मुंगुस**–(पु.) मुंगूस.
**मुचलिन्द**–(पु. वि.) एका वृक्षाचे नाव.
उरुवेला येथील अजपाल, न्यग्रोधच्या जवळचा एक वृक्ष, बुद्धत्व प्राप्ती नंतर भ. बुद्धाने याच वृक्षा खाली तिसरा आठवडा (सप्ताह) चिंतनात घालविला होता.
**मुच्चति**–(क्रि.) स्वतंत्र होणे, मुक्त होणे.
**मुच्चि**–(पू. क्रि.) स्वतंत्र झाला, मुक्त झाला.
**मुत्त, मुच्चित**–(कृ.) स्वतंत्र होता, मुक्त होता.
**मुच्चमान**–(कृ.) स्वतंत्र होण्यायोग्य, मुक्त होण्यायोग्य.
**मुच्चित्त्वा**–(पू. क्रि.) स्वतंत्र होऊन, मुक्त होऊन.
**मुच्छति**–(क्रि.) मूर्च्छित होणे, गुंगी येणे, बेशुद्ध होणे.
**मुञ्छि**–(पू. क्रि.) मूर्छित झाला, गुंगी आली. बेशुद्ध झाला.
**मुच्छित, मुच्छन्त**–(कृ.) मुर्च्छित होता, गुंग होता.
**मुच्छिय**–(कृ.) मूर्च्छित होण्यासारखा, गुंगी येण्यासारखा.
**मुच्छित्त्वा**–(पू. क्रि.) मूर्च्छित होऊन, गुंगी येऊन.
**मुच्छन**–(नपु.) मूर्च्छा, गुंगी, बेशुद्धी.
**मुच्छना**–(स्त्री.) मूर्च्छा, गुंगी, बेशुद्धी.
**मुञ्चक**–(वि.) मुक्त करणारा, स्वतंत्र देणारा, मोकळे करणारा.
**मुञ्चति**–(क्रि.) मुक्त करणे, ढिले करणे, सोडणे.
**मुञ्चि, मुचित**–(पू. क्रि.) मुक्त केले, ढिले केले, सोडले.
**मुञ्चित, मुञ्चन्त**–(कृ.) मुक्त करता, ढिले करता, सोडता.
**मुञ्चमान, मुञ्चिय**–(कृ.) मुक्त करण्यासारखे, ढिले करण्यासारखे.
**मुञ्चित्त्वा**–(पू. क्रि.) मुक्त करून, ढिले करून, सोडून.
**मुञ्चन**–(नपु.) सोडणे, मुक्त करणे, स्वतंत्र करणे.
**मुञ्ज**–(नपु.) मुंज, दर्भ, गवताचा एक प्रकार.
**मुट्ठ**–(कृ.) विस्मृत, विसरलेला, विसरणारा.
**मुट्ठसच्च**–(वि.) विस्मृति, विसरणे, विस्मरण, विसर.
**मुट्ठस्सति**–(क्रि.) विसरणे.
**मुट्ठि**–(पु., स्त्री.) मूठ.
**मुट्ठिक**–(पु.) पैलवान.
**मुट्ठि-मल्ल**–(पु.) मुष्ठी योद्धा.
**मुट्ठि-युद्ध**–(नपु.) मुष्ठी युद्ध.
**मुण्ड**–(वि.) केस नसलेला, मुंडन केलेला.
**मुण्डक**–(पु.) डोकीचे केस काढलेला, डोके मुंडन केलेला.
**मुण्डच्छद**–(पु.) रुंद छत असलेले घर, मोठी गच्ची असलेली इमारत.
**मुण्डत्त, मुण्डिय**–(नपु.) मुंडन अवस्था.
**मुण्डेति**–(क्रि.) मुंडन करणे, डोकीचे केस काढणे, डोकीची हजामत करणे.
**मुण्डेसि**–(पू. क्रि.) मुंडन केले.
**मुण्डित**–(कृ.) मुंडन करता.
**मुण्डेत्वा**–(पू. क्रि.) मुंडन करून.
**मुणिक जातक**–धन्याच्या मुलीच्या लग्नात पाहुण्याना खाण्यासाठी बैला ऐवजी एका डुकरास चांगला पुष्ट करून कापल्याची कथा–(३०).
**मुत**–(नपु.) नाक, जीभ व स्पर्शेंद्रिय याद्वारे मिळणारे ज्ञान किंवा अनुभव.
**मुतिङ्ग, मुदिङ्ग**–(पु.) मृदंग.
**मुतिमन्तु**–(वि.) बुद्धिमान, ज्ञानी.
**मुत्त**–(कृ.) मुक्त, स्वतंत्र, मोकळा.
**मुत्त**–(नपु.) मूत्र, लघवी.
**मुत्ताचार**–(वि.) मोकळेपणा, बंधन नसलेला आचार, स्वैराचार.
**मुत्तकरण**–(नपु.) लघवी करणे, मुतणे.
**मुत्तवत्थि**–(स्त्री.) अण्डकोश, अंड.
**मुत्ता**–(स्त्री.) मोती, मुक्ता.
**मुत्तावली**–(स्त्री.) मोत्यांची माळ.
**मुत्ताहार**–(पु.) मोत्यांचा हार.
**मुत्ताजाल**–(नपु.) मोत्यांचे जाळे.

**मुत्ति**–(स्त्री.) मुक्ती, स्वातंत्र्य.
**मुदा**–(स्त्री.) प्रसन्नता, आनंदीपणा.
**मुदित**–(वि.) प्रसन्न, आनंदित.
**मुदित-मन**–(वि.) प्रसन्न-चित्त, आनंदित मन.
**मुदिता**–(स्त्री.) आनंदीवृत्ति, प्रसन्नता.
**मुदु, मुदुक**–(वि.) कोमल, मऊ, नाजूक, मृदु.
**मुदु-चित्त**–(वि.) कोमल-मन, मृदु अंतःकरण, मृदुचित्त.
**मुदु-जातिक**–(वि.) कोमल अंतःकरणाचा, मृदु स्वभावाचा.
**मुदुता**–(स्त्री.) कोमलता, मऊपणा, मृदु स्वभाव.
**मुदुत्त**–(नपु.) मृदुत्त्व, कोमलता, नाजुकपणा.
**मुदुभूत**–(वि.) कोमल, मऊ नाजूक.
**मुदुलक्खण जातक**–मृदुलक्षण नावाचा एक तपस्वी राजाची सुंदर राणी पाहून तिच्यावर मोहित झाल्याची कथा–. (६६).
**मुद्दङ्कन**–(नपु.) मुद्रांकन, छपाई.
**मुद्दा**–(स्त्री.) मुद्रा, छाप, ठसा, संकेत, हस्त-मुद्रा.
**मुद्दापक**–(पु.) मुद्रक, छापणारा.
**मुद्दापन**–(नपु.) मुद्रण, छपाई.
**मुद्दायन्त**–(नपु.) मुद्रणालय, छापखाना, छपाई-यंत्र.
**मुद्दापेति**–(क्रिया) छापणे, मुद्रित करणे.
**मुद्दापेसि**–(पू. क्रि.) छापले, मुद्रित केले.
**मुद्दापित**–(कृ.) छापता, मुद्रित करता.
**मुद्दापेत्वा**–(पू. क्रि.) छापून, मुद्रित करून.
**मुद्दिका**–(स्त्री.) अंगठी, मुद्रिका, ठसा, द्राक्षासव, द्राक्षांची दारू.
**मुद्दिकासव**–(पु.) द्राक्षासव, द्राक्षांचा अर्क.
**मुद्ध**–(वि.) मूर्ख, चकित.
**मुद्धातुक**–(वि.) मूर्खस्वभाव.
**मुद्धता**–(स्त्री.) मूर्खता, मूर्खपणा.
**मुद्धा**–(पु.) शिर, शिखर, डोके, शीर्ष.
**मुद्धज**–(पु.) मूर्धामधून उत्पन्न, अक्षर, केस.
**मुद्धाधिपात**–(पु.) डोके न चालणे, विचार न सुचणे, बुद्धि भ्रष्ट होणे.
**मुद्धावसित्त**–(वि.) राजतिलक लावलेला राजा. अभिषिक्त राजा, अभिषेक झालेला राजा.
**मुधा**–(अ.) मोफत, फुकट.
**मुनाति**–(क्रि.) जाणणे.
**मुनि**–(पू. क्रि.) जाणले.
**मुत**–(कृ.) जाणता.
**मुनित्वा**–(पू. क्रि.) जाणून.
**मुनि**–(पु.) मुनि, मनन करणारा साधू.
**मुनिन्द**–(पु.) सर्व मुनीत श्रेष्ठ, (बुद्ध).
**मुय्हति**–(क्रि.) विसरणे, बुद्धीमंद होणे.
**मुय्हि**–(पू. क्रि.) विसरले, बुद्धीमंद झाली.
**मुळ्ह**–(कृ.) विसरता, बुद्धीमंद होता.
**मुय्हमान**–(कृ.) विसरण्यासारखे, बुद्धीमंद होण्यासारखे.
**मुय्हित्वा**–(पू. क्रि.) विसरून, बुद्धी मंद होऊन.
**मुय्हन**–(नपु.) विसर, विस्मृति.
**मुरज**–(पु.) चंग, घुंगरू, झांझ.
**मुरमुरायति**–(क्रि.) कुर-कुर आवाज करत कापणे, मुर-मुर आवाज करत कापणे.
**मुसल**–(पु.) मुसळ.
**मुसली**–(वि.) मुसळवाला, मुसळाने सडणारा.
**मुसा**–(अ.) मृषा, खोटे.
**मुसावाद**–(पु.) मृषावाद, खोटे बोलणे.
**मुस्सति**–(क्रि.) विसरणे, अंतर्धान पावणे.
**मुस्सि**–(पू. क्रि.) विसरले, अंतर्धान पावला.
**मुट्ठ**–(कृ.) विसरता, अंतर्धान पावता.
**मुस्सित्वा**–(पू. क्रि.) विसरून, अंतर्धान पावून.
**मुहुत्त**–(पु., नपु.) मुहूर्त, शुभ-समय, शुभ वेळ.
**मुहुत्तेन**–(क्रि. वि.) क्षणात, अगदी थोडच्या वेळात.
**मुहुत्तिक**–(पु.) ज्योतिषी.
**मुहुत्तिक**–(वि.) क्षणभर राहणारा, थोडा वेळ थांबणारा.
**मुळाल**–(नपु.) मृणाल, कमल-नाल.
**मुळाल-पुप्फ**–(नपु.) कमळाचे फुल, फूलाचा देठ.
**मूग**–(वि.) मुका.
**मुग प्रक्ख, मुग प्रक्ख जातक**-(५३८) [पहा-ते मिय जातक]
**मूल**–(नपु.) मुळी, जड, मुळचे भांडवल, रोख. उत्पत्ती, निर्माण, ताळ, कारण, पाया, आरंभ.
**मूल-कन्द**–(पु.) कंद-मूळ.
**मुल-बीज**–(नपु.) अंकूर निघालेले बी.
**मूल परियाय जातक**–काळ सर्वांना खातो, काळाच्या ओघात सर्वनष्ट होतात. तो स्वत.ला खाऊन टाकतो. सर्वांना खाऊन टाकणाऱ्या काळाला कोण खाऊ शकेल ? या प्रश्नाची चर्चा करणारी कथा–(२४५).
**मूलक**–(वि.) कारणीभूत, कारण असलेला.
**मूलिक**–(वि.) मौलिक, महत्त्वपूर्ण.
**मूल्य**–(नपु.) किंमत, मजुरी, मूल्य.
**मूसा**–(स्त्री.) धातू वितळविण्याची मूस.
**मूसिक**–(पु.) उंदीर, मूशक.

मूसिका–(स्त्री.) उंदरीण.
मूसिक-छिन्न–(वि.) उंदरांनी कुरतडलेला.
मूसिक-वच्च–(नपु.) उंदराची लेंडी.
मूसिक जातक–मुलाने बापाची हत्या करण्याचा प्रयत्न केल्याची कथा–(३७७).
मूळ्ह–(कृ.) मूढ, मुर्ख.
मे–(स. ना.) मला, माझा.
मेखला–(स्त्री.) करगोटा, कमरेवरचा दागिना.
मेघ–(पु.) ढग, पाऊस, वर्षा.
मेघनाद–(पु.) ढगांचा गर्जना, ढगांचा गडगडाट, गर्जना.
मेघ-पासाण–(पु.) गारा.
मेघ-वण्ण–(वि.) ढगाच्या रंगाचा, काळा, काळसर.
मेचक–(वि.) काळा, किंवा गर्दनिळा रंग.
मेज्झ–(वि.) पवित्र.
मेण्ड, मेण्डक–(पु.) मेंढा.
मेण्डक–(पु. वि.) विशाखा-मिगारमाताचे पितामह, आजोबा.
मेत्त-चित्त–(नपु.) मित्रत्त्व.
मेत्ता–(स्त्री.) मित्रता, मैत्री, उदारता.
मेत्ता-कम्मट्ठान–(नपु.) मैत्री कर्मस्थान.
मेत्ता-भावना–(स्त्री.) मित्रत्वाचा अनुभव घेणे, सराव करणे, मैत्री भावना.
मेत्तायना–(स्त्री.) मित्रत्व, मैत्री, दोस्ती.
मेत्ताविहारी–(वि.) मित्रत्वात, मित्रांबरोबर वावरणारा.
मेत्तायति–(क्रि.) मैत्री करणे.
मेत्तायि–(पू. क्रि.) मैत्री केली.
मेत्तायन्त–(कृ.) मैत्री करता.
मेत्तायित्वा–(पू. क्रि.) मैत्री करून.
मेत्तेय्य-नाथ–(पु.) मैत्र्येय, भावीबुद्ध.
मेथुन–(नपु.) मैथुन, संभोग.
मेथुन-धम्म–(पु.) मैथुनक्रिया, संभोग कर्म.
मेद–(पु.) चरबी, आळस, मांदे.
मेदक-तालिका–(स्त्री.) चरबी तळण्याची कढई भांडे.
मेद-वण्ण–(वि.) चरबीच्या रंगाचा.
मेदिनी–(स्त्री.) पृथ्वी, भूमी, भूमाता.
मेध–(पु.) यज्ञ.
मेधग–(पु.) झगडा, भांडण.
मेधा–(स्त्री.) प्रज्ञा, बुद्धी.
मेधावी–(वि.) प्रज्ञावान, प्रज्ञावंत, बुद्धिमान.
मेरय–(नपु.) दारू, मदिरा.
मेरू–(पु.) सर्वाधिक उंच पर्वताचे नाव.
मेलक–(नपु.) मेळ, मेळावा, लोकांची परिषद.
मेलन–(नपु.) मिळणे, मिसळणे, मीलन.
मेस–(पु.) मेष, मेंढा.
मेह–(पु.) मुत्र-रोग.
मेहन–(नपु.) पुरुष इंद्रिय, अथवा स्त्री. इंद्रिय, शिस्न योनी.
मोक्ख–(पु.) मोक्ष, मुक्ती.
मोक्खक–(वि.) मोक्षदाता, मुक्तिदाता.
मोक्ख-मग्ग–(पु.) मोक्षाचा मार्ग, मुक्तिमार्ग.
मोक्खति–(क्रि.) मुक्त होणे, मोक्ष मिळणे.
मोग्गलायन–(पु. वि.) भगवान बुद्धांच्या दोन प्रमुख शिष्यांपैकी एक.
मोग्गलिपुत्त तिस्स थेर–(पु. विशे. ना.) तिसऱ्या धम्म परिषदेचे (संगीतीचे) अध्यक्ष, सम्राट अशोकाचा गुरु.
मोघ–(वि.) व्यर्थ.
मोघ-पुरिस–(पु.) बेकार मनुष्य, मूर्ख माणूस.
मोच–(पु.) केळ.
मोचन–(नपु.) मोकळे करणे, मुक्त करणे, सुटका करणे.
मोचापन–(नपु.) मोकळेपणा, मुक्तता, सुटका.
मोचापेति–(क्रि.) मुक्त करणे, मोकळे करणे, सुटका करविणे.
मोचेसि–(पू. क्रि.) मुक्त केले, मोकळे केले, सुटका केली.
मोचित, मोचेन्त, मोचेन्तु–(कृ.) मुक्त करता, मोकळे करता, सोडता.
मोचिय–(कृ.) मुक्त करण्यायोग्य, मोकळे करण्यायोग्य.
मोचेत्वा–(पू. क्रि.) मुक्त करून, मोकळे करून, सुटका करून.
मोदक–(पु.) लाडू.
मोदति–(क्रि.) आनंदित होणे.
मोदि–(पू. क्रि.) आनंदित झाला.
मोदित–(कृ.) आनंदता, आनंदित होता.
मोदमान–(कृ.) आनंदण्यायोग्य, आनंदित होण्यायोग्य.
मोदित्वा–(पू. क्रि.) आनंदून, आनंदित होऊन.
मोदन–(नपु.) आनंदणे, आनंदित होणे.
मोदना–(स्त्री.) प्रमुदित होणे, [पहा–मोदन].
मोन–(नपु.) बुद्धी, मौन.
मोनेय्य–(नपु.) नैतिक परिपूर्णता.

**मोमुह**–(वि.) जडबुद्धी, मूर्ख, अडाणी.
**मोर**–(पु.) मोर पक्षी, मयुर.
**मोर-पिञ्ज**–(नपु.) मोराची शेपटी, मोर पिसारा.
**मोर जातक**–सूर्य आणि बुद्ध यांची प्रशंसा करणारे स्तोत्र गाणारा मोर हरतऱ्हेने सुरक्षित राहिल्याची कथा–. (१५९).
**मोस**–(पु.) चोरी.
**मोसन**–(नपु.) चोरी, चौर्य.
**मोसवज्ज**–(नपु.) असत्य, खोटे बोलणे.
**मोह**–(पु.) मोह, इच्छा, अभिलाषा, आशा, मूर्खपणा.
**मोहक्खय**–(पु.) मोहाचा-तृष्णेचा नाश, अविद्येचा नाश.
**मोह-चरित**–(वि.) मूढ चरित्र.
**मोहतम**–(पु.) मोहरूपी अंधःकार.
**मोहनिय**–(वि.) भुलविणारा, मूर्ख बनविणारे, मोहित करणारे, लुब्ध करणारे.
**मोहन**–(नपु.) मोहने, मोहित करणे, मूर्ख बनविणे.
**मोहक**–(वि.) मोहित करणारे, मोहून होणारे, आकर्षून घेणारे.
**मोहेति**–(क्रि.) मोह उत्पन्न करणे, धोका देणे, भुलविणे.
**मोहेसि**–(पू. क्रि.) मोह उत्पन्न केला, धोका दिला. भुलविले.
**मोहित**–(कृ.) मोह उत्पन्न करता, धोका देता, भुलविता.
**मोहेत्वा**–(पू. क्रि.) मोह उत्पन्न करून, धोका देऊन, भुलवून.
**मोलि**–(पु., स्त्री.) मौलिक, डोक्यातील सर्वश्रेष्ठ भाग, मेंदू-बुद्धी, डोक्याचा उत्तम भाग.

## य

**य**–नागरी लिपितील वर्णमालेचे अडतिसावे वर्णाक्षर.
**य**–(स. ना.) जो, जो कोण, जो काय, जो कांही.
**यकन**–(नपु.) यकृत.
**यक्ख**–(पु.) यक्ष.
**यक्ख-गण**–(पु.) यक्ष गण.
**यक्ख-गाह**–(पु.) यक्षाधिकृत.
**यक्खत्त**–(नपु.) यक्षत्व.
**यक्ख-भूत**–(वि.) यक्षापोटी जन्माला, यक्ष म्हणून जन्मला.
**यक्ख-समागम**–(पु.) यक्षांचे सम्मेलन, यक्षांची सभा-परिषद.
**यक्खाधिप**–(पु.) यक्षराज, यक्षांचा राजा.
**यक्खिनी, यक्खि**–(स्त्री.) यक्षिणी.
**यग्घे**–(वि.) आदरसूचक संबोधन.
**यजति**–(क्रि.) यज्ञ करणे, दान करणे.
**यजि**–(पू. क्रि.) यज्ञ केला, दान केले.
**यिट्ठ, यजित**–(कृ.) यज्ञ करता, दान करता.
**यजमान**–(कृ.) यज्ञ करण्यायोग्य, दान करण्या–योग्य, यजमान.
**यजित्वा**–(पू. क्रि.) यज्ञ करून, दान करून.
**यजन**–(नपु.) यज्ञ करणे, दान देणे.
**यजु**–(नपु.) यजुर्वेद.
**यञ्ञ**–(पु.) यज्ञ.
**यञ्ञ-सामी**–(पु.) यज्ञ-स्वामी, यज्ञाचा मालक.
**यञ्ञा-वाट**–(पु.) यज्ञाची वेदी, (अग्नीकुंड).
**यञ्ञ-उपनीत**–(वि.) यज्ञात द्यावयाचा बळी.
**यट्ठि**–(पु., स्त्री.) यष्ठी, काठी, लाठी.
**यट्ठि-कोटि**–(स्त्री.) काठीचा शेंडा, काठीचें टोक.
**यट्ठि-मधुका**–(स्त्री.) जेष्ठमध.
**यत**–(कृ.) थांबविला, मर्यादित केला.
**यतति**–(क्रि.) प्रयत्न करणे.
**यतन**–(नपु.) प्रयत्न.
**यति**–(पु.) भिक्षु, साधु, ब्रह्मचारी.
**यतो**–(अ.) जेथून, जेव्हा पासून.
**यतक**–(वि.) जितका.
**यत्थ, यत्र**–(क्रि. वि.) जेथे कोठे.
**यथत्त**–(नपु.) यथार्थास्तव, वास्तवासाठी, खऱ्यासाठी, यथार्थ.
**यथरिय**–(अ.) जसा, जसे जशी.
**यथा**–(क्रि. वि.) जसा, जसे.
**यथा कम्मं**–(क्रि. वि.) कर्माप्रमाणे, कर्मासारखे.
**यथा कामं**–(क्रि. वि.) यथेच्छ, भरपूर, इच्छे इतके. इच्छे प्रमाणे.
**यथा कारी**–(वि.) मर्जीनुसार करणारा.
**यथा काल**–(क्रि. वि.) योग्य वेळी, योग्य काळी, योग्य समयी.
**यथाक्कमं**–(क्रि. वि.) क्रमानुसार, ओळीने, अनुक्रमे
**यथाठित**–(वि.) यथास्थित, बरोबर, योग्य.
**यथातथ**–(वि.) यथातथ्य, सत्य, खरे.
**यथातथं**–(क्रि. वि.) यथा सत्य.
**यथा धम्मं**–(क्रि. वि.) धर्मानुसार, धर्माप्रमाणे, नियमानुसार.

**यथाधोत**–(वि.) जसे धुतले.
**यथानुसिट्ठं**–(क्रि. वि.) उपदेशानुसार, शिकवणीप्रमाणे.
**यथानुभावं**–(क्रि. वि.) योग्यतेनुसार, योग्यतेप्रमाणे.
**यथापसादं**–(क्रि. वि.) प्रसन्नतेनुसार.
**यथापूरित**–(वि.) पूर्ण भरलेले, ओतप्रोत, भरल्या-प्रमाणे.
**यथाफासुक**–(वि.) सुविधाजनक, सुसज्ज, सुविधायुक्त, सर्वसोयींनीयुक्त.
**यथाबलं**–(क्रि. वि.) शक्तिनुसार, बळानुसरा.
**यथा भतं**–(क्रि. वि.) जसा आणला.
**यथा भिरतं**–(क्रि. वि.) जोपर्यंत इच्छा आहे, अपेक्षित.
**यथा भूत**–(वि.) यथार्थ, खरोखर.
**यथा भूत**–(क्रि. वि.) यथार्थपणे, खरेपणाने.
**यथारहं**–(क्रि. वि.) योग्यतेनुसार, लायकीप्रमाणे.
**यथारुचि**–(क्रि. वि.) आवडीप्रमाणे, रुचीनुसार.
**यथावतो**–(क्रि. वि.) यथावत, खरोखर.
**यथाविधी**–(क्रि. वि.) विधीप्रमाणे, विधीनुसार.
**यथा विहितं**–(क्रि. वि.) व्यवस्थेनुसार, व्यवस्थेप्रमाणे.
**यथावुड्ढं**–(क्रि. वि.) जेष्ठतेनुसार.
**यथावुत्तं**–(क्रि. वि.) यथोक्त, सांगितल्याप्रमाणे, बोलल्याप्रमाणे.
**यथासक**–(क्रि. वि.) यथाशक्ती, शक्तिनुसार, मिळकतीनुसार.
**यथासति**–(क्रि. वि.) यथाशक्ती, शक्तिनुसार.
**यथासद्धं**–(क्रि. वि.) श्रद्धेनुसार, श्रद्धेप्रमाणे.
**यथासुखं**–(क्रि. वि.) सुखपूर्वक.
**यथिच्छितं**–(क्रि. वि.) इच्छेप्रमाणे.
**यदा**–(क्रि. वि.) जेव्हा.
**यदि**–(अ.) जर, अगर.
**यदिच्छा**–(स्त्री.) इच्छा, प्रवृत्ती.
**यन्त**–(नपु.) यंत्र, मशीन.
**यन्त-नाळि**–(स्त्री.) नळी.
**यन्त-मुत्त**–(वि.) यंत्राद्वारे फेकलेला.
**यन्तिक**–(पु.) यांत्रिक, यंत्र तयार करणारा.
**यम**–(पु.) यमराज, मृत्युदेव, यम.
**यम-दूत**–(पु.) यमाचा दूत-सेवक, बातमीदार, यमदूत.
**यम-पुरिस**–(पु.) नरकात शिक्षा देणारा.
**यम-लोक**–(पु.) प्रेत लोक, यम लोक.
**यमक**–(वि.) जुळणी, पुनःपुन्हा, यमक.
**यमक**–(नपु.) जोड, जोडी, यमक.
**यमक**–(पु.) अभिधम्म पिटकाचा सहावा भाग, सहावा ग्रंथ.
**यमक-साल**–(पु.) शाल वृक्षांची जोडी.
**यमुना**–(स्त्री. विशे. ना.) जम्बुद्वीपातील (भारत) पांच प्रमुख नद्यांपैकी एक नदी, यमुना.
**यव**–(पु.) सातू.
**यव-सूक**–(पु.) सातूची भाकरी.
**यवस**–(पु.) गवताची एक जात.
**यस**–(पु., नपु.) यश, प्रसिद्धी.
**यस-दायक**–(वि.) ऐश्वर्यदाता, यश देणारा, यशदायक.
**यस-महत्त**–(नपु.) ऐश्वर्य किंवा प्रसिद्धीची विशालता.
**यस-लाभ**–(पु.) यशाचा किंवा प्रसिद्धीचा लाभ, यश-लाभ.
**यस थेर**–(पु.) वाराणसीच्या श्रीमंताचा पुत्र यश, याने आपल्या संतप्त हृदयाला बुद्धाच्या अमृत वाणीने शांत करुन घेतले आणि भिक्खु बनला.
**यसोधर**–(वि.) यशोधर, प्रसिद्ध.
**यसोलद्ध**–(वि.) यशाने प्राप्त.
**यहिं**–(क्रि. वि.) येथे.
**यं**–(नपु.) जो, जो कोण, जी कोणती (वस्तु).
**या**–(स्त्री.) जी कोणी, जी कोणती (स्त्री.).
**याग**–(पु.) यज्ञ.
**यागु**–(स्त्री.) यवागु, सातूची खीर, सातूच्या पिठाचा पदार्थ.
**याचक**–(पु.) मागणारा, याचक.
**याचति**–(क्रि.) मागणे, याचना करणे.
**याचि**–(पू. क्रि.) मागितले, याचना केली.
**याचित, याचन्त, याचिन्तु**–(कृ.) मागता, याचना करता.
**याचमान**–(कृ.) मागण्यायोग्य, याचना करणारा.
**याचित्वा**–(पू. क्रि.) मागून, याचना करून.
**याचन**–(नपु.) याचना मागणे.
**याचयोग**–(वि.) दानशील.
**याचित**–(कृ.) मागितलेले, याचना केलेले.
**याचितक**–(वि.) मागितलेली, याचना केलेली.
**याचितक**–(नपु.) मागितलेली वस्तु-पदार्थ.
**याजक**–(पु.) यज्ञ करणारा.
**यात**–(कृ.) गेला.
**याति**–(क्रि.) जाणे.
**यात्रा**–(स्त्री.) प्रवास, जाणे, गमन, फिरणे, यात्रा.
**याथाव**–(वि.) बरोबर.

**यादिस**–(वि.) ज्याच्या सारखा, ज्या समान.
**यान**–(नपु.) गाडी, रथ, वाहन.
**यानक**–(नपु.) लहान वाहन.
**यानगत**–(वि.) गाडीत बसलेला, वाहनात बसलेला.
**यान-भूमि**–(स्त्री.) गाडी जाऊ शकणारी भूमी-रस्ता-सडक.
**यानी**–(पु.) गाडीवान, वाहन चालक.
**यानीकत**–(वि.) अभ्यस्त, सराव करणारा.
**यापन**–(नपु.) उदरनिर्वाह, आहार.
**यापनीय**–(वि.) जीवनधार, चरितार्थाचे साधन.
**यापेति**–(क्रि.) पोट भरणे, चरितार्थ चालविणे.
**यापेसि**–(पू. क्रि.) पोट भरले, चरितार्थ चालविला.
**यापित, यापेन्त**–(कृ.) पोट भरता, चरितार्थ चालविता.
**यापेत्वा**–(पू. क्रि.) पोट भरून, चरितार्थ चालवून.
**याम**–(पु.) रात्रीचा प्रहर.
**याम-कालिक**–(वि.) भिक्खूनी दुपारी मध्यान काळी किंवा रात्रीच्या वेळी खाण्याची वस्तू किंवा पदार्थ.
**यायी**–(वि.) जाता, जात असता.
**याव**–(अ.) पर्यंत.
[**याव-ततियं**–(नपु) तिसऱ्यांदा, तीन वेळपर्यंत].
**याव-कालिक**–(वि.) अस्थायी, अयोग्य ठिकाणी.
**याव-जीव**–(वि.) आयुष्यभर, जीव असेपर्यंत.
**याव-जीवं**–(वि.) जीवनभर, आयुष्यभर.
**याव-जीविक**–(वि.) आयुष्यभर तयार असणारा.
**यावतक**–(वि.) जितका.
**यावदत्थं**–(क्रि. वि.) गरजेपुरता, जरुरीप्रमाणे, आवश्यकतानुसार.
**यावता**–(अ.) जो पर्यंत.
**यावतायुकं**–(क्रि. वि.) जिवंत असे पर्यंत, जीवनभर, आयुष्यभर.
**यावतावतिहं**–(क्रि. वि.) जितके दिवस पर्यंत.
**यिट्ठ**–(कृ.) आहुती दिली.
**युग**–(नपु.) जोडी, जुगार, युग, जमाना, काळ.
**युगन्त**–(पु.) युगाचा शेवट.
**युगग्गाह**–(पु.) ईर्षा, अभिमान, ताबा.
**युगच्छिद्द**–(नपु.) जुगाराचा फासा.
**यगनद्ध**–(वि.) जुगारात अडकलेला, जुगार खेळणारा.
**युगमत्त**–(वि.) युगापर्यंत जुगाराच्या मुदतीपर्यंत लांब.
**युगन्धर**–(पु.) हिमालयातील एक पर्वत.
**युगल, युगलक**–(नपु.) जोडी, उभयता.

**युज्झति**–(क्रि.) लढणे, युद्ध करणे.
**युज्झि**–(पू. क्रि.) लढले, युद्ध केले.
**युज्झित, युज्झितुं, युज्झन्त**–(कृ.) लढता, युद्ध करता.
**युज्झमान, युज्झिय**–(कृ.) लढण्यायोग्य, युद्ध करण्यायोग्य.
**युज्झित्वा**–(पू. क्रि.) लढून, युद्ध करून.
**युज्झन**–(नपु.) लढणे, युद्ध करणे, युद्ध, लढाई.
**युञ्जति**–(क्रि.,) सामील होणे, प्रयत्न करणे.
**युञ्जि**–(पू. क्रि.) सामील झाला, प्रयत्न केला.
**युत्त, युञ्जन्त**–(कृ.) सामील होता, प्रयत्न करता.
**युञ्जमान, युञ्जितब्ब**–(कृ.) सामील होण्यायोग्य, प्रयत्न करण्यायोग्य.
**युञ्जित्वा**–(पू. क्रि.) सामील होऊन, प्रयत्न करून.
**युञ्जन,**–(नपु.) जोडणे, सामील होणे, प्रयत्न करणे.
**युत्ति**–(स्त्री.) न्याय, निवाडा, निकाल.
**युद्ध**–(नपु.) संग्राम, लढाई, समर, युद्ध.
**युद्ध-भूमि**–(स्त्री.) समर भूमी, समरांगण, संग्राम भूमी.
**युद्ध-मण्डल**–(नपु.) युद्ध-क्षेत्र, समर-भूमी. युद्धभूमी.
**युव**–(पु.) तरुण, युवक.
**युवती**–(स्त्री.) तरुणी, युवती.
**युवञ्जय जातक**–चमकणारे दवबिंदू सुकल्याचे पाहून एका राजकुमाराने या जगाची अनित्यता नश्वरता जाणल्याची कथा-. (४६०).
**यूथ**–(पु.) समूह, पशूंची झुंड.
**यूथ-जेट्ठ**–(पु.) जनावरांच्या झुंडीचा म्होरक्या-नेता.
**यूप**–(पु.) यज्ञ स्तंभ.
**यूस**–(पु.) (मांसाचे) सूप, अर्क.
**येन**–(क्रि. वि.) ज्या कारणामुळे.
**येभुय्य**–(वि.) अनेक, पुष्कळ, बहूत.
**येव**–(अ.) ही, सुद्धा (संस्कृतात–हि)
**यो**–(स. ना.) जो, जो कोणी (पुरुष)
**योग**–(पु.) संबंध.
**योगक्खेम**–(पु.) आसक्तीपासून मुक्त, योगक्षेम.
**योग-युत्त**–(वि.) आसक्त.
**योगावचर**–(पु.) योगी, योगसाधना करणारा.
**योगातिग**–(वि.) पूर्वजन्माच्या बंधनातून मुक्त.
**योग्ग**–(वि.) योग्य.
**योग्ग**–(नपु.) गाडी, रथ, वाहन.
**योजक**–(पु.) सामील होणारा.
**योजन**–(नपु.) निवड होणे, निवडणे, अंतराचे माप, योजन–एक योजन = दोन मैल.

**योजना**–(स्त्री.) निर्माण, योजना.
**योजनिक**–(पु., वि.) योजना करणारा, योजना बनविणारा, संयोजक.
**योजित**–(कृ.) मिळलेला, मिसळलेला, जोडलेला.
**योजेति**–(क्रि.) जोडणे.
**योजेसि**–(पू. क्रि.) जोडले.
**योजेन्त**–(कृ.) जोडता.
**योजिय**–(कृ.) जोडण्यायोग्य.
**योजेत्वा**–(पू. क्रि.) जोडून.
**योत्त**–(नपु.) धागा, दोरा, दोरी.
**योध**–(पु.) योद्धा, लढवय्या.
**योधाजीव**–(पु.) सैनिक.
**योधेति**–(क्रि.) लढणे, युद्ध करणे.
**योधेसि**–(पू. क्रि.) लढला, युद्ध केले.
**योधित**–(कृ.) लढता, युद्ध करता.
**योधेत्वा**–(पू. क्रि.) लढून, युद्ध करून.
**योनक, धम्मरक्खित थेर**–(पुं. वि.) तिसऱ्या धम्म परिखदेनंतर (संगीती) मोग्गलीपुत्त तिस्स थेर यांच्या निर्देशनानुसार अपरन्त जनपदाकडे धम्म प्रचारासाठी पाठविलेले एक स्थविर.
**योना, युवाना, योनका**–(पु.) यवन, ग्रीस, (यूनान) निवासी.
**योनि**–(स्त्री.) मूळ, स्त्रीलिंग, स्त्री. योनी.
**योनिसो**–(क्रि. वि.) योग्य प्रकारे, बुद्धीस्सर, बुद्धीपूर्वक.
**योनिसो मनसिकार**–(पु.) योग्य विचार, योग्य मत. यथार्थ विचार.
**योब्बन, योबञ्ञ**–(नपु.) यौवन, तारुण्य.
**योब्बन-मद**–(पु.) यौवन-मद.

## र

**र**–नागरी लिपीतील वर्णमालेचे एकोणचाळीसावे वर्णाक्षर.
**रक्खक**–(पु.) रक्षक, राखणदार, पहारेकरी.
**रक्खति**–(क्रि.) रक्षण करणे.
**रक्खि**–(पू. क्रि.) रक्षण केले.
**रक्खित, रक्खन्त**–(कृ.) रक्षण करता.
**रक्खितब्ब**–(कृ.) रक्षण करण्यायोग्य, संरक्षणीय.
**रक्खित्वा**–(पू. क्रि.) रक्षणकरून.
**रक्खन**–(नपु.) रक्षण.
**रक्खनक**–(वि.) रक्षणकरता.
**रक्खस**–(पु.) राक्षस, दानव.
**रक्खा**–(स्त्री.) आरक्षा, धागा, रक्षा.
**रक्खित**–(कृ.) संरक्षित, सुरक्षित, रक्षित.
**रक्खित थेर**–(पु.) तिसऱ्या धम्म परिखदे (संगीती) नंतर पहाडी-अरण्यवासी प्रदेशांत पाठविलेले स्थविर.
**रक्खिय**–(वि.) रक्षिण्यायोग्य.
**रगा**–(स्त्री. वि.) माराच्या तीन कन्यांपैकी एक हिने बुद्धाला प्रलोभित करण्याचा प्रयत्न केला परंतु तिला यश प्राप्त झाले नाही.
**रङ्कु**–(पु.) हरिणाची एक जात.
**रङ्ग**–(पु.) रंग.
**रङ्गकार**–(पु.) रंगणारा, नाटकातील पात्र.
**रङ्गजात**–(नपु.) नाना प्रकारचे रंग, अनेक रंग.
**रङ्गरत्त**–(वि.) रंगाने रंगलेला.
**रङ्गजीव**–(पु.) चित्रकार, रंगारी, रंगविणारा.
**रचयति**–(क्रि.) रचणे, तयार करणे, व्यवस्था करणे.
**रचयि**–(पू. क्रि.) रचले, तयार केले. व्यवस्था केली.
**रचित**–(कृ.) रचता, तयार करता, व्यवस्था करता.
**रचित्वा**–(पू. क्रि.) रचून, तयार करून, व्यवस्था करून.
**रचना**–(स्त्री.) व्यवस्था, मांडणी, रचना.
**रच्छा, रथिया, रथिका**–(स्त्री.) गल्ली, बाजारपेठ, बाजार.
**रज**–(पु., नपु.) धूळ, धुलीकण.
**रजक्ख**–(वि.) धूळमिश्रित, मलीनचित्त.
**रजक्खन्ध**–(पु.) धुळीचा ढीग.
**रजक**–(पु.) परीट, धोबी, कपडे धुणारा.
**रजत**–(नपु.) चांदी.
**रजति**–(क्रि.) रंगणे, रंगविणे.
**रजि**–(पू. क्रि.) रंगला, रंगविला.
**रजन्त**–(कृ.) रंगता, रंगविता.
**रजितब्ब**–(कृ.) रंगण्यायोग्य, रंगविण्यायोग्य.
**रजित्वा**–(पू. क्रि.) रंगून, रंगवून.
**रजन**–(नपु.) रंगणे.
**रजन-कम्म**–(नपु.) रंगाचे काम, रंग काम.
**रजनी**–(स्त्री.) रात्र, काळोख.
**रजनीय**–(वि.) आकर्षक, मोहक.
**रजस्सला**–(स्त्री.) मासिक पाळी आलेली स्त्री, रजस्वाला.
**रजोजल्ल**–(नपु.) चिखल.
**रजोहरण**–(नपु.) धूळ झाडणे, धूळ पुसून काढणे.
**रज्ज**–(नपु.) राज्य.
**रज्ज-सिरि**–(स्त्री.) राज्य-श्री, राज्यलक्ष्मी, राजवैभव.

**रज्ज-सीमा**–(स्त्री.) राज्य-सीमा, राज्याची सरहद्द.
**रज्जति**–(क्रि.) आनंदित होणे, प्रसन्न होणे.
**रज्जि**–(पू. क्रि.) आनंदित झाला, प्रसन्न झाला.
**रत्त, रज्जन्त**–(कृ.) आनंदता, प्रसन्न होता.
**रज्जित्त्वा**–(पू. क्रि.) आनंदून, प्रसन्न होऊन.
**रज्जन**–(नपु.) अनुरंजन, आनंद, प्रसन्नता.
**रज्जु**–(स्त्री.) दोरी, धागा, दोरा.
**रज्जुगाहक**–(पु.) जमीन मोजणारा.
**रञ्जति**–(क्रि.) आनंदित होणे.
**रञ्जि**–(पू. क्रि.) आनंदित झाला.
**रत्त, रञ्जित, रञ्जन्त**–(कृ.) आनंदित होता.
**रञ्जमान**–(कृ.) आनंदित होण्यायोग्य.
**रञ्जित्वा**–(पू. क्रि.) आनंदित होऊन.
**रञ्जेति**–(क्रि.) आनंद देणे, रंगणे.
**रञ्जेसि**–(पू. क्रि.) आनंद दिला, रंग दिला.
**रञ्जित, रञ्जेन्त**–(कृ.) आनंद देता, रंग देता.
**रञ्जेत्वा**–(पू. क्रि.) आनंद देऊन, रंग देवून.
**रट्ठ**–(नपु.) राष्ट्र.
**रट्ठ-पिण्ड**–(पु.) राष्ट्र-पिण्ड, लोक-भोजन, लोकांना दिलेले भोजन, राष्ट्राचे अन्न.
**रट्ठवासी, रट्ठवासिक**–(पु.) राष्ट्रवासी, राष्ट्राचा अधिवासी.
**रट्ठिक**–(वि.) राष्ट्रिक, राष्ट्राचे वैशिष्ठ्य, सरकारी अधिकारी.
**रण**–(नपु.) युद्ध, लढाई.
**रणञ्जह**–(वि.) रागमुक्त, राग-क्रोध-रहित.
**रत, अनुरक्त**–(कृ.) आनंद घेणारा.
**रतन**–(नपु.) रत्न, लांबी मोजण्याचे माप.
**रतनत्तय**–(नपु.) तीन रत्ने, बुद्ध, धम्म, संघ.
**रतनवर**–(नपु.) श्रेष्ठ रत्न.
**रतनाकर**–(पु.) समुद्र, रत्नाकर.
**रतनिक**–(वि.) लांब रुंद रत्ने, अनेक प्रकारची रत्ने असणारा, जवाहिरी.
**रति**–(स्त्री.) प्रेम, आसक्ती, ओढ, माया.
**रति-क्रीडा**–(स्त्री.) संभोग, मैथुन-क्रीडा.
**रती**–(स्त्री. वि.) माराच्या तीन कन्यांपैकी एक.
**रत्त**–(वि.) लाल, तांबडे.
**रत्त**–(नपु.) रक्त.
**रत्तक्ख**–(वि.) लाल डोळ्याचा, ज्याचे डोळे लाल आहेत.
**रत्त-चन्दन**–(नपु.) लाल चंदन, रक्त चंदन.
**रत्त-फला**–(स्त्री.) लाल फळांची वेली.
**रत्त-पदुम**–(नपु.) लाल पद्म, लाल कमळ.
**रत्त-मणि**–(पु.) लाल हिरा, लाल मणी.
**रत्त-अतिसार**–(पु.) रक्त अतिसार.
**रत्तञ्ञू**–(वि.) दीर्घकालीन.
**रत्तन्धकार**–(पु.) रात्रीचा अंधार, रात्रीचा काळोख.
**रत्तपा**–(स्त्री.) जळू.
**रत्ति**–(स्त्री) रात्र.
**रत्तिक्खय**–(पु.) रात्रीचा क्षय, रात्र संपणे.
**रत्तिक्खित्त**–(वि.) रात्री फेंकलेला, रात्री टाकलेला.
**रत्ति-भाग**–(पु.) रात्रीचा समय, रात्रीचा काळ, रात्रीची वेळ.
**रत्ति-भोजन**–(नपु.) रात्रीचे भोजन.
**रत्तूपरत**–(वि.) रात्री न जेवणारा.
**रथ**–(पु.) गाडी, वाहन, रथ.
**रथकार**–(पु.) रथ बनविणारा, गाडी बनविणारा, सुतार.
**रथङ्ग**–(नपु.) रथाचे भाग.
**रथ-गुत्ति**–(स्त्री.) रथाचे रक्षण.
**रथ-चक्क**–(नपु.) रथचक्र, रथाचे चाक, रथचक्र.
**रथ-पञ्जर**–(पु.) रथाचा सांगाडा.
**रथ-युग**–(नपु.) रथाचा लाकडी छत.
**रथ-रेणु**–(पु.) रथाची धूळ.
**रथ-चरिय**–(पु.) रथ हांकणारा, रथ चालविणारा, सारथी.
**रथानीक**–(नपु.) युद्ध रथांचा तांडा.
**रथारोह**–(पु.) रथावर आरूढ झालेला योद्धा, रथावर बसलेला.
**रथलट्ठिक जातक**–पुरोहिताच्या बाणाने त्याच्या स्वतःच्या डोक्यास मार लागल्याची कथा–(३३२).
**रथिक**–(पु.) रथात बसून लढणारा.
**रथिका**–[पहा-रच्छा].
**रद**–(पु.) हत्तीचा दात.
**रदन**–(नपु.) दात, दंत.
**रन्ध**–(नपु.) रन्ध्र, भोक, छिद्र.
**रन्ध-गवेसी**–(पु.) छिद्रान्वेषी, सूक्ष्मदोष शोधणारा.
**रन्धक**–(पु.) शिजवणारा, रांधणारा, सैपाकी, आचारी.
**रन्धन**–(नपु.) रांधणे, शिजविणे.
**रन्धेति**–(क्रि.) रांधणे, शिजविणे, उकडणे.
**रन्धेसि**–(पू. क्रि.) रांधले, शिजविले, उकडले.
**रन्धित**–(कृ.) रांधता, शिजविता, उकडता.
**रन्धित्त्वा**–(पू. क्रि.) रांधून, शिजवून, उकडून.

**रमन, रमण**–(नपु.) मजा करणे, रमणे, गुंग होणे.
**रमनी, रमणी**–(स्त्री.) स्त्री.
**रमनीय, रमणीय**–(वि.) आकर्षक, मोहक, रमणीय.
**रमति**–(क्रि.) आनंदित होणे, रमणे.
**रमि**–(पू. क्रि.) आनंदला, आनंदित झाला, रमला.
**रत, रमन्त, रमितुं**–(कृ.) आनंदित होता, रमता.
**रममान**–(कृ.) आनंदण्यायोग्य, आनंदित होण्यायोग्य, रमणारा.
**रमित्वा**–(पू. क्रि.) आनंदून, रमून.
**रम्भा**–(स्त्री.) केळीचे रोप.
**रम्म**–(वि.) रम्य, सुंदर.
**रम्मक**–(पु.) चैत्र महिन्याचे नाव.
**रय**–(पु.) वेग.
**रव**–(पु.) आवाज, ध्वनी,
**रवन**–(नपु.) ओरडणे.
**रवति**–(क्रि.) ओरडणे, आवाज काढणे.
**रवि**–(पू. क्रि.) ओरडणे, ओरडला.
**रवन्त, रवित, रुत**–(कृ.) ओरडता.
**रवमान**–(कृ.) ओरडण्यासारखा.
**रवित्वा**–(पू. क्रि.) ओरडून.
**रवि**–(पु.) सूर्य.
**रवि-हंस**–(पु.) सोनेरी राजहंस.
**रस**–(पु.) स्वाद, चव.
**रसक**–(पु.) आचारी, सैपाकी.
**रसग्ग**–(वि.) फार रुचकर, अति स्वादिष्ट.
**रसञ्जन**–(नपु.) डोळयात घालण्याचे अंजन, सुरमा.
**रस-तण्हा**–(स्त्री.) रस तृष्णा, रसाची तहान.
**रसना**–(स्त्री.) स्त्रियांचा घागरा-वस्त्र.
**रसवती**–(स्त्री.) सैपाकघर.
**रसवाहिनी**–(स्त्री., वि.) वैदेह नावाच्या एका भिक्खुने संग्रहित- संपादित- केलेला पालि कथासंग्रह.
**रसातल**–(नपु.) रसातळ, अगदीखाली.
**रसाल**–(पु.) ऊस.
**रसित**–(नपु.) मेघ-गर्जना, ढगांचा गडगडाट.
**रस्मि**–(स्त्री.) सूर्यकिरण, घोडयाचा लगाम.
**रस्स**–(वि.) ऱ्हस्व, आखुड, ठेंगणा.
**रस्सत्त**–(नपु.) ऱ्हस्वपणा, आखुडपणा, ठेंगुपणा.
**रह**–(नपु.) एकान्त ठिकाण.
**रहद**–(पु.) तलाव, तळे.
**रहस्स**–(नपु.) रहस्य, गुप्त गोष्ट.
**रहाभाव**–(पु.) रहस्याचा अभाव, उघड, स्पष्ट.
**रहित**–(वि.) शिवाय, खेरीज, विन.
**रहो**–(अ.) रहस्यपूर्ण.
**रहोगत**–(वि.) एकान्त ठिकाणी राहणे.
**रंसि**–[पहा-रस्मि].
**रंसिमन्तु**–(पु.) सूर्य.
**रंसिमन्तु**–(वि.) प्रकाशमान, सतेज.
**राग**–(पु.) रंग, आसक्ती, ओढ.
**रागक्खय**–(पु.) आसक्तीचा नाश.
**रागग्गि**–(पु.) रागाग्नी, क्रोधाग्नी.
**राग-चरित**–(वि.) रागीट, क्रोधी.
**राग-रत्त**–(वि.) रागाने अनुरक्त.
**रागी**–(वि.) अनुरागी, प्रेमी, कामुक.
**राज**–(पु.) राजा.
**राजककुधभण्ड**–(नपु.) राजचिन्ह, राजमुद्रा, राजकीय चिन्ह.
**राजकथा**–(स्त्री.) राजाविषयी चर्चा, राजकथा.
**राज-कम्मिक**–(पु.) सरकारी अधिकारी, राज्याचा अधिकारी.
**राजकुमार**–(पु.) राजपुत्र, राजकुमार.
**राजकुमारी**–(स्त्री.) राजकन्या, राजकुमारी.
**राज-कुल**–(नपु.) राजवाडा, राज्य-कुल, राजभवन.
**राज-गेह, राज-भवन, राज-मन्दिर**–(नपुं.) राजमहल, राजवाडा.
**राजङ्गण**–(नपु.) राजवाडयाचे आंगण.
**राज-दण्ड**–(पु.) राजाने दिलेली शिक्षा-दिलेला दंड.
**राज-दाय**–(पु.) राजाची देणगी, राजाने दिलेले बक्षीस.
**राज-दूत**–(पु.) राजाचा सेवक, राजाचा बातमीदार, राजदूत.
**राज-देवी**–(स्त्री.) महाराणी, राजाची राणी, राजदेवी.
**राज-धम्म**–(पु.) राजाचे कर्तव्य, राजधर्म.
**राजधानी**–(स्त्री.) राजकीय नगर, राजधानी.
**राज-धीतु, राज-पुत्ती**–(स्त्री.) राजकन्या, राजकुमारी.
**राज-निवेसन**–(नपु.) राजभवन, राजमहाल, राजवाडा.
**राजन्तेपुर**–(नपु.) अंतःपुर, झोपण्याची खोली, रंगमहाल.
**राज-परिसा**–(स्त्री.) राज्य-परिषद, राजसभा.
**राज-पुत्त**–(पु.) राजपुत्र, राजकुमार.
**राज-पुरिस**–(पु.) सरकारी नोकर, शासकीय कर्मचारी.
**राज-बलि**–(पु.) जकात, राज्यकर.
**राज-भट**–(पु.) सैनिक, जवान.

**राज-भय**–(नपु.) सरकारची भीती, राजाची भीती. राजभय.

**राज-भोग्ग**–(वि.) राजास योग्य.

**राज-महामत्त**–(पु.) प्रधान मंत्री.

**राज-महेसी**–(स्त्री.) पट्टराणी, महाराणी.

**राज-मुद्दा**–(स्त्री.) राजमुद्रा, राजचिन्ह.

**राजवर**–(पु.) श्रेष्ठ राजा.

**राज-वल्लभ**–(पु.) राजाचा प्रिय-आवडता.

**राज-सम्पत्ति**–(स्त्री.) राजकीय ऐश्वर्य, राजाचा डाम डौल.

**राजगह, राजगृह**–(नपु., वि.) मगध गणराज्याची राजधानी. आधुनिक राजगीर (विहार).

**राजञ्ञ**–(पु.) क्षत्रिय लोक.

**राजति**–(क्रि.) चमकणे.

**राजि**–(पू. क्रि.) चमकला.

**राजित**–(कृ.) चमकता.

**राजमान**–(कृ.) चमकण्यायोग्य, चमकणारा.

**राजित्वा**–(पू. क्रि.) चमकून.

**राजत्त**–(नपु.) राजत्व, राजेपणा.

**राजहंस**–(पु.) राजाचा हंस, सुंदर पक्षी, राजहंस.

**राजाणा**–(स्त्री.) राजाज्ञा, राजाचा हुकूम-आदेश.

**राजानुभाव**–(पु.) राजाचा थाटमाट, राजाचा पराक्रम.

**राजामच्च**–(पु.) राजाचा आमात्य, राजमंत्री.

**राजायतन**–(पु., वि.) राजायतनवृक्ष, तपस्सु, भल्लिक या नावाच्या दोन व्यापाऱ्यांनी अशा एका वृक्षाखाली भगवान बुद्धाला मिष्टान्न देऊन त्यांची सेवा केली होती.

**राजि**–(स्त्री.) पंक्ति, ओळ.

**राजित**–(कृ.) चमकदार.

**राजिद्धि**–(स्त्री.) राजकीय शक्ती, राज्यवैभव.

**राजिनी**–(स्त्री.) राणी.

**राजिसी**–(पु.) राजर्षि.

**राजुपट्ठान**–(नपु.) राजाच्या सेवेत असणे, नोकरी, राजकीय सेवा.

**राजुय्यान**–(नपु.) राजकीय उद्यान.

**राजुल**–(पु.) राजल साप, दुतोंडी साप.

**राजोरोध**–(पु.) राजाचा रंगमहाल.

**राजोवाद जातक**–काशी आणि कोसल गणराज्यांचे राजे आपापल्या राज्याबाहेर जाऊन आपल्या अवगुणांचा पत्ता लावू लागल्याची कथा–(१५१).

**राजोवाद जातक**–राजाच्या अन्यायी शासनामुळे प्रजेत राजाविषयीं कटुता निर्माण झाल्याची कथा–(३३४).

**राध जातक**–पोट्ठपाद आणि राध या नावांच्या दोन पोपटांची कथा–(१४५).

**राधित**–(कृ.) तयार केले.

**राम**–(पु., वि.) राजा दशरथाचा ज्येष्ठ पुत्र, याचेच दुसरे नाव राम पण्डित होते. त्याने आपली बहीण सीता हिच्याबरोबर लग्न केले होते.

**राम गाम**–(नपु., वि.) गंगेच्या किनारी वसलेले कोलियांचे एक नगर, येथील राजकर्त्यांनी बुद्धाच्या पवित्र अस्थी मिळवून त्यावर चैत्य उभारला होता.

**रामञ्ञ**–(नपु., वि.) ब्रह्मदेशाचे पालि नाव.

**रामणेय्यक**–(वि.) सुंदर, आकर्षक, रमणीय.

**राव**–(पु.) शब्द, आवाज, ओरड.

**रासि**–(पु.) रास, ढीग.

**रासि-वड्ढक**–(पु.) राज्य करावरील अधिकारी, कलेक्टर राज्य कर वसूल करणारा.

**राहसेय्यक**–(वि.) एकान्तवासी.

**राहु**–(पु.) असुरांचा राजा, चंद्राला ग्रासणारा राहु.

**राहु-मुख**–(नपु.) राहुचे तोंड, दंडाची पद्धती.

**राहुल थेर**–(पु., वि.) गौतम बुद्धाचा एकुलता एक पुत्र. याचा जन्म सिद्धार्थ गौतमच्या गृह त्यागापूर्वीच झाला होता, पुढे तो भिक्खु झाला.

**राहुल माता**–(स्त्री., वि.) गौतम बुद्धाची धर्मपत्नी व राहुलाची जननी. हिलाच भद्दकच्चाना (भद्रकन्या), यशोधरा, बिंबादेवी व बिम्बा सुंदरी अशी उपनावे होती.

**रिञ्चति**–(क्रि.) सोडून देणे, मोकळे करणे, रिकामे करणे.

**रिञ्च**–(पू. क्रि.) सोडून दिले, मोकळे केले, रिकामे केले.

**रित्त**–(कृ.) सोडून देता, मोकळे करता, रिकामे करता.

**रिञ्चमान**–(कृ.) सोडण्यायोग्य, मोकळे करण्यायोग्य.

**रिञ्चित्वा**–(पू. क्रि.) सोडून देऊन, मोकळे करून, रिकामे करून.

**रित्त**–(कृ.) रिक्त, मोकळा, रिकामा.

**रित्त-मुट्ठि**–(वि.) मोकळी मूठ, पोकळ मूठ, रिकामी मूठ.

**रित्त-हत्थ**–(वि.) मोकळा हात, हातात कांही नसलेला, रिकामा हात.

**रिपु**–(पु.) शत्रू, वैरी.
**रुक्ख**–(पुं.) वृक्ष.
**रुक्ख-गहण**–(नपु.) वृक्षांची ओळ, झाडांचा समुदाय.
**रुक्ख-देवता**–(स्त्री.) वृक्ष देवता.
**रुक्ख-मूल**–(नपु.) वृक्षाची मुळी-मूळ.
**रुक्ख-मूलिक**–(वि.) झाडाखाली राहणारा.
**रुक्ख-सुसिर**–(नपु.) झाडाची डोली, खोडातील पोकळी.
**रुक्खधम्म जातक**–वृक्ष देवांची कथा-(७४).
**रुचि**–(स्त्री.) पसंती, आवड, रुची.
**रुचिर**–(वि.) सुंदर, रुचकर, अनुकूल, आवडता.
**रुच्चति**–(क्रि.) आवडणे.
**रुच्चि**–(पू. क्रि.) आवडले.
**रुच्चित**–(कृ.) आवडता.
**रुच्चित्त्वा**–(पू. क्रि.) आवडून.
**रुच्चन**–(नपु.) रुची, आवड, आनन्द.
**रुच्चनक**–(वि.) रुचणारा, आवडणारा.
**रुजति**–(क्रि.) दुखणे, त्रास होणे.
**रुजि**–(पू. क्रि.) दुखले, त्रास झाला.
**रुजन्त**–(कृ.) दुखता, त्रास होता.
**रुजित्त्वा**–(पू. क्रि.) दुखून, त्रास होऊन.
**रुजन**–(नपु.) दुःख, त्रास, पीडा.
**रुजा**–(स्त्री.) पीडा.
**रुजक**–(वि.) दुःखकारक.
**रुज्झति**–(क्रि.) अडणे, अडथळा येणे.
**रुज्झि**–(पू. क्रि.) अडले, अडथळा आला.
**रुद्ध**–(कृ.) अडता, अडथळा येता.
**रुज्झित्त्वा** (पू. क्रि.) अडून, अडथळा येऊन.
**रुट्ठ**–(कृ.) रुष्ट, रुसलेला.
**रुण्ण**–(कृ.) रडत, ओरडत.
**रुत्त**–(नपु.) जनावराचा आवाज, जनावराची बोली.
**रुदति**–(क्रि.) रडणे.
**रुदि**–(पू. क्रि.) रडला.
**रुदित, रुत, रुदन्त**–(कृ.) रडता.
**रुदमान**–(कृ.) रडण्यासारखे.
**रुदित्त्वा**–(पू. क्रि.) रडून.
**रुदम्मुख**–(वि.) रडवे तोंड.
**रुद्ध**–(कृ.) अडविलेला, थांबविलेला.
**रुधिर**–(नपु.) रक्त.
**रुन्धति**–(क्रि.) अडविणे, कैद करणे, तुरुंगात टाकणे.
**रुन्धि**–(पू. क्रि.) अडविले, कैद केले.
**रुन्धित, रुद्ध**–(कृ.) अडविता, कैद करता.
**रुन्धित्त्वा**–(पू. क्रि.) अडवून, कैद करून.
**रुन्धन**–(नपु.) अडविणे, तुरुंगात टाकणे.
**रुप्पति**–(क्रि.) बदलणे, चिडणे.
**रुप्पि**–(पू. क्रि.) बदलला, चिडला.
**रुप्पन्त**–(कृ.) बदलता, चिडता.
**रुप्पमान**–(कृ.) बदलण्यासारखा, चिडण्यासारखा.
**रुप्पित्त्वा**–(पू. क्रि.) बदलून, चिडून.
**रुप्पनं**–(नपु.) सतत बदल, नेहमी परिवर्तन.
**रुरु**–(पु.) हरिणाची जात, मृग.
**रुरु (मिग) जातक**–दुर्वर्तनी मुलाने आई-बापाची सारी संपत्ती नष्ट करून टाकली आणि शेवटी कर्ज-बाजारी झाल्याची कथा-(४८२).
**रुह**–(वि.) उगवणारा, वाढणारा.
**रुहक जातक**–रुहक पुरोहिताच्या पत्नीने आपल्या पतीला मूर्ख बनविल्याची कथा-(१९१).
**रुहिर**–(नपु) रुधिर, रक्त.
**रुप**–(नपु.) दृष्टिचा विषय, भौतिक पदार्थ, आकार, मूर्ती, रूप.
**रुपक**–(नपु.) एक लहान आकार-प्रकार, उपमा, रुपक.
**रूप-तण्हा**–(स्त्री.) रुप-तृष्णा-रूपाची आसक्ती.
**रूप-दस्सन**–(नपु.) रूप दर्शन.
**रूप-भव**–(पु.) रूप लोक.
**रूप-राग**–(पु.) रूप लोकांत उत्पन्न होण्याची इच्छा.
**रूपवन्तु**–(वि.) सुंदर, रूपवान, सुस्वरुप.
**रूप-सम्पत्ति**–(स्त्री.) सौंदर्य.
**रूप-सिरि**–(स्त्री.) लावण्य, सौंदर्य.
**रूपारम्मण**–(नपु.) दृष्टी सुखाचा विषय.
**रूपावचर**–(वि.) रूपलोकांसंबंधी.
**रूपिय**–(नपु.) चांदी, रजत.
**रूपियमय**–(वि.) रजतमय, चंदेरी.
**रूपिनी**–(स्त्री.) सुंदरी.
**रूपी**–(वि.) रूपवान, सुंदर.
**रूपूपजीविनी**–(स्त्री.) वेश्या.
**रूळ्ह**–(कृ.) उगवलेला.
**रुहति**–(क्रि.) उगविणे, चढणे, (जखम) चांगली करणे.
**रुहि**–(पू. क्रि.) उगविले, चढले, चांगली केली, बरी केली.
**रूळ्ह**–(कृ.) उगविता, चढता, बरी करता.

**रूहित्त्वा**–(पू. क्रि.) उगवून, चढवून, बरी करून.
**रूहन**–(नपु.) उगविणे, चढणे, जखम भरून काढणे.
**रेचन**–(नपु.) बाहेर काढणे, पोट साफ करणे.
**रेणु**–(पु., नपु.) धूळ, धुळीचा कण, रेणु.
**रेणुक**–(पु.) रेणुक नावाचे सुगंधी अत्तर.
**रेवती**–(स्त्री.) एकशे वीस नक्षत्रांपैकी एक नक्षत्र.
**रोग**–(पु.) आजार, रोग.
**रोग-निड्ड, रोग-नीळ**–(नपु.) रोगाचे ठिकाण.
**रोग-हारी**–(पु.) वैद्य, रोग हरण करणारा.
**रोगातुर**–(वि.) रोगी, आजारी.
**रोगी**–(पु.) आजारी, रोगी.
**रोचति**–(क्रि.) चमकणे, शोभून दिसणे, शोभणे.
**रोचि**–(पू. क्रि.) चमकला, शोभला.
**रोचित**–(कृ.) चमकता, शोभता.
**रोचित्त्वा**–(पू. क्रि.) चमकून, शोभून.
**रोचन**–(नपु.) निवड, पसंत, चमक.
**रोचेति**–(क्रि.) पसंत करणे, निवडणे.
**रोचेसि**–(पू. क्रि.) पसंत केले, निवडले.
**रोचित**–(कृ.) पसंत करता, निवडता.
**रोचेत्त्वा**–(पू. क्रि.) पसंत करून, निवडून.
**रोदति**–(क्रि.) रडणे, ओरडणे.
**रोदि**–(पू. क्रि.) रडला, ओरडला.
**रोदित, रोदन्त, रोदिन्तु**–(कृ.) रडता, ओरडता.
**रोदमान**–(कृ.) रडण्यासारखा, ओरडण्यायोग्य.
**रोदित्त्वा**–(पू. क्रि.) रडून, ओरडून.
**रोदन**–(नपु.) रडे, रडणे.
**रोध**–(पु.) अडथळा.
**रोधन**–(नपु.) अडविणे.
**रोप**–(पु.) झाड लावणे, रोप लावणे, रोपणे.
**रोपित**–(कृ.) लावलेले.
**रोपेति**–(क्रिया) लावणे, रोपणे.
**रोपेसि**–(पू. क्रि.) लावले, रोपले.
**रोपेन्त**–(कृ.) लावता, रोपता.
**रोपायमान, रोपिय**–(कृ.) लावण्यासारखे, रोपण्यासारखे.
**रोपेत्त्वा**–(पू. क्रि.) लावून, रोपून.
**रोम**–(नपु.) शरीरावरील केस.
**रोमक**–(वि.) रोमचा नागरिक, रोम शहरात राहणारा.
**रोमञ्च**–(नपु) रोमांच, त्वचेवरील कांटा, त्वचेवरील केस उभे राहणे.
**रोमन्थति**–(क्रि.) रवंथ करणे.
**रोमन्थि**–(पू. क्रि.) रवंथ केली.
**रोमन्थं**–(कृ.) रवथ करता.
**रोमन्थित्त्वा**–(पू. क्रि.) रवथ करून.
**रोमन्थन**–(नपु.) रवथ करणे.
**रोरुव**–(पु.) रौ-रौ नरक, घोर नरक.
**रोस**–(पु.) रोष, राग, क्रोध.
**रोसक**–(वि.) रोषक, रागीट, क्रोधित.
**रोसना**–(स्त्री.) रागाचे कारण.
**रोसेति**–(क्रि.) रागावणे.
**रोसेसि**–(पू. क्रि.) रागावला.
**रोसित**–(कृ.) रागावता.
**रोसेत्त्वा**–(पू. क्रि.) रागावून.
**रोहति**–[पहा–रूहति].
**रोहन, रूहन**–(नपु.) उगवणे, वाढणे.
**रोहिणी**–(स्त्री.) रोहिणी नक्षत्र.
**रोहित**–(वि.) लाल, हिरा.
**रोहित**–(पु.) मृग, हरीण.
**रोहित-मच्छ**–(पु.) रोहित मासा.

## ल

**ल**–नागरी लिपीतील वर्णमालेचे चाळीसाव्वे **वर्णाक्षर.**
**लकार**–(पु.) नावेचे शिड.
**लकुण्टक**–(वि.) ठेंगू, कमी उंचीचा, लहान.
**लक्ख**–(नपु.) निशान, लक्ष्य.
**लक्ख**–(सं. वि.) लाख, लक्ष, शंभर हजार.
**लक्खण**–(नपु.) निशान, लक्षण, गण.
**लक्खण-पाठक**–(पु.) ज्योतिषी, भविष्यवादी.
**लक्खण-सम्पत्ति**–(स्त्री.) उत्तम लक्षणे.
**लक्खण-सम्पन्न**–(वि.) चांगली लक्षणे असणारा.
**लक्खण-जातक**–लक्षणे आणि काळवीटाची कथा–(११).
**लक्खिक**–(वि.) भाग्यवान, भाग्यवंत.
**लक्खित**–(कृ.) लक्षित, चिन्हांकित, लक्षणयुक्त.
**लक्खी**–(स्त्री.) लक्ष्मी, भाग्य, ऐश्वर्य, धन-संपत्ती.
**लक्खेति**–(क्रि.) चिन्ह लावणे, खूण करणे.
**लक्खेसि**–(पू. क्रि.) चिन्ह लावले, खूण केली.
**लक्खित**–(कृ.) चिन्ह लावता, खूण करता.
**लक्खेत्त्वा**–(पू. क्रि.) चिन्ह लावून, खूण करून.
**लगुळ**–(पु.) दंडा, काठी, दांडके.
**लग्ग**–(वि.) लागलेला, जोडलेला.

**लग्गकेस**–(पु.) जटा, गुंतलेले केस.
**लग्गति**–(क्रि.) लागणे, जुळणे, लटकणे.
**लग्गि**–(पू. क्रि.) लागले, जुळले, लटकले.
**लग्गित**–(कृ.) लागता, जुळता, लटकता.
**लग्गित्वा**–(पू. क्रि.) लागून, जुळून, लटकून.
**लग्गन**–(नपु.) लागणे, जुळणे, लटकणे.
**लग्गेति**–(क्रि.) लागणे, जुळणे, लटकणे.
**लग्गेसि**–(पू. क्रि.) लागले, जुळले, लटकले.
**लग्गित**–(कृ.) लागता, जुळता, लटकता.
**लग्गेत्वा**–(पू. क्रि.) लागून, जुळून, लटकून.
**लङ्गी**–(स्त्री.) दाराचा अडसर, द्वार दंड.
**लङ्गुल**–(नपु) शेपूट, शेपटी.
**लङ्घक**–(पु.) उडी मारणारा, बाजी मारणारा.
**लङ्घति**–(क्रि.) उडी मारणे, पार जाणे.
**लङ्घि**–(पू. क्रि.) उडी मारली, पार गेला.
**लङ्घित**–(कृ.) उडी मारता, पार जाता.
**लङ्घित्वा**–(पू. क्रि.) उडी मारून, पार जाऊन.
**लङ्घन**–(नपु.) उडी मारणे, पार करणे, पार निघून जाणे.
**लङ्घापेति**–(क्रि.) उडी मारविणे, पार करविणे.
**लङ्घी**–(पु.) उडी मारणारा, पार करणारा, पलिकडे जाणारा, बाजी मारणारा.
**लङ्घेति**–(क्रि.) उडी मारणे, उल्लंघन करणे, पार जाणें.
**लङ्घेसि**–(पू. क्रि.) उडी मारली, उल्लंघन केले, पार गेला.
**लङ्घित**–(कृ.) उडी मारता, उल्लंघन करता, पार जाता.
**लङ्घेत्वा**–(पू. क्रि.) उडी मारून, उल्लंघन करून, पार करून.
**लज्जति**–(क्रि.) लाजणे, शरमणे.
**लज्जि**–(पू. क्रि.) लाजला.
**लज्जित, लज्जन्त**–(कृ ).लाजता.
**लज्जमान**–(कृ.) लाजण्यासारखा.
**लज्जित्वा**–(पू. क्रि.) लाजून.
**लज्जन**–(नपु.) लाज.
**लज्जापन**–(नपु.) लाजविणे.
**लज्जापेति**–(क्रि.) लाजविणे.
**लज्जापेसि**–(पू. क्रि.) लाजविले.
**लज्जापित**–(कृ.) लाजविता.
**लज्जापेत्वा**–(पू. क्रि.) लाजवून.
**लज्जितब्बक**–(वि.) लाजण्यासारखे, ज्यामुळे, लज्जित व्हावे लागते.
**लज्जी**–(वि.) लाजलेला.
**लच्छति, लच्छिस्सति**–(क्रि.) मिळविणे, प्राप्त करणे.
**लञ्च**–(पु.) लाच.
**लञ्चखादक**–(वि.) लाचखाऊ, लाच खाणारा.
**लञ्च-दान**–(नपु.) लाच, लाच देणे.
**लञ्छ**–(पु.) चिन्ह, निशाणी, खूण.
**लञ्छन**–(पु.) चिन्ह, खूण, ओळखीची निशाणी.
**लञ्छक**–(पु.) चिन्ह करणारा, खूण लावणारा.
**लञ्छति, लञ्छेति**–(क्रि.) चिन्ह करणे, निशाणी लावणे.
**लञ्छि**–(पू. क्रि.) चिन्ह केले, निशाणी लावली.
**लञ्छेसि**–(पू. क्रि.) चिन्ह केले, निशाणी लावली, खूण केली.
**लञ्छित्वा, लञ्छेत्वा**–(पू. क्रि.) चिन्ह करून, निशाणी लावून, खूण करून.
**लञ्छित**–(कृ.) चिन्हांकित, खूण केलेले.
**लटुकिक जातक**–लावा पक्षिणीने (होलापक्षीण) आपल्या पिलांना तुडवून मारणाऱ्या हत्तीचा बदला घेतल्याची कथा–(३५७).
**लटुकिका**–(स्त्री.) लावीण, (होलापक्षीण).
**लट्ठि, लट्ठिका**–(स्त्री.) लाठी, काठी.
**लण्ड**–(पु.) लेंडी.
**लण्डिका**–(स्त्री.) लेंडी.
**लता**–(स्त्री.) वेली.
**लता-कम्म**–(नपु.) वेल-बुट्टीचे काम, भरतकाम, नक्षीचे काम.
**लद्ध**–(कृ.) प्राप्त, मिळालेले.
**लद्धक**–(वि.) आकर्षक, मोहक, सुंदर दिसणारा.
**लद्धब्ब**–(कृ.) प्राप्तव्य, मिळालेले.
**लद्ध-भाव**–(पु.) प्राप्ती, मिळकत.
**लद्धस्साद**–(वि.) दुःखमुक्त.
**लद्धा-लद्धान**–(पू. क्रि.) प्राप्त करून, मिळवून.
**लद्धि**–(स्त्री.) प्राप्ती, लब्धि, दृष्टिकोण, मत, विचार.
**लद्धिक**–(वि.) सांप्रदायिक, मत परिवर्तन करणारा.
**लद्धुं**–(नपु.) प्राप्तीसाठी.
**लपति**–(क्रि.) बोलणे.
**लपित**–(कृ.) बोलता.
**लपित्वा**–(पू. क्रि.) बोलून.
**लपन**–(नपु.) बोलणे, बडबडणे, तोंड.
**लपनज**–(पु.) दांत.

लपना–(स्त्री.) जिभेची हालचाल, स्तुती करणे.
लबुज–(पु.) फणस.
लब्भति–(क्रि.) प्राप्त होणे, मिळणे.
लब्भमान–(कृ.) प्राप्त करण्यायोग्य.
लब्भा–(अ.) संभव, शक्यता.
लभति–(क्रि.) प्राप्त होणे, मिळणे.
लभि–(पू. क्रि.) प्राप्त झाले, मिळाले.
लद्ध, लभन्त, लभिन्तु, लद्धुं–(कृ.) प्राप्त करता, मिळता.
लभित्वा–(पू. क्रि.) प्राप्त करून, मिळवून.
लम्ब–(वि.) लोंबणारा, लटकणारा, लांब.
लम्बक–(नपु.) लोंबणारा, लटकणारा, लम्बक.
लम्बति–(क्रि.) लोंबणे, लटकणे.
लम्बि–(पू. क्रि.) लोंबले, लटकले.
लम्बन्त–(कृ.) लोंबता, लटकता.
लम्बमान–(कृ.) लोंबण्यासारखा, लटकण्याजोगा.
लम्बित्वा–(पू. क्रि.) लोंबून, लटकून.
लय–(पु.) दोन स्वरांतील अंतर, फार कमी वेळ.
ललना–(स्त्री.) स्त्री, ललना.
ललित–(वि.) सुंदर, कोमल, आकर्षक.
ललित–(नपु.) लीला, खेळ.
लव–(पु.) थेंब.
लवङ्ग–(नपु.) लवंग.
लवण–(नपु.) मीठ, क्षार.
लवन–(नपु.) कापणे, चावणे.
लसति–(क्रि.) चमकणे, खेळणे.
लसि–(पू. क्रि.) चमकले, खेळले.
लसित–(कृ.) चमकता, खेळता.
लसित्वा–(पू. क्रि.) चमकून, खेळून.
लसिका–(स्त्री.) शरीरांतील अवयवांना सुदृढ ठेवणारा पदार्थ, स्निग्ध स्नायु.
लसी–(स्त्री.) डोके, मेंदू.
लसुण–(नपु.) लसून.
लहु–(वि.) हालका, ताबडतोब, गतिमान.
लहु–(नपु.) ऱ्हस्व स्वर, (लघु).
लहुक–(वि.) हलका.
लहुक–(क्रि. वि.) शीघ्रतेने.
लहुता–(स्त्री.) हलकेपणा.
लहु-परिवत्त–(वि.) तत्काळ वदलणारा.
लहुं, लहुसो–(क्रि. वि.) तत्परतेने, ताबडतोब.

लाखा–(स्त्री.) लाख (मोहेर करण्याची).
लाखा-रस–(पु.) लाखेचा रांधा, लाखेचा रंग.
लाज–(पु.) लोखंडी मोठा खिळा.
लाज-पञ्चकम–(वि.) लोखंडासह पंचरसी धातूचा खिळा, विद्युत प्रतिरोधक पट्टी.
लाप–(पु.) होला, लावा पक्षी.
लापु, लाबु–(स्त्री.) दुधीभोपळा.
लाभ–(पु.) फायदा, प्राप्ती, लाभ.
लाभ-कम्यता–(स्त्री.) लाभाची इच्छा, आकांक्षा.
लाभग्ग–(पु.) सर्वश्रेष्ठ लाभ.
लाभ-मच्छरिय–(नपु.) लाभाविषयी मत्सर.
लाभ-सक्कार–(पु.) लाभ आणि सत्कार.
लाभ गरह जातक–जगांतील लाभकारक गोष्टींचा मार्ग शिष्याने दाखविल्याची कथा–(२८७).
लाभा–(अ.) ही लाभाची-फायद्याची गोष्ट आहे या अर्थाचा शब्द.
लाभी–(पु.) अति फायदा मिळविणारा.
लामक–(वि.) निकृष्ट, कमी प्रतीचा, हलका.
लायक–(पु.) चावणारा, कापणारा.
लायति–(क्रि.) चावणे, कापणे.
लायि–(पू. क्रि.) चावला, कापले.
लायित–(कृ.) चावता, कापता.
लायित्वा–(पू. क्रि.) चावून, कापून.
लालन–(नपु.) लाड, माया, लालन.
लालपति–(क्रि.) बोलणे.
लालपि–(पू. क्रि.) बोलला.
लालपित–(कृ.) बोलता.
लालपित्वा–(पू. क्रि.) बोलून.
लालसा–(स्त्री.) प्रबळ इच्छा, लालसा.
लालेति–(क्रि.) लाड करणे, माया करणे.
लालेसि–(पू. क्रि.) लाड केला, माया केली.
लालित–(कृ.) लाड करता, माया करता.
लालेत्वा–(पू. क्रि.) लाड करून, माया करून.
लाळ, लाट–(पु.) राजकुमार विजयची जन्मभूमी सद्याचा गुजरात प्रांत (राज्य).
लास–(पु.) नृत्य, नाच, नर्तन.
लासन–(नपु.) नृत्य विलास.
लिकुच–(पु.) फणस.
लिक्खा–(स्त्री.) लीख, ऊचे अंडे, लहान माप.
लिखति–(क्रि.) लिहिणे.
लिखि–(पू. क्रि.) लिहिले.

लिखित, लिखन्त, लिखिन्तु–(कृ.) लिहिता, लिहिलेले.
लिखित्वा–(पू क्रि.) लिहून.
लिखन–(नपु.) लेखन.
लिखापेति–(क्रि.) लिहून घेणे.
लिखापेसि–(पू. क्रि.) लिहून घेतले.
लिखापेन्त–(कृ.) लिहून घेता.
लिखापेत्वा–(पू. क्रि.) लिहून घेऊन.
लिखितक–(पु.) द्रोही म्हणून जाहीर केलेला.
लिङ्ग–(नपु.) चिन्ह, निशाण, खूण, प्राण्याचे लिंग.
लिङ्ग-विपलास–(पु.) लिंग परिवर्तन, लिंग बदल.
लिङ्गिक–(वि.) व्याकरणांतील लिंगासंबंधी, लैंगिक, स्त्री-पुरुषांच्या लिंगाविषयी.
लिच्छवि–(पु. सा. ना.) बुद्ध समकालिन वैशाली गणराज्यातील लिच्छवी जात-समाज.
लित्त–(कृ.) लिपलेले.
लित्त जातक–कपटी जुगारी माणूस तोंडात सोंगटी दडवून खेळत असल्याची कथा–(९१).
लिपी–(स्त्री.) लेखनाचे अक्षर, लिपी.
लिपि-कार–(पु.) लेखक, लिहिणारा, लिपीकार.
लिम्पति–(क्रि.) लिंपणे.
लिम्पेसि–(पू. क्रि.) लिंपले.
लम्पेन्त, लिम्पित–(कृ.) लिंपता.
लिम्पेत्वा–(पू. क्रि.) लिंपून.
लिम्पन–(नपु.) लिंपणे, लेप.
लिम्पेति–(क्रि.) लिंपणे.
लिम्पेसि–(पू. क्रि.) लिंपले.
लिम्पेन्त, लिम्पित–(कृ.) लिंपता.
लिम्पेत्वा–(पू. क्रि.) लिंपून.
लिम्पापेति–(क्रि.) लिंपून घेणे.
लिम्पापेसि–(पू. क्रि.) लिंपून घेतले.
लिम्पापेसन्त–(कृ.) लिंपून घेता.
लिम्पापेसित्वा–(पू. क्रि.) लिंपून घेऊन.
लिहति–(क्रि.) चाटणे.
लिहि–(पू. क्रि.) चाटले.
लिहमान–(कृ.) चाटण्यायोग्य.
लिहित्वा–(पू. क्रि.) चाटून.
लीन–(कृ.) संकोची, लाजाळू.
लीनता–(स्त्री.) संकोच, लाज, लीनता.
लीनत्त–(नपु.) संकोच, लाज, लीनता.
लीयति–(क्रि.) संकोचणे, लाजणे.
लीयि–(पू. क्रि.) संकोचला, लाजला.
लीयमान–(कृ.) संकोचण्यासारखा, लाजण्यासारखा.
लीन–(कृ.) संकोचता, लाजता.
लीयित्वा–(पू. क्रि.) संकोचून, लाजून.
लीयन–(नपु.) संकोचणे, लाजणे.
लीला–(स्त्री.) हावभाव, खेळ, क्रीडा, लीला.
लुज्जति–(क्रि.) तोडणे, तोडून टाकले.
लुज्जि–(पू. क्रि.) तोडले, तोडून टाकले.
लुग–(कृ.) तोडता, तोडून टाकता.
लुज्जित्वा–(पू. क्रि.) तोडून, तोडून टाकून.
लुज्जन–(नपु.) पडणे, मोडणे.
लुञ्चति–(क्रि.) लोचन करणे, केस उपटणे (जैन सांप्रदायात).
लुञ्चि–(पू. क्रि.) लोचन केले, केस उपटले.
लुञ्चित–(कृ.) लोचन करता, केस उपटता.
लुञ्चित्वा–(पू. क्रि.) लोचन करून, केस उपटून.
लुत–(कृ.) चावला, कापला.
लुत्त–(कृ.) तोडता, कापता, चावता.
लुद्द–(वि.) निर्दयी, कठोर, अंतःकरणाचा, निष्ठूर, क्रूर, भयंकर.
लुद्दक–(पु.) शिकारी.
लुद्ध–(कृ.) लोभी.
लुनाति–(क्रि.) कापणे, चावणे.
लुब्भति–(क्रि.) लोभ धरणे, इच्छिणे.
लुब्भि–(पू. क्रि.) लोभ धरला, इच्छा धरली.
लुब्भित्वा–(पू. क्रि.) लोभ धरून, इच्छा करून.
लुब्भन–(नपु.) लोभ, लोभ धरणे.
लुम्पति–(क्रि.) लुटणे, तोडणे, लुबाडणे.
लुम्पि–(पू. क्रि.) लुटले, तोडले, लुबाडले.
लुम्पित–(कृ.) लुटता, तोडता, लुबाडता.
लुम्पित्वा–(पू. क्रि.) लुटून, तोडून, लुबाडून.
लुम्पन–(नपु.) लुटणे, लूट.
लुम्बिनी–(नपु., वि.) कपिलवस्तु व देवदह या दोन नगरामधील लुंबिनी उद्यान, याच उद्यानांत सिद्धार्थ गौतमाचा जन्म झाला होता.
लुळित–(कृ.) हालविला.
लूख–(वि.) सुकलेला, वाळलेला, रुक्ष.
लूख-चीवर–(वि.) जाडे-भरडे, वस्त्र.
लूखता–(स्त्री.) रुक्षता, जाडे-भरडेपणा.
लूखप्पसन्न–(वि.) जाडे-भरडे वापरणाराविषयी श्रद्धा, साधेपणाविषयी आपुलकी.

**लूण, लून**–(कृ.) कापलेला, चावलेला.
**लेखक**–(पु.) लिहिणारा, लेखक.
**लेखिका**–(स्त्री.) लिहिणारी स्त्री, लेखिका.
**लेखन**–(नपु.) लिखाण, लिहिणे, लेखन.
**लेखनी**–(स्त्री.) लेखणी, टाक.
**लेखनी-मुख**–(नपु.) टाकाची नीब.
**लेखा**–(स्त्री.) लेख, पत्र, शीला-लेख, रेषा, रेघ, लेखनकला.
**लेड्डु**–(पु.) मातीचा ढकळ, मातीचा गोळा.
**लेड्ड-पात**–(पु.) हात घोड्यावर, ढेकळ फेकून जितक्या अंतरावर जातो ते अंतर.
**लेण**–(नपु.) संरक्षण, गुहा, लेणी.
**लेप**–(पु.) लेप.
**लेपन**–(नपु.) लिंपणे, लेप देणे.
**लेपेति**–(क्रि.) लिंपणे, लेप देणे.
**लेपेसि**–(पू. क्रि.) लिंपला, लेप दिला.
**लेपेन्त, लेपित, लित्त, लपेन्त**–(कृ.) लिंपता, लेप देता.
**लेपेत्वा**–(पू. क्रि.) लिंपून, लेप देऊन.
**लेय्य**–(वि.) चाखण्यायोग्य.
**लेस**–(पु.) बहाणा, सोंग, लेशमात्र, अल्प.
**लोक**–(पु.) जग, लोक.
**लोकग्ग**–(पु.) लोकाग्र, सर्वलोकात, श्रेठ, बद्ध.
**लोकनायक**–(पु.) लोकांचा स्वामी, बुद्ध, लोकनायक.
**लोकन्त**–(पु.) जगाचा अंत, जगाचा शेवट, लोकाचा अंत.
**लोकन्तगू**–(पु.) जगाच्या सर्वोच्च पदाला पोहोचलेला, लोकांच्या सर्व श्रेष्ठ मर्यादेस पोहोचलेला.
**लोकन्तर**–(नपु.) परलोक, अन्य लोक, दुसरा लोक.
**लोकोन्तरिक**–(वि.) दोन लोकांच्या मध्ये राहिलेला-असलेला.
**लोक-निरोध**–(पु.) लोक-विनाश.
**लोक-पाल**–(पु.) लोकांचा संरक्षण करता, संरक्षक, लोकपाल.
**लोक-वज्ज**–(नपु.) जगाच्या दृष्टितून दोष, लोकवर्ज्य.
**लोक विवरण**–(नपु.) जगाचे-लोकाचे उद्घाटन.
**लोक-वोहार**–(पु.) सामान्य व्यवहार, सामान्य रीत, लोकव्यवहार.
**लोकाधिपच्च**–(नपु.) लोकाधिपत्य, लोकांवर जगावर-अधिकार.
**लोकानुकम्पा**–(स्त्री.) मानवावर दया, लोकांवर दया.
**लोकायतिक**–(वि.) भौतिकदृष्टी असलेला, लोक-कल्याणाची दृष्टी असलेला.
**लोकिक, लोकिय**–(वि.) लौकिक, जगभर, लोकभर.
**लोकुत्तर**–(वि.) लोकोत्तर, अलौकिक, लोकांहून श्रेष्ठ.
**लोचक**–(वि.) लोचन करणारा, केस मुळातून उपटून काढणारा.
**लोचन**–(नपु.) डोळा, नेत्र, अक्ष, चक्षु.
**लोण**–(नपु.) मीठ, क्षार.
**लोण**–(वि.) खारट, क्षारयुक्त.
**लोणकार**–(पु.) लोणारी, मीठ बनविणारा, मिठारी.
**लोण-धूपन**–(नपु.) खारविणे, खारट करणे.
**लोण-सक्खरा**–(स्त्री.) मिठाचे लहान तुकडे-कण.
**लोणिक**–(वि.) क्षार, खारट.
**लोप**–(पु.) लुप्त होणे, न दिसणे, अदृष्य होणे, लोप पावणे, कापणे.
**लोभ**–(पु.) आशा, लालसा, इच्छा, तृष्णा, लोभ.
**लोभनीय**–(वि.) मोहक, मोहून घेणारा, विलोभनीय.
**लोभ-मूलक**–(वि.) ज्याच्या मुळाशी लालसा आहे.
**लोम**–(नपु.) शरीरावरील केस.
**लोम-कूप**–(पु.) रंध्र, केसमुळाचे छिद्र.
**लोम-हट्ठ**–(वि.) रोमांच, अंग शहारणे.
**लोम-हंस**–(पु., नपु.) रोमांच, रोमहर्ष.
**लोमसं**–(वि.) केसाळ, ज्याच्या अंगावर खूप केस आहेत असा.
**लोमस कस्सप जातक**–शरीरावर लांब-लांब केस असल्यामुळें एका तपस्यास लोम कस्सप नाव पडल्याची कथा–(४३३).
**लोमस-पाणक**–(पु.) बारीक तांदूळ.
**लोम हंस जातक**–तपस्याने जन्मभर शारिरीक क्लेश सहन केल्याची कथा–(९४).
**लोल जातक**–कबूतर आणि लोभी कावळ्याची कथा–(२७४).
**लोल**–(वि.) लोभी, चंचल, अस्थिर.
**लोलता**–(स्त्री.) उत्सुकता, अधीरता, लोभ, चंचलता.
**लोलुप**–(वि.) लोभी, लालची, स्वार्थी.
**लोलुप्प**–(नपु.) लोभ, आशा, तृष्णा, लालुच.
**लोलेति**–(क्रि.) हालविणे.
**लोसक जातक**–निवासी (विहारांत राहणारा) भिक्खु आगन्तुक भिक्खूबरोबरं ईर्षा करू लागल्याची कथा–(४१).
**लोह**–(नपु.) तांबे, लोखंड.
**लोह-कटाह**–(पु.) लोखंडी कढई.
**लोहकार**–(पु.) लोहार.

**लोह-कुम्भी**–(स्त्री.) लोखंडी-पत्र्याची घागर.
**लोह-पिट्ठ**–(पु., नपु.) सार पक्षी, हंस, बगळा.
**लोह-पिण्ड**–(पु.) लोखंडी गोळा.
**लोह-जाल**–(नपुं.) लोखंडी तारेचे जाळे.
**लोह-थालक**–(पु.) लोखंडी थाळी, लोखंडी-पत्र्याची पाटी.
**लोह-पासाद**–(पु., वि. ना.) श्रीलंकेतील अनुराधापूर येथील प्रसिद्ध विहार.
**लोह-भण्ड**–(नपु.) लोखंडाचे सामान, लोखंडी साहित्य.
**लोह-मासक**–(पु.) तांब्याचे नाणे.
**लोह-सलाका**–(स्त्री.) लोखंडाची सळी.
**लोह-कुम्भि जातक**–पुरोहिताच्या शिष्याने यज्ञात बळी दिल्या जाणाऱ्या पशुंचा जीव वाचविल्याची कथा–(३१४).
**लोहित**–(नपु.) रक्त.
**लोहित**–(वि.) रक्तवर्ण, लाल रंगाचा, तांबड्या रंगाचा.
**लोहितक्ख**–(वि.) लाल डोळ्याचा, रक्तवर्ण नेत्राचा, रागीट, क्रोधित.
**लोहित-चन्दन**–(नपु.) रक्तवर्ण चंदन, लाल रंगाचे चंदन, रक्त चंदन.
**लोहित-पक्खन्दिका**–(स्त्री.) रक्तातिसार.
**लोहित-भक्ख**–(वि.) रक्त भक्षक, रक्त खाणारा.
**लोहितुप्पादक**–(पु.) बुद्धाच्या शरीरांतील रक्त वाहवविणारा.
**लोहितक**–(नपु.) लाल, हिरा, तांबडा मणी.
**लोहितक**–(वि.) लालरंगाचा, तांबड्या रंगाचा.

## व

**व**–नागरी लिपीतील वर्णमालेचे एक्केचाळीसावे अक्षर.
**व**–इव–(जसा) किंवा एव- (सुद्धा) या शब्दांचे संक्षीप्त रूप.
**वक**–(पु.) लांडगा, वृक.
**वक जातक**–लांडग्याने उपास धरला होता, परंतु जसे त्याने बकऱ्यास पाहिले, तसे त्याचे खोटे व्रत तुटल्याची कथा–(३००).
**वकुल**–(पु.) बकुल वृक्ष.
**वक्क**–(नपु.) गुरदा, गुर्दा, काळजाजवळचा एक भाग.
**वक्कल**–(नपु.) वल्कल, झाडांच्या सालीपासून बनविलेले वस्त्र.
**वक्कली**–(वि.) वल्कले वापरणारा.
**वक्खति**–(क्रि.) सांगणे.
**वग्ग**–(पु.) समूह, पुस्तकातील भाग, पाठ, धडा, वर्ग.
**वग्ग**–(वि.) भिन्न, वेगवेगळा.
**वग्ग-बन्धन**–(नपुं.) वर्गवारी करणे, वेगवेगळे करणे, वर्गवार-भागवार काढण.
**वग्गिय**–(वि.) वर्गाविषयी, भागासंबंधी.
**वग्गु**–(वि.) प्रिय, मधुर, आवडता.
**वग्गु-वद**–(वि.) प्रियंवद, मधुरभाषी.
**वग्गुलि**–(पु., स्त्री.) वटवाघूळ.
**वङक**–(वि.) वाकडा, बेइमान.
**वङक**–(नपु.) मासे धरण्याचा गळ.
**वङक-घस्त**–(वि.) माशाने जो गळ गिळला.
**वङकता**–(स्त्री.) वक्रता, वाकडेपणा.
**वङ्ग**–(पु., विशे. ना.) वंग प्रदेश, बंगाल.
**वच**–(पु., नपु.) म्हण, वचन.
**वचन**–(नपु.) शब्द, वाणी, व्याख्या, वचन.
**वचनक्खम**–(वि.) सांगितल्याप्रमाणे वागणारा.
**वचनत्थ**–(पु.) शब्दार्थ.
**वचनीय**–(वि.) सांगण्या-ऐकण्यायोग्य.
**वचनपथ**–(पु.) वचन मार्ग.
**वचा**–(स्त्री.) वच नावाचे औषध.
**वची**–(स्त्री.) भाषण, वाणी, बोलणे.
**वची-कम्म**–(नपु) वाणीचे कार्य.
**वची-गुत्त**–(वि.) वाणीचा संयम, बोलण्यातील संयम.
**वची-दुच्चरित**–(नपु.) अनियंत्रित बोलणे, वाणीचे दुराचरण, अद्वातद्वा बोलणे
**वची-परम**–(वि.) वागीश, बोलण्यात चतूर, हजर जबाबी, समर्थ वक्ता.
**वची-भेद**–(पु.) तोंडातून निघालेला शब्द.
**वची-विञ्ञत्ति**–(स्त्री.) वाणीद्वारा सूचना.
**वची-सङखार**–(पु.) बोलण्याचे संस्कार- (चेतसिक).
**वची-समाचार**–(पु.) शुभ बोलणे.
**वची-सुचरित**–(नपु.) बोलण्यांतील संयम, वाणीचे सदाचरण.
**वच्च**–(नपु.) मल, विष्टा, गू.
**वच्च-कुटि**–(स्त्री.) संडास.
**वच्च-कूप**–(पु.) संडासातील मलाचा खड्डा.
**वच्च-मग्ग**–(पु.) गुदद्वार.
**वच्च-सोधक**–(पु.) भंगी.
**वच्छ**–(पु.) वासरू.

**वच्छक**–(पु.) लहान वासरू.
**वच्छगिद्धिनी**–(स्त्री.) वासराची इच्छा करणारी.
**वच्छतर**–(पु.) मोठे वासरू.
**वच्छनख जातक**–वच्छनख नावाच्या तपस्व्याने गृहस्थ जीवनांतील संसारी जीवनांतील दोष दाखविल्याची कथा–(२३५).
**वच्छर**–(नपु.) वत्सर, वर्ष.
**वच्छल**–(वि.) वत्सल, प्रेमपात्र.
**वज**–(पु.) वज्र, हत्यार, जनावरांचा गोठा.
**वजति**–(क्रि.) जाणे.
**वजि**–(पू. क्रि.) गेला.
**वजन्त**–(कृ.) जाता.
**वजमान**–(कृ.) जाणे योग्य.
**वजित्त्वा**–(पू. क्रि.) जाऊन.
**वजिर**–(नपु.) वज्र, हत्यार.
**वजिर-पाणी**–(पु.) शक्र.
**वजिर-हत्थ**–(पु.) इंद्र.
**वज्ज**–(नपु.) वर्ज्य (दोष, काळोख), वाद्य-(बाजा).
**वज्ज**–(वि.) वर्ज्य (अकरणीय), वद्य-(कथनीय).
**वज्जनीय**–(वि.) वर्ज्यनीय, सोडणेयोग्य, न करणे, त्याज्य.
**वज्जन**–(नपु.) वर्ज्यन, त्याज्य, सोडणे, त्यागणे.
**वज्जिय**–(पू. क्रि.) सोडून, त्यागून, वर्जुन.
**वज्जी**–(नपु. वि.) बुद्ध कालीन भारतांतील सोळा गणराज्यांपैकीं एक, वज्जी-जनपद-गणराज्य.
**वज्जेति**–(क्रि.) मनाई करणे.
**वज्जेसि**–(पू. क्रि.) मनाई केली.
**वज्जेंतु**–(कृ.) मनाई करता.
**वज्जेतब्ब**–(कृ.) मनाई करण्यायोग्य.
**वज्जेत्वा**–(पू. क्रि.) मनाई करून.
**वज्झ**–(वि.) वध्य, ठार मारण्यायोग्य.
**वज्झप्पत्त**–(वि.) ठार मारला, प्राणदंड दिला.
**वज्झ-भेरि**–(स्त्री.) वधाची दौंडी, वधाची घोषणा.
**वञ्चक**–(पु.) ठग, फसवा.
**वञ्चन**–(नपु.) फसवणूक.
**वञ्चना**–(स्त्री.) वंचना, फसवणूक.
**वञ्चनिक**–(वि.) फसलेला, ठगविलेला.
**वञ्चेति**–(क्रि.) फसणे.
**वञ्चेसि**–(पू. क्रि.) फसला.
**वञ्चित, वञ्चेन्त**–(कृ.) फसता.
**वञ्चेत्वा**–(पू. क्रि.) फसवून.
**वञ्जु**–(पु.) अशोक वृक्ष.
**वञ्झ**–(वि.) वंध्या, वांझ.
**वञ्झा**–(स्त्री.) वांझ स्त्री.
**वट**–(पु.) वट वृक्ष, वडाचे झाड.
**वटंसक**–(पु.) डोक्यावरील पुष्पमाळ, पुष्प-मुकुट.
**वटुम**–(नपु.) रस्ता, सडक, वाट, मार्ग.
**वट्ट**–(वि.) गोल.
**वट्ट**–(नपु.) चक्कर, वर्तुळ, घेरा, जन्म-मरणाचा फेरा, यान व्यवस्था.
**वट्टक जातक**–होला-लावा-पक्ष्याच्या सत्कर्माने जंगलास लागलेली आग विझल्याची कथा–(३५).
**वट्टक जातक**–होल्याने स्वतः उपाशी राहून मुक्ती मिळविल्याची कथा–(११८).
**वट्टक जातक**–होल्याने आपल्या मोठेपणाचे रहस्य कावळ्यास सांगितल्याची कथा–(३९४).
**वट्टक जातक**–[पहा–सम्मोदमान जातक].
**वट्टका**–(स्त्री.) होली, लावीण.
**वट्टति**–(क्रि.) फिरणे, योग्य होणे, ठीक होणे, वाजवी असणे.
**वट्टन**–(नपु.) फिरणे, योग्य, वाजवी.
**वट्टि, वट्टिका**–(स्त्री.) बत्ती, किनारा, कड.
**वट्टुल**–(वि.) वर्तुळ, गोलाकार.
**वट्टति**–(क्रि.) फिरणे, फिरविणे.
**वट्टेसि**–(पू. क्रि.) फिरले, फिरविले.
**वट्टित**–(कृ.) फिरता, फिरवता.
**वट्टेत्वा**–(पू. क्रि.) फिरून, फिरवून.
**वट्ठ**–(कृ.) वर्षाव झाला, वर्षला.
**वठर**–(वि.) स्थूल, लठ्ठ, मोठा.
**वड्ढ, वड्ढक**–(वि.) वर्धक, वाढणारा, विस्तृत होणारा.
**वड्ढन**–(नपु.) वर्धन, वाढ.
**वड्ढनक**–(वि.) वर्धित, वाढणारा.
**वड्ढकी**–(पु.) सुतार.
**वड्ढकी सूकर जातक**–डुकरांनी सिंहाला ठार मारल्याची कथा–(२८३).
**वड्ढति**–(क्रि.) वाढणे, मोठे होणे.
**वड्ढि**–(पू. क्रि.) वाढला, मोठा झाला.
**वड्ढित, वड्ढन्त**–(कृ.) वाढता, मोठा होता.
**वड्ढमान**–(कृ.) वाढण्यायोग्य, मोठा होण्यायोग्य.
**वड्ढित्त्वा**–(पू. क्रि.) वाढून, मोठा होऊन.
**वड्ढि**–(स्त्री.) वृद्धी, वाढ, व्याज.
**वड्ढेति**–(क्रि.) वाढविणे, मोठे करणे.

**वड्ढेसि**–(पू. क्रि.) वाढविले, मोठे केले.
**वड्ढित, वड्ढेन्त**–(कृ.) वाढविता, मोठे करता.
**वड्ढेत्वा**–(पू. क्रि.) वाढवून, मोठे करून.
**वण**–(नपु.) व्रण, जखम, दुखापत.
**वण-चोळक**–(नपु.) जखमेवर बांधण्याची पट्टी.
**वण-पटिकम्म**–(नपु.) जखमेची चिकित्सा, जखमेची तपासणी.
**वण-बन्धन**–(नपु.) जखम बांधण्याची पट्टी.
**वणिज्जा**–(स्त्री.) वाणिज्य, व्यापार.
**वणित**–(कृ.) जखमी, व्रणयुक्त.
**वणिप्पथ**–(पु.) व्यापारी देश.
**वणिब्बक**–(पु.) दरिद्री, याचक, भिकारी
**वण्ट, वण्टक**–(नपु.) देठ, डाहळी,
**वण्टिक**–(वि.) देठ असलेला.
**वण्ण**–(पु.) वर्ण, रंग, कातडीचा रंग.
**वण्णक**–(नपुं.) रंग, कपडे रंगविण्याचा रंग.
**वण्ण-कसिण**–(नपु.) चित्त एकाग्र करण्यासाठी वापरण्याचे रंगीत चक्र.
**वण्णद**–(वि.) वर्ण-रंग देणारा, सौंदर्य देणारा.
**वण्ण-धातु**–(स्त्री.) रंग.
**वण्ण-पोक्खरता**–(स्त्री.) रंगांचे सौंदर्य, स्वच्छ रंग.
**वण्ण-वन्तु**–(वि.) रंगदार, रंगीत.
**वण्ण-वादी**–(पु.) आत्म-प्रशंसक, स्वतःची स्तुति करणारा.
**वण्ण-सम्पन्न**–(वि.) सौंदर्यवान, सुंदर, वर्णयुक्त.
**वण्णदासी**–(स्त्री.) वेश्या, नगरवधू, गणिका.
**वण्णना**–(स्त्री.) व्याख्या, वर्णन, स्तुती.
**वण्णनीय**–(वि.) प्रशंसनिय, वर्णनीय, स्तुत्य.
**वण्णारोह जातक**–कोल्हयाने वाघ व चित्यात वैर निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याची कथा-(३६१).
**वण्णित**–(कृ.)- वर्णित, वर्णन केलेले, प्रशंसित.
**वण्णी**–(वि.) वर्णाचा, रंगाचा, मुखवट्याचा.
**वण्णु**–(स्त्री.) वाळू, रेती.
**वण्णु-पथ**–(पु.) वाळवंट, रेताड जमीन.
**वण्णुपथ-जातक**–सज्जनाच्या (सार्थवाह) सद्गुणांमुळे सर्वांचे प्राण वाचल्याची कथा-(२).
**वण्णेति**–(क्रि.) वर्णन करणे.
**वण्णेसि**–(पू. क्रि.) वर्णन केले.
**वण्णित, वण्णेन्त**–(कृ.) वर्णन करता, वर्णित.
**वण्णेतब्ब**–(कृ.) वर्णन करण्यायोग्य.
**वण्णेत्वा**–(पू. क्रि.) वर्णन करून.

**वत**–(अ.) निश्चयाने, निश्चित.
**वत**–(नपु.) व्रत, नियम.
**वत-पद**–(नपु.) नियमित, व्रत-पद.
**वतवन्तु**–(वि.) व्रती, नियमाने वागणारा, नियमबद्ध.
**वत-समादान**–(नपु.) व्रत-नियम-स्वीकारणे, पाळणे.
**वति, वतिका**–(स्त्री.) तट, कुंपण, कोट.
**वतिक**–(वि.) अभ्यासी, सराव असलेला.
**वत्त**–(नपु.) कर्तव्य, सेवाकार्य.
**वत्त-पटिवत्त**–(नपु.) सर्व कर्तव्ये.
**वत्त-सम्पन्न**–(वि.) कर्तव्यनिष्ठ, कर्तव्यतत्पर, कर्तव्यपालन करणारा.
**वत्तक, वत्तेतु**–(पु.) वागणारा, वर्तन करणारा, वर्तक.
**वत्तति**–(क्रि.) घडणे, वर्तन करणे.
**वत्ति**–(पू. क्रि.) घडले, वर्तन केले.
**वत्तन्त, वत्तितुं**–(कृ.) घडता, वर्तन करता.
**वत्तमान, वत्तितब्ब**–(कृ.) घडण्यायोग्य, वर्तनायोग्य, वर्तमान.
**वत्तित्वा**–(पू. क्रि.) घडून, वर्तन करून.
**वत्तन**–(नपु.) वर्तन, आचरण, वागणूक.
**वत्तना**–(स्त्री.) व्यवहार, आचरण, वागणूक.
**वत्तनी**–(स्त्री.) सडक, वाट, रस्ता, मार्ग.
**वत्तब्ब**–(कृ.) सांगण्यायोग्य.
**वत्तमान**–(वि.) विद्यमान, चालू, सध्या, वर्तमान.
**वत्तमान**–(पु.) वर्तमान काळ.
**वत्तमानक**–(वि.) विद्यमान, सध्याचा.
**वत्तमाना**–(स्त्री.) चालू काळ, चालू वेळ, वर्तमान काळ.
**वत्तिका**–(स्त्री.) बत्ती.
**वत्तितब्ब**–(कृ.) चालू ठेवणे योग्य.
**वत्ती**–(वि.) अभ्यासी, परिपाठी, अभ्यस्त.
**वत्तु**–(पु.) वक्ता, बोलणारा.
**वत्तुं**–(नपु.) बोलण्यासाठी, सांगण्याकरिता.
**वत्तेति**–(क्रि.) चालू ठेवणे, वर्तन करणे, वागणे.
**वत्तेसि**–(पू. क्रि.) चालू ठेवले, वागले.
**वत्तित, वत्तेन्त, वत्तेन्तु**–(कृ.) चालू ठेवता, वागता.
**वत्तेतब्ब**–(कृ.) चालू ठेवण्यायोग्य, वागण्यायोग्य.
**वत्तेत्वा**–(पू. क्रि.) चालू ठेवून, वागून.
**वत्थ**-(नपु.) वस्त्र, कापड.
**वत्थ-गुय्ह**–(नपु.) गुह्य स्थान, पडद्याआड, झाकून.
**वत्थन्तर**–(नपु.) वस्त्रांचे-कापडांचे नमुने-प्रकार.

**वत्थ-युग**–(नपु.) कापडाची जोडी, दोन कपडे.
**वत्थि**–(स्त्री.) वस्ती, गांव, मधला भाग, मुत्राशय.
**वत्थिकम्म**–(नपु.) मल-मूत्र विसर्जन, पोटाची सफाई.
**वत्थु**–(नपु.) वास्तु, स्थान, भूमि.
**वत्थुक**–(वि.) स्थानिक.
**वत्थु-कत**–(वि.) आधारित, आधार असलेला, आधार-कृत.
**वत्थु-गाथा**–(स्त्री.) संदर्भकाव्य, भूमिकेचे पद्य, आधार-गीत.
**वत्थु-देवता**–(स्त्री.) स्थानिक देवता.
**वत्थु-विज्जा**–(स्त्री.) गृहरचना, गृहनिर्माण शिल्प, गृहस्थापना, घर बांधणे, वास्तु-विद्या.
**वत्थु-विसद-किरिया**–(स्त्री.) मुख्य भागाची पूजा, महत्त्वाच्या जागेची शुद्धी, वास्तु-पूजा.
**वत्त्वा**–(पू. क्रि.) म्हणून, सांगून.
**वदञ्ञू**–(वि.) उदार.
**वदञ्ञुता**–(स्त्री.) उदारता, औदार्य, मोठेपणा.
**वदति**–(क्रि.) बोलणे, म्हणणे, सांगणे.
**वदि**–(पू. क्रि.) बोलला, म्हणाला, सांगितले.
**वुत्त, वदन्त**–(कृ.) बोलता, म्हणता, सांगता.
**वदमान, वत्तब्ब**–(कृ.) बोलण्या-म्हणण्या-सांगण्या-योग्य.
**वत्त्वा, वदित्त्वा**–(पू. क्रि.) बोलून, म्हणून, सांगून.
**वदन**–(नपु.) चेहरा.
**वदन**–(स्त्री.) वाणी, बोलणे.
**वदानिय**–(वि.) त्यागी, दानी, दानवीर, उदार, दानशूर.
**वदापन**–(नपु.) निरोप, बोलावणे.
**वदापेति**–(क्रि.) बोलावणे, बोलवून आणणे.
**वदेति**–(क्रि.) म्हणणे, बोलणे.
**वद्दलिका**–(स्त्री.) काळे ढग, पावसाचे ढग.
**वद्धापचायन**–(नपु.) वृद्धांचा सन्मान, मोठ्यांचा सत्कार, आदर.
**वध**–(पु.) ठार मारणे, प्राण दंड देणे.
**वधक**–(पु.) मारेकरी, ठार मारणारा.
**वधुका**–(स्त्री.) पुत्रवधु, सून, तरुण पत्नी.
**वधू**–(स्त्री.) नवरी, स्त्री, पत्नी.
**वधेति**–(क्रि.) ठार मारणे, चिडविणे, त्रास देणे.
**वधेसि**–(पू. क्रि.) ठार मारले, चिडविले, त्रास दिला.
**वधेन्त**–(कृ.) ठार मारता, चिडविता, त्रासदेता.
**वधित्त्वा**–(पू. क्रि.) ठार मारुन, चिडवून, त्रास देऊन.
**वन**–(नपु.) जंगल, अरण्य, कामवासना.
**वन-कम्मिक**–(पु.) जंगलात काम करणारा, लाकुड-तोडचा.
**वन-गहन**–(नपु.) घनदाट जंगल, निबिड अरण्य.
**वन-गुम्ब**–(पु.) दाट झाडी.
**वन-चर**–(वि.) अरण्यवासी, जंगली, जंगलात राहणारे-फिरणारे.
**वन-चरक**–(वि.) अरण्यांत फिरणारा, जंगली.
**वन-चारी**–(वि.) वनांत हिंडणारा- फिरणारा.
**वनथ**–(पु.) तृष्णा, अभिलाषा, तीव्र इच्छा, कामेच्छा.
**वन-दुग्ग**–(नपु.) महावन, भयानक जंगल, निबिड अरण्य.
**वन-देवता**–(स्त्री.) वनदेवी, वनदेवता.
**वनप्पति**–(पु.) विना फुलाचे फळ देणारे झाड, फुलाशिवाय फळ देणारा वृक्ष.
**वनप्पथ**–(नपु.) जंगलातील दूरचे ठिकाण.
**वनवास**–(पु.) तिसऱ्या संगीती (धम्मपरिषद) नंतर स्थविर रक्षित, (स्थविर धम्म रक्षित) यांना दक्षिण भारतातील उत्तर कर्नाटकात धम्म प्रचारार्थ पाठविलेले स्थान.
**वनवासी**–(वि.) जंगलात रहाणारा.
**वन-सण्ड**–(पु.) घन खंड, अरण्याचा- जंगलाचा भाग.
**वनिक**–(वि.) वनासंबंधी, विषय वासनेसंबंधी.
**वनिता**–(स्त्री., वि.) नारी, विषयासक्त स्त्री, कामुकलेली, उन्मादित स्त्री.
**वनिब्बक**–(पु.) भिकारी, याचक.
**वन्त**–(कृ.) सोडलेली, टाकलेली, परित्यक्त.
**वन्त-कसाव**–(वि.) दोष-विरहित, निर्दोष.
**वन्त-मल**–(वि.) निर्मळ, शुद्ध, पवित्र.
**वन्दक**–(वि.) वंदन करणारा, विनम्र, नमस्कार करणारा, प्रणाम करणारा.
**वन्दति**–(क्रि.) वंदन करणे, नमस्कार करणे.
**वन्दि**–(पू. क्रि.) वंदन केले, नमस्कार केला.
**वन्दित, वन्दन्त**–(कृ.) वंदन करता, नमस्कार करता.
**वन्दमान, वन्दिय, वन्दितब्ब**–(कृ.) वंदन करण्या-योग्य, नमस्कार करण्यायोग्य, वंदनीय.
**वन्दित्वा**–(पू. क्रि.) वंदन करून, नमस्कार करून.
**वन्दन**–(नपु.) नमस्कार, प्रणाम, वन्दन.
**वन्दना**–(स्त्री.) नमस्कार, वंदना.
**वन्दापन**–(नपु.) नमस्कार करणे, वंदन करणे.
**वन्दापेति**–(क्रि.) नमस्कार करणे, वंदन करणे.
**वन्दापेसि**–(पू. क्रि.) नमस्कार केला, वंदन केले.
**वन्दापित**–(कृ.) नमस्कार करता, वंदन करता.

**वन्दापेत्वा**–(पू. क्रि.) नमस्कार करून, वंदन करून.
**वपति**–(क्रि.) बी पेरणे, मुंडन करणे, केस काढणे.
**वपि**–(पू. क्रि.) बी पेरले, मुंडन केले, केस काढले.
**वपित, वपन्त, वुत्त**–(कृ.) बीज पेरता, मुंडन करता, केस काढता.
**वपित्त्वा**–(पू. क्रि.) बीज पेरून, मुंडन करून, केस काढून.
**वपन**–(नपु.) पेरणे, मुंडन करणे.
**वपु**–(नपु.) शरीर.
**वप्प**–(पु.) पेरणी, पेरा, मांसाचा भाग.
**वप्प-काल**–(पु.) पेरणीचा काळ, पेरणीचा हंगाम.
**वप्प-मङ्गल**–(नपु.) नांगरणीचा उत्सव, पेरणीचा उत्सव.
**वप्प थेर**–(पु.) पहिल्या पंचवर्गीय भिक्खुपैकी एक भिक्खु जे थेर पदापर्यंत पोहोचले होते.
**वमति**–(क्रि.) वमन करणे, त्यागणे, वांती करणे.
**वमि**–(पू. क्रि.) वमन केले, त्यागले, वांती केली.
**वन्त, वमित**–(कृ.) वमन करता, त्यागता, वांती करता.
**वमित्त्वा**–(पू. क्रि.) वमन करून, त्यागून, वांती करून.
**वमथु**–(पु.) वमन, वांती, टाकलेला पदार्थ.
**वम्भन**–(पु.) घृणा, तिरस्कार.
**वम्भी**–(पु.) घृणा करणारा, तिरस्कार करणारा.
**वम्भेति**–(क्रि.) घृणा करणे, तिरस्कार करणे.
**वम्भेसि**–(पू. क्रि.) घृणा केली, तिरस्कार केला.
**वम्भित, वम्भिन्त**–(कृ.) घृणा करता, तिरस्कार करता.
**वम्भेत्त्वा**–(पू. क्रि.) घृणा करून, तिरस्कार करून.
**वम्म**–(नपु.) कवच, चिलखत.
**वम्मी**–(पु.) कवचधारी, चिलखती.
**वम्मिक**–(पु.) वाळवीचे घर, वाळवीचे वारुळ.
**वम्मित**–(कृ.) कवच धारण केले.
**वम्मेति**–(क्रि.) कवच धारण करणे, कवच घालणे.
**वम्मेसि**–(पू. क्रि.) कवच धारण केले, कवच घातले.
**वम्मेन्त**–(कृ.) कवच धारण करता.
**वम्मित्वा**–(पू. क्रि.) कवच धारण करून.
**वय**–(पु., नपु.) आयुष्य, वय, हानी, नुकसान, खर्च.
**वय-करण**–(नपु.) खर्च, व्यय.
**वय-कल्याण**–(नपु.) तारुण्याचे आकर्षण.
**वयट्ठ**–(वि.) प्रौढ होणे, वयस्कर, जास्त वयाचा.
**वयप्पत्त**–(वि.) वयात आलेला, विवाहास योग्य.
**वयस्स**–(पु.) मित्र.
**वयोवुद्ध**–(वि.) वयोवृद्ध, वयाने जास्त, वयाने मोठा.
**वयोहर**–(वि.) आयुष्य हरण.
**वय्ह**–(नपु.) वाहन, गाडी.
**वर**–(वि.) श्रेष्ठ, थोर.
**वर**–(पु.) वरदान, देणगी.
**वरङ्गना**–(स्त्री.) वारांगना, विदुषी.
**वरद**–(वि.) वर देणारा.
**वरदान**–(नपु.) वर देणे, वरदान, देणगी.
**वर-पञ्ञ**–(वि.) श्रेष्ठ ज्ञान, श्रेष्ठ प्रज्ञा.
**वर-लक्खण**–(नपु.) श्रेष्ठ चिन्ह, श्रेष्ठ लक्षण.
**वरक**–(पु.) धान्य, वरी.
**वरण**–(पु.) वृक्ष.
**वरण जातक**–आळशी मुलाने सरपणासाठी ओली लाकडे आणली. त्यामुळे ती पेटू शकली नाहीत व स्वयंपाक तयार होऊ शकला नसल्याची कथा–(७१).
**वरत्ता**–(स्त्री.) चामड्याची पट्टी, वादी.
**वराक**–(वि.) बिचारा, बिचारी, दयापात्र, दया दाखविण्यायोग्य.
**वरारोहा**–(स्त्री.) सुंदर स्त्री, सुंदरी.
**वराह**–(पु.) डुक्कर.
**वराही**–(स्त्री.) डुकरीण.
**वलञ्ज**–(नपु.) मार्ग, रस्ता, उपयोग, मलत्याग, मल विसर्जन.
**वलञ्जनक**–(वि.) उपयुक्त, उपयोगात आणणे योग्य.
**वलञ्जियमान**–(वि.) उपयोगी.
**वलञ्जेति**–(क्रि.) रस्ता चालणे, मार्गक्रमण, उपयोगात आणणे, खर्च करणे.
**वलञ्जेसि**–(पू. क्रि.) रस्ता चालला, मार्गक्रमण केले, उपयोगात आणले, खर्च केला.
**वलञ्जित, वलञ्जेन्त**–(कृ.) रस्ता चालता, मार्गक्रमण करता, उपयोगात आणता, खर्च करता.
**वलञ्जेतब्ब**–(कृ.) मार्गक्रमण करण्यायोग्य, उपयोगात आणणे योग्य, खर्च करण्यायोग्य.
**वलञ्जेत्वा**–(पू. क्रि.) मार्गक्रमण करून, रस्ता चालून, उपयोगात आणून, खर्च करून.
**वलय**–(नपु.) कंगन, कांकण, वर्तुळ, कडे, वलय.
**वलयाकार**–(वि.) वर्तुळाकार, गोलाकार.
**वलाहक**–(पु.) ढग.
**वलाहस्स जातक**–वलाहक नावाच्या घोड्याने अडीचशे व्यापाऱ्यांचे रक्षन केल्याची कथा–(१९६).

**वलि**–(स्त्री.) सुरकुती, वळी.
**वलिक**–(वि.)अतिवृद्ध, ज्याच्या शरिरावर सुरकुत्या (वळ्या) पडल्या आहेत असा.
**वलित**–(कृ.) सुरकुतलेला.
**वलि-त्तच**–(वि.) सुरकुतलेली कातडी (त्वचा).
**वलिर**–(वि.) डोळे वटारलेला.
**वली**–(वि.) सुरकुतलेला.
**वलीमुख**–(पु.) वानर, ज्याच्या चेहेऱ्यावर सुरकुत्या पडल्या आहेत असा.
**वल्लकी**–(स्त्री.) सारंगी, वीणा.
**वल्लभ**–(वि.) प्रिय, प्रियकर, पती.
**वल्लभत्त**–(नपु.) आवडणे, प्रिय होणे.
**वल्लरी**–(स्त्री.) गुच्छ, फुलांचा झुबका.
**वल्लिहारक**–(पु.) माळी, वेलींचा संग्रह करणारा.
**वल्लिभ**–(पु.) दुधी भोपळा.
**वल्ली**–(स्त्री.) लता, वेली.
**वल्लूर**–(नपु.) वाळलेला मासा, सुकविलेला मासा, वांगडा.
**ववत्थपेति**–(क्रि.) व्यवस्था करणे, निश्चित करणे, ठरविणे.
**ववत्थपेसि**–(पू. क्रि.) व्यवस्था केली, निश्चित केले, ठरविले.
**ववत्थापित**–(कृ.) व्यवस्था करता, निश्चित करता, ठरविता.
**ववथपेत्वा**–(पू. क्रि.) व्यवस्था करून, निश्चित ठरवून.
**ववत्थापन**–(नपु.) स्थिर करणे, स्थापणे, निश्चित करणे, ठरविणे, व्यवस्थापन.
**ववत्थेति**–(क्रि.) फोड करणे, विश्लेषण करणे.
**ववत्थेसि**–(पू. क्रि.) फोड केली, विश्लेषण केले.
**ववत्थित**–(कृ.) फोड करता, विश्लेषण करता.
**ववत्थेत्वा**–(पू. क्रि.) फोड करून, विश्लेषण करून.
**वस**–(पु.) अधिकार, प्रभाव, छाप.
**वसग, वसङ्गत**–(वि.) दुसऱ्याच्या ताब्यांतील, अधिकाराखाली.
**वसवत्तक, वसवत्ती**–(वि.) शक्तीमान, सशक्त, बलिष्ठ, प्रभावशाली.
**वसवत्तन**–(नपु.) अधिकारी, सामर्थ्यवान, शक्तिशाली.
**वसानुग**–(वि.) आज्ञाधारक.
**वसानुवत्ति**–(वि.) आज्ञाधारक.
**वसति**–(क्रि.) राहणे.

**वसि**–(पू. क्रि.) राहिला.
**वसित, वसन्त, वुत्थ**–(कृ.) राहता.
**वसमान, वसितब्ब**–(कृ.) राहण्यायोग्य.
**वसित्वा**–(पू. क्रि.) राहून.
**वसन**–(नपु.) वस्त्र, कापड.
**वसन**–(नपु.) राहणे, राहण्याचे ठिकाण.
**वसनक**–(वि.) राहणारा, रहिवासी, राहत असता.
**वसनट्ठान**–(नपु.) वस्तीस्थान, राहण्याची जागा-ठिकाण.
**वसन्त**–(पु.) वसंत ऋतु.
**वसल**–(पु.) वृषल, अंत्यज, अस्पृश्य, अयोग्य, पापी, पाप, दुष्कर्म.
**वसवत्ती**–(पु.) समर्थ मार, शक्तिमान मार.
**वसा**–(स्त्री.) चरबी, मांदे, स्निग्ध मांस.
**वसापेति**–(क्रि.) वसविणे, राहावयास लावणे.
**वसापेसि**–(पू. क्रि.) वसविले, राहावयास लावले.
**वसापित**–(कृ.) वसविता, राहावयास लावता.
**वसापेत्वा**–(पू. क्रि.) वसवून, राहावयास लावून.
**वसिता**–(स्त्री.) ताब्यांत असणे, दक्षता, तत्परता.
**वसितुं**–(कृ.) राहण्यासाठी, राहण्यायोग्य.
**वसिप्पत्त**–(वि.) ताब्यात ठेवणारा.
**वसी**–(वि.) शक्तीमान, सामर्थ्यमान, शक्तीशाली.
**वसीकत**–(वि.) शक्तीने, ताकतीने, सामर्थ्याने.
**वसीभाव**–(पु.) ताब्यांत असणे, अधिकारात राहणे.
**वसीभूत**–(वि.) ताब्यांत, अधिकारात.
**वसु**–(नपु.) धन, संपत्ती.
**वसुधा, वसुन्धरा, वसुमति**–(स्त्री.) पृथ्वी.
**वस्स**–(पु., नपु.) वर्ष, साल, वर्षा, पाऊस.
**वस्स-काल**–(पु.) पावसाळा, वर्षाकाळ.
**वस्सग्ग**–(नपु.) भिक्षूचे श्रेष्ठपण, श्रेष्ठपणा.
**वस्सवर**–(पु.) नपुंसक, हांडगा, हिंजडा, वीर्यहीन.
**वस्सति**–(क्रि.) वर्षणे, वर्षाव करणे, पाऊस पडणे, आवाज करणे, आवाज काढणे.
**वस्सि**–(पू. क्रि.) वर्षला, पाऊस पडला, आवाज केला.
**वस्सिन्त, वस्सन्त, वुथ**–(कृ.) वर्षता, पाऊस पडता, आवाज करता.
**वस्सित्वा**–(पू. क्रि.) वर्षून, पाऊस पडून, आवाज करून.
**वस्सन**–(नपु.) वर्षाव, पाऊस, जनावरांचा आवाज.
**वस्साटिका**–(नपु., स्त्री.) भिक्षूंचे वर्षावासातील चीवरा-खेरीज असलेले जादा वस्त्र.
**वस्सान**–(पु.) पाऊस, पावसाळा, वर्षा ऋतु.

**वस्सापनक**–(वि.) वर्षाव करणारा.

**वस्सापेति**–(क्रि.) वर्षाव करणे, पाऊस पाडणे.

**वस्सापेसि**–(पू. क्रि.) वर्षाव केला, पाऊस पाडला.

**वस्सापित**–(कृ.) वर्षाव करता, पाऊस पाडता.

**वस्सापेत्वा**–(पू. क्रि.) वर्षाव करून, पाऊस पाडून.

**वस्सिक**–(वि.) वर्षा ऋतुसंबंधी, पावसाळ्याविषयी.

**वस्सिका**–(स्त्री.) चमेली.

**वस्सित**–(कृ.) भिजलेला.

**वहति**–(क्रि.) धारण करणे, सहन करणे, वाहणे.

**वहि**–(पू. क्रि.) धारण केले, सहन केले, वाहिले.

**वहित, वहन्त**–(कृ.) धारण करता, सहन करता, वाहता.

**वहितब्ब**–(कृ.) धारण करण्यायोग्य, सहन करण्यासारखे, वाहण्यायोग्य.

**वहित्वा**–(पू. क्रि.) धारण करून, सहन करून, वाहून.

**वहन**–(नपु.) वाहणे, घेऊन जाणे, सहन करणे.

**वहनक**–(वि.) आणणारा, वाहणारा, घेऊन जाणारा.

**वहितु**–(पु.) धारण करणारा, वाहणारा, सहन करणारा.

**वळवा**–(स्त्री.) घोडी.

**वळवा-मुख**–(नपु.) समुद्रातील आग.

**वंस**–(पु.) जात, वंश-परंपरा, वासा, बांबू, वेळू, वेळूची बासरी, मुरली.

**वंस**–(विशे. ना.) कोसल गणराज्याच्या दक्षिणेकडील प्रदेश यमुना नदी काठी वसलेली कोसम्बी ही वंसाची राजधानी होती.

**वसं-कळीर**–(पु.) वेळूचा कोंब, बांबूचा अंकूर.

**वंसज**–(वि.) वंशात जन्मलेला, कुळांत जन्मलेला.

**वंस-वण्ण**–(पु.) बहुमोल नीलरत्न, नीलरत्न, नीलमणी इंद्रनील-वैडूर्य.

**वंसागत**–(वि.) वंशपरंपरेने मिळालेले, वडिलार्जित.

**वंसानुपालक**–(वि.) वंशपरंपरा टिकविणारा.

**वंसिक**–(वि.) वंशासंबंधी, घराण्यासंबंधी.

**वा**–(अ.) वा, अथवा, किंवा.

**वाक**–(नपु.) झाडाची साल.

**वाक-चीर**–(नपुं.) वल्कल, वनस्पतीच्या सालीपासून किंवा पानांपासून बनविलेले वस्त्र.

**वाकमय**–(वि.) सालीपासून बनविलेले वस्त्र, वल्कल.

**वाकरा, वागुरा**–(स्त्री.) हरीण पकडण्याचे जाळे, वागर.

**वाक-करण**–(नपु.) चर्चा, विचार, विनिमय.

**वाक्य**–(नपु.) सार्थ शब्द समूह, पुर्‍या अर्थाचे बोलणे. टोमणा.

**वागुरिक**–(पु.) जाळ्याचा-वागरेचा उपयोग करणारा, शिकारी, वागरवाला.

**वाचक**–(पु.) शिक्षक, पाठक, वाचणारा, अभ्यास करणारा.

**वाचनक**–(नपु.) पाठ, धडा.

**वाचना-मग्ग**–(पु.) पाठ करण्याची पद्धती, वाचण्याची रीत, पाठांतराची पद्धती.

**वाचसिक**–(वि.) वाणीसंबंधी, बोलण्याविषयी, वाचसिक.

**वाचा**–(स्त्री.) शब्द, वाणी, वाचा.

**वाचानुरक्खी**–(वि.) संयमाने बोलणारा.

**वाचाल**–(वि.) व्यर्थ बडबडणारा, वाचाळ.

**वाचुग्गत**–(वि.) तोंडपाठ, कंठस्थ.

**वाचेति**–(क्रि.) शिकणे, शिकविणे, पाठ करणे.

**वाचेसि**–(पू. क्रि.) शिकला, शिकविले, पाठ केले.

**वाचित, वाचेन्त**–(कृ.) शिकता, शिकविता, पाठ करता.

**वाचेतब्ब**–(कृ.) शिकण्या-शिकविण्यायोग्य, पाठ करण्यायोग्य.

**वाचेत्वा**–(पू. क्रि.) शिकून, शिकवून, पाठ करून.

**वाचेतु**–(पु.) शिकणारा, शिकविणारा.

**वाज**–(पु.) बाणाचे-तीराचे पंख, पेयपदार्थ.

**वाजपेय्य**–(नपु.) यज्ञाचा एक प्रकार.

**वाजी**–(पु.) घोडा.

**वाट, वाटक**–(पु.) घेरा, तट, कुंपण.

**वाणिज, वाणिजक**–(पु.) व्यापारी.

**वाणिज्ज**–(नपु.) व्यापार.

**वाणी**–(स्त्री.) शब्द, बोल, वाणी, वाचा.

**वात**–(पु.) वायु, वारा, हवा, वात.

**वात-घातक**–(पु.) वृक्ष, वारा, अडविणारे झाड.

**वात-जव**–(वि.) वायुवेग.

**वातपान**–(नपु.) खिडकी, झरोका.

**वात-मण्डलिका**–(स्त्री.) चक्रीवादळ, झंझावात.

**वात-रोग**–(पु.) वायुरोग, पोटांत वात धरणे, वायु धरणे.

**वाताबाध**–(पु.) हवेद्वारे पसरणारा रोग, आजार.

**वात-वट्ठि**–(स्त्री.) वारा आणि पाऊस बरोबर येणे, वादळी पाऊस.

**वात-वेग**–(पु.) हवेचा जोर.

**वातग्ग-सिन्धव जातक**–गाढवीने आपल्या प्रेमपात्र घोड्यास लत्ता प्रहार करून मारले व शेवटी त्याच्या वियोगाने तिने प्राण सोडल्याची कथा-(२६६).

**वातमिग जातक**–वात नावाचा मृग (हरीण) वाऱ्याच्या आशेने फाशात अडकला गेल्याची कथा-(१४).
**वातातप**–(पु.) हवा आणि उष्णता, उष्णवारे.
**वाताभिहत**–(वि.) वाऱ्याचा तडाखा बसलेला, सोसाट्याच्या वाऱ्याने हाललेला, मोडलेला.
**वातायन**–(नपु.) खिडकी, झरोका.
**वाताहत**–(वि.) वाऱ्याने उडवून आणलेला, वाताहत.
**वाति**–(क्रि.) वाहणे, चालणे.
**वातिक**–(वि.) वाऱ्याविषयी, वायुसंबंधी, हवेबाबत.
**वातेरित**–(वि.) वाऱ्याने चालणारी, पवनचक्की.
**वाद**–(पु.) सिद्धांत, वाद.
**वाद-काम**–(वि.) वाद-विवाद करणारा, शास्त्रार्थ सांगणारा.
**वादक्खित्त**–(वि.) वाद-विवादात उकरून काढलेला.
**वाद-पथ**–(पु.) वादाचे कारण, वाद-विवादाचा आधार.
**वादक**–(पु.) वाद्य वाजविणारा, वादक.
**वादित्त**–(नपु.) वाजविणे, आवाज काढणे.
**वादी**–(पु.) मत मांडणारा, सिद्धांत मांडणारा.
**वादेति**–(क्रि.) वाद्य वाजविणे.
**वान**–(नपु.) तृष्णा, अभिलाषा, इच्छा, स्वार्थ, ब्राजले विणणे.
**वानर**–(पु.) वानर.
**वानर जातक**–वानराने मगरीला फसविल्याची कथा-(३४२).
**वानरी**–(स्त्री.) वानरी.
**वानरिन्द**–(पु.) वानरांचा राजा.
**वानरिन्द जातक**–वानरांच्या राजाने उपल्याने मगरमच्छाला फसविल्याची कथा-(५७).
**वापी**–(स्त्री.) तळे, तलाव, पुष्करणी.
**वापित**–(कृ.) पेरले गेले.
**वाम**–(वि.) डावा.
**वाम-पस्स**–(नपु.) डावी बाजू.
**वामन**–(पु., वि.) ठेंगू, फार गिड्डा, ठेंगणा.
**वामनक**–(वि.) ठेंगणा माणूस, ठेंगू.
**वाय**–(पु., नपु.) विणणे.
**वायति**–(क्रि.) वाहणे, चालणे, सुगंध पसरणे.
**वायि**–(पू. क्रि.) वाहिले, चालले, सुगंध पसरला.
**वायन्त**–(कृ.) वाहता, चालता, सुगंध पसरता.
**वायमान**–(कृ.) वाहण्या-चालण्यायोग्य, सुगंध पसरण्यायोग्य.
**वायित्वा**–(पू. क्रि.) वाहून, चालून, सुगंध पसरून.
**वायति**–(क्रि.) कापड विणणे.
**वायन**–(नपु.) वारा वाहणे, सुगंध पसरणे.
**वायन-दण्डक**–(पु.) कापड विणण्याचा माग.
**वायमति**–(क्रि.) प्रयत्न करणे.
**वायमि**–(पू. क्रि.) प्रयत्न केला.
**वायमन्त**–(कृ.) प्रयत्न करता.
**वायमित्वा**–(पू. क्रि.) प्रयत्न करून.
**वायस**–(पु.) कावळा.
**वायसारि**–(नपु.) घुबड.
**वायाम**–(पु.) प्रयत्न, प्रयास, व्यायाम.
**वायित**–(कृ.) विणलेला, वारा वाहणे.
**वायिम**–(वि.) विणलेला.
**वायेति**–(क्रि.) विणून घेणे.
**वायु**–(नपु.) हवा, वारा, वायु.
**वायो**–(नपु.) वारा.
**वायोकसिण**–(नपु.) चित्ताच्या एकाग्रतेसाठी वायु हा ध्यान धारणेचा विषय बनविणे, श्वास रोखून धरणे.
**वायो-धातु**–(स्त्री.) वायु-तत्त्व.
**वार**–(पु.) बारी, संधी, रेळ.
**वारक**–(पु.) घडा, मडके, मोठे भांडे, मातीची घागर.
**वारण**–(पु.) हत्ती, बहिरी ससाण्याची एक जात.
**वारण**–(नपु.) निवारण करणे, थांबविणे, बाजूस सारणे.
**वारि**–(नपु.) जल, पाणी.
**वारि-गोचर**–(वि.) जलचर, पाण्यात राहणारा.
**वारिज**–(वि.) पाण्यात जन्मणारे, उत्पन्न होणारे.
**वारिज**–(पु.) मासा.
**वारिज**–(नपु.) कमळ.
**वारि-मग्ग**–(पु.) नाला, पाण्याचा पाट, जलमार्ग.
**वारित**–(कृ.) निवारण केले, थांबविले, बाजूस सारले.
**वारित्त**–(नपु.) न करणे, न करण्यायोग्य कार्य.
**वारियमान**–(वि.) अडविलेला, अडथळा दिलेला, मनाई केलेला.
**वारुणी**–(स्त्री.) दारू, मदिरा.
**वारुणी जातक**–शिष्याने दारूत मीठ मिसळून आपल्या गुरुला दारू दिल्याची कथा-(४७).
**वारेति**–(क्रि.) मनाई करणे, अडथळा देणे, थांबविणे.
**वारेसि**–(पू. क्रि.) मनाई केली, अडथळा दिला, थांबविला.
**वारेन्त**–(कृ.) मनाई करता, अडथळा देता, थांबविता.

**वारियमान, वारेतब्ब**–(कृ.) मनाई करण्यायोग्य, अडथळा देण्यायोग्य, थांबविण्यायोग्य.

**वारेत्वा**–(पू. क्रि.) मनाई करून, अडथळा देऊन, थांबवून.

**वाल**–(पु.) शेपटीचे केस.

**वाल**–(वि.) भयानक, ईर्षाळू.

**वाल-कम्बल**–(नपु.) घोड्याच्या केसांची काम्बळी.

**वालग्ग**–(नपु.) केसाचे टोक, केसाचा शेंडा, केसाग्र.

**वालण्डुपक**–(पु., नपु.) घोड्याच्या केसांचा बनविलेला कुंचला, ब्रश.

**वाल-बीजनी**–(स्त्री.) चवरी, केसांचा झुबका.

**वाल-वेधी**–(पु.) केसाचा वेध घेणारा धनुर्धारी, केस तोडणारा धनुर्धारी.

**वालधी**–(पु.) शेपटी, शेपटीचे केस–केसांचा पुंजका.

**वालिका, वालुका**–(स्त्री.) वाळू, रेति.

**वालुका-कन्तार**–(पु.) वाळवंट.

**वालुका-कुञ्ज**–(पु.) वाळूचा ढीग.

**वालुका-पुलिन**–(नपु.) वाळूकिनारा, वाळूतट.

**वालोदक जातक**–घोड्यांना आणि गाढवांना अंगुरासव (दारू) पाजल्याची कथा–(१८३).

**वास**–(पु.) राहणे, प्रवास, यात्रा, सफर, वस्त्र, कापड, सुगंध.

**वास-चुण्ण**–(नपु.) सुगंधित चूर्ण, सुगंधी उटणे.

**वासट्ठान**–(नपु.) वसतीस्थान, राहण्याचे ठिकाण.

**वासन**–(नपु.) सुगंधित करणे, वसविणे, राहावयास लावणे.

**वासना**–(स्त्री.) पूर्व संस्कार, पूर्व स्मृती, इच्छा, वासना.

**वास-योग**–(पु.) स्नानचूर्ण, सुगंधी उटणे.

**वासर**–(पु.) दिन, दिवस.

**वासव**–(पु.) इंद्र.

**वासि**–(स्त्री.) सुताराची तासणी.

**वासि-जट**–(नपु.) तासणीची मूठ, तासणीचा दांडा.

**वासि-फल**–(नपु.) तासणी, लोखंडी फळ.

**वासिक, वासी**–(पु.) राहणारा, निवासी, रहिवासी.

**वासितक**–(नपु.) सुवासिक चूर्ण, सुगंधित पीठ.

**वासेति**–(क्रि.) राहावयास लावणे, वसविणे, सुवासिक करणे.

**वासेसि**–(पू. क्रि.) वसविले, सुवासिक केले.

**वासित**–(कृ.) वसविता, सुवासिक करता.

**वासेत्वा**–(पू. क्रि.) वसवून, सुवासिक करून.

**वाह**–(वि.) घेऊन जाणारा, मार्गदर्शक.

**वाह**–(पु.) नेता, पुढारी, गाडी, गाडीतील माल, ओझे वाहणारा पशु, जलधारा.

**वाहक**–(पु.) भार किंवा ओझे वाहणारा-घेऊन जाणारा.

**वाहन**–(नपु.) गाडी.

**वाहसा**–(अ.) कारणाने, च्यामुळे.

**वाहिनी**–(स्त्री.) सेना, सैन्य, नदी.

**वाही**–(वि.) वाहणारा, घेऊन जाणारा.

**वाहेति**–(क्रि.) घेऊन जाणे, वाहणे.

**विकच**–(वि.) विकसित, फुललेले, पुर्ण वाढलेले.

**विकट**–(वि.) परिवर्तित, बदललेला.

**विकट**–(नपु.) घाण.

**विकण्णक जातक**–राजाला कळले की, आपल्या संगीतावर तलावातील मासे आणि कासवे मोहित होतात, तेव्हा त्याने मासे–कासवांना रोज खाद्य घालण्याची व्यवस्था केल्याची कथा-(२३३).

**विकति**–(स्त्री.) विकृति, प्रकार, तऱ्हा.

**विकतिक**–(वि.) नाना आकार-प्रकारचे, विविध, बहुविध.

**विकत्थक, विकत्थी**–(पु.) घमेंडखोर, गर्विष्ठ.

**विकत्थति**–(क्रि.) घमेंड करणे, गर्व करणे.

**विकत्थि**–(पू. क्रि) घमेंड केली, गर्व केला.

**विकत्थित**–(कृ.) घमेंड करता, गर्व करता.

**विकत्थित्वा**–(पू. क्रि.) घमेंड करून, गर्व करून.

**विकन्तन**–(नपु.) कापणे, कापण्याचा चाकू.

**विकप्प**–(पु.) विचार, विकल्प, अनिश्चय.

**विकप्पन**–(नपु.) अस्थिरता.

**विकप्पेति**–(क्रि.) संकल्प करणे, व्यवस्था करणे, परिवर्तित करणे, बदलणे.

**विकप्पेसि**–(पू. क्रि.) संकल्प केला, व्यवस्था केली, परिवर्तित केले, बदलले.

**विकप्पित, विकप्पेन्त**–(कृ.) संकल्प करता, व्यवस्था करता, परिवर्तित करता, बदलता.

**विकप्पेत्वा**–(पू. क्रि.) संकल्प करून, व्यवस्था करून, परिवर्तित करून, बदलून.

**विकम्पति**–(क्रि.) कापणे, थरथरणे, शहारणे.

**विकम्पि**–(पू. क्रि.) कापला, थरथरला, शहारला.

**विकम्पित**–(कृ.) कापता, थरथरता, शहारता.

**विकम्पमान**–(कृ.) कापण्यायोग्य, थरथरण्यायोग्य, शहारण्यायोग्य.

**विकम्पित्वा**–(पू. क्रि.) कापून, थरथरून, शहारून.

**विकम्पन**–(नपु.) कापणे, थरथरणे, शहारणे, थरकाप.

**विकरोति**–(क्रि.) बदलणे, परिवर्तन घडविणे.

**विकरि**–(पू. क्रि.) बदलला, परिवर्तन घडविले.
**विकत**–(कृ.) बदलता, परिवर्तन घडविता.
**विकरित्वा**–(पू. क्रि.) बदलून, परिवर्तन घडवून.
**विकल**–(वि.) सदोष, अभावपूर्ण, दोषपूर्ण.
**विकलक**–(वि.) कमी, कमतरता असलेला, अभावयुक्त.
**विकसति**–(क्रि.) वाढणे, विकसित होणे.
**विकसि**–(पू. क्रि.) वाढला, विकसित झाला.
**विकसित**–(कृ.) वाढता, विकसित होता.
**विकसित्वा**–(पू. क्रि.) वाढून, विकसित होऊन.
**विकार**–(पु.) परिवर्तन, बदल, **विकृति**.
**विकाल**–(पु.) अयोग्य वेळ, अवेळ, मध्यान्हीनंतर, रात्री.
**विकाल-भोजन**–(नपु.) अवेळी जेवणे, मध्यान्हीनंतर जेवणे, रात्री जेवणे.
**विकास**–(पु.) वाढ, फैलाव, प्रसार, विस्तार, विकास.
**विकासेति**–(क्रि.) वाढ होणे, चमकणे, पसरणे.
**विकासेसि**–(पू. क्रि.) वाढ झाली, चमकला, पसरला.
**विकासित**–(कृ.) वाढता, चमकता, पसरता.
**विकासेत्वा**–(पू. क्रि.) वाढ होऊन, चमकून, पसरून.
**विकिण्ण**–(कृ.) विकिर्ण, पसरलेला, विस्कटलेला.
**विकेसिक**–(वि.) विखुरलेल्या केसांचा.
**विकिरण**–(नपु.) विखुरलेला, विस्कटलेला.
**विकिरति**–(क्रि.) विखुरणे, पसरणे, शिंपणे, विस्कटणे.
**विकिरि**–(पू. क्रि.) विखुरला, पसरला, शिंपला, विस्कटला.
**विकिरन्त**–(कृ.) विखुरता, पसरता, विस्कटता.
**विकिरमान**–(कृ.) विखुरण्यायोग्य, पसरण्यायोग्य, शिंपण्यायोग्य, विस्कटण्यायोग्य.
**विकिरित्वा**–(पू. क्रि.) विखरून, पसरून, शिंपून, विस्कटून.
**विकिरीयति**–(क्रि.) विखुरले जाते, पसरले जाते, विस्कटते.
**विकुणित**–(कृ.) विकृत, बदलेला.
**विकुब्बति**–(क्रि.) परिवर्तन करणे, बदलणे.
**विकुब्बि**–(पू. क्रि.) परिवर्तन केले, बदलले.
**विकुब्बित**–(कृ.) परिवर्तन करता, बदलता.
**विकुब्बित्वा**–(पू. क्रि.) परिवर्तन करून, बदलून.
**विकुब्बन**–(नपु.) ऋद्धि बलाचे प्रदर्शन, अदृश्य व अलौकिक शक्ती दाखविणे.
**विकूजति**–(क्रि.) आवाज काढणे, बोलणे, चिव चिवणे.
**विकूजि**–(पू. क्रि.) आवाज काढला, बोलला, चिवचिवला.
**विकूजित**–(कृ.) आवाज काढता, बोलता, चिवचिवता.
**विकूजित्वा**–(पू. क्रि.) आवाज काढून, बोलून, चिवचिवून.
**विकूजन**–(नपु.) पक्षांचे कूंजन, पक्षांची चिवचिव-किलबिल.
**विकूल**–(वि.) उतार, उतरण, घसार.
**विकोपन**–(नपु.) रागावणे, नुकसान करणे.
**विकोपेति**–(क्रि.) रागावणे, नुकसान करणे, हानी करणे.
**विकोपेसि**–(पू. क्रि.) रागावला, नुकसान केले, हानी केली.
**विकोपित, विकोपेन्त**–(कृ.) रागावता, नुकसान करता, हानी करता.
**विकोपेत्वा**–(पू. क्रि.) रागावून, नुकसान करून, हानी करून.
**विक्कन्त**–(नपु.) विक्रांतभाव, शौर्य, वीरता.
**विक्कन्दति**–(क्रि.) ओरडणे, आरडणे, मोठा आवाज काढणे.
**विक्कम**–(पु.) विक्रम, पराक्रम, शौर्य, शक्ती.
**विक्कमन**–(नपु.) प्रयास, प्रयत्न, गमन.
**विक्कय**–(पु.) विक्रय, विक्री, विकणे.
**विक्कय-भण्ड**–(नपु.) विक्रीचा माल, विक्रीचे सामान, विक्रीच्या वस्तू.
**विक्कयिक, विक्केतु**–(पु.) विकणारा, विक्रेता.
**विक्किणाति**–(क्रि.) विकणे.
**विक्किणि**–(पू. क्रि.) विकले.
**विक्किणित, विक्किणीत, विक्किणन्त, विक्किणितु**–(कृ.) विकता, विक्रय करता.
**विक्किणित्वा**–(पू. क्रि.) विकून.
**विक्खम्भ**–(पु.) व्यास, वर्तुळमध्यातून जाऊन वर्तुळाचे दोन समान भाग करणारी सरळ रेषा.
**विक्खम्भन**–(नपु.) थांबविणे, त्याग करणे, घुसळणे, दाबणे.
**विक्खम्भेति**–(क्रि.) त्यागणे, दाबणे, दूर सारणे, दूर करणे.
**विक्खम्भिति**–(पू. क्रि.) त्यागले, दाबले, दूर सारले, दूर केले.
**विक्खम्भेन्त, विक्खम्भित**–(कृ.) त्यागता, दाबता, दूर सारता, दूर करता.
**विक्खम्भेत्वा**–(पू. क्रि) त्यागून, दाबून, दूर सारून, दूर करून.

**विक्खालेति**–(क्रि.) धुणे, स्वच्छ करणे.
**विक्खालेसि**–(पू. क्रि.) धुतले, स्वच्छ केले.
**विक्खालित**–(कृ.) धुता, स्वच्छ करता.
**विक्खालेत्वा**–(पू. क्रि.) धुऊन, स्वच्छ करून.
**विक्खित्त**–(कृ.) विक्षिप्त, असंबद्ध.
**विक्खित्त-चित्त**–(वि.) अस्वस्थ चित्त, खुळा, पागल, वेडा, असंबद्ध वर्तन.
**विक्खित्तक**–(वि.) सर्वत्र विसकटलेला, अस्ताव्यस्त पडलेला.
**विक्खित्तक**–(नपु.) प्रेत, मृतदेह, मढे.
**विक्खिपति**–(क्रि.) विक्षिप्त होणे, असंबद्ध होणे, वेड लागणे.
**विक्खिपि**–(पू. क्रि.) विक्षिप्त झाला, असंबंध झाला, वेड लागले.
**विक्खिपन्त**–(कृ.) विक्षिप्त होता, असंबद्ध होता, वेड लागता.
**विक्खिपित्वा**–(पू. क्रि.) विक्षिप्त होऊन, असंबद्ध होऊन, वेड लागून.
**विक्खिपन**–(नपु.) वेड, गडबड, गोंधळ, असंबद्धता.
**विक्खेप**–(पु.) गडबड, गोंधळ.
**विक्खेपक**–(वि.) गडबड-गोंधळ करणारा.
**विक्खोभन**–(नपु.) विक्षोभ, क्षोभ, धावपळ, गडबड.
**विक्खोभेति**–(क्रि) धक्का मारून हालविणे, क्षुब्ध करणे.
**विक्खोभेसि**–(पू. क्रि.) धक्का मारला, क्षुब्ध केले.
**विक्खोभित**–(कृ.) धक्का मारता, क्षुब्ध करता.
**विक्खोभेत्वा**–(पू. क्रि.) धक्का मारून, क्षुब्ध करून.
**विगच्छति**–(क्रि.) निघून जाणे, निरोप घेणे.
**विगच्छि**–(पू. क्रि.) निघून गेला, निरोप घेतला.
**विगच्छन्त**–(कृ.) निघून जाता, निरोप घेता.
**विगच्छमान**–(कृ.) निघून जाणेयोग्य, निरोप घेण्यायोग्य.
**विगच्छित्वा**–(पू. क्रि.) निघून जाऊन, निरोप घेऊन.
**विगत**–(कृ.) निघून गेला, विरहित झाला.
**विगत-खिल**–(वि.) दोष रहित, निर्दोष.
**विगत-रज**–(वि.) रज रहित, सत्त्व नसलेला.
**विगास**–(वि.) तृष्णा रहित, निर्मोही, निरिच्छ.
**विगासव**–(वि.) चित्तमल गेलेला, अर्हत विशुद्ध वृत्तीचा.
**विगम**–(पु.) जाणे, निरोप घेणे, प्रस्थान.
**विगमन**–(नपु.) जाणे, प्रस्थान करणे.
**विगय्ह**–(पू. क्रि.) दाखल होऊन, बुडून, आत जाऊन.

**विगरहति**–(क्रि.) निंदा करणे, शिवी देणे, अपशब्द बोलणे.
**विगरहि**–(पू. क्रि.) निंदा केली, शिवी दिली, अपशब्द बोलला.
**विगरहत**–(कृ.) निंदा करता, शिवी देता, अपशब्द बोलता.
**विगरहित्वा**–(पू. क्रि.) निंदा करून, शिवी देऊन, अपशब्द बोलून.
**विगलित**–(कृ.) पतित, स्थानभ्रष्ट, पदभ्रष्ठ.
**विगाहति**–(क्रि.) आत जाणे, बुडणे.
**विगाहि**–(पू. क्रि.) आत गेला, बुडला.
**विगाळ्ह, विगाहिन्तु**–(कृ.) आत जाता, बुडता.
**विगाहमान**–(कृ.) आत जाण्यायोग्य, बुडण्यायोग्य.
**विगाहित्वा, विगाहेत्वा**–(पू. क्रि.)आत जाऊन, बुडून.
**विगाहन**–(नपु.) आत जाणे, बुडणे.
**विग्गय्ह**–(पू. क्रि.) फोड करून, विग्रह करून, वेगळे करून.
**विग्गह**–(पु.) भांडण, झगडा, वाद-विवाद, शरीर, शब्द व्युत्पत्ती, विग्रह.
**विग्गाहिक-कथा**–भांडणाची चर्चा, भांडणाविषयी बोलणे.
**विघट्टन**–(नपु.) प्रहार करणे, फोडणे.
**विघाटन**–(नपु.) उद्‌घाटन, उघडणे, सुरू करणे, सैल करणे.
**विघाटेति**–(क्रि.) उद्‌घाटन करणे, उघडे करणे, खुले करणे.
**विघाटेसि**–(पू. क्रि.) उद्‌घाटन केले, उघडे केले, खुले केले.
**विघाटित, विघाटेन्त**–(कृ.) उद्‌घाटन करता, उघडता, खुले करता.
**विघाटेत्वा**–(पू. क्रि.) उद्‌घाटन करून, उघडून, खुले करून.
**विघात**–(पु.) विनाश, दुरवस्था, विद्वेष.
**विघातेति**–(क्रि.) हत्या करणे, ठार मारणे, नष्ट करणे.
**विघातेसि**–(पू. क्रि.) हत्या केली, ठार मारले, नष्ट केले.
**विघातित**–(कृ.) हत्या करता, ठार मारता, नष्ट करता.
**विघातेत्वा**–(पू. क्रि.) हत्या करून, ठार मारून, नष्ट करून.
**विघास**–(पु.) शिल्लक राहिलेले अन्न.
**विघासाद**–(पु., वि.) उष्टे अन्न खाणारा, भिकारी.
**विघास जातक**–तपस्व्याने आपल्या तपस्वी जीवनाचे स्वरूप स्पष्ट केल्याची कथा-(३९३).

**विचक्खण**–(वि.) विलक्षण, चतुर, बुद्धिमान, हुषार.
**विचक्खण**–(पु.) बुद्धीमान, मनुष्य.
**विच्चय**–(पु.) धार्मिक विवेचन-चर्चा, धर्म-विचार.
**विचरण**–(नपु.) हिंडणे-फिरणे, येणे-जाणे, विचरण.
**विचरति**–(क्रि.) फिरणें, ये-जा करणे, विचरण करणे.
**विचरि**–(पू. क्रि.) फिरला, ये-जा केली, विचरण केले.
**विचरित, विचरन्त, विचरितुं**–(कृ.) फिरता, ये-जा करता.
**विचरमान**–(कृ.) फिरण्यायोग्य, ये-जा करण्यायोग्य.
**विचरित्वा**–(पू. क्रि.) फिरून, ये-जा करून, विचारण करून.
**विचार**–(पु.), **विचारण**–(नपु.), **विचारणा**–(स्त्री.)– शोधणे, चिंतन करणे, व्यवस्था करणे, योजना, बनविणे.
**विचारक**–(पु.) विचार करणारा, शोधणारा, व्यवस्थापक.
**विचारेति**–(क्रि.) विचार करणे, योजना करणे, व्यवस्था करणे.
**विचारेसि**–(पू. क्रि.) विचार केला, योजना केली, व्यवस्था केली.
**विचारित, विचारेन्त**–(कृ.) विचार करता, योजना करता, व्यवस्था करता.
**विचारेत्वा**–(पू. क्रि.) विचार करून, योजना करून, व्यवस्था करून.
**विचिकिच्छति**–(क्रि.) संशय धरणे, कचरणे, धरसोड करणे, शंका येणे.
**विचिकिच्छि**–(पू. क्रि.) संशय धरला, कचरला, धरसोड केली, शंका आली.
**विचिकिच्छित**–(कृ.) संशय धरता, कचरता, धरसोड करता.
**विचिकिच्छित्वा**–(पू. क्रि.) संशय धरून, कचरून, धरसोड करून.
**विचिकिच्छा**–(स्त्री.) संशय, शंका, संदेह.
**विचिण्ण**–(कृ.) निवडलेला, नियुक्त.
**विचित्त**–(कृ.) निवडला, नियुक्त केला.
**विचित्त**–(वि.) विचित्र, सजविलेला, नटविलेला, अलंकृत.
**विचिनन**–(नपु.) विवेचन करणे, विचार करणे, चर्चा करणे, निवडणे.
**विचिनाति**–(क्रि.) विचार करणे, निवडणे, संग्रह करणे.
**विचिनि**–(पू. क्रि.) विचार केला, निवडले, संग्रह केला.
**विचित, विचिनन्त**–(कृ.) विचार करता, निवडता, संग्रह करता.
**विचिनित्वा**–(पू. क्रि.) विचार करून, निवडून, संग्रह करून.
**विचिन्तिय**–(पू. क्रि.) विचार करून.
**विचिन्तेति**–(क्रि.) विचार करणे, मनन करणे, चिंतन करणे.
**विचिन्तेसि**–(पू. क्रि.) विचार केला, मनन केले, चिंतन केले.
**विचिन्तित, विचेन्तेन्त**–(कृ.) विचार करता, मनन करता, चिंतन करता.
**विचिन्तेत्वा**–(पू. क्रि.) विचार करून, मनन करून. चिंतन करून.
**विचुण्ण**–(वि.) चूर्ण केलेले, पीठ केलेले, तुकडे केलेले, फोडलेले.
**विचुण्णेति**–(क्रि.) दळणे, पीठ करणे, तुकडे करणे.
**विचुण्णेसि**–(पू. क्रि.) दळले, पीठ केले, तुकडे केले.
**विचुण्णित**–(कृ.) दळता, पीठ करता, तुकडे करता.
**विचुण्णेत्वा**–(पू. क्रि.) दळून, पीठ करून, तुकडे करून.
**विच्छिक**–(पु.) इच्छुक, इच्छा केलेला, इच्छा असलेला.
**विच्छिद्दक**–(वि.) सच्छिद्र, छिद्रित, भोके पडलेला.
**विच्छिन्दति**–(क्रि.) कापणे, अडविणे, बाधा आणणे, अडथळा देणें.
**विच्छिन्दि**–(पू. क्रि.) कापले, अडविले, अडथळा दिला.
**विच्छिन्दन्त**–(कृ.) कापता, अडविता, अडथळा देता.
**विच्छिन्दमान**–(कृ.) कापण्यायोग्य, अडविण्यायोग्य, अडथळा देण्यायोग्य.
**विच्छिन्दित्वा**–(पू. क्रि.) कापून, अडवून, अडथळा देऊन.
**विच्छिन्न**–(कृ.) कापलेला, तोडलेला, वेगळा केलेला, फोडलेला.
**विच्छेद**–(पु.) काप, पार्थक्य, वेगळा.
**विजटन**–(नपु.) सुलभ, सोपा, साधा.
**विजटेति**–(क्रि.) सुलभ करणे, सोपे करणे.
**विजटेसि**–(पू. क्रि.) सुलभ केले, सोपे केले.
**विजटित**–(कृ.) सुलभ करता, सोपे करता.
**विजटेत्वा**–(पू. क्रि.) सुलभ करून, सोपे करून.
**विजन**–(वि.) अरण्य, मानव रहित, शून्य स्थान.
**विजन-वात**–(वि.) एकान्त, सुनेपणा, कोणी नसणे.

**विजम्भति**–(क्रि.) जांभई देणे, आळसणे, झोप येणे.
**विजम्भि**–(पू. क्रि.) जांभई दिली, आळसला, झोप आली.
**विजम्भित**–(कृ.) जांभई देता, आळसता, झोप येता.
**विजम्भित्वा**–(पू. क्रि.) जांभई देऊन, आळसून, झोप येऊन.
**विजम्भना**–(स्त्री.) जांभई देणे, आळसणे.
**विजम्भिका**–(स्त्री.) जांभई, उबासी.
**विजय**–(पु.) जय, जीत, विजय.
**विजय**–(पु., वि.) श्रीलंकेचा पहिला आर्य राजा, सिंह-बाहु व सिंह-सीवलीचा पुत्र.
**विजयति**–(क्रि.) जिंकणे, विजय मिळविणे.
**विजयि**–(पू. क्रि.) जिंकला, विजय मिळविला.
**विजयन्त**–(कृ.) जिंकता, विजय मिळविता.
**विजियित्वा**–(पू. क्रि.) जिंकून, विजय मिळवून.
**विजहति**–(क्रि.) सोडणे, त्यागणे.
**विजहि**–(पू. क्रि.) सोडले, त्यागले.
**विजहन्त, विहाय**–(कृ.) सोडता, त्यागता.
**विजहितब्ब**–(कृ.) सोडण्यायोग्य, त्यागण्यालायक.
**विजहित्वा**–(पू. क्रि.) सोडून, त्यागून.
**विजहन**–(नपु.) परित्याग.
**विजहित**–(कृ.) परित्यक्त, सोडून दिलेली, टाकलेली.
**विजाता**–(स्त्री.) आई, माता, जननी, शिशू-माता.
**विजातिक**–(वि.) विदेशी, परदेशी, परक्या जातीचा.
**विजानन**–(नपु.) ज्ञान, ओळख, परिचय, माहिती.
**विजानाति**–(क्रि.) जाणणे, ओळखणे.
**विजानि**–(पू. क्रि.) जाणले, ओळखले.
**विजानन्त, विजानितुं, विञ्ञात**–(कृ.) जाणता, ओळखता.
**विजानिय, विजानितब्ब**–(कृ.) जाणण्यायोग्य, ओळखण्यायोग्य.
**विजानित्वा**–(पू. क्रि.) जाणून, ओळखून.
**विजायति**–(क्रि.) जन्म देणे.
**विजायि**–(पू. क्रि.) जन्म दिला.
**विजायन्त**–(कृ.) जन्म देता.
**विजायित्वा**–(पू. क्रि.) जन्म देऊन.
**विजायन**–(नपु.) जन्म देणे.
**विजायन्ती**–(स्त्री.) जन्म देणारी, प्रसवणारी.
**विजायमाना**–(स्त्री.) जन्म देणारी, प्रसवणारी, बाळंत होणारी.
**विजायिनी**–(स्त्री.) मुलाला जन्म देऊ शकणारी.
**विजित**–(कृ.) जिंकलेला.
**विजित**–(नपु.) राज्य.
**विजित-सङ्गाम**–(वि.) विजयी, जयवन्त, जेता.
**विजिनाति**–[पहा–जिनाति].
**विजितावी**–(पु.) विजयी, जेता.
**विज्ज-ट्ठान**–(नपु.) अध्ययनाचा विषय.
**विज्जति**–(क्रि.) हजर असणे, चालू असणे, विद्यमान असणे.
**विज्जि**–(पू. क्रि.) हजर होता, चालू होता, विद्यमान होता.
**विज्जन्त**–(कृ.) हजर होता, चालू होता, विद्यमान होता.
**विज्जमान**–(कृ.) विद्यमान, हजर चालू.
**विज्जतित्वा**–(पू. क्रि.) हजर होऊन, चालू होऊन, विद्यमान असून.
**विज्जन्तरिका**–(स्त्री.) वीज कडकडण्यामधला वेळ; विजेची चमक व आवाज यामधील वेळ.
**विज्जा**–(स्त्री.) विद्या.
**विज्जाचरण**–(नपु.) विद्या व आचरण.
**विज्जाधर**–(वि.) मांत्रिक, जादुटोणा करणारा, विद्याधर.
**विज्जा-विमुक्त**–(स्त्री.) विद्येने (ज्ञानाने) मुक्त झालेला.
**विज्जु, विज्जुता, विज्जुल्लता**–(स्त्री.) वीज.
**विज्जोतति**–(क्रि.) चमकणे, प्रकाशमान होणे.
**विज्जोति**–(पू. क्रि.) चमकली, प्रकाशमान झाली.
**विज्जोतित**–(कृ.) चमकता, प्रकाशमान होता.
**विज्जोतमान**–(कृ.) चमकण्यायोग्य, प्रकाशमान होण्या योग्य.
**विज्जोतित्वा**–(पू. क्रि.) चमकून, प्रकाशमान होऊन.
**विज्झति**–(क्रि.) टिपणे, छेद पाडणे.
**विज्झि**–(पू. क्रि.) टिपले, छेद पाडला.
**विद्ध, विज्झन्त विज्झिय**–(कृ.) टिपता, छेद पाडता.
**विज्झमान**–(कृ.) टिपण्यायोग्य, छेद पाडण्यायोग्य.
**विज्झित्वा**–(पू. क्रि.) टिपून, छेद पाडून.
**विज्झन**–(नपु.) टिपणे, नेम धरून मारणे.
**विज्झायति**–(क्रि.) विझणे.
**विज्झापेति**–(क्रि.) आग विझविणे.
**विञ्जत्त**–(कृ.) सूचित, सुचविलेले.

विञ्ञत्ति–(स्त्री.) सूचना.
विञाण–(नपु.) विज्ञान, चेतना.
विञ्ञाणक–(वि.) सचेतन.
विञ्ञाणखन्ध–(पु.) विज्ञान स्कंद.
विञ्ञाणट्ठिति–(स्त्री.) विज्ञानस्थिती, चेतनावस्था.
विञ्ञाण-धातु–(स्त्री.) विज्ञान, चेतना, चित्त, मन.
विञ्ञात–विज्ञात, ज्ञात, जाणलेले, कळलेले, समजलेले.
विञ्ञातब्ब–(कृ.) जाणण्यायोग्य, कळण्या-समजण्यायोग्य.
विञ्ञातु–(पु.) जाणणारा, समजणारा.
विञ्ञापक–(पु.) जाणणारा, शिक्षक, शिकविणारा.
विञ्ञापन–(नपु.) विज्ञापन, बातमी, जाहिरात.
विञ्ञापय–(वि.) शैक्ष, विद्यार्थी, शिकू इच्छिणारा, ज्याला शिकविणे योग्य आहे असा.
विञ्ञापित–(कृ.) जाहीर केलेले, सूचित केलेले, सुचविलेले.
विञ्ञापेति–(क्रि.) जाहीर करणे, शिकविणे.
विञ्ञापेसि–(पू. क्रि.) जाहीर केले, शिकविले.
विञ्ञापंति, विञ्ञापेन्त–(कृदन्त) जाहीर करता, शिकविता.
विञ्ञापेत्वा–(पू. क्रि.) जाहीर करून, शिकवून.
विञ्ञापेतु–(पु.) सूचना देणारा, शिक्षक.
विञ्ञाय–(पू. क्रि.) जाणून, शिकून.
विञ्ञायति–(क्रि.) जाणले जाणे, ओळखणे.
विञ्ञू–(वि.) बुद्धिमान, ज्ञाता, विज्ञ, विद्वान.
विञ्ञू–(पु.) बुद्धिमान मनुष्य, विद्वान मनुष्य.
विञ्ञुता–(स्त्री.) विज्ञता, विवेक, समजशक्ती.
विञ्ञुप्पसत्थ–(वि.) विद्वानामार्फत प्रशंसित, विद्वानांनी प्रशंसिलेले.
विञ्ञेय्य–(वि.) जाणण्यायोग्य.
विटङ्क–(पु., नपु.) कबुतरांचे खोके, कबुतरांचा खुराडा.
विटप–(पु.) शाखा, फांदी, भाग.
विटपी–(पु.) फांद्या असलेला, वृक्ष.
विडूडभ–(पु., वि.) प्रसेनजित राजा व वासभ खत्तिया (क्षत्रिया) राणीचा पुत्र, प्रसिद्ध सेनापती.
विडोज–(पु.) इंद्र.
वितक्क–(वि.) वितर्क.
वितक्कन–(न..) विचार, मनन, चिंतन.
वितक्केति–(क्रि.) विचार करणे, मनन करणे, चिंतन करणे.
वितक्केसि–(पू. क्रि.) विचार केला, मनन केले, चिंतन केले.
वितक्कित, वितक्केन्त–(कृ.) विचार करता, मनन करता.
वितक्केत्वा–(पू. क्रि.) विचार करून, मनन करून, चिंतन करून.
वितच्छिका–(स्त्री.) खरुज, त्वचेचा रोग.
वितच्छेति–(क्रि.) साल काढणे, गुळगुळीत करणे.
वितच्छेसि–(पू. क्रि.) साल काढली, गुळगुळीत केले.
वितच्छित–(कृ.) साल काढता, गुळगुळीत करता.
वितच्छेत्वा–(पू. क्रि.) साल काढून, गुळगुळीत करून.
वितण्ड-वाद–(पु.) व्यर्थ भांडण, निरर्थक बोलणे.
वितत–(कृ.) पसरलेला, विस्तृत केलेला.
वितथ–(वि.) असत्य, खोटे, अयथार्थ.
वितथ–(नपु.) खोटे.
वितनोति–(क्रि.) पसरणे, विस्तृत करणे, वाढ करणे.
वितनि–(पू. क्रि.) पसरले, विस्तृत केले, वाढ केली.
वितनित–(कृ.) पसरता, विस्तृत करता, वाढ करता.
वितनित्वा–(पू. क्रि.) पसरून, विस्तृत करून, वाढवून.
वितरण–(नपु.) वाटणे, वाटप.
वितरति–(क्रि.) वाटप करणे.
वितरि–(पू. क्रि.) वाटप केले.
वितरित–(कृ.) वाटप करता.
वितिण्ण–(कृ) वाटप करता.
वितरित्वा–(पू. क्रि.) वाटप करून.
वितान–(नपु.) छत, चांदवा.
वितुदति–(क्रि.) चावणे.
वितुदन–(नपु.) चावा.
वित्त–(नपु.) धन, संपत्ति, वित्त.
वित्ति–(स्त्री.) प्रीति.
वित्थ–(नपु.) दारू पिण्याचे पात्र, दारूचा प्याला.
वित्थम्भन–(नपु.) विस्तार, विकास, वाढ.
वित्थम्भेति–(क्रि.) विस्तार करणे, वाढ करणे.
वित्थम्भेसि–(पू. क्रि.) विस्तार केला, वाढ केली.
वित्थम्भित–(कृ.) विस्तार करता, वाढ करता.
वित्थम्भेत्वा–(पू. क्रि.) विस्तार करून, वाढ करून.
वित्थार–(पु.) विस्तार, वाढ, स्पष्टीकरण, व्याख्या.
वित्थार-कथा–(स्त्री.) टीका.
वित्थारतो–(क्रि. वि.) विस्ताराने, सविस्तर.
वित्थारिक–(वि.) विस्तारित, विस्तृत, प्रसिद्ध, दूरवर प्रसिद्ध पावलेला.

**वित्थारेति**–(क्रि.) विस्तार करणे, पसरणे.
**वित्थारेसि**–(पू. क्रि.) विस्तार केला, पसरले.
**वित्थारित, वित्थारेन्त**–(कृ.) विस्तार करता, पसरता.
**वित्थारेत्वा**–(पू. क्रि.) विस्तार करून, पसरून.
**विदत्थि**–(स्त्री.) वीतभर.
**विदहति**–(क्रि.) व्यवस्था करणे, सोय करणे.
**विदहि**–(पू. क्रि.) व्यवस्था केली, सोय केली.
**विदहित, विहित**–(कृ.) व्यवस्था करता, सोय करता.
**विदहित्वा**–(पू. क्रि.) व्यवस्था करून, सोय करून.
**विदारण**–(नपु.) चिरफाड.
**विदारेति**–(क्रि.) चिरणे, फाडणे.
**विदारेसि**–(पू. क्रि.) चिरफाड केली.
**विदारित, विदारेन्त**–(कृ.) चिरफाड करता.
**विदारेत्वा**–(पू. क्रि.) चिरफाड करून.
**विदालन**–(नपु.) चिरफाड.
**विदालित**–(कृ.) चिरफाड करता.
**विदालेति**–[पहा–विदारेति.]
**विदित**–(कृ.) माहीत, ज्ञात.
**विदितत्त**–(नपु.) जाणून घेण्याची वृत्ति.
**विदिसा**–(स्त्री.) मनोऱ्याचा मध्यबिंदु.
**विदुग्ग**–(नपु.) कठीण ठिकाण, अवघड किल्ला-दुर्ग.
**विदू**–(वि.) बुद्धिमान.
**विदू**–(पु.) विद्वान मनुष्य.
**विदूर**–(वि.) फार लांब.
**विदूर जातक**–[पहा सुचिर जातक].
**विदूसित**–(कृ.) दूषित, भ्रष्ट.
**विदूसेति**–[पहा–दूसेति.]
**विदेस**–(पु.) विदेश, परदेश.
**विदेसिक**–(वि.) विदेशी, परदेशी, वैदेशिक.
**विदेसी**–(वि.) विदेशी, परदेशी.
**विदेह**–(पु.) वज्जी गणराज्याच्या एक भाग विदेह हा होता, त्याची राजधानी मिथिला नगरी होती.
**विद्दसु**–(वि.) बुद्धिमान.
**विद्देस**–(पु.) शत्रुता, वैर.
**विद्ध**–(कृ.) वेध घेतला, टिपला, छेदला, घायाळ.
**विद्धंसक**–(वि.) विध्वंस करणारा, नाश करणारा, घायाळ करणारा.
**विद्धंसन**–(नपु.) विध्वंस करणे, नाश करणे.
**विद्धंसेति**–(क्रि.) विध्वंस करणे, नाश करणे, नष्ट करणे.
**विद्धंसेसि**–(पू. क्रि.) विध्वंस केला, नाश केला, नष्ट केले.
**विद्धंसित, विद्धंस्त, विद्धंसेन्त**–(कृ.) विध्वंस करता, नाश करता, नष्ट करता.
**विद्धंसेत्वा**–(पू. क्रि.) विध्वंस करून, नाश करून, नष्ट करून.
**विध**–(वि.) प्रकार, भाग, (नानाविध, अनेक प्रकार).
**विधमक**–(वि.) विध्वंस करणारा, नाश करणारा.
**विधमति**–(क्रि.) विध्वंस करणे, नष्ट करणे.
**विधमि**–(पू. क्रि.) विध्वंस केला, नष्ट केले.
**विधमित**–(कृ.) विध्वंस करता, नष्ट करता.
**विधमित्वा**–(पू. क्रि.) विध्वंस करून, नष्ट करून.
**विधमन**–(नपु.) विनाश, विध्वंस.
**विधमेति**–[पहा–विधमति].
**विधवा**–(स्त्री.) नवरा मेलेली स्त्री.
**विधा**–(स्त्री.) प्रकार, तऱ्हा, ढंग, अभिमान, अहंकार.
**विधातु**–(पु.) विधाता, सृष्टीकर्ता, जगनिर्माता.
**विधान**–(नपु.) व्यवस्था, आज्ञा, पद्धती.
**विधायक**–(पु., वि.) व्यवस्था करणारा.
**विधावति**–(क्रि.) धावणे, पळणे.
**विधावि**–(पू. क्रि.) धावला, पळाला.
**विधावत**–(कृ.) धावता, पळता.
**विधावित्वा**–(पू. क्रि.) धावून, पळून.
**विधावन**–(नपु.) धावपळ.
**विधि**–(पु.) भाग्य, नशीब, प्रकार, ढंग, पद्धती.
**विधिना**–(क्रि. वि.) विधिपूर्वक, ठराविक पद्धतीने.
**विधुनाति**–(क्रि.) पिंजणे.
**विधुनि**–(पू. क्रि.) पिंजले.
**विधुनित, विधूत**–(कृ.) पिंजता.
**विधुनित्वा**–(पू. क्रि.) पिंजून.
**विधुर**–(पू., वि.) पत्नी मेलेला पुरुष, एकाकी, एकटा राहिलेला.
**विधर-पंडित जातक**–चार राजांपैकी सर्वाधिक शीलवान कोण? या प्रश्नाचे उत्तर दिलेल्या विधुरपंडिताची कथा–(५४५).
**विधूत**–(कृ.) पिंजलेला.
**विधूपन**–(नपु.) पंखा, पंखा हालविणे, वारा घालणे, फुंकणे.
**विधपेति**–(क्रि.) फुंकणे, धूर करणे, विसकटणे, पसरणे.

**विधूपेसि**–(पू. क्रि.) फुंकले, धूर केला, पसरला, विसकटला.
**विधूपित, विधूपेन्त**–(कृ.) फुंकता, धूर करता, पसरता, विसकटता.
**विधूपेत्वा**–(पू. क्रि.) फुंकून, धूर करून, पसरून, विसकटून.
**विधूम**–(वि.) धूर नसलेला, राग रहित.
**विधेय्य**–(वि.) आज्ञाधारक, आज्ञापालन करणारा.
**विनट्ठ**–(कृ.) विनष्ट.
**विनत**–(कृ.) विनम्र, वाकलेला.
**विनता**–(स्त्री., नाम) गरूडांची आई.
**विनद्ध**–(कृ.) घेरलेला, गुंडाळलेला, लपटलेला.
**विनन्धति**–(क्रि.) घेरणे, गुंडाळणे, लपेटणे.
**विनन्धि**–(पू. क्रि.) घेरले, गुंडाळले, लपेटले.
**विनन्धित**–(कृ.) घेरता, गुंडाळता, लपेटता.
**विनन्धित्वा**–(पू. क्रि.) घेरून, गुंडाळून, लपेटून.
**विनन्धन**–(नपु.) गुंडाळणे, घेरणे, लपेटणे.
**विनय**–(पु.) भिक्खूंच्या वागण्याचे नियम.
**विनयन**–(नपु.) नियमबद्ध करणे, शिकविणे.
**विनय-धर**–(वि.) भिक्खुं नियमांचा सूज्ञ जाणकार.
**विनय-पिटक**–(नपु.) भिक्खुंच्या नियमांचा संग्रहग्रंथ.
**विनय-वादी**–(पु.) भिक्खुंच्या नियमांचा उपदेश करणारा
**विनळीकत**–(कृ.) नष्ट केलेला, नाश केलेला.
**विनस्सति**–(क्रि.) नष्ट होणे, नाश पावणे.
**विनस्सि**–(पू. क्रि.) नष्ट झाला, नाश पावला.
**विनट्ठ, विनस्सन्त**–(कृ.) नष्ट होता, नाश पावता.
**विनस्समान**–(कृ.) नष्ट होण्यायोग्य, नाश पावण्यायोग्य.
**विनस्सित्वा**–(पू. क्रि.) नष्ट होऊन, नाश पावून.
**विनस्सन**–(नपु.) नष्ट होणे, नाश पावणे.
**विना**–(अ.) शिवाय, खेरीज, रहित, बिना.
**विना-भाव**–(पु.) पृथक, वेगळा, पार्थक्य.
**विनाति**–(क्रि.) विणणे, गुंफणे.
**विनि**–(पू. क्रि.) विणले, गुंफले.
**वित, वीत**–(कृ.) विणता, गुंफता.
**विनित्वा**–(पू. क्रि.) विणून, गुंफून.
**विनामन**–(नपु.) शरीर वाकविणे, ओणवे होणे, नमणे.
**विनामेति**–(क्रि.) शरीर वाकविणे, नमविणे.
**विनामेसि**–(पू. क्रि.) शरीर वाकविले, नमविले.
**विनामित**–(कृ.) शरीर वाकविता, नमविता.
**विनामेत्वा**–(पू. क्रि.) शरीर वाकवून, नमवून.
**विनायक**–(पू. वि.) महान नेता, बुद्ध.
**विनास**–(पु.) विनाश.
**विनासक**–(वि.) नाश करणारा, विध्वंसक.
**विनासन**–(नपु.) नाश करणे, विध्वंस करणे.
**विनासेत**–(क्रि.) नाश करणे, विध्वंस करणे, नष्ट करणे.
**विनासेसि**–(पू. क्रि.) नाश केला, विध्वंस केला, नष्ट केले.
**विनासित, विनासेन्त**–(कृ.) नाश करता, विध्वंस करता, नष्ट करता.
**विनासेत्वा**–(पू. क्रि.) नाश करून, विध्वंस करून, नष्ट करून.
**विनिग्गत**–(कृ.) बाहेर निघालेला.
**विनिच्छय**–(पु.) ठाम निश्चय, निकाल, निवाडा.
**विनिच्छय-कथा**–(स्त्री.) स्पष्टीकरणासह गोष्ट, फोड करून सांगितलेली गोष्ट.
**विनिच्छयट्ठान**–(नपु.) न्यायालय, सरकारी कचेरी-कार्यालय.
**विनिच्छय-साला**–[पहा-विनिच्छयट्ठान].
**विनिच्छित**–(कृ.) निश्चय झाला, निवाडा केला.
**विनिच्छिनन**–(नपु.) निवाडा करणे.
**विनिच्छिनाति**–(क्रि.) शोध करणे, निर्णय लावणे.
**विनिच्छिनि**–(पू. क्रि.) शोध केला, निर्णय लावला.
**विनिच्छित**–(कृ.) शोध करता, निर्णय लावता.
**विनिच्छिनित्वा**–(पू. क्रि.) शोध करून, निर्णय लावून.
**विनिच्छेति**–(क्रि.) शोधणे, निर्णय लावणे.
**विनिच्छेसि**–(पू. क्रि.) शोधले, निर्णय लावले.
**विनिच्छित, विनिच्छेन्त**–(कृ.) शोधता, निर्णय लावता.
**विनिच्छेत्वा**–(पू. क्रि.) शोधून, निर्णय लावून.
**विनिधाय**–(पू. क्रि.) अयोग्य व्यवस्था करणे, व्यवस्था चुकविणे.
**विनिपात**–(पु.) दुःख भोगण्याचे ठिकाण, नरक.
**विनिपातिक**–(वि.) नरकात जाणारा.
**विनिपातेति**–(क्रि.) नाशास कारण होणे.
**विनिबद्ध**–(कृ.) संबंधित, जवळचा, नातलग.
**विनिबन्ध**–(पु.) बंधन, आसक्ती, मोह.
**विनिब्भुजति**–(क्रि.) वेगळे करणे, वाटणे.
**विनिब्भुजि**–(पू. क्रि.) वेगळे केले, वाटले.
**विनिब्भुजत**–(कृ.) वेगळे करता, वाटता.
**विनिब्भुजित्वा**–(पू. क्रि.) वेगळे करून, वाटून.
**विनिब्भोग**–(पु.) पृथक्करण, फोड.

विनिमय–(पु.) आदलाबदल, देवाण-घेवाण, विनिमय.
विनिमोचेति–(क्रि.) स्वतःस मोकळे करणे.
विनिमोचेसि–(पू. क्रि.) स्वतःस मोकळे केले.
विनिमोचित–(कृ.) स्वतःस मोकळे करता.
विनिमोचेत्वा–(पू. क्रि.) स्वतःस मोकळे करून.
विनिम्मुत्त–(कृ.) विमुक्त, मोकळा.
विनिवट्टेति–(क्रि.) मुरकुंडी वळणे, खूप हसणे, घसरणे.
विनिवट्टेसि–(पू. क्रि.) खूप हसला, घसरला.
विनिवट्टेत–(कृ.) खूप हसता, घसरता.
विनिवट्टेत्वा–(पू. क्रि.) खूप हसून, घसरून.
विनिविज्झ–(कृ.) छेदला, टिपला.
विनिविज्झति–(क्रि.) छेदणे, टिपणे.
विनिविज्झि–(पू. क्रि.) छेदला, टिपला.
विनिविद्ध–(कृ.) छेदता, टिपता.
विनिविज्झित्वा–(पू. क्रि.) छेदुन, टिपून.
विनिविज्झन–(नपु.) छेदणे, टिपणे.
विनिविद्ध–(कृ.) छेद लागेल, टिपला गेला.
विनिवेठेति–(क्रि.) बंधमुक्त करणे, मोकळे करणे.
विनिवेठेसि–(पू. क्रि.) बंधमुक्त केले, मोकळे केले.
विनिवेठित–(कृ.) बंधमुक्त करता, मोकळे करता.
विनिवेठेत्वा–(पू. क्रि.) बंधमुक्त, करून, मोकळे करून.
विनिवेठन–(नपु.) बन्धमुक्त करणे, बन्धमुक्त होणे, मुक्त.
विनीत–(कृ.) नियमबद्ध जीवन जगणारा.
विनीलक जातक–हंस आणि कावळीच्या संकरांतून विनीलकाचा जन्म झाल्याची कथा–(१६०).
विनीवरण–(वि.) चित्तमलापासून मुक्त, शुद्धचित्त.
विनेति–(क्रि.) शिकविणे, अध्यापन करणे.
विनेसि–(पू. क्रि.) शिकविले, अध्यापन केले.
विनेन्त–(कृ.) शिकविता, अध्यापन करता.
विनेतब्ब–(कृ.) शिकविण्यायोग्य, अध्यापन करण्यायोग्य.
विनेत्वा–(पू. क्रि.) शिकवून, अध्यापन करून.
विनेतु–(पु.) शिक्षक, अध्यापक.
विनेय-जन–(पु., वि.) भगवान बुद्धाच्या शिकवणीप्रमाणे वागणारे लोक.
विनेय्य–(पू. क्रि.) बाजूस सारून.
विनेय्य–(वि.) शिकविण्यायोग्य.
विनोद–(पु.) प्रीती, आनंद.
विनोदन–(नपु.) दूर करणे, बाजूस सारणे.
विनोदेति–(क्रि.) दूर करणे, बाजूस सारणे.
विनोदेसि–(पू. क्रि.) दूर केले, बाजूस सारले.
विनोदित–(कृ.) दूर करता, बाजूस सारता.
विनोदेत्वा–(पू. क्रि.) दूर करून, बाजूस सारून.
विन्दक–(पु.) अनुभव घेणारा, अनुभविणारा.
विन्दति–(क्रि.) अनुभव घेणे.
विन्दि–(पू. क्रि.) अनुभव घेतला.
विन्दित, विन्दन्त–(कृ.) अनुभव घेता.
विन्दमान, विन्दितब्ब–(कृ.) अनुभव घेणे योग्य.
विन्दित्वा–(पू. क्रि.) अनुभव घेऊन.
विन्दियमान–(कृ.) अनुभव घेत असता.
विन्यास–(पु.) चक्रव्यूह, गुंतागुंतीची रचना.
विपक्ख–(वि.) विपक्ष, प्रतिवाद, विरोधी बाजू.
विपक्खिक–(वि.) विपक्षी, प्रतिवादी, विरोधी मताचा.
विपच्चति–(क्रि.) पिकणे, फळ देणे.
विपच्चि–(पू. क्रि.) पिकले, फळ दिले.
विपच्च–(कृ.) पिकता, फळ देता.
विपच्चमान–(कृ.) पिकण्यायोग्य, फळ देण्यायोग्य.
विपच्चित्वा–(पू. क्रि.) पिकून, फळ देऊन.
विपज्जति–(क्रि.) नष्ट होणे, व्यर्थ जाणे.
विपज्जि–(पू. क्रि.) नष्ट झाले, व्यर्थ गेले.
विपन्न–(कृ.) नष्ट होता, व्यर्थ जाता.
विपज्जित्वा–(पू. क्रि.) नष्ट होऊन, व्यर्थ जाऊन.
विपज्जन–(नपु.) नष्ट होणें, व्यर्थ जाणें.
विपत्ति–(स्त्री.) संकट, असफलता, अडचणी, विपत्ती.
विपथ–(पु.) चुकीचा मार्ग, कुपथ, वाईट मार्ग.
विपन्न–(कृ.) संकटग्रस्त.
विपन्न-दिट्ठि–(वि.) मिथ्या दृष्टीवाला, चुकीची धारणा असलेला.
विपन्न-सील–(वि.) शीलभ्रष्ट, दुराचारी, दुर्वर्तनी.
विपरिणत–(कृ.) परिवर्तित, बदलेला, रागीट.
विपरिणाम–(पु.) परिवर्तन, बदल.
विपरिणामेति–(क्रि.) परिवर्तन करणे, बदलणे, फिरविणे.
विपरिणामेसि–(पू. क्रि.) परिवर्तन केले, बदल केला, फिरविले.
विपरिणामित–(कृ.) परिवर्तन करता, बदल करता, फिरविता.
विपरिणामेत्वा–(पू. क्रि.) परिवर्तन करून, बदल करून, फिरवून.
विपरियय, विपरियाय–(पु.) विरोध.
विपरियेस–(पु.) विरोध होणे, विरोध झाला.

**विपरिवत्तति**–(क्रि.) उलटून टाकणे, बदलून टाकणे.
**विपरिवत्ति**–(पू. क्रि.) उलटून टाकले, बदलून टाकले.
**विपरिवत्तित**–(कृ.) उलटून टाकता, बदलून टाकता.
**विपरिवत्तित्त्वा**–(पू. क्रि.) उलटून टाकून, बदलून टाकून.
**विपरिवत्तन**–(नपु.) परिवर्तन, बदल.
**विपरीत**–(वि.) उलटा, विरुद्ध, विपरीत.
**विपरीतता**–(स्त्री.) विरुद्ध भावना.
**विपल्लत्थ**–(नपु.) उलटून टाकले.
**विपल्लास**–(पु.) उलटणें, जागा बदलणे, पालथे होणे.
**विपस्सक**–(वि.) अंतरज्ञानी.
**विपस्सति**–(क्रि.) पाहणें, जाणणे, अंतरदृष्टी मिळणे.
**विपस्सि**–(पू. क्रि.) पाहिले, जाणले, अंतरदृष्टी मिळाली.
**विपस्सेन्त, विपस्सत**–(कृ.) पाहता, जाणता, अंतरदृष्टी मिळता.
**विपस्सित्त्वा**–(पू. क्रि.) पाहून, जाणून, अंतरदृष्टी मिळवून.
**विपस्सना**–(स्त्री.) विपश्यना, अंतरदृष्टी, आत्मज्ञान,. विपस्सना, ध्यान भावना.
**विपस्सना-ञाण**–(नपु.) विपश्यना ज्ञान, अंतरदृष्टीचे ज्ञान.
**विपस्सना-धुर**–(नपु.) विपश्यना मार्ग, अंतरदृष्टीचा मार्ग.
**विपस्सी**–(पु.) विपश्यी, अंतरदृष्टी प्राप्त.
**विपाक**–(पु.) परिणाम, फळ.
**विपातिका**–(स्त्री.) विधवा, निराश्रित.
**विपिट्ठिकत्त्वा**–(पू. क्रि.) तोंड फिरवून, वळून, पाठ फिरवून.
**विपिन**–(नपु.) जंगल, अरण्य.
**विपुल**–(वि.) भरपूर, जास्त, अधिक, विशाल.
**विपुलता**–(स्त्री.) अधिक्य, विशालता.
**विपुलत्त**–(नपु.) विशालत्त्व.
**विप्प**–(पु.) विप्र, ब्राह्मण.
**विप्प-कुल**–(नपु.) ब्राह्मणकुल, ब्राह्मण वंश.
**विप्पकत**–(वि.) अपूरा, अपूर्ण.
**विप्पकार**–(पु.) परिवर्तन बदल, ऐवजी, खेरीज, शिवाय.
**विप्पकिण्ण**–(कृ.) विसकटलेला.
**विप्पकिरति**–(क्रि.) चोहोकडे फेकणे, नष्ट करणे.
**विप्पकिरि**–(पू. क्रि.) चोहोकडे फेकले, नष्ट केले.
**विप्पकिण्ण**–(कृ.) चोहोकडे फेकता, नष्ट करता.
**विप्पकिरित्त्वा**–(पू. क्रि.) चोहोकडे फेकून, नष्ट करून.
**विप्पजहति**–(क्रि.) सोडणे, टाकणे, त्याग करणे.
**विप्पजहि**–(पू. क्रि.) सोडले, टाकले, त्याग केला.
**विप्पजहत**–(कृ.) सोडता, टाकता, त्याग करता.
**विप्पजहित्वा**–(पू. क्रि.) सोडून, टाकून, त्याग करून.
**विप्पटिपज्जति**–(क्रि.) चूक करणे, दोषी होणे.
**विप्पटिपज्जि**–(पू. क्रि.) चूक केली, दोषी झाला.
**विप्पटिपज्जत**–(कृ.) चूक करता, दोषी होता.
**विप्पटिपज्जित्वा**–(पू. क्रि.) चूक करून, दोषी होऊन.
**विप्पटिपत्ति**–(स्त्री.) दुराचरण, वाईट वर्तन.
**विप्पटिपन्न**–(कृ.) कुमार्गी, वाईट मार्गास लागलेला.
**विप्पटिसार**–(पु.) पश्चाताप.
**विप्पमुत्त**–(कृ.) विमुक्त, मोकळा, निर्दोष.
**विप्पयुत्त**–(कृ.) वेगळा केलेला, पृथक.
**विप्पलपति**–(क्रि.) विलाप करणे, दुःख करणे, रडणे.
**विप्पलाप**–(पु.) प्रलाप, दुःख, रडे.
**विप्पलुज्जति**–(क्रि.) फुटणे, तुकडे होणे, छिन्न-विच्छिन्न होणे.
**विप्पवसति**–(क्रि.) गैर असणे, प्रवास करणे.
**विप्पवास**–(पु.) गैर हजर, प्रवास.
**विप्पवुत्थ**–(कृ.) गैर हजर, प्रवासी.
**विप्पसन्न**–(कृ.) अति स्पष्ट, अगदी उघड.
**विप्पसीदति**–(क्रि.) स्पष्ट होणे, उघड होणे.
**विप्पहान**–(नपु.) प्रहाण, त्यागणे, सोडणे, टाकणे.
**विप्फन्दति**–(क्रि.) फडफडणे, हात-पाय मारणे, तडफडणे.
**विप्फन्दि**–(पू. क्रि.) फडफडला, हात-पाय मारले, तडफडले.
**विप्फन्दित**–(कृ.) फडफडता, हात-पाय मारता, तडफडता.
**विफन्दित्त्वा**–(पू. क्रि.) फडफडून, हात-पाय हालवून. तडफडून.
**विप्फन्दन**–(नपु.) संघर्ष करणे, फडफडणे, हात-पाय मारणे. तडफडणे.
**विप्फार**–(पु.) विस्तार, वाढ, प्रसार.
**विप्फारिक**–(वि.) विस्तृत, पसरलेला.
**विप्फारित**–(कृ.) विस्तृत, पसरलेला, वाढलेला.
**विप्फुरण**–(नपु.) व्याप्ती, प्रसार, वाढ, हालचाल.
**विप्फरति**–(क्रि.) पसरणे, हालचाल करणे, थरकाप करणे.
**विप्फुरि**–(पू. क्रि.) पसरले, हालचाल झाली, थरकाप झाला.

**विप्फुरित, विप्फुरन्त**–(कृ.) पसरता, हालचाल होता, थरकाप होता.
**विप्फुरित्वा**–(पू. क्रि.) पसरून, हालचाल होऊन, थरकाप होऊन.
**विप्फुलिङ्ग**–(नपु.) स्फुलिंग, विस्तव, अग्निकण.
**विफल**–(वि.) व्यर्थ, फुकट, निष्फळ.
**विबन्ध**–(पु.) बंधन.
**विबाधक**–(वि.) अडथळा देणारा, नुकसान करणारा. बाधा आणणारा.
**विबाधति**–(क्रि.) अडथळा देणे, थांबविणे, नुकसान करणे, बाधा आणणे.
**विबाधन**–(नपु.) अडथळा, बाधा.
**विबुध**–(पु.) देवगण, देव.
**विब्भन्त**–(कृ.) विभ्रांत, भ्रांत, भ्रांति झालेला.
**विब्भंतक**–(वि.) भिक्खुजीवन सोडून संसारी बनलेला.
**विब्भमति**–(क्रि.) कुमार्गास लागणे, भटकणे, भिक्खु-जीवन सोडणे.
**विब्भमि**–(पू. क्रि.) कुमार्गास लागला, भटकला, भिक्खुजीवन सोडले.
**विब्भन्त**–(कृ.) कुमार्गी लागता, भटकता, भिक्खु-जीवन सोडता.
**विब्भमित्वा**–(पू. क्रि.) कुमार्गी लागून, भटकून, भिक्खु-जीवन सोडून.
**विभङ्ग**–(पु.) वाटप, वाटणी, विभाग, वर्गिकरण.
**विभङ्ग**–(पु., नपु.) विनय पिटकांतील पाराजिक व पाचित्तिय या दोन्ही ग्रंथांचे सामुहिक नाव.
**विभङ्गप्पकरण**–(पु.) अभिधम्म पिटकाच्या सात प्रकरणापैकी दुसऱ्या प्रकरणाचा ग्रंथ.
**विभजति**–(क्रि.) वाटणी करणे, वर्गीकरण करणे.
**विभजि**–(पू. क्रि.) वाटणी केली, वर्गिकरण केले.
**विभत्त, विभजित, विभजन्त**–(कृ.) वाटणी करता, वर्गिकरण करता.
**विभजित्वा**–(पू. क्रि.) वाटणी करून, वर्गिकरण करून.
**विभज्ज**–(पू. क्रि.) विभक्त करून, फोड करून, विश्लेषण करून.
**विभज्जवाद**–(पु.) युक्तिवाद.
**विभज्जवादी**–(पु.) थेरवादाचा अनुयायी.
**विभत्त**–(कृ.) विभक्त, वेगळा, पृथक, वाटलेला.
**विभत्ति**–(स्त्री.) वर्गिकरण, वाटणी, विभागणी, विभक्तीरुप.
**विभव**–(पु.) धन, वैभव, ऐश्वर्य.
**विभाग**–(पु.) भाग, वाटणी, वाटा, हिस्सा, विभाग.
**विभाजन**–(नपु.) फोड, वाटणी, विभाजन.
**विभात**–(कृ.) चमकला, चमकणारा.
**विभाति**–(क्रि.) चमकणे, प्रकाशणे.
**विभावन**–(नपु.) व्याख्या, अर्थ, स्पष्टीकरण.
**विभावना**–(स्त्री.) भाष्य.
**विभावी**–(वि.) प्रज्ञावान.
**विभावी**–(पु.) प्रज्ञावान मनुष्य.
**विभावेति**–(क्रि.) स्पष्ट करणे, सांगणे, शिकविणे.
**विभावेसि**–(पू. क्रि.) स्पष्ट केले, सांगितले, शिकविले.
**विभावित, विभावेन्त**–(कृ.) स्पष्ट करता, सांगता, शिकविता.
**विभावेत्वा**–(पू. क्रि.) स्पष्ट करून, सांगून, शिकवून.
**विभीतक**–(पु.) बेहाडा.
**विभीतकी**–(स्त्री.) बेहाडा.
**विभू**–(वि.) सर्व व्यापी, सर्व व्यापक, सर्वत्र असलेला. विश्वव्यापी.
**विभूत**–(कृ.) स्पष्ट, उघड, जाहीर.
**विभूति**–(स्त्री.) प्रताप, पराक्रम, व्याप्ती, विभूति.
**विभूसन**–(नपु.) विभूषण, दागिना, सजावट, अलंकार.
**विभूसित**–(कृ.) विभूषित, अलंकृत, सजवलेला, नटविलेला.
**विभूसेति**–(क्रि.) सजविणे, अलंकृत करणे, नटविणे, विभूषित करणे.
**विभूसेसि**–(पू. क्रि.) सजविले, अलंकृत केले, नटविले, विभूषित केले.
**विभूसेत्वा**–(पू. क्रि.) सजवून, अलंकृत करून, नटवून, विभूषित करून.
**विमति**–(स्त्री.) संदेह, शंका, संशय.
**विमतिच्छेदक**–(वि.) शंका निरसन करणारा.
**विमन**–(वि.) असंतुष्ट, अतृप्त.
**विमल**–(वि.) निर्मळ, स्वच्छ, विमल.
**विमान**–(नपु.) भवन, इमारत.
**विमान-पेत**–(पु.) प्रेत, मढे, मृतशरीर.
**विमान-वत्थु**–(नपु., पु.) भव्य-दिव्य इमारतींच्या कथांचा ग्रंथ, खुद्दक निकायातील एक ग्रंथ.
**विमानन**–(नपु.) अपमान.
**विमानेति**–(क्रि.) अपमान करणे, अनादर करणे.
**विमानेसि**–(पू. क्रि.) अपमान केला, अनादर केला.
**विमानित**–(कृ.) अपमान करता, अनादर करता.
**विमानेत्वा**–(पू. क्रि.) अपमान करून, अनादर करून.

**विमुख**–(वि.) निष्काळजी, कर्तव्यापासून दूर, कर्तव्य सोडून.
**विमुच्चति**–(क्रि.) मुक्त होणे, स्वतंत्र होणे, मोकळे होणे.
**विमुच्चि**–(पू. क्रि.) मुक्त झाला, स्वतंत्र झाला, मोकळा झाला.
**विमुच्चन्त, विमुत्त**–(कृ.) मुक्त होता, स्वतंत्र होता, मोकळा होता.
**विमुच्चित्वा**–(पू. क्रि). मुक्त होऊन, स्वतंत्र होऊन, मोकळा होऊन.
**विमुञ्चति**–(क्रि.) स्वतंत्र होणे, मुक्त होणे.
**विमुञ्चि**–(पू. क्रि.) स्वतंत्र झाला, मुक्त झाला.
**विमुञ्चित, विमुञ्चन्त**–(कृ.) स्वतंत्र होता, मुक्त होता.
**विमुञ्चित्वा**–(पू. क्रि.) स्वतंत्र होऊन, मुक्त होऊन.
**विमुत्त**–(कृ.) स्वतंत्र, मुक्त, विमुक्त.
**विमुत्ति**–(स्त्री.) विमुक्ती, मुक्तता, स्वातंत्र्य.
**विमुत्ति-रस**–(पु.) मुक्तिरस, मुक्तीचा आनंद.
**विमुक्ति-सुख**–(नपु.) मुक्तिसुख, मुक्तीचे सुख.
**विमोक्ख**–(पु.) विमोक्ष, विमुक्ती.
**विमोचक**–(पु.) मुक्त करणारा, स्वतंत्र करणारा.
**विमोचन**–(नपु.) मुक्ती, स्वातंत्र्य.
**विमोचेति**–(क्रि.) मुक्त करणे, स्वतंत्र करणे.
**विमोहेति**–(क्रि.) मोहात पाडणे, भ्रम निर्माण करणे.
**विमोहेसि**–(पू. क्रि.) मोहात पाडले, भ्रम निर्माण केला.
**विमोहित**–(कृ.) मोहात पाडता, भ्रम निर्माण करता.
**विमोहेत्वा**–(पू. क्रि.) मोहात पाडून, भ्रम निर्माण करून.
**विम्हय**–(पु. ) आश्चर्य.
**विम्हापक**–(वि.) आश्चर्यात टाकणारा, चकित करणारा.
**विम्हापन**–(नपु.) चकित करणे, आश्चर्य वाटणे.
**विम्हापेति**–(क्रि.) चकित करणे, आश्चर्यात टाकणे.
**विम्हापेसि**–(पू. क्रि.) चकित केले, आश्चर्यात टाकले.
**विम्हापित**–(कृ.) चकित करता, आश्चर्यात टाकता.
**विम्हापेत्वा**–(पू. क्रि.) चकित करून, आश्चर्यात टाकून.
**विम्हित**–(कृ.) आश्चर्यचकित.
**विय**–(पु.) समान, सारखा, तुल्य.
**वियत्त**–(वि.) व्यक्त, सुयोग, पंडित.
**वियूहति**–(क्रि.) हटविणे, बाजूस सारणे, विखुरणे.
**वियूहि**–(पू. क्रि.) हाटविले, बाजूस सारले, विखुरले.
**वियूळह, वियूहित**–(कृ.) हटविता, बाजूस सारता, विखुरता.
**वियूहित्वा**–(पू. क्रि.) हटवून, बाजूस सारून, विखरून.
**वियूहन**–(नपु.) बाजूस सारणे, विखुरणे.
**वियूळ्ह, व्यळ्ह**–(कृ.) एकत्रित.
**वियोग**–(पुं.) वेगळेपणा, ताटातूट, वियोग.
**विरचित**–(कृ.) रचलेले, निर्माण केलेले.
**विरचियति**–(क्रि.) रचणे, रचना करणे, निर्माण करणे.
**विरचि**–(पू. क्रि.) रचले, रचना केली, निर्माण केले.
**विरचित**–(कृ.) रचता, रचना करता, निर्माण करता.
**विरचित्वा**–(पू. क्रि.) रचून, रचना करून, निर्माण करून.
**विरज**–(वि.) निर्मळ, शुद्ध, पवित्र.
**विरज्जति**–(क्रि.) वैराग्य येणे, अनासक्त होणे.
**विरज्जि**–(पू. क्रि.) वैराग्य आले, अनासक्त झाला.
**विरत्त**–(कृ.) वैराग्य येता, अनासक्त होता.
**विरज्जमान**–(कृ.) वैराग्यायोग्य, अनासक्तीस योग्य.
**विरज्जित्वा**–(पू. क्रि.) वैराग्य येऊन, अनासक्त होऊन.
**विरज्जन**–(नपु.) विरक्त होणे, विरक्ती, वैराग्य.
**विरज्झति**–(क्रि.) चुकणे.
**विरज्झि**–(पू. क्रि.) चुकला.
**विरद्ध**–(कृ.) चुकता.
**विरज्झित्वा**–(पू. क्रि.) चुकून.
**विरत**–(कृ.) रत झाला नाही, मिसळला नाही, सहमत नाही.
**विरति**–(स्त्री.) बचाव, दूर राहणे, विरक्ती, अलिप्तता, अनासक्ती.
**विरत्त**–(कृ.) विरक्त, अलिप्त, अनासक्त, अनासक्ती.
**विरद्ध**–(कृ.) चुकला.
**विरमन**–(नपु..) थांबणे, विरक्त राहणे, अलिप्त असणे.
**विरमति**–(क्रि.) विरक्त राहणे, अलिप्त असणे.
**विरमि**–(पू. क्रि.) विरक्त राहिला, अलिप्त राहिला.
**विरमन्त**–(कृ.) विरक्त राहता, अलिप्त असता.
**विरमित्वा**–(पू. क्रि.) विरक्त राहून, अलिप्त राहून.
**विरल, विरळ**–(वि.) विरळा, पातळ, दाट नसलेला.
**विरव, विराव**–(पु.) आरडा-ओरड, दंगा, गोंधळ.
**विरवति**–(क्रि.) ओरडणे, आरडणे.
**विरवि**–(पू. क्रि.) आरडा-ओरड केली, ओरडला.
**विरवन्त**–(कृ.) आरडता, ओरडता.
**विरवित्वा**–(पू. क्रि.) आरडून, ओरडून.
**विरवन**–[पहा-विरव].

**विरह**–(पु.) ताटातूट, पृथकपणा, शून्यता, विरह.
**विरहति**–(वि.) विणा, शिवाय, खेरीज, ऐवजी, शून्य.
**विराग**–(पु.) वैराग्य, निरिच्छ, अनासक्त.
**विरागता**–(स्त्री.) राग नसणे, प्रेमळ.
**विरागी**–(वि.) वैरागी, साधू.
**विराजति**–(क्रि.) चमकणे.
**विराजि**–(पू. क्रि.) चमकला.
**विराजित**–(कृ.) चमकता.
**विराजमान**–(कृ.) चमकण्यायोग्य.
**विराजित्वा**–(पू. क्रि.) चमकून.
**विराजेति**–(क्रि.) दूर करणे., बाजूस सारणे, नष्ट करणे.
**विराजेसि**–(पू. क्रि.) दूर केले. बाजूस सारले, नष्ट केले.
**विराजेन्त**–(कृ.) दूर करता, बाजूस सारता, नष्ट करता.
**विराजेत्वा**–(पू. क्रि.) दूर करून, बाजूस सारून, नष्ट करून.
**विराधना**–(स्त्री.) असमर्थता, चुकणे.
**विराधेति**–(क्रि.) चुकणे.
**विराधेसि**–(पू. क्रि.) चुकले.
**विराधित**–(कृ.) चुकता.
**विराधेत्वा**–(पू. क्रि.) चुकून.
**विरिच्चति**–(क्रि.) जुलाब होणे, झाडा होणे, जुलाबाचे औषध देणे.
**विरिच्चमान**–(कृ.) जुलाब होता, झाडा होता.
**विरित्त**–(कृ.) जुलाब होता.
**विरिय**–(नपु.) शक्ती, सामर्थ्य, वीर्य.
**विरिय-बल**–(नपु.) वीर्यबल.
**विरियवन्तु**–(पु., वि.) वीर्यवान.
**विरिय-समता**–(स्त्री.) कमी-अधिक नाही, समानता, समान प्रयत्न.
**विरियारम्भ**–(पु.) प्रयत्नाची सुरुवात, आरंभ.
**विरियिन्द्रिय**–(नपु.) वीर्य, प्रयास, प्रयत्न.
**विरुज्झति**–(क्रि.) विरुद्ध होणे, प्रतिकूल असणे.
**विरुज्झि**–(पू. क्रि.) विरुद्ध झाला, प्रतिकूल झाला.
**विरुद्ध, विरुज्झन्त**–(कृ.) विरुद्ध असता, प्रतिकूल असता.
**विरुज्झित्वा**–(पू. क्रि.) विरुद्ध होऊन, प्रतिकूल होऊन.
**विरुद्ध**–(कृ.) विरुद्ध, विरोधी, प्रतिस्पर्धी, स्पर्धक.
**विरुद्धता**–(स्त्री.) विरोधीपणा, वैर.
**विरुप**–(वि.) कुरूप.
**विरुपक्ख**–(पु.) नागांचा राजा, नागाधिपति.
**विरुपता**–(स्त्री.) कुरूपता.
**विरूळ्ह**–(कृ.) उगवलेला, वाढलेला.
**विरूळ्हि**–(स्त्री.) वृद्धी, वाढ.
**विरूहति**–(क्रि.) उगविणे, वाढणे.
**विरूहि**–(पू. क्रि.) उगविले, वाढले.
**विरूहन्त**–(कृ.) उगवता, वाढता.
**विरूहित्वा**–(पू. क्रि.) उगवून, वाढून.
**विरेक**–(पु.) जुलाब, झाडा.
**विरेचेति**–(क्रि.) पोट साफ होणे.
**विरेचेसि**–(पू. क्रि.) पोट साफ झाले.
**विरेचत**–(कृ.) पोट साफ होता.
**विरेचेत्वा**–(पू. क्रि.) पोट साफ करून.
**विरोचति**–(क्रि.) चमकणे, शोभणे.
**विरोचि**–(पू. क्रि.) चमकला, शोभला.
**विरोचमान**–(कृ.) चमकण्यायोग्य, शोभणारा.
**विरोचित**–(कृ.) चमकता, शोभता.
**विरोचित्वा**–(पू. क्रि.) चमकून, शोभून.
**विरोचन**–(नपु.) चमकणे, शोभा.
**विरोचन जातक**–कोल्ह्याने हत्तीवर आक्रमण केले. पण तो कोल्हा हत्तीच्या पायाखाली तुडविला जाऊन मेल्याची कथा–(१४३).
**विरोचति**–(क्रि.) प्रकाशित करणे, प्रसिद्ध करणे.
**विरोचेसि**–(पू. क्रि.) प्रकाशित केले, प्रसिद्ध केले.
**विरोचित**–(कृ.) प्रकाशित करता, प्रसिद्ध करता.
**विरोचेत्वा**–(पू. क्रि.) प्रकाशित करून, प्रसिद्ध करून.
**विरोध**–(पु.) प्रतिकूल, वैर, विरोध.
**विरोधन**–(नपु.) प्रतिकूलता, वैरभाव.
**विरोधेति**–(क्रि.) विरोध करणे.
**विरोधेसि**–(पू. क्रि.) विरोध केला.
**विरोधित**–(कृ.) विरोध करता.
**विरोधेत्वा**–(पू. क्रि.) विरोध करून.
**विलग्ग**–(कृ.) चिकटून, लागून, बिलगून.
**विलङ्घति**–(क्रि.) उडी मारणे, कसरत करणे.
**विलङ्घेसि**–(पू. क्रि.) उडी मारली, कसरत केली.
**विलङ्घित**–(कृ.) उडी मारता, कसरत करता.
**विलघेत्वा**–(पू. क्रि.) उडी मारून, कसरत करून.
**विलपति**–(क्रि.) दुःख करणे, रडणे, विलाप करणे.
**विलपि**–(पू. क्रि.) दुःख केले, रडला, विलाप केला.
**विलपन्त**–(कृ.) दुःख करता, रडता, विलाप करता.

**विलपमान**–(कृ.) दुःख करण्यायोग्य, रडण्यायोग्य, विलाप करणारा.

**विलपित्त्वा**–(पू. क्रि.) दुःख करून, रडून, विलाप करून.

**विलम्बति**–(क्रि.) उशीर करणे, वेळ लावणे, लटकणे, लोंबकळणे.

**विलम्बि**–(पू. क्रि.) उशीर केला, वेळ लावला, लटकला, लोंबकळला.

**विलम्बित**–(कृ.) उशीर करता, वेळ लावता, लटकता, लोंबकळता.

**विलम्बित्त्वा**–(पू. क्रि.) उशीर करून, वेळ लावून, लटकून, लोंबकळून.

**विलम्बन**–(नपु.) उशीर करणे, वेळ लावणे.

**विलम्बेति**–(क्रि.) वेडावणे, चिडविणे, कमी लेखणे.

**विलय**–(पु.) मिसळणे, विलीन होणे, सामील होणे.

**विलसति**–(क्रि.) खेळणे, चमकणे.

**विलसि**–(पू. क्रि.) खेळला, चमकला.

**विलसित**–(कृ.) खेळता, चमकता.

**विलसित्त्वा**–(पू. क्रि.) खेळून, चमकून.

**विलसित**–(कृ.) आनंदित, प्रसन्न, डौल-दिमाखदार.

**विलाप**–(पु.) रडणे, आक्रोश करणे. निरर्थक बोलणे, व्यर्थ वडबड, विलाप.

**विलास**–(पु.) सौंदर्य, हास्यविलास, नखरा, चैन, विलास.

**विलासिता**–(स्त्री.) नखरा, चैन.

**विलासिनी**–(स्त्री.) सुखासीन स्त्री.

**विलासी**–(पु.) सुखवस्तु पुरुष.

**विलिखति**–(क्रि.) चोळणे, घासणे, चमकदार बनविणे.

**विलिखित**–(कृ.) चोळलेला, घासलेला, चमकदार, गुळगुळीत.

**विलित्त**–(कृ.) माखलेला, चोपडलेला, लिंपलेला.

**विलिम्पति**–(क्रि.) लिंपणे, माखणे, चोपडणे.

**विलिम्पेति**–(क्रि.) लेप देणे, अभिषेक करणे.

**विलिम्पेसि**–(पू. क्रि.) लेप दिला, अभिषेक केला.

**विलिम्पेन्त**–(कृ.) लेप देता, अभिषेक करता.

**विलिम्पेत्त्वा**–(पू. क्रि.) लेप देऊन, अभिषेक करून.

**विलीन**–(कृ.) मिसळला, सामील झाला, लीन झाला.

**विलीयति**–(क्रि.) विरघळणे, मिसळून जाणे, नष्ट होणे.

**विलीयि**–(पू. क्रि.) विरघळला, मिसळला, नष्ट झाला.

**विलीयमान**–(कृ.) विरघळण्यायोग्य, मिसळण्यायोग्य.

**विलीयित्त्वा**–(पू. क्रि.) विरघळून, मिसळून, नष्ट होऊन.

**विलीयन**–(नपु.) विरघळणे.

**विलीव, विलिव**–(नपु.) वेळू किंवा बांबूचा तुकडा.

**विलीवकार**–(पु.) बुरुड, वेळूच्या वस्तु बनविणारा.

**विलुग्ग**–(कृ.) तुटका, तुटलेला, फुटलेला.

**विलुत्त**–(कृ.) लुटलेला.

**विलून**–(कृ.) चावलेला.

**विलेख**–(पु.) चावा, मार, घर्षण, घसारा.

**विलेपन**–(नपु.) सुगंधी चूर्ण, उटणे, लेप, विलेपन.

**विलेपित**–(कृ.) सुगंधी उटणे माखले-लावले.

**विलेपेति**–(क्रि.) सुगंधी लेप लावणे.

**विलेपेसि**–(पू. क्रि.) सुगंधी लेप लावला.

**विलेपेत्त्वा**–(पू. क्रि.) सुगंधी लेप लावून.

**विलोकन**–(नपु.) पाहणे, बघणे, शोधणे, अवलोकन.

**विलोकेति**–(क्रि.) पाहणे, शोधणे, अवलोकन करणे.

**विलोकेसि**–(पू. क्रि.) पाहिले, शोधले, अवलोकन केले.

**विलोकित, विलोकेन्त**–(कृ.) पाहता, बघता, शोधता, अवलोकन करता.

**विलोकयमान**–(कृ.) पाहण्यायोग्य, शोधण्यायोग्य, अवलोकन करणारा.

**विलोकेत्वा**–(पू. क्रि.) पाहून, शोधून, अवलोकन करून.

**विलोचन**–(नपु.) नेत्र, डोळा, लोचन.

**विलोपन**–(नपु.) लूटमार.

**विलोपक**–(पु.) लुटारू, चोरटा, डाकू.

**विलोम**–(वि.) विरुद्ध, प्रतिकूल.

**विलोमता**–(स्त्री.) प्रतिकूलता, विरोध, कमीपणा, उणीव, न्यूनता.

**विलोमेति**–(क्रि.) वाद करणे, सहमत नसणे.

**विलोमेसि**–(पू. क्रि.) वाद केला, सहमत नाही.

**विलोमेन्त**(कृ.) वाद करता, सहमत नसता.

**विलोमेत्त्वा**–(पू. क्रि.) वाद करून, सहमत नसून.

**विलोळन**–(नपु.) घुसळणे, मंथन करणे, घुसळन, मंथन.

**विलोळेति**–(क्रि.) घुसळणे, मंथन करणे.

**विवज्जन**–(नपु.) त्याग, दूर, अलिप्त, वेगळे.

**विवज्जेति**–(क्रि.) वाचविणे, त्याग करणे, सोडणे.

**विवज्जेसि**–(पू. क्रि.) वाचविले, त्याग केला, सोडले.

**विवज्जित, विवज्जेन्त**–(कृ.) वाचविता, त्यागता, सोडता.

**विवज्जिय**–(कृ.) वाचविणे योग्य, त्यागणे योग्य, सोडणे योग्य.
**विवज्जेत्वा**–(पू. क्रि.) वाचवून, त्यागून, सोडून.
**विवट**–(कृ.) उघडा, खुला, मुक्त, नग्न, विवृत्त.
**विवट्ट**–(नपु.) दिवसेंदिवस वाढणाऱ्या कल्पांतील बदल.
**विवट्ट-कप्प**–(नपु.) वाढणारा कल्प, काळ-वेळ-समय.
**विवट्टति**–(क्रि.) मागे सरणे, नवीन सुरुवात करणे.
**विवट्टि**–(पू. क्रि.) मागे सरला, नवी सुरुवात केली.
**विवट्टित**–(कृ.) मागे सरता, नवीन सुरुवात करता.
**विवट्टित्वा**–(पू. क्रि.) मागे सरून, नवीन सुरुवात करून.
**विवट्टन**–(नपु.) मागे सरणे, वळणे.
**विवट्टेति**–(क्रि.) मागे सरणे, बाजू बदलणे, नष्ट करणे.
**विवट्टेसि**–(पू. क्रि.) मागे सरला, बाजू बदलली, नष्ट केले.
**विवट्टित**–(कृ.) मागे सरता, बाजू बदलता, नष्ट करता.
**विवट्टेत्वा**–(पू. क्रि.) मागे सरून, बाजू बदलून, नष्ट करून.
**विवण्ण**–(वि.) दुर्बल, दबलेला, दुरावस्थ.
**विवण्णेति**–(क्रि.) निंदा करणे, बदनामी करणे.
**विवण्णेसि**–(पू. क्रि.) निंदा केली, बदनामी केली.
**विवण्णित**–(कृ.) निंदा करता, बदनामी करता.
**विवण्णेत्वा**–(पू. क्रि.) निंदा करून, बदनामी करून.
**विवदति**–(क्रि.) विवाद करणे, भांडणे.
**विवदि**–(पू. क्रि.) विवाद केला, भांडला.
**विवदन्त**–(कृ.) विवादता, भांडता.
**विवदमान**–(कृ.) विवाद करण्यायोग्य, भांडण्यायोग्य.
**विवदित्वा**–(पू. क्रि.) विवाद करून, भांडून.
**विवदन**–(नपु.) विवाद, भांडण.
**विवर**–(नपु.) छिद्र, भोक, चीर.
**विवरण**–(नपु.) स्पष्टीकरण, उघड, अर्थ सांगणे, अर्थविवरण.
**विवरति**–(क्रि.) स्पष्ट करणे, उघड करणे, अर्थ सांगणे, विवरण करणे.
**विवरि**–(पू. क्रि.) स्पष्ट केले, उघड केले, अर्थ सांगितला, विवरण केले.
**विवट, विवरन्त, विवरिन्तु**–(कृ.) स्पष्ट करता, उघडता, अर्थ सांगता.
**विवरमान**–(कृ.) स्पष्ट करण्यायोग्य, अर्थ सांगणे योग्य.
**विवरित्वा**–(पू. क्रि.) स्पष्ट करून, उघडून, अर्थ सांगून, विवरण करून.
**विवस**–(वि.) विवश, बेचैन, अस्वस्थ, असंमत.
**विवाद**–(पु.) भांडण, कलह, झगडा, विवाद.
**विवादी**–(पु.) भांडणारा, विवाद करणारा.
**विवादक**–(पु.) भांडखोर.
**विवाह**–(पु.) लग्न, विवाह (मुलीचे लग्न).
**विवाह-मङ्गल**–(नपु.) लग्न पावित्र्य, शुभ लग्न.
**विविच्च**–(अ.) पृथक्क, वेगळा, विभक्त.
**विवित्त**–(वि.) एकटा, एकान्तांत.
**विवित्तता**–(स्त्री.) एकान्तपणा.
**विविध**–(वि.) अनेक प्रकार, नाना प्रकार, विविध.
**विवेक**–(पु.) विचार, चिंतन, एकान्त, एकान्तांत विवेक.
**विवेचन**–(नपु.) आलोचना, स्पष्टीकरण, चर्चा, विवेचन.
**विवेचेति**–(क्रि.) स्पष्ट करणे, चर्चा करणे, विवेचन करणे.
**विवेचेसि**–(पू. क्रि.) स्पष्ट केले, चर्चा केली, विवेचन केले.
**विवेचित**–(कृ.) स्पष्ट करता, चर्चा करता, विवेचन करता.
**विवेचेत्वा**–(पू. क्रि.) स्पष्ट करून, चर्चा करून, विवेचन करून.
**विस**–(नपु.) विष, जहर.
**विस-कण्टक**–(नपु.) विषारी जंतू, साप, नाग.
**विस-धर**–(पु.) साप, नाग.
**विस-पीत**–(वि.) विषात बुडविलेला, विष लावलेला.
**विस-रुक्ख**–(पु.) विषवृक्ष.
**विस-वेज्ज**–(पु.) विषवैद्य.
**विस-सल्ल**–(नपु.) विषात बुडविलेला बाण, विष लावलेला तीर.
**विसञ्ञ**–(वि.) बेहोश, बेशुद्ध, मूर्छित, अचेतन.
**विसञ्ञी**–(वि.) बेशुद्ध, मूर्च्छित.
**विसट, विसत**–(कृ.) पसरलेला, विस्तृत.
**विसति**–[पहा-पविसति].
**विसत्त**–(वि.) आसक्त, अधीर.
**विसत्तिका**–(स्त्री.) तृष्णा, आशा, इच्छा, आसक्ती.
**विसद**–(वि.) विशद, स्पष्ट, साफ, व्यक्त.
**विसद-किरिया**–(स्त्री.) स्पष्टीकरण.
**विसदता**–(स्त्री.) स्पष्टता, उघडपणा.
**विसदभाव**–(पु.) स्पष्टता.
**विसभाग**–(वि.) भिन्न, विरोधी, असाधारण, असामान्य.
**विसम**–(वि.) विषम, खडबडीत.

**विसय**–(पु.) स्थान, प्रदेश, क्षेत्र, इंद्रियाचा विषय.
**विसय्ह**–(वि.) सुसह्य, सहन, सम्भव.
**विसय्ह जातक**–उदार, दानी विसय्ह नावाच्या श्रीमंताच्या दान-पुण्यामुळे इंद्राचे आसन डळमळू लागल्याची कथा–(३४०).
**विसर**–(पु.) समूह, थवा, जथा, साठा, संग्रह.
**विसवन्त जातक**–विषवैद्याने सापाला आपले विष परत चोखून घेण्यास सांगितल्याची कथा–(६९).
**विस-लित्त**–(वि.) विषांत बुडविलेला बाण, विष लावलेला तीर.
**विसल्ल**–(वि.) शोकमुक्त, अशोक.
**विसहति**–(क्रि.) समर्थ होणे, साहस करणे.
**विसहि**–(पू. क्रि.) समर्थ झाला, साहस केले.
**विसहमान**–(कृ.) समर्थ होणे योग्य, साहस करणे योग्य.
**विसहित्वा**–(पू. क्रि.) समर्थ होऊन, साहस करून.
**विसंयुत्त**–(कृ.) वेगळा केला, जोडला नाही.
**विसंयोग**–(पु.) वेगळा, पृथक्क, पार्थक्य.
**विसंवाद**–(पु.) खोटा, धोका, विरोध, विसंवाद.
**विसंवादक**–(वि.) अविश्वासनीय, खोटे बोलणारा.
**विसंवादन**–(नपु.) खोटे बोलणे, लबाडीचा व्यवहार करणे.
**विसंवादेति**–(क्रि.) वचनभंग करणे, खोटे बोलणे.
**विसंवादेसि**–(पू. क्रि.) वचनभंग केला, खोटे बोलला.
**विसंवादित, विसंवादेन्त**–(कृ.) वचनभंग करता; खोटे बोलता.
**विसंवादेत्वा**–(पू. क्रि.) वचनभंग करून, खोटे बोलून.
**विसंसट्ठ**–(वि.) पृथक्क झाला, वेगळा झाला, विभक्त राहिला.
**विसङ्कित**–(वि.) संशयीत, संदिग्ध, अनिश्चित.
**विसङ्खार**–(पु.) संखाराचा निरोध, दुष्टाला प्रतिबंध.
**विसङ्खित**–(कृ.) नष्ट केलेला.
**विसाखा**–(स्त्री.) विशाखा नक्षत्र.
**विसाखा**–(स्त्री.) भगवान बुद्धांची उदार शिष्या-उपासिकामध्ये श्रेष्ठ उपासिका, दाती व मिगारमाता विशाखा.
**विसाण**–(नपु.) शिंग, विषाण, डुकराचा दात, जनावराचे शिंग.
**विसाणमय**–(वि.) शिंगापासून बनविलेले.
**विसाद**–(पु.) विषाद, खेद, निरुत्साह.
**विसारद**–(वि.) विशारद, दक्ष, तत्पर, संयत, ज्ञाता.
**विसाल**–(वि.) विशाल, मोठा, भव्य.
**विसालक्खी**–(स्त्री.) विशालाक्षी, मृगाक्षी, मोठ्या डोळ्याची.
**विसालता**–(स्त्री.) विशालता, भव्यपणा, मोठेपणा.
**विसालत्त**–(नपु.) विशालत्व, मोठेपण, विशालता.
**विसिखा**–(स्त्री.) गल्ली, आळी, पेठ, सडक.
**विसिट्ठ**–(वि.) विशिष्ट, प्रमुख, असाधारण.
**विसिट्ठतर**–(वि.) विशिष्टतर, सर्वश्रेष्ठ.
**विसिब्बेति**–(क्रि.) उचटणे, शिलाई उसवणे.
**विसिब्बेसि**–(पू. क्रि.) उचटणे, शिलाई उसवली.
**विसिब्बेन्त**–(कृ) उचटता, शिलाई उसवता.
**विसिब्बेत्वा**–(पू. क्रि.) उचटून, शिलाई उसवून.
**विसीदति**–(क्रि.) निराश होणे, गलितगात्र होणे, निरुत्साह होणे.
**विसीवन**–(नपु.) स्वतःस गरम करणे.
**विसीवेति**–(क्रि.) स्वतःस शेकणे, गरम करणे.
**विसिवेसि**–(पू. क्रि.) स्वतःस शेकले, गरम केले.
**विसीवेन्त**–(कृ.) स्वतःस गरम करता.
**विसीवेत्वा**–(पू. क्रि.) स्वतःस गरम करून.
**विसुज्झति**–(क्रि.) स्वच्छ होणे, शुद्ध होणे.
**विसुज्झि**–(पू. क्रि.) स्वच्छ झाला, शुद्ध झाला.
**विसुज्झमान**–(कृ.) स्वच्छ होणे योग्य, शुद्ध होणे योग्य, शुद्ध होणारा.
**विसुज्झित्वा**–(पू. क्रि.) स्वच्छ होऊन, शुद्ध होऊन.
**विसुद्ध**–(कृ.) विशुद्ध, परिशुद्ध.
**विसुद्धता**–(स्त्री.) विशुद्धपणा, विशुद्ध भाव.
**विसुद्धि**–(स्त्री.) पावित्र्य, विशुद्धी,.
**विसुद्धी-देव**–(पु.) सज्जन व्यक्ती, सदाचारी व्यक्ती.
**विसुद्धी-मग्ग**–(पु) पावित्र्याचा मार्ग, पुन्याचा मार्ग, विशुद्धीचा मार्ग.
**विसुद्धी-मग्ग**–(पु.) संघपाल स्थविरांनी विनंती केल्यावरून आचार्य बुद्धघोषांनी तयार केलेला **बौद्ध** धम्माचा विश्वकोश.
**विसुं**–(क्रि. वि.) वेगवेगळा, पृथक्क, अलग-अलग.
**विसुंकरण**–(पु.) विभागणी, वाटणी.
**विसुंकत्त्वा**–(पू. क्रि.) विभागणी करून, वाटणी करून.
**विसूक**–(नपु.) तमाशा, खेळ, करमणुक.
**विसूक-दस्सन**–(नपु.) खेळ, कला, करमणुक पाहणे, तमाशा पाहणे.
**विसूचिका**–(स्त्री.) पटकी, वांती, जुलाब होणे.
**विसेस**–(पु.) विशेष, वेगळा, भेद असलेला.

**विसेसक**–(पु.) विशेष चिन्ह, वेगळा प्रकार.
**विसेस-गामी**–(वि.) वैशिष्ठ्यात अग्रेसर, प्रवीण.
**विसेस-भागिय**–(वि.) वैशिष्ठ्यात अग्रभागी-पुढे.
**विसेसाधिगम**–(पु.) विशिष्ठ पद प्राप्त.
**विसेसता**–(स्त्री.) विशेषता, वैशिष्ठ्य.
**विसेसतो**–(क्रि. वि.) विशेषरुपाने, विशेषत्वाने
**विसेसन**–(नपु.) विशेषण.
**विसेसिय, विसेसितब्ब**–(कृ. वि.) वैशिष्ठ्यास योग्य.
**विसेसी**–(वि.) विशिष्ठ.
**विसेसेति**–(क्रि.) विशेष करणे, वेगळे करणे.
**विसेसेसि**–(पू. क्रि.) विशेष केले, वेगळे केले.
**विसेसित**–(कृ.) विशेष करता, वेगळे करता.
**विसेसेत्वा**–(पू. क्रि.) विशेष करून, वेगळे करून.
**विसोक**–(वि.) शोक रहित, अशोक.
**विसोधन**–(नपु.) शुद्धीकरण.
**विसोधेति**–(क्रि.) शुद्ध करणे.
**विसोधेसि**–(पू. क्रि.) शुद्ध केले.
**विसोधित, विसोधेन्त**–(कृ.) शुद्ध करता.
**विसोधिय**–(कृ.) शुद्ध करणे योग्य.
**विसोधेत्वा**–(पू. क्रि.) शुद्ध करून.
**विसोसेति**–(क्रि.) सुकविणे, वाळविणे, पसरणे.
**विसोसेसि**–(पू. क्रि.) सुकविले, वाळविले, पसरले.
**विसोसित, विसोसेन्त**–(कृदन्त) सुकविता, वाळविता, पसरता.
**विसोसेत्वा**–(पू. क्रि.) सुकवून, वाळवून, पसरून.
**विस्सगन्ध**–(पु.) कच्च्या मांसासारखा वास.
**विस्सग्ग**–(पु.) दान.
**विस्सज्जक**–(वि.) देणारा, वाटणारा, प्रश्नाचे उत्तर देणारा.
**विस्सज्जति**–(क्रि.) देणे, वाटणे, उत्तर देणे.
**विस्सज्जि**–(पू. क्रि. ) दिले, वाटले, उत्तर दिले.
**विस्सज्जत**–(कृ.) देता, वाटता, उत्तर देता.
**विस्सज्जितब्ब, विस्सज्जिय**–(कृ.) देणे योग्य, वाटणे योग्य, उत्तर देणे योग्य.
**विस्सज्जित्वा**–(पू. क्रि.) देऊन, वाटून, उत्तर देऊन.
**विस्सज्जन**–(नपु.) देणे, प्रत्युत्तर देणे, खर्च करणे, वाटप करणे.
**विस्सज्जनक**–(वि.) प्रत्युत्तर देणारा, दाता.
**विस्सज्जनीय**–(वि.) वाटणे योग्य, उत्तर देणे योग्य.
**विस्सज्जेति**–(क्रि.) उत्तर देणे, वाटणे, खर्च करणे, पाठविणे.
**विस्सज्जि**–(पू. क्रि.) उत्तर दिले, वाटले, खर्च केले, पाठविले.
**विस्सज्जित, विस्सज्जेन्त**–(कृ.) उत्तर देता, वाटता, खर्च करता, पाठविता.
**विस्सज्जेत्वा**–(पू. क्रि.) उत्तर देऊन, वाटून, खर्च करून, पाठवून.
**विस्सट्ठ**–(कृ.) उत्तरित, पाठविलेला गेला.
**विस्सट्ठि**–(स्त्री.) बाहेर पडणे.
[सुक्क-विस्सट्ठि–शुक्रमोचन, स्वप्न दोष, स्वप्नावस्था]
**विस्सत्थ**–(कृ.) विश्वस्त, विश्वसनीय, खात्रीचा.
**विस्सन्द**–(नपु.) उतू येणे, उफाळून येणे, उकळी फुटणे.
**विस्सन्दन**–(नपु.) उतू येणे, उसळणे.
**विस्सन्दति**–(क्रि.) उकळी फुटणे.
**विस्सन्दि**–(पू. क्रि.) उकळी फुटली.
**विस्सन्दित**–(कृ.) उकळी फुटता.
**विस्सन्दमान**–(कृ.) उकळी फुटण्यायोग्य, उसळण्यायोग्य, उकळी फुटणारा.
**विस्सन्दित्वा**–(पू. क्रि.) उकळी फुटून.
**विस्समति**–(क्रि.) विश्रांति घेणे. विश्राम करणें.
**विस्समि**–(पू. क्रि.) विश्रांति घेतली, विश्राम केला.
**विस्समन्त**–(कृ.) विश्रांति घेता, विश्राम करता.
**विस्समित्वा**–(पू. क्रि.) विश्रांति घेऊन, विश्राम करून.
**विस्सन्त**–(कृ.) विश्रांत.
**विस्सर**–(वि.) आर्तस्वर, दुःखीस्वर.
**विस्सरं**–(नपु.) विसरणे, भुलणे.
**विस्सरति**–(क्रि.) विसरणे, भुलणे.
**विस्सरसि**–(पू. क्रि.) विसरले, भुलले.
**विस्सरित**–(कृ.) विसरता, भुलता.
**विस्सरित्वा**–(पू. क्रि.) विसरून, भुलून.
**विस्ससति**–(क्रि.) विश्वास ठेवणे.
**विस्ससि**–(पू. क्रि.) विश्वास ठेवला.
**विस्सत्थ**–(कृ.) विश्वस्थ, विश्वास ठेवता.
**विस्ससित्वा**–(पू. क्रि.) विश्वास ठेवून.
**विस्सास**–(पु.) विश्वास, घनिष्टता.
**विस्सासक, विस्सासिक, विस्सासी, विस्सासनीय**–(पु.) विश्वासू, विश्वासी, विश्वसनीय.
**विस्सास भोजन जातक**–सिंहाने हरिणीचा देह केवळ चाटला. परंतु तिच्या शरिरावर विष चोपडल्यामुळे सिंहाचा मृत्यु झाल्याची कथा–(९३).
**विस्सुत**–(वि.) विश्रुत, प्रसिद्ध, जाहीर, विख्यात.

**विहग**–(पु.) पक्षी.
**विहङ्गम**–(पु.) पक्षी, पाखरू.
**विहञ्जति**–(क्रि.) दुःखी होणे, पीडित होणे.
**विहञ्जि**–(पू. क्रि.) दुःखी झाला, पीडित झाला.
**विहञ्जमान**–(कृ.) दुःख करण्यायोग्य, पीडित होणारा.
**विहत**–(कृ.) मारला गेला, पिंजलेला कापूस.
**विहनति**–(क्रि.) मारणे, बडविणे, ठोकणे.
**विहनि**–(पू. क्रि.) मारले, बुडविले, ठोकले.
**विहनत**–(कृ.) मारता, बडविता, ठोकता.
**विहनित्वा, विहत्वा,**–(पू. क्रि.) मारून, बडवून, ठोकून.
**विहरति**–(क्रि.) राहणे, जगणे, जिंकणे, विहार करणे.
**विहरि**–(पू. क्रि.) राहिला, जगला, जिंकला, विहार केला.
**विहरन्त**–(कृ.) राहता, जगता, जिंकता, विहार करता.
**विहरमान**–(कृ.) राहण्यायोग्य, जगण्यायोग्य, जिंकण्यायोग्य, विहार करणारा,
**विहरित्वा**–(पू. क्रि.) राहून, जगून, जिंकून, विहार करून.
**विहाय**–(पू. क्रि.) सोडून.
**विहार**–(पु.) निवासस्थान, भिक्खुनिवास, बुद्ध-विहार.
**विहार देवी**–(स्त्री.) दुट्ठगामणीची माता.
**विहारिक**–(वि.) विहारात राहणारा, विहारांत फिरणारा, विहार करणारा.
**विहारी**–(वि.) राहणारा, फिरणारा, हिंडणारा, विहार करणारा.
**विहिंसति**–(क्रि.) त्रास देणे, छळणे, ठार मारणे.
**विहिंसि**–(पू. क्रि.) त्रास दिला, छळले, ठार केले.
**विहिंसित**–(कृ.) त्रास देता, छळता, ठार मारता.
**विहिंसित्वा**–(पू. क्रि.) त्रास देऊन, छळून, ठार मारून.
**विहिंसना, विहिंसा**–(स्त्री.) निर्दयता, निष्ठुरता.
**विहित**–(कृ.) योग्य, उचित, व्यवस्थित.
**विहीन**–(कृ.) त्यक्त, सोडलेले, टाकलेले, विरहित, शिवाय, खेरीज.
**विहेठक**–(वि.) त्रास देणारा, हानि करणारा, दुष्ट.
**विहेठ जातिक**–(वि.) त्रास देणारा, कष्ट विणारा, निर्दय.
**विहेठन**–(नपु.) त्रास देणे, कष्टविणे, त्रास उपद्रव.
**विहेठियमान**–(कृदन्त) त्रास देत असात, कष्ट देता, दुःख देत असता.
**विहेठेति**–(क्रि.) त्रास देणे, कष्टविणे.
**विहेठेसि**–(पू. क्रि.) त्रास दिला, कष्टविले, कष्ट दिले.
**विहेठित, विहेठेन्त**–(कृ.) त्रास देता, कष्ट देता.
**विहेठेत्वा**–(पू. क्रि.) त्रास देऊन, कष्ट देऊन.
**विहेसक**–(वि.) कष्टप्रद, त्रासदायक.
**विहेसा**–(स्त्री.) बेचैनी, हैरानी, त्रासित, त्रास, त्रागा.
**विहेसियमान**–[पहा–विहेठियमान].
**विहेसेति**–[पहा–विहेठेति].
**वीचि**–(स्त्री.) लहर, लाट.
**वीच्छा**–(स्त्री.) पुनः पुन्हा एकच गोष्ट. सांगणे.
**वीजति**–(क्रि.) (पंखा) हालविणे, फिरविणे.
**वीजि**–(पू. क्रि.) हालविला, फिरविला.
**वीजित**–(कृ.) हालविता, फिरविता.
**वीजयमान**–(कृ.) हालविणे योग्य, फिरविणे योग्य, हलविणारा.
**वीजित्वा**–(पू. क्रि.) हालवून, फिरवून.
**वीजन**–(नपु.) पंखा चालू करणे, हवा चालू करणे, [वायुवीजन].
**वीजनी**–(स्त्री.) पंखा.
**वीजेति**–(क्रि.) पंखा चालू करणे.
**विजेसि**–(पू. क्रि.) पंखा चालू केला.
**वीजेन्त**–(कृ.) पंखा चालू करता.
**वीजेत्वा**–(पू. क्रि.) पंखा चालू करून.
**वीणा**–(स्त्री.) सारंगी, तंतूवाद्य, वीणा.
**वीणा-दण्डक**–(पु.) वीणेचा दांडा.
**वीणा-दोणि**–(स्त्री.) वीणेचा भोपळा, वीणेचा गोलाकार पोकळ भाग.
**वीणा-वादन**–(नपु.) वीणा वाजविणे, वीणा-वादन.
**वीणा थूण जातक**–बनारसच्या एका धनिकाची मुलगी पाठीचे कुबड निघालेल्या कुबड्याबरोबर पळून गेली. नंतर तिला समजावून सांगून परत आणल्याची कथा–
**वीत, वायित**–(कृ.) रहित, शिवाय, खेरीज, ऐवजी, विणलेले.
**वीतच्चिक**–(वि.) उष्णतेशिवाय.
**वीत-गेध**–(वि.) लोभ रहित, निर्मोही, निरिच्छ.
**वीत-तण्ह**–(वि.) तृष्णा रहित.
**वीत-मल**–(वि.) मल रहित, निर्मळ.
**वीत-मोह**–(वि.) मोह रहित, ज्ञानी.
**वीत-राग**–(वि.) राग रहित, दयाळू, प्रेमळ.
**वीत-राग**–(पु., वि.) अर्हत.
**वीतिक्कम**–(पु.) नियमाविरुद्ध, व्युत्क्रम, व्यतिक्रम.

**वीतिक्कमति**–(क्रि.) नियमबाह्य वागणे.
**वीतिक्कमि**–(पू. क्रि.) नियमबाह्य वागला.
**वीतिक्कन्त, वितिक्कमन्त**–(कृ.) नियमबाह्य वागता.
**वीतिक्कमित्त्वा**–(पू. क्रि.) नियमबाह्य वागून.
**वीतिच्छ जातक**–प्रतिप्रश्न विचारुन प्रश्नकर्त्यास हरविल्याची कथा–(२४४).
**बीतिनामेति**–(क्रि.) वेळ घालविणे, उशीर करणे.
**वितिनामेसि**–(पू. क्रि.) वेळ घालविला, उशीर केला.
**वीतिनामित**–(कृ.) वेळ घालविता, उशीर करता.
**वीतिनामेत्त्वा**–(पू. क्रि.) वेळ घालवून, उशीर करून.
**वीतिवत्त**–(कृ.) निघून गेला, खर्च झाला, जिंकला गेला.
**वीतिवत्तेति**–(क्रि.) उशीर करणे, जिंकणे.
**वीतिवत्तेसि**–(पू. क्रि.) उशीर केला, जिंकले.
**वीतिवत्तित**–(कृ.) उशीर करता, जिंकता.
**वीतिवत्तेत्वा**–(पू. क्रि.) उशीर करून, जिंकून.
**वीतिहरण**–(नपु.) लांब लांब पाऊल टाकणे, ढेंगा करणे.
**वीतिहार**–(पु.) पाऊल.
**वीति हरित**–(क्रि.) चालणे, फिरणे, पाऊल टाकणे.
**वीतिहरि**–(पू. क्रि.) चालला, फिरला, पाऊल टाकले.
**वीतिहरन्त**–(कृ.) चालता, फिरता, पाऊल टाकता.
**वीति हरित्त्वा**–(पू. क्रि.) चालून, फिरून, पाऊल टाकून.
**वीथि**–(स्त्री.) गल्ली, सडक, रस्ता.
**वीथि-चित्त**–(नपु.) क्रियाशील चित्त, कर्तव्यदक्ष.
**वीमंसक**–(वि.) विमर्श करणारा, परीक्षक, मिसांसा करणारा.
**वीमंसन**–(नपु.) विमर्श, परीक्षण, मीसांसा.
**वीमंसति**–(क्रि.) विमर्श करणे, परीक्षण करणे, मीसांसा करणे.
**वीमंसि**–(पू. क्रि.) विमर्श केला, परीक्षण केले, मीमांसा केली.
**वीमंसित, वीमंसन्त**–(कृ.) विमर्श करता, परीक्षण करता.
**वीमंसिय**–(कृ.) विमर्श करणे योग्य, परीक्षण करणे आवश्यक.
**वीमंसित्त्वा**–(पू. क्रि.) विमर्श करून, परीक्षण करून. मीसांसा करून.
**वीमंसी**–(पु.) परीक्षक, विमर्शक, संशोधक, मीमांसक
**वीर**–(वि.) बहादुदूर, शूर.
**वीर**–(पु.) शूर पुरुष.

**वीरक जातक**–साविट्ठिक नावाचा कावळा, वीरक नावाच्या कावळ्याचा नोकर बनला व वीरकाने मारलेले सर्व मासे साविट्ठिक खात असल्याची कथा–(२०४).
**वीयति**–(क्रि.) विणणे, गुंफणे.
**वीरू**–(स्त्री.) लता, वेली.
**वीसति**–(सं. वि. , स्त्री.) वीस, (२०).
**वीसतिम**–(वि.) विसाव्वा.
**वीहि**–(पु.) भात, साळी, न सडलेले तांदूळ.
**वुच्चति**–(क्रि.) सांगणे, उच्चारणे, बोलणे.
**वुच्चमान**–(कृ.) सांगता, उच्चारता, बोलता.
**वुट्ठ**–(कृ.) पावसांत भिजलेला.
**वुट्ठहति**–(क्रि.) उठणे.
**वुट्ठाति**–(क्रि.) उठणे.
**वुट्ठहि**–(पू. क्रि.) उठला.
**वुट्ठासि**–(पू. क्रि.) उठला.
**वुट्ठहित, वुट्ठहन्त**–(कृ.) उठता.
**वुट्ठाय**–(कृ.) उठून.
**वुट्ठहित्त्वा**–(पू. क्रि.) उठून.
**वुट्ठान**–(नपु.) उत्थान, उठणे.
**वुट्ठापेति**–(क्रि.) उठविणे.
**वुट्ठापेसि**–(पू. क्रि.) उठविले.
**वुट्ठापित**–(कृ.) उठविता.
**वुट्ठापेत्त्वा**–(पू. क्रि.) उठवून.
**वुट्ठि**–(स्त्री.) वृष्ठी, वर्षा, पाऊस.
**वुट्ठिक**–(वि.) पावसाळी.
**वुड्ढ**–(वि.) वृद्ध, जेष्ठ, वयाने मोठा.
**वुड्ढतर**–(वि.) वृद्धतर, जेष्ठतर, सर्वांत मोठा.
**वुड्ढि**–(स्त्री.) वृद्धी, वाढ, ऐश्वर्य.
**वुत्त**–(कृ.) सांगितलेले, पेरलेले.
**वुत्त**–(नपु.) सांगितलेले वचन, पेरलेले बी.
**वुत्तप्पकार**–(वि.) कथनानुसार, सांगितल्याप्रमाणे.
**वुत्तप्पकारेन**–(क्रि. वि.) सांगितल्याप्रमाणे.
**वुत्त-वादी**–(पु.) घोकणारा, शिकविल्याप्रमाणे बोलणारा.
**वुत्त-सिर**–(वि.) मुण्डन केलेले डोके, भादरलेले डोके.
**वुत्ति**–(स्त्री.) व्यवहार, आचरण, जीविका, वृत्ति.
**वुत्तिक**–(वि.) वृत्तीचा, अभ्यस्त, परिपाठी.
**वुत्तिका**–(स्त्री.) वृत्तीचा भाव, वर्तन.
**वुत्ती**–(वि.) अभ्यस्त.
**वुत्थ**–(क्रि. वि.) थांबून, वेळ लावून, उशीर करून.

**वुत्थ-वस्स**–(वि.) वर्षावास केलेला, पावसाळ्याचे व्रत केलेला. पावसाळ्यातील व्रतांचे पालन केलेला.
**वुद्ध**–[पहा–वुड्ढ].
**वुद्धी**–[पहा–वुड्ढि].
**वुद्धिप्पत्त**–(वि.) तारुण्यप्राप्त, विवाहास योग्य.
**वुद्धीयुत्त**–(वि.) समृद्ध.
**वुद्धीरोग**–(पु.) अंडकोशाची वृद्धी होणारा रोग, अंड सुजणे.
**वुय्हति**–(क्रि.) घेऊन जाणे.
**वुय्हि**–(पू. क्रि.) घेऊन गेला.
**वुळ्ह**–(कृ.) घेऊन जाता.
**वुळ्हमान**–(कृ.) घेऊन जाणे योग्य, घेऊन जाणारा.
**वुळ्हित्वा**–(पू. क्रि.) घेऊन जाऊन.
**वुय्हन**–(नपु.) नेणे, वाहून नेणे.
**वुस**–(पु.) बैल.
**वुसित**–(कृ.) राहिला, वसला, वास केला.
**वुसित्तत**–(नपु.) राहणे, वसणे.
**वुसित-भाव**–(पु.) राहण्याची वृत्ति.
**वुस्सति**–(क्रि.) राहणे, वसती.
**वुपकट्ठ**–(वि.) एकांतवासी.
**वूपसन्त**–(कृ.) शांति प्राप्त, शांतताप्रिय.
**वूपसमन**–(नपु.) शांति, शांतता.
**वूपसमेति**–(क्रि.) शांत करणे, विझविणे.
**वूपसमेसि**–(पू. क्रि.) शांत केले, विझविले.
**वूपसमित, वूपसमेन्त**–(कृ.) शांत करता, विझविता.
**वूपसमेत्वा**–(पू. क्रि.) शांत करून, विझवून.
**वूपसम्मति**–(क्रि.) उपशमान होणे, शांत होणे, विझणे.
**वूळ्ह**–[पहा–वळ्ह].
**वे**–(अ.) वास्तविक, स्थीर रुपाने.
**वेकल्ल**–(नपु.) विकल, गलित, श्रांत.
**वेकल्लता**–(स्त्री.) विकलांग, गलितगात्र, थकलेला.
**वेग**–(पु.) शक्ती, गती, जोर.
**वेजयन्त**–(पु.) इंद्राच्या महालाचे नाव.
**वेज्ज**–(पु.) वैद्य.
**वेज्ज-कम्म**–(नपु.) वैद्याचे परीक्षण, चिकित्सा.
**वेठक**–(वि.) गुंडाळणारा, लपेटणारा, घेरणारा.
**वेठन**–(नपु.) वेष्टन, लपेट, पगडी, फेटा, पटका.
**वेठियमान**–(कृ.) लपेटता, गुंडाळता, गुंडता.
**वेठेति**–(क्रि.) लपेटणे, गुंडणे, गुंडाळणे.
**वेठेसि**–(पू. क्रि.) लपेटला, गुंडला, गुंडाळला.
**वेठित, वेठेन्त**–(कृ.) लपेटता, गुंडता, गुंडाळता, वेष्ठित.
**वेठेत्वा**–(पू. क्रि.) लपेटून, गुंडून, गुंडाळून.
**वेण**–(पु.) बुरूड, टोपली विणणारा.
**वेणविक**–(पु.) बासरी वाजविणारा.
**वेणिक**–(पु.) वीणा वाजविणारा, सारंगी वाजविणारा.
**वेणी**–(स्त्री.) केसांची वेणी.
**वेणी-कत**–(वि.) वेणी घातलेले वा बुचडा बांधलेले डोके.
**वेणीकरण**–(नपु.) विंचरणे, वेणी घालणे, बुचडा बांधणे.
**वेणु**–(पु.) वासा, कळक, वेळू, बांबु.
**वेणु-गुम्ब**–(पु.) कळकाचे बेट, बांबुची झाडी.
**वेणु-बलि**–(पु.) कळकांच्या रुपात जकात-कर भागविणे.
**वेणु-वन**–(नपु.) कळकांचे वन, राजगृहाजवळील वेणुवन. या वेणुवनात भगवान बुद्धांनी अनेक वेळा येऊन उपदेश केला होता.
**वेतन**–(नपु.) पगार, मजुरी, वेतन.
**वेतनिक**–(नपु.) पगारी नोकर, वैतनिक, भाड्याने मिळणारा नोकर.
**वेतरणी**–(स्त्री.) नरकाप्रमाणे, कष्टप्रद नदी.
**वेतस**–(पु.) बोरूचा नळा, कळकाचा नळा.
**वेतालिक**–(पु.) राजदरबारी कलाकार, संगितज्ञ, गायक, नर्तक.
**वेति**–(क्रि.) लपणे, दडणे, अंतर्धान पावणे.
**वेत्त**–(नपु.) वेत.
**वेत्तग्ग**–(नपु.) वेताचे टोक.
**वेत्त-लता**–(स्त्री.) वेताची छडी, काठी.
**वेद**–(पु.) धर्मभावना, अनुभूति, ब्राह्मणांचे स्वयंभू किंवा ईश्वरनिर्मित मानले जाणारे चार ग्रंथ,.–वेद.
**वेदगू**–(पु.) वेदज्ञ, वेद जाणणारा, अति ज्ञानी.
**वेदजात**–(वि.) आनंदित.
**वेदन्तगू**–(पू., वि.) ज्ञानाच्या परिकोटीला पोहोचलेला, अतिविद्वान.
**वेदन्त-पारगू**–(वि.) वेद पारंगत, सर्व वेदांचा अर्थ जाणणारा.
**वेदक**–(पु.) अनुभव घेणारा, अनुभव भोगणारा.
**वेदनट्ट**–(वि.) त्रासलेला, पीडित, ताडित.
**वेदना**–(स्त्री.) पीडा, त्रास, दुखणे, इंद्रियांचे दुःख-वेदना.
**वेदनाक्खन्ध**–(पु.) वेदना-स्कंध, वेदनांचा समूह.
**वेदब्भ जातक**–वेदब्भ मंत्र जाणकार–सिद्धीप्राप्त ब्राह्मणाने स्वार्थी डाकुंना प्राणदण्ड दिल्याची कथा–(४८).
**वेदयित**–(नपु.) अनुभव, अनुभूति.

**वेदिका, वेदी**–(स्त्री.) यज्ञात पशुबली देण्याची जागा.
**वेदित**–(कृ.) ज्ञात, माहीत.
**वेदियति**–(क्रि.) अनुभव घेणे.
**वेदियमान**–(कृ.) अनुभव घेता, अनुभव घेणे लायक, अनुभव घेणारा.
**वेदेति**–(क्रि.) अनुभव घेणे, जाणणे.
**वेदेसि**–(पू. क्रि.) अनुभव घेतला, जाणले.
**वेदेन्त**–(कृ.) अनुभव घेता, जाणता.
**वेदेत्वा**–(पू. क्रि) अनुभव घेऊन, जाणून.
**वेदेह**–(वि.) विदेह देशाचा वैदेही.
**वेदेहीपुत्त**–(पु.) विदेही देशाच्या राजकुमाराचा पुत्र.
**वेध**–(पु.) छेदणे, टिपणे, नेम मारून टिपणे, नेमणे.
**वेधन**–(नपु.) बाण मारणे.
**वेधति**–(क्रि.) कापणे, बाण मारणे.
**वेधि**–(पू. क्रि.) कापले, बाण मारला.
**वेधित**–(कृ.) कापता, बाण मारता.
**वेधित्वा**–(पू. क्रि.) कापून, बाण मारून.
**वेनयिक**–(पु.) विनय जाणणारा.
**वेनेय्य**–(वि.)विनित बनणारा,शिकणारा, शिक्षण घेणारा.
**वेपुल्ल**–(नपु.) विपुलता, अधिक प्रमाण, जास्त.
**वेपुल्ल**–(पु.) राजगृहाजवळच्या पांच पर्वतापैकी, सर्वांत जास्त उंच असलेला पर्वत.
**वेभङ्गिय**–(वि.) वाटण्यायोग्य, विभागण्यायोग्य.
**वेभार**–(नपु.) राजगृहाच्या चोहोबाजूस असलेल्या पर्वतशिखरापैकी एक.
**वेम**–(पु.) भरणी, धोटा, कापड विणण्याचे एक हत्यार.
**वेमज्झ**–(नपु.) मध्य, मधे, आत.
**वेमतिक**–(वि.) संदिग्ध, संशयित, अनिश्चित.
**वेमत्त**–(नपु.) संदेह, संशय, शंका, भेद.
**वेमत्तता**–(स्त्री.) द्विधा, दुविधा, दोलायमान.
**वेमातिक**–(वि.) सावत्र, सावत्र आईचा, विमातेचा.
**वेमानिक**–(वि.) वैमानिक, विमानवाला, दिव्य भावनाचा मालक.
**वेमानिक-पेत**–(पु.) विमान प्रेत, वैमानिकाचे प्रेत, विमांनातील प्रेत, नष्ट झालेले विमान.
**वेय्यग्घ**–(वि.) वाघांविषयी, वाघाच्या कातड्यानी झाकलेले.
**वेय्यत्तिय**–(नपु.) स्पष्टता.
**वेय्याकरण**–(नपु.) व्याख्या, स्पष्टीकरण.
**वेय्याकरण**–(पु.) व्याकरण जाणणारा, वैय्याकरणी, व्याख्या करणारा, अर्थ लावणारा.
**वेय्याबाधित**–(वि.) कष्टप्रद, त्रासदायक, कठीण, अवघड.
**वेय्यायिक**–(नपु.) व्यय, खर्च.
**वेय्यावच्च**–(नपु.) सेवा, कर्तव्य.
**वेय्यावच्चकर**–(पु.) सेवक, नोकर.
**वेय्यावतिक**–(पु.) सेवक, नोकर.
**वेर**–(नपु.) वैर, शत्रुत्त्व.
**वेरज्जक**–(वि.) अनेक राज्यांचा.
**वेरञ्जा**–(नपु., वि.) मगधातील एक नगर, या वेरञ्जा नगरींत भगवान बुद्धाने एक वर्षी आपला वर्षावास केला होता.
**वेरमणी**–(स्त्री.) विरती, विरक्ती, दूर राहणे.
**वेरम्भ-वात**–(पु.) पर्वतीय प्रदेशांत वहाणारे वारे.
**वेरिक**–(वि.) शत्रुत्त्व धरणारा, वैरी, द्वेषी.
**वेरी**–(वि.) शत्रू, वैरी.
**वेरी जातक**–डाकूंच्या भीतीने श्रीमंत व्यापाऱ्यांने आपले बैल जोरात पळवून घर गाठले आणि सुखरूप पोहोचल्याची कथा–(१०३).
**वेरोचन**–(नपु., पु.) सूर्य, रवि, भास्कर.
**वेला**–(स्त्री.) वेळ, समय, वेळा.
**वेलातिक्कम्म**–(पु.) वेळेपेक्षा अधिक, नेमून दिलेली वेळ ओलांडणे.
**वेल्लित**–(वि.) वाकडे, कुरळे.
**वेल्लितग्ग**–(वि.) कुरळ्या केसांचे टोक.
**वेवचन**–(नपु.) समानार्थी बोलणे, पर्यायी शब्द.
**वेवण्णिय**–(नपु.) विवरण करणे, स्पष्टीकरण देणे.
**वेस**–(पु.) वेश, पोशाख.
**वेसम्म**–(नपु.) विषमता, वैषम्य.
**वेसाख**–(पु., वि.) वैशाख महिना, बुद्धाचाजन्म, ज्ञानप्राप्ती व महापरिनिर्वाण याचे वैशाख महिन्यात मानले जाते.
**वेसारज्ज**–(नपु.) विशारदा, विद्वत्ता, आत्मविश्वास.
**वेसाली**–(स्त्री., वि.) लिच्छवीगणराज्याची प्रसिद्ध राजधानी वैशाली.
**वेसिया, वेसी**–(स्त्री.) वेश्या.
**वेस्म**–(नपु.) निवासस्थान, घर, गृह.
**वेस्स**–(पु.) वैश्य, व्यापारी.
**वेस्सन्तर जातक**–वेस्सन्तर राज्याच्या दानशूरपनाची कथा–(५४७).
**वेहास**–(पु.) आकाश.
**वेहास-कुटी**–(स्त्री.) सर्वात वरच्या मजल्यावरील हवेशीर खोली.

**वेहास-गमन**–(नपु.) आकाशात फिरणे, अवकाशगमन, विमानाची भरारी.

**वेहासट्ठ**–(वि.) आकांत राहिलेला, आकाशस्थित, अवकाश शाळा.

**वेळु**–[पहा–वेणु].

**वेळुरिय**–(नपु.) वैडुर्य, हिरा.

**वेळुक जातक**–बांबूत राहून वाढलेल्या सापाने गारुड्यास चावा घेतल्याची कथा–(४३).

**वेळुवन**–(पु., वि.) राजगृहाजवळचा बिंबिसार राजाचा सुंदर बगिचा, तो बिंबिसाराने भिक्खु संघाला दान दिला होता.

**वो**–(स.) तुम्हीचा पुरुषवाचक सर्वनामाचा पर्यायी शब्द.

**वोकार**–(पु.) रूप, वेदना, इत्यादी पाच स्कंध.

**वोकिण्ण**–(कृ.) मिळता, जुळता, झाकलेला, आच्छादलेला.

**वोक्कमति**–(क्रि.) बाजूस होणे, सरकणे.

**वोक्कमि**–(पू. क्रि.) बाजूस झाला, सरकला.

**वोक्कन्त**–(कृ.) बाजूस होता, सरकता.

**वोक्कम्म**–(कृ.) बाजूस होता, सरकता.

**वोक्कमित्वा**–(पू. क्रि.) बाजूस होऊन, सरकून.

**वोच्छिज्जति**–(क्रि.) चावणे, कापणे.

**वोच्छिज्जि**–(पू. क्रि.) चावला, कापले.

**वोच्छिन्न**–(कृ.) चावता, कापता.

**वोच्छिज्जित्वा**–(पू. क्रि.) चावून, कापून.

**वोत्थपन**–(नपुं.) परिभाषा, अर्थ, व्याख्या, स्पष्टीकरण.

**वोदक**–(वि.) निर्जल, कोरडा, सुका.

**वोदपन**–(नपु.) शुद्धी, शुद्धता.

**वोदपेति**–(क्रि.) शुद्ध करणे.

**वोदन**–(नपुं.) शुद्धी.

**वोमिस्सक**–(वि.) मिश्रित, मिसळलेले.

**वोरोपन**–(नपु.) वंचित.

**वोरोपेति**–(क्रि.) वंचित करणे, फसविणे, छळणे.

**वोरोपेसि**–(पू. क्रि.) वंचित केले. फसविले, छळले.

**वोरोपित, वोरोपेन्त**–(कृ.) वंचित करता, फसविता, छळता.

**वोरोपेत्वा**–(पू. क्रि.) वंचित करून, फसवून, छळून.

**वोलोकेति**–(क्रि.) परीक्षा करणे.

**वोसित**–(वि.) समाप्त, पूर्ण झाला, संपला.

**वोस्सग्ग**–(पु.) दान.

**वोस्सजन**–(नपु.) परित्याग, सोडणे.

**वोस्सजति**–(क्रि.) परित्याग करणे, सोडणे.

**वोस्सजि**–(पू. क्रि.) परित्याग केला, सोडले.

**वोस्सट्ठ, वोस्सज्ज**–(कृ.) परित्याग करता, सोडता.

**वोस्सजित्वा**–(पू. क्रि.) परित्याग करून, सोडून.

**वोहरति**–(क्रि.) उपयोगात आणणे, उघड करणे.

**वोहरि**–(पू. क्रि.) उपयोगात आणले, उघड केले.

**वोहरित, वोहरेन्त**–(कृ.) उपयोगात आणता, उघड करता.

**वोहरित्वा**–(पू. क्रि.) उपयोगात आणून, उघड करून.

**वोहरियमान**–(कृ.) बोलवीत, असता, उपयोगात आणता.

**वोहार**–(पु.) बोलाविणे, प्रकट करणे, उपयोग, व्यापार, कायदा, व्यवहार.

**वोहारिक**–(पु.) व्यापारी, न्यायाधीश.

**वोहारिकामच्च**–(पु.) मुख्य न्यायाधीश.

**व्यग्घ**–(पु.) व्याघ्र, वाघ.

**व्यग्घ जातक**–वाघ आणि सिंह जंगलांतून निघून गेल्यामुळे लोक जंगलतोड करू लागले. याबाबत वनदेवता काही करू शकली नसल्याची कथा–(२७२).

**व्यञ्जन**–(नपु.) चिन्ह, डाळ–भाजी.

**व्यञ्जेति**–(क्रि.) प्रकट करणे, खुणाविणे, सुचविणे.

**व्यञ्जयि**–(पू. क्रि.) प्रकट केले, खुणविले, सुचविले.

**व्यञ्जित**–(कृ.) प्रकट करता, खुणविता, सुचविता.

**व्यञ्जयित्वा, व्यञ्जित्वा**–(पू. क्रि.) प्रकट करून, खुणवून, प्रकट करून.

**व्यत्त**–(वि.) पण्डित, ज्ञानी.

**व्यत्ततर**–(वि.) मोठा पंडित, फार ज्ञानी, फार हुशार.

**व्यत्तता**–(स्त्री) पांडित्य, हुषारी

**व्यथति**–(क्रि.) त्रास देणे, दाबणे.

**व्यथि**–(पू. क्रि.) त्रास दिला, दाबले.

**व्यथित**–(कृ.) त्रास देता, दाबता.

**व्यथित्वा**–(पू. क्रि.) त्रास देऊन, दाबून.

**व्यन्तिकरोति**–(क्रि.) नष्ट करणे, ठार मारणे.

**व्यन्तिकरि**–(पू. क्रि.) नष्ट केले, ठार मारले.

**व्यन्तिकत**–(कृ.) नष्ट करता, ठार मारता.

**व्यन्तिकरित्वा**–(पू. क्रि.) नष्ट करून, ठार मारून.

**व्यन्तिभवति**–(क्रि.) थांबणे, थांबविणे.

**व्यन्तिभवि**–(पू. क्रि.) थांबले, थांबलिले.

**व्यन्तिभूत**–(कृ.) थांबता, थांबविता.

**व्यन्तिभवित्वा**–(पू. क्रि.) थांबवून, थांबून.

**व्यपगच्छति**–(क्रि.) निरोप घेणे, जाणे.

**ब्यपगमि**–(पू. क्रि.) निरोप घेतला, गेला.
**ब्यपगत**–(कृ.) निरोप घेता, जाता.
**ब्यपगमित्त्वा**–(पू. क्रि.) निरोप घेऊन, जाऊन.
**ब्यम्ह**–(नपु.) विमान, महाल, प्रसाद, भव्य वाडा.
**ब्यसन**–(नपु.) दुर्भाग्य, दुर्दैव.
**ब्याकत**–(कृ.) व्याख्यात, सांगितलेले, स्पष्ट केलेले.
**ब्याकरण**–(नपुं.) व्याख्या, व्याकरण.
**ब्याकरियमान**–(कृ.) व्याख्या सांगता, स्पष्ट करत असता.
**ब्याकरोति**–(क्रि.) व्याख्या सांगणे, स्पष्ट करणे.
**ब्याकरि**–(पू. क्रि.) व्याख्या सांगितली, स्पष्ट केले.
**ब्याकत**–(कृ.) व्याख्या सांगता, स्पष्ट करता.
**ब्याकरित्त्वा**–(पू. क्रि.) व्याख्या सांगून, स्पष्ट करून.
**ब्याकुल**–(वि.) व्याकुळ, दुःखी, गोंधळलेला, गडबडलेला.
**ब्याख्याति**–(क्रि.) सुचविणे, सांगणे.
**ब्याख्यासि**–(पू. क्रि.) सुचविले, सांगितले.
**ब्याख्यात**–(कृ.) सुचविता, सांगता.
**ब्याख्यासित्त्वा**–(पू. क्रि.) सुचवून, सांगून.
**ब्याध**–(पु.) शिकारी.
**ब्याधि**–(पु.) रोग, आजार, दुखणे, व्याधी.
**ब्याधित**–(वि.) रोगी, आजारी.
**ब्यापक**–(वि.) व्याप्त, पसरलेला, माखलेला.
**ब्यापज्जति**–(क्रि.) असफल होणे, अयशस्वी होणे.
**ब्यापज्जना**–(स्त्री.) असफलता, क्रोध, राग.
**ब्यापन्न**–(कृ.) मार्ग भ्रष्ट, पद भ्रष्ट.
**ब्यापाद**–(पु.) द्वेष, मत्सर, तिरस्कार, घृणा.
**ब्यापादेति**–(क्रि.) बिघडविणे, द्वेष करणे.
**ब्यापार**–(पु.) धंदा, उद्योग, व्यापार.
**ब्यापारित**–(कृ.) उत्तेजित.
**ब्यापित**–(कृ.) पूरित, व्याप्त, पसरलेला.
**ब्यापेति**–(क्रि.) व्यापणे, पसरणे.
**ब्यापेसि**–(पू. क्रि.) व्यापले, पसरले.
**ब्यापेन्त**–(कृ.) व्यापता, पसरता.
**ब्यापेत्त्वा**–(पू. क्रि.) व्यापून, पसरून.
**ब्याबाधेति**–(क्रि.) नुकसान करणे, त्रास देणे, बाधा करणे.
**ब्याबाधेसि**–(पू. क्रि.) नुकसान केले, त्रास दिला, बाधा केली.
**ब्याबाधित**–(कृ.) नुकसान करता, त्रास देता, बाधा करता.
**ब्याबाधित्त्वा**–(पू. क्रि.) नुकसान करून, त्रास देऊन, बाधा करून.
**ब्याभङ्गी**–(कृ.) काठी घेऊन, जाता.
**ब्याम**–(पु.) लांबी किंवा खोलीचे माप.
**ब्यावट्ट**–(वि.) संलग्न, जोडून, खंडित.
**ब्यासत्त**–(वि.) आसक्त, मोहित.
**ब्यासेचन**–(नपु.) शिंपणे, पाणी पाजणे–(पिकास).
**ब्याहरति**–(क्रि.) बोलणे, चर्चा करणे.
**ब्याहरि**–(पू. क्रि.) बोलला, चर्चा केली.
**ब्याहट**–(कृ.) बोलता, चर्चा करता.
**ब्याहरित्त्वा**–(पू. क्रि.) बोलून, चर्चा करून.
**ब्यूह**–(पु.) सैन्य व्यवस्था, व्यूह रचना.

## स

**स**–नागरी लिपीच्या वर्ण मालेतील तिसाव्वे अक्षर "स".
**स**–(वि.) स्वकीय, आपला, सहित, सह, बरोबर.
**स, सो**–(पु.) एकवचनी कर्त्याचे रूप.
**स-उपादान**–(वि.) आसक्ति सहित.
**स-उपादिसेस**–(वि.) शरीर त्याग, निर्वाण, मरण.
**सक**–(वि.) स्वकीय, आपला, स्व.
**सक**–(पु.) सम्बन्धी, जवळचा, नात्यातला.
**सक**–(नपुं.) स्वतः मिळविलेली धन-संपत्ती.
**सक-मन**–(वि.) आनंदित, उत्साही, प्रफुल्ल.
**सकङ्ख**–(वि.) कांक्षांसह, संशयासह, साशंक.
**सकट**–(पु., नपुं.) गाडी, वाहन.
**सकट-भार**–(पु.) गाडीचे वजन.
**सकट-वाह**–(पु.) गाडीचे वजन, गाडीतून ओझे नेणे.
**सकट-व्यूह**–(पु.) गाड्यांची रचना.
**सकंटक**–(वि.) काट्यांसह, त्रासाचे श्रमाचे, कष्टाचे
**सकदागामी**–(पु.) धर्माचा मार्गदर्शक, धम्म संस्थापक, ज्याचा या जगात अंतिम जन्म ठरला असा.
**सक-बल**–(वि.) आपले बळ, आपले सामर्थ्य, आपली शक्ती, स्वबल.
**स-कवल**–(वि.) घासासह.
**स-कम्म**–(वि.) सकर्मक क्रिया.
**स-करणीय**–(वि.) करण्यासारखे, करण्यायोग्य.
**स-कल**–(वि.) संपूर्ण, तमाम, सकल.
**स-कलिका**–(स्त्री.) मालकंस रागातील दुसरी रागिणी-चाल, क्षमा करणारी, खमाची.
**स-कास**–(पु.) शेजार.

**स-किच्च**–(नपु.) स्वकार्य, स्वकीय-कार्य, स्वतःचे काम.
**स-किञ्चन**–(वि.) भौतिक सुखोपभोगाचा आसक्त.
**सकिं**–(क्रि. वि.) एक वेळ.
**सकीय**–(वि.) स्वकीय, आपला.
**सकुण**–(पु.) पक्षी.
**सकुणग्घी**–(पु.) बहिरी ससाणा.
**सकुणी**–(स्त्री.) पक्षिणी.
**सकुण-जातक**–पक्षीराजाने सर्व पक्षांना सावध केले की, त्यांच्या घरट्याना आगी लागणार आहेत हे सांगितल्याची कथा–(३६).
**सकुणग्घी जातक**–लावा पक्षाने (होला) आपल्या चातुर्याने बहिरीससाण्याचा प्राण घेतल्याची कथा–(१६०).
**सकुन्त**–(पु.) पक्षी.
**सक्क**–(वि.) योग्य, समर्थ, संभव, शक्य.
**सक्क**–(पु.) शाक्य वंश, देवेन्द्र शक्र. इंद्र.
**सक्कच्च**–(पू. क्रि.) चांगली तयारी करून.
**सक्कच्चकारी**–(पु.) सावध, दक्ष, सावधगिरीने वागणारा.
**सक्कच्च**–(क्रि. वि.) सावधगिरीने, तत्परतेने.
**सक्कत**–(कृ.) सत्कृत्य, सन्मानीत.
**सक्कत्त**–(नपु.) शक्रत्व– इंद्रपद, देवेन्द्रशक्राची स्थिती.
**सक्कारोति**–(क्रि.) सत्कार करणे, आदर करणे, अतिथ्य करणे.
**सक्करि, सक्करीयति**–(पू. क्रि.) सत्कार केला, आदर केला, आदरातिथ्य केले.
**सक्कत, सक्करोन्त, सक्करितु, सक्कातुं**–(कृ.) सत्कार करता, आदर करता, आदरातिथ्य करता.
**सक्करितब्ब, सक्कातब्ब**–(कृ.) सत्कार करण्यायोग्य, आदर करण्यायोग्य, आदरातिथ्य करण्यायोग्य.
**सक्कत्वा, सक्करित्वा**–(पू. क्रि.) सत्कार करून, आदर करून, आदरातिथ्य करून.
**सक्का**–(अ.) शक्य, संभव.
**सक्काय**–(पु.) विद्यमान शरीर, सद्यशरीर, चालू देह.
**सक्काय-दिट्ठि**–(स्त्री.) आत्मदृष्टि, आत्मा आहे असे मत.
**सक्कार**–(पु.) सत्कार.
**सक्कुणाति**–(क्रि.) समर्थ होणे, तयार असणे.
**सक्कुणि**–(पू. क्रि.) समर्थ झाला, तयार आहे.
**सक्कुणन्त**–(कृ.) समर्थ असता, तयार असता.
**सक्कुणित्वा**–(पू. क्रि.) समर्थ असून, तयार होऊन.
**सक्कुणेय्यत्त**–(नपु., स्त्री.) सम्भावना, शक्यता.
**सक्कोति**–(क्रि.) समर्थ होणे, शक्य होणे.
**सक्खि, सक्खि**–(पू. क्रि.) समर्थ झाला, शक्य झाले.
**सक्कोन्त**–(कृ.) समर्थ होता, शक्य होता.
**सक्खित्वा, सक्खित्त्वा**–(पू. क्रि.) समर्थ होऊन, शक्य होऊन.
**सक्खर**–(नपु.) शिक्याची अंगठी.
**सक्खरा**–(स्त्री.) साखर, शर्करा.
**सक्खलि, सक्खलिका**–(स्त्री.) छिद्र, भोक.
**सक्खि**–(अ.) समोरा-समोर, पुढे, साक्षात.
**सक्खिक-सक्खी**–(वि.) साक्षीदार.
**सक्खि-दिट्ठ**–(वि.) समोर दिसला.
**सक्खि-पुट्ठ**–(वि.) साक्षीदारास विचारलेला प्रश्न.
**सक्क-पुत्तिय**–(पु.) शाक्य पुत्र, बौद्ध भिक्खूंना दिलेले एक नाव.
**सक्क-मुनि**–(पु.) भगवान बुद्धाचे एक नाव, **शाक्य मुनी**.
**सक्क-सीह**–(पु.) गौतम बुद्धाचे एक अधिवचन, शाक्यसिंह.
**सख, सखि**–(पु.) मित्र.
**सखिल**–(वि.) मधुर भाषी, गोड बोलणारा.
**सख्य**–(नपु.) मैत्री, मित्रत्त्व, दोस्ती, सख्य.
**सगब्भ**–(वि.) गर्भवती, गरोदर.
**सगह, सगाह**–(वि.) भयंकर सुसरी असलेला डोह.
**सगामेय्य**–(वि.) एकाच गांवचे.
**सगारव**–(वि.) गौरवासह.
**सगारवं**–(क्रि. वि.) गौरवाने.
**सगारवता**–(स्त्री.) आदर, गौरव, सन्मान.
**सगोत्त**–(वि.) एकाच गोत्रातील.
**सग्ग**–(पु.) स्वर्ग.
**सग्ग-काय**–(पु.) स्वर्गीय सभा.
**सग्ग-मग्ग**–(पु.) स्वर्गाची वाट, स्वर्गाचा मार्ग, **स्वर्ग-मार्ग**.
**सग्ग-लोक**–(पु.) स्वर्ग-प्रदेश, स्वर्गीय लोक, **स्वर्ग लोक**.
**सग्ग-संवत्तनिक**–(पु.) स्वर्गाभिमुख, स्वर्गीय.
**सग्ग-वासी**–(पु.) स्वर्गात राहणारे, देव लोक, **देवगण**.
**सग्गुण**–(पु.) सद्गुण.
**सङ्कट**–(नपु.) अरुंदजागा, दुःखाचे ठिकाण.
**सङ्कटीर**–(नपु.) उकीरडा, कचऱ्याचा ढीग.
**सङ्कड्ढति**–(क्रि.) एकत्र करणे, मिळविणे.
**सङ्कड्ढि**–(पू. क्रि.) एकत्र केले, मिळविले.
**सङ्कड्ढत**–(कृ.) एकत्र करता, मिळविता.
**सङ्कड्ढित्वा**–(पू. क्रि.) एकत्र करून, मिळवून.
**सङ्कति**–(क्रि.) संशय घेणे, शंका घेणे.
**सङ्किक**–(पू. क्रि.) संशय घेतला, शंका घेतली.

**सङ्किकत**–(कृ.) संशय घेता, शंका घेता.
**सङ्कमान**–(कृ.) संशय घेणे योग्य, शंका घेणे योग्य.
**सङ्किकत्वा**–(पू. क्रि.) संशय घेऊन, शंका घेऊन.
**सङ्कन्तति**–(क्रि.) चोहोकडून कापणे.
**सङ्कन्ति**–(पू. क्रि.) चोहोकडून कापले.
**सङ्कन्तित**–(कृ.) चोहोकडून कापता.
**सङ्कन्तित्वा**–(पू. क्रि.) चोहोकडून कापून.
**सङ्कन्तिक**–(वि.) संक्रान्तिक, बदल.
**सङ्कन्तिक-रोग**–(पु.) सांसर्गिक रोग.
**सङ्कप्प**–(पु.) संकल्प.
**सङ्कप्प जातक**–राजा बाहेर गेला असता, महालात राणीच्या शरिराची नग्नता पाहून एक तपस्वी तिच्यावर मोहित झाल्याची कथा–(२५१).
**सङ्कप्पेति**–(क्रि.) संकल्प करणे.
**सङ्कप्पेसि**–(पू. क्रि.) संकल्प केला.
**सङ्कप्पित**–(कृ.) संकल्प करता.
**सङ्कपेत्वा**–(पू. क्रि.) संकल्प करून.
**सङ्कमति**–(क्रि.) संक्रमण करणे, बदल करणे.
**सङ्कमि**–(पू. क्रि.) संक्रमण केले, बदल केला.
**सङ्कन्त**–(कृ.) संक्रमण करता, बदल करता.
**सङ्कमित्वा**–(पू. क्रि.) संक्रमण करून, बदल करून.
**सङ्कमन**–(नपु.) रस्ता, पूल, बदल.
**सङ्कम्पति**–(क्रि.) कापणे.
**सङ्कम्पि**–(पू. क्रि.) कापले.
**सङ्कम्पित**–(कृ.) कापता.
**सङ्कम्पित्वा**–(पू. क्रि.) कापून.
**सङ्कर**–(वि.) मिश्रित, आनंद-दायक, उत्साहित.
**सङ्कलन**–(नपु.) संग्रह, साठा, एकत्र, संकलन.
**सङ्कस्स**–(नपु. विशे. ना.) स्वर्गात अभिधम्माचा उपदेश दिल्यानंतर भगवान बुद्धाचे अवतरण स्थान, संकाश्य.
**सङ्का**–(स्त्री.) शंका, संशय, संदेह.
**सङ्कायति**–(क्रि.) शंका घेणे, संशय धरणे, संदेह करणे.
**सङ्कार**–(पु.) केर, कचरा, घाण, चित्तमल.
**सङ्कार-कूट**–(पु.) केर-कचऱ्याचा ढीग.
**सङ्कार-चोळ**–(नपु.) उकीरडा.
**सङ्कारट्ठान**–(नपु.) उकीरडा, कचरा कुंडी.
**सङ्कास**–(वि.) समान, सारखा.
**सङ्कासना**–(स्त्री.) व्याख्या, अर्थ, तपशील, स्पष्टीकरण.
**सङ्किच्च जातक**–संकिच्चने राज कुमाराला पितृ हत्येच्या संकल्पापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केल्याची कथा–(५३०).
**सङ्कित्तन**–(नपु.) संकीर्तन, प्रचार करणे.
**सङ्किलिट्ठ**–(कृ.) घाणेरडा, घाण झालेला, मळका.
**सङ्किलिस्सति**–(क्रि.) अशुद्ध होणे, घाण होणे.
**सङ्किलिस्सि**–(पू. क्रि.) अशुद्ध झाला, घाण झाला.
**सङ्किलिस्सत**–(कृ.) अशुद्ध होता, घाण होता.
**सङ्किलिस्सित्वा**–(पू. क्रि.) अशुद्ध होऊन, घाण होऊन.
**सङ्किलिस्सन**–(नपु.) अशुद्ध, घाण.
**सङ्किलेस**–(पु.) चित्त-मळ, अंतःकरणातील द्वेष.
**साङ्किलेसिक**–(वि.) हानिकारक.
**सङ्की**–(वि.) साशंक, संशयी, शंकेखोर.
**सङ्कु**–(पु.) खुंटा, मेख.
**सङ्कुपथ**–(पु.) खुंट्याच्या आधारे चालण्याचा रस्ता.
**सङ्कुचित**–(क्रि.) संकोच करणे, लाजणे.
**सङ्कुचि**–(पू. क्रि.) संकोच केला, लाजला.
**सङ्कुचित**–(कृ.) संकोच करता, लाजता.
**सङ्कुचित्वा**–(पू. क्रि.) संकोचून, लाजून.
**सङ्कुचन**–(नपु.) लाजणे, आकसणे.
**सङ्कुचित**–(वि.) लाजलेला.
**सङ्कुपित**–(कृ.) रागीट, रागावलेला.
**सङ्कुल**–(वि.) भरलेला, दाट.
**सङ्केत**–(पु., नपु.) निशान, खूण, चिन्ह, संकेत.
**सङ्केत-कम्म**–(नपु.) समझोता, मिलाफ, ऐक्य.
**सङ्कोच**–(पु.) लाजणे, अखुडणे, आकसणे, संकोच.
**सङ्कोचेति**–(क्रि.) लाजणे, आखुडणे, आकसणे, संकोच पावणे.
**सङ्संकोप**–(पु.) रागावणे, संकट निर्माण करणे.
**सङ्खव**–(पु.) शंख.
**सङ्खट्ठी**–(पु.) महारोगी, कुष्ठरोगी, कोढी.
**सङ्ख-थाल**–(स्त्री.) शंख थाळी.
**सङ्ख-धम**–(पु.) शंख वाजविणारा.
**सङ्ख-नख**–(पु.) लहान शंख.
**सङ्ख-मुण्डिक**–(नपु.) त्रास देण्याचा मार्ग.
**सङ्ख जातक**–मणिमेखलाने एक आठवडाभर समुद्रात पोहणाऱ्या वीर पुरुषाला सहाय्य करण्याची इच्छा प्रकट केली होती. परंतु त्याने ती नाकारल्याची कथा–(४४२).
**सङ्ख-जातक**–सुसीमच्या वडिलाने मृत पुत्राचा सन्मान केल्याची कथा. (ही कथा जातक अट्ठ कथेत आली नाही).
**सङ्खत**–(कृ.) संस्कृत, समुत्पन्न.

**सङ्खधम्म जातक**–पुत्राने पुन: पुन्हा शंख वाजविणाऱ्या आपल्या पित्यास मनाई केल्याची कथा–(६०).

**सङ्खपाल जातक**–तपस्व्याने शंखपाल नागास धर्मोपदेश केल्याची कथा–(५२४).

**सङ्खय**–(पु.) हानी, नुकसान.

**सङ्खरण**–(नपु.) दुरुस्ती तयारी.

**सङ्खरोति**–(कि.) दुरुस्ती करणे, तयारी करणे.

**सङ्खरि**–(पू. कि.) दुरुस्ती केली, तयारी केली.

**सङ्खत, सङ्खरोन्त**–(कृ.) दुरुस्ती करता, तयारी करता.

**सङ्खरित्वा**–(पू. कि.) दुरुस्ती करून, तयारी करून.

**सङ्खला**–(स्त्री.) हत्तीच्या पायातील साखळी, साखळदंड.

**सङ्खलिका**–(स्त्री.) बेडी-हातकडी.

**सङ्खा**–(स्त्री.) संख्या, मोजदाद.

**सङ्खात, संख्यात**–(कृ.) अमुक-नावाचा.

**सङ्खावति**–(कि.) चावले, चघळले.

**सङ्खावि**–(पू. कि.) चावणे, चघळणे.

**सङ्खावित**–(कृ.) चावता, चघळता.

**सङ्खावित्वा**–(पू. कि.) चावून, चघळून.

**सङ्खान, संख्यान**–(नपु.) मोजणे.

**सङ्खाय**–(पू. कि.) विचार करून, मनन करून.

**सङ्खार**–(पु.) संस्कार.

**सङ्खारक्खन्ध**–(पु.) संस्कार स्कंध.

**सङ्खार-दुख**–(नपु.) संस्कार दुःख–(उपादान).

**सङ्खार-लोक**–(पु.) संपूर्ण विश्व, मानवजात.

**सङ्खित्त**–(कृ.) संक्षिप्त, लहान.

**सङ्खिपति**–(कि.) संक्षिप्त करणे, लहान करणे.

**सङ्खिपि**–(पू. कि.) संक्षिप्त केले लहान केले.

**सङ्खिपन्त**–(कृ.) संक्षिप्त करता, लहान करता.

**सङ्खिपिन्तु**–(कृ.) संक्षिप्त करता, लहान करता.

**सङ्खिपमान, सङ्खिपतब्ब**–(कृ.) संक्षिप्त करणे योग्य, लहान करणे योग्य.

**सङ्खिपित्वा**–(पू. कि.) संक्षिप्त करून, लहान करून.

**सङ्खुभति**–(कि.) रागावणे, क्रुद्ध होणे.

**सङ्खुभि**–(पू. कि.) रागावला, क्रुध झाला.

**सङ्खुभित**–(कृ.) रागावता, क्रुध होता.

**सङ्खुभित्वा**–(पू. कि.) रागावून, क्रुध होऊन.

**सङ्खुभन**–(नपु.) राग, क्षोभ, क्रोध.

**सङ्खेप**–(पु.) संक्षेप, सारांश, थोडक्यात.

**सङ्खेय्य**–(वि.) मोजता येण्यासारखे.

**सङ्खेय परिवेण**–(पु., वि.) सागलचा बुद्ध विहार राजामिलिंद, बरोबर धम्मचर्चा करणारे भिक्खु नागसेन याच संखेय परिवेण विहारात रहात होते.

**सङ्खोभ**–(पु.) क्षोभ, राग, क्रांती, क्रोध.

**सङ्खोभेति**–(कि.) क्षुब्ध होणे, रागावणे, क्रोधित होणे.

**सङ्खोभेसि**–(पू. कि.) क्षुब्ध झाला, रागावला, क्रोधित झाला.

**सङ्खोभित**–(कृ.) क्षुब्ध होता, रागावता, क्रोधित होता.

**सङ्खोभेन्त**–(कृ.) क्षुब्ध होता, रागावता, क्रोधित होता.

**सङ्खोभेत्वा**–(पू. कि.) क्षुब्ध होऊन, रागावून, क्रोधित होऊन.

**सङ्ख्या भेद**–(पु.) विशिष्ठ संख्या (उदा.–अकरा, छत्तीस इ).

**सङ्ग**–(पु.) आसक्ती, ओढ.

**सङ्गच्छति**–(कि.) बरोबर जाणे.

**सङ्गच्छि**–(पू. कि.) बरोबर गेला.

**सङ्गत**–(कृ.) बरोबर जाता.

**सङ्गत्वा**–(पू. कि.) बरोबर जाऊन.

**सङ्गणिका**–(स्त्री.) समाज, जनता.

**सङ्गणिकाराम**–(वि.) सामाजिक. समाजात राहणारा.

**सङ्गणिकारत**–(वि.) समाजात राहणे पसंत करणारा.

**सङ्गण्हाति**–(कि.) संग्रह करणे, शालीनतेने वागणे.

**सङ्गण्हि**–(पू. कि.) संग्रह केला, शालीनतेने वागला.

**सङ्गण्हन्त, सङ्गय्ह**–(कृ.) संग्रह करता, शालीनतेने वागता.

**सङ्गहेत्वा, सङ्गहित्वा, सङ्गण्हित्वा**–(पू. कि.)–संग्रह करून, शालीनतेने वागून.

**सङ्गम**–(पु.) मेळ, ऐक्य, एकत्र, संगम.

**सङ्गर**–(पु.) मैत्री मित्रता, दोस्ती, लाच, युद्ध, प्रतिज्ञा.

**सङ्गह**–(पु.) संग्रह, अतिथ्य, पाहुणचार, सत्कार.

**सङ्गति**–(स्त्री.) संगत, बरोबर असणे.

**सङ्गाम**–(पु.) संग्राम, युद्ध, लढाई, द्वंद.

**सङ्गामावचर**–(वि.) युद्धांत गुंतलेला.

**सङ्गामावचर जातक**–माहुताने आपल्या हत्तीस आव्हान देताच तो आक्रमित होऊन शत्रु सैन्यावर तुटून पडल्याची कथा–(१८२).

**सङ्गामेति**–(कि.) संग्राम करणे, युद्ध करणे.

**सङ्गामेसि**–(पू. कि.) संग्राम केला, युद्ध केले.

**सङ्गामित**–(कृ.) संग्राम करता, युद्ध करता.

**सङ्गामेत्वा**–(पू. कि.) संग्राम करून, युद्ध करून.

**सङ्गायति**–(कि.) संगायन करणे, चालविणे.

**सङ्गायि**–(पू. क्रि.) संगायन केले, चालविणे.
**सङ्गीत**–(कृ.) संगायन करता, चालविता.
**सङ्गायित्वा**–(पू. क्रि.) संगायन करून, चालवून.
**सङ्गाह**–(पु.) संग्रह, साठा, ढीग.
**सङ्गाहक**–(पु.) संग्राहक, साठविणारा, जमविणारा.
**सङ्गीति**–(स्त्री., वि.) त्रिपटकांतील वचनांचाअर्थ ठरविण्यासाठी व त्याचा प्रचार करण्यासाठी अर्हतांची भरलेली सभा, संगीती, संमेलन.
**सङ्गीति-कारक**–(पु.) संगीती भरविणारे अर्हत गण, प्रमुख भिक्खु.
**सङ्घ**–(पु.) समूह, समुदाय, परिषद, सभा, भिक्खुसंघ.
**सङ्घ-कम्म**–(नपु.) भिक्खुसंघामार्फत केलेले धम्मकार्य.
**सङ्घ-गत**–(वि.) संघास दिलेले दान.
**सङ्घ-थेर**–(पु.) संघातील सर्वश्रेष्ठ भिक्खु.
**सङ्घ-भत्त**–(नपु.) संघासाठी केलेले भोजन.
**सङ्घ-भेद**–(पु.) संघातील फूट, संघातील दुही, संघभेद.
**सङ्घ-भेदक**–(पु.) संघात मतभेद निर्माण करणारा, फूट पाडणारा.
**सङ्घ-मामक**–(वि.) संघप्रेमी, संघाविषयी आदर असणारा.
**सङ्घटेति**–(क्रि.) संघटना करणे, ऐक्य करणे.
**सङ्घटेसि**–(पू. क्रि.) संघटना केली, ऐक्य केले.
**सङ्घट्टित**–(कृ.) संघटना करता, ऐक्य करता.
**सङ्घट्टेत्वा**–(पू. क्रि.) संघटना करून, ऐक्य करून.
**सङ्घमित्ता थेरी**– (स्त्री. वि.) सम्राट अशोकाची मुलगी व महास्थविर महेंद्राची बहीण संघामित्रा-तिचा जन्म उज्जयनी येथे झाला होता. ती बुद्ध गयेच्या बोधिवृक्षाची फांदी घेऊन महेंद्राबरोबर धम्म प्रचारासाठी श्रीलंकेस गेली होती.
**सङ्घाट**–(पु.) जोड, मिलाफ, वेढा.
**सङ्घाटी**–(स्त्री.) बौद्ध भिक्षूंच्या तीन चीवरा–(वस्त्रां) पैकी एक चीवर, संघाटी.
**सङ्घात**–(पु.) आक्रमण, बोटांची चिटकी, संग्रह.
**सङ्घिक**–(वि.) सांघिक, सामुदायिक, एकत्रित, संघाविषयी, संघाची मिळकत संपत्ती.
**सङ्घी**–(वि.) संघ अगर समूहाचा नेता, (जैन संप्रदायात यास संघवी म्हणतात.)
**सङ्घुट्ठ**–(कृ.) घोषित, जाहीर, घुमत असलेला.
**सचित**–(नपु.) आपले चित्त, आपले मन, स्वचित्त.
**सचित्तक**–(वि.) चित्त असलेला, विचारी.
**सचिव**–(पु.) राजाचा मंत्री, सचिव.
**सचे**–(अ.) अगर, जर.
**सचेतन**–(वि.) चेतनायुक्त, सजीव, जिवंत, प्राणयुक्त.
**सच्च**–(नपु.) सत्य, खरे.
**सच्च**–(वि.) सत्य वचन, खरे बोलणे.
**सच्च-अभिसमय**–(पु.) सत्याचे ज्ञान.
**सच्च-कार**–(पु.) प्रतिज्ञा.
**सच्च-किरिया**–(स्त्री.) सत्य गोष्टीकरिता वचनबद्ध होणे, सत्यासाठी शाश्वती देणे.
**सच्चङ्किर जातक**–दुष्ट राजकुमार कृतघ्न निघाल्याविषयाची कथा–(७३).
**सच्च-पटिवेध**–(पु.) सत्याचा साक्षात्कार.
**सच्च बद्ध**–(पु. वि.) श्रावस्ती आणि सूनापरन्त या दोन गावामधला एक डोंगर.
**सच्च-वाचा**–(स्त्री.) सत्यवाणी, खरे बोल, सत्यवाचा.
**सच्च-सन्ध**–(वि.) विश्वसनीय.
**सच्चापेति**–(क्रि.) शपथ देणे.
**सच्चापेसि**–(पू. क्रि.) शपथ दिली.
**सच्चापित**–(कृ.) शपथ देता.
**सच्चापेत्वा**–(पू. क्रि.) शपथ देऊन.
**सच्छिकरण**–(नपु.) साक्षात कार, प्रत्यक्ष दिसणे.
**सच्छिकरणीय**–(वि.) प्रत्यक्ष दाखविणे योग्य, साक्षात करणे योग्य.
**सच्छिकत**–(कृ.) साक्षात घडत असलेले, प्रत्यक्ष.
**सच्छिकरोति**–(क्रि.) साक्षात घडविणे, साक्षातकार होणे.
**सच्छिकरि**–(पू. क्रि.) साक्षातकार घडविला, साक्षातकार झाला.
**सच्छिकरोन्त, सच्छिकातु, सच्छिकरितु**–(कृ.)–साक्षातकार घडविता.
**सच्छिकातब्ब**–(कृ.) साक्षातकार घडविणे योग्य.
**सच्छिकत्वा, सच्छिकरित्वा**–(पू. क्रि.) साक्षातकार घडवून.
**सच्छिकिरिया**–[पहा–सच्छिकरण].
**सजति**–(क्रि.) मिठी मारणे, आलिंगण देणे.
**सजि**–(पू. क्रि.) मिठी मारली, आलिंगण दिले.
**सजमान**–(कृ.) आलिंगण देण्यायोग्य.
**सजित्वा**–(पू. क्रि.) मिठी मारून, आलिंगण देवून.
**सजन**–(पु.) नातलग, जवळचा, स्वकीय, सज्जन.
**सजातिक**–(वि.) एकाच जातीचा, एकाच वंशाचा.
**सजीव**–(वि.) जिवंत, प्राणयुक्त, सजीव.
**सजोति-भूत**–(वि.) प्रज्वलित, जळता, पेटलेला.
**सज्जति**–(क्रि.) बिलगणे, मोहित होणे.

**सज्जि**–(क्रि.) बिलगला, मोहित झाला.
**सट्ठ**–(कृ.) बिलगता, मोहित होता.
**सज्जमान**–(कृ.) बिलगण्यायोग्य, मोहित होण्यायोग्य.
**सज्जित्वा**–(पू. क्रि.) बिलगून, मोहित होऊन.
**सज्जन**–(पु.) सत्पुरुष, सज्जन.
**सज्जन**–(नपु.) आसक्ती, सजावट, तयारी.
**सज्जित**–(कृ.) तयार केलेला, सजविलेला.
**सज्जु**–(अ.) ताबडतोब, तत्क्षणी, त्याच वेळी.
**सज्जुकं**–(क्रि. वि.) जलद, शीघ्रतेने, तत्क्षणी.
**सज्जुद्दुम्म**–(पु.) शालवृक्ष.
**सज्जलस**–(पु.) राळ, डिंक.
**सज्जेति**–(क्रि.) तयार करणे, सजविणे.
**सज्जेसि**–(पू. क्रि.) तयार केले, सजविले.
**सज्जेन्त, सज्जेय**–(कृ.) तयार करता, सजविता.
**सज्जेत्वा**–(पू. क्रि.) तयार करून, सजवून.
**सज्झाय**–(पु.) अध्ययन, पाठ, धडा, शिकणे, स्वाध्याय.
**सज्झायति**–(क्रि.) अध्ययन करणे, पाठ करणे, शिकणे.
**सज्झायि**–(क्रि.) अध्ययन केले, पाठ केले, शिकले.
**सज्झायित**–(कृ.) अध्ययन करता, पाठ करता, शिकता.
**सज्झायमान**–(कृ.) अध्ययन करण्यायोग्य, पाठ करण्यायोग्य, शिकण्यायोग्य.
**सज्झायना**–(स्त्री.) मिळून पाठ करणे, समुदायाने एकत्र शिकणे.
**सज्झु**–(नपु.) चांदी.
**सज्झुमय**–(वि.) चांदीचा बनविलेला.
**सञ्चय**–(पु.) संग्रह, साठा, एकत्रित, एकत्रिकरण, संचय.
**सञ्चरण**–(नपु.) फिरणे, हिंडणे, संचरण.
**सञ्चरति**–(क्रि.) फिरणे, हिंडणे, संचार करणे.
**सञ्चरि**–(पू. क्रि.) फिरला, हिंडला, संचार करता
**सञ्चरित, सञ्चरन्त**–(कृ.) फिरता, हिंडता.
**सञ्चरित्त्वा**–(पू. क्रि.) फिरून, हिंडून, संचार करून.
**सञ्चरित्त**–(नपु.) संदेश नेणे, बातमी देणे.
**सञ्चार**–(पु.) हालचाल, फिरणे, रस्ता.
**सञ्चारण**–(नपु.) कार्यान्वित करणे, प्रेरित करणे, प्रेरणा देणे.
**सञ्चारेति**–(क्रि.) संचार करणे, फिरणे.
**सञ्चारेसि**–(पू. क्रि.) संचार केला, फिरला.
**सञ्चारित**–(कृ.) संचार करता, फिरता.
**सञ्चारेत्वा**–(पू. क्रि.) संचार करून, फिरून.
**सञ्चलति**–(क्रि.) चालणे, उत्तेजित होणे.
**सञ्चलित**–(पू. क्रि.) चालला, उत्तेजित झाला.
**सञ्चलित**–(कृ.) चालता, उत्तेजित होता.
**सञ्चलित्वा**–(पू. क्रि.) चालून, उत्तेजित होऊन.
**सञ्चलन**–(नपु.) चालणे, हलचाल, उत्तेजन, संचलन.
**सञ्चिच्च**–(अ.) जाणून बुजून, मुद्दाम.
**सञ्चित**–(कृ.) एकत्रित.
**सञ्चिनन**–(नपु.) एकत्रिकरण, जमवाजमव.
**सञ्चिनाति**–(क्रि.) एकत्र करणे, चालविणे.
**सञ्चिनि**–(पू. क्रि.) एकत्र केले, चालविले.
**सञ्चिनन्त**–(कृ.) एकत्र करता, चालविता.
**सञ्चिनित्वा**–(पू. क्रि.) एकत्र करून, चालवून.
**सञ्चिण्ण**–(कृ.) संग्रहित, परिपाठी, अभ्यस्त, आचारयुक्त.
**सञ्चुण्णेति**–(क्रि.) दळणे, पीठ करणे.
**सञ्चुण्णेसि**–(पू. क्रि.) दळले, पीठ केले.
**सञ्चुण्णित**–(कृ.) दळता, पीठ करता.
**सञ्चुण्णेत्वा**–(पू. क्रि.) दळून, पीठ करून.
**सञ्चेतना**–(स्त्री.) चेतना, सजीवता, इरादा, हेतु.
**सञ्चेतनिक**–(वि.) जाणूनबुजून, मुद्दाम.
**सञ्चेतेति**–(क्रि.) विचार करणे, जाणून घेणे.
**सञ्चेतेति**–(पू. क्रि.) विचार केला, जाणून घेतले.
**सञ्चेतित**–(कृ.) विचार करता, जाणून घेता.
**सञ्चेतेत्वा**–(पू. क्रि.) विचार करून, जाणून घेऊन.
**सञ्चोदित**–(कृ.) प्रेरित, उत्तेजित, उत्साहित.
**सञ्चोपन**–(नपु.) हटविणे, काढून टाकणे, स्थानभ्रष्ट करणे.
**सञ्छन्न**–(कृ.) झाकलेला, पूर्ण भरलेला, ओतप्रोत.
**सञ्छादेति**–(क्रि.) झाकणे, छत देणे.
**सञ्छादेसि**–(पू. क्रि.) झाकले, छत दिला.
**सञ्छादित**–(कृ.) झाकता, छत देता.
**सञ्छादेत्वा**–(पू. क्रि.) झाकून, छत देऊन.
**सञ्छिन्दति**–(क्रि.) कापणे, नष्ट करणे.
**सञ्छिन्दि**–(पू. क्रि.) कापले, नष्ट केले.
**सञ्छिन्न**–(कृ.) कापता, नष्ट करता.
**सञ्छिन्दित्वा**–(पू. क्रि.) कापून, नष्ट करून.
**सञ्जग्घति**–(क्रि.) हसणे, मजा करणे, थट्टा करणे.
**सञ्जग्घि**–(पू. क्रि.) हसला, मजा केली, थट्टा केली
**सञ्जग्घन्त**–(कृ.) हसता, मजा करता, थट्टा करता.
**सञ्जग्घित्वा**–(पू. क्रि.) हसून, मजा करून, थट्टा करून.
**सञ्जनन**–(नपु.) उत्पत्ति, जन्म.
**सञ्जनेति**–(क्रि.) उत्पन्न करणे, जन्म देणे.

**सञ्जनेसि**–(पू. क्रि.) उत्पन्न केले, जन्म दिला.
**सञ्जनित**–(कृ.) उत्पन्न करता, जन्म देता.
**सञ्जनेत्वा**–(पू. क्रि.) उत्पन्न करून, जन्म देऊन.
**सञ्जय–बेलट्ठिपुत्र**–(पु., वि.) भगवान बुद्धांच्या समकालीन जे सहा प्रसिद्ध आचार्य होते त्यापैकी एक संजय बेलठ्ठिपुत्र हा पूर्ण अनिश्चियवादी होता.
**सञ्जात**–(कृ.) उत्पन्न, उगवलेला, उठलेला, निर्माण झालेला.
**सञ्जाति**–(स्त्री.) उत्पत्ती जन्म.
**सञ्जाति**–(क्रि.) उत्पन्न होणे, जन्मणे.
**सञ्जानन**–(नपु.) ओळखणे, जाणणे.
**सञ्जानाति**–(क्रि.) ओळखणे, अनुभव घेणे.
**सञ्जानि**–(पू. क्रि.) ओळखले, अनुभव घेतला.
**सञ्जानन्त**–(कृ.) ओळखता, अनुभव घेता.
**सञ्जानित्वा**–(पू. क्रि.) ओळखून, अनुभव घेऊन.
**सञ्जानित**–(कृ.) ओळखले, जाणले, अनुभवले.
**सञ्जायति**–(क्रि.) जन्म घेणे, उत्पन्न होणे, उपजणे.
**सञ्जायि**–(पू. क्रि.) जन्मला, उत्पन्न झाला, उपजला.
**सञ्जात**–(कृ.) जन्मता, उत्पन्न होता, उपजता.
**सञ्जायमान**–(कृ.) जन्म घेणे योग्य, उत्पन्न होणे योग्य, उपजणे योग्य.
**सञ्जायित्वा**–(पू. क्रि.) जन्मून, उत्पन्न होऊन, उपजून.
**सञ्जीव– जातक**–सञ्जीव नावाचा सिद्धी प्रेताला जिवंत करण्याची कला जाणत होता. परंतु पुन्हा त्यास मारण्याची कला येत नसल्याची कथा– (१५०).
**सञ्जीवन**–(वि.) पुनर्जन्म, प्राणसंचार, संजीवन.
**सञ्झा**–(स्त्री.) संध्याकाळ, संध्या.
**सञ्झाघन**–(पु.) संध्याकाळचा ढग.
**सञ्झातप**–(पु.) संध्याकाळचे ऊन.
**सञ्ञत्त**–(कृ.) प्रेरित सूचित.
**सञ्ञत्ति**–(स्त्री.) सूचना, शांतपणा.
**सञ्ञा**–(स्त्री.) संज्ञा, नाव, नाम, इशारा, ओळखण्याची मानसिक क्रिया.
**सञ्ञा-क्खन्ध**–(पु.) पाच स्कंधांपैकी तिसरा स्कंध, संज्ञास्कंध.
**सञ्ञापक**–(पु.) सूचक, सूचना देणारा, सुचविणारा.
**सञ्ञापन**–(नपु.) माहिती देणे, सूचना देणे.
**सञ्ञाण**–(नपु.) संकेत, इशारा, खूण.
**सञ्ञापेति**–(क्रि.) प्रकट करणे, सुचविणे.
**सञ्ञापेसि**–(पू. क्रि.) प्रकट केले, सुचविले.
**सञ्ञापित**–(कृ.) प्रकट करता, सुचविता.
**सञ्ञापेत्वा**–(पू. क्रि.) प्रकट करून, सुचवून.
**सञ्ञित**–(वि.) नांवाचा.
**सञ्ञी**–(वि.) शुद्धीवर, जागृत, सजग.
**सट्ठि**–(सं. वि., स्त्री.) साठ, (६०).
**सट्ठिहायन**–(वि.) साठ वर्षे वयाचा.
**सट्ठु**–(कृ.) सोडण्यासाठी, त्यागण्यासाठी.
**सठ**–(वि.) शठ, दुष्ट, ठग, धूर्त.
**सठता**–(स्त्री.) दुष्टपणा, धूर्तपणा.
**सणति**–(क्रि.) दंगा करणे.
**सण्ठपन**–(नपु.) स्थापणे.
**सण्ठपेति**–(क्रि.) स्थापना करणे.
**सण्ठपेसि**–(पू. क्रि.) स्थापना केले, स्थापले.
**सण्ठपेत**–(कृ.) स्थापन करता, स्थापता.
**सण्ठपेत्वा**–(पू. क्रि.) स्थापन करून, स्थापून.
**सण्ठहन**–(नपु.) दुसऱ्यांदा निर्माण, पुनर्निर्माण.
**सण्ठाति**–(क्रि.) थांबणे, स्थिर होणे.
**सण्ठासि**–(पू. क्रि.) थांबले, स्थिर केले.
**सण्ठहन्त**–(कृ.) थांबता, स्थिर करता.
**सण्ठहित्वा**–(पू. क्रि.) थांबून, स्थिर करून,.
**सण्ठान**–(नपु.) आकार, प्रकार, आकारमान, स्थिती, संस्थान.
**सण्ठित**–(कृ.) स्थित, संस्थापित.
**सण्ठिति**–(स्त्री.) स्थिरता, संस्थिती.
**सण्ड**–(पु.) झुंड, थवा, समूह.
**सण्डास**–(पु.) शौचकूप, पायखाना, संडास.
**सण्ह**–(वि.) स्निग्ध, नरम, मृदु, मऊ.
**सण्हकरणी**–(स्त्री.) चक्की, जाते.
**सण्हेति**–(क्रि.) दळणे, पिठ करणे.
**सण्हेसि**–(पू. क्रि.) दळले, पिठ केले.
**सण्हित**–(कृ.) दळता, पिठ करता.
**सण्हेत्वा**–(पू. क्रि.) दळून, पिठ करून.
**सत**–(वि.) चेतन, जागृत.
**सत**–(नपु.,) सं. वि.) शंभर, (१००).
**सतक**–(नपु.) शतक, शंभरजण, शंभर वस्तू.
**सतक्ककु**–(वि.) शंभर ओळींचा, शंभर रेघांचा.
**सतक्खतुं**–(क्रि. वि.) शंभर वेळा, शंभरदा.
**सतधा**–(क्रि. वि.) शेकडो प्रकारे, शंभर प्रकारांनी.
**सत-पाक**–(नपु.) शंभर वेळा-शिजविलेला, कढविलेला, शेकलेला-भाजलेला, तेल.

**सतपुञ्ञलक्खण**–(वि.) अनेक पुण्यवान लक्षणांचा अनेक शुभ लक्षणी.
**सत-पोरिस**–(वि.) शंभर माणसांच्या उंची इतका.
**सत-सहस्स**–(सं. वि., नपुं.) एक लाख, एक लक्ष, (१००,०००).
**सतत**–(वि.) लागोपाठ, सारखे, एक सारखे, सतत.
**सततं**–(क्रि. वि.) निरंतर, सदैव, एक सारखे, सतत.
**सत धम्म जातक**–सत्यधर्मी म्हणविणाऱ्या ब्राह्मणाने अति भूक लागल्यावर चांडाळाचा, शूद्राचा सुद्धा उष्टा भात खाल्याची कथा–(१७९).
**सत-पत्त**–(नपु.) कमळ, पद्म.
**सत-पत्त**–(पु.) सुतार पक्षी.
**सत-पत्त जातक**–आईच्या सांगण्यावरून मुलगा वडिलाने दिलेले कर्ज (हजार) वसूल करण्यास गेल्याची कथा–(२७९).
**सतपदी**–(पु.) गोम, गोजर.
**सत-भिसज**–(पु.) सत्तावीस नक्षत्रांपैकी एक.
**सतमूली**–(स्त्री.) शतावरी, शतमूली, मूळव बीज औषधी असलेली वेल.
**सतरंसी**–(पु.) सूर्य.
**सतवंक**–(पु.) मासा.
**सतावरी**–(पु.) शतावरी.
**सति**–(स्त्री.) स्मृति, आठवण, स्मरण, जागृति.
**सतिन्द्रिय**–(नपु.) जागृत, सजग.
**सति-पट्ठान**–(नपु.) आठवण होणे, स्मृति जागृत होणे.
**सतिमन्तु**–(वि.) स्मृतिमान, विचारवंत.
**सति-वोसग्ग**–(पु.) प्रमाद.
**सति-सम्पञ्ञ**–(नपु.) जागृती, जागरूकता.
**सति-सम्बोज्झङ्ग**–(पु.) सम्बोधि अंग, स्वरूप स्मृती.
**सति-सम्मोस**–(पु.) विस्मृती, विस्मरण.
**सति-सम्मोह**–(पु.) विस्मृती.
**सती**–(स्त्री.) पतिव्रता स्त्री, सती.
**सतेकिच्छ**–(पु.) परीक्षण, क्षम्य.
**सत्त**–(पु.) सत्त्व, प्राणी.
**सत्त**–(कृ.) आसक्त, मोहित, अभिलाषी.
**सत्त**–(सं. वि., स्त्री.) सात, (७).
**सत्तक**–(नपु.) सप्तक, सातांचा समूह, सप्ताह, (सात दिवस).
**सत्तक्खुत्तु**–(क्रि. वि.) सातवेळा, सातदा.
**सत्त-गुण**–(वि.) सातपट.
**सत्त-तन्ती**–(वि., स्त्री.) सात तारांची तंतूची वीणा.
**सत्त-ताल-मत्त**–(वि.) सात ताड उंचीचा.
**सत्त-तिंसा**–(सं. वि., स्त्री.) सदतीस, (३७).
**सत्त-पण्णी**–(पु.) सप्तपर्णी वृक्ष.
**सत्तपण्णी गुहा**–(स्त्री., वि.) राजगृहा जवळची प्रसिद्ध गुहा, या ठिकाणी पहिली धम्म संगीति (धर्मसभा) भरली होती.
**सत्त-भूमक**–(वि.) सात मजली इमारत.
**सत्त-महासर**–(पु.) अनोतत्त इत्यादी सात मोठी तळीतलाव.
**सत्त-रतन**–(नपु.) सोने, चांदी, मोती, पोवळे, हिरा, ..मणिक पाचु हे सात मौल्यवान पदार्थ-वस्तु.
**सत्त-रत्त**–(नपु.) सप्ताह, सात दिवस.
**सत्तरस, सत्तदस**–(सं. वि.) सतरा, (१७).
**सत्तला**–(स्त्री.) नव मल्लिका, नवी महाराणी, सम्राज्ञी.
**सत्त-वंक**–(पु.) मासा, विशिष्ठ जातीचा मासा.
**सत्त-वसिक**–(वि.) सात वर्षांचा.
**सत्त-वीसति**–(सं. वि., स्त्री.) सत्तावीस, (२७).
**सत्त-सट्ठि**–(सं. वि., स्त्री.) सदूसष्ठ, (६७).
**सत्त-सत्तति**–(सं. वि., स्त्री.) सत्याहत्तर, (७७).
**सत्तति**–[पहा-सत्त-सत्तति].
**सत्तम**–(वि.) सातवा.
**सत्तमी**–(स्त्री.) सातवा दिवस, सप्तमी विभक्ती.
**सत्ता**–(स्त्री.) अस्तित्त्व, अधिकार, शासन, हक्क, सत्ता.
**सत्ताह**–(नपु., पु.) सप्ताह, आठवडा.
**सत्ति**–(स्त्री.) शक्ती, सामर्थ्य, योग्यता, बर्ची, भाला.
**सत्ति-सूल**–(नपु.) भाल्याचे टोक, अणकुची.
**सत्तिगुम्ब जातक**–लुटारू-डाकू जवळ राहणाऱ्या पोपटाने राजाला ठार मारण्याची भाषा बोलली आणि तपस्व्याजवळ राहणाऱ्या पोपटाने राजाचे स्वागताची भाषा बोलल्याची कथा–(५०३).
**सत्तु**–(पु.) शत्रू, सत्तू (धान्य), सातू.
**सत्तु-भस्ता**–(स्त्री.) सातू भरलेली गोणी-थैली.
**सत्तु-भस्ता जातक**–एक साप ब्राह्मणाच्या सातूच्या पोत्यात शिरून बसल्याची कथा–(४०२).
**सत्थ**–(नपु.) शास्त्र, शस्त्र, हत्यार.
**सत्थ**–(पु.) सार्थ, अर्थपूर्ण, काफिला, थवा, झुंड.
**सत्थक**–(नपु.) सुरी, मोठा चाकू.
**सत्थ-कम्म**–(नपु.) शल्य-क्रिया, चिर-फाड.
**सत्थक-वात**–(पु.) तीव्र वेदना, अति दुखणे, असह्य वेदना.
**सत्थ-गमनीय**–(वि.) झुंडीतून जाण्याचा मार्ग.

**सत्थ-वाह**–(पु.) झुंडीचा, समुदायाचा नेता-पुढारी, सार्थ वाह.

**सत्थि**–(स्त्री.) जांघ, मांडी.

**सत्थु**–(पु.) शास्ता, शासक.

**सत्र**–(नपु.) नियमित दान.

**सत्त्वादि**–(पु.) रज, तम, सत्त्व इत्यादि गुण.

**सदत्थ**–(पु.) सदर्थ, आत्मकल्याण.

**सदन**–(नपु.) घर, सदन.

**सदर**–(वि.) दुःखद, भयानक, भीतिदायक.

**सदस**–(वि.) काठ असलेली चटई किंवा सतरंजी.

**सदस्स**–(पु.) जातीवंत घोडा, पंचकल्याणी घोडा.

**सदा**–(क्रि. वि.) नेहमी, सतत, सदैव, सदा.

**सदातन**–(वि.) नेहमी, तत्पर असणारा, दक्ष.

**सदार**–(पु., स्त्री.) स्वतःची बायको-पत्नी.

**सदार-तुट्ठि**–(स्त्री.) स्वतःच्या पत्नीवर संतुष्ट रहाणे.

**सदिस**–(वि.) सादृश्य, समान, सारखा.

**सदिसत्त**–(नपु.) बरोबरी, तुलना.

**सदुम**–(पु., नपु.) घर, सद्म.

**सदेवक**–(वि.) देवांसह, देवांबरोबर.

**सद्द**–(पु.) शब्द, आवाज.

**सद्दत्थ**–(पु.) शद्वाचा अर्थ, शद्बार्थ.

**सद्द-विदू**–(पु.) नाना प्रकारचे आवाज ओळखणारा पशु-पक्षांची भाषा जाणणरा.

**सद्द-वेधी**–(पु.) आवाजाच्या दिशेने बाणाने वेध घेणारा, (उदा.–एकलव्य धनुर्धारी).

**सद्दसत्थ**–(नपु.) शब्द शास्त्र, व्याकरण.

**सद्दल**–(पु.) नव्या गवतांनी शाकारलेले घर-झोपडी, तृणाच्छदित जागा.

**सद्दहति**–(क्रि.) श्रद्धा ठेवणे, विश्वास ठेवणे.

**सद्दहि**–(पु. क्रि.) श्रद्धा ठेवली, विश्वास ठेवला.

**सद्दहित, सद्दहन्त**–(कृ.) श्रद्धा ठेवता, विश्वास ठेवता.

**सद्दहितब्ब**–(कृ.) श्रद्धा ठेवण्यायोग्य, विश्वास ठेवण्यायोग्य, श्रद्धेय, विश्वसनीय.

**सद्दहित्वा**–(पू. क्रि.) श्रद्धा ठेवून, विश्वास ठेवून.]

**सद्दहन**–(नपु.) विश्वास ठेवणे, श्रद्धा ठेवणे.

**सद्दहना**–(स्त्री.) श्रद्धा, विश्वास.

**सद्दहान**–(पु.) श्रद्धावान, श्रद्धाळू, विश्वासू.

**सद्दायति**–(क्रि.) बोलणे, आवाज काढणे.

**सद्दायि**–(पू. क्रि.) बोलला, आवाज काढला.

**सद्दायन्त**–(कृ.) बोलता, आवाज काढता.

**सद्दायमान**–(कृ.) बोलण्यायोग्य, आवाज काढण्यायोग्य.

**सद्दायित्वा**–(पू. क्रि.) बोलून, आवाज काढून.

**सद्दूल**–(पु.) सिंह, शार्दूल, चित्ता.

**सद्ध**–(वि.) श्रद्धा असलेला, श्रद्धाळू.

**सद्धम्म**–(पु.) सत्य-धर्म, सद्धम्म.

**सद्धा**–(स्त्री.) श्रद्धा, भक्ती.

**सद्धातब्ब**–(कृ.) श्रद्धा ठेवणे योग्य.

**सद्धादेय्य**–(वि.) श्रद्धेने दिलेले दान.

**सद्धा-धन**–(नपु.) श्रद्धा रुपी धन.

**सद्धायिक**–(वि.) विश्वसनीय, खात्रीशीर.

**सद्धालु**–(वि.) श्रद्धाळू.

**सद्धी-विहारिक, सद्धी-विहारी**–(पु.) ब्रह्मचारी.

**सद्धी**–(अ.) सह, बरोबर.

**सद्धीचर**–(वि.) साथी, जोडीदार, मित्र.

**सधन**–(वि.) धनी, श्रीमंत.

**सधम्मी**–(पु.) समान गुणांचा, समान धर्माचा.

**सनति**–[पहा–सणति].

**सनंतन**–(वि.) सनातन, पूर्वीपासून.

**सनाभिक**–(वि.) नाभीसह.

**सनित**–(कृ.) ध्वनित, आवाज काढत, सुर काढत.

**सन्त**–(कृ.) शांत, श्रांत, थकलेला, दमलेला.

**सन्त**–(वि.) विद्यमान, चालू.

**सन्त**–(पु.) सत्पुरुष, साधू, संत.

**सन्त-काय**–(वि.) शांत शरिराचा.

**सन्त-तर**–(वि.) अधिक शांत.

**सन्त-मानस**–(वि.) शांत चित्ताचा, शांत मनाचा.

**सन्त-भाव**–(पु.) शांत भाव.

**सन्तक**–(वि.) स्वकीय, आपला, जवळचा (स–अन्तक), सीमित, मर्यादित.

**सन्तक**–(नपु.) सम्पती, धन.

**सन्तज्जेति**–(क्रि.) त्रास देणे, भीती दाखविणे.

**सन्तज्जेसि**–(पू. क्रि.) त्रास दिला, भीती दाखविली.

**सन्तज्जित, सन्तज्जेन्त**–(कृ.) त्रास देता, भीती दाखविता.

**सन्तज्जयमान**–(कृ.) त्रास देण्यायोग्य, भीती दाखविण्यायोग्य.

**सन्तज्जेत्वा**–(पू. क्रि.) त्रास देऊन, भीती दाखवून.

**सन्ततं**–[पहा–सततं].

**सन्तति**–सन्तती, मुलेबाळे, परंपरा.

**सन्तत्त**–(कृ.) संतप्त, रागावून, तापलेला, रागावलेला.

**सन्तप्पति**–(क्रि.) त्रासणे, दुःखी होणे.
**सन्तप्पि**–(पू. क्रि.) त्रासला, दुःखी झाला.
**सन्तत्त**–(कृ.) त्रासता, दुःखी होता.
**सन्तप्पमान**–(कृ.) त्रासणे योग्य, दुःखी होणे योग्य.
**सन्तप्पित्त्वा**–(पू. क्रि.) त्रासून, दुःखी होऊन.
**सन्तप्पित**–(कृ.) संतुष्ट, प्रसन्न, तृप्त.
**सन्तप्पेति**–(क्रि.) संतुष्ट होणे, प्रसन्न होणे.
**सन्तप्पेसि**–(पू. क्रि.) संतुष्ट झाला, प्रसन्न झाला.
**सन्तप्पिय**–(पू. क्रि.) संतुष्ट झाला, प्रसन्न झाला.
**सन्तप्पित, सन्तपोन्त**–(कृ.) संतुष्ट होता, प्रसन्न होता.
**सन्तपोत्त्वा**, –(पू. क्रि.) संतुष्ट होऊन, प्रसन्न होऊन.
**सन्तर-बाहिर**–(वि.) आंत बाहेर.
**सन्तर-बाहिरं**–(क्रि. वि.) आंत-बाहेर करून.
**सन्तरति**–(क्रि.) ताबडतोब करणे, शीघ्रता करणे.
**सन्तरि**–(पू. क्रि.) ताबडतोब केले, शीघ्रता केली.
**सन्तरत**–(कृ.) ताबडतोब करता, शीघ्रता करता.
**सन्तरमान**–(कृ.) ताबडतोब करणे योग्य, शीघ्रता करणे योग्य.
**सन्तरित्त्वा**–(पू. क्रि.) ताबडतोब करून, शीघ्रता करून.
**सन्तसति**–(क्रि.) भिणे, भयभीत होणे.
**सन्तसि**–(पू. क्रि.) भ्याला, भयभीत झाला.
**सन्तसत, सन्तसन्त**–(कृ.) भिता, भयभीत होता.
**सन्तसित्त्वा**–(पू. क्रि.) भिऊन, भयभीत होऊन.
**सन्तसन**–(नपु.) भय, भीती.
**सन्तान**–(नपु.) संतती, मुले-बाळे, परंपरा, कोळ्याचे जाळे, जळमट.
**सन्तानेति**–(क्रि.) परंपरा चालविणे.
**सन्ताप**–(पु.) ताप, राग, पश्चाताप, संताप.
**सन्तापेति**–(क्रि.) तापविणे, जाळणे, त्रास देणे.
**सन्तापेसि**–(पू. क्रि.) तापविला, जाळला, त्रास दिला.
**सन्तापित**–(कृ.) तापविता, जाळता, त्रास देता.
**सन्तापेत्त्वा**–(पू. क्रि.) तापवून, जाळून, त्रास देऊन.
**सन्तास**–(पु.) भय, त्रास, ताप, थरकाप.
**सन्तासी**–(वि.) भ्यालेला, थरकाप उठलेला.
**सन्ति**–(स्त्री.) शांती.
**सन्ति-कम्म**–(नपु.) शांतता प्रस्थापित करणे, शांती-कर्म.
**सन्ति-पद**–(नपु.) शांत अवस्था, शांत स्थिती, शांती-पद.
**सन्तिक**–(वि.) जवळ.
**सन्तिक**–(नपु.) शेजार.
**सन्तिका**–(अ.) ऊन, हून.
**सन्तिकावचर**–(वि.) शेजारी, शेजारी राहणारा, जवळ राहणारा.
**सन्तिके निदान**–(पु.) जातकाट्ठ कथांचा ग्रंथ. या ग्रंथात बुद्धाच्या बुद्धत्व प्राप्तीपासून परिनिवृत्त होण्यापर्यंतचा वृत्तांत संग्रहित केला आहे.
**सन्तिट्ठति**–(क्रि.) थांबणे, तिष्ठणे.
**सन्तीरण**–(नपु.) संशोधन करणे.
**सन्तुट्ठ**–(कृ.) संतुष्ट, प्रसन्न, तृप्त.
**सन्तुट्ठता**–(स्त्री.) प्रसन्नता, तृप्ती, संतुष्टता.
**सन्तुट्ठि**–(स्त्री.) संतोष, प्रीती, आनंद, संतुष्टी.
**सन्तुसित**–[पहा–सन्तुट्ठ.]
**सन्तुस्सक**–(वि.) संतुष्ट, प्रसन्न.
**सन्तुस्सन**–(नपु.) संतोष.
**सन्तुस्सति**–(क्रि.) संतुष्ट करणे, प्रसन्न करणे.
**सन्तुस्सि**–(पू. क्रि.) संतुष्ट केले, प्रसन्न केले.]
**सन्तुसित, सन्तुट्ठ**–(कृ.) संतुष्ट करता, प्रसन्न करता.
**सन्तुस्समान**–(कृ.) संतुष्ट करणे योग्य, प्रसन्न करणे योग्य.
**सन्तुस्सित्त्वा**–(पू. क्रि.) संतुष्ट करून, प्रसन्न करून.
**सन्तोस**–(पु.) संतोष, आनंद.
**सन्यत**–(कृ.) झाकलेला, आच्छादित.
**सन्यम्भेति**–(क्रि.) कठोर बनणे.
**सन्यम्भेसि**–(पू. क्रि.) कठोर बनला.
**सन्यम्भित**–(कृ.) कठोर बनता.
**सन्यम्भित्त्वा**–(पू. क्रि.) कठोर बनून.
**सन्यम्भना**–(स्त्री.) कठोरता.
**सन्थर**–(पु.) चटई, सतरंजी.
**सन्थर**–(नपु.) अंथरुण.
**सन्थरति**–(क्रि.) अंथरणे.
**सन्थरि**–(पू. क्रि.)अंथरले.
**सन्थरित**–(कृ.) अंथरता.
**सन्थरित्त्वा**–(पू. क्रि.) अंथरून.
**सन्थरापेति**–(क्रि.) अंथरण्यास लावणे.
**सन्थव**–(पु.) दाट मैत्री, घनिष्ट संबंध, संसर्ग, समागम.
**सन्थव जातक**–यज्ञात दिलेल्या आहुतीच्या ज्वालांनी कुटीला आग लागल्याची कथा–(१६२).
**सन्थागार**–(पु., नपु.) सभागृह, सभाभवन.
**सन्थार**–(पु.) बैठक, फरशी, जाजम.
**सन्थुत**–(कृ.) परिचित, ओळखीचा, माहितीचा.
**सन्द**–(वि.) दाट, घन, भरीव.

**सन्द**–(पु.) प्रवाह, सांगणे.
**सन्दच्छाय**–(वि.) दाट सावली, दाट सावलीचा.
**सन्दति**–(क्रि.) वाहणे.
**सन्दि**–(पू. क्रि.) वाहिले.
**सन्दित**–(कृ.) वाहता.
**सन्दित्त्वा**–(पू. क्रि.) वाहून.
**सन्दमान**–(कृ.) वाहून जाण्यायोग्य.
**सन्दन**–(नपु.) वाहणे, ओढणे.
**सन्दन**–(पु.) रथ, गाडा.
**सन्दस्सक**–(पु.) दिसणारा, दृष्य.
**सन्दस्सन**–(नपु.) शिक्षण, मार्गदर्शन.
**सन्दस्सियमान**–(वि.) शिक्षित, शिकलेला.
**सन्दस्सेति**–(क्रि.) समजविणे, शिकविणे.
**सन्दस्सेसि**–(पू. क्रि.) समजविले, शिकविले.
**सन्दस्सित**–(कृ.) समजविता, शिकविता.
**सन्दस्सेत्वा**–(पू. क्रि.) समजावून, शिकवून.
**सन्दहति**–(क्रि.) मेळ घालणे, जुळविणे.
**सन्दहि**–(पू. क्रि.) मेळ घातला, जुळविले.
**सन्दहित**–(कृ.) मेळ घालता, जुळविता.
**सन्दहित्त्वा**–(पू. क्रि.) मेळ घालून, जुळवून.
**सन्दहन**–(नपु.) मेळ, जुळणी.
**सन्दान**–(नपु.) साखळी, परंपरा.
**सन्दालेति**–(क्रि.) तोडणे, चिरणे.
**सन्दालेसि**–(पू. क्रि.) तोडले, चिरले.
**सन्दालित**–(कृ.) तोडता, चिरता.
**सन्दालेत्वा**–(पू. क्रि.) तोडून, चिरून.
**सन्दिट्ठ**–(कृ.) सादृष्य.
**सन्दिट्ठ**–(पु.) मित्र.
**सन्दिट्ठिक**–(वि.) दिसणारा, या लोकांसंबंधी, इह लोकांविषयी.
**सन्दित**–(कृ.) वाहिला, प्रवाहित झाला.
**सन्दिद्ध**–(कृ.)विष, मिश्रित, विष मिसळलेला, संदिग्ध.
**सन्दिस्सति**–(क्रि.) दिसणे.
**सन्दीपन**–(नपु.) स्पष्ट करणे, प्रकाशित करणे.
**सन्दीपेति**–(क्रि.) प्रकाशित करणे, जाहीर करणे.
**सन्दीपेसि**–(पू. क्रि.) प्रकाशित केले, जाहीर केले.
**सन्दीपित**–(कृ.) प्रकाशित करता, जाहीर करता.
**सन्दीपेत्त्वा**–(पू. क्रि.) प्रकाशित करून, जाहीर करून.
**सन्देस**–(पु.) सन्देश, बातमी, निरोप.
**सन्देस-हर**–(पु.) बातमीदार, संदेश देणारा, संदेश आणणारा.
**सन्देसागार**–(पु., नपु.) डाकखाना, पोस्ट, डाक घर.
**सन्देह**–(पु.) शंका, संशय, आपले शरीर, आपला देह.
**सन्दोह**–(पु.) ढीग, साठा
**सन्धन**–(नपु.) स्वतःची संपत्ती, स्वतःचे धन.
**सन्धमति**–(क्रि.) फुंकणे, वाजविणे.
**सन्धमि**–(पू. क्रि.) फुंकले, वाजविले.
**सन्धमन्त**–(कृ.) फुंकता, वाजविता.
**सन्धमित्त्वा**–(पू. क्रि.) फुंकून, वाजवून.
**सन्धातु**–(पु.) मेळ घालणारा, जुळविणारा.
**सन्धान**–(नपु.) मेळ, जुळणी, ऐक्य, एकता.
**सन्धाय**–(पू. क्रि.) मेळ होऊन, जुळणी करून.
**सन्धारक**–(वि.) सहन करता, थांबविता.
**सन्धारण**–(नपु.) थांबविणे.
**सन्धारेति**–(क्रि.) सहन करणे, थांबविणे.
**सन्धारेसि**–(पू. क्रि.) सहन केले, थांबविले.
**सन्धारित, सन्धारेन्त**–(कृ.) सहन करता, थांबविता.
**सन्धारेत्वा**–(पू. क्रि.) सहन करून, थांबवून.
**सन्धावति**–(क्रि.) पळणे, धावणे.
**सन्धावि**–(पू. क्रि.) पळाला, धावला.
**सन्धावित, सन्धावन्त**–(कृ.) पळता, धावता.
**सन्धावमान**–(कृ.) पळणे योग्य, धावणे योग्य, धावणारा, पळणारा.
**सन्धावित्त्वा**–(पू. क्रि.) पळून, धावून.
**सन्धि**–(स्त्री.) मेळ, समझोता, ऐक्य, सांधा.
**सन्धिच्छेदक**–(वि.) चोरीसाठी भिंत फोडणारा.
**सन्धिभेद जातक**–गाईचे वासरू व सिंहाचा छावा यांच्यात मैत्री झाली होती पण एका लबाड कोल्ह्याने त्यांची मैत्री नष्ट केल्याची कथा–(३४९).
**सन्धिमुख**–(नपु.) भिंतीच्या भोकाचे तोंड.
**सन्धीयति**–(क्रि.) घाण मिसळणे.
**सन्धूपायति**–(क्रि.) धूर बाहेर सोडणे.
**सन्धूपायि**–(पू. क्रि.) धूर बाहेर सोडला.
**सन्धूपायेन्त**–(कृ.) धूर बाहेर सोडता.
**सन्धूपायित्त्वा**–(पू. क्रि.) धूर बाहेर सोडता.
**सन्धूपेति**–(क्रि.) धूर देणे, धुरी देणे.
**सन्धूपेसि**–(पू. क्रि.) धूर दिला, धुरी दिली.
**सन्धूपित**–(कृ.) धूर देता, धुरी देता.
**सन्धूपायित्त्वा**–(पू. क्रि.) धूर देऊन, धुरी देऊन.
**सन्धूपेति**–(क्रि.) धूर करणे.
**सन्धूपेसि**–(पू. क्रि.) धूर केला.
**सन्धूपित**–(कृ.) धूर करता.

**सन्धूपेत्वा**–(पू. क्रि.) धूर करून.
**सन्नय्हति**–(क्रि.) शस्त्र बांधणे, हत्यार बांधणे.
**सन्नय्हि**–(पू. क्रि.) शस्त्र बांधले, हत्यार बांधले.
**सन्नय्ह**–(कृ.) शस्त्र बांधता, हत्यार बांधता.
**सन्नय्हित्वा**–(पू. क्रि.) शस्त्र बांधून, हत्यार बांधून.
**सन्नकवृदु**–(पु.) भोपळयाचा वेल, वनस्पती.
**सन्नद्ध**–(कृ.) बांधलेला, हत्यार बंद.
**सन्नाह**–(पु.) कवच, अच्छादन.
**सन्निकट्ठ**–(नपु.) शेजार.
**सन्निकास**–(वि.) मिळता-जुळता, समान.
**सन्निचय**–(पु.) संग्रह, साठा.
**सन्निचित**–(कृ.) संग्रहित.
**सन्निट्ठान**–(नपु.) सारांश, संक्षेप.
**सन्निधान**–(नपु.) जवळिक, जवळपणा, समीपता.
**सन्निधि**–(पु.) जमा करणे, एकत्र करणे, साठा करणे.
**सन्निधिकार**–(पु.) जमाकर्ता, संग्राहक.
**सन्निधिकत**–(वि.) जमविलेला माल.
**सन्निपतति**–(क्रि.) संमेलन भरणे, एकत्र येणे, गोळा होणे.
**सन्निपति**–(पू. क्रि.) संमेलन भरले, एकत्र आले, गोळा झाले.
**सन्निपतित, सन्निपन्त**–(कृ.) संमेलन भरता, एकत्र येता गोळा होता.
**सन्निपतित्वा**–(पू. क्रि.) संमेलन भरून, एकत्र येऊन, गोळा होऊन.
**सन्निपात**–(पु.) संमेलन, वात पित्त-कफ यांचा मिलाफ.
**सन्निपातिक**–(वि.) शरिरातील एक प्रकारचा रोग वात-पित्त-कफ यांचा आरोग्यावर होणारा परिणाम (रोग-आजार).
**सन्निपातन**–(नपु.) एकत्र करणे, जुळविणे.
**सन्निपातेति**–(क्रि.) संमेलन भरविणे, सभा भरविणे, एकत्र करणे, गोळा करणे.
**सन्निपातेसि**–(पू. क्रि.) संमेलन भरविले, सभा भरविली, एकत्र केले, गोळा केले.
**सन्निपातित**–(कृ.) संमेलन भरविता, सभा भरविता, एकत्र होता, गोळा होता.
**सन्निपातेत्वा**–(पू. क्रि.) संमेलन भरवून, सभा भरवून, एकत्र करून, गोळा करून.
**सन्निभ**–(वि.) जुळलेला, एकत्रित.
**सन्नियातन**–(नपु.) सोपविणे, जबाबदारी सोडणे, राजीनामा देणे.
**सन्निरुम्भन**–(नपु.) थांबविणे.
**सन्निरुम्भेति**–(क्रि.) थांबविणे, अडथळा देणे.
**सन्निरुम्भेसि**–(पू. क्रि.) थांबविले, अडथळा दिला.
**सन्निरुम्भित**–(कृ.) थांबविता, अडथळा देता.
**सन्निरुम्भेत्वा**–(पू. क्रि.) थांबवून, अडथळा देऊन.
**सन्निवसति**–(क्रि.) एकत्र राहणे, बरोबर राहणे.
**सन्निवास**–(पु.) संगती, संगत, बरोबर असणे.
**सन्निसीदति**–(क्रि.) शांत होणे, स्थिर होणे.
**सन्निसीदि**–(पू. क्रि.) शांत झाला, स्थिर झाला.
**सन्निसीदित**–(कृ.) शांत होता, स्थिर होता.
**सन्निसीदित्वा**–(पू. क्रि.) शांत होऊन, स्थिर होऊन.
**सन्निस्सित**–(वि.) आश्रित, संबंधित.
**सन्निहित**–(कृ.) ठेवला गेला.
**सन्नेति**–(क्रि.) मिसळणे.
**सन्नेसि**–(पू. क्रि.) मिसळले.
**सन्नित**–(कृ.) मिसळता.
**सन्नेत्वा**–(पू. क्रि.) मिसळून.
**सपच**–(पु.) चांडाळ, अस्पृश्य, भंगी, स्वपच.
**सपजापतिक**–(वि.) पत्नीसह, सपत्निक.
**सपति**–(क्रि.) शपथ घेणे.
**सपि**–(पू. क्रि.) शपथ घेतली.
**सपित**–(कृ.) शपथ घेता.
**सपित्वा**–(पू. क्रि.) शपथ घेऊन.
**सपत्त**–(पु.) विरोधक, शत्रू.
**सपत्त**–(वि.) विरोधी.
**सपत्त-भार**–(वि.) स्वकीय, परकियांचा भार सोसून.
**सपत्ती**–(स्त्री.) पत्नीसह.
**सपत्ती**–(स्त्री., वि.) सवत.
**सपथ**–(पु.) शपथ.
**सपदान**–(वि.) क्रमशः, अनुक्रमे, ओळीने.
**सपदान**–(वि.) क्रमशः.
**सपदान चारिका**–एकहि घर न सोडता, प्रत्येक घरी भिक्षाटन करणे.
**सपदि**–(अ.) ताबडतोब.
**सपरिग्गह**–(वि.) आपली संपत्ति, पत्नीसह, सपरिग्रह.
**सपाक सोपाक**–(पु. वि.) अन्त्यज, कुत्री खाणारा, (कुत्र्याप्रमाणे मृतमांस खाणारा, असा अर्थ असावा).
**सप्प**–(पु.) सर्प, साप.
**सप्प-पोतक**–(पु.) सापाचे पिलू.
**सप्पच्चय**–(वि.) सकारण, संहेतुक.

**सप्पञ्ञ**–(वि.) बुद्धिमान, संपन्न.
**सप्पटिघ**–(वि.) मैत्री करण्या लायक, ज्या बरोबर प्रतिक्रिया, देवाण-घेवाण होईल असा, मित्र, दोस्त.
**सप्पटिभय**–(वि.) भयानक.
**सप्पति**–(क्रि.) रांगणे, मंदगतीने चालणे, सरपटणे. वळवळणे.
**सप्पन**–(नपु.) रांगणे, सरपटणे, वळवळणे.
**सप्पाणक**–(वि.) प्राण्यांसह.
**सप्पाय**–(वि.) लाभदायक, फायदेशीर.
**सप्पायता**–(स्त्री.) फायदेशीर असणे, कल्याणकारी.
**सप्पि**–(नपु.) तूप.
**सप्पिनी**–(स्त्री.) सर्पिनी.
**सप्पिनी, सप्पिनिका**–(स्त्री.) राजगृहा मधून वाहणारी नदी.
**सप्पीतिक**–(वि.) प्रीतियुक्त.
**सप्पुरिस**–(पु.) सत्पुरुष.
**सफरी**–(स्त्री.) सफरी मासा.
**सफल**–(वि.) फळांसह, फळयुक्त, सफल.
**सबल**–(वि.) शक्तिमान, सशक्त, बलवान, बलशाली.
**सब्ब**–(वि.) सर्व.
**सब्ब कनिट्ठ**–(वि.) सर्वांत लहान.
**सब्ब कम्मिक**–(वि.) सर्व कामी, मंत्री, निजी सहाय्यक.
**सब्ब-चतुप्पद**–(पु.) सर्व चतुष्पाद, सर्व जनावरे.
**सब्बञ्ञू**–(वि.) सर्व जाणणारा, सर्वज्ञ.
**सब्बञ्ञू**–(पु. वि.) भगवान बुद्ध सर्वज्ञ.
**सब्बञ्ञुता**–(स्त्री.) सर्वज्ञता.
**सब्बट्ठक**–(वि.) आठ प्रकारांच्या सर्व वस्तू.
**सब्बतो**–(अ.) हर प्रकाराने, सर्व प्रकारे.
**सब्बत्थ**–(क्रि. वि.) सर्वत्र, सर्व ठिकाणी.
**सब्बत्र**–[पहा–सब्बत्थ].
**सब्बथा**–(क्रि. वि.) सर्वथा, सर्व प्रकारे, हर प्रकारे.
**सब्बदा**–(क्रि. वि.) सर्वदा, नेहमी सतत.
**सब्बदाठ जातक**–कोल्ह्याने भोळ्या ब्राह्मणाकडून "पृथ्वी-जय" नावाचा मंत्र शिकून घेतला. या मंत्राच्या सहाय्याने जंगलातील सर्व प्राण्यांना वश करून घेऊन आपण त्यांचा राजा झाल्याची कथा–(२४१).
**सब्बधि**–(क्रि. वि.) सर्वत्र, सर्व ठिकाणी.
**सब्ब पठम**–(वि.) सर्व प्रथम, सर्वांत प्रमुख.
**सब्ब पठमं**–(क्रि. वि.) सर्वांपुढे, सर्वांत पहिला. सर्व प्रथम.
**सब्ब-विदू**–(वि.) सर्वज्ञ, सर्व जाणणारा.
**सब्ब-सत**–(वि.) सर्व प्रकारच्या, शंभर शंभर वस्तू.
**सब्बसो**–(क्रि. वि.) सर्व तऱ्हेने.
**सब्बसोवण्ण**–(वि.) संपूर्ण सोन्याचा बनविलेला.
**सब्बस्स**–(नपु.) सर्व संपत्ति, सर्व धन.
**सब्बस्सहरण**–(नपु.) सर्व संपत्तीचे हरण.
**सब्भ**–(वि.) गुणवान, सद्गुणी, सभ्य.
**सब्रह्मक**–(वि.) ब्रह्म लोकांसह.
**सब्रह्मचारी**–(पु.) सहपाठी, गुरुबंधु.
**सभग्गत**–(वि.) सभेत गेलेला, संमेलनात गेलेला.
**सभा**–(स्त्री.) परिषद, सभा.
**सभाग**–(वि.) समान, सारखा, एकसारखा.
**सभागट्ठान**–(नपु.) योग्य जागा, अनुकूल ठिकाण, सोईची जागा.
**सभागवुत्ती**–(वि.) परस्पर शालीनतेने राहणारा, सद्शील.
**सभाय**–(नपु.) सभागृह, सभा भवन.
**सभाव**–(पु.) स्वभाव, प्रकृती.
**सभाव-धम्म**–(पु.) स्वभावाचा सिद्धांत, स्वभाव धर्म.
**सभोजन**–(वि.) भोजनासह.
**सम**–(वि.) बरोबर, सारखा, समान.
**सम**–(पु.) निश्चलता, शांती, श्रम, थकवा.
**समक**–(वि.) जुळविणारा.
**समग्ग**–(वि.) समग्र, एकता, एकूण सर्व.
**समग्गकरण**–(नपु.) मेळ घालणे, जुळविणे.
**समग्गत्त**–(नपु.) एकूण, ऐक्य, मिलाफ, समग्रता, एकता.
**समग्गरत**–(वि.) ऐक्यात आनंद.
**समग्गाराम**–(वि.) ऐक्यांत समाधान.
**समङ्गिता**–(स्त्री.) जुळणी, जोडणी.
**समङ्गि**–(वि.) जुळलेला, जुडलेला.
**समङ्गीभूत**–(वि.) युक्त, जोडलेला.
**समचारिया**–(स्त्री.) शांत वर्तन.
**समचित्त**–(वि.) शांतचित्त, शांतमन.
**समचित्तता**–(स्त्री.) एकाग्रमन, चित्ताची शांतता.
**समजातिक**–(वि.) एकाच जातीचा, एकाच प्रकारचा
**समज्ज**–(नपु.) यात्रेतील गर्दी, दाटी.
**समज्जट्ठान**–(नपु.) यात्रेची जागा, यात्रेचे ठिकाण.
**समज्जाभिचरण**–(नपु.) यात्रेत फिरणे, हिंडणे.
**समञ्ञा**–(स्त्री.) पद, नाव.
**समञ्ञात**–(वि.) पदप्राप्त, कळलेले, जाणलेले.
**समण**–(पु.) साधु, श्रमण.
**समण-कुत्तक**–(पु.) ढोंगी साधू.

**समणी**–(स्त्री.) साध्वी, श्रमणी.
**समणुद्देसा**–(पु.) श्रामणेर.
**समण-धम्म**–(पु.) श्रमण धर्म.
**समण-सारुप्प**–(वि.) श्रमणास योग्य, अनुरुप.
**समता**–(स्त्री.) बरोबरी, सारखेपणा, समता.
**समतिक्कन्त**–(कृ.) ओलांडला, पारकेला, पूर्ण केला.
**समतिक्कम**–(नपु.) ओलांडणे, पार करणे.
**समतिक्कमति**–(क्रि.) ओलांडणे, पार करणे.
**समतिक्कमि**–(पू. क्रि.) ओलांडले, पार केले.
**समतिक्कमन्त**–(कृ.) ओलांडता, पार करता.
**समतिक्कमित्त्वा**–(पू. क्रि.) ओलांडून, पार करून.
**समतित्तिक**–(वि.) काठोकाठ भरलेला, किनाऱ्या-पर्यंत भरलेला.
**समतिवत्तति**–(क्रि.) सीमा ओलांडणे, हद्दीपार जाणे.
**समतिवत्ति**–(पू. क्रि.) सीमा ओलांडली, हद्दीपार गेला.
**समत्तिवत्तित**–(कृ.) सीमा ओलांडता, हद्दीपार जाता.
**समत्तिवत्तित्त्वा**–(पू. क्रि.) सीमा ओलांडून, हद्दीपार जाऊन.
**समत्त**–(वि.) समस्त, सर्व, संपूर्ण.
**समत्त**–(नपु.) समत्व, सारखेपणा, साम्य, समता.
**समत्थ**–(वि.) समर्थ, सामर्थ्यवान.
**समत्थन**–(नपु.) भांडणाचा निकाल.
**समथ**–(पु.) मनाची शांती, कायदेशीर भांडणाचा निर्णय.
**समथ-भावना**–(स्त्री.) चित्ताच्या शांतीचा अभ्यास-सराव.
**समधिगच्छति**–(क्रि.) मिळविणे, समजून घेणे.
**समधिगच्छि**–(पू. क्रि.) मिळविले, समजून घेतले.
**समधिगत**–(कृ.) मिळविता, समजून घेता.
**समधिगन्त्वा**–(पू. क्रि.) मिळवून, समजून घेऊन.
**समनन्तर**–(वि.) लगेच दुसरा, या नंतरचा.
**समनन्तरा**–(क्रि. वि.) पाठोपाठ.
**समनुगाहति**–(क्रि.) कारण शोधणे.
**समनुगाहि**–(पू. क्रि.) कारण शोधले.
**समनुगाहत**–(कृ.) कारण शोधता.
**समनुगाहित्त्वा**–(पू. क्रि.) कारण शोधून.
**समनुञ्ञ**–(वि.) स्वीकृत, मान्य केलेले.
**समनुञ्ञा**–(स्त्री.) स्वीकृती, मान्यता.
**समनुञ्ञात**–(वि.) स्वीकृत, मान्य, अनुमत.
**समनुपस्सति**–(क्रि.) पाहणे, अनुभवणे.
**समनुपस्सि**–(पू. क्रि.) पाहिले, अनुभवले.
**समनुपस्सत**–(कृ.) पाहता, अनुभवता.
**समधनुपस्समान**–(कृ.) पाहण्या योग्य, अनुभविणे योग्य.
**समनुपस्सित्त्वा**–(पू. क्रि.) पाहून, अनुभवून.
**समनुभासति**–(क्रि.) बोलणे, चर्चा करणे.
**समनुभासि**–(पू. क्रि.) बोलला, चर्चा केली.
**समनुभासित**–(कृ.) बोलता, चर्चा करता.
**समनुभासित्त्वा**–(पू. क्रि.) बोलून, चर्चा करून.
**समनुभासना**–(स्त्री.) गप्पागोष्टी, बातचीत, पूर्वाभ्यास.
**समनुयुञ्जति**–(क्रि.) प्रश्नोत्तर करणे.
**समनुयुञ्जि**–(पू. क्रि.) प्रश्नोत्तर केले.
**समनुयुञ्जित**–(कृ.) प्रश्नोत्तर करता.
**समनुयुञ्जित्त्वा**–(पू. क्रि.) प्रश्नोत्तर करून.
**समनुस्सरति**–(क्रि.) स्मरण करणे, आठविणे.
**समनुस्सरि**–(पू. क्रि.) स्मरण केले, आठविले.
**समनुस्सरन्त**–(कृ.) स्मरण करता, आठविता.
**समनुस्सरित्त्वा**–(पू. क्रि.) स्मरण करून, आठवून.
**समन्त**–(वि.) सर्व, सारे, संपूर्ण.
**समन्त-चक्ख**–(वि.) सर्व पाहणारा, सर्व दिसणारा.
**समन्त-पासादिक**–(वि.) सर्वांना प्रसन्न ठेवणारा.
**समन्त-पासादिका**–(स्त्री., वि.) आचार्य बुद्ध घोषांनी रचलेल्या विनय पिटकाची अट्ठकथा.
**समन्त-भद्दक**–(वि.) सर्वांसाठी कल्याणकारी सर्वांच्या हिताचे.
**समन्त-कूट पर्वत**–(पु., वि.) श्री. लंकेतील प्रसिद्ध पर्वत शिखर, याच पर्वत शिखरावर भगवान बुद्धाचे पदचिन्ह आहे असे मानतात (श्रीपाद).
**समन्ता, समन्तता**–(क्रि. वि.) चोहोंकडून, चारी दिशांनी, सर्वत्र.
**समन्नागत**–(वि.) युक्त.
**समन्नाहरति**–(क्रि.) एकत्र करणे.
**समन्नाहरि**–(पू. क्रि.) एकत्र केले.
**समन्नाहट**–(कृ.) एकत्र करता.
**समन्नाहरित्त्वा**–(पू. क्रि.) एकत्र करून.
**समपेक्खति**–(क्रि.) परीक्षण करणे, तपासणे.
**समपेक्खि**–(पू. क्रि.) परीक्षण केले, तपासले.
**समपेक्खित**–(कृ.) परीक्षण करता, तपासता.
**समपेक्खित्त्वा**–(पू. क्रि.) परीक्षण करून, तपासून.
**समप्पेति**–(क्रि.) समर्पण करणे, सोपविणे.
**समप्पेसि**–(पू. क्रि.) समर्पण केले, सोपविले.
**समप्पित**–(कृ.) समर्पण करता, सोपविता.
**समप्पिय**–(कृ.) समर्पण करणे योग्य, सोपविणे योग्य.

**समप्पेत्वा**–(पू. क्रि.) समर्पण करून, सोपवून.
**समय**–(पु.) काळ, वेळ, परिषद, ऋतु, संधी, धार्मिक मत.
**समयन्तर**–(नपु.) भिन्न भिन्न संप्रदाय, वेगवेगळे पंथ.
**समर**–(नपु.) युद्ध, लढाई, समर.
**समल**–(वि.) अपवित्र, अशुद्ध, मळलेले, मलीन.
**समलङकत**–(कृ.) अलंकृत, नटलेला, सजलेला.
**समलङकरोति**–(क्रि.) सजविणे.
**समलङकरि**–(पू. क्रि.) सजविले.
**समलङकत**–(कृ.) सजविता.
**समलङकरित्वा**–(पू. क्रि.) समजून.
**समवाय**–(पु.) मेळ, सारखेपणा.
**समवेक्खति**–(क्रि.) समीक्षण करणे, वाट पाहणे.
**समवेक्खि**–(पू. क्रि.) समीक्षण केले, वाट पाहिली.
**समवेक्खित**–(कृ.) समीक्षण करता, वाट पहाता.
**समवेक्खित्वा**–(पू. क्रि.) समीक्षण करून, वाट पाहून.
**समवेपाकिनी**–(स्त्री.) सारक, पाचक.
**सम-सिप्पी**–(पु.) समान शिल्प, सारखीच बांधणी.
**समस्सास**–(पु.) सहायता, मदत, विश्राम.
**समस्सासेति**–(क्रि.) मदत करणे, आराम देणे.
**समस्सासेसि**–(पू. क्रि.) मदत केली, आराम दिला.
**समस्सासेन्त**–(कृ.) मदत करता, आराम देता.
**समस्सासेत्वा**–(पू. क्रि.) मदत करून, आराम देऊन.
**समा**–(स्त्री.) वर्ष, साल.
**समाकड्ढति**–(क्रि.) सार काढणे, ओढणे.
**समाकड्ढि**–(पू. क्रि.) सार काढला, ओढले.
**समाकड्ढन्त**–(कृ.) सार काढता, ओढता.
**समाकड्ढित्वा**–(पू. क्रि.) सार काढून, ओढून.
**समाकड्ढन**–(नपु.) ओढणे, सार काढणे, घासणे.
**समाकिण्ण**–(वि.) जमविलेला, एकत्र केलेला भरलेला.
**समागच्छति**–(क्रि.) येऊन, मिळणे, एकत्र होणे.
**समागच्छि**–(पू. क्रि.) येऊन मिळाले, एकत्र झाले.
**समागत, समागम्म**–(कृ.) येऊन, मिळता, एकत्र होता.
**समागन्त्वा**–(पू. क्रि.) येऊन मिळून, एकत्र होऊन.
**समागत**–(कृ.) एकत्रित मिळून.
**समागम**–(पु.) परिषद, सभा, सम्मेलन.
**समाचरति**–(क्रि.) आचरण करणे, अभ्यास करणे.
**समाचरि**–(पू. क्रि.) आचरण केले, अभ्यास केला.
**समाचरन्त**–(कृ.) आचरण करता, अभ्यास करता.
**समाचरित्वा**–(पू. क्रि.) आचरण करून, अभ्यास करून.
**समाचरण**–(नपु.) आचरण, वर्तन, अभ्यास, व्यवहार.
**समाचार**–(पु.) आचरण, व्यवहार.
**समादपक, समादपेतु**–(पु.) उत्साहित करणारा, प्रेरित करणारा, तयार करणारा.
**समादपन**–(नपु.) उत्साहित करणे, प्रेरित करणे, उत्तेजित करणे.
**समादपेति**–(क्रि.) उत्साहित करणे, प्रेरित करणे, उत्तेजित करणे.
**समादपेसि**–(पू. क्रि.) उत्साहित केले, प्रेरित केले, उत्तेजित केले.
**समादपित**–(कृ.) उत्साहित करता, प्रेरित करता, उत्तेजित करता.
**समादपेत्वा**–(पू. क्रि.) उत्साहित करून, प्रेरित करून, उत्तेजित करून.
**समादहति**–(क्रि.) जोडणे, एकत्र करणे, आग पेटविणे.
**समादहि**–(पू. क्रि.) जोडले, एकत्र केले, आग पेटविली.
**समादहन्त**–(कृ.) जोडता, एकत्र करता, आग पेटविता.
**समादहित्वा**–(पू. क्रि.) जोडून, एकत्र करून, आग पेटवून.
**समादति**–(क्रि.) ग्राह्य करणे, स्वीकारणे, कबूल करणे.
**समादान**–(नपु.) स्वीकारणे, अंगिकार करणे, आचरणे.
**समादाय**–(पू. क्रि.) घेऊन, स्वीकारून.
**समादियति**–(क्रि.) स्वीकारणे.
**समादियि**–(पू. क्रि.) स्वीकारले.
**समादिन्न, समादियन्त**–(कृ.) स्वीकारता.
**समादियित्वा**–(पू. क्रि.) स्वीकारून.
**समादिसति**–(क्रि.) आदेश देणे, आज्ञा देणे, हुकूम करणे.
**समादिसी**–(पू. क्रि.) आदेश दिला, आज्ञा दिली, हुकूम केला.
**समादिट्ठ**–(कृ.) आदेश देता, आज्ञा देता, हुकूम करता.
**समादिसित्वा**–(पू. क्रि.) आदेश देऊन, आज्ञा देऊन हुकूम करून.
**समाधान**–(नपु.) एकाग्रता, एकचित्त, एकत्रित.
**समाधि**–(पु.) योगाभ्यास, चित्ताची एकाग्रता, समाधी.
**समाधिज**–(वि.) समाधीतून उत्पन्न, योगाभ्यासातून निर्माण.
**समाधि-बल**–(नपु.) समाधीचे बल, योगाभ्यासाची शक्ती.

**समाधि-भावना**–(स्त्री.) योगाभ्यास, योग साधना.
**समाधि-संवत्तनिक**–(वि.) एकाग्रतेस उपयुक्त. ध्यान.
**समाधि-सम्बोज्झङ्ग**–(पु.) संबोधि प्राप्तीसाठी ध्यान साधना.
**समाधियति**–(क्रि.) संमीलित होणे, मिळणे.
**समाधियि**–(पू. क्रि.) संमीलित झाला, मिळाले.
**समाधियन्त**–(कृ.) संमीलित होता, मिळता.
**समाधियित्वा**–(पू. क्रि.) संमीलित होऊन, मिळून.
**समान**–(वि.) बरोबर, सारखा, सादृश्य, समान.
**समान-गतिक**–(वि.) सारख्या गतीचा वेगाचा.
**समानत्त**–(नपु.) समानत्व–सारखेपणा, समानता.
**समानत्त**–(वि.) (समन+अत्त) शांत चित्ताचा.
**समानत्तता**–(स्त्री.) निपक्षपात, शांत भाव.
**समान-वस्सिक**–(वि.) भिक्खु भाव घेतल्याची समानता, भिक्खु पदाची समान वेळ, समानकाळ.
**समान-संवासक**–(वि.) एकत्र राहणारा.
**समानेति**–(क्रि.) मिळविणे, जवळ आणणे.
**समानेसि**–(पू. क्रि.) मिळविले, जवळ आणले.
**समानित**–(कृ.) मिळविता, जवळ आणता.
**समानेत्वा**–(पू. क्रि.) मिळवून, जवळ आणून.
**समापज्जति**–(क्रि.) कार्यरत होणे, मग्न होणे.
**समापज्जि**–(पू. क्रि.) कार्यरत झाला, मग्न झाला.
**समापज्जन्त**–(कृ.) कार्यरत होता, मग्न होता.
**समापज्जमान**–(कृ.) कार्यरत होणे योग्य, मग्न होणे योग्य.
**समापज्जित्वा**–(पू. क्रि.) कार्यरत होऊन, मग्न होऊन.
**समापज्जन**–(नपु.) कार्यरत, मग्न.
**समापत्ति**–(स्त्री.) प्राप्ती, मिळकत.
**समापन्न**–(कृ.) कार्यरत.
**समापेति**–(क्रि.) समाप्त करणे, संपविणे.
**समापेसि**–(पू. क्रि.) समाप्त केले, संपविले.
**समापित**–(कृ.) समाप्त करता, संपविता.
**समापेत्वा**–(पू. क्रि.) समाप्त करून, संपवून.
**समायाति**–(क्रि.) जवळ येणे, बिलगणे, एक होणे.
**समायुत्त**–(वि.) जोडलेला, बिलगलेला.
**समायोग**–(पु.) मेळ, जोड, एकत्र.
**समारक**–(वि.) मारासह.
**समारद्ध**–(कृ.) आरंभ झाला, सुरू झाला.
**समारब्भति**–(क्रि.) आरंभ करणे.
**समारब्भि**–(पू. क्रि.) आरंभ केला.
**समारब्भित**–(कृ.) आरंभ करता.
**समारब्भित्वा**–(पू. क्रि.) आरंभ करून.
**समारम्भ**–(पु.) कार्य, हानि नुकसान, जनावरांचा वध, समारंभ.
**समारुहति**–(क्रि.) वर चढणे.
**समारुहि**–(पू. क्रि.) वर चढला.
**समारूळ्ह**–(कृ.) वर चढता.
**समारुय्ह**–(कृ.) वर चढणे योग्य.
**समारुहित्वा**–(पू. क्रि.) वर चढून.
**समारुहन**–(नपु.) चढणे.
**समारोपन**–(नपु.) चढणे, उठणे.
**समारोपेति**–(क्रि.) चढणे.
**समारोपेसि**–(पू. क्रि.) चढला.
**समारोपित**–(कृ.) चढता.
**समारोपेत्वा**–(पू. क्रि.) चढून.
**समावहति**–(क्रि.) आणणे.
**समावहि**–(पू. क्रि.) आणले.
**समावहन्त**–(कृ.) आणता.
**समावहित्वा**–(पू. क्रि.) आणून.
**समास**–(पु.) शद्बांचे संक्षिप्त रूप, व्याकरणातील समास.
**समासेति**–(क्रि.) संमेलन भरविणे.
**समासेसि**–(पू. क्रि.) संमेलन भरविले.
**समासित**–(कृ.) संमेलन भरविता.
**समासेत्वा**–(पू. क्रि.) संमेलन भरवून.
**समाहत**–(कृ.) मार खाल्लेला, मार लागलेला.
**समाहनति**–(क्रि.) मारणे, धक्का देणे.
**समाहार**–(पु.) संग्रह.
**समाहित**–(कृ.) एकाग्रचित्त.
**समिज्झति**–(क्रि.) सफल होणे, यश मिळणे.
**समिज्झि**–(पू. क्रि.) सफल झाला, यश मिळाले.
**समिद्ध**–(कृ.) सफल होता, यश मिळविता.
**समिज्झित्वा**–(पू. क्रि.) सफल होऊन, यश मिळवून.
**समिज्झन**–(नपु.) सफलता.
**समित**–(कृ.) शमित, शांत झालेला, तृप्त.
**समितत्त**–(नपु.) शांत भाव, शांत वृत्ती.
**समितावी**–(वि.) शांत पुरुष.
**समितं**–(क्रि. वि.) निरंतर, सदैव, सतत.
**समिति**–(स्त्री.) परिषद, मंडळ, समिती.
**समिद्ध**–(कृ.) समृद्ध, सफल.
**समिद्धि**–(स्त्री.) समृद्धी, सफलता.

**समिद्धि जातक**–तपस्वी सूर्योदयानंतर स्नान करून एका वस्त्रानिशी आपले शरीर कोवळ्या उन्हात सुकवीत असता एक अप्सरा त्यास काम प्रेरित करू लागल्याची कथा-(१६७).
**समीप**–(वि.) जवळ, निकट.
**समीपग**–(वि.) जवळ गेलेला.
**समीपचारी**–(वि.) जवळ राहणारा.
**समीपट्ठ**–(वि.) जवळ राहिलेला.
**समीपट्ठान**–(नपु.) जवळचे स्थान, जवळचे ठिकाण.
**समीर**–(पु.) सुगंधित वायु, शीतल वारा.
**समीरण**–(पु) हवा, वारा, वायु.
**समीरति**–(क्रि.) वारा वाहणे, वायु वाहणे.
**समीरेति**–(क्रि.) आवाज काढणे, बोलणे.
**समीरेसि**–(पू. क्रि.) आवाज काढला, बोलला.
**समीरित**–(कृ.) आवाज काढता, बोलता.
**समीरेत्त्वा**–(पू. क्रि.) आवाज काढून, बोलून.
**समुक्कन्सेति**–(क्रि.) बढाई करणे, बढाई सांगणे, बढाई मारणे.
**समुक्कन्सेसि**–(पू. क्रि.) बढाई केली, बढाई सांगितली, बढाई मारली.
**समुक्कन्सित**–(कृ.) बढाई करता, बढाई सांगता, बढाई मारता.
**समुक्कन्सेत्त्वा**–(पू. क्रि.) बढाई करून, बढाई सांगून, बढाई मारून.
**समुग्ग**–(पु.) टोपली, पाटी, बुट्टी.
**समुग्ग जातक**–एका दैत्याने आपल्या सुंदर पत्नीला सुरक्षित ठेवण्यासाठी डबीत घालून डबी बंद केली व ती बंद डबी गिळून टाकल्याची कथा-(४३६).
**समुग्गच्छति**–(क्रि.) वर येणे, प्रगती करणे.
**समुग्गच्छि**–(पू. क्रि.) वर आला, प्रगती केली.
**समुग्गत**–(कृ.) वर येता, प्रगती करता.
**समुग्गन्त्वा**–(पू. क्रि.) वर येऊन, प्रगती करून.
**समुग्गत**–(कृ.) सुशिक्षित, सुसंस्कृत, प्रगत.
**समुग्गण्हाति**–(क्रि.) धडा-पाठ चांगला शिकणे.
**समुग्गण्हि**–(पू. क्रि.) धडा चांगला शिकला.
**समुग्गहित, समुग्गहीत**–(कृ.) धडा चांगला शिकता.
**समुग्गहेत्त्वा**–(पू. क्रि.) धडा चांगला शिकून.
**समुग्गम**–(पु.) उत्पती, निर्माण, उगम, उद्‌गम.
**समुग्गिरति**–(क्रि.) बोलणे, शद्ब बाहेर काढणे.
**समुग्गिरण**–(नपु.) तोंडातून निघालेला शद्ब.
**समुग्घात**–(पु.) मार धक्का आघात.
**समुग्घातक**–(वि.) आघात करणारा, धक्का मारून बाहेर काढणारा, उकरून टाकणारा.
**समुग्घातेति**–(क्रि.) उकरून टाकणे, धक्का मारणे, दूर करणे.
**समुग्घातेसि**–(पू. क्रि.) उकरून टाकले, धक्का मारला, दूर केले.
**समुग्घातित**–(कृ.) उकरून टाकता, धक्का मारता, दूर करता.
**समुग्घातेत्त्वा**–(पू. क्रि.) उकरून टाकून, धक्का मारून, दूर सारून.
**समुचित**–(कृ.) संग्रहित, एकत्रित.
**समुच्चय**–(पु.) संग्रह, साठा, एकत्र.
**समुच्छिन्दति**–(क्रि.) उपटणे, नष्ट करणे.
**समुच्छिन्दि**–(पू. क्रि.) उपटले, नष्ट केले.
**समुच्छिन्दिय**–(कृ.) उपटणे योग्य, नष्ट करणे योग्य.
**समुच्छिन्दित्त्वा**–(पू. क्रि.) उपटून, नष्ट करून.
**समुच्छिन्न**–(कृ.) समूळ नष्ट केलेले.
**समुच्छिन्दन**–(नपु.) समूळ नाश, विनाश.
**समुज्जल**–(वि.) अत्यंत उज्वल.
**समुज्जित**–(वि.) फेकलेला, टाकलेला, परित्यक्त.
**समुट्ठहति–समुट्ठाति**–(क्रि.) वर चढणे, उन्नती होणे.
**समुट्ठहि**–(पू. क्रि.) वर चढला, उन्नत्ती केली.
**समुट्ठित**–(कृ.) वर चढता, उन्नती करता.
**समुट्ठित्वा**–(पू. क्रि.) वर चढून, उन्नती करून.
**समुट्ठान**–(नपु.) उत्पती, निर्माण, निपज.
**समुट्ठापक**–(वि.) उत्पन्न करणारा, निर्माण करणारा, उत्पादक, निर्माता.
**समुट्ठापेति**–(क्रि.) उन्नत करणे.
**समुट्ठापेसि**–(पू. क्रि.) उन्नत केले.
**समुट्ठापित**–(कृ.) उन्नत करता.
**समुट्ठापेत्वा**–(पू. क्रि.) उन्नत करून.
**समुत्तरति**–(क्रि.) वरून जाणे.
**समुत्तरि**–(पू. क्रि.) वरून गेला.
**समुत्तरण, समुत्तिण्ण**–(कृ.) वरून जाता.
**समुत्तरित्त्वा**–(पू. क्रि.) वरून जाऊन.
**समुत्तेजक**–(वि.) उत्तेजित करणारा, प्रेरित करणारा.
**समुत्तेजन**–(नपु.) उत्तेजना, प्रेरणा.
**समुत्तेजेता**–(क्रि.) प्रकाशित करणे, तेजस्वी करणे, उत्तेजित करणे.
**समुत्तेजेसि**–(पू. क्रि.) प्रकाशित केले, तेजस्वी केले, उत्तेजित केले.

**समुत्तेजित**–(कृ.) प्रकाशित करता, तेजस्वी करता, उत्तेजित करता.
**समुत्तेजेत्वा**–(पू. क्रि.) प्रकाशित करून, तेजस्वी करून, उत्तेजित करून.
**समुदय**–(पु.) निर्माण, उपज, उत्पत्ती,
**समुदय-सच्च**–(न.) निर्मितीविषयी सत्य, उत्पत्ती. विषयी सत्य.
**समुदागत**–(कृ.) उत्पन्न, उपज, निर्माण.
**समुदागम**–(पु.) उपज, निर्माण, उत्पत्ती.
**समुदाचरति**–(क्रि.) आचरणे, वर्तन करणे, वागणे.
**समुदाचरि**–(पू. क्रि.) आचरले, वर्तन केले, वागले.
**समुदाचरित**–(कृ.) आचरता, वर्तन करता, वागता.
**समुदाचरित्त्वा**–(पू. क्रि.) आचरून, वर्तन करून, वागून.
**समुदाचरण**–(नपु.) आचरण, वर्तन, अभ्यास, व्यवहार.
**समुदाचिण्ण**–(कृ.) आचरित, वर्तत, अभ्यस्त.
**समुदाय**–(पु.) समूह, समुदाय.
**समुदाहरति**–(क्रि.) शद्ब उच्चारणे, बोलणे.
**समुदाहरि**–(पू. क्रि) शद्ब उच्चारला, बोलला.
**समुदाहत**–(कृ.) शद्ब उच्चारता, बोलता.
**समुदाहरित्त्वा**–(पू. क्रि.) शद्ब उच्चारून, बोलून.
**समुदाहरण**–(नपु.) शद्बोच्चारण, बातचीत, चर्चा.
**समुदाहार**–(पु.) संवाद, चर्चा.
**समुदीरण**–(नपु.) शद्बोच्चारण.
**समुदीरेति**–(क्रि.) हालचाल करणे.
**समुदीरेसि**–(पू. क्रि) हालचाल केली.
**समुदीरित**–(कृ.) हालचाल [illegible]ता.
**समुदीरेत्त्वा**–(पू. क्रि.) हाल[illegible] करून.
**समुदेति**–(क्रि.) उन्नत होणे, वर चढणे, प्रगती करणे.
**समुद्द**–(पु.) समुद्र, सागर, जलधि, जलाशय.
**समुद्दट्ठक**–(वि.) समुद्रात राहिलेला, समुद्रस्थित.
**समुद्द जातक**–समुद्रातील देवाने अत्यंत लोभी असलेल्या कावळ्याला भीती दाखवून पिटाळल्याची कथा–(२९६).
**समुद्द वाणिज जातक**–कर्जदार झालेले व्यापारी देशांतर करून तेथे श्रीमंत-धनवान झाल्याची कथा–(४६६).
**समुद्धट**–(कृ.) उन्नत केलेला, उद्‌धृत.
**समुद्धरति**–(क्रि.) उद्धार करणे, बाहेर काढणे.
**समुद्धरि**–(पू. क्रि.) उद्धार केला, बाहेर काढले.
**समुद्धरित**–(कृ.) उद्धार करता, बाहेर काढता,
**समुद्धरित्त्वा**–(पू. क्रि.) उद्धार करून, बाहेर काढून.
**समुपगच्छति**–(क्रि.) जवळ जाणे.
**समुपगच्छि**–(पू. क्रि.) जवळ गेला.
**समुपगत**–(कृ.) जवळ जाता, जवळ गेलेला.
**समुपगन्त्वा**–(पू. क्रि.) जवळ जाऊन.
**समुपगमन**–(नपु.) जवळ जाणे.
**समुपगम्म**–(पू. क्रि.) जवळ जाऊन.
**समुपब्बूळ्ह**–(वि.) गर्दी, जमाव.
**समुपसोभित**–(वि.) सुशोभित, अलंकृत, नटलेला, सजलेला.
**समुपागत**–(वि.) जवळ गेलेला.
**समुपज्जति**–(क्रि.) उत्पन्न होणे, उपजणे.
**समुपज्जि**–(पू. क्रि.) उत्पन्न झाला, उपजला.
**समुपज्जित**–(कृ.) उत्पन्न होता, उपजता.
**समुपज्जित्त्वा**–(पू. क्रि.) उत्पन्न होऊन, उपजून.
**समुब्बहति**–(क्रि.) सहन करणे, सोसणे.
**समुब्बहि**–(पू. क्रि.) सहन केले, सोसले.
**समुब्बहन्त**–(कृ.) सहन करता, सोसता.
**समुब्बहित्त्वा**–(पू. क्रि.) सहन करून, सोसून.
**समुब्भवति**–(क्रि.) उत्पन्न होणे.
**समुब्भवि**–(पू. क्रि.) उत्पन्न झाला.
**समुब्भूत**–(कृ.) उत्पन्न होता.
**समुब्भवित्त्वा**–(पू. क्रि.) उत्पन्न होऊन.
**समुल्लपति**–(क्रि.) संभाषण करणे, वार्तालाप करणे.
**समुल्लपि**–(पू. क्रि.) संभाषण केले, वार्तालाप केला.
**समुल्लपित**–(कृ.) संभाषण करता, वार्तालाप करता.
**समुल्लपित्त्वा**–(पू. क्रि.) संभाषण करून, वार्तालाप करून.
**समुल्लपन**–(नपु.) संभाषण, वार्तालाप.
**समुल्लाप**–(पु.) चर्चा, संवाद.
**समुस्सय**–(पु.) जमाव, एकत्रित.
**समुस्सापेति**–(क्रि.) उद्धार करणे.
**समुस्सापेसि**–(पू. क्रि.) उद्धार केला.
**समुस्सापित**–(कृ.) उद्धार करता.
**समुस्सापेत्त्वा**–(पू. क्रि.) उद्धार करून,
**समुस्साहेति**–(क्रि.) उत्साहित करणे, उत्तेजित करणे.
**समुस्साहेसि**–(पू. क्रि.) उत्साहित केले, उत्तेजित केले.
**समुस्साहित**–(कृ.) उत्साहित करता, उत्तेजित करता.
**समुस्साहेत्त्वा**–(पू. क्रि.) उत्साहित करून, उत्तेजित करून.
**समुस्सित**–(कृ.) उद्धरलेले.
**समूलक**–(वि.) समूळ, मुळांसह.

**समूह**–(पु.) थवा, झुंड, समूह.
**समूहनति**–(क्रि.) मुळासह उपटणे, समूळ नष्ट करणे.
**समेक्खति**–(क्रि.) नीट पाहणे, परीक्षण करणे, तपासणे.
**समेक्खि**–(पू. क्रि.) परीक्षण केले, तपासले.
**समेक्खित**–(कृ.) परीक्षण करता, तपासता.
**समेक्खिय**–(कृ.) परीक्षण करणे योग्य, तपासणे योग्य.
**समेक्खित्त्वा**–(पू. क्रि.) परीक्षण करून, तपासून.
**समेक्खन**–(नपु.) पाहणे, बघणे.
**समेत**–(कृ.) संबंधित, जोडलेला.
**समेति**–(क्रि.) जवळ येणे, एकत्र येणे.
**समेसि**–(पू. क्रि.) जवळ आला, एकत्र आला.
**समेत्त्वा**–(पू. क्रि.) जवळ येऊन, एकत्र येऊन.
**समेरित**–(कृ.) चालू केला, सुरू केला.
**समोकिरति**–(क्रि.) शिंपणे.
**समोकिरी**–(पू. क्रि.) शिंपले.
**समोकिरित**–(कृ.) शिंपता.
**समोकिरित्त्वा**–(पू. क्रि.) शिंपून.
**समोकिरण**–(नपु.) शिंपणे, सिंचन करणे.
**समोतत**–(कृ.) सर्व पसरलेला.
**समोतरति**–(क्रि.) उतरणे, खाली येणे.
**समोतरि**–(पू. क्रि.) उतरला, खाली आला.
**समोतिण्ण**–(कृ.) उतरता, खाली येता.
**समोतरित्त्वा**–(पू. क्रि.) उतरून, खाली येऊन.
**समोदहति**–(क्रि.) एकत्र करणे, जमविणे.
**समोदहि**–(पू. क्रि.) एकत्र केले, जमविले.
**समोदहति**–(कृ.) एकत्र करता, जमविता.
**समोदहित्त्वा**–(पू. क्रि.) एकत्र करून, जमवून.
**समोदहन**–(नपु.) एकत्र करणे, जमविणे, एकाजागी ठेवणे.
**समोधान**–(नपु.) जमाव, एकत्र, मेळ.
**समोधानेति**–(क्रि.) जमविणे, जुळविणे.
**समोधानेसि**–(पू. क्रि.) जमविले, जुळविले.
**समोधानित**–(कृ.) जमविता, जुळविता.
**समोधानेत्त्वा**–(पू. क्रि.) जमवून, जुळवून.
**समोसरण**–(नपु.) ऐक्य, मिलाफ, मैत्री.
**समोसरति**–(क्रि.) ऐक्य होणे, एकाजागी येणे.
**समोसरि**–(पू. क्रि.) ऐक्य झाले, एकाजागी आले.
**समोसट**–(कृ.) ऐक्य होता, एकाजागी येता.
**समोसरित्त्वा**–(पू. क्रि.) ऐक्य होऊन, एकाजागी येऊन.
**समोह**–(वि.) मोहासह, मोहयुक्त, आसक्त.
**समोहित**–(कृ.) आंतर्गत, झाकलेला, एकत्रित.
**समोदहति**–(क्रि.) अंतर्गत असणे, झांकणे, एकत्र करणे.
**सम्पकम्पति**–(क्रि.) थरारणे, थरकाप होणे.
**सम्पकम्पि**–(पू. क्रि.) थरारला, थरकाप झाला.
**सम्पकम्पित**–(कृ.) थरारता, थरकाप होता.
**सम्पकम्पित्त्वा**–(पू. क्रि.) थरारून, थरकाप होऊन.
**सम्पजञ्ञ**–(नपु.) विवेक, विचार.
**सम्पजान**–(वि.) जाणून-बूजून, मुद्दाम.
**सम्पज्जति**–(क्रि.) सफल होणे, यश मिळविणे.
**सम्पज्जि**–(पू. क्रि.) सफल झाला, यश मिळविले.
**सम्पन्न**–(कृ.) सफल होता, यश मिळविता.
**सम्पज्जमान**–(कृ.) सफल होणे योग्य, यश मिळविणे योग्य.
**सम्पज्जित्त्वा**–(पू. क्रि.) सफल होऊन, यश मिळवून.
**सम्पज्जन**–(नपु.) यश, सफलता.
**सम्पज्जलित**–(कृ.) प्रज्वलित, पेटता, जळणारा.
**सम्पटिच्छति**–(क्रि.) मिळविणे, प्राप्त करणे.
**सम्पटिच्छि**–(पू. क्रि.) मिळविले, प्राप्त केले.
**सम्पटिच्छित**–(कृ.) मिळविता, प्राप्त करता.
**सम्पटिच्छित्त्वा**–(पू. क्रि.) मिळवून, प्राप्त करून.
**सम्पटिच्छन**–(नपु.) स्वीकृत, संमत्ती.
**सम्पति**–(अ.) साम्प्रति, सध्या, आता.
**सम्पतित**–(कृ.) पतित, पडलेला, अधोगति झालेला.
**सम्पत्त**–(कृ.) पोहोचलेला.
**सम्पत्ति**–(स्त्री.) धन, संपत्ती, श्रीमंती.
**सम्पदा**–(स्त्री.) धन, पैसा.
**सम्पदान**–(नपु.) देणे. चतुर्थी विभक्ती.
**सम्पदालन**–(नपु.) चिरणे, फाडणे.
**सम्पदालेति, सम्पदाळेति**–(क्रि.) चिरणे, फाडणे.
**सम्पदालेसि**–(पू. क्रि.) चिरले, फाडले.
**सम्पदालित**–(कृ.) चिरता, फाडता.
**सम्पदालेत्त्वा**–(पू. क्रि.) चिरून, फाडून.
**सम्पदुस्सति**–(क्रि.) दूषित होणे.
**सम्पदुस्सि**–(पू. क्रि.) दूषित झाले.
**सम्पदुट्ठ**–(कृ.) दूषित होता.
**सम्पदुस्सित्त्वा**–(पू. क्रि.) दूषित होऊन.
**सम्पदुस्सन**–(नपु.) दूषण, दोष, घाण.
**सम्पदोस**–(पु.) तक्रार, दंगा.
**सम्पन्न**–(कृ.) सफल, यशस्वी, पार.
**सम्पयात**–(कृ.) गेला, निघून गेला, लोटला.
**सम्पयुत्त**–(वि.) संबंधित, समन्वित.

**सम्पयोग**–(पु.) मेळ, ऐक्य, बेरीज.
**सम्पयोजेति**–(क्रि.) मिळविणे, एकत्र करणे.
**सम्पयोजेसि**–(पू. क्रि.) मिळविले, एकत्र केले.
**सम्पयोजित**–(कृ.) मिळविता, एकत्र करता.
**सम्पयोजेत्वा**–(पू. क्रि.) मिळवून, एकत्र करून.
**सम्पराय**–(पु.) भविष्यकाळ, पुढील अवस्था.
**सम्परायिक**–(वि.) परलोकासंबंधी.
**सम्परिकड्ढति**–(क्रि.) ओढणे, फरफटत नेणे, घासणे.
**सम्परिवज्जेति**–(क्रि.) दूर ठेवणे, टाळणे.
**सम्परिवज्जेसि**–(पू. क्रि.) दूर ठेवले, टाळले.
**सम्परिवज्जित**–(कृ.) दूर ठेवता, टाळता.
**सम्परिवज्जेत्वा**–(पू. क्रि.) दूर ठेवून, टाळून.
**सम्परिवत्तति**–(क्रि.) उलटणे, लोळणे, मुरकंडी वळणे.
**सम्परिवत्ति**–(पू. क्रि.) उलटले, लोळले, मुरकंडी वळली.
**सम्परिवत्तेति**–(कृ.) उलटता, लोळता, मुरकंडी वळता.
**सम्परिवत्तित्वा**–(पू. क्रि.) उलटून, लोळून, मुरकंडी वळून.
**सम्परिवारेति**–(क्रि.) घेरा टाकणे, सेवेस हजर असणे.
**सम्परिवारेसि**–(पू. क्रि.) सेवेस हजर राहिला, घेरा टाकला.
**सम्परिवारित**–(कृ.) घेरा टाकता, सेवेस हजर राहता.
**सम्परिवारेत्वा**–(पू. क्रि.) घेरा टाकून, सेवेस हजर राहून.
**सम्पवत्तेति**–(क्रि.) परिवर्तन करणे, बदलणे.
**सम्पवत्तेसि**–(पू. क्रि.) परिवर्तन केले, बदलले.
**सम्पवत्तित**–(कृ.) परिवर्तन करता, बदलता.
**सम्पवत्तेत्वा**–(पू. क्रि.) परिवर्तन करून, बदलून.
**सम्पवायति**–(क्रि.) वाहणे, चालणे, बाहेर येणे.
**सम्पवेधति**–(क्रि.) हिसका देणे, हिसका मारणे.
**सम्पवेधि**–(पू. क्रि.) हिसका दिला, हिसका मारला.
**सम्पवेधित**–(कृ.) हिसका देता, हिसका मारता.
**सम्पवेधेति**–(कृ.) हिसका देता, हिसका मारता.
**सम्पवेधित्वा**–(पू. क्रि.) हिसका देऊन, हिसका मारून.
**सम्पसाद**–(पु.) प्रसाद, आनंद, प्रसन्नता.
**सम्पसादनिय**–(वि.) शांतिप्रद, आनंदप्रद, सुखद.
**सम्पसादेति**–(क्रि.) प्रसन्न करणे.
**सम्पसादेसि**–(पू. क्रि.) प्रसन्न केले.
**सम्पसादित**–(कृ.) प्रसन्न करता.
**सम्पसादेत्वा**–(पू. क्रि.) प्रसन्न करून.
**सम्पसारेति**–(क्रि.) पसरणे, प्रसार करणे.
**सम्पसारेसि**–(पू. क्रि.) पसरले, प्रसार केला.
**सम्पसारित**–(कृ.) पसरता, प्रसार करता.
**सम्पसारेत्वा**–(पू. क्रि.) पसरून, प्रसार करून.
**सम्पसीदति**–(क्रि.) प्रसन्न होणे, आनंदणे.
**सम्पसीदि**–(पू. क्रि.) प्रसन्न झाला, आनंदला.
**सम्पसीदित**–(कृ.) प्रसन्न होता, आनंदता.
**सम्पसीदित्वा**–(पू. क्रि.) प्रसन्न होऊन, आनंदून.
**सम्पसीदन**–(नपु.) आनंद, प्रेम, प्रीती, प्रसन्नता.
**सम्पस्सति**–(क्रि.) देखरेख करणे,
**सम्पस्सि**–(पू. क्रि.) देखरेख केली.
**सम्पस्सन्त**–(कृ.) देखरेख करता.
**सम्पस्समान**–(कृ.) देखरेख करण्या योग्य.
**सम्पस्सित्वा**–(पू. क्रि.) देखरेख करून.
**सम्पहट्ठ**–(कृ.) आनंदित, प्रसन्न.
**सम्पहंसक**–(वि.) आनंददायक.
**सम्पहंसति**–(क्रि.) आनंदणे.
**सम्पहंसि**–(पू. क्रि.) आनंदला.
**सम्पहंसित**–(कृ.) आनंदता.
**सम्पहंसेसि**–(पू. क्रि.) आनंदला.
**सम्पहंसित्वा**–(पू. क्रि.) आनंदून.
**सम्पहार**–(पु.) प्रहार, भांडण, झगडा, युद्ध.
**सम्पात**–(पु.) बरोबर पडणे, बरोबर येणे.
**सम्पादक**–(पु., वि.) मिळविणारा, तयार करणारा.
**सम्पादन**–(नपु.) मिळकत, प्राप्ती.
**सम्पादियति**–(क्रि.) मिळविणे, पोहोंचविणे.
**सम्पादेति**–(क्रि.) मिळविणे, प्रयत्न करणे.
**सम्पादेसि**–(पू. क्रि.) मिळविले, प्रयत्न केला.
**सम्पादित**–(कृ.) मिळविता, प्रयत्न करता.
**सम्पादेत्वा**–(पू. क्रि.) मिळवून, प्रयत्न करून.
**सम्पापक**–(वि.) आणणारा. घेऊन येणारा.
**सम्पापन**–(नपु.) पोहोचविणे.
**सम्पापुणाति**–(क्रि.) पोहोचणे.
**सम्पापुणि**–(पू. क्रि.) पोहोचला.
**सम्पापत्त, सम्पापुणन्त**–(कृ.) पोहोचता.
**सम्पापुणित्वा**–(पू. क्रि.) पोहोचून.
**सम्पिण्डन**–(नपु.) गोळा करणे, पिंड बनविणे, लाडू करणे..
**सम्पिण्डेति**–(क्रि.) लाडू करणे, पिंड बनविणे.
**सम्पिण्डेसि**–(पू. क्रि.) लाडू केले, पिंड बनविले.

**सम्पिण्डित**–(कृ.) लाडू करता, पिंड बनविता.
**सम्पिण्डेत्वा**–(पू. क्रि.) लाडू करून, पिंड बनवून.
**सम्पियायति**–(क्रि.) प्रेम करणे, स्वागत करणे.
**सम्पियायि**–(पू. क्रि.) प्रेम केले, प्रेमाने स्वागत केले.
**सम्पियायित, सम्पियायन्त**–(कृ.) प्रेम करता, प्रेमाणे स्वागत करता.
**सम्पियायमान**–(कृ.) प्रेम करण्यायोग्य, प्रेमाने स्वागत करण्यायोग्य.
**सम्पियायित्वा**–(पू. क्रि.) प्रेम करून, प्रेमाने स्वागत करून.
**सम्पियायना**–(स्त्री.) प्रेम, माया, निकट संबंध.
**सम्पीणेति**–(क्रि.) संतुष्ट करणे, खुश करणे.
**सम्पीणेसि**–(पू. क्रि.) संतुष्ट केले, खुश केले.
**सम्पीणित**–(कृ.) संतुष्ट करता, खुश करता.
**सम्पीणेत्वा**–(पू. क्रि.) संतुष्ट करून, खुश करून.
**सम्पीळेति**–(क्रि.) पीडा करणे, त्रास देणे.
**सम्पीळेसि**–(पू. क्रि.) पीडा केली, त्रास दिला.
**सम्पीळित**–(कृ.) पीडा करता, त्रास देता.
**सम्पीळेत्वा**–(पू. क्रि.) पीडा करून, त्रास देऊन.
**सम्पुच्छति**–(क्रि.) विचारणे.
**सम्पुच्छि**–(पू. क्रि.) विचारले.
**सम्पुट्ठ**–(कृ.) विचारता.
**सम्पुच्छित्वा**–(पू. क्रि.) विचारून.
**सम्पुट**–(पु.) द्रोण, वाडगा, ओंजळ.
**सम्पुण्ण**–(कृ.) संपुर्ण.
**सम्पुप्फित**–(कृ.) फुललेला, पुष्पित.
**सम्पूजेति**–(क्रि.) सन्मान करणे, आदर करणे, पूजा करणे.
**सम्पूजेसि**–(पू. क्रि.) सन्मान केला, आदर केला. पूजा केली.
**सम्पुजित, सम्पूजेन्त**–(कृ.) सन्मान करता, आदर करता, पूजा करता.
**सम्पूजेत्वा**–(पू. क्रि.) सन्मान करून, आदर करून, पूजा करून.
**सम्पूरेति**–(क्रि.) पूर्ण करणे, संपविणे.
**सम्पूरेसि**–(पू. क्रि.) पूर्ण केले, संपविले.
**सम्पूरित**–(कृ.) पूर्ण करता, संपविता.
**सम्पूरेत्वा**–(पू. क्रि.) पूर्ण करून, संपवून.
**सम्फ**–(नपु.) व्यर्थ, फुकट, निष्कारण.
**सम्फप्पलाप**–(पु.) व्यर्थ बडबड, निरर्थक बोलणे.
**सम्फस्स**–(पु.) स्पर्श, शिवणे, हात लावणे.
**सम्फुल्ल**–(वि.) पूर्ण उमललेले फूल, पूर्ण विकसित.
**सम्फुसति**–(क्रि.) स्पर्श करणे, शिवणे, हात लावणे.
**सम्फुसि**–(पू. क्रि.) स्पर्श केला, शिवले.
**सम्फुसन्त**–(कृ.) स्पर्श करता, शिवता.
**सम्फुसित्वा**–(पू. क्रि.) स्पर्श करून, शिवून, हात लावून.
**सम्फुसना**–(स्त्री.) स्पर्श.
**सम्फुसित**–(कृ.) स्पर्श केलेला, हात लावलेला.
**सम्बन्ध**–(पु.) परस्परांचा संबंध.
**सम्बन्धित**–(क्रि.) संबंध जोडणे.
**सम्बन्धि**–(पू. क्रि.) संबंध जोडला.
**सम्बन्धित**–(कृ.) संबंध जोडता.
**सम्बन्धित्वा**–(पू. क्रि.) संबंध जोडून.
**सम्बन्धन**–(नपु.) संबंध जोडणे, संबंध ठेवणे.
**सम्बर**–(पु.) असुरांचा दैत्यांचा एक राजा, त्याचे नाव संबर होते.
**सम्बरी**–(स्त्री.) माया जाळ, भुताटकी, फसवेगिरी.
**सम्बल**–(नपु.) खाद्य सामुग्री, शिदोरी, प्रवासातील तरतूद.
**सम्बहुल**–(वि.) अनेक, पुष्कळ, बहुत.
**सम्बाध**–(पु.) बाधा, अडथळा, गर्दी.
**सम्बाधेति**–(क्रि.) अडथळा येणे, गर्दीत सापडणे.
**सम्बाहति**–(क्रि.) चोळणे, मालिश करणे, दाबणे.
**सम्बाहन**–(नपु.) मालिश, दाब, चोळणे.
**सम्बुक**–(पु.) शिंपला.
**सम्बुज्झति**–(क्रि.) समजणे, कळणे, जाणणे.
**सम्बुज्झि**–(पू. क्रि.) समजणे, कळले, जाणले.
**सम्बुद्ध**–(कृ.) समजता, कळता, जाणता.
**सम्बुज्झित्वा**–(पू. क्रि.) समजून, कळून, जाणून.
**सम्बुद्ध**–(पु.) सम्यक संबुद्ध, संपूर्ण ज्ञानी.
**सम्बुल जातक**–संबुला नांवाच्या पतिव्रता स्त्रीने कुष्ठरोगी पतीबरोबर जंगलात राहून पतीची सेवा केल्याची कथा–(५१९).
**सम्बोज्झङ्ग**–(पु.) संबोधि प्राप्तीसाठी सहाय्यक गुण.
**सम्बोधन**–(नपु.) प्रबोध, हाक मारणे, सम्बोधन विभक्ती.
**सम्बोधि**–(स्त्री.) पूर्णज्ञान.
**सम्बोधेति**–(क्रि.) ज्ञान देणे, शिकविणे, अध्यापन करणे.
**सम्भग्ग**–(कृ.) तुटका, फुटका, भग्न.
**सम्भज्जति**–(क्रि.) तोडणे, फोडणे.
**सम्भज्जि**–(पू. क्रि.) तोडले, फोडले.
**सम्भज्जन्त**–(कृ.) तोडता, फोडता.

**सम्भज्जित्वा**–(पू. क्रि.) तोडून, फोडून, भग्न करून.
**सम्भत**–(कृ.) आणलेला.
**सम्भत्त**–(पू.) मित्र, दोस्त, साथी.
**सम्भम**–(पू.) प्रोत्साहन, उत्तेजन, संभ्रम.
**सम्भमति**–(क्रि.) गुरफटणे, संभ्रम उत्पन्न होणे.
**सम्भमि**–(पू. क्रि.) गुरफटला.
**सम्भमित**–(कृ.) गुरफटता.
**सम्भमित्वा**–(पू. क्रि.) गुरफटून.
**सम्भव**–(पु.) उपज, निर्माण, उत्पत्ती, जन्म, संभव, निर्मिती.
**सम्भवति**–(क्रि.) उत्पत्ती होणे जन्मणे.
**सम्भवि**–(पू. क्रि.) उत्पत्ती झाली, जन्मला.
**सम्भूत**–(कृ.) उत्पत्ती होता, जन्मता.
**सम्भवित्वा**–(पू. क्रि.) उत्पत्ती होऊन, जन्मून.
**सम्भवन**–(नपु.) जन्म, उत्पत्ती, निर्माण, निपज.
**सम्भवेसी**–(पु.) जन्मेच्छुक.
**सम्भार**–(पु.) सामुग्री, सामान, साहित्य.
**सम्भावना**–(स्त्री.) सत्कार, सन्मान, अतिथ्य.
**सम्भावनीय**–(वि.) आदरणीय.
**सम्भावेति**–(क्रि.) सत्कार करणे.
**सम्भावेसि**–(पू. क्रि.) सत्कार केला.
**सम्भावित**–(कृ.)सत्कार करता.
**सम्भावेत्वा**–(पू. क्रि.) सत्कार करून.
**सम्भिन्दति**–(क्रि.) तोडणे.
**सम्भिन्न**–(कृ.) तोडलेला, तुटलेला.
**सम्भीत**–(कृ.) भयभीत, भ्यालेला.
**सम्भुञ्जति**–(क्रि.) मिळून खाणे, एकत्र जेवणे.
**सम्भूञ्जि**–(पू. क्रि.) मिळून खाल्ले, एकत्र जेवले.
**सम्भुञ्जित**–(कृ.) मिळून खाता, एकत्र जेवता.
**सम्भुजित्वा**–(पू. क्रि.) मिळून खाऊन, एकत्र जेवून.
**सम्भूत**–(कृ.) उत्पन्न झालेला, जन्मलेला.
**सम्भेद**–(पु.) मिसळ.
**सम्भोग**–(पु.) बरोबर जेवणे, खाणे, प्रेम, मिलाफ.
**सम्म**–(अ.) नात्याच्या प्रेमातील व्यक्तीस हाक मारण्याचे संबोधन.
**सम्म**–(न.पु) टाळ, चिपळ्या.
**सम्मक्खन**–(नपु.) माखणे, चोपडणे, लावणे.
**सम्मक्खेति**–(क्रि.) माखणे, चोपडणे.
**सम्मक्खेसि**–(पू. क्रि.) माखले, चोपडले.
**सम्मक्खित**–(कृ.) माखता, चोपडता.
**सम्मक्खेत्वा**–(पू. क्रि.) माखून, चोपडून.
**सम्मग्गत**–(वि.) सम्यक मार्गी, सम्यक मार्गाने चालणारा.
**सम्मज्जति**–(क्रि.) झाडणे, लोटणे, स्वच्छ करणे, झाड लोट करणे.
**सम्मज्जि**–(पू. क्रि.) झाडले, लोटले, स्वच्छ केले, झाड लोट केली.
**सम्मज्जित, सम्मट्ठ, सम्मज्जन्त**–(कृदन्त) झाडता, लोटता, स्वच्छ करता.
**सम्मज्जितब्ब**–(कृ.) झाडण्यायोग्य, लोटण्यायोग्य, स्वच्छ करण्यायोग्य.
**सम्मज्जित्वा**–(पू. क्रि.) झाडून, लोटून, स्वच्छ करून
**सम्मज्जनी**–(स्त्री.) झाडू, झाडणी, केरसुणी.
**सम्मत**–(कृ.) सहमत, एकाच विचाराचा.
**सम्मताल**–(पु.) टाळ, चिपळ्या.
**सम्मति**–(क्रि.) शांत होणे, मान्यता देणे.
**सम्मत्त**–(कृ.) नशेत गुंग, नशेने धुंद.
**सम्मद**–(पु) तन्द्री, गुंगी.
**सम्मदक्खात**–(वि.) सम्यक प्रकारे शिकविलेला.
**सम्मदञ्ञा, सम्मदञ्ञाय**–(पू. क्रि.) चांगल्या प्रकारे जाणून. समजाऊन घेऊन.
**सम्मदेव**–(अ.) योग्य तऱ्हेने योग्य, उचित.
**सम्मद्द**–(पु.) गर्दी, दाटी, जमाव.
**सम्मद्दति**–(क्रि.) तुडविणे, मर्दन करणे, चोळणे.
**सम्मद्दि**–(पू. क्रि.) तुडविले, मर्दन केले, चोळले.
**सम्मद्दित**–(कृ.) तुडविता, मर्दन करता, चोळता.
**सम्मद्दित्वा**–(पू. क्रि.) तुडवून.
**सम्मद्दन**–(नपु.) तुडविणे, मर्दन.
**सम्मद्दस**–(वि.) सम्यकदृष्टी असलेला, समदृष्टी.
**सम्मन्तेति**–(क्रि.) परामर्श घेणे, मंत्रणा करणे, चर्चा करणे.
**सम्मन्तेसि**–(पू. क्रि.) परामर्श घेतला, मंत्रणा केली, चर्चा केली.
**सम्मन्तित**–(कृ.) परामर्श घेता, मंत्रणा करता, चर्चा करता.
**सम्मन्तेत्वा, सम्मन्तित्वा**–(पू. क्रि.) परामर्श घेऊन. मंत्रणा करून, चर्चा करून.
**सम्मप्पञ्ञा**–(स्त्री.) सम्यक प्रज्ञा, सम्यकज्ञान.
**सम्मप्पधान**–(नपु.) सम्यक् प्रयत्न.
**सम्मसति**–(क्रि.) घेणे, स्पर्श करणे.
**सम्मसि**–(पू. क्रि.) घेतले, स्पर्श केला.
**सम्मसित**–(कृ.) घेता, स्पर्श करता.

**सम्मसित्वा**–(पू. क्रि.) घेऊन, स्पर्श करून.
**सम्मा**–(अ.) सम्यक रूपाने, सम्यक दृष्टीने, योग्य.
**सम्मा-आजीव**–(पु.) सम्यक् चरितार्थ, सम्यक उपजीविका, योग्य उदरनिर्वाह.
**सम्मा-कम्मन्त**–(पु.) सम्यक आचरण, सम्यक् वर्तन, योग्य कर्म.
**सम्मा-दिट्ठिक**–(वि.) सम्यक् दृष्टी असणारा, योग्य दृष्टी असलेला.
**सम्मा-पटिपत्ति**–(स्त्री.) सम्यक आचरण, योग्य आचरण.
**सम्मा-पटिपन्न**–(नपु.) सम्यक प्रवृत्ती, योग्य प्रवृत्ती.
**सम्मा-पास**–(पु.) यज्ञ.
**सम्मा-वत्तना**–(स्त्री.) सम्यक् व्यवहार, योग्य वर्तन.
**सम्मा-वाचा**–(स्त्री.) सम्यक् वाणी, योग्य वाणी.
**सम्मा-वायामो**–(पु.) सम्यक प्रयत्न, सम्यक् व्यायाम, योग्य प्रयत्न.
**सम्मा-विमुत्ति**–(स्त्री.) सम्यक् विमुक्ती, योग्य विमुक्ती.
**सम्मा-संकप्प**–(पु.) सम्यक् संकल्प, योग्य निश्चय.
**सम्मा-सति**–(स्त्री.) सम्यक् स्मृति-आठवण-जाण. जागरूकता, योग्य स्मरण.
**सम्मा-समाधि**–(पु.) सम्यक् समाधी, एकाग्रता, योग्य एकाग्रता.
**सम्मा-सम्बुद्ध**–(पु.) संपूर्ण ज्ञानी, सम्यक् सम्बुद्ध.
**सम्मा-सम्बोधि**–(स्त्री.) सम्यक् ज्ञान, योग्य ज्ञान
**सम्मान**–(पु.) सत्कार, गौरव, सन्मान.
**सम्मानना**–(स्त्री.) आदर, सन्मान.
**सम्मिञ्जति**–(क्रि.) मागे झुकणे, मागे वाकणे.
**सम्मिञ्जि**–(पू. क्रि.) मागे झुकला, मागे वाकला.
**सम्मिञ्जित, सम्मिञ्जन्त**–(कृ.) मागे झुकता, मागे वाकता.
**सम्मिञ्जित्वा**–(पू. क्रि.) मागे झुकून, मागे वाकून.
**सम्मिस्स**–(वि.) संमिश्र, मिसळलेला, मिश्रित.
**सम्मिस्सता**–(स्त्री.) संमिश्रता, संमिश्र भाव.
**सम्मुख**–(वि.) समोरा समोर.
**सम्मुखा**–(अ.) समोर.
**सम्मुच्छति**–(क्रि.) मुर्छित होणे, बेशुद्ध होणे.
**सम्मुच्छि**–(पू. क्रि.) मूर्छित झाला, बेशुद्ध झाला.
**सम्मुच्छित**–(कृ.) मूर्छित होता, बेशुद्ध होता.
**सम्मुच्छित्वा**–(पू. क्रि.) मूर्छित होऊन, बेशुद्ध होऊन.
**सम्मुज्जनी**–(स्त्री.) झाडणी, केरसुणी, झाडू, खराटा
**सम्मुति**–(स्त्री.) सम्मत्ति, सामान्यमत, कबूली, मान्यता.

**सम्मुदित**–(वि.) प्रसन्न, आनंदित.
**सम्मुय्हति**–(क्रि.) विसरणे, विस्मरण होणे.
**सम्मुय्हि**–(पू. क्रि.) विसरले, विस्मरण झाले.
**सम्मूळ्ह, सम्मूय्ह**–(कृ.) विसरता, विस्मरण होता.
**सम्मूहित्वा**–(पू. क्रि.) विसरून, विस्मरण होऊन.
**सम्मुय्हन**–(नपु.) विसर, विस्मरण.
**सम्मुस्सति**–(क्रि.) विसरणे.
**सम्मुस्सि**–(पू. क्रि.) विसरले.
**सम्मुट्ठ**–(कृ.) विसरता.
**सम्मुस्सित्वा**–(पू. क्रि.) विसरून.
**सम्मोदक**–(वि.) प्रसन्नतेने बोलणारा, नम्र स्वभावाचा.
**सम्मोदति**–(क्रि.) आनंदणे, आनंदित होणे, प्रसन्न होणे.
**सम्मोदना**–(स्त्री.) आनंदीवृत्ती, प्रसन्नवृत्ति.
**सम्मोदनीय**–(वि.) प्रसन्न होणे योग्य, आनंदी होणे उचित.
**सम्मोदमान जातक**–होला पक्षी फासे पारध्याचे जाळे घेऊन उडून गेल्याची कथा–(३३).
**सम्मोस**–(पु.) मुर्खपणा, घबराट, भीती, आश्चर्य.
**सम्मोह**–(पु.) घबराट मोह.
**सय**–(वि.) आपला, स्वकीय, नातलग.
**सयति**–(क्रि.) झोपणे.
**सयि**–(पू. क्रि.) झोपला.
**सयन्त**–(कृ.) झोपता.
**सयमान**–(कृ.) झोपणे योग्य, झोपणारा.
**सयित्वा**–(पू. क्रि.) झोपून.
**सयथु**–(पु.) खरूज, त्वचारोग.
**सयन**–(नपु.) शयन, झोपणे, झोप.
**सयन-घर**–(नपु.) शयनगृह, झोपण्याची खोली.
**सयम्भू**–(पु.) स्वयंभू, आपोआप, स्वतः.
**सयं**–(अ.) स्वतः, आपण.
**सयंकत**–(वि.) स्वतः केलेले.
**सयंवर**–(पु.) स्वयंवर, आपला पती आपण निवडणे.
**सयान**–(वि.) झोपलेला.
**सयापित**–(कृ.) झोपविले.
**सयापेति**–(क्रि.) झोपविणे.
**सय्ह**–(वि.) सहन करण्यासारखे, सोसण्यासारखे.
**सय्ह जातक**–राजाने सहपाठी मित्राला आपला राजपुरोहित बनविण्याची इच्छा केल्याची कथा–(३१०).
**सर**–(पु., नपु.) शर, तीर (बाण), स्वर (आवाज), स्वर (अ-व्यंजन अक्षर), तलाव, कळकाची नळी.
**सरतुण्ड**–(नपु.) बाणाचे टोक.

**सरतीर**–(नपु.) सरोवराचा किनारा-काठ.
**सरभण्ड**–(पु.) बाण मोडणे, तोडणे.
**सर-भञ्ज**–(नपु.) गाणे.
**सर-भाणक**–(पु.) सुस्वरात धर्म ग्रंथ वाचणारा, पठण करणारा.
**सर-मण्डल**–(नपु.) स्वर मंडळ.
**सरक**–(पु.) सराव, सवय, अभ्यास, मातीचा परळ.
**सरज**–(वि.) धुळीसह.
**सरट**–(पु.) सरडा.
**सरण**–(नपु.) संरक्षण, आठवण, स्मरण, शरण, अनुसरण.
**सरणागमन**–(नपु.) शरण ग्रहण, शरण जाणे, अनुसरणे.
**सरणीय**–(वि.) स्मरणीय, शरण जाण्यायोग्य.
**सरति** (क्रि.) आठवण ठेवणे, स्मरण करणे.
**सरद**–(पु.) शरद् ऋतु, शरद काळ.
**सरभ**–(पु.) हरिणाची एक जात.
**सरभ जातक**–[पहा-सरभ मिग जातक.]
**सरग मिग जातक**–सरभ मृगाने राजाला धर्मोपदेश केल्याची कथा–(४८३).
**सरभू**–(पु.) पाल.
**सरभू, सरयू**–(स्त्री.) पाच प्रमुख नद्यांपैकी एक.
**सरभङ्ग जातक**–राजाने ज्योतिपालास आपली धनुर्विद्या दाखविण्यास सांगितल्याची कथा–(५२२).
**सरल**–(पु.) सुरू वृक्ष.
**सरलद्दव**–(पु.) सरल वृक्षाचा द्रव, टरपेंटाईन तेल.
**सरव्य**–(नपु.) लक्ष्य, निशाना.
**सरस**–(वि.) स्वादिष्ट, रूचकर, गोड.
**सरसी**–(स्त्री.) सरोवर, तलाव.
**सरसीरूह**–(नपु.) कमळ.
**सरस्सति**–(स्त्री.) सरस्वती नदी.
**सराग**–(वि.) रागीट, रागावलेला, क्रुद्ध.
**सराजक**–(वि.) राजाबरोबर.
**सराव**–(पु.) मातीचा परळ, सराव.
**सरासन**–(नपु.) धनुष्य, (शराचे बाणाचे आसन)
**सरिक्खक**–(वि.) एकसारखा, समान, बरोबर, सारखा.
**सरितब्ब**–(कृ.) स्मरण करण्या योग्य, आठवण करण्या योग्य.
**सरिता**–(स्त्री.) नदी.
**सरितु**–(पु.) आठवण ठेवणारा, स्मरण ठेवणारा.
**सरीर**–(नपु.) शरीर, देह.

**सरीर-किच्च**–(नपु) शौचकर्म, देहधर्म.
**सरीरट्ठ**–(वि.) शरीरात असलेले.
**सरीर-धातु**–(पु.) बुद्धाच्या शरीराचे पवित्र अवशेष.
**सरीर-निस्सन्द**–(पु.) शरीरावरील मळ-घाण.
**सरीरप्पभा**–(स्त्री.) शारिरीक तेज, शरीर प्रभा.
**सरीर-मंस**–(नपु.) शरीराचे मांस.
**सरीर-वण्ण**–(पु.) शरीराचा वर्ण-रंग.
**सरीर-वलञ्ज**–(पु.) शरीरातील मल.
**सरीर-वलञ्जट्ठान**–(नपु.) गुदद्वार, शौचस्थान.
**सरीर-सण्ठाण, सरीर-सण्ठान**–(नपु.) शरीर संस्थान, शारीरिक आकार.
**सरीरी**–(पु.) प्राणी, शरीर असलेला.
**सरूप**–(वि.) स्वरूप, त्याच रूपाचा.
**सरूपता**–(स्त्री.) समानता, सारखेपणा, स्वरूपता.
**सरोज**–(नपु.) कमळ.
**सरोरुह**–(नपु.) कमळ.
**सलक्खण**–(वि.) लक्षण युक्त, लक्षणांसह, चिन्हांकित.
**सलभ**–(पु.) पतंग, दिव्यावर झडप घालणारा.
**सलळवती सलीलवती**–(स्त्री.) मध्य भारताची दक्षिण सीमा.
**सलळागार**–(पु. विशे. ना.) जेतवनातील एक भवन.
**सलाका**–(स्त्री.) शलाका, सळी, तीर, बाण, लहान छडी, गवताचे पान, चिर फाडीचे हत्यार, सुरी.
**सलाका-वुत्त**–(वि.) शलाका भोजन खाऊन राहणारा.
**सलाकग्ग**–(नपु.) शलाका भोजनाचे छत्र.
**सलाकागाह**–(पु.) शलाका भोजन घेणारा.
**सलाका-गाहपक**–(पु.) शलाका वाटणारा.
**सलाका-भत्त**–(नपु.) शलाकानुसार दिले जाणारे भोजन.
**सलाटुक**–(वि.) कच्चा, ताजा.
**सलाभ**–(पु.) स्वतःचा फायदा, स्वलाभ.
**सलिल**–(नपु.) पाणी, जल.
**सलिल-धारा**–(स्त्री.) जलधारा, पाण्याच्या धारा, पाऊस.
**सल्ल**–(पु.) तीर, बाण.
**सल्लक**–(पु.) साळींदराच्या पंखावरील कांटा.
**सल्लकत्त**–(पु.) शल्यकर्ता, लोहार, शरकार, बाण बनविणारा.
**सल्लकत्तिय**–(नपु.) कापणारा, शल्यकर्म, कापणे, चिरणे.
**सल्लक्खन**–(नपु.) विवेक, विचार, मनन, चिंतन.
**सल्लक्खना**–(स्त्री.) विचार, मनन, चिंतन.
**सल्लक्खेति**–(क्रि.) लक्ष देणे, मनन करणे, चिंतन करणे

**सल्लक्खेसि**–(पू. क्रि.) लक्ष दिले, मनन केले, चिंतन केले.

**सल्लक्खित, सल्लक्खेन्त**–(कृ.) लक्ष देता, मनन करता, चिंतन करता.

**सल्लक्खेत्वा**–(पू. क्रि.) लक्ष देऊन, मनन करून, चिंतन करून.

**सल्लपति**–(क्रि.) संभाषण करणे, बोलणे.

**सल्लपि**–(पू. क्रि.) संभाषण केले, बोलला.

**सल्लपन्त**–(कृ.) संभाषण करता, बोलता.

**सल्लपित्वा**–(पू. क्रि.) संभाषण करून, बोलून.

**सल्लपन**–(नपु.) चर्चा, संभाषण, वार्तालाप.

**सल्लहुक**–(वि.) हलका.

**सल्लाप**–(पु.) मित्रत्वाचे बोलणे.

**सल्लिखति**–(क्रि.) तुकडे करणे.

**सल्लिखि**–(पू. क्रि.) तुकडे केले.

**सल्लिखित**–(कृ.) तुकडे करता.

**सल्लिखित्वा**–(पू. क्रि.) तुकडे करून.

**सल्लीन**–(कृ.) एकांतात असलेला, एकांत मिळालेला.

**सल्लीयति**–(क्रि.) एकांतात राहणे.

**सल्लीयि**–(पू. क्रि.) एकांतात राहिला.

**सल्लीयन्त**–(कृ.) एकांतात राहता.

**सल्लीयित्वा**–(पू. क्रि.) एकांतात राहून.

**सल्लीयना**–(स्त्री.) एकांत.

**सल्लेख**–(पु.) कडक तपश्चर्या, कठीण तप.

**सवङ्क**–(वि.) वाकडा, वाकडेपणा, वक्र.

**सवण**–(नपु.) ऐकणे, कान, श्रवण.

**सवणीय**–(वि.) कर्णप्रिय, श्रवणीय, ऐकण्यायोग्य.

**सवन**–(नपु.) कान, वाहणे.

**सवति**–(क्रि.) वाहणे.

**सवि**–(पू. क्रि.) वाहिला.

**सवन्त**–(कृ.) वाहता.

**सवित्वा**–(पू. क्रि.) वाहून.

**सवन्ती**–(स्त्री.) नदी.

**सविघात**–(वि.) द्वेषपूर्ण.

**सविञ्ञाणक**–(वि.) जिवंत प्राणी., सचेत, शुद्धीवर असलेला.

**सवितक्क**–(वि.) तर्कयुक्त, तर्कपूर्ण, संकल्पविकल्पासह.

**सविभत्तिक**–(वि.) वर्गीकरणासह, वेगवेगळा, विभक्त.

**सवेर**–(वि.) वैरयुक्त, शत्रुता, वैरपूर्ण.

**सव्यञ्जन**–(वि.) व्यंजन अक्षरासह, कालवणासह, आमटीसह.

**सस**–(पु.) ससा.

**सस-लक्खण, सस-लञ्छन**–(नपु.) चंद्रावरील सशाचे चिन्ह.

**सस-विसाण**–(नपु.) सशाचे शिंग, अशक्य गोष्ट.

**सस (पण्डित) जातक**–सशाने आपले शरीर दान देण्याचा संकल्प केल्याची कथा–(३१६).

**ससक्कं**–(क्रि. वि.) निश्चयाने, जास्तीत जास्त.

**ससङ्क**–(पु.) चंद्र, शशांक.

**ससति**–(क्रि.) श्वास घेणे.

**ससत्थ**–(वि.) सशस्त्र, हत्यारबंद, हत्यारासह.

**ससन**–(नपु.) मारून टाकणे, ठार करणे.

**ससन्तान**–(पु.) स्वचित्त कल्पित, मनाने ठरविलेले.

**ससम्भार**–(वि.) लोणचे-चटणी भाजीसह.

**ससी**–(पु.) शशी, चंद्र.

**ससीसं**–(क्रि. वि.) डोक्यापर्यंत, शिरासह.

**ससुर**–(पु.) श्वसुर, सासरा.

**ससेन**–(नपु.) सैन्यासह.

**सस्स**–(नपु.) धान्य, पीक.

**सस्स-कम्म**–(नपु.) शेती, शेतीकाम.

**सस्स-काल**–(नपु.) धान्य काढणीचा काळ-हंगाम.

**सस्सत**–(वि.) शाश्वत, कायम राहणारा, टिकणारा.

**सस्सत-दिट्ठि**–(स्त्री.) शाश्वत दृष्टी.

**सस्सत-वाद**–(पु.) शाश्वत मत.

**सस्सत-वादी**–(पु.) आत्म्याला नित्य मानणारा, आत्मवादी.

**सस्सतिक**–(वि.) आत्मा अनंतकालिक मानणारा.

**सस्समण-ब्राह्मण**–(वि.) श्रमण आणि ब्राह्मणांसह.

**सस्सामिक**–(वि.) जिचा स्वामी आहे, जिचा मालक-पती आहे, सधवा.

**सस्सिरीक**–(वि.) श्रीमंत, धनवान, ऐश्वर्यासह, श्री-सह.

**सस्सु**–(स्त्री.) सासू, सासऱ्याची पत्नी.

**सह**–(उ.) बरोबर सहित.

**सह**–(वि.) सहनशील.

**सहकार**–(पु.) आंबा, आम्रफळ.

**सह-गत**–(वि.) युक्त, समन्वित.

**सह-ज, सहजात**–(वि.) बरोबर जन्मलेला, बरोबर उपजलेला.

**सहजाति–नगर**, (नपु. विशे. ना.) ज्या गावी वज्जी पुत्रांनी निर्माण केलेल्या दहा प्रश्नाविषयी विचार करण्यासाठी यश ककण्ड पुत्रकाने, सोरेय्य रेवत-स्थाविरांची भेट घेतली होती ते सहजाति-नगर.

**सहजीवी**–(वि.) बरोबर राहणारा, बरोबरचा रहिवासी.
**सह-नन्दी**–(वि.) बरोबरीने आनंद भोगणारा.
**सह-धम्मिक**–(वि.) आपला धम्म मानणारा, एकाच धर्माचा.
**सह-भू**–(वि.) बरोबर जन्मलेला, बरोबर उपजलेला.
**सह-योग**–(पु.) सहायता, सहकार्य, मदत.
**सह-वास**–(पु.) बरोबर राहणे, एकत्र राहणे, सहवास
**सह-सेय्या**–(स्त्री.) बरोबर झोपणे, एकत्र झोपणे, सहशय्या.
**सह-सोकी**–(वि.) समदुःखी, समशोकी.
**सहति**–(क्रि.) सहन करणे, जिंकणे, योग्य होणे.
**सहि**–(पू. क्रि.) सहन केले, जिंकले, योग्य झाले.
**सहन्त**–(कृ.) सहन करता, जिंकता, योग्य होता.
**सहमान**–(कृ.) सह्य, जिक्य, योग्य.
**सहित्वा**–(पू. क्रि.) सहन करून, जिंकून, योग्य होऊन.
**सहत्थ**–(पु.) आपला हात.
**सहन**–(नपु.) सोसणे, सहन करणे.
**सहम्पत्ति**–(पु.) अनेक ब्रह्मांपैकी एक ब्रह्मा.
**सहव्य**–(नपु.) मित्र.
**सहव्यता**–(स्त्री.) मैत्री, तादात्म्य, मेळ.
**सहसा**–(क्रि. वि.) अचानक, एकाएकी, बळजबरीने.
**सहस्स**–(सं. वि., नपु.) हजार, सहस्त्र, (१,०००).
**सहस्सक्ख**–(पु.) सहस्त्राक्षवाला, इंद्र.
**सहस्सक्खतुं**–(क्रि. वि.) हजारदा, हजारोवेळा.
**सहस्सग्घनक**–(वि.) हजारोच्या किंमतीचा.
**सहस्सत्थविका**–(स्त्री.) हजाराची पिशवी थैली.
**सहस्सधा**–(क्रि. वि.) हजारो तऱ्हेने.
**सहस्सनेत्त**–पहा–सहस्सक्ख.
**सहस्स-भण्डिक**–पहा–सहस्सत्थविका.
**सहस्स-रंसी**–(पु.) सूर्य, सहस्त्ररश्मी.
**सहस्सार**–(वि.) हजारो आऱ्यांचे चाक, अनेक आऱ्यांचे चाक.
**सहस्सिक**–(वि.) हजारोवाला.
**सहस्सि-लोक-धातु**–(स्त्री.) हजारो पट लोक शरीराचे अवयव, समाज, हजारोलोक.
**सहाय**–(पु.) मित्र, दोस्त.
**सहायक**–(वि.) सहायता करणारा.
**सहायता**–(स्त्री.) मैत्री, दोस्ती, मित्रता.
**सहित**–(वि.) साथ, बरोबर, सह-सहित.
**सहितब्ब**–(कृ.) सहन करणे योग्य.
**सहितु**–(पु.) सहन करणारा.
**सहेतुक**–(वि.) सकारण, हेतुपुरस्सर.
**सहोढ**–(वि.) चोरलेल्या मालासह.
**सळायतन**–(नपु.) डोळा, कान, नाक, जीभ, त्वचा, मन ही सहा इंद्रिये-सहा आयतन.
**संयत**–(वि.) आत्मजित, संयमी, संयत.
**संयतत्त**–(वि.) आत्मविजयी, स्वतःच्या इंद्रियावर ताबा-मिळविलेला.
**संयतचारी**–(वि.) संयमी.
**संयम**–(पु.) इंद्रियावरील ताबा, संयम.
**संयमन**–(नपु.) इंद्रिय ताब्यात ठेवणे, नियंत्रण, संयमन.
**संयमी**–(पु.) इंद्रिये ताब्यात ठेवलेला, संयमी.
**संयमेति**–(क्रि.) संयम ठेवणे, इंद्रियावर ताबा ठेवणे.
**संयमेसि**–(पू. क्रि.) संयम ठेवला, इंद्रियांवर ताबा ठेवला.
**संयमित, संयमेन्त**–(कृ.) संयम ठेवता, इंद्रियावर ताबा ठेवता.
**संयमेत्त्वा**–(पू. क्रि.) संयम ठेवून, इंद्रियावर ताबा ठेऊन.
**संयुञ्जति**–(क्रि.) जोडणे.
**संयुञ्जि**–(पू. क्रि.) जोडले.
**संयुञ्जिन्त**–(कृ.) जोडता.
**संयुञ्जित्वा**–(पू. क्रि.) जोडून.
**संयुत, संयुत्त**–(कृ.) जोडलेला, संबंधित, संयुक्त.
**संयुत्तनिकाय**–(पु. वि., विशे. ना.) सुत्त पिटकाच्या पाच ग्रंथांपैकी एक ग्रंथ.
**संयूहति**–(क्रि.) ढीग करणे.
**संयूहि**–(पू. क्रि.) ढीग केला.
**संयूळ्ह**–(कृ.) ढीग करता.
**संयूहित्वा**–(पू. क्रि.) ढीग करून.
**संयोग**–(पु.) बंधन, एकता, स्वरांचा ताल, तालबद्ध स्वर.
**संयोजन**–(नपु.) संबंध, बंधन.
**संयोजनीय**–(वि.) बंधनानुसार.
**संयोजेति**–(क्रि.) जोडणे, बांधणे, नियंत्रित करणे, संयोजन करणे.
**संयोजेसि**–(पू. क्रि.) जोडले, बांधले, नियंत्रित केले. संयोजन केले.
**संयोजित संयोजेन्त**–(कृ.) जोडता, बांधता, नियंत्रित करता.
**संयोजेत्वा**–(पू. क्रि.) जोडून, बांधून, नियंत्रित करून, संयोजन करून.

**संरक्खति**–(क्रि.) रक्षण करणे, पहारा देणे, संरक्षण करणे.
**संरक्खि**–(पू. क्रि.) रक्षण केले, पहारा दिला, संरक्षण केले.
**संरक्खित**–(कृ.) रक्षण करता, पहारा देता, संरक्षित.
**संरक्खित्वा**–(पू. क्रि.) रक्षण करून, पहारा, देऊन, संरक्षण करून.
**संरक्खना**–(स्त्री.) संरक्षण, पहारा, गस्त.
**संवच्छर**–(नपु.) वर्ष, साल, संवत्सर.
**संवट्टकप्प**–(पु.) नष्ट झालेला विचार, भग्न संकल्प.
**संवट्टति**–(क्रि.) वाढणे.
**संवट्टि**–(पू. क्रि.) वाढला.
**संवट्टित**–(कृ.) वाढता.
**संवट्टित्वा**–(पू. क्रि.) वाढून.
**संवट्टन**–(नपु.) संवर्तन, परतणे, वाढणे.
**संवड्ढ**–(कृ.) वाढलेला, पुढे गेलेला, प्रगत.
**संवड्ढति**–(क्रि.) प्रगती होणे, वाढ होणे, संवर्धन करणे.
**संवड्ढि**–(पू. क्रि.) प्रगती झाली, वाढ झाली, संवर्धन केले.
**संवड्ढित**–(कृ.) प्रगती होता, वाढ होता, संवर्धित वाढलेला.
**संवड्ढमान**–(कृ.) प्रगती होणे योग्य, वाढण्यायोग्य, संवर्धन करणारा.
**संवड्ढित्वा**–(पू. क्रि.) प्रगती करून, वाढ होऊन, संवर्धन होऊन.
**संवड्ढेति**–(क्रि.) वाढविणे, पालन-पोषण करणे.
**संवड्ढेसि**–(पू. क्रि.) वाढविले, पालन-पोषण केले.
**संवड्ढित**–(कृ.) वाढविता, पालन-पोषण करता.
**संवड्ढेत्वा**–(पू. क्रि.) वाढवून, पालन-पोषण करून.
**संवण्णना**–(स्त्री.) व्याख्या, अर्थ.
**संवण्णेति**–(क्रि.) व्याख्या करणे, अर्थ सांगणे.
**संवण्णेसि**–(पू. क्रि.) व्याख्या केली, अर्थ सांगितला.
**संवण्णित**–(कृ.) व्याख्या करता, अर्थ सांगता.
**संवण्णेतब्ब**–(कृ.) व्याख्या करणे योग्य, अर्थ सांगणे योग्य.
**संवण्णेत्वा**–(पू. क्रि.) व्याख्या करून, अर्थ सांगून.
**संवत्तति**–(क्रि.) चालू असणे, अस्तित्वात असणे.
**संवत्ति**–(पू. क्रि.) चालू आहे, अस्तित्त्वात आला.
**संवत्तित**–(कृ.) चालू असता, वागता, अस्तित्वात
**संवत्तित्वा**–(पू. क्रि.) चालू असून, अस्तित्वात येऊन.
**संवत्तनिक**–(वि.) प्रेरक, चालू करणारा, प्रेरणा देणारा.
**संवत्तेति**–(क्रि.) प्रेरणा देणे, चालू करणे.
**संवत्तेसि**–(पू. क्रि.) प्रेरणा दिली, चालू केले.
**संवत्तित**–(कृ.) प्रेरणा देता, चालू करता.
**संवत्तेत्वा**–(पू. क्रि.) प्रेरणा देऊन, चालू करून.
**संवर**–(पु.) संभय, काळ, वेळ.
**संवर जातक**–संवर राज कुमाराने आपल्या आचार्यांच्या उपदेशाप्रमाणे वागल्याची कथा–(४६२).
**संवरण**–(नपु.) थांबविणे, अडथळा.
**संवसति**–(क्रि.) सोबत करणे, संगत करणे.
**संवसि**–(पू. क्रि.) सोबत केली, संगत केली.
**संवसित**–(कृ.) सोबत करता, संगत करता.
**संवसित्वा**–(पू. क्रि.) सोबत करून, संगत करून.
**संवास**–(पु.) बरोबर राहणे, एकत्र राहणे, सहवास करणे.
**संवासक**–(वि.) बरोबर राहणारा, एकत्र राहणारा, सहवास करणारा.
**संविग्ग**–(कृ.) उद्विग्न, त्रासलेला, सविग्न.
**संविज्जति**–(क्रि.) चालू असणे, सध्या असणे, विद्यमान असणे.
**संविज्जि**–(पू. क्रि.) चालू असलेले, सध्या असलेले विद्यमान होता.
**संविज्जन्त**–(कृ.) चालू असता, सध्या असता, विद्यमाम असता.
**संविज्जमान**–(कृ.) चालू असणे योग्य, सध्या असणे योग्य, विद्यमान असणारा.
**संविज्जित्वा**–(पू. क्रि.) चालू असून, सध्या असून, विद्यमान राहून.
**संविदहति**–(क्रि.) व्यवस्था करणे, नियोजन करणे.
**संविदहि**–(पू. क्रि.) व्यवस्था केली, नियोजन केले.
**संविदहित**–(कृ.) व्यवस्था करता, नियोजन करता.
**संविदहितब्ब**–(कृ.) व्यवस्था करणे योग्य, नियोजन करणे योग्य.
**संविदहित्वा**–(पू. क्रि.) व्यवस्था करून, नियोजन करून.
**संविदहन**–(नपु.) व्यवस्था, नियोजन.
**संविधान**–(नपु.) व्यवस्था, लिखित योजना, संविधान.
**संविधाय**–(पू. क्रि.) व्यवस्था करून, लिखित योजना करून.
**संविधायक**–(वि.) व्यवस्थापक.
**संविधातुं**–(नपु.) व्यवस्थेसाठी.
**संविभजति**–(क्रि.) वाटणे, विभाग करणे.
**संविभजि**–(पू. क्रि.) वाटले, विभागले.
**संविभजित, संविभत्त, संविभज्ज**–(कृ.) वाटता, विभागता.

**संविभजित्वा**–(पू. क्रि.) वाटून, विभागून.
**संविभजन**–(नपु.) वाटणी, विभागणी.
**संविभाग**–(पु.) वाटा, विभाग, भाग.
**संविभत्त**–(कृ.) योग्य प्रकारे, विभक्त, वेगळा.
**संविभागी**–(पु.) उदार, दानी.
**संवुत**–(कृ.) संयत, संयमी.
**संवुतिन्द्रिय**–इंद्रियांवर संयम ठेवणारा.
**संवेग**–(पु.) वैराग्य, व्यग्रता.
**संवेजन**–(नपु.) वैराग्य, प्राप्त होणे, वैराग्य निर्माण होणे.
**संवेजनिय**–(पु.) वैराग्य निर्माण करणारा.
**संवेजेति**–(क्रि.) वैराग्य निर्माण करणे.
**संवेजेसि**–(पू. क्रि.) वैराग्य निर्माण केले.
**संवेजित**–(कृ.) वैराग्य निर्माण करता.
**संवेजेत्वा**–(पू. क्रि.) वैराग्य निर्माण करून.
**संसग्ग**–(पु.) संगती, संगत, संबद्ध, संसर्ग.
**संसट्ठ**–(कृ.) आसक्त, मोहित.
**संसन्दति**–(क्रि.) अनुकूल होणे, योग्य होणे.
**संसन्दि**–(पू. क्रि.) अनुकूल झाला, योग्य झाला.
**संसन्दित**–(कृ.) अनुकूल होता, योग्य होता.
**संसन्दित्वा**–(पू. क्रि.) अनुकूल होऊन, योग्य होऊन.
**संसन्देति**–(क्रि.) मिळविणे, बेरीज करणे.
**संसन्देसि**–(पू. क्रि.) मिळविले, बेरीज केली.
**संसन्दित**–(कृ.) मिळविता, बेरीज करता.
**संसन्देत्वा**–(पू. क्रि.) मिळवून, बेरीज करून.
**संसप्पति**–(क्रि.) सरपटणे, वळवळणे.
**संसप्पि**–(पू. क्रि.) सरपटला, वळवळला.
**संसप्पित**–(कृ.) सरपटता, वळवळता.
**संसप्पित्वा**–(पू. क्रि.) सरपटून, वळवळून.
**संसप्पन**–(नपु.) सरपट, वळवळ.
**संसय**–(पु.) संशय, शंका, संदेह.
**संसरति**–(क्रि.) चालणे, फिरणे.
**संसरि**–(पू. क्रि.) चालला, फिरला.
**संसरित**–(कृ.) चालता, फिरता.
**संसरित्वा**–(पू. क्रि.) चालून, फिरून.
**संसरण**–(नपु.) संचरण, फिरणे.
**संसादेति**–(क्रि.) एकीकडे, ठेवणे, बाजूस ठेवणे.
**संसार**–(पु.) संचरण, फिरणे, संसरण जगरहाटी, संसार.
**संसार-चक्क**–(नपु.) जन्म-मरणाचे चक्र, संसार-चक्र.
**संसार-दुक्ख**–(नपु.) जन्म-मरणाचे दुःख, जगांतील दुःख, संसार-दुःख.
**संसार-सागर**–(पु.) संसाररुपी समुद्र, संसार-सागर.
**संसिज्झति**–(क्रि.) सफल होणे, यशस्वी होणे.
**संसिज्झि**–(पू. क्रि.) सफल झाला, यशस्वी झाला.
**संसिद्ध**–(कृ.) सफल होता, यशस्वी होता.
**संसिज्झित्त्वा**–(पू. क्रि.) सफल होऊन, यशस्वी होऊन.
**संसित**–(कृ.) प्रतिक्षित, वाट पहात, आशान्वित.
**संसिद्धि**–(स्त्री.) सफलता.
**संसिब्बित**–(कृ.) शिवलेला, विणलेला, गुंफलेला.
**संसीदति**–(क्रि.) निराश होणे, असफल होणे, बुडणे.
**संसीदि**–(पू. क्रि.) निराश झाला, असफल झाला, बुडाला.
**संसीदन्त**–(कृ.) निराश होता, असफल होता, बुडता.
**संसीदमान**–(कृ.) निराश होणे योग्य, असफल होणे योग्य, बुडणे योग्य.
**संसीदित्वा**–(पू. क्रि.) निराश होऊन, असफल होऊन, बुडून.
**संसीदन**–(नपु.) बुडणे, रसातळास जाणे.
**संसीन**–(कृ.) बुडालेला, नष्ट झालेला.
**संसुद्ध**–(कृ.) परिशुद्ध, पवित्र, मंगल, शुद्ध.
**संसुद्ध-गहणिक**–(वि.) जातीवंत, शुद्ध वंशातील, उत्तम परंपरा.
**संसुद्धि**–(स्त्री.) पवित्र, पवित्रता, शुद्धता.
**संसूचक**–(वि.) सुचविणारा, सूचित करणारा.
**संसेदज**–(वि.) घामामुळे उत्पन्न होणारे जीव, ऊवा.
**संसेव**–(पु.) संगत, संगती.
**संसेवति**–(क्रि.) संगत करणे, सोबत राहणे.
**संसेवि**–(पू. क्रि.) संगत केली, सोबत राहिला.
**संसेवित**–(कृ.) संगत करता, सोबत राहता.
**संसेवमान**–(कृ.) संगत करणे योग्य, सोबत राहणे योग्य.
**संसेवित्वा**–(पू. क्रि.) संगत करून, सोबत राहून.
**संसेवना**–[पहा–संसेव].
**संसेवी**–(वि.) संगतीत असणारा, सोबती.
**संहट**–(कृ.) एकत्रित, संहत, जमा.
**संहत**–(वि.) दृढ, पक्का, कसलेला, सुदृढ.
**संहरण**–(नपु.) एकत्र करणे, तळ ठोकणे, पाया घालणे, संहार.
**संहरति**–(क्रि.) एकत्र करणे, पाया घालणे, संहार करणे.
**संहरि**–(पू. क्रि.) एकत्र केले, पाया घातला, गोळा केले, जमविले संहार केला.

**संहरित, संहट, संहरन्त**–(कृ.) एकत्र करता, पाया घालता.

**संहरित्वा**–(पू. क्रि.) एकत्र करून, पाया घालून, गोळा करून, जमवून, संहार करून.

**संहार**–(पु.) संक्षेप, सारांश, संग्रह, साठा, विनाश, संहार.

**संहारक**–(वि.) जमविणारा, संग्रह करणारा, विनाशक.

**संहित**–(वि.) युक्त, सह, बरोबर.

**संहिता**–(स्त्री.) जुळणी, स्वरबद्धता, लयबद्धता.

**सा**–(पु.) कुत्रा.

**सा**–(स्त्री. द. सर्व. ना.) ती.

**साक**–(पु., नपु.) भाजी-पाला, शाक-भाजी.

**साक-पत्त**–(नपु.) भाजीची पाने.

**साकच्छा**–(स्त्री.) चर्चा, परामर्श.

**साकटिक**–(पु.) गाडीवान.

**साकल्य**–(नपु.) सर्व भाव, साकल्य.

**साकिय**–(वि.) शाक्य जातीचा.

**साकियानी**–(स्त्री.) शाक्य जातीची स्त्री.

**साकुणिक**–(पु.) फासेपारधी.

**साकुन्तिक**–(पु.) फासेपारधी.

**साकेत**–(नपु.) कोसल जनपदाचे (गणराजाचे) प्रसिद्ध नगर साकेत, सध्याचे नाव "फैजाबाद".

**साकेत जातक**–साकेतच्या एका ब्राह्मणाने भगवान बुद्धाला आपल्या पुत्राप्रमाणे मानून सत्कार करून घरी नेल्याची कथा-(६८).

**साकेत जातक**–वरील कथेशी मिळती जुळती कथा-(२३०).

**साखा**–(स्त्री.) शाखा, फांदी.

**साखा-नगर**–(नपु.) उपनगर, वाडी.

**साखा-पलास**–(नपु.) फांद्या, डाहळ्या व पाने.

**साखा-भङ्ग**–(पु.) फांदी तुटणे, मोडणे.

**साखा-मिग**–(पु.) वानर.

**साखी**–(पु.) वृक्ष, तरु, झाड.

**सागतं**–(अ.) स्वागत, सत्कार.

**सागर**–(पु.) समुद्र.

**सागार**–(वि.) घरात राहणारा.

**सागल**–(नपु.) राजा मिलिंदच्या राजधानीचे नगर-सागल.

**साचरियक**–(वि.) आचार्याबरोबर, शिक्षकांसह.

**साटक**–(पु.) वस्त्र, कपडा.

**साटिका**–(स्त्री.) लहान वस्त्र.

**साठेय्य**–(नपु.) शठता, मुर्खपणा, धूर्तपणा.

**साण**–(नपु.) सन, ताग, तागाचे कापड.

**साणि**–(स्त्री.) पडदा.

**साणि-पसिब्बक**–(पु.) तागाची मोठी पिशवी, गोणपाटाची थैली, गोणी, पोते.

**साणि-पाकार**–(पु.) गोणपाटाचा पडदा, भिंत.

**सात**–(नपु.) आनंद, आराम.

**सात**–(वि.) आनंददायक, आरामशीर.

**सातकुम्भ**–(नपु.) सोने, सुवर्ण, कांचन.

**सातच्च**–(नपु.) सातत्य, सतत, एकसारखे.

**सातच्चकारी**–(पु.) सतत कार्यरत, सतत कार्यमग्न.

**सातच्चकिरिया**–(स्त्री.) सतत काम, सतत कार्य.

**साततिक**–(वि.) सतत काम करणारा, कार्यरत.

**साति**–(स्त्री.) स्वाति, सत्तावीस नक्षत्रांपैकी एक नक्षत्र.

**सातोदिका**–(स्त्री.) सुरतेजवळची नदी.

**सात्थ, सात्थक**–(वि.) सार्थ, अर्थासह, उपयोगी, सार्थक.

**साथलिक**–(वि.) शिथील, ढिला, सैल.

**सादर**–(वि.) आदरयुक्त, आदराने, प्रेमाने.

**सादरं**–(क्रि. वि.) आदराने, प्रेमपूर्वक.

**सादियति**–(क्रि.) स्वीकारणे, आनंद मानणे, अनुमती देणे.

**सादियि**–(पू. क्रि.) स्वीकारले, आनंद मानला, अनुमती दिली.

**सादित, सादियत**–(कृ.) स्वीकारता, आनंद मानता, अनुमती देता.

**सादियमान**–(कृ.) स्वीकारणे योग्य, आनंद मानणे योग्य, अनुमती देणे योग्य.

**सादियित्वा**–(पू. क्रि.) स्वीकारून, आनंद मानून, अनुमती देऊन.

**सादियन**–(नपु.) स्वीकृती.

**सादियना**–(स्त्री.) स्वीकारणे, अंगिकार करणे.

**सादिस**–(वि.) सादृश्य, समान, सारखा.

**सादु**–(वि.) स्वाद, चव, स्वादिष्ट, रुचकर.

**सादुतर**–(वि.) अधिक चवदार, जास्त रुचकर.

**सादु-रस**–(वि.) स्वादिष्ट रस, चवदार रस, चविष्ट.

**साधक**–(वि.) घडणारा, प्रमाणित, साधक.

**साधन**–(नपु.) प्रमाण, सहायक, कृती, ऋणमुक्ती, साधन.

**साधारण**–(वि.) सामान्य, साधारण.

**साधिक**–(वि.) अधिक्य, अधिकपणा, अधिक असलेला.

**साधित**–(कृ.) प्रमाणित, घटित, ऋणमुक्त.
**साधिय**–(वि.) संपन्न करण्यायोग्य, प्रमाणित करण्या-योग्य.
**साधीन जातक**–मिथिला नगरीच्या साधीन नावाच्या नरेशाच्या दानशीलतेची कथा-(४९४).
**साधु**–(वि.) चांगला, लाभदायक, शीलसंपन्न.
**साधु**–(अव्यय) हा, होय, फार उत्तम.
**साधुकं**–(क्रि. वि.) चांगल्या प्रकारे, उत्तम तऱ्हेने.
**साधु-कम्यता**–(स्त्री.) कार्य चांगले होण्याची कामना.
**साधु-कार**–(पु.) चांगली भावना, सदिच्छा.
**साधु-कीळन**–(नपु.) एक पवित्र सण.
**साधु-रूप**–(वि.) सुस्वभावी, सज्जन.
**साधु-सम्मत**–(वि.) सज्जनांकडून, प्रशंसित.
**साधुसील जातक**–ब्राह्मणाने आपल्या आचार्यांचे ऐकून आपल्या चारी मुली शीलसम्पन्न व्यक्तींना दिल्याची कथा-(२००).
**साधेति**–(क्रि.) कार्य सिद्ध करणे, प्रमाणित करणे, ऋण उतरणे.
**साधेसि**–(पू. क्रि.) कार्य सिद्ध केले, प्रमाणित केले, ऋण उतारले.
**साधेन्त**–(कृ.) कार्य सिद्ध करता, प्रमाणित करता, ऋण उतारता.
**साधेत्वा**–(पू. क्रि.) कार्य सिद्ध करून, प्रमाणित करून, ऋण उतरून.
**सानु**–(पु., नपु.) उंच ठिकाण, पठार.
**सानुचर**–(वि.) अनुचरांसह, अनुयायांसह, शिष्यांसह.
**सानवज्ज**–(वि.) सदोष, दोषयुक्त.
**साप**–(पु.) शाप.
**सापतेय्य**–(नपु.) सम्पत्ती, धन, श्रीमंती.
**सापत्तिक**–(वि.) आपत्तीग्रस्त, संकटात सापडलेला. विनयांच्या नियमांचे उल्लंघन केलेला.
**सापद**–(नपु.) श्वापद, शिकार केलेला प्राणी.
**सापदेस**–(वि.) सकारण, कारणासह.
**सापेक्ख, सापेख**–(वि.) आपेक्षेसह, आशावान, साक्षेप.
**सा-बन्धन**–(नपु.) कुत्र्याची साखळी.
**साम**–(वि.) श्यामल, काळा.
**साम**–(पु.) शांती, सामवेद.
**साम जातक**–दशरथ राजाने श्रावणाची हत्या केलेल्या कथेशी जुळणारी कथा–(५४०).
**सामं**–(अ.) स्वयं, स्वतः.
**सामग्गी**–(स्त्री.) सामुग्री, ऐक्य, मिळवणी, बेरीज.
**सामग्गीय**–(नपु.) ऐक्य भावना.
**सामच्च**–(वि.) सामंत, मंत्री, मंत्र्यांसह.
**सामञ्ञ**–(नपु.) श्रमण भाव, श्रामण्य.
**सामञ्ञता**–(स्त्री.) श्रामण्याविषयी, आदर, श्रामण्यता.
**सामञ्ञ-फल**–(नपु.) श्रमण जीवनाचे फळ, श्रामण्य फळ.
**सामणक**–(वि.) श्रमणास योग्य, श्रमणालायक.
**सामणेर**–(पु.) श्रामणेर, भिक्खु बनण्यापूर्वीची अवस्था.
**सामणेरी**–(स्त्री.) श्रामणेरी बनण्यापूर्वीची अवस्था.
**सामत्थिक**–(नपु.) सामर्थ्य, योग्यता.
**सामन्त**–(नपु.) आस-पास, शेजार.
**सामन्त**–(वि.) शेजाऱ्यासंबंधी.
**सामयिक**–(वि.) धार्मिक कार्य, वेळेविषयी, अस्थायी, अयोग्य ठिकाणी, सामयिक.
**सामल**–(पु.) श्यामल रंग, कृष्णवर्ण.
**सामा**–(स्त्री.) श्यामा, काळीतुळस, काळ्या रंगाची स्त्री.
**सामाजिक**–(पु.) समाजाचा, संस्थेचा सदस्य, सामाजिक.
**सामिक**–(पु.) स्वामी, मालक, धनी.
**सामिनी**–(स्त्री.) स्वामिनी, मालकीण.
**सामिवचन**–(नपु.) षष्ठी विभक्तीचा प्रत्यय, षष्ठी विभक्ती.
**सामिस**–(वि.) मांसयुक्त, मांसाहार.
**सामी**–(पु.) स्वामी, मालक, पती.
**सामीचि**–(स्त्री.) उचित, योग्य, अनुकूल, मैत्रीपूर्ण, आचरण.
**सामीचि-कम्म**–(नपु.) उचित कार्य, मैत्रीपूर्ण, व्यवहार.
**सामिचि-पटिपन्न**–(वि.) योग्य मार्गाने जाणारा.
**सामुद्दिक**–(वि.) सामुद्रिक, समुद्रावर राहणारा, समुद्रप्रवास करणारा, जलमार्गी.
**सायक**–(वि.) चाखणारा, चव पाहणारा.
**सायण्ह**–(पु.) संध्याकाळ, सांज.
**सायण्ह-काल**–(पु.) संध्याकाळ.
**सायति**–(क्रि.) चाखणे, चव पाहणे.
**सायि**–(पू. क्रि.) चाखले, चव पाहिली.
**सायित, सायन्त**–(कृ.) चाखता, चव पाहता.
**सायित्वा**–(पू. क्रि.) चाखून, चव पाहून.
**सायन**–(नपु.) चाखणे, चव घेणे.
**सायनीय**–(वि.) चव घेणे योग्य, चाखणे योग्य.

**सार**–(पु.) तत्त्व, वृक्षाचा भाग, झाडाची साल, सार.
**सार**–(वि.) आवश्यक, श्रेष्ठ, समर्थ, सार.
**सारगन्ध**–(पु.) झाडाच्या सालीचा वास, गन्ध.
**सार-गवेसी**–(वि.) तत्त्व शोधणारा.
**सारमय**–(वि.) सालीपासून बनविलेले.
**सार-सूचि**–(स्त्री.) कठीण काडीची सूई.
**सारवन्तु**–(वि.) सारवान, तत्त्वयुक्त, सारयुक्त.
**सारक्ख**–(वि.) आरक्षासहित, सुरक्षित, संरक्षित.
**सारज्जति**–(क्रि.) आसक्त होणे, मोहित होणे.
**सारज्जि**–(पू. क्रि.) आसक्त झाला, मोहित झाले.
**सारत्त**–(कृ.) आसक्त होता, मोहित होता.
**सारज्जित्वा**–(पू. क्रि.) आसक्त होऊन, मोहित होऊन.
**सारज्जना**–(स्त्री.) आसक्ती, मोह.
**सारत्त**–(कृ.) अनुरक्त, मोहित.
**सारथि, सारथी**–(पु.) रथ हाकणारा, सारथी.
**सारद, सारदिक**–(वि.) शरद ऋतुसंबंधी.
**सारद्ध**–(वि.) उत्साही, आनंदित.
**सारमेय**–(पु.) कुत्रा.
**सारम्भ**–(पु.) क्रोध, कलह, भांडण, उत्तेजना.
**सारम्भ जातक**–नन्दी विसाल जातक कथेचीच पुनरुक्ती असलेली कथा-(८८).
**सारस**–(पु.) सारस पक्षी.
**साराणीय**–(वि.) स्मरणे योग्य, आठवणे, उचित.
**सारिवा**–(स्त्री.) सारसा परिल्ला नावाची रक्त शोषण करणारी वनस्पती.
**सारिपुत्त**–(पु. विशे. ना.) भगवान बुद्धाच्या दोन प्रमुख शिष्यांपैकी एक शिष्य, याचे दुसरे नाव "उपतिस्स" असेही होते. आईचे नाव "सारी" असल्यामुळे सारिपुत्र या नावाने प्रसिद्ध झाला.
**सारी**–(वि.) वर्तन करणारा, वागणारा, अनुसरण करणारा.
**सारीरिक**–(वि.) शारीरिक, शरिराविषयी.
**सारुप्प**–(वि.) स्वरूप, योग्य, बरोबर, उचित.
**सारेति**–(क्रि.) आठविणे.
**सारेसि**–(पू. क्रि.) आठवले.
**सारित**–(कृ.) आठवता.
**सारेतब्ब**–(कृ.) आठवण्यायोग्य.
**सारेत्वा**–(पू. क्रि.) आठवून.
**साल**–(पु.) श्याल, शालवृक्ष, शाळा.
**साल-रुक्ख**–(पु.) शाल वृक्ष.
**साल-वन**–(नपु.) शाल वन, शाल उद्यान.
**साल-लट्ठि**–(स्त्री.) शाल वृक्षाचे रोप.
**सालक जातक**–एका गारुड्याने एक वानर पाळले होते ते वानर सापाबरोबर खेळ करत असे. हे त्या गारुड्याच्या उपजीविकेचे साधन असल्याची कथा–(२४९).
**सालय**–(वि.) आसक्त, मोहित, आलयसह.
**साला**–(स्त्री.) शाळा, विद्यालय, भवन.
**सालाकिय**–(नपु.) डोळ्याचे परीक्षण शास्त्र, डोळ्यात सळी फिरविणे, सुरमा घालणे (सळीने).
**सालि**–(पु.) साळी, भात, न सडलेले तांदूळ.
**सालिक्खेत**–(नपु.) भाताचे खाचर, भातशेती.
**सालि-गब्भ**–(पु.) हुरड्याला आलेले भात-भाताचे पीक.
**सालि-भत्त**–(नपु.) भाताचे जेवण, मसाले भात, सार-भात, बिर्याणी पुलाव, इत्यादि.
**सालिका**–(स्त्री.) मैना, सारिका, शिकविल्याप्रमाणे बोलणारा.
**सालि केदार जातक**–पोपट आपल्या आई-वडिलांसाठी भात-साळी घेऊन जात असल्याची कथा-(४८४).
**सालित्तक जातक**–गप्पा-थापा मारणाऱ्या एका पुरोहिताची कथा-(१०७).
**सालित्तक सिप्प**–(नपु.) गलोलिने दगड मारण्याची विद्या.
**सालिय जातक**–एका गावात वैद्याने साप धरून आणण्यास एका मुलाला सांगितले. मुलाने साप धरून आणला. तोच साप चावून वैद्य मेल्याची कथा-(३६७).
**सालुक**–(नपु.) पाण्यातील कमळाचे मूळ.
**सालूक जातक**–सालूक नावाच्या वराहाला (डुकराला) खूप खाऊ घालून तयार करून त्याचा वध करण्याची कथा–(२८६).
**सालोहित**–(पु.) रक्ताच्या नात्याचा, नातेवाईक, नातलग.
**सावक**–(पु.) ऐकणारा, शिष्य, श्रावक, श्रवण करणारा.
**सावकत्त**–(नपु.) शिष्यत्व, श्रावकत्व.
**सावकसङ्घ**–(पु.) शिष्यगण, शिष्यांचा संघ, श्रावक संघ.
**सावज्ज**–(वि.) सदोष, दोषयुक्त.
**सावज्ज**–(नपु.) दोषीपणा, दोष.
**सावज्जता**–(स्त्री.) दोषी असणे.
**सावट्ट**–(वि.) पाण्यातील भोवरा, फुलावरील भुंगा, गरगर फिरणारा.

**सावण**–(पु., विशे. ना.) श्रावण महिना, घोषणा.
**सावत्थि**–(नपु., विशे. ना.)–श्रावस्ती नगर, कोसल गणराज्याची राजधानी.
**सावसेस**–(वि.) अवशेषासह, अपूर्ण.
**सावेति**–(क्रि.) ऐकविणे. घोषणा देणे.
**सावेसि**–(पू. क्रि.) ऐकविले, घोषणा दिली.
**सावित, सावेन्त**–(कृ.) ऐकविता, घोषणा देता.
**सावेयमान, सावेतब्ब**–(कृ.) ऐकविणे योग्य, घोषणा देणे योग्य.
**सावेत्वा**–(पू. क्रि.) ऐकवून, घोषणा देऊन.
**सावेतु**–(पु.) ऐकविणारा.
**सासङ्क**–(वि.) शंकित, संशय घेतलेला, संदिग्ध, साशंक.
**सासति**–(क्रि.) शिकविणे, शासन चालविणे.
**सासि**–(पू. क्रि.) शिकविले, शासन चालविले.
**सासित**–(कृ.) शिकविता, शासन चालविता.
**सासित्वा**–(पू. क्रि.) शिकवून, शासन चालवून.
**सासन**–(नपु.) शिक्षण, आज्ञा, संदेश, सिद्धांत.
**सासनकार, सासनकारक, सासनकारी**–(वि.) आज्ञाधारक, हुकूम मानणारा, शिक्षणानुसार वागणारा.
**सासनन्तरधान**–(नपु.) [बुद्ध] शासनाचा लोप.
**सासन-हर**–(पु.) दूत, बातमीदार, संदेशवाहक.
**सासनावचर**–(वि.) धर्मानुयायी.
**सासनिक**–(वि.) बुद्ध शासनाविषयी बौद्ध शिकवणीविषयी.
**सासप**–(पु.) मोहरीचे दाणे, मोहरी, सरसू.
**सासव**–(वि.) अस्त्रवासह, चित्ताच्या मलासह, सदोष चित्त.
**साहत्थिक**–(वि.) आपल्या हाताने केलेले.
**साहस**–(नपु.) हिंसा, दुःसाहस, स्वैरवर्तन.
**साहसिक**–(वि.) हिंसक, असभ्य, हत्यारा.
**साहु**–(अ.) ठीक, चांगला.
**साळव**–(पु.) कच्च्या भाजी-पाल्याचे जेवण.
**सिकता**–(स्त्री.) वाळू, रेती.
**सिक्का**–(स्त्री.) शिक्का, मोहोर, ठसा.
**सिक्खति**–(क्रि.) शिकणे, अभ्यास करणे.
**सिक्खि**–(पू. क्रि.) शिकला, अभ्यास केला.
**सिक्खित, सिक्खन्त**–(कृ.) शिकता, अभ्यास करता.
**सिक्खमान, सिक्खितब्ब**–(कृ.) शिकणे योग्य, अभ्यासणे योग्य.
**सिक्खन**–(नपु.) शिक्षण, अभ्यास.
**सिक्खमाना**–(स्त्री.) शिकणारी, विद्यार्थिनी.

**सिक्खा**–(स्त्री.) शिक्षण, नियमांचे पालन.
**सिक्खा-काम**–(वि.) उपदेशानुसार वागू इच्छिणारा.
**सिक्खापक, सिक्खापनक**–(पु.) शिक्षक, गुरु, आचार्य.
**सिक्खापद**–(नपु.) शीलासंबंधी नियम, शिक्षापद.
**सिक्खापन**–(नपु.) शिक्षण, शिकवण.
**सिक्खा-समादान**–(नपु.) शील पालन करणे.
**सिक्खित**–(कृ.) शिक्षित, शिकलेला.
**सिखण्ड**–(पु.) मोराचा डोक्यावरील तुरा.
**सिखण्डी**–(पु.) मोर.
**सिखर**–(नपु.) पर्वत शिखर.
**सिखरी**–(पु.) शिखराचा, शिखर असलेला.
**सिखा**–(स्त्री.) शेंडी, दिव्याची ज्योत.
**सिखी**–(पु.) आग, ज्वाला, मोर.
**सिगाल**–(पु.) कोल्हा.
**सिगालक**–(नपु.) कोल्हेकुई, कोल्ह्याचा आवाज.
**सिगाल जातक**–कोल्ह्याने एका ब्राह्मणाच्या चादरीवर मलमूत्र विसर्जन केल्याची कथा–(११३).
**सिगाल जातक**–चतुर कोल्ह्याला फसविण्यासाठी एका माणसाने मेल्याचे सोंग केले. पण चतुर कोल्ह्याने ते ओळखले. त्यामुळे कोल्ह्याची शिकार होऊ न शकल्याची कथा–(१४२).
**सिगाल जातक**–कोल्हा हत्तीच्या पोटात गेला. पण त्यास परत बाहेर येता न आल्याची कथा–(१४८).
**सिगाल जातक**–कोल्ह्याने सिंहीणीला आपले प्रेम करण्याची इच्छा व्यक्त केली. परंतु सिंहिणीने तो आपला अपमान समजून त्याला धिक्कारल्याची कथा-(१५२).
**सिग्गु**–(पु.) वनस्पती, वृक्ष
**सिङ्ग**–(नपु) शिंग.
**सिङ्गार**–(पु.) शृंगार, सजावट, नटणे, श्रृंगार रस.
**सिङ्गिवेर**–(नपु.) आल्ले.
**सिङ्गी**–(वि.) शिंग असलेला.
**सिङ्गी**–(नपु.) सोने, सुवर्ण.
**सिङ्गी-नद**–(नपु.) सोने.
**सिङ्गी-वण्ण**–(वि.) सोनेरी.
**सिङ्घति**–(क्रि.) हुंगणे, वास घेणे.
**सिङ्घि**–(पू. क्रि.) हुंगले, वास घेतला.
**सिङ्घित**–(कृ.) हुंगता, वास घेता.
**सिङ्घित्वा**–(पू. क्रि.) हुंगून, वास घेऊन.
**सिङ्घाटक**–(पु., नपु.) चौक, चार रस्ते, एकत्र मिळालेली जागा.

**सिङ्घाणिका**–(स्त्री.) नाकाचा शेंडा.
**सिज्झति**–(क्रि.) घडणे, सफल होणे, फायदा होणे.
**सिज्झि**–(पू. क्रि.) घडले, सफल झाले, लाभ झाला.
**सिद्ध**–(कृ.) घडता, सफल होता, लाभ होता.
**सिज्झित्वा**–(पू. क्रि.) घडून, सफल होऊन, लाभ होऊन.
**सिज्झन**–(नपु.) घडणे, सफल होणे.
**सिञ्चक**–(वि.) सिंचन करणारा, शेतीला पाणी देणारा.
**सिञ्चन**–(नपु.) सिंचन करणे, पाणी देणे.
**सिञ्चति**–(क्रि.) शिंपणे, पाणी देणे, (शेतीला)
**सिञ्चि, सिञ्चापेति**–(पु. क्रि.) शिंपले, पाणी दिले.
**सित, सित्त, सिञ्चित**–(कृ.) शिंपता, पाणी देता.
**सिञ्चमान**–(कृ.) शिंपणे योग्य, पाणी देण्या योग्य.
**सिञ्चित्वा**–(पू. क्रि.) शिंपून, पाणी देऊन.
**सित**–(वि.) श्वेत, सफेद, अवलंबित, निर्भृत, आसक्त.
**सित**–(नपु.) स्मित, हास्य.
**सित्त**–(कृ.) शिंचित, शिंपलेले, पाणी दिलेले (शेत-पीक).
**सित्थ**–(नपु.) भाताचा कण, भाताचे शीत, मेण.
**सित्थावकारकं**–(क्रि. वि.) तांदूळ विसकटून.
**सित्थक**–(नपु.) मेण.
**सिथिल**–(वि.) ढिला, सैल.
**सिथिलत्त**–(नपु.) शिथिलता, ढिलेपणा, सैलपणा.
**सिथिल-भाव**–(नपु.) ढिलेपणा, शिथिलता, सैलपणा.
**सिद्ध**–(कृ.) समाप्त, संपलेला, पूर्ण झालेले, शिजलेला. पिकलेला.
**सिद्ध**–(पु.) जादूगार, सिद्धीप्राप्त पुरुष.
**सिद्धत्थ**–(वि.) अर्थ सिद्ध झालेला.
**सिद्धत्थ**–(पु.) शाक्य-मुनी, गौतम बुद्धाचे एक नाव
**सिद्धत्थक**–(नपु.) मोहरी, मोहरीचे दाणे.
**सिद्धी**–(स्त्री.) सफलता, यशस्विता.
**सिद्धी**–(पु.) जादूगार, सिद्धीप्राप्त झालेला.
**सिनान**–(नपु.) स्नान, आंघोळ.
**सिनिद्ध**–(वि.) स्निग्ध, नरम, गुळगुळीत.
**सिनेरु, सुमेरु**–(पु.) सुमेरु पर्वत.
**सिनेह, स्नेह**–(पु.) प्रेम, तेल, स्निग्धपणा, स्नेह.
**सिनेहन**–(नपु.) तेलकट करणे, स्निग्धकरणे.
**सिनेह-बिन्दु**–(नपु.) तेलाचा थेंब.
**सिनेहेति**–(क्रि.) स्नेह करणे, मैत्री करणे, तेल लावणे, तेल माखणे.

**सिन्दी**–(स्त्री.) खजूर.
**सिन्दुर**–(पु.) कुंकवाचा टिळा.
**सिन्धव**–(वि.) सिंध प्रांताविषयी.
**सिन्धव**–(पु.) सैंधव मीठ-क्षार, घोडा.
**सिन्धु**–(पु.) समुद्र सागर, साठा.
**सिन्धु**–(पु. विशे. ना.) हिमालयात उगम पावून अरबी समुद्रास मिळणारी नदी., सिंधू नदी.
**सिन्धु-रट्ठ**–(नपु.) सिंधु-राष्ट्र.
**सिन्धु-सङ्गम**–(पु.) नदी, समुद्राला जिथे मिळते ती जागा, संगम, नदी-समुद्राचे मीलन.
**सिपाटिका**–(स्त्री.) शेंग, लहान पेटी.
**सिप्प**–(नपु.) शिल्प, उद्योग, धंदा, हुन्नर, कला.
**सिप्पट्ठान**–(नपु.) शिल्पस्थान, शिल्पाची ओळ.
**सिप्प-साला**–(स्त्री.) शिल्प कलेची जागा, शिल्प भवन.
**सिप्पायतन**–(नपु.) शिल्प-शाखा, शिल्पाचा आधार.
**सिप्पिक**–(पु.) शिल्पकार, पाथरवट, पाथरुट, दगडाचे घडीव व कोरीव काम करणारा.
**सिप्पिका**–(स्त्री.) शिंपली, पाण्यातील शिंपले.
**सिप्पी**–(पु.) शिल्पी, कलाकार, हर-हुन्नर.
**सिब्बति**–(क्रि.) शिवणे, जोडणे.
**सिब्बि**–(पू. क्रि.) शिवले, जोडले.
**सिब्बित**–(कृ.) शिवता, जोडता.
**सिब्बित्वा**–(पू. क्रि.) शिवून, जोडून.
**सिब्बन**–(नपु.) शिलाई, शिवणे.
**सिब्बनी**–(स्त्री.) उत्कट प्रेम, अतिप्रिय.
**सिब्बनी-मग्ग**–(पु.) डोक्याच्या कवटीचा सांधा.
**सिब्बापेति**–(क्रि.) शिवून घेणे, शिवावयास लावणे.
**सिब्बेति**–(क्रि.) शिवणे, शिलाई करणे.
**सिब्बेसि**–(पू. क्रि.) शिवले, शिलाई केली.
**सिब्बित, सिब्बेन्त**–(कृ.) शिवता, शिलाई करता.
**सिब्बेत्वा**–(पू. क्रि.) शिवून, शिलाई करून.
**सिम्बलि**–(पु., स्त्री.) सावरीचे झाड, शाल्मलीवृक्ष.
**सिर**–(पु., नपु.) डोके, शिर.
**सिरा**–(स्त्री.) नाडी, शीर, रक्त वाहिनी.
**सिरि, सिरी**–(स्त्री.) भाग्य, ऐश्वर्य, लक्ष्मी.
**सिरि-गब्भ**–(पु.) श्रीमंताचे शयनागार.
**सिरिमन्तु**–(वि.) श्रीमंत, धनवान, श्रीसंपन्न, ऐश्वर्य संपन्न.
**सिरि-विलास**–(पु.) थाट, माट, डाम-डौल, श्रीमंती.
**सिरि-सयन**–(नपु.) राजशय्या, राजकीयशय्या.

**सिरि-धर**–(वि.) श्रीधर, शानदार, दिमाखदार, डौलदार.

**सिरि जातक**–कोंबड्याचे मांस खाणारा माहूत राजा बनला. त्याची पत्नी राणी झाली व तपरची राजपुरोहित बनल्याची कथा–(२८४).

**सिरिकालकण्णि जातक**–सिरिकाळकण्णि पण्ह (प्रश्न) याचेच दुसरे नाव असल्याची कथा–(१९२).

**सिरिकाळकण्णि जातक**–बनारसच्या एका व्यापाऱ्याने असा एक पलंग बनवून घेतला होता तो पलंग दुसऱ्यासाठी तयार ठेवला जात असे मात्र त्याच्या योग्य ते पेक्षा तो अधिक पवित्र व शुद्ध असल्याची कथा.–(३८२).

**सिरिमन्द जातक**–सिरिमन्द पण्ह (प्रश्न) याचे दुसरे नाव असल्याची कथा–(५००).

[सेनक व महोसध पण्डित यांच्यात लक्ष्मी आणि सरस्वती या दोघींपैकी श्रेष्ठ कोण ह्या प्रश्नावर वाद-विवाद झाल्याची कथा. यासच सिरिमन्द पण्ह (प्रश्न) म्हणतात.

**सिरिवास**–(पु.) टरपेंटाईन तेल.

**सिरीस**–(पु.) सरसाचे झाड, वृक्ष.

**सिरोजाल**–(वि.) डोके झाकण्याची लोखंडी जाळी, शिरस्त्राण, जिरेटोप.

**सिरोमणि**–(पु.) मुकुटावरील हिरा.

**सिरोरुह**–(पु., नपु.) डोक्याचे केस.

**सिरोवेठन**–(नपु.) पगडी, पटका, फेटा.

**सिला**–(स्त्री.) दगड, शिळा.

**सिला-गुळ**–(नपु.) दगडी गोळा, गुंड.

**सिला-थम्भ**–(पु.) दगडी खांब.

**सिला-पट्ट**–(नपु.) दगडी तुळई.

**सिला-पाकार**–(पु.) दगडी चार भिंती, वेशीच्या दगडी भिंती.

**सिलामय**–(वि.) दगडापासून बनविलेले, दगडी.

**सिलाघति**–(क्रि.) प्रशंसा करणे, फुशारकी मारणे.

**सिलाघि**–(पू. क्रि.) प्रशंसा केली, फुशारकी मारली.

**सिलाघित**–(कृ.) प्रशंसा करता, फुशारकी मारता.

**सिलाघित्त्वा**–(पू. क्रि.) प्रशंसा करून, फुशारकी मारून.

**सिलाघा**–(स्त्री.) प्रशंसा, फुशारकी.

**सिलिट्ठ**–(वि.) स्निग्ध, तेलकट.

**सिलिट्ठता**–(स्त्री.) स्निग्धपणा, तेलकटपणा.

**सिलुच्चय**–(पु.) उंचवटा, टेकडी.

**सिलुत्त**–(पु.) चिचुंद्री.

**सिलेस**–(पु.) उखाणा, श्लेष, श्लोष अलंकार, लेस लावलेली वस्तू, कोडे.

**सिलेसुम**–(पु.) कफ.

**सिलोक**–(पु.) प्रसिद्धी, श्लोक.

**सिव**–(वि.) कल्याणस्थल, सुरक्षित स्थान, मंगल.

**सिव**–(पु.) शिव, महादेव, शिवाची पूजा करणारा., शिवभक्त.

**सिव**–(नपु.) आनंद, खुशी.

**सिवि जातक**–राजाशिबी याने आपले स्वतःचे शरीर–सुद्धा दान केल्याची कथा–(४९९).

**सिविका**–(स्त्री.) पालकी.

**सिसिर**–(पु.) शीतऋतु, शिशिरऋतु, थंडी.

**सिसिर**–(वि.) थंडी, गारठा.

**सिस्स**–(पु.) शिष्य, विद्यार्थी, अनुयायी.

**सीकर**–(नपु.) पावसाचे बारीक थेंब.

**सीघ**–(वि.) शीघ्र, जलद, लवकर, तावडतोब, तत्काळ.

**सीघ-गामी**–(वि.) लवकर जाणारा, शीघ्र जाणारा.

**सीघ-तर**–(क्रि. वि.) अतिशीघ्र, फार जलद.

**सीघ सीघं**–(क्रि. वि.) अतिशीघ्र, फार जलद.

**सीघ-सोत**–(वि.) शीघ्र स्त्रोत.

**सीत**–(वि.) गार, थंड, शीत.

**सीत**–(नपु.) थंडी, गारठा.

**सीत-भिरुक**–(वि.) थंडीने गारठलेला, थंडीने भ्यालेला.

**सीतल**–(वि.) थंड, शीतल.

**सीतल**–[पहा–सीत.]

**सीता**–(स्त्री.) नांगरटीची ओळ, नांगरलेली ओळ.

**सीति-भाव**–(पु.) शीतलता, गारठा, शांती.

**सीतिभूत**–(कृ.) शांती मिळालेला, वासना शमलेला शमथ.

**सीतोदक**–(नपु.) थंडपाणी

**सीदति**–(क्रि.) बुडणे, खाली जाणे, हार होणे.

**सीदि**–(पू. क्रि.) बुडला, खाली गेला, हार झाली.

**सीन**–(कृ.) बुडता, खाली जाता, हार होता.

**सीदमान**–(कृ.) बुडण्यासारखा, खाली जाण्या–योग्य, हार होणे योग्य.

**सीदित्त्वा**–(पू. क्रि.) बुडून, खाली जाऊन, हार होऊन.

**सीदन**–(नपु.) बुडणे, बुडी.

**सीन**–(कृ.) बुडलेला.

**सीपद**–(नपु.) हत्तीचा पाय, हत्तीच्या पायासारखा सुजलेला पाय.

**सीमट्ठ**–(वि.) हद्दपार राहिलेला, शिवेबाहेर थांबलेला.
**सीमन्तिनी**–(स्त्री.) बाई, नारी.
**सीमा**–(स्त्री.) सीमा, हद्द, सरहद्द, भिक्खुचे विनय कार्य करण्याची निर्धारित सीमा-नियम.
**सीमा-कत**–(वि.) सीमित, मर्यादित, बाधिल.
**सीमातिग**–(वि.) सीमोलंघन केलेला, हद्द ओलांडलेला, हद्दी बाहेर गेलेला.
**सीमा-समुग्घात**–(पु.) पहिली हद्द तोडणे, नियम बदलणे.
**सीम-सम्मुत्ति**–(स्त्री.) नवीन हद्द ठरविणे, नवीन सीमा घालणे, नवे नियम करणे.
**सीर**–(पु.) नांगर, औत.
**सीरङ्ग**–(पु.) नांगराचा मुख्य भाग.
**सील**–(नपु.) शील, सदाचरण.
**सील-कथा**–(स्त्री.) शीलाची व्याख्या.
**सीलक्खन्ध**–(पु.) शीलस्कंध, शीलाविषयीचा परिच्छेद
**सील-गन्ध**–(पु.) शीलाचा सुगंध, शीलाची प्रसिद्धी.
**सीलब्बत**–(नपु.) शीलव्रत.
**सील-भेद**–(पु.) शील व्रताचा भंग, शील मोडणे, दुर्वर्तन.
**सीलमय**–(वि.) शीलवान, संयमी जीवन.
**सीलवन्तु**–(वि.) शीलाचे पालन करणारा.
**सील-विपत्ति**–(स्त्री.) शील मर्यादांचे उल्लंघन, दुराचार, दुवर्तन.
**सील-विपन्न**–(वि.) शील मोडणारा, शीलभंग करणारा.
**सील-संपत्ति**–(स्त्री.) शील पालन सदाचार, सद्वर्तन.
**सील-सम्पन्न**–(वि.) शीलवान, शीलयुक्त, सदाचारी, सदाचरणी.
**सीलन**–(नपु.) संयमी असणे, विनयाप्रमाणे वागणे.
**सीलवनाग जातक**–सीलव नागराजाने पथ-भ्रष्ट माणसाला सुदुपदेशाने उपकृत केले.परंतु त्या दुष्ट माणसाने सीलव नागराजाचे दात मुळासह उपडून काढल्याची कथा-(७२).
**सीलवीमंस जातक**–एका तपस्व्याने शीलाचे महत्त्व लोकांना सांगितल्याची कथा-(३३०).
**सीलवीमंस जातक**–तपस्व्याने संपत्तीची (पैशाची) चोरी करून दाखवून दिले की, विद्येपेक्षा शीलाचे महत्त्व अधिक असल्याचे दाखवून दिल्याची कथा-(३६२).
**सीलवीमंस जातक**–एका पुरोहिताने वरील कथेप्रमाणेच विद्येपेक्षा शीलाचे महत्त्व अधिक असल्याचे पटवून दिल्याची कथा-(८६).
**सीलवीमंस जातक**–पहिल्या सीलवीमंस जातक कथेप्रमाणेच विद्याबलापेक्षा शीलबल अधिक श्रेष्ठ असल्याची कथा-(२९०).
**सीलवीमंस जातक**–एका पुरोहित ब्राह्मणाने आपल्या पाचशे शिष्यामध्ये जो अधिक शीलवान शिष्य होता त्यासच आपली कन्या दिल्याची कथा-(३०५).
**सीलानीसंस जातक**–एका न्हाव्याने एक प्राणी-हत्या केली. त्याच्या शीलवान उपासक मित्राने आपल्या पुण्यातील काही भाग त्याला दिल्यामुळे न्हाव्याचा प्राण वाचविल्याची कथा-(१९०).
**सीलिक**–(वि.) स्वाभाविक, प्राकृतिक, स्वभावाचा.
**सीली**–(वि.) शीलवान, शीलवंत.
**सीवथिका**–(स्त्री.) कच्चे स्मशान, साधे स्मशान.
**सीस**–(नपु.) शीर्ष, सिर, डोके, उंच शिखर, पिकाचे कणीस, लेखाचे शीर्षक, काचेची बाटली.
**सीस-कपाल**–(पु.) माथा, कपाळ.
**सीस-कटाह**–(पु.) माथा-कपाळ.
**सीसच्छवि**–(स्त्री.) डोक्याचे कातडे-चामडे.
**सीसच्छेदन**–(नपु.) सिर तोडणे, मुंडके उडविणे.
**सीसप्पचालन**–(नपु.) डोके हालविणे, मान डोलविणे.
**सीस-परम्परा**–(स्त्री.) एका डोक्यावरील ओझे दुसऱ्या डोक्यावर देणे, वडिलार्जित धंदा चालविणे.
**सीस-वेठन**–(नपु.) पगडी, शीरवेष्ठन.
**सीसा बाध**–(पु.) डोके दुखी.
**सीह**–(पु.) सिंह, वनराज, शार्दुल.
**सीह-चम्म**–(नपु.) सिंहाचे कातडे.
**सीह-नाद**–(पु.) सिंहगर्जना.
**सीह-नादिक**–(वि.) सिंहासारखी गर्जना करणारा.
**सीह-पञ्जर**–(पु.) सिंहाचा पिंजरा, झरोका, सळयांची खिडकी.
**सीह-पोतक**–(पु.) सिंहाचा छावा.
**सीह-विक्कीळित**–(नपु.) सिंहाचा खेळ.
**सीह-सेय्या**–(स्त्री.) सिंहशय्या, दक्षिण कुशीवर झोपणे, उजव्या कुशीवर झोपणे.
**सीहस्सर**–(वि.) सिंहासारखा आवाज काढणारा, सिंहाचा आवाज.
**सीह-हनु**–(वि.) सिंहासारख्या दाढीचा, सिंहासारख्या चेहऱ्याचा.
**सीह-हनु**–(पु.) शाक्य मुनी गौतम बुद्धाचे पितामह-आजोबा "सिंह हनु".

**सीह कोट्ठक जातक**–सिंह आणि कोल्ही यांच्या संकराने एक छावा निपजला परंतु त्याचा आवाज कोल्ह्यासारखा असल्याची कथा-(१८८).

**सीह-चम्म जातक**–सिंहाचे कातडे पांघरून फिरणाऱ्या गाढवाला शेतकऱ्यांनी मारल्याची कथा-(१८९).

**सीह-बाहु**–(पु.) श्रीलंकेवर राज्य करणारा पहिला आर्य' राजा "विजय" चा पिता "सिंह बाहु".

**सीहल**–(पु.) श्रीलंकेवर प्रथम राज्य करणारा "विजय राजा व त्याचे साथीदार यांच्या विषयी वापरात' असलेला शब्द "सिंहल".

**सीहल-दीप**–(पु.) जेव्हापासून ताम्रपर्णी (तम्बपण्णि) द्वीप सिंहलांच्या अधिपत्त्याखाली आला तेव्हापासून ताम्रपर्णी (तम्बपण्णि) द्वीपाला "सिंहलद्वीप" म्हणू लागले. सध्या त्यास श्रीलंका म्हणतात.

**सीहळ**–(वि.) सिंहलद्वीपचा रहिवाशी.

**सीहळ-दीप**–(पु.) सिंहलद्वीप.

**सीहळ-भासा**–(स्त्री.) सिंहल लोकांची भाषा बोली.

**सीहासन**–(नपु.) सिंहासन.

**सु**–(उपसर्ग) ठीक चांगले.

**सुंसुमार जातक**–एका वानराला मगराने फसविल्याची कथा-(२०८).

**सुंसुमार गिरी**–(नपु. वि.) भग्ग गणराज्याचे प्रसिद्ध नगर.

**सुक**–(पु.) पोपट, शुक.

**सुक जातक**–शुकराज पोपटाने पित्याच्या आज्ञेचा भंग केल्यामुळे प्राणास मुकल्याची कथा-(२५५).

**सुकट, सुकत**–(वि.) सुकृत, शुभकार्य, शुभकर्म.

**सुकर**–(वि.) सोपे, सहज होण्यासारखे.

**सुकुमार**–(वि.) मृदु, कोमल, मऊ.

**सुकुमारता**–(स्त्री.) कोमलपणा, मऊपणा, मृदुता.

**सुकुसल**–(वि.) अत्यंत कुशल, दक्ष, तत्पर.

**सुक्क**–(वि.) शुक्ल, सफेद, शुभ्र, पांढरा.

**सुक्क**–(नपु.) शुभ कर्म.

**सुक्क-पक्ख**–(पु.) हिंदी महिन्याचा शुक्लपक्ष, शुद्धपक्ष.

**सुक्ख**–(वि.) सुका, वाळलेला, सुकलेला.

**सुक्खति**–(क्रि.) सुकणे, वाळणे.

**सुक्खि**–(पू. क्रि.) सुकले, वाळले.

**सुक्खत**–(कृ.) सुकता, वाळता.

**सुक्खमान**–(कृ.)सुकण्यायोग्य, वाळण्यायोग्य, सुकणारा

**सुक्खित्वा**–(पू. क्रि.) सुकून, वाळून.

**सुक्खन**–(नपु.) सुकणे, वाळणे.

**सुक्खापन**–(नपु.) सुकविणे, वाळविणे.

**सुक्खापेति**–(क्रि.) सुकविले., वाळविले.

**सुक्खापित**–(कृ.) सुकविता, वाळविता.

**सुक्खापेत्वा**–(पू. क्रि.) सुकवून, वाळवून.

**सुख**–(नपु.) सुख, आराम, विश्राम.

**सुख-काम**–(वि.) सुखाची इच्छा करणारा.

**सुखत्थिक, सुखत्थी**–(वि.) सुखार्थी, सुख मिळविणारा.

**सुखद**–(वि.) सुखदायक, सुखद.

**सुख-निसिन्न**–(वि.) सुखासीन, सुखात असलेला, सुखी.

**सुख-पटिसंवेदी**–(वि.) सुख भोगणारा, सुखानुभवी.

**सुखप्पत्त**–(वि.) सुख प्राप्त.

**सुख-भागिय**–(वि.) सुख वाटून देणारा.

**सुख-यानक**–(नपु.) सुखद यान, आराम गाडी.

**सुख-विपाक**–(वि.) सुखद फळ मिळणे, सुख फलदायी.

**सुख-विहरण**–(नपु.) सुखाने राहणे, सुखी जीवन.

**सुख विहारी जातक**–राज्यत्याग करून सुख पूर्ण जीवन जगणाऱ्या तपस्व्यांची कथा-(१०).

**सुख-संवास**–(पु.) सुखद संगत, चांगली मैत्री.

**सुख-सम्फस्स**–(वि.) सुखद स्पर्श.

**सुख-सम्मत**–(वि.) सुख मानले.

**सुखं**–(क्रि., वि.) सहजपणे, आरामशीर.

**सुखायति**–(क्रि.) सुखी होणे.

**सुखावह**–(वि.) सुखद, सुखकारक, सुखदायक, सुखावह.

**सुखित**–(कृ.) सुखी.

**सुखुम**–(वि.) सूक्ष्म, बारीक, अति लहान.

**सुखुमतर**–(वि.) अति सूक्ष्म.

**सुखुमत्त**–(नपु.) सूक्ष्मत्त्व, बारीकपणा, लहानपणा.

**सुखुमाल**–(वि.) सुकुमार, कोमलपणा.

**सुखुमालता**–(स्त्री.) सुकुमारता, कोमलता.

**सुखेति**–(क्रि.) सुखी करणे.

**सुखेसि**–(पू. क्रि.) सुखी केले.

**सुखित**–(कृ.) सुखी करता.

**सुखेत्वा**–(पू. क्रि.) सुखी करून.

**सुखेधित**–(वि.) सुखात पोसलेला, सुखात वाढलेला.

**सुगत**–(वि.) सद्गतीप्राप्त.

**सुगत**–(पु. विशे. ना.) भगवान बुद्ध.

**सुगतालय**–(पु.) भगवान तथागताचे निवासस्थान, सुगताची नक्कल.

**सुगति**–(स्त्री.) चांगली स्थिती, चांगली अवस्था.

**सुगती**–(वि.) शुभकर्म करणारा, सन्मार्गी.

**सुगन्ध**–(पु., वि.) सुवास, चांगला वास, सुगंध.

**सुगन्धिक, सुगन्धी**–(वि.) सुवासिक, सुगंधित.
**सुगहन**–(नपु.) सुगृहित, चांगल्या प्रकारे जाणून घेतले.
**सुगुत्त**–(कृ.) सुरक्षित.
**सुगोपित**–[पहा–सुगत्त].
**सुग्गहित**–(वि.) सुगृहित, चांगले पाठ केले, समजून घेतले.
**सुङ्क**–(पु.) कर, जकात.
**सुङ्कघात**–(पु.) कर चुकवून जाणे, जकात चुकविणे.
**सुङ्कट्ठान**–(नपु.) टोलनाके, जकातघर,
**सुङ्किक**–(पु.) कर वसूल करणारा, मक्तेदार, ठेकेदार.
**सुचरित**–(नपु.) सदाचरण, सद्वर्तन.
**सुचि**–(वि.) पवित्र.
**सुचिकम्म**–(वि.) पवित्र कार्य, मंगल कार्य, शुभ कार्य.
**सुचिगन्ध**–(वि.) पवित्र कार्याचा सुगंध, शुभ कार्याची प्रसिद्धी.
**सुचि-जातिक**–(वि.) स्वच्छता आवडणारा.
**सुचि-वसन**–(वि.) स्वच्छ पोषाखाचा, स्वच्छ कपडे घातलेला.
**सुचित्त**–(वि.) सुचित्रित, चांगला चितारलेला, शुद्ध चित्ताचा, अति विचित्र.
**सुचित्तित**–[पहा–सुचित्त].
**सुच्चज जातक**–राणी म्हणाली "जर हा समोरचा पर्वत सोन्याचा झाला तर मला किती सोने द्याल?" त्यावर राजाने उत्तर दिले. "कणभरसुद्धा सोने देणार नाही" ही कथा-(३२०).
**सुच्छन्न**–(वि.) चांगला झाकलेला, पूर्ण आच्छादित.
**सुजन**–(पु.) चांगला मनुष्य, सज्जन.
**सुजा**–(स्त्री.) शुक्राच्या पत्नीचे नाव "सुजा", यज्ञात उपयोगी पडणारी पळी, हवनासाठी तूप घालण्याचा चमचा.
**सुजात**–(कृ.) चांगला जन्म मिळाला, उच्च जातीचा, श्रेष्ठ.
**सुजात जातक**–मुलाने कर्कश भाषेत बोलणाऱ्या आपल्या आईला सुधारल्याची कथा-(२६९).
**सुजात जातक**–राजाने मिठाई विकणाऱ्या मुलीची मधुरवाणी ऐकून तिला बोलावून घेतले व आपली राणी बनविल्याची कथा.-(३०६).
**सुजात जातक**–सुजातने आपल्या शोकाकूल पित्याचा शोक दूर केल्याची कथा-(३५२).
**सुजाता**–(स्त्री. वि.) "उरुवेले" जवळच्या "सेनानी" गांवच्या प्रमुखाची मुलगी "सुजाता" हिनेच गौतम बुद्धाला वैशाख पौर्णिमाच्या दिवशी वृक्षदेव मानून खिरीचा नैवेध दिला होता.
**सुज्झति**–(क्रि.) शुद्ध होणे, पवित्र होणे.
**सुज्झि**–(पू. क्रि.) शुद्ध झाला, पवित्र झाला.
**सुज्झन्त**–(कृ.) शुद्ध होता, पवित्र होता.
**सुज्झमान**–(कृ.) शुद्ध होणे योग्य, पवित्र होणे योग्य.
**सुज्झित्वा**–(पू. क्रि.) शुद्ध होऊन, पवित्र होऊन.
**सुद्ध**–(कृ.) शुद्ध, पवित्र.
**सुञ्ञ**–(वि.) शून्य.
**सुञ्ञ-गाम**–(पु.) शून्य गाव, मोकळे गाव, गावात कोणी नसणे.
**सुञ्ञता**–(स्त्री.) शून्यता.
**सुञ्ञागार**–(नपु.) शून्यागार, निर्जन स्थान, एकान्त-ठिकाण.
**सुट्ठु**–(अ.) ठीक, छान, चांगले.
**सुट्ठुता**–(स्त्री.) चांगुलपणा.
**सुण**–(पु.) कुत्रा.
**सुणाति**–(क्रि.) ऐकणे.
**सुणि**–(पू. क्रि.) ऐकले.
**सुत, सुणन्त, सोतुं, सुणितुं**–(कृ.) ऐकता.
**सुणमान, सोतब्ब, सुणितब्ब**–(कृ.) ऐकण्यायोग्य.
**सुत्वा, सुणित्वा**–(पू. क्रि.) ऐकून.
**सुणिसा, सुण्हा**–(स्त्री.) सून, मुलाची बायको, पुत्रवधू.
**सुत**–(पु.) पुत्र, मुलगा.
**सुत**–(कृ.) ऐकलेले.
**सुत**–(नपु.) सूत्र, नियम, धर्मग्रंथ.
**सुत-धर**–(नपु.) बहुश्रुत, धर्मग्रंथ पाठ असलेला.
**सुतवन्तु**–(वि.) विद्वान, बहुश्रुत.
**सुतत्त**–(कृ.) चांगले भाजले, चांगले तापविले, गरम केले.
**सुतनु**–(वि.) सुंदर शरिराचा, चांगल्या तनूचा.
**सुतनो जातक**–मुलाने नरमांस भक्षक यक्षाजवळ जाण्याचे मान्य केल्याची कथा-(३९८).
**सुतप्पय**–(वि.) सहज संतुष्ट होणारा.
**सुति**–(स्त्री.) श्रुति, अनुश्रुति, वैदिक परंपरा, आवाज.
**सुति-हीन**–(वि.) बहिरा, ऐकू न येणारा.
**सुत्त**–(कृ.) झोपलेला, निजलेला, निद्रित.
**सुत्त**–(नपु.) धागा, दोरा, सूत, बुद्धोपदेश व्याकरणाचे नियम-सूत्र.
**सुत्तकन्तन**–(नपु.) सूत कातणे.
**सुत्त-कार**–(पु.) सूत्रकार, सूत्रे रचणारा.
**सुत्त-गुळ**–(नपु.) सुताची गुंडी, धागा-गुंडी.

**सुत्त निपात**–(पु., वि.) सुत्त पिटकाच्या खुद्दक निकायातील पंधरा ग्रंथापैकी एक ग्रंथ सुत्त निपात.
**सुत्त-मय**–(वि.) सूत्र निर्मित.
**सुत्तन्त**–(पु., नपु.) बुद्धोपदेश, प्रवचन, बुद्धवचन.
**सतन्तपिटक**–[पहा-सुत्तपिटक] पांच निकायांसह सुत्त-पिटक.
[पांच निकाय–दीघ-निकाय, २ मज्झिम-निकाय, ३ संयुत्त-निकाय, ४ अङ्गुत्तर-निकाय, ५ खुद्दक-निकाय]
**सुत्तन्तिक**–(वि.) संपूर्ण सुत्तपिटक क्रमशः पाठ असलेला, सुत्तपिटक पाठक.
**सुत्ति**–(स्त्री.) शिपली, शिपी.
**सुदन्त**–(वि.) सुशिक्षित.
**सुदस्स**–(वि.) सहज पाहिलेला, चांगले दर्शन.
**सुदस्सन**–(नपु.) सुदर्शन, सुंदर रुपाचा, रुपवान, देखणा.
**सुदं**–(अ) निरर्थक शब्दप्रयोग.
**सुदिट्ठ**–(वि.) चांगल्या प्रकारे पाहिला, निरखून पाहिला.
**सुदिन्न**–(वि.) स्वखुशीने दिले.
**सुदुत्तर**–(वि.) कष्टाने मिळविणे.
**सुदुक्कर**–(वि.) कष्टप्रद, फार त्रासाने, अति दुष्कर.
**सुदुद्दस**–(वि.) पहावयास मिळणे अवघड.
**सुदुब्बल**–(वि.) अति दुर्बल, फार अशक्त.
**सुदुल्लभ**–(वि.) अति दुर्लभ, अति दुर्मिळ, मिळण्यास अवघड.
**सुदेसित**–(वि.) चांगल्या प्रकारे दाखविले, नीट दाखविले.
**सुद्द**–(पु.) शूद्र.
**सुद्ध**–(वि.) शुद्ध, पवित्र, स्वच्छ.
**सुद्धता**–(स्त्री.) शुद्धता, पावित्र्य.
**सुद्धत**–(नपं.) शुद्धता.
**सुद्धाजीव**–(वि.) पवित्र, धंदा करणारा.
**सुद्धावास**–(पु.) पवित्र स्थान, शुद्ध ठिकाण, पवित्र क्षेत्र.
**सुद्धावासिक**–(वि.) पवित्र ठिकाणी राहणारा, तीर्थ क्षेत्रावर राहणारा.
**सुद्धि**–(स्त्री.) शुद्धी, पावित्र्य.
**सुद्धि-मग्ग**–(पु.) पवित्र मार्ग, चांगला रस्ता, शुद्धी मार्ग.
**सुद्धोदन**–(पु., वि.) कपिलवस्तुचा शाक्य राजा शाक्यमुनि गौतम बुद्धाचा पिता "शुद्धोदन".
**सुधन्त**–(कृ.) चांगले फुंकलेला, स्वच्छ केलेला.
**सुधम्मता**–(स्त्री.) सुस्वभाव.
**सुधा**–(स्त्री.) अमृत, चुना.
**सुधाकम्म**–(नपु.) चुना लावणे, सफेदी देणे, चुन्याने रंगविणे.
**सुधाकर**–(पु.) चंद्र.
**सुधा भोजन जातक**–कंजूस कोसियाची कथा-(५३५).
**सुधी**–(पु.) बुद्धीमान मनुष्य.
**सुधोत**–(कृ.) चांगला धुतलेला, स्वच्छ, निष्कलंक.
**सुनख**–(पु.) कुत्रा.
**सुनखी**–(स्त्री.) कुत्री.
**सुनख जातक**–मालक झोपलेला पाहून त्याचा कुत्रा पळून गेल्याची कथा-(२४२).
**सुनहात**–(कृ.) स्वच्छ आंघोळ केलेला, सुचिर्भूत.
**सुनिसित**–(कृ.) चांगली धार लावलेला, धारदार.
**सुन्दर**–(वि.) आकर्षक, मोहक.
**सुन्दरतर**–(वि.) अधिक मोहक, फार आकर्षक.
**सुन्दरिका**–(स्त्री., वि.) कोसल गणराज्याची नदी.
**सुनापरन्त, सुप्पारक पत्तन**–(पु.) बंदराजवळचा भू-प्रदेश.
**सुपक्क**–(वि.) पूर्ण पिकलेले, सुपक्व.
**सुपटिपन्न**–(वि.) सुमार्गाने चाललेला, सुमार्गारुढ, संयत.
**सुपण्ण**–(पु.) गरूड-(पक्षी).
**सुपत्त जातक**–सुपत्त कावळयाची कथा-(२९२).
**सुपति**–(क्रि.) झोपणे, निजणे.
**सुपि**–(पू. क्रि.) झोपला.
**सुत्त, सुपन्त**–(कृ.) झोपता.
**सुपित्वा**–(पू. क्रि.) झोपून.
**सुपरिकम्मु-कत**–(वि.) स्वच्छ घासलेला.
**सुपरिहीन**–(वि.) अति दुबरा, अशक्त, हाडकुळा.
**सुपिन, सुपिनक, सुपिनन्त**–(नपु.) स्वप्न.
**सुपिन पाठक**–(पु.) स्वप्नांचा अर्थ सांगणारा, ज्योतिषी.
**सुपुप्फिल**–(वि.) पूर्ण फुललेले, उमलले, फुलांनी झाकलेले.
**सुपोठित**–(कृ.) चांगला चेचलेला, बडविलेला.
**सुपोत्थित**–[पहा–सुपोठित].
**सुप्प**–(पु., नपु.) अर्क, रस, काढा.
**सुप्पटिविध**–(कृ.) नीट समजले गेले, कळले गेले.
**सुप्पटिट्ठित**–(कृ.) चांगला प्रतिष्ठित, मानमरातब असलेला.
**सुप्पतीत**–(वि.) चांगला प्रसन्न.

**सुप्पधंसिय**–(वि.) सहज दावलेला.
**सुप्पबुद्ध**–(पु., वि.) महामाया व प्रजा गौतमीचा बंधू. सिद्धार्थ गौतमाचा सख्खा मामा.
**सुप्पभात**–(नपु.) सुप्रभात.
**सुप्पवेदित**–(वि.) संतुष्ट, तृप्त.
**सुप्पसन्न**–(वि.) प्रसन्न, आनंदित, श्रद्धावान.
**सुप्पार, सुप्पारक**–(नपुं.) सुप्पारा बंदर, सोपारा बंदर.
**सुप्पारक जातक**–अंधळ्या नाविकाच्या मार्गदर्शनाची कथा-(४६३).
**सुप्फस्सित**–(वि.) लागलेला, लटकलेला.
**सुबहु**–(वि.) अत्यंत, अति खूप.
**सुब्बच**–(वि.) आज्ञाधारक, विनम्र.
**सुब्बत**–(वि.) सदाचारी, सद्शील, सदाचरणी.
**सुब्बुट्ठि**–(स्त्री.) योग्य प्रमाणात पाऊस, सुवृष्टी.
**सुभ**–(वि.) शुभ, शुभ मुहूर्त, मंगल.
**सुभकिण्ण**–(पु.) देवांची एक जात.
**सुभनिमित्त**–(नपुं.) शुभ शकून, सुंदर वस्तू.
**सुभग**–(वि.) सौभाग्यपूर्ण, सुदैवी.
**सुभद्दथेर**–(पु.,) भगवान बुद्ध परिनिर्वाण पावण्यापूर्वी ज्या परिव्राजकाला उपदेश दिला होता तो शेवटचा त्यांचा दीक्षित शिष्य होय.
**सुभर**–(वि.) ज्याचे सहज पालनपोषण करता येते, अधिक भार न पडणारा.
**सुभिक्ख्**–(वि.) अधिक भोजन मिळणारे ठिकाण, भिक्षा मिळणे सोपे असलेले स्थान.
**सुमङ्गल जातक**–सुमंगल नावाच्या माळ्याने प्रत्येक बुद्धाला हरीण समजून बाण मारल्याची कथा-(४२०).
**सुमति**–(पु.) बुद्धीमान मनुष्य.
**सुमन**–(वि.) प्रसन्न.
**सुमन पुप्फ**–(नपु.) चमेलीचे फूल.
**सुमन-मुकुल**–(नपु.) चमेलीचा कोंब, चमेलीचा कोवळा शेंडा.
**सुमन-माला**–(स्त्री.) चमेलीच्या फुलांची माळ.
**सुमन सामनेर**–(पु., वि.) भिक्खुनी संघमित्राचा पुत्र सुमन श्रामणेर, महास्थविर महिंद्राबरोबरच तो सिंहल द्वीपला गेला होता.
**सुमना**–(स्त्री.) चमेलीची वेल, प्रसन्नवदन स्त्री.
**सुमनोहर**–(वि.) अत्यंत आकर्षक.
**सुमानस**–(वि.) प्रसन्न चित्त.
**सुमापित**–(कृ.) सुनिर्मित.
**सुमत्त**–(कृ.) विमुक्त, स्वतंत्र मुक्त, चांगला विमुक्त.
**सुमेध, सुमेधस**–(वि., पु. विशेषनाम) बुद्धीमान.
**सुमेरू**–(पु.) सुमेरू पर्वत.
**सुयिट्ठ**–(वि.) आहुति दिली गेली.
**सुयुत्त**–(वि.) नियुक्त केला, निवडला, निवडून दिला.
**सुर**–(पु.) देव.
**सुरनदी**–(स्त्री.) देवांची नदी.
**सुर-नाथ**–(पु.) देवांचा राजा.
**सुर-पथ**–(पु.) आकाश, गगन, नभ.
**सुर-रिपू**–(पु.) देवांचा शत्रू, असूर, राक्षस, दैत्य.
**सुरत**–(वि.) भक्त, आसक्त, प्रेमी.
**सुरत्त**–(वि.) चांगला रंगविलेला, अति लाल.
**सुरसेन**–(नपुं. विशे. ना.) बुद्ध कालीन भारतांतील सोळा गणराज्यांपैकी एक गणराज्य, सूरसेन. याची गणना मच्छ गणराज्याबरोबर होत होती.
**सुरभि**–(वि.) सुगंधित, सुवासित.
**सुरभि-गन्ध**–(पु.) सुगंध, सुवास.
**सुरा**–(स्त्री.) मादक द्रव, दारू.
**सुरा-घट**–(पु.) दारूचा कुंभ.
**सुरा-धुत्त**–(पु.) दारू पिऊन, धुंद, बेशुद्ध.
**सुरा-पान**–(नपुं.) दारू पिणे, सुरापान.
**सुरा-पायिका**–(स्त्री.) दारूडी स्त्री, दारू पिणारी बाई.
**सुरा-पीत**–(वि.) दारू प्यालेला, दारू प्यालेली.
**सुरा-मद**–(पु.) दारूची धुंदी, दारूची नशा.
**सुरा-मेरय**–(नपुं.) दारू व इतर मादक पदार्थ.
**सुरा-सोण्ड, सुरा-सोण्डक**–(पु.) दारूडा, दारू पिणारा, व्यसनी.
**सुरापान जातक**–तपस्वी दारू प्याले आणि त्या धुंदीत नग्न होऊन नाचू लागल्याची कथा-(८१).
**सुरिय**–(पु.) सूर्य.
**सुरियग्गाह**–(पु.) सुर्यग्रहण.
**सुरिय-मण्डल**–(नपु.) सूर्याभोवतीचे तेजोवलय.
**सुरियत्थङ्गम**–(पु.) सूर्यास्त.
**सुरिय-रंसि**–(स्त्री.) सूर्य किरणे.
**सुरिय-रस्मि**–(स्त्री.) सूर्य रश्मी, सूर्य किरणे.
**सुरियुग्गमन**–(पु.) सूर्योदय, सूर्याचे आगमन.
**सुरुचि जातक**–सुरुचि कुमार आणि सुमेधाच्या गृहस्थी जीवनाची कथा-(४८६).
**सुरुङ्गा**–(स्त्री.) तुरुंग.
**सुरूसुरूकारकं**–(क्रि. वि.) जेवताना खाताना होणारा आवाज.

**सुरूप, सुरूपी**–(वि.) सुंदर, स्वरुपवान.
**सुरूपिनी**–(स्त्री.) सुंदरी, सुंदर स्त्री.
**सुलद्ध**–(वि.) चांगला फायदा, चांगला लाभ.
**सुलभ**–(वि.) सहज मिळू शकणारे, सुलभ.
**सुलसा जातक**–सुलसा गणिकेने कृतघ्न सत्तक डाकूला टेकडीच्या दरीत ढकलून देऊन मारल्याची कथा–(४१९).
**सुव**–(पु.) पोपट.
**सुवच**–[पहा–सुब्बच].
**सुवण्ण**–(नपु.) सोने, सुवर्ण.
**सुवण्ण**–(वि.) चांगल्या रंगाचा, सुंदर, सुवर्णाचा.
**सुवण्णकार**–(पु.) सोनार.
**सुवण्ण-गब्भ**–(पु.) सोने, धनसंपत्ती ठेवण्याची सुरक्षित खोली.
**सुवण्ण-गुहा**–(स्त्री.) सोनेरी गुंफा, गुहा.
**सुवण्णता**–(स्त्री.) सुवर्णता, सोनेरी.
**सुवण्ण-पट्ठ**–(नपु.) सोन्याचा पट्टा.
**सुवण्ण-पीठक**–(नपु.) सोन्याची पेटी–(पीठिका).
**सुवण्णमय**–(वि.) सुवर्णमय, सोन्याचे बनविलेले.
**सुवण्ण-भिङ्कार**–(पु.) सोन्याची झारी.
**सुवण्ण-वण्ण**–(वि.) सोन्याच्या रंगाचा, पिवळा.
**सुवण्ण-हंस**–(पु.) सोनेरी राजहंस.
**सुवण्ण कट्टक जातक**–खेकडयाने साप आणि कावळयास ठार मारुन शेतकऱ्याचा जीव वाचविल्याची कथा–(३८६).
**सुवण्ण-भूमि**–(स्त्री.) तिसऱ्या धम्म परिषदेनंतर सोण व उत्तर स्थविरांचा प्रचाराचा प्रदेश.
**सुवण्णमिग जातक**–शिकाऱ्याने हरिणीच्या आत्मत्यागाची भावना ओळखून व प्रभावित होऊन हरीण व हरिणीस सोडून दिल्याची कथा–(३५६).
**सुवण्णहंस जातक**–लोभी पत्नीने नवऱ्याने आणलेल्या राजहंसाची सर्व पंखे उपटून घेण्याची इच्छा दर्शविल्याची कथा–(१३६).
**सुवत्थापित**–(वि.) सुनिश्चित.
**सुवत्थि**–(नपु.) स्वस्ति, कल्याण होवो, कल्याण मंगल.
**सुवम्मित**–(कृ.) चिलखत घातलेला.
**सुवाण**–(पु.) कुत्रा.
**सुवाण-दोणि**–(स्त्री.) कुत्र्याचे भांडे, मातीचा परळ.
**सुविजान**–(वि.) सहज समजण्यासारखे.
**सुविञ्ञापय**–(वि.) सहज शिकविण्यासारखा.
**सुविभत्त**–(कृ.) योग्यप्रकारे विभक्त, व्यवस्थित.
**सुविलित्त**–(कृ.) चांगले लावले, सुगंधित केले, चोपडले.
**सुविम्हित**–(कृ.) अत्यंत चकित, आश्चर्यचकित.
**सुविसद**–(वि.) स्पष्ट, अतिस्पष्ट.
**सुवीर**–(पु.) पुत्र, मुलगा.
**सुवुट्ठिक**–(वि.) पुरेसा पाऊस, उचित वर्षा.
**सुवे**–(क्रि. वि.) उद्या येणारा.
**सुसङ्खत**–(कृ.) सुसंस्कृत, चांगला तयार केलेला.
**सुसञ्ञत**–(वि.) पूर्ण संयत, पूर्ण नियंत्रित, ताब्यात.
**सुसण्ठान**–(वि.) चांगल्या आकाराचा.
**सुसमारद्ध**–(कृ.) सुमुहूर्त, चांगली सुरवात.
**सुसमाहित**–(कृ.) पूर्ण संयमी, नियंत्रित.
**सुसमुच्छिन्न**–(कृ.) पूर्ण उपटून टाकलेला, समूळ नष्ट.
**सुसान**–(नपु.) स्मशान.
**सुसान गोपक**–(पु.) स्मशान रक्षक, स्मशान पालक, स्मशान राखणारा.
**सुसिक्खित**–(कृ.) सुशिक्षित, चांगले शिकलेला.
**सुसिर**–(नपु.) झाडाचे खिडार.
**सुसिर**–(वि.) पोकळ, छिद्रयुक्त.
**सुसीम जातक**–सुसीम राजाच्या पुरोहिताच्या पुत्राने तीन दिवसात बनारस ते तक्षशिला हा प्रवास करून हत्तिविद्या-गजविद्या-शिकून पूर्ण केल्याची कथा–(१६३).
**सुसीम जातक**–राजाने राजमातेला आपल्या पुरोहिताकडे सोपविल्याची कथा–(४११).
**सुसील**–(वि.) सुशील, शील संपन्न.
**सुसु**–(पु.) शिशु, बाल.
**सुसु**–(वि.) बाल स्वभावाचा, शिशु स्वभाववाला.
**सुसुका**–(स्त्री.) मासा.
**सुसुक्क**–(वि.) अति शुभ्र.
**सुसु नाग**–(पु.) कालाशोकचा पिता व मगध देशाचा राजा शिशुनाग.
**सुसुद्ध**–(वि.) अति शुद्ध, परिशुद्ध.
**सुस्सति**–(क्रि.) विस्कटणे, पसरणे, सुकणे.
**सुस्सि**–(पू. क्रि.) पसरले, सुकले.
**सुस्ख**–(कृ.) पसरता, सुकता.
**सुस्समान**–(कृ.) पसरण्यायोग्य, सुकविण्यायोग्य.
**सुस्सित्वा**–(पू. क्रि.) पसरून, सुकवून.
**सुस्सरता**–(स्त्री.) मधूर स्वर, सुस्वर.
**सुस्सूसति**–(क्रि.) ऐकणे.

**सुस्सूसि**–(पू. क्रि.) ऐकले.
**सुस्सन्त**–(कृ.) ऐकता.
**सुस्सूसित्वा**–(पू. क्रि.) ऐकून.
**सुस्सूसा**–(स्त्री.) ऐकण्याची इच्छा, आज्ञाधारकपणा.
**सुस्सोन्दी जातक**–सुस्सोन्दी राणी गरुडाबरोबर प्रेम करू लागल्याची कथा–(३६०).
**सुहज्ज**–(नपु.) सुहृदयता, मैत्री.
**सुहद**–(पु.) मित्र.
**सुहनु जातक**–महासोन व सुहनु या नांवाच्या घोड्यात मित्रता वाढल्याची कथा–(१५८).
**सुहित**–(वि.) संतुष्ट, तृप्त.
**सूक**–(पु.) सातूची काडी., तृण धान्याची काडी.
**सूकर**–(पु.) डुक्कर.
**सूकर-पोतक**–(पु.) डुकराचे पिल्लू.
**सूकर-मंस**–(नपु.) डुकराचे मांस.
**सूकर जातक**–डुकराने युद्धासाठी सिंहाला आव्हान दिल्याची कथा–(१५३).
**सूकरित**–(पु.) कसाई, खाटीक.
**सूचक**–(पु.) सूचना देणारा.
**सूचन**–(नपु.) सूचना.
**सूचि**–(स्त्री.) सुई, केसांत घालण्याचा चाप, बंद दरवाजास आंतून घालण्याची कडी, आडणा.
**सूचिका**–(स्त्री.) सुई, आडणा.
**सूचिकार**–(पु.) सुई बनविणारा.
**सूचि-घटिका**–(स्त्री.) आडणा बसविण्याची खोबण, आडणा अडकविण्याची साखळी.
**सूचि-घर**–(नपु.) सुई ठेवण्याची डबी.
**सुचि-मुख**–(पु.) सुईसारख्या तोंडाचा डास.
**सूचि-लोम**–(वि.) सुईसारखे कडक केस असणारा.
**सूचि-विज्झन**–(नपु.) चांभाराची अरी.
**सूचि जातक**–सोनाराने अशी सुई बनविली कि, तिने एका पाठोपाठ सात छिद्रे पडत असल्याची कथा–(३८७).
**सूजु**–(वि.) सरळ.
**सूत**–(पु.) रथ हाकणारा, कमी योग्यतेचा.
**सूति-घर**–(नपु.) सूतिका घर, प्रसूतिगृह, बाळंतिणीचे घर.
**सूद, सूदक**–(पु.) आचारी, स्वयपाकी, जेवण तयार करणारा.
**सून**–(वि.) सुजलेला, फुगलेला.
**सूना**–(स्त्री.) कसायाचा कट्टा, मांसाचे दुकान.
**सूना-घर**–(नपु.) कसाईखाना, मांसाचे दुकान.
**सूनु**–(पु.) पुत्र.
**सूप**–(पु.) कढी, अर्क, रस.
**सूपकार**–(पु.) आचारी, स्वयपाकी.
**सूपतित्थ**–(पु.) सन्मार्गी, चांगल्या मार्गाने जाणारा, सुपथिक.
**सूपधारित**–(कृ.) सुविचारी.
**सूपिक**–(पु.) आचारी, स्वयपाकी.
**सूपेय्य**–(वि.) सूप, कढी, पिण्यायोग्य, पेय्य, पातळ पदार्थ.
**सूपेय्य-पण्ण**–(नपु.) पदार्थ (खाद्य) बनविण्यासाठी वापरली जाणारी वनस्पतींची पाने.
**सूयति**–(क्रि.) ऐकणे.
**सूयि**–(पू. क्रि.) ऐकले.
**सूयन्त**–(कृ.) ऐकता.
**सूयमान**–(कृ.) ऐकण्यायोग्य, ऐकणारा.
**सूयित्वा**–(पू. क्रि.) ऐकून.
**सूर**–(वि.) शूर, बहाद्दूर, लढवैय्या.
**सूर**–(पु.) सूर्य, सूरज, शूर.
**सूरत**–(वि.) मृदु, मऊ, कोमल, दया दाखविणारा.
**सूरता**–(स्त्री.) शौर्य, बहाद्दूरी, शूरपणा.
**सूरत्त**–(नपु.) शूरता, शौर्य.
**सूर-भाव**–(पु.) शूरपणा, शौर्य.
**सुरिय**–(पु.) सूर्य, सूरज.
**सूल**–(नपु.) सूळ, शूळ, बर्ची, भाला.
**सूलारोपण**–(नपुं.) सुळावर चढविणे.
**सेफ**–(पु.) शितोडा, शिपले.
**सेख, सेक्ख**–(पु.) शिकणारा, विद्यार्थी, उन्नत्ति पथारुढ, अर्हत पदार्थापर्यंत अजून न पोहोंचलेला, शैक्ष्य.
**सेखर**–(नपु.) पुष्पमुकूट, शेखर.
**सेखिय**–(वि.) धार्मिक जीवनाच्या अभ्यासाविषयी.
**सेग्गु जातक**–एका वडिलाने सेग्गु नावाच्या आपल्या मुलीच्या शीलाची परीक्षा घेतल्याची कथा–(२१७).
**सेचन**–(नपु.) सिंचन, पाणी शिंपणे, शेतीस पाणी देणे.
**सेट्ठ**–(वि.) श्रेष्ठ.
**सेट्ठतर**–(वि.) अधिक श्रेष्ठ, थोर.
**सेट्ठ सम्मत**–(वि.) श्रेष्ठ मानले, मान्यता प्राप्त.
**सेट्ठि, सेट्ठी**–(पु.) शेठ, श्रीमंत व्यापारी.
**सेट्ठिट्ठान**–(नपु.) श्रेष्ठत्त्व, श्रेष्ठपद, शेठची गादी, श्रेष्ठीपद.
**सेट्ठि-जाया**–(स्त्री.) शेठची पत्नी, शेठानी.

**सेट्ठिय-भरिया**–(स्त्री.) शेठची भार्या, शेठची बायको.
**सेणि**–(स्त्री.) श्रेणी, योग्यता, दर्जा, प्रत्येक धंदेवाल्यांची वेगवेगळी सभा-बैठक.
**सेणिय**–(पु.) सभेचा पुढारी, म्होरक्या, नेता.
**सेत**–(वि.) श्वेत, शुभ्र, पांढरा.
**सेत**–(पु.) पांढरा रंग.
**सेत-कुट्ठ**–(नपु.) पांढरे कोढ, पांढरा कुष्ठरोग.
**सेतच्छत्त**–(नपु.) पांढरे छत्र, पांढरे आच्छादन, पांढरा छत.
**सेत-पच्छाद**–(वि.) पांढरे उपरण, पांढरी ओढणी.
**सेत केतु जातक**–जाती अभिमानी श्वेतकेतुला एक एक चांडाळसुद्धा अस्पृश्य, वाटला नसल्याची कथा-(३७७).
**सेतट्ठिका**–(स्त्री.) वनस्पतींचा भगव्या रंगाचा रोग-कीड.
**सेति**–(क्रि.) झोपणे, निजणे.
**सेयि**–(पू. क्रि.) झोपला, निजला.
**सेन्त**–(कृ.) झोपता, निजता.
**सेमान**–(कृ.) झोपणे योग्य, निजणे योग्य, झोपणारा.
**सेयित्वा**–(पू. क्रि.) झोपून, निजून.
**सेतु**–(पु.) पूल.
**सेद**–(पु.) घाम.
**सेदक**–(वि.) घाम येताना.
**सेदन**–(नपु.) वाफेवर शिजविणे.
**सेदावक्खित**–(वि.) घामाघूम, फार घाम आलेला.
**सेदेति**–(क्रि.) घाम येणे, वाफ तयार करणे.
**सेदेसि**–(पू. क्रि.) घाम आला, वाफ बनविली.
**सेदित**–(कृ.) घाम येता, वाफ बनविता.
**सेदेत्वा**–(पू. क्रि.) घाम येऊन, वाफ बनवून.
**सेन, सेनक**–(पु.) घार, बहिरी ससाणा.
**सेना**–(स्त्री.) फौज, सैन्य, पलटण.
**सेना-नायक, सेनापति**–(पु.) सैन्य संचालक, सेना-नायक, सेनापती.
**सेनानी**–(पु.) सैन्याधिपती.
**सेनापच्च**–(नपु.) सेनापतीचे कार्यालय.
**सेना-व्यूह**–(पु.) सैन्याची चक्राकार रचना, चक्रव्यूह.
**सेनासन**–(नपु.) शयनासन, झोपण्याचा पलंग, निवास-स्थान, झोपण्याची व्यवस्था, झोपण्याची जागा.
**सेनासन-गाहापक**–(पु.) झोपण्याच्या खोलीतील व्यवस्था करणारा.
**सेनासन-चारिका**–(स्त्री.) एका अंथरुणावरून (शयनासनावरून) दुसऱ्या अंथरुणावर (शयनासनावर) जाणे.
**सेनासन-पञ्ञापक**–(पु.) अंथरुणांची-शयनासनांची व्यवस्था करणारा.
**सेफालिका**–(स्त्री.) निर्गुडी, निळ्या बारीक फळांचे झुडूप, निरगुडी, शेफालिका.
**सेम्ह**–(नपु.) श्लेष्म, कफ.
**सेय्य**–(नपु.) अधिक श्रेष्ठ, श्रेष्टतर.
**सेय्य जातक**–एका मंत्र्याने राजाच्या रंगमहालांत गडबड केली. हे पाहून राजाने त्याला हद्दपार केल्याची कथा-(२८२).
**सेय्यथापि**–(अ.) जसे, उदाहरणार्थ.
**सेय्यथिदं**–(अ.) खाली दाखविल्याप्रमाणे, पुढे सांगितल्यानुसार, उदाहरणार्थ.
**सेय्या**–(स्त्री.) शैय्या, सेज, झोपण्याचे अंथरुण.
**सेरिचारी**–(वि.) स्वैराचारी, स्वेच्छेनुसार, वर्तन करणारा.
**सेरिता**–(स्त्री.) स्वैर स्वभाव, स्वतंत्रतेने वागणारी वृत्ती, स्वैराचार.
**सेरिवाणिज जातक**–लोभी सेरिवा व्यापाऱ्याने स्वैराचाराने वागून स्वतःचा नाश ओढवून घेतल्याची कथा-(३).
**सेरिविहारी**–(वि.) स्वैराचाराने वागणारा.
**सेल**–(पु.) शैल, पर्वत.
**सेलमय**–(वि.) दगडी, दगडाचा बनविलेला.
**सेलेय्य**–(नपु.) शिलाजित, हिमालयात मिळणारा शीलारस, औषधी अर्क.
**सेवक**–(पु.) नोकर, सेवा करणारा, सेवक.
**सेवक**–(वि.) सेवा करत असलेला, सोबत असलेला, सेवक.
**सेवति**–(क्रि.) सेवा करणे, सोबत करणे, अभ्यास करणे.
**सेवि**–(पू. क्रि.) सेवा केली, सोबत केली, अभ्यास केला.
**सेवित, सेवेन्त**–(कृ) सेवा करता, सोबत करता, अभ्यास करता.
**सेवमान, सेवितब्ब**–(कृ.) सेवा करण्यायोग्य, सोबत करण्यायोग्य, अभ्यास करण्यायोग्य.
**सेवित्वा**–(पू. क्रि.) सेवा करून, सोबत करून, अभ्यास करून.
**सेवन**–(नपु.) संगत, सेवा, उपयोग, सोबत.
**सेवना**–(स्त्री.) संगत, सेवा, उपभोग, अभ्यास, सोबत.

**सेवा**–(स्त्री.) सेवा, चाकरी-नोकरी, काम, कार्य.

**सेवाल**–(पु.) शेवाळ, गंज.

**सेवित**–(कृ.) उपयोगात आणलेला, वापरात असलेला, अभ्यस्त, सोबतीत असलेला.

**सेवी**–(वि.) सोबत करणारा, अभ्यास करणारा, स्वीकारणारा.

**सेस**–(वि.) शेष, बाकी, शिल्लक.

**सेसेति**–(क्रि.) शिल्लक ठेवणे.

**सेसेसि**–(पू. क्रिया) शिल्लक ठेवले.

**सेसित**–(कृ.) शिल्लक ठेवता.

**सेसेत्वा**–(पू. क्रि.) शिल्लक ठेवून.

**सो**–(स. ना.) तो.

**सोक**–(पु.) शोक, दुःख.

**सोकग्गि**–(पु.) शोकाग्नी, दुःखाग्नी.

**सोक-परेत**–(वि.) शोकाकूल, दुःखी.

**सोक-विनोदन**–(नपु.) शोक दूर करणे, दुःख बाजूस ठेवणे, शोक मुक्त, दुःख मुक्त.

**सोक-सल्ल**–(नपु.) शोकरुपी शल्य.

**सोकी**–(वि.) शोक करणारा, दुःखी.

**सोख्य**–(नपु.) स्वास्थ्य, सूख, सौख्य.

**सोखुम्म**–(नपु.) सूक्ष्म, अति लहान.

**सोगन्धिक**–(नपु.) शुभ्र कमळ, श्वेत कमळ.

**सोचति**–(क्रि.) विचार करणे, चिंता करणे, पश्चाताप करणे.

**सोचि**–(पू. क्रि.) विचार केला, चिंता केली, पश्चाताप केला.

**सोचित, सोचन्त, सोचिन्तु**–(कृ.) विचार करता, चिंता करता, पश्चाताप करता.

**सोचमान, सोचितब्ब**–(कृ.) विचार करण्यायोग्य, चिंता करण्यायोग्य, पश्चाताप करण्यायोग्य.

**सोचित्वा**–(पू. क्रि.) विचार करून, चिंता करून, पश्चाताप करून.

**सोचना**–(स्त्री.) चिंता करणे, पश्चाताप करणे, चिंता, विचार.

**सोचेय्य**–(नपु.) पावित्र्य, पवित्रता.

**सोण**–(पु.) कुत्रा.

**सोणित**–(नपु.) शोणित, शोषण, रक्त.

**सोणी**–(स्त्री.) कुत्री, कमर, कटि-प्रदेश.

**सोण्ड, सोण्डक**–(वि.) दारुबाज, व्यसनी.

**सोण्डा**–(स्त्री.) हत्तीची सोंड.

**सोण्डा**–(वि.) दारुबाज स्त्री, व्यसनी स्त्री.

**सोण्डिक**–(पु., वि.) दारू विकणारा.

**सोण्डिका, सोण्डी**–(स्त्री.) डोंगरावरील पाण्याचे टाके-झरा.

**सोण्ण**–(नपु.) सुवर्ण, सोने.

**सोण्णमय**–(वि.) सुवर्णमय, सोन्याचे बनविलेले.

**सोत**–(नपु.) कान, कर्ण.

**सोत**–(पु.) स्त्रोत, धारा, प्रवाह.

**सोतद्वार**–(नपु.) कर्णेंद्रिय, कानाचे दार, कानाचे छिद्र.

**सोत-बिल**–(नपु.) कानाचे छिद्र, कानाचे भोक.

**सोतवन्तु**–(वि.) श्रोता, ऐकणारा, कान असलेला.

**सोत-विञ्ञाण**–(वि.) श्रोत्र विज्ञान.

**सोत-विञ्ञेय**–(वि.) ऐकून मिळणारे ज्ञान.

**सोतायतन**–(नपु.) कर्णेंद्रिय, कान, श्रवणेंद्रिय.

**सोतब्ब**–(कृ.) ऐकणे योग्य.

**सोतापत्ति**–(स्त्री.) धार्मिक वृत्ती स्वीकारणे, धर्मपथाचा पहिला टप्पा गाठणे, अर्हत् मार्गातील पहिली पायरी.

**सोतापन्न**–(वि.) धार्मिक पंथात दाखल होणे, श्रोतापन्न अवस्था प्राप्त झालेला.

**सोतिन्द्रिय**–(नपु.) श्रवणेंद्रिय, कान.

**सोतु**–(पु.) श्रोता, ऐकणारा.

**सोतु-काम**–(वि.) ऐकू इच्छिणारा.

**सोतुं**–(कृ.) ऐकण्यासाठी, ऐकण्याकरिता.

**सोत्थि**–(स्त्री.) स्वस्ति, कल्याणकारक, सुरक्षित, आशिर्वाद, मंगल.

**सोत्थि-कम्म**–(नपु.) आशिर्वाद देणे.

**सोत्थि-भाव**–(पु.) कल्याणकारक, कुशलता, मंगलभाव.

**सोत्थि-साला**–(स्त्री.) स्वास्थगृह, दवाखाना, रुग्णालय.

**सोदक**–(वि.) भिजलेला, ओलाचिंब.

**सोदरिय**–(वि.) एकाच मातेपोटी जन्मलेला, सख्खा, सहोदर.

**सोधक**–(वि.) स्वच्छ करणारा, शुद्ध करणारा.

**सोधन**–(नपु.) सफाई, स्वच्छता, शुद्धीकरण.

**सोधापेति**–(क्रि.) स्वच्छ करणे, शुद्ध करणे.

**सोधापेसि**–(पू. क्रि.) स्वच्छ केले, शुद्ध केले.

**सोधापित**–(कृ.) स्वच्छ करता, शुद्ध करता.

**सोधापेत्वा**–(पू. क्रि.) स्वच्छ करून, शुद्ध करून.

**सोधित**–(कृ.) स्वच्छ केलेले, शुद्ध केलेले.

**सोधेति**–(क्रि.) शुद्ध करणे.

**सोधेसि**–(पू. क्रि.) शुद्ध केले.

**सोधेन्त**–(कृ.) शुद्ध करता.

**सोधेयमान, सोधेतब्ब, सोधेयमान**–(कृ.) शुद्ध करणे योग्य.

**सोधेत्वा**–(पू. क्रि.) शुद्ध करून.

**सोनक जातक**–अरिंदम आणि सोनकाची कथा–(५२६).

**सोन-नन्द जातक**–नंदाने आपल्या आई-वडिलास कच्ची फळे आणून दिली होती. त्यामुळे त्याचा भाऊ सोनला राग आल्याची कथा–(५३२).

**सोपाक**–(पु. विशे. ना.) चांडाळ.

**सोपान**–(पु., नपु.) शिडी, जिना.

**सोपान-पन्ति**–(स्त्री.) शिड्यांची ओळ, जिन्याच्या पायऱ्या.

**सोपान-पद**–(न.) शिडीचा पहिला पायटा, जिन्याची पहिली पायरी.

**सोपान-फलक**–(नपु.) एक पायरी, एक पायटा.

**सोपान-सीस**–(नपु.) शिडीचा माथा–शेंडा.

**सोप्प**–(नपु.) झोप.

**सोब्भ**–(नपु.) खड्डा, डबरा, तळे, जलाशय.

**सोभग्ग**–(नपु.) सौभाग्य, सौंदर्य.

**सोभग्ग-पत्त**–(वि.) भाग्यवान, सुंदर.

**सोभण, सोभन**–(वि.) शोभायमान, चमकदार, सुंदर.

**सोभति**–(क्रि.) चमकणे, सुंदर दिसणे, शोभणे.

**सोभि**–(पू. क्रि.) चमकला, सुंदर दिसला, शोभला.

**सोभित, सोभन्त**–(कृ.) चमकता, सुंदर दिसता, शोभता.

**सोभमान**–(कृ.) चमकण्यायोग्य, सुंदर दिसण्यालायक, शोभून दिसणारा.

**सोभित्वा**–(पू. क्रि.) चमकून, सुंदर दिसून.

**सोभा**–(स्त्री.) शोभा, सौंदर्य.

**सोभित**–(कृ) सुशोभित, सजवलेला, सुंदर बनविलेला.

**सोभेति**–(क्रि.) चमकणे, सजविणे, सुंदर करणे, सुशोभित करणे.

**सोभेसि**–(पू. क्रि.) चमकले, सजविले, सुंदर केले, सुशोभित केले.

**सोभेन्त**–(कृ.) चमकता, सजविता, सुंदर करता, सुशोभित.

**सोभेत्वा**–(पू. क्रि.) चमकून, सजवून, सुंदर करून, सुशोभित करून.

**सोम**–(पु.) चंद्र.

**सोमदत्त जातक**–अग्नीदत्ताचा मुलगा सोमदत्त याची कथा–(२११).

**सोमदत्त जातक**–एका तपस्व्याने सोमदत्त नावाचा हत्ती पाळला होता. त्या हत्तीचे पिलू मेल्यावर त्या तपस्व्याला अतिदुःख झाल्याची कथा–(४१०).

**सोमनस्स**–(नपु.) प्रसन्नता, सुख, आनंदीमन, सौमनस्य.

**सोमनस्स जातक**–ढोंगी तपस्व्याने राजकुमार सोमनस्सला अपराधी ठरविण्याची शिकस्त केल्याची कथा–(५०५).

**सोम्म**–(वि.) सौम्य, हलका, अनुकूल, योग्य.

**सोरच्च**–(नपु.) विनम्रता, नम्रता, विनयशीलता.

**सोवग्गिक**–(वि.) स्वर्गात नेणारा, स्वर्गात घेऊन जाणारा.

**सोवचस्सता**–(स्त्री.) आज्ञाधारकपणा, विनम्रता, नम्रता, विनयशीलता.

**सोवण्ण**–(नपु.) सुवर्ण, सोने.

**सोवण्णमय**–(वि.) सुवर्ण निर्मित, सोन्याचा बनविलेला.

**सोवत्थिक**–(नपु.) स्वस्तिक.

**सोवीरक**–(पु.) कांजी, खळ, मद्य, अर्क, आसव.

**सोस**–(पु.) शोषण, चोखणे, ओढणे, वाळणे.

**सोसन**–(नपु.) वाळविणे, शोषण करणे.

**सोसानिक**–(वि.) स्मशानात राहणारा.

**सोसेति**–(क्रि.) वाळविणे.

**सोसेसि**–(पू. क्रि.) वाळविले.

**सोसित, सोसेन्त**–(कृ.) वाळविता.

**सोसेत्वा**–(पू. क्रि.) वाळवून.

**सोस्सति**–(क्रि.) ऐकणे, श्रवण करणे.

**सोहज्ज**–(नपु.) मैत्री, दोस्ती.

**स्नेह**–[पहा–सिनेह].

**स्वाकार**–(वि.) सारखा, समान, चांगल्या प्रकृतीचा.

**स्वाक्खात**–(वि.) योग्य अर्थ सांगितलेला, योग्य उपदेशिलेला.

**स्वागत**–(वि.) स्वागत, कंठस्थ, पाठ, मुखोद्गत.

**स्वागतं**–(क्रि. वि.) स्वागत करणे.

**स्वातन**–(वि.) भविष्याविषयी, उद्यासंबंधी.

**स्वातनाय**–(नपु.) चतुर्थी विभक्तिचा शब्द, उद्यासाठी, उद्याकरिता, उद्याला.

**स्वे**–(क्रि. वि.) भविष्य, उद्या.

## ह

**ह**–नागरी वर्णमालेतील, बत्तीस्सावे अक्षर, "ह".

**हज्ज**–(वि.) अतिप्रिय, प्रियतम.

**हञ्ञति**–(क्रि.) हाणणे, मारणे, नष्ट करणे.
**हञ्ञि**–(पू. क्रि.) हाणले, मारले, नष्ट केले.
**हञ्ञन्त**–(कृ.) हाणता, मारता, नष्ट करता.
**हञ्ञमान**–(कृ.) हाणण्यायोग्य, मारण्यायोग्य, नष्ट करण्यायोग्य.
**हञ्ञित्वा**–(पू. क्रि.) हाणून, मारून, नष्ट करून.
**हञ्ञन**–(नपु.) हनन, यातना देणे, ठार मारणे.
**हट**–(कृ.) घेऊन गेलेला.
**हट्ठ**–(कृ.) हृष्ट, संतुष्ट, आनंदित.
**हट्ठ-तुट्ठ**–(वि.) प्रसन्न चित्त.
**हट्ठ-लोम**–(वि.) रोमांचित.
**हठ**–(पु.) हिंसा, जिद्द.
**हत**–(कृ.) मारलेला, जखमी केलेला, नष्ट केलेला.
**हत-भाव**–(पु.) नष्ट करण्याची प्रवृत्ती.
**हतन्तराय**–(वि.) बाधा नसलेला, अबाध.
**हतावकासो**–(वि.) शुभाशुभते पलिकडे, शुद्धाशुद्धते बाहेर.
**हत्थ**–(पु.) हात, हस्त, हातभर माप, हाताचे माप.
**हत्थक**–(पु.) हत्थ्या, हत्या.
**हत्थक**–(वि.) हस्तक, हातवाला.
**हत्थकम्म**–(नपु.) शारीरिक श्रम.
**हत्थ-गत**–(वि.) हस्तगत, ताब्यात असलेला, अधिकाराखाली घेतलेला.
**हत्थ गहण**–(नपु.) हातात घेणे, हाताने धरणे.
**हत्थ गाह**–(पु.) हाताने धरलेला.
**हत्थच्छिन्न**–(वि.) हात तुटका.
**हत्थ-छेद**–(पु.) हात कापला.
**हत्थ-छेदन**–(नपु.) हात तोडणे, हात कापणे.
**हत्थ-तल**–(नपु.) तळहात, तळवा.
**हत्थ-पसारण**–(नपु.) हात पसरणे, मागणे, याचना करणे.
**हत्थ-पास**–(पु.) हाताची लांबी.
**हत्थ-वट्टक**–(पु.) हातगाडी.
**हत्थ-विकार**–(पु.) हात हालविणे, हात संचालन करणे, हाताने खुणविणे–संकेत करणे.
**हत्थ-सार**–(पु.) मौल्यवान वस्तू, चलसंपत्ति.
**हत्थापलेखन**–(नपु.) जेवणानंतर हात चाटणे.
**हत्थाभरण**–(नपु.) बाजूबंद, दंडावरील दागिना, तोळबंद.
**हत्थत्थर**–(पु.) हत्तीची पायघोळ झूल.
**हत्थाचरिय**–(पु.) हत्तीला शिकविणारा.
**हत्थारोह**–(पु.) माहूत, महावत, हत्तीची देखरेख करणारा.
**हत्थि**–(पु.) हत्ती या शब्दाचे ऱ्हस्वरुप.
**हत्थि-कन्त-वीणा**–(स्त्री.) हत्तीसाठी वाजविण्याची वीणा.
**हत्थि-कलभ**–(पु.) हत्तीचे पिल्लू.
**हत्थि-कुम्भ**–(पु.) हत्तीचे मस्तक, डोके.
**हत्थि-कुल**–(नपु.) हत्ती जात.
**हत्थिक्खन्ध**–(पु.) हत्तीची पाठ.
**हत्थि-गोपक**–(पु.) महावत, माहूत, महात.
**हत्थि-दन्त**–(पु., नपुं.) हत्तीचा दात, हस्तीदंत.
**हत्थि-दमक**–(पु.) हत्तीला ताब्यात ठेवणारा.
**हत्थि-दम्म**–(पु.) शिकविलेला, हत्ती.
**हत्थि-पद**–(नपु.) हत्तीचा पाय.
**हत्थि-पाकार**–(पु.) हत्तीच्या आकाराची खोदलेली भिंत, भिंतीवर हत्तीचे कोरलेले चित्र.
**हत्थिप्पभिन्न**–(वि.) खवळलेला हत्ती.
**हत्थि-बन्ध**–(पु.) महावत, हत्ती राखणारा, हत्ती बांधणारा.
**हत्थि-मण्ड**–(पु.) महावत.
**हत्थि-मत्त**–(वि.) हत्तीसारखा मोठा, हत्ती एवढा मोठा.
**हत्थि-मारक**–(पु.) हत्तीची शिकार करणारा.
**हत्थि-यान**–(नपु.) हत्तीचे वाहन, हत्ती हे वाहन.
**हत्थि-युद्ध**–(नपु.) हत्तींचे युद्ध, हत्तींची झुंज.
**हत्थि-रूपक**–(नपु.) हत्तीचे चित्र.
**हत्थि-लेण्ड**–(पु.) हत्तीची विष्ठा, हत्तीची लीद, हत्तीची लेंडी.
**हत्थि-लिङ्ग-सकुण**–(पु.) हत्तीच्या सोंडेच्या आकाराची चोच असलेला गिधाड.
**हत्थि-साला**–(स्त्री.) हत्ती शाळा, हत्ती बांधण्याचे ठाण.
**हत्थि-सिप्प**–(नपु.) हत्ती शिल्प.
**हत्थि-सोण्डा**–(स्त्री.) हत्तीची सोंड.
**हत्थिनी**–(स्त्री.) हत्तीण.
**हत्थी**–(पु.) हत्ती.
**हदय**–(नपु.) हृदय.
**हदयङ्गम**–(वि.) आकर्षक, मनमोहक, अनुकूल, हृदयंगम.
**हदय-मंस**–(नपु.) हृदयाचे मांस.
**हदय-वत्थु**–(नपु.) हृदयाचे सार.
**हदय-संताप**–(पु.) हृदयाचा संताप-राग, पश्चाताप.
**हदयस्सित**–(वि.) हृदयासंबंधी.

**हदय-निस्सित**–(वि.) हृदय आश्रित, मनाची समजूत.
**हनति, हन्ति**–(क्रि.) मारणे, जखमी करणे, धक्का मारणे.
**हनि**–(पू. क्रि.) मारले, जखमी केले, धक्का मारला.
**हत, हनन्त, हन्तु, हनिन्तु**–(कृदन्त) मारता, जखमी करता, धक्का मारता.
**हनमान, हन्तब्ब, हनितब्ब**–(कृ.) मारणे योग्य, जखमी करणे योग्य, धक्का मारणे योग्य.
**हनित्वा, हन्त्वा**–(पू. क्रि.) मारून, जखमी करून, धक्का मारून.
**हनन**–(न.) मारणे, धक्का देणे, ठोकरणे, ठार करणे, नष्ट करणे.
**हनु, हनुका**–(स्त्री.) दाढ, हनुवट, दाढी.
**हन्तु**–(पु.) ठार मारणारा, मारेकरी, ठोकरणारा.
**हन्त्वा**–(पू. क्रि.) मारून टाकून, ठार करून.
**हन्द**–(अव्यय) ठीक, आता माझ्याकडे लक्ष द्या, या अर्थाचे अव्यय.
**हम्भो**–(संबोधन) लोकांना उद्देशून, अहो.
**हम्मिय**–(नपु.) अनेक मजली इमारत.
**हय**–(पु.) घोडा, अश्व.
**हय-पोतक**–(पु.) घोड्याचे शिंगरू.
**हय-वाही**–(वि.) घोडागाडी, रथ, बग्गी, टांगा.
**हयानिक**–(पु., नपु.) घोडेस्वार, घोड्यावरील सैनिक.
**हर**–(वि.) घेऊन जाणारा, हरण करणारा, आणणारा
**हरण**–(नपु.) नेणे, घेऊन जाणे.
**हरणक**–(वि.) हरण करणारा, नेणारा, घेऊन जाणारा.
**हरति**–(क्रि.) हरण करणे, नेणे, घेऊन जाणे, चोरणे, लुटणे.
**हरि**–(पू. क्रि.) हरण केले, नेले, घेऊन गेला, चोरले, लुटले.
**हट, हरन्त, हरितुं**–(कृ.) हरण करता, नेता, घेऊन जाता, चोरता, लुटता.
**हरमान**–(कृ.) हरण्यायोग्य, नेण्यायोग्य, घेऊन जाण्यायोग्य, चोरण्यायोग्य, लुटण्यायोग्य.
**हरित्वा**–(पू. क्रि.) हरून, नेऊन, घेऊन जाऊन, चोरून, लुटून.
**हरायति**–(क्रि.) लाजणे, चिंता करणे.
**हरायि**–(पू. क्रि.) लाजले, चिंता केली.
**हरायत**–(कृ.) लाजता, चिंता करता.
**हरायित्वा**–(पू. क्रि.) लाजून, चिंता करून.
**हरापेति**–(क्रि.) घेऊन जाणे.
**हरापेसि**–(पू. क्रि.) घेऊन गेला.
**हरापित**–(कृ.) घेऊन जाता.
**हरापेत्वा**–(पू. क्रि.) घेऊन जाऊन.
**हरिण**–(नपु.) मृग, हरिण.
**हरित**–(वि.) हिरवा, ताजा.
**हरित**–(नपु.) भाजीपाला.
**हरितत्त**–(नपु.) हरितपणा, हिरवळ, हिरवेपणा.
**हरितब्ब**–(कृ.) घेऊन जाण्यायोग्य.
**हरिताल**–(नपु.) पिवळा हरताल, पिवळ्या रंगाचा खनिज पदार्थ.
**हरितु**–(पु.) घेऊन जाणारा.
**हरित्तच**–(वि.) सोनेरी रंगाचा.
**हरिस्सवण**–(वि.) सोनेरी चमक असलेला.
**हरितक**–(नपु.) हिरडा.
**हरीतकी**–(स्त्री.) हिरडा.
**हरे**–(संबोधन) हे, अहो.
**हल**–(नपु.) औत, नांगर.
**हलं**–(अ.) पर्याप्त, प्राप्त, योग्य.
**हलाहल**–(नपु.) विष, हलाहल.
**हलिद्दा**–(स्त्री.) हळद.
**हलिद्दी**–(स्त्री.) हळद, हळदी.
**हवे**–(अ.) निश्चित, निश्चयाने.
**हव्य**–(नपु.) आहुती.
**हसति**–(क्रि.) हसणे.
**हसि**–(पू. क्रि.) हसला.
**हसित, हसन्त**–(कृ.) हसता.
**हसमान, हसितब्ब**–(कृ.) हसण्यायोग्य.
**हसित्वा**–(पू. क्रि.) हसून.
**हसन**–(नपु.) हास्य, हसे.
**हसित**–(कृ.) (नपुं.) हसला, हास्य.
**हसितुप्पाद**–(पु.) हास्य, हसे.
**हस्स**–(नपु.) चेष्टा-मस्करी, विनोद, हर्ष.
**हंस**–(पु.) हंस.
**हंस-पोतक**–(पु.) हंसाचे पिल्लू.
**हंसति**–(क्रि.) रोमांचित होणे, शहारणे.
**हंसि**–(पू. क्रि.) रोमांचित झाला, शहारला.
**हंसत**–(कृ.) रोमांचित होता, शहारता.
**हंसित्वा**–(पू. क्रि.) रोमांचित होऊन, शहारून.
**हंसन**–(नपु.) रोमांचित होणे, शहारणे.
**हंसी**–(स्त्री.) हंसिनी, हंसाची मादी.
**हंसेति**–(क्रि.) हसविणे.

हा–(अ.) दुःख, दुःखोद्गार.
हाटक–(नपु.) सोने, सुवर्ण.
हातब्ब–(कृ. त्याज्य, टाकण्यायोग्य.
हातुं–(कृ.) त्यागण्यासाठी, सोडण्यायोग्य.
हानभागिय–(वि.) सोडण्यासारखे.
हानि–(स्त्री.) नुकसान, तोटा, त्रास, हानी.
हापक–(वि.) नुकसानकारक, हानी करणारा, तोटा करणारा, त्रास देणारा.
हापन–(नपु.) हानी, तोटा, नुकसान.
हापेति–(क्रि.) उपेक्षा करणे, वेळ लावणे, कमी करणे.
हापेसि–(पू. क्रि,) उपेक्षा केली, वेळ लावला, कमी केले.
हापित, हापेन्त–(कृदन्त) उपेक्षा करता, वेळ लावता, कमी करता.
हापेत्वा–(पू. क्रि.) उपेक्षा करून, वेळ लावून, कमी करून.
हायति–(क्रि.) कमी करणे, व्यर्थ घालविणे.
हायि–(पू. क्रि.) कमी केले, व्यर्थ घालविले.
हीन, हायन्त–(कृ.) कमी करता, व्यर्थ घालविता, हीन.
हायमान–(कृ.) कमी करणे योग्य, व्यर्थ घालविणे योग्य.
हायित्वा–(पू. क्रि.) कमी करून, व्यर्थ घालवून.
हायन–(नपु.) कमी, उणीव, ऱ्हास, वर्ष, साल.
हायी–(वि.) सोडणारा, त्यागी.
हार–(पु.) फुलांची अगर मोत्यांची माळ, फुलांचा मोत्याचा हार.
हारक–(वि.) हटविणारा, घेऊन जाणारा, हरण करणारा.
हारिका–(स्त्री.) हटविणारी, घेऊन जाणारी, हरण करणारी स्त्री.
हारिय–(वि., कृ.) घेऊन जाण्यायोग्य, हरण करण्यालायक.
हास–(पु.) हास्य, हसे.
हासकर–(वि.) हास्यकारक, आनंददायक.
हासेति–(क्रि.) हसविणे, प्रसन्न करणे, आनंदित करणे.
हासेसि–(पू. क्रि.) हसविले, आनंदित केले, प्रसन्न केले.
हासित, हासेन्त–(कृ.) हासविता, आनंदित करता, प्रसन्न करता.
हासयमान–(कृ.) हसविण्यायोग्य, आनंदित करणे योग्य.
हासेत्वा–(पू. क्रि.) हासवून, आनंदित करून, प्रसन्न करून.

हि–(अ.) निश्चित, वास्तविक, सुद्धा.
हिक्का–(स्त्री.) उचकी.
हिङ्गु–(नपु.) हिंग.
हिङ्गुसक–(नपु.) कुंकू, टिळा.
हित–(नपु.) फायदा, चांगुलपणा, हित.
हित–(वि.) उपयोगी, उपयुक्त.
हित–(पु.) मित्र.
हितकर–(वि.) फायदा करणारा, हित करणारा.
हितावह–(वि.) फायदेशिर, फायदा करणारे.
हितेसी–(पु.) हितैषी, हितचिंतक.
हिंताल–(पु.) खजूर.
हिम–(नपु.) बर्फ.
हिमवन्तु–(पु.) हिमालय पर्वत.
हियो–(क्रि. वि.) कालचा, भूतकाळ, निघून गेलेला.
हिरञ्ञ–(नपु.) सोने, सुवर्ण.
हिरि–(स्त्री.) लाज, लज्जा.
हिरि-कोपीन–(नपु.) लंगोटी.
हिरिमन्तु–(वि.) लाजाळू.
हिरीयति–(क्रि.) लाजणे.
हिरीयना–(स्त्री.) लाज.
हिरोत्तप्प–(नपु.) लज्जारूपी भय, पापाची लाज.
हिंसति–(क्रि.) हिंसा करणे, ठोकरणे, चिडविणे.
हिंसि–(पू. क्रि.) हिंसा केली, ठोकरले, चिडविले.
हिंसित, हिंसन्त–(कृदन्त) हिंसा करता, ठोकरता, चिडविता.
हिंसमान–(कृ.) हिंसा करण्यायोग्य, ठोकरण्यायोग्य, चिडविण्यायोग्य.
हिंसित्वा–(पू. क्रि.) हिंसा करून, ठोकरून, चिडवून.
हिंसन–(पु.) हिंसा करणे, ठोकरणे, चिडविणे.
हिंसना–(स्त्री.) हिंसा, ठोकर, चीड.
हिंसा–(स्त्री.) हिंसा, ठार मारणे, त्रास देणे, दुःखविणे.
हिंसापेति–(क्रि.) ठार मारणे, दुखविणे.
हिंसापेसि–(पू. क्रि.) ठार मारले, दुखविले.
हिंसापित–(कृ.) ठार मारता, दुखविता.
हिंसापेत्वा–(पू. क्रि.) ठार मारून, दुखवून.
हीन–(वि.) नीच, त्याज्य, कमी प्रतीचा, हीन.
हीन-जच्च–(वि.) नीच जन्मी.
हीन-विरिय–(वि.) हिम्मत हारलेला, निरुत्साही, निकामी.
हीनधिमुत्तिक–(वि.) मन्दोत्साह, नामर्द, शंढ, हिजडा.
हीयति–(क्रि.) नुकसान होणे, टाकणे.

**हीयि**–(पू. क्रि.) नुकसान झाले, टाकले.
**हीयन्त**–(कृ.) नुकसान होता, टाकता.
**हीयमान**–(कृ.) नुकसान होणे योग्य, टाकण्यायोग्य.
**हीयित्वा**–(पू. क्रि.) नुकसान होऊन, टाकून.
**हीयो**–(अ.) काल, भूतकालीन.
**हीर, हीरक**–(नपु.) खमाज रागाचा एक प्रकार, ६ + ६ + ११ मात्रागण.
**हीलन**–(नपु.) घृणा करणे, तिरस्कारणे, न आवडणे.
**हीलना**–(स्त्री.) घृणा, तिरस्कार, नावड.
**हीळेति**–(क्रि.) घृणा करणे, तिरस्कार करणे.
**हीळेसि**–(पू. क्रि.) घृणा केली, तिरस्कार केला.
**हीळित**–(कृ.) घृणा करता, तिरस्कार करता.
**हीळियमान**–(कृ.) घृणा करण्यायोग्य, तिरस्कारणे योग्य.
**हीळेत्वा**–(पू. क्रि.) घृणा करून, तिरस्कार करून.
**हुत**–(पुं.) आहुती.
**हुतासन**–(नपु.) अग्नी, यज्ञ.
**हुत्त**–(पुं.) होम केला, यज्ञ केला.
**हुत्वा**–(पू. क्रि.) होऊन.
**हुर**–(क्रि. वि.) दुसऱ्या लोकांतून, परक्यापासून.
**हे**–(अ.) संबोधन शब्द, हे, अहो, अरे.
**हेट्ठतो, हेट्ठतो**–(क्रि. वि.) खालून, खालपासून.
**हेट्ठा**–(क्रि. वि.) खाली, तळाला.
**हेट्ठा-भाग**–(पु.) खालचा भाग, तळ.
**हेट्ठा-मञ्चे**–(क्रि. वि.) बाजे खाली, खाटे खाली.
**हेट्ठिम**–(वि.) सर्वात खाली, सर्वांखालचा.
**हेट्ठक**–(वि.) कष्टप्रद, कष्टदायक, कठीण, अवघड.
**हेट्ठना, हेठना**–(स्त्री.) त्रास देणे, कष्ट देणे, सतावणे.
**हेठेति**–(क्रि.) त्रास देणे, सतावणे.
**हेठेसि**–(पू. क्रि.) त्रास दिला, सताविले.
**हेठित, हेठेन्त**–(कृ.) त्रास देता, सताविता.
**हेठेयमान**–(कृ.) त्रास देण्यायोग्य, सताविण्यायोग्य.
**हेठेत्वा**–(पू. क्रि.) त्रास देऊन, सतावून.
**हेति**–(स्त्री.) हत्यार, अस्त्र.
**हेतु**–(पु.) कारण, उद्देश, हेतु.
**हेतुक**–(वि.) कारणासंबंधी.
**हेतुप्पभव**–(वि.) कारणाने उत्पन्न, हेतुप्रभावाने, उद्देशाने.
**हेतुवाद**–(पु.) उद्देशाच्या फळाचा सिद्धांत.
**हेम**–(पु.) सोने, सुवर्ण.
**हेमजाल**–(पु.) सुवर्ण जाळे, फसवे जाळे, सोनेरी फास.
**हेमन्त**–(पु.) हेमन्त ऋतु, हिवाळा, थंडीचा मोसम.
**हेमन्तिक**–(पु.) हेमन्त ऋतुसंबंधी.
**हेमवण्ण**–(वि.) सोनेरी रंगाचा.
**हेमवतक**–(वि.) हिमालयात रहाणारा, हिमालयात वावरणारा.
**हेरञ्ञिक**–(पु.) सोनार, हिरण्णिक.
**हेला**–(स्त्री.) हालचाल, हावभाव.
**हेसा**–(स्त्री.) घोड्याचे खेंकाळणे.
**हेसा-रव**–(पु.) घोड्याच्या खेंकाळण्याचा आवाज.
**होती**–(क्रि.) होणे, असणे.
**अहोसि**–(पू. क्रि.) होता, असलेला.
**होन्त**–(कृ.) होता, असता.
**होतब्ब**–(कृ.) होणे योग्य, असणे योग्य.
**होतुं**–(कृ.) होतां, असता.
**अहोसित्वा**–(पू. क्रि.) होऊन, असून.
**होम**–(नपु.) आहुति, पेटविणे, जाळणे.
**होम-दब्बि**–(स्त्री.) होमाची जागा, यज्ञाचा कुंड, यज्ञकुंड, हवनाचा चमचा.
**होरा**–(स्त्री.) घंटा, भविष्य.
**होरा-पाठक**–(पु.) ज्योतिषी, भविष्यवादी.
**होरा-यन्त**–(पु.) मोठे घडचाळ.
**होरा-लोचन**–(पु.) वेळ दर्शक, समय दर्शक, घडचाळ.

"साधु–साधु–साधु !"

# अंक व अंकवाचक शब्द

| | |
|---|---|
| १–एक. | ३९–एकूनचत्तालीसति. |
| २–द्वि,द्वे. | ४०–चत्तालीसति. |
| ३–ति. | ४१–एकचत्तालीसति. |
| ४–चतु. | ४२–द्वेचत्तालीसति. |
| ५–पञ्च. | ४३–तिचत्तालीसति. |
| ६–छ. | ४४–चतुचत्तालीसति. |
| ७–सत्त. | ४५–पञ्चचत्तालीसति. |
| ८–अट्ठ. | ४६–छचत्तालीसति. |
| ९–नव. | ४७–सत्तचत्तालीसति. |
| १०–दस. | ४८–अट्ठचत्तालीसति. |
| ११–एकादस. | ४९–एकूनपञ्ञासति. |
| १२–द्वादस, बारस. | ५०–पण्णास, पञ्ञासति. |
| १३–तेरस-तेलस. | ५१–एकपञ्ञासति. |
| १४–चुद्दस, चतुद्दस. | ५२–द्विपञ्ञासति. |
| १५–पञ्चदस, पण्णरस. | ५३–तिपञ्ञासति. |
| १६–सोलस. | ५४–चतुपञ्ञासति. |
| १७–सत्तरस, सत्तदस. | ५५–पञ्चपञ्ञासति. |
| १८–अट्ठारस, अट्ठादस. | ५६–छपञ्ञासति. |
| १९–एकूनवीसति. | ५७–सत्तपञ्ञासति. |
| २०–वीसति. | ५८–अट्ठपञ्ञासति. |
| २१–एकवीसति. | ५९–एकूनसट्ठि. |
| २२–द्वावीसति, द्वेवीसति. | ६०–सट्ठि. |
| २३–तेवीसति. | ६१–एकसट्ठि. |
| २४–चतुवीसति. | ६२–द्विसट्ठि. |
| २५–पञ्चवीसति. | ६३–तिसट्ठि. |
| २६–छब्बीसति. | ६४–चतुसट्ठि. |
| २७–सत्तवीसति. | ६५–पञ्चसट्ठि. |
| २८–अट्ठवीसति. | ६६–छसट्ठि. |
| २९–एकूनतिंसति. | ६७–सत्तसट्ठि. |
| ३०–तिंसति. | ६८–अट्ठसट्ठि. |
| ३१–एकतिंसति. | ६९–एकून सत्तति. |
| ३२–बत्तिंसति. | ७०–सत्तति. |
| ३३–तेत्तिंसति. | ७१–एकसत्तति. |
| ३४–चतुत्तिंसति. | ७२–द्विसत्तति. |
| ३५–पञ्चतिंसति. | ७३–तिसत्तति. |
| ३६–छत्तिंसति. | ७४–चतुसत्तति. |
| ३७–सत्ततिंसति. | ७५–पञ्चसत्तति. |
| ३८–अट्ठतिंसति. | ७६–छसत्तति. |

## अंक व अंकवाचक शब्द—समाप्त

| | |
|---|---|
| ७७—सत्तसत्तति. | ९४—चतु नवुति. |
| ७८—अठसत्तति. | ९५—पञ्च नवुति. |
| ७९—एकूनासीति. | ९६—छनवुति. |
| ८०—असीति. | ९७—सत्त नवुति. |
| ८१—एक असीति. | ९८—अठ्ठनवुति. |
| ८२—द्वि असीति. | ९९—नवनवुति, एकून सतं. |
| ८३—ति असीति. | १००—सतं |
| ८४—चतु असीति. | २००—द्विसतं. |
| ८५—पञ्च असीति. | ९००—नवसतं. |
| ८६—छ असीति. | १,०००—सहस्सं. |
| ८७—सत्त असीति. | १०,०००—दस सहस्सं, नहुतं. |
| ८८—अठ्ठ असीति. | १००,०००—सत सहस्सं, लक्खं. |
| ८९—एकून नवुति. | १०,००,०००—दस लक्खं. |
| ९०—नवुति. | १,००,००,०००—कोटि. |
| ९१—एक नवुति. | १०,००,००,०००—दस कोटि. |
| ९२—द्विनवुति, द्वानवुति. | १००,००,००,००० सत कोटि. |
| ९३—तिनवुति. | |

## परिशिष्ट (व्यक्ति-स्थान)


| | | | |
|---|---|---|---|
| अकनिठ्ठदेव | १. | अमस्सुक | ४३. |
| अक्कोस, भारद्वाज | २. | अमिताभ | ४३. |
| अग्गिक भारद्वाज | ४. | अमिता | ४३. |
| अग्गि ब्रह्मा | ४. | अमितोदन | ४३. |
| अङ्गिरस | ४. | अम्बजातक | ४४. |
| अङ्गुलिमाल | ४. | अम्ब चोर | ४४. |
| अचिरवति | ५. | अम्बपाली | ४४. |
| अजातसत्तु | ६. | अम्बा | ४४. |
| अज्जुन | ६. | अम्म | ४४. |
| अञ्ञात कोण्डञ्ञ | ८. | अयकूट | ४५. |
| अट्ठिसेन | ८. | अय्य-पुत्त | ४५. |
| अति देव | ९. | अय्यका, अय्यिका | ४५. |
| अतिभगिनी | १०. | अय्या | ४५. |
| अतिवाहक | ११. | अरञ्खजातक | ४६. |
| अत्थसालिनी | १३. | अरति | ४६. |
| अत्थस्स | १३. | अरहध्वज | ४६. |
| अनधिवर | १६. | अरिय | ४७. |
| अनागतवंस | १७. | अरिय सच्च | ४७. |
| अनुथेर | २१. | अरुण | ४७. |
| अनुपिय | २२. | अलम्बुसा | ४८. |
| अनुबुद्ध | २३. | अलीनचित्त | ४८. |
| अनुरुद्ध | २४. | अल्लकप्प | ४८. |
| अनोम | २६. | अवचरक | ४८. |
| अनोमा | २६. | अवतार | ५०. |
| अन्धक-विन्द | २८. | [illegible]नि | ५०. |
| अपण्णक | २९. | अव[illegible] (अवंति) | ५२. |
| अपरंत | ३०. | अविदुरे | ५२. |
| अपलिबुद्ध | ३०. | अविवट्ह | ५३. |
| अब्भुत धम्म | ३५. | अविहिंसा | ५३. |
| अभिजन | ३६. | अवीचि | ५३. |
| अभिधम्म | ३७. | असठ | ५४. |
| अभिधान[illegible] दीपिका | ३७. | असदिस | ५४. |
| अभिमार | ३९. | असद्धम्म | ५४. |
| अभियुञ्जन | ३९. | असनि | ५५. |
| अभिसङ्खार | ४१. | असपत्त | ५५. |
| अभिसम्बुद्ध | ४२. | असप्पुरिस | ५५. |
| अमत | ४२. | असमण | ५५. |
| अमतण | ४२. | संखशेठ | ५५. |

## परिशिष्ठ (व्यक्ति-स्थान)—चालू


| | | | |
|---|---|---|---|
| असातरूपजातक | ५६. | इन्द | ७९. |
| असित | ५६. | इन्दपत्त | ७९. |
| असिताभु | ५६. | इरू | ८०. |
| असुर | ५६. | इल्लीस | ८०. |
| असोक | ५७. | उक्कल | ८३. |
| असोकाराम | ५७. | उच्चालिङ्ग | ८५. |
| अस्समेध | ५७. | उज्जेनी | ८६. |
| अस्ससेना | ५७. | उण्णा | ८७. |
| अस्सक | ५७. | उतुनी | ८७. |
| अंसु | ५९. | उत्तरकुरु | ८८. |
| अंसुमाली | ५९. | उत्तर पाञ्चाल | ८८. |
| आखु | ६०. | उत्तरा | ८८. |
| आगन्तुक | ६१. | उत्तरानन्द माता | ८८. |
| आगाक | ६१. | उत्तरापथ | ८८. |
| आचरिय | ६१. | उदान | ९०. |
| आजञ्ञ | ६२. | उदुम्बर | ९१. |
| आजिवक | ६२. | उद्दक राम पुत्त | ९१. |
| आट | ६२. | उपतिस्स | ९५. |
| आतुमा | ६३. | उपवत्त, उपवत्तन | १००. |
| आदिच्च | ६३. | उपसम्पदा | १००. |
| आदित्त | ६३. | उपसेनिया | १०२. |
| आनन्द | ६४. | उपालि | १०३. |
| आपण | ६५. | उपासक | १०४. |
| आपादक | ६५. | उपासिका | १०४. |
| आपादिका | ६५. | उपोसथ | १०४. |
| आभाकर | ६६. | उप्पब्बजित | १०५. |
| आमगन्ध | ६७. | उप्पलवण्णा | १०५. |
| आमा | ६७. | उम्मदन्ती | १०८. |
| आयाचिका | ६८. | उरग जातक | १०९. |
| आरक्खक | ६९. | उरुवेलकप्प | १०९. |
| इट्ठिय | ७७. | उरुवेला | १०९. |
| आलकमंदा | ७०. | उसभ | ११०. |
| आलकमंदा | ७१. | उसुकार | ११०. |
| आळवी | ७२. | उळुराज | १११. |
| आळार कालाम | ७२. | एकक्खर कोस | ११३. |
| आसंक | ७४. | एरावण | ११५. |
| आसभ | ७५. | एसिकत्थम्भ | ११६. |
| आसिलेसा | ७५. | ओकास | ११७. |

## परिशिष्ट (व्यक्ति-स्थान)—चालू


ओदात-कसिण-वसन १२०.
ओरस १२२.
ओसधीस १२४.
ओहीयन १२५.
ककुट्ठा १२६.
कङ्खावितरणी १२७.
काच्चायन १२७.
कजङ्गल १२७.
कटाह १२८.
किन्नरा-राणी १३०.
कथावत्थु १३३.
कपि १३५.
कपिलवत्थु १३५.
कप्पिय भाण्ड १३६.
कम्बोज १३७.
कम्मासदम १३९.
कलन्दक निवाप १४०.
कलसिगाम १४१.
कल्याणी १४२.
काक १४३.
काकति १४४.
कालिङ्ग १४९.
कासि १४९.
कूट १४९.
काळकण्णी १५०.
कालाम १५०.
कुणाल १५५.
कुद्दाल १५६.
कुमारपञ्ह १५७.
कुरु १५८.
कुसिनारा १५९.
केलास १६१.
केसधातु १६१.
कोरव्य, कोरब्य १६३.
कोलिय १६४.
कोसम्बी १६४.
खत्तधम्म १६६.
खीणासव १६९.
खुद्दक-निकाय-पाठ १७०.
गग्गरा-राणी १७२.
गङ्गा १७२.
गणिका १७३.
गण्डम्ब १७३.
गन्धकुटि १७४.
गन्धवंस १७५.
गन्धार १७५.
गया १७६.
गिज्झकूट, गृध्रकूट १७९.
सुपत्त १७९.
गुत्तिल १८१.
मूसिल १८१.
गोकुलिक १८३.
गोतम १८३.
गोधावरी (गोवावरी) १८३.
घोसिताराम १८७.
चण्डपज्जोत (चंडप्रद्योत) १८९.
चण्डासोक १८९.
चित्रकूट १९१.
चम्पा १९२.
चरियापिटक १९२.
चित्त-सम्भूत १९४.
चीवर १९६.
चुन्द १९६.
चोलरठ्ठ १९९.
छन्न २०१.
जम्बुदीप २०६.
जिन २१०.
जिन-पुत्त २१०.
जीवन २११.
जुण्ह २१२.
जेतवन २१२.
जेतुत्तर २१३.
ठित्त २१६.
तक्कसिला, तक्षशिला २१८.
तण्हा २२०.
तनय, तनुज २२२.

## परिशिष्ठ (व्यक्ति-स्थान)–चालू


| | |
|---|---|
| तनया, तनुजा | २२२. |
| तपस्सु | २२३. |
| तपोदा | २२३. |
| तम्बपण्णि | २२४. |
| ताल | २२५. |
| तिदिवाधार | २२७. |
| तिदिवादिभू | २२७. |
| तिपिटक | २२७. |
| तुसित | २३१. |
| तेजोकसीन, तेजोकसिण | २३२. |
| थुति-पाठक | २३५. |
| थूण (स्थानेश्वर) | २३६. |
| थूप | २३६. |
| थेय्य संवासक | २३७. |
| थेर | २३७. |
| दण्डपाणि | २३९. |
| दन्तपुर | २४०. |
| दनु | २४०. |
| रोहित | २४१. |
| दमिळ | २४१. |
| दरीमुख | २४१. |
| दळहधम्म | २४२. |
| दसण्ण | २४२. |
| दस्सु | २४३. |
| दाढा-धातु | २४३. |
| दानव | २४४. |
| दायज्ज | २४४. |
| दायाद | २४४. |
| दिगम्बर | २४५. |
| दिन्नक | २४७. |
| दीघ निकाय | २४८. |
| दीपङकर | २४८. |
| दीपवंस | २४९. |
| दुःख निरोध गमिनी पटिपदा | २४९. |
| दुमिन्द | २५३. |
| दुय्योधन | २५३. |
| दुहितु | २५४. |
| देव | २५५. |
| देव-परिसा | २५५. |
| देवदत्त | २५६. |
| देवदह | २५६. |
| देवानम्पिय तिस्स | २५६. |
| देवी | २५६. |
| देसना | २५७. |
| दोण | २५७. |
| द्वारपाल | २५८. |
| द्विप | २५९. |
| धजाहट | २६०. |
| धनञ्जय | २६१. |
| धम्म | २६१. |
| धम्म-चक्क | २६२. |
| धम्मपद | २६३. |
| धम्मराजा | २६४. |
| धम्मसङ्गणि | २६४. |
| धम्म सेनापति | २६४. |
| धव | २६५. |
| धातु कथा | २६५. |
| धुरंधर | २६७. |
| धूमकेतु | २६८. |
| नकुल | २६९. |
| नक्क | २६९. |
| नगरगुत्तिक | २६९. |
| नगर सोभिनी | २६९. |
| नग्ग-समण | २६९. |
| नत्थिकवादी | २७१. |
| नन्दथेर | २७१. |
| नर्म्मदा | २७३. |
| नरवीर | २७३. |
| नरसीह | २७३. |
| नरुत्तम | २७४. |
| नवक | २७४. |
| नहापित | २७५. |
| नळनिका | २७५. |
| नागदीप | २७५. |
| नागसेन | २७६. |
| मिलींद | २७६. |

## परिशिष्ठ (व्यक्ति-स्थान)—चालू


| | | | |
|---|---|---|---|
| पापक | २७७. | पञ्चवग्गीय | ३१७. |
| नालंदा | २७८. | पञ्चसील | ३१७. |
| नालागिरी | २७८. | पञ्चानन्तरिय | ३१७. |
| निक्खमनिय | २८०. | (पाञ्चाल) पञ्चाल | ३१८. |
| निगण्ठ | २८१. | पञ्ञा | ३१८. |
| निगण्ठ नाथ पुत्त | २८१. | पञ्ह | ३१९. |
| निग्रोध | २८२. | पटिपत्ति | ३२५. |
| निघण्डु, निघण्टु | २८३. | पटिपुग्गल | ३२६. |
| निचुल (मुचलिंद) | २८३. | पटिबुद्ध | ३२६. |
| निज्झान | २८४. | पटिसम्भिदामग्ग | ३३१. |
| निदाघ | २८६. | पट्ठान-पाली | ३३३. |
| निदान कथा | २८६. | पट्ठानप्पकरण | ३३३, |
| निन्नगा | २८८. | पठवी-कम्पन | ३३४. |
| निब्बाण | २९१. | पठवी-कसिण | ३३४. |
| निमीराजा | २९२. | पंण्डक | ३३५. |
| निय्यातु | २९५. | पण्डव | ३३५. |
| निरय | २९५. | पबुद्ध | ३४४. |
| निरुत्ति-पटिसम्भिदा | २९६. | पभङ्कर | ३४५. |
| निरोध | २९७. | पय्यक | ३५०. |
| निसभ | २९९. | परन्तप | ३५१. |
| निसाद | २९९. | परमत्थ-जोतिका | ३५२. |
| नीति-सत्य | ३०२. | परमत्थ-दीपनी | ३५२. |
| नीप | ३०२. | परिणायक-रतन | ३५८. |
| नील-कसिण | ३०३. | परित्त, परित्ता | ३५९. |
| नेक्ख | ३०४. | परिनिब्बाण | ३६०. |
| नेक्खम्म-वितक्क | ३०४. | परियत्तिधर | ३६५. |
| नेक्खम्म-संकप्प | ३०४. | परियत्ति धम्म | ३६५. |
| नेतु | ३०४. | परियत्ति सासन | ३६५. |
| नेरञ्जरा, नेरञ्जना | ३०५. | परियोसान | ३६७. |
| नेरु | ३०५. | परिवार-पालि | ३६८. |
| पकास | ३०७. | परिवेण | ३६८. |
| पकुध-कच्चायन | ३०७. | परिसा | ३६९. |
| पच्चनिक | ३१२. | परोसहस्स | ३७२. |
| पच्चन्त जनपद | ३१२. | पवत्तन | ३७४. |
| पच्चुपन्न | ३१३. | पवारणा, प्रवारणा | ३७५. |
| पच्चेकबुद्ध | ३१४. | पाटलिपुत्त | ३८२. |
| पञ्चप्पकरण | ३१७. | पाटि पद | ३८३. |
| पञ्चमहानदी | ३१७. | पाटिमोक्ख, पाटिमोक्ख | ३८३. |

## परिशिष्ठ (व्यक्ति-स्थान)—चालू


पापकम्म ३८६.
पारमिता ३८८.
पाराजिक ३८८.
परिलेख्य, पारिलेय्यक ३८८.
पालि ३८९.
पावा ३८९.
पासाण-लेखा ३९०.
पिटक ३९०.
पिण्डपात ३९१.
पिण्डोल भारद्वाज ३९१.
पुग्गल-पञ्ञति ३९५.
पुण्डरिक ३९७.
पुब्बाराम, पूर्वाराम ३९९.
पुराण-वुतिधिका ४००.
पुरीस-दम्म ४०१.
पेतवत्थु ४०३.
पोट्ठपाद ४०४.
फल-चित्त ४०८.
बहि-निक्खमन ४१३.
बिन्दुसार ४१६.
बिम्बा ४१६.
बिम्बिसार ४१६.
बुद्ध ४१७.
बुद्धवंस ४१८.
बोज्झङ्ग ४१८.
बोधिसत्त ४१९.
ब्रह्मदण्ड ४२०.
भगवन्तु ४२१.
भद्दसाल ४२३.
भद्दिय ४२४.
भरुकच्छ ४२४.
भाणवार ४२६.
भोवादी ४३४.
मक्खली गोसाल ४३५.
मगध ४३६.
मग्गङ्ग ४३६.
मग्ग-भावना ४३६.
मज्झन्तिक थेर ४३९.
मज्झिम निकाय ४३९.
मज्झिम देस ४३९.
मट्ट कुण्डली ४४०.
मधुरा ४४४.
मनोपुब्बङ्गम ४४५.
महाउपासक-उपासिका ४४८.
महा सावक ४४९.
महा कस्सप थेर ४५०.
महा थूप ४५०.
महा धम्मरक्खित थेर ४५०.
महा नारद कस्सप थेर ४५१.
महापज प्रजापति ४५१.
महामाया ४५१.
महा मोग्गलान थेर ४५१.
महा रक्खित थेर ४५१.
महारट्ठ ४५२.
महावंस ४५२.
महावग्ग ४५२.
महाविहार ४५२.
महासांधिक ४५२.
महिंसासक ४५३.
महिंद (महिन्द्र) ४६३.
मागधी ४५४.
मातली ४५४.
माया (महामाया) ४५६.
मार ४५६.
मिगार ४५८.
मिच्छा ४५८.
मिथिला ४५९.
मिलिन्द ४६०.
मुचलिन्द ४६१.
मुसा ४६४.
मेण्डक ४६६.
मोग्गल्लान ४६७.
मोग्गलिपुत्त-तिस्स थेर ४६७.
यमक ४७१.
यमुना ४७१.
यसत्थेर ४७१.

## परिशिष्ठ (व्यक्ति-स्थान)—चालू


| | |
|---|---|
| याम-कालिक | ४७३. |
| युगन्धर | ४७३. |
| योगन धम्म-रक्खित थेर | ४७५. |
| रक्खित थेर | ४७६. |
| रगा | ४७६. |
| रति | ४७८. |
| रसवहिनी | ४८०. |
| राजगह, राजगृह | ४८२. |
| राजायतन | ४८२. |
| रामगाम | ४८२. |
| रामञ्ञ | ४८२. |
| राहुल थेर | ४८३. |
| राहुल माता | ४८३. |
| लिच्छवि | ४९४. |
| लुम्बिनी | ४९६. |
| लोहपासाद | ४९९. |
| लोहितुप्पादक | ४९९. |
| वङ्ग | ५००. |
| वज्जी | ५०२. |
| वज्जु | ५०२. |
| वसल | ५१२. |
| वंस | ५१४. |
| वायोकसिण | ५१७. |
| विनय | ५२६. |
| विडूडभ | ५२९. |
| विदेह | ५३१. |
| विनय-पिटक | ५३३. |
| विनायक | ५३३. |
| विनेयजन | ५३६. |
| विभङ्ग | ५४०. |
| विभङ्गप्पकरण | ५४०. |
| विमानवत्थु | ५४१. |
| विसुद्धिमग्ग | ५५१. |
| वीत-राग | ५५६. |
| वेजयन्त | ५५९. |
| वेणु-वन | ५६०. |
| वेभार | ५६१. |
| वेरञ्जा | ५६२. |
| वेरमणी | ५६२. |
| वेसाख | ५६३. |
| वेसाली | ५६३. |
| वेळुवन | ५६३. |
| सकदागामी | ५६८. |
| सङ्कस | ५७२. |
| सङ्खेय-परिवेण | ५७४. |
| सङ्गीति-कारक | ५७६. |
| संघमित्ता | ५७६. |
| संघाटि | ५७६. |
| सच्चबद्ध | ५७७. |
| सज्जुगुम्म | ५७८. |
| सञ्जय-बेलट्ठिपुत्त | ५८१. |
| सञ्जीव | ५८१. |
| सञ्ञा-क्खन्ध | ५८१. |
| सत्तपण्णी गुहा | ५८४. |
| सपदान चारिका | ५९५. |
| सपाक, सोपाक | ५९५. |
| सब्बञ्ञू | ५९६. |
| समण, समणी | ५९७. |
| समन्त पासादिका | ५९९. |
| समन्तकूट | ५९९. |
| समाधि | ६०२. |
| समानवस्सिक | ६०२. |
| सम्बुद्ध | ६१५. |
| सम्बुला | ६१५. |
| सम्मपञ्ञा | ६१८. |
| सम्मा सम्बुद्ध | ६१८. |
| सरण | ६२०. |
| सरीर-धातु | ६२१. |
| सलळवती, सलीलवती | ६२२. |
| सलळागार | ६२२. |
| सलाका | ६२२. |
| सहजातिनगर | ६२४. |
| सळायतन | ६२६. |
| संयुत्त निकाय | ६२६. |
| संवर | ६२८. |
| संवुत्त | ६२९. |

## परिशिष्ट (व्यक्ति-स्थान)—समाप्त

| | |
|---|---|
| साकिय | ६३२. |
| साकेत | ६३२. |
| सागल | ६३२. |
| सामणेर, सामणेरी | ६३५. |
| सारिपुत्त | ६३६. |
| साल-रुक्ख | ६३७. |
| सावण | ६३८. |
| सावत्थी (श्रावस्ती) | ६३८. |
| सासन | ६३८. |
| सिक्खा | ६३९. |
| सिन्धु | ६४१. |
| संसुमार गिरि | ६४८. |
| सुगत | ६४९. |
| सुजा | ६५०. |
| सुजात | ६५१. |
| सुजाता | ६५१. |
| सुञ्ञ | ६५१. |
| सुत्तनिपात | ६५२. |
| सुद्धोदन (शुद्धोदन) | ६५३. |
| सुन्दरिका | ६५३. |
| सुपटिपन्न | ६५४. |
| सुप्प बुद्ध | ६५४. |
| सुमङ्ग थेर | ६५५. |
| सुमन सामणेर | ६५५. |
| सुरसेन | ६५६. |
| सुलसा | ६५७. |
| सूकर | ६५९. |
| सोतापत्ति | ६६५. |
| सोतापन्न (श्रोतापन्न) | ६६५. |
| सोपाक | ६६६. |
| सोमदत्त | ६६६. |
| हिमवन्तु | ६७३. |

शामुको–वाय ३–२,१३०–११.९७

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.